व्यावहारिक ज्ञानकोश

भाग पांचवा

संपादक,
गणेश रंगो भिडे.

व्यावहारिक ज्ञानकोश

भाग पांचवा

मानवी संस्कृति ते ज्ञानेश्वर व
पुरवणी १ व २

अल्पं मानव जीवितं, बहुविधा विद्याः कलाः शोभनाः
तासामध्ययनं सुयत्न सुलभं, यत्नावकाशः कुतः ।
तस्मात्सद्गृहिणो यदिष्ठमुचितं ज्ञातव्यसारं मतं
तत्सर्वं व्यवहारकोश कथितं संघेन संपादितम् ॥

१३ डिसेंबर १९४०

किंमत १० रुपये

प्रकाशक–ग. रं. भिडे, मॅनेजिंग डायरेक्टर, व्यावहारिक ज्ञानकोश मंडळ, लि., कोल्हापूर.

मुद्रक–कृ. ह. सहस्रबुद्धे, प्रोप्रायटर, श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

,, बा. ना. ठकार, प्रोप्रायटर, श्रीसिद्धेश्वर प्रेस, को. यांनीं पुरवणी १।२ छापिली.

मुख्य संपादक

गणेश रंगो भिडे

या भागांतील कांहीं प्रमुख लेखक

श्री. वि. स. खांडेकर
पंडित श्री. दा. सातवळेकर
प्रो. शं. वा. दांडेकर
प्रो. रा. वि. ओतुरकर
श्री. वि. वा. पत्की
प्रो. वि. बा. आंबेकर
श्री. वि. नी. आंबडेकर
श्री. द. न. मोकाशी
डॉ. अ. ज. पाटील
श्री. शंकरराव जोशी
प्रो. वि. ह. कुलकर्णी
श्री के. रा. कुलकर्णी

संपादकीय—

ज्ञानकोश याचा अर्थच मुळी ' ज्ञान संकलन ' अर्थात् त्यांत नवे विचार ते कितीसे असणार! आजपर्यंत जें ज्ञान मनुष्यानें मिळविलें, जे जे पराक्रम गाजविले, ज्या कला वाढविल्या, जे शास्त्रीय शोध लावून मानवी आयुष्य सुखी (आणि दु:खी) करण्यासाठीं धडपड केली तिची त्रुटित पण मुद्देसूद नोंद करणें हेंच ' कोणत्याहि ' ज्ञानकोशाचें खरें खुरें कार्य आहे. कोणत्याहि हा शब्द लिहिण्याचा उद्देश हा कीं मनुष्यानें आतांपर्यंत कमावलेलें ज्ञान कोणत्याहि एका ग्रंथांत एकत्रित करणें अगदीं अशक्य आहे. अर्थात् हें ज्ञान संपादन व संकलन करतांना प्रत्येक ज्ञानकोश काराला एखाद्या विशिष्ट दृष्टीनेंच ज्ञान संकलन करावें लागलें आहे. अर्थात् प्रत्येक ज्ञानकोशाची उपयुक्तता मर्यादित झालीच आणि हें अगदीं साहजीकच आहे.

व्यावहारिक ज्ञानकोशाची रचना करतांना काय दृष्टी ठेविली आहे हें कोशाच्या पहिल्या भागाच्या आरंभीं दिलेंच आहे.

स्वतंत्र कीं भाषांतर ?

ज्ञान-संकलन हेंच ज्ञानकोशाचें मुख्य कार्य असल्यानें कोणत्याही ज्ञानकोशांत अगदीं नवें व स्वतंत्र असें कांहीं सांपडणें अशक्य आहे. आतां, कांहीं विषयांचें अगदीं स्वतंत्र किंवा केवळ ज्ञान-कोशासाठीं संशोधन केलें व माहिती जमविली तर गोष्ट निराळी.

शेक्सपियर, नेपोलियन, शिवाजी, श्रीकृष्ण यांचीं चरित्रें ज्ञानकोशांत घेतांना नवीन माहिती काय घालायची ? आहे तींच सुटसुटीत करून प्रसंगाचें महत्त्व जाणून पाल्हाळ सोडून शक्य तितक्या कमी शब्दांत ती माहिती द्यावयाची हेंच काम राहते. शेक्सपियर, नेपोलियन यांच्या चरित्रांमधून आतां कोणता कोशकार नवी भर घालणार आहे. व्यावहारिक ज्ञानकोशांत अशा चरित्रांची माहिती घेतांना २१४ कोश चाळून त्यांतून जी माहिती चांगली वाटली ती घेतली. जी गोष्ट चरित्रांच्या बाबतींत तीच देश, शोध, ग्रह, यंत्रें यांच्या बाबतींत आहे, जरूर तेवढी माहिती घेऊन व्यावहारिक-ज्ञानकोशांतील माहिती लिहिली आहे.

पण हा कोश म्हणजे कोणत्या तरी कोशांतील अनेक लेखांचें केवळ भाषांतर असें मात्र नव्हें. कारण ती गोष्ट शक्य नाहीं, इष्ट नाहीं. वाटल्यास या बाबतींत कोणीहि प्रयत्न करून पाहावा म्हणजे वरील म्हणण्याची सत्यता लक्षांत येईल.

कोशांतील उणेपणा

कोशांत राहिलेल्या उणीवांची जाणीव मला आहे. शास्त्रीय विषयांवरील लेख कोणी लेखक न मिळाल्यामुळें मलाच लिहावें लागले. अर्थात् शास्त्रज्ञांच्या आत्मप्रत्ययाची उणीव त्यांत राहिली असेल पण कोणतीहि गोष्ट स्वत:ला समजल्या शिवाय लिहिलेली नाहीं. जिवंत लोकांपैकी कांहींची चरित्रें गळलीं आहेत. महाराष्ट्रांतील कांहीं प्रमुख मंडळींना त्यांच्या चरित्रासंबंधींची माहिती विचा-रली. कांहींचीं उत्तरें आलीं नाहींत. कांहींचीं आलीं तीं अशा मासल्याचीं कीं अशा लोकांना पत्रें लिहिल्याचा मला पश्चाताप झाला. ज्यांनीं माहिती पाठविली त्यांचीं चरित्रें आलीं आहेत.

कांहींचीं चरित्रें मिळालीं तशीच घातलीं. मोठ्या लोकांनीं आपल्या चरित्राची माहिति कोशकारांना देणें (लिहून पाठविणें) हें एक त्यांचें सार्वजनिक कर्तव्य आहे; आणि त्यांनीं तें करावें एवढी त्यांना विनंति आहे.

इतर विषयांच्या निवडींत कांहीं दोष राहिलें आहेत, याची जाणीवहि मला आहे पण मंडळाच्या कार्याचा सर्व भार माझ्या एकट्यावर मुख्यतः पडल्यामुळें व पुरेसा वेळ न मिळाल्यानें उडालेल्या तारांबळींत या चुका झाल्या. कांहीं ठिकाणीं एखादा आकडा चुकला, छापतांना रकार, उकार उडालें असें प्रकार झालें आहेत पण कोशाच्या या चुका सूज्ञ वाचकांच्या सहज लक्षांत येण्यासारख्या आहेत. सध्यां वेळ नसल्यामुळें शुद्धि पत्र जोडलेलें नाहीं. पुढें मागें स्वतंत्रपणें काढण्याचा विचार आहे.

पुरवणी

पुरवणी १ मध्यें गळलेले किंवा वेळेवर हातीं लेख न आलेले विषय दिले असून पुरवणी २ मध्यें महत्त्वाच्या गोष्टींची आज तागायत नोंद करण्याचा प्रयत्न केला आहे.

ग. रं. भिडे

प्रणाम—

व्यावहारिक ज्ञानकोशाचा हा पांचवा भाग आतां कोशाच्या ग्राहकांच्या (व वाचकांच्या) सेवेसाठीं सादर करीत आहे. १९३१ च्या एप्रिल महिन्यांत या कार्याची कल्पना सुचली व आज नऊ वर्षांनीं ती कल्पना दृश्य स्वरूपांत पूर्ण करतां आली याबद्दल मनाला एक प्रकारचा आनंद वाटतो. पण हा आनंद मिळायला कितीतरी लोकांचें सहाय्य अनेकपरीनें मला झालें आणि म्हणूनच कार्यपूर्तीचा आनंद मिळणें शक्य झालें आहे.

कोल्हापूर दरबारचें सहाय्य केवढ्या मोलाचें झालें हें पहिल्या भागाच्या आरंभीं सांगितलेंच आहे त्याची पुनरुक्ति करण्यापेक्षां या ठिकाणीं अंतःकरणपूर्वक कृतज्ञता व्यक्त करणेंच जास्त श्रेयस्कर. हें सहाय्य मिळण्यासाठीं रा. ब. दादासाहेब सुर्वे, मुख्य प्रधान, सरकार करवीर यांनी केलेल्या 'धाडसी' प्रयत्नाबद्दलहि मी आजपर्यंत कृतज्ञ आहे. 'धाडसी' हा शब्द एवढ्याचसाठीं वापरला कीं त्यावेळीं मी अवघा बावीस वर्षांचा (१९३३ मध्यें) होतो. एवढें मोठें काम करण्याचा तत्पूर्वी किंचिन्मात्रहि अनुभव नव्हता, कोणा मोठ्या साहित्यिकांची नांवेंहि माझ्या मागें नव्हतीं. अशावेळीं कोण व्यक्ति एकदम १२,००० रु. पर्यंत मदत करावी म्हणून शिफारस करील? पण एरव्ही अशक्य दिसणारी ही गोष्ट रा. ब. सुर्वे यांनीं केली. आणि हें कार्य करण्यांतील पहिली अडचण दूर झाली. या शिवाय अगदीं प्रारंभापासून रा. ब. सुर्वे व्यावहारिक ज्ञानकोश मंडळ, लि. या कंपनीच्या बोर्डचे प्रेसिडेंट आहेत. त्यामुळें त्यांची मदत अखेरपर्यंत मिळत आलेली आहे.

यानंतर कंपनीच्या डायरेक्टर मंडळांवर मे. रा. ब. द. मा. भोंसले, मे. रा. ब. शं. आ. इंदूलकर, मे. रा. ब. वि. ग. चव्हाण, मे. रा. ब. शा. सं. भोंसले, मे. रा. शं. गो. दाभोळकर, मे. रा. वि. तु. पाटील, मे. गो. शि. उपळेकर, मे. एम्. डी. जोशी या कोल्हापुरांतील अधिकारी व सार्वजनिक कार्यात अखंड भाग घेणाऱ्या मंडळींचें सहकार्य लाभलें व त्यामुळें कोल्हापुरांत व कोल्हापुराबाहेर मंडळाच्या स्थैर्याबद्दल आरंभापासूनच विश्वास उत्पन्न झाला. ही केवढ्यातरी महत्त्वाची गोष्ट आहे.

मंडळाचा नेहमींचा व्यवहार पाहण्यासाठीं १ मे. रा. ब. वि. ग. चव्हाण, चेअरमन, २ मे. रा. ब. शा. सं. भोंसले, ३ मे. रा. शं. गो. दाभोळकर ४ मे. रा. वि. तु. पाटील यांची मॅनेजिंग कमेटी नेमलेली होती व तीच आतांपर्यंत बोर्डतर्फे प्रत्यक्ष व्यवहार पहात आलेली आहे. मे. रा. ब. वि. ग. चव्हाण व मे. रा. शं. गो. दाभोळकर, खजिनदार, यांच्याकडे मला वारंवार जावें लागे. दोघांनीहि माझी कधीहि खोटी न करतां भेट घेऊन महत्वाचीं कार्यें पाहिलीं. या शिवाय मे. रा. ब. शा. सं. भोंसले यांच्याकडेहि मंडळाच्या कामानिमित्त ज्या ज्या वेळीं गेलों त्या त्यावेळीं आपुलकीनें कार्याची माहिती करून घेऊन योग्य तो सल्ला व सहाय्य केलें. मे. रा. वि. तु. पाटील यांनींहि मागितलें तें सहाय्य आरंभापासून दिलें. या सर्वांचा मी सदैव ऋणी आहे.

महाराष्ट्रांतील ज्या ज्या लेखकांना आरंभीं कोशाची कल्पना कळवून लेखन सहाय्य मागितलें त्यांपैकीं फक्त रा. शं. वा. किर्लोस्कर, संपादक, 'किर्लोस्कर' मासिक यांच्या शिवाय इतरांच्याकडून जी उत्तरें आलीं तीं केवळ हेटाळणी करणारीच. (सुमारें १०० पत्रांपैकीं फक्त १७ पत्रांचींच उत्तरें आलीं होतीं). रा. शं. वा. किर्लोस्कर यांचें मात्र पुढें कोणत्या अडचणी

येतील व त्यासाठीं काय करावें लागेल, कोणत्या गोष्टीवर अधिक भर दिला पाहिजे वगैरे मजकूराचें एकच एक सदिच्छेचें पत्र आलें होतें. आजहि हा मजकूर लिहितांना त्यांच्या पत्राचें स्मरण मला झाल्यावांचून राहात नाहीं. भाग जसजसें प्रसिद्ध होत गेले तसतशी कांहीं स्तुती करणारीहि पत्रें आलीं. पण रा. किर्लोस्करांच्या पत्राचें महत्त्व त्या सर्वांहूनहि मला अधिक वाटतें.

तीन भाग प्रसिद्ध झाल्यानंतर प्रो. द. वा. पोतदार व प्रो. रा. वि. ओतुरकर यांनीं भा. इ. सं. मंडळाच्या सभासदांकडून ऐतिहासिक चरित्रें लिहवून घेऊन कोशाला जें सहाय्य केलें आहे त्याबद्दलहि मला कृतज्ञता वाटते. प्रो. ओतुरकरांनीं तर या चरित्रासाठीं उन्हातान्हाच्या अनेकांच्याकडे अनेक वेळां फेऱ्या मारल्या व काम करून दिलें.

कोशाच्या या कार्याला ५०–६० लेखकांचे सहाय्य मिळालें. अन्यत्र त्यांची नांवें दिलींच आहेत. या सर्व लेखकांना लेखांबद्दल योग्य ती रक्कम मिळाली नाहीं असें मलाहि वाटते. पण स्वतःच्या पगाराची रकम वाढवून किंवा अन्यत्र अधिक खर्च करून राहिलेल्या रकमेंतून लेखकांना पैसे देण्याचा प्रयत्नहि कधीं झालेला नाहीं. एवढेंच मी सांगू शकतो. साधारणतः दर पृष्ठास सव्वा तें दीड रुपया एवढीच रकम देतां आली. या सर्व लेखकांचाहि मी अभारी आहे.

मी स्वतः कोशाच्या प्रती खपविण्यासाठीं पुष्कळ हिंडलों. आणि 'सेल्समन' चे गुण अंगीं नसतांहि माझ्या हांतून बऱ्याच प्रती खपल्या गेल्या त्या केवळ ग्राहकांच्या चांगुलपणामुळेंच. माझ्याशिवाय माझे सहकारी रा. के. रा. कुलकर्णी व रा. कृ. ग. सबनीस यांनींहि ग्राहक मिळविण्याचें महत्त्वाचें काम चांगलें केलें आहे. मंडळाचे ठाण्याचे एजंट रा. नी. गो. गंधे यांनीं जवळ जवळ शंभर गिऱ्हाईक मिळविलें. व सर्व व्यवहार रोखीचा व चोख केला. त्यांचे हें सहाय्यहि महत्त्वाचें आहे. याशिवाय ग्वाल्हेरचे रा. स. गं. देवधर व नागपूरचे श्री. वा. दाते यांनींहि कोशाच्या भागांच्या प्रती वाटून रक्कम जमा करण्यास चांगली मदत केली आहे.

चित्रकारांपैकीं पुण्याचे चित्रकार रा. दीक्षित, व कोल्हापूरचे रा. वसंत जाधव व रा. इंगळहळ्ळीकर यांनीं सुंदर चित्रें काढून दिलीं. लंडनच्या Exclusive News Agency, W. F. Taylor व दिल्लीचा सरकारी ब्यूरो यांच्याकडून फोटोंचें सहाय्य मिळालें. मुंबईचे बी. पी. सामंत (आणि कं.), पुण्याच्या नवजीवन प्रोसेस स्टुडिओचे मालक रा. भाटे व महाराष्ट्र फोटो झिंकोचे मालक रा. भिडे यांनीं सुंदर ब्लॉक्स करून दिलें. या सर्वांचा मी आभारी आहे.

छपाईच्या बाबतींत येथील श्रीसिद्धेश्वर प्रेसचे मालक ठकार बंधू यांच्या पहिल्या भागाच्या वेळीं मिळालेल्या खऱ्याखुऱ्या सहकार्याचा विसर मला पडूं शकत नाहीं. कै. आण्णा ठकार यांनीं पहिल्या भागाच्या वेळीं स्वतः लक्षपूर्वक माहिती तपासून पाहून अनेक सूचनाहि दिल्या व त्या पुढें मला उपयोगीहि पडल्या. २, ३, ४ व ५ या भागांच्या छपाईचें काम येथील श्री. ज्ञानेश्वर प्रेसमध्यें झालें आहे. या छापखान्याचे मालक रा. कृ. ह. सहस्रबुद्धे यांनीं नेहमीं या कोशासाठीं नवा टाइप आणवून व छपाई चांगली व्हावी म्हणून इतरहि काळजी घेऊन उत्कृष्ट छपाई करून दिली आहे. याशिवाय त्यांनीं केलेल्या इतर व्यावसायिक सहाय्याबद्दल त्यांचे किती नी कसे आभार मानावे ? माझें स्वतःचें व्याकरण थोडें कच्चेच. त्यामुळें सगळी प्रुफें शेवटपर्यंत मीच तपासलीं असती तर किती चुका राहिल्या असत्या कुणाला ठाऊक ! पण माझे मित्र व ज्ञानेश्वर प्रेसचे व्यवस्थापक रा. पोंक्षे यांनीं व्याकरणदृष्ट्या काळजीपूर्वक प्रुफें तपासलीं व मला सहाय्य केलें याबद्दल त्यांचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे. ज्ञानेश्वर प्रेसचे रा. ओगले यांनी प्रुफांच्या बाबतींत केलेल्या सहाय्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

मंडाळाच्या कचेरींत रा. कृ. ग. सबनीस (मंडळाचे सेक्रेटरी व एक डायरेक्टर), यांचें मंडळाचा हिशेब ठेवणें व इतर व्यवहार पाहाण्यास चांगलीच मदत झाली आहे. याशिवाय रा. के. रा. कुलकर्णी यांनीं मला संपादकीय कार्यांत व कोशाच्या विक्रीच्या बाबतींत पुष्कळच सहाय्य केलें आहे. ॲ. द. न. मोकाशी यांनीही कचेरींत कांहीं दिवस येऊन किरकोळ पण महत्त्वाचे लेख लिहिण्यांत व दुसऱ्या कार्यांत मदत केली आहे. या सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

आतां माझे संपादन कार्यांतील सहकारी श्री. रा. कों. फाटक, श्री. वि. नी. आंबेडकर, श्री. खं. सा. दौंडकर, कु. पिरोज आनंदकर व प्रो. वा. ह. कुलकर्णी यांनीं वेळोवेळीं विचार विनिमय करून व जरूर तेवढें लेखनसहाय्य देऊन कोशाची फार मोठी कामगिरी बजावलेली आहे. या मित्रांचें आभार तरी कोणत्या शब्दांत मानावें हें सुचत नाहीं.

पुष्कळ वेळां या कोशानें खरोखरीच कांहीं कार्य केलें आहे कां असा प्रश्न मनांत येतो. आणि पुष्कळ विचार करूनहि त्या प्रश्नाला मला कधींच उत्तर देतां आलें नाहीं, पण या कोशाच्या कार्यासाठीं काय काय केलें त्यापैकीं दोन तीन महत्वाच्या गोष्टींचा उल्लेख मात्र जरूर करावासा वाटतो. यानंतर यापेक्षां चांगलीं कार्यें जे कोणी हातीं घेतील त्यांना याचा उपयोग होईलसें वाटतें. १ आरंभीं परदेशी कंपन्याकडून फोटो मागितलें त्यावेळीं सर्व कंपन्यांनी धुडकावूनच लावलें. पण हवा तसा पत्रव्यवहार करून फोटो तर मिळविलेच पण कांहीं थोड्या व्यवहारानंतर आधीं एक पैहि न पाठवितां १००–१५० फोटो निवड करण्यासाठीं याच कंपन्यांनी पाठविले हें लक्षांत ठेवावें. परदेशांतून अशा रीतीनें फोटो मागवून (अर्थात् पैसे देऊन) पुस्तकांत छापण्याचें कार्य प्रथम याच कोशानें केलें आहे असें वाटतें. हा जो एक प्रकारचा विश्वास या कंपन्यांतून निर्माण करविला आहे त्याचा उपयोग यापुढें इतरांनीहि करून घ्यावा. २ परदेशी लेखकांचे लेखन सहाय्य मिळविण्याचाहि प्रयत्न केला व तोहि यशस्वी झाला आहे. उत्कृष्ट माहिती व वेळेप्रमाणें काम होऊं शकते. रक्कम थोडी जास्त जाईल पण लेखासाठीं खोटी होणार नाहीं. मात्र पत्रव्यवहारांत बराच वेळ जातो हे लक्षांत ठेवावें. ३ विषयाला हवी तेवढींच चित्रें घालावीं व तीं चांगल्या चित्रकारांकडून काढून घ्यावी. चित्रें स्वस्त मिळालीं तरी ब्लॉक करण्याचा खर्च वाढतो व जागा अकारण अडते हें लक्षांत ठेवावें.

वर किती लोकांचें किती प्रकारचें सहाय्य झालें आहे हें लिहिलेंच आहे तेव्हां या कार्याच्या यशाला कारणीभूत हीच सर्व मंडळीं आहेत, या कार्यांत जर कांहीं गुण असतील तर ते त्यांचे. कार्यांत जे कांहीं दोष राहिले ते केवळ माझ्यामुळें, या कार्याला जें आर्थिक यश मिळत आहे तेहि सरकार करवीर, कंपनीचे शेअर होल्डर व कोशाचे ग्राहक यामुळें. मी केवळ निमित्तमात्र आहे.

प्रणाम—

ग. रं. भिडे



भाग पांचवा


मानवी संस्कृतिः—मनुष्य प्राणी या भूतलावर अवतरल्यानंतर त्याचीं कायिक, वाचिक व मानसिक अशीं अनेक स्थित्यंतरें होत गेलीं. निसर्गानें दिलें तेवढें अन्न खाऊन व दिलें तेवढें संरक्षण घेऊन त्यानें हळूं हळूं निसर्गावलंबी परिस्थिती कमी करीत स्वतःच्या बुद्धीनें आज हजारों वर्षांनंतर कित्येक बाबतींत त्यानें निसर्गाला आपला दास बनविलें आहे. भूगोलाचें अन्तर त्यानें तोडून टाकलें आहे. समुद्राला त्यानें आवरला आहे. खाणींतून त्यानें सोनें काढलें आहे. तसेंच, वृक्षांच्या पाल्यापाचोळ्यापासूनहि उत्कृष्ट कागद बनविला आहे. यंत्रें चालविणाऱ्या कोळशापासून त्यानें साखर बनविली; तशीच डोंगरपर्वतांतून अनिरुद्ध जलप्रवाहांना कामाला लावून आकाशांतील विजेच्या तोडीला तोड म्हणून त्यानें यांत्रिक वीज निर्माण करून घरोघरीं तिला दास्यत्व स्वीकारावयास लावलें आहे. एवढेंच नव्हे तर आज इतर ग्रहांवर जाऊन तिथें काय आहे हें पाहण्याची त्यानें महत्त्वाकांक्षा धरली आहे. हें जें वैभव त्यानें प्राप्त करून घेतलें आहे त्याचा अगदीं त्रुटित इतिहास पुढें देणार आहों. त्यावरून कोणत्या मानववंशानें काय केलें, मानवी सुखाची लालसा सतत कशी वाढत गेली व ती शमविण्यासाठीं मानवानें काय केलें याबद्दलची कल्पना यावी एवढाच या लेखाचा हेतू आहे.

पृथ्वीवर मनुष्यप्राणी नेमका केव्हां आला हें सांगण्यांत शास्त्रज्ञांचेंहि एक मत नाहीं. मानवी शरीरशास्त्र, भूगर्भशास्त्र, पुराणें वगैरे कित्येक विषयांच्या अभ्यासानें शास्त्रज्ञांनीं कांहीं अंदाज बांधलेले आहेत. त्यांची थोडी कल्पना आपल्यास आली म्हणजे झालें. अधिक खोलांत शिरण्याचें हें स्थान नव्हे. एक तास म्हणजे चोवीसहजार वर्षें अशी कल्पना केली तर या कल्पनेप्रमाणें मनुष्य या पृथ्वीवर प्रथम अवतरून चोवीसपेक्षां अधिक तास झाले आहेत असें शास्त्रज्ञ सांगतात. या कल्पनेप्रमाणें ४०० वर्षें म्हणजे एक मिनिट होय. याप्रमाणें पाहिलें तर पांडवांचा काल हा फक्त पांच मिनिटापूर्वीं होता व ऋग्वेदाचा काल फक्त दहाच मिनिटांपूर्वीं होता असें म्हणतां येईल. शास्त्रज्ञांनीं 'आजचा माणूस' तयार होण्यापूर्वीं म्हणजे १०,००० वर्षांपूर्वीं कांहीं विशिष्ट युगें कल्पून त्या त्या युगांत अमूक एका स्थितिपर्यंत प्रगती केलेला मनुष्य कल्पून त्यांना स्वतंत्र नांवें दिलेलीं आहेत. इतिहासपूर्वकाल म्हणजे आपल्या कल्पनेप्रमाणें २४ तासांपूर्वीं, हा मनुष्याच्या बुद्धिहीनतेचा काल मानतात. या कालांत मानवी प्राणी उघडाबोडका व

जवळजवळ पशूंप्रमाणेंच वागणारा होता. यानंतर ज्यावेळीं इतिहास काळ सुरू झाला असें मानतात त्यावेळीं त्यानें आपल्या बुद्धीची प्रथमतःच चमक दाखवून स्वतःसाठीं निरनिराळ्या वस्तू तयार करावयास सुरवात केली. ऊन-वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठीं वस्त्रें, दगडी हत्यारें बनविणें इ. हे त्याचे पहिले विजय होत. अरण्यांत वृक्षांच्या फांद्यांच्या घर्षणापासून निर्माण झालेला अग्नि त्यानें पाहिला व त्याचा उपयोग करण्याचें त्यानें ठरविलें. अर्थात् गुहांतून राहणाऱ्या या प्राण्याला विस्तवाचा–अग्नि–उपयोग उजेड व पक्वान्न तयार करण्याकडे–एखादी वस्तू भाजण्याकडे–कसा करावा हें सुचलें व त्यानें एक नवा सुखाचा शोध लावला असेंच म्हटलें पाहिजे. अशाच हालअपेष्टा भोगीत असतां तो सृष्टीच्या आणखी एका मोठ्या उत्पातांत सांपडला व आणखी शहाणा झाला. हा उत्पात म्हणजे सूर्याच्या उष्णतेनें बर्फ वितळणें व थंडीनें पाणी गोठून बर्फ होणें. अर्थात् यामुळें त्याला कितीतरी संरक्षक गोष्टी हुडकून काढण्यासाठीं डोकें लढवावें लागलें व थंडीच्या दिवसांत बाहेर हिंडणेंच अशक्य म्हणून अन्नाचा सांठा करणेंच त्याला प्राप्त झालें. अशा रीतीनें ज्या निसर्गानें त्याला कित्येक वर्षें छळलें, त्यानेंच त्याला अक्कल शिकविली व प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून जगण्याचा संदेश दिला.

शास्त्रज्ञांनीं आतांपर्यंत जो पुरावा गोळा केला आहे त्यावरून मनुष्याचें मूळ किंवा पहिल्या वस्तीचें ठिकाण म्हणून मध्य आशियाकडे बोट दाखवितां येतें व त्याचा जन्मकाल १,०००,००० अथवा अधिक वर्षांपूर्वींचा मानतात. 'जावा मॅन' (मनुष्य), 'पिल्ट्डॉउन मॅन', 'ऱ्होडेशियन मॅन' व 'पेकिंग मॅन' हे मनुष्याच्या शरीराचे निरनिराळे प्रकार मनुष्याच्या शारीरिक उत्क्रांतीचे दुवे म्हणून कांहीं शास्त्रज्ञ पुढें ठेवतात; पण हे लोक कांहीं आजच्या मनुष्याचे खरे पूर्वज नव्हत असेंहि कांहीं म्हणतात. आजच्या मानवाचा पूर्वज आजच्या मनुष्यापेक्षां उंचीनें लहान, कुरूप चेहऱ्याचा, अंगावर, हातापायावर राठ व लांब केस असलेला, तांबूस वर्णाचा असा होता. त्याला कपाळ असें नव्हतेंच, जबडा एखाद्या हिंस्र पशूसारखा व माकडासारखी पातळ पण बळकट हाताचीं बोटें असलेला असा होता. पण याच्या असल्या ह्या भयानक स्वरूपांत रूपांतर होत होत सहा फूट उंचीचा, भव्य कपाळाचा, बांधेसूद मानवी शरीराचा अंगावरचे केस जवळ जवळ नाहींसे झालेला, बुद्धिवान व चलाख माणूस तयार झाला व त्यानें पृथ्वीवर 'आपला इतिहास' बनविण्याला सुरवात केली. ६००० वर्षांपासूनचा लिहिलेला इतिहास आज उपलब्ध आहे.


आरंभींच्या हिमयुगानंतर चार निरनिराळ्या युगांत मानवी संस्कृतीची विभागणी केलेली आहे. या प्रत्येक युगांत सर्वसाधारण मानवाची कोठपर्यंत प्रगति झाली होती हें कळून येतें. हीं चार युगें अशीं–**१ पाषाण-युग** (यांतहि दोन भाग करतात)–या युगांत मानव दगडांचा उपयोग शस्त्रासाठीं करूं लागला. मिळेल त्या दगडाचा उपयोग करण्याच्या प्रवृत्तीनंतर दगड अणकुचीदार व पटाशीसारखे ताशीव करण्यास व वापरण्यास सुरवात झाली. हें युग खि. पू. ६०,०००-



मानवी कवटींची उत्क्रांति.

पर्यंत मानतात. हा काल Eolithic age म्हणून ओळखतात. यानंतरच्या कालांत दगडाचीं सुधारलेलीं शस्त्रें तयार झालीं. या कालाला Palaeolithic or old stone age म्हणतात. यानंतर जें युग सुरू झालें तें–**२ कृषि-युग** होय. या युगांत मनुष्य शेती करण्यास शिकला. संघा संघानें एकत्र राहण्यास, भांडीं, बुट्या, वैद्यकी, नावा बांधणें व थोड्या फार प्रमाणांत व्यापार करावयास शिकला. हें युग Neolithic Civilization म्हणून ओळखतात. हा काळ कांहीं शास्त्रज्ञ खि. पू. ७००० ते १०,००० हा देतात. यानंतरचीं दोन युगें म्हणजे ताम्रयुग (Bronze Age) व लोहयुग (Iron Age) हीं होत. या दोन्ही युगांचा काल निरनिराळ्या राष्ट्रांत निरनिराळा मानतात. या दोन्ही युगांत तांब्याचा शोध लागून मनुष्य आपलीं पूर्वींचीं दगडी, लांकडीं,

व हाडकांचीं हत्यारें फेकून देऊन तांब्याचीं शस्त्रें तयार करूं लागला. व लोहयुगांत लोखंडाचा शोध लागून लोखंडाचीं हत्यारें तो बनवूं लागला. ताम्रयुगाचा युरोपांतील काल खि. पू. ५००० तें २०००-पर्यंत व लोहयुगाचा खि. पू. १००० ते इ. स. १००-पर्यंत मानतात. लोहयुगाचा चाल्डिया, असीरिया, इजित, चीन या देशांतील काल खि. पू. ४००० वर्षांपासून धरतात अशा रीतीनें मानवी प्रगतीचे हे चार टप्पे असून आजचें **यंत्रयुग** हा पांचवा टप्पा किंवा युग मानावयास हवें; अर्थात् मानवी प्रगतीची ही



मनुष्याचीं पहिलीं हाडाचीं व लांकडाचीं हत्यारें.

१, ४ व ६ मारे मारण्याच्या बरच्या. २, ५ व ७ करवतीसारखा उपयोग होणारी हत्यारें. ८ व १० तरवारींचे प्रकार. ९ सुयांचे प्रकार


मोजदाद म्हणजे दगडमातीनें त्यांच्या कर्तबगारीची केलेली मोजदाद होय. यापेक्षां कितीतरी क्षेत्रांत त्यानें केवढी प्रगती केली आहे हे पाहणें म्हणजेच मानवी संस्कृतीचा इतिहास पाहणें होय.

संस्कृति या शब्दाची व्याख्या करणें कठीण आहे. अनेक विद्वान इंग्रजींतील Civilization या शब्दाला हा प्रतिशब्द वापरतात. पण नुसत्या 'सिव्हिलिझेशन' या शब्दानें जो अर्थ व्यक्त होतो तेवढा अर्थ संस्कृति या शब्दोच्चारानें निर्माण होणाऱ्या कल्पनेची स्पष्टता व्यक्त करूं शकत नाहीं. एवढ्यासाठीं इंग्रजींतील कल्चर (Culture) या शब्दाचा अर्थहि लक्षांत घेतला पाहिजे. म्हणजे कल्चर व सिव्हिलिझेशन मिळून संस्कृति होय. 'कल्चर' या शब्दानें जें चित्र आपल्या दृष्टिपुढें येतें त्यावेळीं आपण एखाद्या मानववंशाच्या कलांचे अर्थात् ललितकलांचे, कौटुंबिक जीवनाचे, धर्मांचे, कायद्याचे, उद्योगधंद्याचे, चालिरीतीचे, तत्त्वज्ञानाचे व शासनसंस्थेचे (सरकार) इत्यादींचे विचार आपल्या दृष्टीसमोर येतात. सिव्हिलिझेशन या शब्दानें समाजविशिष्ट भूप्रदेशांत स्थायिक झाल्यानंतर, त्या ठिकाणीं शेती, कांहीं प्रमाणांत आर्थिक व्यवस्था, वर्गभेद, मध्यवर्ती राज्यसंस्था इत्यादि निर्माण करीत असतांना जीं जीं कृत्यें त्याला करावीं लागलीं त्यांचा समावेश सिव्हिलिझेशन या शब्दाच्या अर्थांत करतात. (वस्तुतः कल्चर व सिव्हिलिझेशन या दोन 'पाणबंद' कल्पना नव्हेतच.) कल्चरचें स्थान, बुद्धि, भावना व अन्तःकरण हें आहे तर सिव्हिलिझेशनचें स्थान तदीतर गोष्टीवर आहे. अगदीं साध्या शब्दांत सांगायचें झालें तर कल्चर म्हणजे 'वृत्ती' होय. सिव्हिलिझेशनचे परिणाम दृश्य स्वरूपांत दिसतात व शिक्षणानें टिकवितां येतात. युरोपियन सिव्हिलिझेशनचें दृश्य फळ म्हणजे भौतिक सुखसोईंची वाढ व युरोपियन कल्चर म्हणजे ऐहिक जीवन हें सुखानें जगण्यासाठीं आहे हा त्यानें जगाला दिलेला संदेश होय.

वर सांगितल्याप्रमाणें मध्य आशियांतून या मानवी प्राण्याचें पेव फुटलें व निरनिराळी मंडळी निरनिराळ्या दिशेनें हालूं लागली. पण आरंभीं सर्वच माणसें एकाच वंशाचीं व रक्ताचीं असावीं असें वाटत नाहीं. निदान दोन चार तरी निरनिराळे मानववंश आरंभीं असावेत अशी कल्पना करण्यासहि आधार आहेत. सारांश निरनिराळे मानववंश पोटासाठीं भटकत भटकत

निरनिराळ्या ठिकाणीं गेले, कांहीं तैग्रिस–युफ्रेटिस नद्यांच्या कांठीं जाऊन स्थायिक झाले, कांहीं पुढें नाइल नदीकडे गेले, कांहीं हिमालय ओलांडून सिंधूच्या कांठीं आले व कांहीं पश्चिमेस सरकत सरकत डान्यूब नदीपर्यंत पोचले, कांहीं चीनकडे वळले. अशा रीतीनें निरनिराळ्या भागांत गेल्यावर त्या त्या लोकांनीं जगण्यासाठीं व वंशसातत्यासाठीं जी धडपड केली तीच आतां थोडक्यांत पाहावयाची आहे.

इजिप्त—पाश्चात्य इतिहासकार चीन, हिंदुस्थान किंवा इतर कोठल्याही संस्कृतीपेक्षां सर्वांत जुनी म्हणून इजिप्तची संस्कृती होय असें सांगतात. जेम्स एच्. ब्रेस्टेड हा तर 'It is now a finally established fact that civilization first arose in Egypt.' असा निर्वाळा देतो.




आमेन हेटेपचा स्तंभ (१८ वा राजवंश) इजिप्तच्या शिल्पाचा एक उत्कृष्ट नमुना.

इजिप्त उर्फ मिसर संस्कृतीचा विचार करतांना एकूण ३१ राजवंशांचा विचार केला पाहिजे. हे राजवंश खि. पू. ३४०० पासून खि. पू. ३३२ पर्यंत झाले. यानंतर टॉलेमीज (Ptolemies) या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या राजांचा अंमल खि. पू. ३३२ ते इ. स. ३०पर्यंत होता. या वेळीं ग्रीकांचा वरचष्मा होता. शेवटीं राणी क्लीओपात्राच्या मृत्यूनंतर इजिप्त रोमन साम्राज्याचा एक भाग झाला व इ. स. ६४० मध्यें इजिप्त मुसलमानांच्या ताब्यांत गेला. एव्हांपासून हा देश मुसलमानांचाच राहिला आहे.

मिसर संस्कृतीचा अभ्यास करतांना मिसर देशाचें जीवन जी नाइल नदी तिच्या उत्तर व दक्षिण भागांत जीं जीं राज्यें झालीं त्यांचा इतिहास पाहावयास हवा. नाइलच्या कांठीं ज्या जमाती आपलें घर करून राहिल्या त्यांच्यांपैकीं पाटबंधारे काढून त्यांनीं आपलें उत्पन्न वाढविलें व सैन्यशक्ति वाढविली त्या त्या जमातींनीं आपलीं स्वतंत्र राज्यें निर्माण केलीं. अशा रीतीनें निर्माण झालेल्या अनेक लहान लहान राज्यांचें एकीकरण मेनीस यानें केलें व तो मिसराचा सम्राट् बनला. (खि. पू. ३४००.) या राज्याचा विस्तार एजियन व तांबड्या समुद्रापर्यंत झाला व जवळच्या देशांशीं व्यापारहि सुरू झाला. या वेळीं मेंफिस ही इजिप्तची राजधानी होती. या संस्कृतीचें आजचें जिवंत स्मारक जें पिरॅमिडस् त्यांपैकीं गिझे (Gizeh) नांवाचा पिरॅमिड याच वेळीं बांधला गेला. व्यापार, कलाकौशल्य यांमध्यें यावेळीं फार मोठी भरभराट झाली होती. यानंतर मध्यराज्याचा (Middle kingdom) काल मानतात. या कालांत खि. पू. २००० ते १६०० पर्यंत १० राजवंशानीं राज्य केलें. साम्राज्यांतील जहागीरदारांनीं स्वतंत्र रीतीनें वागण्यास सुरवात केली व अनेक राज्यें झालीं; पण खि. पू. २१५० ते १०८०च्या दरम्यान फाराओ (Pharaoh) नांवानें ओळखले जाणारे कांहीं बलाढ्य राजे निर्माण झाले व त्यांनीं सर्व सरदारजहागीरदारांना नमविलें व पुन्हां मिसर देश अपूर्व वैभवानें तळपूं लागला. या कालांत हा देश फार श्रीमंत, विलासी पण उदार आणि उमद्या वृत्तीचा झाला होता.

यानंतर पुन्हां कांहीं काळ अवकळा आली. सेमेटिक लोकांनीं व इतर रानटी टोळ्यांनीं लहानसहान स्वाऱ्या करून कांहीं भाग जिंकला व राज्यें स्थापिलीं. या 'धनगरराजांना' 'हिक्सॉस' म्हणत. पण यांचीहि वेळ भरली. थेब्स्च्या राजांनीं या लोकांना हांकून लाविलें. खडें सैन्य ठेवण्याची प्रथा याच वेळीं पडली. सर्व देश परत जिंकला व पूर्ववत् व्यवहार सुरू झाले. बाबिलोनिया, असीरिया इत्यादि देशांच्या राजांकडून नजराणे वसूल होऊं लागले. सोनें, चांदी, तांबें, हस्तीदंत, रत्नें इत्यादींचा व्यापार, नाना तऱ्हेचे दागिने, मसाल्याचे जिन्नस, सुवासिक अत्तरें यावेळीं



१ टॉटेमिस, तिसरा, इजिप्तचा राजा ख्रि. पू. १५५०. २ सेली दुसरा. १९ वा राजवंश. ३ राजवाड्याचा रखवालदार. ४ १८ व्या राजवंशाच्या वाळचा एक अधिकारी व त्याची पत्नी.



इजिप्तमधील स्फिंक्स व पिरॅमिड. मिसर संस्कृतीचें चिरंजीव स्मारक.

विपुल होतीं. पण याच वेळीं अनेक मंदिरें बांधलीं जाऊन देवाच्या नांवावर पुरोहितवर्ग वरचढ झाला. ऐहिक सुखलोलुपता बळावली व रूढी आणि विचित्र समजुती बळावल्या; आणि हा प्रकार इख्नटॉन (१३७५–१३६८) नांवाची तेजस्वी सम्राट निर्माण होईपर्यंत चालू राहिला. **त्यानें प्रथम एकेश्वरी मत प्रतिपादिलें.** याच्यानंतर रॅमसेस दुसरा व तिसरा यांनीं आपल्या राज्याच्या आसपासच्या शत्रुराजांशीं लढून इजिप्तचें राज्य टिकवलें. पण नंतर इजिप्त वैभवाला मुकत चालला. इराणच्या राजाच्या अंमलाखालीं असतांना त्यानें परत स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. लौकरच अलेक्झांडरनें इराण्यांचा पराभव करून इजिप्त स्वतःच घेतला व इजिप्तचें वैभव संपलें. यानंतर टॉलेमीज नांवानें ओळखल्या जाणाऱ्या राजवंशाचें राज्य ख्रि. पू. ३३२ ते ३०पर्यंत टिकलें. या वंशापैकीं विख्यात क्लिओपात्रा ही शेवटची राणी.

तिच्या मृत्यूनंतर इजित रोमन साम्राज्यांत विलीन झाला.

मिसरच्या संस्कृतींत फलज्योतिष, खगोलशास्त्र, गणित, रसायनशास्त्र व वैद्यकीय शास्त्र यांची चांगली प्रगती झालेली दिसून येते. एक प्रकारच्या गवतापासून कागदहि तयार करीत असत. शेतकीचीं कांहीं औतें प्रचारांत होतीं.आजहि दिसणारे प्रचंड पिरॅमिड्स त्यांत सांपडललीं प्रेतें, मंदिरें इ. त्यांच्या कलाकौशल्याचीं जिवंत प्रतीकेंच होत. सामाजिक व नैतिक विषयावरील लेख, कथा व छंदबद्ध कविता, प्रणयगीतें व कायद्यासंबधींची चर्चाहि त्यावेळीं झालेली होती. अशा रीतीनें केवढी तरी प्रचंड क्रांति मानवी जीवनांत करून ही संस्कृती विराम पावली.




तुतानखामेनच्या (१८ वा राजवंश) कारकीर्दींत तयार केलेला सिंहाचा पुतळा.

मोहेंजोदारो–वायव्य हिंदुस्थानांतील एक प्राचीनसंस्कृति. कांहीं शास्त्रज्ञांच्या मतें आर्य हिंदुस्थानांत येऊन राहण्यापूर्वींच ही संस्कृति भरभराटून नामशेष झाली होती व कांहींच्या मतें मोहेंजोदारो लोकांचें व आर्यांचें थोडेंबहुत तरी दळणवळण असावें असा अंदाज आहे. सिंधमध्यें सिंधू नदीशेजारीं एक पक्या विटांचा स्तूप सांपडला, तेव्हां त्या ठिकाणीं व पंजाबांतील हराप्पा या ठिकाणीं सरकारच्या पुराणवस्तुसंशोधन खात्याचे डायरेक्टर जनरल सर जॉन मार्शल यांच्या देखरेखीखालीं उत्खननास सुरवात झाली. त्यापैकीं विशेषतः पहिल्या ठिकाणीं एक अभूतपूर्व शहर निघालें. यालाच मोहेंजो–दारो (मृतांचें स्थान) असें म्हणतात. या ठिकाणीं जें शहर सांपडलें त्या शहराची पद्धतशीर रचना, पक्या विटांच्या भिंती, सांडपाण्याची उत्कृष्ट सोय, खोदलेल्या विहिरी, मुलांचीं खेळणीं, दागिने, तांब्याचीं हत्यारें व ज्या लिपीची अद्याप ओळख पटलेली नाहीं अशा लिपींत लिहिलेले लेख इत्यादींवरून अंदाज बांधून मार्शलनें या मृत संस्कृतीसंबंधीं एक सुंदर पुस्तक लिहिलें असून त्यामुळें या संस्कृतीचा काल व इतर अंगोपांगें यांची बरीच माहिती मिळते. सर्वसाधारणतः या मृतसंस्कृतीचा काल जरी खि. श. पूर्वीं ५००० पर्यंत मानण्यांत येत असला तरी अनेक उलट सुलट पुराव्यांवरून खि. पू. ३२५० ते खि. पू. २७५० हाच काल अधिकृत मानण्यांत येतो.



इजिप्तच्या एका भिक्षुकाचें खोदलेलें चित्र.

मोहेंजोदारो येथें सांपडलेल्या मोहरा किंवा शिक्के यांच्यांतील व ऊर (मेसापोटेमिया) येथें सांपडलेले शिक्के यांच्यांतील कांहीं साम्यावरून मोहेंजोदारो लोकांचें मेसापोटेमिया येथील लोकांशीं दळणवळण असावें असा



मेहेंजो-दारो येथील उत्खननाचा एक देखावा. मध्यंतरी एक तळें दिसत असून त्याभोंवतीं घरांच्या पडक्या भिंती आहेत.




इजिप्शियन ममी

तर्क आहे. या संस्कृतीच्या लोकांच्या धर्माबाबत अद्याप कांहीं निश्चित सांगतां येत नाहीं. पण कांहीं मूर्ती सांपडलेल्या आहेत.

चौरस रस्ते, पक्क्या विटांच्या भिंती, स्नानगृहें, विहिरी, सांडपाण्याची सोय, माती, तांबें, चांदी वगैरेंचे दागिने, दुमजली घरें, मुलांच्यासाठीं खेळणीं, पुतळे, मातीचीं भाजलेलीं मडकीं, निरनिराळ्या आकाराचीं भांडीं, गेळे, डेरे, मध्यवर्ती तळें, हत्ती, बैल, वाघ, इत्यादींचीं खोदीव चित्रें यांवरून या लोकांच्या राहणीची कल्पना येते. घरांच्या रस्त्याच्या बाजूस घराची मागची भिंत (एकहि खिडकी नसलेली) हें या शह-

---

इजिप्शियन लोकांना प्रेतें चिरकाल टिकावीत म्हणून मसाला घालून व सुवासित करून ठेवण्याची कला (Embalming) माहीत होती. आजच्या शास्त्रीय व रासायनिक शोधांच्या युगांतहि मिसरच्या लोकांनीं कमाविलेलें यश मिळवितां आलेलें नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवावी. अशा प्रकारें जतन करून ठेवलेल्या प्रेताची पेटी व उजव्या बाजूस कापडांत गुंडाळलेलें प्रेत दाखविलें आहे. या प्रकारच्या प्रेतास ममी (Mummy) म्हणतात.




तैग्रीस व युफ्रेटिस या नद्यांचें खोरें व त्यांत निर्माण झालेल्या व विलयास गेलेल्या साम्राज्यांच्या राजधान्या वर दिल्या आहेत.


राचें वैशिष्ट्य आहे. यावरून स्त्रियांना पडदा असावा किंवा रस्त्यावरील धूळ घरांत येऊं नये म्हणून ही सोय केली असावी असे दोन्ही तर्क काढण्यास जागा आहे. मृतांच्या विधीसंबंधीं निश्चित एकच तर्क काढतां येत नाहीं. तसेंच हें शहर भूमीच्या पोटांत कसें गडप झालें, येथील लोक कुठें गेले कीं, एखाद्या शत्रूनें चाल करून हें शहर उध्वस्त केलें, कीं प्लेगासारख्या एखाद्या भयंकर रोगानें सर्वांचा नाश केला याबद्दल अजून निर्णय ठरलेला नाहीं. मात्र घरांत जमिनीवर अनेक सांगाडे सांपडलेले आहेत. एकंदरींत या शहरच्या लोकांनीं मानवी सुखांत बरीच भर घातली होती असें दिसतें.

तैग्रीस व युफ्राटीस या नद्यांच्या कांठच्या संस्कृति–उत्तरेकडून गोऱ्या वर्णाच्या व कणखर टोळ्या खि. पू. ४००० वर्षांपूर्वी मेसापोटेमियांत आल्या. याच टोळ्यांना सुमेरियन लोक म्हणतात. सुमेरियन लोकांनीं या नद्यांच्या कांठच्या सुपीक प्रदेशांत आपली वसाहत केली, पण लौकरच अरबस्तानांतील अकॅडियन्स नांवाच्या टोळ्यांची धाड त्यांच्यावर आली. या लोकांची ओळख इतिहासांत सेमाइट किंवा सेमटिक टोळ्या या नांवानें होते. पण नंतर एक हजार वर्षांनीं दुसऱ्या अमोराइट नांवाच्या सेमिटिक टोळ्यांनीं अकॅडियन्सना जिंकून आपलें राज्य स्थापलें. यांचा नेता हमूरबी नांवाचा एक पराक्रमी पुरुष होता. खि. पू. २१००च्या सुमारास यानें सुमेर व अकॅड या दोन नगरराज्यांतील लोकांना आपल्या अम्मलाखालीं घेऊन बाबिलोनचें साम्राज्य स्थापलें. या साम्राज्याची राजधानी बाबिलोन हें शहर बनलें. जगाच्या इतिहासांत हमूरबीला फार महत्त्वाचें स्थान आहे. कारण त्यानें तयार केलेले कायदे आजहि कांहीं बाबतींत विचार करण्याइतके महत्त्वाचे होते. विशेषतः त्यानें कायद्यानें विधवा स्त्रियांच्या योगक्षेमाची तरतूद, पोरक्या मुलांची सोय व कुटुंबांना दिलेलें संरक्षण व स्त्रियांना समाजांत दिलेला मान या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. कांहीं गुन्ह्यांना प्रमाणाबाहेर कडक शिक्षा हा त्याच्या कायद्यांचा एक महत्त्वाचा दोष मानला जातो. हमूरबीच्या कारकीर्दींत बाबिलोनचा व्यापार वाढला, शेतकऱ्यांची स्थिती सुधारली व इजिप्तनंतर तें एक वैभवशाली साम्राज्य झालें.


याच्यानंतर कासाइट नांवाच्या टोळ्यांनीं बाबि-




बाबिलोनियन लोकांच्या चित्रलिपीची कल्पना
या चित्रावरून येईल.



असीरियाचा राजा असूर नसीर पाल (खि. पू. ८८५ ते ८६०)
याच्या वंशासंबंधीं व दिग्विजयासंबंधीं या विटेवर माहिती
पाचरी लिपींत (Cuniform) खोदलेली आहे.



असीरियन सम्राट दुसरा सारगॉन याच्या वाड्यांत सांपडलेला
मोठे पंख व मनुष्याचें तोंड असलेला बैल.



असूर नसीरपाल पूजा करीत आहे.

लोनवर हल्ले चालू ठेवले. त्यांच्या जोडीला हिटाइट्स टोळ्या मिळाल्या, आणि ही अंदाधुंदी बरींच वर्षें चालल्यावर खि. पू. ९०००च्या सुमारास असीरियन लोकांनीं बाबिलोनचें साम्राज्य जिंकलें. त्यांनीं बांधलेल्या शहरांपैकीं असूर व निनव्हे हीं दोन मोठीं शहरें होत. असीरियन्स हे जात्या लढाऊ वृत्तीचे होते व शेवटपर्यंत ते तसेच राहिले. त्यांची युद्धदेवता हीच आधिदैवत मानली जात असे. त्यांच्या असूरबनिपाल नांवाच्या सम्राटाच्या वेळीं [मृत्यु खि. पू. ६२६] हें साम्राज्य अत्युच्च शिखरावर होतें. त्याच्या मृत्यूनंतर विनाशाला सुरवात झाली व निनव्हे या राजधानीची वाताहत झाली. चाल्डियन व मीड टोळ्यांनीं असीरियन संस्कृति नामशेष केली. पैकीं चाल्डियनांचा राजा नेबुचाड-निझार हाच इतिहासांत विशेष प्रसिद्ध आहे. शेवटीं चाल्डियन व मीड यांना इराणचा राजा सिरस यानें जिंकून आपलें राज्य तेथें प्रस्थापिलें [खि. पू.५७६].

बाबिलोनियन व खाल्डियन लोकांच्या शिलालेखांत राजप्रासाद व मंदिरें बांधणें यांसारख्या शांततामय कृत्यांची नोंद आढळते. तर असीरियन शिलालेखांत युद्ध, विजय, मृगया, यांची नोंद आढळते. असीरियन संस्कृतीचा काल खि. पू. १९०० ते ६१२ पर्यंत मानतात. असीरियन व बाबिलोनियन भाषांमध्यें पुष्कळ साम्य आहे. या दोन्हीहि सेमेटिक भाषासमूहांतील आहेत. आरंभीं पाचरीच्या आकारासारखी (Cuniform) असलेली लिपी बाबिलोनियनांनीं काढली व तीच पुढें असीरियन्सनीं उचलली. कच्चया विटावर लिखाण करीत असत. (१) भाषाशास्त्र, कोश, (२) भूगोल (३) नक्षत्रविद्या, फलज्योतिष, गणित (४) ऐतिहासिक (५) शाबरी विद्या यांवरचें बरेंच लिखाण लिहिलें गेलें होतें. असूरबनीपाल यानें निनव्हे येथें मोठें ग्रंथालय बांधलें होतें. **धर्म**—असीरियन व बाबिलोनियन यांचा धर्म एकच होता. ॲशर व मार्डुक या त्यांच्या देवता. ईस्टर ही प्रेम व युद्ध यांची देवता, सामाझ ही सूर्य देवता, सिन् चंद्र देवता अशा त्यांच्या देवता होत्या. पंचमहाभूतांनाहि ते भजत असत. पण शेवटीं शेवटीं एकेश्वरी मत प्रभावी झालें. भुताखेतांवर त्यांचा फार विश्वास. त्यामुळें मांत्रिकांचें फावलें व पुढें तर देवतांना संतुष्ट करण्याच्या मिषानें नरबली देण्यापर्यंत मजल गेली. पुनर्जन्मावर त्यांचा विश्वास नव्हता. **शास्त्रें**—असीरियन व बाबिलोनियन लोकांना ग्रहणांचा काल नक्की वर्तवितां येत असे. राशिचक्र त्यांना माहीत होतें. रोगांचें वर्गीकरण करून वैद्यकींतहि त्यांनीं प्रगती केली होती. धर्मगुरूंच्याकडून फक्त वरच्या वर्गास शिक्षण मिळत असे. इमारती बांधणें व कुंभारकाम यांत विलक्षण प्रगती झाली होती. शिवाय व्यापारास आवश्यक अशी एक पेढी सतत ४०० वर्षें काम करीत होती. ती मोठ्या प्रमाणावर होती व असीरियन्सच्या काळांत शेतकऱ्यांची स्थिती आजच्यापेक्षां कितीतरी चांगली होती. मनुष्याचें डोकें असलेल्या बैलाच्या आकृतीवरून बैल हें त्यावेळचें महत्वाचें जनावर असलें पाहिजे असा कयास निघतो. राजवाड्यांच्या भव्य इमारतीनंतर मंदिरांसाठीं या लोकांनीं बरेच श्रम घेतलेले दिसून येतात. असीरियन व बाबिलोनियन लोक एकतंत्री राजसत्तेचे भोक्ते होते.

ग्रीक संस्कृति—खिस्ती शकापूर्वी २०००ते१५००-च्या दरम्यान आर्यांच्या कांहीं टोळ्या मॅसिडोन (एक प्रांत)च्या रोखानें चाल करून येऊन हळूं हळूं ग्रीसमध्यें (ग्रीस पाहा) येऊन राहूं लागल्या. या टोळ्यांपैकीं हेलेन्स, थीसेलियन्स, डोरियन्स इत्यादि नांवांनीं ओळखल्या जात असत. खि. श.पूर्वी १००० ते ७०० पर्यंत ग्रीस व त्याभोंवतींचीं बेटें जिंकून लहान लहान नगर-राज्यांची (City States) स्थापना केली. यापैकीं अथेन्स व स्पार्टा हीं इतिहासप्रसिद्ध आहेत. अशा अनेक नगरराज्यांची मिळून ग्रीक (हेलेनिक) संस्कृति बनली. लोक राज्यांचें संस्थापक, शिल्पकला, ललित-वाङ्मय, खेळाडू वृत्ति, शरीरसौष्ठव, नगरसौंदर्य, मर्दानी खेळ, समाजरचनेची विशिष्ट पद्धति, सैन्य व आरमार यांतील प्रगति, अगर इतिहासकार, राज्यघटनाकार व कवि म्हणून ग्रीकांनीं जगाच्या इतिहासांत आपलें नांव आजरामर करून ठेवलें आहे. (इतिहासासाठीं ' ग्रीस ' भाग दुसरा पाहा.)

ग्रीकांच्या ध्येयवादाला जगाच्या इतिहासांत तोड नाहीं. आपण एका स्वतंत्र नगरराज्याचे नागरिक आहों आणि त्या दृष्टीनें आपल्या राज्याचें वैभव वाढविणें आपलें एक अवश्यमेव कर्तव्य आहे अशी शिकवण प्रत्येक ग्रीकाला मिळाली होती. या त्यांच्या वृत्तीबद्दल एक विख्यात ग्रंथकार म्हणतो—He felt (ग्रीक नागरिक) that his intelligent neighbours were watching him. Whatever he did, whe-

ther he wrote plays or made statues out of marble or composed songs; he remembered that his efforts were going to be judged by all the free born citizens of his home town who knew about such things. This knowledge forced him to strive after perfection, and perfection, as he had been taught from childhood, was not possible without moderation.

आरंभींच्या त्यांच्या 'सेनापती' किंवा 'पुढाऱ्याला' त्यांनीं राजा म्हणून कांहीं दिवस मानलें, तरी हळूं हळूं श्रीमंत व कर्तबगार लोकांनीं त्या राजाची जागा पटकाविली. या श्रीमंताच्या मालकीचा बराच व्यापार असे व त्याच्या मालकीच्या बऱ्याच जमिनी असत. यामुळें सामान्य शेतकरी कामकरी लोकांपेक्षां त्यांना जीवनस्वास्थ्य जास्त मिळाल्यामुळें व तें टिकविणें जरूर असल्यामुळें या वरच्या वर्गाला युद्धकलेंत प्राविण्य मिळविणेंच प्राप्त होतें. अर्थात् नगरराज्याचा अधिपती कोणी व्हायचें याबद्दल त्यांच्यांत नेहमीं भांडणें होत; व बळी तो कान पिळी या न्यायानें जो विजयी होई तो राजा बने. पण हा राजा कांहीं लोकप्रिय होत नसे. तो 'जुलमी राजा' म्हणूनच लोक त्याला ओळखत. सातव्या शतकाच्या प्रारंभीं ग्रीकांनीं या राज्यपद्धती-विरुद्ध प्रतिक्रिया सुरू केली व सरदारवर्गाव्यतिरिक्त जे लोक 'फ्रीमेन' (freemen) म्हणून ओळखले जात त्यांनाहि राज्यकारभारांत भाग मिळाला पाहिजे अशा विचाराची एकच लाट उसळली. ड्रॅको नांवाच्या मनुष्यावर श्रीमंताच्या लहरीपासून गरीबांच्या हक्कांचें संरक्षण होईल अशी राज्यघटना तयार करण्याची जबाबदारी टाकली. पण ड्रॅको स्वतः कायदेपंडित असल्यामुळें व त्याची दृष्टि गुन्हा म्हणजे गुन्हा ही असल्यानें व त्याचा सामान्य लोकांशीं विशेष परिचय नसल्यानें त्याची घटना इतकी कडक बनली कीं तीनुसार सर्वच गुन्हेगार ठरले असते. तेव्हां ड्रॅकोची घटना बाजूस सारून पुन्हां सॉलॉन नांवाच्या गृहस्थास तें काम देण्यांत आलें. सॉलॉन हा सरदारपुत्र असून त्यानें खूप प्रवास व निरनिराळ्या घटनांचा अभ्यास केला होता. त्यानें आश्चर्यकारक पण समाधानकारक घटना तयार केली. शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचा व अन्यायाविरुद्ध त्याला ज्यूरी मागण्याचा हक्क मिळाला. एवढेंच नव्हें तर प्रत्येक फ्रीमनला राज्यकारभारांत भाग घेणें हें त्याचें कर्तव्यच होऊन बसलें. ज्याचा जन्म ज्या नगरराज्यांत झाला त्यालाच त्या नगरराज्याच्या नागरिकत्वाचे हक्क मिळत. ज्या वेळीं एखाद्या नगरराज्याला राजा किंवा राज्य बळकावणारा सरदार नसे त्या वेळीं राज्यकारभार 'फ्रीमेन' चालवीत. या फ्रीमेनशिवाय पांच सहा पटीनें मोठा असलेला वर्ग म्हणजे गुलामांचा. अशा रीतीनें १ सरदार किंवा श्रीमंत, २ फ्रीमेन व ३ गुलाम अशी ही ग्रीकांची समाजरचना होती.

सामान्य ग्रीक मनुष्याचें घरहि स्वच्छ आणि त्या कालच्या दृष्टीनें सोईस्कर असें बांधलेलें असे. घराच्या मध्यभागीं अंगण, त्यांत एखादें कारंजें, त्यासभोंवतीं सुंदर संगमरवरी पुतळे व त्यासभोंवतीं स्वयंपाकघर, दिवाणखाना, इतर खोल्या अशी व्यवस्था असे. रस्त्यावर जाण्यास एक दरवाजा. रस्त्याच्या बाजूस घराला खिडक्या मात्र नसत. लांब पांढरे कपडे ते वापरीत. एकंदरीत साधेपणा हें ग्रीक जीवनाचें वैशिष्ट्य होतें. मात्र सौंदर्याचे ते भोक्ते होते. व्यायाम करणें, लष्करी कवायतीला हजर असणें, दारू घेतली तरी 'ज्यास्त' न घेणें, राष्ट्रीय उत्सवांत भाग घेणें ते आपलें कर्तव्य मानीत. नाटकांचे ते फार शोकी होते. 'ट्रॅजेडी'चा नाट्यप्रकार ग्रीक नाटककारांनीं प्रथम प्रचारांत आणला. ॲश्चिलस्, सोफोक्लीस, युरिपिडीज् हे 'शोकान्त' नाटककार व त्यांच्यानंतर ॲरिस्टोफेनिस (हास्यरसात्मक नाटकें लिहिणारा) विशेष प्रख्यात आहेत. होमर हा जगविख्यात महाकवी व हिरोडोटस हा इतिहासकार. या दोघांनीं ग्रीकांचें नांव अमर केलें आहे. त्यांच्या रंगभूमीचा व नाटकांचा इतिहासहि मोठा रम्य आहे.

पर्शियन सम्राटानें (दारियस) ग्रीकांना शरण यावयास सांगून, कराची मागणी केली. ग्रीकांनीं ती नाकारली अर्थात् युद्ध सुरू झालें. सर्व ग्रीक नगरराज्यांत अथेन्स हें वैभवसंपन्न होतें. अर्थात् लढाईचा मुख्य भार त्यावरच पडला. अथेन्सनें स्पार्टा या ग्रीक राज्याला सहाय्यास बोलाविलें; पण मत्सरानें स्पार्टानें मदत केली नाहीं. इतर लहान नगरराज्यांनींहि अथेन्सला मदत केली नाहीं, तरी अथेन्सनें एकट्यानें लढून लढाई जिंकली. (खि. पू. ४९०). नंतर झरसेसनें खि. पू. ४८१ मध्यें प्रचंड सैन्यानिशीं चाल केली. यावेळीं मात्र स्पार्टानें मदत केली. इराणी सैन्यानें अथेन्स शहर काबीज करून तें जाळलें. पण ग्रीकांनीं थेमिस्टॉक्लीजच्या नेतृत्वाखालीं पुन्हां जय मिळविला (४८०).







१. धातूची चकती फेकणारा एक खेळाडू. २ व ३. डिमिटर व टाऊनले या ग्रीक देवता.

अथेन्स हें उंच टेकड्यांवर वसलेलें नगर होतें. तर स्पार्टा एका दरींत वसलेलें होतें. प्रत्येक स्पार्टन हा शिपाई होता. स्पार्टन्सना कला, शिक्षण इत्यादी-पेक्षां स्वसंरक्षण व शिपाईगिरीचेंच महत्व जास्त होतें. पेरिक्लिस या ग्रीक पुढाऱ्यानें अथेन्स शहर पुन्हां बांधलें. शिल्पकार आणवून इमारती व पुतळे पुन्हां तयार करवून अथेन्स सुंदर बनविलें. पण अथेन्स व स्पार्टा यांच्यामधील भांडणाला तोंड फुटून दोघांत लढाई जुंपली. अखेरीस स्पार्टाचा विजय झाला. (४०४). अथेन्सचें राजकीय वैभव खलास झालें.

अलेक्झांडर दि ग्रेट—स्पार्टा व अथेन्सच्या भांडणाच्या वेळीं मॅसिडोनचा राजा फिलिप हा होता. त्याला अथेन्सच्या गुणांचा असा नाश होत असलेला पाहून वाईट वाटत होतें. त्याच्या मनांतून स्पार्टाचा सूड घ्यावयाचा होता, पण त्याचा खून झाला व त्याचा पराक्रमी मुलगा अलेक्झांडरवर ती कामगिरी पडली. खि. पू. ३३४मध्यें अलेक्झांडरनें युरोपची रजा घेतली व अतुल पराक्रम गाजवीत व देशामागून देश जिंकीत अवघ्या ७ वर्षांत हिंदुस्तानांत येऊन पौरसा-बरोबर त्यानें लढाईहि दिली. फोनीशिया, इजिप्त, इराणचें साम्राज्य हीं त्यानें मॅसिडोनच्या राज्यांत सामील केलीं. पण देश जिंकण्यापेक्षां ग्रीकांची संस्कृती सर्वत्र पसरावी ही त्याची प्रबल इच्छा होती. त्याला थोडेंबहुत यश मिळतें न मिळतें तोंच तो मेला. त्याच्या साम्राज्याचे तुकडे झाले आणि त्याचें स्वप्न भंगलें. पण मिसर, सुमेर, बाबिलोन, इराण, ग्रीक संस्कृतींनीं जी मानवी प्रगति केली तिचा अधिक वैभव-शाली उपयोग पुढें रोमन लोकांनीं केला व जगाच्या इतिहासांत आपलें नांव अमर केलें.

इराणी संस्कृति—आर्यन लोकांच्या कांहीं टोळ्या इराणच्या उत्तरेस असलेल्या डोंगराळ मुलखांत राहात होत्या. त्यांनीं हळू हळू सेमेटिक लोकांशीं लढून एकदांचा जय मिळविला. निनव्हे या राजधानीच्या पाडावानंतर ५० वर्षांनीं सिरस नांवाच्या त्यांच्या सेनापतीनें या सर्वांची एकजूट करून अवघ्या तीन वर्षांत सर्व देश जिंकला व मीडियाचें राज्यहि जिंकलें. याच्या सैन्यांत धनुष्यबाणांचा उपयोग करणारे शिपाई व घोडेस्वार होते व त्यांच्या हल्ल्याला तोंड देणें शत्रूला शक्य नसे. ५३९ खि. पू. मध्यें चाल्डिया व बाबिलोन हीं दोन्ही राज्यें त्यानें जिंकलीं, पण खि. पू. ५२८मध्यें उत्तरेकडील कांहीं टोळ्यांशीं लढत असतां सिरस मारला गेला, त्यानंतर सिरसचा मुलगा कॅम्बेसिस यानें खि. पू. ५२५ मध्यें इजिप्त राज्याला जोडलें. यावेळीं भूमध्य व एजियन समुद्रापासून हिंदुस्थानपर्यंत हें साम्राज्य पसरलें. खि. पू. ५२१मध्यें कॅंबेसिस मेला व इराणचा महापुरुष दारियस (Darius the Great) गादीवर आला.

दारियसच्या कालांत इराणच्या साम्राज्याची चांगली भरभराट झाली. त्यानें राज्याचे वीस सत्राप (प्रांत) करून त्यांवर प्रांताधिकारी (सत्राप म्हणत) नेमले.

लिडियाकडून तो नाण्यांत खंडणी घेत असे. इराणची राजधानी सुसा ही होती. सर्व साम्राज्यभर रस्ते पसरले होते. टपालाची उत्कृष्ट व्यवस्था झाली होती व ३९ मुळाक्षरांत (पाचरी पद्धतीच्या) सर्व लिपी बसविली होती. व महत्वाच्या गोष्टी विटा व दगडी स्तंभ व इतर स्मारकें यांवर खोदून ठेवीत. दारियसला इराण ही अतुलनीय आरमारी शक्ति व्हावी ही इच्छा होती म्हणून त्यानें फोनीशियन लोकांच्या सहाय्यानें आरमार तयार केलें. त्याच्या मुलाच्या वेळीं हें आरमार १२०० जहाजांचें झालें होतें. ग्रीक व स्पार्टन लोकांनाहि आपल्या अंमलाखालीं आणावें म्हणून त्यानें अथेन्स-वर मोठी स्वारी केली. व मॅरेथॉनची विख्यात लढाई होऊन त्यांत दारियसला पराजय घेऊन राजधानीला परतावें लागलें. दारियसची तयारी करून पुन्हां स्वारी करण्याचा बेत होता, पण तो खि. पू. ४८५ मध्यें मेला. पण बापाची इच्छा त्याचा मुलगा झर्सिस यानें पुरी करण्याचें ठरवून तयारी करण्यास सुरवात केली. यावेळीं मॅसिडोनापासून हिंदुस्थानपर्यंत व अफगाणि-स्तान, अरबस्तान, पॅलेस्टाइन, सीरिया, मेसापोटेमिया, आशिया मायनर व इराण एवढें हे प्रचंड साम्राज्य झालें होतें. झर्सेस, धनुर्धारी शिपाई, घोडेस्वार, रथी व आरमार इत्यादी प्रकारचें तीन लक्षाहून अधिक सैन्य घेऊन ग्रीकांवर चालून गेला. ग्रीकांना या वेळीं रणवीर स्पार्टन लोकांचें सहाय्य मिळालें होतें. लिओनिडास या स्पार्टन सेनापती व राजा समवेत थर्मापिलीच्या खिंडींत फक्त ३०० स्पार्टन वीरांनीं नुसते भाले व तरवारी यांसह इराणी सैन्यावर तुटून पडून प्रचंड लढाई दिली. शस्त्रें मोडल्यावर हातांनीं व दातांनीं लढून ते पराक्रमी वीर आपल्या सेनापतीसह गारद झाले. ही थर्मापिलीची लढाई (खि. पू. ४८०) जगाच्या प्रमुख लढाईच्या इतिहासांत अग्रस्थान मिळवील एवढी ती अद्भूत झाली. नंतर इराणी सैन्य पुढें घुसलें व झर्सेसनें ग्रीकांनीं रिकामें केलेलें अर्थेन्स शहर जिंकून जाळून टाकलें. पुढें त्याच्या आरमारालाहि पराजय मिळाला आणि प्लेटिया येथें जमिनीवरच्या लढाईत पराभव खाऊन तो परतला. खि. पू. ४६५मध्यें झर्सेसचा राजवाड्यांत खून झाला. त्याच्यानंतर त्याच्या मुलांत भांडणें लागलीं. नंतर हीच दुही वाढत जाऊन इराणी साम्राज्य कमकुवत होत गेलें व अलेक्झांडरनें तें सपाट्यासरशीं मोडून टाकलें.

खि. पू. १००० वर्षें झोरोस्टरनें आपला धर्म-प्रस्थापित केला होता. अंतकाळीं परमेश्वर सर्वांचा एके दिवशीं पापपुण्याप्रमाणें न्याय निवाडा करणार; ही कल्पना या धर्मांपासूनच प्रथम पश्चिम आशियांत निर्माण झाली व तिचेच प्रतिध्वनी पुढें यहुदी, खिश्चन व मुसलमानी धर्मांत उमटले. इराण्यांनीं असीरियन लोकांपासून पंख व मनुष्याचें डोकें असलेला बैल आपल्या धर्मांत घेतला. त्यांनीं बांधकाम. व तकतकीत विटा तयार करण्याची पद्धति बाबिलोन व इजिप्त यापासून उचलली. सिरस व दारियस यांनीं कमावलेलें एवढें प्रचंड साम्राज्य जन्मापासून अवघ्या २०० वर्षांत खलास झालेलें पाहून विषाद वाटतो.

रोमन साम्राज्य—इटलीची आजची राजधानी रोम ही आज कित्येक शतकें इतिहासप्रसिद्ध आहे. लोककथांच्या आधारेंच सांगायचें तर असें सांगतां येईल कीं खि. पू. ७५३ मध्यें रोम शहर वसलें. या शहरच्या लोकांना रोमन म्हणत. या लोकांनीं जें साम्राज्य कमावलें तें रोमन साम्राज्य होह. रोमन साम्राज्य अत्यंत वैभवशाली होतें म्हणून इतिहास सांगतो. पण प्रत्यक्ष इतिहास पाहिला तर हें साम्राज्य म्हणजे एक अकल्पित घटना म्हणूनच इतिहासकार मानतात. कारण साम्राज्याच्या इच्छेनें हें साम्राज्य जिंकलें गेलें नसून रोमन लोकांच्या वाढत्या गरजेबरो-बर त्यांना देश जिंकावे लागले आणि हें साम्राज्य वाढलें.

खि. पू. १९० मध्यें हॅनिबॉल नांवाच्या इटली-समोर आफ्रिकेच्या किनाऱ्यावर असलेल्या व फोनी-शियन्सनीं स्थापलेल्या पराक्रमी कार्थेज या नगरराज्याच्या सेनापतीच्या आत्महत्येमुळें व्यापारी क्षेत्रांत प्रभुत्व मिळविण्याच्या मिषानें रोमन व कार्थेजियन्समधील वितुष्ट वाढत जाऊन अनेक वर्षें चालत आलेला लढा संपला, कार्थेजचें वैभव लयाला गेलें व रोम विजयी झालें.

रोमन समाजव्यवस्थेचे तीन विभाग करतां येतील. एक लष्करी अंमलदार व सरदार, दुसरा शेतकरी व इतर गरीब वर्ग व तिसरा लढायांत मिळविलेल्या विजयानंतर जित राष्ट्रांतील आणलेले स्त्री–पुरुष गुलाम किंवा इतरत्र बाजारांत प्रत्यक्ष विकत घेतलेले गुलाम यांचा वर्ग. यांपैकीं पहिल्या वर्गांतील सुमारें २००० लोकांच्या मालकीचीच इटलींतील सर्व जमीन होती. या विषमतेच्या पोटींच क्रांतीचीं बीजें रोवलीं

जाऊन लोकशाहीसाठीं लढा सुरू झाला. या बाबतींत पहिला प्रयत्न टायबेरियस ग्रेकस यानें केला, पण तो असेंब्लींत येतांच त्याला इतर सभासदांनीं इतका मार दिला कीं तो लगेच मेला. पण यानंतर १० वर्षांनींच त्याच्या भावाला [गेयस] यश मिळून एका कायद्यान्वयें त्यानें शेतकऱ्यांना मदत करण्याचा कायदा केला. पण त्याची एवढीच प्रगती झाली कीं सर्व शेतकरी 'धंदे-वाईक भिकारी' बनले. पण गेयसची एवढीशी सुधारणाहि सरदारांना खपली नाहीं. त्याचाही खून झाला. पण यानंतर काळ्या समुद्राच्या भोंवतालच्या प्रदेशाचा राजा मिथ्रिडेटस् यानें रोमन लोकांच्या चालविलेल्या छळाची बातमी रोमला पोचली. तेव्हां त्याच्यावर चाल करून जाण्यासाठीं सला नांवाचा सरदार निघाला. तो गेलेला पाहून मारियस नांवाच्या शेतकऱ्यांच्या पुढाऱ्यानें बंड करून रोम काबीज केलें. पण लौकरच सला विजयी होऊन परतला व रोममध्यें अंतस्थ यादवी माजली. मारियस पळून गेला व सला विजयी होऊन रोमचा डिक्टेटर बनला व चार वर्षें राज्यकरून मेला. नंतर पॉम्पी हा सेनापती मिथ्रिडेटसचा पुन्हां पराभव करून व सीरिया, जेरुसलेम जिंकून व खूप लूट घेऊन रोमला परतला. रोमन लोकांची वृत्तीच ही कीं पराक्रमी योध्याला राजासमान मानायचें; पण पॉम्पीनें एकदम 'डिक्टेटर' होण्याऐवजीं प्रथम राज्यकारभारासाठीं तिघांची समीति नेमली. तिचे पॉम्पी, ज्यूलियस सीझर (वर सांगितलेल्या मारियसचा पुतण्या) व क्रासस असे तीन सभासद होते. पार्थियन्सच्याविरुद्ध लढण्यासाठीं क्रासस गेला व तिकडेच मेला. नंतर ज्यूलियस सीझर पराक्रमासाठीं बाहेर पडला. त्यानें आल्प्स पर्वत ओलांडून फ्रान्स घेतला व पुढें ब्रिटनवर स्वारी करून ब्रिटनही घेतलें. तेथें त्याला पॉम्पी डिक्टेटर झाल्याचें कळलें तेव्हां त्वेषानें तो परत आला. ज्यूलियस सीझरचें रोमन लोकांनीं मोठें स्वागत केलें. ज्यूलियस सीझर परत येतांच पॉम्पी पळून इजिप्तला गेला. तिथें त्याचा टॉलेमीनें खून केला. ज्यूलियस त्याच्या पाठीवर होताच. त्याची व टॉलेमीची लढाई जुंपली. टॉलेमी लढाईत मारला गेला. तेव्हां सीझरनें त्याच्या क्लिओपात्रा नांवाच्या बहिणीस गादीवर बसविलें. क्लिओपात्रावर ज्यूलियसचें प्रेम बसलें. अशा रीतीनें अनेक पराक्रम करून व रोमचें साम्राज्य वाढवून तो रोमला परतला. सीनेटनें त्याला 'डिक्टेटर' केले. त्यानें नागरिकत्वाच्या हक्काची वाढ केली. दूरच्या प्रांतांची राज्यव्यवस्था पाहाण्यास सुरवात केली. (हे प्रांत श्रीमंत रोमन्स आपली खाजगी मालमत्ता समजत), बहुजन समाजाच्या सुखसोईकडेहि त्यानें लक्ष दिलें. सरदारी लोकांना एवढें कारण बस्स होतें. त्यांनीं सीनेटच्या मीटिंगला ज्यूलियस सीझर येतांच सीनेटर्सपैकीं कांहींनीं (मित्रांनींच) त्याचा खून केला. त्याच्यानंतर सीझरचा पुतण्या ऑक्टेव्हियन व त्याचा कारभारी ॲन्टनी यांनीं अंदाधुंदी थांबवली. ॲन्टनीनें पूर्वेस आशियांतील बंडें मोडलीं, पण तो क्लिओपात्राच्या प्रेमांत सांपडल्यामुळें इजिप्तला जाऊन राहिला. ऑक्टेव्हियन व ॲन्टनी यांच्यांत बेबनाव होऊन ऑक्टेव्हियननें ॲन्टनीचा पराजय केला. क्लिओपात्रास एकटीलाच शत्रूला तोंड द्यायचें होतें. तिनेंहि ऑक्टेव्हियनला प्रेमाच्या जाळ्यांत पकडण्याचा प्रयत्न केला; पण तो फसला. तेव्हां तिनें आत्महत्या केली. इजिप्त रोमच्या साम्राज्याचा एक भाग झाला व ऑक्टेव्हियन रोमला परतला. यानें शहाणपणानें ४० वर्षें राज्य केलें. म्हणजे रोम शहर वसल्यानंतर ७५३ वर्षांनीं रोमचें एवढें अवाढव्य साम्राज्य पसरलें.

पण यानंतर रोमन साम्राज्य झपाट्यानें ढासळूं लागलें. उत्तरेकडून रानटी टोळ्यांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या. सेनापतींच्यामध्यें भांडणें सुरू झालीं. नीरो-सारखे नालायक सीझर रोमवर राज्य करूं लागले, राज्यकारभारांत लांचलुचपत, बेसावधपणा वाढला, श्रीमंतांची चैन भागण्यासाठीं गरीबावरचे कर वाढले, विलासी व पाचकळ वाङ्मय निर्माण होऊं लागलें, शूर वृत्ती मरूं लागली आणि अखेरीस सन ४७६ मध्यें रोमचा सम्राट रोममधून हाकलला गेला व रोमन साम्राज्य लयाला गेलें.

नाहीं म्हणायला या विनाशाच्या काळांत (३१३ ते ३३७) आवाढव्य साम्राज्याला मध्यवर्ती राजधानी असावी म्हणून कॉन्सटटाइननें बायझंटियम येथें राजधानी आणली या शहराला त्यानें कॉन्स्टॅन्टिनोपल हें नांव दिलें. पण यामुळें इटलीवर ताबा कमी झाला व हेंच कारण वाढत जाऊन साम्राज्य आणखी कमकुवत होत गेलें.

रोमन लोकांच्या जीवनावर ग्रीक लोकांच्या राहणीची व तत्त्वज्ञानाची केवढी तरी छाप पडली होती. कॉन्स्टॅन्टिनोपलला राजधानी गेल्यावर तर रोमन

लोकांनीं आपली लॅटिन भाषा सोडून ग्रीक भाषा उचलली. रोमन सम्राटांचा एकच एक असा धर्म नव्हता. निसर्गदेवतांची पूजा हा कांहींचा धर्म होता, कांहीं या बाबतींत उदासीन होते, तर शेवटीं शेवटीं ख्रिश्चन धर्माचेहि एक दोन सम्राट झाले. शिल्पकलेच्या बाबतींतहि रोमन लोकांनीं छान प्रगति केली होती. ग्रीकांप्रमाणेंच अनेक भव्य इमारती त्यांनीं बांधल्या, वाङ्मयाच्या बाबतींत सिसिरोचीं भाषणें, व्हर्जिल, होरेस यांचीं नांवें अमर आहेत; पण सर्वांपेक्षां रोमन कायदा ही रोमन लोकांची अपूर्व देणगी आहे.

येशू ख्रिस्त—येशू ख्रिस्ताच्या जन्मानें व त्याच्या शिकवणीनें एक नवें युग सुरू झालें. येशू ख्रिस्ताला क्रूसावर खिळे ठोकून मारलें तरी त्याची शिकवण अमर राहिली आहे. हळू हळू त्याच्या शिकवणीला व तत्त्वज्ञानाला धर्माचें स्वरूप येऊन ख्रिश्चन धर्माचे अनुयायी अतीशय हाल सोसूनहि वाढूं लागले. ख्रिश्चन मठवासियांनीं सेवा करून हळू हळू एवढें सामर्थ्य कमाविलें कीं रोमन साम्राज्याच्या लयानंतर आजच्या युरोपाच्या जन्मापर्यंतच्या मधल्या बजबजपुरीच्या व सरंजामशाहीच्या काळांत हळू हळू दक्षिणेकडून उत्तरेकडे व पश्चिमेकडे ख्रिश्चन धर्माचा प्रसार करून चर्च व चर्चचा मुख्य अधिकारी 'पोप' याची सत्ता एवढी प्रबल केली कीं अनेक पराक्रमी राजांनींहि या सत्तेपुढें नमावें. सर्व ख्रिश्चन समाज एकत्रित ठेवून त्याच्या शिक्षणाची व अभ्युदयाची कामगिरी या चर्च संस्थेनें केली. एवढेंच नव्हे तर ज्या ठिकाणीं राजाची किंवा कोणा सरदाराची सत्ता नसेल त्या ठिकाणींहि राजाचें काम, पोप व त्याचे दुय्यम अधिकारी यांनीं केलें. यासाठीं अनेक मठ स्थापन झाले व आजन्म ब्रह्मचारी राहून स्त्रीपुरुषांनीं धर्मसेवेला वाहून घेऊन कार्य चालू ठेवलें.

बायझंटाइन साम्राज्य—कॉन्स्टन्टाइन हा रोमन लोकांचा पहिला सम्राट बनला. त्याच्यापुढें साम्राज्य राखायचें कसें हाच मोठा प्रश्न होता; पण त्यानें आपल्या मरणापर्यंत कसें बसें तें संभाळलें. त्याच्यानंतर डायोक्लेटियन यानें निकोमोडिया येथें राजधानी नेली होती. एवढेंच नव्हे तर पुढच्या सम्राटांना चार राजधान्या कराव्या लागल्या. कॉन्स्टन्टाइनला गॉथ व जर्मन लोकांबरोबर नेहमीं युद्धें करावीं लागत. त्यानें आपल्या सैन्यांत त्यांच्यापैकीं कांहीं लोक घेतलेही. पण त्याला निश्चित स्वरूपाचें यश येण्यापूर्वीच तो मेला. राज्यासंबंधीं अनेक खून होऊन त्याच्या राहिलेल्या तीन मुलांत तें विभागलें गेलें. सर्वांत धाकट्या मुलाकडे—कॉन्स्टन्स—पूर्वेचा व दक्षिणेचा भाग आला. पण त्याला राज्यसौख्य मिळालें नाहीं. कॉन्स्टंटियसनें त्याला मारून राज्य बळकावलें. याच्यानंतर त्याचा भाऊ ज्यूलियन (३६१–३६३) राज्यावर आला. याच्या अम्मलांत ख्रिश्चनांचा छळ बराच कमी झाला. याच्यानंतर जस्टीनियन (५२८–५६५) हाच काय तो महत्त्वाचा सम्राट मानतां येईल. इराणी, व्हॅन्डॉल, गॉथ इत्यादि लोकांचा त्यानें अनेक ठिकाणीं पराभव केला. पण याची महत्त्वाची देणगी म्हणजे त्याचें कायद्याचें कोड हें होय. "The Code, Corpus jures Civiles, The Pandects and the Institutes." हीं त्याचीं कायद्याचीं पुस्तकें बायझंटाइन संस्कृतीची अमर देणगी मानतात. कॉन्स्टॅन्टिनोपल येथील सेंट सोफियाचें चर्च यानेंच बांधलें. याच्या मृत्यूनंतर हें साम्राज्य कसेंबसें १४५३ पर्यंत जगून राहिलें व त्या वर्षी तें तुर्की लोकांच्या हातीं पडलें. रोमन साम्राज्यानंतर युरोपमध्यें माजलेल्या बजबजपुरीच्या काळांत ग्रीक व रोमन संस्कृतीची धुरा वाहण्याचें महत्त्वाचें कार्य या राजवंशानें केलें.

इस्लाम—यानंतर इस्लामचा उदय ही एक जगाच्या इतिहासांतील महत्त्वाची घटना आहे. महंमद पैगंबराच्या दूरदर्शी धोरणानें कडव्या पण रानटी अरब लोकांना नव्या कल्पनेच्या जोरावर एकत्र आणून एक-चतुर्थांश जगावर एके काळीं स्वामित्व गाजविण्याइतकी त्यांची प्रगती झाली. मुसलमानांनीहि इमारती बांधण्याच्या बाबतींत आपली स्वतंत्र प्रथा पाडून स्वतःचें वैशिष्ट्य कायम टिकविलें. पण केवळ विलासाकडेच पुढच्या खलीफांचें विशेष लक्ष राहिल्यामुळें 'इस्लाम धर्मांतील सर्व लोकांचा दर्जा सारखाच' या एक तत्त्वाशिवाय यांच्या संस्कृतीचें अमर कार्य नाहीं. मुसलमानांच्या भरभराटीच्या काळीं त्यांनीं व्यापार, रेशमी कापड, औषधें, गणित, ज्योतिषशास्त्र यांत मात्र चांगली प्रगती केली होती. 'मुसलमानी धर्म' हा विषय पहा.

मध्ययुग—आतां यानंतरचा युरोपांतील काल फार महत्त्वाचा आहे. तुर्की सुलतानांनीं जेरुसलेम घेतलें आणि ख्रिश्चनांचा छळ सुरू झाला. जेरुसलेम ही तर ख्रिस्ताची भूमि. तेव्हां ती परत जिंकण्यासाठीं युरोपांतील

राजांनीं धर्मयुद्धें (Crusades) सुरू केलीं. १०९५मध्यें पहिलें धर्मयुद्ध सुरू झालें. शेवटपर्यंत ख्रिश्चनांना निश्चित असें यश मिळालें नाहींच; तरी पण युरोप व आशिया यांमधील दळणवळण व व्यापार वाढला, युद्धाच्या साधनांची प्रगति झाली. धर्मयुद्धासाठीं फ्रेंच, जर्मन, इटालियन, इंग्लिश तरुण एकत्र झाले, सुंदर चर्चें, इमारती बांधल्या गेल्या, जहाजांच्या बांधणींत प्रगती झाली आणि पुढें येणाऱ्या सुवर्णकालासाठीं युरोपची भूमि तयार झाली. यापूर्वी रोमन साम्राज्याच्या विनाश-कालीं सरंजामशाही निर्माण झाल्याचें मागें लिहिलें आहेच. एकंदरींत सर्व जगभर केव्हां तरी सरंजामशाही निर्माण होऊन हळूं हळूं एखाद्या प्रबल राजास तिनें जन्म दिलेला आढळून येतो. युरोपमध्यें तेंच झालें. लहानमोठ्या सरदारांच्या भांडणांमधून अनेक पराक्रमी घराणीं निर्माण झालीं व त्यांनीं फ्रान्स, प्रशिया, ऑस्ट्रिया ई. ठिकाणीं मोठमोठ्या राज्यांची स्थापना केली.


यानंतर कांहीं शतकें [बाराव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंत] विद्येच्या पुनरुज्जीवनाची लाट युरोपमध्यें उसळली, व्यापारामुळें मध्यमवर्गीय पण श्रीमंत वर्ग निर्माण झाला, त्यांच्यामुळें विद्वानांना उत्तेजन मिळालें, बंदुकीच्या दारूचा शोध लागल्या-मुळें लढाईच्या बाबतींत केवढी तरी क्रांती झाली, छपाईचा शोध लागला, नवीन विद्यापीठें स्थापन झालीं, ग्रीक वाङ्मयाचीं भाषांतरें होऊं लागलीं, मार्टिन ल्यूथरच्या चळवळीनें धार्मिक बाबतींतहि बहुजन-समाजाला धर्माच्या नांवाखालीं काय काय चालतें याची कल्पना आली, विद्येबरोबर शिल्पकला, चित्रकला यांचीहि भरभराट झाली, खुद्द चर्च संस्थेंत अंतर्गत सुधारणा होऊं लागली. याच वेळीं इंग्लडच्या आठव्या हेन्रीनें पोपचें धार्मिक वर्चस्व झुगारून दिलें. अशा रीतीनें सर्व युरोप जागें होऊन नव्या आशाआकांक्षेनें भविष्यकालाकडे पाहूं लागलें.

यापुढचा काळ म्हणजे युरोपांतील निरनिराळ्या राजांच्या भांडणाचा आहे असें म्हटलें तरी चालेल. पण वाढत्या आकांक्षेमुळें व व्यापारासाठीं विशेषतः हिंदुस्थानला जाण्यासाठीं जवळचे समुद्राचे मार्ग शोधण्यासाठीं कोलंबस निघाला. त्याला हिंदुस्थानऐवजीं अमेरिका सांपडली, वास्को ड गामा निघाला त्याला हिंदु-स्थानचा मार्ग मिळाला. अशा रीतीनें आणखी प्रयत्न होऊन सांपडेल त्या देशांत युरोपांतील राष्ट्रांनीं वसा-हतीस सुरवात केली. अशा रीतीनें साम्राज्यें वाढूं लागलीं. व्यापारापेक्षां राज्यव्यवस्था महत्त्वाची होऊन बसली आणि अनेक वाटाघाटी सुरू झाल्या.

इंग्लंडमध्यें नागरिक हक्काच्या घोषणा झाल्या आणि राजाला नमवून लोकांच्या हक्काचा पहिला विजय मॅग्ना चार्टाच्या द्वारें मिळाला आणि त्यानंतर लोकांचा राजकारणांत प्रवेश होऊन राजसत्ता खिळखिळी होऊं लागली; इतकी कीं १९ व्या शतकांत इंग्लंडमध्यें सर्व राजसत्ता लोकांच्याच हातीं आली. इंग्लंडच्या पार्ले-मेंटच्या वाढीचा इतिहास रमणीय आहे. आज इंग्लंड-वर राजा असूनहि तें राष्ट्र लोकशाहीचें तारण करणारी एकमेव शक्ति आहे अशी आशा सर्व जगभर निर्माण झाली आहे.

अमेरिकेची राज्यक्रांती—इंग्लंडमधील धार्मिक छळाला कंटाळून इंग्लंडमधील कांहीं लोक अमेरिकेला वसाहतीसाठीं निघाले. तेथें पोचल्यावर त्यांना अत्यंत सुपीक असा प्रदेश आढळला. नंतर हळूं हळूं युरोपशीं दळणवळण वाढत चाललें. अमेरिकेच्या नैसर्गिक संपत्तीची कल्पना युरोपांत पसरतांच जवळ जवळ प्रत्येक राष्ट्रांतून कित्येक कुटुंबेंच्या कुटुंबें वसाहतीसाठीं अमेरिकेंत आलीं. पण बहुसंख्य अमेरिकन इंग्लिश असल्यामुळें व त्यांनीं आपल्या घरच्या लोकशाहीच्या कल्पना बरोबर आणल्यामुळें निरनिराळ्या प्रांतांत लोक-नियुक्त राज्यकारभार चालण्यास सुरवात झाली. जरी ब्रिटिशांनीं गव्हर्नर्स पाठविले व सैन्य ठेवलें तरी त्यांना ही वृत्ती मारतां आली नाहीं. इंग्लंडच्या राज्याच्या चैनीसाठीं अमेरिकेंत कर वाढूं लागले, तसतसे अमे-रिकेच्या लोकांचें मत खवळूं लागलें व लौकरच आपल्याला पार्लमेंटमध्यें प्रतिनिधित्व मिळाल्याशिवाय पार्लमेंटला आमच्यावर कर लादायचा अधिकार नाहीं व आम्हांला कर द्यायची इच्छा नाहीं असें मत व्यक्त होऊं लागलें व अमेरिकेचा राज्यकारभार पाहण्याचा अधिकार आपला आहे असें म्हणूं लागले. केव्हां तरी युद्ध होणारच हें जाणून अमेरिकन लोकांनींहि तयारी चालविली व अखेर सर्व अमेरिकन वसाहतींनीं एकत्र जमून ४ जुलै १७७६ रोजीं स्वातंत्र्याचा जाहीरनामा पुकारला. इंग्लंडनें युद्ध सुरू केलें पण १७८७मध्यें इंग्लंडचा पूर्ण पराभव होऊन अमेरिकेची स्वतंत्र राज्यघटना जाहीर झाली. ही जगाच्या इतिहासांतील **पहिलीच लिहिलेली राज्यघटना होय** आणि यामुळें तिचें महत्व विशेष आहे.

फ्रेंच राज्यक्रांती व नेपोलियन—अमेरिकेच्या राज्यक्रांतीनंतर दुसरी अभूतपूर्व गोष्ट म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीची (पृष्ठ १३७६ पाहा). असह्य जुलूम झाला म्हणजे लोकक्षोभ केवढा होतो व त्याचे केवढे भयंकर परिणाम होतात याचें प्रत्यंतर या राज्यक्रांतींत सापडतें. १७८९मध्यें ही क्रांती झाली व तिनें निर्माण केलेला गोंधळ पुढें चार वर्षेपर्यंत चालू होता. कांहीं अपराधी जीवां बरोबर हजारो निरपराधी जीवांना कंठस्नान घालण्यांत आलें आणि बेताल झालेल्या जनसमूहानें हे प्रकार आणखी किती दिवस चालविले असते कुणास ठाऊक! पण १७९३ मध्यें फ्रेंच बादशाहालाच फांशी दिल्यावर व आणखी कत्तली झाल्यावर १७९५ मध्यें स्थिरस्थावर झालें. निर्भेळ लोकशाहीच्या स्थापनेचीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं व लोकशाहीच्या युगाचा कोंबडा आरवला. या क्रांतींतून स्वातंत्र्य, समता व बंधुभाव हीं तीन तत्त्वें बाहेर पडलीं व एका नवीन तत्त्वज्ञानाचा उदय झाला. क्रांती झाली पण फ्रान्सच्या भोंवतालच्या राजशाहीकडून फ्रान्सवर संकटें येऊं लागलीं. यावेळीं नेपोलियन बोनापार्ट या नांवाचा एक तरुण सेनाधिकारी आपल्या कर्तबगारीनें पुढें आला. फ्रेंच राज्यक्रांती मुख्यतः मध्यम वर्गांतील पुढाऱ्यांच्याच पुढाकारानें झाली हें विसरू नये.



सध्याच्या मेक्सिकोंत ख्रि. पू. ५७५ च्या वेळीं मय (Maya) लोकांची संस्कृति चांगलीच भरभराटलेली होती. त्यांनीं लिहिलेल्या शिलालेखांवरून इतिहास संशोधनाचें काम चालू झालेलें आहे.अद्याप पूर्णशी माहिती जमलेली नाहीं. मय लोक मूर्तिपूजक होते व नागराज (plumed serpent) त्यांचें दैवत होतें. शेती हा त्यांचा मुख्य पेशा होता. त्यांचेच वंशज आज मेक्सिकोचे इंडियन्स म्हणून ओळखले जात आहेत. आपल्या पुराणकालीन पाताळांतलि बभ्रुवाहनाच्या राज्याचा उल्लेख याच राज्यासंबंधीं तर नसेल ? वरच्या चित्रांतील मागची इमारत पिसारा असलेल्या नागराजाचें मंदीर आहे.

नवीन स्थापन झालेल्या डिरेक्टरीच्या व 'कौन्सल'च्या पद्धतींत त्याला स्थान मिळालें. त्यानें आपल्या युद्धकौशल्यानें अनेक प्रांत जिंकले. बलाढ्य समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांचा एकामागून एक पराभव केला. फ्रान्सचा दरारा व वैभव वाढविलें; व अमीन्सच्या तहानें (१८०२) फ्रान्सला पुन्हां शांततेचा काल लाभला. फ्रेंच लोकांनीं कृतज्ञतेनें नेपोलियनला आमरण 'फर्स्ट कौन्सल' केलें. 'कोड नेपोलियन' या नांवानें अनेक कायदेपंडितांच्या सहाय्यानें सिव्हिल कोड तयार केलें. यानंतर 'क्रिमिनल कोड', पीनल कोड, कमर्शिअल कोड (व्यापारी कायदे) व सिव्हिल प्रोसीजर कोड तयार केलें. हे कायदे तयार करतांना त्यानें रोमन कायदा हा मुख्य आधार समजला होता ही महत्त्वाची गोष्ट आहे. त्यानें राज्यकारभारांतहि एकसूत्रीपणा व तत्परता आणली. १८०४ मध्यें तो फ्रान्सचा बादशहा झाला. अमेरिकेंत साम्राज्य वाढविण्याचा त्याचा प्रयत्न फसल्यामुळें त्यानें युरोपमध्येंच आपलें लक्ष स्थिर केलें. पण शेवटीं त्याचा वाटर्लूला पराभव होऊन युरोपच्या इतिहासांतील नेपोलियन-युग संपलें.

फ्रेंच राज्यक्रांतीनें सर्व युरोपच्या जीवनांत राजकीय व सामाजिक क्रांती केली. शेतकऱ्यांच्या परिस्थितीशीं जुळते कायदे निर्माण झाले व त्यांच्या वाढत्या महत्वाकांक्षेमुळें युरोपांतील सर्व राष्ट्रांतील तरुणांत अननुभूत असा स्वराष्ट्राभिमान जागृत झाला. एवढे हे फायदे या दोन गोष्टींपासून झाले. या दोन गोष्टींच्या परिणामासंबंधीं एक अमेरिकन लेखक म्हणतो— "The middle classes were stirred by ideas that


would not be silenced. National sentiment had emerged in most of the European nations and this sentiment, rightly or wrongly, seemed to promise, in its cultivation, not only increased stability, but also increased liberties."

राष्ट्रीय स्वातंत्र्याचा अतिरेक—नेपोलियनचा पराभव झाला खरा, पण तेवढ्यानें कांहीं युरोपांत शांतता झाली नाहीं. नेपोलियननें जवळ जवळ चोवीस राज्यांची उलथा पालथ केली होती. या देशाचे प्रांत त्या राज्याला जोडून एक अपूर्व गोंधळी निर्माण झाली होती. युरोपची राजकीय घडी विसकटलेली होती ती बसविण्यासाठीं मेटरनिच् (ऑस्ट्रिया), टॅलिरॅ (फ्रान्स) व रशियाचा झार अलेक्झांडर यांची १८१५ मध्यें व्हिएन्नाला समिति बसून युरोपच्या शांततेची त्यांत गंभीर चर्चा झाली व योजना ठरल्या. नवीं राज्यें बनलीं. थोडेसे प्रश्न सुटल्यासारखे वाटले पण शांततेचीं बीजें कुठेंच रुजलीं नाहींत. स्पेनचा राजा परतला, जर्मनींत बिस्मार्कचा उदय झाला, बोर्बोन राजांना फ्रेंच सिंहासन पचलें नाहीं, तिथें पुन्हां लोकशाही आली आणि लौकरच तिसऱ्या नेपोलियननें पुन्हां फ्रान्सचें सिंहासन स्थापलें. स्पेन, पोर्तुगाल, नेपल्स-मध्यें राज्यक्रांत्या झाल्या, हॉलंडपासून बेल्जियमनें स्वातंत्र्य मिळविलें. हंगेरीनें ऑस्ट्रियापासून आपल्या-साठीं स्वतंत्र पार्लमेंट मागितलें, अमेरिकेनें युरोपशीं सुरू केलेल्या व्यापारामुळें आणखी व्यापारी कटकटी निर्माण होऊं लागल्या. याच वेळीं अमेरिकेच्या मनरो डॉक्ट्रिनचा उदय झाला.या सर्वांना एकच उत्तर मॅटर-निच्च्या दृष्टीनें होतें तें म्हणजे दडपशाही. पण त्यांत त्याला यश मिळालें नाहीं. १८१५ मध्यें व्हिएन्नाला झालेल्या वाटाघाटींतून इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया व रशिया या चार राष्ट्रांच्या पवित्र करारानें अनिर्बंध एकतंत्री राजशाही स्थापन करण्याची कल्पना पार ढासळली. प्रत्येक राष्ट्रांतून स्वतःच्या राष्ट्राविषयींचा अभिमान कमालीचा वाढत चालला, एकतंत्री व जुलमी राज्यकारभाराविरुद्ध राज्यक्रांत्या झाल्या आणि सर्व युरोपभर स्वातंत्र्ययुद्धांचा डोंब उठला.

शास्त्रें आणि मानवी प्रगति—निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या ठिकाणीं मनुष्यानें जी कांहीं थोडी बहुत पुंजी मिळविली तेवढ्या पुंजीवरच कित्येक शतकें त्या त्या राष्ट्रांतील मानवी जीवन आपला मार्ग आक्रमीत होतें. जिथें मनुष्याची मति कुंठित झाली त्या ठिकाणीं त्यानें हात टेकून त्या गोष्टींचा संबंध 'परमेश्वरा'शीं जोडला. त्या समाजांतील विद्वानांनीं व पुढाऱ्यां-नींच जिथें हात टेकले तेथें सामान्य लोकांची कथा काय ? आकाशांत भराभर काळेकुट्ट ढग जमून सोसा-ट्याचा वारा एके दिवशीं वाहूं लागला आणि सर्व विश्वाची जणूं वावडी होते कीं काय अशी परिस्थिती निर्माण झाली आणि इतक्यांत कडाड् काड् काड् आवाज करीत निमिषमात्रांत सर्व पृथ्वीवर तेजस्वी प्रकाश फेकून विद्युल्लता त्या गर्द अंधारांत कुठें नाहींशी झाली. ती गेली न गेली तों धो धो पाऊस आला नी सर्व पृथ्वी न्हाऊन गेली. हा चमत्कार मानवानें यापूर्वी कधीं पाहिला नव्हता. त्यानें आपलें इवलेसें डोकें खूप खूप खाजवून पाहिलें; पण त्यांतून हें असें कसें झालें याचें कांहीं केल्या उत्तर मिळेना. पुन्हां पुन्हां त्यानें तो चम-त्कार पाहिला व पुन्हां पुन्हां त्यानें त्यावर विचार केला, पण कांहीं केल्या त्याला त्याचा उलगडा होईना आणि असाच एकदां तो आपल्या घरकुलाच्या दाराशीं बसला असतां आकाशांतून विद्युल्लता आली नी पृथ्वीच्या पोटांत गडप झाली. दुसरे दिवशीं भक्ष्यासाठीं तो फिरत असतांना त्याला काल जिथें वीज गडप झाल्यासारखें वाटलें त्या ठिकाणीं केवढा तरी मोठा खड्डा पडलेला दिसला. हें असें कां व्हावें याचेंहि कारण त्याला सुचेना—छे,यावेळीं त्याला तें सुचलें. हो. अगदीं समाधानकारक ! आकाशांत राहाणाऱ्या, ही पृथ्वी व तीवरील जीवसृष्टी निर्माण करणाऱ्या परमेश्वराचीच ही करणी ! केवढें समाधान वाटलें त्याच्या मनाला ! त्यानें त्या दिवसा-पासून अगम्य गोष्टी या परमेश्वरनिर्मित ठरवून टाकल्या आणि त्यानें आपलें हें मत आपल्या मुलानातवांना मोठ्या भक्तीनें सांगितलें आणि त्याच्या आज्ञाधारक मुलांनीं तें तसेंच शतकानुशतकें जतन करून ठेवलें.

विद्युल्लतेची गोष्ट सोडली तरी इतर बाबतींतहि त्यानें परमेश्वराला शरणचिठ्ठी दिली. एखाद्या ओढ्याचें पाणी पिऊन कुणाला ताप आलेला पाहतांच त्याला वाटलें कीं त्या पाणी पिणाऱ्याच्या कांहीं दुष्ट अशा पूर्वकर्मांबद्दल त्या परमेश्वरानें त्याला पाण्याच्या रूपानें शासन दिलें; आणि हीच विचारसरणी बळावून त्यानें या परमेश्वराच्या अदृश्य शक्तींना खूष करण्यासाठीं नैवेद्य व हळुंहळूं बलिदानास सुरवात केली; व ती पद्धत जगांतील प्रत्येक राष्ट्रांत कोणत्या ना कोणत्या तरी कालांत मनुष्यानें धर्माच्या नांवाखालीं अवलंबिली,

याबद्दल इतिहास दाखले देतो. पण याच समाजांत कांहीं 'जरा जास्त चिकित्सक'मंडळी निर्माण झाली आणि त्यांनीं संशोधनास सुरवात केली. एखाद्याला ताप आला तर परमेश्वराची करुणा भाकीत बसण्यापेक्षां कांहीं औषध शोधण्याची खटपट केली; आणि



(१) ७५० सालीं (A. D.) मुसलमानी साम्राज्याचा विस्तार केवढा होता याची कल्पना या नकाशावरून येईल. (२) बायझंटाइन साम्राज्याची रूपरेखाहि या नकाशांत दिलेली आहे.

त्याला थोडेंबहुत यश आलें. या यशानें उल्हसित झालेल्यांनीं आणखी परिश्रम करून हा ताप कां येतो व तो कसा घालवायचा हें लोकांना सांगून टाकलें व स्वतःचें शास्त्र बनविण्यास सुरवात केली. त्यांनीं वनस्पती शोधल्या, त्यांचे गुणधर्म पारखले आणि कोणत्या तापावर व रोगावर कोणत्या वनस्पतीचा कशा प्रकारें उपयोग केला तर उतार पडतो हें अनेक ठोकताळे पाहून कायमचें ठरवून टाकलें. ही जशी वैद्यकशास्त्राची सुरवात झाली तशीच इतर शास्त्रांचीहि सुरवात झाली आणि आज ही शास्त्रीय विचारसरणीची पद्धति इतकी वाढली आहे कीं मनुष्यानें चालावें कसें नी बोलावें कसें याचेंहि शास्त्र बनलें आहे.

वर ज्या अगतिक परिस्थितीनें अगम्य गोष्टी या परमेश्वराच्या लोभाकोपावर अवलंबून आहेत असें मनुष्यानें ठरवून टाकलें त्यावरूनच रूढी व धार्मिक कल्पना विशिष्ट ठिकाणीं पक्कड धरून बसल्या. पूर्वपरंपरागत कल्पनांविरुद्ध कोणी कांहीं बोललें कीं तो पाखंडी मानला जाऊं लागला. त्याचा छळ होऊं लागला. सर्व जगभर ही परिस्थिती अगदीं परवांपर्यंत होती. रॉजर बेकन सारख्याला कित्येक वर्षे असलें नवीन कांहीं लिहायला बोलायला बंदी होती. गॅलिलिओनें टेलिस्कोपमधून इतर ग्रहांच्याकडे पाहून जेव्हां त्याला त्या ग्रहांचें सत्यस्वरूप कळून आलें तेव्हां तो सांगूं लागला, " लोकहो ऐका, जे तेजस्वी तारे तुम्हांला आकाशांत दिसतात त्या ठिकाणीं बायबलमध्यें लिहिल्याप्रमाणें कुणा देवांचीं राज्यें नाहींत; ते तारे..." पण त्याला पोप व त्याच्या अधिकाऱ्यांनीं पुढें बोलूंच दिलें नाहीं. कॉपरनिकसनें सांगितलें कीं, या विश्वाचा मध्यबिंदू सूर्य आहे, पृथ्वी नव्हे; तेव्हां त्यालाहि बायबलमधील सत्याचा अपमान केला म्हणून शिक्षा भोगावी लागली. ही ख्रिश्चन लोकांची तऱ्हा; तर मुसलमानांची तऱ्हा याहून न्यारीच. त्यांचा पक्का विश्वास कीं, महंमद पैगंबरानें सर्व कांहीं कुराणांत लिहिलें आहे. त्यांत जें काय करायला सांगितलें आहे तेंच धार्मिक आणि जें त्यांत नाहीं तें सर्व अधार्मिक; आणि हा कित्ता त्यांनीं अगदीं आजपर्यंत प्रामाणिकपणें गिरविला आहे. रेडिओ कांहीं महंमद पैगंबराच्या-वेळीं नव्हता; पण आतां रेडिओ तर आला. आतां तो वापरायला हरकत नाहीं असें कांहीं कुराणांत सांगितलेलें दिसत नाहीं तेव्हां तो वापरणें निषिद्धच असें कांहींचें निश्चित मत; पण परवांच मोठमोठ्या मौलवींची सभा भरून त्यांत ठरलें कीं रेडिओ वापरणें यांत कुराणाच्याविरुद्ध कांहीं नाहीं. आपण हिंदु लोकहि कांहीं या अंधश्रद्धेच्या बाबतींत कमी नाहीं. पण—

आतां काल बदलला आहे. प्लेग ही आज दैवी आपत्ती ठरूं शकत नाहीं. आकाशांत गडगडणारी वीज कां उत्पन्न होते व कडाडते हें आम्हांला कळलें आहे. तिच्या विध्वंसक शक्तीपासून स्वसंरक्षण कसें

करावें हेंहि आम्हांला आज कळलें आहे. आकाशांत रात्रीं चमचमणारे तारे म्हणजे काय प्रकरण आहे याचा तलास आम्ही काढला आहे. पक्ष्याप्रमाणें आकाशांत उड्डाण करण्याची किमया आम्ही मिळविली आहे, परमेश्वरचरणीं रुजूं केलेल्या सर्व शरणचिठ्यांची फेर-तपासणी करून त्यांची सत्यता पारखली आहे आणि आज आम्ही एवढे धीट बनलों आहोंत कीं परमेश्वर परमेश्वर म्हणून म्हणतात ती चीज तरी आहे कीं नाहीं असा फाड्कन् प्रश्न विचारूं लागलों आहों.


याच शास्त्रीय विचारसरणीनें सर्व मानवी व्यवहारांचें, जीवनाचें आम्ही पृथक्करण करून उपयुक्त, अनुपयुक्त गोष्टी पारखून एक नवीन विचारसरणी सर्व जगभर एकसमयावच्छेदेंकरून पसरूं पाहात आहों. त्यामुळें आज सर्व जग खडबडून जागें होऊं लागलें आहे. पूर्वींच्या धर्मकल्पना पार गडगडत आहेत, व जो तो आपापलें घर झाडून पुसून स्वच्छ करूं लागला आहे.

यंत्रयुगाची सुरवात—यंत्रयुगाची सुरवात वस्तुतः एकोणिसाव्या शतकाच्या आरंभींच झाली होती. १७७७मध्यें जेम्स वॅटनें वाफेवर चालणारें इंजिन तयार केलें. १७३३ मध्यें जॉन के नांवाच्या इसमानें 'धांवता धोटा' काढला, इलाय व्हिटने यानें कापूस पिंजणारें यंत्र काढलें, १७८८ मध्यें जॉन फिच् यानें वाफेच्या यंत्रशक्तीवर चालणारें जहाज तयार केलें, कार्टराइटनें यंत्रावर चालणारा माग तयार केला, १८८३ मध्यें हेन्री कार्ट यानें पोलाद तयार केलें, १७६९ मध्यें आर्कराईटनें एकाच वेळीं १६ चात्या चालविणारें यंत्र तयार केलें. त्यामुळें सूत भरभर तयार होऊं लागलें. १८१४ मध्यें स्टिफेन्सननें ताशीं तीन मैल चालणारें लोकोमोटिव्ह (रेल्वेचें इंजिन) तयार केलें. १८५०-पर्यंत रेल्वेचे मार्ग तयार झाले, रॉबर्ट फल्टननें फ्रान्समध्यें आपल्या कर्तबगारीला वाव मिळत नाहीं म्हणून अमेरिकेंत जाऊन १८३८ मध्यें फक्त १५ दिवसांत न्यूयॉर्कहून पॅरिसला आपल्या जहाजांतून प्रवाशांना तो घेऊन आला. साध्या कोळशाऐवजीं भट्ट्यांसाठीं दगडी कोळशाचा उपयोग होऊं लागला. अशा रीतीनें द्रुतगतीनें व्यापार व वाहतूक करण्यासाठीं यंत्रांचा उपयोग होऊं लागला. हातमागावरील कापडापेक्षां गिरणींतील कापड चांगलें व स्वस्त मिळूं लागलें, लोहारांची गरज कमी झाली, कारखाने वाढूं लागले, खेडीं ओस पडूं लागलीं, शहरें भरभराटूं लागलीं, शेतीच्या बाबतींत नवे नवे शोध लागूं लागले, १८३७ मध्यें तारायंत्राचा शोध लागला. अशा रीतीनें झपाट्यानें यांत्रिक सुधारणा होऊं लागल्या.

पण यामुळें मानवी सुखाच्या एका बाजूस भर आला तर दुसऱ्या बाजूस दुःख झपाट्यानें वाढूं लागलें. कारखान्यांत काम केल्यास जास्त पैसा मिळतो असें वाटून कोष्ट्यांनीं आपले माग बंद केले, लोहारांचीं दुकानें बंद झालीं, गाडी—घोड्याचें काम बंद झालें; पण एवढें होऊनहि कारखान्यांत सर्वांना काम मिळणें शक्यच नव्हतें. बेकारी वाढूं लागली. एका बाजूस नवीन नवीन कारखाने काढण्याकरितां अनेकांच्या थोड्या थोड्या रकमा गोळा करून जॉइंट स्टॉक कंपन्या स्थापन होऊन भराभर कारखाने निघूं लागले. जमिनदारांच्या व सरदारांच्या श्रीमंतीलाहि लाजविणारा भांडवलदारांचा वर्ग यामुळें निर्माण होऊं लागला. आपण इंग्लंडचीच गोष्ट घेऊन बोलूं या. इंग्लंडच्या पार्लमेंटमध्यें कितीतरी लॉर्डस् होते, इतरहि जमीनदार होते, लहान मोठ्या शहरांच्यातर्फें निवडून गेलेले प्रतिनिधीहि होते; पण ज्यांच्या व्यापारामुळें राष्ट्राच्या संपत्तींत भर पडत होती व नेपोलियनबरोबरच्या युद्धांत ज्यांच्याकडून सारखा पैसा पुरवला जात होता अशा लिव्हरपूल, मँचेस्टरसारख्या शहरांचे व व्यापाऱ्यांचे त्यांत प्रतिनिधी नव्हते. बेकार लोकांनीं कारखान्यांवर हल्ले केल्यामुळें व कामगारांचे संघ स्थापन केल्यामुळें कारखानदारांना आपल्यावर मोठें संकट ओढवणार असें वाटलें, तेव्हां त्यांनीं एकच हाकाटी केली. आणि १८३२ च्या सुधारणा बिलानें पार्लमेंटमध्यें प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क मिळविला. पण मजुरांची दाद कोणीच घेतली नाहीं. मालक देतील तो पगार घ्यावयाचा, १२—१३ तास काम करायचें आणि श्रमानें पिळवटून गेल्यावर कसल्यातरी खोलींत येऊन पडायचें.शिट्टी वाजली कीं पुन्हां पळायचें. याशिवाय स्त्रीमजुरांचीं दुःखें होतींच. मोठ्या माणसांपेक्षां लहानमुलें कामावर ठेवणें काटकसरीचें म्हणून लहान मुलांची भरती झाली; पण त्यांचेहि हाल पाहवत नसत. अशा रीतीनें मजुरांचीं गाऱ्हाणीं वाढत गेलीं व १८४८ मध्यें त्यांनीं मोठें बंड केलें. पण ते पुढाऱ्यांच्या नादानपणानें आपल्याच मरणानें मेले. कारखानदार तरी माणसेंच होतीं. त्यांना आपली चूक हळूं हळूं कळून आली. कांहीं कालानें मजुरांच्या दुःस्थितीकडे त्यांचें लक्ष गेलें.

पार्लमेंटमधून कायदे पास झाले. मजुरांची स्थिती कितीतरी पटीनें सुधारली आणि गेल्या २५ वर्षांत तर मजुरांचे संघ सरकारमान्य होऊन त्यांच्यातर्फेचे प्रतिनिधीहि निरनिराळ्या राष्ट्रांच्या असेंब्ली, सीनेट, पार्लमेंट इ.मध्यें जाऊन बसले. कांहींना तर मुख्य प्रधानकीचीं वस्त्रेंहि मिळालीं.

गुलामांचा व्यापार—अनादि कालापासून युद्धानंतर जितांमधून स्वरूपसंपन्न स्त्रिया राजांनीं आपली कामवासना तृप्त करण्याकरितां गुलाम म्हणून न्यायच्या, त्यांचें अनुकरण सेनापतींनीं व इतर सैनिकांनीं करायचें, इतर सेवेसाठीं पुरुषांना गुलाम करून न्यायचे ही एक जेत्यांची प्रथाच पडलेली सर्व जगभर आपल्याला आढळून येते. नुसता जेवणावारी राबणारा नोकर आजहि कुणाला मिळाला तर हवा असतो. मग ज्या काळीं मानवी हक्काच्या कल्पनांचा पूर्ण विकासहि झाला नव्हता त्या काळच्या लोकांना हिणविण्यांत तरी अर्थ काय ? गुलामांना घरींदारीं राबवून अत्यल्प खर्चांत अनेक सुखसोई मिळविणें ही एक साधीसुधी व कांहीं लक्ष देण्यांत अर्थ नाहीं असल्या समजुतीनें भारलेल्या कल्पना अगदीं परवांपर्यंत उघड दिसत होत्या.



१९१४ सालीं असलेलें ब्रिटिश साम्राज्य व इतर साम्राज्यें दाखविणारा नकाशा.


याच कल्पनेची सुधारून वाढविलेली आवृत्ति म्हणजे गरीब स्त्री–पुरुषांना व्यापारासाठीं म्हणून बळजबरीनें पकडून, पैसे देऊन विकत घेऊन या देशांतून त्या देशांत जाऊन त्यांच्या सौंदर्याचें, शक्तीचें व गुणांचें उघड्या बाजारांत प्रदर्शन मांडून व वर्णन करून लिलांवानें त्यांना विकणें. पश्चिम आशिया, इजिप्त हे देश तर असल्या–विशेषतः स्त्रियांच्या–व्यापाराबद्दल आज हजारों वर्षें प्रसिद्ध आहे. आज जग केवढें सुधारलें आहे असें आपण म्हणतों, पण हा स्त्रियांचा व्यापार अद्यापहि सर्व कायदे झुगारून किती मोठ्या प्रमाणावर चालला आहे हें राष्ट्रसंघातर्फे प्रसिद्ध झालेले वृत्तांत वाचले तर सहज लक्षांत येण्यासारखें आहे. केवढी शरमेची गोष्ट आहे ही !

यापेक्षांहि ज्या गुलामांच्या व्यापाराचा इतिहास लिहिला गेला आहे तो पाहिला तर आज सुधारलेल्या म्हणून समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांचा अधःपात केवढा झाला होता हें समजून येईल. मेक्सिकोंत या नव्या पद्धतीच्या गुलामांच्या व्यापाराचें बीज रोवलें गेलें. तिथल्या मुळच्या हिंदी लोकांना स्पॅनिश मळेवाल्यांनीं राबवून तेथले हिंदी लोकच नामशेष होतात कीं काय अशी परिस्थिति निर्माण

केली. तेव्हां एका मोठ्या दयाळू पाद्र्यानें (!) यापेक्षां आफ्रिकेंतले नीग्रो लोक आणले तर पुष्कळ गुलाम मिळून आपली अडचण भागेल अशी शक्कल काढली. केवढी नामी कल्पना आणि अशी कल्पना अमलांत आणायची नाहीं तर कोणती आणायची? स्पॅनिश जहाजें आफ्रिकेला निघालीं, शेकडों दीनवाण्या नीग्रोंना पकडून आणून अमेरिकेंत, युरोपांत त्यांना विकण्याचा व्यापार सुरू झाला. सर्व राष्ट्रांतील व्यापाऱ्यांनीं या पवित्र व्यापारांत भाग घेतला. उत्तर अमेरिकेच्या दक्षिण भागांत उसाच्या, तंबाखूच्या मळेवाल्यांना, मेक्सिकोंतील मळेवाल्यांना, दक्षिण अमेरिकेंत, सर्वत्र त्यांची उघड विक्री सुरू झाली. त्यांना रात्रंदिवस राबविण्यांत येऊं लागलें. त्यांना इतक्या क्रूरतेनें वागविण्यांत येत असे कीं नुसत्या छळाची हकीगत ऐकून अंगावर शहारे येत. इंग्लंडमध्यें वुइल्यम विल्बरफोर्स आणि झकेरी मेकॉले यांनीं संस्था स्थापून गुलामगिरीच्या पद्धतीविरुद्ध हल्ले चढविले. त्यांनीं पार्लमेंटमध्यें 'गुलामांचा व्यापार करणें' हा गुन्हा असल्याचा कायदा पास करून घेतला आणि १८४० नंतर इंग्लंडच्या वसाहतींत एकहि गुलाम राहिला नाहीं. १८४८च्या राज्यक्रांतीनें फ्रान्सच्या वसाहतींतील 'गुलामगिरी' नष्ट झाली. १८५८ मध्यें पोर्तुगीजांनीं २० वर्षांत सर्व गुलामांना स्वातंत्र्य देण्याचा कायदा केला. डच लोकांनींहि 'गुलामगिरी' नष्ट केली. पण—

उत्तर अमेरिकेंतील दक्षिणी संस्थानांतील मळेवाल्यांचें राज्यकारभारांत मताधिक्य असल्यामुळें त्यांनीं 'गुलामगिरी' बंद करण्यास नकार दिला. १८६०मध्यें अब्राहम लिंकन अमेरिकेचा प्रेसिडेंट म्हणून निवडून आला, त्यानें हा प्रश्न धसास लावला. या प्रश्नासाठीं दक्षिणेंतील कांहीं संस्थानांनीं अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतून फुटून निघण्याचा बूट काढला. लिंकनच्या दृष्टीनें ही विघातक गोष्ट होती. दोन्ही पक्षांत युद्ध सुरू झालें. शेवटीं दक्षिणी संस्थानांचा पराभव होऊन (१८६५) लिंकनचें म्हणणें मान्य झालें. सर्व संस्थानें एकत्र राहिलीं. पण यापूर्वींच दोन वर्षें (१८६३) मध्यें लिंकननें जाहिरनामा काढून सर्व गुलाम स्वतंत्र झाल्याचें जाहीर केलें होतें. अशा रीतीनें या अमानुष व्यापाराचा प्रकट कायदेशीरपणा गाडला गेला. पण यापेक्षांहि एका भयंकर गुलामगिरींत अनेक राष्ट्रें अडकून पडत होतीं. ही राजकीय गुलामगिरी होय आणि साम्राज्यशाही ही ती दिव्य शक्ति होय.

साम्राज्यांची वाढ व गेलें महायुद्ध—युरोपांतील सर्वच राष्ट्रांच्या पुढें आतां राजकीज अडचणींपेक्षां जन्माला घातलेल्या या यंत्रांना खायला अन्न कोठून आणायचें हा प्रश्न होता. यंत्रांना खायला घातलें तर राष्ट्राची उपासमार होणार होती. तेव्हां वसाहती काबीज करून यंत्राला अन्न (कच्चा माल) पुरवायचा व तयार झालेला माल घेऊन नवीन व्यापारपेठा काबीज करून त्यांत तो खपवायचा हा एकच मार्ग त्यांना उरला व तोच त्यांनीं पत्करला. इंग्लंडनें, आफ्रिकेंत दक्षिणेकडचा भाग व इजिप्त घेतला, हिंदुस्तान घेतला, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड त्यांचेच होते. जर्मनांनीं पश्चिम व पूर्व आफ्रिका बळकाविली. द. अमेरिकेंतील न्यू गिनी येथें वसाहत केली, फ्रान्सनें अल्जीयर्स, माडागास्कर बेट, फ्रेंच इंडोचायना घशांत घातला, लहानशा बेल्जियमनेंसुद्धां आफ्रिकेंतला कांगो नदीचा प्रदेश उपटला. अमेरिकेला घरांत भरपूर जमीन व खनिज संपत्ति असूनहि तिनें क्यूबा व फिलिपाइन्स हीं बेटें घेतलीं. इटलीनें अबिसिनीया घेण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. तेव्हां ट्रिपोलीवरच ढेकर दिली. सर्वांची चैन झाली. पण याच वेळीं रुमानिया, सर्बिया, बल्गेरिया या चिमुरड्या बाल्कन राष्ट्रांनीं टर्कीच्या सुलतानापासून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न सुरू केला. १८७६ मध्यें बल्गेरियांत कत्तली झाल्या; यामुळें संतापून रशियानें युद्ध पुकारलें. आणि विजय मिळवीत रशियन्स कॉन्स्टॅन्टिनोपलच्या दरवाजावर धक्के मारूं लागले. तेव्हां टर्कीच्या सुलतानानें इंग्लंडकडे मदत मागितली. त्या वेळीं इंग्लंडचा प्रधान डिझरेली यानें रशियांत झालेल्या ज्यूंच्या छळाचा सूड घ्यावा व टर्कीलाहि उपकारबद्ध करावें म्हणून सहाय्य केलें व लढाई जिंकली. १८७८मध्यें सेंट सेफॅनो येथें तह झाला व बाल्कन राष्ट्रांचा प्रश्न बर्लिनच्या कॉन्फरन्सवर सोपविला. डिझरेली महावस्ताद मुत्सद्दी. बिस्मार्कहि त्याला वचकून होता. त्यानें सर्बिया, रुमानिया व मॉन्टेनेग्रो यांना स्वतंत्र म्हणून मान्यता दिली. बल्गेरियाला राजा दिला, पण अर्धवट स्वातंत्र्य दिलें आणि हळूंच एक चूक करून ठेवली. ती ही कीं सर्बियाचे दोन तालुके ऑस्ट्रियाच्या ताब्यांत दिले. सर्बियन लोकांना ही गोष्ट आवडली नाहीं. आणि ऑस्ट्रियन सत्तेविरुद्ध त्यांचा लोकक्षोभ वाढत जाऊन २८ जून १९१४ ला साराजेव्हो येथें एका सर्बियन विद्यार्थ्यानें आर्चड्यूक फर्डिनंडवर गोळी



ऑगष्ट १९३९ अखेर हिटलर व मुसोलिनी यांच्या झोटिंगशाहींच्या तडाख्यानें त्यांच्या अमलाखालीं आलेले युरोपांतील प्रदेश जाड काळ्या रेषांनीं दाखविले आहेत.

महायुद्धानंतरः—२८ जुलै १९१९ रोजीं तह झाल्यानंतर एकदांचें युद्ध संपलें. हा तह व्हर्साय (फ्रान्स) येथें झाला. फ्रान्स व इंग्लंड या दोन राष्ट्रांनीं जर्मनीस हा तह मान्य करण्यास भाग पाडलें. महायुद्धाचा सर्व दोष आपला असल्याचें जर्मनीकडून मान्य करविलें, जर्मनीकडून अल्सस लॉरेन हे प्रांत फ्रान्सला, यूपेन—मालमेडी बेल्जियमला, पासेन व कॉरिडॉर (जर्मनीकडून पूर्व आशियांत जाणारा समुद्रकांठचा पट्टा) पोलंडला, मेमेल लिथुआनिआला इत्यादिप्रमाणें जर्मनीचे प्रांत काढून इतर राष्ट्रांना दिले. पोलंड, झेकोस्लोव्हाकियासारखीं नवीन राष्ट्रें निर्माण केलीं. जर्मनीचें सैन्य, आरमार व वैमानिक बल खची केलें. १५ वर्षांच्या मुदतीनें ऱ्हाइनलँड हा सुपीक प्रदेश दोस्तांनीं आपल्या ताब्यांत घेतला. जर्मनीच्या वसाहती सर्वांनीं वाटून घेतल्या आणि अशा रीतीनें जर्मनीच्या सामर्थ्याचा चट्टामट्टा करून व जर्मनीसारख्या मानी राष्ट्राचा अवमान करून लढाईनंतर निर्माण झालेली बेकारी, व्यापाराला लागलेली ओहोटी इ. प्रश्नांचा विचार करण्यासाठीं हीं राष्ट्रें आपापल्या घरीं परतलीं.

या तहाचे दोन भाग होते. पहिल्या भागानें राष्ट्रसंघाची प्रतिष्ठापना झाली व दुसऱ्यांत काय सामावलें होतें हें वर दिलेंच आहे. यंत्रयुगाच्या सुरवातीनें पूर्वीची समाजरचना निदान सार्वजनिक आयुष्यांत ढासळूं लागली. भांडवलदार व मजूर आणि शेतकरी असे दोन वर्ग निर्माण झाले. कार्ल मार्क्स (स्वतंत्र चरित्र पाहा) या जर्मन ज्यूनें आर्थिक विषमता कशी निर्माण होत आहे हें दाखवून जगाच्या कल्याणासाठीं नवीन समाजरचना कशी करावयास हवी हें सांगितलें. मजुरांचे संघ निर्माण झाले. त्यांचें प्राबल्य वाढूं लागलें. रशियांत अनेक कारणानें मोडकळीस आलेल्या झारशाहीला महायुद्धाचा भार सहन झाला नाहीं.

झाडली. त्या आवाजानें जणूं काय जागे होऊन जर्मनी, फ्रान्स, रशिया, इंग्लंड, टर्की इत्यादि राष्ट्रांच्या तोफखान्यांतल्या तोफा भराभर लालबुंद लोखंडी स्फोटक गोळे फेकूं लागल्या.

फर्डिनंडच्या या मृत्यूनें जरी गेल्या महायुद्धाला तोंड पडलें असलें तरी त्याचीं बीजें मुख्यतः बर्लिनच्या कॉन्फरन्समध्येंच रुजलीं होतीं. प्रत्येक राष्ट्राच्या महत्त्वाकांक्षा दडपल्या गेल्या होत्या, जगावर प्रभुत्व मिळविण्याची जबरदस्त महत्वाकांक्षा निर्माण झाली होती त्याचें हें फळ होतें. ऑस्ट्रियानें युद्ध सुरूं केलें, जर्मनी त्याला मिळाला, टर्कीहि मिळाला. यांच्याविरुद्ध फ्रान्स उभें ठाकलें, इंग्लंड रणांगणावर उतरलें, रशियानें उडी घेतली. इटलीनें आरंभीं जर्मनी—ऑस्ट्रियाशीं सख्य दाखविलें तरी शेवटीं तें इंग्लंड—फ्रान्सला मिळालें आणि इतर लहानसान राष्ट्रांनीं योग्य वाटली ती बाजू घेऊन चार वर्षेपर्यंत अपूर्व रणकंदन केलें. दोन्ही पक्ष घाईला आले. जय कोणाचा होतो हें कळेना; इतक्यांत अमेरिकेचा अध्यक्ष वुड्रो विल्सन इंग्लंडच्या मदतीला आला. इंग्लंड—फ्रान्सचा—दोस्तांचा—जय झाला. १९१९ मध्यें व्हर्सायचा तह झाला. जगाला वाटलें हें युद्ध शेवटचेंच; आतां शांतता अखंड नांदेल. केवढी गोड आशा होती ही ! पण सर्वांचा अंदाज चुकला.

तेथील असंतुष्ट प्रजेस व मजूरशेतकरी वर्गास, लेनिनसारखा पुढारी (लेनिन पाहा) मिळाला, राज्यक्रांति झाली, झारची व त्याच्या कुटुंबियांची निर्दयपणें कत्तल झाली. लेनिनच्या नेतृत्वाखालीं नव्या तत्त्वज्ञानानें भारलेलें सरकार स्थापन झालें. सोशॅलिझम, कम्यूनिझम, बोल्शेव्हिझम यांसारख्या नव्या राजकीय पंथांचा उदय झाला. स्पेन व इटलींत लोकशाहीच्या व सोशॅलिझमच्या तंत्रांचा उपयोग प्रत्यक्ष अडचणींना तोंड देण्यांत झाला नाहीं. नुसते संप पुकारून कांहीं राज्यव्यवस्थेची घडी बसेना, मुसोलिनीसारख्या पक्क्या सोशॅलिस्टालाहि काय करावें याचा पेंच पडला आणि फॅसिझमचें (फॅसिझम पहा) नवें तत्त्वज्ञान त्याला सुचलें. धडाडीनें त्यानें त्याचा प्रसार केला. अराजकतेनें कंटाळलेल्या इटालियन जनतेनें त्याचा बहुमतानें स्वीकार केला. मुसोलिनीनें स्वपक्षाच्या सामर्थ्यावर मुख्य प्रधानकी बळकाविली आणि गेलीं १७-१८ वर्षे आपल्या या आवडत्या तत्त्वज्ञानानुसार तो इटलीचें राज्य चालवीत आहे व साम्राज्य वाढवीत आहे.

सामान्य शिपाई म्हणून महायुद्धांत भाग घेतलेल्या एका हिटलर नांवाच्या जर्मन रंगाऱ्यास व्हर्सायच्या तहानें झालेला राष्ट्राचा अपमान सहन झाला नाहीं. फॅसिझमच्या तत्त्वज्ञानाप्रमाणेंच (किरकोळ फरक सोडून) नात्सिझमच्या तत्त्वज्ञानाची त्यानें प्रतिष्ठापना केली. अनेक अनुयायी मिळविले, निवडणुकी लढवल्या आणि १९३३ मध्यें तो जर्मन राष्ट्राचा चॅन्सेलर निवडून आला, आणि त्याच घटकेपासून एक अभूतपूर्व घटना घडून येऊं लागली. त्यानें व्हर्सायच्या तहाच्या सर्व अटी मोडल्या. नुकसानभरपाई देण्याचें नाकारलें. सार प्रांत घेतला, खऱ्याखोट्या प्रचारानें ऑस्ट्रिया व झेकोस्लोव्हाकिया घशांत घातला; आणि कॉरिडॉर व वसाहतींच्या मागणीनें आकाश पाताळ एक करून सोडलें. जर्मन लोकांवर अत्याचार होत आहेत अशी सबब काढून पोलंडविरुद्ध एवढ्या झपाट्यानें हल्ला केला कीं अवघ्या १५ दिवसांत पोलंडचें राज्य खलास झालें. याच वेळीं पोलंडच्या मदतीस धांवण्याच्या करारामुळें, वस्तुतः हिटलरचा हा समंध आतां कुठें थांबणार हें नकळल्यानें, इंग्लंड-फ्रान्स या दोस्तांनीं जर्मनीरुद्ध युद्ध पुकारलें. (सप्टेंबर १९३९) हिटलरनें, डेन्मार्क, हॉलंड, नॉर्वे, बेल्जियम व शेवटीं फ्रान्सहि जिंकून निम्म्या युरोपवर आपलें अधिराज्य स्थापलें. इटलीहि मे १९४०पासून जर्मनीला मिळाला आहे. ('हिटलर' पाहा).

रशियानें-स्टालिननें-संधी साधून पोलंडचा युक्रेन प्रांत बळकावला, चार महिने युद्ध करून फिनलंडला आपल्या मागण्या मान्य करायला लावल्या. धाकदपटशा दाखवून रुमानियाकडून बेसअरेबिया हा प्रांत उपटला. रशियाची साम्राज्याची भूक चांगली वाढलेली दिसते !


आज गेल्या जुलै (१९४०) पासून इंग्लंड एकाएकी जर्मनीशीं टक्कर देत आहे. रोज हल्ले प्रतिहल्ले चालू आहेत. हजारो जीव मरत आहेत आणि काळाच्या उदरांत काय साठलें आहे याचा विचार करूं गेलें कीं जीव उबून जातो.

लोकशाही, कम्यूनिझम, फॅसिझम या सर्वच राज्यपद्धतींची सध्यां परीक्षा चालू आहे. यांपैकीं कोणती टिकणार व त्याचे परिणाम तरी मानवी हिताला पूरक होणार कीं नाहींत हें आणखी २५ वर्षांनीं ठरेल.

हिंदुस्थान आणि पूर्व आशिया—पूर्व आशियांतील चीन व जपान हींच काय तीं राजकीय महत्वाच्या दृष्टीनें महत्वाचीं अशीं राष्ट्रें उरलीं आहेत. चीनची संस्कृतीहि फार जुनी आहे. युरोपमध्यें बंदुकीच्या दारूचा शोध लागण्यापूर्वी तो चीनमध्येंच लागला होता. छपाईसाठीं टाइप पाडण्याची कल्पना युरोपच्याआधीं चीनला माहीत होती. खि. स. पू. तेथें चांगल्यापैकीं कागद तयार होत होता. उत्तर चीनमध्यें असलेली भिंत ही चीनच्या उच्च शिल्पकलेचा एक उत्तम नुमना आहे. मातीचीं सुंदर भांडीं करण्यांत आज शेकडों वर्षें चीन तरबेज आहे. चीन संततिसंपत्तीनें संपन्न असूनहि स्वराष्ट्राभिमानाचा अभाव, अशिक्षितपणा, एकलकोंडेपणाची वृत्ती व एकजुटीचा अभाव यामुळें फुटून गेला आहे आणि त्याचाच शेजारी-जपान-अवघ्या दीडशें वर्षांत जागृत होऊन आज जगांतील बलाढ्य राष्ट्रांत त्याची गणना होऊं लागली आहे; आणि आज तोच चीनच्या राशीला बसला आहे.

हिंदूंची (आर्यांची) संस्कृती लो. टिळकांच्या मताप्रमाणें खि. पू. ६००० वर्षांपासून वाढीला लागली. खि. पू. कांहीं शतकें ते हिंदुस्थानांत येऊन राहिले. राज्यें स्थापलीं, साम्राज्यें कमावलीं आणि घालविलीं. वेद, उपनिषदें, महाभारत, रामायण इ. महाकाव्यें या हिंदूंच्या अमूल्य व तेजस्वी ठेवी आहेत. भगवान कृष्ण, बुद्ध,

महावीर इ. लोकोत्तर पुरुष याच राष्ट्रांत जन्मले व वाढले. वैदिक धर्मानंतर, बुद्धधर्म प्रथम इथेंच स्थापन झाला, जैनांच्या धर्माची मातृभूमी हीच आहे. अशोकासारखा अलौकिक सम्राट याच राष्ट्रांत जन्मला. त्याला झालेल्या उपरतीनें त्यानें बुद्धधर्माचा स्वीकार व प्रचार केला. अहिंसेचा उपदेश सर्व जनतेला मिळाला. नंतर मुसलमान आले. ते इथेंच राहिले. त्यांची प्रजाहि झपाट्यानें वाढत आहे.मुसलमानांच्या दास्यत्वांतून हिंदुस्थानची सुटका मराठे करतात न करतात तोंच टोपीवाला इंग्रज प्रबल होऊन त्यानें सर्व हिंदुस्थान पादाक्रांत केला. आज आपण गुलाम आहोंत. गुलामगिरीच्या बेड्या तोडून नव्या उत्साहानें हिंदी संस्कृतीचें तोंड उजळ करणें व जगांत तिचा मान राखणें आज हिंदूंचें कर्तव्य आहे. आजहि आपण बावरलेल्या परिस्थितींत आहोंत. महात्मा गांधींचा सत्यअहिंसेचा मार्ग आपल्याला तारणार आहे का, त्याशिवाय आपद्धर्म म्हणून आपल्याला दुसरा कांहीं मार्ग काढायला हवा आहे? जगाच्या इतिहासाचा अभ्यास केला व धीरानें आणि निश्चयानें स्वतःच्या धर्मांत, समाजरचनेंत शिरलेले दोष प्रसंगीं प्रेमानें, स्वार्थत्याग करून तर प्रसंगीं एखाद्या रानवटाप्रमाणें काढून टाकले तर अखिल हिंदु एकत्र येऊन स्वतःचाच काय पण जगाचाहि उद्धार करतील अशी आपण आशा बाळगूं.



आजची यांत्रिक संस्कृति

[या लेखांत अनेक गोष्टींचा उल्लेख पुनरुक्ती होऊं नये म्हणून केलेला नाहीं. तरी या लेखाबरोबरच धर्म, हिंदुधर्म, आपली संस्कृति, उपनिषदें, भारतीय तत्त्वज्ञान, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, ग्रीस, चीन, जपान, जर्मनी, फ्रान्स इ. देशांचा इतिहास, गौतमबुद्ध, खिश्चन धर्म, मुसलमानी धर्म, झरतुष्ट्र व त्याचा धर्म इ. इतरत्र आलेले लेख पाहावे.]

मार्कंडेयः—मृकंडाचा पुत्र. याला धूमोर्णा नांवाची बायको होती. हा प्रारंभीं अल्पायुषी होता, पण पुढें दीर्घायुषी झाला. याला फक्त सहामहिन्यांचें आयुष्य होतें.परंतु पांच महिने चोवीस दिवस गेल्यावर पंचविसावे दिवशीं यास सप्तर्षींचें दर्शन झालें. त्यांनीं याला 'दीर्घायुषी हो' असा आशीर्वाद दिला. तसेंच त्याला ब्रह्मदेवानेंदेखील कल्पांतापर्यंत आयुष्य, पुराणरचयितृत्व व ऋषिश्रेष्ठत्व दिलें. हा ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत होता. याला कल्पांतींच्या वटवृक्षाचें व प्रलयाचें दर्शनहि झालें होतें. देवानें त्या वेळीं याला पोटांत ठेविलें होतें. तेथें याला अंत लागेना, तेव्हां देवाचें यानें स्तवन केलें. त्यामुळें यास भगवद्दर्शन झालें. याची पांचवें वर्षीं मुंज झाली. सप्तर्षींनीं याला यज्ञोपवीत व दंड दिला होता. यानें आपला एक आश्रम स्थापिला होता. यासंबंधीं सर्व माहिती पुलस्त्यानें रामास सांगितली. मयसभेंत पांडवांनीं प्रवेश

केला, त्यावेळीं हा तेथें होता. ब्रह्मसभेंत पांडव गेले, त्यावेळींहि हा तेथें होता. धर्म मार्केंडेयाश्रमीं गेला असतां लोमश ऋषीनें त्यास मार्केंडेयचरित्र सांगितलें. धर्मराज वनवासांत असतां हा त्यांस भेटण्यास गेला होता. त्यावेळीं श्रीकृष्णही तेथें होता. नारदाच्या सांगण्यावरून यानें पांडवांस पारलौकिक गति, भूपतीचें महत्व, तार्क्ष्य–सरस्वतीसंवाद, वैवस्वतमनुचरित्र, युगनिरूपण, विष्णुदर्शन, विष्णु–उदरप्रवेश व निर्गमन, विष्णुस्वरूपकथन, कलियुगवृत्त, कल्की–अवतार व कृतयुगारंभ यांसंबंधीं सर्व निवेदन केलें. यानें धर्माला प्रयागमाहात्म्य सांगितलें. नारदानें यास चार युगें व भार्याधर्म यांचें निवेदन केलें. याची व पांडवांची भेट झाली असतां यास रामाची आठवण होऊन यानें 'सामर्थ्य असतां अधर्म आचरूं नये' असा उपदेश केला. यानें हेममालीस व्रत देऊन त्यास शापापासून मुक्त केलें. यानें भद्रतनु ब्राह्मणास दान्तापासून उपदेश घेण्यास सांगितलें.

मार्केंडेयानें अत्यंत घोर तप केलें. तें सहा मन्वंतरें चाललें होतें. तेव्हां पुरंदर नामक इंद्रानें याला मोहित करण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले. प्रथम वसंतऋतु उत्पन्न केला. नंतर अप्सरा, गंधर्व यांसह मदन पाठविला. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर यास नरनारायणांचें, मायेचें, बालमुकुंदाचें व शंकराचेंहि दर्शन झालें. शंकरानें यास 'तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतील, यश अविच्छिन्न राहील, त्रिकालज्ञान प्राप्त होईल, आत्मानात्मविचार उत्तम समजेल. श्रेष्ठ पुराणिक होऊन कल्पसमाप्तीपर्यंत अजरामर होशील' असा वर दिला. शंकरानें यास चौदा कल्पांचें आयुष्य दिलें. याचा पुत्र वेदशिरस. याच्या नांवावर मार्केंडेयस्मृति, मार्केंडेयसंहिता व मार्केंडेय स्तोत्र हे प्रसिद्ध ग्रंथ आहेत. यानें तामसपुराणांपैकीं मार्केंडेय व वाराह हीं पुराणें रचिलीं.

मार्क्स, कार्ल (१८१८–८३):–जर्मन (ज्यू) अर्थशास्त्रज्ञ व समाजसत्तावादाचा आद्य आचार्य. याचा जन्म ट्रेव्हेज येथें ५ मे १८१८ रोजीं झाला. त्याचें शिक्षण बॉन व बर्लिन विद्यापीठांत झालें. इतिहास व तत्त्वज्ञान हे त्याचे आरंभींचे आवडीचे विषय होते. १८४२ मध्यें तो 'ऱ्हेनिश गॅझेट' या वृत्तपत्राचा संपादक झाला. पण त्यांतील पुढारलेल्या मतांमुळें दडपशाहीला तें लौकरच बळी पडलें. तेव्हां जर्मनी सोडून पॅरिसमध्यें येऊन राहिला. तेथें असतांनाच एंजल्स या अर्थशास्त्रज्ञाशीं त्याची मैत्री जमली व ती आमरण टिकली; पण त्याच्या मतामुळें पॅरिसमधून त्याची हकालपट्टी झाली. तेव्हां तो ब्रुसेल्सला गेला व तेथें त्यानें एंजल्सच्या सहकार्यानें कम्यूनिस्ट मॅनिफेस्टो काढला. ऱ्हाइनलँडमध्यें १८४८ सालीं झालेल्या अयशस्वी क्रांतींत त्यानें भाग घेतला. पुढें १८४९ मध्यें तो लंडन शहरीं गेला. शेवटपर्यंत तो तिथेंच होता. लंडन शहरीं त्यानें आंतरराष्ट्रीय मजूरसंघ स्थापण्यांत व चालविण्यांत भाग घेतला. पण हा संघ १८७३ मध्यें बंद पडला. त्याच्या विश्वविख्यात 'कॅपिटल (Capital)' या ग्रंथाचा पहिला भाग १८६७ मध्यें प्रसिद्ध झाला; व राहिलेले दोन भाग त्याच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. तो ता. १४ मार्च १८८३ रोजीं लंडन येथें मेला.

त्याची कामगिरी–इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण, तत्त्वज्ञान वगैरे सर्व क्षेत्रांत कार्ल मार्क्सनें एक नवीन कालखंड निर्माण केला. गतेतिहास, वर्तमानकाळ व भवितव्य या सर्वांकडे पाहण्याची अगदीं एक नवी दृष्टि मार्क्सनें दिली, आणि देव, दैव अथवा चमत्कार यांवर हताशपणें विसंबून न राहतां स्वतांच्या कर्तृत्वानें मनुष्यास सृष्टिधर्म आपल्या उन्नतीसाठीं राबवितां येतील हें मार्क्सनें जगास शिकविलें आहे.

"'ईश्वरानें प्रकाश निर्माण होवो' असें म्हटलें त्याबरोबर प्रकाश निर्माण झाला" ही खिस्ती पुराणांतली कल्पना चूक असून अंधेरप्रकाश, जन्ममरण, ऊनपाऊस, डोंगर, नद्या, झाडें, प्राणी वगैरे सर्व गोचर सृष्टि हा सृष्टिधर्माचा परिणाम होय, ईश्वराचा यांत कांहींही संबंध नाहीं, ईश्वर नाहींच असें मार्क्सच्या पूर्वींचे भौतिकवादी ऊर्फ जडवादी मानीत होते. पण मानवी सृष्टींत ज्या हेतुपूर्वक घडामोडी प्रत्यहीं होत आहेत, हें नुसतें जडसृष्टीचें कर्तृत्व असणें शक्य नाहीं; जडसृष्टीचे गुणधर्म समजून सृष्टीवर प्रभुत्व ठेवण्यासाठीं व तिला आपल्या उपयोगीं लावण्यासाठीं मनुष्य निरनिराळीं हत्यारें, यंत्रें बनवितो व निरनिराळ्या समाजरचना करतो हें मानव इतिहासाचें सार आहे, असें मार्क्स सांगतो.

समाजरचना करण्याच्या या क्रमांतच एकदां गुलामगिरी आली होती, पुढें सरंजामशाही आली व आतां भांडवलशाही आली आहे. धनोत्पादनाचा प्रकार

सुधारतां सुधारतां त्याला उपकारक होईल अशा प्रकारें जुनी समाजरचना नष्ट होऊन मनुष्याकरवीं नवी उत्पन्न होते. भांडवलशाहीचा जन्म हा धनोत्पादन-साधनें सुधारण्यास उपकारक झाला. कालांतरानें आतां भांडवलशाहीही धनोत्पादन–साधनांच्या सुधारणेस अडथळा करूं लागली असल्यानें तिचा नाश करून कम्युनिझम स्थापन होईल, त्यासाठीं मानवजातीनें झगडलें पाहिजे असें मार्क्सचें सांगणें आहे.

या इतिहासक्रमांत एका वर्गानें दुसऱ्या वर्गाची पिळणूक राज्यसत्तेच्या बळावर अखंड चालविली असून सध्यांच्या भांडवलशाहींत भांडवलदार वर्ग मजूरवर्गाची पिळणूक करीत आहे; पण मजूरवर्गानें भांडवलदारवर्गाशीं वर्गकलह चालवून अखेर कामगार-क्रांतीपूर्वक कामगारसत्ता स्थापन केल्यास कालांतरानें वर्गीय पिळणूक व राज्यसत्ता दोन्हीहि नष्ट होतील आणि स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांच्या आधारावर पूर्ण अराज्य अवस्था निर्माण करतां येईल, ही सर्व जगभर केली पाहिजे व तीसाठीं धनोत्पादन–साधनें खाजगी मालकींतून काढून सार्वजनिक मालकींत आणलीं पाहिजेत असें मार्क्स शिकवितो. मार्क्सनें आयुष्यभर अनेक ग्रंथ लिहून, चळवळी करून व संस्था स्थापून हें जागतिक क्रांतीचें कार्य चालविलें. त्याच्या हयातींत त्यास यश आलें नाहीं. त्याचें सुखस्वप्न रशियाचा कम्युनिस्ट पुढारी लेनीन यानें १९१७ सालीं रशियांत कामगारक्रांति करून यशस्वी केलें.

मार्क्सवादः–कार्ल मार्क्सच्या तत्त्वावर आधारलेला एक सोशॅलिस्ट पंथ. हेगेल (जर्मन) व रिकार्डो (इंग्लिश) यांच्या तत्त्वांचाहि या पंथावर बराच परिणाम झालेला आहे. मानवी जीवन, राजकीय तत्त्वज्ञान व आदर्श समाजरचना हीं सर्व आर्थिक परिस्थितीवरच आधारलेलीं असलीं पाहिजेत किंवा केवळ आर्थिक परिस्थिती हीच या सर्वांच्या उभारणीचा पाया मानला पाहिजे, ही या पंथाची मूलभूत विचारसरणी आहे. ज्या वेळीं हातानें कापड विणलें जात होतें त्यावेळीं सरंजामदारीप्रधान समाजरचना (Feudal society) जन्माला आली व ज्या वेळीं वाफेनें चालणाऱ्या यंत्रावर कापड विणलें जाऊं लागलें त्यावेळीं भांडवलदारीप्रधान समाजरचना किंवा सरंजामशाही व भांडवलशाही निर्माण झाली व त्या त्या समाजरचनेबरोबरच त्यांच्या कल्पना, धर्म व तत्त्वें निर्माण झालीं असें हा पंथ म्हणतो. याला "ऐतिहासिक भौतिकवाद" (Historical materialism) म्हणतात. सतराव्या व एकोणिसाव्या शतकांच्या मध्यंतरींच्या कालांत जी औद्योगिक क्रांती झाली त्या क्रांतीनें सरंजामशाही उलथून भांडवलशाही स्थापन केली पण या भांडवलशाहीच्या पोटांतच तिचा मारेकरी कामकरीवर्ग निर्माण झाला. पण भांडवलशाही, तिची उत्पादनशक्ति मध्यंतरी निर्माण झालेल्या उत्पादनसाधनांच्या प्रमाणांत कमी प्रभावी ठरेल, त्या वेळीं ही भांडवलशाहीहि उलथून पडेल. मालक मजुराला तो जितका वेळ काम करतो तितक्या वेळेच्या बरोबरीचा आर्थिक मोबदला किंवा मजूरी देत नाहीं, तर कांहींतरी कमी देत असतो म्हणजे जेवढी रक्कम तो कमी देतो तेवढी तो स्वत:साठीं राखून ठेवतो, आणि जर मजूर याला विरोधील तर त्याला काढून मालक दुसऱ्या बेकार मजुराला कामाला लावील. या बेकार मजुरांना अर्थशास्त्रज्ञ 'औद्योगिक राखीव सैन्य' (Industrial reserve army) म्हणतात व हें सैन्य मनुष्याचें काम करणारीं यंत्रें, व्यावसायिक प्रगती (Technical progress) यांनीं नेहमीं निर्माण होत राहते. अशा तऱ्हेनें उत्पादनाच्या वाढीबरोबर मजुरीचें पाऊल कधींच पडत नाहीं आणि ही विषमता मधून मधून मालक-मजुरांतील तंटे निर्माण करते. यामुळेंच भांडवलदार वर्गाची श्रीमंती सतत वाढत राहते. मोठ्या प्रमाणांत आणखी भांडवल हे भांडवलदार गुंतवितात, मोठमोठे कारखाने उभारतात आणि त्यासाठीं यंत्रांची वाढ करून सतत बेकारी वाढवीत राहतात, कामकऱ्यांची मजूरी कमी होत जाते व मालक–मजूर तंटे अधिक तीव्रतर होत जातात व मजूरवर्ग दरिद्री होत जातो. अशा रीतीनें समाजाच्या एका बाजूस संपत्तीसंचय होतो तर दुसऱ्या बाजूस वाढतें दारिद्र्य पाय पसरत असतें; आणि अशा रीतीनें क्रांतीची तयारी होत जाते. दारिद्र्य तीव्रतम झालें कीं, कामगारवर्ग उठून भांडवलदाराच्या हातून संपत्ती निर्मिणाऱ्या सर्व साधनांची मालकी हिसकावून (अर्थात् जबरीनें) घेतो व ही सर्वांची समाईक मालकी समजून समाईक फायद्यासाठीं वैयक्तिक फायद्याची हाव मारून संपत्ती निर्माण करतो. हा वर्ग नेहमीं उत्पादन व गरज यांचें समप्रमाण ठेवण्याची योजना अंमलांत आणून बेकारी निर्माण होऊं देणार नाहीं.

गेल्या ६० वर्षांत या तत्त्वज्ञानाची राजकीय व आर्थिक क्षेत्रामध्यें फार मोठी छाप पडली आहे. ट्रेड

युनियन्स वगैरेंच्या संघटनेमुळें मजुरांच्या आर्थिक परिस्थितींत सतत सुधारणा होत आलेली आहे असें एडवर्ड बर्नस्टाइन या जर्मन सोशॅलिस्टाचें मत आहे. महायुद्धानंतर अशीहि एक विचारसरणी पुढें आलेली आहे कीं संघटित भांडवलशाही व सरकारची हुकमत यामुळें ही विषमता पुष्कळच कमी करतां येईल. याउलट लेनिन व कम्यूनिस्ट यांचें म्हणणें असें कीं भांडवलशाहीमुळें नसत्या मजुरांचीच उपासमार होत नसून मजुरांसह इतर सर्व लोकांची उपासमार होत आहे व सर्वांनाच आर्थिक विषमतेचे चटके बसत आहेत. अर्थात् ही विचारसरणी हीहि मार्क्सिझमचाच एक भाग मानतात.

मानसशास्त्र:–मानसशास्त्रासंबंधीं या लेखांत कांहीं विचार मांडतांना पाश्चिमात्य मानसशास्त्रज्ञांच्या पद्धतीचा उपयोग केला आहे. आपल्या देशांतील वेगवेगळ्या दर्शनांतून मनाचा विचार केलेला आहे. पण ही गोष्ट खरी आहे कीं त्या विचारावरील अध्यात्माची पकड कधींच दूर झाली नाहीं. मन हें अणु कां व्यापक आहे नित्य कां अनित्य आहे, वृत्ति कशा उत्पन्न होतात, त्यांचा गुणांचा संबंध काय अशा तऱ्हेच्या प्रश्नांचा विचार आपल्या वेगवेगळ्या दर्शनांतून आढळतो. पण हे सर्व प्रश्न ते अध्यात्माच्या जोरावर सोडविण्याचा प्रयत्न करीत. अगदीं अलिकडे म्हणजे शेपन्नास वर्षांपूर्वी हिंदींत 'वृत्तिप्रभाकर' म्हणून ग्रंथ लिहिलेला आहे. पण तोसुद्धां प्रमाणदृष्ट्या विचार करण्याकरतां आहे. ही अध्यात्मिक दृष्टि जरा थोडीशी बाजूला ठेवून चित्तवृत्तींचा अभ्यास करणारें शास्त्र म्हणजे योगशास्त्र. पण त्यानेंसुद्धां एका दृष्टीनें दुसऱ्या सूत्रांतच 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' ही व्याख्या सांगतांना आपल्या कार्याची मर्यादा दाखविली आहे. योगसूत्रांत चित्ताच्या अवस्था कोणत्या आहेत, निर्बीज समाधि म्हणजे काय, ती प्राप्त होण्याचा मार्ग कोणता, त्यांत अडथळे कोणते येतात इत्यादि प्रश्नांचा विचार केला आहे; व त्यांनीं काढलेले या बाबतींतील कांहीं निष्कर्ष आजहि सर्वमान्य होण्यासारखे आहेत. पण वर उल्लेखिलेली अध्यात्मिक अथवा योगिक दृष्टी बाजूला ठेवून इतर पदार्थांप्रमाणें मन हा एक अभ्यसनीय पदार्थ आहे व तसा त्याचा अभ्यास होणें इष्ट आहे ही कल्पना आपल्याकडे दिसत नाहीं. पाश्चात्य देशांतसुद्धां मानसशास्त्राचा एक स्वतंत्र शास्त्र म्हणून अभ्यास करूं लागल्यास दोनशें सवादोनशें वर्षेंच झालीं असतील. पण त्यांच्याकडे गेल्या पांचपन्नास वर्षांत प्रयोगपद्धतीचें अवलंबन यांतील पंडित करूं लागल्यापासून या शास्त्राची वाढ फारच झपाट्यानें झाली; व आज अशी स्थिति आहे कीं सामान्यतः कोणचेंहि महत्त्वाचें शास्त्र या शास्त्रास दूर ठेवूं शकत नाहीं. म्हणून या लेखांत पाश्चात्य विचारसरणीचाच उपयोग केला आहे.

(२) अर्वाचीन शास्त्रांत मानसशास्त्राचें स्थान; अर्थात् शास्त्राचें महत्त्व व उपयोग––

शास्त्रांच्या वाढीच्या इतिहासाकडे जर आपण लक्ष दिलें तर आपणांस असें आढळून येईल कीं, मानसशास्त्राची वाढ फार उशीरां सुरूं झाली. वाढ उशीरां सुरूं झाली खरी; पण सुरूं झाली ती इतक्या जोरानें कीं तिच्या वाढत्या परिवारानें पूर्वीच्या कांहीं शास्त्रांचे पाये खिळखिळे केले आहेत, कांहींना अजिबात पुनर्रचना करण्यास भाग पाडिलें आहे. असें एकहि शास्त्र नाहीं कीं ज्याच्या दृष्टिकोनावर याच्या वाढीचा परिणाम झाला नाहीं. हें शास्त्र आज ज्ञानरूप इमारतीच्या पायाचे दगडच (Cornerstones) मानलें जात आहे.

एक काळ असा होता कीं मुलांना एकादी गोष्ट शिक्षकास समजून देतां आली नाहीं तर ती मुलांच्या गळीं उतरवण्याचा उपाय म्हणजे छडी मारून त्याला गळा काढावयास लावणें. या मुलाचें 'मनोमंदीर' म्हणून कांहीं आहे, त्यांत आंत शिरण्याचें अवधानरूपी द्वार आहे व त्या मनोमंदिरांत या अवधानरूप दरवाजाच्या सोईनें आपणांस विषय शिरविला पाहिजे याची दखलसुद्धां पूर्वकालीन बहुतेक शिक्षकांना नसे. तसेंच मुलगा शाळेंत येत नाहीं, अभ्यास करीत नाहीं, यांचीं मुळें याच्या मनाचा अभ्यास करून शोधलीं पाहिजेत हें पूर्वी लक्षांतहि येत नसे. शाळेंत आला नाहीं द्या खुर्ची, नाहीं तर उलटें टांगून मारा, विषय समजत नाहीं म्हणतो द्या तोंडांत असे प्रकार पूर्वी होत असत. आतां काळ बदलला आहे. देहदंड पुष्कळसा कमी झाला आहे. विषय शिकविण्याची वेळ व पद्धत यांत फरक केले जात आहेत. नव्या नव्या शिक्षणपद्धति उपयोगांत आणल्या जात आहेत. पण हा जो इष्ट फरक आपणांस दिसून येतो, त्याच्या बुडाशीं बालमनाचा सूक्ष्म अभ्यास आहे. उत्तम शिक्षक तो कीं जो बालकाचें मन आपल्याकडे वेधून घेतो.

जी गोष्ट शाळेंतील शिक्षणाची तीच गृहांतील बालसंवर्धनाची. मातृपदास प्राप्त होणाऱ्या स्त्रीस, गृह चालविणाऱ्या गृहस्थास मानसशास्त्राचीं मूलभूत तत्त्वें माहिती असणें अवश्य आहे. मुलें कांहींशीं हट्ट करणारच, आपआपसांत भांडणार, ओरडणार, हंसणार, खिदळणार बालमनाची ही स्वाभाविक प्रवृत्ति आहे हें जर कुटुंब चालविणाऱ्यास कळलें नाहीं तर तो आपल्या वागणुकीनें गृहाचें नंदनवन करण्याऐवजीं 'खांडववन' करील व मुलांना घरीं राहाण्याऐवजीं 'घराबाहेर' राहणें बरें वाटूं लागेल व याचाच परिणाम मुलें घर सोडून भटकतील. बालसंवर्धन हें शास्त्र आहे व त्यावर आतां निरनिराळीं शास्त्रीय चर्चा करणारीं पुस्तकें प्रसिद्ध होत आहेत. जी गोष्ट बालशिक्षण, बालसंवर्धन याला लागू तीच वक्तृत्वालाहि लागू आहे. श्रोत्यांचीं मनें आकर्षून घेतां येत नसलीं म्हणजे श्रोते तपकीर काढूं लागतात, आपआपसांत बोलतात व कित्येक वेळां हलके हलके तेथून पाय काढतात. या सर्वांचें खरें कारण वक्त्याच्या ठिकाणीं श्रोत्यांचें अवधान आकर्षण करण्याच्या शक्तीचा अभाव. हें लक्षांत न आल्यामुळें वक्ता श्रोत्यांनाच नांवें ठेवूं लागतो.

नीतिशास्त्रांतसुद्धां निःश्रेयसाचा विचार करतां ज्या मानवी मनाकरतां नीति सांगावयाची, त्या मनाचें, स्वभावाचें, कुवतीचें ज्ञान असणें अवश्य आहे. मानवी मनाच्या नैसर्गिक प्रवृत्ति काय आहेत याचा विचारच ज्या नीतिशास्त्रांनीं अथवा धर्मशास्त्रांनीं केला नाहीं तें शास्त्र अथवा तें धर्मशास्त्र टिकणार नाहीं. मनुष्याकरतां नीति, मनुष्याकरतां धर्म, अर्थात् ज्या मनुष्याकरतां हीं आहेत त्या मनुष्याच्या मनाचा विचार हा या शास्त्रांचा एक प्रकारें पायाच होय. सॉक्रेटिसानें मनुष्य हा वाईट कर्म नेहमीं अजाणपणानें करतो असा सिद्धांत ठोकला. पण हा सिद्धांत चूक आहे. कारण मनाच्या व्यवस्थित ज्ञानावर तो उभारलेला नाहीं. 'जानामि अधर्मं न च मे निवृत्तिः' असें म्हणणारे दुर्योधन आहेतच! धर्माचारासंबंधींसुद्धां हाच नियम लागू पडेल. वैदिक धर्मांतील आश्रमव्यवस्था मानसशास्त्राच्या व्यवस्थित ज्ञानावर उभारली असल्यानें ती आज हजारों वर्षें टिकली. मानवी प्रवृत्ति आणि निवृत्ति यांची योग्य सांगड या आश्रमव्यवस्थेनें घातली आहे.

अर्थशास्त्रासारख्या विषयालासुद्धां आतां मानसशास्त्राची मदत घेणें अवश्य होऊं लागलें आहे. द्रव्योत्पादनाचीं साधनें, संप, मालक व मजूर यांचे संबंध इत्यादि इत्यादि विषयांचा निकाल मजूर म्हणजे तारे, ग्रहयंत्र इत्यादि निर्जीव वस्तूंप्रमाणें नव्हे, त्यांनाहि मन आहे, त्यांनाहि भावना आहेत हें लक्षांत आणूनच देणें अवश्य होऊन बसलें आहे. मनुष्याची प्रगती होत आहे किंवा नाहीं या प्रश्नाचा अर्थसुद्धां मानवी मनाची प्रगति होत आहे किंवा नाहीं असाच करावा लागेल.

कादंबऱ्या, नाटकें, गोष्टी यांचें परीक्षण करणें, त्यांत रंगविलेल्या पात्रांचे स्वभावपरिपोष कसे केलेले आहेत हें पाहणें म्हणजे त्यांच्या मनाचें चित्र यथार्थ आहे का अयथार्थ आहे हेंच पाहणें होय. रोग्यास औषध देण्याच्या–बरें करण्याच्या–बाबतींत 'मानसोपचारपद्धति' स्वतंत्र म्हणून निघालीच आहे; व तिनें असें ठरविलें आहे कीं कांहीं शारीरिक विकारसुद्धां मनाच्या विकृतीचाच परिणाम होय. रोग पहात असतांना रोग्याचें मन काय आहे याचा विचार न करतां उपाययोजना केल्यास ती यशस्वी होणार नाहीं असें अलिकडील योजनाशास्त्रांतील तज्ज्ञांचें मत होत आहे. जाहिरातीच्या शास्त्राच्या बुडाशींसुद्धां मनाचा अभ्यास आहे. तात्पर्य, पारलौकिक कल्याणाची चर्चा करणाऱ्या धर्मशास्त्रापासून तों तहत भिंतीवर चिकटविल्या जाणाऱ्या जाहिरातींच्या शास्त्रापर्यंत सर्व शास्त्रें मनाच्या शास्त्रीय ज्ञानावर उभारलीं पाहिजेत असें निश्चित होऊं लागलें आहे.

या सर्व विवेचनाचें तात्पर्य असें आहे कीं सजीव प्राण्याविषयींचें कोणतेंही शास्त्र असो त्याची पायाशुद्ध उभारणी करणें असल्यास मानसशास्त्राची मदत घेऊनच ती करावी लागेल. तशी केली तरच ती टिकेल. नाहींतर एकांगी होईल. इतकी योग्यता व महत्व या शास्त्रास अर्वाचीन काळांत येऊन बसलें आहे.

(३) या शास्त्राचें दुर्बोधत्व–

मानससशास्त्र म्हणजे मनाचा विचार करणारें शास्त्र. इतर शास्त्रें व हें शास्त्र यांत एक मोठा फरक आहे व तो प्रारंभींच सांगणें अवश्य आहे. कारण त्या फरकाच्या ज्ञानानें पुष्कळ गोष्टींचा सहजच उलगडा होणार आहे. जगतांत जेवढीं म्हणून शास्त्रें व ज्ञानाचे विषय आहेत त्यांत कितीहि एकमेकांमध्यें फरक असला तरी एक गोष्ट त्या सर्वांना सामान्य अशी आहे व ती ही कीं तीं सर्व शास्त्रें–वेगवेगळ्या विषयांचीं सर्व ज्ञानें–मनः-

स्पंदित आहेत. कधीं मला माझ्या समोरच्या घड्याळाचें ज्ञान होईल, कधीं माझ्या खेह्याच्या चेहऱ्याचें ज्ञान होईल, कधीं प्राणवायुसारख्या वायूचें होईल. हे पदार्थ जरी वेगवेगळे असले तरी त्या सर्वांचें ज्ञान मनोद्वारां होतें ही गोष्ट निर्विवाद आहे. मन नाहीं, कल्पना नाहीं तर ज्ञानच नाहीं. सरोवर म्हटलें कीं प्रतिबिंब संपलें, अथवा पडदा फाटला कीं चित्रें संपलींच तसेंच मनोनाश झाला कीं सर्व जगत् मावळलेंच म्हणून समजावें.

मनावांचून जगत् आपल्याला नाहींच असें म्हटल्यासही वावगें होणार नाहीं. पण गंमत अशी आहे कीं इतकें मन जवळ असूनही आपणास त्या मनाच्या कार्याची अथवा पुष्कळांना त्याच्या अस्तित्वाची जाणीवेंसुद्धां फारशी नसते. तात्पर्य, मानसशास्त्र हें अशा वस्तूचें शास्त्र आहे कीं जी आपल्या नित्य सन्निध आहे, जिचा आपण हरघडीं उपयोग करतों पण जिचा उपयोग करतों हें किती तरी वेळां लक्षांत येत नाहीं अशा मनरूपी वस्तूचें शास्त्र आहे.

प्रकाशाच्या सहाय्यानें जरी आपण सर्व वस्तू पहात असलों तरी मुद्दाम तिकडे लक्ष वेधल्याशिवाय आपण प्रथम प्रकाश पाहिला व त्याच्या सहाय्यानें इतर पदार्थ पाहिले हें लक्षांत येत नाहीं. तसेंच मनाचें आहे, मनुष्याचीं इंद्रियेंहि बहिःप्रवृत्त असल्यानें व मन बव्हंशीं इंद्रियांशीं निगडित झालेलें असल्यानें मनानें बाह्य जगताचेंच चिंतन होतें. बाह्य जगाचें ज्ञान होतांना मनाचा उपयोग होत आहे हें कळतसुद्धां नाहीं. आपण भौतिक शास्त्राचे जे विषय आहेत त्यांच्याकडे पाहतों त्यावेळीं आपण पहात आहोंत हें विसरतों. स्वनिरपेक्ष आपण केवळ विषयाचा अभ्यास करीत असतों. मानसशास्त्राचा हा विशेष आहे कीं ज्या मनोवृत्तिद्वारां जगताचें ज्ञान होतें त्या वृत्तींचा तें अभ्यास करतें व जगाकडे ज्ञेय अथवा वृत्तीला विषय या दृष्टीनें त्याच्याकडे पाहतें. मनोवृत्तींचा अभ्यास मानसशास्त्र करीत असल्यानें एका दृष्टीनें मानसशास्त्राचा विषय ब्रह्मदेवापासून तों मुंगीपर्यंत सर्व पदार्थ होत. पण या विषयांचा अभ्यास करणारीं इतर शास्त्रें व मानसशास्त्र यांत जो फरक आहे तो हा कीं मानसशास्त्र या विषयाकडे स्वनिरपेक्ष पहात नाहीं. मनाला विषय—ज्ञेय—याच दृष्टीनें तें पहातें; व हाच या शास्त्राचा विशेष आहे.

(४) शास्त्राची व्याख्या—

मानसशास्त्रांत काय काय विषय अंतर्भूत होतात हें या शास्त्राच्या ज्या वेगवेगळ्या व्याख्या केल्या जातात त्यांवरून चांगलें कळणारें आहे. म्हणून आपण थोडक्यांत त्यांचा विचार करूं:—

(१) ब्रेंटॅनो यानें मानसशास्त्र म्हणजे आत्म्याचें शास्त्र अशी व्याख्या दिली आहे. पण ही व्याख्या अग्राह्य आहे. कारण शास्त्राचा विषय हा सर्वांना ज्ञात असावा लागतो. आत्मा तर कोणालाच ज्ञात होत नाहीं; मग त्याचें शास्त्र कसें होणार? म्हणून दुसरी व्याख्या केली जाते.

(२) मानसशास्त्र हें मनाचें शास्त्र आहे. या ठिकाणीं मन हें अर्थातच आत्म्याहून भिन्न समजलें जातें. पण ही व्याख्यासुद्धां अग्राह्यच आहे. कारण मन नांवाची एक वस्तु आहे हें शास्त्रांच्या विचाराच्या अंतीं ठरणार आहे. आपणांस अनुभवास येतें तें येवढेंच कीं आपल्यांत वृत्तींचा अखंड प्रवाह चालू आहे. म्हणून तिसरी व्याख्या करतात.

(३) मानसशास्त्र हें मनोवृत्तीचें शास्त्र आहे. ही व्याख्या बरी आहे. कारण मन म्हणून दिसण्यासारखी वस्तूच नाहीं. तिचे व्यापार मात्र आपणांस दिसून येतात. अर्थात् मानसशास्त्र हें मनोव्यापारांचें शास्त्र आहे. तात्पर्य मानसशास्त्र हें मनोव्यापार होतात कसे, त्यांचे आपआपसांत संबंध कसे आहेत, त्या व्यापारांचे त्यांच्या विषयांशीं कशा प्रकारचे संबंध असतात, इत्यादि गोष्टींचा विचार करणारें शास्त्र आहे.

अगदीं अलिकडच्या काळांत प्रायोगिक पद्धतीच्या उपयोगामुळें मनाच्या व्यापारांचें निरीक्षण करतां करतां कित्येक शास्त्रज्ञ मनास इतके विसरले कीं मानसशास्त्र याचा अर्थ ते स्थूलसूक्ष्म शारीरिक क्रियांचें शास्त्र असाच समजूं लागले, व त्यांच्या मतें मानसशास्त्र हें नांवच बदलणें इष्ट आहे. कारण मन म्हणून कांहीं पदार्थच नाहीं असा त्यांचा निश्चय आहे. पण हें मत अजून बहुतेक पसंत नाहीं. यामुळें तिसरीच व्याख्या अजून सन्मान्य अशी समजली जाते.

जातां जातां एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं मनुष्य हा महत्वाचा प्राणी असल्यानें व तोच मनाचा अभ्यास करणारा असल्यानें मानवी मन हेंच अभ्यासाचा मुख्य विषय आहे. पण त्याबरोबरच पशूंच्या

मनाचेंहि हें शास्त्र विचार करतें. कारण पशूंच्या क्रिया ह्या गुंतागुंतीच्या नसतात. मानवी मन हें मनुष्य-शरीरांत एकदम निर्माण झालेलें नसल्यानें, तें हळुहळु विकसित होत आलेलें असल्यानें, त्याचें बालस्वरूप खालच्या योनींतून पहायला मिळेल म्हणून हल्लीं माकडें वगैरे पशूंवर प्रयोग करून त्यांचा अभ्यास पुष्कळसा केला जात आहे. तरी पण मानसशास्त्र हें मुख्यतः मानवी मनाचा विचार करतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

(५) या शास्त्रांतील विषय–

आपण वरील व्याख्यांचा विचार केला असतां मानसशास्त्रांत कोणकोणते विषय अंतर्भूत होतात हें चटकन् लक्षांत येईल. मानसशास्त्रांत खालील विषय येतातः—

(१) मनोव्यापार (२) त्याचे विषय. पण त्यांच्याकडे मानसशास्त्र केवळ ते मनाला ज्ञेय या दृष्टीनें पहातें. (३) ज्या शरीराच्या व्यापारामुळें मनोव्यापार घडतात त्या शारीरिक व्यापारांचा विचार. (४) मन (५) आत्मा (६) अज्ञात मनोव्यापार.

कांहीं काळपर्यंत मानसशास्त्र हें मनाचे जे ज्ञात व्यापार आहेत त्यांचाच विचार करीत असे. पण डॉ. फ्रॉइड यानें मनांत अंतर्मन आहे व त्याचे होणारे अज्ञात असे व्यापार फार महत्त्वाचे आहेत, ही गोष्ट स्पष्टपणें सर्व लोकांच्या नजरेस आणून मानसशास्त्रांत एक नवें दालन सुरू केलें. डॉ. फ्रॉइडच्या पूर्वीं किती तरी वर्षें लाइब्निझनें मनाचे व्यापार चालतात असें प्रतिपादन केलें होतें. पण ती गोष्ट त्या वेळीं फार लोकांना मान्य झाली नाहीं. डॉ. फ्रॉइडनें तीच गोष्ट पटेल अशा रीतीनें मांडली. म्हणून हल्लीं मानसशास्त्रांत अज्ञात मनोव्यापारांचाहि विचार केला जातो.

(६) अभ्यासाची पद्धत–

या शास्त्राचा अभ्यास करणें एका दृष्टीनें फार सोपें आहे. कारण त्याचा विषय आपल्याजवळ नित्य तयार आहे. आपण फक्त आंत डोकावलें पाहिजे एवढेंच. बाह्य विषयांप्रमाणें मन हें एकाच्या अथवा अनेकांच्या इंद्रियांना विषय होण्यासारखें नसल्यानें त्याचा अभ्यास करण्यास बाह्य विषयाच्या अभ्यासांची पद्धत–म्हणजे तो विषय इंद्रियांनीं प्रत्यक्ष पाहून त्याचा विचार करणें–उपयोगी पडण्यासारखी नाहीं. म्हणूनच फार पुरातन काळापासून मनाच्या अभ्यासाच्या बाबतींत मन अंतर्मुख करून मनानेंच मनाला पहाणें–आत्मनिरीक्षण करणें (Introspection)–ही पद्धत प्रशस्त म्हणून गणली गेली होती. अर्थातच हें सांगण्याची गरज नाहीं कीं असें मनालाच मनानें पहाण्यास मनाची तयारी चांगलीच व्हावी लागते. सुसंस्कृत मनच मनाचा अभ्यास करून तद्विषयक निष्कर्ष काढूं शकेल. येरा गबाळाचें हें काम नव्हे.

फार वर्षेंपर्यंत हीच पद्धत उपयोगिली जात होती; परंतु फ्रान्स देशांत अठराव्या शतकांत प्रसिद्धी पावलेल्या कँट या तत्त्ववेत्त्यानें या पद्धतीस एक जोराचा धक्का दिला. त्यानें असें प्रतिपादिलें कीं मनानें मनाला पाहण्यांत एकच मन द्विधा होतें व त्याची स्वरूपस्थिती बिघडते. शिवाय ज्या वेळेस आपल्यास वृत्ति अथवा विकार पाहूं लागते त्यावेळीं विकार हे आपल्या सहजस्थितींत राहणें शक्य नाहीं. समजा मला क्रोध या विकाराचा अभ्यास करावयाचा आहे; मन क्रोधी असतांना इतर विकार व विचार यांना तेथें थारा नसतो. पण अंतर्मुख होऊन क्रोध काय आहे हें पाहूं लागलें म्हणजे पूर्वीची त्या मनाची निर्भेळ क्रोधी वृत्ती नाहींशी होते. त्यांत विचाराचें मिश्रण होतें व मूळची स्थिती अशी गढूळ झाल्यानें आपल्या परीक्षणाच्या हातास ती मूळ, सहजस्वरूपांत कधींच लागत नाहीं. विकारी मनांत अंतर्मुखतेनें असा फरक पडतो. म्हणूनच रागावलेल्या मनुष्यास राग आवरण्याकरितां दहा अंक मोज असें सांगतात. तात्पर्य मनाच्या ऱ्हासाला वृत्ती जशीच्या तशी लागतच नाहीं. अशी जेथें स्थिती आहे, तेथें त्या वृत्तीचें परीक्षण होऊन त्याचें शास्त्र कोठून निर्माण होणार? त्यानें आणखी तिसरा एक आक्षेप या पद्धतीविरुद्ध आणला. तो असा कीं, मन हें चंचल आहे; हातांत धरलेल्या बर्फाच्या खड्याप्रमाणें तें सारखें बदलत आहे. अशा मनाचें स्वरूप ठरवणें मुळांतच अशक्य आहे. या सर्व आक्षेपांच्या जोरावर त्यानें असें प्रतिपादलें कीं मनाचें हें शास्त्र असिद्ध आहे.

कँटच्या मताचा पुरस्कार कांहीं काळपर्यंत जोरानें करण्यांत आला व असें सांगण्यांत आलें, कीं इतर विषयांच्या अभ्यासाप्रमाणें मनाच्या अभ्यासाकरितांसुद्धां निरीक्षण (Observation) या पद्धतीचाच उपयोग करावा. वेगवेगळ्या प्राण्यांच्या व्यापारांचें निरीक्षण करून जे निष्कर्ष निघतील त्यांची तुलना करून सिद्धांत काढावेत, त्यास पायाच नाहीं.

पहिल्या पद्धतींतील दोष अपरिहार्य आहेत असें नाहीं. विकार बदलतात हें खरें, पण पुनःपुनः हें पहात गेलें असतां वृत्ति जशी आहे तशी अभ्यासिली जाणें शक्य आहे, सम्यक्दर्शन संभवत नसेल, पण अनुदर्शन तर संभवतें! पुढें पुढें ही पद्धतसुद्धां थोडी गौणच वाटूं लागली. कारण मनोव्यापार हे इतके चंचल आहेत व कांहीं इतके विरल आहेत, कीं त्यांचें निरीक्षण अर्थात बहुत वेळ करणें फार कठीण आहे असें वाटूं लागलें. त्यास प्रयोगाची जोड देण्याची आवश्यकतां वाटूं लागली. या प्रायोगिक पद्धतीनें कांहीं कांहीं सिद्धांत उत्तम रीतीनें निश्चित केले गेले, तरी पण अजूनसुद्धां जेम्स स्टाऊट यांसारखे या शास्त्रांतील पंडित पहिल्या म्हणजे आत्मनिरीक्षणाच्या पद्धतीसच महत्त्व देतात. मनांत काय आहे हें कळण्याची तर ती एकमेवच पद्धत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. एकदां काय मनांत आहे हें कळल्यावर निरीक्षण, तौलनिक अभ्यास, अनुभव, (Experience of workers), संवाद, प्रयोग इत्यादि सर्व पद्धतींचें अवलंबन करून सिद्धांत ठरविणें योग्य होय. कांहीं एकांतिक पंडित सोडून बाकीचे सर्व मानसशास्त्री या संमिश्र पद्धतींचेंच अवलंबन करतात.

अर्वाचीन काळांत मनोविश्लेषण (Psycho-Analysis) अथवा मानसमंथनपद्धति फ्रॉइडनें रूढ केली आहे. तिचाही मनाचे कांहीं अज्ञात कप्पे कळण्यास उपयोग आहे. पण तीसुद्धां एकमेवच अशी पद्धत मानतां येण्यासारखी नाहीं. तिचा उपयोग विशेषतः स्वप्नमीमांसा, वेड, भ्रम, मानसिक रोग व कित्येक प्रसंगीं शारीरिक रोग यांचीं कारणें शोधून काढण्यास पुष्कळसा होण्यासारखा आहे.

तात्पर्य आत्मनिरीक्षण, बाह्य मनाचें निरीक्षण, तौलनिक अभ्यास, मनोविश्लेषण, प्रायोगिक यांचा कमी अधिक प्रमाणांत लागेल तसा उपयोग करणें हीच उत्तम पद्धति होय एवढेंच याचें तात्पर्य आहे.

(८) शरीर व मन—

मनाचें स्वरूप नीट लक्षांत येण्याकरतां शरीर व मन यांचा परस्पर संबंध कशा प्रकारचा आहे याचा विचार करणें अवश्य आहे. याविषयीं सामान्य समज असा कीं मनांत संकल्प उत्पन्न झाला कीं तो शरीराकडून क्रियेच्या द्वारां व्यक्त होतो. शरीरावर आघात झाला तर त्याचा मनावर परिणाम होतो असा आरसपरस संबंध आहे; व त्यासंबंधीं विचार करण्याचें फारसें कारण नाहीं. अशा तऱ्हेनें मन व शरीर यांचा आरसपरस संबंध आहे ही गोष्ट उघड आहे. पण शास्त्रीय दृष्ट्या विचार करूं लागलें असतां शास्त्रज्ञांना शंका घेण्यास जागा मिळते व ते अनेक प्रकारचे यांचे संबंध आहेत असे सिद्धान्त काढतात. त्यांपैकीं प्रसिद्ध खालीं देत आहे:—

(१) या मनांत आपण मन म्हणून ज्याला म्हणतों तें पाण्यावर जसा फेंस अथवा आगगाडीच्या इंजिनच्या शिटीचा जसा आवाज, अथवा विण्याच्या तारा छेडल्या असतां त्यांतून निघणारे जसे ध्वनि, तसे शरीरांतील मेंदूचा व्यापार सुरूं असतांना त्यापासून उत्पन्न होणारे जे अनेक परिणाण तदंगभूत एक पदार्थ होय. फेस पाण्याच्या गतीस टाळूं शकत नाहीं, अथवा एंजीनमधून उत्पन्न होणारा आवाज एंजिनच्या यंत्रावर कोणच्याहि प्रकारें सत्ता चालवत नाहीं. त्याप्रमाणें मन अथवा मनोव्यापार एक मेंदूच्या व्यापाराचें उपफल आहे. मेंदूच्या व्यापारांवर तें सत्ता चालवूं शकत नाहीं. शरीराच्या व्यापाराचा परिणाम मन आहे; पण मनाच्या व्यापाराचा शरीरावर परिणाम होत नाहीं. हा चार्वाकाच्या सिद्धान्तासारखा सिद्धान्त आहे. कात चुना, पानें, सुपारी एकत्र आणून त्यांचें मिश्रण केलें कीं तांबडा रंग निर्माण होतो. तसेंच विवक्षित प्रमाणांत पंचभूतें मिश्रित झालीं कीं मन तयार होतें. या मतानें शरीर पडलें कीं मन पडलेंच. शरीराव्यतिरिक्त मन राहूंच शकत नाहीं.

(२) शरीरांतील व्यापार म्हणजे मुख्यतः मेंदूचे व मनाचे व्यापार हे स्वतंत्र रीत्या सारखे चालूं आहेत. ते एकमेकालगत होत आहेत, पण त्यांचे एकमेकांवर परिणाम होत नाहींत. त्यांची वाढ स्वतंत्र पण सारखी सुरूं असते. एका मनोवृत्तीचें कारण आपणांस दुसऱ्या मनोवृत्तींतच सांपडेल, शारीरिक क्रियेंत सांपडणार नाहीं. तात्पर्य, शारीरिक व मानसिक या दोन क्रिया दोन समांतर रेषांप्रमाणें अथवा रेल्वेच्या रुळांप्रमाणें एकमेकांस न भेटतां अथवा एकमेकांवर परिणाम न करतां, सारख्या चालूं आहेत, असा या मतवाद्यांचा सिद्धांत आहे.

(३) (अ) मनाचा शरीरावर परिणाम होतो व शरीराचा मनावर होतो. एकमेक एकमेकांवर परिणाम करूं शकतात.

(ब) याचाच एक भाग, जरा अध्यात्मांत शिरून केलेला, तो असा कीं या दोहोंत मन मुख्य आहे. शरीराच्या व्यापाराचा परिणाम मनावर होतो हें खरें, पण शरीर जर पडलें तर मन नाहींसें होतें असें मात्र नाहीं. मन हें स्वतंत्रपणें वावरतें.

ह्या सिद्धांतांपैकीं पहिला सर्वथैव त्याज्य आहे. तिसरा खरोखरीं सर्वांच्या अनुभवांतला व जर भौतिक शास्त्रांतल्या कांहीं मानवनिर्मित सिद्धांतास चिकटून बसलें नाहीं तर सहज पटणारा असा आहे.

तिसऱ्यांतील (ब) हा अध्यात्मक्षेत्राच्या कक्षेंतील असल्यामुळें प्रस्तुत तद्विषयीं उल्लेखापलिकडे कांहींच न करणें बरें. पण खुद्द वुइल्यम जेम्ससारख्या तत्वज्ञांचा कल शेवटीं शेवटीं 'रुख डोलत देखावा। तरी वारा वाजत मानावा। रुख न दिसे तेथ पांडवा। नाहीं तो गा॥' या ओवींत निर्दिष्ट केलेल्या Transmission theory-कडे होऊं लागला होता हें विसरतां कामा नये. एकादा अफू अथवा भांग यासारखा मादक पदार्थ सेवन केला असतां मनुष्याच्या मनावर परिणाम होतो. अथवा डोक्यावर आघात झाला कीं मनुष्य सुन्न होऊन पडतो हें जितकें उघड आहे तितकेंच मनांत जर बिघाड झाला तर त्याचा शरीरावर तत्काल परिणाम होतो हेंहि उघड आहे. 'तुमचा मुलगा मेला' इतकें वाक्य वाचलें कीं मनुष्य धाडकन् खालीं पडल्याचें आपण वाचतों. अर्थात् त्याच्या मनास धक्काच बसला व त्याच्या शरीरावर एकदम परिणाम झालेला दिसला.

पण इतकी ही गोष्ट उघड असूनही भौतिक शास्त्रज्ञांनीं 'कॉंझरव्हेशन ऑफ एनर्जी'चें जें तत्त्व मान्य केलें आहे त्याच्याशीं हें जमत नसल्यानें त्या उघड गोष्टीचा स्वीकार करण्यास कांहीं शास्त्रज्ञ तयार होत नाहींत. पण वॉर्ड, टेलर, ब्रॅडले यांच्यासारखे तत्त्वज्ञ मनाचे व शरीराचे परिणाम एकमेकांवर होतात हें मान्य करतात. स्टाउटसारख्या मानसशास्त्रज्ञास ही गोष्ट मान्य आहे. मनोव्यापार व शरीरव्यापार दोन स्वतंत्र प्रवाह आहेत हें मानणें या शास्त्रास सोईस्कर असल्यानें या शास्त्रापुरतें मानलें पाहिजे असें म्हणण्याकडे त्यांचा कल आहे.

मनोव्यापार व मन—एके काळीं असा समज होता कीं मन म्हणजे या शरीररूपी किल्ल्यांत राहणारा एक चेतन व स्वतंत्र राजा. या सत्ताधीशाकडे इंद्रियरूपी दरवाज्यांतून विषयरूपी लूट पोचविली जाते, व हा सर्व कारभार वृत्तिरूपी त्याचे हस्तक करतात. तात्पर्य, त्यावेळीं विचार, विकार, संकल्प अथवा इच्छा ह्या मनाच्या शक्ति समजल्या जात असत व मन एक त्यांचा उपयोग करणारी चेतनवस्तु समजली जात असे.

पण लॉक्, ह्यूम इत्यादि ऐंद्रियिक अनुभवावर जोर देणाऱ्या मानसशास्त्रज्ञांच्या प्रयत्नानें हें मत अजीबात अमान्य ठरलें. आतां आधुनिक पंडितांचा कल मन म्हणून कांहीं एक स्वतंत्र पदार्थ आहे असें मानणेंच चुकीचें आहे असें म्हणण्याकडे होऊं लागला आहे. मनोव्यापार हेंच अभ्यासाचें प्रमुख अंग; मन म्हणून कांहीं एक पदार्थ आहे किंवा नाहीं हें शास्त्राच्या चर्चेच्या अंतीं ठरविण्याची गोष्ट असें ते म्हणतात.

आपले जे मनोव्यापार होतात ते आपण पाहूं लागलों तर आपणास त्यांत काम, संकल्प, अपेक्षा, आशा, प्रतीक्षा, महत्वाकांक्षा, विचार, संशय, विपर्णय, राग, द्वेष, प्रेम, निश्चय, भावना इत्यादि प्रकार दिसून येतात. यामध्यें एकमेकांत साम्य व भेद पाहून यांचें वर्गीकरण करूं लागलों असतां यांत आपणास प्रामुख्यानें तीन भेद करतां येतात. ते असेः—एक विचार, दुसरा विकार व तिसरा संकल्प अथवा इच्छा.

हें जें वर्गीकरण आतां सर्वसामान्य आहे यासंबंधानें कांहीं गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. त्या खालीलप्रमाणेः—

(१) एका काळीं असा समज होता कीं हे तीन वर्ग आपापलीं कामें स्वतंत्र रीत्या, दुसऱ्या वर्गाशीं न मिसळतां, करून टाकतात; नव्हे पुष्कळ वेळां करतात. उदाहरणार्थ, ज्या वेळीं विचाराची वृत्ति असेल त्यांत विकाराचा अंश असलाच पाहिजे असें नाहीं. पुष्कळ वेळेला तो नसेलही. जी गोष्ट विचारास लागू तीच विकार अथवा संकल्प यांनाहि लागू होय. ज्या वेळीं मनुष्य दुःखानें रडत असतो त्यावेळीं त्यांत विचाराचा अथवा इच्छेचा अंश असेलच असें सांगतां येत नाहीं. तात्पर्य विचार, विकार, इच्छा ह्या अगदीं स्वतंत्र शक्ति आहेत व एकमेकांचें झालेंच तर कधीं मिश्रण होईल; पण सामान्यतः त्या स्वतंत्र वावरूं शकतात.

पण ही विचाराची दिशा आतां अजिबात पालटली आहे. आतां मानसशास्त्रवेत्ते दुसऱ्या टोकास जाऊन असें म्हणूं लागले आहेत कीं, विकार, विचार व

संकल्प हे एकमेकांपासून विलग कधींच राहूं शकणार नाहींत. अंतःकरणांत उत्पन्न होणाऱ्या कोणत्याही वृत्तीचें आपण पृथक्करण केल्यास आपणांस त्यांत या त्रयीचे अंश सांपडणारच. आपण एकादी वृत्ति विचारात्मक म्हणतों. याचा अर्थ एवढाच कीं 'ती विचार-प्रमुख' आहे, त्यांत विचाराचा भाग अधिक आहे एवढेंच. आपण कल्पना करूंया कीं, एखादा मनुष्य एखाद्या गोष्टीचा विचार करीत पडला आहे. सामान्य मनुष्यास वरवर पाहतां असें वाटेल कीं, यांत विकाराचा अंश मुळींच नाहीं. पण तोच जर खोल जाऊन पाहील तर त्यांत विकाराचा अंश आहे असें अवश्य दिसून येईल. कारण जर त्यांत त्या विचाराबरोबर सुखाचा अंश व त्याचा परिणाम तोच विचार पुढें चालू ठेवण्याच्या इच्छेचा अंश नसता तर ती विचार-मालिका एकदम बंद पडली असती. तात्पर्य, तीन रंगांच्या सुताची जशी दोरी असावी तशी आपली मनोवृत्ती आहे. त्यांत विचार, विकार व संकल्प हे भिन्न भिन्न प्रमाणांत पण नेहमीं मिश्रित झालेले असणारच. विकार आणि इच्छा यांचें मिश्रण नसलेला विचार ही केवळ काल्पनिक अवस्था आहे. जी गोष्ट विचाराची तीच विकार व इच्छा यांची आहे.

(२) मनुष्याची व्याख्या तो एक बुद्धिवान् अथवा विचार करणारा प्राणी अशी सर्वमान्य असल्यानें साधारण लोकांचा समज असा कीं, बहुतेक मानवी क्रिया या विचारमूलक असतात. तसाच असा साधारण समज कीं, मनोव्यापारांत विचार हा प्रमुख असला पाहिजे व तो प्रथमपासूनच परिणत रूपांत असला पाहिजे; पण विकासवादानें व पशूंवर केलेल्या प्रयोगानें असें सिद्ध झालें आहे कीं, मनुष्याच्या रोजच्या व्यवहारांत खास विचाराचा भाग असा थोडाच असतो. पुष्कळसा भाग संवयीचा व सहज प्रवृत्तींचा असतो. मानवी मनाचा सारखा विकास होत आहे. मनोव्यापारांचें मूळ विचारांत नसून संकल्पांत आहे. प्रथम संकल्प उत्पन्न होतो व त्याच्या पूर्ततेकरतां विचार प्रगट होतो. विचारानुसार क्रिया झाली व संकल्पाप्रमाणें फळ दिसलें कीं, सुख होतें, फळ दिसलें नाहीं कीं दुःख होतें. तात्पर्य प्रो. फडके म्हणतात त्याप्रमाणें 'प्रेरणेमुळें साध्याचा निश्चय होतो व तर्कामुळें साधनाचा निश्चय होतो.' मनाच्या व्यापारांचें मूळ संकल्प होय हा सिद्धान्त आतां बद्धमूल होत आहे. याचा परिणाम शास्त्रांचें लक्ष सहज प्रवृत्तींच्या स्वरूपाकडे अधिकाधिक ओढण्यांत होत आहे. मनोव्यापारांचें मूळ जर संकल्प तर पुढें प्रश्न असा कीं त्याचें कारण काय? व त्यास उत्तर सहजवृत्तीस तत्कालीन प्राप्त झालेलें स्वरूप. आमच्याकडचे तत्त्वज्ञ या कारणास गुणोत्कर्ष असें नांव देतात. जसजसा अंतःकरणांत गुणाचा परिपाक तसा तसा त्या त्या वेळीं संकल्प उत्पन्न होतो. अध्यात्मिक पंडित या गुणपरिपाकाच्या उलगड्याकरतां पूर्वजन्माकडे धांव घेतात, तर भौतिक पंडित मातृपितृद्वारां प्राप्त कौटुंबिक संस्कार, शिक्षण, भोंवतालची परिस्थिति यायोगेंच त्याचा उलगडा होऊं शकतो असें मानतात. मनोव्यापारांचें मूळ विचार नव्हे तर संकल्प आहे या सिद्धान्तामुळें मानवी व्यवहाराकडे पहाण्याची नवीनच दृष्टि प्राप्त होणारी आहे.

संकल्प मूळ आहे हें जरी खरें तरी ही गोष्टहि खरी आहे कीं, मानसशास्त्रवेत्त्यांनीं या मानवी मनाच्या विकासाच्या ज्या पायऱ्या अथवा टप्पे ठरविले आहेत ते विचारवाढ हेंच परिमाण, कसोटी, अथवा माप लावून ठरविले आहेत. ते टप्पे (१) ऐंद्रियिक संवेदनारूप (Sensational) (२) कल्पना-मिश्रित ऐंद्रियिक संवेदनारूप (Perceptual) (३) कल्पनाप्रधान विचाररूप (Conceptual). या टप्प्यांवर विचार, विकार व इच्छाशक्ति यांचें स्वरूप कसें असतें हें पुढीलपानावरील कोष्टकावरून कळून येईल.

(३) वर उल्लेखिलेले जे मनाचे व्यापार आहेत त्या सर्वांची जूट अथवा केंद्रीकरण करणारा असा मनाचा जो व्यापार, किंबहुना अगदीं शास्त्रीय अथवा अध्यात्मिक नजर सोडून दिल्यास व्यवहारापुरतें ज्यास मनच म्हणतां येईल असा मनाचा व्यापार म्हणजे अवधान हा होय. याचें महत्व कांहीं कालापूर्वीं नीटसें लक्षांत आलें नव्हतें. लॉकनें 'कल्पनासाहचर्याची' कल्पना जी प्रामुख्यानें मांडली—प्रामुख्यानें म्हणण्याचें कारण त्याच्या पूर्वींही अरिस्टॉटलनें ती मांडली होती- तीच वाढवून व मन म्हणून कांहीं पदार्थ आहे या कल्पनेस अजिबात फाटा देऊन ह्यूम, मिल वगैरे शास्त्रज्ञांनीं कल्पना-साहचर्याच्याच जोरावर मनाच्या सर्व खेळांची उपपत्ती लावण्याचा चंग बांधला. पण या कल्पनेस अध्यात्मिक शाखेंत जर्मन तत्त्ववेत्ता कँटनें जोराचा धक्का दिला व मानसशास्त्रांत या कल्पनेस अमेरिकन मानसशास्त्रपंडित वुइल्यम् जेम्स यानें व इंग्लंडमध्यें वॉर्ड यानें फारच जोराचे धक्के दिले. पण दुर्दैवानें वु. जेम्स या कल्पनेच्या तडाक्यांतून पुरा सुटलेला दिसत नाहीं. या साहचर्यकल्पनेच्या बुडाशीं असलेली मनाची

मनोविकासाचें कोष्टक

	प्रथम टप्पा	द्वितीय	तृतीय
विचार	नुसतें ऐंद्रियिक संवेदन. ज्या विषया-मुळें हें संवेदन झालें त्याचेंही ज्ञान होत नाहीं.	विषयाचें ज्ञान	विषयाचे एकमेकांशीं होणाऱ्या संबंधाचें ज्ञान
विकार	बरें अथवा वाईट वाटणें.	भीति, राग इत्यादि भावना	विचारानें वाढलेल्या उच्च भावना
इच्छा किंवा संकल्प	स्वाभाविक प्रतिक्रिया	सहज प्रवृत्तींचा व्यापार	हेतुपूर्वक अथवा बुद्धिपुरःसर क्रिया
आत्म्याचें व विषयाचें ज्ञान	आत्मा व अनात्मा यांतील भेदाची कल्पनाही नाहीं.	भेदाची अंधुक कल्पना	भेदाची स्पष्ट कल्पना. आपण ज्ञाते आहोंत व आपणाहून भिन्न ज्ञेय आहे याची जाणीव.

कल्पना मन म्हणजे संवेदनाअणूंच्या सहचर्यापासून बनलेलें आहे ही त्यानें फारच उत्तम रीतीनें खोडून काढली व मन हें असें संयोगजन्य नव्हे, ती एक अखंड प्रवाही चेतनवस्तु आहे असें त्यानें प्रतिपादिलें; पण त्यानें मन हा शब्द कल्पनासमूह याच अर्थानें वापरला. वॉर्ड याचा प्रयत्न मात्र वेगळ्या स्वरूपाचा होता. यानें अवधानाचें खरें महत्व ओळखलें व बाह्य विषयाच्या अनुभवाच्या ज्ञानाची कथा सांगतांना कल्पनासाहचर्याचा परिणाम हें ज्ञान नव्हे, ज्ञानाचे संवेदनारूप परिमाण एकत्र बनून मनोवृत्ती बनलेली नव्हे, तर मनोवृत्ती ही एक अवधानरूप वृत्ती आहे व तिच्याच योगानें अंधुक प्रकाशरूप असणाऱ्या बाह्य विषयांत भेद अथवा भाग केले जातात व कल्पनासाहचर्य हें अवधानावांचून होतच नाहीं, हें त्यानें निर्विवाद सिद्ध केलें. कल्पनासाहचर्य अथवा अनुभवाची वाढ ही धारणा (Retention), संयोग (Cohesion) व निवड (Selection) अशा क्रियांनीं होते; पण या सर्वांच्या बुडाशीं अवधानच असल्यानें स्मृति, कल्पनासाहचर्य, अनुभवाची वाढ हीं एका अवधानाचीं वेगवेगळीं रूपें अथवा कार्यें समजण्यास कांहींच हरकत नाहीं. त्या वेळेपासून ‘ कल्पनासाहचर्याचें ’ महत्व कमी झालें व अवधानास योग्य स्थान प्राप्त झालें.

आपल्या व्यवहाराच्या भाषेवरूनसुद्धां मन म्हणजे एका दृष्टीनें अवधानच हें सहज कळून येईल. उदाहरणार्थ ‘त्यावेळीं माझें मन ठिकाणावर नव्हतें’ याचा अर्थ त्याला त्यावेळीं मनच नव्हतें असा नव्हे. तर माझें अवधान नव्हतें असाच केला पाहिजे; त्यावेळीं मन ठिकाणावर नव्हतें याचा अर्थ तें दुसरीकडे अवधान देऊन व्यापार करत होतें. एकादा मनुष्य म्हणतो ‘ मला ही गोष्ट ऐकूं आली नाहीं.’ याचा अर्थ त्याचें त्या गोष्टीकडे अवधान नव्हतें. जो जो आपला मनाचा व्यापार आपल्या जाणीवेनें होतो तो तो अवधानरूपच असतो. मनाची जाणीव याचा अर्थ अवधान असाच करावा लागेल. अवधानाचें हें महत्व जाणून शिक्षणांत नवीन सुधारणा होऊं लागल्या आहेत. एकेकाळीं शिक्षणांत शिक्षकाचें प्राबल्य होतें, तदनंतर ‘पाठ्यविषयांस’ आलें, आतां शिशूस म्हणजे बालकास म्हणजे त्याच्या अवधानास आलें आहे. मनाचे ज्ञात व्यापार, अज्ञात व्यापार हा फरकही अवधानावरच अवलंबून आहे. निरवधान अशी स्थिति असते कीं नाहीं, अवधानानें विषयाच्या ज्ञानांत कसा फरक पडतो, अवधानाचे प्रकार किती वगैरे विषय महत्वाचे आहेत.

(४) मनोव्यापारांत स्मृति, कल्पना अथवा मनोराज्य करण्याची शक्ति, भावना, सहजप्रवृत्ति, संवयी,

भ्रम इत्यादि महत्वाचे व्यापार आहेत. त्यांवर प्रत्येकीं मोठमोठे निबंध लिहिले जात आहेत. आपण ज्यास स्मृति म्हणतों त्याचें स्वरूप काय ? तिचा पाया मेंदूतील क्रियांच्या साहचर्यांत आहे, अथवा कल्पनासाहचर्यांत आहे, कां अवधानांत आहे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अष्टावधानी, शतावधानी प्रयोगाकरितां पुढें येत आहेत. पण एक गोष्ट निर्विवाद आतां सिद्ध होत आहे कीं स्मृतीचें रूप अवधान हेंच होय. विशेषतः प्रयोगाच्या पद्धतीचा सरराह उपयोग होऊं लागल्यापासून स्मृति, मनोराज्य, चाणाक्षपणाची कसोटी इत्यादि बाबतींत पुष्कळच प्रयोग केले जात आहेत व त्यांतूनही निघालेल्या निष्कर्षांच्या योगानें वेगवेगळ्या शास्त्रांना आपआपली शिकवणूक बदलावी लागली आहे. उदाहरणार्थ–स्मृति वाढविणें झाल्यास अवधान वाढवावें लागतें हें आतां शिकविलें जातें. भावना व त्यांचे आविष्कार अथवा अभिनय यांचा काय संबंध आहे, भावनांचा व विचारांचा काय संबंध आहे याबद्दलहि मोठी मनोरंजक चर्चा पाश्चात्य शास्त्रांत झाली आहे.

भावनांचा विचार मॅकडूगल् यांनीं पुष्कळ केला आहे. भावना व सहजप्रवृत्ती यांच्या संबंधाबाबत त्याचा असा सिद्धांत आहे कीं, प्रत्येक सहजप्रवृत्ति ही कोणत्या ना कोणत्या भावनेशीं निगडित झाली आहे. त्यानें याविषयीं मोठें कोष्टकच दिलें आहे. यांत सहज अथवा जन्मजात प्रवृत्ति ह्या महत्त्वाच्या असल्यामुळें थोडक्यांत तत्संबंधीं कांहीं विचार मांडूं.

सहजप्रवृत्ति (Instinct)–आपले जे व्यापार होत असतात त्यांत दोन भेद सहज करतां येण्यासारखे आहेत.:–(१) हेतुपुरःसर (२) अहेतुक. सहजप्रवृत्ती ह्या अहेतुक या सदरांत पडतात. पण त्यांचें स्थान समजण्याकरितां अहेतुक क्रियांचे भेद थोडक्यांत पाहूं.

(अ) **इतस्ततः होण्याच्या क्रिया**–यांमध्यें कांहीं नियम अगर स्पष्ट कारण दिसून येत नाहीं व त्यांची जाणीवही नसते. फक्त ह्या क्रिया होत असतांना एकदम अडथळा उपस्थित झाला तरच त्या समजून येतात. पाळण्यांतल्या लहान मुलाकडे पाहिलें तर अशा किती तरी हालचाली दिसून येतात. त्याच्या बहुतेक सर्वच हालचाली ह्या स्वरूपाच्या असतात.

(आ) **प्रतिक्षिप्त किंवा परावृत्त क्रिया**–या हलचालींवर मनाचा मुळींच ताबा असत नाहीं. इतकेंच नाहीं तर त्या क्रिया होऊन जाईपर्यंत त्यांची विशेष जाणीवहि नसते. उदा० आघात अगर तीव्र प्रकाश आला असतां एकदम डोळे मिटणें, शिंकणें, हातावर कांहीं भुळभुळलें असतां एकदम हात झाडणें वगैरे.

(इ) **सहजप्रवृत्ति क्रिया**–ज्या हालचालींच्या मुळाशीं भीति, राग, कुतूहल, वगैरे भावना असतात त्या सर्व क्रिया या सदरांत येतील. अशा हालचाली सहजप्रवृत्तीमुळें घडतात, व त्यांचीहि सुरवातीला स्पष्ट जाणीव नसते. वर दिलेल्या दोन प्रकारच्या हालचालींत शिक्षणानें अगर परिस्थितीमुळें फारच थोडा फरक होऊं शकतो. परंतु सहजप्रवृत्तीमध्यें शिक्षणानें व भोंवतालच्या परिस्थितीमुळें इतका फरक घडवून आणतां येतो कीं, पुष्कळ वेळां त्यांचें मूळचें स्वरूप पार बदलून जातें. शिक्षकांचें व आईबापांचें मुख्य काम ह्या सहजप्रवृत्तींना वळण लावणें हेंच असतें; त्यामुळें त्यांचा विशेष बारकाईनें अभ्यास करणें फार जरूर आहे.

प्रत्येक सहजप्रवृत्तीशीं संबद्ध अशी एक ठराविक भावना किंवा मनांतील तीव्र अशी खळबळ असते. उदा. युद्धप्रवृत्तीमुळें राग येतो, पलायनप्रवृत्तीमुळें भीति उत्पन्न होते, जिज्ञासेमुळें कुतूहल वाटतें. तेव्हां सहजप्रवृत्तीची व्याख्याच करावयाची झाली तर ' विशिष्ट परिस्थितींत एखाद्या विशिष्ट आकर्षक गोष्टीकडे (चेतकाकडे) मनुष्याचें लक्ष आपोआप ओढलें जाण्याचा व त्याबरोबर मनांत विशिष्ट तऱ्हेची चलबिचल होऊन विशिष्ट क्रिया (प्रतिक्रिया) करण्याची तीव्र इच्छा होण्याचा स्वाभाविक (अनुवंशिक) कल ' अशी करतां येईल. ह्या चेतकाकडे स्वाभाविकतः लक्ष ओढलें गेलें कीं, त्यामुळें त्या विशिष्ट प्रवृत्तीच्या अंगभूत असलेली भावना उत्पन्न होऊन मनांत विशेष तऱ्हेची चलबिचल होते, व विशेष तऱ्हेनें वागण्याची अगर क्रिया करण्याची प्रवृत्ति होते.

(५) वरती मनाचें स्वरूप 'अवधान' असें म्हटलें आहे, याचा अर्थ मानसशास्त्रांत मनोव्यापार चालू असतां अनुस्यूत असा अखंड रहाणारा ' अहं ' यास जागाच नाहीं असा नव्हे. Behaviorists हें मन अथवा पदार्थ कांहीं नाहींच असें जरी म्हणत असले तरी त्यांचें मत फारसें मान्य नाहीं. स्टाउट्, स्पीअरमनसारख्या शास्त्रज्ञांचा कल मनोव्यापाराच्या बुडाशीं एक मनोव्यापारांची अनुस्यूत ' अखंड अहं 'सारखी

वस्तु (Unity) आहे असें मानण्याकडेच आहे. अवधानात्मक हें कार्य करतांना दिसणाऱ्या मनाचें स्वरूप आहे. छायाचित्राच्या खेळांत जसा पडदा तसा मनोव्यापारांत ज्याला ज्ञान होतें, जो सुखदुःख भोगतो व तदनुकूल जो अनुकूलप्रतिकूल व्यापार करतो असा मूळ 'अहं' आहे असें मानण्याकडेच बहुतेक शास्त्रज्ञांचा कल आहे. या सामान्य वस्तूचा अधिष्ठानापलिकडे, सत्तेपलिकडे उपयोग नाहीं, म्हणून त्याचा उल्लेख केला जात नाहीं, अथवा करण्याची अवश्यकता वाटत नाहीं, येवढेंच. याचा अर्थ तो नाहींच असा मात्र नव्हे.

(९) शास्त्राचा व्याप—

आरंभीं आरंभीं हें मानसशास्त्र अध्यात्मशास्त्राचा गुलाम म्हणून गणलें जात होतें. पण लॉक, बर्क्ले यांच्या प्रयत्नामुळें त्याला जो अनुभवाचा पाया प्राप्त झाला त्यामुळें त्याची अत्यंत झपाट्यानें वाढ सुरू झाली. आजची या शास्त्राची स्थिति अशी आहे कीं मॅक्डुगल या अर्वाचिन मानसशास्त्रज्ञानें असें म्हटलें आहे कीं 'मानसशास्त्र मला पुरें समजलें म्हणण्याचें कोणी धाडस करूं नये, इतक्या त्याच्या शाखा वाढल्या आहेत.'

या शास्त्राचा जो विस्तार झाला त्याची कल्पना त्याच्या शाखाभेदाचा नकाशा वाचकापुढें मांडून देतां येईल—

मानसशास्त्र

(Normal) अविकृत / स्वाभाविक मन	(Abnormal) विकृत मन
याचे खालील प्रकारः —	[अ] भ्रम
बालमनाचें शास्त्र (Child Psy.)	[आ] स्वप्नविचार
तरुण ,, ,, (Adult Psy.)	[इ] वेड
स्त्री ,, ,, (Woman Psy.)	[ई] मानसिक भ्रम
जनसंमर्द ,, ,, (Crowd Psy.)	[उ] परवशीकरण
सामाजिक ,, (Social Psy.)	[ऊ] स्ववशीकरण
पाशवी ,, ,, (Animal Psy.)	

मानसशास्त्राची ही शाखोपशाखी वाढ दिसत आहे त्याचें कारण त्या शास्त्रानें उठल्या सुटल्या अध्यात्माकडे पहाण्याची संवय सोडून दिली, व प्रायोगिक रीत्या मनाचें प्रत्यक्ष पृथक्करण करण्याचें शास्त्रज्ञांनीं ठरवलें. विषयवारीनें याचे आणखीहि प्रकार संभवतील. अगदीं अर्वाचीन काळांतील कांहीं प्रकार पुढें दिले आहेतः—

(१०) जुनेनवे पंथ—

(१) **Faculty Psychology**—या पंथांतील लोकांचें म्हणणें असें कीं मन हें एक नित्यद्रव्य आहे व त्याच्या विचारादि शक्ति आहेत. मनाचा अभ्यास करण्याची एकमेव पद्धत म्हणजे 'अंतर्मुख होऊन निरीक्षण' करणें ही होय.

(२) **Empirical Psychology**—मनाचीं वेगवेगळीं स्वतंत्र दालनें आहेत. मेंदूंत वेगवेगळे कप्पे आहेत व ते वेगवेगळ्या काळीं स्वतंत्ररीत्या वावरतात, या मताचें उच्चाटन या पंथीयांनीं केलें. यांनीं मुळावरच घाव घातला. ह्या पंथाचें म्हणणें असें कीं आपल्या अनुभवांत जेवढें येईल तेवढेंच मानावें. अंतर्मुख होऊन पाहूं लागलों असतां मन हाताला लागतच नाहीं. मन नाहींच—असल्यास एक ऐंद्रियिक संवेदना गोळा होण्याची जागा असें असावें.

हीं मतें जरी पुढें टिकलीं नाहींत तरी पण 'अनुभवा' वर जोर पुढच्या पंथीयांनीं दिला.

(३) **Physiological Psy**—यांचें म्हणणें मन म्हणून नाहींच. क्रिया म्हणून जेवढी आहे ती प्रतिक्रियारूपाची आहे. हेतुपूर्वक व अहेतुक असा जो क्रियेंत भेद केला जातो तो व्यर्थ आहे. मानवी क्रियांचा विचार करतांना या पंथियांच्या मतें मनाचा अथवा बुद्धिचा विचार करण्याचें कारणच नाहीं. कारण मन म्हणून कांहीं पदार्थच नाहीं. मनुष्याची बुद्धीमान् म्हणून जी आपण व्याख्या करतों ती चूक आहे. कारण उच्च प्रतीच्या जनावरांत सुद्धां आपणाला बुद्धी दिसून येते.

(४) **Experimental Psychology**—आपण नुसत्या निरीक्षणावर अवलंबून राहतां कामा नये. इतर शास्त्रांची प्रगति त्यांनीं निरीक्षण सोडून प्रयोगाचा अंगिकार केला म्हणून झाली, तेव्हां शास्त्राची वाढ करणें असेल तर प्रयोग सुरू केले पाहिजेत. ते असे प्रयोग करून त्यांनीं कांहीं गोष्टी निश्चित केल्या. संवेदनाचेतक व संवेदना यांचा काय संबंध असावा हें प्रयोगाच्या साहाय्यानें ठरवितां येतें असें वेबर व फेक्नेर यांनीं जवळ जवळ ठरवलें आहे. स्मृति, बुद्धि, आत्मनिरीक्षण इत्यादि बाबतींत प्रयोगप्रद्धतीचें अवलंबन करून वेगवेगळ्या निष्कर्षांचा खरे खोटेपणा तपासण्यांत येत आहे. याच्यांत

(अ) **Epiphenomenalism.**

(आ) **Functionalism.**

(इ) **Introspectionism** अथवा **Structurism.**

(आ, इ हे दोन पंथ अमेरिकेंत आढळतात.) असे भेद आहेत. पहिल्या वर्गाचें म्हणणें असें कीं मन म्हणजे शरीरांतील मेंदूच्या क्रिया चालू असतांना उत्पन्न होणारा पदार्थ. यांचें मत (३) सारखेंच आहे. दुसरा वर्ग क्रियेच्या विषयापेक्षां ज्या मानवी क्रिया आहेत त्यांवरच अधिक जोर देतो. तिसरा वर्ग चेतन-परमाणूंनीं मनाचे व्यापार स्पष्ट करण्याची हांव धरतो.

(५) **Behavourism**—या पंथाचें म्हणणें असें कीं जर आपणांस संपूर्ण ज्ञान असेल तर शारीरिक सर्व क्रियांचें मूळ आपणांस शारीरिक क्रियेंत सांपडतेंच. 'मानसशास्त्र' हा शब्दच बदलला पाहिजे. कारण मन नाहींच. वॉटसन वगैरे लोक या पंथाचे आहेत.

(६) **Gestult Psychology**—खरें म्हटलें असतां यांत नवीन कांहीं नाहीं. यांचें म्हणणें अभिज्ञा ही संवेदनांच्या परमाणूंची बनलेली नाहीं. आपणांस पदार्थ एकदम संपूर्ण असा दिसतो. कल्पनासाहचर्यवादी असें समजतात कीं आपणांस पदार्थांची अभिज्ञा होते त्या वेळीं एक एक भाग असा दिसतो व मग आपण त्याचें संकलन करतों. यांचें म्हणणें असें होत नाहीं. पदार्थ संपूर्णच दिसतो.

हें मत जर्मन देशांत विशेष मान्य आहे. कॉफा, कोहेनर वगैरे पंडित याचा अंगिकार करतात.

(७) **Hormic Psychology**:—हें मत नं. ३, नं. ५ अशा पंथांविरुद्ध आहे. याचा प्रवर्तक मॅक्डुगल नांवाचा पंडित आहे. यांचें म्हणणें प्रत्येक क्रियेच्या बुडाशीं ज्ञात अथवा अज्ञातपण प्रयोजन आहे. आपण ज्यास सहजप्रवृत्ती म्हणतों त्यांच्यासुद्धां बुडाशीं एकेकाळीं प्रयोजन होतेंच.

(८) **Pshycho-analysis** (मनोविश्लेषण)—आपणाकडे विशेष माहित असलेला असा पंथ म्हणजे मनोविश्लेषणाचा. या पंथाचा आद्यप्रवर्तक ऑस्ट्रियन डॉक्टर फ्रॉइड हा होय. रोग्यांना औषधें देतांना याला असें आढळून आलें कीं रोगाचें बीज नुसतें रोग्याच्या शरीरस्थितींत अथवा तत्कालीन दिसणाऱ्या त्याच्या मनोविकारांत आढळून येत नाहीं. तर पुष्कळ वेळां आपणांला त्यांच्या मनाचा ठाव पहावा लागतो, व आपण असा ठाव पहाण्याचा प्रयत्न जर केला तर आपणांला मनाच्या एका कोपऱ्यांत अज्ञात अशा खुरटलेल्या पण प्रभावी सहजप्रवृत्ती दिसून येतील. त्यानें ह्या प्रवृत्ती शोधून काढण्याची जी पद्धत काढली तिला Psycho-analysis असें त्यानें म्हटलें. ह्या पद्धतीनें गूढ अशा प्रवृत्ती—ज्या खुद्द रोग्यालाहि ठाऊक नसतात—शोधून काढतां येतात. मात्र त्या शोधून काढण्यास फार दिवस लागतात. आपल्या मनांतील प्रवृत्तींना वाव मिळाला नाहीं म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचे गंड (Complex) तयार होतात, व त्यांचा परिणाम भित्रेपणा, दुर्वर्तन, प्रसंगीं वेडेपणा, शारीरिक विकार यांच्यांत होतो.

येथपर्यंत डॉ. फ्रॉईडच्या सिद्धान्ताचा भाग सर्वच मान्य करतात. मतभेद आहे तो पुढील भागासंबंधानें आहे. त्याचें म्हणणें आपल्या आचारविचाराच्या बुडाशीं ज्या प्रवृत्ती आहेत, त्या सर्वांचें मूळ लैंगिक प्रवृत्तींत आहे. मूल स्तनपान करतें, मुलगा आईशीं भांडतो असल्या गोष्टीसुद्धां त्यानें लैंगिक प्रवृत्तीच्या आधारानें उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे; पण हें त्याचें मत खुद्द त्याच्याच पंथांतील युंग, ॲडलर यांना मान्य नाहीं. युंगचें म्हणणें आदिप्रवृत्ति लैंगिक नाहीं, ती सत्तेच्याकरतां आहे. ॲडलरच्या मतें अपुरेपणा दूर करण्याच्या प्रयत्नांत मनोनवस्थानाचें बीज आहे. या पद्धतींतील अर्थातच कांहीं भाग खरा आहे. प्रवृत्तीला कामावांचून मूळच नाहीं म्हणणें हें वस्तुस्थितीस निर्विवाद सोडून आहे, व असे मॅक्डुगलसारखे लोक म्हणतही आहेत. या पद्धतीनें नीति, धर्म, व्यवहार वगैरेकडे पाहण्याची एक वेगळीच दृष्टि लोकांना दिली गेली आहे. पण जातां जातां येवढें सांगणें अवश्य आहे कीं या पद्धतीचा शास्त्रांत उपयोग करतांना मोठ्या जबाबदार पद्धतीनेंच तिचा उपयोग केला पाहिजे. कारण सर्वच अजून प्रायोगिक स्थितींत आहे.

मॉन्सून (**Monsoon**):—हिंदी महासागरावर एप्रिल ते सप्टेंबरपर्यंत पाऊस धारण करणारे वारे वहातात; त्यांस उद्देशून हा शब्द वापरतात. अरबी समुद्राच्या व बंगालच्या उपसागराच्या अक्षांशावर वास्तविकपणें वहाणारे वारे म्हणजे ईशान्येचे वारे (N E. Trade). पण या भागांत हे वारे थंडीच्या दिवसांतच फक्त वहातात. जेव्हां उत्तर अक्षांशांत (North Latitude)

सूर्य डोक्यावर येतो, तेव्हां Barometric depression हिंदुस्थानच्या वायव्य दिशेकडे होऊं लागतें. त्याचा परिणाम असा होतो कीं आग्नेय वारे (S. E. Trade) विषुववृत्तावर वाहूं लागतात व पुढें नैऋत्य वारे (S. W.) होऊन हिंदुस्थानला येऊन पोंचतात व या कमी दाबाच्या (of low pressure) केंद्राभोंवतीं गिरक्या घेत रहातात. या सर्वांचा परिणाम असा होतो कीं बंगालच्या उपसागरांत वादळें उत्पन्न होऊन तीं आग्नेय दिशेनें गंगानदीच्या दऱ्यांतून वर जातात.

अशा प्रकारच्या वादळी पाण्यांतून फिरणारे प्राचीन अरब लोक अशा वाऱ्यांवर अवलंबून होते व हिंदुस्थानशीं व्यापार करणाऱ्या प्रारंभींच्या युरोपियन कंपन्यांना आपला प्रवास या वाऱ्यांच्या अनुसंधानानें ठरवावा लागे. हल्लींसुद्धां जहाजांना मॉन्सून सुरू होतांच आपला नेहमींचा मार्ग बदलावा लागतो. हिंदुस्थानच्या बहुतेक सर्व भागांत वार्षिक पावसापैकीं शेंकडा ६० ते ९० टक्के पाऊस मॉन्सूनमध्येंच पडतो. त्याच त्या ठिकाणीं या पावसाचें प्रमाण वर्षानुवर्षे बदलत जातें व ठराविक पाऊस पडला नाहीं तर त्या ठिकाणीं दुष्काळ व रोगराई सुरू होते. हिंदुस्थानांत दर वर्षी आर्थिक स्वास्थ्याची गोष्ट म्हणजे अरबी समुद्रावरील वादळी वाऱ्यानें पावसाचे ढग हिंदुस्थानांतील ठिकठिकाणीं फोडणें ही होय. अशा तऱ्हेनें मॉन्सून या शब्दाला उन्हाळ्यांतील एक विशिष्ट पाऊस असा अर्थ अभिप्रेत झाला आहे.

मायकेल अँजेलो (१४७५–१५६४):–विख्यात इटालियन चित्रकार, शिल्पकार व कवि. कॅप्रिस या गांवीं ६ मार्च १४७५ रोजीं याचा जन्म झाला. त्यावेळीं याचा बाप कॅप्रिस गांवचा गव्हर्नर होता; पण पुढच्याच वर्षी तो आपल्या बोनारोटि या गांवीं परत येऊन राहिला. या गांवींच मायकेलचें बालपण त्याच्या दाईच्या सहवासांत गेलें. ही दाई गवंडी जातीची होती. त्यामुळें मायकेलला लहानपणींच संगमरवरी दगडाचे तुकडे, टाक्या व हातोडी हीं खेळणीं मिळालीं व भोंवतालच्या दगड घडविणारांच्या संगतींत तो खेळूं लागला. हें न आवडून बापानें त्याला शाळेंत डांबलें. पण बाप व मास्तर यांच्या मारकुटीला दाद न देतां मायकेलनें आपल्या भेटी बंद केल्या नाहींत हें पाहून त्रासून बापानें १ एप्रिल १४८८ रोजीं–म्हणजे मायकेलच्या वयाच्या तेराव्या वर्षी–त्याला गिर्लीडियो नांवाच्या चित्रकाराच्या हाताखालीं उमेदवार म्हणून ठेवलें.

पुढें लौकरच लॉरेंझोच्या दृष्टीस याचा पहिलाच पुतळा पडून त्यानें याला आपल्या घरींच राजवाड्यांत जागा दिली. पुढें लॉरेंझो डी मेडिसी हा शिल्पकार ८-४-१४९२ रोजीं मेला. लौकरच मायकेल व्हेनिसला गेला. पण व्हेनिसमध्यें त्याला कांहींच काम मिळालें नाहीं. तेव्हां तो भटकत भटकत बोलोना शहरीं गेला; पण तेथील मत्सरी कलावन्तांनीं त्याला धमक्या दिल्यामुळें हा १४९५मध्यें फ्लॉरेन्सला परत आला. यावेळीं फ्लॉरेन्समध्यें लोकराज्य स्थापन झालें होतें. आश्चर्य असें कीं तो येथें येतांच त्याच्या वयाच्या अवघ्या २०व्या वर्षी त्याला तेथील जनरल कौन्सिलवर जागा मिळाली. पण लौकरच रोमच्या एका कार्डिनलनें त्याला बोलावल्यावरून तो रोमला गेला व तेथें त्याला काम मिळालें. ४–५ वर्षांतच उत्कृष्ट चित्रकार व शिल्पकार म्हणून त्यानें कीर्ति कमाविली; पण तो दरिद्रीच राहिला. १५०५मध्यें दुसरा पोप ज्यूलियस यानें स्वतःचें एक प्रचंड स्मारक 'ज्यूलियन टूम' तयार करण्यास याला सांगितलें; पण पैशाच्या बाबतींत पोपनें फसविल्यामुळें हा फ्लॉरेन्सला पळाला. पुन्हां १५०८मध्यें समजूत पाडल्यावर हा रोमला परतला. राफेल वगैरे चित्रकारांनीं याची फजिती करण्याकरितां याला सिस्टाइन चापेलचा घुमट रंगविण्यास सांगितलें. या घुमटावर त्यानें चार वर्षे खपून इटलीच्या पुनरुज्जीवनाच्या कालांतील सर्वोत्कृष्ट चित्रें काढलीं.यानंतर त्याला पोपनें 'ज्यूलियन टूम'चें अर्धवट काम पुरें करावयास सांगितलें. पण चारच महिन्यांनंतर पोप ज्यूलियस मेला व पोप लिओ गादीवर आला. त्यानें त्याला फ्लॉरेन्सला पाठवून दुसरें स्मारक बांधण्यास सांगितलें. पुढें १५२७ मध्यें रोमचें जूं झुगारून देण्याचा अयशस्वी प्रयत्न फ्लॉरेन्सनें केला. त्या युद्धांत यानें भाग घेतला. पण शेवटीं यास पळून जावें लागलें. पोपचा राग शांत होऊन फ्लॉरेन्स येथील ग्योलिनो व लॉरेन्झो डी मेडिसी यांच्या समाधी (छत्र्या) यानें पुऱ्या केल्या व १५३४ मध्यें फ्लॉरेन्स कायमचें सोडलें. पुढें वयाच्या ७० व्या वर्षी यानें 'ज्यूलियन टूम' पुरें केलें. ब्रॅमँटी या शिल्पकारानें सुरू केलेलें सेंट पीटरचें चर्च पुरें करण्याचें काम याला १५४६ मध्यें देण्यांत आलें.

याच्या शिल्पकलेंत रेखीवपणा व भव्यपणा आहे. The last judgment, The crucfixion, The descent of Christ from the Cross हीं त्याचीं चित्रें विश्वविख्यात आहेत. यानें कविताहि पुष्कळ व

चांगल्या कल्या आहेत. काव्याची स्फूर्ति त्याला विटोरिया कोलोना नांवाच्या एका सरदाराच्या विधवेच्या सहवासानें मिळाली. त्याच्या गद्य लिखाणांत भाषणेंच अधिक आहेत. हा म्हातारपणीं सर्दीनें आजारी पडून १८ फेब्रुवारी १५६४ रोजीं मेला. त्याला शिल्पकार म्हणवून घेण्यांतच जास्त अभिमान वाटे.

मायक्रॉस्कोपः–लहान वस्तु मोठ्या स्वरूपांत डोळ्यानें पाहण्याचें हें एक यंत्र आहे. त्याचें अगदीं साधें स्वरूप म्हणजे एक लेन्सचा मॉयक्रॉस्कोप. या प्रकारच्या मायक्रॉस्कोपचा फार प्राचीन काळीं शोध लागला असला पाहिजे. वक्र व पारदर्शक अशा तबकडीमुळें लहान वस्तु मोठी दिसते, हा चमत्कार फार प्राचीन काळापासून अवलोकनांत आला असला पाहिजे. तथापि आज जे महाप्रभावी असे जोड (compound) मायक्रॉस्कोप दृष्टीस पडत आहेत त्यांचा शोध अलीकडेच लागला आहे.

एका लेन्समुळें रंगीबेरंगी व तुटक तुटक (Distorted) प्रतिबिंब दिसे. इ. स. १७२९ सालीं चेस्टर मूर हॉल व १७५२ सालीं जॉन् डोलॉंड यांनीं Achromatic Lensचा शोध लावीपर्यंत मायक्रॉस्कोपमध्यें कांहीं प्रगती झाली नव्हती. इ. स. १८७३ ते १८८१ सालीं प्रोफेसर इ. एब् या शास्त्रज्ञानें केलेल्या शास्त्रीय (Theoretical) संशोधनानें व जर्मन ग्लासमेकर डॉक्टर शॉट् (Schott) यानें प्रत्यक्ष मायक्रॉस्कोप बनविण्यांत दाखविलेल्या कौशल्यामुळें आधुनिक मायक्रॉस्कोपचा पाया घालण्यांत आला. सर आल्मरॉथ् राइट व जे. जे. लिस्टर (Sir Almroth Wright J. J. Lister) या दोघांनींहि आधुनिक मायक्रॉस्कोपचें संशोधन करण्यांत यशस्वी प्रयत्न केले आहेत.

मायक्रॉस्कोपच्या साध्या नमुन्यांत नळीच्या एका टोंकाला एक वर्धक लेन्स (Magnifying Lense) असतें व दुसऱ्या बाजूलाहि एक असतें. दुसरीचा उपयोग दर्शिका (Eye piece) म्हणून करायचा असतो. आधुनिक मायक्रॉस्कोप या तत्त्वावरच तयार करतात. यांत दोन साध्या लेन्सऐवजीं, गुंतागुंतीच्या लेन्सीसच्या दोन मालिका (systems) असतात. जो पदार्थ पहायचा त्याच्या जवळ असलेल्या मालिकेला दृश्य (objective) व डोळ्याजवळील मालिकेस दर्शिका (Eye piece) असें म्हणतात. दृश्य हा मायक्रॉस्कोपमधील महत्त्वाचा भाग. यांत भिन्न गुणधर्मांच्या व शक्तींच्या लेन्सेस असतात. या लेन्सेसचें काम म्हणजे पदार्थापासून येणाऱ्या प्रकाशकिरणांचें संकलन करून ते केंद्रीभूत करणें.

मायक्रॉस्कोपमधून वस्तु पहातांना एका डोळ्याला फार ताण पडत असे. इ. स. १८६० सालीं, एफ्. एच्. वेन्हॅम् या शास्त्रज्ञानें एक Binocular मायक्रॉस्कोप तयार केला. त्यास दोन नळ्या असतात. या योजनेमुळें डोळ्यावर पडणारा ताण फारच कमी झाला आहे. या योजनेंत, दृश्यापासून निघणाऱ्या प्रकाशकिरणांचे Prism मुळें पृथक्करण होतें व दोन प्रतिबिंबें (Images) एकचित्र होऊन ज्यास Stereoscopic प्रतिबिंब (Vision) म्हणतात तें तयार होतें.

मायक्रॉस्कोपमध्यें जी कांच वापरतात त्यांतील घटकांत जसजशी सुधारणा होत गेली तसतशी मायक्रॉस्कोपमुळें जें प्रतिबिंब येई त्याच्यामध्येंहि सुधारणा होत गेली.

Molten Quartz पासून लेन्सेस तयार करण्याचा शोध लागल्यापासून Ultra-violet प्रकाशाचा उपयोग करून वापरतां येईल व ज्यामधून $\frac{१}{२४}$ लक्ष्यांश इंच व्यास असलेल्या लहान वस्तू दिसतील अशा प्रकारचे Microscope करतां येणें शक्य झालें. यांतहि Polarised light वापरल्यानें अधिक प्रगती झाली आहे; त्यामुळें $\frac{१}{६}$ कोट्यांश इंच व्यासाची वस्तू दिसूं शकते. इ. स. १९३१ सालीं प्रो. रॉबर्ट ए. मिलिकन् (Millikan) यानें प्रोफेसर जे. डयूमॉंड व एच्. किर्क्पॅट्रिक, कॅलिफोर्निया इन्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी यांनीं शोधून काढलेल्या एका नव्या मायक्रॉस्कोपची घोषणा केली. या मायक्रॉस्कोपमुळें Electrons चा वेग पहातां येतो व मोजतां येतो. या मायक्रॉस्कोपला ५० स्पेक्ट्रोस्कोप असतात. हे सर्व एक Arc मध्यें असून त्यावरून क्ष–किरण जात असतें (sweep), यामुळें गतिमान् Electrons चे फोटोग्राफ घेतां आले आहेत.

मार्क ॲन्टोनी अथवा मार्कस अन्टोनिअस (इसवी सनापूर्वी ८३–३०):–हा एक रोमन मुत्सद्दी व वक्ता होऊन गेला. त्याचा जन्म प्राचीन काळीं रोममधील एका कुलीन घराण्यांत झाला असून आईकडून त्याचा ज्यूलियस सीझरशीं संबंध पोहोंचतो. त्यानें बेफिकीरपणानें बदफैलीपणा करण्यांत जरी आपला वेळ घालविला तरी त्याची तीव्र बुद्धिमत्ता व शौर्य यांची ज्युलीयस सीझरला जाणीव झाली होती. तो ज्युलीयस सीझरचा कट्टा पक्षपाती होता. ज्युलियस सीझरनें त्याला झटकन् पुढें आणलें. फार्सालस (Pharsalus) तेथें पॉम्पेचा

(Pompey) ज्यूलीयस सीझरनें पराभव इ. सनापूर्वी ४८व्या वर्षी केला तेव्हां ॲन्टोनीनें त्याच्या सैन्याच्या एका भागाचें आधिपत्य स्वीकारलें होतें.

४४ सालीं डिक्टेटरच्या खुनाच्या पूर्वी ॲन्टोनीला सीझरचा सहकारी म्हणून कौन्सलशिपमध्यें (Consulship) नेमण्यांत आलें. खून झाल्यावर तो दगा देईल अशी कटवाल्यांना वेळींच कल्पना आली नाहीं. लवकरच सीझरपक्षाचा प्रमुख होऊन त्यानें बंड करण्याची तयारी केली. सीझरचा दत्तक पुत्र ऑक्टेव्हीयस याची सत्ता वाढत असलेली पाहून त्याचें सहकार्य ॲन्टोनीनें मिळविलें. हे भावी कालचे प्रतिस्पर्धी एका हेतूनें प्रेरित होऊन सहकारी झाले. त्यांनीं कॉमनवेल्थच्या स्थापनेकरितां अवश्य असलेल्या ट्राइमव्हरेट (अधिकाऱ्यांचें त्रिकूट)मध्यें आपली नेमणूक करणें भाग पाडलें. या त्रिकुटांत एम्. लिपिडियस नांवाचा तिसरा इसम होता. त्याला दुय्यम दर्जा देण्यांत आला. या त्रिकुटाला अमर्याद सत्ता होती. त्यानें आपल्या वैयक्तिक वैऱ्यांपैकीं सर्वांना मृत्यूची शिक्षा फर्मावून ती अमलांत आणली व रिपब्लिकन पार्टीचे पुढारी ब्रूटस व कॅसीयस यांच्याकडे तें त्रिकूट वळलें व त्यांचा फिलिपी येथें मोड केला.

या यशानंतर ॲंटोनी व ऑक्टेव्हीयस यांनीं लिपिडियसकडे दुर्लक्ष करून रोमन मुलूख आपापसांत वाटून घेतला. ऑक्टेव्हीयसनें पश्चिमभाग व ॲन्टोनीनें पूर्वभाग घेतला. दोन वर्षांतच त्यांच्यांत तीव्र विरोध उत्पन्न झाला, पण त्यांचा तात्पुरता समेट झाल्यामुळें युद्ध व्हायचें टळलें. त्यानंतर ॲन्टोनी इजिप्तची राणी क्लिओपात्रा हिला भुलून सर्वस्वीं तिच्या आधीन झाला. रोमन राज्याची विभागणी ॲन्टोनी व ऑक्टेव्हियस यांच्या महत्त्वाकांक्षी मनाला सहन होईना. त्यांचें ३१ सालीं युद्ध जुंपलें. ॲग्रिपाच्या आधिपत्याखालीं झालेल्या आरमारी युद्धांत ऑक्टेव्हियसला विजयश्रीनें माळ घातली. ॲन्टोनी क्लिओपात्रेसह ईजिप्तला पळाला. कसून व सतत प्रयत्न करण्याला तो अपात्र झाला होता. पुढील वर्षी त्यानें आत्महत्या केली; क्लिओपात्रेनें त्याचेंच अनुकरण केलें. ॲन्टोनीच्या मरणानें आक्टेव्हियसचें रोमन राज्यांत निष्कंटक वर्चस्व प्रस्थापित झालें. ॲन्टोनीच्या स्वभावाचें उत्कृष्ट वर्णन शेक्स्पीयरच्या ज्यूलियस सीझर व ॲन्टोनी आणि क्लिओपात्रा या दोन नाटकांत केलेलें आढळतें.

मार्कोनी (१८७४–१९३९):–ह्या इटालियन विद्युत्‌शास्त्रज्ञाकडे बिनतारी संदेशवाहनाच्या शोधाच्या श्रेयाचा बराचसा वाटा जातो. याचा जन्म इटालींतील बोलोग्रा या गांवीं झाला. याचें शिक्षण बोलोग्रा (Bologna) विद्यापीठांत झालें. लहान वयांतच त्याचा विद्युत्‌शास्त्राकडे असलेला ओढा दिसून आला. बिनतारी संदेशवाहन (Wireless telegraphy) व्यवहार्य कोटींत आणण्याकरितां त्यानें अनेक प्रयोग केले. या प्रयोगांच्या अन्तीं त्याला तत्संबंधींच्या उपकरणांत सुधारणा करून तीं पूर्णावस्थेस नेण्यांत यश मिळालें. त्यानें बिनतारी संदेशवाहनाचें पहिलें ठिकाण इंग्लंडांतील कॉर्नवाल येथें निर्माण केलें. त्यानें अटलँटिक महासागरावरून संदेश पाठवून १९०१ सालीं आपल्या शोधाचें प्रात्यक्षिक दाखविलें. १९०४ सालीं मार्कोनी कंपनीनें बिनतारी संदेशवाहकानें दैनिक वार्ता पोहोंचविण्याची सर्व्हिस स्थापिली. त्यानंतर तीन वर्षांनीं इंग्लंड व उत्तर अमेरिका यांच्या दरम्यान सार्वजनिक बिनतारी संदेशवाहनाची सर्व्हिस सुरू केली. सध्यां मार्कोनीच्याच पद्धतीचा सार्वत्रिक अवलंब करण्यांत येत आहे. मार्कोनीनें अनेक प्रयोग करून बिनतारी टेलिफोनही पूर्णत्वाला नेला आहे. त्याच्या शोधाबद्दल त्याला १९०९ सालीं पदार्थविज्ञानशास्त्रांत नोबेल प्राइझ मिळालें. १९१५ सालीं इटालियन सरकारच्या बिनतारी–संदेशवाहन खात्याचा तो प्रमुख झाला. १९१७ सालीं युद्धविषयक कामगिरीकरतां त्यानें अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांना भेट दिली.



मार्कोनी

मार्गशीर्ष:–हिंदु कालमापनपद्धतीप्रमाणें येणारा वर्षांतील नववा महिना. हा महिना इंग्रजी नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यांच्या सुमारास व हेमंत ऋतूच्या मध्यभागीं येतो. या महिन्यांतील पौर्णिमा मृगशीर्ष नक्षत्रानें युक्त असल्यानें त्यास ‘मार्गशीर्ष’ असें म्हणतात. प्राचीन काळीं यास ‘सहस्’ असें नांव

होतें. या महिन्यांत महाराष्ट्रांत वर्षाकाल संपून आकाश निरभ्र होऊन सूर्याच्या तापामुळें हवेंत उष्णता वाढते. हवेंतील फरकामुळें अनारोग्य वाढतें. मलेरिया-सारख्या तापाची सांथ पसरते व जनता किंचित् हवालदील होते. हिरवेंगार गवत उन्हानें करपून पिवळसर—पिंगट बनतें, झाडांचीं पानेंहि पिवळीं होऊन गळूं लागतात, धनधान्येंहि पिकून कापणीस तयार होतात. सर्व सृष्टीस म्हातारपण आल्याचा भास होतो. डिसेंबरांत थंडीस सुरवात होते. २१ डिसेंबरला उत्तर गोलार्धांत दिवस सर्वांत लहान असतो व हिंवाळा भासूं लागतो.

या महिन्यांतील शुक्ल एकादशी ही तिथि अत्यंत पवित्र मानली जाते. कारण या दिवशीं श्रीकृष्णाच्या देहांतून एकादशी नांवाची देवी उत्पन्न झाली असें भाविक लोक मानतात. कृष्णाप्रीत्यर्थ पाळल्या जाणाऱ्या या तिथीच्या महत्त्वाचें दुसरें कारण भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं सर्व मासांत श्रेष्ठ असा मार्गशीर्ष तो मीच—'मासानाम् मार्गशीर्षोऽहम्' असें म्हटलें आहे, असेंहि कांहीं लोक मानतात. या एकादशीस मोक्षदा अथवा वैकुंठ एकादशी असें म्हणतात. श्रीमत् भगवद्गीता—जयंतीहि याच दिवशीं करतात. शुक्ल षष्ठीस चंपाषष्ठीचा उत्सव महाराष्ट्राच्या कांहीं भागांत करतात. चंपाषष्ठीचें नवरात्र प्रदिपदेपासून षष्ठीपर्यंत असतें. हा उत्सव खंडोबा, मल्लारी, मार्तंड या देवतेसंबंधीं असतो व तो जेजुरी, पाली, मंगसुळी या गांवीं जत्रा भरून साजरा करतात. पौर्णिमेस दत्त-जयंत्युत्सव करतात. हा उत्सव पौर्णिमेपूर्वी सात दिवस चालतो. भाविक लोक श्रीदत्तास, ब्रह्मा, विष्णु व महेश यांचा अवतार मानतात. तर वेदांतील अग्नि, मरुत् व सूर्य या देवता म्हणजेच दत्तात्रेय असें दुसरे लोक म्हणतात. दत्तजयंतीचा उत्सव गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर, कोल्हापूर या महाराष्ट्रांतील गांवांत होतो. या वेळीं येथें मोठी यात्रा भरते. याशिवाय कोंकणस्थांची दिपवाळी, करवीर राज्यसंस्थापक महाराणी ताराबाई यांची पुण्यतिथि, रेणुकायात्रा, मोरया गोसावी पुण्यतिथि, गोंदवलेकर महाराज पुण्यतिथि हे उत्सव व यात्राहि या महिन्यांत येतात.

मार्चः—हा इंग्रजी वर्षाचा तिसरा महिना आहे. याचे दिवस ३१ असतात. ख्रि. स. पू. ४६ या वर्षी ज्युलियस सीझरनें जेव्हां कॅलेंडरची योजना केली, तेव्हां त्यानें मास म्हणजे मंगळ या रोमन युद्धदेवतेच्या सन्मानार्थ या महिन्यास मार्च असें नांव दिलें व तो वर्षाचा पहिला महिना केला. इंग्लंडमध्यें १७५२ पर्यंत मार्च हाच वर्षाचा पहिला महिना मानीत व २५ मार्च हा दिवस New Year's Day अथवा पाडवा म्हणून पाळीत. पण या सालीं फ्रान्स व स्कॉटलंड यांचें अनुकरण करून मार्च हा वर्षाचा तिसरा महिना मानण्याचें इंग्लिशांनीं ठरविलें.

पृथ्वी सूर्यासभोंवतीं फिरतां फिरतां २१ मार्च रोजीं अशा स्थितींत येते कीं, त्या वेळीं पृथ्वीचा आंस सूर्याकडे अगर सूर्यापासून दूर कललेला नसतो. म्हणून या दिवशीं पृथ्वीवरील सर्व ठिकाणीं दिवस व रात्र समान म्हणजे बारा बारा तासांचीं असतात. मार्च हा महिना उत्तर गोलार्धांत वसंत ऋतूमध्यें येतो म्हणून २१ मार्च या दिवसास Vernal equinox म्हणजे वसंतऋतूंतील समान दिवसरात्र असें म्हणतात. ऋतूंप्रमाणें बदल होणाऱ्या सौरमानाप्रमाणें ज्या वर्षाच्या चार तारखा—२१ मार्च, २१ जून, २३ सप्टेंबर व २२ डिसेंबर—आहेत त्या अत्यंत महत्त्वाच्या मानलेल्या आहेत. कारण या वेळीं पृथ्वीवर हवामानामध्यें व हवामानामुळें वनस्पति, प्राणी इत्यादिकांच्या बाबतींत दृश्य फरक दिसून येतात. या तारखेस जगांतील मुख्य मुख्य धर्मांच्या लोकांचे सण, उत्सव व समारंभ असतात. सणांना व उत्सवांना हा काल अत्यंत उपयुक्त व योग्य असा मानला गेला आहे.

मार्चमध्यें हिंदूंचा चैत्र महिना येतो. शालिवाहन शकाप्रमाणें हिंदु वर्षाचा आरंभ म्हणजे पाडवा हा याच महिन्यांत व तोहि बहुधा २२ मार्चलाच येतो. रामनवमीचा उत्सवहि याच महिन्यांत येतो. महाराष्ट्रांत या कालीं वसंतऋतूचा अम्मल संपूर्ण दिसून येतो. आम्रादि वृक्षांस मोहोर व पालवी फुटून सृष्टिदेवता नाना रंगांच्या फुलांफळांनीं नटलेली असते. दिवस मोठा झाल्यानें हवेंत उष्मा वाढतो व हवेंत वाफेचें प्रमाण वाढतांच ढगांचा गडगडाट व विजांचे लखलखाट होऊन वळवाचे, गारांचे पाऊस सायंकाळीं पडूं लागतात. पावसामुळें हवेंत गारवा येतो. पण पुन्हां उन्हाचा ताप दिवसभर होऊन उष्मा वाढतो. अशी संक्रमण दर्शविणारी हवा पडूं लागते. पावसामुळें रानें हिरवींगार होतात. तळीं डबकीं भरतात, नाल्यांना ओढ्यांना पाणी येतें. सर्वत्र शांत, सुरम्य व प्रसन्न वातावरण पसरतें. पशुपक्षी आनंदित होऊन आपापलीं

घरटीं बांधून, अंडीं घालूं लागतात. पशूंना मद चढतो व ते मूढ बनून स्वत्व विसरून हिंडूं लागतात. या महिन्यांत हा परिणाम ससावर घडून येतो म्हणून त्यावरून इंग्लिश भाषेमध्यें 'As mad as March hare' अशी एक म्हणहि आलेली आहे. (चैत्र पहा)

महाराष्ट्रांत वरीलप्रमाणें परिस्थिति असली तरी समशीतोष्ण कटिबंधांतील कांहीं भागांत—कॅनडा, रशिया—मार्चअखेरपर्यंत हिवाळ्याचीच झाक दृष्टोत्पत्तीस येते. तेथें सोसाट्याचे वारे व गारांचा पाऊसहि पडतो. कित्येक वेळीं उबदार, शांत दिवस तर कित्येक वेळीं अंगाला झोंबणारे गार वारे अशी विषम हवा या महिन्यांत या देशांतून आढळते.

इलिझाबेथ ब्राऊनिंग, फिलिप शेरिडन, या कवींचे व लेखकांचे जन्म याच महिन्यांतील आहेत.

मार्टिन ल्यूथर (१४८३–१५४६):–पोपच्या सत्तेविरुद्ध बंड करणारा व प्रॉटेस्टंट धर्मपंथाचा संस्थापक. जर्मनींतील आइसलेबेन या गांवीं गरीब आईबापांच्या पोटीं तो जन्मला. १५०७ मध्यें तो धर्मगुरु बनला. १५०८ मध्यें विटेनबर्गच्या विद्यापीठांत तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर म्हणून त्याची नेमणूक झाली. आरंभीं त्यानें ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानावर व्याख्यानें दिलीं. पण लौकरच त्यानें बायबलच्या तत्त्वज्ञानावर व्याख्यानें देण्यास सुरवात केली. १५१२ मध्यें तो रोमला गेला. तेथें त्याला डॉक्टर ऑफ थिऑलॉजी ही बहुमानाची पदवी मिळाली. १५१७ मध्यें कोणी जोहान टिटझेल नांवाच्या पाद्रयानें पापापासून मुक्त होण्यासाठीं पैसे घेऊन पापमुक्त झाल्याचीं सर्टिफिकिटें विकावयास सुरवात केली. तेव्हां ल्यूथरनें याविरुद्ध निषेध म्हणून त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें लोकांना कळण्यासाठीं आपले ९५ मुद्दे (theses) कागदावर लिहून चर्चच्या दारावर लावले. त्यानें हे मुद्दे छापून सर्व युरोपभर तीं पत्रकें वाटलीं, तेव्हां वादाला तोंड फुटलें.

ल्यूथरनें वादाची तयारी म्हणून बायबल व चर्चसंस्था आणि चर्चचे कायदे यांचा अभ्यास सुरू केला. तेव्हांपासून तो चर्च या संस्थेपासून दूर दूर जाऊं लागला व त्याचीं व्याख्यानें आणि लिखाण अधिक कडक होऊं लागलें. पोपनें आरंभीं त्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं; पण ज्यावेळीं त्याचीं मतें जास्त फैलावूं लागलीं त्यावेळीं येणारें संकट ओळखून पोपनें त्याला ६० दिवसांत क्षमा मागण्याचा व तसें न केल्यास त्याला रोमला पकडून आणून चौकशी करण्याचा धाक घातला. पोपचें आलेलें हें पत्र ल्यूथरनें चव्हाट्यावर जाळलें.

१५२१ मध्यें जर्मनींतील राजे, सरदार व धर्मगुरु यांच्या असेंब्लीपुढें त्याला बोलाविलें; पण त्यानें हें आमंत्रण नाकारलें; तेव्हां त्याला पाखंडी ठरवून हद्दपार करण्यांत आलें. परंतु सॅक्सनीच्या फ्रेडरिकनें त्याला गुप्त रीतीनें वार्टबर्गच्या किल्ल्यांत नेऊन ठेवलें. ल्यूथर येथें १० महिने राहिला व त्या काळांत त्यानें नव्या कराराचें जर्मन भाषेत भाषांतर केलें. दहा महिन्यांनंतर, जरी त्याला कायद्यानें हद्दपार केलें होतें तरी, प्रकटपणें विद्यापीठांत येऊन त्यानें आपलें प्रोफेसरचें काम सुरू केलें. लौकरच त्याच्याविरुद्ध काहूर उठलें. तेव्हां तो आसपासच्या शहरांतून व खेड्यांतून दौऱ्यावर निघाला.

त्यानें स्वतःहि कांहीं धार्मिक कविता रचल्या. त्यांपैकीं 'A Mighty Fortress is our God' ही विशेष प्रसिद्ध आहे. १५२४ मध्यें कॅथरिन बोरा नांवाच्या एका मठवासिनीबरोबर त्यानें लग्न केलें. त्याच वर्षांत त्यानें आइसलेबेन येथें शाळा स्थापिली. यानंतर १५२६ ते १५२९ पर्यंत त्यानें नवीन प्रार्थना लिहिल्या; पुढें त्याचें बायबलचें भाषांतरही प्रसिद्ध झालें.

युरोपांत सोळाव्या शतकाच्या आरंभीं विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या लाटेला ल्यूथरच्या या निर्भीड प्रचारानें फार मोठी मदत झाली. त्याच्या हयातींतच त्याला पुष्कळ अनुयायी मिळाले हेच प्रॉटेस्टंट ख्रिश्चन होत.



मार्लीन डिट्रिच

मार्लीन डिट्रिच (१९०२–) सिनेमानटी. बर्लिनमध्यें २७ डिसेंबर १९०२ रोजीं तिचा जन्म झाला आरंभीं कांहीं दिवस रंगभूमीवर काम करून मग कांहीं मूकचित्रपटांत तिनें कामें केलीं. पण

१९२९ मध्यें ब्लू एंजल या उफाच्या इंग्लिश बोलपटानें प्रथम ती जर्मनीबाहेर चमकली. लगेच ती अमेरिकेला गेली व आतांपर्यंत तिथेंच आहे. आपल्या हावभावानें प्रसन्न वातावरण निर्माण करण्यांत तिचा हातखंडा आहे. लाडके उच्चार हें तिचें वैशिष्ट्य आहे. The Blonde Venus, The Song of Songs, Desire हे तिचे बोलपट फार नांवाजलेले आहेत.

मालवीय, पंडित मदन मोहन (१८६१–):– या कट्टया सनातनी देशभक्ताचा जन्म ता. २५ डिसेंबर १८६१ रोजीं झाला. त्यांचे वडील पंडित व्रजनाथ हे जसे गाढे पंडित होते तसे अतिशय दयाळू होते. पंडित मालवीयजींना लहानपणापासून नीटनेटका पोषाख करण्याची संवय होती. प्रथम संस्कृत पाठशाळेंत अभ्यास करून त्यांनीं मूर कॉलेजांत प्रवेश केला व १८८४ सालीं बी. ए. झाले. त्यांना खेळण्याची मुळींच आवड नव्हती. धर्म व शिक्षण हींच त्यांच्या आवडीचीं क्षेत्रें म्हणून त्यांनीं अलाहाबाद येथें हिंदु समाज व Literary Institute (साहित्यसंस्था) या संस्था स्थापिल्या.

त्यांनीं पुढें तीन वर्षें शिक्षकाचा व्यवसाय केला. नंतर ते वृत्तपत्रव्यवसायांत शिरले. 'हिंदुस्थान' व 'इंडियन यूनियन' या दोन पत्रांचें संपादन त्यांनीं चांगल्या रीतीनें केलें. 'अभ्युदय' नामक हिंदी नियतकालिक सुरू केलें. 'लीडर' पत्रहि सुरू केलें. या पत्रांच्या द्वारें त्यांनीं ज्ञान व संस्कृती यांचा प्रसार केला.

मि. A. O. Hume यांच्या प्रेरणेनें त्यांनीं कायद्याच्या अभ्यासाला सुरवात केली व १८९१ सालीं एल्एल्. बी. झाले. कायद्याचें ज्ञान व साक्षेपी वृत्ती यांच्या बळावर त्यांनीं वकिलीच्या धंद्यांत यश कमावलें. १८९६ सालीं ते कॉंग्रेसला मिळाले. त्यांनीं कलकत्ता कॉंग्रेसच्या वेळीं प्रथमच जें भाषण केलें त्यावरून पार्लमेंटरी पुढारी होण्याचे गुण त्यांच्या आंगीं असल्याचें दिसून आलें.

१८८८ सालीं मद्रास येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे वेळीं मालवीयजी कॉंग्रेसचे सेक्रेटरी होते. १९०२ मध्यें लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें निवडून आले. १९०८ सालीं लखनौ येथें भरलेल्या संयुक्त प्रांतीय परिषदेचे ते अध्यक्ष झाले व १९०९ सालीं राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानावर विराजित झाले.

पुढें मध्यवर्ती विधिमंडळांत शिरल्यावर ते १९२४ सालीं असेंब्लींतील नॅशनॅलिस्ट पार्टीचे ते अध्यक्ष झाले.

मालवीयजीनीं हिंदु संस्कृतीचें परिपोषण व्हावें व शास्त्रीय विषयांत तज्ज्ञ निर्माण व्हावेत या दुहेरी हेतूनें बनारस हिंदु युनिव्हर्सिटीची स्थापना केली. ते सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे कट्टे पुरस्कर्ते आहेत. हिंदूंच्या चळवळीची संघटना करणारांत ते प्रमुख आहेत. लोकांना लष्करी शिक्षण देण्यांत यावें असें ते नेहमीं सांगतात. त्यांनीं हिंदुमहासभेला नांवरूपाला आणलें. स्वदेशी धंद्याचा आधुनिक पद्धतीवर विकास व्हावा अशी त्यांची उत्कट इच्छा आहे.

१९३० सालीं त्यांना मुंबई येथें अटक करण्यांत आली. ते गोलमेज परिषदेला प्रतिनिधी म्हणून गेले होते. १९३३ सालीं कलकत्त्यास भरावयाच्या राष्ट्रीय सभेचे ते नियोजित अध्यक्ष होते. परंतु सरकारनें त्या अधिवेशनास बंदी केल्यामुळें मालवीयजी कलकत्त्यास जात असतां त्यांना वाटेंत पकडण्यांत आलें. १९३२च्या दिल्ली कॉंग्रेसचे ते नियोजित अध्यक्ष होते. दिल्लीच्या मार्गावर असतांनाच त्यांना अटक झाली. १९३५च्या हिंदुसभेच्या पुणें येथील अधिवेशनाचें ते अध्यक्ष होते.

मावळणकर, ना. गणेश वासुदेव (१८८८–):– यांचा जन्म ता. २६ नोव्हेंबर १८८८ रोजीं बडोदा येथें झाला. लहानपणापासूनच त्यांची मानसिक शक्ति प्रबल असल्याचें दिसून आलें. त्यांचे वडील सब्‌जज्ज होते; त्यांचा आपल्या मुलाच्या चारित्र्याला वळण लावण्याचे कामीं बराच उपयोग झाला.



ना. गणेश वासुदेव मावळणकर

१९०४ सालीं ते अहमदाबाद हायस्कूलमधून मॅट्रिक झाले. १९०८ सालीं अहमदाबाद येथील गुजराथ कॉलेजमधून बी. ए. झाले. ते तीन वर्षें कॉलेजांत स्कॉलर होते व एक वर्ष फेलो होते. १९११ सालीं एल्एल्. बी. झाले. ते ह्या परीक्षेंत युनिव्हर्सिटींत पहिल्या वर्गांत पहिले आले.

भारतसेवक समाजाला मिळण्याची त्यांची इच्छा होती; पण त्यांच्या घरच्या वडील मंडळींनीं त्यांना तसें

करूं दिलें नाहीं. १९१३ सालीं अहमदाबाद येथें वकिलीच्या धंद्यास त्यांनीं सुरवात केली. लवकरच अपवादात्मक यश त्यांना मिळालें.

१९१८ सालीं इन्फ्ल्युएंझाच्या साथींत लोकांना मदत करण्याचे कामीं त्यांनीं भाग घेतला. १९१९ सालीं दुष्काळग्रस्तांना त्यांनीं मदत केली. नंतर खेडा जिल्ह्यांतील करबंदीच्या चळवळींत त्यांनीं भाग घेतला. त्या चळवळीचे सूत्रधार महात्माजी यांनीं माळवणकर यांचेवर कायमची मोहिनी घातली.

१९२१ सालीं नागपूर कॉंग्रेसच्या ठरावानुसार त्यांनीं वकिलीचा धंदा बंद ठेवला. गुजराथ प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे ते पहिले जनरल सेक्रेटरी होते. अहमदाबाद येथें १९३६ सालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या ३६ व्या अधिवेशनाचे ते जनरल सेक्रेटरी होते.

१९१९ सालीं अहमदाबाद म्युनिसिपालिटींत सभासद निवडून आले. तेथें १९२२पर्यंत ते सभासद होते. पुढें १९२५ सालीं पुनः निवडून आले व १९२८ पर्यंत सभासद राहिले. त्या सालीं मतभेदामुळें त्यांनीं राजीनामा दिला. सॅनिटरी व लीगल कमिटीचे चेअरमन म्हणून त्यांनीं काम केलें.

मावळणकरांनीं १९२८सालीं युरोपचा प्रवास केला. परत येतांच रणपूरच्या पोलिसांच्या अत्याचारांची चौकशी करण्याकरितां नेमलेल्या कमिटीचे ते चेअरमन झाले. कमिटीला मॅजिस्ट्रेटनें बंदी केली. मावळणकरांना अटक होऊन दोन महिने सश्रम कारावासाची शिक्षा झाली. परंतु ती शिक्षा हायकोर्टानें रद्द केली.

१९३० सालीं ते अहमदाबाद म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष झाले; तीन वर्षें त्या जागेवर होते. १९३३सालीं Emergency Powers Act खालीं त्यांना अटक होऊन रत्नागिरीच्या तुरुंगांत १५ महिने ठेवण्यांत आलें. १९३४ सालीं म्युनिसिपालिटीचे व्हाइस प्रेसिडेंट निवडून आले.

त्यांचा अहमदाबाद येथील अनेक संस्थांशीं प्रत्यक्ष संबंध आहे. ते महात्माजींचा हरिजन आश्रम, अहमदाबाद एज्युकेशन सोसायटी, गुजराथ व्हर्न्याक्युलर सोसायटी व गुजराथ लॉ सोसायटी या संस्थांचे ट्रस्टी आहेत.

१९३७ सालीं ते मुंबईच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत निवडून आले व स्पीकर झाले.

ना. मावळणकर हे थंड डोक्याचे व धिमे गृहस्थ आहेत. त्यांचें ध्येय उच्च व स्वार्थत्याग दांडगा आहे. त्यांचें स्वदेशप्रेम उत्कट आहे.

माशी:—निरुपद्रवी वाटणारा पण रोगप्रसारास मदत करणारा जीव. घरमाशी, मधमाशी, गांधीलमाशी, गोमाशी, गूमाशी इत्यादि अनेक जाती हिच्यांत आहेत. या ठिकाणीं घरगुती माशीबद्दलच विवेचन करावयाचें आहे.

हा प्राणी सहा पायांचा, दोन पंखांचा, दोन मोठे डोळे असलेला, लांबूडक्या अंगाचा असतो. हिच्या शरीराचे मुख्य भाग दोन. एक डोकें व दुसरा शरीर. डोक्याचा रंग तांबूस असून शरीराचा भाग भुरकट दिसतो. अंगाला व पायांना पुष्कळसे केस असून तिचें शरीर चिकट असतें. हिला दांत किंवा जबडे नसतात.

माशीचा जन्म घाणींत, तिचें खाणें घाण व राहणी घाण म्हणून तिची कृतिहि घाण. ही घाणींत, कुजणाऱ्या उकिरड्यांत, मैल्यांत व विशेषतः घोड्याच्या लिदींत अंडीं घालते. या घाणींत माशीच्या वाढीला लागणारी ऊब, अन्न व ओलावा हीं सर्व द्रव्यें असतात. दर खेपेला ही कमींत कमी १२० तरी अंडीं घालते. अंड्याची माशी बनेपर्यंत तिला अंडें, आळी, प्युपा व माशी या चार अवस्थांतून जावें लागतें. अंड्याची अळी बनण्यास ८ ते २४ तास लागतात. २ ते ६ दिवसांत आळीचें प्युपांत रूपांतर होतें. नंतर प्युपांतून माशीचें रूप येण्यास एक आठवडा लागतो. याप्रमाणें अंड्यापासून माशीचें शरीर लाभण्यास तिला चौदा दिवस लागतात. अशा प्रकारें एक माशी कांहीं महिन्यांत हजारों, नव्हे लाखो माशांना जन्म देते.

मनुष्याच्या अगर जनावराच्या उघड्या अंगावर ही बसल्यास फार त्रास होतो. यापेक्षांहि तिच्याकडून रोगजंतूंचा प्रसार जास्त होतो, व रोगजंतूंच्या प्रसारानें अति त्रास सोसावा लागतो. घट्ट पदार्थावर ही बसते त्यावेळीं त्याला मऊपणा येण्यासाठीं ती त्यावर ओकते; या ओकींत अनेक रोगजंतू असतात. हे जंतुमिश्र पदार्थ खाल्ल्यास नाना प्रकारचे रोग उद्भवतात. तसेंच घाण पदार्थांवर बसल्यानंतर तिच्या अंगच्या चिकटपणामुळें थोडी कां होईना घाण तिला लागते. माशी चांगल्या पदार्थावर बसल्यास तो बिघडतो. पटकी, विषमज्वर अगर आमांश झालेल्या रोग्याच्या मलावरही

ताव मारते, त्यामुळें तिच्या पोटांत वरील रोगांचे जंतु प्रवेश करतात. हेच जंतू तिच्या बसण्याहिंडण्यानें पसरत असतात; म्हणून तिचा बंदोबस्त करणें हें आपलें पहिलें कर्तव्य होय.

घर व त्याच्या आसपासची जागा स्वच्छ ठेवणें, स्वयंपाकाच्या व जेवणाच्या ठिकाणीं असणाऱ्या खिडक्यांना जाळ्या लावणें, खाण्यापिण्याचे पदार्थ झाकून ठेवणें व माशांचा संहार करणें या उपायांनीं हिच्या उत्पत्तीला, वाढीला व अस्तित्वाला आळा बसतो. हिच्या संहाराला बाजारांत चिकट कागद व पिंजरे मिळतात ते वापरावेत. अंडीं असलेल्या ठिकाणीं राकेल मारावें म्हणजे त्यांपासून नवीन माशा निर्माण होणार नाहींत.

मांसः–इंग्लिशमध्यें meat या शब्दाचा प्रयोग प्रारंभीं सर्व प्रकारच्या घन भोजनविषयक पदार्थांस करण्यांत येई; आतां खाण्यास उपयोगीं असें प्राण्याचें मांस या अर्थी meat हा शब्द योजतात. मांसांत प्रोटिन हें द्रव्य असल्यानें ज्या वर्गास सतत व जबाबदारीचीं कामें करावीं लागतात त्यांस हें पोषक आहे. आज पृथ्वीतलावर जीं प्रमुख म्हणून राष्ट्रें आहेत त्यांतील महत्त्वाचा वर्ग मांसावरच उपजीविका करून आहे.

मांसापासून विषबाधा–मांसापासून विषबाधा होण्याचाहि संभव असतो. कुजकें मांस खाल्लें असतां विषबाधेचीं लक्षणें दिसूं लागतात. पोटांतून सारखें ढवळून येतें; उलटी व हगवण यानें मनुष्य बेजार होतो; अंगांत तापहि येतो. कित्येक वेळां वाताचे झटके येतात व रोगी हातपाय झाडूं लागतो. रोग असाध्य नाहीं. सारक औषधाची तात्काळ योजना करावी.

मासाः–पृष्ठवंशप्राण्यांमध्यें माशाची गणना करतात. या जातीच्या प्राण्यांत सर्वांत कमी बुद्धिमत्तेची ही जात आहे. अनादि कालापासून खाद्य या दृष्टीनें मनुष्याची सेवा माशांनीं फार केलेली आहे व करीत आहेत. सर्व जगभर समुद्रांत, नद्यांत, सरोवरांत व लहानमोठ्या ओढ्यांतहि मासे सांपडतात.

माशाच्या एकूण १३,००० जाती आहेत. यांत मिनो जातीच्या एक इंच दीड इंच लांबीच्या माशाच्या जातीपासून ३५ फूट लांबीच्या नरभक्षक शार्क माशाचे प्रकार आहेत. सर्वसाधारण माशाचा आकार पुढें व मागें चिंचोळा असतो. या आकारामुळें अंगावर पाण्याचें पडणारें वजन सहन करण्यास व पाण्यांतून हालचाल करण्यास मदत होते. बहुधा माशांच्या पृष्ठभागावर खवले असतात. मासे आपल्या कल्ल्यांनीं पाण्यांतील ऑक्सिजन शोषून घेऊन श्वासोच्छ्वास करतात. त्यांना फुप्फुसें असतात. गोड पाण्यांत असणाऱ्या कांहीं जातीचे मासे पाण्यावर येऊन हवा तोंडांतून घेऊन श्वासोच्छ्वास करतात असें कांहीं शास्त्रज्ञ म्हणतात; पण त्या बाबतींत एकमत नाहीं. माशांचें रक्त थंड व तांबडें असतें. माशांच्या शरीरांत एक पोकळ पिशवी असते त्यांत मासा इच्छेप्रमाणें हवा घेतो किंवा ती रिकामी ठेवतो. शास्त्रज्ञांच्या मतें यांतील हवेचा उपयोग माशाला तोल संभाळायला होतो. माशाला पाय वगैरे नसतात. तोंडाच्या मागच्या दोन्ही बाजूस असलेल्या पंखांनीं तो पोहतो व मागें उभ्या व निमुळत्या असलेल्या शेपटीच्या (या शेपटीच्या शेवटींही पंख असतात) साहाय्यानें त्याला पाण्यांत आपली दिशा बदलण्याला सुकाणूसारखी मदत होते. बहुधा माशांना हाडांचाच सांगाडा असतो, पण कांहीं जातींना हाडें नसतात. त्याऐवजीं हाडासारख्याच कठिण पण लवचीक पदार्थांच्या तंतूंची योजना केलेली असते.

उष्ण कटिबंधांत असणाऱ्या माशांना विविध व आकर्षक रंग असतात. ध्रुवाकडे जसजसें जावें तसतसा माशांचा रंग काळसर होत जातो. माशांना तोंडावर दोन्ही बाजूस दोन डोळे असतात, पण कांहीं मासे सदैव खोल पाण्यांतच राहातात, तेथपर्यंत सूर्यप्रकाश पोचत नाहीं, त्यांना डोळे नसतात व दिसत नाहीं. त्याऐवजीं त्यांचीं स्पर्शेंद्रियें तीक्ष्ण असतात व ते त्या अनुरोधानें आपली हालचाल करतात. संरक्षणासाठीं मोठे जबडे व तीक्ष्ण दांत असतात. खोल पाण्यांत राहणाऱ्या ज्या माशांना डोळे असतात त्यांच्या अंगांत असलेल्या फॉस्फरसामुळें त्यांच्याभोंवतीं प्रकाश पडतो व ते आपला मार्ग पाहूं शकतात.

व्हेल नांवाचा मासा सर्वांस ऐकून माहीत आहेच. शास्त्रज्ञांच्या मतें व्हेल हा मासा नसून सस्तन प्राणी आहे. याचें डोकें शरिराच्या एकतृतियांशाएवढें मोठें असतें. बाकी आकार माशाप्रमाणेंच असतो. त्याची लांबी ९० फूट व वजन ७० टनपर्यंत असतें. तोंडांत ५०० दातांची फणी असते. तो आपलें तोंड उघडें टाकून १५ ते २० मैलांच्या वेगानें पोहतो व पोहतांना तोंडांत लहानसान प्राणी व मासे जातील ते गिळून भूक शमवितो. त्याचा घसा मनुष्य सहज

गिळतां येईल एवढा मोठा असतो. (कांहीं व्हेल माशांचा घसा यापेक्षां बराच लहान असतो). वर सांगितलेली दातांची फणी १५ फूट रुंद असूं शकते. व्हेल माशापासून तेल व हाडांचे अनेक पदार्थ बनवितात.

अनेक माशांचें तेल औषधी असतें. कॉड जातीच्या माशाचें तेल कॉडलिव्हर ऑइल अशक्तपणावर प्रख्यात आहे. मासे एका वेळीं लक्षावधि अंडीं घालतात; पण तीं उबविण्याची ते काळजी घेत नाहींत, त्यामुळें इतर प्राण्यांच्या तीं भक्ष्यस्थानीं पडतात. अलीकडे इंग्लंड, अमेरिका, कॅनडा इत्यादि ठिकाणीं माशांचीं अशीं अंडीं जमवून तीं उबवून माशांची उत्पत्ती वाढविण्याची खटपट चालू आहे. कॉड, गोल्डफिश, हेरिंग, आर्चर, मॅकरेल, सॅलमन, शार्क, सनफिश, सोअर्डफिश, टॉरपेडो, व्हाइट फिश हे प्रकार विशेष प्रख्यात आहेत. घरांत कांचेच्या भांड्यांतून ठेवण्यासाठींहि निळ्या, जांभळ्या तांबड्या रंगाचे लहान लहान मासे मिळतात. माशांच्या अंगांत एक विशिष्ट प्रकारचा द्रव पदार्थ वाहात असतो, व त्यामुळें त्यांना पाण्याचा भार सहन करतां येतो.

मासे व त्यांचे पदार्थ—माशांच्या अनेक जाती आहेत. परंतु सर्वच मासे खाण्याच्या उपयोगीं पडत नाहींत. शिवाय एका जातींतील अगर प्रांतांतील लोक जे मासे खातात ते दुसऱ्या जातींतील व प्रांतांतील लोक खातातच असें नाहीं. परंतु सर्वसाधारण लोक जे मासे खातात त्यांचीं नांवें पुढें दिलीं आहेत—

मोठ्या जातीचे मासे—सरंगा, रावस, हलवा (याला काळा सरंगा असेंहि नांव आहे), पाला, भिंग, गोळ, वडा, खरवड, वाम्ब (फक्त खिश्चन लोकच खातात).

लहान मासे—चिवणी, ओवशा, निवट्या, मोड्या, बोंबील, कोलंबी, करंदी, शेवंड, कालवे, खेंकडे वगैरे.

मासे शिजविण्याची कृति—कोणतेहि मासे शिजविण्यापूर्वी कापावे. त्यांच्यावरील खवले काढून टाकावेत. त्यांच्या पोटांतील घाण वगैरे सर्व काढून टाकून मधला भाग स्वच्छ धुवावा. बाजूची पिसुरडी (पंखासारखा भाग), शेंपटी कापावी व नंतर तुकडे करावे. कोणतेहि मासे धुवून कापून स्वच्छ केल्यावर त्यांना मीठ व लिंबाच्या रसाचा अगर चिंचेच्या पाण्याचा हात चोळावा.

माशांचे कांहीं पदार्थ—पुरणाचे सरंगे—कांदे बारीक चिरून, त्यांत जिऱ्याची पूड, मीठ, हळद, तिखट, तेल व ओलें खोबरें घालावें. हे सर्व जिन्नस एकत्र मिसळावे व सरंग्याचे तुकडे त्यांत घालावे; सर्व मसाला तुकड्यांना चोळावा. थोडें पाणी घालून शिजत ठेवावें (झांकणावरही पाणी घालावें) ह्याच प्रकारें रावस, गोळ, कोलंबी यांचा प्रकार करावा. यांत ओले वाटाणे बटाटे अगर टोमेटोचे तुकडेहि घालवेत.

सरंग्याचें भुजणें—एक मोठासा कांदा बारीक चिरून, त्यांत ओल्या मिरच्या, कोथिंबीर, लसणाच्या पाकळ्या (थोड्या ठेंचून), थोडें मीठ, तिखट, हळद आणि तेल घालून (एका सरंग्याला दोन टेबलस्पून भरून) सर्व जिन्नस चुरावे. नंतर मध्यें माशाचे तुकडे व पाणी घालून शिजवावें. उकळी येतांच उतरावें. बोंबील, कोलंबी, ओवशा, गोळ, रावस वगैरे सर्व माशांचें भुजणें याच प्रकारें करावें. लाल मिरचीच्या तिखटाऐवजीं, बरीच कोथिंबीर व ओल्या मिरच्या घालून, वरीलप्रमाणेंच कृति करावी.

सोलाचे सरंगे—कांदे बारीक चिरून त्यांत थोडेसें ओलें खोबरें मीठ, मिरची, सांबार (काळा मसाला) व कोकम घालून कांदा चांगला चुरावा, त्यांत थोडेसें तूप व सरंग्याचे तुकडे घालून मसाला सारखा चोळून थोडें पाणी घालून शिजत ठेवावें.

याचप्रमाणें कोलंबी, रावस, ओवशा, गोळ वगैरे माशांचें करावें.

शेवंडीचीं भजीं-शेवंडीचे लांब पाय कापून व कांटे घांसून स्वच्छ करावे व उकडल्यानंतर कवची काढून तुकडे करावे. त्यांना मीठ, हळद, तिखट, चोळून ठेवून तांदळाचें सुकें पीठ लावून ते तुकडे तेलांत तळावे अगर भज्यांचें पिठांत कालवून भजीं करावीं.

प्रकार दुसरा—वरीलप्रमाणेंच शेवंडी उकडून तुकडे करावें. नंतर थोडें जिरें, मेथ्या, बदाम, खसखस हे जिन्नस तव्यावर भाजून घ्यावेत. बरेचसें ओलें खोबरें, काळा मसाला, लसूण, आलें, काळीं मिरीं हे जिन्नस व वरील मसाला एकत्र वाटावा. नंतर कांदा बारीक चिरून तुपांत लालसर तळून काढावा. वाटलेला मसाला, शेवंडीचे तुकडे, मीठ, हळद व तिखट घालून थोडे परतावे व त्यांत नारळाचा पातळ आंगरस घालून शिजवावें. चिंचेचा रस, नारळाचें

जाड दूध त्यांत ओतावें. चवेला थोडी साखरहि त्यांत घालावी. चांगली उकळी येईपर्यंत शिजूं द्यावें.

कोलंबीचे कटलेट्स–कोलंबी धुवून स्वच्छ करून व कोशे (तोंडाकडला भाग) न घेतां वाटावी. थोडा भाजलेला रवा, व काळ्या मिऱ्याची पूड घातलेला पावाचा चुरा हे दोनही पाण्यांत भिजवून ठेवावे. एक चिरलेला कांदा, आलें, मिरच्या, कोथिंबीर व थोडेसे उकडलेले बटाटे, व मीठ हे सर्व एकत्र वाटून ते वरील मिश्रणांत एकत्र करावे व त्यांत कोलंबीहि घालावी–रव्यांत बुडवून, अगर वर अंड्याचें पांढरें लावून पावाच्या चुऱ्यांत फिरवून तळावी.

गोळीचे, रावसाचे कटलेट्सहि असेच करावे.

माशांचे फिलेटस्–कोणत्याहि माशांचे फिलेट्स करावयाचे झाल्यास माशांचे काटे काढून तुकडे करावे. लिंबाच्या रसांत मीठ, आलें, कांदा, ओल्या मिरच्या, काळीं मिरीं वाटणें. त्यांत तेल मिसळून तें तुकड्यांस चोळून कांहीं वेळ ठेवावें. नंतर त्यांना अंड्याचें मिश्रण व पावाचा चुरा लावून तळावें.

रावसाचें लोणचें–रावसाचे खवले वगैरे कापून, स्वच्छ धुवून व वाफून त्याच्या तुकड्या कराव्या नंतर राईचें दळ, तिखट, आल्याच्या चकत्या, लसणीच्या पाकळ्या व मीठ हे बेतानें घेऊन तें मिश्रण त्या तुकड्यांना लावावें. थोडा वेळ ठेवाव्या व मग चुलीवर तेलांत शिजवाव्या.

सरंग्याचें लोणचें–सरंग्याच्या तुकड्या स्वच्छ धुवून त्याला हळद व मीठ चोळावें व पांच मिनिटें राहूं द्यावा. नंतर त्या तेलांत तळाव्या, व तळल्यावर त्यांना लोणच्याचा मसाला, मीठ, लिंबाचा रस चोळून तेलासकट बरणींत ठेवावें.

बोंबील–बोंबील धुवून त्याचे साधारण मोठे तुकडे चिरावे. पिकलेलीं राजाळीं केळीं घेऊन सोलावीं, व त्यांच्या लहान लहान चकत्या कराव्या. बरेचसे कांदे बारीक चिरून ठेवावे. त्यांत ओलें खोबरें, जिऱ्याची पूड, चिरलेला कांदा, मीठ, तिखट, हळद, व तेल हें सर्व चुरून त्यांत बोंबिलाचे तुकडे व केळ्याच्या चकत्या पसरून घालाव्या. झांकणावर पाणी ठेवून शिजूं द्यावें. केळीं नको असल्यास भिजलेले वाल सोलून घालावेत.

मासारिक, टॉमस गॅरिग (१८५०–):–हा एक साहित्यिक व झेकोस्लॉव्हेकियाच्या प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष. त्याचा जन्म ता. ७ मार्च १८५० रोजीं हॉडॉनिन, मोरेव्हिया येथें झाला. त्याचा बाप मोरेव्हियांत कोचमनचा धंदा करीत असे. त्याची आई स्लॉव्हेकियन व जर्मन या मिश्र विवाहाची संतति. त्याचें प्राथमिक शिक्षण झेज्कोव्हिस (Gzejkovice) येथील एका झेक शाळेंत झालें. नंतर तो हॅस्टोपेच (Hastopech) येथील जर्मन शाळेंत शिकला. कांहीं दिवस व्हिएन्ना येथील एका कुलपें करणाराकडे व कांहीं दिवस एका मोरेव्हियन लोहाराकडे काम करून त्यानें आपला शिक्षणाचा खर्च भागविला. त्याचें पुढील शिक्षण Brno व्हिएन्ना व लिपझिक येथें झालें. तो प्राग (Prague) विद्यापीठांत प्राध्यापक झाला (१८८२). तो १८९१ सालीं ऑस्ट्रियन विधिमंडळाचा (Reichsrath) सभासद निवडून आला; पण दोन वर्षांनीं त्यानें सभासदत्त्वाचा राजीनामा दिला. १९०७ सालीं पुनः निवडून आला. महायुद्ध सुरूं झाल्यानंतर मासारिक ऑस्ट्रियाहून निसटला व त्यानें स्वदेशाकरितां अविश्रांत परिश्रम केले. १९१५ सालीं तो लंडन येथील किंग्ज कॉलेजांत प्राध्यापक झाला. दोस्त राष्ट्रांकडून झेकोस्लोव्हाकियाला मान्यता मिळवून देणाऱ्यांमध्यें हा प्रमुख होय. महायुद्ध संपल्यावर झेस्कोस्लॉव्हेक रिपब्लिक स्थापण्यांत आलें; मासारिकला त्याचा अध्यक्ष करण्यांत आलें. त्याच्या नेमणुकीला ता. २७ मे १९२० च्या नॅशनल पार्लमेंटकडून मान्यता मिळाली. ता २७ मे १९२७ सालीं तो पुनः निवडून आला. त्यानें झेक व जर्मन भाषेंत लिखाण केलें.

मे १९३४ मध्यें पुनः झेकोस्लाव्हाकियाचा अध्यक्ष निवडून आला. परंतु त्याची प्रकृति ढासळत चालली म्हणून त्यानें १९३५ च्या डिसेंबर महिन्यांत राजीनामा दिला. त्याचे ग्रंथ:—

On Hypnotism 1879; Suicide 1881 (अर्वाचीन जगतांतील एका सामाजिक साथीचें निरीक्षण); Blaise Pascal 1883; The Ratio of probability and Hume's Skepticism 1884; The Theory of History according to T. H. Buckle 1884; Slavic Studies 1889; Russia and Europe 1913; The World Revolution 1925; The Way of Democracy (1933–34) President Masaryk tells his Story (आत्मचरित्र.)

मांसाहार:–जगांतील लोकसंख्येकडे पाहिलें तर असें दिसून येईल कीं शाकाहारी लोकांपेक्षां मांसाहारी लोकांची

संख्याच जास्त आहे. मांसामध्यें प्रोटीन, फॉस्फरस इ. शरीरपोषक द्रव्यें पुष्कळ प्रमाणांत असल्यामुळें शाकाहारी लोकांपेक्षां मांसाहारी लोक शरीरानें अधिक पुष्ट दिसतात, यांत वाद नाहीं. मांस खाण्यानें ताकद व मस्तीहि जास्त वाढते. मात्र त्याचबरोबर बुद्धीची तीव्रता कमी होते असा सर्वसाधारण अनुभव आहे. जगांत विद्वान म्हणून गणल्या गेलेल्या लोकांपैकीं बहुतेक लोक प्रायः शाकाहारी असल्याचेंच आढळून येतें. मांसाशनामुळें चरबी व मांस शरीरांत जास्त वाढतें.

हरीण, ससा, गाय व पक्षी यांचें मांस खाण्यास हलकें असतें. याशिवाय बकरीं, डुकरें इत्यादींचें मांस त्या मानानें जड पण स्वस्त; म्हणून या दोन पशूंचेंच मांस मांसाहारी लोकांत जास्त प्रमाणांत खातात. चीनमध्यें म्हशीचें मांस स्वस्त पडतें. कोंबडीं, बहिरी ससाणा, होला, कबूतर हे पक्षी मांसाहारी लोकांच्या विशेष परिचयाचे आहेत. पक्ष्यांच्या मांसामुळें शरीरांत उष्णता फार वाढते. कोंबड्यांचीं अंडीं मांसाहारी व शाकाहारी दोघेहि खातात. कोंबडीच्या अंड्यांतहि प्रोटीन हें द्रव्य विपुल सांपडतें.

याशिवाय मासे व इतर जलचर प्राणी (माशांच्यापेक्षां पुष्कळच कमी प्रमाणांत) यांचें मांसहि मांसाहारी लोकांच्या विशेष आवडीचें असतें. माशामध्येंहि अनेक शरीरपोषक द्रव्यें असतात. इतर पशुपक्ष्यांच्या मांसापेक्षां माशाचें मांस बरेच दिवस टिकतें आणि याच कारणामुळें नॉर्वे, इंग्लंड, बेल्जियम, अमेरिका वगैरे राष्ट्रांतून माशांचा व्यापार फार मोठ्या प्रमाणांत चालतो.

मॉरीस शिव्हेलियर (१८८९–):–प्रख्यात विनोदी सिनेमा नट. याचा जन्म १२ सप्टें. १८८९ रोजीं फ्रान्समध्यें मेनिलमोंटांट या गांवीं झाला. गायक व नृत्यविशारद म्हणून त्यानें फ्रान्समध्यें चांगली कीर्ती कमाविली होती. बोलपटाच्या युगाला सुरवात होतांच हा अमेरिकेंत आला व पॅरामाऊंट कंपनीतर्फे त्याचे 'Innocents of Paris', 'Love Parade' 'One hour with . you', 'Love me tonight' व मेट्रोतर्फे 'Merry Widow' हे चित्रपट तयार झाले. याशिवाय आणखीहि त्याचे चित्रपट प्रसिद्ध आहेत. १९३५ मध्यें तो परत फ्रान्सला आला व पुन्हां रंगभूमीवर काम करूं लागला. कांहीं दिवसांनंतर तो लंडन फिल्मस्‌मध्यें कांहीं चित्रपटांसाठीं गेला होता. ऐटबाज अभिनय व सुरेल संगीत यांबद्दल तो प्रसिद्ध आहे.




मॉरिस शिव्हेलियर

मिंटो, गिलबर्ट जॉन इलिअट (१८४७-१९१४):– सुप्रसिद्ध योद्धा व मुत्सद्दी. शिक्षण ईटन व ट्रिनिटी कॉलेज केंब्रिज येथें झालें. केप कॉलनीमध्यें लॉर्ड राबर्ट्‌स् याचा १८८१ सालीं खासगी चिटणीस झाला. लॉर्ड लँड्‌सडाऊन १८८३–८५पर्यंत गव्हर्नर जनरल असतां त्याचा मिलिटरी सेक्रेटरी होता. १८९८ ते १९०४ कॅनडाचा गव्हर्नर जनरल व १९०५ ते १९१० हिंदुस्थानचा व्हाइसरॉय होता. हा हिंदुस्थानचा व्हाइसरॉय असतेवेळीं लॉर्ड मोर्ले भारतमंत्री होते. १९०९ सालीं पार्लमेंटनें कायदा पास करून हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत हिंदी लोकांचें सहकार्य मिळविण्याकरतां ज्या सुधारणा केल्या त्या मोर्ले–मिंटो सुधारणा म्हणून प्रसिद्ध आहेत.

मिताक्षराः–हिंदूंच्या धर्मशास्त्रविषयक वाङ्मयांत मिताक्षरेचें स्थान महत्त्वाचें आहे. व्याकरणशास्त्रांत पातंजलीच्या महाभाष्याचें व काव्यशास्त्रांत मम्मटाच्या काव्यप्रकाशाचें जें स्थान आहे तेंच धर्मशास्त्रावरील ग्रंथांत मिताक्षरेचें आहे. बंगालखेरीज हिंदुस्थानांतील सर्व भागांत दत्तक, वारसा व संविभाग (Partition) यांसारख्या व्यवहारधर्मशास्त्रविषयक बाबतींत मिताक्षरेचें प्रामाण्य ब्रिटिश हिंदुस्थानांतील न्यायालयाकडून प्रामुख्यानें मानण्यांत आलें आहे.

मिताक्षरा ही याज्ञवल्क्यस्मृतीवर टीका म्हणून झालेली आहे. तथापि तींत याज्ञवल्क्यस्मृतींतील श्लोकांचें केवळ स्पष्टीकरणच नसून, स्मृतींत येणाऱ्या बाबींवरील तो एक प्रबंध आहे. त्यांत अनेक स्मृतिवचनें उद्‌धृत केलीं असून पूर्वमीमांसेंत सांगितलेल्या अर्थ करण्याच्या नियमानुसार त्यांचें स्पष्टीकरण केलें आहे व त्यायोगें भिन्नभिन्न वचनांतील विरोधांचें निरसन करण्यांत आलें आहे. निरनिराळ्या वचनांचें वर्गीकरण करून विषयव्यवस्था करण्यांत आली आहे; वर वर असंबद्ध



मान्सून वाऱ्यामुळें ज्या प्रदेशांना पाऊस मिळतो ते प्रदेश या नकाशांत काळे दाखविलेले आहेत. [पृष्ठ १५७४ पाहा.

दिसणाऱ्या स्मृतिवाक्यांचा समन्वय करण्यांत आला आहे. एकंदरींत मिताक्षरा हा ग्रंथ तत्पूर्वीच्या दोन हजार वर्षांतील धर्मशास्त्रविषयक विचारांचा सारभूत ग्रंथ आहे.

मिताक्षरेंत ज्याप्रमाणें अनेक स्मृतिग्रंथांतील वचनें उद्धृत केलीं आहेत त्याप्रमाणें असाहाय्य, विश्वरूप, मेधातिथी, श्रीकर, भरूसी व भोजदेव या आपल्या पूर्वीच्या सहा टीकाकारांच्या व निबंधकारांच्या ग्रंथांचे उल्लेख आहेत. याशिवाय बृहदारण्यकोपनिषद्, गर्भोपनिषद्, जबालोपनिषद्, निरुक्त, भरत, योगसूत्र, पाणीनि, स्कंदपुराण, विष्णुपुराण, अमर इत्यादि ग्रंथांचे उल्लेख त्यांत आहेत.

ग्रंथकार ग्रंथाच्या उपसंहारांत विज्ञानयोगिन् असा स्वतःविषयीं उल्लेख करतो. त्यानंतरचे ग्रंथकारहि त्याचा त्याच नांवानें उल्लेख करतात. तो भारद्वाजगोत्रीय असून पद्मनाभभट्टाचा मुलगा. तो परमहंस यति होता. त्याच्या गुरूचें नांव उत्तम. हा ग्रंथ लिहिला त्यावेळीं विक्रम अथवा विक्रमादित्य कल्याणास (निजाम राज्यांतील) राज्य करीत होता, असें तोच सांगतो. ग्रंथाच्या शेवटीं दिलेले व्यक्तिविषयक माहिती देणारे श्लोक खरे दिसतात.

मिताक्षरेचा लेखक विज्ञानेश्वर यानें पूर्वमीमांसेचा सखोल अभ्यास केला होता. प्रस्तुत ग्रंथांत अथपासून इतिपर्यंत पूर्वमीमांसेंतील नियम सांगून त्यांचा व्यवहारधर्मशास्त्रांत उपयोग करून दाखविला आहे. हा ग्रंथ मुद्द्याला धरून व संक्षिप्त आहे. परंतु हा ग्रंथ विविध स्मृतिवचनांचा संग्राहक व्हावा व त्यांचें संयोगीकरण व्हावें म्हणून ग्रंथकारानें कित्येक वेळां पाल्हाळहि केला आहे.

मिताक्षरा ग्रंथ सन १०७० ते सन ११००पर्यंतच्या कालांत झाला असला पाहिजे असें विद्वान संशोधकांचें मत आहे.

मिताक्षरा व दायभाग यांतील तात्त्विक फरक 'दायभाग' या मथळ्याखालीं पहा.

मिराबाई (मृत्यु स. १५४६):—एक हिंदी कवयित्री. ही मेढत्याच्या राठोड रत्नसिंहाची मुलगी. हिचा जन्म सन १४९८ च्या सुमारास झाला. उदेपूरच्या भोजराज गुहिलोत याच्याशीं हिचें लग्न झालें (सन १५१६). पण थोडक्या वेळांतच हिचा नवरा वारला. (सन १५१८ सुमार) कर्नल टॉडच्या लेखांत ही महाराणा कुंभाची पत्नी असें आहे, पण तें सर्वस्वीं चूक आहे.

हिला लहानपणापासून भगवद्भक्तीची गोडी लागलेली होती. त्यामुळें ह्या दुःखकारक प्रसंगीं भगवद्भजनाकडे तिचें मन ओढलें जाणें स्वाभाविक आहे. भगवद्भक्तीची देणगी हिच्या पितृकुलाकडून हिला मिळाली होती. महाराणा संग मरण पावल्यावर त्याचा पुत्र रत्नसिंह गादीवर बसला; आणि तोहि स. स. १५३१त मरण पावला व नंतर त्याला पुत्र नसल्यामुळें त्याचा भाऊ विक्रमादित्य गादीवर बसला. या वेळीं हिची भक्ती आणि भावपूर्ण भजनें यांची ख्याति हिंदुस्थानभर पसरली होती. ही गोष्ट विक्रमादित्यास आवडत नसे.

ही निःसंकोचपणें आपलीं पदें गात देवापुढें नाचत असे. राजकुलांतल्या स्त्रियांनीं चारचौघांत असें भजन करीत राहणें विक्रमादित्याला पसंत नव्हतें. म्हणून तो हिला अनेक प्रकारें त्रास देई. त्यानें हिला विष देऊन पाहिलें. हिच्याकडे पेटाऱ्यांत नाग घालून पाठविला,

पण त्याचा कांहीं एक परिणाम न होऊन तें सर्व हिच्या भक्तिप्रभावानें निष्फळ झालें. हिची अशी स्थिति विक्रमदेवाला कळल्यावर, त्यानें हिला मेदत्याला बोलावून नेलें. नंतर ही द्वारकेस येऊन राहिली.

हिनें तयार केलेल्या पदांचा हिंदुस्थानभर प्रचार झालेला आहे. हीं पदें जागोजाग गाइलीं जातात. गीतगोविन्दाच्या धर्तीवर हिनें ' रागगोविन्द ' नांवाचा ग्रंथ लिहिला असून शिवाय जयदेवाच्या गीतगोविन्द काव्यावर टीकाहि लिहिलेली आहे. हिचीं पदें राजपुतानीमिश्रित हिंदीमध्यें व गुजराथीमध्यें आहेत. हिचा मल्हारराग विशेष लोकप्रिय आहे.

ही आपल्या पदांत रैदास गुरु असल्याचा निर्देश करते. द्वारकेस ही असतां राण्यानें हिला परत आणण्यासाठीं कांहीं ब्राह्मण पाठविले होते. वृंदावन येथें जीवगोस्वामींच्या दर्शनास ही गेली असतां, त्यांनीं हिला कळविलें कीं ' मी स्त्रियांना दर्शन देत नाहीं.' तेव्हां हिनें उलट निरोप पाठविला कीं ' गिरधरलालाशिवाय दुसरा कोणी पुरुष आहे असें मला वाटत नाहीं.' हें कळल्यावर त्यांनीं हिची भेट घेतली. हिच्या पदाच्या शेवटीं ' मीराके प्रभु ' असें पालुपद असतें.

मिल्टन, जॉन (१६०८–७४):–इंग्रज कवी व गद्य लेखक. याचा जन्म ब्रेडस्ट्रीट, चीपसाईड लंडन येथें झाला. त्याच्या बापाला प्यूरिटन पंथाविषयीं सहानुभूति होती. पण वाङ्मय व संगीत यांचीहि आवड होती. त्याचा धंदा फरशीवर चित्रें काढण्याचा होता. यामुळें जॉनला सुसंस्कृत गृहस्थितीचा मिळावयाचा तो फायदा मिळाला. त्याचें शिक्षण सेंट पॉलस् स्कूल व केम्ब्रिज विद्यापीठाचें खाइस्ट कॉलेज येथें झालें. शिक्षण संपल्यावर बकिंगहॅमशायरमधील हार्टन या गांवीं आपल्या बापाच्या घरीं तो राहण्यास गेला. तेथील १६३२–३८ या वर्षांच्या वास्तव्यांत त्यानें परिश्रमपूर्वक अभ्यास केला व लिखाण केलें. १६३३ सालीं लेलेग्रो (L'Allegro) –आनंदी मनुष्य–व इल पेनसोरोसो (Ill pensoroso–दुःखी, निराशावादी मनुष्य) हीं दोन उत्कृष्ट वर्णनात्मक लघुकाव्यें (Idylls) लिहिलीं. कोमस (Comus) नामक छद्मवेषनाटक (Masque) १६३४ मध्यें व लिसिडास (Lycidas) ही विलापिका (Elegy) १६३७ मध्यें लिहिली. ही विलापिका त्यानें आपला महाविद्यालयीन मित्र एडवर्ड किंग याच्या मृत्यूनंतर लिहिली. ही विलापिका सुंदर तर आहेच, शिवाय तींत मिल्टननें प्रथमतःच प्युरिटन तत्त्वाविषयींची निष्ठा उघड रीतीनें व्यक्त केल्यामुळें तिचें विशेष महत्व आहे.

मे १६३८ मध्यें तीन वर्षें विदेशीं घालविण्याच्या हेतूनें मिल्टन युरोपच्या प्रवासास निघाला. नेपल्समध्यें असतांना स्वदेशांतील यादवीची बातमी त्याच्या कानीं आली. आपले देशबांधव स्वातंत्र्यासाठीं लढत असतांना आपण मौजेखातर प्रवास करीत राहणें हें अधमपणाचें आहे असें समजून त्यानें ग्रीस देशांतील आपला संकल्पित प्रवास रहित केला व १८३९ च्या ऑगस्टमध्यें इंग्लंडला परत आला. त्या वेळीं यादवी सुरू होण्याच्या बेतांत होती. एक महाकाव्य लिहिण्याचा त्याचा विचार होता, पण हा विचार बाजूला ठेवून त्यानें पुढील वीस वर्षें राजकारण व गद्यलेखन यांत घालविलीं. त्याचें घटस्फोटाचें तत्त्वज्ञान व शिस्त (Doctrine and Discipline of Divorce) हें पुस्तक १६४३–४५ मध्यें प्रसिद्ध झालें. १६४४ मध्यें शिक्षण या विषयावर Tractate on Education हें चोपडें प्रसिद्ध केलें. त्याच वर्षी त्यानें मुद्रणस्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार करणारा लेख प्रसिद्ध केला. पहिल्या चार्ल्सच्या शिरच्छेदानंतर लागलीच त्यानें Tenure of Kings and Magistrates (राजे व मॅजिस्ट्रेट यांची अमदानी) हा ग्रंथ प्रसिद्ध केला. यामुळें त्याची नवीन कारकीर्दीचा जोरदार पुरस्कर्ता म्हणून ख्याति झाली व त्याची नेमणूक परराष्ट्रीय व्यवहार करणाऱ्या कमिटीच्या लॅटिन सेक्रेटरीच्या जागीं झाली. आपल्या पुढील लिखाणानें त्यानें सरकारला मदत केली. Eikonoklaster (1649); Defensio pro Populo Anglicans, (1651); Defensio Secunda, (1654).

वर उल्लेखिलेल्या ग्रंथांपैकीं शेवटचा ग्रंथ लिहिण्यांत तो गुंतला असतांना त्याचे मुळचेच अधू असलेले डोळे जास्त बिघडले व तो सर्वस्वीं अंध झाला. दरम्यान दुर्दैवानें त्याच्यावर कौटुंबिक आपत्तिहि आल्या. १६४३ सालीं ऑक्सफर्डशायरमधील एका राजपक्षीय सद्गृहस्थाच्या मेरी पॉवेल नामक मुलीशीं विवाह केला. या विवाहापासून त्याला सुख लागलें नाहीं. ही त्याची पत्नी १६५३ सालीं वारली. १६५६ सालीं त्यानें कॅथेराइन वुडकॉकशीं विवाह केला; ती पण १६५८ सालीं वारली. पुढें दोन वर्षांनीं राजसत्तेची पुनः स्थापना झाल्यानंतर त्याचे दिवस सांदीकोपऱ्यांत व दारिद्र्यांत गेले. आपल्या एकाकी जीवनांत व दुःखांत विरंगुळा

वाटावा म्हणून त्यानें पुष्कळ वर्षांपूर्वी योजून ठेविलेल्या काव्याच्या लेखनांत आपलें मन घातलें. १६६७ सालीं Paradise Lost (स्वर्गच्युति) हें महाकाव्य प्रसिद्ध झालें. १६७१ सालीं Paradise ragained व Sampson Agonistes हीं काव्यें प्रसिद्ध झालीं. त्याच्या उत्तर आयुष्यांतील प्रमुख गद्यग्रंथ पुढीलप्रमाणें:— A History of Britain (1670) व A treatise of true religion 1673. त्यानें १६७३ सालीं इलिझाबेथ मिनशूल हिच्याशीं विवाह केला. तेव्हां पहिल्या पत्नीपासून झालेल्या त्याच्या तीन मुलींनीं त्याची उपेक्षा केली; पण त्याच्या तिसऱ्या पत्नीनें त्याची प्रेमपूर्वक सेवा केली. मिल्टन Artillery walk, Bunhil Fields, London या आपल्या घरीं ८ नोव्हेंबर १६७४ रोजीं वारला. S. Giles's Cripplegate येथें त्याचें शव पुरण्यांत आलें. त्याच्या मागें त्याची विधवा पत्नी १७२७ पर्यंत होती.

" प्यूरिटनतत्त्वाचा केवळ उच्चत्तमच नव्हे तर पूर्णतम पुतळा " असें मिल्टनचें वर्णन करण्यांत येतें. हें वर्णन त्याच्या स्वभावापुरतें खरें असेल; पण कवी या नात्यानें त्यानें प्यूरिटनपंथाच्या तत्त्वाची मर्यादा ओलांडली हें खोटें नव्हे. प्यूरिटनची सदाचारप्रियता, पंडिताची ज्ञानभक्ति व कलावन्ताची सौंदर्यासक्ति या तीहींचा मधुर संगम त्याचे ठिकाणीं होता. त्याच्यावर विद्येच्या पुनरुज्जीवनाचा (Renaissance) पुष्कळच परिणाम झाला असल्याचें दिसून येतें. प्राचीन ग्रीक व लॅटिन भाषेंतील अभिजात ग्रंथांच्या पठनानें त्याच्या बुद्धीवर सुसंस्कार झाले व ती ज्ञानसंपन्न झाली. त्याला या ग्रंथांपासूनच लेखनाची स्फूर्ति मिळाली. त्याच्या ग्रंथांच्या स्वरूपावरून ते रेनॅसन्सच्या सांप्रदायांतील दिसतात. पॅरडाइज लॉस्ट हें महाकाव्य प्राचीन ग्रीक व लॅटिन काव्यांच्या धर्तीवर लिहिलेलें आहे. लिसिडास ही थिओक्रिटसच्या पद्धतीवर लिहिलेली मेंढपालविषयक (Pastoral) विलापिका आहे.

मिल्टनची विद्वत्ता व कला यांचा रेनॅसन्सशीं (विद्येच्या पुनरुज्जीवनाचा काल) संबंध येत असला तरी त्यानें त्यांचा उपयोग प्युरिटन तत्त्वज्ञानाच्या मंडनाकरितांच केला. आधुनिक युरोपियन वाङ्मयांत तंत्रदृष्ट्या (Technically) उत्कृष्ट कलाकृती म्हणून नांवाजलेल्या पॅरडाइज लॉस्ट या महाकाव्याच्या लेखनाचा हेतु ईश्वर जें जें करितो तें तें न्याय्यच असतें असें मानवाला दाखविणें हाच होता, यांत शंका नाहीं. आंग्ल कवींच्या श्रेणींत त्याला प्राप्त झालेलें मानाचें स्थान वादातीत आहे. त्याची बुद्धि, कल्पना व प्रतिभा यांना तोड नाहीं.


मिल, जॉन स्टुअर्ट (१८०६–७३):—हा ब्रिटिश तत्त्वज्ञ व अर्थशास्त्रज्ञ २० मे १८०६ रोजीं लंडन येथें जन्मला. त्याच्या बापाचें नांव जेम्स मिल. त्याच्या शिक्षणाला सुरवात त्याच्या बापानें केली व त्याची पूर्तता फ्रान्समध्यें झाली. त्याची बुद्धिमत्ता अचाट होती. अगदीं लहान वयांतच त्यानें आपल्या अलौकिक बुद्धीची चमक दाखविली. चौदा वर्षांचा असतांच त्यानें विदग्ध वाङ्मय, तर्कशास्त्र (Logic), अर्थशास्त्र, इतिहास व गणित वगैरे विषयांचें ज्ञान मिळविलें होतें.

एकांगी बौद्धिक शिक्षणामुळें त्याच्या मनांत अतिशय संभ्रम झाला होता, तो वर्डस्वर्थ कवीच्या अभ्यासानें नाहींसा झाला. १८२०–५८ या कालांत तो ईस्ट इंडिया कंपनीच्या ऑफिसमध्यें नोकरीला होता. कंपनी बंद पडल्यावर त्यानें पेन्शन घेतलें. मिसेस जॉन टेलर हिच्याशीं त्याचा परिचय १८३० सालीं झाला. पुढें १८५१ सालीं तिच्याशींच त्याचा विवाह झाला. तिच्या सहवासाचा त्याच्या मनावर बराच परिणाम झाला; त्याच्या बेंथॅमिझमविषयक मतामध्येंहि फरक पडला (Benthamism जेरेमी बेंथॅम याचें मत, अतिशय लोकांचें अतिशय कल्याण व्हावें असें मत.)

लहान वयांतच ग्रंथलेखन व नियतकालिकांत लेख लिहिणें या कार्याला त्यानें सुरवात केली. सिस्टीम ऑफ लॉजिक (System of logic) हा त्याचा ग्रंथ १८४३ सालीं प्रसिद्ध झाला.

मीठः—मानवी जीवनाला लागणारा एक अत्यावश्यक क्षार. मीठ खाऱ्या पाण्याचे झरे, समुद्राचें पाणी, खाऱ्या (मिठाच्या) पाण्याचीं सरोवरें यांपासून मिळतें. मिठाच्या खाणीहि अनेक ठिकाणीं आहेत. या खाणींतून मीठ खणून काढतात. खाणींतील मीठ शुद्ध असेल तर तें तसेंच विक्रीस पाठवितात, नसल्यास शुद्ध करून पाठवितात. खाणींतील मिठाचा रंग किंचित् तांबूस असतो. ध्रुवप्रदेशाशेजारीं पाणी गोठून त्याचें बर्फ बनतें व मिठाचे कण वेगळे होतात. उष्णकटिबंधांतील समुद्रकिनाऱ्यावर वाफे काढून त्यांत समुद्राचें पाणी घेतात व सूर्याच्या उष्णतेनें तें पाणी तापून उडून जातें

मायक्रॉस्कोप



प-प्रकाशकिरण, **अ**-आरसा, **न**–नेत्रिका, (eye-piece) **स**–मोठी झालेली (दिसणारी) आकृति, **स** २–नेत्रिकेमुळें मोठी दिसणारी आकृति, **क**–पदार्थाभिमुख कांच (object glass), **त**-जी वस्तू मायक्रॉस्कोपमधून पाहावयाची ती वस्तू ठेवावयाची चकती. [पृष्ठ १५७६

व मिठाचे क्षार वाफ्यांत राहतात. झऱ्यांतील पाण्याचेंहि सूर्याच्या उष्णतेनें मीठ तयार करतात. झऱ्याच्या पाण्यांत मिठाशिवाय सोडियम सल्फेट, कॅल्शियम इ. दुसरेहि क्षार असतात. हिंदुस्थानांत समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करतात; तसेंच पंजाबमध्यें मिठाच्या खाणीहि आहेत.

मीमांसाः–

मीमांसायां त्विहाज्ञाते दुर्ज्ञाते वाऽविवेकतः ।
न्यायमार्गे महान् दोष इति यत्नोपचर्यता ॥१॥
—कुमारिल भट्ट.

अर्थ–या मीमांसेचें जर ज्ञान नसेल, अथवा गैरसमजानें भलताच अर्थ कळला असेल तर न्यायपद्धतींत मोठा प्रमाद घडतो; म्हणून मोठ्या परिश्रमाची आवश्यकता आहे.

पूर्वमीमांसेचें ऐतिहासिक कार्य–वैदिक धर्म आणि वैदिक तत्त्वज्ञान, वेदांच्या संहिता आणि ब्राह्मणग्रन्थ यांच्यांत आलें आहे. वेदराशी फार मोठा आहे; विविध स्वरूपाचा आहे. गद्यात्मक व पद्यात्मक आहे. देवतांचीं स्तोत्रें, यज्ञविधींचें स्वरूप, निरनिराळ्या देवासुरादिकांच्या कथा, ब्रह्मवेत्त्यांचे संवाद, सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयाचीं वर्णनें, आत्म्याच्या व ईश्वराच्या स्वरूपाचें विवरण, पिंडब्रह्माण्डाचा उहापोह, उपासना व विविध फलांचीं वर्णनें इत्यादि गोष्टींनीं वेदवाङ्मय व्यापलेलें आहे. चार वेद व त्यांच्या अनेक शाखा यांमध्यें कर्म, उपासना व तत्त्वज्ञान या तीन विषयांचें विवरण केलेलें असतें. प्रत्येक वेदाच्या प्रत्येक शाखेंत कमीजास्त प्रमाणांत, थोड्याबहुत फरकानें याच विषयांचें प्रतिपादन केलेलें असतें. त्यांत पुनरुक्ति असते, विरोध असतो, अतिशयोक्ति असते. अशा अनेक तऱ्हेनें गुंतागुंतीच्या बनलेल्या विशाल वैदिक वाङ्मयाचें मनन करण्याकरितां त्याचा अर्थनिर्णय करण्याकरितां, त्यांतील विचारांची संगति लावण्याकरितां मीमांसाशास्त्र उत्पन्न झालें आहे.

मीमांसेचा विषय-वैदिक वाङ्मयाच्या विषयाचे सहजगत्या दोन भाग पडतात. एक धर्म व दुसरा तत्त्वज्ञान. जुन्या भाषेंत यालाच कर्मकांड व ज्ञानकांड असें म्हणतात. जैमिनीची पूर्वमीमांसा कर्मकांडात्मक वेदराशीचा विचार करते व बादरायणाची उत्तरमीमांसा ब्रह्मविचार करणाऱ्या वेदभागाची मीमांसा करते. या दोनही मीमांसांनीं मिळून सगळा वेदराशी उलगडला आहे. कर्मकांडात्मक वेदराशी वेदांतापेक्षां कितीतरी पटीनें मोठा आहे; म्हणून पूर्वमीमांसेचें क्षेत्र अतिशय विस्तृत आहे. उपनिषदें हें वेदाचें शेवटचें प्रकरण आहे. यासच वेदांत म्हणतात. उत्तरमीमांसा याच भागाचा विचार करते.

पूर्वमीमांसेचें प्रतिपाद्य-वाक्यमीमांसा-पूर्वमीमांसा नुसत्या कर्मकांडाच्या प्रकरणाचा विचार करून स्वस्थ बसत नाहीं, तर अर्थनिर्णय करण्याची पद्धती व्युत्पादिते. अर्थनिर्णय करण्याची पद्धती म्हणजे शब्द, वाक्य, प्रकरण व सगळा ग्रंथ यांचें तात्पर्य निश्चित कसें करावें यासंबंधींच्या नियमांचें शास्त्र होय. उत्तरमीमांसेंत हें शास्त्र गौण रीत्या येतें. त्यांत या विषयाला प्राधान्य नाहीं. पूर्वमीमांसेनें जी अर्थनिर्णयपद्धति मीमांसिली आहे तिचा उपयोग उत्तरमीमांसेनें भरपूर केला आहे.

पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा–वेदाच्या पूर्वभागाचें म्हणजे कर्मकांडाचें समीक्षण जैमिनीच्या मीमांसासूत्रांत केलें असल्यामुळें त्यास पूर्वमीमांसा

असें म्हणतात; आणि बादरायणाच्या ब्रह्मसूत्रांत वेदाच्या उत्तरभागाचें विवेचन असल्यामुळें त्यास उत्तरमीमांसा असें म्हणतात; या दोनही मीमांसा प्राचीन वैदिक आर्यांच्या सूक्ष्म तर्कशक्तीचे, भाषेच्या प्रगल्भ विवेचन-प्राविण्याचे आणि गहन तत्त्वज्ञानाच्या पांडित्याचे आदर्श होत.

पूर्वमीमांसेंतील वाक्यशास्त्राचें मूल्य—जैमिनीची पूर्वमीमांसा आज आपणांस उपलब्ध आहे. जैमिनीच्या पूर्वी अनेक पूर्वमीमांसा निरनिराळ्या आचार्यांनीं लिहिलेल्या होत्या. या पूर्वाचार्यांचे उल्लेख व त्यांच्या मतांचा परामर्ष जैमिनीच्या पूर्वमीमांसेंत वारंवार आढळतो. मीमांसाशास्त्र अनेक शतकांतील महान् पंडितांच्या दीर्घ परिश्रमाचें फळ आहे. विचारांची प्रगल्भता पूर्वमीमांसेंत पराकोटीला पोंचली आहे. पूर्व-मीमांसेंतील वाक्यार्थमीमांसेचे शेंकडों नियम आजच्या शास्त्रीय युगांतसुद्धां जगाच्या विचारसंपत्तींत भर घालतील इतके चोख आहेत. केवळ विधिनिषेधात्मक धर्मशास्त्रालाच या मीमांसेचा उपयोग नाहीं, तर त्यांतील कित्येक तत्त्वें इतकीं व्यापक व वैविध्यपूर्ण आहेत कीं, त्यांचा कोणत्याही प्रमाणभूत ग्रंथाच्या अर्थमीमांसेला उपयोग होईल.

कर्मयोग्यांनीं निर्मिलेलें शास्त्र—वैदिक धर्म हा प्रवृत्तिप्रधान आर्यांचा धर्म आहे. मूळची आर्यसंस्कृति संन्यासप्रधान नाहीं. वैदिकधर्म हा गृहस्थधर्म आहे. शंभर वर्षे जगून ऐहिक व पारलौकिक कर्मे करीत पराक्रमी जीवन भोगणें हें वैदिक ध्येय आहे. 'कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः' (वाज. सं., अ. ४०-२) असा वैदिक आदेश आहे. वेदोक्त कर्मे देवतासंबंधीं परमार्थ-प्रवण आहेत हें जरी खरें असलें तरी त्या पारमार्थिक कर्मांच्या परिघामध्यें ऐहिक जीवन व ऐहिक प्रयत्न यांना मध्यवर्ति स्थान आहे. संतति, आरोग्य, दीर्घायुष्य, धन, भूमि, पशु, मित्र, मेधा, प्रज्ञा, श्रद्धा, बल, शौर्य, कांति हीं ऐहिक साध्यें मिळविण्याकरतां खटाटोप करणाऱ्या आर्यांचा यज्ञ हा धर्म होता. विद्या व कला, वैभव व शौर्य यांचें सम्यक् प्रदर्शन यज्ञसंस्थेंत वैदिक आर्य करीत. ऐहिक जीवनाची समृद्धि करणें हा वैदिक आर्यांच्या दृष्टीनें मोठा सद्गुण होता. कामना ही दुःखरूप व बंधनरूप आहे ही कल्पना वैदिकांना मान्य नव्हती. सकाम कर्मयोग हें त्यांच्या ऐहिक व पारमार्थिक जीवनाचें एकमेव स्वरूप होतें. "काम्यो हि वेदाधिगमः कर्मयोगश्च वैदिकः" (म. स्मृ.) यज्ञधर्म त्यांच्या लौकिक कर्मयोगाचें प्रतिबिंब होतें व यज्ञधर्माचें प्रतिबिंब त्यांच्या ऐहिक व्यवहारांत पडत होतें. या वैदिक प्रवृत्तिमार्गाचें समर्थन करणाऱ्या व वैदिक मार्गाचें अनुशासन करणाऱ्या आर्यांच्या परंपरेनें पूर्वमीमांसा शास्त्र निर्मिलें.

हें शास्त्र वैदिक धर्माच्या रक्षणाचें शस्त्र होय. या वैदिक धर्माच्या परंपरेवर हल्ला करणारे शत्रु प्राचीन काळीं वैदिक समाजांत व वेदबाह्य समाजांत उत्पन्न झाले. संन्यास, कर्मनिवृत्ति, गृहत्याग, वैराग्य, भिक्षुवृत्ति, अपरिग्रह, संतोष इत्यादि निवृत्तिधर्माचा बोलबाला करणारे यज्ञनिंदक प्रवृत्तिविरोधि संप्रदाय भारतवर्षांत इसवी सनापूर्वी हजार वर्षांच्या सुमाराला जोरावले. बुद्ध व जिन हे ह्या भिक्षुधर्माचे सगळ्यांत मोठे विजयी प्रचारक इसवी सनापूर्वी सहाव्या शतकाच्या शेवटीं जन्मले. श्रमण, भिक्षु, संन्यासी, बैरागी, यायावर (भटके बैरागी), वानप्रस्थी या सगळ्यांचें प्रस्थ भारतवर्षांत बुद्धकालीं भयंकर माजलें. त्यांनीं देशभर हिंडून वादविवाद करून, प्रवचनें देऊन, प्रवृत्तिमार्गाचा व यज्ञधर्माचा उत्साद मांडला. हे सगळे निवृत्तिमार्गी संप्रदाय म्हणजे समाजसंस्थेचे रोगच होत. वैराग्यवाद हा समाजाच्या हाडीमांसीं खिळणारा क्षयच होय. या समाजशत्रूंशीं झगडण्याचें मोठें ऐतिहासिक कार्य पूर्वमीमांसक आचार्यांनीं केलें. हें वैचारिक युद्ध भारतीय समाजांत सहस्रावधि वर्षें चाललें होतें. या वैचारिक युद्धांत गृहस्थाश्रमी आचार्यांनीं सेनापत्य स्वीकारलें होतें. त्यांनीं संन्यासधर्म हा वृद्ध, दीर्घरोगी, अंध, व्यंग व नपूंसक यांचा धर्म ठरविला आणि समाजांत उपयुक्त व्यवसाय करणारे कार्यक्षम गृहस्थ यज्ञधर्मास पात्र ठरविले.

या यज्ञधर्माचीं व प्रवृत्तिमार्गाचीं विवरणें करणारे वेद अप्रमाण होत असा निवृत्तिमार्गीयांनीं कोलाहल चालविला होता. "तदप्रामाण्यमनृतव्याघात पुनरुक्तदोषेभ्यः" (न्या. सु.) वेदांत थापा, परस्पर विसंगति व पुनरुक्ति असल्यामुळें ते अप्रमाण होत असा अवैदिकांनीं आक्षेप घेण्यास सुरवात केली होती. वीतरागद्वेष अशा भिक्षूंची वा मुनींचींच वचनें प्रमाण होत असें ते म्हणूं लागले. वैराग्यानें शुद्धचित्त झालेले पुरुष खरे धर्मप्रवक्ते होऊं शकतात म्हणून हे बैरागी लोकच खरे धार्मिक होत असा भिक्षूंनीं प्रचार चालविला. यज्ञांत पशुहिंसा असल्यामुळें यज्ञधर्म हे निंद्य होत असा त्यांचा

आक्षेप असे. अशा व दुसऱ्या अनेक प्रकारच्या आक्षेपांचें निरसन करून वेदांचें प्रामाण्य स्थापना करण्याकरतां व वेदांच्या अर्थाचें व्यवस्थित उपपादन करण्याकरतां मीमांसाशास्त्र वैदिक आचार्यांनीं तयार केलें.

आद्य शंकराचार्यांनीं बौद्धतत्त्वज्ञानाचें खंडन करून बौद्धतत्त्वज्ञानाचा पाडाव केला अशी लोकरूढ समजूत आहे. शंकराचार्यांच्या भाष्यग्रंथांत या समजुतीला पोषक असा विशेषसा आधार सांपडत नाहीं. शंकराचार्य इसवी सनाच्या आठव्या शतकांत होऊन गेले, ही गोष्ट आतां निश्चित झाली आहे. बौद्धधर्म आठव्या शतकाच्या पूर्वीच खूप डबघाईस आला होता. त्या धर्मावर शंकराचार्यांच्यापेक्षां पूर्वमीमांसकांनीं जबरदस्त हल्ला चढविला होता. शंकराचार्यांचे परमगुरु गौडपादाचार्य यांनीं माण्डूक्य--कारिका लिहिल्या आहेत, त्या कारिकांत बुद्धाची प्रशंसा त्यांनीं केली आहे. शंकराचार्यांच्या भाष्यांत बौद्धमताचें दोनदां तीनदां खंडन आलें आहे; पण तसें सांख्य, वैशेषिक इत्यादिक मतांचेंहि खंडन आलें आहे. शंकराचार्यांचा मुख्य हल्ला पूर्वमीमांसकांच्यावरच होता. त्यांच्या भाष्यांत सगळीकडे पूर्वमीमांसकांची विचारसरणी खोडलेली दिसते. गीताभाष्यांत, उपनिषद्भाष्यांत व ब्रह्मसूत्रभाष्यांत पूर्वमीमांसाविरोधी लेखन फार आढळतें. पूर्वमीमांसकांचा यावज्जीव आचरण्याचा कर्ममार्ग, गृहस्थधर्मप्राधान्य, संन्यासाची गौणता इत्यादि विचारांचा पदोपदीं समाचार घेऊन ज्ञान, निवृत्ति व संन्यास यांचें महत्त्व आचार्यांनीं स्थापिलें आहे. जगन्मिथ्यात्व, तृष्णाचक्र (प्रतीत्यसमुत्पाद) निवृत्तिवाद आणि संन्यास या बाबतींत बौद्ध आणि शंकराचार्य यांचें ऐकमत्य आहे; म्हणून शंकराचार्यांची मुख्य कामगिरी बौद्धधर्माचा पराभव करणें ही नव्हे, किंबहुना रामानुजीय, माध्व इत्यादि संप्रदाय शंकराचार्यांस प्रच्छन्न बौद्ध असेंच संबोधितात. शंकराचार्यांचा मुख्य विरोध पूर्वमीमांसकांशींच होता. शांकरदिग्विजयांतील मंडनमिश्र व शंकराचार्य यांच्या वादाची कथा सुप्रसिद्धच आहे. मंडनमिश्र हे पूर्वमीमांसक पंडित होते. या दोघांच्या वादाचा मुख्य विषय " मंडनं वा मुंडनं वा " " गृहस्थाश्रम कीं संन्यास " हाच होता. शंकराचार्यांनीं कर्ममार्गी मीमांसकाच्या विचारांचा पराभव केला हीच शंकराचार्यांच्या आयुष्यांतील प्रख्यात कामगिरी होय. अविद्या, काम आणि कर्म यांच्यांत परस्पर कार्यकारणभाव शंकराचार्यांनीं मानिलेला आहे. अविद्येमुळें कामना व कामनेमुळें कर्म असा हा कार्यकारणभाव होय. ब्रह्मज्ञानानें अविद्यानाश होतो त्यामुळें कामना नष्ट होते; व कामनानाशामुळें आपोआप कर्मापासून निवृत्ति होते, असें शंकराचार्यांचें मुख्य तत्त्व आहे. कर्ममार्गी मीमांसक कर्म आणि ज्ञान यांची परस्परसहाय्यक अशी जोडी मानतात, तर शंकराचार्य कर्म आणि ज्ञान तमःप्रकाशवत् विरुद्ध मानतात.

पूर्वमीमांसकांनीं बौद्धमत खंडित करून बौद्धधर्माला खिळखिळें करून टाकिलें. श्रुतिस्मृतींचें प्रामाण्य तर्कशास्त्रतः समर्थित करून कर्ममार्गाचा उद्धार केला. बौद्ध व जैन हे सर्वज्ञ अशा पुरुषांचा म्हणजे बुद्ध व महावीर यांचे आदेश (देशना) प्रमाण मानून वैदिक मार्गाची हेटाळणी करीत. पूर्वमीमांसकांनीं कोणताहि मनुष्य सर्वज्ञ, पूर्ण निर्दोष, निःपक्षपाती असूंच शकत नाहीं असें सिद्ध केलें, व श्रुती ह्या मनुष्यप्रणीत नाहींत म्हणजे अपौरुषेय आहेत असें सप्रमाण प्रतिपादिलें. कुमारिलभट्टांनीं श्लोकवार्तिकांत विस्तरशः बौद्धमताचें समीक्षण करून त्याचें खंडन केलें आहे. कुमारिलभट्ट इसवी सनांतील ७ व्या शतकाच्या प्रारंभीं होऊन गेले. त्यांनीं हिंदुस्थानभर दिग्विजय करून बौद्ध व जैन मतांचा पराभव केला. बौद्ध व जैन मतांचा पराभव हीच पूर्वमीमांसकांची मुख्य ऐतिहासिक कामगिरी होय.

अर्थनिर्णयाचे नियम म्हणजेच पूर्वमीमांसा— कुमारिल भट्टानीं मीमांसेचें मोठें मार्मिक रीतीनें वर्णन केलें आहे. " धर्मे प्रमीयमाणे तु वेदेन करणात्मना। इति कर्तव्यताभागं मीमांसा पूरयिष्यति ॥ " " धर्माचें यथार्थ ज्ञान करून घेण्याकरितां वेद या साधनाचा उपयोग करावा लागतो. वेद या साधनाचा उपयोग कसा करावा हें मीमांसा शिकविते " वेद हे धर्मज्ञानाचें साधन आहेत ही गोष्ट खरी; पण वेदाचा एक निश्चित अर्थ कसा करावा ही गोष्ट मीमांसा शिकविते म्हणजे मीमांसा ही वेदांच्या अर्थनिर्णयाचे नियम सांगते. मीमांसेनें वेदार्थनिश्चयाचे जे नियम सांगितले आहेत ते केवळ वेदरूपी ग्रंथाच्याच उपयोगीं पडत नाहींत तर इतर ग्रंथांच्याही विचारांना त्यांचा उपयोग होतो. " केचिदाहुरसावर्थः केचिन्नासावयन्त्विति। तन्निर्णयार्थमय्येतत्परं शास्त्रं प्रणीयते ॥ " " जेव्हां कोणी असें म्हणतात कीं अमुक एक वाक्याचा असाच अर्थ आहे व दुसरे म्हणतात कीं तसा नव्हे असाच आहे,

अशा मतभेदप्रसंगीं निर्णय करण्याकरितां हें शास्त्र प्रवृत्त झालें आहे." म्हणजे अशा पेंचप्रसंगीं पेंच कसा सोडवावा याची रीत मीमांसाशास्त्र सांगतें.

सामान्य व विशेष नियम—मीमांसेंत सांगितलेले अर्थनिर्णयार्थ उपयोगी पडणारे नियम दोन तऱ्हेचे आहेत. एक कोणत्याही विधानास, निरूपणास, प्रतिपादनास, लेखास किंवा ग्रंथास लागू पडणारे असे सर्वसामान्य नियम आहेत व दुसरे केवळ धार्मिक ग्रंथांसच लागू पडणारे आहेत. धर्मशास्त्रविषयक कोणत्याही ग्रंथाचा अर्थ उलगडण्यास उपयोगी पडणारे नियम सूक्ष्म रीतीनें व विस्तारानें पूर्वमीमांसेंत प्रतिपादिले आहेत. धर्मशास्त्रांतील वाक्यांचें उपपादन (Interpretation) करावयास उपयोगी पडणारे मीमांसेंतील नियम आधुनिक कायद्यांच्या ग्रंथांनासुद्धां उपयोगी पडतील इतके सुरेख आहेत. स्मृतीमधील व्यवहारधर्मास म्हणजे कायद्यास मीमांसेचे नियम मेधातिथी, विज्ञानेश्वर, देवण्णभट्ट, माधवाचार्य, जीमूतवाहन, मित्रमिश्र, बालंभट्ट इत्यादि प्राचीन पंडितांनीं फार सुंदर रीतीनें लावून दाखविले आहेत. मनुभाष्य, मिताक्षरा, स्मृतिचंद्रिका, पराशरमाधव, दायविभाग, वीरमित्रोदय आणि बालंभट्टी या ग्रंथांत पूर्वमीमांसेच्या नियमांचा अनेक अडचणींच्या प्रसंगीं त्यांतून निभावून जाण्याकरितां कसा उपयोग होतो हें वरील पंडितांनीं दाखविलें आहे.

मीमांसेंतील सर्वसामान्य रितीनें कोणत्याही वाक्यसमुदायास लागू पडणारे नियम किंवा विशेषेंकरून धर्मशास्त्रास लागू पडणारे नियम अगदीं अलौकिक असे नाहींत, ते कोणत्याही विचक्षण मनुष्यास थोड्याबहुत प्रमाणांत माहीत असतातच, जसे व्याकरणाचे नियम अथवा तर्कशास्त्राचे नियम भाषा बोलणाऱ्यास किंवा विचार करणाऱ्यास सामान्यपणें माहीत असतात तसेंच मीमांसेच्याही नियमांचें आहे. खूप परिश्रम करून अनेक पंडितांनीं हळुहळू अनेक पिढ्यांपर्यंत जमविलेले वाक्यशास्त्राचे नियम पूर्वमीमांसेंत साठविलेले आहेत.

सामान्य नियमांचें दिग्दर्शन-वर प्रतिपादन केल्याप्रमाणें मीमांसेंतील सामान्य नियम कोणते व विशेष नियम कोणते याचें अगदीं थोडक्यांत येथें दिग्दर्शन केलें आहे. त्यावरून मीमांसेच्या स्वरूपाची थोडी कल्पना वाचकांस येईल. कोणत्याही शब्दाचे वाच्य किंवा लक्ष्य असे दोन अर्थ होऊं शकतात. उदाहरणार्थ गंगा या शब्दाचा पाण्याचा विशिष्ट प्रवाह हा वाच्यार्थ व तीर हा लक्ष्यार्थ होय. मीमांसा यासंबंधीं असा एक नियम सांगून ठेवते कीं कोणताही शब्द वाच्यार्थानें वापरला आहे असें गृहीत धरून चालावें. विसंगती दिसूं लागल्यास परंपरेनें होणारा अर्थ म्हणजे लक्ष्यार्थ स्वीकारावा. हा नियम कोणाही विचक्षण मनुष्यास मान्य होण्यासारखा आहे. याचा कसोशीनें उपयोग करण्याची पाळी कायदेशीर व्यवहारामध्यें जास्त येते. जेथें सुखदुःखाचा, फायदातोट्याचा, हिताहिताचा संबंध येतो, त्या त्या व्यवहारांत भाषेची अथवा शब्दाची तपासणी कसोशीनें करावी लागते, म्हणून हे सामान्य नियम अवगत करून घेणें जास्त इष्ट आहे. मीमांसेनें स्तुतिपर किंवा निंदात्मक वर्णनासंबंधीं एक मार्मिक नियम सांगून ठेवला आहे, त्याचा व्यवहारांत योग्य ठिकाणीं उपयोग होऊं शकतो. 'नहिं निंदा निंदितु प्रवर्तते किंतु विधेय स्तोतुम्' (शा. भा. अ १ पा. २) 'मुख्य प्रतिपाद्य विषयाची महती अथवा मूल्य समजून देण्याकरितांच इतर वस्तूंची निंदा केलेली असते, त्यामुळें इतर निंदिलेल्या वस्तु खरोखरच निंद्य आहेत असें प्रतिपादकाचें तात्पर्य नसतें' असा वरील नियमाचा अर्थ आहे. हा नियम कुशलतेनें वापरावयाला पाहिजे. कोणत्याही प्रतिपादनाचें तात्पर्य निश्चित करण्याचीं प्रमाणें मीमांसेंत सांगितलीं आहेत. "उपक्रमोपसंहारावभ्यासापूर्वता फलं। अर्थवादोपपत्ती च लिंगं तात्पर्यनिर्णये ॥" "प्रारंभ, समाप्ती, वारंवार केलेला निर्देश, वैशिष्ट्य, प्रयोजन, अर्थवाद आणि चिकित्सा हीं तात्पर्यनिर्णयाचीं ज्ञापकें होत" या प्रमाणांचा उपयोग करावयास विवेचक शक्ती चांगली प्रगल्भ व्हावी लागते.

जगांतील वस्तूंत कांहीं एक क्रम असतो. प्रतिपादनांतही क्रम असतो. क्रियेंतही क्रम असतो. क्रिया, वस्तू अथवा प्रतिपादन यांतील क्रमासंबंधीं अनेक सूक्ष्म नियम मीमांसेंत सांगितले आहेत. उदाहरणार्थ, ज्या अनेक गोष्टींचें वर्णन केलेलें असतें त्या गोष्टींचा जगांत ज्या तऱ्हेनें क्रम (कार्यकारणभाव) असतो त्यापेक्षां प्रतिपादनाचा क्रम बदललेला असण्याचा संभव असतो. प्रतिपाद्य वस्तूंच्या क्रमाला अर्थक्रम म्हटलें असून प्रतिपादनाच्या क्रमाला पाठक्रम असें म्हटलें आहे. वस्तुस्थितींत जो क्रम असतो त्याप्रमाणें म्हणजे अर्थक्रमाप्रमाणें प्रतिपादनाचा क्रम म्हणजे पाठक्रम नसला तरी तसा लावून घ्यावा असा नियम आहे.

असे सामान्य प्रतिपादनास लागू पडणारे शेंकडो नियम मीमांसेंत सांगितले आहेत.

विशेष नियमांचें दिग्दर्शन—धर्मशास्त्रास लागू पडणारा पहिला व मुख्य नियम असा आहे कीं, सगळे धर्मग्रंथ प्रवृत्तिरूप किंवा निवृत्तिरूप क्रिया सांगण्याकरितांच प्रवृत्त झालेले आहेत. 'आम्नायस्य क्रियार्थत्वम्।' (अ. १ पा. २ अ. १) वेद केवळ क्रियाच सांगतो. विधि अथवा निषेध हें धर्मशास्त्राचें मुख्य प्रतिपाद्य होय. देवता, राक्षस, पिशाच, ग्रह, स्वर्ग, नरक, इतिहास, कथा इत्यादि धर्मशास्त्रांतील गोष्टी गौण होत. हा पूर्वमीमांसेचा सिद्धान्त धर्मतत्त्वज्ञानांत अतिशय बलवत्तर आहे. हा सिद्धान्त कायद्यासही लागू पडेल. एवढें खरें कीं, कायद्यांत निवृत्तीला म्हणजे निषेधाला फार महत्व आहे. पूर्वमीमांसक आचार्यांनीं धर्मविद्येचें ठरविलेलें हें रहस्य खरोखर अत्यन्त विस्मयजनक व आदरणीय आहे. सगळ्या धर्मशास्त्राचा क्रिया हा आत्मा आहे हें ठरविल्यामुळें शंकराचार्यांसारख्या संन्यासवादी दिग्गजपंडिताला हा सिद्धान्त खोडण्याकरितां आपलें निम्में लिखाण खर्च करावें लागलें आहे. कोणतेहि इतर धर्मज्ञ हा पूर्वमीमांसकांचा सिद्धान्त मान्य करण्यास नाखूष होतील हें खरें आहे. ते म्हणतात कीं निश्रेयस् अथवा मोक्ष हेंच साधनासह प्रतिपादणें किंवा ईश्वराचें प्रतिपादन करणें हा धर्मग्रंथाचा मुख्य उद्देश आहे. पूर्वमीमांसक आचार्य ईश्वर, स्वर्ग व मोक्ष यांना गौण ठरवून विधि व निषेध, सत्कर्म अथवा असत्कर्म हाच धर्मशास्त्रप्रतिपाद्य विषय होय असें मानतात. पूर्वमीमांसकांची परंपरा वेदांपर्यन्त जाऊन भिडते. वैदिक विचारसरणींत समाजसंस्थेला मुख्यत्व आहे. समाजसंस्थेचा क्रिया अथवा विधिनिषेध हा मुख्य आधार आहे. पूर्वमीमांसकांची या बाबतींत कोणीही बरोबरी करूं शकणार नाहीं. क्रिया हें मध्यवर्ती सूत्र ठरविल्यानंतर त्यासंबंधीं शेकडों उपनियम अथवा न्याय मीमांसेंत सांगितले आहेत. वेदांचें पृथक्करण केलें आहे. विरुद्ध वचनांची संगती कशी लावावी यासंबंधीं पुष्कळ विवरण केलें आहे. न्यून, अधिक, पुनरावृत्त इत्यादि प्रकारच्या प्रतिपादनांची व्यवस्था सांगितली आहे. तुटलेले दुवे कसे जुळवावे, विखुरलेले विचार एकत्रित कसे बांधावे याचीही उपपत्ती सांगितली आहे. या सगळ्या विषयांची मराठींत छाननी करणें कठीण आहे; पण आवश्यक आहे. त्यामुळें मराठी भाषेंत वाक्यशास्त्र उत्पन्न होईल व धर्ममीमांसेची प्रथा पडेल.

मीमांसेचे ग्रंथ—पूर्वमीमांसेचे बारा अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायांत चार पाद असतात. तिसऱ्या व सहाव्या अध्यायांत मात्र आठ पाद आहेत. प्रत्येक पादांत कांहीं अधिकरणें असतात. अधिकरण म्हणजे कोणत्याहि एका मुद्द्याची साधकबाधक अशी संपूर्ण चर्चा होय. अधिकरण एक किंवा अनेक सूत्रांचें बनलेलें असतें.

जैमिनीचीं पूर्वमीमांसासूत्रेंच हल्लीं उपलब्ध आहेत. त्यांवर शबरस्वामींचें विस्तृत भाष्य आहे. त्या भाष्यावर कुमारिल भट्टांचीं वर्तिकें व प्रभाकराची वृत्ति आहे. कुमारिल व प्रभाकर यांच्यांत बरेच मतभेद आहेत. पूर्वमीमांसेवर पंडितांनीं शेंकडो ग्रंथ सूत्रभाष्यांच्या आधारें लिहिले आहेत. आपदेवाचा मीमांसा—न्यायप्रकाश व लौगाक्षी भास्कराचा अर्थसंग्रह मीमांसेच्या प्राथमिक अभ्यासाला चांगले उपयोगीं पडतात. मराठींत षट्दर्शनचिन्तनिकेंत कै. शंकर पांडुरंग पंडितांनीं मीमांसासूत्राचें भाषांतर व विवरण लिहिलें आहे. प्रो. शिवराम महादेव परांजपे यांनीं अर्थसंग्रहाचें भाषान्तर उत्तम टीपांसह प्रसिद्ध केलें आहे. प्रो. पांडुरंग वामन काणे यांनीं पूर्वमीमांसेवर एक छानदार निबंध इंग्रजींत लिहिला असून त्याचें मराठींत भाषान्तर झालें आहे.

पूर्वमीमांसेचा अभ्यास करून त्यांतील तत्त्वांचा व नियमांचा मराठींत विस्तारशः उहापोह करणारा ग्रंथ होणें अगत्याचें आहे. तसेंच शबरस्वामींचें भाष्य, कुमारिलाचें वार्तिक व आपदेवाचा मीमांसान्यायप्रकाश यांचाही मराठींत अनुवाद होणें जरूर आहे.

पूर्वमीमांसेचें तत्त्वज्ञान—पूर्वमीमांसेंत वैशेषिक व सांख्य यांच्याप्रमाणेंच एक स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे. तें कुमारिलानें, पार्थसारथिमिश्रानें आणि इतर अनेक पंडितांनीं विवरिलें आहे. त्याचाही यथायोग्य परामर्ष घेणें इष्ट आहे. मराठींत वेदान्ताशिवाय भारतीय दर्शनांची चर्चाच केलेली आढळून येत नाहीं, हें मराठीचें मोठें व्यंग आहे. तत्त्वज्ञान म्हणजे वेदान्त अशी खुळी समजूत आमच्या लोकांत त्याचमुळें रूढ झाली आहे. इतर दर्शनांच्या व्यासंगानें मराठी भाषा सम्पन्न करणें आधुनिक पंडितांचें कर्तव्य आहे.

मुकुंदराज (स. ११२८–९६ सुमार):—मराठी भाषेंतील आद्य कवि व साधु. याचे ग्रंथ—१ विवेकसिंधु,

२ परमामृत, ३ पंचीकरण, ४ मूलस्तंभ, ५ दशोपनिषदांवरील महाभाष्य (संस्कृत). याचें पूर्वार्धांत नांव परमार्थतत्त्वप्रबोध असून उत्तरार्धांत महाभाष्य आहे (मं. श. १८३५ वा. इ. ले. २५). शिवाय कांहीं अभंग व पदें आहेत. विवेकसिंधु हा ग्रंथ जोगाईच्या आंब्याचा राजा जयंतपाळ याच्यासाठीं रचला, असें त्या ग्रंथांतच 'नृसिंहाचा बल्लाळ । तयाचा कुमार जयंतपाळ । तेणें करविला गदारोळ । ग्रंथरचनेचा ।' या शब्दांत म्हटलें आहे. जयंतपाळ, जैत्रपाळ, जैतपाळ अशीं हीं नांवें लिहिलेलीं आढळतात. पण या नांवाचा राजा प्रसिद्ध नाहीं. हा साधुसज्जनांस बोलावून 'तुम्हांला साक्षात्कार झाला आहे काय?' असा प्रश्न विचारी, व 'नाहीं' असें उत्तर आलें कीं त्यांना कैदेंत टाकी. पण मुकुंदरायानें त्याला साक्षात्काराचा अनुभव दिला, अशी आख्यायिका आहे. विवेकसिंधूच्या कांहीं प्रतींत शारंगधर राजा राज्य करीत असतां शके १११० साधारण संवत्सरीं द्विजोत्तम मुकुंदानें ग्रंथ केला असें म्हटलें आहे. शके १११०ला कीलक संवत्सर असून बाराला साधारण संवत्सर येतो. त्यावेळीं हे वृद्ध होते (प्रक. ७ ओवी ५४). त्यावेळीं हे साठ वर्षांचे असावेत.

आदिनाथ–हरिनाथ–रघुनाथ–मुकुंदराज अशीं यांनीं आपली गुरुपरंपरा दिली आहे. मध्य प्रांतांत भंडाऱ्याजवळ वैनगंगा नदीच्या कांठीं अंभोर म्हणून तीर्थ आहे; तेथें हरिनाथाची समाधि आहे. रघुनाथाची समाधि जवळच छिंदवाड्यास आहे. मुकुंदराजाची समाधिहि बैतुलजवळ खेडलें नांवाच्या गांवीं जुन्या पडक्या किल्ल्यांत आहे. यावरून ही त्रयी नागपूरकडील आहे असें ठरतें. जोगाईच्या आंब्यास मुकुंदराजांची समाधि दाखवितात; पण त्या यांच्या पादुका आहेत. हे सर्व शैव होते.

पवनविजय हा संस्कृत स्वरोदयाचें भाषांतर असणारा शेख महंमद कवीचा ग्रंथ मुकुंदराजाच्या नांवावर कांहीं चुकीमुळें दाखल झाला आहे. अनंत बडवे यानें याच्या मूळ मराठींत लिहिलेल्या विवेकसिंधूचें संस्कृत भाषेंत भाषांतर केलें.

मुक्तहस्तउर्ध्वपद्मासनः–(१) पद्मासनावर बसावें. दोन्ही हाताचे तळवे दोन्ही गुडघ्यांचे आंतील बाजूस जमिनीवर टेकावे. हातांचीं बोटें समोर करावीं. गुडघे व हातांचे तळवे यांवर व्हावें. दोन्ही पुढे उचलावे. नंतर हातावर जोर घेऊन गुडघे जमिनीवरून उचलावे व तोल हातावर घेऊन ते दोन्ही काखेपर्यंत आणावे. तेथून पुढें पुठ्यांचा भाग पहिल्यानें वर उचलावा. तोल सांभाळून हळूंहळूं पद्मासन वर उचलावें. मान समोर करावी. हें आसन बऱ्याच श्रमानें साध्य होतें. (२) ओणवें होऊन दोन्ही हातांचे तळव्यावर सर्व शरीर उचलून पाय झुलवून उर्ध्व दिशेस न्यावे. मान पुढें करून तोल सांभाळावा. दोन्ही हातांवर चांगला तोल सांभाळतां येऊं लागला म्हणजे सावकाश तोल सांभाळून पाय आखडून पद्मासन घालावें. या आसनानें हाताच्या सर्व भागांस बळकटी येते. बाहू बळकट होतात. रुधिराभिसरण चांगल्या रीतीनें होऊं लागतें व जठराग्नि प्रदीप्त होतो.

मुक्ताबाई (जन्म स. १२७९–समाधि स. १२९७):– जुनी मराठी कवयित्री. ही ज्ञानेश्वराची बहीण होय. हिचा जन्म आपेगांवीं स. १२७९ मध्यें झाला. नंतर ही पैठण गांवीं गेली. तेथून नेवाशाच्या रस्त्यानें आळंदीस येऊन तिथेंच वास्तव्य केलें. हिचे गुरु निवृत्ति व शिष्य चांगदेव. ज्ञानेश्वर व सोपान यांच्या समाधीनंतर एदलाबादेजवळ माणगांवीं हिनें जलसमाधि घेतली. हिचे ग्रंथ–कल्याणपत्रिका, नमन, हरिपाठ हे होत. ही अविवाहित होती. हिच्या नांवावर असलेले ताटीचे अभंग फार प्रसिद्ध असून विशेष गोड आहेत. एक दिवस ज्ञानेश्वरास पाहून एका टवाळानें, या संन्याशाच्या पोरांचें दर्शन घडलें, मोठा अपशकून झाला, असें म्हटलें. तें ऐकून ज्ञानेश्वर खिन्न झाले आणि खोलींत बसून खोलीचें दार (म्हणजे ताटी) लावून घेतलें. मुक्ताबाईसही ताटी उघडीनात. तेव्हां हिनें ताटी उघडण्याविषयीं विनंति केली ते हे अभंग होत.

हिची 'निवृत्तिप्रसादें मुक्ताबाई' ही अभंगरूपी कविता अद्यापि अप्रसिद्ध आहे. (मं. त्रै. १२–४, ले. ३५).

हिची समाधि खानदेशांत तापीतीरावर असलेल्या मेहुण या गांवांत आहे. एदलाबाद या गांवांत हिची समाधि नसून हिचें मंदिर आहे.

मुक्तेश्वर (इ. स. १५७३–इ. स. १६२८):–महाभारताच्या अखण्ड नंदादीपावरून ज्या ज्या महाराष्ट्र कवींनीं आपापले दीप लावून घेतले, त्यांपैकीं फक्त मोरोपंत व मुक्तेश्वर यांच्या दीपांचा प्रकाश काय तो आपणापर्यंत आज येऊन पोचतो; आणि सूक्ष्म दृष्टीनें पहाणाराला मोरोपंताच्यापेक्षां मुक्तेश्वराचा दीप हा

जास्त तेजस्वी भासतो. अशा या महाकवीच्या विषयीं थोडें विवेचन करावयाचें आहे.

मुक्तेश्वराच्या चरित्राबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध आहे व जी आहे तिच्या बाबतींत बहुतेक सर्व टीकाकारांचें एकमत आहे. मुक्तेश्वर हे प्रसिद्ध महाराष्ट्रकवि, समाजसुधारक व आद्य वाङ्मयसंशोधक एकनाथ यांचे नातू (मुलीचा मुलगा). यांच्या मातापित्यांच्या नांवाविषयींसुद्धां बरीच अनिश्चितता आहे. स्वतः मुक्तेश्वर आपल्या काव्यांत आईबापांचा—व तेच त्यांचे गुरु होते असे म्हणतात, म्हणून गुरूंचा पण—'लीलाविश्वंभर' या नांवानें उल्लेख करतो. परंतु एकनाथांच्या मुलीचें नांव गोदावरी—किंवा गंगा—असें होतें; व मुक्तेश्वराच्या वडिलांचें नांव चिन्तामणि असें होतें. परंतु पांगारकर इ. चें म्हणणें कीं या मुलीलाच नाथ 'लीला' अशी हाक मारीत व वडिलांचें नांव विश्वंभर असें त्यांच्या वंशावळींत सांपडतें. मुक्तेश्वरांचें आडनांव मुग्दल असें होतें.

मुक्तेश्वराच्या कालासंबंधीं पण असाच वाद आहे. तो आपल्या भारतांत प्राकृत कवींपैकीं फक्त एकनाथ व ज्ञानेश्वर यांचा उल्लेख करतो. इतर समकालीन कवींचा उल्लेख सांपडत नाहीं. साधारणपणें तुकाराम—रामदास यांच्या समकालीन तो झाला असावा. परंतु एवढ्या मोठ्या लोकांचा काव्यांत उल्लेख नाहीं यामुळें त्याबद्दल शंका वाटते व कदाचित् यांच्या थोडा पूर्वी तो झाला असावा असें वाटतें. महाराष्ट्रकविचरित्रकार त्याचा जन्म शक १५३१ हा देतात. परंतु एकनाथांच्या सहवासांत त्यानें आपल्या आयुष्याचीं सात आठ वर्षें काढलीं असावींत असा संशोधकांचा तर्क आहे. तसेंच, एकनाथांच्या प्रसादानें त्यास वाचा प्राप्त झाली इ. गोष्टींना धक्का बसतो. कारण नाथांचा प्रयाणकाल १५२० शक हा आहे. तेव्हां, राजवाडे पांगारकरांनीं म्हटल्याप्रमाणें मुक्तेश्वराचा काल १४९५—१५५० (शक) हा धरण्यास हरकत नाहीं. उदयोन्मुख महाराष्ट्राचा अभिमान यांच्या काव्यांत आढळतो व डोळे उघडे ठेवून सारें जग पहात असल्यानें समोर घडणारे अद्वितीय प्रसंग त्याच्या अवलोकनांतून सुटले नसते, तेव्हां सहाजिकच ते होण्यापूर्वी त्याचें देहावसान झालें असावें.

मुक्तेश्वरांचें शिक्षण नाथांच्या देखरेखीखालीं झालें असावें व तेथेंच शास्त्रीय ग्रंथ, महाकाव्यें इ. चें अध्ययन झालें असावें. कांहींच्या मतें याचें शिक्षण काशीस नाथांचे चिरंजीव हरीपंडित असत त्यांच्या हाताखालीं झालें असावें. निदान त्यानें तेथपर्यंतचा मुलुख तरी पाहिला असावा असें त्यांच्या काव्यावरून वाटतें. कारण डोळे उघडे ठेवून जगाचें अवलोकन तो करीत होता. महाराष्ट्राविषयीं त्याला अभिमान वाटे.

यानंतरचा मुद्दा ग्रंथकर्तृत्वाचा. त्याच्या नांवावर, आज महाभारताचीं ५ पर्वें (आदि, वन, सभा, विराट सौप्तिक), हरिश्चंद्र, शतमुख रावणवध, मूर्खलक्षणें, शुकरंभासंवाद, भगवद्गीता, एकनाथचरित्र, पदें व आरत्या इ. काव्यें मोडतात. महाराष्ट्रसारस्वतकार संक्षेपरामायण, गरुडगर्वाख्यान, कालियामर्दन, अहिमहिराख्यान इ. काव्यें पण देतात. शिवाय यांपैकीं कांहीं भागवतांतलीं आहेत; म्हणून भागवतावरही त्यांचें एक काव्य असावें असा तर्क आहे. पण त्याला विशेष आधार पुढें आलेले नाहींत. या बाबतींत आणखी एक वाद उपस्थित होतो व तो म्हणजे त्यानें भारताचें संपूर्ण भाषांतर केलें कीं नाहीं. त्याचीं भारतावरचीं पांच पर्वें उपलब्ध आहेत तीं वर उल्लेखिलींच आहेत. महाराष्ट्रकविचरित्रकार 'शांतिपर्व' पण सांपडलें असें म्हणतात; परंतु तें अद्याप प्रसिद्ध झालें नाहीं. स्वतः कवि आदिपर्वांत उद्योगपर्वाचा हवाला देतो; इ. कारणांवरून असें वाटतें कीं त्यानें संपूर्ण भारत लिहिलें असावें अशी पांगारकर, आजगांवकर इ. चा तर्क—खातरी—आहे. परंतु सारस्वतकार भावे यांचें मत त्यानें तें लिहिलें नसावें असें आहे व त्यांतही बराच सत्याचा अंश आहे.

यानन्तर प्रश्न येतो कवित्वाविषयींचा. या क्षेत्रांतहि टीकाकारांचे मतभेद असले तरी तो अव्वल दर्जाचा कवि आहे या बाबतींत मतैक्य आहे.इतर (मोरोपंत) कवीशीं तुलना करतां त्याला एकाद्या टीकाकारानें जरी कमी लेखण्याचा यत्न केला असला तरी त्याचें मोठेंपण व वैभव हें संशयातीत राहातें. त्याच्या काव्यावर भाव्यांनीं मधुनमधून तोल सुटतो अशी तक्रार केली आहे; परंतु ताबडतोब त्यांनीं स्वतःच त्या दोषाचें समर्थन केलें आहे. तेव्हां तिकडे लक्ष न देणेंच बरें. दुसरा दोष—पण यास दोष म्हणावा कीं नाहीं याबद्दल मतभेद होऊं शकेल; हा—म्हणजे कालविपर्यासाचा. तसें म्हटलें तर कोणता महाकवी या दोषापासून सर्वस्वीं

अलिप्त आहे ? व याचें कारण म्हणजे मनुष्याला कल्पनेनेंसुद्धां आपला काळ व जग सोडून फार दूर जाववत नाहीं हें होय व दुसरा भाग असा कीं, स्वतःच्या ज्ञानाचें अगर पांडित्य, अवलोकन इत्यादींचें प्रदर्शन हा दोष पतकरून करतां येणें शक्य असतें. शिवाय जर एखादा अलिखित संकेत म्हणून याकडे पाहिलें तर सारा प्रश्न सुटतो.

मुक्तेश्वराच्या प्रतिभेचे नवे नवे उन्मेष त्याच्या भारतांत व विशेषतः आदिपर्वांत पहावयास मिळतात. त्यानें रामायण अगोदर लिहिलें असलें तरी त्याची प्रतिभा भारताचें आदिपर्व लिहिलें त्यावेळीं पूर्ण विकसित झाली होती व म्हणूनच आदिपर्वाला भाव्यांनीं जी पौर्णिमेच्या चंद्राची व इतर पर्वांना कृष्णपक्षांतील चंद्राची उपमा दिली आहे ती योग्य वाटते. उपलब्ध भारतांत सर्वांत जुनें असें भारत त्याचेंच. त्याच्या पूर्वीं नामा विष्णुदास नांवाच्या कवीनें जरी भारत लिहिण्याचा प्रयत्न केला असला तरी तो पुढें महानुभाव पंथांत गेला असल्यानें त्याचें भारत पुढें आलें नाहीं. कवित्वशक्तीचे अव्वल गुण मुक्तेश्वरांच्या भारतांत पहावयास मिळतात.

यथातथ्य सृष्टिवर्णनें करण्यांत मुक्तेश्वराचा फार हातखण्डा आहे. त्याचीं सारीं सृष्टिवर्णनें बहारीचीं असतात. त्यांत कवि स्वतःला पूर्णपणें विसरून गेलेला दिसतो. प्राचीन महाकाव्याची ऐट व सूक्ष्म अवलोकन यांचा सुरम्य संगम त्यांत पहावयास मिळतो. दुष्यंत राजा शिकारीला निघाला त्यावेळीं केलेलें अरण्याचें वर्णन, लाक्षागृहांतून भीम, चार बंधु व आई यांसकट बाहेर पडला त्या समयीं केलेलें महारात्रीचें वर्णन, तसेंच नंतरचें पहाटेचें सूर्योदयाचें वर्णन हीं तर अत्यंत मनोज्ञ वाटतात. रात्रीच्या वर्णनांत तर रात्रीचें वातावरण दृष्टीपुढें उभें राहिल्यासारखें वाटतें. तसेंच, राज्याभिषेक, नगरशृंगार इ. कितीतरी प्रकारच्या वर्णनांनीं त्यानें काव्यास अनुपम शोभा आणली आहे. खाण्डव वन जाळलें त्यावेळीं, दोन पक्ष्यांचा पिलांचा व आईचा संवाद आहे तो फारच करुणरम्य व उदात्त असा भासतो. सृष्टिवर्णनाबरोबर मनोविकार पण त्याला चांगले साधतात. या बाबतींत खरें श्रेय व्यासांना जात असलें तरी स्वतःच्या ज्या दोनचार छटा मुक्तेश्वरानें उमटविल्या आहेत त्या नयनरम्य वाटतात. रागावलेली शकुन्तला, दीन होऊन भूलिंगावर अश्रुधारा घालणारी संतप्त द्रौपदी, क्षुल्लक व मोठ्या कारणांवरून तावडतोब रागावणारी देवयानी, पतीला उपदेश करणारी कुन्ती यांचीं चित्रें मनोरमतेनें रंगविलीं आहेत. तसेंच, भीम, धर्म, अर्जुन इ.च्या संभाषणांतून, कणिक नारद, इ.च्या नीतींतून त्यानें जें आपलें तद्विषयक ज्ञान दर्शित केलें आहे तेंही वाखाणण्यासारखें आहे.

मुक्तेश्वराची कविता प्रासादिक, प्रौढ, रसाळ, व सृष्टिसौंदर्यवर्णनयुक्त असून नानाप्रकारचे रस व अलंकार तींत ठिकठिकाणीं आले आहेत. कविचरित्रकार म्हणतात "मुक्तेश्वराप्रमाणें रसाळ ओव्या कोणत्याही कवीच्या नाहींत. त्याच्या वाणींत मार्दव व माधुर्य हे गुण विशेष असून ती प्रासादिक आहे." कै. ओक म्हणतात "नूतन व उदात्त विचारांमुळें त्याच्या काव्याला विशेष शोभा आली आहे व शब्दचमत्कारांपेक्षां अर्थमाधुर्याकडे त्याचें लक्ष होतें" सहृदयता, प्रासादिकपणा व रसांचा उत्कटपणा, वर्णनशैलीची हातोटी या बाबतींत कोणी महाराष्ट्र कवि त्याचा हात धरूं शकणार नाहीं असे उद्गार त्याला पंतापेक्षां कमी लेखणाऱ्या टीकाकारांनींसुद्धां काढले आहेत. पांगारकरांचा अभिप्राय–मुक्तेश्वराच्या काव्यांत जें अद्भुत ओज व जी वीररसाची दीप्ती इतक्या उत्तमत्वानें चमकते त्याचें कारण हेंच कीं त्याची कल्पनाशक्ती अति विशाल होती. एकनाथांचें रक्त त्याचे अंगांत खेळत असल्यानें जाज्वल्य नीतिमत्ता व ईश्वरभक्ति हे गुण निसर्गतः त्याला प्राप्त झाले होते. सर्वांगसुंदर कविश्रेष्ठ मुक्तेश्वराच्या तोलाचा दुसरा मराठी कवी नाहीं. गेल्या पिढींतील विद्वान् टीकाकार भिडे म्हणतात–'कालभैरवाचें अकांडतांडव व अप्सरेचा नाजूक नाच हीं दोन्ही एकाच व्यक्तीला साधलेलीं पाहून मत चकित झालेंच पाहिजे. मुक्तेश्वरांची भाषा जितकी एका ठिकाणीं कर्कश तितकीच दुसरे ठिकाणीं लुसलुशीत ! जितकी एके ठिकाणीं आवेशी तितकीच दुसरे ठिकाणीं संथ.' हरिभाऊंनीं पण त्यांचेविषयीं–"रसपरिपाक, वर्णनसौंदर्य व भाषेची अव्याज मनोहरता ज्यांस हवी असेल त्यांचें मन रंजवण्यास मुक्तेश्वर तयार आहेत" असे उद्गार काढले आहेत. या सर्वांच्या अभिप्रायावरून त्यांचें श्रेष्ठत्व संशयातीत ठरतें.

शेवटीं एकच मुद्दा राहतो व तो म्हणजे मुक्तेश्वर व मोरोपंत यांची तुलना. या बाबतींतही एखादा दुसरा अपवाद सोडून सारेजण श्रेष्ठपणाची माळ मुक्तेश्वराच्याच

गळ्यांत घालतात व तें सर्वस्वीं योग्य आहे. संपूर्ण भारताचा प्रयत्न या दृष्टीनें पंतांची योग्यता त्याचेपेक्षां मोठी आहे हेंच खरें. मुक्तेश्वराचा प्रतिभाचंडोल हा आकाशांत उंच उंच भराऱ्या मारतो तर पंतांचा अंतरावर पण जास्त वेळ संथतेनें राहातो. मुक्तेश्वराचा प्रतिभादीप जास्त प्रज्वलित व तेजस्वी वाटतो, तर पंतांचा दीप थोड्या कमी प्रखरतेनें पण सतत सारखी उष्णता देण्याचें काम करतो. मुक्तेश्वराची वाक्सरिता उड्या मारीत मारीत धबधब्याचीं नयनमनोहर दृश्यें दाखवीत जाते तर पंतांची दोन्ही बाजूला दगडांनीं बांधलेल्या घाटांकित मार्गांतून संथतेनें वाहिल्यासारखी वाटते. असो, पांगारकरांनीं म्हटल्याप्रमाणें—मोरोपंत हा घरांतला (घरगुती वातावरण रंगवणारा) कवि म्हटला तर मुक्तेश्वर हा राष्ट्रीय वातावरण रंगवणारा कवि म्हटला पाहिजे.

श्रीधरानें आपली सर्व काव्यसंपदा मुक्तेश्वर पुढें आदर्श धरूनच संपादिली, व त्या दृष्टीनें त्याच्या काळाचा विचार करतां भाषाविषयक कामगिरी केवळ अपूर्व अशी भासते. ज्ञानदेवएकनाथांनीं विभूषित केलेल्या मराठी वाङ्मयविहारांत मुक्तेश्वराला साधेंसुधें नव्हे तर महाकवी म्हणून स्थान द्यावयास कांहींच हरकत नाहीं.

मुगहॅम, विल्यम सॉमरसेट (१८७४-)— एक ब्रिटिश नाटककार व कादंबरीकार. सफाईदार उपरोध हें त्याच्या लिखाणाचें ठळक वैशिष्ट्य होय. याचें शिक्षण किंग्ज स्कूल, कँटरबरी, हायडेलबर्ग (Heidelberg) आणि सेंट टॉमस हॉस्पिटल (St. Thomas's Hospital) येथें झालें. त्यानें वैद्यकीची परीक्षा दिली पण तो व्यवसाय केला नाहीं. त्यानें वाङ्मयव्यवसायास सुरवात केली. लिझा ऑफ लॅम्बेथ या १८९७ सालीं प्रसिद्ध झालेल्या त्याच्या पहिल्या कादंबरींत निकृष्ट वर्गाच्या जीवनाचें चित्र रेखाटलें आहे. ही कादंबरी लोकप्रिय आहे. त्याचा वाङ्मयसंसार फार मोठा आहे. त्याचीं प्रमुख पुस्तकें पुढीलप्रमाणें:—

कादंबऱ्या Of Human Bondage, The Moon and sixpence. Mrs. Craddock; The Magician; The painted Veil; The Casuarina Tree.

नाटकें—A Man of Honour 1903; Lady Fredrick 1907; Mrs. Dot 1908; Penelope, 1919; Loaves and Fishes 1911; The Land of Promise 1914; Caroline 1916; Home and Beauty 1919; The Circle 1921; East of Suez 1922; Our Betters 1923; The Letter 1927, The Unknown.

मुंगळा:—मुंगीच्या वर्गांतील कीटक. कांहीं लोक यास डोंगळा या नांवानेंहि ओळखतात. याच्या शरीराचे तीन भाग असतात. एक डोकें, दुसरा छाती व तिसरा मागचा भाग. डोकें हा भाग सोडला तर याच्या अंगाचा आकार डंबेलससारखा दिसतो. रंग काळा-कुळकुळीत असतो. पाय चार असून ते प्रत्येक बाजूला दोन दोन प्रमाणें असतात. तोंडानें हा चावतो. एखादा दिवा दिसला तर हा सारखा त्याच्याभोंवतीं घिरट्या घालीत बसतो. गूळसाखरेसारखे पदार्थ याला फार आवडतात. मुंगळा हा प्राणी एकाद्या बिळांत अगर वारुळांत राहूं शकतो. हा प्राणीदेखील मुंगीप्रमाणें अंडज आहे. अनेक मुंगळे एकत्र राहूं शकतात. मात्र मुंगीइतका हा सद्गुणी नव्हे. याच्या काळे, तांबडे व तेलमुंगळे अशा तीन जाती आहेत. तेलमुंगळा मध्येंच तांबडा असून त्याचा बाकीचा भाग काळाच असतो. साधारणतः पेरू, आंबा अशां-सारख्या झाडावर हे असलेले दिसतात. ओलसर घरांत किंवा स्वयंपाकघरांत, अंधाऱ्या जागीं वा लग्नामुंजीचे स्वयंपाक ज्या ठिकाणीं होतात अशा जागीं तांबड्या मुंगळ्यांची वस्ती दिसून येते. तांबड्या मुंगळ्याचे अंग व अवयव हे भाग तांबडेच असतात म्हणून त्यांना तांबडे मुंगळे म्हणतात. तांबडे मुंगळे-देखील जमावानें राहतात.

मुंगी:—घरींदारीं आढळणारा कीटक. हा प्राणी अंडज असून अत्यंत उद्योगी, व्यवस्थित रीतीनें राहणारा आहे. मुंगीचे प्रकार तीन आहेत. एक तांबडा, दुसरा काळा व तिसरा वारेमुंग्यांचा. वारेमुंग्यांना पंख असल्यामुळें त्या उडूं शकतात. वारेमुंग्या या फारशा दिसत नाहींत. मुंग्यांच्या घराला वारूळ म्हणतात. या वारूळांत त्या पावसाळ्यांत उपयोगी पडणारे खाद्य-पदार्थ गोळा करून ठेवतात. घरें म्हणजे वारुळें चिकणमातीचीं बनवतात. हीं वारुळें इतकीं कठीण असतात कीं तीं, एकादा मनुष्य त्यांवर जरी उभा राहिला तरी मोडूं शकत नाहींत.

मुंग्यांतील राणीमुंगी अंडीं घालते. हीं अंडीं उबवण्याचें कार्य इतर मुंग्या तीं अंडीं मोकळ्या हवेंत नेऊन पार पाडतात. या अंड्यांतूनच कांहीं माद्या व कांहीं नर जन्माला येतात. राणीमुंगीची खाण्यापिण्याची

सर्व व्यवस्था इतर मुंग्या पाहतात. इतर मुंग्यांपेक्षां राणीमुंगी ही जरा मोठी असते.

मुंगी हा प्राणी गोड पदार्थांना फार लुब्ध आहे. या प्राण्याच्या ठिकाणचें ऐक्य, शिस्त, पूर्वव्यवस्था, चिकाटी, आज्ञाधारकपणा, सततोद्योगीपणा हे गुण चांगल्या प्रकारें व्यक्त होतात.

मुंगीचें शरीर मुंगळ्याप्रमाणेंच असतें. धान्याचे कण, गोड पदार्थ व कीटकांचीं शरीरें यांवर, तसेंच मोठाल्या प्राण्यांच्या मांसावरहि मुंग्या आपला निर्वाह करतात. वारेमुंग्या विशिष्ट कालांतच पहावयास मिळतात. काळ्या व तांबड्या मुंग्या चोहोंकडे आढळतात.

मुचकुंदः—मांधाता व विंदुमती यांना झालेल्या तीन पुत्रांतील कनिष्ठ मुलगा. हा दाशरथी रामाच्या पूर्वींचा ४१ वा पुरुष होय. याला पुरुकुत्स व अंबरीष असे दोन भाऊ असून शिवाय पन्नास बहिणीहि होत्या. याच्या सर्व बहिणींनीं एकट्या सौभरिऋषीलाच वरिलें होतें. हा मोठा गुणवान व ब्राह्मणांचा भक्त होता. एकदां यानें स्वबलाची परीक्षा पाहण्याकरितां कुबेरावर स्वारी केली. तेव्हां कुबेरानें राक्षससेना निर्मून तिच्याकडून याचा फडशा पाडला. स्वतःची फजिती झाल्यामुळें हा आपल्या पुरोहितांची निंदा करूं लागला. तेव्हां वसिष्ठानें उग्र तपश्चर्या करून राक्षसांचा वध केला. त्यावेळीं कुबेर म्हणाला, 'तूं आपल्या शौर्यानें मजशीं लढ. ब्राह्मणांची मदत कशाला घेतोस?' यानें सांगितलें कीं, 'तप आणि मंत्र यांचें बल ब्राह्मणांजवळ व अस्त्रविद्या क्षत्रियांजवळ असते. म्हणून या दोहोंचाहि उपयोग करून राजानें राष्ट्राचें कल्याण केलें पाहिजे.' या भाषणानें कुबेर संतुष्ट झाला व त्यास पृथ्वीचें राज्य देऊं लागला; पण तें यानें नाकारून 'मी आपल्या बाहुबलानें राज्य मिळवीन,' असें त्यास उत्तर दिलें व त्याप्रमाणें यानें स्वबाहुबलानें पृथ्वीचें राज्य संपादन केलें.

याला भार्गवानें शरणागताचे रक्षणाविषयींची कपोताची गोष्ट सांगितली.

हा अतिशय पराक्रमी असल्यामुळें देवांनीं दैत्यांच्या विरुद्ध लढण्याकरितां याची मदत घेतली व यानें सहाय्य करून दैत्यांचा पराभव केला. कार्तिक स्वामी सेनापति होण्यापूर्वीं यानेंच देवांचें रक्षण केलें. नंतर सर्व देव प्रसन्न होऊन 'वर माग' म्हणतांच हा अतिशय दमलेला असल्यामुळें यानें झोंपेची अपेक्षा केली व 'माझी झोंप जो दुष्ट मोडेल तो मी त्याकडे अवलोकन करतांच जळून खाक व्हावा, व नंतर मला श्रीविष्णूचें दर्शन व्हावें' असा वर मागितला. हा एका पर्वताच्या गुहेंत बरींच वर्षें निद्रासुख अनुभवीत होता; परंतु कृष्णानें कालयवनाला याच गुहेंत आणलें व याच्या अंगावर आपला शेला घालून आपण पलीकडे उभा राहिला. कालयवन आंत येतांच त्यास कृष्ण शेला पांघरून निजला आहे असें वाटून त्यानें त्यास एक जोरानें लाथ मारिली. लगेच मुचकुंद जागा होऊन रागानें कालयवनाकडे पाहतांच कालयवन तेथल्या तेथेंच जळून भस्म झाला. नंतर कृष्णानें याला दर्शन देऊन राज्याकडे जाण्यास सांगितलें व 'तूं पुढच्या जन्मीं सर्व भूतांचा मित्र असा श्रेष्ठ ब्राम्हण होशील व नंतर तूं मुक्त होशील' असा वर दिला. पण आपलें राज्य कोणी तरी घेतलें आहे व सर्व माणसें आकारानें लहान झालीं आहेत असें पहातांच हें कलियुग सुरू झालें, असें याला समजलें. तेव्हां हा हिमालय पर्वतावरील बदरिकाश्रमीं तपश्चर्येसाठीं निघून गेला. तेथें कांहीं दिवस तपश्चर्या केल्यानंतर राजर्षि मुचकुंद विष्णुपदास गेला.

मुंजः—मुंज म्हणजे उपनयनसंस्कार. 'उपनयन' या शब्दाचा वाच्यार्थ "जवळ नेणें" असा आहे. शिष्याला विद्यार्जनाकरितां गुरूसमीप नेणें अशा अर्थानें हा रूढ झाला आहे. प्राचीन काळीं ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांत उपनयन करीत. पहिल्या तीन वर्णांत वेदाध्ययन होत असल्यामुळें उपनयन होत असे. शूद्र वेदाध्ययन करीत नसल्यामुळें उपनयनाची त्यांना अवश्यकता नसे. शूद्रांनाहि वेदाध्ययनाची इच्छा असल्यास त्यांचेंहि उपनयन करावें अशीं स्मृतिग्रंथांत वचनें सांपडतात. प्राचीनकाळीं स्त्रियांचेंही उपनयन करीत. शिष्याला गुरूचे स्वाधीन करण्यापूर्वीं विशिष्ट विधि पाळावे लागतात. शिष्यानें मुंजा गवताची मेखला धारण करून कौपीन (लंगोटी) घालावयाची असते. त्याला यज्ञोपवीत धारण करावें लागतें. हातांत दंड घ्यावा लागतो व बसण्याकरितां मृगाजीन जवळ बाळगावें लागतें. हें सर्व साहित्य बटूनें मंत्रपूर्वक धारण केल्यावर त्याला ब्रह्मचर्याचा उपदेश करण्यांत येतो. बटूनें तीन दिवस भिक्षा मागून त्या भिक्षेचा भात शिजवून हवन करावयाचें असतें व नंतर भोजन करावयाचें असतें. याप्रमाणें तीन दिवस झाल्यावर चौथे दिवशीं मेधा-

जनन संस्कार होतो. याला 'पळसुला' असेंही म्हणतात. मेधा म्हणजे बुद्धि. बुद्धि वाढण्यासाठीं ब्रह्मवृक्षाचें म्हणजे पळसाचें पूजन करून परमेश्वराची प्रार्थना करण्याचा व विद्वानांचा आशिर्वाद घेण्याचा विधि यांत करावयाचा असतो. मेधावर्धनविधि उपनयनसंस्काराबरोबरच केला जातो. हा संस्कार होतांच बटूचा ब्रह्मचर्याश्रमांत प्रवेश होतो. उपनयनसंस्कारांत बटूला ब्रह्मचर्याचा उपदेश वगैरे गोष्टींचा समावेश होतो.

याप्रमाणें विधि होऊन बटू गुरुगृहीं विद्याभ्यासार्थ गेल्यावर त्यानें कमींत कमी १२ वर्षें व जास्तींत जास्त २४ वर्षें अगर ३६ वर्षें ब्रह्मचर्यपूर्वक विद्याभ्यास करावयाचा असतो. त्यानंतर समावर्तनसंस्कार करावयाचा. हे विधि कमींतकमी १२ वर्षांच्या काळांत व्हावयाचे. सांप्रत ते एका दिवसांत घाईनें उरकण्यांत येतात. वास्तविक पाहतां उपनयनानंतर कमींत कमी बारा वर्षें ब्रह्मचर्यपालन केल्यावरच समावर्तनसंस्कार व्हावयाचा असतो. सांप्रत तत्त्व जाणून हे संस्कार केले जात नाहींत.

मुंजे, डॉ. बाळकृष्ण शिवराम (१८७२–)– एक तेजस्वी हिंदू पुढारी. या महाराष्ट्रीय ब्राह्मण पुढाऱ्याची माहिती नाहीं असा सुशिक्षित हिंदुस्थानांत आढळणार नाहीं. यांचा जन्म १८७२ सालीं ऑक्टोबर महिन्यांत बिलासपूर शहरीं (मध्यप्रांत) झाला. बिलासपूरलाच मिडल स्कूलपर्यंत व पुढें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण रायपूरला झालें. मॅट्रिक झाल्यावर ते नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजांत आले व पहिल्या वर्षाच्या परीक्षेनंतर डॉक्टरीच्या अभ्यासासाठीं मुंबई ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें दाखल झाले व ग्रे मेडल हें पदक सर्जरींतील नैपुण्याबद्दल मिळवून एल्. एम्. अँन्ड एस्. ही डॉक्टरीची अखेरची परीक्षा उतीर्ण झाले (१८९८). याच सुमारास त्यांचें लग्न झालें.



डॉ. मुंजे

या परीक्षेनंतर मुंबई कॉर्पोरेशनच्या वैद्यकीय खात्यांत नोकरी धरली; पण ही सुखाची नोकरी सोडून त्यांनीं दक्षिण आफ्रिकेंत सुरू झालेल्या बोअरयुद्धांत भाग घेतला. जनरल बुलर यांच्या हाताखालीं कॅप्टनच्या हुद्याची सिव्हिल सर्जनची जागा त्यांना मिळाली. युद्धविषयक कामगिरीबद्दल मानाचें पदक पटकावून युद्धसमाप्तीनंतर डॉ. मुंजे हिंदुस्थानला परत आले व नागपूरला त्यांनीं खाजगी दवाखाना काढून प्रॅक्टिसला सुरवात केली.लौकरच उत्कृष्ट नेत्रवैद्य म्हणून त्यांनीं कीर्ती मिळविली. त्यांनीं मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेंत स्वतःची नवी पद्धती शोधून काढली. हीच पद्धती पुढें डॉ. स्मिथच्या नांवानें प्रसिद्धीस आली आहे. १९०६ पर्यंत 'खाना, पीना, मजा मारना' या पद्धतीनें त्यांनीं आयुष्य खर्चिलें; पण या वर्षी लो. टिळक व दादासाहेब खापर्डे यांच्याबरोबर शिवाजी उत्सवानिमित्त कलकत्याला जाण्याचा योग आला व त्यांच्या सहवासानें स्फूर्ती मिळून त्यांनीं वंगभंगाच्या चळवळींत उडी घेऊन आपल्या राजकीय चळवळीस सुरवात केली. यानंतर २५ वर्षेंपर्यंत प्रांतिक व अखिल हिंदी काँग्रेस समित्यांतून त्यांनीं महत्वाची कामगिरी केलेली आहे. आरंभापासून आजपर्यंत डॉ. मुंजे लो. टिळकांच्या राजकीय मतप्रणालीचे आहेत. महात्मा गांधींचें सत्य, अहिंसा व प्रेम या त्रिसूत्रीवर आधारलेलें राजकारण त्यांना कधींच मान्य झालें नाहीं. आरंभापासून त्यांनीं गांधींच्या राजकारणावर कडक टीका केली आहे. अस्पृश्यतेच्या बाबतींत त्यांचीं मतें कमालीचीं उदार आहेत. पण गांधींच्या हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या धोरणाबाबत त्यांचा तीव्र मतभेद आहे. मुसलमानांना स्वतःच्या फायद्याशिवाय कांहीं नको आहे, त्यांना स्वदेशाभिमानाची कल्पनाच कशी मानवत नाहीं हें त्यांनीं अनेक वेळीं दाखवून दिलें आहे.

बॅ. सी. आर. दास यांच्या स्वराज्यपक्षांत ते आरंभापासून सामील झाले व मध्यप्रांत विधिमंडळ व सेंट्रल असेंब्ली यांत पुढें ते निवडून आले. १९२७ सालीं त्यांनीं हिंदु महासभेंत प्रवेश केला व १९२९मध्यें त्यांनीं काँग्रेस सोडली. १९२७पासून बॅ. वि. दा. सावरकर यांच्या हातीं हिंदु महासभा जाईपर्यंत डॉ. मुंजे हेच महासभेचे मुख्य आधारस्तंभ होते व आजहि आहेत. १९३०–३२च्या राउंड टेबल कॉन्फरन्सवर डॉ. मुंजे यांची नेमणूक झाली होती. त्यांनीं त्या ठिकाणीं हिंदूंची बाजू अत्यंत कसोशीनें मांडली. याच कॉन्फरन्सचे ते सभासद असतांना इंडियन मिलिटरी कॉलेज कमिटीवर त्यांची नेमणूक झाली होती.

हिंदूंना लष्करी शिक्षण मिळालें पाहिजे म्हणून डॉ. मुंजे यांनीं सतत काम केलें आहे. हिंदी लष्करांत हिंदूंच्या बाबतींत होत असलेल्या पक्षपातावर त्यांनीं विधिमंडळांतून, समित्यांतून, सभांमधून व लेखांतून कडक टीका केली आहे. त्यांना हिंदुत्वाचा कमालीचा अभिमान आहे, आणि हिंदू तरुणांना लष्करी शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून त्यांनीं सदैव धडपड केलेली आहे आणि प्रत्यक्ष कार्याची सुरवात म्हणून १६ जून १९३७ रोजीं त्यांनीं भोसला मिलिटरी स्कूलची नाशिक शहरीं स्थापनाहि केलेली आहे. डॉ. मुंजे यांना 'धर्मवीर' ही पदवी लोकांनीं स्वेच्छेनें दिली आहे आणि आजच्या सत्तरीच्या वयांतहि ते तरुणाला लाजविणाऱ्या उत्साहानें 'हिंदू राष्ट्रासाठीं' श्रमत आहेत.

मुजुमदार, दत्तात्रय चिंतामण (१८८२–):– व्यायाम ज्ञानकोशाचे संपादक. पुण्यास १३–१०–१८८२ला जन्म. १९०३ मध्यें बी. ए. व १९०६त एल्.एल्.बी या पदव्यांची प्राप्ती. बडोदा संस्थानांत मुन्सफ, मामलेदार व अ. अकौंटंट या पदांवर कामें केलीं. १९३१ पासून सेवानिवृत्त. यांनीं श्रीनारायणगुरूची तालीम, बोटिंग क्लब व चिंतामण हौद या शिक्षणसंस्था बडोद्यास स्थापल्या. तसेंच पाद्रा व संखेडा या ठिकाणींहि व्यायामशाळा सुरूं केल्या.



द. चिं. मुजुमदार

बडोद्यावर अतिवृष्टीमुळें महापुराचें जें संकट कोसळलें त्यांत अनेक लोक सांपडले. या संकटांतील शेकडों कुटुंबांस जीवदान देण्याचें कार्य यांनीं केलें. हे अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेचे दोन वेळ अध्यक्ष होते. तसेंच बडोद्यांतील अनेक संस्थांचे ते अध्यक्षहि आहेत.

गेल्या पंचवीस वर्षांपासून आबासाहेब मराठी व गुजराथी या भाषेंत व्यायाम मासिक प्रकाशित करीत असतात. हाच उपक्रम हिंदींतही करून चौदा वर्षें होऊन गेलीं. त्यांनीं व्यायामाच्या अनेक विषयांवर अनेक पुस्तकें लिहिलीं आहेत. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील नामवंत मल्लांच्या फोटोंचा प्रचंड संग्रह केला आहे. यांनीं आतांपर्यंत व्यायामकोशाच्या दहा खंडांपैकीं चार खंड प्रसिद्धले आहेत. हा कोश हिंदी व गुजराथी भाषेंत प्रसिद्ध करण्याचा त्यांचा उद्योग चालू आहे.

मुडदूस (Rickets):—एक लहान मुलांना होणारा रोग. हा रोग सदोष आहारापापासून प्रायः उद्भवतो. हा रोग जगांतील बहुतेक सर्व भागांत होतो; विशेषतः हा रोग मोठ्या शहरांत राहाणाऱ्या गरीब अर्भकांना होतो. घाणेरड्या जागेंतील वस्ती, दाट वस्ती, अपुरा आहार, आईचें दूध सारखें बराच काळ पीत रहाणें यामुळें या रोगाची वाढ सपाट्यानें होते; तथापि आहारांत, कांहीं जीवनद्रव्यांच्या अभावामुळें अगर अपुरेपणामुळें हा रोग जडतो.

या रोगाचीं लक्षणें मूल सहा ते नऊ महिने वयाचें होतांच दिसून येतात. यावेळीं मूल बेचैन असतें; पचनक्रिया बिघडलेली असते, चालण्याकडे मुळींच प्रवृत्ति नसते; इतकेंच नव्हे तर चालविण्याचा प्रयत्न केल्यास तें ओरडूं लागतें. अंगांत १००° ते १०१° ताप असतो व पुष्कळ घाम येऊन तो निवतो.

हा रोग जसजसा वाढत जातो तसतशा हाडांत झालेल्या विकृती दृष्टोत्पत्तीस येतात; हाडांचीं टोंकें वाढतात व त्यांच्यांत अवश्य टणकपणाचा अभाव असतो. त्याची वाढहि खुंटलेली असते. तंगड्या वक्र होतात, पाठीच्या कण्याला बांक येतो, छातीच्या बरगड्या पुढें येतात, दांत येत नाहींत व आले तर ते अपूर्ण येतात अगर किडतात. या रोगाचें वाढतें मान असतां न्यूमोनिया, हगवण यांसारखे रोग झपाट्यानें जडतात.

या रोगावर वेळींच उपाय केला नाहीं तर मूल दगावतें. गाईचें ताजें दूध त्यांत थोडें पाणी घालून द्यावें. कॉड्लिव्हर ऑइल हें या रोगावर उपयोगी असतें. लोखंड, फॉस्फरस व चुना हीं द्रव्यें घालून तयार केलेलीं औषधें गुणकारक असतात. हगवणीसारख्या रोगांची बिलकूल हयगय करूं नये. त्यांवर वेळीं उपाययोजना करावी. मुलांना उबदार पोषाख द्यावेत व ताजी हवा मुबलक मिळेल अशी व्यवस्था करावी. जर हाडांना अगोदरच बांक आला असेल तर

पट्ट्या (Splinters) बांधून दोष सुधारतां येतो.

मुंडकोपनिषद्ः—हें उपनिषद् अथर्वण वेदाचें आहे. या उपनिषदांत शौनक नामक शिष्याला त्याच्या आंगीरस नामक गुरूनें ब्रह्मोपदेश केला आहे. शौनकानें गुरूला प्रश्न केला, "हे भगवन्, कोणत्या एका वस्तूचें ज्ञान झालें असतां पुरुष सर्वज्ञ होईल?' या प्रश्नाला आंगीरसानें दिलेल्या उत्तरांत या उपनिषदाचा सर्व विषय आलेला आहे. याचा सारांश पुढें दिलेला आहे.

'परा व अपरा' अशा दोन विद्या जाणण्यासारख्या आहेत. अपरा विद्या म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद हे चार वेद व शिक्षा,कल्प,व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष हीं वेदांगें यांचें ज्ञान. जिच्यायोगानें अविनाशी ब्रह्माचें ज्ञान होतें ती पराविद्या. तें ब्रह्म ज्ञानेंद्रियांना अगम्य असून तें कर्मेंद्रियाचाहि विषय होत नाहीं. तें मूलरहित व गुणरहित आहे. त्याला चक्षु, श्रोत्र व कर्मेंद्रियें नाहींत. तें नित्य, विभू (विविधरूपांनीं असणारें), सर्वव्यापी, अत्यंत सूक्ष्म व क्षयरहित आहे. तें प्रकाशरूप आहे, तें महत् आहे, त्याचें रूप चिंतन करतां येण्यासारखें नाहीं, तें सूक्ष्माहून सूक्ष्म व स्थूलाहून स्थूल आहे; तें अत्यंत जवळ आहे, तें दूरही आहे. या ब्रह्मांत समस्त विश्व अर्पिलेलें आहे.

हा आत्मा नेत्र, वाणी व इतर इंद्रियें यांनीं जाणता येण्यासारखा नाहीं; तप अथवा कर्म यांनीं त्याची प्राप्ति होत नाहीं. अंतःकरण सत्य व ब्रह्मचर्य यांच्या पालनानें शुद्ध झालें म्हणजे साधक एकाग्र मनानें आत्मचिंतन करूं लागतो व आत्म्यास पाहतो. आत्मज्ञान झालेले ऋषि ज्ञानानें तृप्त होतात, परमात्मस्वरूप होतात, शांत होतात. जो कोणी या परब्रह्माला जाणतो तो ब्रह्मच होतो. तो शोक व पाप यांच्यापलिकडे जातो, हृदयग्रंथी तुटतात व तो मुक्त व अमर होतो. समुद्राकडे वाहणाऱ्या नद्या आपलें नामरूप टाकून देऊन समुद्रांत लय पावतात, त्याचप्रमाणें अविद्याकृत नामरूपानें मुक्त झालेला विद्वान् श्रेष्ठाहून श्रेष्ठ अशा परमपुरुषांत विलीन होतो. तत्स्वरूप होतो.

मुतखडाः—लघवीमध्यें खडा बनतो त्यास मुतखडा म्हणतात. आमच्या रोजच्या खाण्यापिण्याच्या पदार्थांत जे क्षार असतात त्यांपैकीं बरेचसे क्षार पदार्थ मूत्रपिंडांतून लघवीवाटें निघून जातात; त्यांपैकीं कांहीं हलके हलके एकत्र गोळा होऊन मोठे होतात आणि मग त्याचें खड्यांत रूपांतर होतें. मुतखडा होण्याचें मूळ कारण नक्की सांगतां येत नाहीं. कारण कांहीं ठिकाणीं (उदा. महाराष्ट्र) त्याचें प्रमाण फार कमी आहे, तर कांहीं ठिकाणीं (उदा. सिंध, काठेवाड) त्याचें प्रमाण फार मोठें आहे. साधारणपणें रक्तदोषानें आणि पचनक्रियेच्या दोषानें हा रोग उद्भवतो.

कारणेंः—(१) प्रदेश—उष्ण व वालुकामय प्रदेशांत याचें प्रमाण अधिक आहे. (२) मूत्रपिंडाचे रोग—यांत लघवींतील क्षार एक होऊन त्याचें खड्यांत रूपांतर होतें.

प्रकारः—(१) लिथिया, (२) फॉस्फेट्स, (३) कॅलशियम् ऑक्सलेट्स.

लक्षणेंः—मुतखडा चार ठिकाणीं राहूं शकतो. (१) मूत्रपिंड (Kidneys) (२) मूत्रनलिका (Ureters) (३) मूत्रपिशवी (Urinary bladder) (४) शिस्ननलिका (Urethra). मूत्रपिंडांत खडा असल्यास त्याचीं लक्षणें कित्येक वेळां कांहींच असत नाहींत व अशा रीतीनें पुष्कळ वेळां तो खडा हळुहळू तेथेंच मोठा होत जातो; पण मूत्रपिंडांतून आपली जागा सोडून जेव्हां तो खालीं येऊं लागतो तेव्हां मात्र त्याचीं लक्षणें निराळीं होतात. म्हणजे एकदम जोरांत कळ सुरूं होते, मनुष्य गडबडा लोळूं लागतो, उलट्या होऊं लागतात; अंगास दरदरून घाम येऊं लागतो आणि वरचेवर लघवीस आल्यासारखें वाटतें आणि कशानेंही स्वस्थता वाटत नाहीं. अशा स्थितींत डॉक्टरना बोलावून गुंगीचें औषध अगर इंजेक्शन घ्यावें लागतें. खडा जर परत आपल्या पूर्वजागीं गेला अगर खालीं मूत्रपिशवींत आला तर एकदम कळ थांबते आणि रोग्यास अकस्मात् बरें वाटतें; लघवी साफ होते. अशा रीतीनें जशी कळ अकस्मात् सुरू होते तशी अकस्मात् नाहींशी होते.

लघवीच्या पिशवींत खडा असेल तर पुष्कळ वेळां कांहींच लक्षणें असत नाहींत; पण साधारणपणें खालील लक्षणें आढळून येतीलः—

(१) लघवी होतां होतां एकदम थांबणें.

(२) लघवी संपल्यानंतर शेवटीं कळ येणें (विशेषतः शिस्नाच्या टोंकास).

(३) लघवीच्या धारेंत फरक पडणें.

(४) लघवीच्या शेवटीं अगर लघवींत मिसळलेलें असें रक्त पडणें.

रोग्याचें लक्ष्य कळीमुळें अगर रक्तामुळें या रोगांकडें वेधलें जातें.

खडा शिश्नलिकेंत बहुतेक शेवटच्या तोंडाला येऊन अडकतो त्या वेळीं लघवी मागें तुंबते व लघवी साफ न होतां थेंब थेंब होऊं लागते. वेदना येतात आणि अशा स्थितींत डॉक्टरकडे गेल्याशिवाय चालत नाहीं.

मुतखड्यावर घरगुती उपाय चालत नाहीं. डॉक्टरांच्या सल्ल्यानें औषध घ्यावें व पथ्य करावें व जरूर पडल्यास ऑपरेशन करून घ्यावें.

तिळाचा, आघाड्याचा, केळीचा किंवा पळसाचा क्षार शेळीच्या मूत्राबरोबर घ्यावा. यामुळें मुतखडा झरून झरून निघून जातो.

२ कोहाळ्याचा रस, मध, शवखार मिसळून घेणें.

मुदतीचा कायदाः—व्यापक अर्थानें मुदतीचा कायदा म्हणजे अमूक एक गोष्ट केव्हां करावी अगर करूं नये याविषयीं कालावधि घालून देणारा कायदा. या अर्थानें कायद्यानें घालून दिलेल्या मुदतीसंबंधींच्या हरएक बाबीचा मुदतीच्या कायद्यांत अंतर्भाव होईल. परंतु कायद्याच्या परिभाषेंत हा शब्दप्रयोग इतक्या व्यापक अर्थानें करण्यांत येत नाहीं. दावा, अपील अगर अर्ज दाखल करून न्यायालयांत दाद मागावयाची ती अमूक एका मुदतींतच मागितली पाहिजे. कायद्यानें ठरवून दिलेल्या मुदतीबाहेर दाद मागितली गेल्यास ती न्यायालयानें देववूं नये असा निर्बंध घालून देणारा कायदा अशा मर्यादित अर्थानेंच हा शब्दप्रयोग योजण्यांत येतो. म्हणून कायद्यानें सांगितलेल्या कालावधीसंबंधीं इतर कोणत्याहि नियमांचा मुदतीच्या कायद्यांत समावेश होत नाहीं. उदाहरणार्थ (१) भारतमंत्र्यावर आणावयाचा दावा. त्याला त्यासंबंधींची कायद्याप्रमाणें द्यावी लागणारी नोटीस दिल्यापासून दोन महिन्याचा कालावधि संपल्यावरच आणतां येतो. तत्पूर्वी नाहीं. हा नियम मुदतीच्या कायद्याचा भाग नाहीं. (२) इंडियन डायव्होर्स ॲक्टांत (घटस्फोटाचा कायदा) असा एक नियम आहे कीं हायकोर्टानें विवाहविच्छेदाचा हुकूमनामा केल्यापासून सहा महिन्यांचा कालावधि संपेपर्यंत विवाहसंबंधांतून मुक्त झालेल्या पतिपत्नींना दुसरा विवाह करण्याला कायद्याचा प्रतिबंध आहे. या नियमाचा मुदतीच्या कायद्यांत अंतर्भाव होत नाहीं.

दावा, अपील अगर अर्ज यांचे द्वारां न्यायालयांत मागावयाची दाद ठराविक मुदतींतच मागितली पाहिजे, असा निर्बंध नागरिकांच्या हिताकरितांच घालण्यांत आला आहे. 'न ऋते श्रांतस्य सख्याय देवाः' या वेदवचनानुसार आत्मोद्धारार्थ अविश्रांत परिश्रम करणाऱ्यालाच परमेश्वर सहाय्य करतो. त्याचप्रमाणें न्यायदेवताहि डोळ्यांत तेल घालून आपल्या हिताला जपणाऱ्या कर्मयोग्यालाच सहाय्य करते; आळशाला नाहीं. वर दिलेल्या वैदिक वचनांत थोडा फरक करून 'न ऋते श्रान्तस्य सख्याय न्यायदेवता' असें आपणाला न्यायदेवतेला अनुलक्षून म्हणतां येईल. दीर्घकालपर्यंत झोंपा काढून आपल्या इच्छेस येईल तेव्हां न्यायालयांत जाऊन आपल्या हक्कासंबंधीं दाद मागण्याची मुभा नागरिकाला कायद्यानें ठेविली तर लबाडी, खोट्या साक्षी देणें, बनावट पुरावा तयार करणें वगैरे गोष्टींना ऊत येऊन समाजाचें स्वास्थ्य बिघडेल. कोणाहि नागरिकाला मिळकतीसंबंधींच्या आपल्या हक्काच्या स्थैर्याविषयीं निश्चिति वाटणार नाहीं. विशिष्ट काल लोटल्यावर आपल्यावर विशिष्ट बाबतींत कब्जाखोकल्याला तोंड देण्याची पाळी येणार नाहीं, आपल्या ताब्यांत असलेल्या मिळकतीसंबंधींच्या आपल्या हक्कासंबंधीं न्यायालयांत जाब देण्याचा प्रसंग आपल्यावर ठराविक कालावधीनंतर येणार नाहीं अशी निश्चिति नागरिकाला असणें समाजाच्या स्थैर्याच्या दृष्टीनें अवश्य आहे. हीच निश्चिति मुदतीच्या कायद्यानें दिली आहे. मुदतीच्या कायद्यांत सांगितलेल्या ठराविक कालावधीच्या आंत न्यायदेवतेकडे आपलें गाऱ्हाणें नेऊन दाद मागण्याची तत्परता नागरिकानें दाखविली तरच त्याच्या गाऱ्हाण्याचा योग्य तो विचार न्यायदेवतेकडून होतो; नाहींतर नाहीं. मुदतीच्या कायद्याप्रमाणें एखाद्या व्यक्तीचा विशिष्ट हक्कांबाबत न्यायालयांतून दाद लावून घेण्याचा मार्ग ठराविक कालावधीनंतर बंद होतो; पण त्यायोगें तो विशिष्ट हक्क नष्ट होत नाहीं. यावर कोणी असा प्रश्न करील कीं ज्या हक्काबाबत दाद मागतां येत नाहीं तो हक्क नष्ट झाला नाहीं असें कसें म्हणावयाचें? दादच मिळत नाहीं तर हक्क जिवंत आहेत असें म्हणण्यांत स्वारस्य तें काय? यावर उत्तर असें कीं दाद मागण्याचा मार्ग बंद होणें व हक्क नष्ट होणें या दोन गोष्टी भिन्न आहेत. या दोहोंतील ह्या फरकाला कायद्याच्या दृष्टीनें महत्त्वहि आहे. उदाहरणें देऊन हा फरक स्पष्ट करूं. समजा कीं, 'अ' नें 'ब' चें कर्ज

काढलें आहे. कायद्यानें कर्जवसुलीकरितां दावा आणण्यासाठीं दिलेल्या मुदतींत 'अ' कडून त्या कर्जाची फेड होत नाहीं व 'ब' त्या मुदतींत 'अ' वर कर्जवसुलीकरतां दावाहि दाखल करीत नाहीं. या मुदतीनंतर 'अ' वर दावा आणून कर्ज वसूल करण्याचा मार्ग जरी बंद झाला, तरी त्या कर्जासंबंधींचा 'ब' चा हक्क नष्ट होत नाहीं. 'अ' नें 'ब' च्या नांवें या मुदतीबाहेर गेलेल्या कर्जाकरितां प्रॉमिसरी नोट लिहून दिली तर ती कायदेशीर आहे. त्याचप्रमाणें 'अ' नें मुदतीबाहेर गेलेल्या कर्जाची फेड केली तर तीहि कायदेशीर आहे. याचा अर्थ असा कीं, आपण दिलेला पैसा मुदतीबाहेर गेलेल्या कर्जाच्या फेडीकरतां दिला तो चुकीनें दिला. आपणाकडून पैसा वसूल करण्याचा 'ब' ला हक्कच राहिला नसतां आपण पैसा दिला, तो आपणाला परत मिळावा अशी मागणी 'अ' ला कायद्याप्रमाणें करतां येत नाहीं.

मुनशी कन्हयालाल माणिकलाल (जन्म १८८७):– जन्म ता. २९ डिसेंबर १८८७ रोजीं झाला. १९२६ सालीं लीलावती शेठ या सुप्रसिद्ध गुजराथी साहित्यसेविकेशीं विवाह झाला. भडोच येथील आर. एस. दलाल हायस्कूलमध्यें शिक्षण. १९०६ सालीं बडोदा कॉलेजांतून बी. ए. झाले. १९१० सालीं मुंबई युनिव्हर्सिटीची एलएल्. बी. ची परीक्षा पास झाले. १९१३ सालीं ॲडव्होकेटस्च्या परीक्षेंत यश मिळविलें; त्याच सालीं मुंबई हायकोर्टाचे ॲडव्होकेट म्हणून नांव दाखल झालें. १९१५ सालीं यंग इंडियाचे दुय्यम संपादक झाले; १९१९–२० 'मुंबई होमरूल लीग' चे सेक्रेटरी; १९२२ पासून 'साहित्यसंसद मुंबई' चे सेक्रेटरी झाले. गुजराथी वाङ्मयाच्या ज्ञानकोशाचे संपादक झाले. १९२५ सालीं रजिस्टर्ड ग्रॅज्युएट्स्तर्फे मुंबई युनिव्हर्सिटीच्या सीनेटचे सभासद निवडून आले. १९२६ मध्यें गुजराथी साहित्यपरिषद्मंडळाचे उपाध्यक्ष निवडून आले. १९२९ सालीं मुंबई युनिव्हर्सिटीच्या सिंडिकेटचे सभासद निवडून आले; त्याच सालीं बडोदा युनिव्हर्सिटी कमिशनचे सभासद होते. १९२७ सालीं मुंबई युनिव्हर्सिटींतील गुजराथी अभ्यासमंडळाचे (Board of Studies) अध्यक्ष निवडून आले; त्याच सालीं मुंबई युनिव्हर्सिटीतर्फे मुंबईच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद निवडून आले; शिवाय शाळेंत शारीरिक शिक्षण देण्याबाबत विचार करण्याकरितां सरकारनें नेमलेल्या कमिटीचे अध्यक्ष झाले. १९२९ सालीं मुंबई युनिव्हर्सिटीचे ॲकेडमिक कौन्सिल व बोर्ड ऑफ स्टडीजचे सभासद निवडून आले. २० एप्रिल १९३० रोजीं सत्याग्रहाच्या चळवळींत सामील झाले; ता. २१ एप्रिल १९३० रोजीं त्यांना अटक होऊन ता. २२ रोजीं मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें त्यांना सहा महिन्यांची कारावासाची शिक्षा सांगितली. ता. १ ऑक्टोबर १९३० रोजीं सुटका झाली. त्याच महिन्यांत कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीचे दुसऱ्याच्या बदली सभासद झाले. पुढें ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे सभासद निवडून आले. १९३२ सालच्या कायदेभंगाच्या चळवळींत वटहुकुमान्वयें अटक होऊन दोन वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. १९३७ सालीं मुंबईच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद निवडून येऊन गृहमंत्री झाले. १९३९ च्या आक्टोबरमध्यें मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला.

त्यांचे ग्रंथ–पृथ्वीवल्लभ, गुजराथनो नाथ, राजाधिराज, भगवान कौटिल्य, वेरनी वसुलात.

नाटकें–पुरंदरपराजय, अविभक्त आत्मा, तर्पणपुत्र, समोवादी, काकानी शशी, नरसी मेहताचें चरित्र, गुजराथचें वाङ्मय, किरकोळ गोष्टी व निबंध.

मुंबई:–हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रमुख बंदर व मुंबई इलाख्याच्या राजधानीचें शहर. हें मुंबई बेटाच्या दक्षिणेकडील भागावर वसलें आहे. याचे कोट व शहर असे दोन भाग आहेत. कोट या भागाला पूर्वीं तटबंदी होती. हा भाग चिंचोळा असून याच्या पूर्वेस बंदर व पश्चिमेस बॅकबे आहे. येथें मुंबईचा किल्ला, सरकारी कचेऱ्या, मोठमोठ्या वखारी, व्यापारी पेढ्या आहेत. मुंबईचें बंदर प्रशस्त व सुरक्षित असून तेथें विस्तीर्ण गोद्या बांधल्या आहेत. मुंबई ते ग्रेटब्रिटन आगबोटींचें दळणवळण मोठ्या प्रमाणावर होतें; शिवाय चीन, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर वगैरे भागांशींहि आगबोटींचें नियमित दळणवळण आहे. मुंबईहून उत्तर हिंदुस्थानांत जाणारे दोन लोहमार्ग आहेत. एक जी. आय्. पी. रेल्वेचा व दुसरा बी. बी. ॲंड सी. आय् रेल्वेचा. परदेशचे प्रवासी बहुधा मुंबईमार्गेंच हिंदुस्थानांत प्रवेश करीत असल्यामुळें मुंबईला हिंदुस्थानचें प्रवेशद्वार असें यथार्थतेनें संबोधण्यांत येतें. मुंबईच्या रस्त्यावर जगांतील बहुतेक सर्व वंशाचे लोक दृष्टीस पडतात.

मुंबई शहर हें राजकीयदृष्ट्या इलाख्याचें केंद्र आहे. उद्योगधंदे व व्यापार या बाबतींत या शहराला जागतिक महत्त्व प्राप्त झालें आहे. पश्चिम हिंदुस्थानांतील कापसाच्या व्यापाराचें हें मोठें केंद्र असून येथें अनेक कापडाच्या गिरण्या आहेत. रंगकाम, कांतडीं कमावणें हे धंदेहि मोठ्या प्रमाणावर चालतात. याशिवाय मातीचीं व पितळेचीं भांडीं करण्याचे व लांकडावर खोदकाम करण्याचे बरेच कारखाने आहेत.

मुंबई शहरांत अनेक प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. त्यांत प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, आर्ट गॅलरी, कावसजी जहांगीर हॉल, हायकोर्ट, युनिव्हर्सिटी, व्हिक्टोरिया टर्मिनस रेल्वे स्टेशन, टाऊन-हॉल, सेक्रेटेरिएट्, व्हिक्टोरिया गार्डन्स वगैरे स्थळें महत्त्वाचीं आहेत. येथून सहा मैलांवरील बेटांवर असलेल्या 'एलेफंटा केव्हज्' शिल्पकलेच्या दृष्टीनें प्रेक्षणीय आहेत.

१९३१च्या शिरगणतीप्रमाणें मुंबईची लोकसंख्या ११७५९१४ आहे. लोकसंख्येच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील शहरांत कलकत्त्याचा पहिला व मुंबईचा दुसरा क्रम लागतो. मुंबईच्या रहिवाशांत ७५०००० हिंदू, २२५००० मुसलमान, ७५००० खिश्चन, १२५००० इतर आहेत. यांत युरोपीयन किंवा तत्सम १८००० आहेत. मुंबईच्या नागरिकांत साक्षरतेचें प्रमाण दर हजारीं २९१ पुरुष व १५३ स्त्रिया असें आहे.

मुरक्कूः—**साहित्य**—तांदूळ, डाळ, तेल, मीठ, हळद, जिऱ्याची पूड, तिखट. **माप**—अर्धा शेर तांदूळ, अदपाव उडदाची डाळ, दोन चमचे मीठ, थोडी हळद, एक चमचा जिऱ्याची पूड. **कृति**—दोन्ही डाळी लाल होईपर्यंत भाजाव्या. उडदाच्या डाळीपेक्षां तांदूळ कमी भाजावे.मग दोन्ही एकत्र करून बारीक दळावे, त्याच्यांत मीठ, हळद,जिऱ्याची पूड व तिखट घालून तेलाचें थोडें मोहन घालून चकल्याच्या भाजाणीसारखें घट्ट भिजवावें. अर्ध्या तासानें तें पीठ चांगलें मळावें व पोफळाएवढें पीठ घेऊन कडबोळ्यांसारखीं पण त्यापेक्षां बारीक व लांब वळीं वळावीं, व त्या वळयाचे दोन भाग करून त्यांस पीळ घालावा व त्याचें पोकळ वेटोळें करून तें तेलांत तळावें. याप्रमाणें सर्व पिठाचें करावें. पीळ चांगला पाडावा.

मुरांबाः—आंब्याचा मुरांबा हा लेख पहा. (पृष्ठ ८१)


मुसलमानी धर्मः—मुसलमान लोक आपल्या धर्माला 'इस्लाम' म्हणतात. इस्लाम या शब्दाचा अर्थ 'ईश्वरचरणीं पूर्ण नम्रता.' 'कुराण' हा त्यांचा प्रमाणग्रंथ होय. कुराणाशिवाय परंपरागत उपदेशांना—सुन्ना—मानणारेहि कांहीं लोक आहेत. या सुन्नांत महंमदाचीं वचनें, त्यानें प्रसंगोपात काढलेले उद्गार व त्याचीं कृत्यें यांचा संग्रह आहे. बुद्धिवादी मोटासाल व कट्टर शिय्या लोक या सुन्नांना मुळींच मानीत नाहींत. सुन्नी लोकांत चार पक्ष होते. हे सर्व पक्ष इ. स. ७४० ते ८४० च्या दरम्यान स्थापन झाले होते. या पंथांना त्यांच्या संस्थापकांच्या नांवावरून हनीफी, मलेकी, शफी व हनाबली अशीं नांवें मिळालीं.


'ईश्वर एकच असून महंमद हा त्याचा प्रेषित आहे,' हें इस्लामचें मुख्य तत्त्व आहे. या धर्माचा संस्थापक महंमद पैगंबर हा होय. (चरित्र—भाग चौथा, पृष्ठ १५१२ पाहा.)

"तरवारीच्या जोरावर शांतीचा संदेश सर्वत्र पसरवून 'धर्मसंस्थापक' ही पदवी एकट्या महंमदानेंच मिळविली आहे." (इस्लामी संस्कृतीचें क्रांतिकार्य). "त्यांना (मुसलमानेतरांना) आपल्याशीं द्रोह करतां येऊं नये व चोहोंकडे परमेश्वराचें धर्मराज्य व्हावें, एवढ्याकरितां जरूर त्यांच्याशीं लढा." "काफराशीं (नास्तिकांशीं—मुसलमानांशिवाय इतरधर्मीय लोक हे नास्तिक व काफर होत.) अवश्य लढा. ते शरण येऊन आपल्या हातांनीं खंडणी देऊं लागेपर्यंत त्यांच्याशीं लढा." [जगांतील विद्यमान धर्म—आठवले] "जे लोक इस्लामधर्मास नाकारतात, परमेश्वरापुढें त्यांची धनदौलत कामास येणार नाहीं व संततीहि उपयोगी होणार नाहीं, ते नरकाग्नीचें इंधन होतील." "नास्तिकांस मित्र पत्करूं नका." "आणि नास्तिकांचा मूळच्छेद करून टाकावा." [कुराण] अशा प्रकारच्या उपदेशानें व वृत्तीनें अरबस्तानांत हा धर्म प्रथम स्थापन झाला व कडव्या वृत्तीच्या अरबांना लुटालुटीस व मानवी संहारास धर्माचें अधिष्ठान लाभतांच व लढण्यामुळें इस्लामची सेवा व लढाईत मृत्यु आल्यास सुंदर स्त्रिया, पांढरें शुभ्र मद्य, मोठमोठ्या डोळ्यांच्या अप्सरा, स्वरूपवान मुलें, सुंठीच्या पाण्याचे पाट, व बागा असलेला स्वर्ग मिळेल असें महंमद पैगंबराचें आश्वासन मिळाल्यामुळें झंजावातासारखा हा धर्म पसरत गेला व आजहि या वा त्या अन्य मार्गांनीं त्याचा प्रसार चालू आहे.


महंमद पैगंबर वयाच्या पंचविसाव्या वर्षी सीरिया प्रांतांत गेला. तेथील कांहीं महंत लोक त्याला













मुंबई

१ कॉर्पोरेशन २ राजाबाई टॉवर ३ जनरल पोस्ट ऑफिस ४ महालक्ष्मी रेसकोर्स ५ गेटवे ऑफ इंडिया व ताजमहाल हॉटेल ६ फ्लोरा फाउंटन.

एकेश्वरी मताचे आढळले. ते मूर्तिपूजक नव्हते. त्यांच्यापासून त्याला ख्रिस्ती धर्माची माहिती मिळाली. तिचा परिणाम त्याच्या मनावर फार झाला. तेव्हांपासून त्याच्या मनांत ईश्वरविषयक कल्पना घोळूं लागल्या. यानंतर 'हिरा' नांवाच्या डोंगरावर तो कांहीं दिवस एकांतांत राहिला. या एकांतवासानंतर त्याला धर्मस्थापनेची स्फूर्ति झाली व पहिला अनुयायी म्हणून त्याची बायकोच त्याला मिळाली.

या वेळीं अरबस्तानांत मूर्तिपूजेचें भयंकर प्रस्थ होतें. अरबस्तान हा प्रदेश रखरखीत, मोठ्या नद्या नसलेला व वाळवंटानें भरलेला असा होता (व आहे). अरब मूर्तीपुढें नग्न स्त्रियांना नाचवीत ! हजारों जीवांची मूर्तीपुढें हत्या होई, लांचलुचपत, दारू, जुगार, लफंगेगिरी सर्वत्र बोकाळली होती. गुलामांचा व्यापार व व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालत असे. अरब लोक क्षुल्लक कारणानें वर्दळीवर येत. त्यांची रक्तपिपासा व विषयपिपासा फार दांडगी होती. अशा या रानटी लोकांना राज्यपदाची आशा, लुटीचा लोभ व स्वर्गसुखाची लालूच दाखवून महंमदानें धर्माचा प्रसार सुरू केला. अरबांना लौकरच तुर्क, मोगल वगैरे राक्षसी वृत्तीच्या लोकांचें सहाय्य मिळालें व 'इस्लाम'चा दिव्य संदेश सर्व जगभर केवळ कत्तलीनें, फितुरीनें, छळानें, आर्थिक नाकेबंदीनें, जबरीनें व फसवेगिरीनें पसरला. याला ज्या ज्या देशांत आज मुसलमानी धर्म पसरलेला दिसतो त्या त्या देशांचा इतिहास (प्रामाणिकपणें जतन करून राखला गेल्यास) सदैव साक्ष देत राहील.

मुसलमानांच्या मतें आदम, नोहा, आब्राहम, मोसेस, जीसस् (ख्रिस्त) व महंमद हे ज्ञानी पुरुष खुद्द परमेश्वरानेंच कायदे व नवीन व्यवस्था करण्यासाठीं पाठविले. या ज्ञानी पुरुषांना धर्मतत्त्वांची माहिती परमेश्वरानें दिली ती ज्यूंचा धर्मग्रंथ, पवित्रगीतें (Psalms), शुभवर्तमान (The Gospel) व कुराण हीं चार दर्शनें होत. यांपैकीं पहिलीं तीन असत्यानें भरलीं असून कुराण तेवढेंच सत्य होय असा मुसलमानांचा दृढ विश्वास आहे.

गॅब्रियल नांवाच्या देवदूतानें महंमदास कुराण सांगितलें. महंमदाला कुराणाचें प्रकटीकरण जेव्हां होई तेव्हां महंमद अंगांत आलेल्या माणसाप्रमाणें बोले. त्या वेळीं तो आपल्याभोंवतीं एक घोंगडी गुंडाळून घेत असे. अशा तऱ्हेनें देवदूत अंगांत संचारला म्हणजे तो बेशुद्ध होई. या बेशुद्धींत तो जें बोले ते शब्द जवळचे लोक टिपून गेत. अशा तऱ्हेनें हें कुराण प्रकट झालेलें आहे. अझरायल हा मृत्युदूत मानतात. याच्याकडे मनुष्यांचे आत्मे त्यांच्या शरीरापासून अलग करण्याचें कार्य आहे. इस्रायल हा देवदूत पुनरुत्थानाच्या वेळीं तुतारी वाजवितो. ही तुतारी वाजल्यावर थडग्यांत गाडून टाकलेले मुसलमान उठतात व त्यांच्या कर्माप्रमाणें त्यांना स्वर्ग किंवा नरक मिळतो. हें न्यायदान (Judgment) झाल्यानंतर सर्वांना 'अल् सिरम' नांवाच्या—केंसाहून बारीक, तरवारीच्या धारेहून तीक्ष्ण व ज्याच्या दोन्ही बाजूस कांटे आहेत अशा पुलावरून जावें लागतें. जे सज्जन म्हणजे निष्पापी असतील ते या पुलावरून सहज व त्वरित पलीकडे (अर्थात् त्यांच्या धर्माप्रमाणें वर्णिलेल्या स्वर्गांत) जातील व जे पापी असतील ते या पुलावरून खालीं नरकांत पडतील. स्वर्गाची कल्पना काय आहे हें आरंभीं थोडक्यांत सांगितलें आहेच. नरकाची कल्पना, कमालीचा थंडपणा व उष्णतेचा अतिरेक यावरच मुख्यतः आधारलेली आहे. एकेश्वरवादावर ज्याचा विश्वास आहे त्यांची शेवटीं नरकांतून सुटका होऊन नंदनवनांत (स्वर्गांतील बाग) प्रवेश मिळतो असें आश्वासन महंमदानें दिलें आहे. इस्लामेतरांना सदैव नरकयातना भोगाव्या लागतात असें हा धर्म स्वधर्मसमर्थनार्थ सांगतो. जें जें घडतें तें तें सर्व अल्लाच्या पूर्वयोजनेमुळेंच घडतें अशी मुसलमानांची श्रद्धा आहे.

(१) शुचित्व व नमाज, (२) दानधर्म, (३) उपवास व (४) मक्केची यात्रा हीं मुसलमानधर्माचीं चार प्रमुख लक्षणें होत. प्रार्थनेच्या पूर्वी शुचिर्भूत होणें अवश्य आहे. प्रार्थना कुठेंहि केली तरी चालते; पण शुक्रवारीं मशीदींतच प्रार्थना करावी असा आदेश आहे. हिंदुस्थानांतील मुसलमान मक्केच्या दिशेकडे तोंड करून प्रार्थना करतात. प्रार्थना दिवसांतून पांच वेळां सांगितलेल्या आहेत. प्रत्येक मुसलमान स्त्री—पुरुषानें मक्केची यात्रा जन्मांत निदान एकदां तरी करावी. या यात्रेकरतां स्वतःच्या ऐवजीं बदली दुसरा मनुष्य पाठविला तरी चालतो; यामुळें स्वतः यात्रा करून जेवढें पुण्य मिळावयाचें तेवढेंच मिळतें. प्रत्येकाला चार बायका (लग्नाच्या) करायला धर्मानेंच सवलत दिलेली आहे. खुद्द महंमदानें दहा लग्नें

(एकाच वेळीं) केलीं. विशेषत: वयाच्या ५० व्या वर्षानंतर फक्त १० वर्षांच्या कुमारिकेशीं लग्न लावलें.

कुराणांत लोभ, परनिंदा, सूडबुद्धि, मादक पदार्थांचें सेवन, व्याज घेणें व व्यभिचार यांचा निषेध केलेला आहे. मुसल्मानी धर्मांत स्त्रीधनाबद्दलची महत्त्वाची कल्पना सोडली, तर स्त्रियांसंबंधीं पुष्कळ अत्यंत अनुदार कल्पना आढळतात. "जास्त व चांगल्या बायका मिळण्याची आशा वाटत असेल, तर आपल्याला नावडत्या असणाऱ्या बायकांना खुशाल सोडून द्यावें," "पुरुष हे स्त्रियांवर सत्ताधारी होत. कारण परमेश्वरानें पुरुषांना स्त्रियांवर श्रेष्ठत्व दिलें आहे. आणि दुसरें हें कीं, पुरुषांनीं स्त्रियांसाठीं आपलें द्रव्य खर्ची घातलें आहे." "पण ज्या (स्त्रिया) तुमच्या हस्तगत झाल्या असतील त्या मात्र निषिद्ध नव्हेत." (अर्थात् उपभोग व लग्न लावणें याकरितां हें सांगून "ही परमेश्वराची लेखी आज्ञा होय व ती पाळणें तुम्हांस आवश्यक होय." असें स्पष्ट कुराणांत सांगितलें आहे.) (कुराण—चौथा अध्याय पाहा.)


महंमद पैगंबराच्या मृत्यूनंतर अबूबकर इत्यादि जे खलीफा गादीवर आले त्यांच्या कारकीर्दींत झपाट्यानें धर्मप्रसार झाला. अबूबकरच्या मृत्यूनंतर (६३४), उमर (महंमदाचा मेहुणा) खलीफा म्हणून गादीवर आला. उमरच्या कारकीर्दींतच राज्यविस्तार व धर्मप्रसार जोरानें झाला. ६४३मध्यें हा मरण्यापूर्वीं मेसापोटेमिया, युफ्राटिस खोऱ्याचा सुपीक प्रदेश, बाबिलोन, असीरिया, इराण व इजिप्तचीं राज्यें उमरनें जिंकलीं. ६४०मध्यें इजिप्त जिंकलें; त्याच वेळीं अलेक्झांड्रिया येथील प्रख्यात ग्रंथसंग्रहालय जाळलें गेलें. यावेळीं खलीफानें धर्मप्रसार व राज्यविस्तार कसा केला याबद्दल प्रख्यात इतिहासकार डेव्हिस म्हणतो; "Wherever the Mohammedans went, they invariably offered their foes a choice of three courses: Koran, Tribute, or Sword."

यानंतर उत्तर आफ्रिका जिंकीत हीं सैन्यें ट्रिपोलीपर्यंत पोंचलीं. हा पश्चिम दिग्विजय चालू असतां पूर्वेकडेहि हीं सैन्यें हालूं लागलीं व आरंभीं केवळ लूट नेण्याच्या उद्देशानें जरी तीं आलीं तरी पुढें तिकडील यादवीपेक्षां स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या उद्देशानें स्वाऱ्या होऊं लागल्या व बाबरपासून मुसलमानी राज्याची हिंदुस्थानांत स्थापना झाली. आठव्या शतकाच्या आरंभींच्या कांहीं वर्षांत सर्व उत्तर आफ्रिका जिंकून भूमध्य समुद्र ओलांडून मुसलमानांनीं स्पेन काबीज केला. नंतर फ्रान्समध्येंही हीं सैन्यें घुसलीं. पण ७३२ मध्यें ट्यूरच्या लढाईंत फ्रॅंक लोकांच्या राजाचा मुख्य प्रधान चार्लस मार्टल् यानें मुसलमानी सैन्याचा मोठा पराभव केला व तेव्हांपासून मुसलमानांचें आक्रमण तर थांबलेंच, पण हळूं हळूं स्पेनमधूनहि पिछेहाट झाली. चीनच्या हद्दीपर्यंत हें राज्य पसरत गेलें. अशा या पराक्रमी कालानंतर युरोपची पाळी आली व ख्रिश्चन लोकांनीं मुसलमानी धर्माची लाट थोपवून धरून स्वतःचें आसन स्थिर करीत राजकीय विजयास सुरवात केली. आरंभीं जिथें जिथें मुसलमान गेले तिथें तिथें सर्वच्या सर्व देश त्यांनीं मुसलमानधर्मीय बनविले. पण याला दोनच अपवाद आहेत. एक युरोप व दुसरा हिंदुस्थान. ट्यूरच्या लढाईनंतर युरोपांतील आक्रमण थांबलें. शेवटीं ग्रीक लोकांशीं सारख्या लढाया होऊन कॉन्स्टँटिनोपल जिंकण्याच्या ईर्षेनें व ६९८ मध्यें कार्थेजचा समूळ विध्वंस केल्यानंतर मुसल्मानांना पराक्रम गाजवितां आले नाहींत व ही आलेली अपूर्व भरती ओसरूं लागली. हिंदुस्थानांत जवळजवळ एक हजार वर्षें लढाया व राज्यें करूनहि मुसलमानांना रजपूत, मराठे इत्यादींच्यापुढें शेवटीं मान तुकवावी लागली, व इंग्रजांच्या आक्रमणानंतर हिंदुस्थानांतील सर्वांनाच गुलाम व्हावें लागलें.

आज मुसलमानी राष्ट्रें व हिंदुस्थानांतील मुसलमान यांना पुन्हां सर्व जगभर पाकिस्तान (मुसलमानांचें राज्य)स्थापण्याच्या महत्त्वाकांक्षा वाटत असून त्या दिशेनें त्यांचे प्रयत्न चालू आहेत. हिंदुस्थानांत सुमारें आठ कोट मुसलमान असून सर्व जगभर २०९,०२०,००० इतकी (१९३५ प्रमाणें) मुसलमानधर्मीयांची लोकसंख्या आहे.

मुसलमानी पंथः—मुसलमान धर्मांत बरेच पंथ आहेत. पण हिंदुस्थानांत शिया व सुन्नी हे दोन पंथ प्रख्यात आहेत. महंमद पैगंबराच्या मरणानंतर इस्लामी धर्माचा कोणीतरी मुख्य पुढारी खलीफा असावा असें ठरलें. पण हा खलीफा कोण निवडावयाचा याबद्दल वाद माजले. महंमदाला मुलगा नव्हता. त्यामुळें हा वाद विकोपाला गेला. महंमदाचा जांवई अली हा महंमदाचा जवळचा वारस होता. तेव्हां एका पक्षानें त्यालाच खलीफा करण्याचा हट्ट धरला. उलटपक्षीं इस्लामी धर्माप्रमाणें सर्व लोक सारखेच आहेत तेव्हां सर्वानुमतें पुढारी निवडला पाहिजे असा एक पक्ष

म्हणूं लागला. जन्माचा व नात्यागोत्याचा विचार होतां उपयोगी नाहीं असा या पक्षाचा हट्ट. पण आरंभीं अबूबकर हा महंमदाचा मित्र व अनुयायी पहिला खलीफा म्हणून निवडला गेला. याच्यानंतर उमर व उस्मान हे दोघे खलीफा झाले व चौथा खलीफा अली निवडला गेला. पहिले तीन खलीफा वृद्ध असल्या-मुळें लौकर मरण पावले. अली (महंमदाचा जांवई) मेल्यावर पुन्हां खलीफापदाबद्दल वाद माजला. अलीच्या मुलाला म्हणजे पैगंबराच्या नातूलाच खलीफा केलें पाहिजे असें म्हणणारे लोक म्हणजे शिय्यापंथीय



मक्का येथील ' काबा ' नांवाचा दगड व मशीद. याची मुसलमान लोक पूजा करितात.

लोक होत; व त्यांच्याविरुद्ध-पक्षीयास सुन्नी म्हणत. पुढें या दोन पक्षांत तंटा होऊन शिय्यांचा पुढारी खलीफा हुसेन हा मारला गेला (मोहरम पहा.). मोगल राजा हुमायून हा सुन्नीपंथीय होता; पण पुढें तो इराणच्या बादशहाकडे मदत मागण्यास गेला असतां त्यानें हुमायुनास शिय्याधर्म (पंथ) स्वीकारण्यास भाग पाडलें.

या दोन मुख्य पंथांशिवाय आणखी कांहीं पोटपंथ आहेतच. पैकीं हिंदुस्तानांतील विशेष प्रख्यात पंथ म्हणजे ना. आगाखानांचा व त्यांच्या अनुयायांचा—बोहरी, खोजे इत्यादि लोकांचा—होय. ना. आगाखान हे इस्नायली पंथाचे आहेत.

मुसलमानी सणः—मुसलमानांचे पांच प्रमुख सण आहेत. त्यांचीं नांवें—१ बकरीद, २ मोहरम, ३ रमझान ईद आणि फल कत्र, ४ सबीबरत, ५ आखिरी चाहार संभा. यांपैकीं मोहरम व रमझान यांची माहिती इतरत्र स्वतंत्रपणें दिली असून बाकीच्या तिन्हींची या ठिकाणीं दिली आहे. **बकरीद**—इस्माइलनें केलेल्या दिव्याचें स्मरण म्हणून हा सण पाळतात. अब्राहम उर्फ खलीलूल्ला याला बोलावून त्याला अत्यंत प्रिय वस्तूचा त्याग करून अल्लाला अर्पण कर म्हणून सांगण्यांत आलें. अब्राहमनें आपला आवडता मुलगा इस्माईल याला आणून उभें केलें व त्याचा जीव अल्लाला अर्पण करण्याच्या उद्देशानें त्यानें डोळे बांधून घेऊन इस्माईलच्या मानेवर सुरी ठेविली. तोंच त्याला अल्लाकडून संदेश मिळाला कीं, केवळ परीक्षा पाहण्याच्या उद्देशानें त्याला हें कृत्य करावयास सांगण्यांत आलें होतें. तेव्हां त्यानें आपले डोळे सोडून इस्माईलच्या ठिकाणीं असलेल्या बकऱ्यासच बळी देण्यास सांगितलें. त्यानें डोळे उघडून इस्माईलच्या जागीं असलेल्या [निर्माण झालेल्या ?] बकऱ्यास कापून अल्लाला त्याचा जीव अर्पण केला. अशा तऱ्हेनें इस्माईलचा जीव वाचला. या आनंदाप्रीत्यर्थ तो दिवस सण म्हणून मुसलमान पाळतात. हा झिल हिज्जाचा १०वा दिवस मानतात. बकरा हा मनुष्यांतील नीच वृत्तीचें द्योतक; म्हणून या दिवशीं बकऱ्यांचे बळी देऊन त्यांच्या मांसावर ताव मारण्यास सुरवात झाली आहे. बकऱ्यांच्याबरोबर उंट, मेंढ्या, कोंकरें, शेळ्या यांचेहि बळी पडतात. हिंदुस्थानांतील मुसलमानांना हिंदुधर्मीयांना पूज्य असलेली गाय मारण्यांत मोठा आनंद वाटतो. **सबीबरत**—साबान महिन्याच्या १६व्या दिवशीं हा सण पाळतात. या दिवशीं मानवी कृत्यांचें मोजमाप होतें व त्यांच्या

शिक्षा किंवा बक्षिसें ठरविलीं जातात. **आखिरी चाहार संभा**–सफर महिन्याच्या पहिल्या बुधवारीं हा सण पाळतात. या दिवशीं महंमद पैगंबरानें मरण्यापूर्वीच्या आजारांत थोडें बरें वाटल्यामुळें स्नान (जिवंतपणींचें शेवटचें) केलें होतें. म्हणून या दिवसाचें महत्त्व आहे.

मुसलमानी कायदा:–सांप्रत ब्रिटिश हिंदुस्थानांतील न्यायालयांत शुद्ध मुसलमानी कायद्याचा अम्मल कांहीं विशिष्ट बाबतींतच करण्यांत येतो. विवाह, घटस्फोट, वारसा, जनकत्व, मृत्युपत्र, देणगी, वकफ व अग्रक्रयाधिकार या त्या बाबी होत. हिंदुस्थानांतील प्रान्तिक हायकोर्टांना मुसलमानी कायद्याचा अम्मल करण्याचा अधिकार ब्रिटिश पार्लमेंटच्या कायद्याअन्वयें प्राप्त झाला असून प्रान्तांतील इतर कोर्टांना हे अधिकार त्या त्या प्रान्तांतील विधिमंडळांनीं केलेल्या कायद्यांनीं दिलेले आहेत. परंतु येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं अमूक एका बाबतींत मुसलमानी कायद्याचा अम्मल करावा असा स्पष्ट आदेश प्रांतिक विधिमंडळांनीं केलेल्या कायद्यांत आहेच असें नाहीं. कांहीं ठिकाणीं आहे; कांहीं ठिकाणीं नाहीं. मुंबई इलाख्यांतील राजधानीबाहेरील कोर्टांत मुसलमानी कायद्याच्या अमूक एका भागाचा अम्मल करावा असा स्पष्ट निर्देश नाहीं. म्हणून तेथें त्या कायद्याचा अम्मल सारासार विवेकाला धरूनच करण्यांत येतो. बंगाल, संयुक्त प्रान्त, आसाम, मद्रास या प्रान्तांत विवाह, घटस्फोट, वारसा, वकफ वगैरे बाबतींत मुसलमानी कायदा स्पष्टपणें लागूं केला आहे. परंतु देणगी व अग्रक्रयाधिकार याविषयीं मुसलमानी कायदा लागूं करावा असा स्पष्ट निर्देशहि नाहीं व तो लागूं करूंच नये असाहि आदेश नाहीं. म्हणून त्या बाबतींतल्या कायद्याचा अम्मल करावा कीं करूं नये हें कोर्टानें सारासारविवेकबुद्धीनेंच ठरवावयाचें असतें; परंतु 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या न्यायानें या बाबतींतहि मतभेद होण्याचा फार संभव असतो व या बाबतींतहि तो झाला आहे. उदाहरणार्थ अग्रक्रयाधिकाराचा कायदा हिंदुस्थानांत लागूं करूं नये असा विवेक करूनच मद्रास हायकोर्टनें ठरविलें तर तो कायदा मुंबई इलाख्यांत सारासारविवेकन्यायाला अनुसरूनच लागूं करण्यांत आला आहे. अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, त्या बाबतींत हिंदूंचा हिंदू कायदा व मुसलमानांचा मुसलमानी कायदा बाजूस ठेवून हिंदुस्थानांतील सर्वहि प्रजाजनांना एकाच स्वरूपाचा कायदा लागूं करण्यांत आला आहे. त्या बाबी अपराध, करार व पुरावा या मुख्य होत. या बाबतींतील शुद्ध मुसलमानी कायद्याचा अम्मल अर्थातच हिंदुस्थानांत करण्यांत येत नाहीं.

हिंदुस्थानांत लागूं असलेल्या मुसलमानी कायद्याचा अम्मल हिंदुस्थानांतील सर्व मुसलमान नागरिकांच्या बाबतींत करण्यांत येतो. या कायद्याचा अम्मल जन्मानें व त्याचप्रमाणें धर्मानें मुसलमान असणाऱ्या व्यक्तींच्या बाबतींत करण्यांत येतो. मुसलमानी धर्माचा स्वीकार केलेल्या विधर्मीय व्यक्तीलाहि हा कायदा लागूं होतो. परंतु एखाद्या व्यक्तीचा मुसलमानी धर्माचा स्वीकार करण्यांतील हेतु अप्रामाणिकपणाचा असेल तर त्याला तो कायदा लागूं पडत नाहीं. दाव्यांतील दोन्ही पक्षकार मुसलमान असतील तरच ह्या कायद्याचा अम्मल होतो. क्वचित् प्रसंगीं केवळ प्रतिवादी मुसलमान असला तरीहि मुसलमानी कायदा लागूं होतो.

मुसलमानी कायद्याचें मूळ कुराणांत सांपडतें. याशिवाय सुन्ना, इज्मा व कियास असे मुसलमानी कायद्याचे तीन ग्रंथ आहेत. सुन्नामध्यें पैगंबरांचीं वचनें, उपदेश, कृति व त्यांनीं प्रत्यक्षाप्रत्यक्षरीत्या मान्य केलेल्या गोष्टी इत्यादींचा समावेश होतो. या गोष्टी परंपरेनें आल्या असून अधिकारी व्यक्तींनीं त्यांचा संग्रह केला आहे. इज्मामध्यें पैगंबरानें सांगितलेला कायदा, त्यावर त्याच्या शिष्यांनीं केलेलीं भाष्यें व तदनुसार दिलेले निर्णय यांचा अंतर्भाव होतो. कियासमध्यें सांप्रत ज्याला न्यायाधीशकृत कायदा म्हणतात त्या स्वरूपाच्या कायद्याचा समावेश केलेला आहे. हे निर्णय कोणी न्यायाधिशांनीं दिलेले आहेत असें नाहीं; ते खासगी व्यक्तींनींच दिलेले आहेत. कांहीं मुसलमान पंडितांना कुराण, हादिय अथवा सुन्ना व इज्मा यांतील वचनें विशिष्ट बाबतींत लागूं पडत नाहींत असें आढळून आल्यावरून त्यांनीं या तीहींचा तुलनात्मक अभ्यास करून सादृश्य-प्रमाणानें कांहीं सिद्धान्त प्रस्थापित केलेले आहेत. त्या सिद्धांतांनाच सांप्रतच्या न्यायाधीशकृत कायद्याचें स्वरूप मिळालें आहे. हिंदु कायद्याप्रमाणें मुसलमानी कायद्यांतहि रूढीला विशिष्ट बाबतींत कायद्याची योग्यता व मान्यता मिळाली आहे. अशा प्रकारें कायद्याची मान्यता मिळण्याकरितां रूढी, कुराणांतील वचनें व

कुराणाखालोखाल प्रमाणभूत असलेल्या हादिय अथवा सुन्ना यांतील वचनें यांविरुद्ध असतां कामा नये.

एकाद्या दाव्यांतील एकादा पक्षकार सुनीपंथाचा आहे कीं शियापंथाचा आहे असा प्रश्न उत्पन्न झाला असतां तो सुनी पंथाचाच आहे असें कोर्ट धरून चालतें. या दोन पंथांच्या कायद्यांत पुष्कळ फरक आहे. सुनी व शियापंथीय वारसासंबंधींच्या कायद्यांत तर आमूलाग्र फरक आहे.

मुसोलिनी, बेनिटो (१८८३–):–'फॅसिझम्' या राजकीय पंथाचा जनक व इटलीचा डिक्टेटर. २९ जुलै १८८३ रोजीं फोर्लि प्रांतांतील प्रेडापिओ या गांवीं जन्मला. याचा बाप लोहार होता. घरच्या गरीबीमुळें लहान वयांतच त्याला मोलमजुरी करावी लागली; आणि अशा प्रतिकूल परिस्थितींतच त्यानें इटली व स्वित्सर्लंड येथें विद्या संपादन केली. आरंभीं हा सोशॅलिस्ट होता व त्यामुळें त्याला स्वित्झर्लंडमध्यें हद्दपारी भोगावी लागली होती. १९०२ मध्यें स्वित्सर्लंडमधून इटलींत परत आल्यावर त्याला सोशॅलिस्ट पक्षांत प्रमुख स्थान मिळालें व त्या पक्षाचें 'Avanti' नांवाचें वृत्तपत्र निघत होतें त्याचें संपादकत्वहि त्याला मिळालें. पण १९१४ मध्यें महायुद्ध सुरू होतांच त्यानें इटलीनें युद्धांत प्रत्यक्ष भाग घ्यावा असें आपलें मत प्रतिपादिलें; तेव्हां सोशॅलिस्ट पार्टीमधून त्याची हाकालपट्टी झाली. तेव्हां त्यानें स्वतःचें 'Popolo d' Italia' या नांवाचें वर्तमानपत्र सुरू केलें. मे १९१५ मध्यें इटली युद्धांत पडतांच तो सैनिक म्हणून इटलीच्या सैन्यांत दाखल झाला व कार्पोरलच्या हुद्यापर्यंत चढला. फेब्रुवारी १९१७ मध्यें रणभूमीवर त्याला जबर दुखापत झाली होती. या दुखण्यांतून बरा होतांच त्यानें परत आपलें पत्र हातीं घेतलें. युद्धसमाप्तीनंतर जेव्हां इटलीच्या पदरांत कांहींच पडलें नाहीं. तेव्हां मुसोलिनी चिडला व त्यानें आपली फॅसिस्ट पार्टी स्थापन केली. सोशॅलिस्टचा मुसोलिनी फॅसिस्ट बनला याला अनेक कारणें झालीं, त्यांपैकीं त्या वेळच्या कम्युनिस्ट व सोशॅलिस्ट पुढाऱ्यांची पोकळ बडबड, कर्तव्यशून्यता व प्रत्यक्ष फलदायी कार्याचा अभाव हेंहि एक प्रमुख कारण होतें. आपल्या राष्ट्राचा उदय झाला पाहिजे या एका तीव्र महत्त्वाकांक्षेनें त्या वेळीं तो तळमळत होता. वर सांगितल्याप्रमाणें त्यानें मिलन शहरीं 'फॅसिस्ट पार्टी'ची स्थापना (Fascio di combattimento) केली. आरंभीं त्याला फक्त ४० अनुयायी मिळाले. (ता. २३ मार्च १९१९). त्याच वर्षीं त्यानें निवडणुकीहि लढविल्या; पण त्यांत त्याला फारसें यश आलें नाहीं. पण संपूर्ण राष्ट्रीय धोरण व कम्युनिस्टविरोधी धोरण यांमुळें त्याच्या पक्षाला हळूं हळूं पाठिंबा मिळत गेला व अनुयायी वाढत गेले. पुढें १९२१ मध्यें उदारमतवाद्यांशीं सहकार्य करून त्यानें चेंबरमध्यें ३८ जागा मिळविल्या; पण राज्यसूत्रें हातीं घेण्याचें त्यानें नाकारलें. त्याच्या राष्ट्रीय उद्धाराच्या व राजकारणाच्या नवीन तत्त्वज्ञानाला मध्यंतरीं 'फॅसिझम्' हें नांव मिळालें व त्याच्याकडे अनेकांची दृष्टि वेधली. १९२२ मध्यें पक्षोपपक्षांच्या व राजकीय पुढाऱ्यांच्या वैयक्तिक हेव्यादाव्यामुळें इटलीचें राजकारण व राज्ययंत्र खिळखिळें होऊन एक प्रकारचा गोंधळ निर्माण झाला. रॅडिकल सोशॅलिस्टांनीं (कम्युनिस्ट, मॅक्सिमॅलिस्ट व सिंडिकॅलिस्ट) मोठमोठे कारखाने काबीज केले व संप घडवून आणण्याचा सपाटा चालविला. याच वेळीं नेपल्स येथें फॅसिस्ट पक्षाची वार्षिक सभा भरली होती. त्यावेळीं राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन मुसोलिनीचा पुढचा कार्यक्रम निश्चित झाला होता. त्यानें लगेच आपल्या ४०,००० अनुयायांसह राजधानीवर २८ ऑक्टोबर १९२२ रोजीं मोर्चा नेला. त्यावेळचें सरकार इतकें कमकुवत होतें कीं, त्याला सरकारतर्फे कुठेंच विरोध झाला नाहीं. राजानें मुसोलिनीची वाढती सत्ता पाहून त्याला राजवाड्यांत बोलावून घेऊन त्याच्या हातीं राज्यसूत्रें दिलीं व मुसोलिनी मुख्य प्रधान झाला. सोशॅलिस्टांनीं त्याला विरोध केला, पण फॅसिस्टांनीं सोशॅलिस्टांच्या विरोधाचें कंबरडें मोडून आपला रस्ता साफ करून घेतला. १९२३ मध्यें मुसोलिनीनें निवडणुकीच्या बाबतींत सुधारणा जाहीर करून कमींत कमी एकचतुर्थांश मतें मिळविणाऱ्या पक्षाला निदान दोन तृतियांश जागा मिळाव्या अशी सोय करून दिली. यानंतर एप्रिल १९२४ मध्यें झालेल्या निवडणुकींत त्याच्या पक्षानें निर्विवाद बहुसंख्य जागा काबीज केल्या. १९२५ मध्यें लष्कराच्या सहाय्यानें त्यानें आपण–डिक्टेटर–सर्वाधिकारी झाल्याचें जाहीर केलें. हळूं हळूं लोकशाही पद्धतीला व विरोधी पक्षांना ठेचून काढून तो खराखुरा सर्वाधिकारी बनला. विरोधी पुढाऱ्यांपैकीं कित्येक परदेशीं पळून गेले.

यानंतर त्यानें फॅसिझमच्या तत्त्वानुसार अंतर्गत सुधारणा करण्यास सुरवात केली. या त्याच्या तत्त्वानुसार लोकांच्या स्वातंत्र्यावर जरी मोठा आघात झाला असला, तरी इटलीची नाजूक परिस्थिति त्यानें बरीच सांवरली हें मान्य करावें लागेल. ऑस्ट्रिया हिटलरनें घेईपर्यंत हिटलर व मुसोलिनी यांच्यांत फारसें सख्य नव्हतें. पण पुढें दोघे मित्र (राजकीय) बनून गेले आहेत.

१९३५ मध्यें मुसोलिनीनें अबिसिनीयावर स्वारी केली. लीग ऑफ नेशन्स, फ्रान्स व इंग्लंड यांच्या अर्धवट धोरणामुळें व इटलीविरुद्ध पुकारलेला आर्थिक बहिष्कार, पोंचट धोरणामुळें अयशस्वी ठरल्यामुळें मुसोलिनीची शक्ति विशेष खर्ची न होतां मुसोलिनीनें अबिसिनीया जिंकून ९ मे १९३६ रोजीं अबिसिनीया इटलीला जोडल्याचें जाहीर केलें. या युद्धापासून त्यानें हिटलरशीं विशेष सहकार्य केलें व जर्मनी आणि इटली यांमध्यें विशेष जोरदार स्वरूपाचे राजकीय करार घडूं लागले. या वेळेपासूनच राजकारणांत रोम–बर्लिन करार (Axis policy) व त्याचें महत्त्व वाढूं लागलें. यानंतर हिटलरच्या सहाय्यानें त्यानें स्पेनमध्यें जनरल फ्रँकोच्या नेतृत्त्वाखालीं अंतस्थ यादवी सुरू केली. एप्रिल १९३९मध्यें आल्बेनियावर स्वारी करून त्यानें आल्बेनिया अगदीं थोड्या दिवसांत जिंकला व इटलीच्या साम्राज्यांत खेचला.

हिटलरचें ज्यूविरोधी धोरण, झेकोस्लोव्हाकियावर स्वारी करणें वगैरे गोष्टींबद्दल त्यानें राजकीय धोरणानें पाठिंबा दिला आहे. २९ सप्टेंबर १९३८ रोजीं झालेल्या म्यूनिच–करारावर याची सही आहे. हा करार हिटलरनें मुसोलिनीच्या मध्यस्थीनेंच घडवून आणला होता. पण लौकरच आपल्या पाठिंब्याचा व सख्ख्याचा फायदा हिटलरलाच जास्त मिळत आहे हें पाहून मुसोलिनी मनांत रुष्ट झाला. पण राजकीय परिस्थितीच अशी होऊन बसली कीं, त्याला पूर्वींचेंच सख्यत्वाचें धोरण पुढें चालूं ठेवावें लागलें. २ मे १९३९ रोजीं हिटलर रोममध्यें मुसोलिनीला येऊन भेटला. मुसोलिनीनें फार मोठ्या प्रमाणावर त्याचें स्वागत केलें. दोघांच्या पुष्कळ खाजगी बैठकी होऊन इटली–जर्मनीचें सख्य दृढतर झालें. नंतर ऑगस्टमध्यें यानें हिटलरला जर्मनीच्या राजधानींत–बर्लिनमध्यें–परतभेट दिली. हिटलरनेंहि त्याचें भव्य प्रमाणावर स्वागत केलें.

आतां मुसोलिनीनें फ्रान्सच्या ताब्यांतील जिबूती (Djibouti) व ट्यूनिस हीं मिळण्याबद्दल व सुएझ कॅनॉलच्या व्यवस्थेंत इटलीलाहि स्थान मिळावें म्हणून मागण्या इंग्लंड–फ्रान्सकडे केल्या आहेत. सध्यां सुरूं असलेल्या युद्धाच्या वात्रतींत सध्यां जरी तो तटस्थ असला तरी आंतून जर्मनीला सहाय्य करीत असून मे १९३९ मधील त्याच्या निरनिराळ्या गर्जनावरून तो धोरण पाहून लौकरच युद्धांत उडी घेतल्याखेरीज राहणार नाहीं असें वाटतें. २३ ऑगस्ट १९३९ रोजीं जाहीर झालेल्या रशिया–जर्मनी तहामुळें मुसोलिनी मनांत खट्टू झाला व तेव्हांपासून त्यानें आपलें धोरण अधिक सावधपणें आंखून आपलें महत्त्व तो वाढवून बसला आहे. मुसोलिनी वास्तविक परिस्थिति लक्षांत घेऊन, स्वतःच्या राष्ट्राच्या अंतिम फायद्याकडे लक्ष ठेवून चालणारा, धोरणी व स्वयंभू मुत्सद्दी आहे यांत वाद नाहीं. मुख्य प्रधानपदाशिवाय गृहमंत्री, व लढाई, आरमार, हवाई दल व पूर्व आफ्रिका यांचा मंत्री म्हणून काम पाहातो. त्याला राज्यप्रमुख (" Capo del Governo ") म्हणतात.

डोना रॅचेली नांवाच्या स्त्रीशीं त्याचा विवाह झाला असून विटोरियो (Vittorio) व ब्रूनो (Bruno) नांवाचे दोन मुलगे व एडा (Edda) नांवाची मुलगी असून त्याचा जांवई काउंट सिआनो हा इटलीचा परराष्ट्रमंत्री म्हणून काम पाहातो. त्याचें खासगी जीवन अगदीं साधें असून कोणत्याहि प्रकारची चैन तो करीत नाहीं. अठरा अठरा तास तो राज्यकारभार पाहात असतो. मुसोलिनी बुद्धिमान, स्वसंस्कृतीचा अभिमानी व निश्चयी आणि धाडसी वृत्तीचा आहे.

गेल्या महायुद्धापासून इटलीचें वाढतें दारिद्र्य त्यानें आपल्या धोरणानें बरेंच कमी केलें असून इटलीचा राजकीय दर्जा त्यानें निःसंशय वाढविला आहे. त्याच्या फॅसिझमच्या तत्त्वज्ञानाविरुद्ध किंवा त्याच्या कार्यपद्धतिविरुद्ध कोणाचीं कांहींहि मतें असलीं, तरी त्यानें आपल्या राष्ट्राची खरीखुरी सेवा केली आहे हें सर्वांना मान्यच करावें लागेल.

जून १९४० मध्यें त्यानें जर्मनीच्या बाजूनें इंग्लंड–फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारलें आहे.

मुळा:–कोणत्याहि दिवसांत मुळे होतात; पण हिंवाळा हा ह्याचा मुख्य हंगाम. बीं टाकल्यापासून एक महिन्याच्या आंत जमिनींत मुळें धरतात. म्हणजे

थोडक्या खर्चांत लवकर होणारें हें पीक आहे. ह्याच्या दोन जाती आहेत. (१) पांढरी व (२) तांबडी, पांढरा मुळा मोठा व दिसण्यांत मोहक असतो. तांबडा मुळा लहान असतो. मुळे काढतांना ते न तुटतील अशी काळजी घ्यावी. ह्याच्या पानांचीहि भाजी करितात.

मूर, सर जॉन (१७६१–१८०९):–हा एक ब्रिटिश योद्धा. तो १७७६ सालीं लष्करांत शिरला. अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळीं तो अमेरिकेंत लढला. आयरिश बंडखोरांविरुद्ध १७९८ सालीं, नेदरलंड्समध्यें १७९९ मध्यें व इजिप्तमध्यें १८०२मध्यें लढला. यावेळेपर्यंत योद्धा म्हणून त्यानें मोठें नांव कमाविलें.

१८०६ सालीं मूरला भूमध्य समुद्राकडे पाठविण्यांत आलें. १८०८ सालीं स्वीडनच्या मदतीला तो एक तुकडी घेऊन गेला; पण तो बेत फसला. तेथून परतल्यावर त्याला पोर्तुगालला पाठविण्यांत आलें, व ब्रिटिश सेनेचें आधिपत्य त्याला देण्यांत आलें. परिस्थितीमुळें त्याला कोरुन्ना येथें परत जावें लागलें. तेथें तो फ्रेंचांशीं १८०९ च्या जानेवारींत लढला. त्याला ता. १७ जानेवारी रोजीं प्राणांतिक जखम झाली व तो वारला. त्याच्या शवाचें दफन ज्या परिस्थितींत झालें त्या परिस्थितीची कल्पना रेव्हरंड सी. उल्फ याच्या कवितेवरून येते. त्याची पिट व ड्यूक ऑफ यॉर्क यांच्याशीं दाट मैत्री होती. या उभयतांचें इतर अधिकाऱ्यांप्रमाणें मूरच्या अंगीं लष्करी शिपाई या नात्यानें वसत असलेल्या उत्तम गुणांबद्दल चांगलें मत होतें. त्यानें पायदळाला शिक्षण देण्याचें बहुमोल काम केलें. तो ब्रिटिश सेनेच्या निर्मात्यांपैकीं एक असें म्हणतात. रेव्हरंड सी. उल्फ यांची 'दी बेरीयल ऑफ सर जॉन मूर' (सर जॉन मूरचा दफनविधि) ही कविता आंग्ल भाषेंतील अतिशय लोकप्रिय कवितांपैकीं एक आहे.

मूर, टॉमस (१७७९–१८५२):–हा आयरिश कवि व चरित्रकार एका वाण्याचा मुलगा होय. त्याचा जन्म डब्लिन येथें झाला. त्याचें शिक्षण ट्रिनिटी कॉलेजमध्यें झालें. तो १७९९ सालीं लंडनला गेला. त्याच्या छाप पाडणाऱ्या व्यक्तित्वामुळें व असामान्य बुद्धिमत्तेमुळें लंडन शहरीं व इतरत्र नामांकित लोक त्याचे मित्र झाले. 'Poetical works of the Late Thomos Little' या नांवाचा कवितासंग्रह १८०१सालीं त्यानें प्रसिद्ध केला. हा १८०३ सालीं बर्मुडा येथील अॅडमिरॅलिटी कोर्टाचा रजिस्ट्रार झाला; परंतु आपल्या जागीं दुसरा इसम नेमून तो इंग्लंडला परतला.

१८०६ सालीं ओड्स अँड एपिसल्स हें पुस्तक प्रसिद्ध झालें. यांतच कॅनेडियन बोट–सॉंग आहे. या पुस्तकावर एडिंबरो रिव्ह्यू मध्यें कडक टीका आली; यामुळें संपादक जेफ्रे यांच्याशीं त्याचें द्वंद्वयुद्ध झालें; पण तें अपुरेंच राहिलें. यानंतर त्या दोघांची गाढ मैत्री झाली. १८०७ सालीं आयरिश मेलडीजच्या प्रकाशनास सुरवात झाली; त्याला सर जॉन स्टीव्हन्सनच्या संगीताची जोड मिळाल्यामुळें मूरची प्रसिद्धि होऊन नांव मिळालें. मूरच्या इतर कवितांप्रमाणेंच हीं कवनें सुंदर व श्रुतिमनोहर आहेत. पण त्यांतील पुष्कळ कृत्रिम असून त्यांच्यामध्यें भावनांची खोली कमी आहे. या आयरिश मेलडीजपासून मूरला २५०० डॉलरचें ठराविक वार्षिक उत्पन्न मिळूं लागलें व १८१७ सालीं प्रसिद्ध झालेल्या लाला रूख या कवितेपासून १५००० डॉलर मिळूं लागले. या बाबतींत त्याचा क्रम बायरनच्या खालोखाल लागतो. पण मूरच्या बर्मुडा येथील प्रतिनिधीनें ३०००० डॉलरची अफरातफर केल्यामुळें त्याला ठोकर बसली व पॅरिसमध्यें आश्रयार्थ जावें लागलें. तेथें १८२२ पर्यंत राहून तो लंडनला परत आला. त्यानें आपलें उर्वरित आयुष्य विल्टशायरमधील स्लॉपरटन कॉटेजमध्यें घालविलें. त्यानें १८११ सालीं बेसी डाइक या नटीशीं विवाह केला.

मूरच्या आयुष्याच्या उत्तरार्धांत प्रसिद्ध झालेला महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे बायरनचें चरित्र होय. हा ग्रंथ १८३० सालीं प्रसिद्ध झाला. गुणदोषविवेचनाच्या दृष्टीनें हा ग्रंथ तितकासा चांगला नाहीं, पण चरित्र म्हणून प्रमाणभूत आहे. त्यानें शेरीडनचें चरित्र १८२५ सालीं व लॉर्ड एडवर्ड फिट्झेरल्डचें १८३१ सालीं प्रसिद्ध केलें. त्याला १८३५ सालीं १५००० डॉलर साहित्यवृत्ति व १८५० सालीं सिव्हिल लिस्ट पेन्शन मिळालें. या कवीचें चरित्र अर्ल रसेल यानें लिहिलें आहे.

मूर्च्छा:–'बेशुद्धि' शब्द पहा.

मूर्तिपूजा:–मूर्तिपूजा हें हिंदुधर्माचें वैशिष्ट्य आहे. हिंदुधर्माचे मूळ ग्रंथ जे वेद त्यांत आतां रूढ असलेली मूर्तिपूजा सांगितलेली नाहीं; यामुळें मूर्तिपूजा अवैदिक आहे असें कांहीं विद्वानांचें मत आहे. आर्य-

समाजाचे संस्थापक महर्षी दयानंद सरस्वती यांनीं आपल्या 'सत्यार्थप्रकाश' या ग्रंथांत मूर्तिपूजेचा अवैदिक म्हणून निषेध केला आहे. त्यांचे मतें ईश्वर एक आहे. तो दिव्य गुणकर्म, स्वभाव व विद्या यांनीं युक्त आहे. त्याच्या आश्रयानें पृथ्वी व सूर्यादि लोक राहिले आहेत. तो सर्वव्यापी असून देवतांचाहि देव आहे. त्याचें ध्यान करणें व त्याचे गुण आपल्या अंगीं बाणण्याचा प्रयत्न करणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे. उपासनेकरितां ईश्वराच्या ठिकाणीं कोणा दुसऱ्याची स्थापना करून पूजा करूं नये. 'प्रतीकांमध्यें ब्रह्मोपासना करणें योग्य नव्हे; कारण प्रतीक ब्रह्म नव्हे.' ब्रह्माहून भिन्न वस्तूमध्यें ब्रह्मदृष्टि करणें याला प्रतीकोपासना म्हणतात. अशा उपासनेचा निषेध शास्त्रांत केला आहे. याकरितां प्रतीकामध्यें ब्रह्मदृष्टि न करतां ब्रह्मामध्येंच केली पाहिजे. याप्रमाणें दयानंदजींचें मत आहे.

उलटपक्षीं एकेश्वरवाद मानूनहि मूर्तिपूजेची आवश्यकता प्रतिपादिली जाते. मूर्तिपूजेच्या समर्थनार्थ पुढील महत्त्वाचे मुद्दे सांगतां येण्यासारखे आहेतः–(१) वेदकालीं मूर्तिपूजा आजच्या स्वरूपांत नसली तरी सूर्य, अग्नि, सोम, मित्र, वरुण इत्यादि देवतांची पूजा अथवा त्यांच्या प्रीत्यर्थ यज्ञ होत असत. (२) परमेश्वराचें निराकार अथवा जगदाकार स्वरूप कल्पून त्याचें ध्यान करणें कठीण आहे. अगदीं सामान्य मनुष्याला तर तें साधणें कठीणच. भगवद्गीतेंत 'अव्यक्त ब्रह्माची उपासना करणाऱ्या देहधारी मनुष्यांना उपासनेचे कष्ट अधिक पडतात' असें म्हटलें आहे. ज्ञानी, योगाभ्यासी अशा लोकांना मूर्तिपूजेची आवश्यकता नसली तरी अशा माणसांची संख्या कमीच असणार. निर्गुण ब्रह्म सामान्य मनुष्याच्या उपासनेचा विषय होऊं शकणार नाहीं. ज्यांच्यावर मन स्थिर करतां येईल व ज्यांच्या योगानें ईश्वरविषयक मनोवृत्ति जागृत होतील अशा साधनांची आवश्यकता आहे. सगुण अशी परमेश्वराची सुंदर व मनोवेधक मूर्ति हाच उपासनेचा विषय. (३) मूर्तिपूजक दगडाची अगर तांब्यापितळेच्या मूर्तीची उपासना करतात हा आक्षेप फोल आहे. उपासक मूर्तीची उपासना करीत नसून परमेश्वराची उपासना करतो. मूर्ति म्हणजे ईश्वर नव्हे; त्याचें प्रतीक आहे, अशी त्याला जाणीव असतेच. तो आपणास आवडणाऱ्या एकाद्या ईश्वराच्या दैवी स्वरूपांत व्यक्त झालेलें ईश्वरी प्रेम, सौंदर्य व शक्ति यांची उपासना करतो. (४) वेदांत मूर्तिपूजा नसली तरी त्यांत दिलेल्या परमेश्वराच्या वर्णनाला अनुसरूनच त्यांच्या मूर्ती बनविण्यांत आल्या आहेत. प्रत्येक मूर्तींत वेदांतील एखादें तत्त्व ग्रथित झालें आहेच. हें विधान शास्त्रशुद्ध मूर्तीपुरतेंच मर्यादित आहे. (५) परमेश्वराच्या या जगांत नित्य अनुभवास येणाऱ्या भिन्न भिन्न शक्तींचीं चित्रें म्हणजेच मूर्ती होत. अज्ञान्याला भक्ती व ज्ञान्याला ज्ञान देण्यासारखी रम्य कल्पकता प्रत्येक शास्त्रीय मूर्तींत आहे. उदाहरणार्थ, गणपति, श्रीविष्णू, दत्तात्रेय, शंकर, सूर्य, सरस्वती इत्यादि शास्त्रीय मूर्तींत अनेक वेदान्तप्रमेयें ग्रथित केलीं आहेत. (६) तत्त्व जाणून मूर्तिपूजा करणें कल्याणकारकच आहे. मूर्तिपूजा वाईट असती तर तुळशीदास, एकनाथ, रामदास, तुकाराम, ज्ञानदेव वगैरे संतांनीं तो मार्ग अनुसरला नसता. तुकाराम महाराजांना पांडुरंगाच्या काळ्या दगडी मूर्तींतच परब्रह्म सांपडलें. (७) ज्या धर्मांत मूर्तिपूजेचा निषेध स्पष्टपणें केला आहे त्यांतहि प्रतीकें आहेतच. गौतमबुद्ध ईश्वर न मानणारा; पण त्याला स्वतःलाच ईश्वराचा अवतार मानण्यांत येऊन त्याच्या मूर्तींची पूजा होऊं लागली. जैनधर्म देव मानीत नाहीं; तरी तीर्थंकरांच्या अनेक मूर्तींचें पूजन करण्यांत येतें. मुसलमानी धर्मांतील ताबूत, मशिदी हे प्रतीकपूजनाचेच प्रकार आहेत. ख्रिश्चनाचा क्रॉस हेंही एक प्रतीकच आहे.

मूलतत्त्वें:–रसायनशास्त्रांत जगांतील सर्व पदार्थांचे दोन भाग केलेले आहेत. ज्यांच्यापासून घटक निघत नाहींत असे पदार्थ, व ज्यांच्यापासून घटक निघतात असे पदार्थ, हे ते दोन भाग होत. लोखंड, सोनें, गंधक, आयोडीन इत्यादि पदार्थ असे आहेत कीं त्यांच्यापासून इतर कोणताहि पदार्थ निघत नाहीं. त्याच्या उलट पाणी, सोडा, मोरचूत, चुना वगैरे पदार्थ असे आहेत कीं योग्य प्रयोग केले असतां त्यांचें पृथक्करण होऊं शकतें व त्यांपासून अगदीं भिन्न असे पदार्थ निघतात. पहिल्या प्रकारच्या पदार्थांना 'मूल पदार्थ' व दुसऱ्या प्रकारच्या पदार्थांना 'संयुगें' म्हणतात. मूल पदार्थापासून त्याच्याशिवाय दुसरा अधिक साधा पदार्थ मिळूंच शकत नाहीं. अगर तो अमूक दोन पदार्थ मिळून झाला आहे असें दाखवितां येत नाहीं. म्हणून त्याला मूलतत्त्व म्हणतात. या मूलतत्त्वांपैकीं दोन किंवा अधिक तत्त्वांचा संयोग होऊन त्यापासून भिन्न गुणधर्मांचे पदार्थ मिळतात त्यांनाच संयुग म्हणतात.

या मूलतत्त्वांच्या सामान्य गुणधर्मांचें परीक्षण करून रसायनशास्त्रज्ञांनीं त्यांचे दोन प्रकार मानिले आहेत. धातुवर्ग व अधातुवर्ग. ज्या मूलतत्त्वांत जडपणा, चकाकी, विद्युत् व उष्णता यांचें शीघ्रवाहक असणें इत्यादि गुणधर्म असतात त्यांचा समावेश धातुवर्गांत केलेला आहे. परंतु या वर्गामध्यें कांहीं गुणांच्या बाबतींत अपवाद असणारे धातू आहेत. धातू सामान्यत: नेहमींच्या उष्णतामानावर घनरूप असतात. पारा नेहमींच्या उष्णतामानावर द्रवरूप असतो. धातूंचे पत्रे काढतां येतात व तारा बनवितां येतात. पण जस्त अतिशय ठिसूळ असतें. ज्या मूलतत्त्वांचे गुणधर्म धातूंच्या गुणधर्मांप्रमाणें नाहींत त्यांचा अधातुवर्गांत समावेश केला आहे. धातुवर्ग व अधातुवर्ग यांत पुढीलप्रमाणें मुख्य फरक आढळून येतो:—

(१) कांहीं अपवाद (पारा) खेरीज करून धातू घनरूप असतात. अधातुवर्गांतील मूलतत्त्वें तीन्ही अवस्थांत सांपडतात (२) धातुवर्गाचें विशिष्टगुरुत्व १ पेक्षां अधिक असतें (अपवाद सोडियम). अधातुवर्गाचें वि. गु. १पेक्षां कमी असतें. (३) सामान्यत: धातु पारदर्शक नसतात; पुष्कळ अधातु पारदर्शक असतात. (४) धातु प्रसरणशील असतात (अपवाद जस्त); अधातु प्रसरणशील नसतात. (५) धातू उष्णतेचे व विद्युत्चे शीघ्रवाहक आहेत; अधातु तसे नाहींत. (६) पुष्कळ धातु आम्लांत विरघळतात; सामान्यतः अधातु आम्लांत विरघळत नाहींत.

आतांपर्यंत ९२ मूलतत्त्वें सांपडलीं आहेत. त्याहून अधिक मूलपदार्थ आहेत; परंतु त्यांचे एक दोन खेरीज करून गुणधर्म परस्परांशीं इतके सारखे आहेत कीं त्यांना निरनिराळे मूलपदार्थ समजावें कीं नाहीं त्याबद्दल निश्चित मत देतां येत नाहीं. भूपृष्ठावरील मूलतत्त्वांची संख्या अगदींच थोडी आहे.

पुढें भूपृष्ठावरील मूलतत्त्वांचें प्रमाण दिलें आहे:—

नांव	शेंकडा प्रमाण
ऑक्सिजन	४६·४३
सिलिकॉन	२७·७७
अल्युमिनियम	८.१४
लोह	५·१२
कॅल्शम	३·८३
सोडियम	२·८५
पोटॅशियम	२·६०
मॅग्नेशियम	२·०९
इतर	१·३७
एकूण	१००·००

मूळव्याधः—मलद्वाराचे सभोंवतीं व आंतील बाजूस शिरांची बारीक जाळी पसरलेली असते. त्यांतील कांहीं शिरा मोठ्या होतात तेव्हां त्यांना मूळव्याध म्हणतात.

कारणें:—

(१) मलावरोध.
(२) यकृताचे व काळीजाचे रोग.
(३) मोठ्या आंतड्याच्या नलिकेंतील ग्रंथी.
(४) एकाच जागीं जास्त वेळ बसून राहणें.
(५) म्हातारपण.
(६) गरोदरपण अगर गर्भाशयाच्या व्याधि.

गुदद्वाराच्या भोंवतालच्या अगर त्यांतील रक्तनळ्या सैल होऊन मोठ्या झाल्या म्हणजे मूळव्याध होते. शौचाचे वेळीं स्वाभाविकपणें कुंथावें लागतें, त्यावेळीं साहजिकच रक्तनळ्यांवर दाब बसून त्या हळूं हळूं मोठ्या होऊं लागतात आणि सभोंवतीं त्यांना आधार नसल्यामुळें सैल पडतात आणि मग त्यांनाच मोड म्हणतात.

प्रकार—अंतर अर्श व बाह्य अर्श (मूळव्याध). गुदद्वाराचे भोंवतीं असणाऱ्या मोडास बाह्य अर्श म्हणतात. घर्षणानें त्यांच्यावर लवकर जखम होते आणि मग ती बरीच दुखते आणि कित्येक वेळां असह्य वेदना येऊं लागतात. गुदद्वाराचे आंत होणाऱ्या मोडास अंतर अर्श म्हणतात. यांत कळ असत नाहीं. रक्तस्राव हाच त्याचा मोठा विशेष आहे आणि त्यानेंच रोग्याचें प्रथम लक्ष वेधिलें जातें.

औषधोपचार—ज्या कारणांनीं मूळव्याध होते तें कारण नाहींसें करण्याकरितां योग्य डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

घरगुती उपाय—रोज फक्त हलका व्यायाम घ्यावा. घोड्यावर, सायकलीवर बसणें वर्ज्य करावें. जाग्रण करूं नये. कोठा साफ ठेवण्यासाटीं एरंडेल तेल अगर सोनामुखीचा सौम्य रेच घ्यावा. तिखट व मसाला वर्ज करावा. या रोगावर ऑपरेशनशिवाय दुसरा खात्रीलायक इलाज नाहीं.

आयुर्वेदिक उपाय—वातादि दोषांनीं गुदद्वारांत निरनिराळ्या आकाराचे जे मोड उत्पन्न होतात, त्यांस मूळव्याध म्हणतात. **उपचार**—कुचल्याची बी लोण्यांत उगाळून मोडाला लावावी. द्राक्षासव, शर्करासव, सुरण-मोदक ह्या औषधांचा पोटांत देण्याकडे उपयोग चांगला होतो. सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रकमूळ, वावडिंग, तीळ, हिरडेदळ, निब्बा यांचें चूर्ण गूळ मिळवून घेतल्यानें कार्यभाग होतो.

मृगजलः—हा एक प्रकारचा दृग्भ्रम आहे. हा दृग्भ्रम हवेच्या निरनिराळ्या थरांचें उष्णतामान भिन्न असल्या-मुळें हवेच्या दार्ढ्याचें प्रमाण कमीजास्त झालें असतां होणारें परावर्तन व वक्रीभवन यांमुळें उत्पन्न होतो. ओसाड प्रदेश व समुद्र यांवर पूर्णस्वरूपाचें मृगजल निर्माण होतें. ओसाड प्रदेशावरील मैदानावर सरोवर असल्याचा भास होतो; समुद्रावर वारंवार जहाजाच्या उलट्या प्रतिमा दिसतात.

हा दृग्भ्रम कां बरें निर्माण होत असावा? प्रकाश-किरण जेव्हां एका माध्यमामधून दुसऱ्या माध्यमामध्यें जातो तेव्हां तो मूळच्या रेषेशीं कोन करून वक्र होतो. प्रकाशकिरण हवेंतून पाण्यांत गेला असतां असेंच वक्री-भवन होतें. म्हणूनच हवेच्या कमीअधिक दार्ढ्याच्या वेग-वेगळ्या थरांमधून जाणाऱ्या प्रकाशकिरणांचें वक्रीभवन होतेंच होतें. पृथ्वीजवळील हवेचें दार्ढ्य पृथ्वीपासून लांब असलेल्या हवेपेक्षां अधिक असतें. याप्रमाणें वेगवेगळ्या ठिकाणच्या हवेच्या दार्ढ्यांत कायम स्वरूपाचा फरक असतो. या कायम फरकांत, वालुकामय प्रदेश व पर्वतांच्या दऱ्या यांतून तापलेली हवा वर जात असतां व उंचीवरील थंड हवेचे प्रवाह खालीं येत असतां, उद्भवणाऱ्या दार्ढ्यांतील आगंतुक स्वरू-पाच्या फरकाची भर पडून विपरीत दृश्यें दिसूं लाग-तात व मृगजल निर्माण होतें.

मेसापोटेमियांत वाळूच्या पृष्ठभागावरील तापलेली हवा पसरते, व वक्रीभवनगुणक अथवा वातावरणाच्या अत्यंत खालच्या थराची वक्रीभवनाची शक्ति कमी होते. नेहमींच्या परिस्थितीच्या उलट परिस्थिति निर्माण होते. कांहीं अंतरापर्यंत हवेचें दार्ढ्य जसजसें वर जावें तसतसें कमी न होतां वाढत जातें. पुढें नेहमींची परिस्थिति फिरून उत्पन्न होऊन दार्ढ्य व वक्रीभवन-शक्ति हीं कमी होऊं लागतात. म्हणून नैसर्गिक प्रमाणाबाहेरच्या वातावरणामधून एखादी वस्तू पाहिली असतां ती प्रकाशकिरणांच्या दोन गटांनीं दिसते. यांतील एक गट पृथ्वीजवळून क्षितिजाशीं बहिर्गोलवक्र होऊन जातो. दुसरा गट पृथ्वीपासून वर उंचीवरून क्षितिजाशीं अंतर्गोल होऊन जातो. याप्रमाणें पदार्थ जणू काय वाळूंत प्रतिबिंबित झालेले दिसतात.

मृतासनः—जमिनीवर पाय पसरून उताणें निजावें. हात शरीरालगत कमरेच्या बाजूनें पूर्ण ताणावे. मान सरळ बसवावी. उशास कांहीं घेऊं नये. सर्व शरीर पूर्ण शिथिल करावें. श्वासक्रिया इतकी मंद चालवावी कीं पूरकरेचकांचा अल्पमात्र ध्वनी स्वतःस ऐकूं येऊं नये. शारीरिक व मानसिक सर्व व्यापार अगदीं शिथिल करावे. दृष्टि भ्रूमध्यावर अगर नासाग्रीं ठेवावी.

या आसनानें श्रम करून आलेला शिणोठा पूर्ण नाहींसा होऊन सर्व थकवा जाऊन शरीर व मन पुन्हां ताजेंतवानें होतें. ४।५ आसनें झाल्यावर २।३ मिनिटें या आसनावर राहण्याचा सराव करावा.

मृत्युपत्रः—आपल्या पश्चात् आपल्या मिळकतीची विल्हेवाट अमूक अमूक प्रकारें व्हावी म्हणून एकाद्या व्यक्तीनें कायदेशीररीत्या व्यक्त केलेली इच्छा. मृत्युपत्र करण्याची कल्पना रोमन कायद्यांतून घेतली आहे. मृत्यु-पत्रांत व्यक्त केलेल्या इच्छेचा अम्मल मृत्युपत्र करणा-राच्या मृत्यूनंतरच व्हावयाचा असतो. मृत्युपत्र करणारा आपल्या हयातींत एकदां केलेलें मृत्युपत्र रद्द करूं शकतो, त्यांत फरक करूं शकतो अगर त्याऐवजीं दुसरें करूं शकतो. एकाद्यानें एकापाठीमागून एक अशीं अनेक मृत्युपत्रें केलीं, तर कालानुक्रमानें शेवटीं झालेल्या मृत्युपत्राचाच अम्मल कायद्याप्रमाणें करावयाचा असतो. त्यापूर्वीचीं मृत्युपत्रें रद्दच समजावयाचीं. मृत्युपत्र हा कागद मृत्युपत्र करणाऱ्याच्या मृत्यूपर्यंत कायद्यानें निश्चित झालेला नसतोच; तो परिवर्तनशील असतो. मृत्युपत्राविषयींचा कायदा 'दी इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५' यांत सांगितला आहे. मुसलमान खेरीज करून कोणाहि नागरिकाला मृत्युपत्र करावयाचें असेल तर त्यानें या कायद्यांत सांगितल्या प्रकारेंच तें केलें पाहिजे. विवेचक शक्ति असलेल्या कोणाहि सज्ञान व्यक्तीला मृत्युपत्र करण्याची कायदेशीर पात्रता आहे. विवेचक शक्ति असणें म्हणजे आपण जें कांहीं करतों त्याचें स्वरूप व त्याचा आपल्या हितावर होणारा परिणाम समजण्याची मानसिक पात्रता असणें. कायद्याच्या दृष्टीनें अज्ञान असलेल्या व्यक्तीला, त्याचप्रमाणें वेड्या

व्यक्तीला वेडाच्या अवस्थेंत मृत्युपत्र करतां यत नाहीं. वार्धक्यानें अथवा दुखण्यानें ज्याची मानसिक शक्ति इतकी अधु झालेली आहे कीं, आपण काय करतों हें कळण्याची पात्रता नाहीं त्यानें केलेलें मृत्युपत्र कायदेशीर नाहीं. मृत्युपत्र लेखी केलें पाहिजे, व त्यावर तें करणाराची सही अगर खूण पाहिजे व त्यावर निदान दोन साक्षीदारांच्या सह्या पाहिजेत. मृत्युपत्र करणारानें मृत्युपत्रावरील सही अगर खूण या साक्षीदारांसमक्ष केली असेल तर ठीकच; त्यानें ती तशी केली नसेल व अगोदर सही करून नंतर त्या साक्षीदारांना आपण सही केल्याचें सांगितलें असेल व त्यांनीं त्याचे सांगण्यावरून त्यावर आपली साक्ष घातली असेल तरी तें मृत्युपत्र कायदेशीर होतें. प्रत्यक्ष युद्धांत गुंतलेला सैनिक, वैमानिक अथवा आरमारांतील नोकर याला मृत्युपत्र करावयाचें असेल तर तें लेखीच केलें पाहिजे असें नाहीं. त्याच्या बाबतींत कायद्याचे नियम बरेच सैल आहेत.

मुसलमानी कायदा–'इंडियन मेजॉरिटी ॲक्ट १८७५' याप्रमाणें सज्ञान झालेला व समज असलेला कोणीहि मुसलमान आपली मिळकत मृत्युपत्रानें देऊं शकतो. मृत्युपत्र लेखी असलेंच पाहिजे असें नाहीं. एकाद्या मुसलमानानें आपल्या वारसाला मृत्युपत्रानें दिलेली देणगी इतर वारसांच्या संमतीविना कायदेशीर होत नाहीं. अमुक एक मनुष्य वारस आहे कीं नाहीं हें मृत्युपत्र झाल्याची वेळ लक्षांत घेऊन न ठरवितां मृत्युपत्र करणाराच्या मृत्यूचीच वेळ लक्षांत घेऊन ठरविलें पाहिजे. कोणीहि मुसलमान आपल्या मिळकतींतील एकतृतीयांशाहून अधिक मिळकत मृत्युपत्रानें देऊं शकत नाहीं. एकतृतीयांशाहून अधिक मिळकत दिली असेल तर मृत्युपत्र करणाराच्या वारसांची अशा बाबतींत संमति पाहिजे. मृत्युपत्रानें या कायदेशीर एकतृतीयांशाहून जास्त देणगी दिली असेल व वारस आपली संमति नाकारतील तर ती देणगी रद्द होते.

मृत्युपत्राच्या बाबतींत सुनी व शिया कायदा यांतील फरक पुढील प्रमाणें:—

(१) सुनी कायद्याप्रमाणें एका वारसाला मृत्युपत्रानें दिलेली देणगी इतर वारसांच्या संमतीविना कायदेशीर ठरत नाहीं. शिया कायद्यानुसार मृत्युपत्रानें एकाद्या वारसाला कायदेशीर एकतृतीयांशाहून अधिक मिळकत दिली नसेल तर इतर वारसांची संमति लागत नाहीं; या कायदेशीर एकतृतीयांशाहून अधिक मिळकत एकाद्या वारसाला दिली असेल तरच इतर वारसांची संमति लागते. (२) सुनी कायद्यानुसार ही संमति मृत्युपत्र करणाऱ्याच्या मृत्यूनंतरच देण्यांत आली पाहिजे. शिया कायद्याप्रमाणें, वारस नसणाऱ्याला कायदेशीर एकतृतीयांशाहून अधिक मिळकत मृत्युपत्रानें दिली असेल तर वारसांची संमति आवश्यक. ती मृत्युपत्र करणाऱ्याच्या हयातींत दिली तरी चालेल. इतर बाबतींत त्याचे मृत्यूनंतरच संमति दिली पाहिजे. (३) मृत्युपत्र करणाऱ्याचे हयातींत मृत्युपत्रदानाधिकारी मृत्यू पावला तर मृतलेखार्पित दान सुनी कायद्याप्रमाणें रद्द होतें. अशा बाबतींत शिया कायद्याप्रमाणें मृतलेखार्पित दान रद्द होत नाहीं; तें मृत्युपत्रदानाधिकाऱ्याच्या वारसाकडे जातें. (४) मृत्युपत्र करणाऱ्याचा वध करणाऱ्याला दिलेलें मृतलेखार्पित दान रद्द समजावें; मग हा वध बुद्धिपुरःसर केलेला असो अथवा अबुद्धिपुरःसर केलेला असो. शिया कायद्याप्रमाणें हा वध बुद्धिपुरःसर केलेला असेल तरच दान रद्द होतें. (५) मृत्युपत्र करणाऱ्याचे हयातींत मृत्युलेखार्पित दानाचा स्वीकार करणें कायदेशीर नाहीं; शिया कायद्याप्रमाणें असा स्वीकार कायदेशीर ठरतो.

मेः–हा इंग्रजी वर्षाचा पांचवा महिना आहे. प्राचीन रोमन कॅलेंडरमध्यें वर्ष मार्चपासून सुरू होतें. तेव्हां हा तिसरा महिना होता. मे या शब्दाची उत्पत्ति वसंत ऋतूची रोमन देवता जी माइया (Maia) यापासून झाली असें कांहींचें मत आहे; तर कांहींचें म्हणणें मे हा शब्द 'मेजॉरिस' (Majores) म्हणजे 'म्हातारे' या लॅटिन शब्दापासून झाला आहे. परंतु मे म्हणजे आयुष्याचा वसंतकल; मे हा वसंत ऋतूचा मध्यमास; मे म्हणजे तारुण्य; जेव्हां एखादा तरुण एखाद्या म्हाताऱ्या स्त्रीशीं लग्न करतो तेव्हां May is said to marry December या इंग्लिश भाषेंतील वाक्यप्रचारावरून पाहिलीच व्युत्पत्ति अधिक समाधानकारक वाटते. याचे दिवस ३१ आरंभापासून आहेत तेच आहेत.

उत्तरगोलार्धात मे महिना म्हणजे वसंतऋतूचा ऐन भर असतो. यावेळीं फुलें, फळें, पानें व गवत हीं अत्यंत नयनमनोहर रंगांनीं नटलेलीं असतात व नुकत्याच निघून गेलेल्या हिंवाळ्याची आठवणहि होत नाहीं. दिवस मोठे व ऊबदार होतात, सृष्टि सुरम्य

दिसते, पक्ष्याना कंठ फुटतात, लोक आनंदांत असतात व अनेक उत्सव करतात. या महिन्यांतील फार मोठा उत्सव म्हणजे मेच्या १ तारखेस येणारा 'मे डे'चा उत्सव होय. रोमन लोक फुलांची देवता 'फ्लोरा' हिच्या प्रीत्यर्थ हा उत्सव घराबाहेर सुरम्य रानांत जाऊन २८ एप्रिल ते ३ मेपर्यंत करीत असत. यादिवशीं खेड्यांतील सर्वांत सुंदर मुलीस 'मेची राणी' करीत, तिला फुलांचा मुकुट घालीत व तिचे अध्यक्षतेखालीं मे महिन्यांतील सर्व उत्सव, नाच, गाणीं वगैरे होत. खेड्याच्या हिरवळीवर एक उंच काठी रोवीत. यास 'मे पोल' असें म्हणत. तो फुलांनीं शृंगारीत व त्यांसभोंवतीं सर्व लोक गाणीं म्हणत, नाच करीत आनंदांत दिवस घालवीत. श्रीकृष्णाच्या रासक्रीडेसारखाच हा उत्सव आहे. प्युरिटन लोकांनीं हा उत्सव बंद करण्याचा प्रयत्न केला; पण अद्यापहि इंग्लंडच्या बऱ्याच भागांत शाळांतून हा उत्सव करतात. फ्रान्स व जर्मनीमध्यें 'मे पोल्स'चा नाच अद्यापहि करतात. इटलीमध्यें १ मेच्या दिवशीं सकाळीं हिरव्या पानांचीं तोरणें बांधून घरांचीं दारें सुशोभित करण्याची चाल आहे.

पाश्चात्य देशांत व समशीतोष्ण कटिबंधांत वसंत ऐन भरांत असला तरी महाराष्ट्रांत निराळीच परिस्थिति असते. दिवस मोठा झाल्यानें, एप्रिलपासूनच उकाडा व्हावयास सुरवात होते. मेमध्यें तर उष्णतामान कमालीचें वाढतें, वारा असा मुळींच वहात नाहीं. सर्व तळीं, नद्या, डबकीं आटून शुष्क होतात. गवत करपून जातें व सर्व सृष्टि वैराण दिसते. शेतकरी शेतें नांगरण्यांत गुंतलेले दिसतात. चैत्रांत पडणारे गारांचे पाऊसहि पडण्याचें बंद होतें व उन्हाच्या तापानें जीव अगदीं हैराण होऊन जातो. केव्हां पाऊस पडेल व केव्हां गारवा वाटेल असें होऊन जातें. म्हणून या महिन्यांत महाराष्ट्रांतील सर्व शाळांस व कचेऱ्यांस सुट्टी असते. सरकारी अधिकारी व श्रीमंत लोक महाबळेश्वर, मसूरी, उटकमंडसारख्या थंड हवेच्या ठिकाणीं जाऊन राहतात. आंबे, फणस, बोरें, जांभळें, करवंदें इत्यादि फळें मात्र या महिन्यांत विपुल येतात. या महिन्यांत हिंदूंचा बहुधा वैशाख महिना येतो. तेव्हां अक्षय्यतृतीया, नृसिंहजयंती, कूर्मजयंती, नारदजयंती, श्रीशिवछत्रपति जन्मदिन, श्रीमदाद्यशंकराचार्य जन्मदिन, पुण्यदिन, नृसिंह नवरात्र, श्रीसिद्धेश्वर रथोत्सव इत्यादि उत्सव व जन्मदिन या महिन्यांत साजरे केले जातात.

जोसेफ ॲडिसन, जॉर्ज इन्नेस, रॉबर्ट पीयरी, रॉबर्ट ब्राउनिंग, गॅब्रिएल, फॅरनहीट, फ्लॉरेन्स नायटिंगेल, एडवर्ड जेनर, राणी व्हिक्टोरिया, डॅांटे इत्यादि थोर विभूतींचे जन्महि याच महिन्यांत झालेले आहेत.

मेकॉले, टॉमस बॅबिंग्टन (१८००-१८५९):- हा ब्रिटिश इतिहासकार लीस्टरशायरमधील रोथ्ले टेंपल येथें ता. २५ आक्टोबर १८०० रोजीं जन्मला. त्याचा बाप झकेरी मेकॉले हा एका स्कॉटिश प्रेस्बिटेरिअन धर्मोपदेशकाचा मुलगा. वेस्ट इंडीज व आफ्रिका येथें व्यापार करून त्यानें थोडीबहुत माया जमविली व तो क्लॅपॅम येथें जाऊन राहिला. तेथेंच टॉमसचा बराचसा प्रारंभींचा काळ गेला. त्याचें प्राथमिक शिक्षण एका खासगी शाळेंत झालें. १८१८ सालीं त्यानें उच्च शिक्षणाकरितां केंब्रिज येथील ट्रिनिटी कॉलेजांत प्रवेश केला. त्याची बुद्धिमत्ता अचाट होती. बालवयांतच त्यानें आपलें बुद्धिवैभव दाखवून लोकांना थक्क केलें. वयाच्या दहाव्या वर्षी त्यानें एक महाकाव्य लिहिलें व बाराव्या वर्षी जगाचा इतिहास लिहिला. त्याचें वाचन दांडगें व स्मरणशक्तीहि अचाट. तो जें जें वाची तें तें सर्व त्याच्या लक्षांत राही. त्याचा गणितविषय तेवढा कच्चा होता. त्या विषयाबद्दल त्याला मोठा तिटकारा. एरवीं महाविद्यालयांत त्यानें आपलें बुद्धिवैभव दाखविलें. १८२४ सालीं ट्रिनिटी कॉलेजांत त्याला फेलोशिप मिळाली.



टॉमस बॅबिंग्टन मेकॉले

दरम्यान त्याचा बाप सांपत्तिक अडचणींत आला. दानधर्मांत त्याचा पुष्कळसा पैसा खर्च झाला. टॉमस २५ वर्षांचा झाला नाहीं तोंच त्याला कुटुंबभार वहावा लागला. मिल्टनवरील त्याचा सुप्रसिद्ध निबंध एडिंबरो रीव्हयूमध्यें प्रसिद्ध होऊन त्याचें नांव गाजलें. त्या नियतकालिकाचा संपादक जेफ्रे हा तर मेकॉलेची मौलिक लेखनशैली पाहून थक्कच झाला. या व्हिग पक्षाच्या थोर पत्राशीं जडलेला त्याचा संबंध वीस वर्षे टिकला. तो १८२६ सालीं बॅरिस्टर झाला; पण त्यानें

त्या धंद्यांत यश मिळविण्याकरितां विशेष आस्थेनें प्रयत्न केले नाहींत.

त्याचें विशेष लक्ष वाङ्मयाकडे होतें; तसेंच राजकारणाकडेहि त्यानें आपलें मन वळविलें. १८३० सालीं काल्नेतर्फे तो पार्लमेंटमध्यें शिरला. तेथें रिफॉर्म बिलावर अनुकूल भाषणें करून त्यानें लवकरच वक्ता म्हणून नांव मिळविलें. १८३३ सालीं तो लीड्सतर्फे पार्लमेंटचा सभासद झाला. १८३४ सालीं तो सुप्रीम कौन्सील ऑफ इंडियाचा वार्षिक ५,००,००० शि. पगारावर कायद्याचा सल्लागार झाला. आपल्या प्रिय कुटुंबीयांच्या चरितार्थाकरितांच त्याला ही नोकरी पतकरणें भाग पडलें. शिक्षणसमीतीचा अध्यक्ष या नात्यानें त्यानें दिलेल्या सल्ल्यावरूनच युरोपीय भाषा व शास्त्रें यांचा समावेश हिंदुस्थानांतील उच्च शिक्षणांत करण्यांत आला. इंडियन पीनल कोड या कायद्याचा मसुदा करण्यांत त्यानें प्रामुख्यानें भाग घेतला. त्याचें हिंदुस्थानांतील चार वर्षांचें वास्तव्य त्याच्या क्लाईव्ह व वॉरन हेस्टिंग्ज यांवरील निबंधांत प्रतिबिंबित होतें. हिंदुस्थानांत असतांनाच त्यानें 'प्राचीन रोमविषयक कवनें' यापैकीं पुष्कळसा भाग लिहिला. हीं लोकप्रिय कवनें १८४३ सालीं प्रसिद्ध झालीं. १८३९ सालीं तो एडिंबरोतर्फे पार्लमेंटचा सभासद झाला; व प्रथम सेक्रेटरी फॉर वॉर व नंतर पेमास्टर जनरल ऑफ दि फोर्सेस झाला. १८४८ सालीं त्याच्या इंग्लंडच्या इतिहासाचे पहिले दोन विभाग प्रसिद्ध झाले. हा इतिहास दुसऱ्या जेम्सच्या राज्यारोहणापासूनचा आहे. तो इतका अद्यावत् करण्याची त्याची इच्छा होती कीं त्यांत त्याच्या वेळीं विद्यमान असलेल्या लोकांच्या आठवणींतील गोष्टींचाहि समावेश व्हावा. पण त्याची मजल तिसऱ्या विल्यमच्या कारकीर्दीच्या शेवटापलीकडे नाहीं. त्यानंतरचे दोन भाग १८५५ सालीं बाहेर पडले. पांचवा भाग त्याच्या मृत्यूनंतर १८६१ सालीं प्रकाशित झाला. प्रारंभापासूनच या ऐतिहासिक ग्रंथाला लोकप्रियता मिळाली. १८४७ च्या सार्वत्रिक निवडणुकींत एडिंबरो भागातर्फे उभा राहिला, पण निवडून आला नाहीं. पुढें १८५२ सालीं निवडून आला. १८५७ सालीं लॉर्ड झाला व १८५९ सालीं तो वारला व वेस्टमिनिस्टर ॲबेमध्यें त्याचें शव पुरण्यांत आलें.

मेकॉले याला पहिल्या प्रतीच्या इतिहासकारांच्या मालिकेंत स्थान मिळणार नाहीं. दांडगें वाचन व अचाट स्मरणशक्ति यांच्या जोरावर त्यानें अनेक विषयांचें ज्ञान मिळविलें. या अनेकविध ज्ञानाचा उपयोग त्यानें उदाहरणें देऊन आपले लेख सजविण्याकडे केला; पण तो कोणत्याहि विषयांत पारंगत नव्हता. व्हिग पक्षाच्या पक्षपातित्वामुळें तो कोणत्याहि गोष्टीचा विचार पूर्वग्रहदूषित दृष्टीनेंच करी. यामुळें पुष्कळ वेळां त्याच्याकडून वस्तुस्थितीचा विपर्यास होई. लिखाण परिणामकारक व्हावें म्हणून तो सत्याची हानीहि करी. त्याच्या ऐतिहासिक ग्रंथांत कांहींहि दोष असोत, त्याच्या सुंदर भाषाशैलीपुढें त्यांचा विसर पडतो. गत गोष्टींचें सुबोध व सुंदर वर्णन करण्याचे बाबतींत मेकॉलेच्या तोडीचा मनुष्य सांपडणें विरळा.

मेक्सिको:—साधारणतः सात लक्ष चौरस मैलांचें क्षेत्रफळ असलेला युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिकेच्या दक्षिणेचा देश. यु. स्टे. ऑफ अमेरिकेला हा देश जरी अगदीं लागून असला तरी मेक्सिकन लोकांची भाषा, संस्कृति व चालीरीती अगदीं भिन्न आहेत. याच्या पूर्वेस मेक्सिकोचें आखात, पश्चिमेस कॅलिफोर्नियाचें आखात, दक्षिणेस मध्यअमेरिका व उत्तरेस यु. स्टे. ऑफ अमेरिका आहे.

लोकसंख्या व क्षेत्रफळ—मेक्सिकोची लोकसंख्या १६,५५२, ७२२ इतकी असून तीपैकीं जवळ जवळ एकपंचमांश युरोपियन लोकांची आहे, इतर तेथील मूळचे लोक व स्पॅनिश व तेथील मूळचे लोक यांच्या मिश्रणानें निर्माण झालेली अशी आहे.

सरकार—सरकार लोकसत्तात्मक असून पूर्वीं ज्या स्पॅनिश लोकांनीं येऊन वसाहती केल्या त्यांच्या वंशजांच्या हातांतच मुख्यतः सत्ता आहे. राजभाषा स्पॅनिश हीच आहे. येथील मूळच्या लोकांना राज्यकारभारांत अद्याप फारसा वाव मिळालेला नाहीं. त्यांची आर्थिक परिस्थिति अत्यंत हलाखीची आहे. सर्व मजूरवर्ग याच लोकांचा आहे; मात्र अशा स्थितींतहि त्यांनीं आपली भाषा सोडलेली नाहीं. मेक्सिको शहर राजधानीचें ठिकाण आहे. व्हेरा क्रूझ, जॉरेझ, सान् लुई, पोटोसी इ. इतर शहरेंहि बरींच मोठीं आहेत.

खनिज संपत्ती, व्यापार, शिक्षण इत्यादि—मेक्सिकोला ६,३०० मैल लांबीचा किनारा आहे. अनेक लहानमोठीं बंदरें आहेत. देशांत १५,००० मैल लांबीचा सरकारचा रेल्वेचा मार्ग असल्यामुळें वाहतुकीला फारशी अडचण पडत नाहीं.



कॉलेजिएट चर्च व समोरील बाजार, उजव्या बाजूस हिडॅल्गो या देशभक्ताचा पुतळा आहे—गॉडेल्प हिडॅल्गो.
[मॅक्सिको शहराजवळ].

रुपें, सोनें, शिसें, जस्त व तांबें खाणींतून काढतात. पैकीं रुपें व तांबें या धातूंची पैदास पुष्कळ होते. सर्व जगांत निर्माण होणाऱ्या रुप्यापैकीं ४० टक्के रुपें एकट्या मेक्सिकोंत होतें. या खालोखाल पेट्रोलहि बरेंच मिळतें. गेल्या महायुद्धांत ब्रिटिशांना पेट्रोलचा पुरवठा पुष्कळसा या देशाकडूनच झाला. मात्र या खाणीच्या व्यापारांत गुंतलेल्या भांडवलापैकीं ९५ टक्के भांडवल परस्थांचें—मुख्यतः ब्रिटिश व अमेरिकनांचें—आहे.

याशिवाय मेक्सिकोची मुख्य उत्पन्नाची बाब म्हणजे शेती. किनाऱ्याच्या कांठीं ताड, नारळी, रबर, महॉगनी व एबनी इत्यादींचे वृक्ष विपुल आहेत. नंतर मध्यभागांत ओक, पाइन व फर वृक्षांचीं मोठीं जंगलें आहेत. त्यांचा व्यापार फार मोठ्या प्रमाणावर चालतो. शेतीच्या उत्पन्नांत साखर, वाटाणे, बटाटे, तंबाखू, कॉफी, नील यांचें उत्पन्न बरेंच मोठें आहे. मेक्सिकोची जमीन सुपीक आहे.

प्रदेश खडकाळ असाच आहे. पाऊस कांहीं ठिकाणीं २५ इंच तर कांहीं ठिकाणीं १२० इंच इतका पडतो. किनाऱ्याजवळची हवा उष्ण असून विशेषशी आरोग्यदायक नाहीं.

खनिज धातू, पेट्रोल, इमारतीचें लाकूड, तंबाखू व फळें निर्गत होतात व धान्यें, मांस, कापूस, लोकरीचे जिन्नस, लोखंड व यंत्रें आयात होतात. हा सर्व व्यापार मुख्यतः अमेरिका व ग्रेट ब्रिटन यांच्यांशींच चालतो.

साक्षरतेचें प्रमाण ५० टक्के असून मेक्सिको शहरीं व इतरत्र सात अशीं आठ विद्यापीठें शिक्षणाचें कार्य करीत आहेत.

बहुसंख्य लोक रोमन कॅथॉलिक आहेत. धर्मस्वातंत्र्य असलें तरी धर्माच्या नांवावर मालमत्ता करण्यास बंदी आहे.

इतिहास—इ. स. १५२१त कॉर्टेझच्या नेतृत्वाखालीं स्पॅनिश लोकांनीं मेक्सिको देश घेतला. त्यापूर्वीं तेथील





१ मेक्सिकन स्त्री व तिच्या दोन सुंदर मुली. एका सणाच्या दिवशीं घेतलेला फोटो.
२ मेक्सिकोंतील गुराखी (Cowboys)
E. N. A.



सॅग्रॅरिओ मेट्रो पॉलिटाग्गे कॅथिड्रल [चर्च], मेक्सिको शहर. E. N. A.

निरनिराळ्या राजांच्या ताब्यांत हा देश होता. कॉर्टेझ यानें या देशाला 'न्यू स्पेन' हें नांव दिलें. यानंतर पुष्कळ कुटुंबें स्पेनमधून येथें वसाहतीसाठीं आलीं. १५३५ मध्यें पहिला राजप्रतिनिधी (व्हॉइसरॉय) नेमण्यांत आला. पण स्पेनच्या राजाचा लहरी अंमल व राजप्रतिनिधींची छळणूक यांना लोक कंटाळून गेले. अनेक लहान लहान बंडें झालीं, पण तीं मोडलीं गेलीं पुढें १८०८ मध्यें स्पेनमधील अंदाधुंदीचा फायदा घेऊन हिडाल्गो नांवाच्या पाद्र्यानें बंड पुकारलें. १८२१ पर्यंत हा धुमाकूळ चालू होता. यावेळीं बोर्बोन राजघराण्यांतील एखाद्याला राजपद देण्याचा बेत फसल्यामुळें बंडखोरांचा पुढारी इटूरबाय यानें स्वतःलाच सम्राट म्हणून जाहीर केलें. पण अवघ्या तीन वर्षांतच त्याला सिंहासनावरून खालीं उतरावें लागलें व १८२४ मध्यें यु. स्टे. ऑफ अमेरिकेच्या धर्तीवर लोकसत्ताक राज्य प्रस्थापित झालें.

पण या मिळविलेल्या स्वातंत्र्यापासून वारंवार कटकटी सुरू झाल्या. १८३५ मध्यें टेक्ससमध्यें झालेल्या बंडाच्या निमित्तानें अमेरिकेशी युद्ध सुरू होऊन १८६२ पर्यंत कोलोराडोचा उत्तरभाग, ॲरिझोना वगैरे प्रदेश अमेरिकेला द्यावा लागला. १८६२–६३ मध्यें फ्रेंच सैन्यानें मॅक्सिको जिंकून घेतलें. नंतर १८६४ ते १८६७ पर्यंत तिसऱ्या नेपोलियनच्या पाठिंब्याच्या बळावर मॅक्सिमिलियन सम्राट बनला. पण १८६७मध्यें जॉरेझच्या नेतृत्वाखालीं पुन्हां स्वातंत्र्य पुकारलें गेलें व जॉरेझ अध्यक्ष बनला. १८७६ मध्यें पॉफिरिओ डिया जॉरेझचा पराभव करून अध्यक्ष बनला व ३० वर्षेंपर्यंत त्यानें यशस्वी रीतीनें राज्य केलें. याच्या कारकीर्दींत मेक्सिकोची चांगलीच भरभराट झाली. १९११ मध्यें मॅडेरोच्या नेतृत्वाखालीं राज्यक्रांती होऊन डियाला पळून जावें लागलें. डिया एकतंत्री होता तर मॅडेरोचा कारभार शिथिल होता. लौकरच अंतर्गत क्रांतीचें बीज रुजलें गेलें व मॅडेरोचा १९१३ मध्यें खून झाला.

व्हिक्टोरियानो ह्युरेटा नांवाच्या मॅडेरोच्या युद्धमंत्र्यानें राज्यसूत्रें आपल्या हातांत घेतलीं; पण मॅडेरोच्या मित्रांना ही गोष्ट सहन न होऊन त्यांनीं राज्यक्रांतीची तयारी चालविली. ह्युरेटाच्या अध्यक्षपदाला अमेरिकेनें मान्यता दिली नव्हती. १९१४च्या एप्रिलमध्यें अमेरिकेचे आरमारी लोकांना टॅंपिको येथें कांहीं कारणावरून अटक झाली. ॲडमिरल मेयोनें या अपमानाचें उट्टें काढण्यासाठीं ह्युरेटाला अमेरिकेच्या निशाणाला 'सलाम' करण्यास सांगितलें; पण त्यानें तें नाकारल्यामुळें लहानसें युद्ध झालें. आर्जिंटीना, ब्राझील व चिली देशांच्यातर्फे मध्यस्थी होऊन तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या; पण मध्यंतरीं त्याच्या विरोधी पक्षानें लष्कराच्या बळावर राज्य जिंकलें व ह्युरेटा पळून गेला. यानंतरच्या पांच वर्षांत पांच अध्यक्ष झाले. याच वेळीं पांचो व्हिला या सुविख्यात दरोडेखोरानें व देशभक्तानें कमालीचें शौर्य गाजविलें. लढाई जिंकून तो अध्यक्षहि बनला; पण पुन्हां कॅरंझाच्या पक्षानें उचल खाऊन १९१५ च्या आक्टोबरच्या १९ तारखेस प्रेसिडेंट विल्सनकडून आपल्या सरकारास त्यानें मान्यताहि मिळविली.

पांचो व्हिलाच्या दरोडेखोर टोळ्यांनीं सरहद्दीवर अमेरिकन लोकांची कत्तल केल्यामुळें मार्च १९१६ मध्यें अमेरिकेचें सैन्य मेक्सिकोवर चालून आलें. कॅरंझानें या प्रकाराचा निषेध केला, तेव्हां अमेरिकन सैन्य थबकून राहिलें. शेवटीं दक्षिण अमेरिकेंतील कांहीं संस्थानांच्या मध्यस्थीनें दिलजमाई होऊन १९१७ च्या जानेवारींत अमेरिकन सैन्य परतलें.

१९१७ च्या फेब्रुवारींत नव्या राज्यघटनेनुसार कॅरंझा पुन्हां अध्यक्ष म्हणून निवडून आला. १९२० सालीं याची सद्दी संपली. शेवटीं तो राजधानींतून पळून जात असतां मारला गेला. यानंतर ओब्रेगॉन अध्यक्ष झाला, पण त्याचाहि १९२८ मध्यें खून झाला. यानंतर मात्र विशेष प्रकार न होतां मेक्सिको आपल्या जीवनाशीं झगडत स्वातंत्र्य टिकवून आहे. नोव्हेंबर ३०, १९३४ रोजीं जनरल कार्डेना अध्यक्ष निवडून आला.

मेगॅस्थेनीसः–(खि. पू. सुमारें ३२७) सीरियाचा राजा सेल्यूकस निकेटर याचा पाटलिपुत्र येथें चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारीं असणारा वकील. हा प्रथम सिकंदराच्याबरोबर हिंदुस्थानांत आला. हा पुष्कळ वर्षें पाटलिपुत्र येथें राहिला. हा येथें असतां आपला रिकामा वेळ या देशाचें भौगोलिक वर्णन, पीक, संस्था यांच्या वर्णनांत घालवी. ज्या गोष्टी यानें स्वतः पाहून लिहिल्या आहेत, त्या प्रामाणिक आहेत. याचा ग्रंथ मूळ ग्रीक भाषेंत होता, पण तो सध्यां उपलब्ध नाहीं. त्या ग्रंथाचें नांव इंडिका असें होतें. त्यांपैकीं स्ट्रेबो, आर्यन, प्लीनी आदि ग्रंथकारांनीं उद्धृत केलेले उतारे

तेवढे सध्यां मिळतात. त्यावरून यानें स्वतः पाहून लिहिलेला भाग प्रामाणिक दिसतो.

मेंढी–गरीब स्वभावाचा, कळप करून राहणारा, मनुष्याच्या उपयोगी असणारा चतुष्पाद प्राणी. या प्राण्याला खासगी रीतीनें फारसें कोणी बाळगीत असल्याचें आढळत नाहीं. धनगर मात्र शेंकडों मेंढरें पाळतात. ते वर्षांतून एकदां यांच्या केंसांची कापणी करतात व ती लोकर घोंगडीं तयार करणाऱ्या लोकांना विकून पैसे करतात. बहुतेक शेतकरी धनगरांना त्यांचा ठरलेला दर कबूल करून आपापल्या शेतांतून मेंढरें बसवून घेतात. असें करण्यांत त्यांना जमिनींत फारसें खत घालवें लागत नाहीं. चार, आठ दिवस जी कांहीं मुदत ठरली असेल तितकी होईपर्यंत तीं मेंढरें बसवलेल्या शेतांत हागतात व मुततात. त्यांच्या लेंड्यांचा व मुतांचा शेताला खतासारखा उपयोग होतो. मांसाहारी त्यांचें मांस खातात. त्यांच्या दुधाचा उपयोग पिण्याकडे होतो.

हा प्राणी काळया, पांढऱ्या, करड्या किंवा पिंगट रंगाचा असतो. याची उंची साधारणतः दोन फूट असून लांबी तीन फूट असते. पाय चार असून खालीं दुभागलेले खूर असतात. कान गाईप्रमाणें मोठे व शरीराबरोबर असतात. मेंढीला शिंगें इतकीं छोटीं असतात कीं तीं केंसांतून बाहेर मुळींच दिसत नाहींत. मात्र मेंढा असेल तर खालीं वांकलेलीं पिळदार अशीं दोन शिंगें त्याच्या तोंडाला शोभा आणण्याचें काम करतात. मेंढीला शेपूट लहान असतें व ती अंगाबरोबर पण खालीं वांकलेली असते. हिला कास असते; पण ती छोटी. या कासेला लहानशीं दोनच थानें असतात. गवत झाडपाला खाऊन राहाणारा हा प्राणी होय. शेळीसारखा हा चपळ प्राणी नव्हे. धन्याच्या आज्ञेत राहणारा, गुबगुबीत दिसणारा व एका मेंढरामागून दुसरा व दुसऱ्यामागून तिसरा असा शिस्तबद्ध व कधींहि दंगामस्ती न करणारा हा प्राणी आहे. वर्षांतून मेंढी दोन वेळां विते. दर खेपेला तिला एक पिलूं होतें. मेंढीचें वय साधारणतः १०।१२ वर्षांचें असते. हिचें दूध पिवळें व खारट असतें.

मेणः–पशू आणि वनस्पती यांपासून तयार करतां येणारा चरबीसारखा घट्ट पदार्थ. मधमाशांचीं पोवळीं अनेकांनीं पाहिलीं असतीलच. या पोवळ्यांसाठीं वनस्पतीपासून मधमाशा मेणच तयार करतात व वापरतात. मेणाचा उपयोग पुतळे तयार करणें, उचाटे (Moulds) तयार करणें, मलमें व मेणबत्त्या तयार करण्याकडे होतो. व्हेलसारख्या माशांच्या तेलापासूनहि मेण तयार करतात व त्याचा उपयोग मेणबत्त्या व टॉयलेट क्रीम तयार करण्याकडे होतो.

मॅडम मेरी क्यूरी (१८६७–१९३४):–रेडियमचा शोध लावणाऱ्या या प्रख्यात संशोधिकेचा जन्म वारसॉ (पोलंड) येथें झाला. तिचा बाप तेथील एका विद्यालयांत अध्यापक होता. पोलंडवरील रशियाच्या जुलमी नियंत्रणामुळें लोकोत्तर बुद्धिमत्तेच्या या मुलीला रसायनशास्त्रांतील प्राथमिक शिक्षण आपल्या बापाच्या हाताखालीं त्याच्या प्रयोगशाळेंत काम करून संपवावें लागलें. तिच्या स्वाभाविक हुषारीमुळें तेथील परीक्षा ती उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाली. त्यानंतर उच्च शिक्षणासाठीं ती पॅरीस येथें गेली. तेथें सोरबानच्या प्रयोगशाळेंत पायेर क्यूरी (१८५९–१९०७–विद्युच्चुंबकाची उत्कृष्ट मापनसाधनें करण्याबद्दल प्रसिद्ध.) याच्या हाताखालीं तिनें पुढें अभ्यास चालू ठेवला. १८९५ त तिचा क्यूरी याच्याशीं विवाह झाला व तीं दोघें रसायनशास्त्रांतील संशोधन करूं लागलीं. यापूर्वी त्यांच्या ओळखीचे प्रख्यात फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ बेकेरेल यांनीं 'युरेनियम' या मूलद्रव्याचे रेडिओ ॲक्टिव्हिटीचे गुणधर्म संशोधले होते. त्यावरून इतर मूलद्रव्यांत तसे गुणधर्म आहेत कीं काय, याविषयीं त्यानें खूप शोध केला. क्यूरी पतिपत्नींनींहि आपल्यापरीनें संशोधन सुरूं केले. त्यावेळीं त्यांची स्थिति अतिशय गरीबीची होती.

युरेनियमशिवाय 'थोरियम' या मूलद्रव्यांतही सदर गुणधर्म त्यांना आढळून आले. तसेंच १८९५त रॉटजेन याचा किरणांचा शोध व त्यापूर्वीचा इंग्रज शास्त्रज्ञ क्रूक्स याचा निर्वात नळींतील 'कॅथोड' किरणांचा शोध हेही त्यांच्या संशोधनास उपयुक्त झाले. याच वेळीं संशोधक म्हणून त्यांची ख्याति झालेली होती. त्यामुळें ऑस्ट्रियाच्या बादशहाकडून ज्यांत 'युरेनियम' सांपडतो असा 'पिचब्लेंड' नांवाचा एक टन खनिज पदार्थ त्यांस देणगीदाखल मिळाला. त्यावर पुष्कळ रासायनिक कृतीनंतर त्यांस दोन मूलद्रव्यें सांपडलीं. त्यांपैकीं जें अगोदर सांपडलें त्यास मॅडम क्यूरीनें आपल्या जन्मभूमीच्या म्हणजे पोलंडच्या स्मरणार्थ 'पोलोनियम' असें नांव दिलें. पुढें १८९८त

मॅडम क्यूरीनें रेडियमचें पृथक्करण केलें. रेडियमच्या गुणधर्मांची माहिती होतांच या शोधामुळें हें संशोधक जोडपें एकदम जगप्रसिद्ध झालें. पुढें १९१० मध्यें मॅडम क्यूरीनें 'रेडियम' अगदीं वेगळा काढून दाखविला. रेडियमच्या शोधाबद्दल १९०० मध्यें बेकेरेल व क्यूरी पति–पत्नींना एकत्रित नोबेल पारितोषिक मिळालें व पुढें १९११ मध्यें रेडियमसंबंधींच्या इतर संशोधनाबद्दल मॅडम क्यूरीला तें पारितोषिक पुनः मिळालें.

नोबेल पारितोषिक दोनदां मिळविण्याचा अपूर्व मान आतांपर्यंत मॅ. क्यूरीलाच आहे. यावरून तिच्या संशोधनाचें महत्त्व दिसून येतें १९०७ मध्यें पायरे क्यूरी पॅरीस येथें अपघातानें वारला. मॅडम क्यूरीनें आपलें संशोधन चालू ठेवलें. रेडियमच्या उपयुक्ततेसंबंधीं इतर शास्त्रीय शोध बरेच लागले आहेत. त्यांत रुदरफोर्ड, रॅम्से व सॉडी यांचें संशोधन विशेष महत्त्वाचें आहे. मॅडम क्यूरी पतीच्या मृत्यूनंतर त्याचे जागेवर सोरबान येथें अध्यापिका झाली. ती उत्कृष्ट अध्यापिका होती. रेडियमच्या शोधानंतर तिच्यावर पुष्कळ सन्मानांचा वर्षाव झाला. तिनें आपल्या मातृभूमींत वॉरसॉ येथें एक रेडियमसंस्था स्थापिली आहे. ही अलौकिक रसायनशास्त्रज्ञ स्त्री १९३४ मध्यें मृत्यु पावली.

मेतकूटः–साहित्य–हरभऱ्याची डाळ, उडदाची डाळ, गहू, हिंग, मोहरी, हळकुंडें, वाटाण्याची डाळ, धने, जिरें, मिरें, सुंठ, आवळकाठी, तिखट.

माप–एक मापटें हरभऱ्याची डाळ, अर्धें कोळवें उडदाची डाळ, मूठभर गहूं, हिंग दोन तोळे, मोहरी एक मूठ, पांच हळकुंडें, एक कोळवें वाटाण्याची डाळ, धने व जिरें प्रत्येकीं मूठ, सात आठ मिरीं, एक सुंठीचें कुडें, थोडी आवळकाठी, तिखट एक लहान वाटीभर, तिखटाच्याऐवजीं मिरच्या घेतल्या तरी चालतील.

कृति–वरील सर्व जिन्नस निरनिराळे भाजून घ्यावे. नंतर मोहरीशिवाय सर्व जिन्नस एकत्र करून बारीक दळावे. मोहरी वेगळी बारीक कुटून मग त्याच्यांत मिसळावी व सर्व बारीक चाळणीनें चाळून ठेवावें. हें मेतकूट वर्षभर टिकतें. हें ऊन भात व तूप याजबरोबर चांगलें लागतें. हें दह्यांत मीठ घालून कालवून व तुपाची फोडणी देऊनही तयार करतात.

मेथिलिटेड स्पिरिटः–अल्कोहोल denaturalized केलें असतां मेथिलिटेड स्पिरिट तयार होतें. हें पेय म्हणून वापरण्यास अयोग्य आहे. मेथिलिटेड स्पिरिटचे दोन प्रकार आहेतः–(१) खनिज मेथिलिटेड स्पिरिट यांत अल्कोहोल बरोबर त्याच्या $\frac{१}{९}$ लाकूड नॅप्था व $\frac{३}{२}$ of I p. c. पेट्रोल असतें. (२) औद्योगिक मेथिलिटेड स्पिरिट–यांत $\frac{१}{१९}$ लाकूड नॅप्था असतो. दुसऱ्या प्रकारचें स्पिरिट मोठाल्या कारखान्यांत सरकारी परवाना घेऊन वापरण्यांत येतें. मेथिलिटेड स्पिरिट किरकोळ विकणाऱ्यांना खास परवाना लागतो.

मेथीः–भाजी व बिया यांसाठीं ही लावतात. भाजीशिवाय हिची चाऱ्यासाठींहि निर्मिती होते. चाऱ्याच्या उद्देशानें हिची लागवड करण्यांत नाशिकची प्रसिद्धी आहे. मेथीचा चारा बैल व दुभतीं जनावरें यांना अतिशयच चांगला आहे. हिची लागवड सर्व प्रकारच्या जमिनींत जरी होते, तरी पण ती गोराडू व मध्यम काळ्या जमिनींत चांगली निपजते. सरासरीनें ती दर एकरास ८००–१२०० पौंड होते.

पातळ भाजी–नीट करून ती चिरायची. नंतर तींत मूठभर तुरीची डाळ, मूठभर तांदूळ किंवा कण्या, थोडे शेंगदाणे व पाणी घालून ती शिजवायची. चांगली शिजली म्हणजे तींत आवडीप्रमाणें तिखट, मीठ, अमसोल अगर चिंच, गूळ हे पदार्थ घालवेत. वाफ येऊं द्यावी व मग फोडणी देऊन खालीं उतरावी. कोणी कोणी ती सरबरीत होण्यासाठीं भाजीला पीठही लावतात.

मोकळी–नीट करून फोडणीला टाकायची. मग वाफ आल्यावर इच्छेप्रमाणें तिखट व मीठ घालून थोडा वेळ चुलीवर ठेवावी. नंतर खालीं उतरावी.

मेंदीः–मुंबई इलाख्यांत मेंदीचें झाड कुंपणाच्या कामाकरितां उपयोगांत आणतात; परंतु उत्तर हिंदुस्थानांत व्यापारी दृष्ट्या मेंदीस पुष्कळच महत्त्व असल्यामुळें तिकडे जमिनीची चांगली मशागत करून मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. मेंदीचें झाड सहा ते आठ फूट उंच वाढतें; परंतु त्याचें कुंपण असतांना तें छाटून आपल्या आटोक्यांत ठेवतां येतें. याचें लांकूड बरेंच टणक व कठीण असतें. पानें बारीक लंबवर्तुळाकार व अणकुचीदार असतात. फुलें पिंवळसर असून फळें वाटाण्याइतकीं मोठीं व गोल असतात. फळें घोंसांनीं लागतात. कोंकणांत कुंपणाच्या दृष्टीनें मेंदीचा

फारच उपयोग केलेला दिसतो. अभिवृद्धि गुलाबाप्रमाणें फांद्यापासून करितात. चैत्र, वैशाख व ज्येष्ठ या महिन्यांत झाडें बहरलेलीं असतात. मेंदीच्या फुलांना मधुर वास असतो म्हणून बागेंत पश्चिम बाजूस हिचें कुंपण करावें.

मेंदीचा उपयोग अनेक तऱ्हांनीं केला जातो. ‘ हीना ’ म्हणून जें अत्तर काढितात तें मेंदीच्या फुलांपासूनच होय. स्त्रिया नखें व हात रंगविण्याकरितां ह्या फुलांचा उपयोग करितात. उष्णतेवर मेंदीचा पाला गुणकारी आहे. ह्याशिवाय इतर औषधी उपयोग ह्या झाडाचे आहेत.

मेनिंजायटिसः—मेंदूच्या आंतील व बाहेरील आवरणाच्या भागांत सूज होऊन जी विकृती निर्माण होते तीस मेनिंजायटिस म्हणतात. गर्मी, देवी, कर्णरोग किंवा मेंदूला पोचलेली इजा यापासून हा रोग होतो. मेनिंजायटिसच्या तडाख्यांतून फारच थोडे रोगी वांचतात. जे वांचतात त्यांच्या शरीरांतील कांहीं स्नायू कायमचे निकामी होतात. क्वचित् ऑपरेशनचा उपयोग होतो.

मेरिडिथ, जॉर्ज (१८२८–१९०९):—यांचा जन्म ता. १२ फेब्रुवारी १८२८रोजीं ७३, हायस्ट्रीट पोर्ट्समाऊथ येथें झाला. त्याचा बाप ऑगस्टस आर्मस्ट्रांग मेरिडिथ हा पोर्ट्समाऊथ येथें आरमारासंबंधींच्या प्रवाशी सामानाचा व्यापारी होता; त्याची आई जेन ही मायकेल मॅक्नॅमारा या त्याच शहरांतील गृहस्थाची कन्या. त्याचें प्राथमिक शिक्षण पोर्ट्समाऊथ येथेंच झालें. त्याला वयाच्या १४ व्या वर्षीं ऱ्हाइनच्या कांठीं न्यूवीड येथील मॉरेव्हियन स्कूलमध्यें पाठविण्यांत आलें. तेथें तो दोन वर्षें होता. तेथून लंडनला परत आल्यावर तो एका सॉलिसिटरकडे कायदा शिकण्याकरितां उमेदवार राहिला; पण आपल्या वयाला २१ वर्षें होण्यापूर्वीच कायद्याचा अभ्यास सोडून वाङ्मयाकडे वळला. त्याची पहिली कविता चिलियनवाला ही चेंबर्स जर्नल या नियतकालिकांत ७ जुलै १८४९ रोजीं प्रसिद्ध झाली; पण ती अत्यंत गचाळ असल्यामुळें तीवरून तरी तो चांगला कवि होईल असें कोणाला वाटलें नाहीं.

ता. ९ ऑगस्ट १८४९ रोजीं मेरिडिथ यानें मेरी एलन निकोलस या एका आरमारी अधिकाऱ्याच्या विधवेशीं विवाह केला. ही टॉमस लव्ह पीकॉक या कादंबरीकाराची मुलगी असून ती वयानें मेरिडिथहून नऊ वर्षांनीं मोठी होती. १८५१ सालीं त्यानें आपल्या कविता प्रसिद्ध केल्या. या कवितांचें गुणवैशिष्ट्य चार्ल्स किंग्जले व टेनिसन यांनीं मान्य केलें होतें. टेनिसननें तर Love in Valley या त्याच्या अप्रतिम कवितेची मुक्त कंठानें स्तुति केली. १८५६ सालीं Shaving of Shagpat नांवाची एक अद्‌भुतरम्य कथा त्यानें प्रकाशिली. तिचें जॉर्ज इलियट प्रभृति सुबुद्ध टीकाकारांनीं हार्दिक स्वागत केलें.

विवाह झाल्यापासून १८५६ पर्यंतच्या कालांत लेखनापासून उपजीविकेपुरती प्राप्ती त्यास झाली नाहीं. १८५६ सालीं तो इप्स्विच जर्नलचा संपादक झाला. या जर्नलचें संपादनकार्य तो आपल्या घरीं राहूनच करीत असे. त्यांत अग्रलेख व बातमीसंबंधीं स्फुटें लिहिण्याचें काम तो करी. हें काम त्यानें कांहीं वर्षें केलें. त्याच कालांत सर विल्यम हार्डमन या आपल्या मित्राच्या संपादकत्वाखालीं निघत असलेल्या मॉर्निंग पोस्ट या नियतकालिकांत तो लेख देत असे. १८५८ सालीं मेरिडिथ व त्याची पत्नि विभक्त झालीं नंतर मेरीडिथ तिजपासून झालेल्या आर्थर नामक आपल्या एकुलत्या एक पुत्रासह इशर व ऑक्सशॉट यांच्यामध्यें असलेल्या कॉपशॅम कॉटेजमध्यें राहण्यास गेला.

१८५९ सालीं त्याची Ordeal of Richard Feverel ही कादंबरी प्रसिद्ध झाली. तिची योग्यता स्वतंत्र रीतीनें विचार करणाऱ्या टीकाकारांना कळून चुकली. पण ती लोकप्रिय होऊं शकली नाहीं. १८६१ सालीं त्याची बायको वारली. त्याच सालीं Evan Harrington च्या Once a week या नियतकालिकांत क्रमशः प्रसिद्ध झालेल्या त्याच्या अप्रतिम कादंबरीचें प्रकाशन झालें. मृत्यू १८ मे १९०९.

मेसफील्ड, जॉन् एडवर्ड (१८७८–):— राजकवि, नाटककार, कादंबरीकार.हा एका सॉलिसिटराचा मुलगा याचा जन्म ता. १ जून १८७८ रोजीं नॅप येथें झाला. वॉरविक येथील किंग्ज स्कूलमध्यें शिक्षण घेऊन कॉनवे ट्रेनिंग शिपवर गेला व केप हॉर्नच्या सभोंवतीं जलपर्यटन केलें. पुढें त्यानें सहावा अधि-



जॉन् मेसफील्ड

कारी या नात्यानें व्हाइट स्टार लाइन या कंपनींत प्रवेश केला.पण अमेरिकेस पोहोंचतांच त्यानें दर्यावर्दी जीवनाला रामराम ठोकला. त्याची 'The Everlasting Mercy' ही सुप्रसिद्ध कविता जेम्स डग्लसच्या मतें उदात्त जीवनाची अभिनव कल्पना आहे. १९१३ सालीं डॉबर हा ग्रंथ व १९१५ सालीं ' The faithful ' नांवाची शोकान्तिका प्रसिद्ध केली. परदेशांत रुग्णालयाच्या कामांत बराच उत्साह दाखविला. अमेरिकेंतील चहात्यांकडून १९१६ सालीं स्वागत. त्याचीं इतर पुस्तकें " Gallipoli ", " The old Front Line " "King Cole "(1923), " Sard Harker " (1924) व " Odtaa " (1926). ता. ९ मे १९२६ रोजीं राजकवि म्हणून नेमणूक. १९३५ सालीं ऑर्डर ऑफ मेरिटची प्राप्ती त्यास झाली. सहाव्या जॉर्जच्या राज्यारोहण प्रसंगीं त्यानें एक काव्य लिहिलें आहे.

मेस्मेरिझमः—गुंगी अगर झोंप आणण्याच्या एका पद्धतीचें नांव. या पद्धतीचा उपयोग प्रथमतः फ्रँझ मेस्मर यानें केला. या पद्धतीला अलिकडे जें शास्त्रीय स्वरूप देण्यांत आलें आहे त्यावरून तिला हिप्नॉटिझम म्हणतात. मेस्मरनें गुंगी आणण्याच्या पद्धतीचीं मूलतत्त्वें शोधून काढलीं. त्याची अशी श्रद्धा होती कीं एक गूढ शक्ति विश्वाला व्यापून राहिली असून तिचें योग्य प्रकारें नियमन केल्यास तिचा मानवी प्राण्याच्या मज्जातंतूसंस्थेवर फार मोठा परिणाम होऊं शकतो. त्याच्या खोलींत प्रकाश मंद असे, आरसे टांगलेले असत, व सुवासिक धूप जळत असे; मेस्मर जादुगाराच्या वेषांत असे. मेस्मरच्या गुंगी आणण्याच्या पद्धतीचें अनुकरण लबाडांनीं व फसव्यांनीं करण्यास सुरवात केली; त्यामुळें मेस्मेरिझमबद्दल लोकांना तिरस्कार वाटूं लागला; पण १९ व्या शतकाच्या शेवटीं शेवटीं मेस्मेरिझमचा शास्त्रीय पद्धतीनें अभ्यास सुरूं झाला.

मेहता, सर फेरोजशहा मेरवानजी (१८४५–१९१५):—क्रॉनिकल पत्राचे जनक, प्रागतिक पक्षाचे अध्वर्यु व बँबे कॉर्पोरेशनला सध्यांचें महत्त्व येण्यास कारणीभूत असलेला एक पारशी मुत्सद्दी. उच्च शिक्षण एल्फिस्टन कॉलेजमध्यें. एम्. ए. झाल्यावर बॅरिस्टर होण्यासाठीं विलायतेस प्रयाण. १८६८ त तिकडून बॅरिस्टर होऊन मेहताजी परत आले. नंतर त्यांनीं आपल्या वकिलीस मुंबईला सुरवात केली. या व्यवसायांत त्यांना कीर्ति व पैसा यांची चांगलीच प्राप्ती झाली. वकीली करीत असतांनाच यांच्या सार्वजनिक आयुष्यास आरंभ झाला. त्यांची महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनीं केलेल्या श्रमांमुळेंच मुंबई कॉर्पोरेशनला सध्यांची सुस्थिति व स्वातंत्र्य लाभलें. यांचा कॉर्पोरेशनशीं मरेपर्यंत संबंध होता. कॉर्पोरेशनचे हे चार वेळ अध्यक्ष होते. यांनीं अनेक जुलमी कायद्यांचा निषेध केला. मेहतांनीं ' बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन ' ही संस्था स्थापन केली. या संस्थेचे ते मरेपर्यंत अध्यक्ष होते. या संस्थेच्या द्वारें ते स्वतःचीं राजकीय मतें स्पष्टपणें प्रगट करीत असत. राष्ट्रीय सभा स्थापल्यानंतर ते तिचे एक आधारस्तंभ बनले. हे १८९० मध्यें राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष झाले होते. मुंबई व वरिष्ठ कौन्सिलचे ते सभासद होते. कौन्सिलांत त्यांनीं लोकहितविरोधी बिलांना निर्भीडपणें विरोध केला. मुंबई विश्वविद्यालयाचे ते व्हाईस चॅन्सेलरहि होते. त्यांना मुंबई विश्वविद्यालयानें LL. D. ही पदवी दिली होती. सरकारनेंहि त्यांना १८९४ त C. I. E. हा किताब दिला. तसेंच १९०४ मध्यें सर ही पदवी मिळाली. त्यांचा स्वभाव मानी व सत्ता गाजवणारा असल्यामुळें इतरांशीं त्यांचें पटत नसे. सुरत काँग्रेसनंतर त्यांनीं राजकारणांत फारसा भाग घेतला नाहीं. १९१० सालीं हे इंग्लंडला गेले होते. ' टाईम्स ' पत्राला तोड म्हणून त्यांनीं इंग्लंडहून परत आल्यावर ' क्रॉनिकल ' पत्र सुरूं केलें. १९१५मध्यें हे मरण पावले.

मैना—माणसाळणारा व शिकवावें तसें बोलणारा पक्षी. या पक्षाच्या पुष्कळ जाती असल्या तरी त्या सर्वांत १ देशी, २ गंगाबंगाली, ३ ठिपक्याची, ४ काळ्या डोक्याची, ५ करड्या डोकीची, ६ गुलाबी व ७ तेल्या रंगाची या सात जाती प्रसिद्ध व प्रमुख होत. १ ते ४ प्रकारच्या मैना पुष्कळ आहेत. त्यांपैकीं गंगामैना व ठिपक्याची मैना या जाती पाण्याच्या कांठीं राहतात. देशी, गंगाबंगाली, ठिपक्यांची, गुलाबी व तेल्या या जातींच्या मैनांचे कळप असतात. गुलाबी व तेल्या जातीच्या मैना फिरस्त्या होत. गुलाबी मैना उन्हाळ्यांत व तेल्या रंगाची पावसाळ्यांत दृष्टीला पडते. सर्व जातींच्या मैनांचें खाद्य किडे हेंच आहे. ओबडधोबड स्वरूपांत कागद, गवत, चिंध्या, काटक्या व पंख यांचें घरटें विहिरी, घरें, किंवा भिंती यांच्या खबदाडांत एप्रिल मेमध्यें मैना बांधते. पावसाळ्याच्या सुरवातीला या घरट्यांत मादी निळ्या रंगाचीं चार अंडीं घालते.

प्रत्येक जातीच्या मैनेचें स्वरूप पुढीलप्रमाणें असतें.

(१) **देशी**—डोक्याचा रंग काळा असून बाकीचें अंग विटकरी रंगाचें असतें. डोळयाभोंवतीं पिवळया जर्द रंगाची कड असून पंखावर एक पांढरा पट्टा असतो. हा पट्टा ती उडतांना दिसतो.

(२) **गंगावंगाली**—डोकें व मान या अवयवांचा रंग करडा, पण बाकीच्या अंगाचा रंग गडद काळा असतो. डोळयाभोंवतीं तांबड्या लाल रंगाची कड असून पाय व चोंच पिवळी असते.

(३) **ठिपक्याची**—पांढरे गाल, पांढऱ्या रंगाची छटा असलेल्या काळ्या रंगाचें शेपूट व पंख हे अवयव सोडून बाकी अंगाचा रंग काळा असतो. चोंच मात्र टोंकाला पांढरी असून तिचा मागील भाग नारिंगी रंगांत असतो.

(४) **काळ्या डोक्याची**—डोकें, तुरा, छाती व पाय हे भाग सोडून बाकीच्या अंगाचा रंग करडा असतो. मानेवर पडणारा तुरा व डोकें काळें तर छाती तांबेऱ्याप्रमाणें असून पाय पिवळ्या धमक रंगाचे असतात.

(५) **करड्या डोक्याची**—मान व डोकें फिकट करड्या रंगाचें असून बाकीचे भाग काळ्या डोक्याच्या मैनेप्रमाणें असतात.

(६) **गुलाबी**—तुळतुळीत काळ्या रंगांतील डोकें, शेपूट, पंख व छाती हे अवयव असतात. याचीं पिसें किरमिजी, करडी, गुलाबी, मातट अशा अनेक रंगांचीं असतात. दिसायला हा पक्षी फारच छान आहे.

(७) **तेल्या रंगाची**—याचे पंख पिंगट ठिपके असलेले काळ्या कुट्ट रंगाचे असतात.

मैनावड्याः—साहित्य—बदाम, पिस्ते, चारोळ्या, बेदाणा, तूप, साखर, केशर, वेलदोडे व जायफळ. **माप**—पावशेर बदाम, पावशेर पिस्ते, दीड पावशेर साखर, अर्धा चमचा वेलचीची पूड, पाव चमचा जायफळाची पूड, थोडें केशर, चारोळ्या व बेदाणे अजमासें. **कृति**—प्रथम बदाम व पिस्ते वेगवेगळे ऊन पाण्यांत भिजत घालावेत. बेदाणा निवडून घ्यावा. बदाम व पिस्ते पाट्यावर साधारण बारीक वेगवेगळे वाटावे. नंतर बदामाचा गोळा पांच सहा चमचे तूप घालून चांगल्या कल्हईच्या भांड्यांत भाजावा. किंचित् लाल रंग आल्यावर तो एका ताटांत काढून घ्यावा. त्याचप्रमाणें पिस्त्यांचा खीस भाजून तो एका ताटांत काढून घ्यावा. नंतर साखऱ्याचा पाक साधारण तार येईपर्यंत करावा व दोन पातेल्यांत सारखा करावा. एका पातेल्यांतील पाकांत केशर घालून त्यांत बदामाचा खीस टाकावा व तो गोळी वळेसा पक्का झाल्यावर पाव चमचा वेलचीची पूड व तेवढीच जायफळाची पूड टाकून तें मिश्रण चांगलें घाटावें व नंतर एका ताटांत बेदाणा व चारोळ्या विरळ पसरून त्यावर पाकांत टाकलेला बदामाचा खीस थापावा व लागलीच बदामाप्रमाणें केशर न घालतां पिस्त्यांचा खीस पाकांत टाकून बदामाचे थरावर त्याच ताटांत थापावा. खालच्याप्रमाणें वरही मसाला घालावा आणि आपणाला हवे असतील तेवढे काप कापावे. या वड्या एका बाजूनें हिरव्या व दुसऱ्या बाजूनें केशरी असतात, यामुळें फार सुंदर दिसतात.

मोक्षः—जन्ममरणाच्या चक्रांतून जीवात्म्याची सुटका म्हणजे मोक्ष. जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य झाल्यानेंच ही सुटका होते. पूर्वकर्मानुसार प्राप्त झालेल्या मनुष्यजन्मांत मनुष्य जसें कर्म करतो तशीच त्याला पुढें गति मिळते, मनुष्यानें पूर्व सुकृतानें प्राप्त झालेल्या या नरदेहांत मोक्ष मिळविण्याकरितां प्रयत्न करणें हें त्याचें अंतिम साध्य आहे. नरदेहाखेरीज इतर कोणत्याहि देहांत जीवाला ही संधी मिळत नाहीं. मोक्ष मिळविण्याचे कर्मयोग, भक्तियोग, राजयोग (अष्टांगयोग) व ज्ञानयोग हे चार मार्ग आहेत.

महर्षि दयानंद सरस्वती यांनीं मुक्ती अथवा मोक्ष याविषयीं पुढीलप्रमाणें विवेचन केलें आहे : जिच्यामुळें सुटका होते तिला मुक्ति म्हणतात. दुःखापासून सुटावें अशी सर्व जीवांची इच्छा असते. परमेश्वराची आज्ञा पालन करणें; अधर्म, अविद्या, कुसंग, कुसंस्कार यांपासून दूर राहणें; सत्य भाषण, परोपकार, विद्या व धर्म यांची वृद्धि करणें; परमेश्वराची स्तुति, प्रार्थना व उपासना करणें; योगाभ्यास करणें इत्यादि साधनांनीं मुक्ति मिळते. याहून विपरीत कर्मांच्या योगानें बंध होतो. मुक्तीमध्यें जीव विद्यमान असतो, व तो ब्रह्ममध्यें राहतो. ब्रह्म सर्वत्र पूर्ण आहे. त्याच्या आधारानें जीव सर्वत्र अव्याहत गति होऊन विज्ञानानंदानें मुक्त होऊन स्वतंत्रपणें संचार करतो; त्याला कोणताहि अडथळा होत नाहीं. मुक्त जीवाला स्थूल शरीर असत नाहीं. त्याचें भौतिक शरीर नाश पावतें; पण त्याचे सत्य संकल्पादि स्वाभाविक गुण व सामर्थ्य हीं सर्व राहतात; त्यांच्या योगानें तो सर्व आनंदाचा उपभोग घेतो. मुक्तीमध्यें जीवाचा लय होत

नाहीं. सर्व दुःखांपासून सुटून आनंदस्वरूप, सर्व-व्यापक अनंत परमेश्वरामध्यें आनंदानें राहणें, ही जीवाची मुक्ति. श्रीमत् आद्य शंकराचार्यांचा मायावाद दयानंदजींना मान्य नाहीं. त्यामुळें मुक्तींत जीव ब्रह्म-रूप होतो हेंही त्यांचें म्हणणें दयानंदांना संमत नाहीं. शंकराचार्य मुक्तींतून पुनरावृत्ति होत नाहीं म्हणतात; तर दयानंदजी मुक्तींतून पुनरावृत्ति होते असें मानतात.

मोगरे, गंगाधर रामचंद्र (१८५८–१९१५):– कवि. शिरगांव येथें १८ जानेवारी १८५८ ला यांचा जन्म झाला. यांचें बालपण व प्राथमिक शिक्षण तेथेंच पार पडलें. इंग्रजीसाठीं ते मुंबईस आले व त्यांनीं जगन्नाथ शंकरशेट यांच्या शाळेंत १८७३ मध्यें नांव दाखल केलें. तेथें यांचा प्रवेशपरीक्षेपर्यंत इंग्रजीचा अभ्यास झाला.

यानंतर त्यांनीं एका बँकेंत नोकरी धरली. पण ती १८८६ मध्यें सोडून रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या लायब्ररींत नोकरी पतकरली. तेथें ते शेवटीं शेवटीं लायब्ररीयन बनले. मराठी शाळेंत असल्यापासून त्यांना काव्याची आवड उत्पन्न झाली होती. त्यानंतर पुढील आयुष्यांत तर लायब्ररींतच नोकरी लागली. त्याठिकाणीं इंग्लिशमधील बहुतेक प्रमुख कवि त्यांनीं अभ्यासलेच; शिवाय इंग्रजीच्या द्वारें फ्रेंच, इटालियन व ग्रीक कवींच्या कृतींचा आस्वाद त्यांजकडून मनसोक्त घेतला गेला. या वाचनाचा परिणाम मुळांत त्यांच्या ठिकाणीं असलेला काव्यांकुर वाढीस लागून पुढें त्याचें वृक्षामध्यें रूपांतर झालें.

मोगऱ्यांनीं आपली कविता ‘ विविधज्ञान विस्तार ’ मासिकांतून प्रकाशिली. त्यांच्या काव्याचा संग्रह ‘ मोगऱ्यांचीं फुलें ’ या नांवानें पांच भागांत रा. सा. कै. मोरमकर यांनीं प्रसिद्ध केला. यांची सारी कविता वृत्तात्मक आहे. यांचें सारेंच काव्य कर्णमधुर सुबोध अशा भाषेंत असून यामधून त्यांचा देश व भाषा यांचा अभिमान चांगलाच प्रगट झाला आहे.यांनीं उपहासात्मक व विलापात्मक आणि इतर असें तीन प्रकारचें काव्य रचिलें आहे. यांनीं ‘ अभिनव कादंबरी ’ या नांवानें संस्कृत कादंबरीसाराचें आर्यावृत्तांत रूपांतर केलें. १९१४पर्यंत नोकरी करून हे कवि ११ मार्च १९१५ला दिवंगत झाले.


मोटारः–मोटार–(मोटर;मराठींत रूढ झालेल्या उच्चारा-प्रमाणें मोटार) म्हणजे गति देणारें यंत्र.गणितांत स्क्रूचा आकार, स्थिती, दिशा इत्यादींची माहिती व्यक्त कर-णारें एक नांव असाहि अर्थ आहे. शरीरशास्त्रांत कांहीं विशिष्ट नाजूक शिरांना हें नांव आहे. पण व्यवहारांत मोटार एक वाहन या अर्थानेंच अधिक रूढ आहे व त्याच अर्थानें पुढें माहिती दिली आहे.

मोटारीचे मुख्य दोन भाग मानतां येतील. १ चासिस (म्हणजे मोटारीचीं सर्व यंत्रें असलेला भाग) २ बॉडी (वाहतुकीसाठीं किंवा बैठकीसाठीं केलेली योजना). हे दोन भाग इतके स्वतंत्र मानले जातात कीं दोन स्वतंत्र कारखानदार दोन्ही भाग स्वतंत्र रीत्या बनवितात. यामुळें बॉडीमध्यें अनेक आकार व प्रकार तयार होणें सुलभ झालें असून त्यामुळें विशेष आकर्षक व सोईच्या बॉडी बनविणें शक्य झालें आहे. मोटारमध्यें पुढील पांच प्रकार आहेत. १ टूरिंग अथवा फैटन (५ किंवा ७ माणसें बसणारी गाडी) २ सीडन (बंदगाडी ५ किंवा ७ माणसें बसणारीं) ३ कूप (फक्त दोन माणसें बसणारी व मागें जरुरी-प्रमाणें बसण्याची व्यवस्था असलेली. फक्त एक दोघां-करितां) ४ रोडस्टर (उघडी व फक्त दोन माणसें मावणारी). ५ लिमॉइन (५ किंवा ७ माणसें बस-णारी. ड्रायव्हरच्या वरील किंवा मागील टप उघडतां येणारी. या प्रकारच्या गाडींत ड्रायव्हरच्या मागें उभी कांच असते.)

मोटारच्या चासिसचे पुढीलप्रमाणें पांच भाग पड-तात. १ एन्जिन, २ क्लच, ३ गिअर बॉक्स, ४ प्रॉपे-लर शाफ्ट, ५ डिफरेन्शिअल. याशिवाय या सर्व भागांचें व्यवस्थित काम चालण्यासाठीं कंट्रोल गिअर हा महत्त्वाचा भाग असतो.

१ एन्जिन चार, सहा किंवा आठ सिलिंडरचें असतें. अगदीं अलीकडे फक्त दोन सिलिंडरवर चाल-णाऱ्या जर्मन बनावटीच्या गाड्या तयार झाल्या आहेत. (सिलिंडरचें कार्य कसें चालतें हें पाहण्यासाठीं ‘ अंतर्ज्वलन एन्जिन ’ हा लेख पहा.) एन्जिनमध्यें कारब्युरेटर नांवाचा महत्त्वाचा भाग असतो. त्याचें कार्य हवा व पेट्रोल एन्जिनला पुरविणें हें असतें.

२ क्लच म्हणजे पकड. एन्जिन व गिअर बॉक्स यांमधील क्लच हा दुवा होय. ह्याचे योगानें एन्जिन चालू असतांना त्याचा धांवत्या गाडीशीं असलेला संबंध तोडून गाडी उभी करतां येते. उलट गाडी उभी असतांना एन्जिनला एकदम वेग येऊं नये म्हणून



मोटार–१ रॅडिअटर, २ मॅस्कॉट, ३ बॉनेट, ४ आरसा (The driving mirror), ५ वुइंड स्क्रीन, ६ स्पॉट लाइट, ७ दार, ८ गाडीचा घडी घालता येणारा टप, ९ सामान ठेवण्यासाठीं लोखंडी पंखा, (लगेज ग्रिड), १० नंबर प्लेट, ११ मागचा दिवा (टेल लाइट), १२, १७ मागील व पुढील बंपर्स १३ पंखा (मडगार्ड), १४ रनिंग बोर्ड, १५ जादा टायर, १६ हेडलॅम्प, १८ दार उघडण्याची मूठ, १९ ड्रायव्हर बसण्याची जागा (सीट), २० मागील बैठका, २१ गिअर लिव्हर, २२ स्टिआरिंग व्हील, २३ हॅंड ब्रेक, २४ डायरेक्शन इंडिकेटर.

व गाडीनें हळूं हळूं वेग पकडावा म्हणून याचा उपयोग होतो.

३ गिअर बॉक्स–या पेटींत प्रथम गाडी चालू करतांना वेग पकडण्यासाठीं सपाटीवर चढण लागली असतांना एन्जिनवर फार दाब पडूं नये म्हणून यांत्रिक रचना केलेली असते.

४ प्रॉपेलर शाफ्ट–एन्जिननें मिळविलेली गति गाडीच्या मागच्या चाकांना पोचविणारा पोलादी दांडा.

५ डिफरेन्शिअल– मागच्या चाकांना ज्या ठिकाणाहून गति मिळते त्या ठिकाणीं हा भाग असतो. वळणावर वळत असतां आंतलें चाक कमी फिरतें (आंतल्या चाकाचे फेरे कमी होतात) व बाहेरच्या चाकाचे फेरे जास्त होतात. त्याचप्रमाणें गाडी उभी असतांना आंतलें चाक न फिरतां बाहेरचें चाक फिरूं शकतें; यामुळें गाडी वळविणें अत्यंत सोपें जातें. ही क्रिया ज्या यांत्रिक रचनेमुळें शक्य होते त्यास डिफरेन्शियल म्हणतात.

ड्रायव्हर स्टिअरिंग व्हील जेव्हां उजवीकडे किंवा डावीकडे फिरवितो त्या वेळीं त्या चक्राशीं पुढच्या चाकांचा कणा आंतून यांत्रिक रचनेनें जोडलेला असतो. पुढच्या चाकांचा कणा उजवीकडे किंवा डावीकडे आंत ओढला जातो व गाडी उजवीकडे किंवा डावीकडे वळते. ड्रायव्हरच्या डाव्या हातास हात ब्रेक व पायांत पाय ब्रेक असतो. पायाशींच कारब्युरेटरवर नियंत्रण ठेवून वेग वाढविणारी पट्टी (Lever) असते.

मोटरला दुसरा शब्द ऑटोमोबाइल (मोबिल) असा आहे. ऑटोमोबाइल हें फ्रेंच भाषेंत विशेषण असून त्याचा अर्थ स्वयंचल असा आहे. इंग्रजींत मोटर, मोटर कार किंवा नुसता कार असा शब्दप्रयोग करतात.


या मोटरचे तीन प्रकार आहेत. १ गॅसोलिन (पेट्रोल) वर चालणाऱ्या २ विजेवर चालणाऱ्या

३ वाफेवर चालणाऱ्या. यांपैकीं पेट्रोलवर चालणाऱ्या गाड्याच जास्त प्रचारांत आहेत. अलीकडे क्रूड ऑइलवर चालणाऱ्या (क्वचित् रॉकेलचा उपयोग करणाऱ्या) गाड्या निघाल्या आहेत. पण क्रूड ऑइलचें वजन व यांत्रिक शक्ती पेट्रोल इतकी लौकर निर्माण होण्याची अशक्यता यामुळें त्यांचा विशेष प्रसार नाहीं.) बॅटरींच्या सहाय्यानें मोटर चालूं शकते. पण त्यासाठीं वारंवार बॅटरींची शक्ति कायम ठेवण्यासाठीं बॅटरी भरून घेणें अवश्य असतें व ही गोष्ट त्रासाची व सर्वत्र सहजसुलभ नसल्यानें याचा प्रसार विशेष झालेला नाहीं. वाफेवर चालणाऱ्या गाड्या प्रयोग म्हणून यशस्वी झाल्या असल्या तरी लोकप्रिय नाहींत. अगदीं आरंभीं फक्त एकच सिलिंडरच्या मोटारी तयार होत, पण एन्जिनचा एक फेरा पुरा होण्याला वेळ लागे व त्यामुळें गतिसातत्य राखणें कठीण जाई. अलीकडे एका सिलिंडरपासून सोळा सिलिंडर पर्यंत प्रगती झालेली आहे.

मोटरच्या शोधाच्या बाबतींत कुणा एकालाच श्रेय देतां येत नाहीं. १८९० पासून या बाबतींत प्रयत्न चालू होते. १८९५ मध्यें पेट्रोलचा उपयोग एन्जीन चालविण्याकडे होऊन मोटारीचें पहिलें एन्जिन तयार झालें. १८९४ ते १८९६ पर्यंत खपून अंतर्ज्वलन एन्जिन बसवून हेन्री फोर्डनें आपली पहिली मोटर तयार केली. त्यानंतर हळूं हळूं प्रगति होत होत आजची मोटर तयार झालेली आहे. बॅटरींच्या विद्युच्छक्तीचा उपयोग करण्याची कल्पना थॉमस एडिसननें काढून तिचें पेटंट घेतलें.

जॉन कॉब (इंग्लंड) यानें पूर्वीचा कॅप्टन आयस्टनचें ताशीं ३५७·५ मैल या वेगाचें रेकॉर्ड मोडून ताशीं ३६८·४५ मैलाचें नवें रेकॉर्ड प्रस्थापित केलें आहे (१९३९).

मोटार सायकल



१ पेट्रोलची टाकी, २ हॅन्डल, ३ कार्ब्युरेटर कंट्रोल लिव्हर, ४ इग्निशन कंट्रोल, ५ पुढचा ब्रेक दाबण्याची लिव्हर, ६ एक्झॉस्ट व्हॉल्व्ह लिव्हर, ७ गिअर लिव्हर, ८ सीट, ९ पेट्रोल पाइप, १०, २३ सिलिंडर, ११ सामान ठेवण्यासाठीं किंवा मागें बसण्यासाठीं कॅरियर, १२, २६ क्रमांक दाखविणारा फलक (नंबर प्लेट), १३ हत्यारांची पिशवी, १४ मागचें चाक फिरविणारी साखळी या आवरणांत असते (चेन ड्राइव्ह), १५ ब्रेक ड्रम (मागच्या चाकाच्या ब्रेकचे ठोकळे या लोखंडी धावेवर घासतात), १६ एक्झॉस्ट पाइप, १७ किक् स्टार्टर (यंत्र सुरूं करतांना हा जोरानें खालीं दाबावा लागतो, १८ गिअर बॉक्स, १९ क्लच् सायलेन्सर, २० मॅग्नेटो ड्राइव्ह, २१ मॅग्नेटो, २२ व्हॉल्व्हज्, २४ दिवा, २५ स्प्रिंग काटा (Fork), २७ व्हॉल्व्ह-उचालक (Valve-lifter)

मोटर-सायकल:–यंत्रशक्तीवर चालणारें दुचाकी किंवा तिचाकी वाहन अशी मोटर सायकलची व्याख्या करतात. पण सर्वसाधारणतः मोटरसायकली दुचाकीच असतात; सायकलला डाव्या बाजूस एक चाकी बैठी गाडी (Side-car) जोडून आणखी एक मनुष्याची सोय करतां येते. मोटर–सायकलला एक, दोन, तीन किंवा चार सिलिंडर असलेल्या अंतर्ज्वलन इंजिनमुळें (साखळीच्या सहाय्यानें) गती मिळते.

१८८१ मध्यें सर टॉमस पार्किन या गृहस्थानें वाफेवर चालणारें इंजिन बसवून मोटर सायकल प्रथम तयार केली. १८९५ मध्यें प्रथमच अंतर्ज्वलन इंजिनचा उपयोग मोटार सायकलसाठीं करण्यांत आला, तरी पण १९०७ नंतरच मोटर सायकलमध्यें खरी खुरी प्रगती झाली. मोटार सायकलला सव्वा अश्वशक्तीच्या यंत्रापासून दहा अश्वशक्तीच्या यंत्रांपर्यंत यंत्रें बसवून गाडीचा वेग, वजन व ताण सहन करण्याची शक्ति, खडबडीत रस्त्यावरूनहि सुलभ चाल इत्यादि गोष्टी साधतां येतात. यंत्रांत दोन फेरे किंवा चार फेऱ्यांचीं यंत्रें वापरतात. अधिक शक्तीचीं यंत्रें दोन सिलिंडरचीं व इंग्रजी V अक्षराप्रमाणें रचना असलेलीं असतात.

हलक्या प्रतीच्या मोटारसायकलीशिवाय इतर सर्वांत दोन, तीन किंवा चार गिअर असतात किंवा गिअर बदलण्याची इतर सुलभ योजना असतें. जास्त शक्तीचीं इंजिनें सुरूं करण्याकरितां 'किक् स्टार्टर' असतो. त्यामुळें इंजिन सहज सुरूं करतां येतें. बेंझॉल पेट्रोल इत्यादींचें योग्य मिश्रण होणें वगैरे गोष्टी पुष्कळशा आपोआपच (automatic) होतात. डायनामो बसवून विजेच्या दिव्याची सोय, स्प्रिंगची बैठक व जोडगाडी यामुळें मोटार सायकल अधिक उपयुक्त झाली आहे.

मोटार सायकलीचे आतांपर्यंतचें रेकॉर्ड दर ताशीं १२१·२३४ मैलाचें आहे. फक्त एक मैल अंतर मोजून १७१·६७४ मैल वेग अर्नस्ट हेन या जर्मनानें दाखविला होता.

मोडक, प्रो.बाळाजी प्रभाकर (१८४७–१९०६):– शास्त्रीय ग्रंथ मराठींत लिहिणारे कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे प्रोफेसर. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील मालवण तालुक्यांतल्या आचरें गांवीं झाला. यांचें बालपण बेळगांव व सांगली येथें गेलें. मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण सांगली व बेळगांव या दोन ठिकाणीं होऊन १८६५मध्यें बेळगांवच्या हायस्कूलमधून ते उत्तीर्ण झाले. यानंतर पुढील शिक्षणासाठीं पुण्यास गेले. बी. ए. मध्यें असतां मोडक हे अतिशय आजारी पडले व त्यामुळें त्यांच्या अंगीं अतिशय अशक्तता आली. तशांतच घरची गरीबी. शेवटीं त्यांनीं शिक्षणाचा नाद सोडून देऊन १८६९ त कोल्हापूरच्या हायस्कुलांत नोकरी पतकरली. १८८०मध्यें राजाराम कॉलेज सुरूं झालें. त्यांत यांची नेमणूक झाली. दोनही संस्थांत ते 'रसायन' हा विषय शिकवीत. त्यामुळें रसायनाशास्त्राची गोडी त्यांस लागली व ती पुढें अधिक वाढली. हें घडून येण्यास कारण १८७०ते १९०० पर्यंत प्रयोगशाळा त्यांच्याच ताब्यांत होती हें होय. त्यांनीं स्वतःसच शास्त्रीय ज्ञानाचा फायदा करून न घेतां इतरांसही त्याचा लाभ व्हावा म्हणून मराठींत त्यांनीं अनेक ग्रंथ लिहिले. या ग्रंथांचें वर्गीकरण करावयाचें झाल्यास त्यांचे दोन भाग पडतील. पहिला शास्त्रीय व दुसरा ऐतिहासिक. दोन्ही भागांवरील पुस्तकांची संख्या ३५ पर्यंत भरते.



प्रो. बा. प्र. मोडक

प्रो. मोडक केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन व इतरेजनांच्याकरितां ग्रंथ लिहून गप्प बसले नाहींत, तर शास्त्रीय विषयाचें महत्त्व व गोडी सामान्य लोकांत वाढावी म्हणून त्यांनीं प्रदर्शनें भरवलीं. तसेंच १९०४ मध्यें मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या (मुंबईच्या) अध्यक्षस्थानावरून महाराष्ट्र विद्यापीठाची कल्पना लोकांसमोर मांडली. कोल्हापूरच्या वाचनालयाची उत्तम व्यवस्था ठेवून दाखविली. त्याचप्रमाणें 'सदर्न मराठा बँक' उर्जितावस्थेला आणली. याशिवाय पदार्थसंग्रहालय जें स्थापन झालें त्यांत यांचेहि श्रम कारणीभूत झाले.

मोतीबिंदू (Cataract):–डोळ्यांच्या बाहुलीच्या मागें स्फटिकरूप रस असतो; तो निसर्गत: पारदर्शक असतो आणि त्यामुळें आपणांस दिसतें. पण कांहीं कारणांनीं तो रस घट्ट होऊन अपारदर्शक होतो आणि दिसण्याचें बंद होतें तेव्हां त्यास मोतीबिंदू (मोतीबिंब) म्हणतात.

कारणें:—१ उपजतच क्वचित् प्रसंगीं हा रोग आढळून येतो. २ केव्हां केव्हां लहान मुलांस हा रोग होतो. ३ अगदीं अशक्तपणामुळें हा रोग होण्याचा संभव असतो. ४ सुई, कांटा वगैरे लागून डोळयास इजा झाल्यानें डोळयांत मोतीबिंब पडतें. ५ डोळयांच्या कित्येक रोगांत मोतीबिंब पडतें. ६ मधुमेहांत मोतीबिंब पडण्याचा फार संभव असतो. ७ म्हातारपणीं—४० वर्षें वयाच्यानंतर—कित्येकांस मोतीबिंब पडतें.

प्रकार—म्हातारपणीं होणाऱ्या मोतीबिंदूस कठीण मोतीबिंब म्हणतात. बाळपणांत होणाऱ्या मोतीबिंदूस नरम मोतीबिंदू म्हणतात. इजा होऊन होणाऱ्या मोतीबिंदूस आकस्मिक मोतीबिंदू म्हणतात.

चिन्हें—सुरवातीस थोडें अंधुक दिसतें आणि डोळयाची बाहुली लहान अगर मोठी असेल त्या मानानें कमी जास्त दिसेल; म्हणजे दिवसां उजेडांत कमी दिसेल व रात्रीं अंधारांत जास्त दिसेल; कांहीं महिन्यांनीं अगर वर्षांनीं दिसण्याचें अजिबात बंद होतें. तेव्हां मोतीबिंब पिकलें असें समजतात. बोटें मोजण्याचें बंद होतांच मोतीबिंब पिकलें असें समजण्याची डॉक्टरांची खूण आहे.

उपाय—ऑपरेशनशिवाय त्यावर दुसरा कोणताही उपाय चालत नाहीं.

मोदकः—गोड खाद्यपदार्थ. **माप**—मापटेंभर कणीक, अर्धें कोळवं तांदळाचं पीठ, चहाच्या चमच्याएवढं मीठ, दह्याच्या चमच्याएवढं गोड तेल, एक नारळ, आंब्याएवढा गूळ, आवडीप्रमाणें वेलदोडे, खसखस भरणांत घालावी. **कृति**—मीठ, तेल व तांदळाचं पीठ हे पदार्थ कणेंकत मिसळून कणीक घट्ट मळायची. मग तिच्या पाती लाटायच्या व मोदक तयार करावयाचे.

भरण करण्याची कृति—खोबरं खिसून घ्यावें. या खिसांत गूळ बारीक चिरून घालायचा. नंतर वेलदोड्याची पूड, खसखस हे पदार्थ मिसळावे. हें भरण मोदकाच्या पातींत घालून व तोंडें बंद करून मोदकपात्रांतून मोदक उकडून काढावेत.

(तांदळाच्या पिठाचे—उकडीचे)—**माप**—मापटंभर तांदळाचें पीठ, अर्धीवाटी पाणी, चहाचा चमचाभर गोड तेल, थोडं मीठ. **कृति**—एका पातेल्यांत पाणी, तेल, मीठ घालून तें उकळावें. उकळी आल्यावर तींत पीठ घालावं. पळीनं दोन भोकें पाडावींत. आधणावर दहा मिनिटं झाकण घालावं. वाफ आल्यावर परातींत पातेल्यांतलं पीठ घ्यावें. वेगळं ऊनपाणी घेऊन त्यावर शिंपडून तें मळावं. यापुढील कृति वरीलप्रमाणें करून मोदक बनवावेत.

मोपासाँ Maupassant, Henri Rene Albert Guy de (१८५०—९३):—हा फ्रेंच कादंबरीकार मिरोंमेंसील नॉर्मंडी येथें ५ ऑगस्ट १८५० रोजीं जन्मला. सूक्ष्म निरीक्षण करणें व यथार्थ वर्णन करणें या गोष्टी तो फ्लॉबर्टजवळ शिकला. हाच त्याचा कादंबरीलेखनकलेंतील गुरु होय. झोलाच्याभोंवतीं मेदान येथें जमलेल्या तरुण ग्रंथकारांत हा एक होता. त्या तरुण ग्रंथकारांचा Soirees de Medan नांवाचा जो कथासंग्रह प्रसिद्ध झाला त्यांत La Boule de Suif ही गोष्ट मोपासाँ ह्यानें लिहिली. त्यामुळें त्याच्याकडे लोकांचें लक्ष लागलें. त्यावेळीं तो तालीमबाज व प्रकृतीनें दणकट होता; पण त्याची प्रकृती १८९२ सालीं अकालींच घसरली, त्याला वेड लागलें व ६ जुलै १८९३ रोजीं तो एका वेड्याच्या इस्पितळांत वारला. त्यानें शेवटीं शेवटीं लिहिलेल्या कांहीं कथांत व्यक्त केलेले मुलखावेगळेच विचार व भलत्याच भावना यांवरून त्याच्या भावी मतिभ्रंशाची कल्पना येते. मोपासाँनें बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या. त्यांत Une Vie, Pierre et Jean, Notre Coeur ह्या प्रसिद्ध आहेत; पण त्याच्या कादंबऱ्यांपेक्षां त्याच्या लघुकथाच अधिक चांगल्या आहेत. सर्व वाङ्मयांतील पहिल्या प्रतीच्या लघुकथालेखकांत त्याचें स्थान अढळ आहे. La Maison Tellier, Mademoiselle Fifi आणि M. Parent हे त्याचे कथासंग्रह उल्लेखनीय आहेत.

त्यानें Pierre et Jean या आपल्या कादंबरीच्या प्रस्तावनेंत अत्यंत प्रगत अशा वास्तववादाचा पुरस्कार केला आहे. कादंबरीकाराच्या कार्याविषयीं त्याचें असें मत होतें कीं कादंबरीकारानें स्वतःला विसरून स्वतंत्र व शास्त्रीय दृष्टीनें जीवनाचें निरीक्षण व अभ्यास करावा. आपण पाहिलें असेल त्यांचेंच वर्णन करावें व सत्याविष्करणाच्या मार्गांत आपल्या वैयक्तिक भावना व नीतितत्त्वांचें मंडन करण्याचा हेतुही आड येऊं देऊं नये. या तत्त्वांना अनुसरून त्याच्या कथांचें परीक्षण केलें असतां त्यांत जीवनाचें नितांत सत्य रेखाटलें असल्याचें दिसून येतें. त्यानें केलेल्या स्वभावचित्रणांत त्याची सूक्ष्म निरीक्षणशक्ति व कौतुकास्पद वर्णनशैली यांची प्रचीति येते. त्याच्या कथांत जीवनांतील गुणदोष

दाखवून टीका केलेली नाहीं; पण त्याच्या स्वतःच्या मनावर जीवनाचा जो ठसा उमटलेला आहे त्याचें प्रतिबिंब त्यांत खास सांपडतें. इतर वास्तववाद्यांप्रमाणें मोपासाँनें आपल्या कथांत मानवी स्वभावाचें हीन व हिडीस स्वरूपच दाखविलें आहे; एकंदरींत त्याच्या लेखनाचा सूर निराशावादी व खिन्न दिसतो.

मोर:–सर्व पक्ष्यांचा राजा. मोरासंबंधींचे उल्लेख प्राचीन व अर्वाचीन ग्रंथांत मोठ्या आदरानें केलेले आहेत. सरदार, जहागीरदार अगर राजे लोक यास बाळगतात. रंग, रूप वगैरे दृष्टीनें हा पक्षी सुंदरच आहे. याच्या सर्व अवयवांत पायच ओबड धोबड दिसतात. चोवीस पिसें असणारा तुरा याच्या डोक्यावर असतो. हीं पिसें मध्येंच हिरवींगार असून कडेला पिवळीं असतात. त्याचा गळा, मान व डोकें हे अवयव निळे असतात. या निळ्या रंगावर मधून मधून हिरव्या व पिवळ्या रंगाची झांक मारते. मोराच्या पोटाचा रंग हिरवट काळसर दिसतो. डोक्यावरील तुऱ्यानें याला फारच शोभा येते.

मोर मोठ्या आनंदांत असतो, त्यावेळीं पंख्याप्रमाणें आपला पिसारा पसरतो व हळूंहळूं पावलें टाकून डौलानें नाचूं लागतो. हीं पिसें साधारणतः वीस असतात. या प्रत्येक पिसावर वाटोळा डोळा असून पिसाचा दांडा पांढरा असतो. पिसांच्या कडेला पर असते. पिसाच्या डोळयाला पिवळा, निळा, हिरवा या रंगांची छटा मारते. पिसारा फक्त नराला असतो. दर वर्षाला हा पिसारा गळतो व वसंतांत पुनः येतो. पिसारा नसल्या मुदतींत हा दृष्टीत पडत नाहीं. मोर पहांटेच्या वेळीं आपल्या आवाजाची द्विरुक्ती करून कर्कशपणें 'माऊ' असा ओरडतो. उन्हाळ्यामध्यें संध्याकाळीं व रात्रीं नेहमींच ओरडत असतो. मेघगर्जनेनें यास आनंद होतो. याच्या मादीला लांडोर म्हणतात. मोराचें घरटें जमिनीवर असून तें गवताचें असतें. या घरट्यांत जून ते ऑक्टोबर या काळांत ६ पासून १५पर्यंत खडबडीत अंडीं घातलीं जातात. जावा बेटांतील मोर हिरवा असतो. सीलोनमधील मोर पांढरे शुभ्र असतात.

मोरया गोसावी–(१३७५–१५६१):–महाराष्ट्रांतील एक प्रसिद्ध सत्पुरुष. पित्याचें नांव वामनभट्ट व मातेचें नांव पार्वतीबाई. हे देशस्थ ऋग्वेदी हरितसगोत्री ब्राह्मण. हे कर्नाटकांतील शाली गांवचे राहणारे. त्यामुळें यांचें उपनांव शालिग्राम होय. पुढें या घराण्यांत अनेक सिद्धपुरुष उत्पन्न झाल्यानें देव या नांवानें हें घराणें ओळखलें जाऊं लागलें.

वामनभट्ट गणेशोपासक होते. त्यांना वयाचीं पन्नास वर्षे झालीं तरी पुत्रसंतति नव्हती. तेव्हां त्यांनीं पुत्रप्राप्तीकरितां मोरगांवीं तपश्चर्या केली. श्रीच्या कृपेनें पुत्ररत्न झालें, तेच मोरया गोसावी होत. यांचा जन्मदिन शके १२९७ माघ शु॥ ४ हा होय. पुढें वामनभट्ट वयाच्या एकशेंतिसाव्या वर्षी मृत्यु पावले (शके १३३२).

आठव्या वर्षी उपनयन झाल्यावर मोरयांनीं जटाघनापर्यंत साग्र वेदाचें अध्ययन केलें. नंतर योगीराज नांवाच्या सिद्धाचा गुरूपदेश घेतला आणि थेऊर येथें घोर तपश्चर्या केली व मंगलमूर्तीचा अनुग्रह संपादन केला. येथून पुढें हे चिंचवड येथें राहूं लागले.

तेथें राहत असतां गोविंदराव कुलकर्णी यांची मुलगी उमाबाईशीं यांचें लग्न झालें आणि शके १४०३ माघ व. ४ स यांना मुलगा झाला. त्याचें नांव चिंतामणी असें ठेवण्यांत आलें.

प्रथम हे दर चतुर्थीस मोरगांवीं वारी करीत, पण पुढें यांना साक्षात्कार झाला. कऱ्हा नदींत स्नान करीत असतां हातांत एक गणपतीची मूर्ति (तांदळाएवढी) आली. तेव्हां यांनीं तेथें नदीकांठीं त्याची पूजा करून सर्व शाकभाजी व पोळी यांचा नैवेद्य दाखविला. ज्या जागेवर पूजन करून नैवेद्य दाखविला ती जागा तेथें पोळी या नांवानें प्रसिद्ध आहे. तेथें त्या दिवसापासून आजपर्यंत ब्राह्मणापासून चांडाळापर्यंत सर्वांना प्रसाद वाटण्यांत येतो.

नंतर यांनीं ती मूर्ति चिंचवड येथें नेऊन ठेवली व आजहि वाड्यांत ती पाहावयास मिळते.

पुढें यांची कीर्ति फार वाढली व लोकांपासून दूर राहण्याची यांना इच्छा झाली. म्हणून यांनीं जिवंत समाधि घेतली (१४८३ मार्गशीर्ष वद्य ६). हे महायोगी असल्यानें यांचा हा १८६ वर्षांचा आयुष्यक्रम अशक्य नाहीं. यांची पुण्यतिथि चिंचवड येथें मोठ्या समारंभानें होत असते.

यांचीं गणपतीवर केलेलीं पदें फार प्रसिद्ध आहेत. तीं चिंचवड, कसबा गणपति, रांजणगांव गणपति वगैरे ठिकाणीं ऐकावयास मिळतात. प्रत्येक पदांत श्रीमोरयाला निस्सीम भक्तीनें व घरगुती नात्यानें आळविलें आहे. यांनीं केलेल्या पदांपैकीं 'सासूर', 'माहेर' व 'कामधेनू' हीं पदें आकर्षक वाटतात.

तुकाराम, रामदास यांसारख्या संतांत यांची गणना आहे. प्रथम यांचें घराणें अगदीं विरक्त स्थितींत राही, पण पुढें यांच्या वंशजांस आदिलशाह, संभाजी, राजाराम, शाहू वगैरेनीं अनेक इनामें दिलीं. या घराण्याचा मराठेशाहींत अत्यंत सन्मान ठेवण्यांत येत असे.

मोरावळा:–आवळ्याचा मुरांबा हा लेख पहा. (पान १०४)

मोरोपंत (इ. स. १७२९–१७९४):–कवि. यांचें पूर्ण नांव मोरेश्वर रामचंद्र पराडकर. गोत्र जामदग्न्य, कऱ्हाडे ब्राह्मण, जन्म शके १६५१. मृत्यु शके १७१६ चैत्र शु॥ १५. मूळ गांव सौंदळ (कोंकणांत राजापूरजवळ). यांच्या घराण्यांत डांगेपणाचें व पतकेपणाचें वतन होतें. मोरोपंत हे 'पंत' या नांवानें वाङ्मयांत प्रसिद्ध आहेत. पंतांचें शिक्षण कोल्हापुराजवळ पन्हाळगडीं पाध्ये मंडळींच्या सहवासांत झालें. गणेश पाध्ये त्यांचे गुरु होत. संस्कृतचें मार्मिक अध्ययन पंतांनीं केलें होतें. पंतांचें अक्षर खरोखरच मोत्यासारखें होतें.

तरुणपणींच पंतांना बारामतीस बाबूजी नाईक जोशी या प्रसिद्ध सरदाराचा आश्रय शके १६७४ त मिळाला; आणि पंत अखेरपर्यंत बाबूजी व त्यांचे चिरंजीव पांडुरंग नाईक यांच्याच आश्रयास राहिले. तेथें त्यांचें काम म्हणजे पुराण सांगण्याचें होतें. असें दिसतें कीं त्यांच्या पुराणाला गांवांतील सर्व जातींची–तेली, तांबोळी इत्यादि–मंडळी येत होती. आपल्या श्रोत्यांवर पंतांचें प्रेमहि फार होतें; म्हणून त्यांनीं काशीस गेल्या वेळीं त्या सर्वांच्या नांवानें 'वकीली' केली. पुराण सांगून राहिलेला काळ पंतांनीं भगवत्पादसेवनांत आणि भगवद्गुणानुवाद करण्यांतच घालविला. भारत, भागवत, रामायण इत्यादि मोठमोठ्या ग्रंथांची संपूर्ण रचना त्यांनीं मराठींत केली. रामायण तर निरनिराळ्या वृत्तांत १०८ वेळां रचिलें. पंतांचें आवडतें वृत्त म्हणजे आर्या (गीति) हें होय. आर्या म्हणजे पंतांची अशी सर्वत्र प्रसिद्धि आहे 'तशि हे मयूर नाहीं तरि लोकांना न दीसती आर्या' असा यथार्थ अभिमान पंतांनीं स्वतःच गायला आहे. त्यांची नादवत्ता वाचकांना मुग्ध करणारी आहे. पंत यमकांकरितां प्रसिद्ध आहेत. आपल्या वेडामुळेंच त्यांच्या रचनेंत क्लिष्टता आली आहे. भारतांतील कृष्णार्जुन, भीष्मद्रोण, धर्मभीम, दुर्योधनदुःशासन, द्रौपदीगांधारी प्रभृतींची स्वभावचित्रें पंतांनीं फारच कुशलतेनें वदविलीं आहेत. शुद्ध गृहस्थी बाणा त्यांच्या काव्यांतच पहावयास मिळतो. पंतांचें 'आर्याभारत' मराठी वाङ्मयाचा एक अद्वितीय अलंकार आहे. पंतांनींहि आपण 'प्रतिव्यास' असल्याचा प्रत्यय फारच बहारीनें ध्वनित केला आहे. राम हें पंतांचें कुलदैवत. त्यामुळें रामचरित्रवर्णनांत पंतांनीं कमालीचा रसरंग भरला आहे! पंत हाडाचे सद्गृहस्थ व भक्त होते. त्यांचीं 'आर्याकेकावली,' 'संशयरत्नमाला' वगैरे अनेक स्वतंत्र प्रकरणें रसिक मंडळीस हालवून सोडतात. त्यांची 'श्लोककेकावली' वाचून पंडित माना डोलावितात. पंतांचा 'कृष्णविजय' व त्यांचें 'मंत्र भागवत' हे ग्रंथहि त्यांच्या प्रतिभेची साक्ष पुरवितात. त्यांचें 'मंत्ररामायण' तर मंत्रभागवतापेक्षांहि सरस आहे. मंत्रमय काव्यांत पंतांनीं केलेली मंत्रांची गुंफण इतक्या कुसरीनें केली आहे कीं, पंतांनींहि प्रतिज्ञेनें सवाल टाकला कीं 'कथा परालाचि तो (मंत्र) कसा गवसे?'

मराठीप्रमाणें पंत संस्कृतांतहि लीलेनें कविता करीत. त्यांच्या संस्कृत काव्यांचा एक खंडच प्रसिद्ध झाला आहे, तो पाहतां पंतांनीं पाध्यांचा आग्रह न ऐकतां मराठींतच रचना केली हें आपलें व आपल्या भाषेचें मोठें भाग्य होय यांत शंका नाहीं.

पंतांच्या पत्नीचें नांव रमाबाई, (बहु भली रमा भार्या) पंतांचे वडील बंधू सोनोपंत, धाकटे आबा; पंतांचे तीन पुत्र रघुनाथ, रामकृष्ण व काशिनाथ. रामकृष्णाचे वंशज पंढरपुरीं राहातात व त्यांजकडेच पंतांचें सर्व दप्तर आहे. इतर शाखा उज्जयिनी वगैरे दूरवर पसरल्या आहेत.

पंतांच्या मित्रमंडळींत बाबा पाध्ये, धर्मसिंधुकार, विठोबा दादा चातुर्मासे वगैरे मंडळी मोडत. पंतांनीं कांहीं यात्रा केली व अनेक तीर्थस्थानें, सत्पुरुष व मठ पाहिले होते.

पंतांची एकंदर कविता पाऊण लाख आहे. त्यांनीं आपल्या हातानें लिहून ठेविलेली त्यांची कविता रा. रामकृष्णपंत पराडकर–पंतवंशज–यांनीं नऊ भागांत सुंदरपणें छापून काढिली आहे. अजून तीन भाग मात्र प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. ते झाले कीं, 'समग्र मोरोपंत' अस्सल असा आपल्या हातीं येईल.

मोर्ले, जॉन (१८३८ ते १९२३):–याचा जन्म ता. २४ डिसेंबर १८३८ रोजीं ब्लॅकबर्न येथें झाला.

त्याचें शिक्षण चेल्टनहॅम येथें व ऑक्सफर्ड येथील लिंकन कॉलेजांत झालें. वयाच्या बाविसाव्या वर्षी विश्वविद्यालयीन पदवी त्यानें घेतली. एका बंद पडण्याच्या बेतांत आलेल्या 'लिटररी गॅझेट' नांवाच्या लंडन येथील नियतकालिकाचा तो आपल्या वयाच्या बाविसाव्या वर्षींच संपादक झाला. सुमारें सात आठ वर्षें लंडनमधील वाङ्मयीन जीवनाचा विविध प्रकारचा अनुभव त्यानें चाखला. १८६७ सालीं त्याचा 'बर्क' नामक ऐतिहासिक ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथानें मोर्लेचा मोठा लौकिक झाला; इतिहास व राजकारण याविषयींची त्याची आस्था दिसून आली. त्याच वर्षी जॉर्ज हेनरी ल्यूज यांच्यानंतर 'फॉर्टनाइट्ली रिव्ह्यू' या नियतकालिकाचा तो संपादक झाला. हें काम त्यानें सोळा वर्षांहून अधिक काल केलें. तो १८६८–७० पर्यंत 'मॉर्निंग स्टार'चा संपादक होता.

फ्रेंच राज्यक्रान्तीच्या पूर्वी होऊन गेलेल्या साहित्यिकांचीं चरित्रें व त्यांच्या ग्रंथांचीं परीक्षणें लिहून मोर्लेनें नामवंत साहित्यिकांच्या मालिकेंत स्थान मिळविलें. त्यानें रॉबेसपिअर आणि टॅगार्ट यांसारख्या फ्रेंच मुत्सद्द्यांच्या चरित्रांचीं समालोचनें लिहिलीं.

'On Compromise' हा नामवंत ग्रंथ १८७४ सालीं प्रसिद्ध झाला. या ग्रंथानें मोर्लेला इंग्लिश तत्त्वज्ञांच्या मालिकेंत मानाचें स्थान मिळवून दिलें. यापूर्वीच्या ऐतिहासिक समालोचनांनीं मोर्लेला जी कीर्ति मिळाली तींत या ग्रंथानें भरच टाकली. त्यानें १८८१ सालीं कॉब्डेनचें चरित्र प्रसिद्ध केलें. '**Englsih Men of Letters**' या मालेच्या कल्पनेला जॉन मोर्ले यांनींच मूर्त स्वरूप दिलें. त्यांनीच मालेचें संपादन केलें.

१८८०–८३ या कालांत मोर्ले 'पालमॉल गॅझेट' या उदारमतवादी पक्षाच्या मुखपत्राचे संपादक होते. या कालांत सदर पत्र पुढाऱ्यांच्या मताला वळण लावण्याच्या बाबतींत प्रभावी ठरलें. याचा परिणाम असा झाला कीं, न्यूकॅसल-ऑन-टाइनतर्फे मोर्ले पार्लमेंटमध्यें शिरले (१८८३). तीन वर्षेंपर्यंत, चीफ सेक्रेटरी फॉर आयर्लंड म्हणून प्रधानमंडळांत होते. लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला कीं, मोर्ले यांचें स्थान प्रधानमंडळांत असायचेंच. महायुद्धाच्या सुरवातीच्या पूर्वी १९१४ सालीं त्यांनीं राजकारणांतून आपलें अंग काढून घेईपर्यंत त्यांचें स्थान अढळ होतें. ग्लॅडस्टनचे अत्यंत विश्वासांतील सहकारी असल्यामुळें मोर्ले हे १८९२–९५ या कालांत पुनः आयरिश सेक्रेटरी झाले. लिबरल पक्ष अधिकारारूढ झाल्यामुळें १९०५–१० या कालांत ते भारतमंत्री झाले व १९१०–१४ या कालांत कौन्सिलचे प्रेसिडेंट झाले. १८९५ पासूनच मोर्ले 'ग्लॅडस्टनचें चरित्र' या आपल्या अत्यंत संस्मरणीय ग्रंथाच्या लेखनांत गुंतले होते. हें चरित्र १९०३ सालीं प्रसिद्ध झालें. ऐतिहासिक व चरित्रात्मक ग्रंथांत हा ग्रंथ उत्कृष्ट म्हणून गणला जातो.

अँड्र्यू कार्नेजी यांनीं आपला मौल्यवान ग्रंथसंग्रह मोर्ले यास १९०२ सालीं नजर केला. सदरचा ग्रंथसंग्रह कार्नेजी यांनीं लॉर्ड ॲक्टन यांच्या मृत्युपत्र चालविणाराकडून विकत घेतला होता. मोर्लेनें हा ग्रंथसंग्रह ॲक्टनच्याच केम्ब्रिज विद्यापीठाच्या स्वाधीन केला. 'आठवणी' या त्यांच्या ग्रंथांत होणाऱ्या राजकारणांतील गुप्त गोष्टींच्या ओझरत्या दर्शनानें व त्यांच्या अमर वाङ्मयगुणांनीं वाचक मोहित होतो. ता. २३ सप्टेंबर १९२३ रोजीं मोर्ले मृत्यु पावले.

व्हायकाऊंट मोर्ले यांनीं वृत्तपत्रकार, ग्रंथकार व मुत्सद्दी म्हणून जागतिक मान्यता मिळविली व व्यक्तिशः सर्वांच्या विश्वासास पात्र झाले. त्यांनीं लोकांना अप्रिय अशा गोष्टींचा पुरस्कार केला, तरी त्यांच्या मान्यतेला व विश्वासपात्रतेला न्यूनत्व आलें नाहीं. ते साम्राज्यविस्ताराच्याविरुद्ध होते. इजिप्त व दक्षिण आफ्रिका यांवरील ब्रिटिशांची पकड दृढ झाल्यावर त्यांनीं त्यावर केलेली टीका त्यांच्यांशीं मतभेद असणाऱ्यांनींहि मोठ्या आदरानें ऐकून घेतली.आयरिश स्वराज्याला त्यांनीं सतत पाठिंबा दिला तरी त्या प्रश्नाच्या विरोधकांनींहि त्यांना शिव्याशाप दिले नाहींत; याचें कारण हेंच कीं ते आपलें म्हणणें कळकळीनें पण तर्कशुद्ध रीतीनें मांडत. ते स्वमताग्रही होते व तत्त्वानुसार आचरण करण्याकरितां तत्त्वांना मुरड घालून तीं परिस्थितीशीं जुळतीं करण्याचें त्यांना जमत नसे; म्हणून त्यांजवर टीका करण्यांत येई.

मोर्ले सहज व जलद बोलणारे वक्ते नव्हते; पण त्यांचें व्यक्तिमत्व छाप पडणारें होतें. आपलें अत्यंत अंतरींचे विचार व्यक्त करीत तेव्हां त्यांचें भाषण इतकें सुंदर व प्रभावी होई कीं, त्यांचे विचार श्रोतृवृंदाच्या अंतःकरणाला जाऊन भिडत. अशाच एका वेळीं कळकळीनें बोलतांना अधिक लोकांना अधिक चांगल्या रीतीनें सुखी करणें हा आपल्या जीविताचा प्रधानहेतु असल्याचें त्यांनीं सांगितलें.

मोर्स, सॅम्वेल, फिनले ब्रीस (१७९१–१८७२):– या अमेरिकन शास्त्रज्ञाचा जन्म १७९१ सालीं झाला. शिक्षण येल कॉलेजांत झालें. तेथें असतां त्यानें रसायनशास्त्र व पदार्थविज्ञानशास्त्र या विषयांचा सखोल अभ्यास केला. कॉलेजांतील शिक्षणक्रम आटोपल्यावर बेंजामिन वेस्ट या चित्रकाराच्याजवळ चित्रकलेचा अभ्यास करण्याकरतां तो इंग्लंडला गेला. इंग्लंडहून परत आल्यावर न्यूयॉर्क येथें पोर्ट्रेट पेंटिंगच्या धंद्याला सुरवात केली. १८२६ सालीं त्यानें 'नॅशनल ॲकॅडेमी ऑफ डिझाईन' ही संस्था स्थापिली.या संस्थेचा तो पहिला अध्यक्ष झाला. यानें विजेच्या तारायंत्राचा प्रथम शोध लावला. १८३५ सालीं अर्धा मैल लांबीच्या तारेंतून विद्युत्संदेश पाठवून त्यानें आपल्या शोधाचें प्रात्यक्षिक दाखविलें. प्रथमतः त्याला अमेरिकन सरकारकडून मदत मिळूं शकली नाहीं. म्हणून त्यानें कांहीं वर्षें आपल्या उपकरणांत सुधारणा करण्यांत घालविलीं. १८४३ सालीं अमेरिकन कॉंग्रेसची मदत मिळून वॉशिंग्टन ते बाल्टिमोरपर्यंत तारायंत्र बसविण्यांत आलें. त्यांतून यशस्वी रीतीनें विद्युत्संदेश पाठवितां आला. या तारायंत्रांतून पाठविलेला पहिला विद्युत्संदेश 'ईश्वरानें काय केलें' (What hath God wrought?) हा होय. त्यानें विद्युत्संदेश पाठविण्याकरतां अवश्य अशा अक्षरांच्या, आंकड्यांच्या खुणा, सांकेतिक शब्द व वाक्प्रचार यांसंबंधींची एक पद्धति बनविली. ती 'मोर्स-कोड' या नांवानें प्रसिद्ध आहे (यासंबंधीं माहिती व्या. ज्ञा. कोश पृष्ठ ९४२ वर 'तारायंत्र' या शीर्षकाखालीं दिली आहे). त्याच्या कामगिरीबद्दल अनेक देशांकडून त्याचा सत्कार करण्यांत आला. १८७१ सालीं न्यूयॉर्क शहरांतील सेंट्रल पार्कमध्यें त्याचा एक ब्रॉंझचा पुतळा उभारण्यांत आला आहे.

मोलीअर (१६२२–१६७३):–आनंदपर्यवसायी नाटकाचा जनक व खंदा लेखक. मोलीअरचें खरें नांव Jean Baptiste Poquelin हें होय. त्याचा जन्म पॅरिस येथें १६२२ मध्यें झाला. त्याचा बाप जीन पोकेलिन् हा सरंजामी सामानाचा व्यापारी होता; त्याला सरकारी नोकरी असून तो श्रीमंत होता. मोलीअरच्या आईचें नांव मेरी क्रेसी. त्याचें शिक्षण क्लरमॉंट येथील कॉलेजांत झालें. त्यानें तेथें ॲरिस्टॉट्ल्च्या ग्रंथांचा अभ्यास केला. बापाचाच धंदा त्यानें चालवावा असें ठरलें होतें. पण त्याचा रंगभूमीकडे प्रबल ओढा असल्यामुळें त्यानें आपल्या वयाच्या एकविसाव्या वर्षी आपल्या कांहीं मित्रांसह एक 'L'Illustre Theatre' नांवाची नाटककंपनी स्थापिली. या कंपनीनें पॅरिसमध्यें कशींबशीं दोन वर्षें काढलीं. नंतर मंडळीनें राजधानीच्या बाहेर पांच वर्षें कशींबशीं काढून बराचसा लौकिक मिळविला. नंतर मंडळी पॅरिस येथें १८५८ सालीं परत आली. तेथें दोन वर्षांनीं Palais Royal या नाट्यगृहांत स्थायिक झाली.

१६५९ सालीं Les Precieuses Ridicules हें नाटक लिहून सामाजिक आनंदपर्यवसायी नाट्याच्या लेखनास त्यानें प्रारंभ केला. १६६२सालीं त्याची पहिली उत्कृष्ट कॉमेडी L'Ecole des Femmes ही प्रकाशित झाली. त्याच वर्षी त्यानें Armande Bejart या वीस वर्षांच्या मुलीशीं विवाह केला. पण ती छचोर असल्यामुळें तो विवाह सुखावह झाला नाहीं. वर उल्लेखिलेल्या नाटकाशिवाय इतर पुष्कळ नाटकें मोलियरनें लिहिलीं. त्यांतील प्रमुख पुढें दिलीं आहेत:—

Le Tartuffe 1664, Don Juan 1665, Le Misanthrope 1666, Amphitryon 1668, L'Avare 1668, Le Bourgeois Gentilhomme 1670, Les Femmes Savantes 1672, Le Malade Imaginaire 1673.

मोलीअर हा आनंदपर्यवसायी नाटकांच्या बाबतींत पहिल्या प्रतीचा नट होता. गॅरिकप्रमाणेंच विकारदर्शन व अभिनय यांतील आनंदी वृत्ति हें त्याचें वैशिष्ट्य होय. तो नाट्यगृहाचा उत्कृष्ट व्यवस्थापक होता. मंडळीच्या हिताकडे त्याचें सदैव लक्ष असे. नाटकाची रंगीत तालीम करविण्यांत तो कसूर करीत नसे. आपल्या नाटकांत अत्यंत नाजूक विनोदापासून तों अत्यंत विचकट प्रहसनापर्यंतच्या विनोदाच्या सर्व छटा निर्माण करण्यांत त्याचा हातखंडा होता. त्याच्या कित्येक नाटकांत शोकरसाचा अंतर्गत प्रवाह आढळून येतो; परंतु जीवनाचें आनंददायक स्वरूप पाहूनच त्याच्या कल्पनाशक्तीला चालना मिळत असे. प्रेक्षकांना त्याच्या नाटकांतील टारटफ् (दुर्बल धर्ममार्तंड) ची भीति वाटत असली तरी त्याला पाहून प्रेक्षक हंसतात; आल्सेस्ट (दुसरें एक दुधखुळें पात्र)ची आम्हाला कींव येत असली तरी त्याला पाहून आपणांला हंसूं येतें. पहिल्यांत मोलीअर एका गुन्हेगाराची हास्यास्पद बाजू दाखवितो व दुसऱ्यांत एका प्रेमळ, सुशील मनुष्याचें हास्यास्पद स्वरूप दाखवितो.

मोलीअरचा नाट्यलेखनांतील उद्देश जनरंजन व समाजसुधारणा हा आहे. कुटुंबांतील दोष, वेडाचार यांचा त्यानें उपहास केला आहे. सत्य व व्यवहारज्ञान यांच्या भूमिकेवरून त्यानें, दांभिकता, वेडगळ समजुती, नास्तिकता, बदफैलीपणा, लोभ, अहंमन्यता, पोकळ डौल, काकवि; धंदेवाईक थापाडे व पंडितमन्य यांच्यांवर त्यानें निकराचा हल्ला चढविला आहे.

मोलीयरनें आपल्या नाट्यसृष्टींत निर्माण केलेल्या मोलकरणी प्रामाणिक, स्वामिनिष्ठ, फटकळ, व्यवहारकुशल असून त्यांना मोलीयरप्रमाणेंच दंभ व बौद्धिक उद्धटपणा याचा तिटकारा आहे; जणूं काय त्या त्याच्या नाट्यप्रतिभेच्या प्रतिनिधीच होत. त्यानें गिर्माण केलेलीं पात्रें सृष्टीला धरूनच आहेत. त्यांत अस्वाभाविकता नाहीं. त्याच्या नाटकांतील पात्रांत अतिमानुष अथवा स्वल्पमानुष असें कोणीहि नाहीं. आतां त्याच्या कांहीं विचकट प्रहसनांत हास्यास्पद पात्रें सांपडतात ही गोष्ट खोटी नाहीं.

त्याचीं Don Juan, L'Avare, Le Bourgeois Gentilhomme यांसारखीं कांहीं नाटकें घाईनें लिहिलीं गेल्यामुळें त्यांच्यांत विस्कळितपणा आढळून येतो हें खरें आहे; तरी पुरेसा वेळ मिळाल्यास तो सर्वांगसुंदर नाटक लिहीत असे ही गोष्ट नाकारतां येत नाहीं. कथानकांतील गुंतागुतीची उकल करण्याचें कौशल्य त्याच्यांत दिसून येत नाहीं. त्याचें कलेपेक्षां जीवनाकडे अधिक लक्ष होतें. नाटकाच्या कथा गतिमान करणें, कृति परिणामकारक करणें, एकंदर नाटकाला उठाव आणणें या बाबतींत त्याचा हात धरणारा कोणी झाला नाहीं.

मोलीयरची भाषा एकंदरीनें सुंदर आहे. तथापि कित्येक ठिकाणीं ती निष्काळजीपणानें लिहिलेली व गुन्तागुन्तीची असल्याचें आढळून येतें.

मोलीयर पॅरीसमध्यें १७ फेब्रुवारी १६७३ रोजीं वारला. सेंट जोसेफच्या प्रार्थनामंदिराच्या पाठीमागील स्मशानभूमिकेंत त्याचें शव पुरण्यांत आलें.

मोसंबी:—मोसंबी हें एक १०।१५ फूट उंच वाढणारें व जास्त विस्तार नसलेलें फळझाड असून त्याचें फळ सर्वसाधारण प्रत्येकाच्या परिचयाचें आहे. ह्याची लागवड अलीकडे बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वाढत आहे. मुंबई इलाख्यांतील बहुतेक महाराष्ट्रांतच ह्याची लागवड केलेली आढळते आणि एकट्या पुणें जिल्ह्यानेंच जवळजवळ ५० टक्के क्षेत्र व्यापलें आहे. त्याच्या खालोखाल अहमदनगर व पूर्व खानदेश हे जिल्हे क्रमानें येतात.

मोसंबीस हवामान उष्ण व कोरडें लागतें, पण कोंकणांतही हीं झाडें चांगल्या प्रकारें वाढून त्यांना रुचकर व भरपूर फळें येतात हें सिद्ध झालें आहे. १००० फूटपासून २५०० फूट उंचीपर्यंत हीं झाडें उत्तम होतात.

अभिवृद्धि—मोसंबीच्या झाडाची अभिवृद्धि बियांपासून न करितां जंबूरी (ईडलिंबाच्या वर्गांतील आंबट लिंबू) नांवाच्या लिंबाच्या रोपावर मोसंबीचे डोळे भरून करितात. (डोळे कलम पहा.) बियांपासून तयार केलेल्या झाडांना आंबट किंवा बेचव फळें येतात. मोसंबीचें दाब किंवा गूटी कलमही होतें.

मोसंबींत दोन प्रकार आढळतात. एक 'गोधडी' म्हणजे जाड सालीची व दुसरी 'कागदी' म्हणजे पातळ सालीची; पण कलमें विकत घेतांना तीं अमूक एक प्रकारचीं आहेत हें कांहीं सांगतां येणें शक्य नसतें. पातळ किंवा जाड सालीच्या मोसंबीच्या फळांत रुचीच्या दृष्टीनें कांहीं फरक नसतो. दिसण्यांत मात्र पातळ सालीचीं फळें मोहक दिसतात.

बहार-ह्या झाडास वर्षांतून तीन वेळां बहार म्हणजे फुलें येतात. त्यामुळें एकाच वेळीं झाडावर कांहीं पिकलेलीं, कांहीं कचीं, कांहीं लहान फळें व कांहीं फुलेंही दिसून येतात. पण व्यापारदृष्ट्या फळें बाजारांत अमूक एका हंगामांत भरपूर जावीं म्हणून बागवान तेथील परिस्थितीच्या मानानें कोणताही एक बहार धरतात. ह्या तीन बहारांचीं नांवें:—(१) मृगबहार (२) हत्तीबहार व (३) आंबेबहार.

मृगबहार—फुलें जून—जुलै महिन्यांत व तयार फळें फेब्रुवारी—एप्रिलमध्यें.

हत्तीबहार—फुलें आक्टोबर—नोव्हेंबर व फळें पावसाळ्याच्या सुरवातीस.

आंबेबहार—फुलें फेब्रुवारी—मार्च व फळें आक्टोबर—डिसेंबरांत.

उत्पन्न व आयुष्य—मोसंबीचीं झाडें २० ते २५ वर्षेंपर्यंत टिकतात. त्यानंतर दुसरी लागवड करतात. एका झाडास सरासरी ३०० फळें दरवर्षी लागतात, म्हणजे प्रत्येक झाडापासून अदमासें ३ रुपये मिळण्यास हरकत नाहीं.

मोहाचें झाड:–हें एक २०।२५ फूट उंच वाढणारें जंगली झाड आहे. ह्याच्या फुलांपासून उत्तम पिण्याची दारू तयार करितात. महाराष्ट्रांत व कोंकणांत हीं झाडें आढळतात. ह्या झाडाचीं पानें सागाप्रमाणें मोठीं असल्यामुळें पत्रावळींकरितां त्यांचा उपयोग करितात. ह्याचीं फळें फणसाच्या बियांप्रमाणें लांबट असून वरची साल हिरवी असते. सालीची भाजी चांगली होते व बियांचा अर्क तुपाप्रमाणें निघतो, व त्याचा तसा उपयोगही करितात.

मोसेस:–हिब्रू स्मृतिकार व ईजिप्तमधील इस्राइल लोकांचा पुढारी.त्याला फराओच्या (Pharaoh's) मुलीनें आपला मुलगा मानून इजिप्शियन राजपुत्र म्हणून त्याला वाढविलें. बायबलमध्यें त्याच्यासंबंधीं पुढील माहिती दिली आहे:–इजिप्तमध्यें इस्रायल लोकांची व हिब्रू लोकांची जसजशी वाढ होत गेली तसतसा त्यांचा इजिप्शियन लोकांकडून छळ होऊं लागला. त्यांना इजिप्शियन लोकांनीं गुलामांप्रमाणें वागविण्यास सुरवात केली व त्यांच्याकडून काम चोपून घेण्याकरितां अधिकाऱ्यांची योजना केली. अशा एका इस्राइलांचा छळ करणाऱ्या अधिकाऱ्याला ठार मारून मोसेस मिडियनला (अरबस्थानांतील उत्तरेकडील प्रदेश) पळाला व तेथील जेथ्रो नांवाच्या एका धनगराची मुलगी झिपोरो हिच्याशीं विवाह केला. माऊंट हॉरेब येथें त्याला इजिप्तला परत जाण्याविषयीं ईश्वरी आदेश झाला. ईजिप्तहून त्यानें इस्राइल लोकांना कॅनॉनच्या सरहद्दीवर नेलें. त्याला सिनाई पर्वतावर देवानें दहा आज्ञा दिल्या. Pisgah वरून त्यानें Promised Land ची दृष्टिभेट घेतली व तो वारला. त्याच्या पाठीमागें त्याचे जरशॉम व इलींझर असे दोघे मुलगे होते. त्याचें शव एका अज्ञात कबरींत पुरण्यांत आलें.

ज्यू लोकांच्या एका आख्यायिकेवरून मोसेस हा Pentatench या ग्रंथाचा कर्ता असें मानण्यांत येतें. परंतु त्या ग्रंथाचा बराचसा भाग निरनिराळ्या संकलनकारांनीं 'जुना करार' या नांवानें तयार केला असून त्यांतील कांहीं भाग मोसेसनें लिहिला असें, सांप्रत मानण्यांत येतें. मोसेसच्या नांवाचा उल्लेख कुराणांत व इस्लामी दंतकथांत वारंवार केलेला सांपडतो. जुन्या करारांत उल्लेखिलेल्या व्यक्तींत मोसेस ही एक महान् व्यक्ति आहे. तो पौर्वात्य राजैश्वर्यांत वाढविला गेला असूनही पारतंत्र्यांत खिचपत पडलेल्या लोकांच्या जीवनाशीं समरस झाला, आणि त्यानें इस्राइल राष्ट्र स्थापिलें.

मोहरम:–मुसलमानांचा एक सण. हुसेनच्या स्मरणार्थ (कांहींच्या मतें हसन व हुसेन यांच्या) सुतकाचे दिवस म्हणून हा महिना पाळतात. हुसेन हा महंमद पैगंबराच्या फातिमा नांवाच्या मुलीला अलीपासून झालेला मुलगा होय. अलीचा थोरला मुलगा हसन याला भावी खलीफा यझीद याच्या प्रोत्साहनानें इ. स. ६६८ मध्यें ठार मारण्यांत आलें होतें. पुढें हुसेन याचा करबला येथें ९ ऑक्टोबर इ. स ६८० या दिवशीं खून झाला. हा दिवस म्हणजे मोहरम महिन्याचा दहावा दिवस होय.

कांहींच्या मतें हसन व हुसेन हे करबल्याच्या रणांगणावर लढाईंत मारले गेले, व त्यानंतर त्यांच्या अनुयायांनीं शिया लोकांनीं ('मुसलमानी पंथ' पहा.) हे दिवस पाळण्यास सुरवात केली. सध्यां हिंदुस्थानांत शिया व सुन्नीपंथीय दोघेहि हा शोकप्रधान धार्मिक उत्सव पाळतात. मात्र 'मधेसाहेबा' व 'तबर्रा'च्या वादामुळें १९०५ पासून हे दोन्ही पंथ स्वतंत्र ताबूत बसवितात. शिया पंथीयांना याबद्दल जेवढें दुःख वाटतें तितकें सुन्नी यांना अर्थातच वाटत नाहीं व म्हणूनच सुन्नीपंथीयांच्या उत्सवांत मिरवणुकी व सोंगें निघालीं आहेत, व त्यांतील करमणुकीच्या स्वरूपामुळें हिंदुस्थानांत या चालीचा सर्वत्र प्रसार झाला आहे. ताबूत थंडे झाल्यानंतर शिया लोक जीं शोकगीतें म्हणतात त्यांना 'मर्शिया' असें नांव आहे.

'मधेसाहबा' व 'तबर्रा' म्हणजे काय यासंबंधींची माहिती रा. भास्करराव जाधव यांच्या लेखांतील एक परिच्छेद उद्धृत करून देत आहों—

"पण पंथाभिमान दुर्दमनीय आहे. शियांच्या मताप्रमाणें हजरत पैगंबराच्या वेळींच अली हा खलिफा झाला व त्या कारणानें पहिले तीन खलिफा हे खलिफाच नव्हत. या कारणानें त्यांतील कोणी धर्मवेड्या कवीनें या तिघांच्या नालस्तीच्या कविता केल्या व त्या शियापंथीयांच्या गाण्यांत येऊं लागल्या. यांस 'तबर्रा' म्हणतात. त्याला प्रतिक्रिया म्हणून सुन्नीपंथीयांनीं या पहिल्या तिघां खलिफांच्या स्तुतीपर कवनें केलीं, त्यांना 'मधेसाहेबा' म्हणतात. तबर्रा कानांवर पडल्यास सुन्नीलोक संतापतात. मधेसाहेबा कानीं आल्यास शियांचें पित्त भडकतें! इंग्रजी

राज्यांतील शांततेच्या दिवसांत पौरुष दाखविण्याचे प्रसंग नाहींसे झाल्याकारणानें धर्मनिमित्तानें एका धर्माचे लोक परधर्मीयांशीं भांडतात, पण आपल्या धर्मांतील भिन्नपंथीयांशींहि भांडतात, याचें हें ठळक उदाहरण आहे." (किर्लोस्कर मासिक–फेब्रुवारी १९४०.)

मंगळ (ज्योतिष):–मंगळ हा क्रूर पुरुषग्रह असून त्याला युद्धाची देवता मानतात. याला कुज, भूमिपुत्र, लोहितांग, अंगारक अशीं नांवें आहेत. मंगळ पृथ्वीला फार जवळ असल्यानें ज्योतिषशास्त्रज्ञांनीं मंगळाच्या पृष्ठभागाचा फोटोहि काढला आहे. मकरेस तो उच्च राशींत असतो. कर्केला तो नीच राशींत सप्टेंबरांत येतो. सर्व ग्रहांमध्यें अधिक माहिती मंगळाबद्दलच मिळवितां आली आहे. त्याचें तेज रक्तासारखें लाल असतें व तो वक्री झाल्यावर एका राशींत सहा सहा महिने राहतो व त्यावेळीं पृथ्वीवर भारतीय युद्धासारखे अनर्थ घडतात. १४ जानेवारी १९३३ च्या सुमारास शनिमंगळाच्या युतीनें भूकंप होऊन केवढा हाहाःकार केला त्याची आठवण अद्याप बुजली नाहीं !

मंगळाच्या शुभ गुणधर्मांचा मनुष्य पराक्रमी, महत्त्वाकांक्षी, धाडसी, सत्यप्रिय, मनमोकळा असतो. असत्य म्हटलें कीं त्याचे बाबतींत ठिणगी उडते. हा अशुभ असतां तंटेभांडणें, अपघात, मारामाऱ्या, रक्तपात, चिडखोरपणा, वावदूकता दर्शवितो. याचें वास्तव्याचें ठिकाण म्हणजे तालीमखाने, युद्धक्षेत्रें, कारखाने, डॉक्टरांचीं ऑपरेशनस्थळें, आगी लागण्याच्या जागा इत्यादि होत. विषप्रयोग, विषारी प्राणी, फौजदारी खटले वगैरे आकस्मिक परिणाम करणाऱ्या गोष्टी हा ग्रह दर्शवितो. मंगळ हा अष्टमस्थानचा म्हणजे मृत्यूचा कारक ग्रह आहे. मंगळाचा अंमल शरीरांतील गुह्येंद्रियें व शरीरांतील सर्व स्नायुबंधांवर आहे. गोंवर, रक्तपिती, देवी, प्रजोत्पादनाच्या इंद्रियांचे सर्व विकार हे मंगळ अनिष्ट असल्यास घडतात. मंगळाचें प्राधान्य असलेलीं माणसें सडसडीत, फार लठ्ठ नसलेलीं, परंतु हाडपेरानें मजबूत, चेहरा उग्र व क्वचित् त्यावर वण असलेलीं, डोकें तांबूस परंतु तेजस्वी व कुरळ्या केसांचीं असतात. मंगळ 'ऋणकर्ता' असल्यानें अशा मंडळींचा स्वभाव विशेष खर्चिक असतो.

मेष व वृश्चिक या मंगळाच्या स्वगृहराशी. मकरेस २८ अंशांवर तो उच्चीचा व कर्केस २८ अंशांवर तो परम नीचीचा असतो. सप्तम दृष्टीबरोबरच त्याला ४ व ८ अशी केंद्रदृष्टि असल्यानें रवि, हर्शल, नेपचून, शनि या ग्रहांशीं त्याचा अशुभ योग होत असेल तर वाईट फळें फार जाणवतात. शुक्र व मंगळ हे दोघेहि राजस व रजोगुणी ग्रह असल्यानें त्यांचा शुभयोगच असावा. केंद्रयोग असल्यास अगर समसप्तक असल्यास मनुष्य बहुधा कामुक, व्यभिचारी व निलाजरा असतो. दशमांतील मंगळ मनुष्यास पुढें आणतो. पण तो कर्केचा असल्यास पोलिसाप्रमाणें हलकटवृत्ति, शिवराळपणा इत्यादिकांनीं अधिकार गाजवितो व मीन रास असल्यास चंचलपणाची त्यांत भर पडते. कन्या रास बौद्धिकता दर्शविते. तसेंच मिथुन, तूळ, कुंभ या बौद्धिक राशी शास्त्रीय बाबतींत पराक्रम घडवून माणसाला पुढें आणतात. मंगल जलराशींत अशुभसंबंधित असतां मनुष्य दारूबाज असतो. वृश्चिक राशींतील मंगळ बहुधा डॉक्टरीचा धंदा दर्शवितो. कारण मंगळ हा रसायनें, वनस्पति व शस्त्रक्रिया यांचा दर्शक आहे. सिंहेंतील मंगळ पराक्रमी, मेषेंतील न्यायी व शूर, धनु राशींतील अत्यंत रागिट पण तितकाच सत्यनिष्ठ व वृषभ राशींत अत्यंत कामातुर, खुनशी व द्रव्यलोभीपणा दर्शवितो. तात्पर्य, मंगळ ही मोठी आग अथवा विजेप्रमाणें दारुण शक्ति आहे. त्याचा व गुरुचंद्र इत्यादिकांचा शुभयोग असेल तर ही शक्ति सत्कार्य पुढें ढकलण्याला उपयोगी पडते. नाहींतर त्याचे पापग्रहाशीं अशुभ योग असतां अत्यंत दारुण विपत्ति ओढवते.

मंगळः–सूर्यमालेंतील एक ग्रह. ग्रहांच्या सूर्यापासूनच्या अंतराच्या मानानें याचा क्रम चौथा पडतो. सूर्यमालेंत शुक्रापुढें पृथ्वी व तिच्या पलीकडे मंगळ आहे. ग्रहांच्या कक्षा पूर्ण वर्तुलाकृति नाहींत. त्या दीर्घवर्तुलाकृति आहेत. कक्षेला पूर्णवर्तुलत्वाहून जो कमीपणा असतो त्याला केंद्रच्युति म्हणतात. मंगळाची केंद्रच्युति बुधाखेरीज इतर सर्व ग्रहांपेक्षां जास्त आहे. त्यामुळें मंगळ उच्चीं असतो तेव्हां पृथ्वीपासून ६३०००००० मैल अंतरावर असतो व नीचीं असतांना ३५०००००० मैलांवर असतो. मंगळाचा व्यास पृथ्वीच्या अर्ध्याहून थोडा जास्त व चंद्राच्या व्यासाच्या दुप्पट आहे. त्याचा आकार पृथ्वीच्या सुमारें षष्ठांश आहे. मंगळावरील दिवस २४ तास ३७ मिनिटें २३ सेकंद आहे. मंगळाची सूर्यप्रदक्षिणा ६८७ दिवसांत होते. अर्थात् हे दिवस पृथ्वीवरच्या दिनमानानें होतात. मंगळावरच्या दिनमानानें एका वर्षांत मंगळाचे सुमारें

६६९॥ दिवस होतात. मंगळाचा एक सौर महिना पृथ्वीवरच्या ५७ दिवसांचा आहे. मंगळाची कक्षा व विषुववृत्त यांच्यामध्यें सुमारें २७ अंशांचा कोण आहे. येथील प्रत्येक ऋतूचा कालावधि पृथ्वीवरील ऋतुकालाच्या जवळजवळ दुप्पट आहे. मंगळाला सूर्याचा प्रकाश व उष्णता पृथ्वीला सूर्यापासून मिळणाऱ्या उष्णता व प्रकाश यांच्या $\frac{3}{7}$ मिळतो. मंगळ हा बुधाखेरीज सर्व ग्रहांत लहान आहे. सूर्यापासून मंगळाचें मध्यम अंतर १४१० लक्ष मैल आहे.

मंगळाला दोन उपग्रह आहेत. त्यांचा १८७७ सालीं शोध लागला. एकाचा व्यास १५।२० मैल असून दुसरा त्याचे आंत आहे व त्याहून बराच तेजस्वी आहे. त्याचा व्यास सुमारें ३०।४० मैल आहे. त्यांचीं मंगळाहून अंतरें फार थोडीं आहेत. आंतला सुमारें ६००० मैलांवर व बाहेरला सुमारें १४॥ हजार मैलांवर आहे. हे मंगळाभोंवतीं फार जलद फिरतात. आंतला ७ ता. ३९ मि. इतक्या वेळांत फिरतो व बाहेरला ३० ता. १८ मि. इतक्या वेळांत फिरतो.

मंगळाचा पृष्ठभाग दुर्बिणींतून फार चांगला दिसतो. याच्या पृष्ठभागाचा कांहीं भाग तांबूस व कांहीं हिरवा दिसतो. तांबूस भाग ही जमीन असावी व हिरवा भाग .दिसतो येथें पाणी असावें असें शास्त्रज्ञांनीं अनेक प्रमाणांनीं सिद्ध केलें आहे. मंगळाच्या दोन्ही ध्रुवांभोंवतालचा भाग चकचकित पांढरा दिसतो त्यावरून तेथें बर्फ असावें असें अनुमान निघतें. मंगळावर वातावरण आहे. तेथें कधीं कधीं पृथ्वीवरील वातावरणांत येतात तशीं अभ्रें येतात. यावरून तेथें पाणी असल्याचें सिद्ध होतें. पृथ्वीवरच्या वातावरणांत जीं तत्त्वें आहेत तींच मंगळाच्या वातावरणांत आहेत, असें त्याच्या वर्णलेखावरून सिद्ध झालें आहे. मंगळाच्या ध्रुवप्रदेशाजवळ बर्फ असून त्यांच्याभोंवतीं समुद्र आहे. मंगळावर जमीनीइतकेंच पाणी आहे. पाणी व जमीन जिकडे तिकडे वांटलेलीं आहेत. मंगळाच्या हवेचा दाब पृथ्वीच्या हवेहून कमी आहे. पृथ्वीवर समुद्रकांठीं भारमापकांत पारा ३० इंच असतो. मंगळावर ११ इंच असेल. मंगळावरील पाणी, जमीन, वातावरण यांची जी माहिती मिळाली आहे तीवरून मंगळावर कोणत्या तरी प्राण्यांची वस्ती असावी असें अनुमान निघतें. मंगळावरील परिस्थितीचें सांगोपांग ज्ञान मानवी प्राण्याला अद्याप झालें नसल्यामुळें पृथ्वीवरील प्राण्यासारखे प्राणी तेथें आहेत किंवा काय हें निश्चित सांगतां येत नाहीं.

मंगळागौरः—लग्न झाल्यानंतर पांच वर्षेंपर्यंत दर श्रावण महिन्यांतील मंगळवारीं शिवपार्वतीची पूजा करावयाची असते, या एक प्रकारें रूढीनें पडलेल्या व्रताला मंगळागौर म्हणतात. या पूजेची आदल्या दिवशीं म्हणजे दर श्रावणी सोमवारीं शंकराची शिवामूठ वाहून पूजा करावयाची असते. लग्न होऊन ज्यांचीं पांच वर्षें पुरीं झालेलीं नाहींत अशा नववधूंना बरोबर घेऊन मंगळवारीं यथाविधि गौरीची पूजा बांधावयाची व संध्याकाळपर्यंत उपवास करावयाचा. रात्रीं सुग्रास भोजनानें उपवास सोडून निरनिराळे खेळ खेळून, गाणीं म्हणून मध्यरात्रीपर्यंत जाग्रण करून मंगळागौर जागवावयाची अशी प्रथा आहे. ही पूजा विशेषतः ब्राह्मणवर्गांतच होत असते.

म्युनिसिपॅलिटीः—हा शब्द लॅटिन म्युनिसिपीयम या शब्दापासून बनला आहे. हा शब्द रोमन अमलाखालील शहरांतील समाज (Community) अशा अर्थानें वापरत असत. या समाजाला जसे रोमन नागरिकत्वाचे सर्व हक्क उपभोगावयास मिळत तशी नागरिक म्हणून जबाबदारीहि स्वीकारावी लागत असे. या हक्कांत पुष्कळ अंशानें अंतर्गत स्वायत्ततेचा अंतर्भाव होतो. हल्लीं या शब्दाचा अर्थ कोणतेंहि स्वायत्त शहर असा होतो.

म्यूनिच करारः—हा करार ता. २९ सप्टेंबर १९३८ रोजीं जर्मनी, ग्रेट ब्रिटन, फ्रान्स व इटाली या राष्ट्रांच्या दरम्यान झाला. या करारावर त्या त्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या सह्या म्यूनिच येथें झाल्या; म्हणून तो म्यूनिच करार म्हणून ओळखला जातो. या करारान्वयें झेकोस्लोव्हाकियांतील सुडेटन जर्मन प्रांत जर्मनीला देण्याचें ठरलें. हिटलरनें हा प्रांत जर्मनीच्या ताब्यांत मिळावा म्हणून सन १९३८ च्या ऑगस्ट महिन्यांत मागणी केली व झेकोस्लोव्हाकियावर स्वारी करण्याकरितां सैन्याची जमावाजमव केली. त्या वेळचे इंग्लंडचे पंतप्रधान चेंबरलेन हिटलरला युद्धापासून परावृत्त करण्याकरितां विमानमार्गें हिटलरच्या भेटीला गेले. त्यानंतर फ्रान्स व इंग्लंड या राष्ट्रांनीं शेंकडा ५० हून जास्त जर्मन लोकसंख्या असलेले प्रदेश जर्मनीकडे सोडून देण्याविषयीं झेकोस्लोव्हाकियाला शिफारस केली.

चेंबरलेननीं पुनः एकवार हिटलरची भेट घेण्याकरितां विमानोड्डाण केलें. र्‍हाइनलँडमधील सॉडेसबर्ग येथें झालेल्या या भेटींत हिटलरनें आपल्या मागण्या पूर्वींहून वाढविल्या; झेकोस्लोव्हाकियांतील पूर्वी मागणी केल्याहून अधिक विस्तृत प्रदेश जर्मनीला मिळावा व त्या देशाच्या दुसर्‍या भागांत सार्वत्रिक मतनोंदणी होऊन लोकमताला कौल लावण्यांत यावा असा हिटलरनें हट्ट धरला. चेंबरलेन निराशेनें परत गेले. झेकोस्लोव्हाकियाला युद्धाची सिद्धता करण्याचा सल्ला देण्यांत आला. फ्रान्स व इंग्लंड यांनीं युद्धाची सिद्धता चालविली. युद्धाचा वणवा भडकण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. परंतु हिटलरनें मुसोलिनीच्या सल्ल्यावरून म्युनिचला पुनः एकवार परिषद बोलावण्याची सूचना केली.

चेंबरलेन, दलादिये, मुसोलिनी व हिटलर यांची ता. २८ सप्टेंबर रोजीं म्यूनिच येथें परिषद झाली. हिटलरनें आपल्या मागण्यांत थोडासा फरक केला; त्याच्या सर्व मागण्या मान्य करण्यांत आल्या. हिटलरनें मागितलेला सर्व प्रदेश मतनोंदणीविना त्याला देण्याचें मान्य करण्यांत आलें. जर्मन सेनेनें ता. १ ऑक्टोबर रोजीं झेकोस्लोव्हाकियांत प्रवेश केला. झेकोस्लाव्हाकियाच्या नवीन सरहद्दीबद्दल करारावर सह्या करणार्‍या राष्ट्रांकडून हमी देण्यांत आली. चेंबरलेन व हिटलर या दोघांनीं इंग्लंड व जर्मनी या देशांचे दरम्यान युद्ध होणार नाहीं अशी संयुक्त घोषणा केली.

झेकोस्लोव्हाकियांत व इतरत्र हा करार म्हणजे विश्वासघात असेंच मानण्यांत येऊं लागलें. ब्रिटन व फ्रान्समध्यें या करारान्वयें युद्ध टळलें म्हणून त्याचा प्रथम उदो उदो करण्यांत आला; पण पुढें लवकरच शरणागतीचा एक प्रकार म्हणून या कराराचा चोहोंकडून धिक्कार करण्यांत येऊं लागला. कांहीं झालें तरी एक गोष्ट मात्र खरी कीं, या करारानें अनुनयाच्या धोरणाची परिसीमा गांठली. हिटलरनें झेकोस्लोव्हाकियाचा उर्वरित भाग मार्च १९३९ मध्यें काबीज करून करारभंग केल्यामुळें समजावणीचें धोरण पुढें चालविणें अशक्य झालें.

म्हैसः—चतुष्पाद प्राण्याच्या वर्गांतील एक गांवठी पण दुभतें जनावर. ही चारा, कडबा, गवत यांवर मुख्यतः जगते. हिचें दूध व कष्ट उपयोगीं पडत असल्यामुळें म्हशीला अनेकजण बाळगतात. ही सावित्री या नांवानेंहि प्रसिद्ध आहे. विश्वामित्रानें आपली स्वतंत्र सृष्टि निर्माण केली, त्या सृष्टींतील ही एक होय अशी पौराणिक आख्यायिका आहे.

हिच्या शरीराचे तीन प्रमुख भाग. एक डोकें, दुसरा शरीर व तिसरा शेपूट हा. डोकें शरीरास मानेच्या योगानें जोडलेलें असतें. तसेंच शेपूट गुदद्वाराजवळ पाठीच्या कण्याशीं सांधलें गेलें आहे. गायीप्रमाणें हिला वशिंड व गळ्याखालीं पोळी नसते. शेपूट मागच्या बाजूस खालीं लोंबत असतें. शेपटीला गोंडा असतो. तोंड लांबूडकें असून त्यावर मागें पडलेलीं चपटीं काळीं शिंगें असतात. गायीपेक्षां अंगानें ही थोडी मोठी असते. साधारणतः जमिनीपासून हिची उंची ४—४॥ फूट भरते. तोंडापासून शेंपटीच्या टोकापर्यंत १२—१३ फूट लांब ही असूं शकते.

म्हैस रंवथ करते. ही चपळ नव्हे. शांत व गरीब स्वभावाची होय. हिचें चालणें व काम करणें हळूंहळूं असतें. कित्येक वेळां बराच वेळ तिला रेकेत बसण्याची इच्छा होते. उन्हांत बराच वेळ बांधली तर ही धापा देऊं लागते. काळ्या रंगाच्याच म्हशी फार दिसतात. पण थोड्याबहुत करड्या व मिसळ रंगाच्याहि पाहण्यांत आहेत.

वयाच्या ३—४ थ्या वर्षापासून ही फळूं लागते. गाभ धरल्यावर ती वर्षाभरानें विते. दर खेपेस तिला एकच रेडकूं होतें. साधारणपणें हिच्या सर्व आयुष्यांत ९।१० पेक्षां अधिक रेडकें होऊं शकत नाहींत. जास्तींत जास्त ही पंचवीस वर्षें जगूं शकते.

म्हशीला गोचीड, तांबवा यांचा फार उपसर्ग होतो. तो होऊं नये म्हणून कित्येक तिला भादरतात. तिला दूध अधिक यावें याकरितां पुष्कळ लोक पेंड, भरडा, सरकी, कोंडा इत्यादि पदार्थ खाऊं घालतात.

व्याल्याबरोबर जें दूध निघतें त्यास चीक म्हणतात. पहिले ७।८ दिवस हिचें दूध चिकाच्या रूपांतच निघत असल्यानें विरजणाच्या दृष्टीनें निरुपयोगी असतें. पुढें पुढें मग तें दूध चांगलें निघतें. म्हशी ८—९ महिने दूध देतात. कांहीं वर्ष—सव्वा वर्ष देतात तर क्वचित् एखादी दीड ते पावणेदोन वर्षेंपावेतों देऊं शकते. म्हशीचें दूध दाट, पांढरें स्वच्छ असतें. म्हशीच्या लोण्याचें तूपहि पांढरें व कणीदार असतें. गायीपेक्षां म्हैस अधिक दूध देते. हिचें दूध गोदुग्धाइतकें बुद्धिवर्धक असत नाहीं असा समज आहे.

स्थानपरत्वें हिच्या पुष्कळ जाती आहेत. त्यांत जाफराबादी जात प्रमुख होय.

म्हैसूर:–बशीसारख्या आकाराचें हें शहर म्हैसूर संस्थानची राजधानी आहे. या गांवाच्या दक्षिणेस ३५०० फूट उंचीची टेकडी असून तीवर चामुंडा अथवा महिषासुरमर्दिनीचें मंदिर आहे. देवीच्या नांवावरूनच या टेकडीला चामुंडेची टेकडी असें म्हणतात. टेकडीवरील देवी म्हैसूरच्या महाराजांची कुलस्वामिनी होय. दिवसा व रात्रीं म्हैसूरची शोभा, या टेकडीवरून उत्तम दिसते. गांवांत मध्यभागीं तलाव असून त्याच्या कांठाला महाराजांचा किल्ल्यांतील वाडा गांवची शोभा वाढवीत आहे. बंगळूर म्हैसूर रेल्वे शहराच्या पश्चिम बाजूनें जाते. या रेल्वेचें मुख्य स्टेशन गांवच्या वायव्य कोंपऱ्यांत आहे.


शहराचे आठ प्रमुख भाग आहेत. या ठिकाणीं पूर्व–पश्चिम दिशांना अनुक्रमें डोडाकेरी व कुकरनळी असे दोन मोठे तलाव असल्यामुळें गांवाला रुंदी वाढवण्यास वाव नाहीं; आणि यामुळेंच शहराची दक्षिणोत्तर लांबी खूपच होऊन बसली. पूर्वपश्चिम गेलेले मोठे सहा रस्ते व दक्षिणोत्तर असणारे तीन प्रमुख रस्ते यांनीं शहराचे पुष्कळच छोटे छोटे पोट भाग केले गेले आहेत. कांहीं चौकांत वर्तुळाकृति दिव्यांची योजना केली असल्यानें रात्रीच्या वेळीं सर्व नगर दीपसौन्दर्यानें नटलेलें दिसतें. येथील कृष्णराज हॉस्पिटल, टेक्निकल इन्स्टीट्यूट, वसंतमहाल, हार्डिंग सर्कल, प्राणिसंग्रहालय, म्हैसूर वाचनालय, महाराजा कॉलेज, ललिता महाल व विश्वविद्यालय हीं ठिकाणें परस्थांना पाहाण्यास फारच मजा वाटेल. चामुंडेनें या जागीं महिषासुराचा वध केला म्हणून म्हैसूर हें नांव प्राप्त झालें अशी दंतकथा आहे. म्हैसूर हा शब्द कानडी असून तो म्हैस व ऊरु या दोन शब्दांपासून बनला आहे. संस्थानांतील हळेबीड, बैलूर, नांजनगूड व श्रीरंगपट्टण येथील देवालयें व ऐतिहासिक स्थळें व अवशेष पाहण्यास जाण्यासाठीं येथून मोटारी नी रेल्वे यांची चांगलीच सोय झालेली आहे. पुराणकालापासून या शहराची प्रसिद्धि दिसून येते.

म्हैसूरपाकः–**साहित्य**–चण्याचें पीठ, साखर, तूप, वेलदोडे व केशर. **माप**–वाटीभर चण्याचें पीठ, तितकीच साखर, दोन वाट्या तूप, केशर व वेलदोडे अजमासें. **कृति**–प्रथम थोडें तूप घालून पीठ भाजून घ्यावें. मग साखरेचा पाक गोळी वळेपर्यंत करावा. बाकीचें तूप तापत ठेवून कडकड वाजूं लागल्यावर त्यांत पीठ टाकून जरा हलवावें व त्यावर पाक ओतून जरा घाटून ताटाला तुपाचा हात लावून त्यावर तें पीठ ओतावें. जास्त तूप निथळून काढावें व वड्या कापाव्या. ह्या वड्यांना जाळी पडते.

य

यमः–विवस्वत व संज्ञा यांचा पुत्र. संज्ञेस सूर्याचें तेज सहन होत नसे; म्हणून ती तो समोर येतांच नेत्र मिटीत असे. त्यावरून विवस्वतानें संज्ञेला 'तुझ्या पोटीं प्रजासंहारक यम येईल' असा शाप दिला. तोच हा यम. यम व यमी हीं जुळीं मुलें होत. सावत्र आईला लाथ मारल्याबद्दल तिनें यमाला 'तुझा पाय गळेल' असा शाप दिला. पुढें यानें बापाला सर्व हकीकत सांगितली. तेव्हां बापानें उःशापवजा वर दिला. एक तांबड्या पायांचें पांखरूं पाय खाईल व नंतर पाय आखूड पण सुंदर होईल' यानंतर यमाला वैराग्य उत्पन्न झाल्यामुळें त्यानें तपश्चर्या केली. तेव्हां ब्रह्मदेवानें याला पितरांचें स्वामित्व व जगांतील पाप पुण्यावर नजर ठेवण्याचें काम दिलें. याला मांडव्याच्या शापामुळें विदुररूपानें शूद्र योनींत जन्म घ्यावा लागला. कुंतीनें याचा मंत्र जपला म्हणून तिला युधिष्ठिर झाला. अर्जुनास यानें एक अस्त्र दिलें होतें. यानें गौतमाला मातृपितृऋणांतून मुक्त होण्याचा मार्ग सांगितला. सावित्रीनें सत्यवानाला याच्यापासून सोडविला. धर्मानें आपल्या प्रश्नांचीं योग्य उत्तरें दिल्यामुळें एका सरोवरावर मृत झालेल्या पांडवांस यानें जिवंत केलें व अज्ञातवासांतून पार पडण्याचा त्यांस वर दिला. याचा उपदेश हिरण्यकशिपूनें स्वक्षियांस सांगितला. याच्या स्त्रीचें नांव धूमोर्णा. याची नगरी मानसोत्तर पर्वतावरील संयामिनी. यानें जनकाच्या विनंतीवरून वाटेंतील लोकांस त्रास न देण्याचें ठरविलें. सुरथाची परीक्षा पाहून त्यास यानें रामदर्शनाखेरीज मृत्यु येणार नाहीं असा वर दिला. यमीनें यमाला कार्तिक शु॥ २ला भोजन दिलें होतें. म्हणून जे त्या दिवशीं बहिणीच्या हातचें भोजन करतील त्यांना सदैव सौख्य प्राप्त होईल असा यानें वर दिला. यानें गंगास्नानादि व्रतें हर्षणाच्या मातापित्यांचीं भीषण रूपें जाऊन सौम्य रूपें लाभावींत म्हणून हर्षणाला सांगितलीं.

हा व याचा दूत यांच्यामध्यें झालेला संवाद 'यमगीता' नांवानें प्रसिद्ध आहे. ही गीता जातिस्मरानें कालिंगक ब्राह्मणास सांगितली. त्यानें ती भीष्मास व



म्हैसूर—१ श्रीरंगपट्टणची झुलती कमान २ म्हैसूरचा राजवाडा-रात्रीची विजेची रोषणाई ३ म्हैसूरची दसऱ्याची मिरवणूक ४ होयसालेश्वरची मूर्ती ५ (हालेबिड). होयसालेश्वर मंदिराचा बाहेरचा एक देखावा.

भीष्मानें नकुलास सांगितली याला धर्म हें आणखी एक नांव होतें.

याच्या नांवावर यमसंहिता व यमस्मृति हे दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. याज्ञवल्क्यानें धर्मशास्त्रकारांच्या यादींत याचें नांव दिलें आहे. विश्वरूप, विज्ञानेश्वर, अपरार्क, स्मृतिचंद्रिका वगैरे ग्रंथांत याचे सुमारें ३०० श्लोक आज उपलब्ध आहेत. यानें नचिकेताला दानासंबंधीं सांगितलेला गाथा प्रसिद्ध आहे. व्यवहार व व्यभिचार यासंबंधीं यानें बरीच महत्त्वाची माहिती दिली आहे.

यमुना:—उत्तर हिंदुस्थानांतील एक पवित्र नदी. हिचा सूर्यकन्या व यमाची बहीण म्हणून पुराणांत उल्लेख केला आहे. बृहत्संहिता व भागवत या ग्रंथांत हिचा नामनिर्देश केलेला दिसून येतो.

हिचा उगम हिमालयांतील ' बंदर पुंच ' या शिखराच्या पश्चिमेस आठ मैलांवर झाला असून ती

जम्नोत्रीवरून वहात येते. फैजाबादजवळ हिचें पात्र पुष्कळच मोठें असल्यामुळें या ठिकाणाहून हिला पूर्व कालवा व पश्चिम कालवा हे दोन कालवे काढले आहेत. याखेरीज हिला आणखी एक आग्रा कालवा या नांवाचा कालवा दिल्लीपासून १० मैलांवर आखला येथून काढण्यांत आला. पूर्व कालवा १८३० त पुरा झाला. पश्चिम कालवा १३७६ त फिरोझ तुघ्लखनें बांधला. या कालव्याचा हंसी हा फांटा बोटी जाण्या-येण्याजोगा आहे. तिन्ही कालव्यांमुळें यमुनेच्या कांठची लाखों एकर जमीन दरवर्षी भिजते.

ही नदी उगमापासून प्रयागपर्यंत ८६० मैल लांब आहे. हिला महिपूरजवळ ३६० मैल लांबीची बटवा नदी मिळते. याचप्रमाणें पार्वती २२० मैल लांबीची, बनास ३०० मैल व क्षिप्रा १२० मैल या नद्यांच्या संयोगानें बनलेली ६५० मैल लांबीची चंबळा नदी इटावाजवळ भेट देते. तसेंच बाणगंगादि आणखीहि नद्या यमुनेला येऊन मिळतात. प्रयागजवळ ही गंगेला मिळते.

या नदीच्या कांठाला दिल्ली, बाघपत, वृंदावन, काल्पी, हमीरपूर, प्रयाग इत्यादि प्रसिद्ध ठिकाणें आहेत. हिच्यावर रेल्वेचे मोठाले पूल पुष्कळ ठिकाणीं बांधलेले आहेत. जमुना नांवानेंहि ही ओळखली जाते. हिचें पाणी काळेंभोर दिसतें. गंगा–यमुना या नद्यांच्या संगमाजवळ हिच्या काळेपणाचा प्रत्यय चांगलाच दिसून येतो.

यशवंतराव होळकर (मृत्यु २८ आक्टो. १८११):– मराठ्यांच्या लढाऊ वृत्तीचें असामान्य प्रदर्शन करणारा होळकर कुलांतील धर्माभिमानी, व उत्कृष्ट सेनापति. हा तुकोजीचा दासीपुत्र. याला काशिराव, मल्हारराव व विठोजी असे तिघे भाऊ होते. यांपैकीं पहिले दोघे औरस असून तिसरा अनौरस होता. बापाच्या पश्चात् गादीसंबंधीं तंटे उत्पन्न झाले. काशिरावानें पेशवे यांचा पक्ष धरला. मल्हाररावानें सर्जेरावाचा पक्ष स्वीकारला. याचा भाऊ विठोजी बंड करून पेशव्यांच्या नांवानें खंडणी वसूल करूं लागला; म्हणून बापू गोखल्यानें त्यास पकडून ठार केलें. बापूंच्या या कृत्यानें यशवंतराव चिडला. यानें पुणें घेण्यासाठीं त्यावर स्वारी केली. तींत यानें पुणें शहराची नासाडी केली व शेवटीं पेशव्यांच्याकडून एक कोट रुपये वसूल केले. पुढें वेलस्लीच्या हालचालीमुळें हा पुणें सोडून गेला.

दिल्लीकडे शिंद्याचा पाडाव होत असतांना हा तटस्थ राहिला. यामुळें शिंदे–भोसल्यांचे तह झाल्यावर हा एकटा पडला. हाहि तह करण्यास तयार होता; पण तो मान्य झाला नाहीं. शिंदे–भोसले यांची रिकामी झालेली फौज यानें नोकरीस ठेविली. इंग्रजांशीं युद्ध नाकारणाऱ्या इंग्रजी नोकरांचें यानें शिरच्छेद केले. बादशहाकडून यानें 'महाराजाधिराज राजराजेश्वर अलिजाबहाद्दर' अशी पदवी मिळवली. यानें अफगाणिस्थानापर्यंत सर्व राजे-रजवाड्यांना पत्रें धाडून इंग्रजांविरुद्ध उठावणी केली. तेव्हां इंग्रजांनीं यास 'होळकरांच्या दौलतीवर तुमचा हक्क नाहीं' असें कळविलें. या त्यांच्या कळवण्यानें हा फारच चिडला. याचें व इंग्रजांचें युद्ध सुरूं झालें. धांवपळीचा सामना करून यानें इंग्लिशांना बेजार केलें. शेवटीं १८०५ त राजपूर घाट येथें तह झाला. या तहांत पूर्वीचा सर्व मुलुख त्याजकडे कायम राहिला आणि याच्या मुलीस (भिमाबाईस) बुंदेलखंडांतील कुंचचा जिल्हा जहागीर म्हणून मिळाला. मात्र याचे लढाईपूर्वी ७० हजारापर्यंत असणारें सैन्य व १०० पर्यंत तोफा कमी होऊन तें १५ हजारापर्यंत सैन्य व २० पर्यंत तोफा ठेवण्याचा अधिकार यास मिळाला.

पुढें यास अतिश्रमामुळें दारूचें व्यसन लागलें. शेवटीं शेवटीं तर हा वेडा बनला. हा काळा व ठेंगू होता. मराठी व फारशी यांचें लेखन त्यास येत असे. यानें स्वतःचा रुपया पाडला होता. हा धर्माभिमानी होता. उत्कृष्ट सेनापती म्हणून याचें नांव चिरकाल टिकेल. इंग्रजांची खोड मोडण्याची याची हौस अपुरीच राहिली. यानें तोफा ओतवण्याचा कारखाना सुरूं केला होता. होळकरांची दौलत याच्यामुळेंच टिकली. मराठ्यांच्या लढाऊ वृत्तीचें असामान्य प्रदर्शन यानें शेवटीं शेवटीं पुनः एकदां दाखविलें. हा भानपूर येथें २८ आक्टो. १८११ ला मरण पावला.

याज्ञवल्क्य:–आर्यांच्या प्राचीन वाङ्मयांत याज्ञवल्क्य हें नांव तत्त्वज्ञ, योगी व स्मृतिकार म्हणून गाजलें आहे. वैदिक ऋषींच्या मालिकेंत याज्ञवल्क्याला मानाचें स्थान आहे. शुक्लयजुर्वेदाचा प्रवर्तक म्हणून त्याची ख्याति आहे. याज्ञवल्क्य व त्याचा गुरु वैशंपायन या दोघांत वितुष्ट आलें व याज्ञवल्क्यानें सूर्याची आराधना करून शुक्ल यजुर्वेद व शतपथ ब्राह्मण यांची प्राप्ती करून घेतली, असा महाभारताचे शांतिपर्वांत उल्लेख आहे. विष्णुपुराण, भागवत व इतर पुराणें यांत

यासंबंधीं दिलेली हकीगत महाभारतांतील हकीगतीशीं जुळती नाहीं; तथापि याज्ञवल्क्य व त्याचा गुरु यांचे संबंध सलोख्याचे नव्हते यात्राबत एकमत आहे. याज्ञवल्क्याच्या विदेही जनकाशीं झालेल्या अग्निहोत्र या विषयावरील संभाषणाचे शतपथ ब्राह्मणांत अनेकदां उल्लेख आले आहेत.

बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्य ऋषीचें महान् तत्त्वज्ञाच्या भूमिकेंत आपल्याला दर्शन होतें. त्यांत याज्ञवल्क्यानें आपली तत्त्वजिज्ञासु पत्नी मैत्रेयी हिला गूढ अशी ब्रह्मविद्या सांगितली आहे. याच उपनिषदांत जनकानें अत्यंत विद्वान् ब्राह्मणाला देण्याकरितां ठेवलेल्या एक हजार गाई याज्ञवल्क्यानें जिंकल्याचा उल्लेख आहे. यांत याज्ञवल्क्यानें जनकाला पार्थिव शरीर सोडून गेलेल्या जीवात्म्याचें पुढें काय होतें याचें ज्ञान सांगितलें आहे. याज्ञवल्क्यस्मृतीच्या कर्त्यानें आपण सूर्यापासून प्राप्त झालेल्या आरण्यकाचा व योगशास्त्राचा कर्ता असल्याविषयीं त्या स्मृतींत उल्लेख केला आहे. परंतु हा उल्लेख एका महान् तत्त्वज्ञानें व योग्यानें लिहिलेली स्मृति म्हणून आपल्या स्मृतीला महत्व यावें म्हणूनच करण्यांत आलेला असून उपनिषदांतील तत्त्वज्ञ याज्ञवल्क्य व स्मृतिकार याज्ञवल्य या भिन्न व्यक्ति आहेत असें विद्वानांचें मत आहे.

याज्ञवल्क्यस्मृतीची रचना इसवी सनाच्या पहिल्या दोन शतकांत अगर तत्पूर्वी झाली असावी असें संशोधकांनीं ठरविलें आहे. ही स्मृति मनुस्मृतीहून अधिक पद्धतशीर व आटोपशीर आहे. या स्मृतींत आचार, व्यवहार व प्रायश्चित्त या तीन सदरांखालीं विषयविवेचन केलें आहे. विषयांची मांडणी मुद्देसूद असून पुनरुक्ति सहसा झालेली नाहीं. मनुस्मृतींतील बहुतेक सर्व विषय यांत आले आहेत. (मनुस्मृति पाहा.) यांतील विषयप्रतिपादन इतकें संक्षेपानें केलें आहे कीं, मनुस्मृतींत जो विषय सांगण्याला सत्तावीसशें श्लोक लागलें तोच विषय या स्मृतींत एक हजाराहून थोड्या जास्त श्लोकांत सांगितला आहे. मनुस्मृति व याज्ञवल्क्यस्मृति या दोहोंत पुष्कळ साम्यस्थळें आहेत. मनुस्मृतींत नसलेले अथवा केवळ जातां जातां ज्यांचा उल्लेख केला आहे असे कांहीं विषय याज्ञवल्क्यस्मृतींत आढळतात. याज्ञवल्क्यस्मृतींत शरीरच्छेदन व वैद्यक या विषयांची माहिती आहे. मनुस्मृतींत ती पुसटहि नाहीं. याज्ञवल्क्यानें आपल्या स्मृतींत पांच प्रकारच्या दिव्यांविषयीं विस्तारानें विवेचन केलें आहे, तर मनूनें अग्नि व जल यांच्या दिव्यांचा पुसट उल्लेख केला आहे. उलट पक्षीं याज्ञवल्क्य—स्मृतींत नसलेले जगदुत्पत्तीसारखे विषय मनुस्मृतींत विस्तारानें चर्चिले आहेत. याज्ञवल्क्यस्मृतींत व्यवहारधर्मासंबंधींचीं पुष्कळ वचनें उदार आहेत. त्यांत शूद्रालाही चांद्रायण प्रायश्चित्त घेण्याची मुभा दिली आहे. तत्पूर्वी फक्त द्विजांनाच तें घेतां येत होतें. ज्ञानवान् शूद्राला मान द्यावा, शूद्राला व्यापार करण्याची मुभा असावी अशीं त्यांत वचनें असून ब्राह्मणालाहि अपराधाबद्दल शासन झालें पाहिजे असें प्रतिपादिलें आहे. तींत स्त्रियांचा वारसाहक्क मान्य करण्यांत आला आहे.

याज्ञवल्क्यस्मृति अनुष्टुभ छंदांत लिहिली असून तिची भाषा ओघवती आहे. या स्मृतीचा कर्ता शुक्लयजुर्वेदीय असावा असें त्या स्मृतींतील उल्लेखावरून वाटतें. कांहीं विद्वानांचें असें म्हणणें आहे कीं शुक्लयजुर्वेदाचें एक धर्मसूत्र होतें व त्यावर याज्ञवल्क्यस्मृति आधारली आहे; आज उपलब्ध असलेल्या पुराव्याचा विचार करतां हें म्हणणें टिकत नाहीं.

ही स्मृति शास्त्रीय पद्धतीनें लिहिली असून तींतील विषयप्रतिपादन पूर्वग्रहदूषित नाहीं; म्हणूनच ती अखिल भारतांत प्रमाणभूत मानण्यांत येऊं लागली. विज्ञानेश्वर व आपराक यांसारख्या पंडितांनीं आपले प्रबंध याच ग्रंथावर आधारले आहेत.

युगः—मोठ्या कालगणनेस युग म्हणतात. हिंदु धर्मकल्पनेप्रमाणें चार युगें कल्पिलीं आहेत. १ कृतयुग २ त्रेतायुग ३ द्वापारयुग व ४ कलियुग. पैकीं कृतयुग १७,२८,००० वर्षांचें, त्रेतायुग १२,९६,००० वर्षांचें, द्वापारयुग ८,६४००० वर्षांचें व कलियुग ४,३२०००वर्षांचें होय.या हिंदू धर्मकल्पनेप्रमाणें आपण सध्यां कलियुगांत आहों. या चार युगांचें एक महायुग व अशा एक हजार महायुगांचें एक कल्प होय. या कल्पाच्या अखेरच्या काळास कल्पांत म्हणतात. अर्थात् यानंतर विनाश होणार असें मानतात.

मनुष्याचें (वरील कालगणनेप्रमाणें) एक महायुग म्हणजे देवांचीं १२ हजार वर्षें होत; किंवा देवाचें एक युग होय. देवांचीं अशीं एकाहत्तर युगें झालीं म्हणजे एक मन्वंतर होतें. अशीं चौदा मन्वंतरें मानलेलीं आहेत.

याशिवाय सामान्य व्यवहारांत एखाद्या विशिष्ट गोष्टीनें कांहीं काल आपला प्रभाव टिकविला तर त्यालाहि त्या विशिष्ट नांवानें युग मानण्याची पद्धति रूढ आहे. उदा. १९२१–२२ नंतरचा काल मराठी साहित्यांत 'कोशयुग' म्हणून उल्लेखितात.कारण मुख्यतः याच कालांत महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख कोशवाङ्मय निर्माण झालेलें आहे. कांहीं ठिकाणीं चार वर्षांचें एक युग असाहि अर्थ घेतात.

हिंदुधर्मांप्रमाणें मानलेल्या युगांचा काल सोडल्यास इतर ज्या ज्या ठिकाणीं 'युग' या शब्दानें काल-निर्देश होईल त्या त्या ठिकाणीं सर्वत्र सारखी काल-मर्यादा सांगणें किंवा दाखविणें अशक्य होऊन बसतें. इतिहासाच्या दृष्टीनें पाहिल्यास सध्यांचा काल 'यंत्रयुग' या नांवानें ओळखला जाईल.

युगोस्लाव्हिया:—युरोपांतील एक स्वतंत्र देश व बाल्कन संस्थानांपैकीं एक संस्थान. क्षेत्रफळ ९५,००० चौ.मैल. लोकसंख्या १३,९००,०००.यापकीं सर्ब६,५००,०००, ४,०००,००० क्रोट, १,०००,००० स्लोव्हेनी, ५५०,००० हंगेरियन, ३००,००० जर्मन व आल्बे-नियन, बल्गेरियन इ. लहान अल्पसंख्यांकांचें मिळून हें राष्ट्र आहे. पूर्वींचा सर्बिया व ऑस्ट्रिया हंगेरीचा कांहीं भाग व व्हिवोडिना हे प्रांत मिळून हें राष्ट्र बनविलेलें आहे.

१९२१ मध्यें राज्यघटना तयार झाली. या राज्य-घटनेनुसार नॉर्डोना नांवाचें एकमेव विधिमंडळ बन-विण्यांत येऊन, तें ३१५ निवडून आलेल्या सभासदांचें बनविण्यांत आलें. सर्ब व क्रोटन लोकांची आरंभापासून सारखी धुसफूस चालू होती व आहे. १९२८ मध्यें क्रोटनपार्टीच्या पुढाऱ्याचा खून झाला व परिस्थिति गंभीर होऊं लागली. तेव्हां अलेक्झांडर पहिला (राजा) यानें पार्लमेंट बरखास्त करून डिक्टेटरशिपची प्रस्थापना केली. १९२९ च्या आक्टोबरमध्यें पूर्वींची राज्यघटना (Vidovdan Constitution) रद्द ठरविली गेली व याच वेळीं 'सर्ब, क्रोट व स्लोव्हेन लोकांचें राज्य' हें नांव बदलून 'युगोस्लाव्हिया हें नांव ठेवण्यांत आलें. देशाचे नऊ प्रांत पाडण्यांत आले; व ३ सप्टेंबर १९३१ रोजीं नवी राज्यघटना जाहीर झाली. या घटनेनुसार 'सीनेट' व 'चेंबर ऑफ डेप्युटीज्' अशीं दोन कायदेमंडळें स्थापण्यांत आलीं.

अलेक्झांडर फ्रान्सला भेट देण्यासाठीं गेला असतां ९ ऑक्टोबर १९३४ रोजीं मार्सेलीस येथें त्याची मिर-वणूक चालू असतां गोळी घालून त्याचा खून झाला. त्याच्यानंतर पीटर दुसरा हा त्याचा मुलगा (जन्म १९२३) गादीवर आला व रीजन्सीमार्फत राज्य-कारभार सुरू झाला. १९३५ पर्यंत फ्रान्सशीं या देशाचे घनदाट संबंध होते; पण त्यानंतर इटली व जर्मनीशीं विशेष मैत्री जोडण्यांत आली. यावेळचा मुख्य प्रधान स्टोयाडिनोव्हिचचा १९३८ च्या निव-डणुकींत पराभव होऊन त्याच्या प्रतिपक्षांतील ड्रागिशा स्वेट्कोविच् मुख्य प्रधान बनला.

युगोस्लाव्हियांतील निरनिराळ्या अल्पसंख्याकांचा प्रश्न नेहमींचा त्रासदायक होऊन बसला आहे. सर्व लोकांचें समाधान व्हावें या हेतूनें १९३९ मध्यें पुन्हां निवडणुकी जाहीर झाल्या; पण त्याच वेळीं सध्यां चालू असलेलें युद्ध सुरू झालें. युगोस्लाव्हियानें युद्धांत आपण तटस्थ असल्याचें जाहीर केलें आहे.

युगोस्लाव्हिया हा मुख्यतः शेतकीप्रधान देश आहे. याशिवाय खाणींचा उद्योगधंदाहि मोठ्या प्रमाणावर चालतो.

युधिष्ठिर:—धर्म हा लेख पाहा. (पृष्ठ १०४९).

युरेनस:—सूर्यमालेंतील एक ग्रह. ग्रहांच्या सूर्यापासूनच्या अंतराच्या मानानें याचा क्रम सातवा लागतो. याचा शोध सर विल्यम हर्शल या इंग्रज ज्योतिषशास्त्रज्ञानें ता. १३ मार्च १७८१ रोजीं लावला. वेध घेत असतांना हा तारा स्थिर नाहीं अशी त्याला शंका आली. पण पुढें अधिक प्रभावी दुर्बिणींतून पाहतां ती दृढ झाली. तो तारा धूमकेतू असावा असें त्याला प्रथम वाटलें; परंतु कांहीं आठवडे दुर्बिणींतून अवलोकन केल्यानंतर सूर्या-पासूनच्या पृथ्वीच्या अंतराच्या १९ पट अंतरावर हा तारा फिरत असल्याचें त्याला आढळून आलें; त्यामुळें हा ग्रह असल्याविषयीं त्याची खात्री झाली. हर्शलपूर्वींच्या ज्योतिषांनीं तो १९ वेळां पाहिला होता. पण तो ग्रह असल्याचें कोणीं ओळखलें नव्हतें. फ्लॅमस्टीड व लेमॉनीर या ज्योतिषांनीं तो हर्शलपूर्वीं पाहिला होता. हर्शलनें या ग्रहाला आपला आश्रयदाता इंग्लंडचा राजा तिसरा जॉर्ज याच्या गौरवार्थ जॉर्जियम सिडस हें नांव दिलें. परंतु परदेशस्थ ज्योतिषी त्याला हर्शलच म्हणूं लागले. ग्रहांना प्राचीन ग्रीक व रोमन देवतांचीं नांवें देण्याची वहिवाट असल्यामुळें ज्योतिषांनीं त्याला युरेनस हें नांव

दिलें. युरेनस हा शनीचा पिता व मंगळाचा (गुरु) पितामह. सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय ज्योतिषी जनार्दन बाळाजी मोडक यांनीं याला 'प्रजापति' हें मराठी नांव दिलें आहे.

प्रजापतीला सूर्याभोंवतीं प्रदक्षिणा करण्याला ८४ वर्षे लागतात. त्याचें सूर्यापासूनचें सरासरी अंतर १,७८,२८,००,००० मैल असून त्याचा व्यास ३०९०० मैल आहे. आकार पृथ्वीच्या सुमारें ६४ पट असून द्रव्य पृथ्वीच्या १४ पट आहे. त्याचें दार्ढ्य फारच कमी आहे; तें पृथ्वीच्या ०·२५ व पाण्याच्या १·३६ पट आहे. हा ग्रह एका राशीला सात वर्षे राहतो.

प्रजापतीभोंवतीं चार उपग्रह आहेत. ते सुमारें २॥, ४, ८॥ व १३॥ दिवसांत अनुक्रमें प्रजापतीभोंवतीं प्रदक्षिणा करितात. त्यांतील बाहेरचे दोन हर्शलनें शोधून काढले. आंतले दोन १८५० चे सुमाराला सांपडले; ते फार दूर आहेत, म्हणून अत्यंत प्रभावी दुर्बिणींतूनच दिसतात. त्यांच्या कक्षांचा क्रान्तिवृत्तांशीं कोण ९८ अंश आहे. त्यामुळें त्यांची गति उलटी असल्याचें दिसून येतें. हे सूर्यमालेंतील इतर ग्रहोपग्रहाप्रमाणें पश्चिमेकडून पूर्वेकडे न फिरतां उलटे फिरतात. उपग्रह ज्या पातळींत फिरतात त्याच पातळींत प्रजापती आंसाभोंवतीं फिरतो, असें अनुमान आहे. त्याचा आंस व त्याची कक्षा यांत ८ अंशांचा कोण आहे. मोठ्या दुर्बिणींतूनहि प्रजापतीची शरीरघटना दिसत नाहीं; कारण तो अति दूर आहे. नुसत्या दुर्बिणींतून त्यावरील वातावरण कसें आहे हें, समजूं शकत नाहीं. वर्णलेखावरून त्यावरील वातावरणाची कल्पना होते. डॉ. ह्युजिन्स यानें ग्रहांचे व ताऱ्यांचे वर्णलेख घेण्याचे प्रयत्न केले आहेत. प्रजापतीच्या वर्णलेखावरून त्यावरील वातावरणांत हैड्रोजन वायू मोठ्या प्रमाणांत असल्याचें दिसून येतें. नैट्रोजन, कार्बानिक ॲसिड व पाण्याची वाफ यांचें चिन्ह त्यावर दिसत नाहीं. प्राणवायू त्यावर असण्याचा संभव नाहीं. यावरून प्रजापतीवर प्राण्याची वस्ती नसली पाहिजे असें दिसतें.

ग्रीक पुराणाप्रमाणें युरेनस हा पृथ्वीचा नवरा (किंवा मुलगा) व शनीचा बाप असें मानतात. हा देवांचा पहिला राजा मानतात.

येसूबाई भोसले (इ. स. १६५७–१७२० नंतर):– संभाजी छत्रपतींची पत्नी व पहिले शाहूमहाराज यांची आई. पिलाजी शिर्क्यांची ही मुलगी. दिल्लीकडून संभाजी परत आल्यावर हिचें त्याच्याशीं १६६७ मध्यें लग्न झालें. लग्नांत ही दहा वर्षांची होती. १६८० च्या डिसेंबरांत हिला शिवाजी नांवाचा मुलगा झाला. हाच मुलगा पुढें शाहू नांवानें प्रसिद्धीस आला. येसूबाईचें जिऊबाई असें आणखी एक नांव आहे.

नवरा असल्यापासूनच हिला राजकारणांत लक्ष घालावें लागलें. बाळाजी आवजीला संभाजीनें हत्तीच्या पायीं दिल्यावर खंडो बल्लाळाला हिनेंच वांचवून विश्वासांत घेतलें. कलुषा व संभाजी शिक्क्याचा दुरुपयोग करतील म्हणून तो हिनें आपल्या ताब्यांत ठेवला होता. त्यामुळें प्रत्येक आज्ञापत्र हिनें पाहिल्याशिवाय सुटत नसे असें दिसतें. संभाजी मेल्यावर रायगडला वेढा पडला, तेव्हां हिनें रायगड लढविण्यास सुरवात केली. आठ महिने किल्ला लढविल्यावर सूर्याजी पिसाळाच्या फितुरीमुळें हिला शेवटीं शाहूसह इ. स. १६८०त कैद व्हावें लागलें. औरंगजेब यांना नेहमींच बरोबर वागवीत असल्यामुळें हिचे हालही बरेच झालेले दिसतात. तथापि हिनें तेथें आपले दिवस मोठ्या चातुर्यानें काढले आणि जोत्याजी केसरकर वगैरे विश्वासूक लोकांकडून पत्रव्यवहार करून अखेरपर्यंत राजकारणाचा संदर्भ ठेवला.

सन १७०७मध्यें शाहू सुटला तरी ही व इतर माणसें मुक्त झालीं नव्हतीं. बाळाजी विश्वनाथ पेशवा दिल्लीस गेला तेव्हां त्यानें १७१९ त त्यांना सोडवून आणलें. शाहूला सोडून हीं महत्त्वाचीं माणसें गुंतवून ठेवण्याचा उद्देश शाहूनें बादशाहीविरुद्ध गडबड केल्यास त्याला शह देण्याचा दिसतो.

हिची मान्यता मोठी होती. संभाजी व शाहू हिला अत्यंत सन्मानानें वागवीत. संभाजीसारखा संतापी पुरुष हिच्या पूर्ण ताब्यांत होता. नानाप्रकारचीं संकटें भोगून शाहूस शेवटीं सुखाचे दिवस लाभले याचें श्रेय हिला आहे.

हिच्यावरील कांहीं प्रसंगांचीं वर्णनें आजहि अंगावर शहारे उत्पन्न करतात. त्या प्रसंगांना तोंड देऊन हिनें मराठा स्त्रियांच्यापुढें वीरपत्नी व वीरमाता कशा असतात यांचा आदर्श ठेवला आहे.

योगः–योग हा शब्द 'युज्' म्हणजे जोडणें या धातूपासून निघाला आहे. या शब्दाचा धात्वर्थ 'जुळणी, मिळवणी, संगति, एकतावस्थिति' असा आहे. पुढें

तशी स्थिति प्राप्त होण्याचा उपाय, साधन, युक्ति किंवा इलाज म्हणजे 'कर्म' असा अर्थ झाला आहे. आर्यांच्या तत्त्वज्ञानपर ग्रंथांत परमार्थप्राप्तीचा मार्ग अशा अर्थानें हा शब्द अनेक वेळां वापरण्यांत आला आहे. भक्तियोग, कर्मयोग, ज्ञानयोग व राजयोग असे चार मोक्षोपाय सांगितलेले आहेत. या चार शब्दांत 'योग' या शब्दाचा मोक्षाचा मार्ग अथवा उपाय असाच प्रयोग केला आहे. "योगः कर्मसु कौशलं" म्हणजे कर्में करण्याची विशेष प्रकारची कुशलता अथवा चतुराई अशी 'योग' या शब्दाची व्याख्या भगवद्गीतेंत केली आहे. येथें योग हा शब्द कर्मयोग अशा अर्थानें वापरला आहे. परंतु 'योग' या शब्दाचा हल्लींचा रूढार्थ 'प्राणायामादिक साधनांनीं चित्तवृत्तींचा किंवा इंद्रियांचा निरोध करणें अथवा ध्यानयोग' असा आहे. या अर्थी उपनिषदांतहि या शब्दाचा प्रयोग केला आहे. यालाच राजयोग अशी दुसरी संज्ञा आहे. राजयोगशास्त्राविषयीं विचार महर्षि पतंजली यांनीं आपल्या योगदर्शनांत केला आहे. पतंजलीमुनीनें योगाचीं आठ आंगें सांगितलीं आहेत. म्हणून त्याला अष्टांगयोग असेंहि म्हणतात. योगशास्त्र हा ईश्वरप्राप्तीचाच एक उपाय आहे. 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' (योग म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध करणें) अशी योग या शब्दाची व्याख्या पांतजल योगसूत्रांत केली आहे. योगशास्त्रांत ईश्वर मानिला आहे. चित्तवृत्तीचा निरोध होतो, त्यावेळीं आत्मा स्वरूपामध्यें निमग्न असतो. योगाचीं आठ आंगें पुढीलप्रमाणें:—

(१) यम, (२) नियम, (३) आसन, (४) प्राणायाम, (५) प्रत्याहार, (६) धारणा, (७) ध्यान, (८) समाधि.

(१) **यम**—अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह (२) **नियम**—शारीरिक व मानसिक शुद्धि, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वर प्रणिधान. (३) **आसन**—हीं आसनें ८४ आहेत. यांत सिद्धासन, पद्मासन, सिंहासन, स्वस्तिकासन, भद्रासन व वज्रासन हीं मुख्य आहेत. हीं घालून योगाभ्यास केला असतां चित्ताची एकाग्रता चांगली साधते. (४) **प्राणायाम**—प्राणायाम म्हणजे श्वासोच्छ्वासाची गति नियमित करून प्राणशक्तीवर ताबा मिळविणें. प्राणायाम हें योगांतील महत्त्वाचें अंग आहे. आसनांचा अभ्यास पक्का झाल्यावर प्राणायामाचा अभ्यास करावयाचा असतो. तो गुरूच्या जवळ करावा. श्वासोच्छ्वास नियमित झाल्याशिवाय चित्त एकाग्र होत नाहीं. (५) **प्रत्याहार**—प्राण ब्रह्मरंध्रांत २५ पळें स्थिर करतां येऊं लागला म्हणजे त्याला प्रत्याहार म्हणतात. (६) **धारणा**—प्राण ब्रह्मरंध्राच्या ठिकाणीं पांच घटका स्थिर करतां येणें. ('प्राणायाम' पहा) (७) **ध्यान**—साठ घटकांपर्यंत प्राण ब्रह्मरंध्रांत स्थिर करतां येणें. (८) **समाधि**—म्हणजे बारा दिवसपर्यंत प्राण स्थिर करणें. या अवस्थेंत जीवात्मा परमात्म्याशीं एकरूप होऊन जातो. ही योगाची शेवटची पायरी आहे.

ज्योतिषशास्त्रांत योग हा शब्द चंद्रसूर्यांच्या विवक्षित गतींची बेरीज या अर्थानें वापरला आहे. सूर्यचंद्राच्या विवक्षित गतीची बेरीज १३ अंश २० कला होण्यास जो काळ लागतो त्याला योग म्हणतात. हे योग २७ आहेतः—(१) विष्कंभक (२) प्रीति (३) आयुष्मान् (४) सौभाग्य (५) शोभन (६) अतिगंड (७) सुकर्मा (८) धृति (९) शूल (१०) वृद्धि (११) ध्रुव (१२) व्याघात (१३) हर्षण (१४) वज्र (१५) सिद्धि (१६) व्यतिपात (१७) वरीयान् (१८) परीघ (२०) शिव (२१) सिद्धि (२२) साध्य (२३) शुभ (२४) शुक्ल (२५) ब्रह्म (२६) ऐंद्र (२७) वैधृति. यांचीं फलें नांवाप्रमाणें आहेत असें मानतात. व्यतिपात व वैधृति हे योग फारच अशुभ मानतात.

योगमुद्राः—उजव्या पायाचा घोटा गुदद्वाराचे मुळाशीं लावून डावा पाय ताठ पुढें पसरून बसावें. डाव्या पायाचे मांडीला उजवें पाऊल सबंध लावावें. उजव्या गुडघ्यापर्यंतचा मांडीचा भाग उजव्या बाजूस जमिनीवर लागलेला असावा. दोन्ही हातांच्या बोटांची मगरमिठी घालून त्या मिठीनें डावे पावलास बाहेरील बाजूनें विळखावें. डावें पाऊल ताठ ठेवावें, वाकवूं नये. डाव्या पायाची मांडी व पिंढरी जमिनीस लागलेली ठेवावी व स्थिर व्हावें. दोन्ही हात कोपरांत ताठ करून हनुवटी छातीस खेटून कपाळाचा भाग डावे गुडघ्यावर टेकेल इतकें वाकावें. दृष्टी भ्रूमध्यावर लावावी. मूलबंधयुक्त पूरक करून मग कुंभकांत बंधत्रय साधावा व उड्डीयानबंध धरून रेचक करावा. अशी श्वसनक्रिया त्या स्थितींत राहून कांहीं वेळ करावी. उजवा पाय ताठ ठेवून व डाव्या पायाची वरीलप्रमाणें मांडी घालून वरीलप्रमाणेंच सर्व कृती दुसऱ्या बाजूवर करावी. या क्रियेनें क्षयादि विकार, जीर्णज्वर नाहींसे होऊन शरीर आरोग्यसंपन्न होतें.

र

रक्तः—शरीरांतील रक्त वाहिन्यांतून सर्व शरीरांत फिरणारा द्रव. हा द्रव अन्नांश व ऑक्सिजन शरीराच्या प्रत्येक भागाला नेऊन पुरवितो. शरीरांतील टाकाऊ द्रव्यें उत्सर्जक इंद्रियांच्या द्वारां शरीराबाहेर नेण्याकरितां उत्सर्जक इंद्रियांकडे नेण्याचें कार्य हाच द्रव करतो. रक्तामध्यें रक्तजल (Plasma) नांवाचा रंगरहित द्रवपदार्थ असून त्यांत असंख्य सूक्ष्म रक्तपेशी तरंगत असतात. रक्तजलांत विविध प्रकारचे क्षार असून त्यांत आपलें सामान्य मीठ अथवा सोडीयम क्लोराइड हें मुख्य आहे. रक्तपेशी दोन प्रकारच्या आहेत—लाल व पांढऱ्या.

मानवी शरीरांतील लाल पेशी चपट्या व गोल असून त्यांचा व्यास १/३२०० इंच असतो. एक रक्तपेशी स्वतंत्रपणें पाहिली कीं तिचा रंग फिकट पिवळा दिसतो. पण अशा असंख्य पेशी एका ठिकाणीं असल्यामुळें रक्ताला गडद लाल रंग आलेला असतो. एक घन मिलिमिटरमध्यें जितकें रक्त मावेल तेवढ्या रक्तांत सुमारें ५ दशलक्ष लाल पेशी असतात. हवेंतील प्राणवायू फुप्फुसांत घेऊन तो टिश्यूजना पुरविणें हें रक्तपेशींचें कार्य आहे.

रक्तपेशींत हीमोग्लोबिन (Haemoglobin) नांवाचा एक लाल पदार्थ असतो. हा ऑक्सिजनशीं सहज संयोग पावतो. फुप्फुसांत ऑक्सिजन नेलेलें रक्त तेजस्वी लाल रंगाचें असतें. पण टिश्यूजमध्यें त्याचें अभिसरण सुरू झालें म्हणजे त्यांतील ऑक्सिजन कमी कमी होऊन रक्त अधिक काळें व निळें होतें. फुपफुसांत आलेल्या ऑक्सिजनच्या संयोगानें ऑक्सि—हिमोग्लोबिन नांवाचा एक पदार्थ लाल पेशींत बनतो.

श्वेत पेशींची संख्या लाल पेशींच्या मानानें पुष्कळ कमी आहे. दर पांचशें लाल पेशींस एक श्वेत पेशी असें त्यांचें प्रमाण आहे. श्वेत पेशीचा आकार ठराविक असा नसतोच, त्या अमीबा नामक एका पेशीसारख्या असतात. त्यांच्याप्रमाणेंच त्या आपला आकार क्षणोक्षणीं बदलतात. श्वेत पेशींचें महत्त्वाचें कार्य म्हणजे शरीरांत शिरलेल्या जंतूंना खाऊन टाकून त्यांचा नाश करणें हें होय. शरीरांत शिरलेल्या रोगजंतूंशीं झगडून त्यांचा नाश करणें व त्यायोगें रोगाची वाढ होऊं न देणें हें महत्त्वाचे कार्य श्वेत पेशी करतात. जंतूंशीं झगडतांना मरणाऱ्या श्वेत पेशींना पू म्हणतात.

रघुजी भोसले (मृत्यु स. १७५५):—बंगालवर स्वाऱ्या करणारा भोसले कुळांतील कर्तृत्ववान् व धार्मिक पुरुष. हा नागपूरच्या बिंबाजी भोसल्याचा मुलगा. हा पहिला रघुजी. बाप लहानपणीं वारल्यामुळें वाईजवळच्या पांडववाडीला आईकडे याचें बालपण गेलें. नंतर हा रमाऊ नांवाच्या चुलतीकडे राहात असे. पुढें राणोजी नांवाच्या चुलत्याच्या लष्करांत हा राहिला. याच्या मागून कान्होजी, चांद सुलताना, एलिचपूरचे नबाब इस्माईलखान व त्यामागून शाहूकडे हा आला.

शाहूनें यास सेनासाहेब सुभ्याची वस्त्रें व बंगालपर्यंत चौथाईचे हक्क वाढविण्याचा निर्देश करून सनद दिली. यानें १७३० त कान्होजीला पकडून त्यास शाहूकडे पाठविलें व शाहूच्या नांवें चौथाईच्या वसुलीस सुरवात केली. १७२८ त चिमाजी पेशव्याबरोबर हा माळव्याच्या स्वारींत होता.

यानंतर त्यानें रतनकुंवरच्या मुलास वलीशहाचा पाडाव करून देवगडच्या गादीवर बसविलें. या कामगिरीबद्दल रतनकुंवरकडून यास तिच्या राज्याचा तिसरा हिस्सा व खर्चाबद्दल १० लक्ष रुपये १७३७ मध्यें मिळाले. पुढें यानें आपलें ठाणें नागपूरला ठेवलें. गोंडाच्या (देवगडच्या) राज्यांत बंडाळी माजल्यामुळें तें सर्व राज्य यानें आपल्या ताब्यांत घेतलें.

या गोष्टीनंतर, लखनौ, बेदर, बंगाल, बुंदेलखंड, अलाहाबाद, पाटणा वगैरे सुभ्यांवर स. १७३८ मध्यें मराठ्यांचा अम्मल बसवण्याचा अधिकार शाहूनें याला दिला. भोपाळच्या लढाईत पेशव्यास यानें मदत केली नाहीं, म्हणून याच्यावर बाजीरावानें आपला सरदार आवजी कवडे यास पाठविला होता; पण त्याचा बंदोबस्त रघुजीनें शाहूकडे तक्रार करून केला. १७४१ त अर्काटच्या दोस्त अलीचा पाडाव करण्यास रघुजी हजर होता. या मदतीबद्दल त्यास कान्होजीच्या वेळचा सर्व सरंजाम देण्यांत आला. यानें बंगालवर १७४२—५१ पर्यंत चार स्वाऱ्या केल्या. याशिवाय यानें देवगड व चंद्रपूर हीं संस्थानें घेतलीं. यानंतर हा पोटदुखीनें ता. १४ डिसें. १७५५ला मरण पावला. तेव्हां त्याच्या सहा स्त्रिया सती गेल्या. याला जानोजी, मुधोजी, साबाजी व बिंबाजी असे चार पुत्र होते.

रघुजी हा त्या वेळच्या मराठे सरदारांत अत्यंत शूर होता. नागपूरकर भोसल्यांच्या घराण्यांत याच्याइतका कर्तृत्ववान् पुरुष दुसरा झाला नाहीं. शिपाईगिरी

हा त्याचा मुख्य गुण होता. हा मोकळ्या मनाचा व दिलदार मनुष्य होता. याच्या स्वभावांत मानीपणा व स्वतंत्र वागण्याची प्रवृत्ति जास्त होती. छत्रपतीस ठरलेली खंडणी हा केव्हांहि पाठवीत नसे. दारू पिण्याची संवय याला होती. पण ही त्याच्या कर्तृत्वाच्या आड आली नाहीं. हा धार्मिक असून रामभक्त होता. रामटेकचें राममंदीर व घाट यानें बांधला. बाळाजी बाजीराव पेशवे व रघुजी भोसले यांच्या भांडणाची कटकट प्रत्यक्ष बंगालमध्यें झाली नसती तर खुद्द बहार व बंगाल प्रांतांत महाराष्ट्रराज्य स्थापन झालें असतें. शेती, संस्कृत विद्या व कापडाचा धंदा यांना त्यानें चांगलेंच उत्तेजन देऊन नागपूर प्रांताला उत्तम राजकीय वळण लावलें.

रणजितसिंग, कुमारश्री (१८७२–१९३३):– आपल्या देशांतील एक महान् क्रिकेटपटु. यांचा जन्म राजघराण्यांत झाला.यांचें कॉलेजचें शिक्षण केंब्रिज येथें ट्रिनिटी कॉलेजमध्यें झालें. क्रिकेट खेळांतील त्यांचें नैपुण्य पाहून त्यांस इ. स. १८९५ सालीं ससेक्स कौंटी टीममध्यें घेण्यांत आलें. इ. स. १८९६ व १९०० या सालीं त्यांचें बॅटिंग स्कोअर कोणत्याहि इंग्लिश खेळाडूहून जास्त होतें. केंब्रिज युनिव्हर्सिटीसाठीं व पुढें ऑस्ट्रेलियां विरुद्ध इंग्लंडसाठीं तो खेळला. इ. स. १९०६ सालीं नवानगरच्या गादीचा त्यांकडे वारसा येऊन त्यांचें राज्यारोहण झालें. गेल्या महायुद्धांत त्यानें दोस्त राष्ट्रांना इ. स. १९१४–१५ या सालीं आपलें सैन्य पुरविलें व स्वतः जातीनें आघाडीवर शिपाई म्हणून काम केलें. इ. स. १९२० डिसेंबरमध्यें जेनिव्हा येथें राष्ट्रसंघाची परिषद भरली असतां हिंदुस्थानांतील संस्थानिकांचा प्रतिनिधी म्हणून त्यानीं काम केलें. जगांतील उत्कृष्ट बॅट्समनमध्यें यांची गणना होते. मृत्यु मार्च १९३३

रणजितसिंग (स. १७८०–१८३९):–पंजाबांतील शीख लोकांचा राजा. स. १७८० च्या सुमारास याचा जन्म झाला. अहमदशहा अब्दालीनंतर पंजाब प्रांत पुनः शिखांच्या ताब्यांत आला. परंतु त्यांत लहान लहान राज्यें निर्माण झालीं. त्यांच्यांत नेहमीं मारामाऱ्या व तंटे होत.

महासिंगानंतर त्याचा मुलगा रणजितसिंग हा वयाच्या १२ व्या वर्षी गादीवर आला. यानें आपल्या शौर्यानें आपल्या वयाच्या १९ व्या वर्षी सर्व शीख राजांचें आधिपत्य आपणाकडे घेतलें. यानें स्वतःस राजा ही पदवी मिळविली. स. १८०२ सालीं अमृतसर जिंकलें. यमुनेपर्यंत आपला राज्यविस्तार व्हावा या इच्छेनें यानें स. १८०६ सालीं लुधियाना घेतलें. नाभा व पतियाळा या दोन संस्थानांमधील भांडणाचा फायदा घेऊन यानें सतलज ओलांडून सरहिंदप्रांतीं खंडणी गोळा केली. इंग्रजांसहि याची भीति वाटत होती. तेव्हां मेट्काफ यास पाठवून त्यांनीं रणजितसिंगाशीं तह केला. या तहानें त्याची हद्द सतलज नदी ठरली; व इंग्रजांचें लुधियानास लष्कर राहिलें. यानें हा तह शेवटपर्यंत पाळला. म्हणून इंग्रज याला आपला जिवलग दोस्त म्हणत. यानें सन १८२३ त पेशावर प्रांत जिंकला. परंतु हा प्रांत परत देण्याबद्दल दोस्तमुहंमदानें इंग्रजांजवळ मागणी केली. परंतु इंग्रज यास भीत असल्यामुळें त्यांनीं यास तो प्रांत देण्याबद्दल आग्रह केला नाहीं. यानंतर या दोघांनीं दोस्त मुहंमदावर स्वारी करून शहासुजास काबूलच्या गादीवर बसविलें. यानंतर दोन वर्षांनीं हा वारला (स. १८३९).

यानें ४० वर्षें अव्याहत श्रम करून शीखांत लष्करी सामर्थ्य उत्पन्न केलें व त्यांचें राष्ट्र उत्तम भरभराटीस आणलें. हा वारला त्यावेळीं इंग्रजांच्या दिल्ली, आग्रा, अलाहाबाद व इतर मुख्य छावण्यांतून याच्या वयाच्या संख्येइतक्या (५९) तोफा याच्या सन्मानार्थ सोडण्यांत आल्या. याच्या राण्यांपैकीं चौघीजणी व सात नाटकशाळा या सती गेल्या. याला शेवटीं अर्धांगवायूचा झटका झाला. मृत्युपूर्वी एक वर्षभर पूर्वीसारखा दरारा राज्यांत राहिला नाहीं. हा फार शूर, मुत्सद्दी व युद्धशास्त्रांतील जाणता होता.

सर लॉवेल ग्रिफिन म्हणतो, “ रणजितनें आपलें राज्य लष्करी दराऱ्यावर व शिस्तीवर स्थापन केलें; याचा राज्यकारभार व्यवस्थित होता. परंतु याच्या मागें हे गुण कोणाच्याच अंगीं नसल्यानें, याचा एकट्याचा पाठिंबा गेल्याबरोबर, सहा वर्षांत शीखांचें राज्य ढासळून पडलें. ” यानें या शीख खालसा (सैनिक) मध्यें उत्तम पायदळ, सुव्यवस्थित घोडदळ व चांगला तोफखाना यांची भर घातली. याचे बहुतेक सर्व लष्करी अम्मलदार इटालियन अथवा फ्रेंच असत. वेंचुरा, अलार्ड व ॲव्हिटेबिलो हे तीन सेनापति तर प्रसिद्ध नेपोलियनच्या हाताखालीं शिक्षण घेतलेले होते. स. १८४५ मध्यें त्याचें ८८६६२ शीख

सैन्य असून त्यांत ४८४ तोफा व ३०८ उंटावरील जेजाला होत्या.

हा आपले अधिकारी कोणच्याहि जातींतून निवडी. केवळ लायकी हेंच याच्याकडे नोकरी मिळण्याचें साधन असे.

याची जमाबंदी, मुलकी व्यवस्था, जकात किंवा इतर राजकीय व्यवस्था तात्त्विक पद्धतीवर उभारलेली नव्हती. केवळ लष्करी बळावर याचें राज्य चाललें होतें.

रणजीतसिंगमहाराज हे अटक नदी उतरून पलीकडे जाऊं लागले तेव्हां त्यांचा गुरु येऊन म्हणूं लागला कीं, 'अटकेपर्यंत मात्र हिंदूंस जाण्याची मर्यादा आहे.' तेव्हां यानें उत्तर दिलें कीं,

सब भूमि है गोपालकी, इसमें अटक कहां ।
जिसके मनमें खटक रही, वोही अटक रहा ॥

सारांश–'सर्व पृथ्वी देवाची असून तिच्यांत कोठेंहि जाण्यास हरकत नाहीं. ज्याच्या मनांत संशय आहे तोच थांबून राहिला आहे.' असा जबाब यानें दिला आणि सर्व अफगाणिस्थान जिंकलें (लोकहितवादी २९४ वरून)

रताळीं:–पिठूळ कंद. जमिनींत तयार होणाऱ्या गड्ड्यांचा हा एक वेल असून रताळीं सर्वांच्या परिचयाचीं आहेत. या कंदाला जमीन मोकळी व भुसभुशीत पाहिजे. रताळ्याचें पीक कोकणांत केव्हांहि घेतां येतें. देशावर उन्हाळ्यांत रताळ्याचें पीक चांगलें येत नाहीं.

याच्या जाती दोन. एक पांढरी व दुसरी तांबडी. तांबड्या रताळ्याच्या पुनः दोन जाती आहेत. एक कातऱ्या पानाची व दुसरी पूर्ण पानाची. तांबडी जात जास्त प्रमाणांत लावितात, पण पांढरी जात गोडीस जास्त असून त्यांत तंतूहि कमी असतात.

रताळीं लावण्याकरितां वेलाचे साधारण १२ इंचाचे तुकडे घेऊन ते १॥ ते २ फूट अंतरानें पाडलेल्या सरीच्या बाजूवर ९ इंचांवर मधोमध दाबून लावितात. वेल जसजसे लांब लांब वाढूं लागतात तसतसे ते परतविले पाहिजेत. वेल न परतविल्यास त्याचा जमिनीशीं निरनिराळ्या ठिकाणीं संबंध येतो व त्या ठिकाणीं अगदीं बारीक रताळीं लागतात. मुख्य पिकावर त्यामुळें परिणाम होतो व मोठीं रताळीं फारच थोडीं मिळतात. म्हणून सर्व रताळीं मोठीं व्हावीं ह्यासाठीं प्रत्येक तीन आठवड्यांनीं वेल परतविले पाहिजेत. वेल लाविल्यापासून रताळीं साधारण पांच महिन्यांनीं काढणेस तयार होतात. ह्यावेळीं जमिनीच्या पृष्ठभागावर बारीक चिरा किंवा भेगा पडतात व त्यामुळें रताळीं काढण्यास तयार झालीं हें समजतें.

रताळ्याचा उपयोग बहुतेक उपवासाच्या दिवशींच जास्त करितात. त्याची भाजीहि चांगली होते. कांहीं लोक प्रथम त्याचे काप करून, व ते वाळवून त्याचें पीठ करून ठेवितात. उपवासाच्या दिवशीं पिठाची लापशी करतात. कोंवळ्या पाल्याचीहि गरीब लोक भाजी करितात. जून वेल गुरें आनंदानें खातात.

रत्नें–रत्नांची उत्पत्ति, काठिण्य, तेज व आकार.

मौक्तिक आणि प्रवाळ हीं रत्नें प्राणिज आहेत. अंबर अथवा तृणमणि हें रत्न उद्भिज्ज आहे. बाकीचीं सर्व रत्नें खनिज आहेत. मौक्तिक, प्रवाळ आणि अंबर यांचें काठिण्य बेताचेंच असतें आणि त्यांचा आकारहि स्फटिकाप्रमाणें म्हणजे पैलूदार नसतो. मोत्याचें तेज हें त्याच्या विशिष्ट रचनेचें आणि प्रकाशकार्याचें फल होय. प्रवाळाचें आणि अंबराचें तेज जिल्हईनें आलेलें असतें. खनिज रत्नांचें काठिण्य, तेज व आकार हे गुण त्यांस त्यांच्या उत्पत्तीच्या विशिष्ट परिस्थितीमुळें प्राप्त झालेले असतात.

रत्नें मुख्यतः सिलिका (सिकता–रेती) अल्यूमिना, (अल्यूमिनियम धातूवर प्राणवायूचा म्हणजे ऑक्सिजनचा परिणाम होऊन तयार झालेली माती), चुना आणि कोळसा ह्या चार अगदीं सामान्य अशा द्रव्यांचीं बनलेलीं आहेत. असें असतां रत्नांचे मुख्य गुण जे काठिण्य, तेजस्विता आणि दुर्मिळता हे गुण त्यांस कसे प्राप्त झाले, त्यांस स्फाटिक आकार कसे आले, आणि त्यांस सुंदर व मोहनीय रूप कसें प्राप्त झालें याचा मोठा चमत्कार वाटतो. पण मौक्तिक-प्रवाळ अंबर सोडून बाकीचीं खनिज रत्नें भूगर्भामध्यें भयंकर वजनाखालीं, पराकाष्ठेच्या उष्णतेंत, रासायनिक घटना होऊन तयार होतात. ही परिस्थिति व तीमुळें घडणारा प्रकार हीं समजून आलीं म्हणजे हें कोडें उलगडतें.

खनिज रत्नांची उत्पत्ति अखिल सृष्टीच्या उत्पत्तीच्या मार्गांतच झालेली आहे. सर्व सृष्टीला अस्तित्व आणण्याकरितां जे विद्युत्कण उत्पन्न झाले त्यांपासूनच आपली पृथ्वी उत्पन्न झाली आहे. ही प्रथम तप्तधूममय होती. उष्णताविसर्जनामुळें ती द्रवमय होऊन

निवत असतां तिच्या उदरांत अग्निजन्य खडक उत्पन्न झाले. ते सर्व स्फटिकरूप आहेत. ह्या खडकांस नीस अथवा जंबूर दगड हें नांव देण्यांत आलें आहे. हे अग्निजन्य खडक तयार होत असतां त्यांत माणिक, वैदूर्य, स्वर्णवैदूर्य, वज्रभासीय, लाल, चुनडी, तोरमली, याकूत, कांचमणि इत्यादि रत्नें तयार झालीं. पृथ्वीच्या गर्भांतील अग्निजन्य खडकानंतर सागरांच्या तळांवर स्तरित खडक तयार झाले. हे होत असतां त्यांत ज्वालामुखीचे स्फोट होऊन हिंदी हिरे बिजावर-श्रेणींत तयार झाले आहेत. तसेंच तेथल्या गर्भांतील अत्यंत उष्णतेमुळें अल्यूमिना माती वितळून तिचीं तेथें माणिक व नील हीं रत्नें तयार झालीं आहेत. तशींच तेथील सिलिका वितळून तिचीं काचमण्याचीं रंगीत रत्नें तयार झालीं आहेत. हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं खडकांत सामान्यतः सिलिका, अल्यूमिना, चुना, लोह वगैरे अनेक द्रव्यें असतात. तथापि विशिष्ट स्थळीं विशिष्ट द्रव्यें असून निरनिराळ्या खडकांतील घटक द्रव्यांचें प्रमाणही स्थलविशेषीं कमीजास्त असतें. यामुळें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळीं खनिजें—रत्नें—तयार होतात. कोणताहि खडक वितळला म्हणजे त्या खडकांत असलेलीं सर्व द्रव्यें वितळून सर्वांचा एक संयुक्त जळजळीत रस तयार होतो. हा हळूंहळूं निवतो तसतशीं तेथें रत्नें तयार होतात. एकाद्या स्थळीं खडक बनण्याच्या क्रिया चालू असतां कवचाच्या हालचालीमुळें, ज्वालामुखीमुळें व इतर कारणांनीं त्या ठिकाणीं अत्यंत उष्णता उत्पन्न होऊन तप्त रस तयार होतो. त्यावेळीं त्या ठिकाणच्या गर्भांतील उष्ण वाफ प्रसृत होते. ती प्रथम तेथील नजीकच्या खडकाच्या फटींत शिरून त्या खडकास भाजून काढूं लागते. तिच्या मागोमाग तो तप्त रसही त्या फटींत शिरूं लागून तेथील खडकांस तो द्रवरूप देतो व नवीन तयार झालेल्या ह्या द्रवांत मिसळतो. अशा वेळीं ह्या दोन्ही प्रकारच्या तप्त रसांतील द्रव्यांची देवघेवही होते व ह्यामुळें दोन्ही खडकांत मूळचीं नसणारीं खनिजें ह्या देवघेवीमुळें अगदीं नवीन प्रकारचीं अशीं तयार होतात. हे मिश्र खडक हळूं हळूं निवतात व निवतांना तेथें माणिक, नील, लसण्या हीं पूर्वपरिचित रत्नें आणि द्रव बनलेल्या दोन्ही खडकांत पूर्वी तयार होत नसलेलीं अशीं नवीन रत्नें चुन्यापासून झालेलीं चुनडी, पाच, स्पायनेल इत्यादि हीं तयार होतात.

ह्या मिश्र खडकांस रूपांतरित अथवा विकृत खडक म्हणतात. जीं रत्नें फार खोलांत तयार होतात, त्यांवर खडकांचें फार भारी वजन असल्यामुळें तेथील उष्णता विसर्जनास फारच मोठा कालावधि लागतो; पण ह्यामुळें तेथें खनिजांचें स्फटिकीभवन होऊन वाढ होण्यास मनसोक्त वेळ मिळतो; म्हणून फार खोलांत तयार झालेलीं रत्नें आकारानें मोठीं आणि फार घन अथवा कठीण होतात. ह्यामुळें हीं रत्नें रंगारूपानें मनोज्ञ आणि पोतानें घट्ट अशीं असतात. पृथ्वीच्या उदरांत विकृत खडक तयार होण्याच्या क्रियेंतील जळजळीत तप्तरस ज्वालामुखीच्या स्फोटानें कधीं कधीं बाहेर वाहूं लागतो व तेथें त्या रसाचे थरावर थर बसून हळूहळूं निवतात; हे ज्वालामुखीचे खडक होत. यांत कांचमण्याचीं रत्नें, हिरे वगैरे तयार होतात. विकृत खडकाच्या तप्त रसांत आलिव्हिन जातीच्या रत्नप्रस्तराचें प्रमाण जास्त असल्यास त्यास नवीन सर्पेंटाइन जातीच्या खडकाचें रूप येतें. अशा खडकांस दक्षिण आफ्रिकेंत ब्ल्यू ग्राऊंड अथवा निळी जमीन असें म्हणतात. तेथें या अशा जमिनींतून हिरे निघतात. हिऱ्याच्या उत्पत्तीच्या प्रकाराचें निश्चित ज्ञान अद्यापि झालें नाहीं हें खरें, तथापि ते खोल भूगर्भांत तयार होतात एवढें निश्चित झालें आहे. तेथें कार्बन आणि ग्राफाइट पुष्कळ आहेत. त्यावर खोलांतील अत्यंत उष्ण पाणी व प्रचंड भार यांचा परिणाम दीर्घकाल होऊन त्याचा धातुमय—कदाचित् लोहमय—कार्बन बनला असावा व त्या कार्बनला पुढें हिऱ्याचें रूप आलें असावें असें हल्लींचें मत आहे.

रेती, माती, चुना, कोळसा ह्यांसारख्या फुसक्या द्रव्यांस हिरेमाणकांत असणारें जें काठिण्य उत्पन्न झालें तें तीं रत्नें तयार होत असतां पृथ्वीच्या खोल भागांत व अत्यंत उष्णतेंत जें त्यांच्यावर भयंकर दडपण पडलें व तें अगणित काल राहिलें त्याचा परिणाम होय. जीं रत्नें पृथ्वीच्या उथळ भागांत तयार होतात तीं त्या मानानें कमी कठीण असतात. रत्नांस तेज व रंग हे गुण अन्तर्भागांतील दाटींत झालेल्या घर्षणाच्या व उष्णतेच्या परिणामाचा व सूक्ष्म प्रमाणांत त्यांत लोहक्रोमादि मिसळलेल्या रंजक द्रव्यांचा परिणाम आहे. पृथ्वीवर नेहमीं दिसणारें त्याचें उदाहरण मृदु व भुरकट मातीचीं मडकीं तयार करून व भाजून कुंभार त्यांस टणकपणा (काठिण्य) आणि लाली आणतो हें होय. मडकें जितकें उत्तम भाजावें तितका

टणकपणा व लाली त्यांत जास्त येते. मातीच्या मडक्यांत हे धर्म आणणारें दडपण व उष्णता कितीशी असते? त्याच्या हजारोंपट जास्त उष्णता व दडपण पृथ्वीच्या पोटांत असतें. शिवाय पडीझडीनें व दुसऱ्या रासायनिक क्रियादि अनेक कारणांनीं ह्या दोन्ही कारणांची पृथ्वीच्या अंतर्भागांत वाढ होत असते आणि अशा स्थितींत रत्नांचीं घटक द्रव्यें हजारोंहजार वर्षें दडपलेलीं असतात. अशा परिस्थितींत असलेल्या उष्ण रसांतून रत्नें निर्माण होतात. यामुळें त्यांस काठिण्य वगैरे गुण येतात. हा उष्ण रस हळुहळू निवत गेला म्हणजे रत्नांस निरनिराळे पैलूदार आकार लाभतात. हे आकार धारण करण्याचा धर्म घटकांच्या परमाणूंस स्वाभाविक असतो.ह्यामुळें आपलेपणामुळें निरनिराळ्या जागीं एकत्र आलेले परमाणू आपापला स्फटिकाकार धारण करतात. हा धर्म प्रत्यक्ष प्रयोग करून तुरटीच्या साधनानें स्पष्ट करून दाखवितां येतो. पाणी कढत असतां त्यांत पुष्कळ तुरटी विरघळवून तो द्रव सावकाश आटूं दिला म्हणजे तुरटीचे सुंदर अष्टपैलू स्फटिक बनतात. खनिज पदार्थांचा हा एक धर्मच आहे. मात्र हें कढतें पाणी सावकाश निवूं दिलें पाहिजे. म्हणजेच त्यांतून तुरटीचे स्फटिक वेगळे होतात. एरवीं असे स्फटिकाकार होणार नाहींत. रत्नांस ह्या धर्मामुळेंच पैलूदार आकार येतो. निरनिराळ्या घटक द्रव्यांच्या रत्नांचे निरनिराळे पैलूदार आकार होतात. म्हणून प्रयोगार्थ निरनिराळा स्फटिकाकार घेणारीं द्रव्यें कुटून तीं पुनः एकत्र मिसळलीं व त्यांचे स्फटिक होऊं दिले तर कुटलेल्या द्रव्यांप्रमाणें त्यांचे निरनिराळ्या जातीचे भिन्नभिन्न स्फटिकाकार तयार होतात. त्यांत चूक होत नाहीं. हेंही एक सोपा प्रयोग करून दाखवितां येईल. चूर्णीकृत मोरचूत आणि चूर्णीकृत तुरटी यांचें सारख्या प्रमाणांत मिश्रण करून तें उकळत्या पाण्यांत विरवावें व कांहीं वेळ कढूं द्यावें व नंतर सावकाश थंड होऊं द्यावें. थंड झाल्यावर मोरचुताचे निळ्या रंगाचे व तुरटीचे बिनरंगी स्फटिक निरनिराळे तयार झाल्याचें आढळेल.

भूगर्भांत निरनिराळ्या रत्नांस लागणारीं भिन्नभिन्न घटक द्रव्यें एकत्र द्रवरूप झालेलीं व एकमेकांत मिसळलेलीं असतात. त्यांतून भिन्नभिन्न रत्नांचे घटक निराळे कसे होतात व त्यांचीं भिन्नभिन्न रत्नें कशीं तयार होतात हा एक महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न होतो. त्याचें उत्तर असें आहे कीं, भिन्नभिन्न रत्नांचे घटकांत स्वतंत्र आपलेपणा असतो. ह्यामुळें तप्त रसांतील उष्णतेच्या साह्यानें ते घटक परमाणु स्वजातीयांशीं एकरूप होतात. या परमाणूंच्या धर्मास आपलेपणा (Natural selection) हें नांव आहे. ह्या धर्मामुळें मिश्रित रसांतून निरनिराळ्या रत्नांचे घटक परमाणु भिन्न होऊन ते निरनिराळा स्फटिकाकार घेतात. रत्नांचा दुसरा धर्म असा आहे कीं भिन्न भिन्न रत्नें उष्णतेच्या भिन्न भिन्न अंशांवर रत्नत्व पावतात. सर्व रत्नांस तयार होण्यास एकाच अंशावरील उष्णता चालत नाहीं;म्हणून तप्त रस हळूहळू निवत असतां ज्या ज्या अंशांवर त्याची उष्णता येईल त्या त्या अंशांवर तयार होणारीं रत्नें त्या त्या वेळीं तयार होतात. ह्यामुळें रत्नें तयार होण्यांत धांदल अगर चूक होत नाहीं. याप्रमाणें एकल मिश्रित रसांतूनच भिन्न भिन्न रत्नें भिन्न भिन्न वेळीं तयार होतात. हीं गर्भांत तयार झालेलीं रत्नें कधीं भूस्फोटाच्या जोरामुळें ज्वालामुखींतून उडून बाहेर पसरतात. (असा प्रकार हिऱ्यासंबंधानें घडतो.) अथवा पर्वतीकरणाच्या क्रियेमुळें पर्वतशिखरावर आलेलीं आढळतात अगर पर्वताच्या अंतर्भागीं निरनिराळ्या खोलींवर आलेलीं असतात. पृष्ठभागावर पसरलेलीं रत्नें प्रवाहाबरोबर नदीनाल्याच्या गाळांत अगर समुद्राच्या वाळुकेंत जाऊन पडतात. तेथून व अंतर्भागांत निरनिराळ्या खोलींवर आलेलीं रत्नें खाणींमधून माणसांच्या हातीं लागतात.

रत्नांचें वर्गीकरण—रत्नांचे पुष्कळच प्रकार आहेत. त्यांचे महारत्नें व उपरत्नें असे दोन विभाग केले गेले आहेत. ज्या रत्नांचा रंग धवधवीत व चमकणारा असून मृदु व मोहनीय असतो, जीं बहुतेक कमी जास्ती पारदर्शक असतात,ज्यांचें तेज भारी असतें, हिऱ्याखेरीज जीं वजनदार असून उत्तम जिल्हई येण्यासारखीं असतात, त्यांची गणना महारत्नांत केली गेली आहे. ज्या रत्नांत हेच गुण कमी प्रमाणांत असतात तीं उपरत्नें म्हटलीं गेलीं आहेत. अगदीं प्राचीन काळीं माणिक, हिरा व मोतीं एवढ्यांसच महारत्नें म्हणत. पुढें पाच आणि पुष्पराग यांचीहि गणना महारत्नांत होऊं लागली. नंतर त्यांत आणखी नील, गोमेद लसणिया आणि पोवळें ह्यांचा समावेश करून त्या सर्वांस मिळून नऊ महारत्नें म्हणूं लागले. प्राचीन काळीं माणिक ह्या रत्नास पहिलें स्थान होतें. कारण त्यावेळीं हिऱ्याचें पूर्ण तेज बाहेर आलें नव्हतें. हिऱ्याचें तेज अठराव्या शतकाच्या सुमारास त्याला ब्रिलियन आकार देण्यांत येऊं लागल्यापासून मनस्वी

काढून त्यांत अधिकसरा चमक (फायर) दिसूं लागली; त्यामुळें त्याचा क्रम मापकावर जाऊन त्यास पहिल्या प्रतीचें रत्न म्हणूं लागले.

उपरत्नांचें परिगणन निरनिराळ्या ग्रंथांत निरनिराळें केलेलें दिसतें. त्यांत कित्येक ठिकाणीं महारत्नें व उपरत्नें ह्यांच्या पोटभेदांसही उपरत्नांत समाविष्ट केलेलें आहे. हीं पोटरत्नें त्या त्या महारत्नांच्या आणि उपरत्नांच्या वर्णनांत प्रतिष्ठित केलीं पाहिजेत. तीं वजा जातां महत्त्वाचीं उपरत्नें अवशिष्ट राहतात तीं:–चुनडी, तोरमली, काचमणि, अकीक, पेरोज, राजावर्त, पीलु (जेड), अंबर, वज्रभासीय (झिर्कान), कर्केतन, मासरणि, मंचक, कर्कोद, सुगंधी, टिट्टिभ, रूचक, उत्पल, गंधशस्य, पिंड, सीस, नीलांग, शेषमणि, कर्पूराश्मा, मुक्ताशुक्ति आणि शंख. ह्याशिवाय नामनिर्देश न केलेलीं जमेस धरलीं तर उपरत्नांची संख्या शंभरांवर होते. उपरत्नांपैकीं निवडक उपरत्नांचें मात्र वर्णन पुढें केलें आहे.

रत्नांची परीक्षा–पूर्वकालीन ग्रंथांतून सांगितलेली रत्नपरीक्षा नेत्रेंद्रिय, स्पर्शज्ञान, निकष (कसोटी) इत्यादि साधनांनीं होत असे. अलीकडे रत्नांचें पृथक्करण केलें गेल्यामुळें त्याच्या घटकांचें ज्ञान झालेलें आहे त्यावरून, प्रकाशसाधनें उपलब्ध झालेलीं आहेत त्यांवरून, रत्नावर होणाऱ्या उष्णतेच्या व विद्युल्लतेच्या परिणामावरून, तसेंच विशिष्टगुरुत्व, दार्ढ्य, भिदुरता, स्फटिकरचना वगैरे परीक्षून रत्नें ओळखण्याची शास्त्रीय पद्धति निघाली आहे. क्ष किरणांनींही त्यांत आपला वांटा उचलिला आहे. यामुळें सांप्रत परीक्षेचीं शास्त्रीय साधनें विविध झालीं आहेत. त्यायोगानें खऱ्याखोट्याची पारख तज्ज्ञाला त्वरित व बिनचूक होऊं शकते.

महारत्नें–हिरा–

१ घटना, उत्पत्तिस्थान व व्याप्ति– कर्ब (कार्बन–शुद्ध कोळसा) ह्या मूलद्रव्याचा हिरा बनलेला आहे असें शास्त्रीय रीत्या सिद्ध झालेलें आहे. हिऱ्याला रत्नमुख्य म्हणतात. हिंदुस्थान हिऱ्याची आद्यभूमि आहे. येथें हिरे सांपडण्याचे तीन मुख्य प्रदेश आहेत. (१) एक प्रदेश मद्रास इलाख्यांत कृष्णा व गोदावरी यांच्या खोऱ्यांत व त्याच्या दक्षिणेस कडाप्पा, बल्लारी, कर्नूल व उत्तरेस भद्रचेलम् हीं ठिकाणें. यासच गोंवळकोंड्याच्या खाणी म्हणत. वास्तविक खुद्द गोंवळकोंड्यास हिऱ्याच्या खाणी मुळींच नसून येथें हिऱ्यांचा मोटा व्यापार होत असे. त्यावरून तेथच्या हिऱ्यांस गोंवळकोंड्याचे हिरे म्हणत. (२) दुसरा प्रदेश महानदी व गोदावरी ह्या दोन नद्यांमधील होय. या प्रदेशांत संबळपूर आणि वैरगड या ठिकाणीं हिऱ्याच्या मोठ्या खाणी आहेत. (३) तिसरा प्रदेश बुंदेलखंडांत आहे. तेथील पन्ना शहराजवळ मुख्य खाणी आहेत. ह्या प्रदेशांपैकीं कृष्णा–गोदावरीच्या प्रदेशांत कोल्लूर येथें प्रसिद्ध कोहिनूर हा हिरा सांपडला होता.

येथें हिरे रेती व चिखल यांच्या संचयांत; अथवा गोटे, गारगोट्या, रेती यांच्या गड्डयांत सांपडत. हल्लीं हिंदुस्थानांत पन्ना येथें कांहीं हिरे अद्याप सांपडतात. बाकी बहुतेक ठिकाणें बंद आहेत. सन १९३६ सालच्या सरकारी भूगर्भ खात्याच्या पाहणीच्या वृत्तांतावरून कळतें कीं ह्या सालीं हिंदुस्थानांत १४५७ क्यारट हिरे सांपडले. ते मुख्यत्वें करून पन्ना संस्थानांत सांपडले. इतरत्र क्वचित् थोडी पैदास होते. हिंदुस्थानचे पूर्वेकडील बोर्निओ, मलाक्का, जावा, सेलिबीज या बेटांत हिरे सांपडतात.

इ. स. १७२८ सालीं दक्षिण अमेरिकेंतील ब्राझिल देशांत हिरे सांपडूं लागले. तेथें ते हिरे मुख्यत्वें करून रेतींत सांपडत. ब्रिटिश ग्वायानांत स. १८९० सालीं हिरे सांपडूं लागले. उत्तर अमेरिकेंत क्यालिफोर्निआ, व्हर्जिनिआ आणि मेक्सिको या देशांत हिरे सांपडतात. सांप्रत दक्षिण आफ्रिकेंत सर्वांत मोठ्या व महत्त्वाच्या हिऱ्याच्या खाणी आहेत. येथील खाणींचा शोध इ. स. १८६७ सालीं लागला. सर्व जगांतील मोठा कलियन हिरा येथें सांपडला. उरल पर्वतांत; तसेंच ऑस्ट्रेलिया, न्यू साउथ वेल्स आणि तास्मानिया यांतही हिरे सांपडतात.

(२) नैसर्गिक व कृत्रिम आकार, काठिण्य, भिदुरता व विशिष्टगुरुत्व:–निरनिराळ्या रत्नांचे अणु निरनिराळा स्फटिक आकार धारण करितात. स्फटिकीभवनानें झालेले खाणींतील नैसर्गिक हिऱ्याचे आकार बहुशः अष्टपैलू असतात. कधीं कधीं ह्या अष्टपैलूंच्या प्रत्येक पैलूंत तीन अगर सहा आणखी पैलू असतात. असा हिरा बहुतेक वर्तुळाकार म्हणजे अंडाकृति होतो. हिऱ्याचे हिंदी कृत्रिम आकार अनेक आहेत. त्यांपैकीं (१) परब हा पातळ असून बिनपैलूंचा असतो. (२) पलचा हाहि पातळ पण त्याच्या एका बाजूस पैलू असतात. (३)

बिलंदी यास एका बाजूस पैलू असून माथ्यावर टोंक असतें. (४) मुखलसी यास दोन्ही बाजूस पैलू असतात. (५) चादर यास सर्वांगभर पैलू असतात. हिऱ्याचे विलायती कृत्रिम आकार ब्रिलियन, गुलाबघाटी, टेबलघाटी, पायऱ्यांचे टेबलघाटी, मदारघाटी इ० आहेत. ह्या सर्व आकारांत ब्रिलियन हा प्रमुख असून ह्या आकाराच्या कारणानें हिऱ्यांत आगीसारख्या लकेरी मारतात व अनेक रंगांच्या तेजस्वी छटा मारतात, यामुळें हा फार दीप्तिमान दिसतो. हिऱ्याचें काठिण्य सर्वांत अधिक असतें. तें दहा या आंकड्यानें दर्शवितात. कोळशा, फुसक्या व ढुस्स काळ्या द्रव्यास जें अत्यंत काठिण्य आणि लोकोत्तर तेज येतें त्याचें कारण असें आहे कीं, त्यावर पृथ्वीच्या खोल गर्भांत कोट्यवधि टनांचें वजन पडतें व तेथें तें द्रव्य अशा वजनाखालीं गर्भांतील तीव्रतम आंचेनें वर्षोंवर्षे शिजत असतें; हें वजन, ही उष्णता व हा काल ह्याचा परिणाम त्या द्रव्यावर घडून आल्यानें त्याचा फुसकेपणा जाऊन त्याच्या अणूंत लोकोत्तर काठिण्य येतें आणि कालिमा जाऊन लोकविलक्षण तेज म्हणजे चकाकी येते.

हिरा इतका कठीण असला तरी पैलूशीं समांतर अशा चार ठिकाणीं तो फुटणें शक्य असतें.पण भलत्याच भागावर आघात केला तर तो फुटत नाहीं. म्हणून अडाणीपणानें तो अभेद्य म्हटला जातो.* हिरा फोडतां येतो इतकेंच नव्हे तर त्याचें चूर्णही करितां येतें. हें चूर्ण हिरे व इतर रत्नें यांस जिल्हई देण्याकरितां वापरतात.

दक्षिण आफ्रिकेंत सांपडलेला सर्वांत मोठा कलियन हिरा त्यास असलेला ऐब (दोष) काढून टाकण्याकरितां हिऱ्यांतील भिदुरतेच्या दिशेनेंच फोडण्यांत आला होता. तो एका घांवाबरोबर फुटला. भिदुरतेची दिशा पारखून काढल्यावर तो फोडण्यास श्रम कांहींच लागत नाहींत. हिऱ्याचें विशिष्टगुरुत्व ३·५२ असतें.

(३) **रंग, तेज, उपयोग, किंमत**–जो हिरा अगदीं निर्भेळ, पाण्याच्या बिंदूसारखा ढळढळीत, पूर्ण पारदर्शक, आणि पूर्ण रंगहीन असतो तो उत्तम जाणावा. तथापि उत्तम सफेत म्हणजे रंगहीन असून त्यांत थोडी निळ्या रंगाची झांक असेल तरी तो उत्तमांत गणतात; किंबहुना अशा नील वर्णाच्या झांकीचा हिरा सर्वांत उत्तम असेंही कित्येक मानितात. पिंवळ्या रंगाचा हिरा हलका समजतात. पाचेसारखे हिरवे, माणकासारखे लाल, व निळे असे हिरे अत्यंत दुर्मिळ होत. गवतासारख्या हिरव्या रंगाचे हिरे मिळतात त्यांस वनस्पति हिरा म्हणतात. गुलाबी रंगाचे हिरे बरेच असतात. कित्येक हिरे काळ्या रंगाचेही असतात. कित्येक फिकया रंगाच्या हिऱ्यांचा रंग रेडियमच्या साह्यानें हिरवागार करितां येतो.

हिऱ्याचें तेज त्यांत शिरणाऱ्या प्रकाशकिरणांच्या परावर्तनानें फार वाढतें आणि वक्रीभवनानें हिऱ्यांतून इंद्रधनुष्यासारख्या निरनिराळ्या रंगांच्या मजेदार लकेरी मारतात. नैसर्गिक आकाराच्या हिऱ्यांतल्यापेक्षां कृत्रिम ब्रिलियन आकार दिलेल्या हिऱ्यांतून हे दोन्ही चमत्कार फार मोठ्या प्रमाणांत दृष्टीस पडतात. हिऱ्याच्या उच्चतम काठिण्यामुळें त्यास दिलेली जिल्हई तशीच उच्चतम चमकदार होते.

हिऱ्याचा मुख्य उपयोग दागिने करण्याकडे होतो. हिऱ्याच्या आंगठ्या फार प्राचीन काळापासून वापरण्यांत येत आहेत. हिरा हें शुक्राचें प्रिय रत्न आहे. शुक्राची पीडा न व्हावी म्हणून हें आंगावरही वापरतात. देवादिकांच्या किरीटांत, राजेलोकांच्या गळ्यां-

* दुसरा लोकभ्रम असा आहे कीं ढेंकणाच्या रक्तानें हिरा भंग पावतो म्हणजे फुटतो. हा लोकभ्रम जारी होण्याचें कारण वैद्यक ग्रंथांत आहे. रसरत्नसमुच्चय या वैद्यकीयग्रंथांत हिऱ्याचें भस्म करण्याचा एक प्रकार सांगितला आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं:—

विलिप्तं मत्कुणस्यास्त्रे सप्तवारं विशोषितम्
कासमर्दरसापूर्णे लोहपात्रे निवेशयेत्
सप्तवारं परिध्मातं वज्रभस्म भवेत्खलु

याचा अर्थ असा कीं वज्राला (हिऱ्याला) ढेंकणाच्या रक्ताचा लेप देऊन तें वाळवावें. असें सात वेळ करावें. नंतर कासविंदाच्या रसानें भरलेल्या लोखंडाचे पात्रांत तो हिरा ठेवावा. मग त्याला सात वेळ कोळशाची आंच द्यावी म्हणजे खरोखर हिऱ्याचें भस्म होईल. याचा अनुभव आम्हांला नाहीं. असें भस्म होत असलें तरी एकट्या ढेंकण्याच्या रक्तानें तें होत नाहीं. त्याच्यापुढील विधि केले म्हणजे होतें. पण तेवढ्यावरून ढेंकणाच्या रक्ताच्या संसर्गानें हिरा भंग पावतो हा प्रवाद खरा नाहीं.

तील हारांत, त्यांच्या तरवारीच्या मुठींवर, हत्ती-घोड्यांच्या शृंगारांत, फार काय पण नौकादिक वाहनांवरही अनेक प्रकारांनीं बसवून हिरे वापरण्यांत येतात.

बोर्ट आणि कार्बोनेडो हे काळ्या रंगाचे हिरे कठीणतर असल्यानें कातळास भोंकें पाडण्याकडे* त्यांचा उपयोग हल्लीं करीत असतात. हिऱ्याच्या साह्यानें सर्व रत्नांस भोंकें पडतां येतात. जात्या अणकुचीदार टोंकाचा हिरा मुठींत बसवून कांचा कापण्याकडे व कांचांवर अक्षरें कोरण्याकडेही त्याचा उपयोग करितात.

सफेत, पाणीदार, कांतिमान व निर्दोष हिरा फार महाग विकतो. असा हिरा आकारानें ब्रिलियन असून वजनानें २ ते १० रतीपर्यंत असल्यास त्याची किंमत दर रतीस ४०० ते १००० रुपये पर्यंत असते. तोच सदोष व रंगानें पिंवळसर असल्यास दर रतीस २०० ते २५० रुपये पर्यंत किंमत पडते. देशी पैलू असलेले हिरे १५ ते १२५ रुपये रतीपर्यंत मिळतात. बिनपैलूंचे ह्यापेक्षांही कमी किंमतीस मिळतात. बेघाट हिऱ्यास किंमत पाऊणपट व सदोष हिऱ्यास पावपट पडते.

(४) **हिऱ्याचे गुणदोष, कृत्रिम व शास्त्रीय हिरे, हिऱ्याची परीक्षा व प्रख्यात हिरे**:-हिरा निर्मळ, हलका, वीज-अग्नि-इन्द्रधनुष्य यांच्यासारख्या लकेरींनीं चमकणारा, प्रकाशाचें आत्यंतिक परावर्तन करणारा, कोणत्याही पदार्थावर चरा पाडण्याइतका कठीण असणें हे हिऱ्याचे गुण आहेत. काळे, पांढरे, तांबडे छाटे, रेघा, खाडे व जाळें असणें हे हिऱ्याचे दोष आहेत. हिऱ्यांत तीन मोठे काळे छाटे असल्यास त्या दोषास काकपद म्हणतात.

कांचेचा एक प्रकारचा रांधा तयार करितात, त्यास पास्ट किंवा स्ट्रास म्हणतात. त्याचे कृत्रिम हिरे करतात. कांचमण्याचे (क्वार्ट्झचे) ही कृत्रिम हिरे अनेक ठिकाणीं करितात; गोमेद, पुष्पराग, वैडूर्य यांचेहि कृत्रिम हिरे करितात.

नैसर्गिक रत्नांचे जे घटक आहेत तेच घेऊन त्यांचीं तीं तीं रत्नें अलिकडे तयार करूं लागले आहेत, त्यांस शास्त्रीय रत्नें असें म्हणतात. हीं कल्चर मोत्यांचीं भावंडेंच आहेत. असे शास्त्रीय रीत्या माणिक व नील बनवितां येतात. व्यापारांत उपयोग करितां येईल असे शास्त्रीय हिरे अद्याप तयार होऊं लागले नाहींत.

हिऱ्याची परीक्षा करणें हें नजरेचें काम आहे. तें अभ्यासानें येतें. सर्व रत्नांपेक्षां हिऱ्यांत लखलखीतपणा व तेज जास्त असतें. त्यांत अनेक रंगांच्या तेजस्वी छटा मारतात. हिऱ्याचें आंग (पोत किंवा घडण) इतर रत्नांपेक्षां कठीण दिसतें. त्याचा स्पर्शहि हाताला कठीण लागतो. हिऱ्यावर काणस लागू होत नाहीं. हिऱ्यानें सर्व रत्नांवर चरा पडतो. इतर रत्नें हिऱ्यावर चरा पाडूं शकत नाहींत; पण चमत्कार असा कीं, हिऱ्यानें हिरा कांपला जातो. खऱ्या हिऱ्याची ढाळ वरच्या बाजूस मारते; खोट्याची आंतल्या बाजूस मारते व खोलगट दिसते. खरा हिरा तेजाबांत टाकिला तर जशाच्या तसा राहतो. खोटा फुटून त्याचे तुकडे होतात. खरा हिरा विद्युज्जागृत होतो म्हणजे त्याला रेशमी वस्त्रानें घासून जवळ हलका कापूस नेला तर तो त्यास ओढून घेतो. खोट्यानें तसें होत नाहीं. खऱ्या हिऱ्यावर मुखानें श्वास टाकिला असतां त्यावर पांढुरकेपणाची झांक कांचेवर टाकिलेल्या श्वासाचे झांकेपेक्षां जास्त दाट येते व ताबडतोब जाते. कांचेवरची जास्त वेळ टिकते. हिऱ्याचा स्पर्श कांचेपेक्षां जास्त थंड असतो, स्वच्छ पाण्यांत खरा हिरा ठेविला तर त्याची चकाकी व तेज कायम राहतें व पैलू जशाचे तसे दिसतात. खोट्या हिऱ्याची चकाकी पाण्यांत मंद होते व पैलू वांकडेतिकडे व ढोबळ दिसतात. सूक्ष्मदर्शक यंत्रानें पैलू पाहिल्यास नकली हिऱ्याचे जशाचे तसे दिसतात पण खऱ्या हिऱ्याचे पैलू एका रेषेंत दिसत नाहींत. कृत्रिम हिरा कांचेचा केलेला असल्यास आंत रेघोट्या व बारीक बुडबुडे दिसतात. खऱ्या हिऱ्यांत तसें दिसत नाहीं. विशिष्टगुरुत्वावरून, नैसर्गिक स्फाटिक आकारावरून व पारखण्याच्या आणखीही कांहीं शास्त्रीय तऱ्हा आहेत त्यांवरून खऱ्याखोट्याची पारख करितां येते.

ऐतिहासिक व जगप्रसिद्ध असे अनेक हिरे आहेत. त्यांपैकीं कोहिनूर ५००० वर्षांपूर्वीं कोल्लूरच्या खाणींत सांपडलेला आहे. तो हल्लीं इंग्लंडच्या राजाजवळ आहे. हा हिरा भारतवर्षीय वीरपुरुष कर्ण वापरीत असे. एकंदर जगांत प्रसिद्ध शुभ्र हिरे सुमारें २० आहेत. पैकीं निम्मेपेक्षां अधिक हिंदुस्थानांत सांपडलेले

* इंद्र आपल्या वज्रानें (हिऱ्यानें) पर्वताचें चूर्ण करितो असा लौकिकी प्रवाद आहे. त्याचा व्यावहारिक असाच अर्थ घेतल्यास याचा उपयोग फार प्राचीन काळापासून इकडे असाच होत आहे असेंच म्हणावें लागेल.

आहेत. सर्वांत मोठा शुभ्र हिरा कलियन हा दक्षिण-आफ्रिकेंतील खाणींत सांपडला. इतर रंगांचे प्रसिद्ध हिरे सुमारें १४ आहेत. त्यांपैकीं सुमारें निम्मे हिरे दक्षिण आफ्रिकेंतील खाणींत सांपडलेले आहेत.

माणिक-(१) घटना, उत्पत्तिस्थान व व्याप्ति— माणिक हें रत्न कुरुविंदाचें बनलेलें आहे. कुरुविंद अथवा कुरुंद यास इंग्रजींत या शब्दाचाच अपभ्रंश झालेला कोरंडम हा शब्द आहे. याची शास्त्रीय सारणी Al_2O_3 अशी आहे. यावरून याचे घटक ॲल्यूमिनियम आणि ऑक्सिजन हे असल्याचें स्पष्ट होतें. अल्यूमिनियमच्या मूलतत्त्वाचा ऑक्सिजनशीं संयोग होऊन जो गंज अथवा जंग तयार होतो त्याला ॲल्यूमिनियमचा ऑक्साईड हें शास्त्रीय नांव आहे. व्यावहारिक भाषेंत ह्यास अल्यूमिना माती अथवा फटकीचें सत्त्व म्हणतात. हें पांढऱ्या रंगाचें असून जांब्या दगडांत सांपडतें. ही माती अगदीं शुद्धावस्थेंत असतां अथवा तींत सुमारें शेंकडा १ इतकीं रंग देणारीं प्राणिजें असतां तिचें स्फटिकीभवन झालें म्हणजे तिचीं शुभ्र व रंगीत माणकें, नील, पुष्पराग इ० मौल्यवान रत्नें बनतात. ह्या मातींत चुना, सिलिका वगैरे पदार्थांचें मिश्रण असलें तर तिचे सामान्य कुरुंद, एमेरी वगैरे पाषाण बनतात. निर्भेळ कुरुंद रंगहीन असतां त्याचें शुभ्र रंगाचें माणिक होतें. त्यांत क्रोमिक ऑक्साइडचें सूक्ष्म मिश्रण असतां तांबड्या रंगाचें माणिक होतें.

माणकाचे मुख्य प्रकार दोन आहेत. एक पद्मराग नांवाचें लाल माणिक व दुसरें नीलगंधी. नीलगंधी हें बाहेरून तांबूस पण अंतर्भागीं निळसर असतें. हेंही पद्मरागाप्रमाणें श्रेष्ठ मानतात. ह्याची उत्पत्ति लंकेंतील रावणगंगेंत होते.

माणिकाचे ओबडधोबड खडे खाणींत, खडकांत, नदीचे गाळांत, व रेती रेवशांत सांपडतात. भूगर्भांतील घडामोडींनीं आणि पृथ्वीच्या गर्भांतील उष्णता व उष्ण पाणी यांचा व्यापार घडून विकृत खडक तयार होण्याच्या क्रियेंत द्रवरूप झालेले खडक हळूहळू थंड होत असतां त्यांतील कुरुंदाच्या घटकांचे षट्कोन पद्धतीचे स्फटिकाकार तयार होतात. भूकंप, पर्वतीकरण वगैरे क्रियांनीं भूगर्भांतील भाग भूपृष्ठावर येऊन तेथून पुनः पर्जन्यानें धुपून गेला असतां त्याबरोबर हीं रत्नें नद्यांच्या प्रवाहांत व गाळांत गेलेलीं सांपडतात. ब्रह्मदेश, सयाम, सीलोन, अमेरिकेंतील उत्तर क्यारोलिना, रशियांतील ओरेनबर्ग, आफ्रिकेंतील ऱ्होडेशिया, व हिंदुस्थानांत म्हैसूर, मद्रासकडे, पंजाबांत व उदेपूर ह्या शहराजवळ माणकें सांपडतात. माणकांची सर्वांत जास्त पैदास ब्रह्मदेशांत होते. लाल नांवाचें माणिक ब्रह्मदेशांत व सीलोनांत सांपडतें. पेरू देशांतील केपलंड पर्वतावर लाल फार सांपडतात. किरमिजी अगर पारव्याच्या रक्तासारखीं उत्कृष्ट लाल माणकें ब्रह्मदेशांतील मोगाक शहराजवळ सांपडतात. तेथें सन १९३६ सालीं १५५३८१ क्यारेट वजनांचीं माणकें सांपडलीं.

(२) नैसर्गिक व कृत्रिम आकार, काठिण्य व विशिष्टगुरुत्वः—माणकाचा नैसर्गिक आकार स्फटिकशास्त्रांतील षट्कोणपद्धतींपैकीं समभुज ह्या पोटभेदांत येतो. तथापि प्रत्यक्ष तो तितका रेखीव असत नाहीं. तो अनेकदां लघुकोन षड्भुज मनोऱ्याप्रमाणें असतो. माणकाचे नैसर्गिक खडे घांसून त्यांस गोल, तिकोनी, षट्कोणी, अष्टकोणी, कमलघाटी वगैरे अनेक तऱ्हेचे देशी आकार देतात. हल्लीं माणकांस ब्रिलियन आकारही देऊं लागले आहेत. माणकाचें काठिण्य ९ आहे. ह्याचें काठिण्य हिऱ्याचे खालोखाल असल्यामुळें ह्यानें हिऱ्याशिवाय इतर रत्नांवर चरा पडतो. ह्याचें विशिष्टगुरुत्व ४·६ आहे.

(३) माणकाचा रंग, तेज, उपयोग, किंमतः— माणकाचा रंग लाल असतो; पण पांढऱ्या रंगाचींही माणकें आढळतात. ह्या रत्नाचा लालसर रंग कमीजास्त गहिरा किंवा अगदीं फिक्का लाल असाही असतो. पारव्याच्या रक्तासारखा लाल रंग उत्कृष्ट मानितात. त्यांत किंचित् निळ्या रंगाची झांक असल्यास तो मनपसंत मानितात. माणकाचा रंग सर्व आंगभर सारखा असतो असें नाहीं. हें रत्न गहिऱ्या लाल रंगापासून तों जांभळ्या रंगापर्यंत अनेक प्रकारच्या लाल रंगांचें असतें. सर्वांगानें स्वच्छ गहिऱ्या लाल रंगाच्या माणकास फार करून लाल असें म्हणतात. उत्तम लाल तो कीं, जो पाणी भरलेल्या रौप्य पात्रांत ठेविला असतां आपल्या प्रभेनें पाण्यास किंचित् रक्तमय भासवितो; अथवा अंमळ हातावर ठेविला तर सभोंवार लाल प्रभा पसरवितो. हा अमूल्य आहे. लाल लहान असल्यास त्यास माणकी म्हणतात. माणकाच्या काळसर रंगाच्या जातीस श्याम म्हणतात. कांहींचा रंग दुधक, लाल पांडुरका, लालसर गुलाबी, फिक्का गुलाबी असतो. कांहीं माणकें गुलबाशीच्या फुलाच्या रंगाचीं, कांहीं जास्वंदीच्या फुलाच्या रंगाचीं, कांहीं पिकलेल्या डाळिंबाच्या दाण्याच्या रंगाचीं असतात. जास्वंदीच्या फुलाच्या रंगाचीं सर्वांत उत्तम, गुलबाशीच्या

फुलाच्या रंगाचीं त्याच्या खालोखाल, आणि त्याच्या खालोखाल डाळिंबीच्या दाण्याच्या रंगाचीं समजतात. काळसर व सफेत माणकें निकृष्ट मानितात. उत्कृष्ट माणकाचें तेज हिऱ्याच्या तेजाजवळजवळ असतें. परंतु जास्त जास्त मलिन रत्नांत तें वज्रसदृशापासून कांच-सदृश होत जातें. कांहीं माणकांत खैराच्या निखाऱ्या-सारखी प्रखर प्रभा दिसते; अशी प्रभा सिंहलद्वीपांत सांपडणाऱ्या माणकांत आढळते.

माणकांचा उपयोग फार प्राचीन काळापासून जडावाच्या दागिन्यांत होत आला आहे. प्राचीन काळीं कानाच्या दागिन्यांत व आंगठ्यांत माणकांचा उपयोग करीत. सांप्रतही माणकाच्या आंगठ्या करि-तात. तसेंच माणिक, पाच वगैरे मौल्यवान रत्नांच्या मौल्यवान कंठ्याही करितात. माणकांच्या 'लोलक' लालड्या करून त्या दागिन्यांत वापरतात. श्रीमंत लोक कोट वगैरे कपड्यांचीं बटणें हीं माणकाचीं करितात. प्राचीन काळच्या आर्य राजांच्या मुकुटास माणकें लावीत असत. टांचणीच्या डोक्याएवढ्या माणकांचा उप-योग खिशांतील घड्याळांच्या चक्रांना आधार देण्या-कडे करितात. हिंदुस्थानांत माणकांस फार करून पैलू न पाडतांच वापरतात; पण पैलू पाडून वापरण्याची प्रथा दिवसेंदिवस जास्त पडत चालली आहे. पूर्वींच्या काळच्या गोल व लांबट माणकांचे मण्यांस हल्लीं पैलू पाडून ब्रिलियन आकार देतात. माणिक हलकें असल्यास त्याचा भाव मालाच्या दर्जाप्रमाणें १रुपया-पासून २५ रुपये रतीपर्यंत असतो. चांगले व मोठे खडे असल्यास त्यांचा भाव ५० रुपये रतीपासून ४०० रुपये रतीपर्यंत असतो. उत्तम पैलू पाडलेला लाल दोन रतींहून जास्त वजनाचा असल्यास त्यास २०० रुपये रतीपासून १००० रु. रतीपर्यंतही किंमत पडते. अस्सलप्रमाणें उत्तम कृत्रिम शास्त्रीय माणकें तयार होऊं लागल्यानें नैसर्गिक माणकांची किंमत सध्यां उतरली आहे.

(४) माणकाचे गुणदोष, कृत्रिम व शास्त्रीय माणकें,त्यांची परीक्षा,प्रख्यात माणकें व पोटरत्नें:–तुळ-तुळीत, स्वच्छ, तेजस्वी,वजनदार, सुंदर आकृतीचें,प्रभेनें सर्वत्र भरलेलें पण त्यांतही विशेषतः मध्यभागीं कांति-युक्त व अतिलोहितवर्ण असें माणिक असणें हे माण-काचे गुण समजतात. माणकाच्या वरच्या बाजूस दुधकाची चादर पडल्यासारखी दिसणें म्हणजे फिका दुधासारखा पांढरा रंग पसरल्यासारखा दिसणें हा त्याचा ऐब म्हणजे दोष आहे. तसेंच आंतल्या बाजूस छाटे असणें, बारीक कण असणें, रेघांसारखें जाळें असणें, धूम्ररंग अथवा अभ्रासारखा अंधुकपणा असणें, खाडे असणें, एक प्रकारचें फूल असणें हेही त्याचे दोष आहेत.

कांचमण्यासारख्या रत्नास उष्णता देऊन त्यास सूक्ष्म तडे पाडून त्यांतून आंत रंग भरून उत्कृष्ट अशीं माणकें व दुसरीं अनेक रंगांचीं अन्य जातींचीं कृत्रिम रत्नें तयार करितात. शिवाय कांचेचा पास्ट अथवा स्ट्रास नांवाचा रांधा तयार करून त्याचींही माणिकासुद्धां सर्व प्रकारचीं रत्नें तयार करितात. अशीं रत्नें वापरण्यानें काळीं पडतात.

शास्त्रीय रत्नांची व्याख्या हिऱ्याबद्दल लिहितांना दिली आहे. शास्त्रीय रत्नें माणिकें व इंद्रनील यांचीं फार करितात. नैसर्गिक व शास्त्रीय रत्नांचे घटक एकच असल्यानें त्यांचे गुणधर्मही एकच असतात. तथापि त्यांस ओळखून काढण्याचीं निश्चित साधनें उपलब्ध झालीं आहेत. त्यांपैकीं महत्त्वाचीं अशीं कांहीं खालीं दिलीं आहेत :–

(अ) शास्त्रीय रत्नांत हवेचे लहान बुडबुडे अस-तात व ते बहुधा गोल असतात. नैसर्गिक रत्नांत असे क्वचित्‌च आढळतात. आढळतात तेही गोल नसून ओबडधोबड, कोणयुक्त व कांहींसे स्फटिकाकार असतात.

(आ) शास्त्रीय रत्नांच्या अंतर्भागीं रेषा असल्यास त्या बांकदार असतात. नैसर्गिकांतील सरळ असतात.

(इ) शास्त्रीय रत्नांचा रंग अनेकदां सर्वत्र एक-सारखा असतो. नैसर्गिकांमधील रंग एकाच रत्नाच्या निरनिराळ्या भागांत कमीजास्त असतो. नैसर्गिकांत रंगाचे पट्टे असले तर ते बांकदार कधींही नसतात. समांतर अथवा इतस्ततः पसरलेले असतात.

(ई) नैसर्गिक माणिक व नील या रत्नांत दुधक हा दोष पुष्कळ वेळां आढळतो. तसा पांढुरकेपणा शास्त्रीय रत्नांत कधीं दिसला तरी तो दुर्बिणींतून पाहिला तर तो दुधक नसून ते बुडबुड्यांचे थवे असल्याचें आढळून येतें.

(उ) नैसर्गिक रत्नांच्या पृष्ठभागाला जितकी सफाई असते तितकी शास्त्रीय रत्नांत नसते.

माणकांसुद्धां सर्व कृत्रिम रत्नांची परीक्षा काठिण्य, विशिष्टगुरुत्व या साधनांनीं करून तीं ओळखीतां येतात. हिऱ्याचे खालोखाल माणिक व नील यांचें

काठिण्य आहे, म्हणून हिऱ्याशिवाय बाकीच्या रत्नांनीं त्यांवर ओरखडे पडत नाहींत. माणिक व नील यांवर काणस चालत नाहीं. माणिक व नील ह्यांनीं ह्याच रत्नांवर आणि हिऱ्याशिवाय बाकीच्या सर्व रत्नांवर चरे पाडितां येतात म्हणून या साधनानें हीं रत्नें ओळखितां येतात. कांचेचीं कृत्रिम माणकें व नील काणशीनें ताबडतोब कानसले जातात, यामुळें त्यांचा खोटेपणा तेव्हांच दिसून येतो.

खरीं खोटीं रत्नें कसोटीवरूनही ओळखतां येतात. रत्न कसोटीवर घासतांना हलकें गेलें तर तें कृत्रिम होय. कढविलें असतां ज्या रत्नाचा तजेला जातो तेंही कृत्रिम होय असा रत्नशास्त्राचा आदेश आहे. 'युक्तिकल्पतरू'त लिहिलें आहे कीं, "स्नेहप्रभेदो लघुता मृदुत्वं विजाति लिंगं खलु सार्वजन्यम्" म्हणजे फार कमी तुळतुळीतपणा, हलकेपणा, आणि मृदुपणा हीं नकलीं रत्नांचीं सर्वसाधारण चिन्हें आहेत. (हलकेपणासंबंधानें हिरा मात्र अपवाद समजावा.) प्रत्येक जातीच्या रत्नाचें विशिष्टगुरुत्व निरनिराळें असतें म्हणून तें तपासून रत्नें एकमेकांपासून व नकली रत्नांपासून निवडतां येतात. याला शास्त्रीय रत्नें मात्र अपवाद आहेत. प्रकाशाचीं अनेक साधनें आहेत त्यांचाही उपयोग कृत्रिम अकृत्रिम रत्नें ओळखण्यास करितां येतो. माणकास घांसलें असतां तें विद्युज्जागृत होतें. रत्नें ओळखण्यास रंग हें साधन मात्र बहुतेक निरुपयोगी आहे. कारण एकाच जातीचीं रत्नें अनेक रंगांचीं असतात. मात्र निष्णात पारखी रत्नाच्या तेजाच्या सूक्ष्म छटा पाहून रत्नांची परीक्षा करूं शकतात.

ब्रह्मदेशच्या खाणींत एक ४०० क्यारट वजनाचें प्रचंड माणिक सांपडलें होतें; त्याचा एक तुकडा सत्तर क्यारटचा, दुसरा पंचेचाळीस क्यारटचा असे करून त्याचीं दोन कांतीव माणकें तयार करण्यांत आलीं. बाकी राहिलेल्या तुकड्यांची बिनकांतीव स्थितींतच सात लाख रुपये किंमत आली. शिवाय ह्या खाणींत दुसरें मोठें माणिक ३०४ क्यारट वजनाचें व तिसरें १७२ क्यारट वजनाचें माणिक सांपडलें होतें. कबूतराच्या अंड्याएवढें मोठें माणिक रशियाच्या राणीजवळ होतें. पारिस येथें ८१३ रति वजनाचा सुमारें अर्ध्या अंड्याएवढा एक लाल आहे. रशियाच्या राणीच्या मुकुटांत एक लाल कबूतराच्या अंड्याएवढा होता.

माणकाचीं पोटरत्नें सौगंधिक (Spinel), कुरुविंद (Rubicelle), मांसखंड (Balas Ruby) वगैरे अनेक आहेत.

नील अथवा शनि—१ घटना, उत्पत्तिस्थान व व्याप्ति—माणकाप्रमाणें नील हें रत्नही कुरुविंदोद्भव (कुरुंदापासून झालेलें) रत्न आहे. कुरुंदाचे प्रस्तरांत टिट्यानिक प्राणिजाच्या सूक्ष्म मिश्रणानें ज्यास निळा रंग येतो त्यास नील अथवा शनीचें रत्न म्हणतात. एकाच खाणींत माणिक व नील हीं अनेकदां सांपडतात. उत्पत्तिसंबंधानें आणि सांपडण्याच्या तऱ्हांसंबंधानें माणकाचीं केलेलीं वर्णनें नील ह्या रत्नालाही लागू पडतात. नीलाच्या जगांतील मोठ्या खाणी सयाम (श्याम) ह्या देशांत आहेत. येथील नील आकारानें मोठे आणि गुणांनीं सरस असतात. ब्रह्मदेशांत व सीलोनांतही नीलाची उत्पत्ति होते. सीलोनांत रत्नपूर नगराजवळ सांपडणारे नील तेजस्वी असतात. इराणांत हिमालयाच्या वायव्येकडील भागांत, व पंजाबांतही नील सांपडतात. शिवाय अमेरिका, युरोप, आफ्रिका व ऑस्ट्रेलिया ह्या खंडांतही थोडेफार नील कित्येक ठिकाणीं सांपडतात.

(२) **नैसर्गिक व कृत्रिम आकार, काठिण्य व विशिष्टगुरुत्व**—नील व माणिक हीं कुरुंदाचींच होत असल्यानें माणकांप्रमाणेंच नीलाचेही आकार, काठिण्य आणि विशिष्टगुरुत्व हीं एकसारखींच आहेत.

(३) **नीलाचा रंग, तेज, उपयोग, किंमत**—नीलाच्या रंगापैकीं सर्वांत उत्तम रंग गहिरा, मखमालीच्या रंगाचा होय. हा फक्त इंद्रनील ह्या जातींत आढळतो. आळशीच्या फुलाच्या रंगाच्या निळाला किंमत फार येते. अगदीं फिक्कट पाण्येर निळ्या रंगापासून तो गहिरा होत जात जात उत्तम आळशीच्या फुलाच्या घवघवीत निळ्या रंगापर्यंत जाणाऱ्या ह्या रंगाच्या अनेक पायऱ्या असतात. त्याहूनही पुढें हा रंग काळ्या शाईसारख्या रंगाचा होत गेलेला असतो. लालसर व धूम्रवर्णाचेही नील असतात. शास्त्रीय तऱ्हेनें केलेल्या कृत्रिम नीलरत्नाचा रंग नैसर्गिक नील रत्नाच्या उत्तम रंगाप्रमाणें असूं शकतो. पुष्कळसे इंद्रनीलमणि रात्रीपेक्षां दिवसास चांगले दिसतात. पण मोंटाना येथून येणारे इंद्रनील विजेसारख्या तेजानें युक्त असे निळे असतात. ते मात्र दिवसापेक्षां रात्रीच्या कृत्रिम प्रकाशांत फार चमकतात. रंगाची तकाकी आणि पारदर्शकता हीं ह्या रत्नांत

महत्त्वाचीं समजलीं जातात. म्हणून अशा नीलाला फार किंमत पडते. निळाचे तारे असतात, त्यांचें तेज चांगलें असतें.

आपल्या रत्नविषयक ग्रंथांतून इंद्रनील, महानील, वर्णाढ्य, जलनील वगैरे निळाच्या जाति दिल्या आहेत. ज्या निळाच्या मध्यभागीं इंद्रधनुष्याप्रमाणें प्रभा दिसतात त्यास इंद्रनील म्हणतात. अन्यत्र असेंही म्हटलें आहे कीं, इंद्रनील मण्यांत निळ्या रंगाच्या पंक्ति असतात. जो आळशीच्या फुलाच्या रंगाचा असून दुधांत ठेविला असतां दुधाला निळा रंग आणितो त्यास महानील म्हणतात. जो नील बालसूर्यासमोर ठेविला असतां निळी प्रभा ओकतो त्यास वर्णाढ्य हें नांव आहे. जलनील हा फिक्कट निळ्या रंगाचा असून वजनानें हलका असतो. हीं नांवें हल्लींच्या रत्नांच्या व्यापाऱ्यांचे मुखांतून ऐकूं येत नाहींत.

नीलरत्न हें शनीचें प्रिय रत्न आहे. म्हणून शनीदेवाला प्रसन्न ठेवण्याकरितां ह्या रत्नाची आंगठी करून वापरतात. शनीला प्रिय म्हणून ह्या रत्नाचें नांवही शनी असेंच पडलें आहे. नवग्रहाचे आंगठींत हें बसवावें लागतें. तें १। रति वजनाचें असावें लागतें व शनीच्या होऱ्यावर बसवावें लागतें. आंगठीशिवाय इतर रीतीनेंही हें शरीराबर धारण करितात.

नीलाची किंमत करणें झाल्यास त्याचा आकार, रंग, तेज, ऐब यांचा विचार करून करितात. नैसर्गिक साधारण नील ५ रुपये रतीपासून १०० रुपये रतीपर्यंत मिळतो. अगदीं हलके नील ह्याहूनहि कमी किंमतीस मिळतात. ऐबदार नीलाची किंमत पाऊणपट, व घाट कमी व मळ अशा नीलाची किंमत पावपट समजावी. मोराच्या मानेवरील अथवा पिसाऱ्यावरील रंगाप्रमाणें ज्यांत सतेज लकेर मारते त्या नीलास ५०० ते १००० रुपये रतीप्रमाणें किंमत पडते; पण एकंदरींत माणकापेक्षां नीलाची किंमत कमी असते. शास्त्रीय नीलाची किंमत फारच कमी म्हणजे सुमारें आठ आणे क्यारटप्रमाणें असते.

(४) नीलाचे गुणदोष, कृत्रिम व शास्त्रीय नील, त्यांची परीक्षा व प्रख्यात नीलः–जडपणा, तुळतुळीतपणा, सर्वांगभर सारखा उत्तम रंग, बाजूंना प्रकाश फांकत असणें, व विद्युज्जागृति हे नीलाचे गुण समजतात. नीलाचे अंतर्भागीं अभ्रासारखा पडदा असणें, रेतीसारखे कण असणें, फुटीर असणें, रंग रुक्ष दिसणें, आंत दुधक असणें, छाटे, जाळें, रेषा व खळगे असणें हे नीलाचे दोष होत. ह्याच्या कृत्रिम व शास्त्रीय प्रकारांची माहिती माणकाप्रमाणें समजावी. नीलाची परीक्षा माणकाप्रमाणेंच करावी.

हल्लीं माहीत असलेल्या प्रख्यात नीलांपैकीं बरेचसे नील हिंदुस्थानांत सांपडलेले आहेत. सर्वांत मोठा एक नील १९०० क्यारट वजनाचा व दुसरा ९५१ क्यारट वजनाचा असे दोन नील ब्रह्मदेशच्या राजाच्या खजिन्यांत होते म्हणतात. ब्रह्मदेशांतील माणकाच्या खाणींत मोठे नील सांपडतात. तेथें सन १९२८ सालीं ४५६ रति वजनाचा नील पूर्ण निर्दोष व उत्तम वर्णाचा असा सांपडला होता. इ. स. १९२३ सालीं ब्रह्मदेशाच्या खाणींतून १०२००० क्यारट वजनाचीं नीलरत्नें निघालीं.

पाच अथवा पन्ना–

(१) घटना, उत्पत्तिस्थान व व्याप्ति–पाचेचा मुख्य घटक सिलिका आहे. सिलिका म्हणजे सिकता–रेती. पांढरी वाळू ही शुद्ध सिलिका होय. पाचेच्या घटनेंत सिलिकेशिवाय अल्युमिनियम् आणि बेरिलियम् (अथवा ग्लुसिनम्) हे धातुही असतात. त्यांतील बेरिल या धातूमुळें पाश्चात्य लोक यास बेरिलचें म्हणजे वैडूर्याचें रत्न म्हणतात. बेरिल हा शब्द संस्कृत वैडूर्य ह्या शब्दापासून निघालेला दिसतो. संस्कृतांत पाचेला वैडूर्य हें एक नांव आहे. विदुर पर्वतांत हें रत्न सांपडे म्हणून त्यास 'वैदूर्य' म्हणजे विदुरोत्पन्न हें नांव प्राप्त झालें. इतर कांहीं रत्नांप्रमाणें हें पाश्चात्य देशांत गेल्यावर त्यांच्या दृष्टोत्पत्तीस त्यांतील घटक बेरिल धातु असल्याचें आढळल्यावरून त्यांनीं यास 'बेरिलचें रत्न' हें नांव दिलें. हल्लीं पाच हिंदुस्थानांत फारशी निपजत नाहीं; पण पूर्वी तिची उत्पत्ति येथें बरीच असावी असें दिसतें. पाच फक्त हिंदुस्थानांतून येते असें प्लिनीनें आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे.

पाच ह्या रत्नाच्या मुख्य खाणी कोलंबिया, ब्रेझिल व पेरु ह्या अमेरिकेंतील देशांत आहेत. प्राचीन काळीं ईजिप्त देशांतील खाणींतून पाच काढीत असत. आशिया खंडांतील उरल व अलताई पर्वतांत व सैबेरिया व ब्रह्मदेश या देशांत पाचेच्या खाणी आहेत. मद्रास इलाख्यांत कांहीं पाचेच्या खाणी असून खंबायतेंत व अजमीर प्रांतांत पाचेचे प्रस्तर सांपडतात.

पाचेची व्यापारी उलाढाल कलकत्ता व मुंबई येथें फार होते.

(२) नैसर्गिक व कृत्रिम आकार, काठिण्य व विशिष्टगुरुत्व—पाचेचे समपार्श्व षट्कोणी आकाराचे खडे खाणींत सांपडतात. कृत्रिम आकारांपैकीं ब्रिलियन आकार कित्येक पाच रत्नांस देण्यांत येत असतो. हिरे माणकांप्रमाणें अनेक कृत्रिम आकार ह्या रत्नासही दिलेले आढळतात.

ह्याचें काठिण्य हिऱ्याचे पुष्कळ खालीं म्हणजे ७½ असल्यानें हिऱ्याचें दागिन्यांत पाचेचे दागिनें ठेविले असतां त्यास चरे पडतात. पाचेचें विशिष्टगुरुत्व २·६७ पासून २·७३२ पर्यंत असतें. पन्ना बराच ठिसूळ असल्यामुळें हातांतून खालीं पडल्यास त्यास तडे पडतात. म्हणून तो फार काळजीनें वापरावा लागतो.

(३) रंग, तेज, उपयोग, किंमत—उत्तम पाचरत्न सतेज गवताच्या हिरव्या रंगाचें असतें. हा रंग त्यास क्रोमियमच्या प्राणिलानें आलेला असतो. पाचेच्या हिरव्या रंगांत दुसऱ्या कोणत्या तरी रंगाची झांक असते. पिंवळी सोनेरी सतेज झांक असल्यास तो पन्ना उत्तमांत गणिला जातो. झांक सतेज पिंवळी नसल्यास तो मध्यम समजतात. पिंवळी झांक नाहीं व हिरवा रंग ही कमी अशी पाच कनिष्ठ समजावी. ह्याहीपेक्षां हलके पन्ने म्हणजे जे पांढरे असून त्यांत थोडीशी हिरवी झांक असते ते. कित्येक पन्ने हिरव्या काळसर रंगाचे असतात. ह्याची एक चारा म्हणून जात आहे, ती हिरव्या गवताच्या रंगाची असते. पाचेची चमक कांचेसारखी असते. पाचेचें तेज अत्यंत कोमल असल्यामुळें त्यास तकाकी फार मारते. एकाच रंगाचा व भरपूर पाणीदार पन्ना असला आणि तो तळहातावर ठेवून त्याजकडे सूक्ष्म नजरेनें पाहिलें, तर त्यांतून किरणांच्या सूक्ष्म लकेरी फुटून बाहेर पडताहेत कीं काय असें दिसतें, व तळहात हिरवा दिसतो. असा पन्ना पाणी भरलेल्या कांचेच्या पेल्यांत ठेविला तर पाण्याचा रंग हिरवा दिसूं लागतो. हा पन्ना अमूल्य होय.

पाचेचा उपयोग आंगठ्या करण्याकडे फार होतो. दुसऱ्याही नाना प्रकारच्या दागिन्यांत पाचेचा उपयोग करितात. हिरव्या थंड रंगामुळें श्रीमंत लोक पाचेचे चष्मे बनवितात. हिंदुस्थानांत पूर्वीं पाचेचा लांबट मणी करून वापरीत असत. हल्लीं तेच मणी कापून त्यांस सोन्याच्या कोंदणांत बसवून वापरतात. पाऊण रति वजनाचा खडा घेऊन तो बुधाचे होऱ्यावर नवग्रहाचे आंगठींत बसवितात. पन्ना हें बुधाचें प्रिय रत्न आहे.

पाचेची किंमत अलीकडे फार वाढली आहे. उत्तम पाचेस दर रतीस ५०० ते १५०० रुपयेपर्यंतही किंमत पडते. हलके खडे फिक्या रंगाचे, आंत रेषा असून पैलू पाडलेले अशा खड्यांस झिरम म्हणतात. त्याचा भाव दर रतीस २५ ते १५० रुपये पर्यंत असतो. खडा तेजाला मठ्ठ असल्यास किंमत पावपट येते.

(४) पाचेचे गुणदोष, कृत्रिम व शास्त्रीय पाच, तिची परीक्षा व प्रख्यात पन्ना—तुळतुळीत, तेजस्वी बालतृणाच्या वर्णाचे, पूर्ण निर्मल, वजनदार आणि कोमल असणें हे पाचेचे गुण आहेत. रुक्षता, विस्फोट म्हणजे अंतर्भागीं फोडासारखा ऐब असणें, छाटे, मळकटपणा, आंत रजःकण असणें, निस्तेजता आणि खडा रंगीबेरंगी असणें हे पाचेचे दोष आहेत.

अनेक द्रव्यांच्या मिश्रणानें पाचेकरितां रांध्याची कांच तयार करून तिचे तुकडे पाडितात. ते पाचेसारखे हिरवे चकचकीत होतात. त्यांस ब्रिलियनसुद्धां सर्व आकार देऊन पॉलिश करून कृत्रिम पाचेचीं रत्नें हुबेहुब तयार करितात. खोट्याला खऱ्याच्या तुकड्याची जोड देऊन दुबेळकीं, तिबेळकीं रत्नें तयार करितात. हीं मिश्र रत्नें गरम अगर थंड पाण्यांत अगर दारूंत अगर क्लोरोफॉर्ममध्यें बुडवून ठेविलीं तर त्यांचे सांधे निखळून तीं ओळखतात. पाचेचा खडा सूर्यतेजाकडे धरून त्याचें निरीक्षण करावें. आंत बुडबुडे दिसतील तर तो खोटा म्हणून समजावें. बंद करून बसविलेल्या खड्याखालीं रंग असतो म्हणून त्याचा तपास करावा. उष्णतेच्या साह्यानें अथवा धक्का देऊन स्फटिक मणि पिचवून त्याचे फटींतून अंतर्भागीं रंग शिरवून कृत्रिम पन्ने तयार करितात. त्याप्रमाणें केलें आहे कीं काय ह्याचें निरीक्षण करावें आणि पन्नयाचा सौदा करावा.

अमेरिकेंत हॅंपशायरमध्यें पाच रत्नाचा (बेरिलचा) २॥ टन वजनाचा एक स्फटिक सांपडला होता. डेव्हानशायरचें ड्यूकसाहेबांचे ताब्यांत पाचेचा एक मोठा स्फटिक आहे. त्याचें वजन १७४७ क्यारट आहे. विलायतेंतील पदार्थसंग्रहालयांत १५६½ क्यारट वजनाचा पाचेचा खडा आहे. श्रीमंत राजे भोसले, नागपूर यांच्या जामदारखान्यांत रामपंचायतनाच्या पांच मूर्ति

एकसंधी पाचूच्या आहेत. पैकीं रामाची मूर्ति ३३२ रति वजनाची आहे. तेथेंच ८८ वजनाचें पाचेचें शिवलिंग आहे.

सागरराग (Acquamarine) व मार्गानाइट हीं बेरिलचीं पोटरत्नें आहेत.

गोमेद–ह्या रत्नाचें इंग्रजी नांव हिसोनाईट अथवा सिन्यामन स्टोन (दालचिनीच्या रंगाचें रत्न) असें आहे. हें चुनडीच्या जातीचें रत्न असून सिकता, अल्यूमिना माती आणि चुना ह्यांचें बनलेलें आहे. सीलोनमध्यें, आल्प्स पर्वतांत, मेक्सिको देशांत, उरल पर्वतांत व अन्य कांहीं स्थळीं हें रत्न सांपडतें. ह्याचेही नाना प्रकारचे आकार असतात. त्यांत गोल आणि पानघाट उत्तम मानिले जातात. कृष्ण गोमेद, रक्त गोमेद, पीत गोमेद, असे याचे प्रकार आहेत. गोमूत्रसम म्हणजे पिवळट तांबूस रंगाचा गोमेद श्रेष्ठ होय. हाच राहूला प्रिय असतो. ह्याच रंगाला सुवर्णासारखा आरक्त रंग म्हणतां येईल. हाच ह्या रत्नाचा उत्तम रंग होय. मधाच्या थेंबाच्या रंगाप्रमाणें रंगही उत्तम मानला जातो. शिवाय याचे रंग पिवळा, काळा, रक्त, श्वेत, पीत असेही आहेत. संस्कृत व इंग्रजी ग्रंथांत याचा एक शुक्लवर्णी प्रकार वर्णिला आहे. पण ह्या वर्णाचा गोमेद अलीकडे तरी इकडे दिसत नाहीं. 'ग्रासूलर' म्हणून इंग्रजींत एक प्रकार आहे. तो इतर रंगांखेरीज पांढुरक्या रंगाचाही असतो. कांहीं गोमेद दुरून पाहिले तर जास्त लाल दिसतात. पण डोळ्यांजवळ धरिले तर जास्त पिंवळट दिसतात. गोमेदाचे मृदुपणा, तुळतुळीतपणा आणि जडपणा हे गुण समजतात; आणि हिऱ्याप्रमाणें खाडे वगैरे असणें हा दोष मानितात. याचें काठिण्य ७½ असून विशिष्टगुरुत्व ३·४४ ते ३·६२ असतें. याचा उपयोग आंगठ्या करण्याकडे विशेष होतो. ह्याचे मणिही करितात. मुंबईंत व जयपूर येथें गोमेदाचे पैलूदार खडे तयार करितात. हें हलक्या प्रतीचें रत्न आहे. ह्याची किंमत २५ ते ३० रु. तोळा किंवा ८४ आणे ते २ रुपये रतिप्रमाणें हलका भारी पाहून असतो. ह्याच्या खऱ्याखोटेपणाची परीक्षा मागील रत्नांप्रमाणेंच करावी.

पुष्पराग अथवा पुष्कराज–ह्या रत्नाचा मुख्य घटक अल्यूमिना असून त्यांत सिकताही बरीच असते. हें रत्न अरबस्तान, पेरू, बोहिमिया येथें व हिंदुस्थानांत सांपडतें. रशियांतही ह्याच्या खाणी पुष्कळ आहेत. ब्राझिल देशांत व सिलोनांतही पुष्कराज सांपडतात. हिंदुस्थानांत सांपडणारा पुष्पराग सर्वांत उत्तम असतो. हा फिक्का पिंवळा, सोनेरी, गहिरा पिंवळा, पांढरा, केशरी, लालसर, निळसर, हिरवट, गुलाबी, नारिंगी वगैरे अनेक रंगांचा असतो. पैकीं सैनल म्हणजे पिंवळी वजनदार जात आणि सफेता म्हणजे पांढरी जात ह्या दोन जास्त प्रसिद्ध आहेत. मुख्य रंग पांढरा असून आंत सोनेरी झांक असलेला पुष्पराग उत्तम मानितात. वजनदारपणा, स्निग्धता, मनोहरपणा, स्वच्छता इत्यादि याचे गुण असून छाटे, खाडे, कण, डाग वगैरे याचे दोष आहेत. याचें काठिण्य ८ आणि ९ यांचें दरम्यान असतें. याचें विशिष्टगुरुत्व ३·६ असतें. याचेही बिलियन, रोजकट वगैरे आकार असतात. ह्याच्या खरेखोटेपणाची परीक्षा मागील रत्नांप्रमाणेंच करावी. पुष्पराग दिसण्यांत मृदु दिसतो. हिरा कटीण दिसतो. पुष्परागांत हिऱ्याइतकी चमक नसते. ह्या दोन्ही प्रकारांवरून पांढरा पुष्पराग पांढऱ्या हिऱ्यापासून ओळखावा. पिंवळा कांचमणि व पिंवळा पुष्पराग हे मिथिलेटेड आयोडाइडमध्यें टाकिले तर पुष्पराग बुडतो व कांचमणि तरतो. तसाच तोरमलीचा खडाही तरतो. ह्यावरून त्यांस ओळखावें. पुष्परागाचा उपयोग दागिने करण्याकडे होतो. ह्याच्या शुभ्ररंगी खड्याच्या बिलियनकट आंगठ्या हिऱ्यासारख्या दिसतात. उत्तम पुष्पराग पिंवळा अगर सफेता असल्यास किंमत १०० ते २०० रुपये रतीपर्यंतही पडते. मध्यम रत्नास ५० रुपये रतिपर्यंत आणि कनिष्ठ खड्यास ४ ते ५ रु. रतीपर्यंत किंमत पडते. औरंगजेब बादशहापाशीं ३१४ रतींचा एक पुष्पराग होता. त्यास त्यानें १८०,००० रुपये दिले होते.

कौरंटक, कापायक, सोमलक वगैरे ह्याचे पोटभेद आहेत.

लसणिया व मार्जारनेत्री–वैदूर्य म्हणजे इंग्रजी बेरिल याचें पाचरत्न होतें आणि त्याच्या स्वर्णवैदूर्य (Chryso beryl) ह्या जातीची लसण्या. (लशुन, लसणिया), मार्जारनेत्री (Cat's-eye) हीं रत्नें होतात. स्वर्णवैदूर्यांत अल्यूमिना ८०·२ भाग असून बेरिलियम १९·८ भाग असतो. बेरिलियम यासच ग्लुसिना असेंहि नांव आहे. यांचींच मुख्यत्वेंकरून हीं रत्नें बनलेलीं आहेत. स्वर्णवैदूर्याच्या साध्या खड्यास पैलू पाडून त्याचे बिलियन आणि दुसरे गोल, लांबट वगैरे

आकाराचेहि लसणें तयार करितात बिनपैलूचेहि खडे असतात. स्वर्णवैदूर्यांच्या दोरेदार खड्यास बहिर्वक्र मदारघाटी (Cabochen) ह्या विशिष्ट आकाराचा कापून मार्जारनेत्री बनवितात. ह्यांत मार्जाराच्या नेत्रांतील बुबुळांतल्याप्रमाणें अनेक रंग चमकतात. लंकेंत नदीच्या वाळवेंत नीळ व तोरमलीबरोबर लसण्येही सांपडतात. पेगू, बोर्निओ, उत्तर अमेरिका, ब्राझिल, उरल पर्वत यांतही लसण्ये सांपडतात. खंबायतेजवळील रत्नपूर गांवींही लसण्यें सांपडतात. लसण्याचे रंग हिरवा, हिरवट पांढरा, पिंवळट हिरवा, पिंवळा, सोनेरी, सफेत, करडा, उदी, धूम्र, काळसर, निळसर असे असतात. त्यांत सोनेरी पिंवळ्यापासून उदी हिरव्या व क्वचित् काळ्या रंगाच्या झांकी मारतात. सोनेरी म्हणजे कनकवर्णाचा मार्जारनेत्री आणि लसणिया उत्तम मानितात. स्वर्णवैदूर्याच्या मार्जारनेत्रींत सफेत रंगाचा किंवा क्वचित् सोनेरी रंगाचा दोरा अथवा दोरे खेळत असतात, त्यांस सूत असें म्हणतात. अडीचसुती मार्जारनेत्री उत्तम मानितात. लसण्या स्वच्छ, काळसर पांढरा व वजनदार असणें हे त्याचे गुण आहेत. तेजोहीनत्व, जाळें वगैरे त्याचे ऐब आहेत. लसण्याचें काठिण्य ८·५ असून विशिष्टगुरुत्व ३·५ ते ३·८ आहे. त्याच्या खऱ्या खोट्याची परीक्षा मागील रत्नाप्रमाणें करावी. लसण्ये व मार्जरनेत्री यांची किंमत वजनदारपणा व दोरा यांवर अवलंबून १० रुपये रतीपासून १०० रुपये रतीपर्यंत असते. मार्जारनेत्री हें केतूचें प्रिय रत्न आहे. सीलोनांत सांपडलेला पूर्ण निर्दोष असा ४३¾ क्यारट वजनाचा लसण्या हल्लीं विलायतेंतील पदार्थसंग्रहालयांत आहे. अलेक्झांड्राईट आणि कर्कोद हीं याची पोट रत्नें आहेत.

प्रवाळ अथवा पोंवळें–हें रत्न बहुतेक सर्वांच्या माहितीचें आहे. त्याची उत्पत्ति प्रवाळकीटक ह्या प्राण्यापासून समुद्रांत होतें. हें रत्न चुन्याचें बनलेलें आहे. प्रवाळकीटक एकास एक संलग्न असे वेलीप्रमाणें वाढतात, व ते मयत झाले म्हणजे त्यावरच दुसरे प्रवाळकीटक वाढतात व मरतात. असें वर्षानुवर्ष चालून ह्याचे खडक बनतात. त्यांच्या तुकड्यापासून वाटोळे, लांबोडे अशा आकाराचे मणि तयार करितात. हेंच प्रवाळरत्न होय. इटाली व ग्रीसकडे याची उत्पत्ति व घडण होते. पांढरीं, पिंवळीं, लाल ह्या रंगांचीं पोंवळीं असतात. पिंवळ्या रंगांत लाल झांक असलेलें तकतकीत व वजनदार पोंवळें उत्तम मानतात. ह्याच्या माळा करून गळ्यांत घालतात व भस्म करून औषधांत वापरतात. ह्याची किंमत ४ आणे तोळ्यापासून १ रुपया तोळ्यापर्यंत असते. मोठ्या पोंवळ्याचा दर ह्याहूनही जास्त असतो. आलकंदक व वैवर्णिक हे ह्याचे पोटभेद आहेत.

मोतीं, शिंपले व शंख.

(१) मोत्याची घटना, उत्पत्तिस्थान व व्याप्ति–मोतीं हें प्राणिज रत्न आहे. ह्याची उत्पत्ति कालवांपासून होते. ती जलाशयांत–मुख्यतः समुद्रांत–आणि क्वचित् नद्यांतून होते. विरलेला चुना पाण्यांत पुष्कळ असतो. त्या चुन्याशीं ह्या कालवांचा पुष्कळ तऱ्हेचा व्यवसाय असतो. हा प्राणी ह्या चुन्यानें आपल्या शरीराचें रक्षण करणारे शिंपले तयार करतो. ह्या प्राण्याच्या बहिर्भागास एक मांसाची दुलई असते. हिच्या कडांच्या सूक्ष्म पेशी शिंपल्याच्या वरचा शिंगासारखा थर व मधला समपार्श्व थर बनवितात व कडांपासून अन्तर्भागांत असलेल्या दुलईच्या पृष्ठभागावरील सूक्ष्म पेशी मौक्तिक रस तयार करितात व तो शिंपल्याच्या आंतला चकचकीत भाग बनविण्याकडे लावतात.

शिंपला तयार करण्याकरितां घेतलेला एकादा कण त्याच्या दुलईच्या घडींत घट्ट झाला व खुपूं लागला अगर त्याच्या दुलईत अथवा शरीरांत एकादा सूक्ष्म जीवजंतु अथवा पदार्थ घुसला तर हा प्राणी स्वसंरक्षणार्थ आणि तो पदार्थ अथवा कण न खुपेल असा गुळगुळीत करण्याकरितां त्यावर मौक्तिक रसाचे फेरे फिरवूं लागतो व ह्याप्रमाणें सतत करीत राहून आपणांस आनंद देणारें असें मौक्तिक रत्न तयार करितो. ह्या फेऱ्यांनीं बसणारे मौक्तिकरसाचे थर फार पातळ असतात; तथापि ते सोडविले असतां सुटे होतात. कारण एक थर फिरवून झाल्यावर व तो सुकल्यावर त्यावर दुसरा थर असे हे थर वाढत गेलेले असतात; व ते नेहमीं सुरू राहात असल्यानें मोत्याची वाढ सतत होत राहते. म्हणून ह्या कालाच्या मानानें मोती मोठें होतें. ह्यावरून समजून येईल कीं, मोत्यांची वाढ मौक्तिकरसाच्या पातळ पत्र्यांनीं झालेली आहे. एक थर फिरवून झालेल्या भागावर जिल्हई चढलेली असते. म्हणून मोत्याचें वरचें कवच सुटलें तरी आंत मोत्यासारखाच रंग व चकाकी असते. मात्र शिंपल्याच्या बाहेरच्या शिंगासारख्या भागाचा अगर मधल्या

भागाचा घटक पदार्थ क्वचित् चुकून इकडे लागला असला तर मात्र त्या भागाचा रंग बिघडतो. पण असें क्वचितच घडतें.

सागरांत काय किंवा नद्यांत काय मोतीं कालवेंच तयार करितात; पण त्यांच्या शिंपल्यांत फरक असतो. खाऱ्या पाण्यांतील मोतीं तयार करणारे प्राण्यांचा शिंपला दुहेरी म्हणजे उघडझांप करणारा व वाटोळा असतो. पण गोड्या पाण्यांतील मोतीं तयार करणाऱ्या कालवांचा शिंपला अखंड व लांबोडा असतो. निरनिराळ्या जातींच्या ह्या दोन कालवांनीं तयार केलेल्या मोत्यांत फरक असा असतो कीं, खाऱ्या पाण्यांतील मोतीं गोड्या पाण्यांतील मोत्यांपेक्षां सरस असतात.

गोड्या पाण्यांतील मोतीं समशीतोष्ण कटिबंधांतल्या नद्यांत तयार होतात. खाऱ्या पाण्यांतील मोतीं उष्ण कटिबंधांतील देशांत अथवा उष्ण पाण्याचे प्रवाह असणाऱ्या समुद्राचे भागांत होतात. ग्रेट ब्रिटन, फिन्लंड, युनायटेड स्टेट्स वगैरे देशांतील व चीन, जपान या देशांतील नद्यांत गोड्या पाण्याच्या मोत्यांची बरीच निपज होते.

प्राचीन काळीं सीलोन आणि इराणचें आखात येथूनच मुख्यतः सर्व जगास मोत्यांचा पुरवठा होत असे. सांप्रत हिंदी महासागरांत, इराणच्या आखातांत, तांबड्या समुद्रांत, मध्य अमेरिकेच्या किनाऱ्याजवळील समुद्रांत, ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्याजवळील पासिफिक महासागरांत व पासिफिक महासागराचे इतरही कांहीं भागांत खारे पाण्यांतील मोत्यांची निपज मुख्यतः होते. वेस्ट इंडीजजवळील कांहीं भागांतील शंखांत गुलाबी रंगाचीं मोतीं सांपडतात. सिलोनांतील मानारचे आखातांत, हिंदुस्थानांतील तुतिकोरिनजवळ, बेहेरिन बेटाजवळील लिंगा येथें, पश्चिम ऑस्ट्रेलिया व व्हेनेझुएला येथें असलेले नैसर्गिक मोतीं काढण्याचे कारखाने महत्त्वाचे असून हल्लीं प्रसिद्धीस आलेल्या समुद्रांतील कल्चर मोत्यांचे कारखाने फक्त जपानचे समुद्रांत आहेत.

(२) मोत्यांचे आकार, काठिण्य व विशिष्ट-गुरुत्व—नैसर्गिक मोत्यांचे आकार वाटोळा, लांबट, चपटा, वांकडातिकडा, डमरूवजा, बसका, अर्धवर्तुळ वगैरे अनेक असतात. गोल, गरगरीत, वाटोळा आकार उत्तम. आधुनिक कल्चर म्हणजे लावणीचीं मोतीं व्यापारांत जीं आढळतात त्याची निपज सर्व प्रकारच्या आकारांची होत असली तरी विक्रीला ठेविलेलीं मुख्य मोतीं बहुतेक सुंदर, वाटोळीं, लांबट, बसकीं आणि अर्धवर्तुळ अशींच आढळतात. मोत्यांचे साधारण-मानाचें काठिण्य ३·५ ते ४ पर्यंत असून विशिष्ट गुरुत्व सुमारें २·७ असतें. कोरीं मोतीं जुन्या मोत्यां-पेक्षां वजनानें जास्त भरत असून रंगालाही सरस असतात वजनानें जड असेल तें मोतीं चांगलें. कल्-चर मोत्यांची घडावण सर्वत्र थरांवरथर अशी नसते. ह्यामुळें त्यांस नैसर्गिकाइतका कठीणपणा नसतो. म्हणून तीं टिकाऊपणांत कमी असतात.

(३) मोत्याच्या जाती, रंग, तेज, उपयोग, किंमतः नैसर्गिक मोत्यांत बसराई अथवा चोखा, बदला अथवा ढबदार अशा दोन जाती मानतात. सुकु-मार पोताच्या, तेजस्वी, निर्दोष आणि गोल अशा मोत्यांस बसराई म्हणतात. हलक्या जातीच्या, खडबडीत, कमी खोलगट, चपट्या, जरा लांबट अगर रुंदट अशा मोत्यांस बदला मोतीं म्हणतात. चोख्या मोत्यांत आणखी जीवन व पातळ जीवन असे पोटभेद आहेत.

जुन्या मोत्यांस मजीट म्हणतात. एका जातीच्या लांबट मोत्यांस नूर म्हणतात. काळ्या मोत्यांस काग-वाशी म्हणतात. खडबडीत चपटे मोत्यांस गांवशाही म्हणतात. जुन्या मोत्यांचीं भोकें भोंगळ झालेलीं असतात.

मोती उत्तम सफेत, शुक्री, मीठा, लाल, कळी, श्याम, सोनेरी, हुर्मूजी, गुलाबी, गुळधानी वगैरे अनेक रंगाचीं असतात. सफेत मोती युरोपियनांस आणि पिवळे मोती चिनी लोकांस आवडतें. तांबडें कानडी लोक पसंत करितात. आपले इकडे गुलाबी मोत्यांची जास्त आवड असते, फिकट पांढऱ्या रंगाचीं, कमी चकाकी असलेलीं पण काळीं नव्हत अशा मोत्यांस शुक्री रंगाचीं मोतीं म्हणतात. ह्यांची झांक गुलाबी रंगाकडे असूं शकेल. लालीशीं मिश्र असलेल्या सफेत रंगाच्या मोत्यांस हुर्मुजी म्हणतात. मीठ म्हणजे पिंवळट गुलाबी रंग. गुळधानी रंगाचीं म्हणजे बऱ्याच लालसर रंगावर असलेलीं, खुलता सफेत म्हणजे तांबूस रंगावर असलेला सफेत रंग, पूर्ण पांढरा नव्हे अगर पूर्ण लाल नव्हे अगर पूर्ण पिंवळा नव्हे अशा रंगामागें खुलता हा शब्द वापरण्याचा प्रघात आहे. मोत्यांचें तेज ताऱ्याच्या प्रकाशाप्रमाणें लुक-लुकणारें अथवा चंद्रबिंबासमान असावें हें उत्तम. मौक्तिक हें चंद्राचें प्रिय रत्न आहे.

मोत्यांचा उपयोग मुख्यतः दागिन्यांकडे होतो हें सुप्रसिद्ध आहे. मोत्यांचें भस्म अनेक विकारांवर उपयोगीं पडतें. नवग्रहांचे आंगठींत बटणाच्या आकाराचें मोतीं बसवितात. श्रीमंत चिनी लोक हातांतील पंख्यांना व छत्र्यांना मोतीं जडवितात. ते बैठकीच्या कापडाला व आंगवस्त्रालाहि मोतीं गुंतवितात.

हिंदुस्थानांत मोत्यांची किंमत चवावर असते. प्रथम वजनानें रति काढून हिशोबानें त्याचे चव करितात. तो हिशेब करण्याची रीत अशीः–रतीचा वर्ग करून त्यास ५५ नीं गुणून ९६ नीं भागावें. जो भागाकार येईल त्यास मोत्यांच्या संख्येनें भागावें. जो भागाकार येईल तो त्या मोत्यांचे चव समजावे. जसें:–जर ११ मोतीं २४ रति वजन असतील तर

$$\frac{२४ \times २४ \times ५५}{९६} = \frac{३१६८०}{९६} = \frac{३३०}{११} = ३०$$

चव झाले. जर दर चवास २० रुपये किंमत असली तर $३० \times २० = ६००$ रुपये किंमत ११ मोत्यांची झाली. पण जर एकच मोतीं २४ रति वजन असेल तर $\frac{३१६८०}{९६}$ यांस ११ नीं न भागतां मोत्यांची संख्या १ ही असल्यानें तिनें भागावयाचें म्हणजे ३३० हा भागाकार येतो. हे एका मोत्याचे चव झाले. जर दर चवास २० रुपये भाव असेल तर $३३० \times २० = ६६००$ रुपये किंमत एका मोत्याची झाली. ह्यावरून असें दिसून येईल कीं जेव्हां सर्व मिळून २४ रतिभार मोतीं लहान लहान अशीं ११ होतीं तेव्हां त्यांची सर्वांची मिळून किंमत ६०० रुपये झाली. परंतु जेव्हां एकच मोतीं २४ रतीभार वजनांत भरलें तेव्हां त्याची एकट्याची किंमत ६६०० रुपये झाली हें पाहून आश्चर्य वाटतें. पण आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. ही किंमत दुर्मिळतेबद्दल आहे. कारण एवढ्या भारी वजनाचें मोतीं क्वचितच मिळतें व मिळालें म्हणजे तें घेणें असल्यास अशीच किंमत द्यावी लागते.

मोत्यासंबंधाचीं व्यावहारिक कोष्टकें:—

१६ तंडुल = १ रति	६। बदाम = १ दोकडा
२४ रति = १ टांक	१०० दोकडे = १ चव

६२ रति म्हणजे एक कोरा रुपयाभार असें प्रमाण आहे. म्हणजे १ रती सुमारें दीड गुंज होते. मुंबईच्या वेस्ट एंड वॉच कंपनीनें ठरविल्याप्रमाणें १ ३/३२ रती म्हणजे एक क्यारट होतो. मुंबईच्या बाजारांत एका क्यारटची किंमत रतीपेक्षां एका रुपयास सव्वा आण्यानें जास्त धरितात. इंग्लिश लोक आणि नेपाळी लोक मोतीं रतीचवाचे हिशेबानें विकत घेत नाहींत. ते क्यारटवर किंवा टांकावर घेतात. बाकी सर्व हिंदुस्थानभर व अरबस्तानांतसुद्धां चवाच्या पद्धतीनेंच मोतीं विकतात.

मळलेलें मोतीं साफ करणें झाल्यास तांदुळाच्या, मिठाच्या, साखरेच्या किंवा रिठ्याच्या पाण्यांत भिजत घालून धुऊन साफ करावें. लिंबू वगैरे आंबट जिनसांत मोतीं भिजत ठेवूं नये; फार वेळ ठेवल्यास त्याचा चुना होतो. तसेंच सोड्याचे पाण्यानें व साबणानेंही मोतीं साफ करितात, परंतु एकादे जातीचें मोतीं काळें पडतें. मोतीं आंगावर घालून नेहमीं अग्नीसन्निध बसूं नये. खराब होतात. मोती आंगावर ठेवून निजूं नये. निजल्यास मोतीं झिजतात. मोत्याचे दागिने व हिरेमाणकाचे दागिने एकत्र ठेवूं नये. मोतीं जास्त मृदु असल्यानें त्यावर चरे पडण्याची भीति असते.

हल्लीं बसराई मोत्यांचा भाव उत्तमाचा दर चवास रुपये ४५ ते ५० पर्यंत आहे. मध्यमाचा रु. २५ ते ६० पर्यंत आहे. कनिष्ठाचा रुपये १२ ते १५ पर्यंत आहे. बदला अथवा ढबदार मोत्यांचा भाव उत्तमाचा रुपये १२ ते १५ पर्यंत, मध्यमाचा रुपये ८ ते १० पर्यंत, कनिष्ठाचा रुपये ३ ते ५ पर्यंत आहे. बसराई जीवन बारीक दर चवास ६० ते ६५, बसराई जीवन मोठी साईझ रुपये ७५ ते १०० आहे. लहान व्यापारी सारख्या आकाराचीं व रंगारूपाचीं उत्तम कल्चर मोतीं चवावर व बाकीचीं उत्तम व हलकीं यांची भेसळ असलेलीं तोळ्यावर विकतात. मोठे व्यापारी पौंडाच्या व तोळ्याच्या वजनानें कल्चर मोतीं विकतात. जपानी पाकीटांतील उत्तम कल्चर मोतीं १०० रुपये तोळा, मध्यम ६०, ४०, ३०, २०, १० रुपये तोळा व कनिष्ठाचा भाव १२ ते १० रुपये तोळ्यास असा आहे. चवाचे दर रंग, रूप पाहून १ रुपया ते ५ रुपये चव असा आहे.

(४) **मोत्यांतील गुणदोष**–कृत्रिम व कल्चर मोतीं, त्यांची परीक्षा, व प्रख्यात मोतीं:–मोतीं पूर्ण वर्तुळाकार, तेजस्वी, तुळतुळीत, वजनदार, कोमल व निर्मळ असावें हे मोत्याचे सहा गुण आहेत. निर्मळ मोतीं म्हणजे स्वच्छ व अगदीं निर्दोष तें निर्मळ मोतीं,

तुळतुळीत म्हणजे चंद्रबिंबासमान स्निग्ध. कोमल म्हणजे सुकुमार पोताचें. फाट, नर, पोटनर, करवा, छाटे, खळणे वगैरे मोत्यांचे बरेच दोष आहेत. मोत्यांच्या वरच्या बाजूला फुटका भाग किंवा भेग दिसते तिला फाट हें नांव आहे. मोत्यांत चिरल्यासारखी रेघ दिसते तिला नर म्हणतात. इंग्रजी आठाच्या आंकड्याचा म्हणजे 8 असा आकार अगर सभोंवार खोलगटपणा असलेल्या दोषास करवा म्हणतात. मोत्यावर जे ठिबके दिसतात त्यांस छाटे असें म्हणतात.

कृत्रिम मोतीं कांचेचीं आणि इतर पदार्थांचीं अशीं दोन प्रकारचीं आढळतात. एका प्रकारच्या माशाच्या खवल्यांचे मोत्यांच्या रंगाचें सत्व निघते तें कांचेच्या मोत्यांस बाहेरून अगर आंतून लावून उत्तम खोटीं मोतीं तयार करतां येतात. कल्चर मोती जपानांत तयार होतात. जपानी लोक प्रथम समुद्रांतून कालवाचे शिंपले बाहेर काढितात. मग कल्चर मोत्यांची क्रिया करणारे तज्ञ लोक शिंपल्याच्या अंतर्भागांतून कापून अगोदरच तयार करून ठेविलेल्या मौक्तिक रसाच्या गोल गोळ्या हत्यारांचे साधनानें शिंपल्यांतील कालवांच्या शरीरांत घुसवून ठेवितात. कालवास ह्या गोळ्या खुपूं लागतात, त्याच्या प्रतिकारार्थ म्हणून ते निरुपद्रवी कालव त्या गोळ्यांवर आपल्या शरीरांत तयार होणारा मौक्तिकरस थापटून व त्यावर रसाचे फेरे फिरून त्यांची इजा कमी करण्याचा प्रयत्न करितात व असें करून कल्चर मोठा बनवितात.

कल्चर मोती आणि नैसर्गिक मोती यांत एक मोठा फरक आढळतो तो असा कीं नैसर्गिक मोत्यांत मध्यवर्ती पदार्थावर मौक्तिकरसाचे फार पातळ असे कांद्याच्या पापुद्र्याप्रमाणें अनेक थरावर थर असतात. तसे कल्चर मोत्यांत नसतात. कल्चर मोत्यांतील मध्यवर्ती गोळीवर प्रथम मौक्तिकरसाचा एकच एक जाड थर असून त्यावर एक पातळ थर असलेला आढळतो. ह्याचें कारण असें दिसतें कीं स्वाभाविकपणें शरीरांत शिरलेला कण फारच बारीक असल्यामुळें त्या प्राण्याला त्याची इजा कमी असते. ह्यामुळें त्यावर हें कालव मौक्तिकरसाचे अनेक फेरे सावकाश फिरवीत राहतें व त्यामुळें त्याचे पापुद्र्यावर पापुद्रे असे अनेक तयार होत असतात. कल्चर मोतीं बनविण्याकरितां कालवाच्या शरीरांत घुसविलेली गोळी फार मोठी असते. तिची इजा ह्या प्राण्यास भयंकर होत असावी. म्हणून तो प्राणी ह्या गोळीच्या भोंवतीं थोडथोड्या मौक्तिक रसाचे फेरे फिरवीत न बसतां तीवर त्या रसाचा जाड लगदा एकदम बसवत असला पाहिजे; व असें करून आपली इजा शक्य तितकी लवकर शमवीत असला पाहिजे. एरवीं दोन्ही प्रकारच्या मोत्यांतील ह्या फरकाचें कारण देतां येत नाहीं. रचनेंतील ह्या फरकामुळें असें होईल कीं कल्चर मोत्यांचा वरचा थर झिजला म्हणजे आंतील गोळीवरच्या लगद्याला मोत्याच्या वरच्या थरासारखी जिल्हई नसल्यानें हीं मोतीं निस्तेज दिसतील. शिवाय आंतील गोळी जाड व त्यावरील थर घाईघाईनें दिलेला ह्यामुळें खरबरीत दिसतील. शिवाय त्यावर एकच पातळ थर असल्यामुळें मोत्यांची बांधणी घट्ट न झाल्यानें थर ढिला होतो आणि फुटतो असें आढळून येतें.

कल्चर मोत्यांचे धंद्यांत मुळांतच व्यापारी दृष्टि फार झाली आहे; ह्यामुळें मोतीं मोठें दिसावें म्हणून कालवाच्या आंगांत शिरकवावयाची गोळी दिवसेंदिवस मोठी मोठी होत चालली आहे. आणि ती कालवाच्या शरीरांत फार वर्षेंही राहूं न देतां कालव समुद्रांतून लवकर बाहेर काढण्यांत येऊं लागलें आहे. जर गोळी बसविल्यावर कालवाचा समुद्रांत राहण्याचा काळ वाढविला तर मोत्यांच्या वरचे थरही वाढण्याचा संभव आहे. पण लवकर लवकर पैसे मिळविण्याचे धोरणापुढें मोत्यांच्या सुधारणेचें धोरण बाळगलें जात नाहीं. ह्या कामीं जपानास कोणी प्रतिस्पर्धी अजून निघाला नाहीं. तो निघाल्यास कल्चर मोत्यांत सुधारणा खास होईल. जपानी समुद्रांतील मोतीं करणाऱ्या कालवांची जात सीलोन, इराण, अरबस्तान इकडील मोत्यांच्या कालवाच्या जातीपेक्षां निराळी आहे. शिवाय जपानची हवा थंड व इकडील हवा उष्ण ह्यामुळेंही मोत्यांच्या तेजांत फरक राहतो. इकडील म्हणजे सीलोन, इराण, अरबस्तान येथील मोत्यांत ओरिएंट असें नांव ठेविलेलें जें सौंदर्य असतें तें जपानच्या मोत्यांत नसतें. म्हणून इकडच्या समुद्रांत हा कल्चर मोत्यांचा धंदा कोणी सुरू केल्यास तो जपानच्या कल्चर मोत्यांस मागें टाकील यांत शंका नाहीं.

वरील प्रकारच्या फरकाच्या गोष्टी असल्या तरी हल्लींच्या हलाखीच्या काळांत खर्चाच्या दृष्टीनें कल्चर मोती वापरणें फायदेशीर दिसतें. तें लवकर विटेल, फुटेल वगैरेमुळें लवकर फुकट जाईल असें कांहीं असलें तरी कल्चर मोतीं इतकीं स्वस्त मिळतात कीं तीं लवकर लवकर बिघडलीं तरीही प्रत्येक वेळीं नवीं तर

मिळतीलच पण अशीं तीन चार वेळां पुनः पुनः तीं मोतीं घ्यावीं लागलीं तरीही तीं स्वस्तच पडतील. शिवाय कल्चरच्या मोत्यांच्या धंद्यांत व्यापारी दृष्टीनें एक चांगली गोष्ट आहे तीं अशी कीं माल गरगरीत वाटोळा व चांगला तजेलदार व आवडत्या रंगाचा असाच माल बाजारांत जाऊं दिला जातो. वाईट माल निघेल त्याचा बहुतेक जपानांतच नाश केला जातो. म्हणून नैसर्गिक मोत्यापेक्षां कल्चर मोत्यांचा माल नेहमींच मनोहर व दृष्टीला भुलवणारा असतो. ज्यांना महाग अशीं मनपसंत नैसर्गिक मोतीं घेण्याची ऐपत असेल त्यानीं तीं घ्यावीं. पण बाकी सामान्य जनतेनें आपली गरज कल्चर मोतीं घेऊन भागविणें सोईचें, व शहाणपणाचेंहि दिसतें.

कृत्रिम मोतीं, कल्चर मोतीं आणि नैसर्गिक मोतीं ओळखण्याचे अनेक प्रकार आहेत. नुसत्या डोळयांच्या साधनांनीं त्यांची परीक्षा अगदीं बिनचुक होणें कठीण आहे. ही ओळखण्याची एक शास्त्रीय पद्धति आहे ती अशीः—तपासावयाचें मोतीं सीडारचे तेलांत बुडवून काढून तें मोठ्या शक्तीच्या सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं ठेवावें. नंतर त्यावर मोठ्या जोराचा विजेचा प्रकाश पाडून तो स्थिर करावा. असें केलें म्हणजे मोत्यांतून प्रकाशाचें परावर्तन न होतां तें बरेंच पारदर्शक होतें. मग त्याच्या अंतर्भागाचें निरीक्षण करावें. मोतीं नैसर्गिक असेल तर अंतर्भागांत पापुद्र्यावर पापुद्रा असून ते एकमेकांस समांतर आहेत अशी रचना दिसेल. कल्चर मोत्यांत बाहेरचा थर मात्र पापुद्र्यासारखा दिसून त्याच्या आंत तें मोतीं ज्या द्रव्यानें आंतून भरलें असेल त्याची एक गोळीच दिसेल. थर दिसणार नाहीं. कृत्रिम मोती पोकळ दिसेल. अगर इतर रीतीनें ओळखेल.

जगांतील सर्वांत मोठें मोतीं बेरेस्फर्ड हें आहे. हें लंडन येथें दक्षिण केन्सिंगटनचे पदार्थसंग्रहालयांत दाखविण्यांत आलें होतें. हल्लीं हें आल्बर्ट म्युझिअममध्यें आहे. ह्याची लांबी २ इंच असून परीघ ४½ इंच आहे. ह्याचें वजन ३ औंस आहे. पूर्ण निर्दोष असें मोती इराणचे शहाजवळ होतें तें इ. स. १६६३ सालीं फ्रेंच जव्हेरी ट्याव्हर्निअर ह्यानें पाहिलें होतें. ह्याची किंमत ३२०००० डॉलर होती. ह्याची लांबी सुमारें तीन इंच होती. एक हिंदी मोती निद्रितसिंह ह्या नांवाचें होतें. त्याची किंमत २२५०० डॉलर आली होती. अशीं बरींच मोठीं मोतीं प्रसिद्ध आहेत. गाइकवाड सरकारचे जामदारखान्यांत बरींच साधारण मोठीं मोतीं असून तेथें एक मोत्यांची शाल आहे. तिची किंमत १००००० पौंड आहे म्हणतात.

मोत्यांचे शिंपले—भावप्रकाशांत "मुक्ताशुक्ति" ह्या नांवानें आणि अर्कप्रकाशांत "मौक्तिकी शुक्ति" ह्या नांवानें मोत्यांच्या शिंपल्याची म्हणजे त्याच्या अंतर्भागांतील मौक्तिकरसाच्या थराची गणना उपरत्नांत केली आहे. ह्याचें रंगरूप सर्व मोत्याचेंच असल्यानें ह्याची गोळी तयार करून ती जपानी कल्चर मोत्यांचा मध्यवर्ती पदार्थ म्हणून त्याच्या शरीरांत घुसवीत असतात. हा त्याचा अलीकडचा मोठा उपयोग आहे. मोतीं काढण्याच्या कांहीं ठिकाणीं मोत्यांपेक्षां हे शिंपलेच जास्त मौल्यवान असतात. कारण तेथील शिंपल्याच्या अंतर्भागावरील मौक्तिक रसाचा थर फार जाड, शुभ्र व तेजस्वी असतो. असे शिंपले ऑस्ट्रेलियांत फार सांपडतात. अमेरिकेंतील मिसिसिपी नदीमधील कालवाचे शिंपलेही असेच मौल्यवान असतात. शिंपल्याच्या मौक्तिकरसाचीं सुंदर बटणें करितात. खोदीव कामास लावण्याकडे व नकशीकामास लावण्याकडे ह्याचा फार उपयोग होतो. डाका येथें सांप्रत याचीं कांकणें व बांगड्याही करितात.

शंख—ह्यांचाही उपरत्नांत समावेश होतो. सीलोनच्या व हिंदुस्थानाजवळच्या हिंदी महासागरांत शंख सांपडतात. कित्येक शंखांत मोतींही सांपडतात. ह्या शंखापैकीं कांहीं शंख दक्षिणावर्ती म्हणजे ज्याची सर्पिल रचना उजव्या बाजूस आहे असे असतात. अशा शंखांस बौद्धधर्मी, सिंहली, चिनई व हिंदु लोक फार पूज्य मानतात. जुन्या काळीं हे लोक अशा उजव्या शंखाची किंमत सोन्याच्या भारंभार देत असत.

प्राचीन काळीं शंखांचीं कांकणें करीत असत. हल्लीं डाका येथें शंखाचे दागिने करितात. सुरती शंख फार मोठे असल्यामुळें त्यांचा कांकणें व बांगड्या करण्याकडे जास्त उपयोग होतो. तिटकुरी व पाती ह्या जातीचे शंखास लकाकी जास्त असल्यामुळें त्यांचा उपयोग कोंदणाचे कामीं जास्त होतो. राणीशंखाचा उपयोग करून केलेलें सुंदर गुलाबी केमिओ नांवाचें खोदीवकाम फारच शोभिवंत दिसतें.

उपरत्नें—१ चुनडी (संस्कृत पुलकमणि) लोलक, लालडी—चुनडीला इंग्रजींत गार्नेट (Garnet) म्हणतात. चुनडीचे मुख्य घटक अल्यूमिना, लोह,

चुना, मॅग्नेशिया, मँगानीज, क्रोमियम, आणि सिलिका हे आहेत. ह्यांमुळें ह्याच्या सहा जाती झाल्या आहेत. त्यांपैकीं गोमेद हिचा अंतर्भाव नवमहारत्नांत केला गेल्यानें तिचें वर्णन पूर्वींच होऊन गेलें आहे. बाकीच्या पांच जातींपैकीं केपमाणिक ह्या जातीचा रंग अनेकदां माणकासारखा लाल असतो. तिसऱ्या जातीस चुनडींतील लाल असें म्हणतात. चवथी जात पाचेसारखी हिरवी असते. हिला उरेलियन पाच म्हणतात. शिवाय आणखी दोन सामान्य जाती आहेत. चुनडी हें रत्न निरनिराळ्या मनोहर रंगाचें असतें. पण हें विपुल सांपडत असल्यामुळें किंमत फार पडत नाहीं. ह्यामुळें गरीबासही हें वापरून रत्नाची हौस भागवितां येते. ह्यांपैकीं केप माणिक ही जात सर्व जातींत कठीण असते. तसेंच हिचा रंग माणकासारखा सुंदर असल्यानें किंमतही जास्त पडते. चुनडींतील लाल यास बहिर्वक्र आकार दिला तर त्याचा रंग जास्त खुलून दिसतो. उरेलियन पाच ह्या जातीचा हिरवा रंग इतका अप्रतिम असतो कीं, त्यामुळें त्याची योग्यता रंगीत रत्नांत पुष्कळ वरच्या प्रतीची ठरते. हिचा उपयोग हारासारख्या दागिन्यांत लोलका-प्रमाणें करितात. चुनड्या पृथ्वीच्या पाठीवर अनेक ठिकाणीं सांपडतात. त्यांतील सीलोन, हिंदुस्थान व ग्रीनलंड येथील उत्तम असतात. ह्यांचे स्फटिक द्वादश फलकी असतात. चुनडीचें काठिण्य ६½ ते ७½ असतें व विशिष्टगुरुत्व ३·१५ ते ४·३ इतकें असतें. चुनडीचा दागिन्यांत उपयोग करितात. जयपुरांत चुनडीचे लोलक व गोखरूदार मणि तयार करून त्याच्या माळा करितात. लालडी ही दिसण्यांत, घटनेंत व रचनेंत चुनडीसारखीच असते. पण तिचें विशिष्टगुरुत्व चुनडीहून कमी असतें, व ह्या रत्नांत सिलिकेचा अंश जास्त असतो.

२ तोरमली—ह्या रत्नाचें नांव तुरमली आहे. इंग्रजींत त्याचाच अपभ्रंश झालेला शब्द तूर्मलीन् हा वापरतात. या रत्नाचें संस्कृतांतील नांव गंधर्व असें असल्याचें एका ग्रंथांत लिहिलें आहे. हें रत्न मुख्यतः अल्यूमिना, सिलिका आणि टंक (Boron) या घटकांचें बनलेलें असतें. यांत दुसरींही बरींच द्रव्यें सूक्ष्म प्रमाणांत मिसळलीं असल्यामुळें हीं रत्नें अनेकविध रंगांचीं झालीं आहेत. पांढऱ्या रंगामुळें व चकचकीत तेजामुळें ह्याच्या पांढऱ्या जातीस आपणाकडे हिऱ्याचें उपरत्न मानतात, तर हेंच रत्न मूलमेन शहरीं सिलोनी हिरे म्हणून विकलें जातें. हिऱ्यासारखें शुभ्र, माणकासारखें लाल, निळासारखें अस्मानी आणि पाचेसारखें हिरवें या रंगाचीं हीं रत्नें विशेष शोभिवंत दिसतात. रंगावरून ह्या रत्नाच्या दहा जाती झाल्या आहेत. ह्या रत्नाचा रंग सर्वांगभर सारखा नसतो. हिरवी तोरमली तापविली असतां पांढरी होते. तोरमलाचें काठिण्य ७ ते ७½ असून विशिष्टगुरुत्व २·९४ ते ३·१५ इतकें असतें. हिचें तेज कांचसदृश असतें. हिला कपड्यानें घासलें असतां विद्युत् जागृत होते.

तोरमली चित्रित वज्रतुंडाच्या भगदाडींत, दलपाषाणांत व चुन्याच्या पैलूदार दगडांत सांपडते. ही सीलोन, ब्राझिल, सैबेरिया, उत्तर अमेरिका, मादागास्कर येथें व ब्रह्मदेशांत सांपडते. हिंदुस्थानांत बंगाल, म्हैसूर, काश्मीर येथें सांपडते. सुरत व मद्रास येथें हिची बरीच मोठी विक्री होते. तेथें ही चार आणे ते तीन रुपये रतीपर्यंत अगर कोडीच्या भावावरही विकली जाते. शुभ्र रंगाची तोरमली चिंचपेट्यांत व आंगठ्यांत वापरतात. ह्या व इतर रंगाच्या तोरमल्या अनेक दागिन्यांत वापरतात.

उत्तम तोरमलींत हिऱ्यासारखी चमक मारते; पण ती मंद असते, व आंतील बाजूस मारते. हिऱ्या कडा नेहमीं सुरवट व निस्तेज असतात. मिथिलेटेड आयोडाईडच्या साधनानें हें अनेक समरंगी रत्नांपासून ओळखतां येतें.

आर्यवैद्यकांतील रसायनप्रकरणांत वैक्रांत या नांवाच्या रत्नाचें भस्म सांगितलें आहे. कोणी वैद्य वैक्रांत म्हणजे तोरमली असें म्हणतात, तर कोणी वैक्रांत म्हणजे त्रिलोर अथवा स्फटिक होय असें प्रतिपादितात. डॉक्टर देसाई आणि बनारसच्या आयुर्वेदिक कॉलेजांतील प्रो. कुलकर्णी हे वैक्रांत म्हणजे फ्लूअर स्पार (चित्रखनिज) होय असें म्हणतात. वैक्रांत रत्नाबद्दल हा असा तीव्र मतभेद आहे.

३ कांचमणि म्हणजे **स्फटिक रत्न**—कांचमणि हें एक महत्त्वाचें उपरत्न आहे. सिकतेचें पैलूदार झालेलें हें रत्न आहे. ह्यास इंग्रजींत रॉक क्रिस्टल (Rock Crystal) म्हणतात. मौलिक द्रव्य सिलिकॉन ह्याचें आक्सिजनाशीं एकास दोन ह्या प्रमाणांत मिश्रण होऊन पांढरी वाळू तयार होते. ही पृथ्वीच्या पोटांत भयंकर वजनाखालीं तीव्रतम उष्णतेमुळें वितळून जाऊन मग हळुहळू निवाली असतां तिचे निर्जल असे तेजस्वी व पारदर्शक पैलूदार कांचमणि तयार

होतात. हिंदुस्थानांत हिमालय पर्वतांत, विंध्याद्रींत, तापी नदीच्या किनाऱ्यावर, काठेवाडांत, छिंदवाड्यांत, वरंगळ येथें व कावेरी नदींत कांचमणि रत्न सांपडतें. याशिवाय सिलोनांत, मादागास्कर बेटांत, आल्प्स पर्वतांत, काकेशस पर्वतांत, व सैबेरिया, ब्रेझिल, जपान ह्या देशांतही कांचमणि रत्न सांपडतें. कांचमण्याचें काठिण्य ८ असून विशिष्टगुरुत्व २·६५ पासून २·८ पर्यंत असतें. हें रत्न षट्कोण पद्धतीपैकीं आहे.

जो स्फटिक अत्यंत निर्मळ व तुळतुळीत असतो तो उत्तम समजावा. शुभ्र वर्णाच्या कांचमण्यापासून भीष्ममणि हें रत्न तयार होतें. भीष्ममणि या नांवाचें रत्न हल्लीं बाजारांत मिळत नाहीं. त्या रत्नाचा अथवा त्याच्या नांवाचा लोप झालेला दिसतो. कांचमण्याच्या अगदीं रंगरहित खड्याचे तंजावरकडे वल्लभ नांवाचे व पंजाबांत मरी नांवाचे कृत्रिम हिरे तयार करितात. शिवाय खंबायत, जयपूर, काश्मीर येथें कांचमण्याचे अनेक आकाराचे खडे तयार करण्याचे कारखाने आहेत.

कांचमण्याचे फार दिवसांपासून पेबलचे चष्मे तयार करीत आले आहेत. शिवाय याच्या मूर्ति, पेले, तरवारीच्या मुठी व अंतर्गोल व बहिर्गोल भिंगें तयार करितात. प्रयोगशाळेंतील जास्त उष्णतेचे प्रयोगांत साध्या कांचेचा टिकाव लागत नाहीं. ह्याकरितां प्रयोगाचे कामासाठीं कांचमण्याचीं प्रयोगसाधनें तयार करितात.

ह्या रत्नाच्या रंगयुक्त खड्यांचीं अनेक रत्नें तयार होतात. उत्तम जांभळ्या रंगाच्या कांचमण्याचें आमाथिस्ट म्हणजे याकूत हें मनोहर व लोकप्रिय रत्न तयार होतें. पिंवळ्या रंगाच्या कांचमण्याचा कृत्रिम पुष्पराग होतो. वैडूर्याचें जसें मार्जारनेत्री हें रत्न होतें तसें याचेंही होतें. शिवाय व्याघ्रनेत्री व श्येननेत्री ह्या नांवाचीं रत्नेंही होतात. मादागास्कर येथें जे कांचमण्याचे खडे सांपडतात त्यांच्या एका चौरस इंचांत हजारों खळगे असून त्यांत द्रव किंवा वायु असतात. ह्यामुळें हे खडे उजेडांत धरून फिरविले म्हणजे त्यांच्या अन्तर्भागीं फार मजेदार अशा रंगाच्या लकेरी दिसतात व ह्यांस घासलें तर फार सुवासिक असा वास येतो. कांचमण्याला तापवून उष्ण पाण्यांत बुडवून सच्छिद्र करून आंत रंग भरून अनेक कृत्रिम रत्नें तयार करितात. कांचमण्याचीं सर्व रत्नें स्वस्त मिळतात.

कांचमण्याचे फार मोठे स्फटिकाकार प्रस्तर सांपडतात. मादागास्कर बेटांत ह्याचा एक स्फटिक २० फूट परिघाचा सांपडला होता.

सूर्यकांत, चंद्रकांत, जलकांत, हेमगर्भ, वायव्य, देवेज्य, मुक्ताज्योतीरस, राजवर्त, राजमय, ब्रह्ममय वगैरे नांवांचीं ह्याचीं पोट रत्नें आहेत.

४ **अकीक** ही सिकतेची अव्यक्त पैलूदार जात आहे. हींत मिश्र झालेल्या द्रव्यामुळें अकीकाचे अनेक रंग झाले असून हीं रत्नें तयार होण्याच्या स्थानांवरून व प्रकारावरून ह्याचे अनेक आकार झाले आहेत; व अशा भेदांवरून ह्याच्या रत्नांस निरनिराळीं नांवें ठेवण्यांत आलीं आहेत. ह्या रत्नांपैकीं कांहींची रचना पस्त्यापस्त्यांची असते. त्यांस इंग्रजींत ॲगेट ही संज्ञा आहे.

इंग्रजींतील क्याल्सेडोनी, ॲगेट आणि ओपल ह्या तिन्ही जाती अकीकाचेच पोटभेद आहेत. त्यांपैकीं क्याल्सेडोनी व ॲगेट ह्या जाती निर्जल असून ओपल ही जात सजल आहे. ओपलचें वर्णन निराळें केलें आहे.

अकीक थराथरांनीं बनलेला असतो. त्याचें काठिण्य सुमारें ७ असून विशिष्टगुरुत्व २·६२ ते २·६४ असतें. ह्याचे खडे ज्वालामुखी पर्वताचे आसपास बिळांतून किंवा शिरांतून सांपडतात. नद्यांत ज्या चकमकी सांपडतात त्या प्रवाहाबरोबर वाहत आलेले अकीकच होत.

ज्या अकीकाची रचना गोठलेल्या कणांची असून रंग सारखे असतात त्या जातीस क्याल्सेडोनी हें नांव आहे. हा अकीक अथवा क्याल्सेडोनी तयार होतांना त्यांत लोहप्राणिलाचें सूक्ष्म मिश्रण झालें असलें तर त्याला मांसासारखी किंवा रक्तासारखी तकाकी व लाल रंग येतो. अशा जातीस कार्नेलियन म्हणजे रुधिराक्ष किंवा रुधिराख्य म्हणतात. क्यालेडोनाइट हा पदार्थ जर अकीकाशीं संमिश्र झाला असला तर गहिरी हिरवी प्रेज ही जात तयार होते. दुसरी याची क्रिसोप्रेज नांवाची जात आहे. ही पूर्वी हिंदुस्थानांत स्वर्णांगी ह्या नांवानें प्रसिद्ध होती. स्वर्णांगी हें रत्न निळें, हिरव्या रंगासारख्या वर्णाचें, शुद्ध सोन्याचे रजःकणयुक्त, शोभाढ्य आणि मनोहारी असतें. आणखी एक ब्लडस्टोन नांवाची अकीकाची जात आहे. तिला संस्कृत नांव ज्योतीरस असें आहे. ह्याचा रंग हिरवा काळा असून त्यावर नर्मद्या गणपतीच्या रंगाचे लहान ठिबके असतात. हेच ठिबके

मोठे असले तर त्या जातीस हेलिओटॉप हें नांव देतात. नर्मदे गणपती, बाण हे क्याल्सेडोनीच्या ज्यास्पर म्हणजे संगयशब ह्या प्रकारांत येतात.

अकीकाच्या ॲगेट ह्या जातीस सुलेमानी पत्थर अथवा शिलेमणि म्हणतात. ह्याच्या अनेक पोटजाती आहेत. त्यांपैकीं ओनिक्स म्हणजे पालंक ही जात महत्त्वाची आहे. हें रत्न बहुधा काळसर अथवा तपकिरी रंगाचें असून त्याला फार उत्तम तजेला असतो. त्यावर बहुधा पांढरे पट्टे असतात आणि कधीं कधीं त्यांत हिरवट थर असतो. ह्याच्या सिलाच्या आंगठ्या करितात. गळ्यांत घालण्याकरितां किंवा जपाकरितां मणीही करितात. हल्लीं कृत्रिम ओनिक्स जर्मनींत पुष्कळ तयार होऊं लागला आहे. ॲगेटच्या आणखी प्रकारांपैकीं सब्जी म्हणजे शेवाळीसारखा देखावा दाखविणारें, ॲगेट, गंज म्हणजे ज्यांवर झाडें डोंगर वगैरे देखावे दिसतात तो, मोचा ॲगेट हे आणि दोरेदार ॲगेट हे प्रकार प्रसिद्ध आहेत.

अकीकास कांतण्याचें व पैलू पाडण्याचें काम हिंदुस्थानांत विशेषः खंबायत व भडोच येथें फार चालतें. रेवा कांठांतील रतनभोर प्रांतांत, खेडा जिल्ह्यांतील कपडवंज, अमदाबाद जिल्ह्यांतील रणपूर आणि राजपिंपळा संस्थानांतील रत्नपूर येथें ह्याच्या खाणी आहेत. खाणींतून काढिल्यावर ह्याचे दगड विस्तवांत आरक्तोष्ण केले म्हणजे याचे रंग खुलतात. ह्याचीं बटनें, आंगठ्यांचे खडे, कंठ्या व माळा करण्याचे मणि व ड्ल वगैरे अनेक सुंदर प्रकार होतात. ह्यांची खंबायती खडे म्हणून प्रसिद्धी आहे. पूर्वी खंबायतेंत ६ ते ८ लाख रुपयांचा माल तयार होत असे. पण हे जिन्नसही कृत्रिम रीतीनें तयार होऊं लागल्यामुळें आतां येथें फक्त लाख दीडलाख रुपये किंमतीचा माल निघूं लागला आहे.

५ ओपल—ही सिलिकेची अव्यक्त स्फटिक सजल जात आहे. ओपल हें इंग्रजी नांव आहे. ह्या रत्नाचें संस्कृत नांव शिवधातु (शंकराचें बीज) असें असून रंगावरून पडलेलें दुसरें नांव दुग्धस्फटिक व हिंदी नांव दुधिया पत्थर असें आहे. इंग्रजींत याचें दुसरें नांव मिल्कस्टोन म्हणजे दुधाच्या रंगाचें रत्न असें आहे. क्वचित् मिल्क ओपल असेंही म्हणतात. ह्या रत्नांत ९० भाग सिकता व १० भाग पाणी असतें. नैसर्गिक उष्ण पाण्याच्या वाहत्या झऱ्याबरोबर जी सिकता विद्रुत होऊन वहात असते तिचे थर अग्न्युत्पन्न खडकाच्या पोकळींत किंवा चुन्याच्या दगडाच्या पोटांत बसत बसत इंद्रधनुष्याच्या रंगाप्रमाणें चमक दाखणारें हें रत्न तयार होतें. ह्याचें काठिण्य ५·५ ते ६·५ असून विशिष्टगुरुत्व २ ते २·२१ असतें. ह्याचे रंग दुधासारखा पांढरा, पिंवळा, तांबडा, श्याम, हिरवा किंवा करडा असे असतात. ह्याचें तेज कांचसदृश किंवा राळेसारखें अथवा मोत्यासारखें असतें. ह्या रत्नाचे अंतर्भागीं खळग्या असतात त्यांत हवा व कधीं कधीं पाणी असतें. ह्यामुळें त्यांत तऱ्हेतऱ्हेच्या रंगाच्या लकेरी दिसतात. त्यांत कधीं निखाऱ्यासारख्या लाल, कधीं उज्ज्वल अंजिरी रंगाच्या, तर कधीं पाचेप्रमाणें हिरव्यागार रंगाच्या आणि लकलकीत किरमिजी व निळ्या रंगाच्या झांकी मारतात. ह्याच्या फायर ओपल म्हणजे अग्निपुलक या जातीच्या रत्नाचा रंग तांबूस अगर संत्र्याच्या रंगासारखा असतो. हा रंग घवघवीत असून रत्नाच्या आंतल्या बाजूसही आगीसारखी तांबडी चमक असते.

ह्या रत्नाला अनेकदां पैलू पाडलेले आढळतात. पण पुष्कळसे खडे बहिर्वक्र आणि चपटे असेच असतात. पहिल्या प्रकारचे खडे लोलकाप्रमाणें आणि दुसऱ्या प्रकारचे मुख्यतः आंगठ्यांमध्यें उपयोजितात. ह्याच्या सामान्य जातीच्या खड्याच्या गळ्याच्या व हाताच्या गुंड्याही करितात. हें रत्न हिंदुस्थानच्या अनेक भागांत सांपडतें. यूरोपांतील हंगेरी देशांत, न्यू साउथ वेल्समध्यें, ऑस्ट्रेलिया व ह्यंडयूरास येथें हीं ओपल रत्नें सांपडतात. ह्याच्या फायर ओपल ह्या रत्नाच्या जातीकरितां मेक्सिको देश प्रख्यात आहे. नगर जिल्ह्यांतील सीना नदीच्या तीरावरही हा सांपडतो.

ह्या रत्नाची किंमत त्याच्या चांगल्या रंगाच्या व लकेरीच्या धोरणाप्रमाणें एक रुपया पासून तीस रुपये रतिपर्यंत असते. हलकें रत्न याहूनही कमी किंमतीस मिळतें.

६ पेरोज, राजावर्त अथवा लाजवर्द, पीलू अथवा जेड, अंबर अथवा तृणमणि आणि वज्रभासीय अथवा झिर्कान—हीं हलकीं रत्नें वापरांत कधीं कधीं आढळतात. पैकीं पेरोज अपारदर्शक असूनही त्याची रत्नांत गणना होते, व तो दागिन्यांत वापरण्यांत येतो. त्याच्या हिरवट निळ्या रंगाच्या खड्यांस मागणी जास्त असते. विशेषतः पार्शी व मुसलमान लोक हें रत्न जास्त वापरतात. लाजवर्द यास गोविंदमणि असेंही म्हणतात. ह्याचा रंग निळा असतो. यास इंग्रजींत Lapis-lazuli

म्हणतात. ह्याच्या स्फटिकीभूत पाषाणाचीच गणना रत्नांत होते. ह्याचा आकार द्वादशफलकी असतो. चिनई भांड्यांवर निळ्या रंगाची वेलबुट्टी ह्याचीच काढलेली असते. जेड हें चिनी व जपानी लोकांचें आवडतें रत्न आहे. ह्याचें संस्कृतांतील नांव पीलू असें आहे. ब्रह्मदेशांत ह्याच्या मोठाल्या खाणी आहेत. त्याचे मोलोन येथें मुख्य कारखाने असून त्यांत ह्याच्या आंगठ्या, कर्णफुलें, कांकणें वगैरे करितात. अंबर हें रत्न संस्कृतांत तृणकांत किंवा तृणमणि ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. औषधांत वापरतात तें हें नव्हे. तें निराळें असतें. हें उद्भिज्ज रत्न आहे. राळ ज्या वृक्षापासून होते त्याच्या राळेचा अश्मीभूत झालेला हा पदार्थ आहे. ह्याचा मुख्य रंग पिंवळा असतो. ह्याला घासलें असतां वीज उत्पन्न होते व जाळलें असतां सुगंध सुटतो. चोळल्यासही थोडा वास येतो. याचा वास मंदमंद व गोड असतो. म्हणून ह्यास सुगंधी रत्न म्हणतां येईल. ह्याच्या मण्याच्या माळा करून लहान मुलांच्या गळ्यांत घालितात. वज्रभासीय म्हणजे इंग्रजी झिर्कान होय. हें मुख्यत्वेंकरून सीलोनांत मतूरा येथें फार सांपडतें. ह्याच्यांत हिऱ्यासारखी झांक व अग्नितुल्य तेज असल्यामुळें ह्याच्या खड्यांस मतूराचे हिरे असें नांव मिळालें आहे. पण ह्याचें काठिण्य हिऱ्यापेक्षां फारच कमी म्हणजे ७$\frac{1}{4}$ असल्यानें हा त्यामुळें ओळखतां येतो. ह्याचे अनेक रंगाचे खडे असतात. ह्याच्या बिनरंगी खड्यांस बिलियन आकार देऊन त्यांचा आंगठ्यांत उपयोग करितात. त्यावेळीं हें केवळ हिऱ्याप्रमाणें दिसतें.

७ अवांतर उपरत्नें व पौराणिक रत्नें—करकेतन, मासरमणि अथवा मसारगर्भ, मेचक, कर्कोद, सुगांधि, टिट्टिभ, रुचक, उत्पल, गंधशस्य, पिंड, सीस, नीलांग, शेषमणि, सस्यक इत्यादि अनेक अवांतर उपरत्नें आहेत. त्यांपैकीं कर्केतन अथवा करकेतन हें विशेष उल्लेखनीय आहे. ह्याचें वर्णन विष्णुपुराणांत आहे. तेथें असें म्हटलें आहे कीं, "सर्वेषामेव रत्नानां धार्यं कर्केतनं स्मृतम्" हें पवित्र रत्न धारण केल्यानें संपत्ति, नोकरचाकर आणि धान्य यांचीं वृद्धि होऊन संतति व कलत्रसुख मिळतें इ. असें याचें फल सांगितलें आहे. हें हल्लीं कोठें मिळत असल्याचें दिसत नाहीं. ग्रंथांतरीं याचा वर्ण रक्त, स्वर्ण अगर मध यांच्यासारखा असून तेज अग्नीच्या ज्वालेप्रमाणें, विजेप्रमाणें अगर सूर्याप्रमाणें जळजळीत असतें असें म्हटलें आहे. दुसरें रत्न मासरमणि हें उत्तरेकडील म्लेच्छांच्या देशांत उत्पन्न होतें असें "हिंदी रत्नपरीक्षा" ह्या पुस्तकांत लिहिलें आहे. शिवाय हंसाप्रमाणें ह्याच्या अंगीं पाणी दुधापासून निराळें करण्याचा धर्म असल्याचेंहि त्यांत सांगितलें आहे.

चिंतामणि रत्न, चिंतासिंधु, कौस्तुभ, परीस, स्यमंतकमणि आणि वैजयंतीमाला हीं पुराणप्रसिद्ध रत्नें आहेत. यांचें विस्तृत वर्णन श्री. खांबेटे यांच्या रत्नप्रदीप खंड २ यांत आलेलें आहे.

८ कित्येक इंग्रजी रत्नें—देशी विदेशी अशीं कांहीं रत्नें आहेत. त्यांपैकीं आलिव्हिन—पेरोडाट अथवा क्रिसोलाइट, अॅपटाइट, डायओप्साइड, स्पायनेल, एपिडोट, आयडोक्रेज, फेनाकाइट, स्पोड्यूमिन, आम्याझोनाइट, कियानाइट, मार्गानाइट इत्यादि कधीं कधीं पाहण्यांत येतात. यांचें वर्णन श्री. खांबेटे यांच्या रत्नप्रदीप खंड २ मध्यें आहे.

नवग्रहांचीं प्रियरत्नें—इंद्रगोप किड्याच्या रंगाप्रमाणें माणिक रवीला प्रिय असतें. लाल, पिवळा, पांढरा अगर सांवळा ह्या वर्णाचें मोतीं चंद्राला आवडतें. पिंवळी झांक असलेल्या तांबड्या रंगाचें पोंवळें मंगळाला प्रिय आहे. मोर आणि चाष पक्षी ह्यांच्या पंखांच्या रंगकांतीप्रमाणें हिरवें पन्ना रत्न बुधाला आवडतें. सुवर्णाच्या कांतीप्रमाणें तेजयुक्त व पिंवळ्या रंगाचा पुष्पराग गुरूला पसंत असतो अति स्वच्छ आणि ताऱ्याप्रमाणें चमकणारा हिरा शुक्राला आवडतो. असित म्हणजे गहिऱ्या निळ्या रंगाचें आणि दाट मेघाप्रमाणें काळें असें नीलरत्न शनीला प्रिय असतें. पिंवळट रंगावर लाल असें गोमेद रत्न राहूला प्रिय असतें. मांजराच्या डोळ्याच्या तेजाचें आणि फिरणारा दोरा असलेलें वैडूर्य रत्न (लसण्या) हें केतूचें प्रीतिस्थान आहे. प्रत्येक रत्नाचा साधारणपणें सर्वोत्तम रंग हा त्या त्या रत्नाच्या देवतेला प्रिय असतो हें पाहून ग्रहांकरितां रत्नें विकत घेणारांनीं तारतम्य वापरावें. ह्या ग्रहांना प्रसन्न करून घेणेकरितां ह्या रत्नांचीं दानें करावीं; आणि हीं रत्नें आंगावर वापरावीं म्हणजे त्या त्या ग्रहांपासून पीडा होत नाहीं.

नवग्रहांकरितां नवरत्नांची आंगठी व तींतील रत्नांचीं स्थानें—नवग्रहाचे आंगठींत हिऱ्याचें स्थान पूर्वदिशा हें होय. मोत्याचें स्थान आग्नेय दिशा,

पोवळयाचें दक्षिण दिशा, गोमेदाचें नैर्ऋत्य दिशा, नीलाचें पश्चिम दिशा, वैडूर्याचें वायव्य दिशा, पुष्प-रागाचें उत्तर दिशा, पाचेचें ईशान्य दिशा, आणि माणकाचें अवशिष्ट स्थान म्हणजे मध्यभाग हें होय.

ह्याप्रमाणें दिशांस तीं तीं रत्नें बसविण्याच्या घरांचे आकार पुढीलप्रमाणें असावे–रवीचें घर वर्तुळ असावें. चंद्राचें चौकोनी, मंगळाचें तिकोनी, बुधाचें नाग-वेलीच्या पानाच्या आकाराचें, गुरूचें पंचकोनी, शुक्राचें अष्टकोनी, शनीचें रथाच्या आकाराचें, आणि केतूचें पताकेच्या आकाराचें असावें. जेव्हां ग्रह उच्चीचे असतील तेव्हां रत्नें बसवून घ्यावीं.

नवरत्नांची आंगठी धारण करण्याचें फल–हीं नवरत्नें जो सुज्ञ मनुष्य हातांत (आंगठीच्या रूपानें बोटांत) धारण करितो तो नित्य सुखी राहील; शिवाय राजाला योग्य अशी संपत्ति त्याला लाभेल.

नवरत्नांच्या खरेदीच्या वेळा–रत्नें नऊ आणि वार सात म्हणून राहू व केतु ह्या ग्रहांचीं प्रियरत्नें शनीच्या रत्नांप्रमाणें समजून त्यांची खरेदी शनीच्या रत्नाच्या वेळेवर करावी. बाकीचीं खरेदी करणें तीं प्रत्येक वारीं त्या त्या ग्रहाच्या होऱ्यावर त्यांचीं त्यांचीं रत्नें खरेदी करावीं. रत्नें दिवसास खरेदी करावीं. रात्रीं कधींच खरेदी करूं नये.

रत्नांचे धार्मिक व आरोग्यविषयक उपयोग–संसार हा दुःखमय व असार आहे असें तत्त्वज्ञान असणाऱ्या पौर्वात्यांनीं आपणांस संसारसागरांतून सोडविणाऱ्या देवतांस प्रसन्न करून घेण्यासाठीं त्यांच्या मूर्ति करण्याकडे रत्नांचा महत्त्वाचा उपयोग केलेला आहे. हिऱ्यासारख्या तेजस्वी शुभ्र रत्नांचा उपयोग मूर्तीच्या डोळ्यांचे ठिकाणीं करण्यांत आलेला असे. अशा डोळ्यांच्या ठिकाणीं बसविलेल्या हिऱ्यांचा व तेथून ते चोरीस गेल्याचा उल्लेखही प्रसिद्ध रत्नांच्या वर्णनांत आढळतो.

संस्कृतांत शिल्पशास्त्राचे अनेक ग्रंथ आहेत. त्यांत देवालय कसें बांधावें, त्यांतील मूर्ती कशा व कशाच्या असाव्या ह्यांचींही वर्णनें आलेलीं आहेत. त्यांपैकीं काश्यपशिल्पांत शिवलिंग 'रत्नजं लोहजं वाऽथ लिङ्गं कृत्वा सयोनिकम्' म्हणजे लिंग रत्नाचें अथवा लोहाचें असावें असें लिहिलें आहे. जर श्वेत अश्मज (शिलेचें) लिंग करणें असेल तर ती शिला मुक्तास्फटिकसन्निभा म्हणजे मोतीं, स्फटिक यांच्या प्रभेसारखी प्रभावान् असावी; व लिंगाकरतां घेणेची शिला जर कृष्णवर्णाची असेल तर तिचा देखावा राजावर्त रत्नासारखा (राजावर्तनिभाकारा–राजावर्ताची उत्तम निभा थोडी लाली व जास्त नीलिमा अशा वर्णमिश्रणाची झांक असलेली होय) असावा असेंही सांगितलें आहे. शिवाय वामन-पुराणांत रत्नांचें रत्नाचलदान व रत्नधेनुदान असे धार्मिक उपयोगही सांगितले आहेत.

आरोग्यविषयक उपयोग म्हणजे रत्नांचीं भस्में करून रसायनांत उपयोग करावयाचा हा होय. ह्याचें वर्णन वैद्यक ग्रंथांतून सविस्तर दिलेलें असतें. त्यांतील प्रमुख म्हणून रसरत्नसमुच्चय या ग्रंथाचा उल्लेख करतां येईल. रत्नांचा दुसरा उपयोग रत्नांतील विजेपासून शरीरास होणारा आरोग्यलाभ हा होय. विद्युत् आपल्या शरिरांत आहे. तिचें योग्य प्रमाण नेहमीं कायम ठेवणें आरोग्य-कारक आहे. हिरे, माणकें, इंद्रनील वगैरे रत्नांत वीज असते. कांतलेल्या रत्नास कोरड्या कपड्यानें घासलें असतां त्यांत वीज उत्पन्न होते. तिला सौदामिनी असें नांव आहे. बहुतेक रत्नांतून वीज लवकरच निघून जाते. परंतु हिरे, माणिकें, इन्द्रनील व पुष्पराग ह्यांजवर वीज पुष्कळ वेळ-पर्यंत जागृत राहाते. चित्रखनिज, कांचमणि, पुष्पराग आणि क्याल्साइट ह्यांवर दाबानें वीज उत्पन्न होते. टूर्मलाइन आणि पुष्पराज यांस तापविलें असतां त्यांजवर वीज उत्पन्न होते. ह्या प्रकारें रत्नें वीज उत्पन्न करणारीं असल्यानें तीं शरीरावर धारण करणाऱ्यास आरोग्याचे दृष्टीनें फार उपयुक्त आहेत. आपल्या-पूर्वींच्या पद्धतीनें लिहिलेल्या पुस्तकांतून असें विधान केलेलें आढळतें कीं, रत्नें आंगावर धारण केलीं असतां तीं सूर्यादि ग्रहांच्या पीडांचें निवारण करितात, आणि दीर्घायुष्य व आरोग्य देतात. ह्याचें रहस्य तरी वर लिहिलेल्या गोष्टींतच आहे. म्हणून ज्यांना ऐपत असेल त्यांनीं पंचरशी धातूच्या पुतळ्या व आंगठ्या वापरण्यापेक्षां रत्नें धारण करावीं. रत्नें सौभाग्य, भाग्योदय, वशीकरण, वैभव, प्रसन्नता, व धैर्य ह्यांची प्राप्ती करून देतात आणि शरिराची निस्तेजपणा व मालिन्यानें येणारी अलक्ष्मी दूर करितात व भूतबाधेचा नाश करितात.

रबर:–झाडें-झुडपें व वेली यांपासून निघणारा पांढरा घट्ट चिक. याला लॅटेक्स असेंहि म्हणतात. झाडाची साल व लांकूड यांमध्यें हा पदार्थ असतो. हा पदार्थ मिळण्यासाठीं सालीवर साधारण जोराचा घाव घालावा लागतो. शिसेपेन्सिलीनें लिहिलेलें लिहिणें

पुसण्याचा गुणधर्म यामध्यें असल्यामुळें याला 'रबर' हें इंग्रजी नांव पडलें. वेस्ट इंडीज बेटांत याचा प्रथम शोध लागला. म्हणून याला इंडिया रबर म्हणूं लागले. या वस्तूची उपयुक्तता दिवसेंदिवस जास्त प्रमाणांत दिसून येऊं लागल्यामुळें त्याची लागवड अनेक देशांत होऊं लागली. लागवड करण्यापूर्वी रबराचीं झाडें दक्षिण नि पश्चिम अमेरिका आणि पूर्व नि पश्चिम आफ्रिका व आशिया या भागांत वाढत असत. रबराची गरज सध्यां मोठ्या प्रमाणांत वाढल्यामुळें आतां याची लागवड करून मोठ्या प्रमाणांत निर्मिती करण्याचे प्रयत्न चालू आहेत. लागवडीच्या झाडापासून होणारा रबर वरील देशांतील रबरापेक्षां कमी प्रतीचा निपजतो.

रबराचे प्रकार पुष्कळ, पण त्यांत पॅरा, मॅनिकोबा, उल, आसाम रबर किंवा रॅमबाँग व लॅगॉस हे पांच प्रकार प्रमुख होत.

याच्या ठिकाणीं नरमाई, लवचिकपणा व स्थितिस्थापकता हे गुण आहेत. रबर चिकट असल्यानें तें सहज कापतां येत नाहीं. त्याच्या अंगची स्थितिस्थापकता थंडीनें कमी होते तर उलट उष्णतेनें ती वाढते. थोडा वेळ, रबराची वादी ताणून ती पाण्यांत धरल्यास ती आकसत नाहीं. पण तिला उष्णता लागतांच तिच्या अंगीं आकसण्याचा धर्म निर्माण होतो. पुष्कळ दिवस मोकळ्या हवेंत व प्रकाशांत रबर ठेवलें तर तें चिकट बनून जातें आणि त्याची स्थितिस्थापकताहि नाहींशी होते. मद्यार्कांत किंवा जलमिश्रित आम्लांत रबर वितळत नाहीं; पण ईथर, क्लोरोफार्म, नखतेल व शुद्ध टरपेंटाईन यांत तें वितळतें. रबर कापण्याची क्रिया सहज करतां येण्यासाठीं त्यावर थोडें पाणी ओतावें म्हणजे तें सहज कापलें जातें. रबराचे दोन तुकडे कापून लगेच ते एकमेकांवर दाबले तर कापल्या ठिकाणीं बेमालूम चिकटतात. नखतेल किंवा टरपेंटाईन यांत थोडा वेळ ठेवूनहि तुकडे चिकटवितां येतील. दिव्यावर रबर धरलें तर तें पेटतें. पेटतांना त्याचा जाळ पांढरा पण धुरकट असतो.

या पदार्थाचा उपयोग सायकली—मोटारी यांच्या धांवा, मुलांचीं खेळणीं, गिरण्यांना लागणारे पट्टे, नळ्या, जलाभेद्य कपडे वगैरेसाठीं होतो.

हा पदार्थ आसाम, कोचीन, मद्रास इलाखा, त्रावणकोर इकडे फार निर्माण होतो. तसाच तो कूर्ग व म्हैसूर या ठिकाणीं थोड्या प्रमाणांत उत्पन्न होत असतो.

रमझान आणि ईद उल फत्र:—रमझान हा मुसलमानांचा ९वा महिना होय. हा महिना मुसलमान पवित्र मानतात. याचें कारण या महिन्यांत कुराण प्रगट झालें. रमझान महिन्याच्या चंद्रदर्शनापासून ३० दिवस याप्रीत्यर्थ उपवास करतात. हे उपवास पहाटेपूर्वीपासून सुरू करून सूर्यास्तानंतर सोडतात.

रमाबाई, पंडिता (–१९२२):—एक समाजसुधारक महिला. हिचा जन्म ब्राह्मणकुळांत झाला. युरोप व अमेरिकेंत प्रवास झाल्यानें हिचें ज्ञान-क्षेत्र बरेंच प्रगल्भ व व्यापक झालें. पुण्यांत ब्राह्मण विधवांच्या शैक्षणिक उद्धारासाठीं तिनें प्रथम संस्था काढली; इ. सन १९२२ एप्रिल १५ रोजीं तिचें देहावसान झालें.

रवि (ज्योतिष):—हा सर्व चराचर वस्तुमात्राचा व मनुष्यजीवनाचा आधार अगर 'आत्मा' आहे. प्राणिमात्राचें रक्षण व पालनपोषण तो करितो; म्हणून रवि-हा पित्याचा 'कारक' मानला आहे. अधिकार, सत्ता, पराक्रम, कीर्ति, उद्योगधंदा, सरकार, सरकारी नोकर व नोकरी, मानमरातब, जीवनशक्ति, आरोग्य इत्यादि गोष्टी रवीवरून दर्शित होतात. वसंतसंपाताच्या वेळीं मेष राशींत रवि उच्च व प्रखर असतो. शरद्संपातांत तो तूळ राशींत नीचीचा असतो. रवि मित्रराशींत बलिष्ठ,शुभदृष्ट,स्थानबली असेल तर मनुष्याला पितृसुख, आरोग्य, कीर्ति, ऐश्वर्य यांचा लाभ होतो. याचे उलट रवि हा कुंडलींत बलहीन, नीचीचा अगर अशुभदृष्ट असेल तर सत्तेची पोकळ मिजास व बढाईखोरी असून मनुष्य हलकट असतो. त्याची अपकीर्ति होते व वेळीं त्याला तुरुंगांतहि पडावें लागतें. चंद्रकुंडलीइतकेंच रविकुंडलीचें महत्त्व ज्योतिषांनीं मानलेलें आहे. रवीची खगोलविषयक माहिती 'सूर्य' या लेखांत दिली आहे.

रविवर्मा (१८४८–१९०६):—चित्रकार. जातीचा क्षत्रिय. याला लहानपणापासून चित्रें काढण्याचा नाद लागला. याचा चित्रकलेचा नाद पाहून त्रावणकोर दरबारनें याला आश्रय दिला. त्यावेळीं हा केवळ १३ वर्षांचा होता. पुढें हा ऑईल पेंटिंगचीं चित्रें काढूं लागला. त्यानें या कलेंत स्वावलंबनानें प्राविण्य प्राप्त करून घेतलें. हा पौर्वात्य कल्पना पाश्चात्य पद्धतीनें फार चांगल्या रीतीनें व्यक्त करी. त्याच्या या गुणाबद्दल

हिंदुस्थानचे माजी व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन यांनींदेखील याच्यासंबंधीं प्रशंसापर उद्गार काढले आहेत. याचीं चित्रें लोकांना अतिशय आवडूं लागल्यामुळें त्याच्या चित्रांना फार मागण्या येऊं लागल्या. म्हणून त्यानें स्वतःचा एक छापखाना काढला. हा छापखाना तो मेल्यावर बंद पडला. याच्याकडून बडोदें व त्रावणकोर येथील दरबारनें पुष्कळशीं चित्रें काढवून घेतलीं. तीं पाहण्यास दूरदूरचे लोक सध्यां येत असतात. आपल्या लोकांमध्यें चित्रकलेसंबंधीं आदर निर्माण करण्याचें कार्य यानें केलें आहे. तसेंच चित्रकलेला सध्यां जें स्वरूप लाभलें आहे तें लाभण्यास याचे श्रम बऱ्याच अंशीं कारणीभूत झाले.

रशियाः—स्लाव्हिक वंशापैकीं मोठ्या संख्येची पितृभूमी व कम्यूनिझम या नवीन राज्यशासनप्रणालीची पहिली प्रयोगभूमि.


भौगोलिक रचना—मुख्य रशिया हें एक फार मोठें मैदान आहे. या मैदानाच्या मध्यंतरीं उंचवट्याचा भाग असून त्यानें उत्तर व दक्षिण उतार पाडले आहेत. दक्षिणेस काळा समुद्र, वायव्येस व पश्चिमेस बाल्टिक समुद्र, पश्चिमेस जर्मनीचें साम्राज्य व पूर्वेस अफगाणिस्तान, तिबेट व मंगोलिया. लेनिनग्राडच्या दक्षिणेस व्हालडाई टेकड्या, दक्षिणेस कॉकेशस पर्वत व याच्या पश्चिमेस क्रीमियांत डोंगरांच्या रांगा, ईशान्येस उरल पर्वताच्या रांगा आहेत. पिचोरा ही नदी मध्यरशियांत उगम पावून उत्तरेस वाहात जाऊन आर्क्टिक महासागरास मिळते. मेझेन व डिव्हाना या आर्चेंगलच्या सामुद्रधुनींत मिळतात. नेव्हा, ड्यूना व व्हिस्चूला या नद्या बाल्टिक समुद्रास मिळतात. दक्षिणेकडे वाहणाऱ्या नद्यांपैकीं उरल, उझेन, व्होल्गा व क्यूमा या कास्पियन समुद्राला मिळतात. निपर, बग व नीस्टर या काळ्या समुद्राला मिळतात. लाडोगा नांवाचें मोठें सरोवर लेनिनग्राडच्या उत्तरेस असून फिनलंड शेजारींहि दोन लहान सरोवरें आहेत.

हवामान—३५ अक्षांशांत रशियाचा भूभाग पसरला असल्यामुळें निरनिराळ्या ठिकाणीं विविध हवामान आहे. उत्तरेचे भाग आर्क्टिक भूभागांत असल्यामुळें अतिशय थंड आहेत तर, अगदीं दक्षिणेचे भाग उष्ण आहेत. दक्षिणेकडून किंवा उत्तरेकडून वाहणाऱ्या वाऱ्यांना अडविणारे डोंगर, पर्वत रशियांत फारसे नसल्यामुळें जवळ जवळ सर्व देशभर हे वारे वाहात जातात व त्यामुळें हवामानांत आकस्मिक बदल होतो. वर्षाचें पर्जन्यमान सरासरी २० इंचाचें आहे. हिंवाळ्यांत सर्व देशभर बर्फ पडत असतें.

उद्योगधंदे—प्लॅटिनम, लोखंड, तांबें, कोळसा, मीठ, जस्त, सोनें व रुपें रशियांत विपुल सांपडतें. कोळसा मध्य दक्षिण भागांत सांपडतो. उरल पर्वतांत लोखंड सांपडतें. कॉकेशियांत अनेक पेट्रोलच्या खाणी आहेत. उरल पर्वतांत, हिरे व पाच यांच्या खाणी आहेत. अडीच कोट एकर भरेल एवढीं मोठीं जंगलें रशियांत आहेत. त्यामुळें या जंगलांच्या भागांत पोटॅश, टरपेंटाइन, डांबर व कागदासाठीं लाकडाचा लगदा इत्यादि वस्तू तयार करण्याचे कारखाने आहेत. नद्या व सरोवरें यांतून मासे पकडतात, पण रशियाच्या लोकांना पुरतील एवढे मासे मिळत नाहींत. उत्तरेकडील लोक पिसें व निरनिराळ्या प्राण्यांच्या अंगावरचीं केसाळ कातडीं यांचा धंदा करतात.

वाहतूक व्यापार—रशियाला पुरेशीं मोठीं बंदरें नाहींत. पण बहुतेक नद्यांचा वाहतुकीच्या कामीं चांगला उपयोग होतो. याशिवाय कालवे काढूनहि वाहतुकीची व शेतीला पाण्याची सोय केलेली आहे. रशियाचा व्यापार मुख्यतः इंग्लंड व जर्मनीशीं चालत असे. गहूं व कातडी हे मुख्य निर्गतीचे जिन्नस असून खाण्याचे पदार्थ, शास्त्रीय उपकरणें, यंत्रसामुग्री हीं आयात होतात.

लोक व धर्म—रशियाचे युरोपियन रशिया व एशियन रशिया असे दोन भाग आहेत. आर्मिनियन, इराणी, तुर्की, मंगोलियन, स्लाव्हज इत्यादि अनेक वंशांच्या लोकांचें रशियांत भरताड आहे. युरोपियन रशियांतील लोकांचा धर्म रोमन कॅथॉलिक व पूर्वेकडील लोकांचा मुसलमानी व बौद्ध असा आहे. रशियाचें क्षेत्रफळ ८२,४१,९२१ चौरस मैल (यांत यावर्षी पोलंडमधील यूक्रेनचा भाग, बेसारेबिया व ट्रान्सिल्व्हेनिया यांची भर पडलेली आहे.) १९३३ सालची एकूण लोकसंख्या १६५,७६८,४०० इतकी होती. युरोपियन रशियांत ग्रेट रशियन्स, लिटल् रशियन्स, व्हाइट रशियन्स, कोसॅक्स, पोल, स्वीड, फिन, लिथुआनियन, एस्टोनियन, रुमानियन व ज्यू इतक्या जाती आहेत. कम्यूनिझमच्या तत्त्वाप्रमाणें धर्म ही एक त्याज्य कल्पना आहे असें शिक्षण सध्यां मिळतें. रशियन लोक धंद्यानें मुख्यतः शेतकरी आहेत.



रशिया—झार अलेक्झांडर ज्या जागेवर मारला गेला त्याच जागेवर १८८२ मध्यें बांधलेलें चर्च ऑफ रीसरेक्शन. १९व्या शतकांत रशियांत पॅनस्लाव्हिझमूची चळवळ जोरांत होती. या चळवळीचें हें स्मारक समजतात. हें चर्च लेनिनग्राड (पेट्रोग्राड)मध्यें आहे.

राज्यघटना—सध्यां रशियाला यूनियन ऑफ् सोशॅलिस्ट सोव्हियट रिपब्लिक्स असें नांव आहे. (सोव्हियट याचा अर्थ समिति असा आहे.) कम्यूनिझमच्या तत्त्वानुसार राज्यकारभार चालतो. रशियाचे अनेक लोकमतानुवर्ती (कम्यूनिस्ट) प्रांत पाडले असून या सर्व प्रांतांची एक वरिष्ठ समिती असून स्टॅलिन हा तिचा चिटणीस आहे. पण हुद्दा चिटणीस असा असला तरी वस्तुतः आज तोच डिक्टेटर असून झोटिंगशाहीच्या पद्धतीनेंच राज्यकारभार चाललेला आहे.

वाङ्मय-स्लाव्ह भाषेंतील धार्मिक वाङ्मय हें रशियाचें अगदीं पहिलें वाङ्मय होय. या भाषेंत बायबलचा कांहीं भाग व मंदिरांतील प्रार्थना लिहिल्या गेल्या. बाराव्या शतकांत नेस्टर नांवाचा इतिहासकार होऊन गेला. तेराव्या शतकांत मंगोलियन लोकांच्या स्वाऱ्या सुरू झाल्यापासून १७ व्या शतकापर्यंतच्या धालमेलीच्या कालांत रशियांत म्हणण्यासारखें वाङ्मय निर्माण झालेलें नाहीं. यानंतर पीटर दि ग्रेट या झारच्या काळापासून पुन्हां साहित्याकडे लोकांचें लक्ष वळलें व युरोपियन व राष्ट्रीय विचारसरणी त्यांतून उमटूं लागली. १८व्या शतकांत रशियन वाङ्मयाची चांगली प्रगती झाली. या शतकांतील महान लेखक लोमोनोसॉफ (१७११–१७६५) हा काव्यविषयक वाङ्मयाबद्दल प्रसिद्ध आहे. याच शतकाच्या मध्यकालीं फ्रेंच वाङ्मयाची छाप रशियन वाङ्मयावर पडली, पण या शतकाच्या अखेरीस इंग्लिश व जर्मन वाङ्मयाची छाप वाढत गेली. यानंतर टॉलस्टॉय, ओस्ट्रोव्हस्की, टर्जेनीव्ह, गोगोल या जगविख्यात लेखकांनीं रशियाच्या वाङ्मयाला जगांत महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें. अगदीं अलीकडच्या काळांतील कुप्रीन, टॉलस्टॉय व मॅक्सिम गॉर्की यांचीं नांवें रशियन वाङ्मयाचीं प्रतीकें म्हणूनच मानतात.

इतिहास-इ. स. ८६२ मध्यें रूरिक या स्कॅन्डेनेव्हियन पुढाऱ्यानें रशियांतील विस्कळित स्लाववंशीय लोकांना त्यांच्यावर होणाऱ्या स्वाऱ्यांपासून संरक्षण देऊन आपलें साम्राज्य स्थापिलें. रूरिक ८७९ मध्यें मेला व त्याचा अल्पवयी मुलगा गादीवर आला. याच्या कारकीर्दीत कीव्ह येथें राजधानी झाली व रशियन लोकांनीं कॉन्स्टॅन्टिनोपलवर स्वारी करून बायझंटाइन सम्राटाकडून खंडणीहि वसूल केली. याच साम्राज्याला पुढें रशिया हें नांव मिळालें. अकराव्या शतकापर्यंत ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करून व शिक्षण घेण्यास सुरवात करून रशियन लोकांनीं बरीच प्रगति करून घेतली.

तेराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास मोंगल लोकांच्या स्वाऱ्यांनीं रशिया हैराण होऊन गेला. पश्चिम युरोपाशीं रशियाचे संबंध तुटले. शिक्षण, धर्म नव्हे सर्व संस्कृतीच नाहींशी होते कीं काय अशी परिस्थिति निर्माण झाली; पण १३८० मध्यें मास्कोमधील एका राजपुत्रानें (डिमिट्री चौथा) मंगोल लोकांचा मोठा पराभव करून रशियाला त्यांच्या त्रासापासून मुक्त केलें. पुढें इव्हान दि ग्रेट (१४६२–१५०५) यानें मंगोल व तार्तर लोकांच्या हल्ल्यांना युक्तीनें तोंड देऊन रशियांत उत्साह व आशा निर्माण केली व त्याच्यानंतर इव्हान दि टेरिबल [१५३३–१५८४] यानें आझान, आस्ट्राकान व सैबेरियापैकीं कांहीं भाग जिंकून साम्राज्य वाढविलें. याच्यानंतर १६१३ पर्यंत मायकेल रोमानॉफ् याची राज्यावर निवड होईपर्यंत सर्वत्र अंदाधुंदीच माजली होती. मायकेलचा मुलगा अलेक्सिस गादीवर आल्यावर त्यानें पोलंडचा बराच भाग जिंकला. अलेक्सिसनें मरणाच्या वेळीं आपल्या वेड्या मुलाच्या—इव्हानच्या-ऐवजीं आपला [अलेक्सिसचा] सावत्रभाऊ पीटर यानें गादीवर बसावें अशी इच्छा व्यक्त केली. पण पीटरची बहीण सोफिया हिला आपल्या हातीं सत्ता असावी अशी महत्त्वाकांक्षा असल्यानें तिनें पीटरबरोबर इव्हानचें नांवहि झार म्हणून जाहीर केलें. पण लौकरच पीटर खराखुरा सत्ताधारी बनला, व त्यानें सोफियाला चर्चमध्यें हरीहरी करीत बसविलें. मात्र इव्हान नांवाचा झार राहिला. याच पीटरच्या कारकीर्दीपासून रशियाचें वैभव वाढूं लागलें.

पीटरच्या मृत्यूनंतर (१७२५) त्याची राणी कॅथेरिन हिला राजमुकुट मिळाला. तिच्यानंतर तिचा नातू पीटर दुसरा (१७२७-१७३०), पीटर ॲना इव्हानोव्हाना (१७३०–१७४०) व इव्हान (१७४०–१७४१) यांनीं राज्य केलें. पण इव्हाननंतर इलिझाबेथ पेट्रोव्हाना (१७४१–१७६२) हिच्या कारकीर्दींत ऑस्ट्रियाच्या बाजूनें रशियानें प्रशियाशीं चाललेल्या सात वर्षांच्या युद्धांत भाग घेतला. इलिझाबेथचा मुलगा पीटर याचा राज्यावर येऊन कांहीं दिवस होतात न होतात तोंच खून झाला व त्याची बायको कॅथेरीन दुसरी हिला राजमुकुट मिळाला. हिच्या कारकीर्दींत पोलंडची फाळणी व क्रीमिया जिंकलें हीं दोन महत्त्वाचीं कामें झालीं. तिच्या चतुराईच्या राजकारभारानें युरोपमध्येंही रशियाचें महत्त्व वाढलें. पुढें १७८७ते१७९२ या पांच वर्षांत तुर्की लोकांशीं युद्ध झालें व नीस्टर (Dniester) हा प्रांत रशियाला मिळाला. कॅथेरिनच्यानंतर तिचा मुलगा पॉल पहिला गादीवर आला (१७९६). आरंभीं त्यानें कांहीं दिवस चांगला कारभार केला; पण पुढें असह्य जुलमास सुरवात झाली. लोकक्षोभ एवढा वाढला कीं त्याचा १८०१ मध्यें खून झाला. त्याच्या-

नंतर त्याचा मुलगा अलेक्झांडर गादीवर आला. त्यानें शेतकऱ्यांची गुलामगिरी नष्ट केली व कांहीं क्रूर शिक्षाहि कमी केल्या.

अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर (१८२५) त्याचा मुलगा निकोलस पहिला गादीवर आला. त्यानेंहि उदार धोरण स्वीकारलें; पण सुधारणा करतांना त्रास होऊं लागतांच दडपशाहीस त्यानें सुरवात केली. इराणशीं युद्ध सुरूं झालें, व अखेरीस क्रीमियन युद्ध सुरूं झालें. पण या युद्धाचा निकाल लागण्यापूर्वी तो विरुद्ध वातावरण खवळून ज्यूंचा अतोनात छळ झाला व परवांपर्यंत तो कायदेशीरपणें चालूच होता. हा १८९४मध्यें मेला व त्याचा मुलगा निकोलस दुसरा गादीवर आला.याच्या कारकीर्दींत पूर्वेकडे साम्राज्य वाढविण्याचे प्रयत्न झाले. आशियांतील रशियाच्या भागांत रेल्वे झाली, व्यापारी केंद्रें निर्माण केलीं गेलीं व कोरिया जिंकून घेतला. मंगोलिया घेण्याचाही प्रयत्न झाला व चीनमधील बॉक्सर प्रकरणाचा फायदा घेऊन मांचूरिया व निम्मा मंगोलियाहि ताब्यांत घेतला. पण रशि-



युक्रेनमधील एक खेडें व शेतकरी,—रशिया

मेला. त्याचा मुलगा अलेक्झांडर दुसरा याच्यावर इंग्लंड, जर्मनी, ऑस्ट्रिया व फ्रान्स या राष्ट्रांनीं पॅरिसचा तह लादला व रशियाचा बेसारेबिया हा प्रांत काढून घेतला. पुढें टर्कीशीं झालेल्या युद्धांत जय मिळूनहि इतर युरोपियन राष्ट्रांच्या दाबामुळें मिळविलेले प्रांत रशियाला सोडावे लागले. याचा आरंभींचा राज्यकारभार जरी चांगला झाला तरी अखेरीस त्यानेंहि कमालीच्या दडपशाहीला सुरवात केल्यामुळें त्याचा १८८१ मध्यें खून झाला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा अलेक्झांडर तिसरा गादीवर आला. याच्या कारकीर्दींत ज्यूंच्या-

याची ही वाढती सत्ता न साहून युरोपांतील राष्ट्रांनीं जपानला पुढें करून असा दाब आणला, कीं १९०३मध्यें कोरिया, मांचूरिया व मंगोलियाचा भाग मोकळा करून देऊं असें झारकडून वदवून घेतलें. पण रशियाची हा प्रांत सुखासुखीं सोडण्याची तयारी नव्हती. तेव्हां जपाननें ६ फेब्रुवारी १९०४ रोजीं रशियाविरुद्ध युद्ध पुकारलें. या लढाईंत रशियाचा सणसणीत पराभव झाला.

या पराभवानें झारची व त्याच्या सरदारांची व अधिकाऱ्यांची राज्यकारभार चालविण्याची नालायखी

दिसून आली. पराभवामुळें व्यापार पार मंदावला. हजारों मजूर बेकार झाले. क्रांतिकारक पक्ष बळावूं लागला. जातीजातींत युद्धें सुरू झालीं. राजसैन्याला सशस्त्र विरोध झाला व पोटेम्कीन या लढाऊ जहाजावरील खलाशांनींहि बंड पुकारलें. परिस्थिति गंभीर होत चालली. तेव्हां झारनें कांहीं सुधारणा देऊं केल्या, पण जनतेची मागणी वाढली होती. तिनें प्रातिनिधिक सभेची मागणी केली. शेवटीं निकोलसला ती मान्य करावी लागली. त्याप्रमाणें १० मे १९०६ रोजीं ड्यूमाची (प्रातिनिधिक सभा) पहिली बैठक भरली. दोन आठवडे मोकळेपणानें चर्चा झाली व झारनें आणली सत्ता कमी करण्याची व जनतेच्या हातीं कांहीं अधिकार देण्याची मागणी कबूल केली. पण २१ मेला ही सभा झारनें बरखास्त केली, व पुन्हां मर्यादित मतदानाचा हक्क देऊन निवडणुकी केल्या व १ मार्च १९०७ रोजीं ड्यूमाची दुसरी बैठक बोलाविली; पण हीहि १७ जूनला बरखास्त केली. ड्यूमाची तिसरी बैठक नोव्हेंबरमध्यें बोलाविली; पण लौकरच ती २१ जून १९०८पर्यंत तहकूब झाली. या सभेंत खरे लोकप्रतिनिधी फार थोडे होते. १९१२पर्यंत ही सभा चालू होती. ड्यूमाच्या चौथ्या बैठकीला नोव्हेंबर १९१२मध्यें सुरवात झाली; पण या सुधारणांनीं लोकांचें समाधान झालें नव्हतें व सुखांतहि कांहीं भर पडली नव्हती. असंतोष वाढत होता. अशा परिस्थितींत सर्बियाच्याविरुद्ध ऑस्ट्रियानें चढाई केली व महायुद्धाला सुरवात झाली (१९१४). सर्बियाच्या स्लाव्हिक लोकांशीं रशियन लोकांचा रक्ताचा संबंध असल्यामुळें सर्बियाच्या बाजूनें रशियानें लढाईंत उडी टाकली.


ऑस्ट्रियन पोलंडमध्यें १९१४मध्यें रशियन सैन्यानें शिरून गॅलिशिया प्रांत जिंकला. पण १९१५च्या उन्हाळयांत जर्मन व ऑस्ट्रियन सैन्यानें रशियाचा पराभव करून गॅलिशिया परत घेतला व व्हिल्ना व रिगा यांच्या रोखानें चढाई केली. युद्धाच्या आरंभापासून लष्करी अधिकाऱ्यांनीं लांच खाऊन फितुरी केली. खुद्द झरीना (झारची बायको) हिचाहि असल्या घाणेरड्या बाबतींत हात होता. सैन्याला पुरेसें युद्धसाहित्य मिळेना. अशा रीतीनें अंदाधुंदीला सुरवात झाली. पण असल्या आपत्तींनाही झेमूस्टोज (Zem. stvos Union) संघानें रुग्णालयें काढून, अन्नपुरवठा करून व इतर अनेक प्रकारें मदत करून फंदफितुरीनें रसातळाला चाललेल्या राज्याला बराच हात दिला व ऑक्टोबर १९१६पर्यंत राष्ट्राचें फार मोठें काम केलें. १९१७मध्यें रशियानें युद्धांतून अंग काढून घेतलें. रशियाचें ५० लाख सैन्य गारद झालें होतें. फितुरांनीं जर्मनीशीं तहाच्या वाटाघाटी चालू केल्या, पण इतक्यांत १९१७ ची रशियन राज्यक्रांति झाली.

रशियन राज्यक्रांति–या१९१७त झालेल्या राज्यक्रांतीला ‘ बोल्शेव्हिक क्रांति ’ किंवा ‘ कम्युनिस्ट क्रांति ’ असेंहि म्हणतात. १९१७ च्या फेब्रुवारी व मार्चमध्यें पेट्रोग्राड व मॉस्को या ठिकाणीं कम्यूनिस्टांनीं संप घडवून आणले व राजपक्षीयांशीं मारामाऱ्या सुरू केल्या. ११ मार्च १९१७ रोजीं निकोलसनें ड्यूमाचें विसर्जन केलें. परंतु ड्यूमानेंच झारविरुद्ध बंड पुकारलें. झारचे प्रधान कैद झाले. लौकरच ड्यूमानें एक्झीक्यूटिव्ह कौन्सिलला तात्पुरतें सरकार निर्माण करण्याची आज्ञा केली व १५ मार्चला झारला स्वतःच्या व मुलाच्या पदच्युतीचें अधिकारपत्र लिहावें लागलें. त्याच दिवशीं प्रिन्स ल्हॉफ् यानें मंत्रिमंडळ बनविलें. या मंत्रिमंडळांत अलेक्झांडर केरन्स्की हा न्यायमंत्री बनला. केरन्स्की हा सोशॅलिस्ट होता, व कामगार आणि सैनिक या बलवान पक्षाचा प्रतिनिधि होता.

या मंत्रिमंडळानें ज्या कांहीं सुधारणा करण्याचें ठरविलें त्यामुळें बहुजन समाजाचें समाधान होणें शक्य नव्हतें. लेनिनचा प्रचार जोरानें चालू होता. यावेळीं केरेन्स्की युद्धमंत्री झाला होता. त्याला लष्करांत पुन्हां उत्साह निर्माण करून या सर्व बंडाळीला तोंड द्यावयाचें होतें. पण त्याला यश येण्यापूर्वीच ७ नोव्हेंबर रोजीं बोल्शेव्हिकांनीं पेट्रोग्राड घेतलें व ९ नोव्हेंबर रोजीं अखिल रशियन कामगार व शिपाई यांच्या काँग्रेसच्या प्रतिनिधींनीं लेनिनच्या (मुख्य प्रधान) नेतृत्वाखालीं मंत्रिमंडळ जाहीर केलें. या मंत्रिमंडळांत ट्रॉटस्की हा परराष्ट्रमंत्री बनला. यानंतरच्या इतिहासासाठीं ‘ कम्यूनिझम ’ (पृष्ठें २०९ ते २१७) व ‘ बोल्शेव्हिझम् ’ (पृष्ठें १४३७ ते १४४६), व लेनिन, ट्रॉटस्की व स्टॅलिन यांचीं चरित्रें पाहा.

राज्यघटना– क्रांतिनंतरची यादवी व ‘ वॉर कम्युनिझम् ’ संपून ‘ नवें आर्थिक धोरण ’ सुरू झाल्यावर थोडी स्थिरस्थावर झाली. तेव्हां १९२३ सालीं रशियांत नवी राज्यघटना जाहीर करण्यांत

आली. तदनुसार रशिया हें 'सात सोशॅलिस्ट सोव्हिएट प्रजासत्ताक राज्यांचें संयुक्त राज्य' [यूनिअन ऑफ् सोशॅलिस्ट सोव्हिअट रिपब्लिक्स्–यू. एस्. एस्. आर.] आहे असें ठरविण्यांत आलें. हीं सात प्रजासत्ताक राज्यें पुढीलप्रमाणें होतः—[१] रशियन सोशॅलिस्ट फेडरेटेड सोव्हिअट रिपब्लिक. [हें सर्व प्रांतांत मोठें असून त्यांत पुन्हां ७ पोट प्रजासत्ताक राज्यें आहेत. याची लोकसंख्या १० कोटीहून अधिक आहे. सर्व यू.एस्. एस्. आर.ची लोकसंख्या आतां १८कोटीच्या घरास गेली आहे.] [२] व्हाइट रशियन सोशॅलिस्ट सोव्हिअट रिपब्लिक व [३] युक्रेनिअन सो. सो. रिपब्लिक. (हीं दोन युरोपच्या सरहद्दीवर असून त्यांची लोकसंख्या अनुक्रमें ५० लक्ष व ३ कोटी आहे. १९१८ सालीं रशिया व जर्मनी यांमध्यें झालेल्या तहांत युक्रेन हें स्वतंत्र राज्य बनविण्यांत आलें होतें. पण १९१९ ते २० सालीं रशियन सरकारनें तें पुन्हां जिंकून घेतलें.) कॉकेशसचे दक्षिणेस (४) ट्रॅन्सकॉकेशस सो. सो. रिपब्लिक असून त्यांत जॉर्जिया, अझर बैझान व अर्मेनिया अशीं तीन प्रजासत्ताक पोटराज्यें आहेत. यांतील कोणीही रशियन नसून सर्वांची राष्ट्रीयता भिन्न भिन्न आहे. (५) उझबेक सो. सो. रिपब्लिक हें अफगाणिस्तानचे उत्तर सरहद्दीस लागून आहे. (६) तुर्कोमान सो. सो. रिपब्लिक हें तुर्कस्तानच्या सरहद्दीवर आहे. शेवटचें (७) ताडझिक सो. सो. रिपब्लिक हें हिंदुस्तानच्या उत्तर सरहद्दीस लागून आहे. शेवटच्या तिहींत मुसलमानांची वस्ती आहे. अनेक वंशांना एकाच राजवटींत आणण्यांत आलें असलें तरी एकंदर जनता अधिकाधिक सुखी होत असून तिला रशियाबद्दल अभिमान वाटूं लागला आहे. एकंदर राज्यव्यवस्था जनतेस कशी वाटते या संबंधानें हॅम्पडन जॅक्सन 'पोस्ट–वॉर वर्ल्ड' या ग्रन्थांत लिहितो, "अफगाणिस्थान, इराण व हिंदुस्थान यांच्या सरहद्दीवरील जनतेला शेजारच्या रशियन प्रजेबद्दल हेवा वाटावा इतकी या मागासलेल्या जनतेलाही रशियन सरकारकडून उत्तम वागवणूक मिळते. झारच्या रशियन साम्राज्यांतील निरनिराळ्या राष्ट्रीयकांना एकाच साम्राज्याच्या भट्टींत भाजून एकजीव करण्याचें झार बादशहाचें धोरण असे. उलट सोव्हिअट अमलांत या भिन्न भिन्न राष्ट्रीयकांना स्वतंत्रपणें उन्नति करून घेण्यास उत्तेजन देण्यांत येतें. प्रत्येक प्रजासत्ताक संयुक्त राज्य व त्याचीं घटक राज्यें यांना सांस्कृतिक स्वातंत्र्य व भाषास्वातंत्र्य देण्यांत आलें असून शिक्षणसंस्था, आरोग्य व मतप्रसाराचीं साधनें ज्यांचे त्यांचे नियंत्रणाखालीं देण्यांत आलीं आहेत.



सोव्हियट रशियांतील सामुदायिक व यांत्रिक पद्धतीची शेती.

मात्र प्रत्येकानें आपली आर्थिक प्रगति एकंदर यू. एस्. एस्. आर. च्या प्रगतीशीं अनुरूप अशी ठेविली पाहिजे."

रशियांत कामगारांचीं 'सोव्हिअट्स' असून त्यांच्या-मार्फत 'कामगारांची मुखत्यारी' रशियांत नांदत आहे असें रशियन राज्यघटनेचें वर्णन करण्यांत येत असतें. रशियन सरकारला यामुळेंच 'सोव्हिअट्स सरकार' असेंही म्हणतात. हीं 'सोव्हिअट्स' क्रांतीच्या पूर्वीं स्थापण्यांत आलेलीं 'कामकरी, शेतकरी व सैनिक यांचीं कौन्सिलें' होत. याच संघटनांच्या द्वारां क्रांति घडवून आणण्यांत आली. कामगारसंघ, शेतकरी-संघ हे त्या त्या वर्गांच्या आर्थिक हितसंबंधांचें संपादन व रक्षण करीत असतात. त्यांना स्वतंत्र राजकीय ध्येय असत नाहीं. पण सोव्हिअट्स हीं राजकीय क्रांतीचा लढा चालविण्यासाठीं स्थापन झालीं होतीं. जी. डी. एच. कोल लिहितो, "मार्क्सचा सिद्धांत असें सांगतो कीं, भांडवलशाहींतून कम्युनिझम्-कडे जातांना कामगारांनीं उत्पन्न केलेल्या संस्थांच्या साह्यानें चालणाऱ्या कामगारांच्या मुखत्यारीच्या (डिक्टेटरशिप ऑफ् दि प्रॉलेटॅरिअट) राज्यकारभारां-तूनच जावें लागतें. रशियांत राज्यक्रांति झाली ती याच पद्धतीनें झाली. १९२३ च्या राज्यघटनेंत या तत्त्वाचा फारसा उल्लेख नसला तरी तिचा मूलभूत सिद्धांत हाच आहे. असंतुष्ट सैनिकांच्या साहाय्यानें कामगारांनीं बंड करून क्रांति केली. त्यांनीं कामगारांची मुखत्यारी निर्माण करण्यासाठीं ज्या संस्था स्थापल्या त्या सोव्हिअट्स् ऊर्फ "कामकरी, शेतकरी व सैनिक यांचीं कौन्सिलें" होत.

हीं सोव्हियट्स् सर्व आर्थिक, राजकीय, सामाजिक इमारतीचा पायाच होत. अगदीं लहान खेडीं, कार-खाने, यांचीं प्राथमिक सोव्हिअट्स् आहेत. यावरूनच चढत चढत अगदीं शिखरावर पेट्रोग्रॅडचें 'कौन्सिल ऑफ सोव्हिअट्' असे. १९३७ सालीं रशियन राज्य-घटनेंत बदल झाला आहे. पण त्यापूर्वींची राज्यघटना कशी होती हें समजून घेणें महत्त्वाचें आहे. पेट्रोग्रॅडचें कौन्सिल ऑफ सोव्हिअट्स् हेंच वरिष्ठ कायदेमंडळ असे. तें दरसाल एकदां भरे. त्यांतून एक 'प्रेसि-डियम्' निवडलें जाऊन तें 'कौन्सिल ऑफ पीपल्स कॉमिसर्स' म्हणजे मंत्रिमंडळ याचें नियंत्रण करी. सर्व यू. एस्. एस्. आर. चा जो अध्यक्ष त्याचे खालोखाल कौन्सिल ऑफ पीपल्स कॉमिसारच्या अध्यक्षाचा दर्जा असे. १९१७ च्या क्रांतीचा पुढारी लेनिन याची याच पदावर स्थापना झाली होती. याचा दर्जा दुय्यम असला तरी राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें याचेच हातीं असत. सोव्हिअट्सची निवडणूक गुप्त मतदान पद्ध-तीनें न होतां जाहीर सभांतून उमेदवारांचीं व्याख्यानें करवून व सभासदांनीं आपापल्या प्रतिनिधीसाठीं हात वर करून होई. प्राथमिक सोव्हिअट्चे प्रतिनिधी त्याच्यावरच्या सोव्हिअट्सना प्रतिनिधी पाठवीत. हे वरचे सोव्हिअट्स आपल्यावरच्या सोव्हिअट्सना प्रति-निधी पाठवीत. असें चढत चढत पेट्रोग्रॅडचें 'कौन्सिल ऑफ सोव्हिअट्स्' हें वरिष्ठ कायदेमंडळ निवडलें जाई. अगदीं प्राथमिक सोव्हिएट्सना स्वाय-त्ततेचे फारच व्यापक अधिकार असत. कामकऱ्यां-पेक्षां शेतकऱ्यांना प्रतिनिधि फारच कमी देण्यांत येत. यामुळेंच रशियांत कामगारांची मुखत्यारी आहे असें म्हणण्यांत येतें. देशांत कम्युनिस्ट पक्षाखेरीज इतर पक्ष ठेवण्यास बंदी आहे असें मागें सांगितलेंच आहे. १९३७ सालीं वरील राज्यघटनेंत बदल करून गुप्त-मतदानपद्धति सुरू करण्यांत आली. मध्यकायदे-मंडळाचीं दोन सभागृहें करण्यांत आलीं व शेत-कऱ्यांना प्रतिनिधि अधिक देण्यांत आले. तथापि तेथें पूर्ण लोकशाही स्थापन झाली आहे हें म्हणणें अयोग्य असून अजून तेथें कामगारांची मुखत्यारीच आहे.

कम्युनिस्ट पक्ष—एकंदर राज्यघटनेंत कम्युनिस्ट पक्षाचा कोठें उल्लेखही नाहीं. तरी पण सगळें राज्य-यंत्र याच पक्षाच्या हातीं आहे. रशियन राज्यक्रांति-पूर्वी 'सोशल डेमोक्रॅटिक पार्टी' नांवाचा जो पक्ष होता त्यांतील 'बोल्शेव्हिक' पक्षानें क्रांति घडवून आणल्यावर त्यासच 'कम्युनिस्ट पक्ष' हें नांव देण्यांत आलें. पार्लमेंटांतून विशिष्ट राजकीय धोरणाचीं माणसें एकत्र येऊन तेवढ्यापुरते त्यांचे पक्ष बनलेले असतात तशा अर्थाचा हा पक्ष नाहीं. मध्ययुगांत व त्यापूर्वी धर्मक्रांतीचा जोग घेतलेल्या धर्मसेवकांच्या सर्वसंगपरित्यागावर आधारलेल्या जशा संस्था असत, तसा हा कम्युनिस्ट पक्ष आहे. पक्षांत येऊं इच्छिणाऱ्या कम्युनिस्टांची निवड अतिशय काळजीपूर्वक केली जाते. मानसिक तयारीचा तपःकाल त्याला घालवावा लागतो, आणि शिस्तपालन व साधी राहणी याची त्यास शपथ घ्यावी लागते,

१९३४ सालीं पक्षाच्या सभासदांची संख्या २० लक्ष (म्हणजे साधारणतः लोकसंख्येच्या दर ८० स १ कम्युनिस्ट) इतकी होती. या कम्युनिस्ट पक्षाची संघटनाहि अगदीं लहान मुलांपासून केलेली आहे. 'पायोनिअर्स' नांवाच्या अगदीं लहान मुलांच्या संस्था आहेत. १६ वर्षांवरील व २४ वर्षांखालील तरुणांच्या 'कॉम्सोमॉल्स' नांवाच्या संस्था आहेत. यांतून बाहेर पडणारे तरुण कम्युनिस्ट पक्षांत जातात. वैयक्तिक वर्तन व पक्षाच्या कार्यक्रमाची बजावणी यासंबंधानें निस्ट पक्षाच्या चिटणीसाचे हातीं राहते. सध्यां स्टॅलिन हाच या पक्षाचा चिटणीस असल्यानें तोच रशियाचा सर्वाधिकारी आहे.

रशियन कम्युनिस्ट पक्ष हा 'कम्युनिस्ट इन्टरनॅशनल' म्हणून सगळया जगांतल्या कम्युनिस्ट पक्षांची जी मध्यवर्ती संस्था मॉस्कोमध्यें आहे तिचा एक पोटविभाग आहे. या 'कम्युनिस्ट इन्टरनॅशनल'चें ध्येय रशियाप्रमाणें जगांतील प्रत्येक राष्ट्रांत कम्युनिस्ट क्रांति व सोशॅलिस्ट पुनर्घटना घडवून आणावी हें आहे.



कार्पेथो पर्वतांतील एक दृश्य. —रशिया

बंधनें कडक आहेत. प्रत्येक सभासदाचें चरित्र वरचेवर तपासलें जातें व तत्त्वच्युत होणाऱ्यांना पक्षांतून हाकाललें जातें. सोव्हिअट्सूवर कम्युनिस्टांचें वर्चस्व राहावें असा कायदा कोठेंच नाहीं. पण तेच खरे स्वार्थत्यागी समाजसेवक असल्यानें साहजिकच प्रत्येक सोव्हिएट्मध्यें एक दोन तरी कम्युनिस्ट असतातच.

उत्तम शिस्त व सेवाप्रेम हे गुण अंगीं असल्यामुळें कम्युनिस्टांचीच नेमणूक बहुधा अधिकाराच्या जागीं होते. यामुळें रशियांत खरी सत्ता सोव्हियट काँग्रेसच्या हातीं न राहतां कम्युनिस्ट पक्षाच्या काँग्रेसच्या हातीं राहते. आणि राज्यकारभाराची मुख्य सत्ता 'सेंट्रल एक्झिक्युटिव्ह'च्या हातीं न राहतां कम्यु-

१९३४ पासून रशियानें लोकशाही राष्ट्रांशीं आपले स्नेहसंबंध जुळविण्यास सुरवात केली. याच वेळीं हिटलर जर्मनींत सत्ताधारी झाला. त्याचें धोरण उघड उघड बोल्शेव्हिझमविरुद्ध असल्यामुळें रशियाला आपल्या घरची काळजी घेणें प्राप्तच झालें होतें. १९३४ मध्यें रशिया 'लीग ऑफ नेशन्स'चा सभासद झाला. याच वर्षी फ्रान्स व झेकोस्लोव्हाकिया या राष्ट्रांशीं परस्पर सहाय्याचे करार झाले. जपानच्या आक्रमणाविरुद्ध रशियानें चीनला सहाय्य देण्याचें धोरण आंखलें व आजपर्यंत तें पाळलें आहे. झेकोस्लोव्हाकियाच्या खुनाच्या वेळीं फ्रान्सबरोबर सहकार्य करून रशियानें जर्मनीच्याविरुद्ध लढण्याची तयारी दाखविली;

पण इंग्लंडचे मुख्य प्रधान चेंबर्लेन यांची 'शांततेसाठीं' कांहींहि करण्याची तयारी पाहून हिटलरनें फ्रान्स व इंग्लंड या दोन्ही राष्ट्रांना झुलवून ' म्यूनिच करार ' (२९ सप्टेंबर १९३८) करून शेवटीं सर्वांनाच, झेकोस्लोव्हाकिया गिळंकृत करून आपटी दिली, आणि या वेळेपासून रशियाचें परराष्ट्रीय धोरणहि बदलत गेलें. २३ ऑगस्ट १९३९ रोजीं तर जर्मनी व रशिया यामधील परस्पर अनाक्रमणाचा करार झालेला ऐकून सर्व जग विस्मयचकित झालें. १ सप्टेंबर १९३९ रोजीं जर्मनीनें पोलंडवर स्वारी केली व अवघ्या एका पंधरवड्यांत पश्चिम पोलंड पादाक्रांत केला. पोलंडचें सैन्य जर्मनीशीं लढण्यांत गुंतलेलें पाहून रशियानें पूर्व पोलंडवर हल्ला करून युक्रेन उपटला (१७–९–४०) व ता. २२ सप्टेंबर १९३९ रोजीं जर्मनी व रशिया यांनीं जिंकलेला पोलंडचा भाग आपापल्याकडे राहावा म्हणून तह करून रशियानें जगाला दुसरा धक्का दिला.

यानंतरचें रशियाचें धोरण म्हणजे केवळ साम्राज्यवादीचेंच बनलें. फिनलंडकडे नाविक केंद्रासाठीं व सैन्यासाठीं हॅन्गोचा भूभाग व पेटॅसामो हें बंदर मागितलें. याशिवाय सरहद्दीची फेरआंखणी करण्याचीहि मागणी होतीच. फिनलंडनें कांहीं मागण्यांना नकार दिला. तेव्हां ३० नोव्हेंबर १९३९ रोजीं रशियानें फिनलंडविरुद्ध युद्ध पुकारलें. रशियानें फिनलंडचें आपल्या बाजूचें नवें सरकार क्यूसिनेनच्या नेतृत्वाखालीं स्थापिलें. फिनलंडनें मॅनरहीम या गेल्या महायुद्धांत प्रसिद्धीस आलेल्या सेनापतीच्या नेतृत्वाखालीं रशियाशीं मोठ्या धैर्यानें युद्ध केलें. पण इंग्लंड व फ्रान्स यांच्याकडून जरूर तेवढी मदत न मिळाल्यानें व रशियाच्या अवाढव्य सैन्याच्या जोरामुळें फिनलंडला हार खावी लागून १२ मार्च १९४० रोजीं तहाचीं बोलणीं सुरू झालीं; व रशियाला हवा तसा तह होऊन (१७ मार्च १९४०) हें युद्ध संपलें.

इकडे पश्चिम युरोपांत हिटलर एकेक देश पादाक्रांत करीत चाललाच होता, त्याचा फायदा घेऊन दक्षिण युरोपांतील लहानमोठ्या राष्ट्रांशीं कुरापती काढून आणखी लचके तोडण्यास रशियानें सुरवात केली व २७ जूनला (१९४०) रुमानियाचे बेसारेबिया व उत्तर बुकोव्हिना हे प्रांत उपटले. हळूं हळूं रशियाचें प्रस्थ बाल्कन राष्ट्रांत वाढत आहे व हीं बाल्कन राष्ट्रें आतां जर्मनी व रशिया यांच्या तोंडांकडे पाहून चालत आहेत. बाल्टिक राष्ट्रांपैकीं एस्तोनिया, लटेव्हिया, लिथुआनिया यांवरहि रशियाचेंच राजकीय प्रभुत्व आहे असें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. रशियानें कम्युनिझमचें सर्व तत्त्वज्ञान झुगारून दिल्यासारखें वाटण्याइतकी आज परिस्थिति निर्माण केली आहे. जर्मनी–रशियाची गट्टी किती काल टिकते व रशिया युरोपियन राजकारणाला भविष्य कालांत कोणतें स्वरूप देईल याची आज कांहींच कल्पना करतां येत नाहीं.

सध्यां रशियांत एक शेतकीसंबंधीं अभिनव प्रयोग म्हणून एका अवाढव्य शेतावर १७००० शेतकरी काम करीत आहेत.

जर्मनीशीं सहकार्य करून व्हर्सायच्या तहानें बाल्कन राष्ट्रांच्या बाबतींत झालेला अन्याय दूर करण्याचें आपलें धोरण रशियानें नुकतेंच जाहीर केलें आहे.

रस्कीन, जॉन् (१८१९–१९००):–एक नामांकित इंग्लिश लेखक व मार्मिक टीकाकार. याचा जन्म ८ फेब्रुवारी १८१९ मध्यें झाला. याचा बाप दारूचा मक्तेदार होता. रस्किननें ब्रिटनमध्यें सर्व ठिकाणीं प्रवास केलाच; शिवाय फ्रान्स, इटली, स्वित्झर्लंड वगैरे देशांतहि प्रदीर्घ पर्यटन करून आपलें ज्ञानक्षेत्र प्रगल्भ केलें. यास लहानपणापासून कलाभिरुची होती. त्याला १८३६ सालीं ख्राइस्टचर्च ऑक्सफर्डमध्यें प्रवेश मिळाला. इ. स. १८२९ सालीं त्यास न्यूडगेट बक्षिस मिळालें.

त्यानें इ. स. १८४१ सालीं टर्नरच्या चित्रकलेवर पहिला निबंध प्रसिद्ध केला. या निबंधावरून त्यानें १८४३ सालीं मॉडर्न पेंटर्सचा पहिला भाग प्रसिद्ध केला; त्याचा दुसरा भाग इ. स. १८४६ सालीं व उरलेले १८५६ व १८६० सालीं प्रसिद्ध केले. हे सर्व ग्रंथ रस्किनच्या कलाविषयक मार्मिक रसिकतेचीं जिवंत स्मारकें होत. त्यानें इ. स. १८५१ सालीं ' राफेलपूर्व चित्रकला ' हा निबंध लिहिला. तोहि तितकाच महत्त्वाचा आहे. तसेंच पुढें लवकरच प्रसिद्ध केलेल्या The Stones of Venice या ग्रंथानेंहि रस्किनच्या कलाबुद्धीची चमक जनतेच्या निदर्शनास चांगल्या तऱ्हेनें आली. याच सुमारचे त्यांचे आणखी महत्त्वाचे ग्रंथ म्हणजे The Seven Lamps of Architecture (1849), Lectures on Architecture and Painting (1853) व Political Economy of Arts (1857) हे होत. उत्कृष्ट शिल्प

कलेंत, नैतिक भावना व यथोचित मनोविकार यांचें उत्तम तऱ्हेनें आविष्करण केलेलें असतें, हें तत्त्व रस्किननें The Seven Lamps of Architecture या पुस्तकांत प्रतिपादन केलें आहे. हेंच तत्त्व त्यानें अधिक खुलाशानें The Stones of Venice या पुस्तकांत ग्रथित केलें आहे. रस्किनच्या मतानें, गोथिक शिल्पकला ही जास्त वास्तवता निदर्शक होती; निरागस धर्मश्रद्धा व कौटुंबिक समाधान यांतूनच शिल्पकलेचा उगम होतो, हें लक्षण गोथिक शिल्पकलेंत जसें दिसून येतें तसें विद्येच्या पुनरुज्जीवनाचे वेळीं झालेल्या कलाविलासांत दिसून येत नाहीं.

रस्किननें समाजकार्यांतहि बरेंच लक्ष घातलें. १८५४ सालीं एफ्. डी. मॉरिस किंग्स्ले व इतर मंडळींनीं Working Men's College नांवाची संस्था काढली. त्या संस्थेस रस्किननें प्रथम पाठिंबा दिला. इ. स. १८६० सालीं Unto this Last हा निबंध Cornhill Magazine मध्यें प्रसिद्ध करून आधिभौतिक शास्त्रांच्या धर्मशून्य व कलाशून्य अंगोपांगांवर हल्ला चढविला. इ. स. १८७१ पर्यंतचीं त्यांचीं आणखी महत्त्वाचीं पुस्तकें म्हणजे Munera Pulveris (१८६२), Time and Tide (१८६७) व Sesame and Lilies (१८७१) हीं होत. या सर्व पुस्तकांत त्यानें कार्लाइलच्या आध्यात्मिक विचारशैलीला सोपपत्तिक पाठिंबा दिला आहे. १८६४ ते १८६८ पर्यंत औद्योगिक सुधारणा होऊन तिचा कलांवर दुष्परिणाम झाला त्या व तत्समान विषयांवर त्यानें अनेक व्याख्यानें दिलीं; तीं Sesame and Lilies या पुस्तकांत प्राध्यान्येंकरून समाविष्ट केलीं आहेत. रस्किनच्या अव्वल विचारांची छाप या पुस्तकांवर पडली आहे. त्याची ही सर्वोत्कृष्ट कलाकृति होय.

इ. स. १८६९ सालीं ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटींत त्यांची प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. या जागेवर तो १८८४ पर्यंत (मध्यंतरीं कांहीं वर्षे सोडून) होता. या काळांत त्यानें नीति, कला, राजकारण, व्यापार, साहित्य वगैरे अनेक विषयांवर विचारप्रगल्भ व्याख्यानें दिलीं. तीं पुढें ग्रंथरूपानें प्रसिद्ध झालीं; त्यांचीं नांवें— The Eagle's Nest (1872) Ariadne Florentina (1172), Val d Arno (1872) The Art of England (1883) व Fors Clavigera (1871-84). रस्किनची शेवटची महत्त्वाची कृति Praeterita ही आत्मचरित्रात्मक असून त्यांत त्यानें आपल्या धार्मिक प्रवृत्तीचा विकास कसा होत गेला याचें दिग्दर्शन केलें आहे.

रस्किनच्या खाजगी जीवनाबद्दल दोन गोष्टींचा प्रामुख्यानें निर्देश करणें अवश्य आहेः—(१) त्यास पत्नीपासून सुख लाभलें नाहीं व (२) त्याचा उदरनिर्वाह लेखनावर मिळालेल्या कमाईवरच झाला. त्याला वडिलार्जित मिळकतीपैकीं ७५०,००० पौंड मिळाले; पण त्यानें ती सर्व मिळकत सार्वजनिक शैक्षणिक व सामाजिक, संस्थांना देऊन टाकली. २० जानेवारी इ. स. १९००, रोजीं तो खिस्तवासी झाला. " जीवनाच्या प्रत्येक हालचालींत कलेचा हात आला पाहिजे " हा संदेश लोकांना प्रभावी गद्यांत सांगणारा निर्भीड महात्मा म्हणून रस्किनला इंग्लंडच्या इतिहासांत स्वतंत्र महत्त्व आहे.



जॉन रस्किन

रागः—भारतीय संगीतशास्त्रग्रंथांत या शब्दाचा प्रयोग प्रामुख्यानें आढळतो. ग्रंथांत रागाची व्याख्या खालीलप्रमाणें केली आहे:—

योऽयं ध्वनिविशेषस्तु स्वरवर्णविभूषितः
रंजको जनचित्तानां स रागः कथितो बुधैः ॥

भावार्थ—स्वरांतून उत्पन्न होणारा वादी, संवादी व वर्ण यांनीं विभूषित व लोकमनरंजन करणारा स्वरसमूह म्हणजे राग होय. प्रत्यक्ष गायनांत होणाऱ्या स्थायी, आरोही, अवरोही व संचारी इत्यादि ज्या क्रिया त्यांना वर्ण म्हणतात. प्रत्येक रागांत तो गातांना त्याच्या नियमित स्वरांपैकीं एखाद्या स्वराला प्राधान्य देणेंत येतें, म्हणजे त्या स्वराचा उपयोग वर्णमध्यें वारंवार केला जातो, त्यास वादी किंवा अंशस्वर असें म्हणतात. त्याचप्रमाणें ज्या एखाद्या दुसऱ्या स्वरास दुय्यम प्राधान्य देणेंत येतें त्यास संवादी स्वर असें संबोधण्यांत येतें. रागांत हे वादी—संवादी स्वर षड्ज—पंचम किंवा षड्ज—मध्यम भावांत असतात; व त्यायोगेंच स्वरांच्या या रचनेंतून रस व माधुर्य उत्पन्न होतें. ते रागाचा आत्माच होत.

आपल्या संगीतांतील रागनांवें व तसेंच त्यांच्या उत्पत्ती वगैरेंचा विचार केला तर, कांहीं रागनांवें ऋतूनांवांवरून, कांहीं देशनांवांवरून, व कांहीं कविकल्पनेवरून ठेविलेलीं आढळतात. जसें वसंत, मेघ, कानडा, मुलतानी, सिंध काफी, हिंडोल, इत्यादि. अशा नियमांनीं उत्पन्न केलेले सरासरी शंभर ते सव्वाशे राग आपणांस निरनिराळ्या ग्रंथांत उल्लेखलेले आढळून येतात. प्राचीन कर्नाटकी व हिंदुस्थानी ग्रंथकार या सर्व रागांचें वर्गीकरण वेगवेगळ्या पद्धतीनें करीत असत. कर्नाटकी ग्रंथकारांनीं जन्य राग आणि जनक मेल अशा प्रकारें तें वर्गीकरण केलें आहे व तेंच हल्लीं प्रचारांत ग्राह्य व प्रमाण मानलें जातें. हिंदुस्थानी बरेच ग्रंथकार रागांचें वर्गीकरण सहा राग, छत्तीस रागिणी व बाकीचे पुत्रराग वगैरे पद्धतीनें करीत असलेले आपल्या दृष्टीस पडतात. तें वर्गीकरण त्या काळीं योग्यही असेल. परंतु संगीत परिवर्तनशील असलेनें तें रागवर्गीकरण नवीन रागस्वरूपांना विसंगत दिसूं लागलें. म्हणून अधिक समंजस व तर्कशुद्ध जन्यजनक मेलवर्गीकरण पद्धतीच अर्वाचीन ग्रंथकारांनीं स्वीकारली आहे. ते सहा राग (१) भैरव (२) मालकौंस, (३) हिंडोल (४) दीपक (५) श्री (६) मेघ, अशा अनुक्रमानें कांहीं कांहीं ग्रंथांत आढळतात. मतमतांतरीं हीं सहा रागनांवें व छत्तीस रागिणीनांवें निरनिराळीं आढळतात. जन्यजनक पद्धतींत जनकांना मेल म्हणतात. असे ७२ मेल ते मानीत असत, व त्या मेलाखालीं इतर रागांची व्यवस्था लावीत असत. हिंदुस्थानी कांहीं ग्रंथकार पंडित कर्नाटकी पद्धतीप्रमाणें ७२ मेल न मानतां सोयीकरितां व सुलभतेकरितां ही मेलसंख्या कमी करून रागव्यवस्था करितात. रागविबोधकार तेवीस जनक मेल मानितात.

भावभट्टांनीं ही संख्या विसावर आणिली आहे. परंतु इतक्या जनक मेलांच्या साहाय्यानें रागवर्गीकरण करणें अवघड पडत असून राग समजूत देणेंत सुलभता व बिनचूकपणा येत नाहीं. म्हणून पंडित भातखंडे इ. अलीकडील ग्रंथकार जनकमेल दहाच मानून त्यांच्या सहाय्यानें राग वर्गीकरण करितात. परंतु सूक्ष्म दृष्टीनें रागअभ्यासूंस ही व्यवस्था अपूर्ण वाटते. म्हणून " रागांग–पद्धती " प्रचारांत आणणें जरूरीचें आहे; ती खालीलप्रमाणें असेल:—

रागांग–पद्धती–या पद्धतीनुसार मुख्य रागांगें तीस मानून, कोणत्याही रागाची समजूत देणेंची म्हणजे रागाचे स्वर सांगून रागांग सांगितलें कीं पुरें. राग चांगला कळतो. ही वर्गीकरणपद्धति बरीच बिनचूक व राग समजणेस सोपी व उपयुक्त वाटेल अशी अपेक्षा आहे.

१ **भैरव**–(जोगी, कालिंगडा, रामकली, गुणक्री, गौरी. २ **कल्याण**–(चंद्रकांत, शाम, शुद्ध कल्याण.) ३ **खमाज**–(झिंजोटी, तिलंग, मांड, खंबावती, चंपक.) ४ **काफी**–(सिंध काफी.) ५ **पूर्वी**–(पूरिया, पुरिया धनाश्री, रेवा.) ६ **मारवा**–(सोहिनी.) ७ **तोडी**–(मुलतानी, गुर्जरी.) ८ **बिलावल**–(अल्हैया, देवगिरी, यमनी, सरपरदा, लच्छासाख, शुक्ल बिलावल.) ९ **सोरठ**–(देस, तिलक कामोद.) १० **आसावरी**–(जीवनपुरी, देवगांधार, देसी.) ११ **सारंग**–(ब्रिंदावनी.) १२ **भैरवी**–(मालकंस, बिलासखानी, धनाश्री.) १३ **पिलू**– १४ **हिंडोल**–(भिन्न षड्ज.) १५ **ललीता**–(पंचम.) १६ **श्री**–(गौरी [चैत्रा], तिरवन.) १७ **बागेश्री**–(रागेश्री, मालगुंजी, जयजयवंती.) १८ **कानडा**–(बहार, अडाणा, सुहा, सुधराई, शहाणा, गुंजी कानडा, नायकी.) १९ **केदार**–भवानी केदार, मलुहा केदार.) २० **मल्हार**–(गौड मल्हार, रामदासी सूर, दासी, मेघ, जयंत.) २१ **बिभास** २२ **नट**–(छाया नट.) २३ **शंकरा**–(हंसध्वनि.) २४ **भूपाली**–(देसकार.) २५ **आसा** २६ **कामोद**–(हमीर.) २७ **बिहाग**–(बिहागडा.) २८ **भीमपलासी**)–धानी, पटदीप, हंसकंकिणी, प्रदीपिका.) २९ **बसंत**–(परज.) ३० **दुर्गा**–(भवानी.) ३१ **भटियार**–(भंखार.)

राघोबादादा पेशवे (१७२९–१७८३):–भगवा झेंडा अटकेवर फडकविणारा व झपाट्यानें सैनिक हालचाली करणारा पेशवा. हा पहिल्या बाजीरावाचा तिसरा मुलगा. तारुण्यापर्यंतचा याचा काळ सातार्‍यास दरबारांत गेला. घरीं व दरबारीं चालणारें राजकारण त्यास लहानपणापासूनच पाहण्यास मिळाल्यामुळें हा त्यांत चांगलाच निष्णात झाला.

थोरला झाल्यावर यास नानासाहेब पेशव्यांनीं उत्तरेकडची कामगिरी सांगितली. ही कामगिरी त्यानें दोन स्वार्‍या करून पार पाडली. पहिल्या स्वारीपेक्षां

दुसऱ्या स्वारींतच अटकेवर झेंडा लावण्याची कामगिरी व अब्दालीचा अम्मल नष्ट करून मराठ्यांचा दरारा वाढवण्याचें कार्य यानें केलें. वरील दोन्ही स्वाऱ्यांत त्यानें झपाट्यानें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं सैन्यें नेलीं म्हणून इतिहासांत 'राघो भरारी' या नांवानें त्याची प्रसिद्धि झाली.

याचें यश वाढूं लागल्यामुळें हा कदाचित् डोईजड होईल या भावनेनें नानासाहेब पेशव्यानें त्यास परत बोलाविलें. हा पुण्यास आला त्या वेळीं याची पहिली बायको वारली होती. यानंतर हा दक्षिणेकडच्या कांहीं लढायांत हजर होता. पुढें नानासाहेब पेशवे वारून माधवराव पेशव्यांची आमदानी चालू झाली. अहिल्याबाई होळकरीण इचें प्रकरण, नारायणरावाचा वध, त्यांतून निर्माण झालेलें बारभाईंचें कारस्थान इत्यादि प्रकरणांवरून हा स्वजनांना अतिशय अप्रिय बनला. तशांतच दुसरी बायको आनंदीबाई इच्या शिकविण्यानें हा बेताल वागूं लागला. तसेंच पेशव्यानें महत्प्रयासानें संपादन केलेल्या मुलखाची यानें स्वतःला शत्रुपक्षाचें पाठबळ मिळावें म्हणून धूळधाण केली आणि त्यामुळें वरच्या अप्रियतेला आणखी अविश्वासाची जोड मिळाली. म्हणून याची पेशवाई मिळविण्याचीं कारस्थानें नाना फडणवीस आणि महादजी शिंदे यांनीं हाणून पाडून आपले बेत सिद्धीस नेले. शेवटीं निरुपाय झाल्यानें हा कोपरगांव येथें २५००० रु. ची नेमणूक घेऊन राहूं लागला. तेथेंच हा ११–१२–१७८३ ला मरण पावला.

याला आनंदीबाई व जानकीबाई या नांवाच्या दोन स्त्रिया होत्या. पैकीं जानकीबाई ही पहिली. आरंभीं यानें बरेच दिवस मूल न झाल्यामुळें अमृतराव यास दत्तक घेतलें. दत्तकानंतर आनंदीबाईला दुसरा बाजीराव व चिमाजी हे दोन मुलगे व गोदूबाई नी दुर्गाबाई या दोन मुली झाल्या.

राजगोपाळाचारीयर, चक्रवर्ती (१८७९–):– मद्रास प्रधानमंडळाचे काँग्रेसपक्षीय प्रथम पंतप्रधान व महात्मा गांधींचे व्याही. १८७९ ला जन्म. मद्रासमधील प्रेसिडेन्सी व लॉ या कॉलेजांतून उच्च शिक्षण झालें. १९०० मध्यें यांच्या वकिलीस प्रारंभ. लौकरच ते सालेम येथील एक सुप्रसिद्ध वकील बनले. पुढें यांनीं वकिली सोडून १९१९ च्या असहकारितेच्या चळवळींत भाग घेतला. हाच क्रम पुढें अनेकवार चालू राहिल्यानें बंदिवासाचा अनुभव यांना अनेकदां घ्यावा लागला. म. गांधी संपादित असलेल्या 'न्यू इंडिया' या पत्राचें कार्यहि ते करीत असतात. १९२१–२२ त सर चिटणिशीचें पद यांच्याकडे होतें. काँग्रेसच्या अस्पृश्योद्धार परिषदेच्या कार्यकारी मंडळाचें सभासदत्व यांच्याकडे कांहीं काल होतें. १९३० च्या सविनय कायदेभंगांत भाग घेतल्याबद्दल सरकारनें यांना बंदिशाळेंत घातलें. १९२६ पावेतों काँग्रेसच्या 'तामीळनाडू' शाखेचे हे अध्यक्ष होते. १९३७ मध्यें मद्रास प्रधानमंडळाचें धुरीणत्व काँग्रेस पक्षानें यांच्याकडे दिलें. महात्माजींच्या राजकीय तत्त्वज्ञानाचे निर्भय पुरस्कर्ते, पंडित, उत्तम वक्ते, कसलेले मुत्सद्दी, मुरब्बी राजकारणी व म. गांधींच्या चिरंजीवांना यांनीं आपली कन्या दिलेली असल्यामुळें सुधारक या नात्यानें ते सर्वांच्या परिचयाचे आहेत. १९३९ नोव्हेंबरमध्यें यांच्या मंत्रिमंडळानें राजीनामा दिला.

राजवाडे, विश्वनाथ काशीनाथ (१८६३–१९२६):–अस्सल कागदपत्रांवरून इतिहास–संशोधन करण्याच्या महाराष्ट्रांतील परंपरेचे आणि पुणें येथील भारतइतिहाससंशोधकमंडळाचे (स्थापना स. १९१०) प्रस्थापक; धुळें येथील राजवाडे संशोधनमंदिर संस्थेचे (स्थापना स. १९२९) आणि अशाच तऱ्हेच्या इतिहास, समाजशास्त्र आणि भाषाशास्त्रविषयक अभ्यासाचे प्रेरक व कार्यकर्ते; वैय्याकरणी, व्युत्पत्तिविशारद आणि डॉ. केतकर लिहितात त्याप्रमाणें 'संस्कृति–विकास–प्रवर्तक'; मूलग्राही शास्त्राभ्यासक आणि महाराष्ट्रांत शास्त्रीय विचारसरणी प्रसृत व्हावी म्हणून आरोग्यमंडळ, समाजशास्त्रमंडळ, भौतिकशास्त्रसंशोधनमंडळ इत्यादींचे संस्थापक व पुरस्कर्ते; उत्कट देशाभिमानी आणि हलक्या दरानें कर्ज देणारीं मंडळें, रेल्वेच्या तक्रारी दूर करणारें मंडळ असें कार्य उचलून धरणारे व्यापक दृष्टीचे कार्यकर्ते; मराठी भाषा आणि भारतीय संस्कृतीचे तीव्र अभिमानी; महानुभाव पंथाच्या ग्रंथांची सांकेतिक लिपी एकाकी प्रयत्नांनीं उलगडणारे असामान्य कल्पक व चिकित्सक; 'महाराष्ट्राला संताळ्यांनीं निष्क्रिय केलें,' 'मराठी भाषा मेली' अशांसारखीं एकांतिक वाटणारीं पण तळमळीचीं विधानें करणारे निस्पृह वक्ते आणि लेखक; आणि प्रचंड कार्यक्षमता, स्वैर तर्कपद्धति, अफाट कार्यसंतति आणि एकदां वाहून घेतल्यानंतर अमर्याद

परिश्रम करून संन्यस्त वृत्तीनें कार्य करण्याची पद्धति यांमुळें महाराष्ट्राला ललामभूत झालेली विद्वान् व्यक्ति.

मूळचें उपनांव जोशी आणि गांव रत्नागिरीजवळचें निवें. कोंकण सोडून राजवाडे घराणें तीनचार पिढ्या पुण्याचेच स्थायिक झाले होते. जन्मस्थान कोंकणांत वरसई. जन्म ता. २४ जून १८६३. वडील व चुलते दोघेहि वकील. वडील बंधु प्रिन्सिपल वैजनाथ काशी-नाथ राजवाडे. प्राथमिक शिक्षण—वडगांव; दुय्यम शिक्षण—पुणें. मॅट्रिक १८८२. कॉलेजचें शिक्षण—एक-सहामाही एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई, नंतर डेक्कन कॉलेज पुणें, बी. ए. १८९०. परीक्षेच्या आराधनेंत व्यर्थ कालक्षेप करण्याची नावड. कोणत्याहि परीक्षेंत नापास झाले नाहींत. ते म्हणतात 'डेक्कन कॉलेजांत जातांच दर दोन दोन महिन्यांनीं एक एक परीक्षा जर घेतली असती तर (बी. ए.पर्यंतच्या) तिन्ही परीक्षा पहिल्या सहामाहींतच पास झालों असतों ! परंतु टर्म भरणें सहामाही, प्रिलिमिनरी परीक्षा, आणि मुंबईच्या फेऱ्या अशा खुळांत सहा वर्षें रखडावें लागलें. ह्या रखडण्यांत मग 'माझ्या मनाला योग्य वाटलें तेंच केलें. कॉले-जांतील खुळचट शिस्तीला बळी न पडतां, व मन व मेंदू यांना शैथिल्य व शीण न येऊं देतां, जगांत जास्त उत्साहानें काम करण्यास मी सिद्ध झालों. '

विवाह १८८८—गोडबोले घराणें; पत्नी बाळंत-रोगानें वारली १८९३, मुलगाहि गेला. गृहजीवन व पर्यायानें कुटुंबाशीं संबंध अशा रीतीनें अवघ्या २८ व्या वर्षीं तुटला आणि राष्ट्रासाठीं सन्यस्त वृत्ति स्वीकारून कार्य सुरू झालें.

कॉलेजमध्येंच अभ्यासाकडे जुजबीच लक्ष असे. परंतु युरोपीय इतिहास आणि अनुषंगानें अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, मानसशास्त्र, वनस्पति-शास्त्र इत्यादि शास्त्रें व फारसी आणि फ्रेंच भाषा यांचा थोडा फार अभ्यास केला होता. सरकारी नोकरी न करण्याचा निश्चय होतांच काव्येतिहाससंग्रहादि वाचनानें मराठ्यांच्या इतिहासाची स्वतंत्र रचना करण्या-कडे त्यांचा कल होता. आणि यद्यपि प्रथम १८९१–९२ एम्. ए.चा मध्येंच सोडून दिलेला अभ्यास, पुण्यांतील शाळांतून अल्पकाल शिक्षकाचें काम, आणि १८९४ पासून त्या वेळच्या लोकसेवेच्या कल्पनांप्रमाणें 'भाषांतर' मासिकाचें संपादन (३७ अंक व १५ ग्रंथांचीं पुरींअपुरीं भाषांतरें) अशा गोष्टी त्यांनीं केल्या, तथापि 'मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनां'चे २२ खंड प्रसिद्धि (इ. स. १८९८ ते १९१७) हेंच त्यांचें खरें युगप्रवर्तक कार्य होय.

राजवाड्यांच्या पूर्वी श्री. साने, खरे यांनीं इतिहासो-पयोगी समकालीन कागदपत्र प्रसिद्ध केले होते. परंतु याच एका कार्यासाठीं फकिरी स्वीकारून आमरण स्वतःला वाहून घेणें ही असामान्य गोष्ट राजवाड्यांनीं केली. ठिकठिकाणीं विखुरलेली आणि काळजीच्या अभावीं त्वरेनें नाश पावत असलेली ही साधन—संपत्ति केवळ राजवाड्यांच्या परिश्रमांमुळें उपलब्ध झाली. त्यांनीं साधनांचीं ५३०० पृष्ठें छापलीं, कांहीं संग्रहांना चिकित्सक व मूलग्राही प्रस्तावना लिहिल्या, आणि इतिहास—संशोधनाची एक स्वतंत्र परंपराच निर्माण केली. ती पुण्याच्या भा. इ. सं. मंडळांत व महाराष्ट्रांत इतरत्र प्रामुख्यानें चालू आहे.

इतिहासाशिवाय व्याकरण, समाजशास्त्र, भाषा-शास्त्र आणि त्यांतहि विशेषतः व्युत्पत्तिशास्त्र यांबद्दल त्यांनीं अनंत परिश्रम केले व पुष्कळच लिहिलें. त्यांचे प्रसिद्ध झालेले अनेक लेख आणि त्यांतील सिद्धांत खळबळ उडविणारे ठरले. त्यांचें अप्रसिद्ध लिखाण आणि गोळा केलेलीं सर्व कागदपत्रांची सामग्री राज-वाडे संशोधनमंदिर, धुळें येथें संग्रहित केलेली आहे. राजवाडे यांनीं शेवटीं सुमारें ३० हजार मराठी धातूंची व्युत्पत्ति ठरविली व आणखी कितीतरी कार्य करावयाचें म्हणून आत्मविश्वासानें आंखून ठेविलें होतें; परंतु अनपेक्षितपणें तीन चार दिवसांच्या आजारानें ता. ३१ डिसेंबर १९२६ रोजीं धुळें येथें त्यांचें देहा-वसान झालें.

'मराठ्यांच्या इतिहासाच्या साधना'शिवाय त्यांच्या हयातींत व हयातीनंतर प्रसिद्ध झालेले त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ——ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वरीचें मराठी व्याकरण (इ. स. १९०९), सुबंतविचार (इ.स.१९१२), संस्कृत भाषेचा उलगडा (१९२०), राधामाधवविलासचंपू (१९२२), महिकावतीची बखर (१९२४), ऐतिहासिक प्रस्तावना (१९२८), संकीर्ण निबंध (१९३५), राज-वाडे मराठी धातुकोश (१९३८). याशिवाय त्यांचे अनेक विषयांवरील नियतकालिकांतून आलेले स्फुट निबंध पुनर्मुद्रित झालेले आहेत.

राजाराम छत्रपती (१६६९–१७००):— हा छत्रपती शिवाजी महाराजांचा धाकटा मुलगा व महाराष्ट्र—राज्यावरील तिसरा राजा होय. ह्याचा

जन्म शके १५९१ च्या फाल्गुनांत, राज्यारोहण म्ह. मंचकारोहण समारंभ शके १६१० च्या फाल्गुनांत आणि मृत्यु शके १६२१ च्या फाल्गुनांत झाला. ह्याप्रमाणें राजारामाचें आयुष्य ३० वर्षांचें. पैकीं वयाच्या १९ व्या वर्षांपासूनचीं पुढलीं ११ वर्षें त्याचीं राजकारकीर्द झाली. रायगडावरच राजारामाचा मुंजविधि व लग्नविधि शिवाजीराजे विद्यमान असतां झाला. त्या कालच्या मानानें मिळावयाच्या त्या शिक्षणाचा लाभ राजारामास लाडकेपणामुळें व घरांतील सापत्नभावामुळें फारसा मिळाला नसतांहि त्याची राजवट महाराष्ट्र–राज्यरक्षणाच्या दृष्टीनें संस्मरणीय अशी झाली. शिवाजीनंतर राजारामाचें नांव पुढें करून आण्णाजी दत्तो सचीव ह्यांच्या पक्षानें औरंगजेबाकडून निघून आलेल्या अकबर पुत्रामार्फत कांहीं खटपट चालवली होती. पण ह्यांत राजारामावरील प्रेमापेक्षां संभाजीसंबंधींचा तिरस्कारच अधिक कारणीभूत होता. पण आतां आठ वर्षांनीं स्वतः राजारामच राज्याधिकारी झाला, आणि ह्या वेळीं (इ.१६८९ फे.) महाराष्ट्र देश भयंकर आपत्तींत सांपडला होता. एक प्रकारें असें म्हणणें प्राप्त आहे कीं, ही आपत्ति न येती तर दुसरी घरफुटीची आपत्ति, जी पुढें ८४ वर्षांनीं महाराष्ट्रइतिहासांत ओढवली, ती कदाचित् आतांच कोसळली असती. पण महाराष्ट्रीयांच्या आंगचा प्रसंगीं दिसून येणारा गुणसमुच्चय त्यामुळें जगाच्या निदर्शनास आला; तसेंच त्यामुळें 'महाराष्ट्रीय' म्हणवून घेणें हें कोणालाहि अभिलषणीय व अभिमानाचें वाटावें असा तो काल त्या आपत्तीच्या निरसनानें इतिहासालंकृत झाला व तीच राजारामाची राजवट होय.

राजारामाच्या राजवटींत महाराष्ट्रराज्याची राजधानी कर्नाटकांत जिंजी येथें झाली. अर्थात् हें जें देशान्तर झालें तो (१) प्रवासप्रसंग (२) जिंजींतील वास्तव्य व तेथूनचा राज्यकारभार, (३) त्या अवधींतील महाराष्ट्र व कर्नाटक ह्या दोन्ही ठिकाणीं महाराष्ट्रवीरांनीं औरंगजेबाशीं केलेला संग्राम, व (४) ह्या संग्रामप्रसंगानें राजाराम छत्रपतींनीं महाराष्ट्राला दिलेला संदेश ह्या राजारामराजवटींतील चार मुख्य गोष्टी होत. छत्रपती संभाजीचा औरंगजेबानें वध करून रायगड राजधानी घेण्याकरतां ईतिकद्खानास ससैन्य रवाना केलें. हें ऐकून रायगडावरील कारभारी व राजकुटुंबांतील मंडळींच्या दूरांदेशी धोरणानें राजारामानें स्वतःस राज्यारोहण–नव्हे, कारण तो मान रीतीप्रमाणें शाहूचा–मंचकारोहणविधि करून जड पावलानें गड सोडला. नंतर तो प्रतापगडावरून पन्हाळ्यास व तेथून रांगणा, गोकाक, सौंदत्ती, हुबळी, बंकापूर, बेदनूर, वेलोर, इ. ठिकाणीं वास्तव्य करीत जिंजी येथें पोंचला. वाटेंत औरंगजेबाच्या हुकुमाप्रमाणें शेख निजाम, रुहुल्लाखान, सय्यद अबदुल्ला, अलीखान वगैरे सरदार ठिकठिकाणीं पाठलाग करीत येत होते. पण त्यांशीं रूपाजी भोसले, बहिरजी घोरपडे, खंडो बल्लाळ, दाभाडे, केसो त्रिमल पिंगळे इ. वीर व स्वामिनिष्ठ मंडळींनीं कोठें सामना देत तर कोठें वेषांतर करून, कोठें लपत छपत तर केव्हां बेदनूरकर राणीकरवीं सत्कार घेत, आपला हा पांचशेंहून अधिक मैलांचा प्रवास मोठ्या चतुराईनें पुरा केला. हा प्रवास १६८९ सप्टेंबर ते नोव्हेंबर १५ पर्यंत चालला. राजारामाच्या चरित्रांतील हा प्रवास म्हणजे वर्णनीय भागच झाला व त्यासंबंधानें एक स्वतंत्र संस्कृत काव्यच झालें आहे. राजाराम तिकडे गेल्यामुळें तिकडील हिंदूंची, तसेंच देशी मुसलमानांचीहि संभाजीच्या वधामुळें व अदिलशाही व कुतुबशाही गेल्यामुळें मोंगलाविषयीं जी भीति उत्पन्न झाली होती ती जाऊन धीर आला; आणि इकडे महाराष्ट्रांत सर्व दक्षिण यवनमय करण्याचा चंग बांधून व त्यासाठीं आपली सर्व पातशाही शक्ति पणास लावून बसलेल्या औरंगजेबाचें सामर्थ्य दुभंगलें गेलें.

जिंजीस राजाराम पोंचतों तों पाठोपाठच मोंगल सरदार झुल्फिकारखान मोठी फौज घेऊन जिंजी वेढून बसला. हा जिंजीचा वेढा आठ वर्षें होता. अर्थात् राजाराम कोंडला गेला; पण तशाहि स्थितींत प्रल्हाद निराजी, कृष्णाजी अनंत, सेनापती पानसंबळ, सुंदर बाळाजी, कदम, घाटगे, बहिरजी घोरपडे इ. इ. राजकार्यधुरंधर शूरांच्या व मंत्र्यांच्या सहाय्यानें आणि विशेषत: शूराग्रणी संताजी घोरपडे, नावजी बलकवडे, धनाजी जाधव, माने, जेधे, ढगे ह्या फिरत्या रणधुरंधरांकरवीं यावनीमंडळ निर्यवन करण्याचा उद्योग राजारामानें जिंजीहून व विशाळगडाहून रामचंद्रपंत अमात्यानें चालविला. खानाच्या वेढ्याची ह्या वीरांनीं अशी दुर्दशा करून टाकिली कीं, खानानें एकदां (इ.स. १६९३) आपला वेढा उठवूनहि टाकला, व तेवढ्यांत राजारामानें तंजावर गांठलें व तेथील आपला चुलत भाऊ शहाजी व त्रिचनापल्लीचा नायक राजा ह्यांच्याशीं संगनमत केलें. औरंगजेबानें विजापूर व गोवळकोंडा येथील शाह्या बुडविल्यामुळें दक्षिणी मुसलमानांचा


म्हणजे देशी मुसलमानांचा पक्षहि जो महाराष्ट्र–राज्याशीं सहानुभूतीनें वडीलकीचा मान देऊन वागण्यास राजी त्यांतील सरदारमंडळीहि महंमद सादिक, इस्माइलखान मका, अस्करअल्लीखान, इ. मराठ्यांस सामील झाली. झुल्फिकारखानाच्या सहाय्यास आलेला औरंगजेबाचा फर्जंद कामबक्ष ह्यांच्यांतहि भांडण लागलें. तात्पर्य, ह्या वेढ्याचा शेवट असा झाला कीं, खान राजारामाशीं तहाचेंच बोलणें करण्यास उत्सुक झाला. संताजीनें, ही वेळ मोंगलसरदारांचा नष्टांशच करण्याची आहे असें सुचविलें. पण राजारामानें सौम्यता धरून वागणूक केली व राजा कर्ण, खंडोजी बल्लाळ ह्यांस खानाकडे संधीचें बोलणें करण्यास पाठविलें. एकंदरींत वेढा आतां नांवाचा उरला. ह्याच प्रांतीं असतांना राजारामानें मद्रासच्या दक्षिणेकडील नागपट्टम् हें ठिकाण भोंवतालच्या थोड्याशा जागेसह इंग्रज वखारवाल्यांस खरेदी दिलें. इकडे औरंगजेबानेंहि बंदुका घेण्याच्या अटीवर पश्चिम किनाऱ्यावर चांचेगिरी करणाऱ्या कप्तान कीड ह्याच्याशीं तह केला. राजाराम जिंजीहून निघून गेल्यानंतर तो किल्ला मोंगल सरदारांच्या हातीं पडला. राजाराम शिर्के व मोहिते ह्यांच्या योजकतेमुळें वेढ्यांतून निसटला व धनाजीच्या सैन्यांत मिसळून वेलोर गदग ह्या मार्गानें मोंगली सैन्याशीं लढाई देत परत विशाळगडीं इ. सन १६९८-च्या फेब्रुवारींत पोंचला.

ह्या आठ वर्षांत इकडे महाराष्ट्रांत रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण, सिधोजी गुजर, त्रिंबक शिवदेव, रामभट पटवर्धन, गणोजी झेंडे, नागोजी माने, समशेरबहादर आटोळे, निंबाळकर, लिंगोजी शंकर, नागनाक महार, ढमाले देशमूख इ. इ. मराठा, प्रभु, ब्राह्मण, महार इत्यादि सर्व महाराष्ट्रीयांनीं असा मोगल पातशहास हात दाखविला व ठिकठिकाणीं साहसानें व एकजुटीनें लढाई दिली कीं, 'मराठा मोडत नाहीं' हें त्या पातशहास पूर्ण कळून चुकलें. लढण्यांतील भालेराईची पद्धत ह्याच वेळीं उदय पावली व कारणीं लागली. महाराष्ट्रीयांच्या पराक्रमामुळें, यौद्धिक चापल्यामुळें, राजकारणी चातुर्यामुळें ह्या वेळीं नवनव्या अधिकारदर्शक मानाच्या पदव्या निर्माण झाल्या. सेनाधुरंधर, हिंदुराव, सुभालष्कर, प्रतिनिधि, समशेरजंग इ. ह्याच कालांत महाराष्ट्राच्या उत्तरेस जाऊन मोंगली मुलुखावर आक्रमण करून महाराष्ट्रांतील पादशहास पायबंद देऊन ओढा लावण्यास प्रारंभ झाला. महाराष्ट्रीयांच्या अंगची विस्कळीत प्रसंगामध्यें निर्नायकी असतां, शत्रूचा सेनासंभार घरांत घुसला असतां, धैर्याची, स्वातंत्र्यप्रीतीची, धर्माभिमानाची, चिकाटीची गुणपरीक्षा ह्या कालीं कसोटीस उतरली, व त्यामुळें 'महाराष्ट्रीय' किंवा 'मराठा' ही संज्ञा अभिमानाची व अभिलाषणीय होऊन बसली. राजारामानें ह्या प्रसंगानें जो संदेश दिला तो हाच होय कीं, 'तुम्ही लोक जेव्हां मनावरी धरतां तेव्हां गनिमाचा तो हिसाब काय? गनीम हा तुम्ही लोकीं केला आहे. हें महाराष्ट्रराज्य आहे. गनिमाचें लष्कर आटोन हुजूर येत आहे. राज्य करणें हें ईश्वरें निर्मिलें आहे. तरी महाराष्ट्र–धर्माची आस्था धरोन स्वामीकार्य करोन एकनिष्ठेनें नामोश होय तें करावें.' हें राजारामाच्या कारकीर्दीचें सार राजारामानें महाराष्ट्र-राज्यरक्षण केलें. राजाराम जिंजीस असतां शाहूच्या सुटकेचा प्रयत्न केला (इ. १६९६); पण तो साधला नाहीं. जिंजीहून आल्यानंतर १६९६ इसवींत राजारामानें कोंकणांत स्वारी केली व दसऱ्यास धनाजीसह चंदनवंदन गडावरून निघून सुरतेवरहि चाल केली. ह्याच वेळीं देवगडचा गोंडराजा बुलंद बख्त हा मोंगलांच्या छळामुळें अगदीं त्रस्त झाला होता. त्यानें राजारामाकडे सहाय्यार्थ याचना केली व त्याप्रमाणें ही उत्तरेवर स्वारी निघाली राजाराम परिंडा टेंभुर्णीकडेहि गेला. बादशहाच्या ब्रह्मपुरी येथील छावणीवर हल्ला करण्याचाही प्रयत्न राजारामानें केला. पण तो तितका साधला नाहीं. इतक्यांत राजारामाची प्रकृति बिघडली व तो सिंहगडीं उपचारार्थ आला. पण त्यांत तो बरा न होतां इ. स. १७०० मार्च ३ रोजीं मृत्यु पावला. राजारामाची कारकीर्द म्हणजे त्याच्या सरदारांची कारकीर्द आहे. वतनदारीची पद्धत ह्याच कारकीर्दींत दृढमूल झाली. राजारामास चार बायका व एक रक्षा होती. संभाजी व शिवाजी हे दोन पुत्र व दोन मुली होत्या.

राजाराममहाराज (१८९७–):–श्रीमन्महाराज सर राजाराम छत्रपति, जी. सी. एस्. आय्. जी.सी.आय्. ई., सरकार करवीर. उच्च शिक्षणाचे पुरस्कर्ते, पितृनिष्ठ, न्यायप्रिय व व्यापारसंवर्धक म्हणून यांची कारकीर्द संस्मरणीय होईल.

महाराजांचा जन्म ३१ जुलै १८९७ रोजीं झाला. श्री. पु. मा. आईसाहेब महाराज यांच्या देखरेखेखालीं महाराजांचें प्राथमिक शिक्षण झालें. नंतर पुढील

शिक्षणाकरितां महाराजांना आपल्या धाकट्या बंधू-समवेत–कै. श्रीशिवाजी महाराज–इंग्लंडमध्यें पुढील शिक्षणासाठीं पाठविण्यांत आलें होतें. तेथें महाराज आपल्याबरोबरच्या मुलांमध्यें फार प्रिय झाले होते असा त्यांचे ट्यूटर मि. बेकन व सर वुइल्यम मॉरिसन यांनीं पत्रांतून उल्लेख केला आहे. १९१५ मध्यें महाराज हिंदुस्थानांत परत आले. नंतर कै. शाहू महाराजांनीं त्यांना शेतकीच्या शिक्षणासाठीं म्हणून प्रयागला पाठविलें होतें. शेवटीं त्यांनीं राज्यकारभाराचें प्रत्यक्ष शिक्षण श्री. शाहूमहाराजांचें देखरेखेखालीं घेतलें.



श्रीछत्रपति राजाराम महाराज.

बडोद्याचे माजी महाराज कै. तिसरे सयाजीराव यांचे चि. कै. फत्तेसिंह यांच्या कन्या इंदुमतीदेवी यांचेबरोबर राजाराम महाराजांचा १ एप्रिल १९१८रोजीं बडोद्यास विवाह झाला. यांचा द्वितीय विवाह १ जून १९२५ रोजीं झाला. दुसऱ्या राणीसाहेब श्री. स. सौ. सं. विजय-माला महाराणीसाहेब या तंजावरच्या मोहिते घराण्यांतील आहेत. महाराजांना थोरल्या महाराणीसाहेब श्री.स.सौ.सं. ताराबाई महाराज यांना ५ आक्टोबर १९४० रोजीं कन्यारत्न झालें असून राजघराण्यांतील मंडळी व सर्व प्रजाजन यांना आनंद झाला आहे.

कै. छत्रपती शाहूमहाराजांचे अकाली मृत्यूनंतर राजाराम महाराज ३१ मे १९२२ रोजीं गादीवर बसले. १९२२ मध्यें गादीवर आल्यावर महाराजांनीं शाहूमहाराजांचें धोरण पुढें चालू ठेवून डिसेंबर १९२२ मध्यें साताऱ्यास भरलेल्या ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेचें अध्यक्षपद स्वीकारलें. १९२३ च्या डिसेंबरमध्यें बेळगांवला भरलेल्या मराठा शिक्षण-परिषदेचे अध्यक्ष म्हणून कार्य केलें. १९२४ मध्यें पुण्यास भरलेल्या मुस्लिम शिक्षणपरिषदेनें महाराजांना बोलावून मानपत्र दिलें व कोल्हापूर संस्थानांत मुसल-मानांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ केलेल्या सहाय्याबद्दल गौरवपर उल्लेख केला. महाराज युवराज असतांना कोल्हापुरां-तील महॉमेडन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष होते हीहि गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हें कार्य व लोकप्रियता पाहून महाराजांना ब्रिटिश सरकारनें जून १९२४ मध्यें जी. सी. आय्. ई. ही पदवी दिली, व यानंतर लौकरच जी. सी. एस्. आय्. ही बहुमानाची पदवीहि मिळाली. महाराज ११० नं. च्या मराठा लाइट इन्फंट्रीचे ऑनररी कर्नल आहेत. १९२६ मध्यें उमरावतीला भरलेल्या अखिल भारतीय ब्राह्मणेतर परिषदेचें अध्यक्षपद त्यांनीं मंडित केलें होतें.

शिक्षणाच्या बाबतींत महाराजांनीं केवढें कार्य केलें आहे याची कल्पना पुढील गोष्टींवरून येईल. १९२२ला राजाराज कॉलेज फर्स्ट ग्रेड झालें. सायन्स डिपार्टमेंट राजाराम कॉलेज स्थापना १९२६. (त्यामुळें B. Sc. पर्यंतचें सर्व शिक्षण येथें मिळूं लागलें आहे.) १९३३ लॉ कॉलेज, १९३४ बी. टी. कॉलेज, १९२६ मध्यें ओब्रायन टेक्निकल स्कूलची स्थापना, १९२९ शाहू अग्रिकल्चरल स्कूल व लॉर्ड इर्विन म्यूझियम, १९२९ मध्यें महाराणी लक्ष्मीबाई गर्लस् हायस्कूलची स्थापना. शाळा कॉलेजमधून अनेक शिष्यवृत्त्या ठेवल्या असून शिक्षणावर दरवर्षी उत्पन्नाच्या $\frac{1}{10}$ खर्च होतो.

शिक्षणाव्यतिरिक्त महाराजांनीं १९२५ मध्यें कोल्हापूर म्युनिसिपालिटी लोकनियुक्त करणें, १९२७ मध्यें इलाखा पंचायतची स्थापना करून पंचायती-मार्फत कारभार चालू करणें (सुमारें १४ लक्षांचा कारभार ही संस्था पाहते). १९३१ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानप्रमाणें हायकोर्ट व सुप्रीम कोर्टाची स्थापना, १९२६ मध्यें सरकारच्या पेट्रनेजखालीं 'बँक ऑफ कोल्हापूर'ची स्थापना, १९३२ शुगर मिलची सुरवात, १९३८ मध्यें ट्रंक टेलिफोन सर्व्हिस व १९३९ विमान वाहतुकीची सुरवात वगैरे वाढत्या व्यापाराच्या व राज्य-कारभाराच्या द्योतक अशा सर्व सुधारणा केलेल्या आहेत.

कोल्हापूरची बरीच वाढ यांचे कारकीर्दींत झाली. लक्ष्मी-पुरी, साइक्स एक्स्टेंशन, राजारामपुरी व ताराबाईपार्क

या मोठ्या वसाहती झाल्या आहेत. राधानगरी येथें मोठें धरण बांधण्याचें काम चालू असून त्यामुळें हायड्रो-इलेक्ट्रिक वर्क्स फार मोठ्या प्रमाणावर चालून खूप वीज निर्माण होऊन कोल्हापूर शहर व इतर खेडीं यांना वीज पुरवतां येऊन, लहानमोठे उद्योगधंदेही सुरू होतील. शिवाय कित्येक मैलपर्यंत शेतीसाठीं पाणी पुरवितां येईल. राधानगरीच्या डोंगरांत ॲल्युमिनियम असून त्याची खाणहि लौकरच सुरू होईल. यासाठीं सुमारें ७० लक्ष रुपये खर्च होणार आहे.

२९ सप्टेंबर १९३२ रोजीं जाहीरनामा काढून महाराजांनीं सर्व अस्पृश्यांना सार्वजनिक मंदिरें, पाणवठे वगैरे ठिकाणीं इतर हिंदूंच्याबरोबर समान हक्क दिले. याशिवाय हिंदु समाजांतील मागासलेल्या वर्गांची धार्मिक गुलामगिरी नष्ट करण्याकरितां राजर्षि श्रीशाहू छत्रपती महाराज यांनीं श्रीमत् क्षात्रजगद्गुरु पीठाची व क्षत्रिय वैदिक विद्यालयाची स्थापना केली. परंतु त्या संस्थांची पूर्ण वाढ होण्यापूर्वीच महाराज कालवश झाले. तथापि श्रीमच्छत्रपति राजाराम महाराज यांनीं त्या संस्थांची पूर्ण वाढ करून संस्थानांत व बाहेरील मराठा व तत्सम वर्गास त्या उपयोगी अशा केल्या. प्रथम स्वतःच्याच राज्याभिषेकाचे वेळीं श्रीमत् क्षात्रजगद्गुरु व वैदिक विद्यालयांतील पुरोहितांकडून सर्व विधी करून घेऊन जनतेस उदाहरण घालून दिलें, व त्या संस्थांची उपयुक्तता दाखविली. तेव्हांपासून आजपावेतों त्या संस्था सदर वर्गांतील जनतेच्या धार्मिक उत्कर्षास उपयोगी पडत आहेत.

राजेंद्रप्रसाद (१८८४-   ):-बिहार ओरिसामधील पहिल्या प्रतीचे राजकारणी पुरुष. सारण जिल्ह्यांत जिरदेई येथें ३ डिसेंबर १८८४ स यांचा जन्म. १९०२ मध्यें प्रवेशपरीक्षा, १९०४ ला इंटर, १९०६ त बी. ए., १९०७ एम. ए., १९१० त बी. एल्, व १९१५ सालीं एम्. एल्. या परीक्षांतून राजेंद्रबाबू उत्तीर्ण झाले. वरील सर्व परीक्षा कलकत्ता विश्वविद्यालयाच्या, प्रवेशपरीक्षा, इंटर, बी. ए. व एम्. एल्. या परीक्षांतून त्यांनीं पहिला नंबर पटकावला आहे. बिहार युवक चळवळींतील प्रमुख लोकांपैकीं हे एक बिहार विद्यार्थी परिषदेचे नेते. १९२७ त स्थापलेल्या पाटणा विश्वविद्यालयाच्या सेनेट व सिंडिकेट यांमध्यें यांनीं प्रवेश करून सभासदत्व मिळविलें. १९१६ पर्यंत कलकत्त्यास वकिली केली. नंतर पाटण्यास हायकोर्ट स्थापल्यामुळें यांनीं तेथें वकिलीला आरंभ केला. कांहीं काळ कलकत्ता विश्वविद्यालयाच्या लॉ कॉलेजांत हे अध्यापक. १९१७ पासून यांच्या बिहारमधील सार्वजनिक आयुष्यास प्रारंभ. याच वर्षी चंपारण्यांत महात्मा गांधींच्याबरोबर यांनीं कामगिरी केली. १९२० ला वकिली बंद करून हे असहकार चळवळींत प्रविष्ट झाले. १९२२ त काँग्रेसचे सर चिटणीस व तिच्या कार्यकारी मंडळाचे सभासद. सविनय कायदेभंगांत अनेकवार यांना कारावास सोसावा लागला. १९३४ व १९३९ (सुभाषचंद्र बोसनीं त्यागपत्र दिल्यावर) या वर्षांमध्यें हे काँग्रेसचे दोन वेळ अध्यक्ष बनले.

रात्रीची राणी-हें एक सुगंधी फुलझाड आहे. ह्याची अभिवृद्धि गुलाबाप्रमाणें फांटेकलमानें होत असल्यामुळें पुष्कळ ठिकाणीं हीं झाडें लावलेलीं दिसतात. हें झाड ५ ते ७ फुटांपर्यंत वाढतें. फांद्या लिंबकळल्याप्रमाणें असतात. फुलें हिरवट पिंवळ्या रंगाची असून, बारीक लांब नळीची असतात. फुलांची फुलण्याची वेळ रात्रीची असल्यामुळें मध्यरात्रीपर्यंत त्यांचा सुवास चोहोंकडे दरवळतो.

राधाकृष्णन्, सर सर्वपल्ली M.A.D. Litt.(Hon.) (१८८८-   ):-भारतीय धर्म व नीतिशास्त्र यांचे ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांतील प्राध्यापक. ५ सप्टें. १८८८ ला हे जन्मले. हे दक्षिण हिंदुस्थानांतील तिरुतनी येथील रहिवासी. वेल्लोर व मद्रास येथील खिश्चन संस्थांतून यांनीं शिक्षण घेतलें. हे मद्रास, म्हैसूर व कलकत्ता येथें तत्त्वज्ञानाचे शिक्षक होते. १९२१-३१ कलकत्ता विश्वविद्यालयांत 'पांचवे जॉर्ज' या तत्त्वज्ञान विभागाच्या जागेवर यांची नेमणूक. त्यांच्यामधील शिकविण्याची हातोटी, व लेखन हे गुण आकर्षक असल्यानें त्यांना इंग्लंड अमेरिकेंत व्याख्यानांसाठीं निमंत्रणें आलीं. १९२९-३० मध्यें 'हर्बर्ट व्याख्याते' या नात्यानें नेमणूक झाली. येथें असतांना 'जीविताचा आदर्श दृष्टिकोन' हा विषय त्यांच्या व्याख्यानांचा होता. पुनः ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाच्या मँचेस्टर विद्यालयांत 'तुलनात्मक धर्म' या विषयावर १९२६ मध्यें त्यांस प्रोफेसर नेमलें. याच वर्षी त्यांची चिकागो विश्वविद्यालयांत 'हस्केल व्याख्याते' या नात्यानें नेमणूक झाली. भारतीय तत्त्वज्ञानावरचें त्यांचें लिखाण अति महत्त्वाचें आहे. सध्यां हे आंध्र व बनारस येथील विश्वविद्यालयांचे व्हाईस चॅन्सेलर आहेत. 'जीविताचा हिंदी दृष्टिकोन,

भारतीय तत्त्वज्ञानाचे दोन खंड व 'जीविताचा आदर्श दृष्टिकोन' हे यांचे प्रमुख ग्रंथ होत.

रानडे, न्या. महादेव गोविंद (१८४२–१९०१):- पेशवाई संपून इंग्रजी अंमल सुरू होण्याच्या संक्रमण-कालांत जुने सरदार इंग्रजांनीं पेन्शनें देऊन घरीं बसविले. नूतन आंग्ल विद्याविभूषित नव्या थाटानें दिपून गेले व सरकारी नोकरींत व प्राप्त झालेल्या मानांत दंग झाले होते. अशा अनेक कारणांमुळें महाराष्ट्र देश म्हणजे त्या वेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. 'या थंड्या गोळ्यास कोणत्या तऱ्हेनें ऊब दिली असतां तो पुन: सजीव होईल व हातपाय हालवूं लागेल याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपायांनीं, अनेक रीतीनीं त्यास पुन: सजीव करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरितां जिवा-पाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमत: माधवरावजींनींच केली असें म्हटलें पाहिजे. व आमच्या मतें हेंच त्यांच्या थोरवीचें किंवा असामान्य मोठेपणाचें मुख्य चिन्ह होय.' अशा प्रकारचे उद्गार कै. लो. टिळक यांनीं रानडे यांच्या मृत्युलेखांत काढले आहेत. या उद्गारांतच न्या. रानडे यांच्या कर्तृत्वाचें सार यथार्थत्वानें प्रकट झालें आहे.

न्या. रानडे यांचा जन्म नाशिक जिल्ह्यांत निफाड येथें ता. १८ जानेवारी १८४२ (माघ शुद्ध ६ शके १७६३) मंगळवार रोजीं झाला. त्यांचे वडील गोविंदराव हे त्यावेळीं फडणिशीचे हुद्यावर होते. त्यांच्या आईचें नांव गोपिकाबाई. माधवराव दोन अडीच वर्षांचे असतां रात्रौ बैलगाडीच्या प्रवासांत घाटांतून जात असतां एका वळणावर गाडींतून खालीं पडले. त्यावेळीं ते झोपेंतच होते. गाडी पुढें निघून गेली. जागे झाल्यावर थोड्या वेळानें त्यांचे चुलते विठूकाका हे मागाहून घोड्यावरून सावकाश येत होते ते त्यांना आढळले. विद्यार्थीदशेपासूनच यांचा स्वभाव धिम्मा, बिनबोलका, सरळ व सत्यप्रिय असे. बरोबर सोबती नसल्यास खांबाबरोबर सोंगट्याचा खेळ खेळून, खांबा-कडून त्यांनीं आपल्यावर बाजू उलटून घेतली, पण त्या बिनबोलक्या खांबाशीं खोट्या विजयाच्या आशेनें प्रतारणा केली नाहीं असें सांगतात. मि. दिनशा वाच्छा व आबाजी विष्णू काथवटे हे यांचे विद्यार्थी-दशेंतील स्नेही. माधवरावांचें शरीर धिप्पाड व बांधा ओबडधोबड असल्यानें त्यांस विनोदानें 'बाल मतंगज' असें म्हणत.

माधवरावांच्या लहानपणींच त्यांच्या वडिलांची बदली कोल्हापुरास झाली. माधवरावांचें मराठी शिक्षण कोल्हापूर येथेंच पांडोबातात्या दिवेकर यांच्या हाताखालीं झालें व इंग्रजी शिक्षण रा. ब. नाना मोरोजी यांनीं काढलेल्या शाळेंत झालें. अशा रीतीनें इ. स. १८५६ पर्यंत त्यांचा काळ कोल्हापूर येथें गेल्यावर ते पुढील शिक्षणासाठीं मुंबईस आले. इ. स. १८५९ सालीं मुंबई युनिव्हर्सिटीची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा झाली तींत ते पास झाले. इ. स. १८६०ते६६ या काळांत ते एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें पहिलीं ३ वर्षें ज्यूनियर फेलो व पुढील ३ वर्षें सीनियर फेलो होते. इ. स. १८६२ सालीं बी. ए., इ. सन १८६४ सालीं एम्. ए. व इ. स. १८६६ एलएल. बी. या सर्व परीक्षा ते पहिल्या वर्गांत पास झाले व या काळांतील अतिवाचनानें त्यांचे डोळे कायमचे अधु बनले. इ. सन १८७१ त ते ॲडव्होकेटची परीक्षा पास झाले. एका मागून एक सर्व परीक्षांतून यशस्वी रीतीनें उत्तीर्ण झाल्यामुळें लोक त्यांस 'Prince of Graduates' म्हणूं लागले.

इ. स. १८६६ ते ६७ या कालांत माधवरावांनीं पुण्यास ॲक्टिंग मराठी ट्रान्स्लेटर, अक्कलकोटचे कार-भारी, कोल्हापुरास न्यायाधीश अशीं अनेक कामें केलीं. इ.स. १८६८ ते ७२ या काळांत ते एल्फिन्स्टन कॉलेजांत द. म. ४०० रु. पगारावर इंग्रजी भाषेचे प्रोफेसर होते. इ. स. १८६९ पासून ते न्यायखात्यांत शिरले. १८६९ सालीं ते मुंबई हायकोर्टांत असिस्टंट रिपोर्टर व १८७१ सालीं थर्ड मॅजिस्ट्रेट, स्मॉलकॉजचे चौथे जज्ज, व पुण्यास ॲक्टिंग फर्स्ट क्लास जज्ज होते. १८७३–७८ या काळांत त्यांनीं पुण्यास फर्स्ट क्लास फर्स्ट ग्रेड सबजज्ज (त्यावेळचें नांव प्रिन्सिपल सदर अमीन) म्हणून काम केलें. तेथून त्यांची नाशिक व धुळें या ठिकाणीं बदली झाली. इ.स. १८८१ सालीं त्याचेकडे शेतकरी कायद्याप्रमाणें पुणें व सातारा येथील मुन्सफ कोर्टांची पाहाणी करण्याचें काम आलें. इ. स. १८८७ चे सुमारास त्यांना शेतकरी कायद्याअन्वयें होणाऱ्या दाव्यांच्या चौकशीसाठीं स्पेशल जज्ज नेमलें. मध्यें वर्ष दीड वर्ष (इ. स. १८८६ सालीं) फायनॅन्स कमिटीचे सभासद म्हणून त्यांनीं काम केलें. इ. स. १८९३ ते १९०१ पर्यंत मुंबई हायकोर्टांत त्यांनीं न्यायाधिशाचें काम केलें. मुंबई हायकोर्टांचे हे पहिलेच हिंदी न्यायाधीश होत. ७ जानेवारी १९०१

रोजीं त्यांनीं कांहीं दिवसांची रजा घेतली. ता. १६ जानेवारी १९०१ रोजीं रात्रौ १०॥ वाजतां म्हणजे वयाचीं ६० वर्षे पुरीं होण्यापूर्वींच ते मृत्यु पावले. त्या दिवशीं सायंकाळीं ते नित्याप्रमाणें फिरून आले. रात्रौ भोजनोत्तर जस्टिस मॅकार्थीचें पुस्तक वाचीत होते. त्यावेळीं कांहीं प्रसंगानें त्यांनीं उद्गार काढले कीं, 'काम करीत असतां मृत्यु यावा हें उत्तम.' अगदीं तसेंच झालें. अर्ध्या तासांतच त्यांच्या छातींत कळ आली. डॉक्टर येऊन पोहोंचण्यापूर्वींच त्यांना मृत्यु आला.

वर त्यांचें चरित्र अगदीं वर्षवारीनें दिलें असलें तरी त्यांत त्यांच्या आयुष्यांतील घडामोडींची चौथ्या हिश्यानेंही हकीकत आलेली नाहीं. सरकारनें त्यांच्या कर्तबगारीवरून सी. आय. ई. ही पदवी दिली. इ. स. १८८५, १८९० व १८९३ या तीन वर्षांत मुंबईच्या गव्हर्नरांनीं त्यांना आपले कौन्सिलर म्हणून नेमले. सरकारी नोकरीचें काम संभाळून ते अविश्रांत उद्योग करीत व सार्वजनिक चळवळींना उठावणी देत. सार्वजनिक सभा, वक्तृत्वसभा, वसंत व्याख्यानमाला, प्रार्थनासमाज, फीमेल हायस्कूल, औद्योगिक चळवळ, डेक्कन सभा या सर्व संस्थांशीं माधवरावजींचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध होता व त्या संस्थांना त्यांचें मार्गदर्शकत्व लाभे. अर्थशास्त्राच्या प्रांतांत त्यांना 'हिंदी अर्थशास्त्राचे प्रणेते' हें नांव यथार्थत्वानें देतां येईल. महाराष्ट्रांतील अनेक अर्थशास्त्रीय उद्योगाची ते प्रेरक शक्ति होते. इ. स. १८८९ सालीं Industrial Association of Western India ही संस्था स्थापन करून पुढील वर्षी औद्योगिक परिषद भरविण्याचा उपक्रम केला. इ. स. १८९२ सालीं शेतकरी कमिशनपुढें साक्ष देऊन त्यांत सहकारी चळवळीची पूर्वसूचना दिली. त्याच वर्षी डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थ्यांपुढें त्यांनीं आपला अर्थशास्त्रीय वाङ्मयांत अमर होऊन राहिलेला Indian Political Economy हा निबंध वाचला. इ. स. १८९३ सालीं त्यांनीं आंकडेवार माहिती मिळवून 'पदवीधर अकालीं कां मरतात' या विषयाची चर्चा केली. हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यकर्ते विलायतेंतून आणलेलीं अर्थशास्त्रीय मतें व तत्त्वें हिंदुस्थानास लावूं लागले त्यावेळीं त्यांचें चुकतें कोठें हें सांगणारा पुरुष रानडे होय. कॉलेजांतील प्रोफेसर त्या काळीं मिल, फॉसेटचीं पुस्तकें वाचण्यांत गुंतले असतां जर्मन अर्थशास्त्रज्ञ लिस्ट याचे विचार अभ्यासून त्या दृष्टीनें इंग्रजी अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांवर मात करणारा हिंदी मनुष्य रानडे होय. हिंदुस्थानांत स्वदेशीस उत्तेजन देतांना त्यांची विधायक दृष्टि असे. परदेशी वापरणारावर हल्ला करण्यापेक्षां संघटना, कौशल्य, व शास्त्रीय प्रगति यांच्या साह्यानें स्वदेशीस कसें उत्तेजन मिळालें पाहिजे हें ते सांगत. हे अर्थशास्त्रीय विचार जातिधर्मनिरपेक्ष असल्यामुळें या विचारांच्या आधारावर हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत प्रसृत होण्याजोगा एकराष्ट्रीयत्वाचा विचार यामुळें बळावण्यास मोठें साह्य झालें.

इतिहासाच्या प्रांतांत न्या. रानडे यांनीं 'पेशव्यांच्या रोजनिशी' यांचें प्रकाशन करविण्यास उत्तेजन दिलें. Rise of the Mahratta Power हा उत्कृष्ट ग्रन्थ लिहिला. पेशव्यांच्या रोजनिशांना एक मार्मिक प्रस्तावना लिहून मराठेशाहींतील सामाजिक स्थितीवर त्रोटक चर्चा केली व 'पेशव्यांच्या टांकसाळी' हा दुसरा लेख लिहिला.

सामाजिक प्रांतांत राष्ट्रीय परिषदेबरोबर सामाजिक परिषद भरविली जावी अशी प्रथा पाडली. विधवा-विवाह, स्त्रीशिक्षण इत्यादि चळवळींस उत्तेजन दिलें. विशेषतः देशांतील कोणत्याहि धर्माच्या किंवा वर्गाच्या मनुष्यास आपल्या गुणाच्या जोरावर आपला भाग्योदय करून घेण्यास जातिधर्मनिर्बंधांची आडकाठी येतां कामा नये या उदारमतवादी विचाराचा (Liberalism) त्यांनीं पाया घातला. टिळक राष्ट्रीयत्वाचे अवतार, आगरकर बुद्धिवादाचे अवतार, तर रानडे हे उदारमतवादाचे अवतार होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. राष्ट्रीयत्व, बुद्धिवाद व उदारमतवाद या त्रयीच्या पायावर महाराष्ट्रांतील आधुनिक जागृतीची उभारणी झाली आहे.

राजकीय क्षेत्रांत न्या. रानडे यांची कामगिरी प्रथम सार्वजनिक व नंतर डेक्कन सभेच्या द्वारें सरकारपुढें जनतेच्या तक्रारी मांडण्याच्या स्वरूपाची होती. या कामीं ना. गोखले यांनीं आस्थापूर्वक त्यांचें शिष्यत्व पतकरलें. स्वतः न्या. रानडे यांना सरकारी नोकरीचें बंधन असल्यामुळें प्रत्यक्ष जें काम करतां आलें नाहीं तें त्यांच्या आवडत्या शिष्यांनीं पार पाडण्यांत गुरूवरही मात केली असें म्हटलें तरी चालेल. राजकीय चळवळीला पोकळ शब्दावडंबरापेक्षां किंवा स्थूल भावनापेक्षां भरीव अभ्यासाचा आधार पाहिजे व त्याच्या आधारावर केलेलें विधान शब्दानें सौम्य पण कोटि-

क्रमानें बिनतोड असें असावें. प्रतिपक्षाला चिडविण्यापेक्षां त्याच्या पोटांत शिरून त्याच्या विचारांचा पायाच डळमळीत करावा ही नेमस्त विचारसरणी न्या. रानडे यांची होय. राजकीय क्षेत्रांत आपल्या अधिक स्वातंत्र्यानें, निर्भयतेनें व कठोरपणानें स्वावलंबनाचा मार्ग प्रतिपादणारा प्रतिपक्षी त्यांना भेटला ते लो. टिळक होत. यामुळें रानडे यांची राजकीय कामगिरी त्या पिढींत पुष्कळांच्या नजरेंत भरली नाहीं. पण आज इतक्या वर्षांनंतर उभयतांच्याही कार्याचें महत्त्व महाराष्ट्रांतील तरुण पिढी जाणते यांत शंका नाहीं.

पण या सर्व क्षेत्रापेक्षां न्या. रानडे यांचा आत्मा खरोखर कोठें वावरत असेल, तर तो धर्मक्षेत्रांत होय. प्रार्थनासमाजाचे ते मोठे पुरस्कर्ते होते. तेथें भागवतधर्मावर प्रवचनें करतांना ते तल्लीन होत. इतकीं सार्वजनिक कार्यें करीत असतां ' वृत्तीनें तें अंतर्बाह्य संत असत. ' करि मस्तक ठेंगणा । लागे संताच्या चरणा.' हा तुकोबाचा अभंग ते रोज उठतांक्षणींच म्हणत व म्हणतांना त्यांची चित्तवृत्ती तन्मय होई. त्यांनीं पुरस्कारलेल्या प्रार्थनासमाजाचा पुढें व्हावा तसा उत्कर्ष झाला नाहीं हें खरें; पण न्या. रानडे यांचें महत्तम व्यक्तिमत्व त्यांच्या प्रार्थना समाजांतील प्रवचनांत सांठविलेलें आहे यांत शंका नाहीं. त्यांच्या पत्नी रमाबाई रानडे यांनीं त्यांचीं प्रवचनें एकत्र करून प्रसिद्ध केलीं आहेत.

न्या. रानडे यांचे ग्रंथः–' राईज ऑफ दि मराठा पॉवर,' ' एसेज ऑन इंडियन इकॉनॉमिक्स ' त्यांचीं सामाजिक व औद्योगिक परिषदांतील भाषणें, रेव्हेन्यू मॅन्युअल, विधवाविवाहाची सशास्त्रता व यथार्थता, थीइस्ट्स कनफेशन ऑफ फेथ हीं होत. न्या. रानडे यांचे विस्तृत चरित्र प्रो. न. र. फाटक यांनीं लिहिलें असून त्याखेरीज, सुबोधपत्रिकाकर्ते वैद्य, श्री. वा. बा. रानडे यांनीं लहान लहान चरित्रें लिहून प्रसिद्ध केलीं आहेत; पण तीं बहुतेक आतां दुर्मिळ आहेत.

राफेल (१४८३–१५२०):– अतुलनीय इटालियन चित्रकार. याचा जन्म इटलींत उरबीनो या गांवीं झाला. याचा बाप, गिओव्हानी सान्झिओ, हा चित्रकारच होता. त्यामुळें राफेलला चित्रकलेचे पहिले धडे आपल्या बापाकडून लहानपणींच मिळाले. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी याला पेरुगिनो या चित्रकारानें आपल्या पदरीं पेरुगिओ या गांवीं ठेवून घेतलें. त्याच्याकडे तो आठ वर्षे होता. १५०४ मध्यें तो स्वगृहीं परतला. यावेळेपासून तो स्वतंत्रपणें चित्रें काढूं लागला. याच वर्षाच्या अखेरीस तो फ्लॉरेन्स शहरीं गेला. त्यावेळीं अनेक चित्रकार व शिल्पकारांचें माहेरघर म्हणून फ्लॉरेन्स शहर प्रसिद्ध होतें. त्या ठिकाणीं त्यानें चार वर्षें अभ्यासांत घालविली. या कालांत त्यानें काढलेल्या चित्रापैकीं The Entombment of Christ, The Madonna of the Grand Duke, The Marriage of the Virgin हीं चित्रें (पेंटिंग्ज) प्रख्यात आहेत. १५०८ मध्यें राफेल रोमला पोप ज्यूलियस दुसरा याच्या आमंत्रणावरून गेला व व्हॅटिकन (चर्च) मध्यें ओल्या भिंतीवर त्यानें चित्रें काढण्यास सुरवात केली. या प्रकारच्या चित्रांना फ्रेस्कोज् (Frescoes) म्हणतात. यानंतर दहावा पोप लिओ धर्मपीठावर आला तेव्हां त्यानें त्याला आपल्या पदरीं मुख्य चित्रकाराची जागा दिली. यावेळीं त्यानें रोममध्यें अनेक ठिकाणीं चित्रें काढलीं व Sistine Madonna हें जगप्रसिद्ध चित्र पूर्ण केलें. हें चित्र सध्यां ड्रेसडेनच्या म्यूझियममध्यें आहे.

धार्मिक विषयावर चित्रें काढणारा चित्रकार म्हणून राफेल प्रसिद्ध आहे. गोडवा, सौंदर्य, उदात्त भावना, व रेखीवपणा या बाबतींत राफेलइतका प्रसिद्ध चित्रकार दुसरा कोणीहि नाहीं. स्वतः राफेल फार देखणा होता व वरच्या दर्जाच्या लोकांत वावरत असल्यामुळें अनेक स्त्रियांवर त्यानें मोहिनी घातली. सौंदर्यसंपन्न सरदारकन्या मॉडेल म्हणून त्याला सदैव मिळत आणि स्त्रीसौख्याच्या बाबतींत तर त्याच्याइतका दुसरा भाग्यवान क्वचितच आढळेल. त्याला पैसा अमूप मिळाला, त्याला सर्वत्र राजासारखा मान मिळत असे. १५२० मध्यें यानें लग्न करण्याचें ठरविलें. पण तो अकस्मात् मृत्यु पावला. त्याचे सिस्टाइन मॅडोना हें चित्र दुसऱ्या भागांत ' चित्रकला ' या निबंधांत घातलेलें आहे तें पाहावें म्हणजे त्याच्या कलेची थोडी कल्पना येईल.

रामः–दशरथास कौसल्येपासून झालेला थोरला मुलगा. हा विष्णूचा अवतार. दशरथानें पुत्रकामेष्टि केल्यानें त्यास चार मुलगे झाले. त्यांत हा थोरला. याचा जन्म चैत्र शुद्ध नवमीस दुपारीं बारा वाजतां झाला. याचें नामकरण व व्रतबंध झाल्यावर याला वसिष्ठाकडून शास्त्रें व शस्त्रें यांचें शिक्षण मिळालें. पुढें राम व त्याचा भाऊ लक्ष्मण यास यज्ञरक्षणार्थ विश्वामित्राबरोबर जावें

लागलें. जातांना विश्वामित्राकडून अनेक विद्या, अस्त्रें, कथा यांचा लाभ उभय बंधूंना झाला. वाटेंत त्यांनीं ताटकेचा वध केला. नंतर रामलक्ष्मण यज्ञाच्या निमित्तानें सर्व ऋषींबरोबर जनकाकडे निघाले. यानें वाटेंत अहल्येचा उद्धार केला. पुढें हे बंधु मिथिलेस आले. तेथें रामानें शिवधनुष्याचा भंग करून जनकाचा पण पुरा केला. म्हणून सीतेनें याला माळ घातली. पुढें जनकानें दशरथाला बोलावून रामासह चौघा बंधूंचे विवाह करून दिले. अयोध्येस परत येतांना वाटेंत परशुराम आडवा आला. हा रामावर धनुर्भंगासाठीं फार संतापला होता. पण रामापुढें त्याचें कांहीं चालेना. शेवटीं हा बंधूसह परतला. यानंतर त्यास यौवराज्याभिषेक करण्याचें ठरलें, पण दशरथानें कैकयीला दिलेले वर पूर्ण होण्यासाठीं त्यास लक्ष्मण व सीता यांच्यासह चौदा वर्षें वनवास करावा लागला. हा प्रयाग, चित्रकूट करून पंचवटीस येऊन राहिला. पुढें सीतेला रावणानें पळवून नेऊन अशोक वनांत ठेविली. तिच्या शोधार्थ रामलक्ष्मण बाहेर पडले. तेव्हां जटायूनें सीता रावणानें पळविल्याचें सांगितलें. वाटेंत अगस्ती, मातंग यांच्या आतिथ्याचा स्वीकार करून हे पंपा सरोवराकडे गेले. तेथून ऋष्यमूकापाशीं आल्यावर मारुतीच्या साहाय्यानें राम-सुग्रीवाचें सख्य झालें. यानंतर रामानें वालीचा वध करून सुग्रीवास किष्किंधेंत राज्याभिषेक केला. मग सुग्रीवानें मारुतीला पाठवून सीतेकडील सर्व वृत्त रामाला कळविलें.

रामानें तिच्या सुटकेसाठीं सुग्रीवाची मदत घेऊन लंकेवर चाल केली. प्रथम रामभक्त बिभीषण (रावणाचा भाऊ) रामाला शरण आला. रामानें त्याच्या सहाय्यानें रावणाचा वध केला.

यानंतर रामानें बिभीषणास गादीवर बसविलें. मग हा सीतेला घेऊन विमानांतून अयोध्येला आला. वाटेंत त्याला भरत भेटला. पुढें रामाला राज्याभिषेक झाला व भरताला यौवराज्य देण्यांत आलें. कांहीं कालानें सीता गरोदर असतां रामाला सीतेविषयीं प्रजेनें काढलेले दुष्ट उद्गार ऐकावयास मिळाले म्हणून त्यानें सीतेचा त्याग केला. मग ती वाल्मिकीकडे आली. तेथें तिला लव, कुश झाले.

रावणाच्या वधामुळें घडलेल्या ब्रह्महत्येचा दोष नष्ट व्हावा म्हणून अगस्तीच्या सांगण्यानें रामानें अश्वमेध केला. या यज्ञांत रामाला लवकुशांची ओळख वाल्मिकीनें करून दिली. पुढें सीतेनें रामाची भेट घेऊन पृथ्वींत प्रवेश केला. यानंतर रामाच्या तिन्ही माता मरण पावल्या. लक्ष्मणानेंहि देह ठेविला. कुशाला कोमल देशीं व उत्तर कोसलांत लवाला राज्याभिषेक करून रामानेंहि देह ठेविला.

रामचंद्र निळकंठ अमात्य (इ. स. १६५०–१७३३ सुमार):– गगन बावडा जहागीरदारांचे मूळ पुरुष, आज्ञापत्रांचे जनक, छत्रपती राजारामाच्या वेळचे मुत्सद्दी अधिकारी व निळो सोनदेव बहुतकर यांचा मुलगा. याचा १६५० त जन्म. मोरोपंत पिंगळयांचा हा जांवई. शिवाजीनें याला याच्या बापाच्या पश्चात् आपला प्रधान केला. कांहीं काल, अण्णाजी दत्तोनंतर, सचीवपदहि याच्याकडे होतें. यावरून हा शिवाजीच्या हाताखालीं तयार झालेल्या मंडळींपैकीं होता असें म्हणावयास अडचण नाहीं.

राजारामानें यास जिंजीहून १६९१ त ‘हुकमतपन्हा’ या पदाचीं वस्त्रें दिलीं. तसेंच रघुनाथ हणमंते याच्या मृत्यूमुळें तेंहि पद १६९७ मध्यें याचेकडेच आलें.

राजारामाच्या पश्चात् यानें ताराबाईचा आग्रह व दुहीची भीति यामुळें तिचा पुत्र शिवाजी यास गादीवर बसविलें. आपल्याविरुद्ध कांहीं प्रकार घडले म्हणून हा केव्हांहि भडकून जात नसे. औरंगजेबानें कपटविद्येचे प्रयोगानें आपसांत भांडणें लावण्याचा प्रयत्न केला, पण याच्यामुळें त्यास यश आलें नाहीं. दिल्लीहून शाहू परत आल्यावर यानें त्याचें राज्य परत करण्याबद्दल ताराबाईस विनविलें होतें; पण इतरांप्रमाणें यानें अखेरपर्यंत ताराबाईचा पक्ष सोडला नाहीं. शाहूचें राज्य वाढल्यामुळें ताराबाई व हा बाजूला पडला. पुढें राजसबाईचा मुलगा संभाजी हा गादीवर आला. त्यानें ताराबाई व तिचा मुलगा शिवाजी यांना बंदिवासांत ठेवलें. शेवटीं हा संभाजीचा ताबेदार बनला. संभाजीला उद्देशून १७१६ ला त्यानें राजनीति हा महत्त्वाचा उपदेशवजा ग्रंथ लिहिला. या ग्रंथानें त्याचें राजनीतिनैपुण्य व दूरदर्शीपणा हे दोन गुण चांगलेच दिसून येतात. यानंतर त्यानें राजकारण सोडून देऊन संन्यास घेतला. हा अलीबागेच्या उत्तरेस श्रीकनकेश्वर येथें शेवटपर्यंत राहिला. त्याची व्यवस्था कान्होजी आंग्रे उत्तमपणें करीत असे. हा १७३०–३३ च्या दरम्यान मृत्यु पावला. यास भगवंतराव,

मोरेश्वर व शिवराम असे तीन मुलगे होते. जाग्याला राजा व खजिना हीं दोन्हींहि नसतांना, वतनपद्धति सुरू करणें, राजारामाचें आगमन, राज्याचा सांभाळ, महाराष्ट्र व कर्नाटक येथें युद्धाची धुमश्चक्री सतत चालू ठेवणें, लोक राजी राखणें या प्रकरणांनीं त्याची मुत्सद्देगिरी उत्तमपणें दिसून येते. या गुणांच्या जोरावरच शत्रूवर मात करून त्यानें स्वजनांना राष्ट्रीयदृष्ट्या मोठ्या वैभवाचा काळ प्राप्त करून दिला असें म्हणतां येईल.

राम जोशी (१७६२–१८१२):–पेशवाईच्या अखेरीस झालेला प्रसिद्ध शाहीर व कीर्तनकार. हा यजुर्वेदी ब्राह्मण असून सोलापूरचा राहणारा. याच्या वडील भावाचें नांव मुद्गल होतें. तो नांवाजलेला शास्त्री व पुराणिक होता. याच्या बापाचें नांव जगन्नाथ. याचें उपनांव तासे, गोत्र वत्स, सूत्र कात्यायन, शाखा वाजसेनेय. हा प्रथम पंढरपुरांतील धर्मसिंधुकार काशीनाथ बाबा पाध्ये या गृहस्थांकडे संस्कृत शिकण्यास गेला; परंतु लावण्या व तमाशे पाहण्याचा फार नाद आहे असें कळल्यावर त्यांचें व याचें न पटून हा तेथून निघाला व कर्नाटक प्रांतीं गेला. तेथें यानें कानडी भाषेचा अभ्यास करून संस्कृतचेंहि शिक्षण घेतलें. नंतर हा फिरून पहिल्या गुरूकडे आला. तेथें यानें गुरूशीं संस्कृतांत वाद करून आपली ओळख करून दिली. तेव्हां गुरूनें याची पाठ थोपटली. पुढें हा सोलापुरास येऊन कांहीं दिवस पुराण सांगत असे. तेथें हा आपल्या विद्वत्तेनें सर्व लोकांत प्रसिद्धीस आला. याच्या घरापुढें एक मठ होता. तेथील मठाधिकारी शुभराय महाराज याचा फार तिरस्कार करी. एकदां शुभराय हा मठापुढें कीर्तन करीत असतां यानें त्याच जागेवर 'भला जन्म हा तुला लाधला । हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरीं । मठाची उठाठेव कां तरी ॥' ही प्रसिद्ध लावणी ताबडतोब रचून म्हटली व तेथील मठाधिकाऱ्याला लाजावयास लाविलें. याला कीर्तन करण्याचा व पोवाडे व लावण्या रचण्याचा नाद असे. कविवर्य मोरोपंत व हा या दोघांचा फार स्नेह होता. मोरोपंत याला आपल्या आर्या दाखवीत व हा त्या कीर्तनांत म्हणे. राम जोशी यांच्यामुळेंच त्या सर्वतोमुखीं झाल्या आहेत. हा लावण्या रची व तमाशे करी म्हणून याला वाळींत टाकण्याचा कांहीं लोकांनीं प्रयत्न केला. वाळीताचें कारण हा संध्या करीत नाहीं व चिमा नांवाच्या नायकिणीशीं उघड व्यवहार ठेवितो हें होय. मरण्याच्या अगोदर यानें महाराष्ट्रभर कथाकीर्तनें केलीं. शेवटीं हा पुण्यास येऊन राहिला. यानें पंढरपूरवर्णन, तुळजापूरवर्णन, गिरीच्या व्यंकटेशाचें वर्णन, पुणेंवर्णन, व शनवारवाड्याचें वर्णन वगैरे लावण्या रचिल्या.

तमासगीर व कीर्तनकार या दोनहि नात्यांनीं पेशवाईंत गाजलेल्या शाहीरांत याची गणना होते. याचें मूळ उपनांव तासे, परंतु याला मिळालेल्या वृत्तीवरून जोशी हें नांव पडलें. हा फार उधळेपणानें वागे. म्हणून यास नेहमीं पैशाची याचना करण्याचा प्रसंग येई. मद्यपी म्हणून याची ख्याती होती. याच्या लावण्या कथेकऱ्यांनीं म्हणण्याची पद्धत ठेवल्यानें याची कीर्ति चोहोंकडे पसरली. ती अद्यापिहि कायम टिकून आहे. त्याच्या लावण्यादेखील सरस आहेत. पुण्यास हा मरण पावला.

रामतीर्थ (१८७३–१९०६):–पाश्चात्य देशांत वेदान्ताची ध्वजा फडकवणारे आधुनिक कालांतील पंजाबचे सत्पुरुष. जन्म गोस्वामी तुलशीदास यांच्या कुळांत. पंजाबमधील गुजरणवाला जिल्ह्यामधील 'मुरलीवाला' या छोट्या खेड्यांत २९ आक्टोबर १८७३ ला यांचा जन्म झाला. वडील हिरानंद गुरु-भगत धन्नाराम. आई लहानपणींच वारलेली म्हणून त्यांच्या आतेनें यांचें पालनपोषण केलें. तिच्या वर्तनाचा यांच्या मनावर फारच चांगला परिणाम होऊन यांना चांगल्या प्रकारचें वळण लागलें. पांचव्या वर्षीं 'श्री ग'ला आरंभ. दहाव्या वर्षीं स्वामी विवाहबद्ध. अभ्यासक्रम पार पडण्यास घरच्या गरीबीमुळें त्यांना फार अडचणी आल्या. पण त्या त्यांनीं निवारून स्वावलंबनानें शिक्षण मिळविलें. यांची १८८८ त प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले. गणित घेऊन १८९२ त फोरमन खिश्चन कॉलेजांतून ते एम्. ए. झाले. हरिद्वारला १८९७ त एकांतासाठीं यांचें प्रयाण झालें. साक्षात्कार १८९८ च्या सप्टेंबरमध्यें झाला. स्वामींनीं १९०१ ला संन्यास घेतला. वेदान्ताच्या प्रसारासाठीं टिहिरीच्या महाराजांची मदत स्वीकारून हे जपानला गेले. तेथें सर्कसवाले छत्रे व यांची गांठ पडली. रा. छत्रे यांनीं आपल्याबरोबर अमेरिकेस येण्याविषयीं अति आग्रह केला. म्हणून स्वामी अमेरिकेस गेले. तेथें २॥ वर्षें कंठून ते इजिप्तमध्यें आले. तेथून ते परत इंग्लंडला गेले. त्या ठिकाणीं यांचा पांच महिने

मुक्काम होता. यानंतर स्वामी १९०४ च्या जूनमध्यें मुंबईस आले. मग टिहिरीपासून पंचवीस कोसांवर जंगलांत वसिष्ठाश्रम आहे तेथें स्वामींनीं १९०६ ला गंगेंत जलसमाधी घेतली. यांचे मूळ ग्रंथ इंग्रजी व उर्दूमध्यें आहेत. यांच्या ग्रंथांचीं मराठी भाषांतरें फडके, बर्वे यांनीं व वीरकर आणि मंडळीनें प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांवरून त्यांची प्रतिपादनशैली व त्यांचें तत्त्वज्ञान यांचा चांगला बोध होतो.

रामदास (१६०८–१६८१) संतकवि, छत्रपति श्रीशिवाजी महाराजांचा समकालीन आणि त्यांनीं आरंभिलेल्या स्वराज्यसंस्थापनेच्या कार्याला पोषक होणारें तत्त्वज्ञान पुरवून सामाजिक आणि धार्मिक संघटनेचें वातावरण स्वतंत्रपणें निर्माण करणारा साधू. पुढें पुढें त्यांच्या आदराला आणि गुरुत्वाला पात्र झालेला आणि मोठी शिष्यपरंपरा, सुमारें ६०–७० मठ, अकरा मारुती आणि अनेक राममंदिरें स्थापन करणारा धोरणी पुरुष. महाराष्ट्रांत पूर्वापार चालत आलेल्या संतांच्या भक्तिपर परंपरेला प्रभावी शत्रु-निर्दालक राम आणि हनुमंत यांच्या उपासनेची जोड देऊन, परमार्थाबरोबरच प्रपंच नीटनेटका करण्याची व्यावहारिक शिकवण देणारा उपदेशक, स्थलकाल-विवेक करून राजकारणी हितबोधासाठीं ' मराठा तितुका मेळवावा ' ' सामर्थ्य आहे चळवळीचें ', ' मारितां मारितां मरावें ', ' यत्न तो देव जाणावा ', ' आधीं प्रपंच करावा नेटका ', ' देवद्रोही तितुके कुत्ते ' इत्यादि अर्थयुक्त सुंदर ब्रीदवाक्यें आपल्या ग्रंथांतून इतस्ततः पेरणारा प्रासादिक लेखक, सुप्रसिद्ध ' दास-बोध ' या व्यवहार–स्मृति अशा गौरवपर नांवाला पात्र असलेल्या ग्रंथाचा निर्माता आणि कडकडीत वैराग्य आणि तपश्चर्येचें सामर्थ्य यांमुळें ' श्रीसमर्थ ' असें नांव गाजलेला ब्रह्मचारी स्वामी.

याचें नांव नारायण सूर्याजी ठोसर, ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. आईचें नांव रेणुका. सूर्याजीपंत व रेणुकाबाई उभयतां सूर्योपासक व रामोपासक होतीं. दांपत्याने १२ वर्षें सूर्याचें पुरश्चरण केल्याचें फळ म्हणून मोंग-लाईंतील ठोसरांच्या जांब गांवीं शके १५३० चैत्र शु. ९ रोजीं दोनप्रहरीं (श्रीरामजन्माचे वेळीं) नारायणाचा जन्म झाला. नारायण बुद्धिमान व हूड होता. पांचव्या वर्षी मुंज होऊन लेखन, वाचन, जमाखर्च व ब्रह्म-कर्मादि शिक्षण सुरू झालें. बालपणींच नारायणाला श्रीरामाचा साक्षात्कार झाला. वडील वारल्यानंतर वयाच्या अकराव्या वर्षी रेणुकाबाईनें लग्न करण्याचें ठरविलें. परंतु लग्नांतून पळ काढून रातोरात नारायण गोदावरीवर आणि नंतर नाशिक, पंचवटी, असा प्रवास करीत टाकळी येथें गुहेंत मुक्काम करून गोदावरीनंदिनी संगमावर पुरश्चरण करीत राहिला. तेथें त्यास वाचा-सिद्धि, साधुत्वाची प्रसिद्धि आणि कांहीं शिष्य लाभले. १२ वर्षें पुरश्चरण पुरें झाल्यावर त्यानें १२ वर्षें सर्व भारतवर्षांतील सर्व धर्मक्षेत्रांच्या सर्व यात्रा संपादिल्या. या अवधींत देशांतील सर्व परिस्थिति हेरून पूर्ण ज्ञान प्राप्त झाल्यावर देशोद्धाराच्या किंवा स्वतःच्या पुढील कार्यक्रमाच्या कल्पना निश्चित करून तो फिरून ' आनंदवनभुवन ' म्हणून गौरविलेल्या कृष्णाकांठच्या महाराष्ट्र भागांतच येऊन स्थिर झाला. एवढ्या पूर्व-तयारीच्या तेजामुळें सहजच त्याला समर्थ असें नांव प्राप्त झालें.

या ठिकाणीं आल्यावर प्रथम मसूर येथें व नंतर आसपास वास्तव्य व संचार असे. घळींत वस्ती, भिक्षाटण, मारुतींची स्थापना, धर्मप्रसार, शिष्य-संवर्धन इत्यादि संतोचित व्यवहार चालू झाला, व प्रसंगोपात्त राजकारणी पुरुष व खुद्द शिवाजी यांच्याशीं गांठीभेटी झाल्या. शके १५७० मध्यें चाफळ येथें श्रीराममंदिर उभारून तेथें श्रीरामनवमीचा उत्सव सुरू केला; व पुढें शिवाजी महाराजांच्या आग्रहानें ते त्यांच्यासाठीं खास बांधविलेल्या सातारानजीक सज्जन-गड या किल्ल्यावर जाऊन राहिले. पुढें तेथेंच त्यांचें देहावसान शके १६०३ माघ व. ९ रोजीं, शिवाजी महाराजांच्या निधनानंतर सुमारें दहा महिन्यांनीं झालें. सज्जनगडावर त्यांची समाधी असून त्यावर भव्य राममंदिर आहे. तेथें हल्लीं प्रतिवर्षी यात्रा व उत्सव चालू आहे. श्रीसमर्थांचें जन्मस्थळ जांब, कर्तृत्वाचें आनंदभुवनांतील चाफळ, आणि समाधिस्थल साताऱ्या-जवळ सज्जनगड ह्या तीनहि ठिकाणीं श्रीसमर्थ सांप्र-दायिकांकडून व विशेषतः धुळ्याचे श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांच्या परिश्रमानें आधुनिक व प्राचीन पद्धती प्रमाणें उत्सवसमारंभ होत असतात.

सर्व संतकवींप्रमाणेंच समर्थ रामदासांच्या चरित्रा-मध्यें त्यांनीं केलेल्या अनेक चमत्कारांचें वर्णन भाविक चरित्रकारांनीं केलेलें आहे. एवढें एक साम्य सोडलें म्हणजे इतर अनेक बाबतींत समर्थांची शिकवण



मासे

आणि त्यांचें कार्य हें इतर 'संताळ्यां'पेक्षां केव्हांहि अगदीं भिन्न, अधिक प्रभावी आणि व्यावहारिक परिस्थित्यनुकूल असें दिसतें. त्यांनीं केलेली मठस्थापना आणि कित्येक अभिमान्यांच्या मताप्रमाणें शिवाजीच्या राजकारणामध्यें साहाय्यभूत झालेली शिष्यप्रणाली, यांना तर कोठेंच तोड नाहीं. आरंभीं आरंभीं कालौघानेंच अपरिहार्य ठरलेले हे दोन महानुभाव व्यक्तींनीं प्रेरित केलेले पंथ अगदीं स्वतंत्र म्हणून जन्म पावले असले, तरी, पुढें पुढें अगदीं अल्पकाल कां होईना, एकमेकांशीं समरस झालेले दिसतात याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. आतां समर्थाचें अगदीं आरंभापासूनचें गुरुत्व, भगव्या झेंड्याचें जनकत्व आणि सर्व स्वराज्याचें फिरून परत दान इत्यादि गोष्टी तितक्या विश्वसनीय आहेत किंवा कसें याबद्दल आज तरी विद्वानांमध्यें अगदीं तीव्र स्वरूपाचें दुमतच आहे.



वि. का. राजवाडे
पृष्ठ १६८५

समर्थांचें लेखन विपुल आहे आणि त्या वेळच्या परिपाठाप्रमाणें सर्व कवितामय आहे. ज्ञानेश्वरांप्रमाणें काव्यलेखनाचें श्रेय समर्थांना देतां येत नाहीं. त्यांची भाषा ओबडधोबड आणि अलंकारहीन आहे. मात्र त्यांत अर्थवाहकता, ओज आणि रसपरिपोष पुरेसा आहे. समाजांत विवेक, सावधानता, वीरवृत्ति फैलावण्यासाठीं त्यांनीं रामायणांतील निवडलेले सुंदरकांड व युद्धकांड हे भाग आणि दासबोध, मनोबोध, करुणाष्टकें, आत्माराम, षड्रिपुप्रकरण वगैरे प्रकरणें इत्यादि स्वतंत्र रचना मिळून सुमारें १५०० पृष्ठें इतका छापील मजकूर श्री. देव यांनीं संग्रहित व प्रसिद्ध केलेला आहे. आज श्रीसमर्थांचा संप्रदाय सामान्यतः सुशिक्षित वर्गांत मान्य झालेला असून त्याचीहि पंढरीच्या वारकरी संप्रदायाप्रमाणेंच एक प्रकारची सुसंघटित अशी रचना, पालख्या, छबिने, यात्रा, उत्सव इत्यादि बनलेली असून ती मागच्या पिढीच्या राजकारणप्रिय लोकांमध्यें अद्यापि लोकप्रिय आहे.

रामन्, सर चंद्रशेखर वेंकट (१८८८–):– पदार्थविज्ञानशास्त्री. प्रिन्सीपॉल, बंगलोर इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स. केटी. एम्. ए., (ऑनर्स); पीएच.डी. (फ्रीबर्ग) ऑनर्स; एलूएलू.डी. (ग्लासगो ऑनर्स); एस्.सी. (कलकत्ता); एफ्. आर. एस्., एलूएलू.डी. (मुंबई).

यांचा जन्म त्रिचनापल्लीस ७ नोव्हेंबर १८८८ ला झाला. हे बी. ए. च्या परीक्षेत मद्रास प्रेसिडेन्सी कॉलेजांतून पहिल्या वर्गांत पहिले आले. एम्. ए. ची परीक्षा आटोपल्यावर कलकत्त्याला हिंदुस्थान सरकारच्या फडणिशी–खात्याच्या वरिष्ठ नोकरीच्या चढाओढीच्या परीक्षेस ते बसले व तींत ते पहिले आले. यांनीं १९०७–१९१५ पर्यंत नोकरी केली. १९१५ ला आपली सरकारी नोकरी सोडून त्यांनीं कलकत्ता विद्यापीठाच्या विज्ञान–विद्यालयांत वास्तवशास्त्राच्या पलित अध्यापकाची जागा स्वीकारली. यांच्या 'रामन्परिणाम' या सुप्रसिद्ध शोधाचें मूळ त्यांच्या सृष्टिचमत्कारांची शास्त्रीय उपपत्ति लावण्याच्या हौसेंत दिसतें. इ. स. १९२४ते १९२५ पर्यंत त्यांनीं पृथ्वीपर्यटन केलें. हिंदी शास्त्रज्ञ म्हणून त्यांचा चोहोंकडे सन्मान झाला. १९२८त भरलेल्या हिंदी सायन्स कॉंग्रेसचे हे अध्यक्ष होते. अध्यक्षपदावरून यांनीं 'रामनपरिणामा'वर भाषण करतांना त्याचा उपयोग सेंद्रिय रसायनशास्त्रास पुष्कळसा होईल असें सांगितलें. यांना 'रामन्परिणाम' या शोधाबद्दल १९३० ला नोबेल प्राइझ मिळालें. वरील शोधाशिवाय इतर शोध म्हणजे वायुकणांचें सूक्ष्म चुंबकत्व मापन करण्याचें यंत्र व तद्वारां द्रव पदार्थांतील अणूंचें चुंबकत्व प्रत्यक्ष दाखविणें वगैरे होत. यांचा पुष्कळशा सायन्सविषयक संस्थांशीं संबंध आला असून सध्यांहि आहे. सध्यां ते बंगलोरच्या 'इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ सायन्स' या संस्थेचे चालक आहेत.

राम मोहन राय, राजा (१७७४–१८३३):–ब्राह्मोसमाजाचा आद्य संस्थापक. बंगालमधील हुगळी जिल्ह्यांतील राधानगर या शहरीं हा जन्मला. बापाची सांपत्तिक स्थिति उत्तम असल्यामुळें त्यानें याच्या शिक्षणाची व्यवस्था केली. याच्या वेळेला सरकारी कागदपत्रांची भाषा फारसी होती म्हणून याला बंगालीबरोबरच अरबी व फारसी या भाषांचा अभ्यास करावा लागला. बापानें याला तेराव्या वर्षीं संस्कृतचें शिक्षण घेण्यास काशीला पाठवून दिलें. तेथें असलेल्या कालांत यानें

संस्कृतांतील सर्व धर्मग्रंथ वाचून काढले. या धर्मग्रंथांपैकीं त्याला वेदांत व उपनिषदें यावरील ग्रंथ फार आवडले. त्यांचा त्यानें फार बारकाईनें अभ्यास केला. या अभ्यासानें तो एकेश्वरी मताचा बनला. पुढें यानें मूर्तिपूजेवर एक खंडनपर ग्रंथ लिहिला. या ग्रंथलेखनानें याचें व याच्या बापाचें बिनसलें. वांकडें आल्यामुळें त्यानें घर सोडलें. यानंतर ३।४ वर्षें त्यानें इंग्लिश व इतर युरोपीय भाषा शिकण्यांत घालविलीं. १८०० मध्यें रंगपूर येथील कलेक्टरच्या कचेरींत यानें कारकुनाची नोकरी धरली. पुढें तो आपल्या कर्तबगारीनें, कांहीं वर्षांनीं, जिल्ह्याचा दिवाण झाला. १८१४ त नोकरीचा राजीनामा देऊन तो कलकत्त्यास राहूं लागला. यापुढचा काळ त्यानें धर्म व समाज सुधारण्यांत घालवायचा असें ठरविलें. वेदान्त व उपनिषदांचीं भाषांतरें बंगालींत व इंग्रजींत करण्यास त्यानें आरंभ केला. एकेश्वरोपासनेसाठीं त्यानें 'आत्मीयसभा' स्थापली. याशिवाय जुनी शास्त्री मंडळी व मिशनरी यांच्याबरोबर तो जाहीर वादविवाद करूं लागला. १८३० त स्वमताला मूर्तस्वरूप येण्यासाठीं त्यानें 'ब्राह्मोसमाजाची' स्थापना केली. सतीची चाल बंद पाडण्यासाठीं व शिक्षणप्रसारासाठीं त्यानें जोराची चळवळ केली. सुदैवानें त्याच्या या प्रयत्नाला यशहि आलें. त्याला दिल्लीच्या बादशहानें १८३० मध्यें 'राजा' ही पदवी दिली व त्यास आपला वकील म्हणून इंग्लंडला पाठवून दिलें. त्या ठिकाणीं याचें थाटाचें स्वागत झालें. तेथें असतांना, न्याय व जमाबंदीच्या पद्धतीसंबंधीं हाऊस ऑफ कॉमन्सच्या सीलेक्ट कमिटीपुढें त्यानें साक्ष दिली. इंग्लंडहून हा फ्रान्सला गेला. या ठिकाणीं त्याची प्रकृति बिघडली म्हणून तो परत ब्रिस्टल येथें आला. या ठिकाणींहि त्याची प्रकृति सुधारली नाहीं. शेवटीं २७ सप्टेंबर १८३३ रोजीं हा ब्रिस्टल येथेंच मरण पावला.

रामानंद (इ. स. १३००-१४११):–विशिष्टाद्वैतमताचा संस्थापक. याच्या मातेचें नांव सुशीला. रामानंदाचें पहिलें नांव रामदत्त. हा बुद्धीचा अत्यंत तीव्र होता. यानें शास्त्राध्ययन बाराव्या वर्षी पुरें केलें. विशेष अध्ययनाकरितां लवकरच हा काशी येथें आला. प्रथम यानें एका शांकरमतानुयायी आचार्याकडे अध्ययनास सुरवात केली; पण याची एकदां सहज राघवानंदाशीं भेट झाली. राघवानंदानें याला पाहतांक्षणींच याच्या अल्पायुषीपणाबद्दल खेद प्रदर्शित केला; त्यानें त्याला ईश्वरभक्ति करण्यास सांगितलें.

यानें त्यांचा उपदेश ग्रहण केल्यावर राघवानंदानें याचें नांव रामानंद असें ठेविलें. पुढें जेव्हां मृत्यूची वेळ आली तेव्हां हा समाधि लावून बसला. समाधि उतरल्यावर मृत्यु टळला असें याच्या ध्यानीं आलें आणि त्यामुळें राघवानंदावर याची दृढ श्रद्धा बसली. योगाभ्यास व समाधि यांचें शिक्षण राघवानंदानेंच याला दिलें होतें. बरेच दिवस श्रद्धापूर्वक गुरूची सेवा केल्यावर हा यात्रेकरितां बाहेर पडला. यात्रेहून परत आल्यावर सध्यां पंचगंगा घाटावर याच्या पादुका असलेल्या ठिकाणीं हा राहूं लागला. श्रीवैष्णव सांप्रदायांत ब्राह्मणच आचार्यपदावर अधिष्ठित होतो. खाण्यापिण्याचे नियमहि कडक रीतीनें पाळावे लागतात. यात्रेंत असतां यानें खाण्यापिण्याच्या बाबतींत नियम पाळले नव्हते म्हणून राघवानंदानें यास प्रायश्चित्त घेण्यास सांगितलें. यानें ती गोष्ट मानिली नाहीं. या नियमभंगासाठीं त्याला राघवानंदानें आपल्या संप्रदायांतून बाहेर काढिलें. गुरूच्या सांप्रदायत्यागानंतर यानेंहि आपला स्वतंत्र संप्रदाय स्थापन केला. "जाति पाँति पुछे नहि कोई। हरिको भजै सो हरिका होई॥" खानपान व जातिपाति या नियमांना महत्त्व न देतां केवळ रामभक्तीला याच्या संप्रदायांत महत्त्व देण्यांत आलें. राधाकृष्णाच्या उपासनेला प्रतिस्पर्धी असा याचा हा रामसीतेच्या उपासनेवर आधारलेला पंथ होता. याच्या शिष्यांनीं या पंथांत चांगलीच प्रगति केली. या वेळीं हिंदुस्थानांत मुसलमानांनीं जें आक्रमण चालविलें होतें त्याचें सिंहावलोकन केलें असतां रामानंदाच्या संप्रदायाचें स्वरूप चांगलें ध्यानांत येतें. रामानंदानें आपले ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिले. त्यामुळें याच्या विचाराचा प्रसार त्याच्या हयातींत लोकांत विशेष झाला नाहीं. याचीं फक्त दोन हिंदी पदें उपलब्ध झालीं आहेत. एक शिखाच्या ग्रंथसाहेबांत आहे.

आपल्या पहिल्या १२ शिष्यांसमवेत तीर्थयात्रा करीत व मायावादी, जैन व बौद्ध यांच्याशीं वादविवाद करून आपलें विशिष्टाद्वैत मत स्थापून लोकांस आपल्या मतांकडे वळवून आपले शिष्य करीत करीत हा सर्व देश हिंडून आला. यांच्या शिष्यांनींहि गोपाळकृष्णोपासनेशीं चांगल्या रीतीनें टक्कर देत देत रामोपासनेचा प्रसार केला.

हिंदु समाजाच्या निकृष्ट वर्गाविषयीं कळकळ हें वैष्णव धर्माचें आरंभापासूनच विशिष्ट लक्षण आहे.

जन्माच्या फेऱ्यांतून वर चढतां चढतां ब्राह्मणकुलांत जन्म घेतल्यावरच मोक्ष मिळविण्याच्या मार्गाचा अवलंब करतां येतो असें कट्टे वेदांती प्रतिपादीत. रामानुजाचार्य वगैरेंनीं ब्राह्मणाकडेच या मार्गाचा अवलंब करण्याचा अधिकार ठेवला होता. परंतु यानें आमूलाग्र सुधारणा घडवून आणून ब्राह्मण व इतर वर्ग यांत मुळींच भेद ठेविला नाहीं. जे जे विष्णुभक्त अगर भगवद्भक्त असतील, मग ते कोणत्याहि वर्णाचे असोत, त्यांनीं एके ठिकाणीं जेवण्याससुद्धां हरकत नाहीं, असें हा म्हणे. नवीन धर्माच्या प्रसारास मातृभाषेचा उपयोग करणें या सुधारणेसहि यानेंच आरंभ केला. रामानंदानें महत्त्वाची अशी केलेली तिसरी सुधारणा म्हणजे कृष्ण व राधा यांच्याऐवजीं शुद्ध राम व सीता यांच्या पूजेचा प्रघात पाडला.

रामानुजाचार्य (इ. स. १०१७–११३७):–विशिष्टाद्वैत मताचे प्रमुख आचार्य. याचा पिता असुरी केशव भट्टर. तो श्रीपेरुम्बुमूरचा राहणारा. मामानें याचें नांव लक्ष्मण असें ठेवलें.

यानें कांजीवरम् येथें यादवप्रकाशापाशीं अध्ययन केलें. हा कांचीच्या देवराजाचा भक्त होता. याच्या आईचा पणजोबा अलबंदर म्हणून होता.

पुढें यानें परियनम्बी यास आपला गुरु केलें, पण याचें व त्याचें फार दिवस पटलें नाहीं. पुढें बायको माहेरीं गेली असतां यानें संन्यास घेतला. याच्या ज्ञानीपणामुळें यास श्रीरंगम् येथील अलबंदरच्या जागीं नेमण्यांत आलें.

अलबंदरला दिलेल्या वचनाप्रमाणें यानें ब्रह्मसूत्रावरील टीका, भगवद्गीता टीका, वेदांतसारम्, वेदांतसंग्रह आणि वेदांतदीप हे ग्रंथ लिहिले.

याची भाष्यकार म्हणून सर्वत्र कीर्ति पसरली आणि हा काश्मीरांत जाऊन आला. याचा शिष्य 'कुरथल्वर' याचें नांव पराशर ठेवून यानें त्याकडून सहस्रनामावर टीका लिहिली.

कुलोत्तुंग चोलनें यास शैव तत्त्वावर वाद करण्याकरितां बोलावलें. हा वैष्णव असल्यानें गेला नाहीं, पण आपला शिष्य कुरथल्वर यास संन्यासाचा वेष देऊन पाठविलें. पण त्याचा तेथें वध करण्यांत आला. हा गृहस्थाचा वेष घेऊन बिट्टीदेव होयसळाच्या राज्यांत गेला. तेथें बिट्टीदेवच्या मुलीच्या अंगांतील भूत काढल्यानें त्याची याच्यावर श्रद्धा बसली. पुढें हा श्रीरंगम् येथें आला. 'कुरथल्वर'च्या मृत्यूबद्दल यानें दुःख प्रदर्शित केलें. नंतर यानें आपल्या विशिष्टाद्वैत मताचा सर्वत्र प्रचार केला व वयाला एकशें वीस वर्षें झाल्यावर समाधि घेतली. याची समाधि होयसळ येथें आहे. याचें तत्त्वज्ञान म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनीं संस्कृतमध्यें खंडनासह 'अद्वैतामोदः' या ग्रंथांतून दिलें आहे. आणि तो ग्रंथ आनंदाश्रम ग्रंथमालेंत प्रसिद्ध झाला आहे.

रावण:–हा पुलस्त्यपुत्र विश्रव्याचा पुत्र. याच्या आईचें नांव केशिनी. सापत्न भावासारखें (कुबेरासारखें) ऐश्वर्यवान् होण्यासाठीं हा तपश्चर्या करावी म्हणून गोकर्णक्षेत्रांत गेला. तेथें दहा हजार वर्षें यानें तप केलें. प्रत्येक हजार वर्षांच्या शेवटीं हा आपलें एक एक मस्तक अग्नींत हवन करी. शेवटीं ब्रह्मदेवानें प्रसन्न होऊन मनुष्येतर प्राण्यापासून अवध्यत्व प्राप्त झालें. हा वर शंकरानें दिला असेंहि कांहीं ठिकाणीं नमूद आहे. यानंतर त्यानें कुबेर, अनेक राजे, इंद्र यांना जिंकलें. हा पाताळांत गेला असतांना याचा वालीनें गर्वपरिहार केला.

कार्तवीर्य, अर्जून व वाली यांच्या बाबतींत त्याला माघार घ्यावी लागून त्यांशीं यानें सख्य केलें.

कैलास पर्वताच्या जवळ असलेल्या शरवनापाशीं याचें विमान थांबलें. या वनांतील नंदीचा यानें उपहास केला म्हणून नंदीनें यास वानरांकडून पराजय पावण्याचा शाप दिला. तेव्हां यानें संतापून कैलास पर्वत हलविण्यास आरंभ केला; पण शंकरानें तो आंगठ्यानें दाबतांच याचे हात पर्वताखालीं सांपडून हा ओरडूं लागला. शेवटीं सामगायनानें शंकराला प्रसन्न केल्यावर शंकरानें यास रावण हें नांव व चंद्रहास नांवाचें खड्ग दिलें.

हा सीतेच्या स्वयंवराला गेला होता, यानें जनकाच्या राजसभेंतील धनुष्यहि उचललें, पण तें तोलतां न आल्यानें तें याच्या छातीवर पडलें. या प्रसंगांतून रामानें यास सोडविलें.

एकदां याला राम, लक्ष्मण व सीता दंडकारण्यांत आल्याचें कळलें. त्यावेळीं यानें रामलक्ष्मण नसतांना सीतेला पळवून नेलें. वाटेंत आडवा आलेल्या जटायूला ठार करून यानें सीतेला अशोकवनिकेंत ठेविलें. याचा भाऊ बिभीषण यानें याला सीतेला सोडण्याविषयीं पुष्कळ सांगून पाहिलें; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. यानें सीतेला वश करण्याबद्दल अनेक उपाय

केले, पण ते सर्व सीतेच्या प्रतिकूलतेनें निष्फळ झाले.

सीतेपायीं याच्यांत व रामांत युद्ध सुरू झालें. पहिल्या दिवशीं यानें रामलक्ष्मणांना नागपाशांनीं बद्ध करून तें दृश्य सीतेस दाखविलें. सहाव्या दिवशीं स्वतः रावण गेला पण त्याचा पराजय झाला. सीतावधापासून याला इतरांनीं निवृत्त केलें. शेवटीं हा मारला गेला.

हा ब्राह्मण होता. याला मंदोदरीशिवाय हजार स्त्रिया होत्या. याचे पुत्र इंद्रजित, देवांतक, नरांतक, त्रिशिरस् आणि अतिकाय हे होत.

एकदां यानें आईच्या पूजेसाठीं शिवाचें आत्मलिंग आणिलें असतां लघुशंका लागली म्हणून जमिनीवर ठेवल्यानें तें जमिनींत शिरलें. तेंच गोकर्ण येथील लिंग होय.


रावणाला दहा तोंडें व वीस हात होते अशी समजूत आहे व तसें कांहीं ठिकाणीं वर्णनहि आहे. पण वाल्मिकी रामायणांतच त्यास दोन हात व एक तोंड असल्याचें वर्णन आहे.

राष्ट्रसंघः—व्हर्साय येथील व दुसऱ्या ठिकाणीं झालेल्या निरनिराळ्या तहांचाच एक भाग म्हणून राष्ट्रसंघाची स्थापना १० जानेवारी १९२० सालीं झाली. या राष्ट्रसंघाच्या स्थापनेच्या ठरावाचीं किंवा कराराचीं एकूण २६ कलमें आहेत. प्रेसिडेंट विल्सनचे जे १४ मुद्दे प्रसिद्ध आहेत, त्यांपैकीं १४व्या मुद्यांत सुचविलेल्या कल्पनेप्रमाणें राष्ट्रसंघाची कल्पना निघाली; पण अमेरिकेनें याला आपली संमति कधींच दिली नाहीं व स्वतःहि ती सभासद झाली नाहीं.

असेंब्ली, कौन्सिल व सेक्रेटरिएट असे राष्ट्रसंघाचे तीन विभाग आहेत. राष्ट्रसंघाच्या सभासदराष्ट्राला तीन प्रतिनिधी पाठवितां येतात, पण ठरावावर मत मात्र एकच देतां येतें. जरूरीप्रमाणें असेंब्लीची बैठक बोलावितात. कौन्सिलमध्यें ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली व जपान या प्रत्येकातर्फे एक प्रतिनिधि व इतर लहान राष्ट्रांचे तर्फे एकूण चार प्रतिनिधी अशी प्रारंभीची योजना होती. पण आतां ही संख्या १५ पर्यंत वाढलेली आहे. यापैकीं ग्रेट ब्रिटन, फ्रान्स व रशिया हीं तीन राष्ट्रें कायम सभासद आहेत. कार्याच्या दृष्टीनें असेंब्ली व कौन्सिल जगाच्या शांततेला धोका निर्माण होणाऱ्या कोणत्याहि गोष्टीची चर्चा करितात; पण कौन्सिलमध्यें बलाढ्य राष्ट्रांचा समावेश असल्यामुळें प्रत्यक्ष कार्य कौन्सिलमध्येंच चालतें असें म्हटलें तरी चालेल. कांहीं विशिष्ट बाबी सोडल्या तर इतर सर्व बाबतींत निर्णय सर्वांच्या मतानें ठरावा लागतो. याशिवाय आंतरराष्ट्रीय न्यायालय (Permanent Court of International Justice) ही एक महत्त्वाची संस्था या करारानुसार स्थापन झाली असून राष्ट्राराष्ट्रांनीं आपसांतील तंटे या न्यायालयापुढें ठेवून त्यांचा निर्णय लावून घ्यावयाचा. पण या न्यायालयाचा निकाल हा नेहमीं शिफारसवजाच मानला गेल्यानें या न्यायालयाची कल्पनाहि थोडी हास्यास्पद झाली आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय मजूरसंघ (International Labour Organisation) हीहि एक उपसंस्था राष्ट्रसंघातर्फे काम करीत असून जगांतील मजुरांच्या प्रश्नांसंबंधीं ही संस्था कार्य करीत असते. सेक्रेटेरिएट ही एक अत्यंत चोख व्यवस्था असलेली संस्था असून तिच्याकरवीं निरनिराळ्या राष्ट्रांतील अनेक प्रश्नांबाबतची उत्कृष्ट माहिती संकलित केलेली आढळते. मजुरांचे प्रश्न, अफूचा व्यापार, स्त्रियांचा व्यापार, वेश्याव्यवसाय, मलेरिया इ. ताप व गुप्त रोग इत्यादींची सूक्ष्म माहिती मिळवून तीवर उपाय सुचविण्याचें कार्यहि सेक्रेटेरिएट करतें. याशिवाय इतर लहानसान संलग्न संस्था आहेत. कौन्सिल वर्षांतून तीनदां भरतें. राष्ट्रसंघाचा खर्च संघाच्या सभासदराष्ट्रांच्या दर्जाप्रमाणें वर्गणी घेऊन चालविला जातो. राष्ट्रसंघाला स्वतःचें सैन्य किंवा आरमार नाहीं. राष्ट्रसंघाचे सर्व ठराव शिफारसवजाच असल्यामुळें प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनें अपेक्षेप्रमाणें फलप्राप्ति होत नाहीं. अशा रीतीनें राष्ट्रसंघाच्या हातीं प्रत्यक्ष अशी कांहींच सत्ता नसल्यामुळें जागतिक शांततेच्या दृष्टीनें संघाला प्रत्यक्ष कांहींच करतां आलेलें नाहीं. सभासद राष्ट्रांनीं आपल्या तहासंबंधीं व इतर बाबतींत राष्ट्रसंघाचा निकाल आपल्या विरुद्ध लागतांच राष्ट्रसंघ सोडावा व त्याची शक्ति कमी करावी असा प्रकार सुरू झाला व अखेरीस फ्रान्स, इंग्लंड इत्यादि कांहीं राष्ट्रांचीच 'राष्ट्रसंघ' ही संस्था होऊन बसली आहे.

आरंभीं व्हर्सायच्या तहावर सह्या करणाऱ्या राष्ट्रांपैकीं २९ राष्ट्रें सभासद झालीं. नंतर तटस्थ अशीं १३ राष्ट्रें मिळालीं. सध्यां राष्ट्रसंघाचे ५४ सभासद आहेत. १९२५ मध्यें जर्मनी सभासद झाला; पण १९३३ मध्यें हिटलर सत्ताधारी बनतांच जर्मनीनें राष्ट्रसंघ सोडला. दोस्त राष्ट्रांच्या हातांतील राष्ट्रसंघ

हें एक बाहुलें आहे असें हिटलरचें म्हणणें आहे. युरोपांतील कांहीं प्रश्न राष्ट्रसंघानें सोडविले, पण जपानच्या चीनवरील स्वारीला (१९३२) आळा घालतां आला नाहीं. राष्ट्रसंघानें जपानचा नुसता निषेध करतांच जपाननेंहि सभासदत्व सोडलें. १९३४ मध्यें रशियाला राष्ट्रसंघाचा सभासद करून घेण्यांत आलें. १९३५ मध्यें इटलीनें अबिसिनीयावर स्वारी केल्यामुळें इटलीविरुद्ध राष्ट्रसंघानें आर्थिक नाकेबंदी जाहीर केली; तेव्हां इटलीनेंहि आपलें सभासदत्व सोडलें. इटलीनें अबिसिनीया जिंकलाच. या एकामागून एक झालेल्या आघातांमुळें राष्ट्रसंघाची इभ्रत खलास होऊन ती एक वादविवाद करणारी संस्थाच बनली. १९३८मध्यें जर्मनीनें ऑस्ट्रिया व झेकोस्लोव्हाकिया घेतला, तेव्हां तर राष्ट्रसंघाला चूप बसण्यावांचून दुसरा कांहींच मार्ग उरला नाहीं.



एका इंग्रजी चित्रावरून हें चित्र काढलेलें आहे. आकाशांतील निरनिराळया तारकापुंजांचे आकार लक्षांत घेऊन त्याप्रमाणें त्यांना नांवें दिलीं आहेत. कोणत्या महिन्यांत कोणती रास दिसते हें या चित्रावरून लक्षांत येईल. (पृष्ठ १७०२ पाहा.)

रासः–नभोमंडळांत सूर्य, चंद्र, शुक्र इत्यादि ग्रह ज्या एका नियमित वर्तुलाकार मार्गानें फिरतात त्याला क्रांतिवृत्त म्हणतात. या क्रांतिवृत्ताचे बारा सारखे भाग कल्पिलेले आहेत. हे बारा कल्पित भाग म्हणजेच राशी होत. या क्रांतिवृत्तांतील एका भागांतून सूर्याचें दुसऱ्या भागांत जाणें म्हणजे संक्रमण किंवा संक्रांति (संक्रांत) असें म्हणतात. या एकूण १२ राशी आहेत. त्या अनुक्रमें १ मेष (Aries) २ वृषभ (Taurus) ३ मिथुन (Gemini) ४ कर्क (Cancer) ५ सिंह(Leo) ६ कन्या (Virgo)७तूळ (Libra) ८ वृश्चिक (Scorpio) ९ धन (Sagittarius), १० मकर (Capricornus) ११ कुंभ (Aquarius) १२ मीन (Pisces). कंसांतील नांवें लॅटिन आहेत. सव्वादोन नक्षत्रांची एक रास होते म्हणजे चंद्र सव्वादोन नक्षत्रें ओलांडून जाईपर्यंत एकाच राशीस असतो. जन्मकाळीं ज्या राशीस चंद्र असतो ती जन्मरास होय व जन्मकाळीं ज्या राशीस सूर्य असतो तें जन्मलग्न होय. पंचांगांतील शेवटच्या कोष्टकांत चंद्र कोणत्या राशीस आहे हें दाखविलेलें असतें.

ऋतु व राशी यांचा संबंध पुढें दिला आहे. ज्या राशीस सूर्य असतो त्या लागोपाठ दोन राशींचा एक ऋतु मानतात.

१ वसंत–मीन व मेष, २ ग्रीष्म–वृषभ व मिथुन, ३ वर्षा–कर्क व सिंह, ४ शरद्–कन्या व तूळ, ५ हेमंत–वृश्चिक व धन, ६ शिशिर–मकर व कुंभ.

रासपुटीन, ग्रेगरी (१८७३–१९१६):–एक रशियन सुप्रसिद्ध खलपुरुष. याचें खरें नांव नॉव्हिक (Novikh) असें होतें. याचा सैबेरियांत, पोक्रोव्हस्की या ठिकाणीं जन्म झाला. याचा बाप एक साधा कोळी होता. याला शालेय शिक्षणाचा लाभ असा मुळीं झालाच नाहीं; त्याला सही करण्यापुरतें लिहिण्याचें शिक्षण पुढें मिळालें. प्रारंभीं कोळ्याचाच धंदा त्यानें सुरू केला; पण दारूबाजी, ठकबाजी वगैरे बाजींत तो लवकरच पटाईत झाला. चोरीबद्दल त्याला सरकारचा पाहुणचारहि घेण्याचा मान मिळाला.

तेथून सुटल्यावर त्यानें भगवीं वस्त्रें धारण करून आध्यात्मिक क्षेत्रांत संभावित गुंडगिरी सुरू केली. 'अलौकिक गुरुमाउली' म्हणून त्याच्याभोंवतीं हजारो भगतगण जमा होऊं लागले. त्यांत स्त्रियांची संख्या जास्त. इ. स. १९०५ चे सुमारास रशियांतील हजारों तरुण व तरुणी यांचीं मतें रासपुटीनानें आपल्याकडे खेंचून घेतलीं होतीं. त्यानें आपला म्हणून एक नवीनच धर्मसांप्रदाय सुरू केला. त्याची छाप राजदरबारावर व विशेषतः राजघराण्यांतील महिलाजनांवर पडून राजपुटीनगुरुमहाराजांचें राजवाड्यांत अधिकाधिक येणें–जाणें होऊं लागलें व झारच्या कारकीर्दीत बायकी राजकारणाचा तो एक बालेकिल्ला बनला.

या सर्व क्रियेला प्रतिक्रिया होऊन इ. स. १९१३ सालीं त्याच्यावर राजदरबारची अवकृपा होऊन त्यास सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलें; पण महायुद्ध सुरू होतांच तो तेथून परत आला. लवकरच राजस्त्रियांची त्याच्यावर पूर्वीप्रमाणें मर्जी बसली व बायकी राजकारणाचीं कारस्थानें पूर्ववत् त्याच्यामार्फत सुरू झालीं. दिवसेंदिवस लोकक्षोभ वाढत गेला व शेवटीं १९१६, २९ डिसेंबरमध्यें रासपुटीनाचा पेट्रोग्रॅड येथें एका जबाबदार रशियन ऑफिसरनें खून केला.

राहु व केतुः–हे स्वतंत्र ग्रह नसून क्रांतिवृत्ताचे दोन छेदबिंदु आहेत. तथापि त्यांना अयनगति आहे व पापग्रहासारखींच त्यांचीं फलें मिळतात. म्हणून त्यांना स्वतंत्र ग्रह असें फलज्योतिर्विदांनीं मानलें आहे. यांना वामगति आहे व अठरा महिन्यांनीं एका राशींतून दुसऱ्या राशींत हे जातात. दशम व लाभस्थानांतला शुभदृष्ट राहु मनुष्याचें नशीब एकदम उदयाला आणतो. धनस्थानांतील राहु मनुष्याला धनप्राप्तिकरितां घर सोडून भटकावयास लावतो. लग्नीं अगर सप्तामांतील राहु संसारांत सुख देत नाहीं व नवम अगर लाभस्थानांतील राहु परजातीच्या मित्रांत अगर लोकांत येणारा संबंध दर्शवितो.

रिचर्ड, सिंहहृदयी (Richard the Lion-hearted ११५७–९९):–इंग्लंडचा राजा व २ऱ्या हेन्रीचा तिसरा मुलगा. तो इतिहासांत 'सिंहहृदयी' (The lion hearted) म्हणून प्रसिद्ध आहे. इ. स. ११७० सालीं त्यास अक्विटेनचा ड्यूक करण्यांत आलें. यास हेन्री व जॉफ्रे हे दोन भाऊ होते. त्यांच्यांशीं व आपल्या वडिलाशीं तो नेहमीं भांडत असे. वडील वारल्यानंतर हा इंग्लंडच्या गादीवर बसला; पण सहा महिन्यांतच, सुरू झालेल्या धर्मयुद्धांत (Crusade) प्रामुख्यानें भाग त्यानें घेण्यासाठीं गादीचा त्याग केला. इ. स. ११९१त जूनमध्यें त्यानें धर्मयुद्धांत जातीनें भाग घेऊन पॅलेस्टाईन येथें रणांगणाचें नेतृत्व पत्करलें.

त्यानें मोठ्या शौर्यानें चढाई करून तेथील किल्ला सर केला; पण धर्मयुद्धांत सामील झालेल्या राजांत बेकी व परस्पर हेवा मत्सर मोठ्या प्रमाणांत चालू होते; रिचर्डचा स्वभावहि करडा व उतावीळ असल्यानें त्याचें इतर राजांशीं पटेना. अशांत त्यास मिळालेला विजय इतर राजांच्या डोळ्यांवर आला. यामुळें ते राजे रिचर्डचा अधिकाधिक द्वेषच करूं लागले व ते त्याला सोडून परत आपल्या राज्याकडे जाऊं लागले. रिचर्डचा द्वेष करण्यांत प्रमुख असा फ्रान्सचा राजा होता. यामुळें पॅलेस्टाईन जिंकण्याचा नाद सोडून देऊन अमीर सलादिन याच्याशीं तीन वर्षांचा तह करून रिचर्ड इंग्लंडला जाण्यासाठीं मागें परतला. परंतु ऑस्ट्रियामध्यें त्यास तेथील राजानें कैद करून ठेवलें व पुढें मोठी रक्कम घेऊन सोडून दिलें. इ. स. ११९४ मार्चमध्यें तो इंग्लंडमध्यें परत आला. त्यानें आपला भाऊ जॉन यास मोठ्या उदार अंतःकरणानें क्षमा केली व राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं, पण त्यास फार दिवस तें सुख लाभलें नाहीं. फ्रान्सच्या राजावर सूड उगवण्यासाठीं म्हणून त्यानें ११९९ मध्यें त्याच्यावर स्वारी केली. ती स्वारी चालू असतां एप्रिल ६ रोजीं रिचर्ड जखमी होऊन त्यांतच त्याचा अंत झाला.

रुई:—रुक्ष व ओसाड प्रदेशांत वाढणारें हें एक बहुवार्षिक झुडूप आहे. हीं झुडुपें कोंकणांत मोठ्या प्रमाणावर आढळतात. झाडाच्या सर्व अंगांत पांढरा चीक आढळतो. सर्व झाड अल्प प्रमाणांत राख शिंपडल्याप्रमाणें भुरकट दिसतें; पानें जाडसर व गुळगुळीत असतात. फुलें जांभळट पांढऱ्या रंगाचीं असतात. शुद्ध पांढऱ्या फुलांचींहि कांहीं झाडें आढळतात. फळें बोंडाप्रमाणें असून त्यांत कापूस असतो. तीं पक्व झालीं म्हणजे फुटतात व तंतुयुक्त बिंया दूरवर वाऱ्यानें उडतात. या उडणाऱ्या लांब तंतुयुक्त बिंयांसच मुलें 'म्हाताऱ्या' असें म्हणतात.

हिंदुधर्मशास्त्राच्या दृष्टीनें रुईस फार महत्त्व आहे. पुरुषाला तिसरा विवाह करणें असेल तर प्रथम त्यानें रुईच्या झाडाशीं लग्न करून नंतर इच्छित वधू वरावी असें धर्मशास्त्र म्हणतें. या झाडाचे अनेक औषधी उपयोग आहेत. कोंकणांत ह्या झाडांच्या डहाळ्यांचा उपयोग भाजीपाल्यांना व इतर आंबा वगैरे झाडांना खताच्या दृष्टीनें करतात. सालीचे तंतू काढून त्याचे दोरही करितात. चीक पोटांत गेल्यास आग होऊन वांत्या व रेच होतात.

रुक्मिणी:—विदर्भाधिपति भीष्मकाला लक्ष्मीच्या अंशानें झालेली कन्या. ही उपवर झाल्यावर हिनें, कृष्णाचें रूपाबद्दल बरीच आधीं माहिती मिळाल्यामुळें, कृष्णालाच वरण्याचा निश्चय केला. हिचें रूपगुण ऐकून कृष्णानें हिच्याबद्दल भीष्मक राजाकडे मागणी घातली. पण हिचा थोरला भाऊ रुक्मि हा कृष्णाच्या उलट असल्यामुळें त्यानें कृष्णाची मागणी नाकारली. नंतर हिला शिशुपालाला द्यावयाची असें ठरलें. हिच्या भावानें विवाहाची सिद्धता केली. तेव्हां हिनें गुप्तपणें कृष्णाला निरोप पाठविला कीं, मी अंबिकेच्या दर्शनाला आल्यावर आपण मुकाट्यानें तेथें येऊन मला घेऊन जावें. निरोपाप्रमाणें कृष्ण एका रात्रींत कुंडिनपुरांत आला. मागून सैन्यासह बलरामहि आला. राम व कृष्ण यांचें स्वागत क्रथ, कैशिक व भीष्मक यांनीं केलें. रुक्मिणीचा विवाह पार पडावा म्हणून शिशुपालपक्षीं अनेक राजे ससैन्य आले होते. कुलाचाराप्रमाणें लग्नापूर्वीं ही देवीच्या दर्शनास आल्यावर कृष्णानें हिला रथांत घेऊन द्वारकेकडे प्रयाण केलें. यादवांनीं इतर सैन्यांचा पराभव केला. रुक्मीचाहि पराभव कृष्णानें केला. नंतर द्वारकेंत कृष्णाशीं हिचा विवाह मोठ्या थाटानें पार पडला. लग्नानंतर हिला कांहीं दिवसांनीं प्रद्युम्न हा मुलगा झाला. हिला एकंदर दहा मुलगे व चारुमती ही कन्या अशीं अकरा मुलें झालीं. कृष्णाला जेवढ्या स्त्रिया होत्या त्या सर्वांत ही प्रमुख होती. भैष्मी, विदर्भी या नांवांनींहि रुक्मिणीला लोक ओळखतात. हिनें रुक्मीच्या मुलीला आपली सून करून घेतली होती. श्रीकृष्णनिधनानंतर हिनें अग्निप्रवेश केला.

रुपें:—एक मुल्यवान धातू. सोनें व प्लॅटिनम यांच्याखालोखाल हाच मौल्यवान धातू आहे. अनादि कालापासून रुप्याचा उपयोग दागिने, भांडीं, कलाबतूचीं कामें व नाणीं यांसाठीं होत आला आहे. सोन्यापेक्षां तें विपुल प्रमाणांत सांपडत असल्यामुळें महत्त्वाच्या नाण्यासाठीं त्याचा उपयोग सर्व जगभर होत आहे. शुद्ध रुपें म्हणजे चांदी चकचकीत शुभ्र रंगाची असते. रुपें सोन्यापेक्षां कठीण व तांब्यापेक्षां मऊ असतें. ठोकलें असतां आकारानें वाढण्याचा जो एक गुणधर्म धातूंच्या अंगीं असतो त्या बाबतींत सोन्याच्या खालोखाल रुप्याचा क्रमांक लागतो. रुप्याचा $\frac{१}{१००००००}$ इंच इतका पातळ पत्रा

(वर्ख) निघूं शकतो व केंसाहून बारीक तार काढतां येते. १७६१° फॅ. एवढ्या उष्णतामानांत रुपें वितळतें व आणखी आंच वाढविली तर रुप्याचा रस उकळूं शकतो. वितळलेल्या स्थितींत आपल्या आकाराच्या बावीसपट ऑक्सिजन शोषण्याची त्याला शक्ति असून तें थंड होऊं लागतांच ऑक्सिजन बाहेर पडूं लागतो. कोणत्याही धातूपेक्षां रुप्याच्या अंगीं विद्युत्वहनशक्ति अधिक आहे व उष्णतावहनशक्तीच्या बाबतींत सोन्याच्या खालोखाल त्याचाच क्रमांक लागतो. लोखंड, टिन्, शिसें, तांबें व पारा यांत रुपें मिसळूं शकतें. नायट्रिक ॲसिड (नत्रकाम्ल)मध्यें वितळवून व तें मिश्रण साध्या मिठांत मिसळून क्लोराइड ऑफ सिल्व्हर तयार करतात व त्या मिश्रणाचा फोटोग्राफींत ड्राय प्लेट तयार करण्याकडे उपयोग करतात. या मिश्रणास उजेड लागला कीं तें काळें पडूं लागतें. रुपें व नत्रकाम्ल यांच्या मिश्रणापासून काडीखार (Silver Nitrate) तयार करतात.

भूपृष्ठाखालीं नुसती पूड, खडे, ओबडधोबड चिपा अशा स्वरूपांत तें सांपडतें. क्वचित् सोन्याशीं संयुक्त स्वरूपांतहि सांपडतें. याशिवाय शिसें व तांबें यांबरोबरहि तें आढळतें. खाणींतून काढल्यावर तें शिशाशीं मिसळलेलें असेल, तर अल्प उष्णता देऊन शिसें वितळवून रुप्याचा भाग स्वतंत्र काढतां येतो. पूड असेल तर त्यावरून पाणी जाऊं देतात. त्यामुळें हलके पदार्थ वाहून जाऊन रुप्याचे जड कण खालीं राहतात. या व अशा अनेक प्रकारांनीं रुपें काढून घेऊन शुद्ध करून घेतात.

रुबेन्स, पीटर पॉल (१५७७–१६४०):–चित्रकलेंतील फ्लेमिश स्कूलचा एक जगविख्यात चित्रकार. याचा जन्म २९जून१५७७रोजीं जर्मनींत सीगेन गांवीं झाला. वडिलांच्या मृत्यूनंतर त्याची आई आपल्या मुलांसह ॲंटवर्पला जाऊन राहिली. रुबेन्सनें जुन्या चित्रकारांच्या चित्रांच्या नकला करून चित्रकलेचा अभ्यास केला व १५९८ मध्यें त्यानें पहिल्या प्रतीचा चित्रकार म्हणून कीर्ती कमाविली. १६०० मध्यें तो इटलींतील चित्रकारांच्या चित्रांचा अभ्यास करण्यासाठीं इटलींत गेला व मांटुआच्या ड्यूककडे नोकरीस राहिला. १६०८मध्यें तो ॲंटवर्पला परतला व आर्चड्यूक आलबर्टच्या पदरीं राहिला. लौकरच सर्व युरोपभर याची कीर्ती पसरली व अनेक ड्यूक व राजे यांच्याकडून त्याला चित्रांच्या ऑर्डरी मिळाल्या. त्यानें सुमारें १२५० चित्रें रंगविलीं. युरोपांतील प्रमुख चित्रसंग्रहांतून याचीं चित्रें आढळून येतात. १६२२ मध्यें मारी डी मेडिसीच्या (राजमाता) आमंत्रणावरून तो पॅरिसला गेला व लक्झेंबर्गच्या राजवाड्यांत राजमातेच्या इच्छेवरून तिच्या आयुष्यांतील प्रसंगसूचक अशीं दृश्यें त्यानें चित्रिलीं. १६०९ मध्यें इझाबेला ब्रांट या सुंदर युवतीशीं त्यानें लग्न केलें होतें. पण १९२६ मध्यें इझाबेला वारली तेव्हां चार वर्षांनंतर त्यानें पुन्हां हेलेन फोरमेंट नांवाच्या तरुणीशीं दुसरें लग्न केलें.

रुबेन्स हा पोर्ट्रेट, धार्मिक व पौराणिक, शेतीविषयक व राजदरबारच्या विषयांचीं चित्रें काढणारा म्हणून प्रख्यात आहे. चतुर स्वभाव व जोडीला सहा भाषांवरील प्रभुत्व यामुळें त्याला अनेक वेळां वकील म्हणूनहि काम करावें लागलें. अशाच एका प्रसंगीं तो इंग्लंडला गेला. तेथें त्यानें पहिल्या चार्लसला अनेक चित्रें काढून खूष केलें व स्पेनचें आणि इंग्लंडचें सख्य जुळविलें. याच गुणामुळें स्पेनचा राजा चौथा फिलिप हाहि त्याच्यावर खूष झाला. चार्लस व फिलिप या दोघांनींहि त्याला ' नाइटहुड ' (Knighthood ' सर ' पदवी मिळते तो मान) देऊन गौरविलें. १६४० मध्यें हा मेला. याचें सर्व आयुष्य सुखांत गेलें. कीर्ती व पैसा त्याच्या पायाशीं बसून होता. रंगकौशल्य, उठाव व बारिकसारीक गोष्टीहि योग्य प्रमाणांत व्यक्त करण्यांत याचा हातखंडा होता. याच्या चित्रांपैकीं The Descent from the Cross, The Crucifixion, Lion Hunt, Emperor Maximilian I हीं चित्रें विशेष प्रसिद्ध आहेत. तो ३० मे १६४० रोजीं ॲंटवर्प येथें मेला.

रुमानिया:–दक्षिण युरोपांतील एक लहानसें राष्ट्र. १८७७–१८७९ या वर्षांत रशिया व टर्की यांच्या युद्धानंतर बर्लिनच्या कॉन्फरन्सनुसार रुमानिया स्वतंत्र झाला.

स्थान व लोक–काळ्या समुद्राच्या पश्चिमेस व बल्गेरियाच्या उत्तरेस आहे. जून १९४०च्या पूर्वीचें क्षेत्रफळ ११३,००० चौरस मैल व लोकसंख्या १९,५००,००० इतकी होती. लोकसंख्येपैकीं बहुसंख्य रुमेनियन व इतर ज्यू, बल्गेरियन, जर्मन, हंगेरियन, तुर्की, आरमेनियन व जिप्सी लोक आहेत. रुमेनियन स्वतःला रोमन लोकांचे वंशज मानतात. पण कांहीं शास्त्रज्ञांच्या मतें त्यांच्या रक्तांत रोमन, ट्यूटॉन, स्लाव्ह व मंगोल या लोकांच्या रक्तांचें मिश्रण आहे.

त्यांची भाषा लॅटिनपासूनच निघालेली असून इटालियन भाषेसारखीच आहे. सनातन ग्रीक धर्माप्रमाणेंच त्यांचा धर्म आहे.

लगतच्या रशियन प्रांताप्रमाणेंच हवामान आहे. कमालीचे थंड हिंवाळे (हिंवाळ्यांत कित्येक वेळीं शून्याखालीं २०° पर्यंत थर्मामिटर जातो. यावरून थंडीची कल्पना येईल.) उष्ण उन्हाळे, व सर्व वर्षभर मधून मधून पडणारा पाऊस (जूनमध्यें सर्वांत जास्त पाऊस पडतो) असें या देशाचें हवामान आहे.

खनिज संपत्ति व उद्योगधंदे—लोखंड, शिसें, चांदी, तांबें, मँगेनीज, दगडी कोळसा, मीठ सांपडतें. संगमरवरी दगडाच्या खाणी, मूल्यवान माती (भांडीं करण्याकरितां), कांचसामानासाठीं चांगल्या प्रतीची वाळू विपुल आहे. कार्पेथियन पर्वताच्या पायथ्याशीं पेट्रोलच्या खाणी आहेत. रुमानियाचें पेट्रोलचें उत्पन्न मोठें असल्यामुळेंच सध्यां त्याला जर्मनी व रशिया या दोघांचा सासुरवास सोसावा लागत आहे. याशिवाय शेतीचा धंदा हा प्रमुख असून $\frac{८}{१०}$ लोकसंख्या शेतींतच गुंतलेली असते. याशिवाय ७,०००,००० एकर जंगल असून त्यांत ओक, बीच, पाइन, फर यांचीं विपुल झाडें आहेत.

सरकारच्या मालकीची २५०० मैल लांबीची रेल्वे असून महत्त्वाची वाहतुक रेल्वेनेंच होते. गहूं, दारू व इतर धान्यें निर्गत होतात व यंत्रें आणि जीं धान्यें किंवा इतर खाण्याच्या वस्तू देशांत होत नाहींत त्या आयात होतात.

शिक्षण व राज्यव्यवस्था—शिक्षण मोफत व सक्तीचें आहे. पण अद्याप इतर पुढारलेल्या देशांच्या मानानें निरक्षरांचें प्रमाण बरेंच आहे. जेसी व बुखारेस्ट (राजधानी) येथें विश्वविद्यालयें आहेत.

सनदशीर राजशाही प्रस्थापित झालेली असून पुरुषसंततीकडेच गादी चालते. सीनेट व चेंबर ऑफ डेप्युटीज अशीं दोन विधिमंडळें असून मुख्य प्रधान व इतर आठ मंत्र्यांचें मंत्रिमंडळ असतें. मुख्य प्रधान हाच मंत्रिमंडळाचा अध्यक्ष असतो. बॅलट मतदानपद्धतीप्रमाणें दोन्ही विधिमंडळांचे सभासद निवडतात.

इतिहास—रोमन साम्राज्यांत ‘ डेसिया ’ नांवानें सध्यांचा रुमानिया ओळखला जात असे. तेथील लोक त्या वेळीं डेसियन या नांवानें ओळखले जात असत. मध्ययुगांत डेसियाचे मोल्डेव्हिया व वालाचिया असे दोन भाग झाले; व कांहीं कालानंतर हे दोन्हीहि प्रांत टर्कीच्या बादशहाचे मांडलिक बनले. पण १९ व्या शतकांत रशियाच्या झारनें स्वारी करून दोन्ही प्रांत आपल्या राज्याला जोडले. १८६१ मध्यें ‘ क्रीमियन ’ युद्धानंतर हे दोन्ही प्रांत एक झाले. पण टर्कीच्या सुलतानाला खंडणी मात्र दिली जात होतीच. १८७८च्या बर्लिनच्या तहानें रुमानिया स्वतंत्र झाला व त्याचें स्वातंत्र्य जर्मनी, रशिया, इंग्लंड आदिकरून युरोपियन राष्ट्रांनीं मान्य केलें. पहिल्या बाल्कन युद्धांत रुमानियानें भाग घेतला नाहीं; पण दुसऱ्या युद्धांत टर्कीच्या विरुद्ध सर्बिया व ग्रीस यांच्या बाजूनें युद्धांत पडला व शेवटीं बल्गेरियाचे कॅलिआरा व डुरोस्टर हे दोन प्रांत रुमानियाला मिळाले.

१९१४ मध्यें राजा चार्लस मेला व त्याचा पुतण्या फर्डिनंड गादीवर बसला. रुमानिया १९१६ मध्यें महायुद्धांत ऑस्ट्रिया—हंगेरीच्या विरुद्ध पडला. तेव्हां जर्मन, ऑस्ट्रेलियन व बल्गेरियन सैन्यानें जोरानें चढाई करून वालाचिया व डोब्रुजा हे प्रांत घेतले. पुढें बुखारेस्ट ही राजधानीहि सोडून रुमानियन सरकारला जेसी या शहरीं राजधानी न्यावी लागली. रुमानिया शेवटपर्यंत दोस्तांशीं चिकटून राहिला. १९१८मध्यें रुमानियाला जरी पराजय स्वीकारावा लागला तरी १९१९च्या व्हर्सायच्या तहानें रुमानियाचें स्वातंत्र्य राखलें गेलें व पूर्वींच्या प्रदेशांत बेसारेबिया, बुकोव्हिना, ट्रान्सिल्वेनिया व आणखी कांहीं भाग मिळून रुमानियाचे राज्य वाढलें. १९२७ मध्यें फर्डिनंड मेला व त्याचा सहा वर्षांचा नातू मायकेल गादीवर बसला. पण १९३० मध्यें त्याचा बाप प्रिन्स कॅरॉल रुमानियांत प्रकट झाला, (यानें १९२५ मध्यें राजपदाचे अधिकार सोडले होते) व त्याला लगेच राजपद मिळालें व मायकेल परत युवराज बनला.

सध्यां चालू असलेल्या युद्धांत रुमानियानें तटस्थाची भूमिका आतांपर्यंत कायम राखली असली तरी जर्मनी—इटलीचें प्रस्थ राज्यकारभारांत वाढत आहे. रशियाच्या दाबामुळें बेसारेबिया रशियाला जूनमध्यें (१९४०) द्यावा लागला. पूर्वींच्या हंगेरीचा ट्रान्सिल्व्हेनियाहि हंगेरीला द्यावा लागला. (सप्टेंबर १९४०) बल्गेरियाची डोब्रुजाची मागणी जोरानें पुढें येत आहे. राजकीय परिस्थिति अगदीं चमत्कारिक बनली असून सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत कॅरॉलनें राज-

पद प्रिन्स मायकेलच्या स्वाधीन करून स्वित्झर्लंड गांठलें आहे. आतां रुमानिया जर्मनीच्या ताटाखालचें एक राष्ट्र बनलें आहे. ता. १० आक्टोबर १९४०रोजीं बुखारेस्टमध्यें फार मोठा भूकंप झाला व मोठी मनुष्य-हानी व नुकसान झालें.

रूसो, जीन जेकस (१७१२–१७७८):–एक फ्रेंच तत्त्ववेत्ता. याचा जन्म २८ जानेवारी १७१२ रोजीं जिनेव्हा येथें झाला. याचा बाप घड्याळें नीट करणारा होता. याच्या जन्मानंतर पंधरा दिवसांनीं याची आई निवर्तली. तेव्हां याचें संगोपन आपल्या नातेवाइकांकडे सोपवून याच्या बापानें जिनेव्हा सोडलें.

रूसोनें वयाच्या सोळाव्या वर्षी जिनेव्हा सोडून सॅव्हॉयकडे प्रयाण केलें. तेथें मॅडम डी वॅरेन्स या फ्रेंच महिलेनें त्यास आश्रय देऊन त्याचें शिक्षण पुरें केलें. इ. स. १७४१ सालीं रूसोनें पॅरिसमध्यें प्रवेश केला व तेथेंच तो जाऊन राहिला. साहित्यसेवा व चिटणीशी (Secretarial work) करून रूसोनें आपला उदर-निर्वाह केला. व्हेनिस येथें असलेल्या फ्रेंच वकिलाचा चिटणीस म्हणून त्यानें कांहीं दिवस काम केलें. रूसोनें डिडरो व डी अलेंबर्ट यांनीं प्रसिद्ध केलेल्या ज्ञानकोशांत मुख्यतः संगीतासंबंधींच्या विषयांवर लेख लिहिले. इ. स. १८५० सालीं त्यानें 'Has the Progress of the Arts and Sciences helped to corrupt or to purify Morals ?' या विषयावर प्रगल्भ लेख लिहून त्या वेळच्या जनतेंत खळबळ उडवून दिली. या लेखाबद्दल त्याला मोठें बक्षीस मिळालें. इ. सन १८५३ सालीं 'An Essay on Inequality' ही निबंधवजा पुस्तिका लिहून त्यानें अधिक कीर्ति मिळविली. या दोन्ही लेखांत त्यानें शास्त्रें व कला यांच्यांतील महत्त्वाचीं दोषस्थानें दाखविलीं असून 'साधी रहाणी व उच्च विचारसरणी' या जीवनक्रमाचा पुरस्कार केला आहे. त्याप्रमाणें स्वत: जीवन कंठतां यावें म्हणून त्यानें पॅरिसनजीकच्या खेड्यांत आपलें ठाणें ठेवलें व तेथें संगीतरचना व ग्रंथलेखन करून तो एखाद्या साधूप्रमाणें राहूं लागला. या ग्रंथांना फ्रेंच वाङ्मय व जागतिक तत्त्वज्ञान यांत अढळस्थान प्राप्त झालें आहे. त्याचे महत्त्वाचे ग्रंथ म्हणजे La Nouvelle Heloise, Du Contrat Social व Emile. फ्रेंच कादंबऱ्यांच्या विकासांत La Nouvelle या कादंबरीला स्वतंत्र स्थान आहे. दुसरा प्रबंध हें फ्रेंच राज्यक्रांति घडवून आणणाऱ्या क्रांति-कारचें बायबल होतें व तिसऱ्या पुस्तकांत आधुनिक शिक्षणशास्त्रांतील अनेक मूलभूत तत्त्वें बीजरूपानें आढळून येतात.

रूसोच्या लोकविलक्षण तत्त्वज्ञानामुळें त्यास फ्रान्स देश कांहीं वर्षे सोडून जावें लागलें. त्यानें स्वित्झर्लंड, व इंग्लंड या देशांतहि कांहीं दिवस वास्तव्य केलें; पण विलक्षण वागणुकीमुळें त्याचें कोणाशींच पटेना. इ. स. १७६९ सालीं तो फ्रान्समध्यें परत आला; पण एकंदर हालचालींचा त्याच्या मनावर परिणाम होऊन तो वेड्यासारखाच वागूं लागला. शेवटीं २ जुलै १७७८ रोजीं त्याचा अंत झाला.

रेखांश:–पुरवणींतील 'अक्षांश–रेखांश' हा लेख पाहा.

रेचक:–सुदृढ प्रकृतीच्या माणसाची पचनक्रिया बहुधा चांगली होत असल्यामुळें पोटाची स्वच्छता करण्यास त्याला रेचकाची क्वचित जरूरी लागते. पण जडान्न वगैरे खाल्यानें, किंवा कांहीं घाणसाण पदार्थ पोटांत गेल्यानें पचनक्रियेवर परिणाम होतो व पोटांत घाण सांठूं लागते. ही घाण अशीच सांठत गेली तर पोटांत विकृति निर्माण होते. यासाठीं रेचक घेऊन वारंवार पोट साफ राखणें आवश्यक असतें.

रेचकांत एरंडेल हें सर्वांत सौम्य व उत्कृष्ट रेचक आहे. त्याशिवाय त्रिफळा, मधपाणी, सोनामुखी, बाळहिरडा यांचा यासाठीं उपयोग होतो. पैकीं त्रिफळा रात्रीं पाण्यांतून किंवा मधांतून घेतात. मध व पाणी यांचें मिश्रण सकाळीं व एरंडेलही सकाळींच घेतात. हिरडा व सोनामुखी यांचें कोरडें मिश्रण किंवा ओलें मिश्रण किंवा सोनामुखीच्या पानांचा चूर पाण्यांतून घेतात. प्रत्येकाच्या कोठ्याप्रमाणें कमीअधिक प्रमाण ठेवतात.

याशिवाय अलीकडे इंग्रजी औषधांच्या प्रचारामुळें फ्रूट सॉल्ट, मॅग्नेशिया इ. औषधें वापरण्यांत येतात.

रेडिओ–मानवी बुद्धीचें अचाट सामर्थ्य सतत दाख-विणारें हें छोटेसें यंत्र आहे. शेंकडों–हजारों–मैल अंतरावर चाललेल्या गाण्याबोलण्याच्या कार्यक्रमांतील सर्वच्या सर्व भाग जसाच्या तसाच विद्युत्‌लहरींच्या सहाय्यानें आपल्यास जवळ जवळ त्याच वेळीं ऐक-विण्याचें कार्य रेडिओ करतो.

या कोशाच्या दुसऱ्या भागांत ग्रामोफोनसंबंधीं माहिती आलेली आहे. तींत किंवा टेलिफोनच्या

बाबतींत गाणाऱ्याच्या किंवा बोलणाऱ्याच्या शब्दांच्या ध्वनिलहरी मायक्रॉफोन कसा ग्रहण करतो तें दिलेलें आहेच. त्याचप्रमाणें ब्रॉडकास्टिंग स्टेशनमधील गायकाचे शब्द मायक्रॉफोन ग्रहण करतो. या ग्रहण केलेल्या ध्वनिलहरी मायक्रॉफोनमधून ट्रॅन्स्फॉर्मर, ट्रॅन्सफॉर्मरमधून ॲम्प्लिफाइंग व्हॉल्व्हमध्यें जातात. या व्हॉल्व्हमधून पुढें पहिल्या व दुसऱ्या ॲम्प्लिफायरमध्यें या ध्वनिलहरी जातात. नंतर या ध्वनिलहरी ब्रॉडकास्टिंग स्टेशनमध्यें जातात व या ठिकाणीं या ध्वनिलहरींची शक्ती आणखी वाढविण्यांत येते व ट्रॅन्समिटरमधून ज्यांना 'ध्वनिवाहक लहरी' (Carrier waves) असें म्हणतात त्या निर्माण होऊन एरियल्समधून या ध्वनिवाहक लहरी प्रक्षेपित केल्या जातात.

अशा रीतीनें गायकाच्या शब्दांच्या ध्वनिलहरी ग्रहण करून हवेंत फेकून देण्याचा पहिला भाग पुरा होतो.

यानंतरचा दुसरा भाग म्हणजे या ध्वनिलहरी पुन्हां ग्रहण करून परत ऐकविण्याचा भाग शिल्लक राहतो. हा भाग जें यंत्र करतें त्याला आपण रेडिओ (किंवा Receiver—ग्रहण करणारें यंत्र) असें म्हणतों. हवेंत विरलेल्या ध्वनिवाहक (विद्युत्) लहरी आपल्या रेडिओच्या एरियल्सवर आदळतात. आपल्या रेडिओचें सर्व कार्य विजेवरच चालते व विजेचें कोणतेंहि कार्य तिचें एक पूर्ण वलय (Circuit) पुरें झाल्याशिवाय होत नाहीं, हें आपल्यास आतां पूर्ण माहीत झालें आहे. रेडिओंतील विद्युत्‌वलय पूर्ण होण्यासाठीं एरियल्समधून आलेली एक तार रेडिओंत असलेल्या तारेच्या वेटोळ्याला (Coil) जोडलेली असते. यांतून विद्युत्‌लहरी व्हॉल्व्ह, बॅटरी, लाऊडस्पीकरची यंत्ररचना व कंडेन्सर यांमधून जाऊन जमिनींत सोडलेल्या तारेंतून या विद्युल्लहरी ट्रॅन्समिटरमध्यें पोचतात व अशा रीतीनें हें विद्युत्‌वलय पूर्ण होतें.

आतां प्रत्यक्ष ध्वनिलहरींचें ग्रहण कसें होतें तें पाहूं. एरियल्समधून ध्वनिवाहक लहरी आल्यावर त्या तारेच्या वेटोळ्या(Coil)मधून रेडिओंत असलेल्या व्हॉल्व्हज्‌मध्यें जातात. त्या ठिकाणीं जी क्रिया ब्रॉडकास्टिंग स्टेशनमध्यें असलेल्या व्हॉल्व्हमध्यें होते त्याचप्रमाणें या ठिकाणींहि होते व नंतर या लहरी लाऊडस्पीकरच्या (रेडिओच्यासमोर दिसणाऱ्या पडद्याच्यामागें हा कर्णा असतो) लोहचुंबकांत जातात. या लोहचुंबकांत एक चौकोनी तारेचें वेटोळें (Coil) व दोन आर्मेचर (पोलादी तुकडा) असे दोन महत्त्वाचे भाग असतात. आर्मेचरवर ध्वनिलहरींच्या कमी—अधिक आघाताप्रमाणें परिणाम होऊन आर्मेचर मागेंपुढें ओढला जातो. या आर्मेचरला लाऊडस्पीकरचा डायफ्राम (Diaphragm) जोडलेला असतो. आर्मेचरच्यापुढें एक बारीक तार (Needle) असते व ती आर्मेचरवर होणाऱ्या परिणामाप्रमाणें कमी अधिक मागेंपुढें सरून डायफ्रामवर आघात करते. हे आघात हवेंत ध्वनिलहरी उत्पन्न करतात व अशा रीतीनें ब्रॉडकास्टिंग स्टेशनमधून मायक्रॉफोनमधून निघालेल्या ध्वनिलहरी—गायकाचें गाणें—आपल्याला ऐकूं येतात.

रेडिओच्या शोधाचें श्रेय मार्कोनी या प्रख्यात इटालियन शास्त्रज्ञाला दिलें जातें. १८९६ मध्यें मार्कोनीनें पावणे दोन मैल अंतरावर बिनतारी संदेश पाठविला. याच वर्षी त्यानें आपल्या या शोधाचें पेटंटहि घेतलें. यानंतर लहानसान प्रयोग झाले. १९१५ सालीं आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा पहिला प्रयोग झाला व आर्लिंग्टन या आरमारी ठाण्यावरून मनुष्याच्या शब्दांनीं संदेश प्रक्षेपित करून होनोलुलू व पॅरिसमध्यें तो घेतां आला. यानंतर महायुद्धामुळें थोडी मंदी आली व युद्ध संपतांच पुन्हां जोरानें या विषयाला चालना मिळाली. १९२२ पासून अमेरिकेंत ३६ ब्रॉडकास्टिंग स्टेशनें निर्माण झालीं. पण अद्याप बोलणाऱ्याचा किंवा गाणाऱ्याचा आवाज स्पष्ट ऐकूं येत नव्हता. यानंतर रेडिओंत व ब्रॉडकास्टिंगच्या यंत्रसामुग्रींत सुधारणा दरवर्षी होत गेल्या, व १९२९ सालीं स्क्रीन ग्रिड ट्यूबचा शोध लागून ध्वनिग्रहणाच्या बाबतींत फार मोठी सुधारणा झाली; व आज तर निर्दोष असे पुष्कळ रेडिओ बाजारांत मिळत आहेत.

रेडिओला तीन किंवा चार किल्ल्या (knobs) असतात. त्यांपैकीं एकीनें विद्युत्‌प्रवाह चालू करून रेडिओ सुरू करतां येतो. दुसरीनें आपल्याला हवें तें ठिकाण निवडतां येतें, तिसरीनें आवाज लहान मोठा करतां येतो. चौथ्या किल्लीनें शॉर्ट वेव्ह किंवा लॉंग वेव्ह या दोहोंपैकीं ज्यामधून ब्रॉडकास्टिंग होत असेल त्याप्रमाणें रेडिओची ध्वनिग्रहणशक्ति निर्माण करतां येते. कांहीं रेडिओंत याहून अधिक सोई असतात व कांहींत याहून अधिक सूक्ष्म प्रमाणांत कार्य व्हावें म्हणून जास्त सोई केलेल्या असतात. रेडिओंत जितके

व्हॉल्व्हज अधिक तितकी त्याची दूर अंतरावरील ध्वनिलहरी ग्रहण करण्याची शक्ति जास्त असते.

ग्रामोफोन व रेडिओ या दोन्हींची सोय एकाच यंत्रांत केलेली असते. ग्रामोफोनच्या तबकडीवर रेकॉर्ड (ध्वनिमुद्रिका) ठेवून साऊंडरच्या ऐवजीं पिकअप्‌चा उपयोग करून ध्वनिलहरी रेडिओच्या लाऊडस्पीकर-मधून बाहेर पडतात. साध्या ग्रामोफोनच्या आवाजा-पेक्षां ग्रामोफोनच्या रेकॉर्डचा आवाज रेडिओंतून थोडा निराळा व अधिक गोड येतो. शिवाय रेडिओच्या सहाय्यानें ध्वनिमुद्रिकेंतील आवाज लहानमोठा करतां येतो हा दुसरा मोठा फायदा आहे. या यंत्रास रेडिओ-ग्रॅम (Radiogram) म्हणतात.

बिनतारी तारायंत्राप्रमाणें रेडिओचाहि उपयोग करतात. पोलीससाठीं कमी शक्तीचीं ब्रॉडकास्टिंग स्टेशनें तयार करून मुख्य पोलीस कचेरींतून मोटारी-मधून फिरणाऱ्या पोलीसांना ताबडतोब हुकूम घेण्याची सोय झालेली आहे. तसेंच दुसऱ्या एखाद्या ब्रॉड-कास्टिंग स्टेशनमधील महत्त्वाचा कार्यक्रम घेऊन तो पुन्हां आपल्या स्टेशनवरून प्रक्षेपित करण्याचेंहि कार्य चालतें. (तारायंत्र व टेलिव्हिजन हे लेख पाहा.)


रेंदाळकर, एकनाथ पांडुरंग (१८८७–१९२०):– निर्यमक कवितांचे पुरस्कर्ते. जन्म रेंदाळ (कोल्हापूर संस्थान) १ जुलै १८८७ रोजीं झाला. धर्मविचार, मनोरंजन व करमणूक या नियतकालिकांशीं यांचा संपा-दकीय स्वरूपाचा संबंध होता. इंग्रजी, बंगाली व संस्कृत या भाषा त्यांना उत्तम अवगत होत्या. यांची सर्व कविता—एकत्रित अशी—'रेंदाळकरांची कविता' या पुस्त-काच्या दोन भागांत छापली आहे. यांचें काव्य विविध प्रकारचें असून विपुल आहे. पण तें सारें संस्कृतच्या वळणाचें आहे. काव्याचें वळण जरी जुनें असलें तरी त्यांतील विचार प्रगमनशील आहेत. यांचें काव्य प्रसाद, प्रसन्नता व श्रुतिमनोहरता या गुणांनीं मंडित आहे. यांना परकीय कल्पनांना व विचारांना शुद्ध स्वदेशी पोषाख चांगला देतां येतो. यांचें काव्य भाषां-तरित व स्वतंत्र असें आहे. समकालीन मंडळींनीं यांचा फार उपहास केला. या उपहासाला मुख्यतः त्यांचे निर्यमकता व शुद्ध प्रेमविषयक कल्पना हे दोन गुण कारणीभूत झाले असले पाहिजेत.

प्राचीन कवींनीं मराठी कवितेला यमकादिकांचें जें बंधन घातलें होतें तें यांनीं झुगारून दिलें. यांनीं निर्यमक कविताहि सयमक कवितेइतकीच रसपूर्ण व सुंदर कशी होऊं शकते हें सप्रयोग सिद्ध करण्याचा खटाटोप दीर्घकालपावेतों केला. निर्यमक कवितेची प्रथा यांच्यापासूनच सुरू झाली असें म्हणावयास आड-काठी नाहीं. हे २२ नोव्हेंबर १९२०ला मरण पावले.

रेंब्रांट, हारमेंझ व्हान रीन (१६०६–१६६९):– हॉलंडचा जगविख्यात चित्रकार. हॉलंडमध्यें लीडन या गांवीं १५ जुलै १६०६ रोजीं हा जन्मला. १५ व्या वर्षी त्याच्या बापानें त्याला एका चित्रकारा-कडे शिकायला ठेवलें. पण २–४ वर्षांतच हा स्वतंत्र झाला व वयाच्या २५ व्या वर्षी आमस्टरडॅम शहरीं त्यानें आपला स्टुडिओ उघडला. त्याला चित्र-कार म्हणून लौकरच प्रसिद्धी मिळाली. त्यामुळें त्याला कामेंहि चांगलीं मिळूं लागलीं. पण लोकसंग्रह कर-ण्याचा गुण अंगीं नसल्यामुळें व व्यवहारशून्यतेमुळें त्याला पैसे राखतां आले नाहींत. सुमारें ६०० लहान मोठीं चित्रें यानें काढिलीं. १६३४मध्यें याचें सास्किया नांवाच्या सुंदर तरुणीशीं लग्न झालें. तीपासून त्याला एक मुलगाहि झाला. १०–१२ वर्षें त्याला संसार-सुख मिळतें न मिळतें तोंच त्याची पत्नि वारली आणि लौकरच मुलगाहि वारला. त्यानंतर त्याचें सर्व आयुष्य दुःखांत गेलें. पैशाचें सुखहि त्याला मिळालें नाहीं. तो १६६९ वर्षी वारला.

सर्व प्रकारचीं चित्रें काढण्यांत तो तयार होता. पोर्ट्रेट, धार्मिक व पौराणिक विषय, निसर्गचित्रें व ॲसिडच्या सहाय्यानें धातूच्या पत्र्यावर चित्रें खोदून काढण्यांत तो प्रसिद्ध होता. (या प्रकारचीं त्यानें ३२० चित्रें काढलीं होतीं.) त्यानें आरशांत बघून आपली स्वतःची, आपल्या पत्नीचीं, मुलाचीं व मुलाला संभाळण्यासाठीं ठेवलेल्या दाईचीं अनेक चित्रें काढलीं असून आजहि तीं उपलब्ध आहेत. छायाप्रकाशाच्या यथायोग्य योजनेच्या बाबतींत त्याच्या तोडीचा एकहि चित्रकार झालेला नाहीं. त्याच्या कलेसंबंधीं पुढील वर्णन सर्वमान्य आहे:– 'His figures were fault-lessly modelled and full of life; his colour rich, transperent and glowing. In all his work, there is a vivid realism combined with poetic feeling and grace.' त्याच्या चित्रां-पैकीं Christ Healing the Sick, The Bourgo-master, Jan Six, The Night Watch, The Mill हीं चित्रें प्रख्यात आहेत. त्याच्या चित्रांपैकीं बरींच चित्रें अमेरिकेंत आहेत.

रेल्वे:—रेल्वे—Rail-way—लोहमार्ग किंवा आगगाडी हा शब्द सर्व साक्षरांना व बऱ्याचशा निरक्षरांनाहि माहीत आहे. या शब्दानें जो अर्थ व्यक्त होतो तो म्हणजे फक् फक् असा आवाज करीत प्रवाशांना (व माल) वाहून नेणारी बरेच डबे असलेली आगगाडी.




रॉकेट, स्टीफेन्सनचें रेल्वे इंजीन.


या आगगाडीला पुढें इंजिन (वाफेवर चालणारें किंवा विजेवर चालणारें किंवा अंतर्ज्वलन इंजिन्स आंत बसवून त्यामुळें गति घेणारें) असतें. या आगगाडीच्या इंजिनला लोकोमोटिव्ह (Locomotive) म्हणजे पुढें (व मागें) सरणारें यंत्र म्हणतात. या लोकोमोटिव्हच्या जनकत्वाचा मान रिचर्ड ट्रेव्हिथिक (१७७१–१८३३) याच्याकडे जातो. यानें १८०३ मध्यें पहिलें वाफेवर चालणारें रेल्वेचें इंजिन तयार केलें. या ट्रेव्हिथिकच्या पहिल्या इंजिनचें वजन ५ टन होतें. हें इंजिन प्रथम १३ फेब्रुवारी १८०४ रोजीं सार्वजनिक रीत्या त्यानें चालवून दाखविलें व या इंजिनानें वीस टन वजन ताशीं पांच मैलाच्या वेगानें ओढून दाखविलें. यानंतर त्यानें १८०८ मध्यें ८ टन वजनाचें व ताशीं १२ मैल वेगानें जाणारें इंजिन तयार केलें. या इंजिनाच्या मागच्या भागावर बसून अगदीं प्रथमच कांहीं मंडळींनीं प्रवास केला.

यानंतर १८१५ मध्यें इंजिनचीं चार चाकें एकदम चालण्याची योजना, नंतर इंजिनला आठ चाकें लावण्याची, बिडाचीं चाकें ओतण्याची व रुळावरून चाकें घसरूं नयेत म्हणून रुळांना दांतेरे ठेवण्याच्या योजना होत होत्या. ही रेल्वेची चालू असलेली प्रगती पाहून जॉर्ज स्टिफेन्सन या गृहस्थानें १८१४ मध्यें (कोलिंगवर्थ येथील कोळशाच्या खाणींत) कडा लोखंडी असलेल्या रुळावरून आपलें इंजिन चालवून दाखविलें. यानंतर त्यानें इंजिनमध्यें नव्या नव्या सुधारणा १८१५, १८१६ व १८२२ मध्यें घडवून कमी गती पण बरेंच वजन ओढण्याची शक्ति असलेलीं इंजिनें बनविलीं.


सर्व जगांतील पहिला रेल्वेरस्ता स्टॉकटन ते डार्लिंगटनपर्यंत १८२१ मध्यें तयार झाला. १८२२ मध्यें जॉर्ज स्टिफेन्सन हा त्या रेल्वेचा इंजिनियर बनला. त्यानें लौकरच आपला मुलगा रॉबर्ट याला आपल्या मदतीला घेतलें व मालाबरोबर प्रवासी नेण्याचाहि परवाना पार्लमेंटमध्यें बिल आणवून घेऊन, घेतला, व रॉबर्ट सिफेन्सन अँड कं. स्थापून स्टॉकटन ते डार्लिंग्टन रेल्वेरस्ता नव्यानें बांधून २७ सप्टेंबर १८२५ रोजीं त्यानें व त्याच्या मुलानें बनविलेल्या 'लोकोमोशन' या नांवाच्या इंजिनानें जगांतील पहिली आगगाडी ओढली. यांच्याशिवाय रॉबर्ट विल्सन व टिमथी हॅकवर्थ इत्यादींनींहि इंजिनमध्यें सुधारणा केल्या. यानंतर १८२९ मध्यें स्टिफेन्सन पितापुत्रांनीं आपलें 'रॉकेट' नांवाचें नवें इंजिन तयार केलें. लिव्हरपूल व मँचेस्टर रेल्वे कंपनीच्या डायरेक्टर्सनीं इंजिनच्या वजनाच्या तिप्पट वजन ओढणारें व कमींत कमी ताशीं दहा मैल जाणारें इंजिन तयार करणाऱ्यास ५०० पौंडाचें बक्षिस लावलें. या शर्यतींत पांच इंजिनानीं भाग घेतला होता, पण 'रॉकेट'ला बक्षिस मिळालें. वजनासह पळतांना ताशीं १३ मैल व नुसत्या इंजिनाचा वेग ताशीं २४ मैल इतका होता. इंजिनाचें वजन ४। टन होतें. यानंतर १८३० मध्यें स्टिफेन्सन् कंपनीनें आणखी सुधारलेलें इंजिन तयार केलें व त्याच वर्षी लिव्हरपूल-मॅन्चेस्टर रेल्वेच्या उद्‌घाटनप्रसंगीं पहिला मान याच्या नव्या 'नॉर्दंब्रियान' या इंजिनला मिळाला. यानंतर खुद्द इंग्लंडमध्यें अनेक ठिकाणीं रेल्वेचे रस्ते बांधले गेले व रेल्वे गाड्या सुरू झाल्या. नवीं नवीं सुधारलेलीं इंजिनें बांधलीं गेलीं. १८३५ मध्यें ब्रुनेन नांवाच्या गृहस्थानें नवें इंजिन बनविलें. या इंजिनचें नांव 'नॉर्थ स्टार' असें होतें व ८० टन वजन ओढ-




रेल्वे इंजिनची रचना, पुढचा भाग—१ धुराडें २ धुराची पेटी ३ धूर बाहेर सोडणारा नळ (Exhaust pipe) ४ सिलिंडरमध्यें शिरणारी वाफ ५ दट्ट्या (Piston) ६ क्रॉस हेडच्या आधारपट्ट्या (मध्यंतरीं क्रॉस हेड) ७ झडपें उघडणाऱ्या व मिटणाऱ्या लीव्हर्स (उच्चालक) ८ गतिरोधक ठोकळा (Brake-block) ९ दगडी कोळसा किंवा जळण १० भट्टी ११ ब्रेक (हातानें फिरवावयाचा) १२ कोळसेवाला १३ इंजिन ड्रायव्हर १४ गतिरोधक उच्चालक (Ejectors of brakes) १५ इंजिनची शिट्टी १६ वाफेचा घुमट (पेटी) (Steam dome) १७ नळींत शिरणारी वाफ १८ वाफेची नळी १९ या नळ्यांतून ज्वाला फिरतात व त्यांच्या भोंवतींचें पाणी उकळवितात. कांहीं इंजिनमध्यें नळ्यांत पाणी असते व भोंवती ज्वाला फिरतात. इंजिनमध्यें अशा नळ्या पुष्कळ असतात. २० इंजिनचीं चाकें फिरविणारे पोलादी दांडे (Shafts) २१ बाजूचा दट्ट्या २२ टेंडर (कोळसा व पाणी सांठविण्याचा डबा.)




रेल्वे इंजिन मागचा भाग - १ कोळसा २ संयोग साखळी (Communication cord) ३ गार्डच्या डब्याला जोडलेला दट्ट्या (Valve) ४ संरक्षक दट्ट्या ५ ट्रेन पाइप ६ टेंडर व डबा जोडणारी साखळी ७ ट्रेन पाइप व सिलिंडर जोडणारी नळी ८ गतिरोधक ९ सिलिंडर १० धोक्याच्या वेळीं ओढावयाची साखळी (वर २ मध्यें सांगितलेली.)



कीनिया युगांडा (आफ्रिका) रेल्वेचें मीटरगेजचें जगांतील सर्वांत मोठें इंजीन.




नॉर्दर्न पॅसिफिक रेल्वेवरील (अमेरिका) सर्वांत मोठें लोकोमोटिव्ह.



सदर्न पॅसिफिक रेल्वेचें एक इंजीन. या इंजीनची लांबी १२१ फू. ४½ इंच आहे तेलावर चालतें. वजन ९३५,५०० पौंड असून ड्रायव्हिंग व्हील ६३½ इंच व्यासाचें आहे.

ण्याची व ताशीं ३० मैलाचा वेग मिळविण्याची शक्ति त्या इंजिनच्या आंगीं होती.

याच सुमारास फ्रान्स, जर्मनी, इत्यादि ठिकाणीं इंजिनें तयार करण्याचे व रेल्वे बांधण्याचे प्रयोग सुरू झाले व झपाट्यानें इंजिनच्या अंतर्बाह्य स्वरूपांत सुधारणा होत होत आज सुमारें ३०० टन वजनाचीं ६००० टन वजन ओढण्याची शक्ति असलेलीं व ताशीं ७० ते ८० मैल वेग घेणारीं इंजिनें तयार होत आहेत. आज इंजिनची लांबी ७० फुटांपर्यंत गेलेली आहे. इंजिनला साधारणतः ६ ते २०



'फ्लाइंग हॅम्बुर्गर' नांवाची जर्मनीची प्रख्यात आगगाडी. यांत ४१० अश्वशक्तीचीं डिझेल इंजीन्स बसविलीं असून त्यापासून वीज निर्माण होते व त्या विजेच्या शक्तीवर गाडी चालते. ही गाडी बर्लिन व हॅम्बुर्ग या दोन शहरांमध्यें पळते. सरासरी तासीं ७७ मैल वेगानें ही गाडी जाते. जास्तीत जास्त ९९ मैल वेग येतो.

चाकें असतात. त्यांतील लहान चाकाचा व्यास कमींत कमी दीड फूट व जास्तींत जास्त साडेपांच फूट (साधारणतः) या दरम्यान चाकांचा व्यास असतो निरनिराळ्या रेल्वेचें निरनिराळें गेज (Gauge) असतें. गेज म्हणजे रेल्वेच्या डब्याच्या किंवा इंजिनच्या खालीं जमिनीवर असणाऱ्या दोन लोखंडी तुळ्या यांतील अंतर. हें अंतर सामान्यतः दोन प्रकारचें मानतात: १ ब्रॉड गेज (Broad)-रुंद व २ मीटर गेज (Meter Gauge) —अरुंद. हें अंतरहि सर्वत्र सारखें नसतें. १८३५ मध्यें ब्रुनेननें तयार केलेलें 'नॉर्थ स्टार' हें इंजिन ७ फूट १ इंच रुंद रस्त्यावर चालवें या उद्देशानें तयार केलेलें होतें. यापूर्वी इंग्लंडमध्यें ४ फूट ८½ इंच एवढ्या रुंदीचा लोहमार्ग होता.

रेल्वेचा इंग्लंडमधील इतिहास हा असा आहे. रेल्वेच्या बाबतींत पहिला शोध व प्रगती करण्याचें श्रेय एकट्या इंग्लंडलाच द्यावें लागेल.

हिंदुस्थानांत रेल्वे काढण्यासाठीं इंग्लंडमध्यें कंपन्या स्थापन होऊन १८४५मध्यें १ कलकत्ता ते राणीगंज (१२० मैल अंतर), २ मुंबई ते कल्याण (३३ मैल) व ३ मद्रास ते अरकोणम् (३९ मैल) अशा तीन ठिकाणीं रेल्वे बांधण्याचें ठरलें. पण प्रत्यक्ष कार्यास पुढें बऱ्याच वर्षांनीं सुरवात झाली. रेल्वेचें महत्त्व ओळखून लॉर्ड डलहौसीनें १८५३मध्यें कांहीं योजना आखल्या. पुढें १८५९मध्यें निरनिराळ्या आठ कंपन्यांशीं रेल्वे बांधण्याचे करार झाले. आपल्या इकडील ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वेनें (जी. आय. पी.) १८५३मध्यें मुंबई ते कल्याणची रेल्वे सुरू केली. याच सुमारास इतर ठिकाणींहि रेल्वे रस्ते बांधले गेले.

जी. आय. पी. रेल्वेनें ५ नोव्हेंबर १९२९ रोजीं कल्याणपासून पुढें पुण्यापर्यंत विजेच्या गाड्या चालण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या योजना पुऱ्या केल्या व ऑक्टोबर १९३०मध्यें कल्याण ते इगतपुरी हा मार्ग तयार करून मुंबई ते पुणें व मुंबई ते इगतपुरीपर्यंत विद्युत्शक्तीवर चालणाऱ्या गाड्या धावूं लागल्या. (यापूर्वीच मुंबई ते कल्याणपर्यंतची योजना पुरी झालेली होती.) ब्रिटिश साम्राज्यांत विद्युत्शक्तीवर चालणाऱ्या गाड्यांच्या रस्त्यांची लांबी एवढी कुठेंच नाहीं असें म्हणतात.

हिंदुस्थानांत सध्यां तीन मापांचीं गेज आहेत. ५ फूट ६ इंच (ब्रॉड गेज), ३ फूट ३⅜ इंच (मीटर गेज) व २ फूट ६ इंच रुंदीचें सर्वांत कमी (नॅरो गेज) रुंदीचें गेज. हिंदुस्थानांत सध्यां सुमारें ४४००० मैल लांबीची रेल्वे आहे.

रेल्वेच्या शोधामुळें मानवी जीवनांत फार मोठी क्रांति झालेली आहे पूर्वीसारखा प्रवास त्रासदायक, पुष्कळ दिवस घेणारा व खर्चाचा राहिलेला नाहीं. रेल्वेमुळें वाहतुकीची फार मोठी सोय झाल्यानें दळण वळण व व्यापार यांना फार मोठी चालना मिळालेली आहे. एखाद्या भागांत दुष्काळ पडून धान्याचा तुटवडा पडला तर देशाच्या दुसऱ्या भागांतून धान्य अगदीं कमी वेळांत आणवून लोकांची उपासमार थांबविणें सहज शक्य झालें आहे. कांहीं अवजड पदार्थ पूर्वी इकडून तिकडे नेणें केवळ अशक्य होतें. तें आतां रेल्वेमुळें सहज सुलभ झालेलें आहे. लोकांच्या रोजच्या पत्रव्यवहाराची, इकडून तिकडे लहानसान वस्तू पोस्टानें पाठविणें इत्यादीसाठीं रेल्वेचा पोस्टखात्यास फार मोठा व हरघडीं उपयोग

होतो. सरकारला राज्यकारभारावर नियंत्रण ठवण्यास व लष्कराच्या वाहतुकीस फार मोठा उपयोग होतो.

रेल्वेच्या कारभाराची व्यवस्था कांहीं ठिकाणीं व कंपन्यांच्या बाबतींत सरकार करार करून खाजगी कंपन्यांच्या ताब्यांत ठेवते तर कांहीं ठिकाणीं सरकार सर्वच व्यवस्था स्वतः पाहतें. कांहीं ठिकाणीं कांहीं बाबी सरकार पाहातें.

प्रत्येक राष्ट्रांत सरकारला रेल्वे कंपन्यांच्याकडून फार मोठें उत्पन्न होत असतें.

रेशीमः—रेशमी किडे जे मऊ, पिवळसर, बारीक व तकतकीत धागे तयार करतात त्यास रेशीम म्हणतात. हे धागे १५०० ते ३००० फूट लांबीचे व अखंड मिळूं शकतात. भक्कम पाय, पांढरे पंख व त्यावर काळ्या रेषा व लहानसें शरीर असा हा रेशमी किडा असतो. मादी तुतीच्या पानावर अंडीं घालते. पण रेशमाच्या कारखान्यांत मादीच्या खालीं कागद किंवा मऊ कापड ठेवतात व त्यावर मादी अंडीं घालते. ही अंडीं निळसर रंगाचीं असतात व एके वेळीं मादी २०० ते ५०० अंडीं घालते. अशा ४०००० अंड्यांचें वजन फक्त १ औंस होतें. एरवीं या अंड्यांतून रेशमाचे किडे (सुरवंट) बाहेर पडायला तीन आठवडे लागतात पण ७५° फॅ. एवढी उष्णता कृत्रिम तऱ्हेनें दिल्यास ७–८ दिवसांतच अंडीं पूर्ण उबविलीं जाऊन सुरवंट बाहेर पडतात. त्यांना तुतीच्या पानाचे तुकडे खावयास देतात. ते ६ ते ८ आठवड्यांत चारदां कांत टाकतात व अखेरीस त्यांची लांबी दोन इंच होते व यानंतर आणखी १० दिवसांनीं त्या सुरवंटाची पूर्ण वाढ होऊन तो तीन इंच लांब होतो. या वेळीं सुरवंटाला पुढें सहा पाय व मागें दहा पाय असतात व रंग राखी हिरवा बनतो. यावेळीं हा किडा सुस्त बनतो व स्वतःच्या शरीरांतून धागा काढीत कोशेटा (Cocoon) तयार करूं लागतो. अशा या कोशेटांचे धागे सोडवून, धुवून व नंतर दोन तीन धागे एकत्र गुंफून सूत तयार करतात व या सुताचे कपडे विणून बाजारांत येतात. या रेशमी सुताचा व कापडाचा उपयोग प्रथम चिनी लोकांनीं केला असें म्हणतात. रेशमाचें कापड सुळसुळीत, पिवळसर, तकतकीत दिसतें व अंगाला थंड लागतें. कापूस व लाकडाचा लगदा व इतर कांहीं पदार्थ यावर रासानिक क्रिया करून कृत्रिम रेशीम तयार करतात.

रंगवल्लिकाः—केवळ स्त्रियांनींच परंपरेनें जतन केलेल्या ज्या कांहीं कला आहेत, त्यांत रंगवल्लिका अगर रांगोळी ह्या कलेला अग्रस्थान द्यावें लागेल. हिंदूच्या नित्यक्रमांत धार्मिकदृष्ट्या रांगोळीला महत्व आहे. प्रातःकाळीं अंगणांत सडासंमार्जन करून, त्यावर रांगोळी घालणें हें एक शुभदायक चिन्ह आहे असें मानण्यांत येतें. हें सडासंमार्जन घालण्याचें काम स्त्रियांचें असल्यामुळें त्यावर रांगोळी काढण्याचें काम ओघानेंच स्त्रीवर्गाकडे आलें. या नित्य व्यवसायाच्या कृतीला कलेची सांगड स्त्रियांनीं घालून दिली व आजतागायत कोणत्याही प्रगमनशील राष्ट्रांतसुद्धां न सांपडणारी ही कला हिंदु स्त्रियांनींच कायम राखिली आहे ही अभिमानाची गोष्ट होय. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं या यांत्रिक युगांत, व बदलत्या राहणींत, ज्या ठिकाणीं सडासंमार्जन घालण्याला वाव नाहीं, अशा शहरांतील राहणींत स्त्रीजीवनांत रांगोळीचें महत्त्व कमी होत चाललें आहे. खेड्यापाड्यांतून ज्या ठिकाणीं विस्तृत अंगणाची रेलचेल असते अशा ठिकाणीं मात्र ही कला अद्याप जीव धरून राहिली आहे; परंतु त्यामुळें ह्या कलेच्या संवर्धनासाठीं ज्या प्रकारचे प्रयत्न व्हावयास पाहिजेत तसे ते होत नाहींत. तरी पण रांगोळ्यांचे प्रकारांत नाविन्य येत आहे ही सुदैवाची गोष्ट आहे.

पहिला प्रकार—रांगोळीची रचना टिपके अगर थेंब यांवर अधिष्ठित झाली आहे. ठिपक्यांवर आकृति रचण्याचें आमच्या स्त्रियांचें कौशल्य एखाद्या कसलेल्या चित्रकारालाहि खालीं मान घालावयास लावील.

दुसरा प्रकार—फुलांची रांगोळी. यांत रंगांचें काम विविध रंगाच्या फुलांच्या पाकळ्या व पानें यांच्या सहाय्यानें करतां येतें.

तिसरा प्रकार—पाण्यावरील रांगोळी. यांत एक रुंद व उथळ भांड्यांत पाणी घालून त्यांत चुना घालण्यांत येतो. चुन्याच्या थराची पातळी पाण्यावर जमतांच त्यावर रांगोळीनें व रंगानें आकृती काढतां येतात. ही रांगोळी पुष्कळ दिवस कायम राहते.

चवथा प्रकार—धान्यांची रांगोळी. यांत रंगाचें काम वेगवेगळ्या रंगाचीं धान्यें वापरून करण्यांत येतें.

हे चारहि प्रकार सध्यां रूढ आहेत. परंतु सर्व प्रकारांत आमच्या ठिपक्याच्या जुन्या पद्धतींत अधिक कुशलता दिसून येते यांत शंका नाहीं.

रॅले, सर वॉल्टर (१५५२–१६१८):—इलिझाबेथ राणीच्या दरबारांतील सुप्रसिद्ध नाविक, योद्धा, मुत्सद्दी

व लेखक. याचा विद्याभ्यास ऑक्सफोर्ड येथें झाला. वयाच्या १७व्या वर्षी फ्रेंच प्रॉटेस्टंट्सना सहाय्य करण्याकरितां उभारलेल्या स्वयंसेवकांच्या पथकांत हा सामील झाला. १५८१ सालीं त्याचा इलिझाबेथच्या दरबारीं प्रवेश झाला. त्याच्यावर इलिझाबेथ राणीची विशेष कृपा होती. तिनें १५८४ सालीं त्याला 'सर' ही पदवी दिली. १५७८पासून १५८४पर्यंत उत्तर अमेरिकेंत वसाहत करण्याकरितां सर हंफ्रे गिलबर्ट यानें प्रयत्न केले; पण ते यशस्वी झाले नाहींत. या प्रयत्नांत रॅले यानें हातभार लावला होता. १५८४ सालीं राणीच्या परवानगीनें त्यानें अमेरिकेंत वसाहत करण्याचा प्रयत्न केला. त्यानें जी लहानशी वसाहत स्थापिली तिला त्यानें व्हर्जीनिया हें नांव दिलें. त्याच वर्षी सरकार-हक्कांत घेतलेल्या आयर्लंडांत कांहीं मिळकती त्याला मिळाल्या. तेथें त्यानें प्रथमच बटाट्यांची लागवड केली. १५८८ सालीं त्यानें स्पॅनिश आरमारचा पराभव करण्याचे कामीं बहादुरी गाजविली. तो पार्लमेंटचा सभासदहि झाला. १५९५ सालीं सोन्याच्या खाणीचा शोध लावण्याकरितां त्यानें ग्वाएना येथें एक मोहीम नेली; पण शोध न लावतांच परतला. १५९६ सालीं लॉर्ड हॉवर्ड व अर्ल ऑफ इसेक्स यांचे आधिपत्याखालीं आरमारी लढाईंत यानें भाग घेतला व स्पॅनिश आरमाराचा पराभव करण्यांत व केडीझ जिंकण्यांत मदत केली. १६०३ सालीं पहिला जेम्स इंग्लंडच्या गादीवर आला. त्याचें मन रॅलेविषयीं दूषित झालें होतें. त्यानें रॅलेचे सर्व अधिकार काढून घेतले. लॉर्ड कोबहॅम याच्या सहकार्यानें राज्यद्रोह केल्याबद्दल त्याजवर १६०३ सालीं खटला होऊन त्याला देहान्त शिक्षा सांगण्यांत आली; पण ही शिक्षा रद्द करून त्याला कारागृहांत टाकण्यांत आलें. येथें त्यानें बारा वर्षे काढलीं. हे दिवस त्यानें लेखनांत घालविले. १६१६ सालीं सोन्याच्या खाणीचा शोध लावण्याचें वचन दिल्यामुळें त्याला सोडण्यांत आलें. आरिनोको येथें सोन्याच्या खाणी असाव्यात असा त्याचा समज होता; परंतु ही त्याची मोहीम अयशस्वी झाली. त्याच्याबरोबरच्या लोकांनीं स्पॅनिश लोकांवर हल्ला केला. परत आल्यावर जेम्सनें स्पॅनिश सरकारला संतुष्ट करण्याकरतां याला देहान्त शिक्षा दिली. मृत्यू २९ ऑक्टोबर १६१८.

त्याचे प्रमुख ग्रंथ–The Last fight of the Revenge. The Discourse of war, History of the world हे होत. त्यानें अनेक कविताहि लिहिल्या आहेत. त्यांत पुढील कविता उल्लेखनीय आहेत:–The Pilgrimage; The Lie; Pe My love; Affection is not Love; Reply to Marlowe's 'Come Live with Me.'

रॉकफेलर, जॉन् डेव्हिसन (१८३९-१९३७):–एक अमेरिकन कोट्याधीश. याचा जन्म जुलई ८, १८३९ रोजीं झाला. वयाच्या १९ व्या वर्षापासून कमिशन एजंट म्हणून त्यानें व्यापार–धंद्यांत पदार्पण केलें. इ. स. १८६२ सालीं तो तेलाच्या धंद्यांत पडला. इ. स. १८६५ सालीं क्लीव्हलँड व ओहिओ येथें स्टँडर्ड ऑईल रिफायनरी बांधली. पुढें पांच वर्षांनीं दहा लक्ष पौंड भांडवल असलेली स्टॅन्डर्ड ऑइल कंपनी नांवाची एक संयुक्त फर्म आपल्या अध्यक्षतेखालीं काढली. इ. स. १८८२ पर्यंत या फर्ममध्यें युनायटेड स्टेटस्‌मधील बहुतेक सर्व फर्म समाविष्ट झाल्या व रॉकफेलर हा जगांत पहिल्या नंबरचा धनाढ्य झाला. इ. स. १९११ सालीं तो कार्यनिवृत्त झाला. एवढ्या अवधींत त्यानें अनेक शैक्षणिक व लोकोपयोगी कार्यासाठीं लाखो रकमा धर्मादाय दिल्या होत्या. १९३७ मध्यें तो मेला.

रॉकेल:–पेट्रोल हा लेख पहा.

रॉबेसपीअर (१७५८–९४):–एक फ्रेंच क्रांतिकारक. जन्म ६ मे १७५८. स्टेटस् जनरलची सभा फ्रान्समध्यें भरली तेव्हां हा थर्ड इस्टेटचा प्रतिनिधि म्हणून गेला होता. निश्चित ध्येय, आत्यंतिक कळकळ दुर्दम्य उत्साहशक्ति, लोकांना उघड दिसेल अशी निःस्वार्थी बुद्धि, कल्पकता व प्रचंड कर्तबगारीबरोबर अहंकाराची बाधा इत्यादि अनेक गुणावगुणांचें संमेलन रॉबेसपीअरच्या स्वभावांत आढळून येत होतें; त्याच्या अंगीं असलेल्या विलक्षण तडफेमुळें तो जहालाग्रणींत लोकप्रिय होऊन जॅकोबिन् क्लबचा पुढारी बनला. १७९२मध्यें बोलावलेल्या नॅशनल कन्व्हेन्शनला त्याची निवडणूक होऊन तो पुढारी झाला. त्यानें फ्रेंच लोकसत्तात्मक राज्यपद्धतीची घोषणा केली. लोकसत्तात्मक राज्यपद्धतीची स्थापना केल्यानंतर त्यानें क्रांतिकारकांच्या आरोपांची चौकशी करण्यासाठीं न्यायालय (Tribunal) स्थापिलें. २१ जानेवारी १७९३ रोजीं राजाचा वध केल्यानंतर देशांतील गिर्डोण्डिस्ट पक्षाबरोबर याचा यशस्वी झगडा झाला.

१७९३ सालीं फ्रान्सच्या राज्यव्यवस्थेचीं सर्व सूत्रें कमिशन ऑफ् पब्लिक सेफ्टी या बोर्डाकडे गेलीं. या

संस्थेवर रॉबेसपीअरची निवडणूक झाली. या बोर्डावर असतां त्यानें लोकांवर अत्यंत जुलूम व अत्याचार केले; आपले सहकारी डेसमोलिन व डॅन्टन या व अनेक सहकाऱ्यांना फांशीं देवविलें. १७९४ एप्रिलपासून तो फ्रान्सचा जवळजवळ हुकुमशहा बनला.

परंतु लवकरच प्रतिक्रियेला सुरवात होऊन २७ जुलई १७९४ मध्यें भरलेल्या कन्हेन्शनमध्यें रोबेसपीअरची हाकालपट्टी करण्यांत आली; त्यामुळें रोबेसपीअर व त्याचे सहकारी यांनीं देशांतून पळून जाण्याचा प्रयत्न केला; पण तो उघडकीस येऊन त्यांना २८ जुलई १७९४ रोजीं पकडून आणून लागलीच फांशी देण्यांत आलें.

रॉय, आचार्य प्रफुल्लचंद्र हरिश्चंद्र (१८६१-):– बंगालमधील रसायनशास्त्रज्ञ. १८६१ मध्यें रारुली कातीपारा (जिल्हा खुल्ना) येथें यांचा जन्म झाला. यांचें हेअर व आल्बर्ट या स्कूलमधून दुय्यम शिक्षण झालें. कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत उच्च शिक्षण मिळालें. गिलक्रिस्ट शिष्यवृत्ती मिळाल्यामुळें शिक्षणासाठीं इंग्लंडला प्रयाण केलें. तेथें एडिंबरो विश्वविद्यालयांत १८८२मध्यें यांचा प्रवेश झाला. बी.एससी. व डी. एससी. या पदव्या १८८५ व १८८७ या वर्षांत मिळविल्या. यांना १८८७–८८ पर्यंत रसायनशास्त्रांतील होप प्राइझ ही स्कॉलरशिप मिळत होती. पुढें यांची १८८९-१९०४पर्यंत रसायनशास्त्राचे प्रोफेसर म्हणून कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत नेमणूक झाली. १९०४ त यांना सरकारनें जगांतील संशोधनालयें पाहण्यास पाठवून दिलें. यांचे बरेच शोध पाऱ्यासंबंधीं क्षारांचेच आहेत. १८९५ त लागलेला यांचा महत्त्वाचा शोध म्हणजे मर्क्यूरस नायट्राइट हा होय. यांनीं ' बंगाल केमिकल आणि फार्मास्यूटिकल वर्क्स ' ही संस्था स्थापून चालविली. अ. भा. सामाजिक परिषदेचें अध्यक्षस्थान यांना १९१७ मध्यें मिळालें. ऑल इंडिया केमिकल सर्व्हिस कमिशनचे हे सभासद होते. शिक्षणसंस्थांना यांनीं हजारों रुपयांची मदत केली. शिवाय ट्रस्ट करून आपली मिळकत खादी कार्याला देऊन टाकली. बंडापूर्वीचें हिंदुस्थान, हिंदूंचा इतिहास हे यांचे ग्रंथ असून रसायनशास्त्रांतल्या शोधांबद्दल शंभरवर लेख यांनीं लिहिले आहेत.

रॉय, मानवेंद्र (१८९३–):–यांचें खरें नांव नरेंद्रनाथ भट्टाचार्य. हे बंगल्यांतील एका तात्यापंतोजीचे चिरंजीव. इ. स. १९०३ सालीं क्रान्तिकारक चळवळींत सामील झाले; डाक्का अनुशीलन समीतीचें एक प्रमुख सभासद होते. राजकीय दरोड्यांत भाग घेतल्याबद्दल १९०६ सालीं यांजवर खटला. भरण्यांत आला. १९०८ सालीं हौरा कटाच्या खटल्यांत सांपडले. १९१४सालीं गार्डन रीचच्या दरोड्यांत भाग घेतल्याबद्दल खटला झाला. १९१४ सालीं महायुद्ध सुरू झाल्यावेळीं गदरपक्षाला मिळाले व हिंदुस्थानांत शस्त्रास्त्रांची आयात करण्याकरितां जर्मनीशीं झालेल्या पत्रव्यवहारांत भाग घेतला. या कार्यांत अपयश आलें. यानंतर हिंदुस्थानांतून निसटले व चीनला गेले. या प्रवासांत त्यांनीं आपलें नांव अनेकवेळां बदललें. चीनमध्यें त्यांनीं डॉ. सन्यत्सेन यांचा आश्रय घेतला. तेथून ते अमेरिकेला गेले. अमेरिकेंत असतांना एम्. एन्. रॉय या नांवानें वावरले. रॉय मेक्सिकोला गेले व कम्यूनिस्ट पार्टी स्थापून दक्षिणेकडील संस्थानांत साम्यवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. महायुद्ध सुरू असतां लेनिननें त्यांना बोलावून घेतलें. तेथें कम्यूनिस्ट इन्टरनॅशनलचे प्रमुख सभासद झाले व हिंदुस्थानादि पौर्वात्य राष्ट्रांशीं संबंध ठेवण्याकरितां स्थापन झालेल्या इन्टरनॅशनल या संस्थेच्या पौर्वात्य शाखेचे प्रमुख झाले. त्यांनीं १९२२ ते १९२८ पर्यंत व्हॅनगार्ड व मासेस हीं पत्रें चालविलीं. १९२७ सालीं मॉस्को येथील ईस्टर्न यूनिव्हर्सिटीमध्यें भारतीय विभागाचे प्रमुख झाले. पुढें कम्यूनिस्ट इंटरनॅशनलनें त्यांना चीनमध्यें तेथील कम्यूनिस्ट पार्टीला सल्ला देण्याकरितां पाठविलें. परंतु रशियन साम्यवादी पुढारी बारोहिन यांच्याशीं त्यांचें जमेना म्हणून चीनमधील कार्य सोडावें लागलें. १९२८ सालीं भरलेल्या आंतरराष्ट्रीय कम्यूनिस्टांच्या सहाव्या अधिवेशनाचे वेळीं त्यांनीं निरालेंच धोरण स्वीकारलें व पास झालेल्या ठरावावर टीका केली. म्हणून त्यांना कम्यूनिस्ट इन्टरनॅशनलमधून काढून लावण्यांत आलें. नंतर जर्मनी व फ्रान्स येथें जाऊन गुप्तपणें १९३० सालीं हिंदुस्थानांत आले. १९३१ सालीं मुंबई येथें अटक व कानपूर येथें चौकशी होऊन सहा वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. १९३६ सालीं सुटका झाली. नंतर काँग्रेसला मिळाले.

मार्क्सच्या साम्यवादाचे रॉय हे आचार्य गणले जातात. त्यांनीं एका अमेरिकन स्त्रीशीं १९३७ सालीं विवाह केला. त्यांनीं अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांतील प्रमुख पुढीलप्रमाणें–India in Transition, Future of Indian Politics. My experiences in China.

सांप्रत रॉय 'Independent India' नांवाचें वृत्त-पत्र चालवितात.

रॉस्, सर रोनाल्ड (१८५७–१९३२):–एक नामांकित ब्रिटिश डॉक्टर. १८९७–९८ मध्यें मलेरियाच्या जंतूंच्या जीवनाचा इतिहास संशोधिला. १८९९ सालीं पश्चिम आफ्रिकेंत जी वैद्यकीय सफर झाली तिचें नेतृत्व यांच्याकडे होतें. १९०२ सालीं वैद्यकाबद्दल नोबेल प्राइझ मिळालें. गेल्या महायुद्धांत, मलेरियाविषयीं सर्व प्रश्न यांचेकडे सोपविण्यांत आले होते. हे इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्यें बरींच वर्षें होते.

ल

लक्ष्मणः–हा दशरथाला सुमित्रेपासून झालेला मुलगा. विश्वामित्रानें यज्ञरक्षणार्थ रामाबरोबर यालाहि नेलें होतें. वाटेंत त्यानें यांना आदर्श क्षत्रिय बनविण्यासाठीं अनेक शस्त्रास्त्रांचें शिक्षण दिलें. जनकाच्या उर्मिला नांवाच्या कन्येशीं याचें लग्न झालें.

रामाबरोबर हा वनवासास गेला होता. तेथें तो रामाची सेवा अत्यंत काळजीपूर्वक करी. सीतेच्या रक्षणासाठीं यानें पुष्कळ खटपट केली. शेवटीं ती याच्यासंबंधीं नसते तर्ककुतर्क काढूं लागली म्हणून याला तिला सोडून रामाच्या चौकशीस जाणें भाग पडलें. याच्या अंगचा धोरणीपणा मायामृग ओळखतांना चांगलाच प्रत्ययास आला.

पुढें सीतेच्या शोधार्थ हा व राम निघाले असतां याच्यापुढें सीतेचे अलंकार ओळखण्यासाठीं ठेवले; पण ते यास ओळखतां येईनात. यावरून त्याची वागणूक सीतेशीं कशी होती हें समजून येतें.

रामरावण युद्ध सुरू झाल्यावर याच्यावर शरबंधांत पडण्याचा प्रसंग आला होता.याला बारा वर्षें आहारनिद्रा यावांचून काढावीं लागलीं; आणि या तपश्चर्येमुळेंच त्याला इंद्रजिताला मारतां आलें. याशिवाय अतिकाय, विरुपाक्ष आणि रावण यांच्यांशींहि त्यानें प्रत्यक्ष युद्ध केलें. बिभीषणाला यानें युद्धांत वांचविला म्हणून याजवर रावणानें रागानें शक्ति फेकली. या शक्तीनें हा मूर्च्छित पडला. पण या प्रसंगीं मारुतिसुषेणादिकांच्या साहाय्यामुळें हा बचावला.

हा थोडा तापट होता, पण विचारीही होता. मितभाषणी, वृद्धांची सेवा करणारा, आचारसंपन्न, सौम्य स्वभावाचा असा हा होता.

याला उर्मिलेपासून अंगद व चंद्रकेतु अशीं दोन मुलें झालीं. रामानें कारुपथ देशांत अंगदाला अंगदीया नांवाची नगरी स्थापून दिली व मल्लभूमींत चंद्रकेतूकरितां चंद्रकांत नगर स्थापन केलें. हा अंगदाकडे वर्षभर राहून त्याचें स्थिरस्थावर झाल्यावर परत अयोध्येस आला.

राम व कालरूप तपस्वी यांचा संवाद चालू असतां दुर्वास मुनीच्या आगमनानें याला रामाची आज्ञा पाळतां आली नाहीं त्यामुळें रामाच्या वियोगाचा प्रसंग याजवर आला. शरयूच्या तीरीं जाऊन यानें देहत्याग केला. तेथें सहस्रधारा तीर्थ आहे.

हिमालयाच्या पायथ्याशीं त्याचें एक मंदिर असून (ऋषिकेश येथें) लक्ष्मण झूला नांवाचा प्रसिद्ध पूल आहे. तेथें यानें इंद्रजिताला म्हणजे आपल्या जांवयाला मारिल्याच्या दोषाची निष्कृति व्हावी म्हणून हजार वर्षें हा तप करीत बसला होता. त्याच जागीं सध्यांचें लक्ष्मणमंदिर आहे असें म्हणतात.

इंद्रजिताची बायको ही शेषाची मुलगी, व लक्ष्मण हा शेषाचा अवतार म्हणून हें सासरा जावयाचें नातें असावें.

लक्ष्मीः–ही सागरांतून समुद्रमंथनाच्या वेळीं उत्पन्न झाली. ही उत्पन्न होतांच देवांचें तेज वाढलें. ब्रह्मदेवानें ही विष्णूला दिली. हीच पुनः भृगूपासून ख्यातीच्या उदरीं जन्म पावली. पुढें हिनें लक्ष्मीनगर वसवून भृगूस दिलें. हें नगर लक्ष्मी पुढें परत मागूं लागली. पण तें तो देईना. तेव्हां हिच्यासाठीं विष्णूनें मध्यस्थी केली. म्हणून भृगूनें विष्णूला 'मृत्युलोकीं दहा जन्म घ्यावयास लागून भार्येचा वियोग सहन करावा लागेल' असा शाप दिला. विष्णूनेंहि भृगूला 'मुलांबाळांच्या सुखाला अंतरशील' असा प्रतिशाप दिला. हिचे धाता नि विधाता हे दोघे भाऊ होत. हिला शापामुळें हत्तीचें तोंड प्राप्त झालें असतां तें ब्रह्मदेवानें नाहींसें केलें व हिला महालक्ष्मी असें नांव दिलें.

हिचा अलक्ष्मीशीं संवाद झाला. त्यांत श्रेष्ठ कोण हा विषय होता. शेवटीं दोघीजणी निकालासाठीं गंगेकडे गेल्या. गंगेनें लक्ष्मी श्रेष्ठ असा निर्णय दिला.

लक्ष्मीचे अवतार–१ वामनकमलासंभव, २ परशुरामभूमि, ३ रामसीता, ४ कृष्णरुक्मिणी. हिनें आपलीं स्थानें सांगितलीं आहेत. त्यांपैकीं कोल्हापूर हें एक प्रसिद्ध ठिकाण होय.

लखनौ—संयुक्त प्रांताची राजधानी. गोमती नदीच्या कांठचें शहर. या प्रांतांतील सर्व शहरांत हें मोठें आहे. औध—रोहिलखंड रेल्वेचें केंद्र येथें असून हें मुंबईहून ८८५ मैल, कलकत्त्याहून ६१६ मैल व मद्रासहून १४९७ मैल दूर आहे. संयुक्त प्रांतांतील मोठी छावणी येथें असून कारखान्याबद्दल या शहराची प्रसिद्धीही फार आहे. व्यापाराचें देखील हें एक केंद्र आहेच. शिक्षणाचें केंद म्हणूनहि याच्याकडे बोट दाखवितां येईल. याची लोकसंख्या २७४६५९ आहे. या शहराचे उ. अ. २६·५५ पू. रे. ८०·५९ आहेत.

हें शहर लक्ष्मणानें वसविलें अशी दंतकथा आहे. येथील किल्ला शेखांनीं बांधला. हा किल्ला ‘ लिखन ’ नांवाच्या शिल्पकारानें बांधला म्हणून त्याच्या नांवावरून प्रस्तुतचें नांव या शहराला मिळालें असें म्हणतात. १८—१९ व्या शतकांत या शहराची झपाट्यानें वाढ झाली. ही वाढ होण्यास अयोध्येच्या नबाबांची मदत चांगली झाली. नबाबांनीं येथें आपली राजधानी करून पुष्कळ चांगल्या इमारती बांधल्या. यांपैकीं शिकारखाना, आरामस्थान, मोतीमहाल, मुबारकमंझील, शहामंझील, तारावली कोठी नांवाची वेधशाळा, हुसेनाबाद इमामवाडा, गोमतीचा लोखंडी पूल व कैसरबाग हीं ठिकाणें दृष्टिखालीं घालण्यासारखीं आहेत.

बंडखोरांच्या ताब्यांत हें शहर कांहीं काल होतें.

लघुकथा:—विसावें शतक हें महायुद्धांप्रमाणें लघुकथांचेंही शतक आहे. असें असूनही ‘ लघुकथा म्हणजे काय ? ’ असा एखाद्यानें प्रश्न केला, किंवा ‘ तुमची ही नवी लघुकथा म्हणजे जुन्या काळांतली गोष्टच ना ? ’ असा कुणीं संशय व्यक्त केला तर लघुकथेची एक सुंदर व्याख्या पृच्छकाच्या तोंडावर टाकून तें बंद करणें कांहीं सोपें नाहीं ! कुठलीही विकासशील गोष्ट व्याख्येच्या चौकटींत सामावूं शकत नाहीं हें तर याचें एक प्रमुख कारण आहेच; पण दुसरें तितकेंच महत्त्वाचें कारण म्हणजे लघुकथा हा काव्याप्रमाणें लेखकाच्या व्यक्तित्वाचा आविष्कार करणारा लेखनप्रकार आहे. त्यामुळें त्याच्यांतलें वैचित्र्य गद्य ललित वाङ्मयाच्या दुसऱ्या कुठल्याहि शाखेंत आढळणार नाहीं ! लघुकथालेखक हाही कादंबरीकाराप्रमाणें जीवनचित्रच रंगवितो हें खरें; पण तें चित्र जीवनांतल्या अतिशय लहान भागाचें असतें, आणि तें त्यानें आपल्या व्यक्तिमत्तेच्या (Personality) नाजूक रंगांनीं रंगविलेलें असतें.

लघुकथा म्हणजे थोड्या वेळांत संपणारी गोष्ट हें वर्णन या वाङ्मयप्रकाराची कल्पना आणून देण्याच्या दृष्टीनें अगदींच अपुरें, किंबहुना चुकीचें आहे. लघुकथेच्या जनकत्वाचा मान ज्याच्याकडे दिला जातो त्या ‘पो’नें आपल्या व्याख्येंत अमुक मिनिटांत जी गोष्ट वाचून संपते ती लघुकथा असा हिशेब दिला आहे हें खरें. पण रामायण किंवा महाभारत यांचीं कथानकें जशीं एकेका श्लोकांत ग्रथित केलीं आहेत, त्याप्रमाणें ॲना कॅरेनिना, क्राइम् अँड पनिशमेंट्, मेयर ऑफ कॅस्टरब्रिज, श्रीकांत किंवा मी यांचीं कथानकें सारांशरूपानें दहावीस पृष्ठांत सांगतां आलीं तरी त्या गोष्टींना कुणी लघुकथा म्हणेल का ?

लघुकथेंत कथासूत्र असलें तरी तिचें साम्य कादंबरीपेक्षां काव्याशींच अधिक आहे. विविध घटना आणि अनेक पात्रांच्या स्वभावपरिपोषांतून उत्पन्न झालेलें वैचित्र्य हीं कादंबरीचीं आवश्यक अंगें आहेत. लघुकथेला या दोन्हींचेंही वावडें आहे. तिच्यांत एकच परिणामकारक मध्यवर्ती घटना (A single centric episode) असणें इष्ट असतें. दीपमाळेच्या शिखराकडे चढण्याकरतां जशा छोट्या छोट्या पायऱ्या असतात, आणि त्या पायऱ्यांवरून नागमोडी वळणें घेत आपण ज्याप्रमाणें दीपमाळेवर जातों, त्याप्रमाणें लघुकथेंत इष्ट परिणाम साधण्याकरितां पहिल्या वाक्यापासून सर्व गोष्टींची कलात्मक योजना करावी लागते. या दृष्टीनें लघुकथालेखक हा एक प्रकारचा एकलव्यच असतो असें म्हटलें तरी चालेल. इष्ट परिणामाखेरीज कुठलीही गोष्ट त्याला दिसतां कामा नये. हा परिणाम कमींत कमी प्रसंगांनीं आणि वर्णनांनीं साधणें हाच त्याच्या कलेचा विजय.

कादंबरींत जुळवाजुळवीला आणि पाल्हाळाला थोडा तरी अवसर असतो. पण लघुकथा जुळवून चालत नाहीं. ती स्फुरावीच लागते. याच कारणामुळें तिच्या विषयांचें क्षेत्र जेवढें विस्तृत, तेवढेंच स्वभावरेखनाचें क्षेत्र विविध झालें आहे. एखाद्या स्वभावचित्राची एखादी ओझरती बाजू किंवा एखाद्या सामान्य मनुष्याच्या आयुष्यांतला एखादा लहानसा प्रसंग यांच्यावर उभारलेली लघुकथासुद्धां अत्यंत आकर्षक होते. विस्मयजनक घटनांवर उभारलेल्या ओ. हेन्रीच्या कथानकप्रधान लघुकथांइतक्याच बेट्स् आणि कॅथेरिन

मॅन्सफील्ड यांच्या विशिष्ट मनोवृत्ति किंवा वातावरण चितारणाऱ्या कथाही सुंदर वाटतात, याचें कारण लघुकथेच्या या अमर्याद शक्तींतच आहे.

मराठी वाङ्मयांत अद्यापि कथानकाला प्राधान्य देणाऱ्या लहान गोष्टीलाच लघुकथा म्हणण्याचा प्रघात आहे. पण रेखीव किंवा ठाशीव कथानक नसूनही सुंदर वाटणाऱ्या अनेक लघुकथा पाश्चात्य वाङ्मयांत सध्यां लिहिल्या जात आहेत. आज ना उद्यां आपल्याकडेहि तशा प्रकारच्या गोष्टींची आवड उत्पन्न होईल. जीवनांतील विविध अनुभवांचे भावना-प्रधान क्षण त्या त्या भावनेला शोभतील अशा नाजुक-पणानें चित्रित करणाऱ्या कलावंताला अनेकदां कथा-नकाचा एक प्रकारचा कृत्रिमपणा जाचक होऊं लागतो; आणि मग आपोआपच तो या नव्या प्रकारच्या लघुकथा लिहूं लागतो. शब्दचित्रें, रूपक-कथा, प्रतीककथा इत्यादि लघुकथेच्या विविध शाखांचा उगम कलावंताच्या या कुचंबणेंतूनच झाला आहे.

लघुकथा लिहिणाराची स्थिति रेखाचित्र काढणारा-सारखी असते असें म्हणतां येईल. एका रेषेनें चित्र-कार आपलें रेखाचित्र जसें सजीव करीत जातो, त्याप्रमाणें प्रत्येक परिच्छेदानें लघुकथालेखक आपल्या कलाकृतीची सुंदर मूर्ति घडवीत असतो. डोंगरावरून खालीं धांवत येणारा मनुष्य मधें थांबूं शकत नाहीं, उलट खालीं येतां येतां त्याचा धांवण्याचा वेग वाढूंच लागतो. लघुकथेचें तसेंच आहे. तिची सुरवात संथपणें होण्यापेक्षां गतीनें होणेंच अधिक इष्ट. ही गति कथेच्या आत्म्याशीं असंबद्ध अशा कुठल्याही गोष्टींनीं, मग त्या कितीही सुंदर असोत, खंडित झाली कीं तिचें स्वारस्य कमी झालें म्हणून समजावें. खटकेबाज संवाद, सुंदर सृष्टिवर्णनें अथवा आकर्षक सुभाषितें यांना लघुकथेंत जागा नाहीं असें नाहीं. पण वेलीवर फुलें फुलावींत तशा या गोष्टी कथेच्या धांवत्या प्रवाहांतून स्वाभाविकपणें वर आल्या पाहिजेत. इष्ट परिणामापलीकडे एका वाक्यानेंही लघुकथा लांबविली नाहीं म्हणजे तिचें कलात्मक स्वरूप वाचकाला चटका लावल्यावांचून राहात नाहीं. या बाबतींत लघुकथेचें वक्तृत्वाशीं साम्य आहे. श्रोते ज्या क्षणीं देहभान विसरतात, त्याच क्षणीं उत्कृष्ट वक्ता आपलें भाषण संपवितो.

तंत्रदृष्ट्या लघुकथालेखनाच्या अनेक पद्धती प्रच-लित आहेत. निवेदन, आत्मनिवेदन, दैनंदिनी, पत्रें या त्यांतल्या प्रमुख होत. कुशल लेखक आपल्या कथानकाला शोभेल अशाच प्रकारची कथनपद्धति नेहमीं स्वीकारतो. या विविध पद्धतींचें मिश्रणहि कित्ये-कदां अत्यंत परिणामकारक होतें. एखाद्या संन्याशाची प्रणयकथा कथनपद्धतीनें सांगण्यापेक्षां त्याची व लेख-काची एका विलक्षण प्रसंगामुळें गांठ पडते व संन्याशी आपलें अंतःकरण त्याच्यापाशीं मोकळें करतो अशा रीतीनें सांगितली, तर तिला अधिक सजीवता येईल.

मोपाँसा, चेकॉव्ह, ओ. हेन्री प्रभृति पाश्चात्य लघु-कथालेखकांच्या लघुकथा सर्व दृष्टींनीं अभ्यसनीय आहेतच; पण खुद्द मराठींतहि अनेक चांगल्या लघु-कथा निर्माण झाल्या असून त्यांचा अभ्यास होतकरू लेखकाला मार्गदर्शक झाल्याशिवाय राहणार नाहीं. लघुकथेचे विषय, तिचें तंत्र, तिची भाषा इत्यादि अंगांची चांगली माहिती करून घेऊं इच्छिणाऱ्या वाचकांकरितां सहज आठवणाऱ्या कांहीं गोष्टींचीं नांवें खालीं देत आहों:—

वरेरकर—महेश्वरी लुगडें. **प्रो. फडके**—न्याय, माणूस जगतो कशासाठीं ? **खांडेकर**—दोन टोकें, पूल, दुसरी आक्का. **य. गो. जोशी**—पारिजातकाचीं फुलें, दोन आवाज. **प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई**—चांडाळ. **कृष्णाबाई**—संरक्षक, आई. **कुमार रघुवीर**—अप्पांची बैलांची जोडी.

लघुकथेचे मुख्य निकष दोनच ! पहिला तिच्या अन्तरंगाचा; दुसरा बहिरंगाचा. अन्तरंगाच्या अभ्या-सांत लेखकानें विषय कोणत्या दृष्टिकोनांतून मांडला आहे आणि तो मांडतांना केलेली प्रसंगांची निवड सुंदर, सरस व सजीव आहे कीं नाहीं या गोष्टींचा मुख्यतः समावेश होतो. हा निकष लघुकथेचा आत्मा कितपत आकर्षक आहे हें दाखवितो. पण आत्मा कितीहि प्रभावी असला तरी अनुरूप देहाखेरीज त्याला आपलें सामर्थ्य प्रगट करतां येत नाहीं. त्या दृष्टीनें लघुकथेच्या बहिरंगाचें महत्त्वही कांहीं कमी नाहीं! तंत्र, भाषा, इत्यादिकांच्या सौंदर्याचा या दुसऱ्या परीक्षणांत समा-वेश होतो. बहिरंग आणि अंतरंग यांचा जिच्यांत अत्यंत सुंदर मेळ झालेला असतो, ती लघुकथा एकदां वाचून वाचकांच्या मनाची कधींच तृप्ति होणार नाहीं. मोहक गाण्याचे सूर कानांत घुमावेत, त्याप्रमाणें असली लघुकथा मनांत घुमूं लागते. एखाद्या भाव-गीताप्रमाणें ती वारंवार वाचून आपण तिची गोडी अनुभवूं लागतों. तिनें आपल्या ज्ञानभांडारांत भर

टाकली नसली, तरी आपलें भावनाभांडार समृद्ध केलें आहे अशी आपली खात्री होते!

मराठी लघुकथा—मराठी वाङ्मयांत गेल्या पंधरा वर्षांत पाश्चात्य साहित्याच्या कसोशीच्या परिशीलनामुळें जे निरनिराळे वाङ्मयविभाग विशेष परिणति पावत चालले आहेत, त्यांतील लघुकथाविभाग हा अग्रेसर होय. इंग्लिश, अमेरिकन, फ्रेंच आणि रशियन वाङ्मयांतून या विभागाची जोपासना विशेष झपाट्यानें झाली ती गेल्या शंभर वर्षांतच होय. दीर्घकाल वाचीत राहण्यापेक्षां थोडक्या वेळांत पण चटकदार वाटेल असें वाङ्मय वाचून करमणूक करण्याकडे वाचकांची प्रवृत्ति अधिकाधिक होऊं लागल्यामुळें ही जोपासना दिवसेंदिवस फलप्रद ठरत गेली. इंग्रजी राज्याच्या अंमलानें आपल्याला जशी कित्येक राजकीय आणि सामाजिक परिपाठांची क्रांति घडवावी लागली, तसलीच क्रांति आपल्याला वाङ्मयविषयक प्रवृत्तीसंबंधांतही घडवून आणावी लागली. विद्यमान घडामोडींविषयीं आणि प्रचलित समाजाच्या परिस्थितीविषयीं विचार करून त्याविषयीं लिहिण्याची प्रेरणा आपल्या ठिकाणीं उत्पन्न झाली, ती प्रायः या नवीन राजवटीपासूनच होय. चिपळूणकरांच्या पूर्वींच्या पिढींतील लेखकांत ही प्रवृत्ति बीजरूपानें निर्माण झाली. चिपळूणकरांच्या काळांत तिला अंकुर फुटले आणि चिपळूणकरांच्या शिष्यत्वाचीं बिरुदें मिरविणाऱ्या त्यांच्या पुढल्या पिढीच्या वेळीं या अंकुरांतूनच वाङ्मयाची एकेक शाखा विस्तार पावली. त्यानंतर गेल्या पन्नास वर्षांत या शाखांची परिणति होत असतांना त्यावर अनेक प्रकारचे संस्कार होत गेले, व त्यांतूनच पाश्चात्य वाङ्मयांतील अनेक विभागांच्या सारखे दिसणारे आणि भासणारे वाङ्मयविभाग निर्माण झाले. लघुकथा हा त्यांतील अतिशय लोकप्रिय आणि सर्वस्वीं आधुनिक असा प्रकार होय.

गोष्ट सांगून करमणूक करणें हा मनोरंजनाचा प्रकार प्रायः मानवी समाजाच्या बाल्यावस्थेपासून अस्तित्वांत आहे. पराक्रमाच्या व प्रेमाच्या गोष्टी ऐकणें व सांगणें हें कोणत्याही समाजांत आत्मनिवेदनाचें एक प्रमुख साधन समजलें जातें. पूर्वजांचे प्रत्यक्ष घडलेले पराक्रम निवेदन करून किंवा चालू जीवनक्रमांत जी चालचर्या घडणें अवघड किंवा अशक्य आहे, पण जी घडावी अशी मानवी मनाची सूक्ष्म इच्छा असते, ती ज्या गोष्टींतून घडली आहे अशा गोष्टी कल्पनेनें निर्माण करून, सभेची किंवा शिळोप्याची वेळ साजरी करावी अशी वहिवाट पूर्वापार चालत आली आहे. अशी स्थिति असल्यामुळें कोणत्याही देशांतील कथावाङ्मयाचें मूळ नक्की शोधून काढणें पुष्कळ अंशीं अशक्य ठरतें. ग्रीस देशाचा पहिला कथाकार होमर होता. किंवा भारतवर्षाचा पहिला गोष्टीवेल्हाळ व्यास होता, असें जरी कोणीं म्हटलें तरी तें सापेक्षत्वानेंच मान्य केलें पाहिजे. खरी स्थिति अशी आहे कीं, या लोकांनीं ज्या गोष्टी सांगितल्या त्या सांगण्याची पद्धत अधिक आकर्षक व मनोरंजक असल्यानें या लोकांना त्या त्या वाङ्मयांत असें महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें. गोष्टींत प्रसंग पाहिजे, तो प्रसंग अव्वलपासून अखेरपर्यंत वाचकांच्या मनावर पकड बसविणारा पाहिजे, आणि ती गोष्ट संपल्यावर एक स्वयंपूर्ण परिणाम वाचकांच्या मनावर झाला पाहिजे, या गोष्टीबद्दलच्या अपेक्षा आजहि चांगल्या लघुकथेसंबंधांत बाळगल्या जातात. म्हणजे ज्या लेखनगुणांचा लघुकथेचा आत्मा म्हणून उल्लेख करतां येईल, ते गुण व्यासकालापासून आजपर्यंत सारख्याच महत्त्वाचे मानण्यांत आले आहेत. फरक जो पडला आहे तो कथनाच्या पद्धतींत पडला आहे, कथनाला आवश्यक असणाऱ्या गुणांत नाहीं. कथनाच्या पद्धतींत फरक पडतो, त्याचें कारण निरनिराळ्या समाजांतून, निरनिराळ्या कालखंडांतून, आपल्या योगक्षेमाकरितां, अस्तित्वाकरितां, आणि सुखरूपतेसाठीं धडपडणारा समाज आपल्या साऱ्या मनोगताची उकल समकालीन वाङ्मयांतून करण्याची कोशीस करीत असतो हें होय. समकालीन समाजाच्या स्थूलसूक्ष्म मनोगतांचा आविष्कार त्या त्या कालखंडांतील वाङ्मयप्रकारांतून झाल्याशिवाय कधींही राहात नाहीं. त्या वाङ्मयप्रकारांची लांबी रुंदी ठरविण्याचें सामर्थ्य सामाजिक जीवनाच्या हालचालींच्या वेगावर अवलंबून असतें. स्वास्थ्यप्रिय, अल्प श्रमांत पुष्कळ मोबदला मिळविणाऱ्या समाजांत महाकाव्यें वाचलीं गेलीं. आजच्या धांवपळीच्या युगांत लघुकथा अवतार पावली. निसर्ग, धर्मसत्ता, राजसत्ता, समाजसत्ता या सर्वांशीं आपलें जीवन टिकवून ठेवण्याकरितां झुंज घेणाऱ्या लोकसमुदायाला या झुंजेव्यतिरिक्त जो फुरसतीचा काळ लाभतो त्यावरून गोष्टीचा विषय व गोष्टीची लांबीरुंदी हीं ठरत असतात. आजच्या युगांत हा फुरसतीचा काळ नक्की किती आहे, हें सांगतां आलें नाहीं, तरी एकंदर यंत्रयुगाशीं टक्कर घेण्याकरितां जी धांवपळ करावी

लागते, ती ध्यानांत घेतां, लोकांची प्रवृत्ति पुष्कळ अंशीं दिनचर्येतील हरेक बाबींचा झपाट्यानें फडशा पाडण्याकडे अधिक आहे, हें स्पष्ट दिसून येत आहे. जीवनाची गति फार झपाट्याची झाली आहे. यामुळें जें काय सांगावयाचें तें पाल्हाळानें किंवा आनुषंगिक गोष्टींचें अवडंबर न माजवितां सांगितलें पाहिजे, अशी प्रवृत्ति उत्पन्न झाली.

गेल्या पंधरा वर्षांत आपल्याकडे विपुल कथा-वाङ्मय निर्माण झालें. इंग्लिश, फ्रेंच, रशियन व अमेरिकन या वाङ्मयांतील लेखकांचे उत्कृष्ट गुण आपल्या वाङ्मयाला लाभावेत आणि या साऱ्या विदेशी वाङ्मयांतील रसवन्ती, विषयांची विविधता, मनो-विश्लेषणांची मार्मिकता आणि भावनांची हृदयद्रावकता इत्यादि अनेक गुणांचा आपल्याहि वाङ्मयांत प्रकर्षानें अंतर्भाव होत जावा अशीच मनीषा या सगळ्या वाङ्मयसेवेच्या निमित्तानें बाळगण्यांत येत आहे. आज विचारांचे व आचारांचे निरनिराळे प्रकार देशोदेशींच्या कथावाङ्मयांत निदर्शित झालेले आढळतात. आपल्या सामाजिक संक्रमणावस्थेतील आचारविचारांचें स्वरूप आणि त्यावरील मीमांसा किंवा भाष्य व्यक्त करण्याकरितां लघुकथेचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची प्रवृत्ति सर्वत्र दिसून येते त्याला मराठी लघुकथाही अपवाद नाहीं. आपल्या आटोपशीर स्वरूपाला झेपेल इतक्या प्रमाणांत जीवनाचा आवि-ष्कार करण्यांत लघुकथेनें कसूर केलेली नाहीं. संभाव्य पण प्रभावी प्रसंग निवडणें; कथानकाच्या अनुरोधानें प्रसंगांचा बेतीवपणा राखणें; आद्यंत मनाची चटकन् पकड घेतील इतके सामर्थ्यशील असणें; पात्रांची मोजकी संख्या राखून त्यांचा आटपसर मांड मांडणें; स्वभावपरिपोष, पूर्ववृत्तसूचन आणि प्रसंगप्रगति हीं साधून देणारे संवाद रचणें; त्या संवादांतील शब्दांचा कथानकांतील धाग्यांशीं एकजीव करणें इत्यादि गुण यशस्वी लघुकथालेखन करण्यासंबंधांत लोकप्रिय लेखकांनीं आवश्यक आणि मार्गदर्शक म्हणून मानलेले आहेत, आणि कोणत्याही मर्मज्ञ व विवेककुशल लेखकाला ते तसे वाटावेत इतकी त्यांना आजच्या काळांत महति लाभली आहे.

इतक्या अवस्थेपर्यंत पोंचावयाला शंभर वर्षें लागलीं व त्या शंभर वर्षांत आजच्या लघुकथेनें अंतर्बाह्य विकासाचा मार्ग आक्रमितांना अनेक अवस्था अनुभवल्या आहेत. ब्रिटिशांची अव्वल अमदानी सुरू झाली त्यावेळीं पेशवाईच्या अस्ताबरोबर राजशाही व सरंजामशाही यांचाहि लोप झाला, आणि लोकशाहीकडे समाजाला खेचून नेणारी राज्यघटना समाजाला अपरि-हार्य म्हणून मान्य करावी लागली. जुन्या संसाराचीं सारीं भांडीं मोडीस घालण्याचा तो प्रसंग होता. नवीं भांडीं पैदा करून नवीन संसार मांडण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. पण कांहीं लोकांना जुन्या भांड्यांचा मोह सोडवत नव्हता. त्या मोहाच्या भरीस पडून जुन्या भांड्यांनाच नवीन संसारांत आकर्षक स्वरूपांत मांडीत बसण्याचा कांहीं लोकांनीं अट्टाहास चालविला. हा अट्टाहास अनाठायीं आहे असें सांगणारा दुसरा वर्ग नवीन भांड्यांच्या घडामोडीकडे वळला आणि त्यांचा स्वीकार पुरस्कारूं लागला. यांतूनच वाङ्मयांतही सना-तनी आणि सुधारक असे लेखकांचे वर्ग निर्माण झाले. सनातनी लेखकांनीं जुन्या गोष्टी नव्यानें सांगितल्या. नवीनांनीं पुढें आवश्यक वाटणाऱ्या आचारविचारांची तरफदारी करणाऱ्या कथा घडविल्या. पण आरंभींच्या काळांत मूळच्या महाराष्ट्रीय मातीला कोणतें खतपाणी नि:संशय हितावह होईल याचा शास्त्रीय दृष्टीनें निर्णय लावून कोणत्याही पक्षानें कामगिरी केली नाहीं. कृष्ण-शास्त्री चिपळूणकरांच्या 'अरबी भाषेंतील सुरस गोष्टी' (इ. स. १८३१) व त्याच पद्धतीवर इतरांनीं रूपां-तरित केलेल्या चिनी, तुर्की, पर्शियन, जर्मन वगैरे भाषांतील गोष्टी याच संक्रमणकालाच्या निदर्शक आहेत. छत्र्यांचा बालमित्र (स. १८३६) व इसापनीति हे प्रयत्नही याच मासल्याचे आहेत. आपल्या स्वतांच्या समाजाच्या जीवनाचा डाव सर्वस्वीं फसला असला तरी अनुकरणाच्या मार्गानें कां होईना पण तो पुन्हां सांवरतां आला तर पहावा हाच हेतु या सुरवातीच्या प्रयत्नांच्या मुळाशीं होता हें उघड आहे. पंचतंत्र, हितोपदेश, कोकिला-पस्तिशी, लटकचाळिशी, बोधकथा, नीतिकथा, अद्भुत ठकबाजी, सवाई विक्रम—चरित्र हे सारे त्या १८३० ते १८७०च्या दरम्यान झालेले कथाकथनाचे प्रयत्न समा-जाच्या भांबावलेल्या मनःस्थितीचे उत्कृष्ट निदर्शक आहेत. नक्की काय हवें त्याचा उलगडा झालेला नव्हता. आहे त्यापेक्षां कांहीं तरी वेगळें पाहिजे एवढीच जाणीव झालेली होती. ही जाणीव पुरी करण्याचें सामर्थ्य तत्का-लीन समाजजीवनांत उरलें नव्हतें. म्हणून अनुकरणाच्या मार्गानें हें सामर्थ्य निर्माण झालें तर पहावें या हेतूनें हे सारे प्रयत्न झाले. भांबावलेला समाज दैववादी आणि विलासलोलुप बनतो, या सर्वसाधारण अनु-

भवाला ब्रिटिश राजवटीचा प्रारंभकालही अपवाद नव्हता. भांबावलेला समाज दैववादाच्या मगरमिठींतून सुटण्यापूर्वी आपल्या पूर्वजांच्या काळांतील आचार-विचारांशीं, पराक्रमाशीं, धर्मव्यवस्थेशीं, नीतिनियमांशीं मनानें तल्लीन होण्याचा एकवार जबरदस्त प्रयत्न करून पाहातो. इतर देशांतील वाङ्मयाचें रूपांतर तो आपल्या वाङ्मयांत करतो, त्यांतही निवड होते ती नेमकी आपल्या पूर्वजांच्या राजशाहीच्या सुखदुःखाशीं, आणि जीवनचरित्राशीं साम्य राखण्यास सहाय्य करतील, अशाच कथांची होते. रामायण—महाभारतकालीन राजे आणि अशोक, चंद्रगुप्त, शिवाजी इत्यादि राज्यकर्ते यांच्या काळांतील गोष्टींशीं विलक्षण साम्य दाखविणाऱ्या कथांचीं भाषांतरेंच नेमकीं या काळांत झालीं. सरंजामशाहींतील आचार—विचारांचा पुन्हां एकदां जोराचा उच्चार समाजानें करून पहिला. ग्रीस देशांतील पेरीक्लीजचा काळ, रोमच्या इतिहासांतील ऑगस्टसचा काळ, फ्रान्सच्या इतिहासांतील शार्लमेनचा काळ, जर्मनीच्या इतिहासांतील पांचव्या चार्लसचा काळ, स्पेनच्या इतिहासांतील कॅथेराईनचा काळ, इंग्लंडच्या ॲनचा काळ, हे सारे काळ व त्यांतील इतिहास, पराक्रम, आचार-विचार यांचें, आमच्या पूर्वेतिहासांतील आमच्या प्रीतीच्या राजशाही आणि सरंजामशाही युगांतील त्या त्या गोष्टींशीं विलक्षण साम्य समाजांतील लेखकांना आढळून आलें, तेव्हां त्यांनीं त्या त्या देशांतील त्या काळाला अनरूप अशा कथाग्रंथांचीं रूपांतरें केलीं. हा अनुकरणाचा काळ म्हणजेच मागें सांगितलेला सन १८३० ते १८७० चा काल होय. या कालखंडांत जुन्या कथावाङ्मयाच्या पुनरुद्धाराचा हुरूप इतका दांडगा होता कीं त्यावेळीं, भाषा, मांडणी, रचना, आणि कलात्मक आविष्कार इकडे लक्ष देण्यास लेखकांना उसंत सांपडली नाहीं. परकी वाङ्मयांतीलही नेमक्या जुन्याकडेच हे लोक वळले, नवीन कथांकडे वळले नाहींत, त्याचें मर्म या मनोवृत्तींत सांपडणें सहज शक्य आहे. १८७० पर्यंतच्या काळांत शेले, कीट्स, बायरन्, रेनॉल्डस्, थॅकरे, डिकन्स, फीलिंडग, रिचर्डसन् यांच्या पद्यमय किंवा गद्यमय कथांची नुसती ओझरती ओळखहि करून घेण्याचा समाजानें विचार केला नाहीं. त्याचें कारण दुसरें काय असणार ?

पण रानडे आणि चिपळूणकर यांनीं जी नवी जागृति केली त्यामुळें विद्यालय, ग्रंथालय आणि मुद्रणालय यांचा सांगोपांग उपयोग करून त्यांच्या द्वारां सर्व समाजांत नवीन गोष्टींचा प्रचार करण्याची कल्पना वाढीस लागली. ज्याला जें माध्यम सांपडेल आणि परवडेल तें त्यानें नवीन युगाची ग्वाही देण्याकरितां वापरावें असा संकेत निर्माण झाला; तो सामान्यतः १८७० नंतरच होय. भाषणें, शाळा, सभा, वर्तमान-पत्रें, कादंबऱ्या, नाटकें इत्यादि साऱ्या गोष्टी यावेळीं माध्यम म्हणून वापरावयाच्या होत्या. माध्यमाचें स्वरूप शोभिवंत करीत बसण्यापेक्षां प्रचाराच्या कार्याला तें माध्यम अधिकाधिक उपयोगीं कसें पडेल इकडेच त्या त्या शाखेंतील लेखकांचीं मनें गुंतून गेलीं होतीं. हरिभाऊ आपटे यांनीं निर्माण केलेली स्फुट गोष्ट याच कल्पनेनें निर्माण झाली आहे. विनोदात्मक, विचारात्मक, वर्णनात्मक, विवेचनात्मक, आणि रूपकात्मक हे कथा-कथनाचे सारे प्रकार हरिभाऊंनीं वापरले ते प्रचार, नीतिबोध, आणि जीर्णमतखंडन यांच्या आविष्कारासाठीं वापरले. ‘ डिस्पेप्सिया, ’ ‘ पुरी हौस फिटली, ’ ‘ पक्की अद्दल घडली, ’ ‘ खाशी तोड, ’ ‘गरीब बिचारी पार्वती-बाई, ’ ‘ दोन चित्रें, ’ ‘ गोदावरीनें काय केलें ? ‘होतें तें असेंच, ’ ‘उपकारांची उत्तम फेड,’ ‘ हरवलेली किल्ली, ’ ‘ दुर्गाताईची ओवाळणी, ’ ‘ तीन फुलें , ’ ‘ गरीबीचा, संसार ’ व पहिलेंच भांडण ’ या त्यांनींच प्रकाशित केलेल्या स्फुट गोष्टींच्या चार भागांतील कथाप्रचारकाची भूमिका हरिभाऊंनीं आत्मसात करून कथा-लेखनाचा व्यवसाय कसा अव्याहत केला याच्या निदर्शक आहेत. आगरकरांनीं प्रतिपादन केलेली समान हक्कांची सामाजिक सुधारणा हरिभाऊंनीं आपल्या वाङ्मयांत अनेक प्रसंगांच्या साहाय्यानें विणून दाखविली. स्फुट गोष्टींनींही हेंच कार्य केलें. समाजाच्या जुन्या संसारांतील सामाजिक जीवन अजीबात मोडून गेलें आहे, तें नव्यानें घडविलें पाहिजे आणि तें ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या अनुकरणानें आणि आपल्या जीवनाच्या अंगोपांगांत लोकशाहीचें तत्त्व खेळवून घडविलें पाहिजे हें जनमनावर बिंबविण्यासाठीं हरिभाऊंचें वाङ्मय जन्म पावलें.

कुटुंबव्यवस्था, धर्माचार, रीतिरिवाज, मुलांचें संगोपन व शिक्षण, लग्न ठरविण्याची पद्धति इत्यादि अनेक कौटुंबिक व सामाजिक बाबींत एका माणसाचें म्हणणें ग्राह्य धरण्यापेक्षां अनेकांच्या मतांचा आदर करावा हें लोकशाही तत्त्व अंमलांत आणावें ही सामाजिक जीवनांत त्यावेळीं जी मागणी उत्पन्न झाली, व्यक्तिस्वातंत्र्याचा त्यांतून जो पुरस्कार होण्याचा समय

आला होता, त्या साऱ्याचें प्रतिबिंब हरिभाऊंच्या वाङ्मयांत पडलें आहे. रस्त्यांतून भरधांव जाणाऱ्या एकाद्या वाहनाचा वाटसरूला धक्का लागला तर त्या अपघाताकडे लोक दोन दृष्टींनीं पाहूं शकतात. ज्याला धक्का लागला त्या माणसाला सांवरून धरून त्याच्या जखमांवर तावडतोब उपचार करण्याची तत्परता दाखविण्यावर कांहींचा भर असतो, तर कांहींना ज्यानें भरधांव वाहन चालवून धक्का दिला, त्याचा पाठलाग करून त्याला अद्दल घडेल अशा प्रकारचें शासन करावें अशी जबरदस्त इच्छा होते. अशा दोन मनोवृत्तींचे लोक समाजांत नेहमींच असतात. ब्रिटिशांनीं आमच्या समाजव्यवस्थेला धक्का दिला म्हणून त्यांचें शासन करण्याकरितां वाङ्मयद्वारां त्यांचा उपहास आणि निषेध करण्याची कांहीं लोक मनीषा बाळगतात; उलट धक्का लगून कोलमडलेली समाजव्यवस्था पुन्हां सुखरूप व्हावी म्हणून कांहीं लेखकांचे प्रयत्न सुरू होतात. हरिभाऊ आपटे आणि शिवरामपंत परांचपे यांच्या कथालेखनामध्यें हा फरक आहे. हरिभाऊंनीं स्फुट गोष्टींचा संप्रदाय सुरू केल्यावर गोष्ट लिहिण्याच्या शैलीमुळें त्यांच्या गोत्रांत मोडतील असे अनेक लेखक त्यांच्या समकालीनांत आणि पुढल्या पिढींत निर्माण झाले. हरिभाऊंच्या 'करमणूक' (१८८९) साप्ताहिकानंतर सात आठ वर्षांनीं मासिक मनोरंजनाची श्री. का. र. मित्र यांनीं मुहूर्तमेढ रोवली. "स्त्रियांची परवशता" हें जें पहिल्या पिढीच्या सुधारकांचें लक्ष्य होतें, तेंच टिकविण्याकरितां मनोरंजनानें कामगिरी केली. 'यत्र नार्यस्तु पुज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।' हें मनोरंजनाचें ब्रीदवाक्य होतें. सहकारी कृष्ण यांची 'कुटुंब शिक्षण माला'ही याच नमुन्याची होती. वि. सी. गुर्जर, वा. गो. आपटे, ह. वा. अत्रे, द. मा. कुलकर्णी, ना. कृ. आगाशे इत्यादि लेखकांनीं मासिक मनोरंजनांतून बंगाली कथांचीं रूपांतरें लिहून सामाजिक सुधारणेचीच प्रेरणा केली. कृ. के. गोखले यांनींही इंग्रजींतील कथांचीं भाषांतरें करून हरिभाऊंशीं असलेली आपली खासगी मैत्री वाङ्मयांतही अबाधित राखली. शि. म. परांजपे, श्री. कृ. कोल्हटकर, न. चिं. केळकर, वा. म. जोशी यांनींही गोष्टी लिहून आपल्या अंगीकृत कार्याचा प्रचार यशस्वीपणें केला. 'आम्रवृक्ष' 'एका यात्रेकरूचा प्रवास' या शि.म.परांजपे यांच्या गोष्टी; 'संपादिका', 'गरीब बिचारें पाडस' या श्री.कृ. कोल्हटकरांच्या गोष्टी, 'कपड्यांची अदलाबदल,' 'माझी आगगाडी कशी चुकली,' या न. चिं. केळकरांच्या गोष्टी व 'पुरी हौस फिटली' अशासारख्या वा. म. जोशी यांच्या गोष्टी प्रचाराकरितां आणि स्वमतप्रतिपादनाच्या अभिनिवेशानें जन्माला आल्या. त्याचप्रमाणें कित्येक लेखक शरीरानें पुढल्या काळांत वावरले तरी त्यांच्या मनोवृत्तीचा पिंड हरिभाऊंच्या वातावरणानेंच घडविलेला आहे. भा. वि. वरेरकर, ना. ह. आपटे, वा. ना. देशपांडे, सरस्वतीकुमार, प्र. श्री. कोल्हटकर, का. के.जोशी, काशीबाई कानिटकर, गिरिजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के, शारदाश्रमवासी, पिरोज आनंदकर इत्यादि अनेक लेखक मनोरंजन, नवयुग, उद्यान, अरविंद, महाराष्ट्रसाहित्य, गृहलक्ष्मी या मासिकांनीं प्रवर्तित केलेल्या लेखनशैलीचे आणि लेखनविषयांचे अभिमानी प्रचारक आहेत. त्यांतल्या त्यांत श्री. वरेरकर यांच्याबद्दल मात्र असें म्हणतां येईल कीं, चालू काळांत जी नवीन आणि ताजी म्हणून चळवळ गाजत असेल तिच्यावर कथारचना करण्याकरितां तत्परतेनें धांवून जाणारे ते एक प्रचारक आहेत. पोहण्याची अनावर हौस असणारा मनुष्य आसपासच्या टापूंतील एकही डोह त्यांत पोहोण्यासाठीं उतरल्याशिवाय सोडीत नाहीं; तसें वरेरकरांचें आहे. म्हणून वरेरकर आणि कॅ. लिमये यांच्या कथांतून कांहीं नवीन चळवळींना आणि विषयांना हात घातल्याचा भास होतो. पण हात टाकण्याची सफाई मात्र एकाच धर्तीची आहे.

असहकारिता उलटून जाईपर्यंत म्हणजे १९२१ सालापर्यंत स्फुट गोष्टींचा हा जमाना प्रायः चालू होता. त्यापुढच्या काळांत त्यांत प्रचारापेक्षां भावनांचा खेळ रंगवून दाखविण्याकडे मनाचा कल झुकूं लागला. गडकऱ्यांनीं गोष्टी लिहिल्या नाहींत तरी भावनांचें अतिरंजन करण्याचा त्यांचा नाटकांतील प्रकार मराठी स्फुट गोष्टींवर त्यावेळीं परिणाम करण्यास कारण झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्याच सुमारास महायुद्धानंतरची परिस्थिति निर्माण झाली होती. विलायती वाङ्मय बदलत्या समाजरचनेचा आविष्कार करूं लागलें होतें. पण यशस्वी झालेल्या राष्ट्रांच्या वाङ्मयांत युद्ध जिंकल्याचा कैफ डोकावत होता. त्यांतून विलासप्रियता निर्माण होत होती. इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स या देशांतील या सुमाराचें कथावाङ्मय या विलासप्रियतेनें घडविलेलें आहे. त्याबरोबरच फ्रॉईडनें प्रवर्तित केलेली अंतर्मनाची जाणीव कथावाङ्मयांतून आविष्कृत करण्याकडे प्रवृत्ति होऊं लागली. अंतर्मनांतील दाबून किंवा दडपून

ठेवलेले विकार व्यक्त केले पाहिजेत ही नवी अट या विलायती वाङ्मयानें पाळण्यास आरंभ केला. याचा परिणाम मराठी गोष्टींवरहि झाला. दिवाकर कृष्ण, प्रो. फडके, एक विद्यार्थी इत्यादि लेखकांनीं मराठी लघु-कथेच्या प्रवाहांत हे अंतर्मनाचे नवीन तरंग आणून सोडण्याचा प्रयत्न केला. शृंगार, विलास, प्रणय, आसक्ति इ. मनोभावनांसंबंधांत गुप्तपणा न राखतां त्या उघड करून दाखवाव्यात हा मनु सुरू झाला. विलायती वाङ्मयांतही या सुमारास प्रणयकथा वाढीस लागल्या. महायुद्धाच्या धुमश्चक्रीनें आंबून गेलेली प्रजा मन रमविण्यासाठीं शृंगार आणि विलास यांचा आश्रय करूं लागली. तरुण मनाला या गोष्टींचें आकर्षण स्वभावतःच वाटतें. त्यांत युद्धजन्य अनुकूल परिस्थिति लाभल्यामुळें फ्रान्ससारख्या देशांतून या सुमाराचें कथावाङ्मय केवळ शृंगाररसानें न्हाऊन निघालें असल्यास आश्चर्य नाहीं. म्हणजे आमच्या इकडे सुमारें १९२८पर्यंत समाजांत राज्यकर्त्यांच्या वाङ्मयाच्या आनुषंगानेंच आमच्या वाङ्मयाची वाढ होत होती. हरिभाऊंच्या काळांत औदार्य, भूतदया आणि समान हक्क यांची घोषणा झाली ती एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर स्वामित्व गाजविण्याच्या कामीं वापरलीं गेली. सेवकवर्गानें सवलती (Concessions) उपभोगाव्यात, सवलती उपभोगण्यासंबंधांत जी समानता सेवकवर्गाला मिळणार ती सेवकवर्गानें दाखविलेल्या सहानुभूतीमुळें मिळणार अशी त्या वातावरणाची परंपरा होती. १९२१ ते १९२८ या काळांत उत्पन्न झालेली वाङ्मयाची प्रवृत्ति विलासप्रियतेला आणि तो कालपर्यंत ज्या भावना सुप्त आणि गुप्त राखण्याचा संकेत होता त्या भावनांच्या आविष्काराला साहाय्यक ठरली. पण सेवकवर्गाच्या दुःखाला पूर्वसंचित कारण आहे आणि तें पूर्वसंचित दैवावर अवलंबून आहे, या विचारसरणीची पकड दिवाकर कृष्ण व त्यांचे समकालीन लेखक यांच्यावर कायमच होती. हें पूर्वसंचित दैवाधीन नाहीं, उत्पादनाचीं जीवनोपयोगीं साधनें आपल्या अंकित ठेवणाऱ्या आणि समाजांतील पैशाच्या देवाणघेवाणीच्या व्यवहारांवर नियंत्रण गाजविणाऱ्या एका विशिष्टवर्गाच्या एका विशिष्ट चालचर्येतून निर्माण होतें ही विचारसरणी आमच्याकडे येऊं घातली होती. इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका या देशांतून ही विचारसरणी आमच्याकडे येणें सर्वथा अशक्य होतें. युद्धाची धुमश्चक्री डोळसपणानें पाहून दुसऱ्या एका राष्ट्रानें म्हणजे रशियानें आपल्या देशांत राज्यघटना व समाजरचना साफ बदलून टाकण्याचे प्रयत्न केले. देशांतील यच्चयावत लोकांना अन्न आणि वस्त्रप्रावरण देण्याकरितां राबणारा जो शेतकरी-कामकरीवर्ग त्यांची सत्ता रशियांत स्थापन झाली. म्हणजे आमच्या समाजांतील जो सर्वांत गरीबवर्ग त्याचा एका नव्या दृष्टीनें कैवार घेण्याची शक्यता उत्पन्न झाली. त्याचप्रमाणें या वर्गासारखाच दरिद्री पण बुद्धीचे श्रम करणारा जो शिक्षितांचा मध्यम वर्ग त्यालाही आपली सामाजिक नीति नवीन घडामोडींत वेगळया तऱ्हेनें आखली पाहिजे याची जाणीव झाली. या कल्पनेचा परिणाम ज्यांच्यावर विशेष प्रमाणांत अगदीं अपरिहार्यतेनें झाला असे लेखक पुढें आले. धांवपळीचा आयुष्यक्रम वेगानें वाढत होता, म्हणून वाचावयाचें वाङ्मय देहानें संकोच पावत होतें पण त्याची परिणामकारकता अधिकाधिक वाढविण्याचे श्रमही लेखक घेत होते.

प्रो. फडके, खांडेकर, माडखोलकर, क्षमाबाई राव, कमलाबाई टिळक, मांजरेकर, वि. बा. आंबेकर, ग. भ. निरंतर, वि. पां. दांडेकर, एक विद्यार्थी, य. गो. जोशी, कृष्णाबाई, विभावरी शिरूरकर, कु. रघुवीर, नाडकर्णी, पु. ग. सहस्रबुद्धे, कुसुमावती देशपांडे, य. ना. शास्त्री, श्री. बोबडे, ग. रा. बाळ, वि. द. घाटे, वि. वि. बोकील, के. ना. काळे, चिं. वि. जोशी, वि. मा. दी. पटवर्धन, अनंत काणेकर, रॉय किणीकर, दौंडकर, सुखटणकर, कृष्णाबाई खरे, प्रि. अत्रे, कवठेकर, देवभक्त, प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई, इत्यादि अनेक कथालेखक गेल्या दहाबारा वर्षांत पुढें आले. वाङ्मयांत प्रवेश करतांना या लेखकांची मनोवृत्ति देशी किंवा विदेशी अशा कोणीतरी मोठ्या लेखकाचा आपल्यावर कमीजास्त परिणाम करून घेऊन लेखनव्यवसाय करण्याची होती, हें नाकबूल करून चालणार नाहीं. पण थोडक्या काळाच्या अवधींत त्यांनीं आपापलें वैशिष्ट्य स्थापन केलें. विशेषतः प्रो. फडके, खांडेकर, विभावरी शिरूरकर आणि य. गो. जोशी यांनीं लघुकथेचे विषय, तंत्र, मांडणी, संवाद, त्यांतून व्यक्त करावयाच्या स्थूलसूक्ष्म भावनांचा, विकारांचा, विचारांचा आविष्कार आणि चालू समाजजीवनांतील लहानमोठे तरंग त्यांत भरून ठेवण्याची आवश्यकता या सर्व गोष्टींसंबंधांत झपाट्यानें क्रांति घडवून आणली आहे. प्रो. फडके यांच्या गोष्टींचे दोन खंड, श्री. य. गो. जोशी यांच्या पुनर्भेटीचे पांच भाग आणि श्री. खांडेकर यांचें 'नवमल्लिका'


'दत्तक व इतर गोष्टी', 'जीवनकला', 'ऊनपाऊस', 'दंवबिंदु', 'विद्युत्प्रकाश' 'नवचंद्रिका', 'पूजन', 'अबोली', 'फुलें आणि दगड' 'पाकळ्या', 'समाधीवरील फुलें,' 'नवा प्रातःकाल,' 'पहिली लाट,' हे आजपर्यंत प्रकाशित झालेले चौदा कथासंग्रह या म्हणण्याची साक्ष देतील. वर उल्लेखिलेल्या इतरही लेखकांनीं आपापले कथासंग्रह प्रकाशित केलेले आहेत. प्रो. फडके यांची तंत्रप्रियता आणि चटकदारपणा, श्री. य. गो. जोशी यांचा जिव्हाळा आणि घरगुतीपणा या गुणांनीं लघुकथेला विशिष्ट आकार लाभला. पण सर्वांत विशेष प्रामुख्यानें निर्देश करावयाचा तो श्री. खांडेकरांचा ! कारण गुणांइतकेंच संख्येनेंही समृद्ध लघुकथालेखन करणारा दुसरा मराठी लेखक आज तरी त्यांची बरोबरी करूं शकणार नाहीं असा विश्वास वाटतो. लघुकथा प्रसविण्यासंबंधांतील श्री. खांडेकरांचा वेग जितका आश्चर्यकारक आहे, तितकाच त्यांचा इतर गुणसमुच्चयही कौतुकास्पद आहे. आरंभीं त्यांची भाषा व संवाद हे कृत्रिम असत हें जरी खरें तरी आजकालच्या त्यांच्या कथासंग्रहांतून हा कृत्रिमपणा फार मोठ्या प्रमाणांत नाहींसा झाला आहे. गरिबांचा कैवार घ्यावयाचा, गरिबीचें गाऱ्हाणें वेशीवर टांगावयाचें, दलितांच्या हक्कांचा आवेशपूर्ण उच्चार करावयाचा, समाजाच्या दाबून दडपून ठेवलेल्या हजारो भावनांना तोंड फोडावयाचें,आर्थिक विषमतेमुळें आणि वर्णविग्रहामुळें निर्माण होणाऱ्या दुःखांचा, संकटांचा आणि आपत्तींचा हृदयद्रावक देखावा वर्णन करून सांगावयाचा, समाजांत ठायींठायीं पेंगून पडलेली कर्तबगारी प्रतिकूल परिस्थितीच्या माऱ्यानें कशी हतप्रभ झाली आहे हें लोकांना अट्टाहासानें ऐकावयाला लावावयाचें, चालू समाजरचनेंतील विशोभित चालचर्येवर प्रहार करावयाचा, आणि परिस्थितीनें भांबावलेल्या समाजाला एक नवीन वाट दाखविण्याचा प्रयत्न करण्याची धडपड करावयाची हे खांडेकरांच्या लघुकथावाङ्मयाचे आत्मीय विशेष होत. पण आपल्या प्रभावित्वानें त्यांनीं लघुकथेला इतकी अंकित केली आहे कीं, दुसऱ्या कोणत्याही लेखकानें लिहिलेल्या लघुकथेबद्दलच्या अपेक्षा वाचकांनीं खांडेकरांच्या मापानें निर्माण केल्या आहेत. खांडेकरांचें वैशिष्ट्य यांत आहे. त्यांनीं आपल्या स्वतांच्या लघुकथेकरितां निर्माण केलेलें मोजमाप, साऱ्या मराठी लघुकथेचें मोजमाप ठरावें यांत त्यांच्या लघुकथालेखनाचा गौरव आहे. प्रचलित सामाजिक प्रश्न, मनोविश्लेषणात्मक घडामोडी आणि शेंकडो लोकांच्या तीव्र आणि आर्त मनोगताचा उद्गार ही खांडेकरांच्या लघुकथालेखनाची प्रस्थानत्रयी आहे; आणि अद्यापही त्यांचा हुरूप वाढता आहे.

"Everything she wrote, except perhaps a few juvenile pieces, shines with the light of her own peculiar vision. It has the best qualities of realism, being subtle, suggestive and instantly convincing; and it has, no less, that strangeness, and that beauty, whose union in Pater's definition, is the very essence of romance. The world of her stories is a world of sharpened outlines and enhanced colours, a world unnaturally bright and clear. The incessant sparkle of her impressions induces in the responsive reader an excitement that is almost intoxication, life becomes suddenly an intense and brilliant experience of which the most fugitive appearances, the most minute of psychological trivia are delightful and significant. It was as if, as may in a sense be true, Katherine Mansfield looked always on the world with the heightened sensibility, the eager appetite for sights and sounds, of one who is shortly to leave it all."

हें कॅथराईन मॅन्स्फील्ड हिच्या लघुकथालेखनसंबंधानें जिराल्ड् ब्यूलेट यानें काढलेले उद्गार खांडेकरांनीं आजवर विकसित केलेल्या मराठी लघुकथेला लागू करतां येतील. खांडेकरांच्या धर्तीवर लघुकथालेखन करण्याचा आज सांप्रदाय पडतो आहे, तरीही तंत्र, विषय आणि परिणाम या तिन्ही दृष्टींनीं मराठी लघुकथा भट्टींत रसरसणाऱ्या सोन्याच्या गोळ्यासारखी आहे. तिचा आकार व हेतू हीं अद्याप ठरावयाचीं आहेत. १९२६ सालीं 'रत्नाकर' व १९२८ सालीं 'यशवंत' हीं दोन मासिकें हें नवीन युगान्तर घडविण्याकरितां जन्माला आलीं. तेव्हांपासून किर्लोस्कर खबरही हलके हलके बदलून 'अभिसार'-सारखी वादग्रस्त कथा प्रसिद्ध करणारे पुरोगामी 'किर्लोस्कर' मासिक म्हणून तिचें परिवर्तन झालें. त्यानंतर स्फूर्ति, नवजीवन, सुवर्ण, मनोहर, स्त्री, गृहलक्ष्मी, उषा, नयन, झारापकर, ध्रुव, पारिजात, ज्योत्स्ना, संध्या, सत्यकथा, अशीं कितीतरी मासिकें एकामागून एक निघालीं. त्यांतून लघुकथालेखनालाच विशेष प्राधान्य मिळालें असून शेंकड्यांनीं मोजतां येण्याइतक्या कथा त्यांतून आजवर प्रकाशित झाल्या आहेत. यांतील

पुष्कळशा नवीन लेखकांवर फडके, खांडेकर इत्यादि आज अग्रेसर ठरलेल्या कथालेखकांच्या लेखनशैलीची, मांडणीची आणि संवादरचनेची विशेष छाप आहे. सोन्याचा गोळा भट्टींत रसरसतो आहे. तो तावून-सुलाखून बावनकशी ठरणार आणि त्याच्या ठिकाणीं आकार आणि अस्तित्वहेतु हीं निर्माण होणार, अशी फार मोठी आशा निर्माण झाली आहे.

लढाऊ जहाजें:—लढाई करण्यासाठीं ज्या जहाजांचा उपयोग होतो त्यांस लढाऊ जहाजें म्हणतात. जोंपर्यंत कडे होऊं लागला व पूर्वीचीं शिडें जाऊन त्या ठिकाणीं वाफेवर चालणारीं यंत्रें किंवा अंतर्ज्वलन इंजिनें किंवा वीज उत्पन्न करून त्याकरवीं जहाजांना गति मिळविण्याचा उपक्रम सुरू झाला. यामुळें जहाजांचा वेग वाढला व प्रतिकारशक्तीहि वाढली. तरी पण त्याचबरोबर तोफांचे गोळे, पाणसुरुंग व टॉरपेडो यांच्या शोधांमुळें जहाजांना आलेला भक्कमपणाहि कमकुवतच झालेला आहे. आज जहाजांवर फिरते बुरूज व त्यांवर तोफा ठेवण्याची सोय झाल्यामुळें अगदीं कमी वेळांत सर्व दिशांना तोफा डागतां येणें शक्य झालें आहे.




मोटर टॉर्पेडो बोट.

तोफांचा शोध लागलेला नव्हता तोंपर्यंत कोणत्याही प्रकारचीं जहाजें लढाईसाठीं थोडा फार फरक करून उपयोगांत आणतां येत असत. तोफा जहाजावर बसविल्यानंतर तोफ उडल्याबरोबर जो एक धक्का बसतो त्या प्रकारचे धक्के सहन करण्याची ताकद असलेलीं जहाजें म्हणजे भक्कम बांधणीचीं तयार होऊं लागलीं. तरी पण जहाजाला गती येण्यासाठीं शिडांचा उपयोग होत असल्यामुळें व लढाईच्या वेळीं जहाजाची कोणती तरी एक बाजूच तोफांच्या माऱ्यासाठीं उपयोगांत येत असे.


यांत सुधारणा होऊन आतां लाकडाच्याऐवजीं बीड, पोलाद वगैरे धातूंचा उपयोग जहाजें बांधण्या-

ड्रेडनॉट, डिस्ट्रॉयर, क्रूझर व एअरक्रॅफ्ट कॅरियर (विमान वाहून नेणारीं जहाजें) व पाणबुडी हे लढाऊ जहाजांचे मुख्य प्रकार आहेत.


ड्रेडनॉट या लढाऊ जहाजाचा उपयोग मुख्यतः टॉरपेडो टाकणाऱ्या बोटींच्या विरुद्ध हल्ला करण्यासाठीं व मोठ्या प्रमाणावर तोफांचा भडिमार करण्यासाठीं होतो. डिस्ट्रॉयरपेक्षां क्रूझर आकारानें लहान असतें. क्रूझरवर तोफा असतात, तसेंच टॉरपेडो टाकण्याचीहि सोय केलेली असते. जहाजावरील तोफा ८ इंच ते १६ इंच व्यासाच्या असतात. एका १५ इंची तोफेंतून २००० पौंड वजनाचा तोफेचा गोळा फेकतां येतो. जहाजाची बाहेरची बाजू कठीण व टणक




H. M. S.
ड्रेडनॉट



H. M. S. सबमरीन (पाणबुडी) ' ओटावे '



H. M. S. Tartar डिस्ट्रॉयर.



पाणबुडीची अंतर्रचना

१ टॉरपेडो सोडण्याचें मागचें गवाक्ष २ सुकाणू ३ जुळे पंखे (Twin screw) ४ पाणबुडीचा मागचा भाग वर करणारा पंखा (Stern Hydroplane) ५ तेलटाक्या ६६॥ टन वजनाचा पाणबुडीचा सुटा कणा (False-keel) ७ समुद्रावर बोट आली म्हणजे ती चालविण्याकरितां लागणारी डिझेल इंजिन्स ८ हवा दाबून (Compress) भरण्याच्या टाक्या (Cylinders) ९ पाण्याच्या टाक्या १० पेरिस्कोपचा नळ (Periscope-well) ११ पाण्याच्या मुख्य टाक्या (Ballast tanks) १२ पुढच्या हवा दाबून भरण्याच्या टाक्या–यांतील हवा खालच्या पाण्याच्या टाक्यांत सोडून हवेच्या दाबानें त्यांतील पाणी बाहेर काढतां येतें १३ 'हानिपूरक' (Compensating) पाण्याच्या टाक्या १४ पुढचा पंखा (Starboard Hydroplane) हा खाली वळवला असल्यामुळें पाणबुडीचें पुढचें टोंक (Nose) खालीं दाबलें जातें १५ टॉरपेडो सोडण्याचें पुढचें गवाक्ष (Front torpedo door) १६ नांगर १७ पुढील व मागील पंखे (Hydroplanes) नियंत्रित करणारी माणसे १८ सुकाणू नियंत्रित करणारा मनुष्य १९ पेरिस्कोपमधून पाहून सुकाणू व पंखे नियंत्रित करणाऱ्या माणसांना हुकूम देणारा मुख्य ऑफिसर (Commander) २० समुद्रांत बोट बुडली असतांना तिला गती देणाऱ्या इलेक्ट्रिक मोटर्स २१–२२ बोटींचे पाणबंद दरवाजे २३ बोटीच्या आंत ओढून लपवितां येणारा छोटा पेरिस्कोप २४ पहिला पेरिस्कोप. सुटा कणा (५) तळाला बोट गेली तर खडकावर आपटून इजा पोचूं नये म्हणून या कण्याचा उपयोग होतो. तसेंच हवेच्या टाक्यांचें काम चालेनासे झालें व वजन कमी करतां न आले तर हा कणा सोडून पाणबुडीचे वजन कमी करतात.

अशा धातूची व कमींतकमी १२–१३ इंच जाड असते. ड्रेड नॉट या जहाजांच्या प्रकारांतील 'किंग जॉर्ज दि फिफ्थ' या ड्रेडनॉटचें वजन ३५००० टन एवढें होतें व वेग साधारणतः ३५ मैल होता. [३० नॉटस् (knots). १ नॉट = ६०८०·२७ फूट]. एका मोठ्या लढाऊ जहाजावर ४० पर्यंत लहानमोठ्या



जर्मन यू बोट (पाणबुडी)

आकाराच्या तोफा ठेवतां येतात. एक लढाऊ जहाज बांधायला साधारणतः (वर वर्णन केलेल्या ड्रेडनॉट-प्रमाणें) एक कोट रुपये खर्च येतो व तें व्यवस्थित चालू ठेवण्यासाठीं दरवर्षी ३०–४० लाख रुपये खर्च येतो जहाजाची लांबी जवळजवळ ८०० फूट असते. त्यावरील कामगारवर्ग १५० ते २०० पर्यंत असतो. क्रूझरचा वेग ड्रेडनॉटपेक्षां जास्त असतो. तें वजनानें कमी असतें. बहुतेक सर्व जहाजांवर विमानविरोधक तोफांना महत्त्वाचें स्थान दिलेलें असतें.

समुद्रावर शत्रूची हालचाल कळावी व पाणबुड्यांचा ठावठिकाणा लागावा म्हणून विमानांची फार आवश्यकता असते. यासाठीं विशेषतः गेल्या महायुद्धानंतर विमानवाहक जहाजें बांधण्यांत आलीं या जहाजांची लांबी इतरांपेक्षां थोडी अधिक असते व विमानविरोधक तोफा यावर विशेष प्रमाणांत बसविलेल्या असतात. यांचा प्रत्यक्ष लढण्यांत जरी कमी उपयोग होत असला तरी त्यावरील विमानांचें सहाय्य फार महत्वाचें असतें.

पाणबुड्यांचा शोध हा सर्व तऱ्हेच्या लढाऊ जहाजांना फार घातक ठरला आहे. तरी पण पाणबुडीविरोधक युद्धसाहित्यांत भर पडली असल्यामुळें लढाऊ जहाजांबरोबर पाणबुडीला हटकून यश मिळतेंच असें नाहीं. पण व्यापारी व मनुष्यवाहक जहाजांना पाणबुडीला तेव्हांच बुडवितां येतें. पाणबुडी फार वेळ पाण्यांत राहूं शकत नाहीं. कारण त्यामुळें तींतील बॅटरी लौकर संपते. तसेंच हवेच्या पुरवठ्याचा प्रश्न असतोच. पाणबुड्यांचें मुख्य काम टॉरपडो मारून जहाजें बुडविणें. पाणबुडी पाण्यांतून जात असल्यामुळें पाण्याच्या वजनाचा भार पडून ती दबूं नये म्हणून तिची बांधणी फार भक्कम करावी लागते. बंद लोखंडी पिपांत हवा दाबून भरून घेतात. व पाण्यांतून पाणी आत घेऊन बोटीचें वजन वाढवितां येतें व बोट पाण्यांत जाऊं लागते. जसजसें पाणी भरून घ्यावें तसतसें बोटीचे वजन वाढून पाणबुडी खाली जाते. जेव्हां पाणबुडीला वर यावयाचें असतें त्यावेळीं हवेचीं पिपें किंवा टाक्यांतील हवेच्या दाबानें पाण्याच्या टाक्यांतील पाणी बाहेर काढण्यांत येतें व वजन कमी झाल्यामुळें पाणबुडी वर येतें. पाणबुडी अंतर्ज्वलन एंजिनच्या सहाय्यानें व विजेच्या सहाय्यानें चालते. पाणबुडींत ऑक्सिजनच्या कृत्रिम पुरवठाहि केलेला असतो. पेरिस्कोपच्या सहाय्यानें कोठें जहाज दिसतें कां तें पाहून त्या दिशेनें पाणबुडी वळते व जहाजाशेजारीं (२–३ फर्लांग) अंतरावर येऊन एकदम वर येऊन किंवा अर्धवट वर येऊन टॉरपेडो टाकून परत पाण्याखालीं जातां येतें. पाणबुडीविरुद्ध Depth charges चा उपयोग म्हणजे तिच्या भोंवतीं लहान लहान स्फोटक गोळे टाकून व त्यांपैकीं एखादा तिच्या पोलादी अंगावर आपटून स्फोट होऊन तो चीर किंवा भोंक पाडतो व अशा रीतीनें पाणबुडीला कायमची बुडी देऊन किंवा वर येऊन शरण येण्यास भाग पाडतां येतें.

लवंग:—मसाल्याचा उष्ण पदार्थ. या पदार्थाचा परिचय रामायणकालापासूनचा आहे. चिनी व आरबी लोक लवंगेचा व्यापार पूर्वी हिंदुस्थानाशीं करीत असत. १६०३ मध्यें ईस्ट इंडिया कंपनी या वस्तूचा व्यापार करीत असे.

लवंग हें लवंगेच्या झाडाचें न उमललेलें पण वाळलेलें फूल होय. लवंगेच्या कळ्या वाळल्या म्हणजे त्यांतील पुष्पकोशाचा गोळा होतो व तो पुष्पाच्या आवरणाच्या चौदंतांत राहतो. प्रथमतः कळ्या

हिरव्या असून नंतर त्या पिवळ्या होतात. शेवटीं त्यांना चकचकीत तांबडा किंवा पिंगट रंग येतो. झाडावर या कळ्या फार दिवस राहिल्यास त्या उमलतात व त्यांच्या देठाला बोराप्रमाणें स्वरूप येतें. बोरासारख्या गांठींत एक किंवा दोन बिया असतात. या बिया ताज्या असतांना १२ इंच अंतरावर लावल्या तर त्यांचीं झाडें तयार होतात. वाळलेल्या बियांचीं झाडें येत नाहींत. पांच एक आठवड्यांत बियांचीं रोपें बनतात. हीं रोपें चार फूट उंच वाढल्यावर तीं उपटून २०।२० किंवा ३०।३० फूट अंतरावर लावावीं. लवंगेच्या झाडाला निचरा होणारी भुसभुशीत जमीन लागते. दलदल असलेली किंवा केवळ चिकण अथवा वाळू असलेल्या ठिकाणीं लवंगेचीं झाडें मुळींच येत नाहींत. माती व वाळू यांच्या संयोगानें बनलेल्या जमीनींत लवंगेचीं झाडें चांगलीं वाढतात. पावसाळ्याच्या सुरवातीला या झाडांचीं लागण करतात. पहिल्या दोन तीन वर्षांत त्यांवर सावली करावी लागते. नंतर तिची जरुरी नसते. सोसाट्याच्या वाऱ्यापासून रक्षण करावें. या झाडांना ६ व्या वर्षी बहर येतो. बाराव्या वर्षी झाडांपासून पीक काढतां येऊं लागतें. जरी हें झाड १५० वर्षे फळें देत असलें तरी २०–२५ वर्षेंच त्याचें खरें पीक लाभतें. पुढें पुढें फळें कमी कमी निघूं लागतात. लवंगा हातानें अगर झोडपूनहि काढतां येतात. प्रत्येक झाडापासून ६–७ पौंड लवंग मिळते. झाडावरून काढल्याबरोबर लवंगांना काळसर तपकिरी रंग येईपर्यंत धूर द्यावा लागतो. नंतर त्या उन्हांत वाळवाव्या लागतात. वाळल्यावर मूळ वजनांत शे. ६० प्रमाणांत घट होते. लवंगेचें तेलदेखील काढतात. या तेलाचा उपयोग अत्तरें काढण्याकडेहि करतात. लवंग ही पित्तशामक आहे. मसाल्यांत या पदार्थाचा फार मोठा उपयोग होतो. जावासुमात्रांत यांची लागवड मोठ्या प्रमाणांत होते.

लष्करी कायदा:–मार्शल लॉ म्हणजे लष्करी कायदा. मामूली कायद्याप्रमाणें चाललेली राज्यपद्धति बंद ठेवून (Suspension of normal civil law) त्याऐवजीं लष्करी सत्ता प्रस्थापित केली असतां लष्करी कायदा जारी केला असें म्हणतात. युद्ध व बंड यांसारखे प्रसंग उद्भवले असतां कित्येक वेळां अशा प्रकारचे कडक उपाय योजणें इष्ट असतें.

मार्शल लॉ (लष्करी कायदा) या शब्दाचा अर्थ नेहमींच्या अर्थानें कायदा असा होत नाहीं. विशिष्ट स्थल (District) लष्करी अधिकाऱ्याच्या स्वाधीन करून त्या ठिकाणच्या राजनिष्ठ प्रजाजनांच्या व सरकारच्या संरक्षणाची जबाबदारी त्याजवर टाकण्यांत येते. या लष्करी अधिकाऱ्यानें आपली जबाबदारी पार पाडण्याकरितां लष्करी सामर्थ्याचा उपयोग करावा व योग्य ते उपाय योजावेत. एकाद्या ठिकाणीं लष्करी कायदा पुकारण्याकरितां कार्यकारी सरकार मामुली कायदा परिस्थिती काबूंत ठेवण्यास असमर्थ आहे असें जनतेला जाहिरनामा काढून कळवितें. त्यानंतर लष्करी अधिकारी लष्करी अंमलाखालीं लागू करण्याचे जादा नियम कळवितो व वैयक्तिक व सामाजिक स्वातंत्र्यावर जरूर तें नियंत्रण ठेवून त्या नियंत्रणाची मर्यादा लोकांना कळवितो.

आणीबाणीच्या वेळीं लष्करी कायद्याचा उपयोग असा होतो कीं, सरकारचा प्रतिकार करणाऱ्या व शत्रूला मदत करणाऱ्या व्यक्तींना पकडून शिक्षा देण्याकरितां जादा उपाय योजितां येतात व युद्धकालीं जलदीनें बदलणाऱ्या लष्करी स्थितीमुळें सरकारच्या सैन्याच्या यशाला जें जें कृत्य विरोधी आहे असें दिसून येईल तें तें कृत्य गुन्ह्याच्या सदरांत घालणें सोपें होतें. लष्करी अंमलाखालीं लष्करी कोर्टाबरोबरच नेहमींचीं कोर्टें चालू ठेवतां येतात; पण कित्येक वेळां नेहमींचीं कोर्टें बंद ठेवून त्याऐवजीं लष्करी कोर्टें स्थापविण्यांत येतात. लहानसहान गुन्ह्यांची चौकशी करण्याचें काम योग्य त्या लष्करी अधिकाऱ्यावर सोंपविण्यांत येतें; पण अधिक गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याची चौकशी लष्करी कोर्ट करतें. लष्करी कोर्टाला अमर्याद सत्ता असते.

लष्करी कायदा जारी होणें म्हणजे त्या कायद्याचा अंमल असेपर्यंत व्यक्तिस्वातंत्र्य संपुष्टांत येणें. लष्करी कायद्याचा अंमल बंद झाल्यावर, त्या अमदानींत राज्यव्यवस्थेबद्दल जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांनीं आपल्या प्रामाणिक समजुतीप्रमाणें केलेल्या गोष्टींत त्यांच्या झालेल्या कायद्याच्या उल्लंघनाबद्दल त्यांना माफी देणारा कायदा पास करावा लागतो. मार्शल लॉच्या अंमलाची सिंहावलोकनात्मक चर्चा करतां येत नाहीं. ज्या विभागांत तो पुकारण्यांत आलेला असतो त्याच विभागांत त्याचा अंमल होतो. पण विशिष्ट जादा परिस्थितींत त्या विभागाबाहेर अटक केलेल्या व्यक्तीला त्या विभागांत

आणून त्याची तेथील लष्करी कोर्टाकडून चौकशी केली जाते.

लाख:—कारागीर लोकांना लागणारा काळसर—तांबडसर रंगाचा पदार्थ. हा 'लाख' नांवाच्या किड्यांपासून निर्माण होतो. या वस्तूची माहिती भारतीय लोकांना वेदकालापासून असलेली दिसते. परदेशी लोकांना मात्र हिचा परिचय अरबी व्यापाऱ्यांकडून झालेला दिसतो.

हिचा उपयोग सुतार, गाडीवान, चांभार, सोनार, तांबट, जवाहिरे, बुकबायंडर्स यांना होतो. याशिवाय तिचीं खेळणींहि बनवितात. वॉरनिसें, ग्रामोफोनच्या तबकड्या, छपाईची शाई, सीलिंग वॅक्स इत्यादिहि आणखी तिचे उपयोग आहेत.

लाखेचे प्रकार अनेक आहेत. तथापि कपरी लाख, काडी लाख, दाणे लाख, याकुती लाख, गुंडी लाख इत्यादि प्रकार प्रमुख होत. हे प्रकार तिच्या तयार करण्याच्या कृतीवरून बनले आहेत.

या पदार्थापासून लाखी रंग बनवितां येतो. तो तयार करण्यास कपरी लाख लागते. या लाखेंत रंगाची पूड टाकून रंग व कपरी एकजीव होईपर्यंत कुटावें लागतें. या लाखेच्या ५।६ इंच लांब व बोटभर जाड कांड्या करून विकतात.


लाखेची उत्पत्ति उष्ण प्रदेशांत होते. तथापि ती मध्यप्रांत, बंगाल, आसाम व ब्रह्मदेश या भागांत फार होते. या लाखेवर आपल्याकडील कांहीं शेतकरी व भिल्ल या लोकांची उपजीविका चालते.

लाटोर:—निर्दय वृत्तीचा हिंसक पक्षी. वृक्षोपवेशक वर्गांपैकीं हा होय. याला 'खाटीक' या नांवानेंहि ओळखतात. हा द. अमेरिकेशिवाय बहुतेक ठिकाणीं आढळून येतो. याची शेपटी लांब असून ती खालीं सरळ असते; आणि यामुळेंच त्यास ताठ बसतां येतें. अंगानें हा बुलबुलपेक्षां मोठा आहे. याच्या चोंचीपासून मानेच्या मागच्या बाजूपर्यंत एक रुंद काळा पट्टा गेलेला असतो. एकाद्या झाडाच्या फांदीवर बसून हा आपल्या भक्ष्याची टेहळणी करतो व तें दृष्टिपथांत आल्यावर झडप घालून पकडतो. नंतर तो आपल्या तीक्ष्ण पंजानें भक्ष्याचे तुकडे तुकडे करतो व ते खातो. जरा मोठा जीव असला तर त्यास कांटेरी झाडावर दाबून मारतो. याच्या या कठोर वृत्तीवरूनच यास खाटीक म्हणतात. बाभळीच्या किंवा कांटेरी झाडावर हा पक्षी पेल्याच्या आकाराचें आपलें घरटें बांधतो. हें घरटें कांटेरी काटक्या, गवत, चिंध्या व बारीक मुळ्या यांचें बनविलेलें असतें. याच्या घरट्यांतून चिंध्या लोंबत असतात. मादी या घरट्यांत वर जांभळे ठिपके असलेलीं पांढऱ्या रंगाचीं ३।४ अंडीं घालते. खाटीक पक्षी तीन जातींचे आहेत. एक सफेत, दुसरी पंचानक व तिसरी मातीया.

लाल गोंडा:—सप्टेंबर ते एप्रिल अखेर इकडे राहणारा परदेशी पक्षी. वृक्षोपवेशक वर्गांपैकीं हा आहे. आपल्या प्रांतांत आल्यावर हे भिंताडाच्या बिळामधून रात्र काढतात. हा पक्षी इकडे रहात नसल्याकारणानें त्याचें घरटें सांपडत नाहीं. हा कुंपणामध्यें किडे पकडण्यासाठीं हिंडत असतो. चिमणीएवढा याचा आकार आहे. याची मादी व हा एकरंगी असत नाहींत. नर काळ्या रंगाचा असून त्याची शेंपूट तांबड्या भडक रंगाची असते. बसलेला असतो तेव्हां शेंपटीचा लाल रंग झांकून जातो. पण हा उडतो तेव्हां तो स्पष्ट दिसतो. शेंपटीच्या लाल रंगावरूनच यास 'लालगोंडा' हें नांव लाभलें आहे. याची मादी मात्र पिंगट रंगाची असते.

लाहोर:—पंजाबची राजधानी. हें रावी नदीच्या कांठीं वसलेलें आहे. रामाचा मुलगा लव यानें हें शहर वसविलें अशी दंतकथा आहे. दहाव्या शतकापर्यंत या ठिकाणीं ब्राह्मण घराणें राज्य करीत होतें. १०२२मध्यें गझनीच्या महमुदानें हें शहर घेतलें. त्यानंतर चेंगीझखान व तैमूरलंग यांच्याहि स्वाऱ्या या शहराला भेट देऊन गेल्या. १५२४ मध्यें बाबरनें हें शहर घेऊन जाळलें व पुढें नवें लाहोर जन्माला आलें.

अकबराच्या कारकीर्दींत या शहराला फार महत्त्व आलें. स्वतः अकबर कांहीं वर्षें येथें राहात होता. शहाजहानहि येथें राहात असे. शहाजहाननंतर या शहराचें मोंगलांच्या राज्यांतील महत्त्व कमी होत गेलें. १७९९ मध्यें रणजितसिंहानें (शीख) हें शहर जिंकलें व पुढें १८४९ मध्यें इंग्रजांनीं लाहोर आपल्या राज्याला जोडलें. तीन चार शतकें हें शहर मोंगलांच्या ताब्यांत असल्यामुळें अनेक भव्य इमारती या ठिकाणीं बांधल्या गेलेल्या आहेत. त्यांपैकीं बादशाही मशीद, जहांगीरचें थडगें, रणजितसिंहाचें थडगें, अनारकलीचें थडगें, किल्ला, शालिमार बाग इ. इतिहासप्रसिद्ध ठिकाणें व रेल्वे स्टेशन, हॉस्पिटल्स, पंजाब युनि-



बादशाही मशदि-लाहोर

व्हर्सिटीची इमारत, रेल्वेचें वर्कशॉप, टाऊन हॉल, पशुपक्षीसंग्रहालय, म्युनिसिपालिटीची इमारत इत्यादि अलीकडील इमारती पाहण्यासारख्या आहेत.

कराची, पेशावर, कलकत्ता इत्यादि ठिकाणीं येथून रेल्वेचे रस्ते फुटतात. त्यामुळें व सध्यांची पंजाब प्रांताची राजधानी म्हणून या शहराला फार महत्त्व आहे. या ठिकाणीं पुष्कळ कॉलेजें, हायस्कूल्स व वाचनालयें आहेत. वृत्तपत्रेंहि पुष्कळ निघतात. या शहराची लोकसंख्या ४२९,७४७ इतकी आहे. या शहराचे उ. अ. ३१°२७ व पू. रे. ७४°२५ आहेत.

लाह्या:-खाण्याचा पदार्थ. कमी खर्चात होणारा. थोड्या श्रमांत, वेळांत तयार होणारा व पचण्यास अत्यंत हलका असणारा हा पदार्थ जोंधळा, मका व भात या धान्यांचा करतात. या तिखटमीठ लावून मुलें व प्रौढ माणसें खातात. कांहीं लोक त्या उसळून खातात. लाह्यांचें पीठ करून तें दूधगूळ किंवा ताक यांतूनही खातात. बाजारांत लाह्यांचे जोंधळे मिळतात ते घ्यावेत. नंतर त्याच्या लाह्या बनवाव्यात. **कृति**— शेर, मापटें किंवा अडेसरी हवेत तेवढे लाह्यांचे जोंधळे घ्यावेत. आधीं पाणी तापत ठेवावें. नंतर तें उकळून चाळणींतील जोंधळ्यावर ओतावें व त्यावर एक जाड फडकें झांकून ठेवावें. पाणी निथळल्यावर चुलीवर पाटी (लोखंडी) ठेवून खालीं चांगला जाळ लावावा. पाटी व तींतील माती किंवा वाळू चांगली तापल्यावर तींत दर खेपेला रोळींतील (उमले) जोंधळे थोडे थोडे घालून ढवळण्यानें हलवावेत; म्हणजे थोड्याच वेळांत लाह्या बनतील.

लाह्यांसाठीं मोती जोंधळे व झिपरे जोंधळे या जाती पसंत करितात. मोती जोंधळ्याच्या लाह्या करतांना जोंधळ्यावर ऊन पाणी ओतण्याची आवश्यकता नसते. नुसते जोंधळे पाटींत घातले तरी चालतात. मक्याच्या लाह्या वाळूच्या साह्यानें बनवितात.

लिओनार्डो ड व्हिन्सी (१४५२–१५१९):–जगविख्यात इटालियन चित्रकार व शिल्पकार. व्हिन्सी या खेड्यांत याचा जन्म झाला. कायद्यासंबंधींचे कागदपत्र तयार करणाऱ्या एका इटालियन माणसाला

त्याच्या एका प्रेमपात्रापासून झालेला मुलगा. असें असलें तरी बापानें त्याला स्वतःचा मुलगा म्हणून जाहीर केलें व त्याचा संभाळ केला. लिओनार्डो तरुणपणीं फार देखणा दिसत असे. त्याला पावा हें वाद्य उत्तम वाजवितां येत असे. तो चांगला सशक्त म्हणून लहानपणींच नांवाजला होता. शिवाय लहानपणीं त्यानें अनेक आकर्षक कविताहि केल्या होत्या.

वयाच्या तेराव्या वर्षी हा मिलनच्या ड्यूकच्या चाकरीस राहिला.यानंतर १७वर्षे तो मिलनलाच होता. काव्य, शिल्पकला, चित्रकला, गणित, यंत्रशास्त्र यांत त्यानें दिपवून टाकण्याजोगी कामगिरी केलेली आहे. लहानपणीं त्यानें आपल्या शिक्षकांनाही सोडविण्यास अवघड जाणारीं गणितें भराभर सोडवून त्यानें सर्वांस चकित केलें होतें. त्यानें पाणचक्की, तोफेंत गोळा भरणारें यंत्र, पोहतांना बुडूं नये म्हणून तयार केलेला तरता-पट्टा (Swimming-belt) बंदुकीची निमुळती गोळी इत्यादि गोष्टी तयार केल्या. मानवी शरीरांतील रक्ताभिसरण, स्फोटक द्रव्यांचे घटक, चुंबकशक्ती (Magnetic attraction), वाफेच्या शक्तीचा जहाजें हांकारण्याकडे उपयोग इत्यादि बाबतींत त्यानें बराच यशस्वी विचार केला होता. त्यानें डोंगरांतून बोगदे खणले, कालवे खणले. पृष्ठवंश असलेले व नसलेले असे प्राण्याचे दोन प्रकार त्यानें कल्पिले होते. पुढें कॉपरनिकसनें पृथ्वीच्या गतीसंबंधीं मांडलेल्या सिद्धांताची अंधुकशी कल्पना याला आलेली होती. चक्षुरेंद्रियासंबंधीं, गुरुत्वाकर्षण, उष्णता व प्रकाश यासंबंधीं कांहीं नियमहि यानें शोधून काढले होते. विमानविद्येसंबंधींहि शेवटीं शेवटीं तो प्रयोग करीत होता.

तो व्हेनीस, मॅंटुआ व पॅरिस, लावर इत्यादि ठिकाणीं हिंडला. त्यानें अनेक चित्रें व पुतळे बनविले. १५१६ मध्यें फ्रान्सच्या पहिल्या फ्रॅन्सिस या राजानें त्याला बोलावून एखाद्या स्वतंत्र राजाप्रमाणें त्याला वागवून काम करून घेतलें. यानें भिंतीवरहि चित्रें (Fresco) काढलीं. त्याचीं सर्व चित्रें प्रसिद्ध आहेत. पैकीं Last supper, Mona Lisa हीं विशेष प्रख्यात आहेत. हाता. २ मे १५१९ रोजीं क्लो या गांवीं वारला.

हातांत घेतलेलें काम पुरें होत आलें कीं तें आपल्या विद्यार्थ्यांकडे सोपवून हा दुसरेंच कांहीं तरी काम हातीं घेत असे. यामुळें याचीं बरींच चित्रें अपुरीं राहिलीं आहेत.

लिंकन, अब्राहम (१८०९-१८६५):-सुप्रसिद्ध अमेरिकन मुत्सद्दी व संयुक्त संस्थानचा अध्यक्ष. हा १२ फेब्रुवारी १८०९ रोजीं केंटुकी गांवीं जन्मला. गरीब आईबापांच्या पोटीं जन्म झाल्यामुळें लहानपणापासूनच प्रतिकूल परिस्थितीशीं झगडावें लागलें. शालेय शिक्षण



अब्राहम लिंकन

जेमतेम एक वर्ष मिळालें असेल नसेल. आपल्या अंगच्या उपजत गुणांच्या जोरावर तो महत्पदास चढला. अमेरिकन लोकसत्ताक राज्याचें अंतर्गत यादवीपासून संरक्षण करणारा व नीग्रो गुलामांना मुक्त करणारा महापुरुष म्हणून त्याचे देशबांधव त्याचें स्मरण करतात. त्याचा बाप टॉमस हा सुतार होता. टॉमसनें नॅन्सी हॅंक्स या मुलीशीं विवाह केला होता. हिच्या पोटीं अब्राहमचा जन्म झाला. त्याचा बाप टॉमस हा भटक्या मनोवृत्तीचा होता. त्यानें अनेक वेळां स्थलांतर केलें. सन १८१८ सालीं त्याची आई वारली. त्याच्या बापानें दुसरें लग्न केलें. त्याची सावत्र आई सुस्वभावी होती. तिनें त्याला लिहिणें, वाचणें, हिशेब करणें वगैरे शिकवून त्याच्या शिक्षणाला उत्तेजन दिलें. त्याला वाचनाची मोठी आवड होती. दुसऱ्याचीं पुस्तकें मागून आणून तो आपली वाचनाची भूक भागवून घेई. त्यानें विविध धंदे केले. जॉन हॅंक्स या नातेवाइकाचा सहाय्यक म्हणून जहाजांतून माल पोहोंचविण्याकरितां तो न्यू आर्लीन्स येथें गेला. तेथें गुलामाचा बाजार त्यानें प्रथमतःच पाहिला. गुरांप्रमाणें माणसांना वागविलेलें पाहून त्याचें मन द्रवलें. न्यू सालेम येथें त्यानें किराणा मालाचें एक दुकान चालवून पाहिलें. पण या व्यवहारांत त्याला खोट बसली. १८३३ सालीं न्यू सालेम येथें अल्प वेतनावर पोस्टमास्तर झाला. या कामावर तो तीन वर्षें होता. त्या मुदतींत त्यानें कायदा व राजकारण यांचा अभ्यास केला.

तो १८३४ सालीं कनिष्ठ विधिमंडळाचा सभासद निवडून आला. १८३६ सालीं स्त्रियांना मतदानाचे हक्क मिळावेत म्हणून त्यानें चळवळ सुरू केली.ही चळवळ लोकमताविरुद्ध होती. १८३७ सालीं त्याला वकिलीची सनद मिळाली. १८३९ सालीं इलिनॉइस संस्थानची नवी राजधानी स्प्रिंगफील्ड येथें वकिलीच्या धंद्याला त्यानें सुरवात केली. या धंद्यांत त्यानें चांगलें नांव कमावलें. १८४६ सालीं निवडणूक लढवून तो काँग्रेसचा सभासद झाला. तेथें प्रसंग मिळेल तेव्हां तो गुलामगिरीविरुद्ध आपलें मत प्रगट करी. त्यानें १८४९ सालीं एकदां व१८५८मध्यें एकदां सीनेटमध्यें शिरण्याचा प्रयत्न केला पण त्यांत त्याला यश आलें नाहीं; १८६० सालीं लिंकन यास रिपब्लिकन पार्टीनें अध्यक्षपदासाठीं उभें केलें व तो अध्यक्ष म्हणून निवडून आला. १८६१ मध्यें दक्षिण–संस्थानें फेडरेशनमधून फुटलीं, तेव्हां याच्याच सूचनेप्रमाणें दक्षिण व उत्तर संस्थानांत युद्ध–यादवी–सुरू झाली. शेवटीं उत्तर–संस्थानांना जय मिळाला. १८६३ मध्यें त्यानें गुलामांना मुक्त केल्याचा जाहीरनामा काढला. १८६४ मध्यें तो पुन्हां अध्यक्ष म्हणून निवडून आला. फोर्डस थिएटर येथें तो नाट्यप्रयोगाला गेला असतां १४ एप्रिल १८६४ रोजीं त्याला बूथ नांवाच्या नटानें गोळी घालून मारलें. १८४२ मध्यें त्यानें मेरी टॉड नांवाच्या स्त्रीशीं लग्न केलें होतें.

याच्या खंबीर वृत्तीमुळेंच अमेरिकन संस्थानांची जूट कायम टिकली व गुलामांची मुक्तता झाली.

लिंडबर्ग, चार्ल्स ऑगस्टस् (१९०३–   ):– अमेरिकन वैमानिक. चार्ल्स ए. लिंडबर्ग या काँग्रेसमनचा (अमेरिकन विधिमंडळाचा सभासद) मुलगा. ४ फेब्रुवारी १९०३ रोजीं डिट्रॉइटमध्यें जन्मला. लहानपणापासूनच याला यंत्रशास्त्राची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी विसकॉनसिन विद्यापीठांत यंत्रशास्त्र शिकण्याकरितां तो गेला. पण दोन वर्षांनंतर विमानविद्या शिकण्याकरितां त्यानें विद्यापीठास रामराम ठोकला, व विमानविद्येच्या शाळेंत प्रवेश केला. पुढें दोन वर्षें लष्करी शिक्षणही घेतलें. त्यानंतर त्यानें विमानानें टपाल नेण्याचें काम केलें. विमानानें अॅटलँटिक महासागर ओलांडण्याची त्याला महत्त्वाकांक्षा होती. १९२७ मेच्या २० तारखेस पॅरिसला जाण्याकरतां ‘ दी स्पिरिट ऑफ सेंट लुइस ’ या आपल्या विमानानें, निघाला. हा ३६०० मैलाचा प्रवास त्यानें वाटेंत कोठेंही न थांबतां अवघ्या ३३ तास २१ मिनिटांत पुरा केला. या अचाट साहसानें त्याला जागतिक कीर्ति मिळाली. त्यानंतर त्यानें संयुक्त संस्थानांतील प्रत्येक संस्थानाला विमानानें भेट दिली. १९२७च्या डिसेंबर महिन्यांत मेक्सिकन प्रेसिडेंटच्या निमंत्रणावरून तो मेक्सिकोला गेला. वॉशिंग्टन ते मेक्सिको हें विमानोड्डाण त्यानें कोठेंहि न थांबतां केलें. मे १९२७ मध्यें त्यानें इलिझाबेथ मॉरो या युवतीशीं विवाह केला. हिचा पिता ड्वाइट डब्ल्यू. मॉरो हा त्यावेळीं मेक्सिको शहरीं संयुक्त संस्थानतर्फे वकील होता. १९३१ सालीं कॅनडा, अलास्का या मार्गानें जपानला गेला. हें विमानोड्डाण त्यानें २८ दिवसांत संपविलें. १९३२ सालीं याचा दीड वर्षाचा मुलगा पळवून दरोडेखोरांनीं ठार मारल्यामुळें त्याच्यावर मोठीच कौटुंबिक आपत्ति ओढवली.

१९३३ सालीं या दंपतीनें चार खंडांतील २१ देशांना विमानानें जाऊन भेट दिली.

लिंबू:–औषधी दृष्टीनें गुणकारी ठरलेलें फळ. याच्यापासून तेल व सायट्रेट ऑफ लाईम या वस्तूंची निष्पत्ति होते. जेवतांना, ऊसाचा रस पितांना त्याची आवश्यकता फार असते. लिंबोटी हा एक पित्तावरील उपाय आहे. लिंबू पाचक व रक्तशुद्धी करणारें फळ होय.

सोडावॉटरच्या दुकानांत लिंबू नांवाचें पेय तयार करून तें लोकांना पिण्यास देतात. गोवा पावडर लिंबाच्या रसांतून लावल्यास गजकर्णाचा उपशम कांहीं काल तरी होऊं शकतो. देवऋषी लोकांनाहि याची पदोपदीं आवश्यकता लागते.

बाजारांतून, लिंबूच्या मोसमांत लिंबू घेऊन त्याच्या रसाच्या वातबंद अशा बाटल्या विकतात. लिंबूच्या रसाचें सरबत थंड व उत्तेजक असतें.

लिंबाचा घरगुती उपयोग म्हणजे लोणच्याचा. पुष्कळ लोक लिंबाच्या हंगामांत जाड सालीचें लिंबू लोणच्यासाठीं खरेदी करतात व त्यापासून लोणचें बनवून त्याचाहि व्यापार करीत बसतात.

लिंबाच्या बहराचे काल दोन. पावसाळा व हिंवाळा हे बहराचे काल जरी दोन असले तरी बाजारांत लिंबू मात्र बाराहि महिने मिळूं शकतो.

लिंबाचे प्रकार तीन. एक लोणच्याचा, दुसरा कागदी लिंबाचा व तिसरा साखरलिंबाचा. औषधाच्या कामीं कागदी लिंबाचा उपयोग फार होतो. लोणच्याकरितां पहिला प्रकार व शेवटचा प्रकार खाण्यासाठीं उपयोगीं पडतो. कागदी व लोणच्याचे लिंबू आंबट असतात तर साखरलिंबू गोड असतो. साखरलिंबू आकारानेंदेखील कागदी किंवा लोणची लिंबापेक्षां मोठा असतो. कागदी लिंबूची साल पातळ असते तर लोणच्याच्या लिंबाची साल जाड असते.

लिंबाचें लोणचें–साहित्य–पिंवळीं धमक पण मोठीं अशीं ५० लिंबें, सपाट कोळव्यापेक्षां थोड्या कमी मेथ्या, पळीभर हळद, दहा भार पिठी साखर, दोन हळकुंडें, दोन-अडीच तोळे हिंग व शेरभर वारीक मीठ. **कृति**–हळकुंडें, हिंग, हळद व मेथ्या हे पदार्थ तळून घ्यावेत. नंतर लिंबें, सबंध वांग्याच्या भाजीला जशीं वांगीं चिरून घेतात त्याप्रमाणें चिरून घ्यावींत अगर त्यांच्या फोडी कराव्यात. मग मीठ मिसळून तळलेल्या पदार्थांचें कूट बनवावें. इतकें झाल्यावर एका पळींत फोडणी करून ती निवाल्यावर कुटांत मिसळावी व कूट व लिंबें यांचें एका बरणींत मिश्रण करून ठेवावें आणि तोंड घट्ट बांधून टाकावें. ८।१० दिवस झाल्यावर सर्व लोणचें परतावें म्हणजे काम झालें. जसजसा काल अधिक लोटेल तसतसें लोणचें मुरून तें उत्तम बनत जाईल.

फोडणीचें लोणचें साधारणतः वर्षभर विकृति न होतां राहूं शकतें. याच्या उलट बिनफोडणीचें लोणचें ३–४ वर्षें टिकून राहतें.

लिमिटेड कंपनीः–लिमिटेड कंपनी हा एक संयुक्त भांडवलाच्या कंपनीचा प्रकार आहे. इंग्लंडमध्यें संयुक्त भांडवलाच्या कंपन्यांची उत्पत्ति सरकारला पैसा मिळवून देण्याच्या हेतूनें झाली. सरकारकडून कंपनीला जादा सवलती मिळत. इंग्लंडच्या इलिझाबेथ राणीनें इ. स. १६०० सालीं सनद देऊन मूळ ईस्ट इंडिया कंपनी स्थापन केली. ही व्यापार करणारी कंपनी होती; तथापि व्यापारांतून मिळणाऱ्या नफ्यांतून सरकारला आर्थिक सहाय्य व्हावें हाच या कंपनीचा उद्देश होता. यानंतर बँक ऑफ इंग्लंड ही तिसऱ्या विल्यमच्या कारकीर्दींत स्थापन झाली. अशा प्रकारच्या कंपन्या राजाच्या आज्ञापत्रान्वयें अथवा पार्लमेंटच्या खास कायद्यानें अस्तित्वांत येऊं लागल्या. सांप्रत इंग्लंड व हिंदुस्थानांत जसा कंपनीसंबंधीं कायदा आहे तसा इ. स. १८४४ सालापर्यंत इंग्लंडमध्यें नव्हता. १८५५ पर्यंत मर्यादित जबाबदारीचें (Limited liability) तत्त्व मान्य करण्यांत आलें नव्हतें. १८६२ सालीं इंग्लंडमध्यें कंपनीसंबंधींचा कायदा झाला. त्यानंतर त्या कायद्यांत वेळोवेळीं सुधारणा झाल्या. १९०८ सालीं कंपनीविषयींचा नवीन कायदा झाला. या कायद्यांत १९१३ सालीं थोड्याशा सुधारणा झाल्या असून सांप्रत तोच प्रचलित आहे. हिंदुस्थानांतही १८५० पासून १९१३ पर्यंत कंपनीविषयीं वेळोवेळीं कायदे झाले. १९१३ च्या कायद्यानें हिंदुस्थानांतील कंपनीविषयक कायद्यांत पुष्कळच फरक केला. तो कायदा १९०८ च्या इंग्लंडमधील कायद्याच्या धर्तीवर केलेला असून त्यांत इंग्लिश कायद्यांतील पुष्कळशा गोष्टी जशाच्या तशा घेण्यांत आलेल्या आहेत. तथापि हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थितीला अनुसरून विशिष्ट तरतूद पण केली आहे. यानंतर बदललेली परिस्थिति लक्षांत घेऊन व पंचवीस वर्षांत हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या कंपन्यांचे अनुभव जमेस धरून विधिमंडळानें कंपनीच्या कायद्यांत बरेच महत्त्वाचे फेरफार केले. हिंदुस्थानांतील सध्यांच्या सगळ्या कंपन्या कंपनी ॲक्टाप्रमाणेंच निघालेल्या नाहींत. कांहीं पार्लमेंटच्या खास कायद्यान्वयें अस्तित्वांत आल्या आहेत. तर कांहींचा जन्म हिंदुस्तानांतील कौन्सिलांच्या कायद्यांतून झाला आहे. रेल्वे कंपनी अथवा लाईफ इन्शुअरन्स कंपनी अशा प्रकारच्या कंपन्यांकरितां स्वतंत्र कायदे झाले आहेत.

कंपनी ॲक्टाप्रमाणें खासगी व सार्वजनिक असे कंपनीचे दोन भेद केलेले आहेत. खासगी कंपनींत पन्नासपेक्षां अधिक सभासद नसतात. सभासदांनीं आपले शेअर्स बदलून दुसऱ्याला द्यावयाचे नाहींत असा निर्बंध आर्टिकल्स अन्वयें घालण्यांत आलेला असतो. हे निर्बंध कंपनीनें सदैव पाळले पाहिजेत. सार्वजनिक कंपनीचे भागीदार संख्येनें जास्तींत जास्त किती असावेत याविषयीं निर्बंध नाहीं. शेअर्स बदलून देण्याच्या बाबतींत निर्बंध घातलेच पाहिजेत असें नाहीं. खासगी कंपनीनें शेअर्स विक्रीला काढावयाचे नसतात. सार्वजनिक कंपनी शेअर्स विक्रीला काढते; व प्रॉस्पेक्टस द्वारां तसें जाहीरहि करते.

कमींत कमी दोन व जास्तींत जास्त पन्नास सभासदांची खासगी कंपनी असते. सार्वजनिक कंपनींत

कमींत कमी सात सभासद असतात; जास्तींत जास्त किती सभासद असावेत याविषयीं निर्बंध नाहीं. कंपनी खासगी असो अगर सार्वजनिक असो "मेमोरँडम् ऑफ असोशिएशन" तयार करून त्यावर खासगी कंपनीच्या बाबतींत कमींत कमी दोन व सार्वजनिक कंपनीच्या बाबतींत कमींत कमी सात सभासदांच्या सह्या झाल्या असल्या पाहिजेत. कंपनीच्या भागीदारांची जबाबदारी मर्यादित असेल तर त्या कंपनीला लिमिटेड कंपनी म्हणतात. लिमिटेड कंपन्यांचे दोन प्रकार आहेत. एकाद्या कंपनींतील सभासदांची जबाबदारी त्यांनीं घेतलेल्या शेअर्सच्या न दिलेल्या रकमेपुरती मर्यादित असते, तेव्हां त्या कंपनीला शेअर्सनीं मर्यादित झालेली कंपनी म्हणतात; ही मर्यादा मेमोरँडम् ऑफ असोसिएशनमध्यें सांगितलेली असते. लिमिटेड कंपनीचा दुसरा प्रकार म्हणजे जिम्मेदारीनें म्हणजे गॅरंटीनें मर्यादित झालेली कंपनी.या कंपनीच्या मेमोरँडम्मध्येंच अशी तरतूद करून ठेवलेली असते, कीं कंपनीनें जर गाशा गुंडाळला तर विशिष्ट रकमेपुरतीच जबाबदारी भागीदारावर पडावयाची; भागीदारांनीं विशिष्ट रकमेपुरतीच जिम्मेदारी घेतलेली असते. येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं जिम्मेदारीनें मर्यादित असलेली कंपनी खासगी म्हणून कार्य करूं शकत नाहीं; कारण खासगी कंपनीच्या बाबतींतील शेअर बदलून देण्याबाबतींतील आवश्यक निर्बंध अशा कंपनीच्या आर्टिकल्समध्यें घालतां येत नाहींत.

ज्या प्रान्तांत कंपनीचें ऑफीस उघडावयाचें असतें त्या प्रान्तांतील जॉइंट स्टॉक कंपनीच्या रजिस्ट्रारकडे नवीन कंपनी जन्माला घालणाऱ्या प्रवर्तकांनीं अर्ज करावयाचा असतो. अर्जासोबत पुढील गोष्टी लागतात:–(१) मेमोरँडम् ऑफ असोसिएशनयावर प्रत्येक प्रवर्तकाची सही पाहिजे व ज्या साक्षीदारासमक्ष प्रवर्तकानें सही केलेली असते अशा निदान एका साक्षीदाराची तरी सही पाहिजे. मेमोरँडम् ऑफ असोसिएशन हा कागद अत्यंत महत्त्वाचा असतो. तो कागद म्हणजे कंपनीची सनदच होय. कंपनीच्या कार्याची रूपरेखा व मर्यादा त्यांत नमूद असते. त्यांत कंपनीचें उद्दिष्ट नमूद असतें. कंपनीचें संकल्पित भांडवल किती हें सांगितलें असतें; सभासदांची जबाबदारी कोणत्या प्रकारें मर्यादित असावयाची याचा उल्लेख असतो; कंपनीचें रजिस्टर्ड ऑफिस कोणत्या ठिकाणीं रहावयाचें याचा निर्देश असतो.

(२) 'आर्टिकल्स ऑफ असोसिएशन' हा कागद छापील असावा लागतो. यावर प्रवर्तकांची व साक्षीदाराची सही लागते. ममोरँडम् ऑफ असोसिएशन म्हणजे कंपनीची सनद, तर 'आर्टिकल्स ऑफ असोसिएशन' म्हणजे कंपनीच्या अंतर्गत व्यवस्थेविषयींचे नियम.

(३) ज्यांनीं डायरेक्टर होण्याचें मान्य केलें आहे अशा व्यक्तींचीं नांवें; खासगी कंपनीनें रजिस्ट्रेशनकरतां अर्ज केला असेल तर हा नियम लागू नाहीं.

(४) आपण डायरेक्टर होण्यास कबूल असल्याविषयीं प्रत्येक डायरेक्टरची लेखी संमति मिळाली पाहिजे व आपण क्वालिफिकेशन शेअर घेऊन त्यांची रक्कम देऊं म्हणून लेखी करार करून दिला पाहिजे. हा करार रजिस्ट्रारजवळ सादर केला पाहिजे. ज्या कंपनीचें शेअर कॅपिटल नाहीं व जी कंपनी 'लिमिटेड बाय गॅरंटी' आहे तिच्या बाबतींत हा निर्बंध नाहीं. याप्रमाणें जरूर ते कागदपत्र रजिस्ट्रारजवळ सादर केले, व जरूर ती रजिस्ट्रेशन फी दिली म्हणजे रजिस्ट्रार एक दाखला देतो. याला 'सर्टिफिकेट ऑफ इनकॉर्पोरेशन' म्हणतात. हा दाखला मिळाला म्हणजे कंपनी स्थापन झाली असें समजावयाचें.

लीप ईयरः–ज्या वर्षी फेब्रुवारी महिन्याचे २९ दिवस धरतात तें लीप ईयर (वर्ष). स्थूलमानानें इसवी सनाचें वर्ष ३६५ दिवसांचें असतें. सूक्ष्म मानानें सौरवर्षांत ३६५ दिवस ६ तास १२ मि. व ३६ से. असतात; म्हणून एका वर्षांत ६ तास १२ मि. व ३६ से. इतका फरक पडतो. हा फरक नाहींसा करण्याकरितां दर चार वर्षांनीं फेब्रुवारी महिन्याचें २९ दिवस धरण्याची वहिवाट आहे. ज्या सनाला चारांनीं निःशेष भाग जातो तें लीप ईयर. उदाहरणार्थ १९३२, १९३६, १९४० हीं लीप ईयर्स आहेत; परंतु शतकसमाप्तीचें वर्ष त्याला ४०० नीं निःशेष भाग जात असेल तरच लीप ईयर मानावयाचें; त्याला ४ नीं निःशेष भाग जातो एवढ्यावरूनच तें लीप ईयर होत नाहीं. उदाहरणार्थ १३००, १४००, १५०० या वर्षांना ४०० नीं निःशेष भाग जात नाहीं म्हणून तीं लीप ईयर्स (वर्षें) नव्हेत. परंतु सन ८००, १२००, १६०० व २००० यांना ४०० नीं निःशेष भाग जातो; म्हणून तीं लीप ईयर्स. शतकसमाप्तीच्या वर्षांच्या बाबतींत हा नियम ठेवण्याचें कारण असें कीं

प्रति चार वर्षांनीं फेब्रुवारी महिन्यांत एक दिवस अधिक धरल्यानें बाजवीपेक्षां पाऊण तास अधिक धरला जातो; त्यामुळें प्रत्येक चारशें वर्षांत तीन दिवस अधिक धरले जातात. ह्या चुकीची दुरुस्ती दर चारशें वर्षांत तीन दिवस वजा करून करण्यांत येते.

लुबिश, अर्नेस्ट (१८९२–):–जगांतील पहिल्या प्रतीच्या सहा दिग्दर्शकांपैकीं प्रमुख जर्मन दिग्दर्शक. याचा जन्म बर्लिन शहरीं २८ जानेवारी १८९२ रोजीं झाला. तो आपल्या बापाच्या दुकानांत कारकून म्हणून काम करीत असतांनाच व्हिक्टर आर्नोल्ड या विनोदी नटाकडे त्यानें अभिनयाचें शिक्षण घेतलें. १९११ मध्यें आर्नोल्ड यानें लुबिशला मॅक्स रेनहार्ट या चित्रपटनिर्मात्याकडे नेलें. त्याच्याकडे तो दोन वर्षें होता. १९१३ मध्यें त्यानें एका चित्रपटांत विनोदी भूमिका केली. पण त्याची खरी कीर्ति १९१८ मध्यें त्यानें Carmen हा चित्रपट तयार केल्यानंतर दिग्दर्शक या नात्यानें पसरली.

Madame Du Barry, The Loves of Pharaoh, The Wild Cat, The Doll हे चित्रपट त्यानें दिग्दर्शित केल्यावर तो १९२३ मध्यें अमेरिकेस गेला व तेथें मेरी पिकफोर्डचा Rosita हा पहिला मूकपट त्यानें दिग्दर्शित केला. यानंतर दिग्दर्शित केलेल्या मूकपटांपैकीं Three Women, Forbidden Paradise, The Student Prince, The Patriot, Eternal Love हे चित्रपट व बोलपटांपैकीं The Smiling Lieutenant, One Hour With You, Trouble in Paradise, The Merry Widow, Desire हे होत. १९३७ पासून तो असोसिएट प्रोड्यूसर म्हणून काम करीत आहे.

लूबिश गांभीर्य, खेळकरपणा, विनोदी व चुटचुटितपणा या निरनिराळ्या छटा सहज, सफाईनें व विलक्षण चातुर्यानें दाखविण्याच्या बाबतींत बिनतोड असा दिग्दर्शक आहे.

लेनिन, व्हलाडिमिर इलिच युलिआनोव्ह (१८७०–१९२४):–रशियन क्रांतिकारक. याचा जन्म सिंबर्स्क येथें २२ एप्रिल १८७० रोजीं झाला. याचा बाप कॉलेजमध्यें अध्यापक होता व कांहीं दिवस कौन्सिलरहि होता. वकिलीची परीक्षा दिल्यावर हा मजूर चळवळींत पडला. हा प्रथमपासून कट्टा मार्क्सिस्ट होता. १८९५ मध्यें हा जर्मनीला गेला. पण तो परत येतांच त्याला कटांत सामील झाल्याच्या आरोपावरून सुशेन्स्को (पू. सैबेरिया) येथें तीन वर्षें हद्दपार करण्यांत आलें. १९०० मध्यें सुटका झाल्यावर कांहीं दिवसांनीं तो लंडनला गेला (१९०२) व १९०५ पर्यंत रशिया बाहेरच राहिला. १९०५ च्या क्रांतींत तो वरिष्ठ डयूमा सभेंत Second Duma निवडून आला. यावेळीं त्यानें सोशॅलिस्टपक्षाच्या 'न्यू लाइफ' या पत्राचें संपादकत्व पत्करलें होतें. पण लष्करानें क्रांतिकारकांना मदत नाकारल्यानें पुन्हां राजपक्ष सत्ताधीश झाला व पुन्हां लेनिन हद्दपार झाला. १९०७ मध्यें लंडन येथें भरलेल्या सभेंत लेनिन बोल्शेव्हिक पक्षाचा पुढारी बनला. महायुद्धाच्या सुरवातीस हा क्रॅकौशहरीं परतला, पण तेथून तो स्वित्सर्लंडमध्यें गेला व तेथून त्यानें आपल्या पक्षाचीं सूत्रें हलविण्यास सुरवात केली. यावेळीं त्याला जर्मनीमधून पैशाची मदत सतत होत होती. १९१७ च्या रशियन क्रांतीच्या वेळीं जर्मन सैन्यानें त्याला बंद आगगाडींतून पिट्सबर्गला पोचविलें. तेथें ट्रॉटस्कीच्या सहाय्यानें त्यानें जुलैमध्यें बंड केलें. पण तें फसलें, तेव्हां पुन्हां ७ नोव्हेंबर १९१९ रोजीं दुसरें बंड पुकारलें (रशियाच्या पंचांगाप्रमाणें २५ ऑक्टोबर); केरेन्स्की प्रधानमंडळ कोलमडलें. लेनिन कौन्सिलचा अध्यक्ष बनला. अंतस्थ यादवी सुरू झाली. अंतर्गत यादवी पुष्कळ रक्तपातानंतर १९२१ मध्यें शमली व बोल्शेव्हिक पक्ष यशस्वी झाला. नंतर भांडवलशाहीला पोषक अशीं थोडीं तत्त्वें स्वीकारून त्यानें राष्ट्रीय प्रगती करण्याची योजना आंखली. १९२२मध्यें एका स्त्रीनें (बोल्शेव्हिक पक्षाच्या विरुद्ध पक्षांतील) त्याच्यावर गोळी झाडली. त्यांत तो जखमी झाला. यानंतर त्याची प्रकृती बिघडली व कामाचा फार ताण पडत राहिल्यामुळें तो २१ जानेवारी १९२४ रोजीं मरण पावला. याचें प्रेत अनेक रसायनें वापरून जपून ठेवलें असून मास्कोमध्यें त्याची भव्य समाधी बांधलेली आहे. पिट्सबर्ग या शहराचें नांव बदलून याचे स्मरणार्थ त्याला लेनिनग्राड हें नांव दिलें आहे. त्यानें प्रवदा या पत्रांतून सारखा प्रचार चालविला होता. The State and Revolution हें त्याचें पुस्तक १९२० मध्यें प्रसिद्ध झालें. त्याला निकोलाय लेनिन म्हणूनहि ओळखतात.

लेनिनची कामगिरी–मार्क्सचें सुखस्वप्न मार्क्सला आपल्या आयुष्यांत सत्य सृष्टींत आणतां आलें नाहीं, तें लेनिननें रशियांत सत्यसृष्टींत आणून दाखविलें. त्यासाठीं मार्क्सच्या सिद्धांतांत त्यानें अनुभवानें जरूर

वाटलें ते फरकही केले. भांडवलशाहीचा नाश करून समाजसत्ता स्थापन करण्यापूर्वी भांडवलशाहीची पूर्ण वाढ झाली पाहिजे असें मार्क्सचें मत होतें. म्हणून इंग्लंडसारख्या भांडवलशाहीचा विकास सर्वांआधीं झालेल्या राष्ट्रांतच भांडवलशाही नाश पावून समाजसत्ता आधीं निर्माण होईल असें मार्क्सचें व त्याच्या कित्येक अनुयायाचें मत होतें. पण मार्क्सनंतर भांडवलशाहीचा जो विकास झाला त्यावरून लेनिननें मार्क्सचा सिद्धांत बदलला. भांडवलशाहीनें मागसलेलीं राष्ट्रें काबीज करण्याचा क्रम सुरू केल्यामुळें तिला साम्राज्यशाही स्वरूप आलें. अशा अनेक साम्राज्यशाही राष्ट्रांचीं नवीन नवीन मुलुख मिळविण्याच्या स्पर्धेंत युद्धें होऊं लागलीं म्हणजे मागासलेल्या साम्राज्यवादी राष्ट्रांत भांडवलशाहीचा विकास होण्याऐवजीं बाल्यावस्थेंतच भांडवलशाहीचा मृत्यू ओढवून पुढारलेल्या राष्ट्राच्या पूर्वीच या मागसलेल्या साम्राज्यवादी राष्ट्रांत राष्ट्रीय जीवन टिकविण्यासाठीं कामगारक्रांति करावी लागते हा लेनिनचा सिद्धांत होय. त्याप्रमाणें १९१४–१९च्या महायुद्धांत रशिया या मागासलेल्या साम्राज्यवादी राष्ट्रांतली राज्यसंस्था व समाजव्यवस्था युद्धाच्या भाराखालीं मोडकळीस आली, तेव्हां ती वेळींच मोडून टाकून मार्क्सला हवी असलेली कामगारक्रांति लेनिननें रशियांत घडवून आणली. लेनिनच्या या विशिष्ट सिद्धांतास बोल्शेव्हिझम् असें नांव १९०३ सालीं देण्यांत आलें. त्यानें केलेल्या क्रांतीस बोल्शेव्हिक क्रांति म्हणतात. या क्रांतीनंतर जें पुनर्घटनेचें कार्य रशियांत झालें तें लेनिनच्या बोल्शेव्हिक पक्षानें केलें असल्यानें त्यालाही आतां बोल्शेव्हिक पुनर्घटना ऊर्फ बोल्शेव्हिझम् असें म्हणतात. (बोल्शेव्हिझम् पाहा. पृष्ठ १४३७).

लोकशाही (Democracy):–‘ लोकशाही ’ म्हणजे लोकांचें राज्य. अब्राहम लिंकननें “ लोकांनीं लोकांकरितां चालविलेलें लोकांचें राज्य ” अशी ‘लोकशाही’ या शब्दाची व्याख्या केली आहे. स्वदेशाच्या प्राचीन इतिहासाशीं परिचय नसलेल्या हिंदी लोकांना ब्रिटिशांचें राज्य हिंदुस्थानांत झाल्यानंतर लोकशाहीची ओळख झाली. परंतु प्राचीन भारत लोकशाहीला पारखा नव्हता हें संशोधकांनीं निश्चितपणें सिद्ध केलें आहे. महाभारताच्या शांतिपर्वांत लोकशाहीच्या उत्कर्षाचे नियम सांगितले आहेत. वैदिक काळीं राजावर सभा व समिती यांचें नियंत्रण असे. बुद्धकालांत लोकसत्ताक राज्यें होतीं. कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत वृजिक, कुरु, पांचाल इत्यादि लोकसत्ताक राज्यांचा उल्लेख केला आहे. या राज्यांत अन्तर्गत यादवी माजवून त्यांना जिंकण्याविषयीं त्यानें राजे लोकांना उपदेश केला आहे. यावरून प्राचीन भारतांत लोकशाही नांदत होती हें दिसून येतें. तिचें स्वरूप आधुनिक पाश्चात्य शासनसंस्थांत दिसून येणाऱ्या लोकशाहीच्या स्वरूपाहून भिन्न असेल; परंतु राज्यकारभाराचें लोकमतानुवर्तित्व व राज्यकारभारांत लोकांची भागीदारी हीं तत्त्वें प्राचीन भारताच्या शासनसंस्थांत मान्य केलीं होतींच. प्राचीन रोम व ग्रीसमध्यें लोकशाही नांदत होती, पण त्या लोकशाहींत व आधुनिक युरोपियन राष्ट्रांतील लोकशाहींत फरक आहे. अथेन्स येथें प्राचीनकाळीं नगरराज्य होतें. पेरिक्लिसच्या काळीं इक्लिशिया नांवाच्या समित्या होत्या. या समित्याच राज्यकारभार करीत. कायदे करणें, परराष्ट्रीय धोरण ठरविणें या गोष्टी या समित्याच ठरवीत. धर्मविषक प्रश्न, जमाबंदीचे प्रश्न, एकाद्या नागरिकाच्या सार्वजनिक वर्तनाविषयींचे खटले या गोष्टींचा निर्णय या समित्याच करीत या समितींत उपस्थित होण्याकरितां नागरिकांना वेतन देण्यांत येत असे. या नगरराज्यांतील ही लोकशाही प्रत्यक्ष स्वरूपाची होती. याचा अर्थ असा कीं वयांत आलेल्या सर्व नागरिकांना राज्यकारभारांत भाग घेतां येत असे. हीं नगरराज्यें लहान असत. त्यांतील सभासदांची जास्तींत जास्त संख्या ४००० असे. त्यांतील प्रत्यक्ष लोकशाहीचें तत्त्व मोठ्या देशाच्या राज्यकारभारांत अनुसरणें केवळ अशक्य आहे. म्हणून मोठ्या राष्ट्राचा राज्यकारभार लोकशाहीच्या तत्त्वानुसार चालविण्याकरितां राज्यघटना प्रातिनिधिक स्वरूपाची करणें भाग पडलें. आधुनिक लोकसत्ताक राज्यें प्रातिनिधिक स्वरूपाचींच आहेत. प्राचीन ग्रीक लोकशाही प्रत्यक्ष स्वरूपाची म्हटली तर आधुनिक लोकशाही अप्रत्यक्ष स्वरूपाची म्हणतां येईल. प्राचीन ग्रीक लोकशाही प्रत्यक्ष स्वरूपाची असली तरी तिला लोकशाहीचा आदर्श म्हणतां येत नाहीं. राज्यांतील सर्व नागरिकांना जरी राज्यकारभारांत भाग घेतां येत असे तरी राज्यांत नांदणाऱ्या एकंदर जनतेपैकीं फारच थोड्यांना नागरिकत्वाचे हक्क होते. बहुसंख्य प्रजा अल्पसंख्य वतनदार नागरिकांच्या गुलामगिरींत अक्षरशः नांदत

होती. त्यांना साधे माणुसकीचे हक्कहि नव्हते. या गुलामांची गणना अल्पसंख्य नागरिकांच्या मालमत्तेत होत असे. यावरून ही लोकशाही म्हणजे लोकशाहीच्या स्वरूपांत वावरणारीं श्रीमंतांची सत्ताच (Aristocracy) होती, यांत शंका नाहीं. रोमन लोकशाही या अथीनियन लोकशाहीहून मूलतःच निराळी होती. रोमन जनता शेतकीप्रधान होती; त्यामुळें तिला राज्यकारभार करण्याची इच्छा व पात्रता नव्हती, रोमन लोक आपले अधिकारी निवडून देत व कायद्याच्या योजनेवर आपलीं मतें व्यक्त करीत. प्रत्यक्ष राज्यकारभार करणाऱ्या वर्गावर त्यांचा विश्वास असे; त्यामुळें प्रत्यक्ष राज्यकारभारांत ते लक्ष घालीत नसत. याचा परिणाम असा झाला कीं, रोमन सीनेट सर्व सत्ताधारी झाली. रोमचें राज्य हें नगरराज्य होतें. पुढें रोमन साम्राज्य वाढल्यावर लोकसत्ताक राज्य एवढ्या मोठ्या प्रदेशांत चालणें शक्य नव्हतें. प्रातिनिधिक स्वरूपाची राज्यघटनाहि करण्यांत आली नाहीं; त्यामुळें लोकांना राज्यकारभारांत भागीदारी मिळाली नाहीं. शेवटीं साम्राज्यशाहीच्या प्रभावांत लोकशाही लुप्त झाली.

प्राचीन व आधुनिक लोकशाही यांतील फरक—वर सांगितलेंच आहे, कीं प्राचीन लोकशाही प्रत्यक्ष स्वरूपाची होती व आधुनिक लोकशाही प्रातिनिधिक म्हणूनच अप्रत्यक्ष स्वरूपाची आहे. प्राचीन लोकशाहींत सर्व नागरिकांना राज्यकारभारांत भाग घेतां यावा अशी घटना हेतुपूर्वक केलेली होती. सार्वजनिक अधिकाराच्या जागा चिठ्या टाकून भरण्यांत येत. न्यायाधिशांची निवडसुद्धां अशीच होई. फक्त सेनापतींची निवड या प्रकारें होत नसे. नागरिकत्वाचे हक्क असलेले लोक व गुलाम यांच्यांतील फरक वर सांगितलाच आहे.आधुनिक लोकसत्ताक राज्यांत अम्मलबजावणीखातें (Execution); न्यायखातें (judicial) व कायदेकानू करण्याचें खातें हीं खातीं कांहीं अंशीं विभक्त करण्यांत आलीं आहेत. प्राचीन लोकशाहींत या सर्वांची गल्लत करण्यांत आली होती. प्राचीन लोकशाहींत आधुनिक लोकशाहीप्रमाणें मध्यवर्ती व प्रान्तिक सत्ता असा फरक करण्यांत येत नसे. व्यक्ति व राष्ट्र यांतील संबंधाविषयींच्या प्राचीन लोकशाहींतील व अर्वाचीन लोकशाहींतील कल्पनांत मौलिक फरक आहे. आधुनिक लोकसत्ताक राज्यांत राज्य हें त्यांतील व्यक्तिकरतां असतें; तर ग्रीक कल्पनेप्रमाणें व्यक्ति ही राज्याकरतां असे.

आधुनिक लोकशाही प्रातिनिधिक स्वरूपाची असल्याचें वर सांगितलेंच आहे. देशांतील सर्वच लोकांना प्रत्यक्ष राज्यकारभारांत भाग घेतां येणें शक्य नाहीं. म्हणून प्रातिनिधिक तत्त्वाचा अवलंब करण्यांत आला आहे. देशांतील मतदार आपले प्रतिनिधि निवडून देतात. या प्रतिनिधींतूनच राज्यकारभार करणाऱ्या प्रधानमंडळाची निवड होते. हें प्रधानमंडळ लोकप्रतिनिधींच्या विधिमंडळाला जबाबदार असते.या प्रधानमंडळावर लोकप्रतिनिधींचें नियंत्रण राहील अशी योजना केलेली असते. वयांत आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांना मतदानाचा हक्क असणें हें आदर्श लोकशाहीचें वैशिष्ट्य आहे. मतदान करण्याच्या पद्धतीविषयीं 'मतदान' या शीर्षकाखालीं विवेचन केलें आहे. योग्य प्रतिनिधींची निवड व्हावी म्हणून मतदार शिक्षित असणें अवश्य आहे. लोकमत शिक्षित असणें, लोकांना सार्वजनिक कार्यांची आवड असणें, राज्यकारभारांतील किचकट प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या नागरिकांची अखंड परंपरा असणें, लोकांना नागरिकत्वाच्या हक्कांची व जबाबदारीची यथार्थ जाणीव असणें या गोष्टी लोकशाही यशस्वी होण्याला आवश्यक आहेत.

लोकोमोटिव्हः—रेल्वे हा लेख पाहा.

लोखंडः—सर्वत्र आढळणारा व उपयोगांत येणारा एक मूळ धातू. आज खि. पू. ६००० वर्षांपासून मनुष्य हा धातू वापरीत आलेला आहे. लोखंड हा धातू स्वस्त असून त्याच्या कठीणपणामुळें तो हरकामीं उपयोगी पडतो. साध्या टांचणीपासून आगगाडीचें इंजिन किंवा विमान यापर्यंत हजारो वस्तू लोखंडाच्या तयार होतात.

लोखंडाचें रासायनिक चिन्ह Fe हें आहे. परमाणू वजन ५५·८८ इतकें असतें. विशिष्ट गुरुत्व ७·८६ व १५३५° सेंटिग्रेड एवढ्या उष्णतेवर लोखंड वितळतें. मुळांत लोखंड पांढऱ्या करड्या रंगाचें असतें. तें मऊ असतें व ठोकून तें लांब करतां येतें व त्याच्या ठिकाणीं चुंबकशक्ती निर्माण करतां येते. मात्र लोखंडांत ही चुंबकशक्ति तात्पुरतीच राहते. दमट हवेंत लोखंड गंजतें. बहुतेक ॲसिडमध्यें हें विरतें. स्फुर, गंधक व आरसेनिक यांबरोबर तें त्वरित मिसळूं शकतें व अशा तऱ्हेनें झालेलें मिश्रण मूळ धातूपेक्षां लवकर द्रवतें.

खाणींतून अशुद्ध लोखंडाचे तुकडे काढल्यावर ते भट्ट्यांत घालून त्यांतील इतर अशुद्धें काढून ते शुद्ध

करतात. या शुद्ध लोखंडास wrought iron म्हणतात. लोखंडांत कमीअधिक प्रमाणांत कार्बन मिसळून बीड व पोलाद तयार करतात.

लोणचें:—पान ७७ वरील 'आंबा', पान १०३ मधील 'आंवळा' व पान २२२ मधला 'करवंद' हे लेख पाहा.

लोणी:—दूध किंवा दही घुसळून त्यापासून दुधांत असलेली चरबी स्वतंत्र करतां येते. ही चरबी म्हणजेच लोणी होय. पूर्वी शेळीमेंढीच्या दुधापासून लोणी काढीत असत; पण त्यापेक्षां गाईम्हशीच्या दुधापासून लोणी काढणें फार स्वस्त असतें. दुधांतून किंवा दह्यांतून निघणाऱ्या लोण्याचें प्रमाण निश्चित नसतें. जनावराला मिळणाऱ्या चाऱ्यावर व खाण्यांतील इतर पदार्थांवर अवलंबून असतें. आतां सर्वत्र डेअरीची पद्धती सुरू झाल्यामुळें यंत्रसहाय्यानें अल्पावधींत दुधांतील लोणी काढून दूध विकतात. आपल्याकडे दुधाचें दहीं करून व तें घुसळून त्यांतील लोणी काढून घेऊन शिल्लक राहिलेला पदार्थ म्हणजे ताक वापरण्याची सर्रास प्रथा आहे. म्हशीच्या दुधापासून केलेल्या लोण्याचा रंग पांढरा व गाईच्या किंवा शेळीमेंढीच्या दुधापासून तयार केलेल्या लोण्याचा रंग पिवळसर असतो. लोण्यांत थोडें स्वच्छ मीठ एक विशिष्ट रंग येण्याकरितां व तें अधिक काल टिकावें म्हणून घालतात.

लोणी हा पदार्थ स्निग्ध आहे. लोणी थंड असून त्यांत 'ए' हें जीवनद्रव्य (व्हिटॅमिन) आहे. म्हणून सर्वांनीं लोणी अवश्य खावें. लोणी कढवून तूप तयार करतात.

लोहार पक्षी:—जिभेच्या शस्त्रानें झाडावरील लहानमोठ्या किड्यांचा फन्ना पाडणारा वृक्षारोहक वर्गापैकीं पक्षी. हा साधारणपणें कावळ्याएवढा असून त्याची पाठ सोनेरी असते. तुऱ्यासुद्धां याच्या डोक्याचा रंग किरमिजी असतो. पाठीमागचा भाग व शेपटी हे भाग काळे असतात. पंखें कडेला काळीं असलेलीं पण मध्येंच पिवळसर रंगाचीं असतात. याची चोंच पाचरासारखी पण लांब नी सरळ असते. तिचा वरील भाग फार बळकट असून शिवाय तो खालच्यापेक्षां जरा पुढें आलेला असतो. वरच्या जबड्याला पातळीसारखी धार असते.

लोहार पक्षाची जीभ लांब, पातळ व लवचीक असते. तिनें तो लाकडांतील आळ्या, लहानमोठे किडे पकडतो व खातो. याच्या जिभेला काटे असतात. तोंडांतील लाळ व जिभेचे काटे यांचा छोटे किडे व आळ्या यांना मारण्यास फार उपयोग होतो. मोठ्या किड्याला जिभेच्या काट्यांनीं तो ठार मारतो. लहान किडे व आळ्या या तर त्यास माराव्या लागतच नाहींत. त्या तोंडांतील लाळेलाच चिकटून बसतात. आपल्या या दोन्ही साधनांनीं तो झाडावरील किड्यांचा सारखा फडशा पाडतो. या बाबतींत त्याची बरोबरी करणारे फार थोडे पक्षी आहेत.

याची मान फार लहान असते. तिनें तो डोक्याचा हातोडा करून चोंचीच्या मदतीनें झाडावर ठोके मारतो. याच्या शेपटीचीं पिसें बळकट असल्यामुळें ठोके मारतांना तो पाय व शेपटी यांचें तिकाटणें करून बसतो. याच्या पायाला पुढें दोन व मागें दोन अशीं चार बोटें असल्यानें तो झाडावर चढूं शकतो. तो आपलीं बोटें सालीच्या अगदीं बारीक भेगेंतसुद्धां सरकूं शकतो. लोहाराचा जीवनक्रम सर्व प्रकारचे कीटक व आळ्या यांवर चालतो. हा झाडावर राहणारा पक्षी आहे. तो पोकळ झाड दिसलें म्हणजे त्यांत जाण्याला नीट वाट करतो. या वाटेंतच त्याची मादी पांढरीं अंडीं घालते. तीं उबवण्याचें काम आळीपाळीनें एकमेक करतात.

लॅंब चार्ल्स (१७७५–१८३४):— सुप्रसिद्ध आंग्ल लघुनिबंधकार. जन्म लंडन येथें १० फेब्रुवारी १७७५ रोजीं झाला. शिक्षण ख्राइस्ट्स् हॉस्पिटल या संस्थेंत झालें. तेथें असतांना त्याचा कोलरिज या कवीशीं स्नेह जमला; तो आमरण टिकला. शाळेतील अभ्यासक्रम संपल्यावर त्यानें कांहीं दिवस लंडनमधील व्यापाऱ्याकडे नोकरी केली. १७९१ सालीं साऊथ सी हाऊसमध्यें कारकुनाची नोकरी धरली. १७९२ सालीं ईस्ट इंडिया हाऊसमध्यें कारकून म्हणून प्रवेश केला. या जागेवर तो तेहतीस वर्षे होता. १८२५ सालीं सेवानिवृत्त झाला. त्याची बहिण मेरी हीनें वेडाच्या भरांत आपल्या आईच्या छातींत सुरी खुपसली. आई अर्थात्च मरण पावली. आपल्या बहिणीला जन्मभर वेड्याच्या इस्पितळांत ठेवण्याचें चार्ल्सनें नाकारलें. मेरीला वेडाची लहर आली कीं तिची रवानगी इस्पितळांत होई. एरवीं तीं भावाच्या घरींच असे. चार्ल्सनें तिच्या

संगोपनाची जबाबदारी स्वखुषीनें पत्करली. आपल्या बहिणीची आबाळ होऊं नये म्हणून तो आजन्म अविवाहित राहिला.

चार्लस् लँबनें वाङ्मयक्षेत्रांत कवि या नात्यानें पदार्पण केलें. कोलरिज व लॉइड या मित्रांच्या सहकार्यानें त्यानें आपल्या कवितांचें पुस्तक प्रसिद्ध केलें. पण त्या लोकांना आवडल्या नाहींत. त्यानें नाटकेंहि लिहिलीं पण तीं लोकप्रिय झाली नाहींत. त्यानें आपली बहीण मेरी हिच्या सहकार्यानें Tales from Shakespeare हें शेक्सपीयरच्या नाटकांच्या संविधानकांचें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें. या पुस्तकानें त्याला चांगली लोकप्रियता मिळवून दिली. चार्लस्ची वाङ्मयक्षेत्रांतली कीर्ति मुख्यतः त्याच्या लघुनिबंधांमुळें झाली. हे लघुनिबंध त्यानें लंडन मॅगेझिन या नियतकालिकांत 'इलिया' या टोपण नांवानें प्रसिद्ध केले. हे निबंध Essays of Elia या नांवानें आंग्ल वाङ्मयांत प्रसिद्ध आहेत. हे निबंध नितांत रम्य आहेत. त्यांत त्याचा प्रेमळ स्वभाव, गरीबाविषयींची सहानुभूति हीं व्यक्त झालीं असून त्यानें आपल्या आवडीनिवडी व्यक्त केल्या आहेत. निबंधांची भाषा प्रासादिक असून उच्च दर्जाच्या विनोदानें ते परिपूर्ण आहेत. निबंध वाचीत असतांना लेखक आपल्याशीं स्नेहभावानें व मोकळ्या मनानें हितगुज करीत आहे असा वाचकांना प्रत्यय येऊन वाचक त्यांत रमून जातो. तो २७ डिसेंबर १८३४ रोजीं मेला.

लॉईड जॉर्ज (१८६३–):–इंग्लंडचा विख्यात मुत्सद्दी. याचा जन्म १७ जानेवारी १८६३ रोजीं मँचेस्टरला झाला. याचें घराणें वेल्समधील आहे. १८८४ मध्यें हा सॉलिसिटरचा धंदा करूं लागला. पुढें केरनरव्हॉनतर्फें १८९० मध्यें पार्लमेंटमध्यें लिबरल-पक्षातर्फें निवडून आला व आजतागायत त्याच गटा-तर्फें तो सतत निवडून येत आहे. १९०५ मध्यें तो राजकारणांत चमकूं लागला. या वर्षी तो बोर्ड ऑफ ट्रेडचा अध्यक्ष म्हणून निवडला गेला. १९०८ ते १९१५ पर्यंत हा चॅन्सेलर ऑफ दि एक्स्चेकरच्या हुद्यावर होता. १९१५मध्यें तो युद्धसामुग्री खात्याचा प्रधान झाला. लौकरच तो युद्ध चिटणीस व १९१६ मध्यें मुख्य प्रधान झाला. कमालीचे परिश्रम घेऊन यानें इंग्लंडला युद्धांत विजय मिळवून दिला. "Germany wins battles, I win the war" ही त्याची त्या वेळची उक्ती प्रख्यात आहे. १९२२ मध्यें राष्ट्रीय सरकारचा पराभव झाला व यानें मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें अंगावरून उतरलीं. यानंतर लिबरल पक्षहि मागें पडूं लागला. १९३५मध्यें बाल्डविन मुख्य प्रधान असतांना हा पुन्हां लोकांसमोर प्रामुख्यानें आला. चालू युद्धांत नॉर्वेच्या बाबतींत झालेल्या ब्रिटिशांच्या पराभवाचे वेळीं यानें पार्लमेंटमध्यें कडक टीका करून मि. नेव्हिल चेंबर्लेन यांना मुख्य प्रधानकी सोडण्यास भाग पाडण्यांस व युद्धाच्या बाबतींत कडक धोरण स्वीकारण्यास ब्रिटिश सरकारला यानें भाग पाडलें.

लॉंगफेलो, हेन्री वॅड्सवर्थ (१८०७–१८८२):– सुप्रसिद्ध अमेरिकन कवि. याचा जन्म २७ फेब्रुवारी १८०७रोजीं पोर्टलॅण्ड येथें झाला. याचें शिक्षण बॉडोविन कॉलेजांत झालें; तेथें त्यानें अर्वाचीन भाषांच्या अभ्यासांत प्रशंसनीय प्रगती दाखविली. त्यामुळें त्याच कॉलेजांत त्याची अर्वाचीन भाषांच्या प्राध्यापकाच्या जागीं सन १८२६ सालीं नेमणूक झाली; परंतु प्रत्यक्ष कामाला सुरवात करण्यापूर्वीं तीन वर्षें युरोपमध्यें प्रवास करून आपल्या ज्ञानाला पूर्तता आणली व १८२९ सालीं कामावर रुजू झाला. १८३५ सालीं हॉवर्ड विद्यापीठानें त्याला अर्वाचीन भाषा व वाङ्मय यांची खुर्ची देऊन त्याचा बहुमान केला. याहि वेळीं प्राध्यापकाच्या कामाला प्रत्यक्ष सुरवात करण्यापूर्वीं त्यानें युरोपला जाऊन स्कॅंडिनेव्हियन भाषा व वाङ्मय यांचा अभ्यास केला. हॉवर्ड विद्यापीठांत तो १८५४ पर्यंत होता.

त्यानें विपुल साहित्य निर्माण केलें. Hymn to Night; A Psam of Life; The Village Blacksmith; Excelsior; Resignation; The Rainy Day; The Children; The Children's Honour हीं त्याचीं रम्य भावगीतें इंग्रजी वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांना सुपरिचितच आहेत. त्याच्या दीर्घकाव्यांत Evangeline; A Tale of Acadie; The Song of Hiawatha हीं उल्लेखनीय आहेत. त्यानें कांहीं भाषांतरित कविताहि लिहिल्या आहेत. The Poets and Poetry of Europe व डान्टेचे Divine comedy चें भाषान्तर यांत त्याचें भाषान्तर करण्याचें कौशल्य दिसून येतें. मृत्यु २४ मार्च १८८२.

सुसंस्कृत मातापितरांच्या पोटीं जन्म झाल्यामुळें त्याच्या बालपणीं त्याच्या मनावर चांगले संस्कार

झाले. तो स्वभावानें प्रेमळ, दुसऱ्याच्या दुःखानें दुःखित होणारा व निःस्वार्थी होता. त्याच्या भावगीतांत त्याच्या ह्या स्वभावाचें प्रतिबिंब पडलेलें आहे. त्याचें काव्य उदात्त असून ग्राम्यतेपासून अलिप्त आहे. तथापि सामान्य जनतेच्या सुखदुःखाशीं समरस होऊन काव्य लिहिलें असल्यामुळें बहुजन समाजाचा कवि म्हणूनच त्याची ख्याति आहे. त्यानें आपल्या काव्यांत प्रगट केलेलीं तत्त्वें नवीन नसलीं तरी तीं इतक्या साध्या रीतीनें, कळकळीनें व प्रभावानें व्यक्त केलीं आहेत कीं त्यांची पकड वाचकाच्या मनावर बसल्याशिवाय रहात नाहीं. उदात्त भावनांनीं ओथंबलेल्या त्याच्या श्रुतिमनोहर भावगीतांत वाचकांचें व श्रोत्यांचें मन मोहून टाकण्याचेंच नव्हे तर त्यांच्या उदात्त भावना चेतवण्याचेंहि सामर्थ्य आहे. त्यानें केलेली वाङ्मय-सेवा विस्तारानें व गुणानें महनीय अशीच आहे. त्याच्या काव्याची मोहिनी केवळ अमेरिकन जनतेवरच पडली असें नसून युरोपांतील जनताहि त्याच्या काव्यावर लुब्ध झाली. केंब्रिज व ऑक्सफर्ड या विद्यापीठांनीं अनुक्रमें एलएल. डी. व डी. सी. एल. या पदव्या देऊन त्याचा गौरव केला. त्याच्या मृत्यूनंतर वेस्ट मिनिस्टर ॲबेमधील कवींच्याकरतां राखून ठेवलेल्या जागेंत त्याचा अर्ध पुतळा ठेवून इंग्लिशांनीं दुसऱ्या कोणाहि अमेरिकनाचा झाला नसेल इतका त्याचा सन्मान केला. युरोपीयन देशांतील संस्कृती व वाङ्मय यांचा सखोल अभ्यास करून त्यांचा परिचय स्वदेशबांधवांना करून देऊन अमेरिकन राष्ट्राची सांस्कृतिक दृष्ट्या त्यानें सेवा केली. आपल्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांना व्याख्यानद्वारां युरोपीयन वाङ्मयाच्या स्वरूपाची व त्यांतील सौंदर्य-स्थलांची ओळख करून देऊन त्यांची दृष्टी विशाल करण्याची महनीय कामगिरी त्यानें केली.

व

वकफः—वकफ हा मुसलमानी कायद्यांतील एक देणगीचा प्रकार आहे. कोणाहि मुसलमान व्यक्तीनें आपल्या मालकीची स्थावर अगर जंगम मिळकत मुसलमानी कायद्यानें धार्मिक म्हणून मानलेल्या कोणत्याहि कारणास्तव निरंतरची अर्पण केली असतां, त्या देणगीच्या प्रकाराला वकफ म्हणतात. मशीदी बांधणें, मशीदींत प्रार्थना चालविण्याकरितां इमामांची नेमणूक करणें, शिक्षणसंस्था स्थापणें, पूल व धर्मशाळा बांधणें, गोरगरीबांना अन्नसंतर्पण करणें, गरीबांना मक्केची यात्रा करण्याला सहाय्य करणें, सार्वजनिक व खासगी ठिकाणीं कुराणांचीं पारायणें करविणें वगैरे बाबी मुसलमानी कायद्यानें वकफ करण्याच्या दृष्टीनें धार्मिक मानिल्या आहेत.

कोणतीहि देणगी धर्मबुद्धीनें द्यावयाची ती संपूर्णपणें व निरंतर उपयोगाकरतांच द्यावयाची असते. दात्यानें 'तन्न मम' म्हणून स्वत्वनिवृत्ति केली म्हणजे त्याला त्या मिळकतीचा उपभोग घेतां येत नाहीं व त्यानें देणगी दिलेल्या मिळकतींत स्वतःचा हक्क राखून ठेवला असेल तर स्वत्वनिवृत्ति केली असें होत नाहीं. परंतु वकफच्या बाबतींत हें तत्त्व लागू पडत नाहीं. वकफ म्हणजे धर्मबुद्धीनें दिलेली देणगी खरी, तथापि मुसलमानी कायद्यानें हनफी मुसलमानाला वकफ केलेल्या मिळकतींत आपल्या हयातीपर्यंतचा हक्क राखून ठेवण्याची मुभा दिली आहे. हनफी मुसलमान वकफच्या मिळकतींतून आपलें कर्ज भागविण्याचीहि योजना करूं शकतो. मात्र त्या मिळकतीचा अंतिम उपयोग गोर-गरीबांकरितां अगर धार्मिक कारणास्तव होईल अशी दात्यानें योजना केलेली असली पाहिजे. हनफी अगर दुसऱ्या कोणत्याहि पंथाचा मुसलमान आपले कुटुंबीय, मुलें व वंशज यांच्या पोषणार्थ वकफ निर्माण करूं शकतो; परंतु शेवटीं केव्हां ना केव्हां तरी धार्मिक कारणांकरितां अगर गरीबांच्याकरितां त्या मिळकतीचा विनियोग करण्याची योजना झाली असली पाहिजे. दात्याचा निर्वंश होईपर्यंत धार्मिक योजना अंमलांत यावयाची नाहीं असें जरी दात्यानें वकफ करतेवेळीं ठरविलें असलें, तरी त्या कारणास्तव वकफ रद्द होत नाहीं.

कोणीहि समज असलेला सज्ञान मुसलमान आपल्या मिळकतीचा वकफ करूं शकतो. या बाबतींत याप्रमाणेंच तो सज्ञान होतो कीं नाहीं हें ठरवावयाचें.

वकफ तोंडीं अगर लेखी करतां येतो. दात्याच्या हयातींत अंमल होईल अशाप्रकारें वकफ करतां येतो. त्याप्रमाणें मृत्युपत्रानेंहि वकफ करतां येतो. परंतु मृत्युपत्रानें कोणीहि मुसलमान आपल्या मिळकतीच्या एक तृतीयांशापेक्षां अधिक मिळकत देऊं शकत नाहीं. त्या बाबतींत त्याच्या वारसांची संमति लागते. ती त्याच्या मृत्यूनंतरच द्यावयाची असते. वकफच्या बाबतींत हाच नियम लागू पडतो.

वकीलः—वकीलाचे न्यायमंदिरांत पक्षकारातर्फे काम चालविणारा वकील व परराष्ट्रीय वकील असे दोन

प्रकार आहेत. ज्याला प्रांतांतील हायकोर्टाकडून वकिली करण्याची सनद देण्यांत आली असते त्याला त्या सनदेंत नमूद केलेल्या स्थलसीमेंतील कोर्टांत वकिली करण्याचा अधिकार असतो. विद्यापीठाच्या कायद्याविषयींच्या परीक्षा पास झालेल्यांना किंवा हायकोर्टानीं अगर बार कौन्सिलनें चालविलेल्या परीक्षा पास झालेल्यांना वकिलीची सनद मिळते. मुंबई आणि कलकत्ता आणि मद्रास येथील हायकोर्टांना ओरीजिनल साईड व अॅपेलेंट साईड अशा दोन बाजू आहेत. विद्यापीठाची एल्एल्. बी.ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना अथवा बार कौन्सिलची अॅडव्होकेटची परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना ओरिजिनल साईडवर काम करण्याची सनद तात्काल मिळत नाहीं; त्यांनीं ओरिजिनल साईडच्या अडव्होकेटची परीक्षा दिली तर त्यांना ओरिजिनल साईडवर काम करण्यास परवानगी मिळते. शिवाय ही परीक्षा न दिलेल्या पण जुन्या मुरब्बी हायकोर्ट वकिलांना ओरिजिनल साइडवर काम करण्याची परवानगी मिळते.

परराष्ट्रीय वकील–एका राष्ट्राच्या प्रमुखानें दुसऱ्या देशांत पाठविलेला आपल्या देशाचा प्रतिनिधि. हा आपल्या देशांतील अव्वल दर्जाचा मंत्री असतो. त्यानें ज्या देशांत तो वकील म्हणून राहतो त्या देशाच्या सरकारशीं आपल्या राष्ट्राचे हितसंबंध असलेल्या बाबतींत बोलणें करून राष्ट्रहिताचें संरक्षण करावयाचें असतें. त्याला या बाबतींत विशेष अधिकार दिलेले असतात. ते त्याला दिलेल्या सूचनापत्रांत (Instructions), मुखत्यारनामा (Credentials) मध्यें नमूद असतात. मुखत्यारनामा मोहोरबंद लखोट्यांत असतो. तो लखोटा त्या वकिलाबरोबरच पाठविण्यांत येतो. ज्या देशाचा हा मंत्री असतो त्या देशाच्या प्रमुखाकडून ज्या देशांत तो वकील म्हणून रहावयाचा त्या देशाच्या प्रमुखाच्या नांवें हा लखोटा देण्यांत येतो. त्यांत हा परराष्ट्रीय वकील स्वतःच्या नांवें आपल्या राष्ट्राकरितां जें जें करील तें तें सर्व त्याच्या राष्ट्राकडून मान्य करण्यांत येईल असें आश्वासन असतें. ग्रेटब्रिटनमध्यें हीं पत्रें राजाच्या सहीचीं असतात. विशिष्ट प्रसंगीं विशिष्ट अधिकार देऊनहि वकील पाठविण्यांत येतात. हा परराष्ट्रीय वकील परराष्ट्रांत कायम नसतो. विशिष्ट कामापुरतीच त्याची नेमणूक असते. त्याचा दर्जा पहिल्या प्रकारच्या वकीलाहून कमी असतो

वज्रासनः–दोन्ही गुडघे जुळवून जमिनीवर टेकून दोन्ही हातांचे तळवे जमिनीवर समोरील बाजूस टेकून ओणवें व्हावें. दोन्ही पायांचा आंगठ्यापर्यंतचा भाग जमिनीस लावावा. दोन्ही गुडघे, पिंढऱ्या, टाचा व आंगठे एकमेकांस लावावे. दोन्ही टाचांवर दोन्ही कुल्ले टेकून त्यावर बसावें. सर्व शरीर ताठ करून छाती वर उचलून धरावी. दोन्ही हातांनीं छातीशीं नमस्कार करावा. अगर दोन्ही हात ताठ करून परस्पर गुडघ्यांवर तळवे ठेवावे.



वज्रासन

सुप्तवज्रासन–(१) वरीलप्रमाणें वज्रासन करून पाठीचा भाग मागें नेऊन जमिनीवर मत्स्यासनाप्रमाणें निजावें. हातांनीं डोक्यास विळखा घालावा. हनुवटी छातीस खेटावी. पाठीचा सर्व कणा जमिनीपासून उचललेला असावा. (२) टाचांवर कुल्ले न टेकतां दोन्ही टाचा मांड्याबाहेर काढून घ्याव्या व त्या मांड्या लगत ठेवून पावलें जमिनीस, आंगठे खांद्याच्या दिशेकडे करून जमिनीस टेकावीं. बाकीची सर्व कृति पहिल्याप्रमाणेंच करावी.

या आसनांनीं शरीराचा दोंदिलपणा जाऊन पोट व नळ साफ होतात.

वडेः–डाळीच्या पिठाच्या वड्या हा लेख पाहा. पृष्ठ ८९०.

वतनः–'वतन' या शब्दाची व्याख्या मुंबई सरकारच्या वतनासंबंधींच्या कायद्यांत दिलेली आहे. या कायद्याला 'दी बॉम्बे हेरिडिटरी ऑफिसीस अॅक्ट' अशी संज्ञा आहे; हेरिडिटरी ऑफीस म्हणजे वंशपरंपरा चालत आलेली सरकारी नोकरी. ही नोकरी चतुर्विध स्वरूपाची असतेः—(१) सरकारचा सारा वसूल करणें व तत्संबंधीं व्यवस्था पाहणें, (२) खेड्यांतील अंतर्गत स्वास्थ्य राखणें म्हणजेच खेड्यांतील पोलीसाचें काम करणें, (३) जमिनीच्या हद्दी ठरविणें (४) खेडेगांवांतील सिव्हिल अॅडमिनिस्ट्रेशनविषयक इतर बाबी सांभाळणें. पूर्वीच्या बारा बलुतेदारांपैकीं पाटील, कुलकर्णी, चौगला, तळवार, वगैरे नोकर अशा

स्वरूपाची नोकरी करणारे आहेत. वतनांत वर सांगितलेल्या प्रकारची नोकरी व तत्संबंधींचे हक्क व वतनमिळकत यांचा समावेश होतो. प्रत्येक वतनांत वतनमिळकत असतेच असें नाहीं. खेडेगांवच्या राज्यव्यवस्थेसंबंधींची वर सांगितलेल्या प्रकारची नोकरी, तीसंबंधींचे हक्क व अधिकार व वतन मिळकत (असेल तर) या सर्व गोष्टी मिळून 'वतन' होतें. वतन मिळकत स्थावर अगर जंगम असूं शकेल. ती नोकरी करणाऱ्या घराण्यांत वंशपरंपरा चालते. नोकरीचा मुशाहिरा म्हणूनच ती देण्यांत येते. देशाच्या निरनिराळ्या भागांत नोकरीकरतां perquisites लादण्याची पद्धती होती. ही पैशाच्या अगर धान्याच्या स्वरूपांत वसूल करण्याची वहिवाट असे. या हक्काचाहि वतनमिळकतींत समावेश होतो. कित्येक ठिकाणीं पाटील व इतर गांवकामगार यांना वतनमिळकतींतून मिळण्याचें उत्पन्न मुशाहिऱ्यादाखल अपुरें पडत असल्यामुळें सरकारकडून त्यांना जादा मुशाहिरा मिळतो. त्याचाहि वतनमिळकतींत समावेश होतो.

वनस्पती:—वनस्पतींचा वर्ग फार मोठा आहे. उघड्यावर असणाऱ्या दगडावर बुरशीसारख्या उगवलेल्या पदार्थापासून ते मोठमोठ्या वृक्षांपर्यंतचीं सर्व झाडेंझुडपें, वेल, वेली, शेवाळीं, नेचे किंवा राजहंस (फर्नस्), कुत्र्याच्या छत्र्या इत्यादि सर्व वनस्पती या सदराखालींच येतात.

वनस्पतींचीं मुख्य लक्षणें अशीं—१ त्यांना लागणारे अन्न द्रवरूपानें (रस) त्यांच्या सर्व अंगोपांगांतून फिरतें. २ त्यांना लागणारें अन्न म्हणजे पाणी, क्षार व हवेंतील कार्बन डायॉक्साइड हे पदार्थ होत. सर्व वनस्पती ऑक्सिजन बाहेर टाकतात. ३ प्राण्यांप्रमाणें मलोत्सर्गासाठीं त्यांना विशिष्ट अशीं इंद्रियें नसतात. ४ सर्वसाधारण त्यांचें आयुष्य पुष्कळ असतें. अमेरिकेंतील एक वृक्ष ४००० वर्षे जगला होता यावरून वनस्पतींच्या दीर्घायुष्याची कल्पना येईल. ५ त्यांच्या शरीरांतील पेशी या कवचयुक्त असतात. एखाद्या वृक्षाचें वाळलेलें खोड नीट तपासून पाहिलें तर असें आढळून येतें कीं, त्यांतील पेशी मधमाशीच्या पोंवळ्यासारख्या असतात व त्यांतील जीवनरस नाहींसा झाल्यामुळें त्या वाळून गेलेल्या असतात. ६ वनस्पतींत सावयव व निरवयव असे दोन प्रकार आहेत. ७ वनस्पती आपल्या पानावाटें श्वासोच्छ्वास करीत असतात. ८ वनस्पतीना संवेदना (स्पर्श), प्रकाश व उष्णता इत्यादि जाणण्याची शक्ति असते. याशिवाय आहार—निद्रा—भयमैथुनादि अनुभविण्याची शक्ति व इच्छा असते असें आतां सिद्ध झालेलें आहे. ९ वनस्पति आपलें अन्न ऑक्सिजन, कार्बन हवेंतून व नायट्रोजन, अमोनिया इत्यादि पाण्याबरोबर मुळ्यांच्या रूपानें शोषून घ्यावें लागतें. वनस्पतींना मिळणाऱ्या पाण्यांत जर लोह नसेल तर त्यांना हिरवा रंग येत नाहीं. १० कांहीं वनस्पती परोपजीवी म्हणजे दुसऱ्या एखाद्या वेलीवर किंवा वृक्षाच्या जीवनावर जगणाऱ्या अशा असतात. उदा० बांडगुळें, टवळी. ११ वनस्पतींना आवश्यक अशा जीवनद्रव्यांतील एखादें कमी झालें कीं, त्यांना कांहीं रोग होतात, व तें खोड किंवा पानांचे मागचे भाग यांवर पुरळ, तांबेरा व रंगबदल याप्रकारें दिसून येतात. १२ कांहीं वनस्पती कीटक खातात. १३ स्त्रीकेंसर व पूकेंसर तसेंच नरपिंड व स्त्रीपिंड यांच्यायोगें नव्या रोपांच्या बींचें उत्पादन होतें. वनस्पतींच्या फळांतील, फुलांतील किंवा बोंडांतील बीं वाऱ्याच्या योगानें, पक्ष्यांच्यामुळें किंवा प्रत्यक्ष मनुष्यानें त्याची लागवड करून नव्या वनस्पति फुलवतां येतात. कांहीं वेली व वृक्ष यांच्या फांद्यांचे लहानलहान तुकडे जमिनींत रुजवूनहि नवी लागवड करतां येते. कित्येक वेळीं वाऱ्याप्रमाणें पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहात जाऊन दूर कोठें तरी वनस्पतीचें बीं जातें व नैसर्गिक क्रियेनें तें बीं रुजतें. १४ कांहीं वनस्पती दुसऱ्या एकाद्या वृक्षाच्या फांदीवर उगवतात पण त्या वृक्षाच्या जीवनरसावर बांडगुळाप्रमाणें न जगतां हवेंतून जीवनद्रव्यें स्वतः शोषून जगतात; व 'स्वतः जगा व दुसऱ्यास जगूं द्या' या न्यायानें वृक्षावर राहतात. १५ वनस्पती केवळ जमिनीवरच उगवतात असें नाहीं, तर त्या समुद्राच्या तळाशींहि म्हणजे केवळ पाण्यांतहि जगतात. १६ सर्व वनस्पति अचर आहेत.

वनस्पतींचे अनेक वर्ग शास्त्रज्ञांनीं केलेले आहेत. अनेक वनस्पतींना कांटे असतात. कांहीं वनस्पतींचा डिंक उपयोगी असतो. पुष्कळ वनस्पती औषधाच्या दृष्टीनें अत्यंत उपयोगी आहेत. वनस्पतींच्या रंगीबेरंगी फुलांनीं सृष्टीची शोभा तर वाढतेच, पण फुलांच्या निरनिराळ्या मोहक आकारांमुळें मन थक्क होतें. कांहीं फुलांना वास असतो. निरनिराळ्या जातींच्या फुलांचा वासहि गोड व मोहक असतो. फुलांपासून अत्तरें काढतां येतात. याशिवाय पुष्कळ फुलांमधून मध

निघतो. मधमाशांचा उद्योग मध जमविण्याचा व त्याचा पोंवळ्यांत संग्रह करण्याचा असतो हें सर्वांस माहीत आहेच. याशिवाय फुलपांखरें व मुंगेहि मध खातात. कलम करून दोन वनस्पतींपासून तिसरी वनस्पति निराळ्या गुणधर्मांची अशी तयार करतां येते. मोठमोठ्या वृक्षांच्या लांकडांचे फायदे तर हरघडी आपल्या प्रत्ययास येतात.

वराहमिहिर (स. ४९०):–सहाव्या शतकांतील अनेक शास्त्रांवर विचार करणारा आर्यभट्टानंतरचा ज्योतिषी. विक्रमादित्याच्या नऊ रत्नांपैकीं एक आदित्यदास हें याच्या बापाचें नांव. यानें दृक्प्रत्ययानुसार अयनबिंदु निश्चित केले. याच्या वेळेपासूनच वर्षाऋतूची प्रवृत्ति आषाढाआरंभीं मानूं लागले. तत्पूर्वी श्रावणांत वर्षाऋतूचा आरंभ मानीत असत. यानें पंचसिद्धांतिक, बृहज्जातका, लघुजातक, योगयात्रा, विवाहपटल, समाससंहिता व बृहत्संहिता हे ग्रंथ लिहिले.

वरुणः–या ग्रहाला इंग्रजींत नेपच्यून म्हणतात. हर्षल अगर प्रजापतीप्रमाणें याचें अस्तित्व गेल्या शंभर वर्षांत लोकांच्या निदर्शनास आलें. हर्षलप्रमाणेंच हाहि पापग्रहच आहे. हा ग्रह चौदा वर्षें एका राशींत राहतो. याचें व हर्षलचें अधिक संशोधन झालें तर फलज्योतिषांत क्रांति होईल. या दृष्टीनें नवसारीचे 'माधवीवसंत' यांचें 'हर्षल व नेपचून' हें पुस्तक अत्यंत वाचनीय आहे. नेपचून हा आध्यात्मिक उन्नति दर्शविणारा ग्रह आहे. नवमांत मीन राशीचा वरुण मोठमोठे प्रवास घडवितो. चंद्राचा शुभयोग असेल तर अंतःस्फूर्ति, दैवी प्रेरणा इत्यादि गोष्टी फार चांगल्या अनुभवास येतात. हा ग्रह फसवा असल्यानें मिथुन या द्विस्वभाव राशींत अगर तूळ, कुंभ या बौद्धिक राशींत असतां त्या माणसावर विश्वास कधींहि ठेवतां येत नाहीं. लग्नीं व सप्तमांतील वरुण ठरलेलें लग्न अगदीं अकल्पितपणें मोडतो. पण लग्नीं वरुण असतां त्याची प्रवृत्ति स्वतःच्या निराशेंत दुसऱ्याचें मन वळवून समाधान करण्याकडे असते. हर्षलची प्रवृत्ति कठोर असून खुनापर्यंत मजल जाते.

मीन ही वरुणाची स्वगृहराशी आहे. वरुण अशुभ व्ययस्थानदर्शक असला म्हणजे तुरुंग, इस्पितळें, आजार, संन्यास, बुद्धिभ्रंश, हद्दपारी इत्यादि गोष्टी दर्शविल्या जातात. नवमांतील चंद्रदृष्ट वरुण उत्तम स्वप्नसृष्टीचा अनुभव देऊन स्वप्नामधून माणसास आगामी गोष्टींची सूचना देतो व मित्रस्थिति असलेला वरुण अत्यंत लहरी व कल्पक मित्रांशीं गांठ घालतो. अशा माणसांना मैत्रीबद्दल जे अनुभव येतात ते जन्मभर स्वतःच्या लक्षांत राहण्यासारखे असतात.

वरेरकर, भार्गवराम विठ्ठल (१८८५-):– सुप्रसिद्ध नाटककार व वृत्तपत्रकार. श्री. वरेरकरांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत १८८५ सालीं झाला. त्यांचें प्रारंभींचें शिक्षण रत्नागिरी जिल्ह्यांतच झालें व ते पोस्ट खात्यांत नोकरीला राहिले. पण त्यांच्या



भा. वि. ऊर्फ मामा वरेरकर

साहित्यविषयक अभिरुचीला हें एकतंत्री, यांत्रिक काम फार काळ रुचणें शक्य नव्हतें. त्यांनीं पोस्ट खात्यांतली आपली नोकरी सोडली आणि ते मुंबईस आले. त्यांचें 'कुंजविहारी' हें पहिलें पौराणिक नाटक १९०७सालीं रंगभूमीवर आलें आणि त्या काळापासून गेल्या सुमारें २॥ तपांत त्यांनीं आपला केवढा तरी साहित्य-संसार निर्माण केला आहे. कोल्हटकर, खाडिलकरांसारखे लोकप्रिय नाटककार रंगभूमीवर तेजानें चमकत असतांनाच वरेरकरांनीं आपलें वैशिष्ट्य रंगभूमीवर प्रस्थापित केलें ही गोष्टच त्यांची थोरवी पटविणारी आहे. खाडिलकरांप्रमाणें त्यांनीं जळजळीत राजकीय प्रश्न पौराणिक पात्रांच्या मुखांतून रंगभूमीवर मांडले नाहींत किंवा कोल्हटकरांप्रमाणें त्यांनीं केवळ कल्पनारम्य(Romantic) नाटकांचा बाज निर्माण केला नाहीं असें असूनहि खाडिलकर–कोल्हटकरांप्रमाणेंच ते लोकप्रिय होऊं शकले याचें कारण त्यांची प्रगतिप्रियता व सामाजिक प्रश्नांविषयीं त्यांनीं दाखविलेली जागरुकता. समाजासमोर असलेले प्रश्न मोठ्या कौशल्यानें नाट्यसूत्रांत गुंफून ते लोकांपुढें मांडण्यांत श्री. वरेरकर मोठे निष्णात आहेत. प्रथमतः स्त्रियांच्या आणि अलीकडे दलितांच्या कैवाराचें कंकणच त्यांनीं हातीं बांधलें. ज्या कोल्हटकर संप्रदायांत त्यांची गणना होते त्याच्याशीं हें सुसंगत

असलें तरी स्त्रियांचा कैवार घेतांना त्यांनीं पुरुष-वर्गावर ओढलेले कोरडे पुष्कळ वेळां अस्थानीं वाटतात. आतांपर्यंत त्यांनीं सुमारें पंचवीस नाटकें व वीस कादंबऱ्या लिहिल्या आहेत. उत्तुंग कल्पनाशक्ति किंवा असामान्य रसोत्कटता त्यांच्या वाङ्मयांत प्रगट झाली नाहीं तरी खटकेदार, मार्मिक संवाद, नवनवें नाट्यतंत्र आत्मसात करण्याची त्यांनीं दाखवलेली तत्परता आणि साधी, वास्तव आणि प्रसादयुक्त भाषा यामुळें त्यांनीं विलक्षण लोकप्रियता संपादन केली आहे. विश्वविद्यालयीन पदवी नसतानांसुद्धां आपल्या परिश्रमानें आणि अभ्यासानें वाङ्मयक्षेत्रांत थोर पदवीस पोंचलेले श्री. वेरेरकर हे एकटेच साहित्यसेवक आहेत. आपल्या कोंकणभूमीविषयीं त्यांचा आदर असीम आहे.

वर्डस्वर्थ, विल्यम (१७७०–१८५०):–ब्रिटिश कवि. याचा जन्म कॉकरमाउथ येथें ७ एप्रिल १७७० रोजीं झाला. केंब्रिजमध्यें त्याचें शिक्षण झालें. १७९० मध्यें तो युरोपांत प्रवासाला गेला व एक वर्षभर फ्रान्समध्यें राहिला. फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल त्याला आरंभीं गाढ सहानुभूति होती. १७९३ मध्यें An evening walk व Descriptive Sketches या त्याच्या काव्यग्रंथांनीं तो प्रसिद्धीस आला. पुढें १७९८ मध्यें त्यानें व कोलरिज कवीनें Lyrical Ballads नांवाचा भावगीतांचा संग्रह प्रसिद्ध केला. याच सुमारास तो जर्मनींत प्रवास करून आला व ग्रासमीर गांवीं येऊन राहिला. १८०२ मध्यें त्यानें मेरी हचिन्सन हिच्याशीं लग्न केलें. १८१३ मध्यें तो रिडल माउंट येथें गेला व मरेपर्यंत याच गांवीं राहिला. साउदेनंतर १८४३ मध्यें तो राजकवी झाला. २३ एप्रिल १८५० रोजीं तो मेला.

Ode to Duty व Ode on Intimations of Immortality या कविता विशेष प्रसिद्ध आहेत. १९३५ पर्यंत त्यानें अनेक सुनीतेंहि लिहिलीं. The Prelude, Tintern Abbey, Sonnets Dedicated to Liberty हीं काव्यें महत्त्वाचीं आहेत.

वर्डस्वर्थनें निसर्गांतील नयनमनोहर दृश्यें व ग्रामीण जीवनांतील साधेसुधे प्रसंग यांवर सहजसुंदर भाषेत अनेक कविता लिहिल्या. निसर्गांतील दृश्यांत त्याला येणारा ईश्वराच्या अस्तित्वाचा प्रत्यय व सर्व मानव एक होत या तत्त्वावरील त्याची निष्ठा या गोष्टी त्याच्या अनेक कवितांत उत्तम रीतीनें प्रगट झाल्या आहेत.

वर्णव्यवस्था:–वर्णव्यवस्था हें हिंदु समाजाचें वैशिष्ट्य आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण आहेत. ही वर्णव्यवस्था मूळ शास्त्रांनीं गुणकर्मावरूनच केल्यामुळें या वर्णव्यवस्थेंत सांप्रतच्या अठरापगड जातींचा समावेश होत नाहीं. वर्णव्यवस्था शास्त्रीय आहे. जातीभेद अशास्त्रीय आहेत. वर्णव्यवस्था कोणत्याहि परिस्थितींत रक्षणीय तर जातिभेद कोणत्याहि परिस्थितींत असमर्थनीय. सांप्रतची जातिव्यवस्था हिंदुधर्माच्या वर्णव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वाविरुद्ध आहे. सांप्रतकालीं गुणकर्मावरूनच वर्णव्यवस्था होणें समाजधारणेच्या दृष्टीनें इष्ट आहे.

वर्ष:–कालगणनेचें एक प्रमाण. कालगणनापद्धति निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या आहेत. हिंदूंची वर्षाची कालगणना पुढें दिल्याप्रमाणें आहे. ६० विपळें = १ पळ. ६० पळें = १ घटिका. २ घटिका = १ मुहूर्त. ३० मुहूर्त किंवा ६० घटिका = १ दिवस. (रात्र व दिवस मिळून किंवा अहोरात्र). १५ दिवस = १ पक्ष. २ पक्ष = १ महिना. २ महिने = १ ऋतु. ३ ऋतु किंवा ६ महिने = अयन. २ अयनें किंवा १२ महिने = १ वर्ष. (३६० दिवस). इंग्रजी किंवा युरोपियन पद्धतीप्रमाणें मानलेलें वर्ष (Sidereal) पृथ्वीला सूर्याभोंवतीं एक प्रदक्षिणा करावयास जेवढा काल लागतो तेवढ्या कालाचें म्हणजे ३६५ दिवसांचें मानतात. वस्तुतः हा पृथ्वीप्रदक्षिणेचा काल ३६५ दिवस ६ तास ९ मिनिटें व ९ सेकंदें इतका असतो; पण सोईसाठीं वरचे तास मिनिटें सोडलीं आहेत. आपल्याप्रमाणेंच १२ महिन्यांत वर्ष विभागलें असून त्याची कालगणना पुढें दिल्याप्रमाणें करतात. ६० सेकंद = १ मिनिट. ६० मिनिटें = १ तास. २४ तास = एक दिवस (अहोरात्र). इंग्रजी पद्धतींत वर्षाचे ३६५ दिवस धरल्यानें १२ महिन्यांत सर्व दिवसांची बरोबर विभागणी करतां आली नाहीं म्हणून जानेवारी, मार्च, मे, जुलै, ऑगष्ट, आक्टोबर व डिसेंबर या महिन्यांचे ३१ दिवस, फेब्रुवारीचे २८ व एप्रिल, जून, सप्टेंबर व नोव्हेंबर महिन्याचे ३० दिवस याप्रमाणें विभागणी केलेली आहे. एवढें करूनहि गणित चुकतें म्हणून दर चार वर्षांनीं फेब्रुवारीचे २९ दिवस धरतात ('लीप इयर' पाहा). येशू ख्रिस्ताच्या जन्मदिवसापासून हा सन धरतात.

ज्यू व मुसलमान बारा चांद्रमासांचें वर्ष धरतात. ज्यू लोकांचें ३५४ दिवसांचें वर्ष होतें. पण सौरमानपद्धतीप्रमाणें दिवस जुळावे म्हणून कांहीं नियमानुसार

विशिष्ट कालानंतर एकदां ३८४ दिवसांचें वर्ष धरतात. मुसलमानांचें वर्षहि ३५४ दिवसांचें असतें. चांद्रमासाप्रमाणें यांची कालगणना होत असल्यामुळें त्यांचे केव्हां २९ तर केव्हां ३० असे महिन्याचे दिवस होतात.यांच्यां या कालगणनेप्रमाणें सौरमान पद्धतीप्रमाणें होणाऱ्या ३२ वर्षांनीं त्यांचें एक वर्ष वाढतें, म्हणजे त्यांचीं ३३ वर्षें होतात. मुसलमानांचे महिने क्रमानें १ मोहरम, २ सफर, ३ रबिलावल, ४ रबिलाखर, ५ जमादिलावर, ६ जमादिलाखर, ७ रजब, ८ साबान, ९ रमजान, १० सवाल, ११ जिल्काद, १२ जिल्हेज, हे होत

हिजरी सन—महंमद पैगंबर ज्या दिवशीं मक्केहून पळाले त्या दिवसापासून हा सन धरतात.

फसली वर्ष—फसल या शब्दाचा अर्थ पेरणें, शेती करणें असा आहे. इ. स. १६३६ मध्यें शहाजहान बादशहानें दक्षिणेंत पण पूर्वी अकबरानें ही कालगणनापद्धती प्रथम अंमलांत आणली. फसली याला फारसी असेंही नांव आहे. या सनाचा आरंभ मृगनक्षत्रापासून म्हणजे साधारणतः जूनच्या ७-८ तारखेपासून होतो. फसली वर्षाची कालगणना सौरमानाप्रमाणें आहे. त्यांचें अनुक्रमें महिने व पुढें कंसांत त्यांचे दिवस दिले आहेत—

१ आजूर (३०), २ दय (२९), ३ बहमन (३०), ४ इसपिंदाद (३०), ५ फरवर्दी (३१), ६ आर्दिबेहस्त (३१), ७ खुर्दाद (३१), ८ तीर (३१), ९ अमरदाद (३१), १० हाहरेवार (३१), ११ मेहेर (३०), १२ आबास (३०). हा सन आरंभीं इ.स. ५९०मध्यें सुरू झाला.

आरबी वर्ष—याला सुरूसन किंवा शादुरसन अशीं दुसरीं नांवें आहेत. इ. स. ५९९ मध्यें या सनाची सुरवात अरबस्तानांत झाली. या कालगणनेप्रमाणें वर्ष सौरमान पद्धतीनें मोजतात, तर महिना चांद्रमान असतो. मृग नक्षत्र सुरूं झालें कीं हें वर्ष सुरूं होतें. दर तीन वर्षांनीं तेरा महिन्यांचें वर्ष मानतात.

सप्तर्षी वर्ष—काश्मीरकडे चालू आहे. सप्तर्षींच्या गतीवर हें वर्ष आधारलेलें आहे. सप्तर्षींना एक नक्षत्र ओलांडण्यास १०० वर्षें लागतात. तेव्हां १०० वर्षांनंतर पुन्हां एक दोन याप्रमाणें कालगणना सुरू होते. महिने आपल्याप्रमाणेंच, पण महिन्याचा पहिला दिवस वद्यप्रतिपदा व शेवटचा दिवस पौर्णिमा.

बंगाली वर्ष—मेष संक्रांतीला सुरूं होणाऱ्या महिन्यास वैशाख समजून बाकी आपल्याप्रमाणेंच कालगणना करतात. महिने आपल्यासारखेच आहेत. इ. स. ५९३ नंतर ही कालगणना किंवा शक सुरूं झाला.

कोल्लम वर्ष—यास परशुराम शक असेंहि नांव आहे. दक्षिणेकडे या पद्धतीनें कालगणना करतात. मलबारमध्यें आपल्या भाद्रपदापासून व इतरत्र श्रावण महिन्यापासून वर्षाची सुरवात होते. महिन्यांचीं नांवें राशीवरून दिलेलीं आहेत.

यानंतर आपल्या कडील दोन शकांची माहिती अशी—१ शालिवाहन २ विक्रम. पैठणास शालिवाहन नांवाचा पराक्रमी राजा होऊन गेला त्यानें आपल्या नांवानें इ. स. ७८ मध्यें शक किंवा वर्षगणनापद्धति सुरू केली. या शकाचा आरंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेस होतो. हा शक सध्यां महाराष्ट्रांत चालू आहे. ज्या ज्या ठिकाणीं शकाचा उल्लेख असतो तेव्हां तो शालिवाहन शकच समजावयाचा.

उज्जयनीस विक्रमादित्य राजानें इ. स. पूर्वी ५६–५७ वर्षी म्हणजे शालिवाहन शकापूर्वी १३५ वर्षें आपल्या नांवें शक सुरू केला, त्यास विक्रम संवत् म्हणतात. या वर्षाची सुरवात कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून धरतात. उत्तर हिंदुस्थानांत विक्रम संवत् चालू आहे. शिवाजी महाराजांनीं स्वतःला राज्याभिषेक करून घेतल्यावर इ. स. १६६४ पासून राजशक सुरू केला होता.

वर्षा (ऋतु):—श्रावण व भाद्रपद या दोन महिन्यांचा काल. यावेळीं कर्क व सिंह या राशींचा संक्रांतिकाल असतो. या ऋतूच्या वेळीं ऑगस्ट व सप्टेंबर महिने येतात.

वर्षा ऋतु हा भर पावसाळ्याचा काल असतो. पेरलेल्या धान्याचे कोंब जमिनीवर येऊन ते वाढीला लागलेले असतात. वृक्षवेलींना भरपूर पाणी मिळालेलें असल्यामुळें त्या टवटवीत दिसत असतात. उन्हाळ्यानें करपून गेलेल्या माळरानावर पुन्हां गवत उगवलेलें असतें. सर्व डोंगर हिरवेगार दिसतात व त्यांमधून झुळझुळ वाहणारे झरे, खळखळ करीत वाहणारे ओढे व दुथडी भरून चाललेल्या नद्या असें हें सृष्टीचें मनोहर स्वरूप, शिवाय पक्ष्यांची आनंदी वृत्ति व त्यांचे खेळ मनाला आनंद देतात.

नागपंचमी, श्रावणी, कृष्णाष्टमी, गणपत्युत्सव, अनंत चतुर्दशी इत्यादि महत्त्वाचे सण याच कालांत येतात. हिरवीं शेतें पाहून शेतकरी आनंदांत असतात. असा हा महत्त्वाचा ऋतु म्हणजे पुढच्या वर्षाच्या सुखाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे.

वल्लभाचार्य (१४७९–१५३१):– पुष्टीमार्गाचा संस्थापक. बापाचें नांव लक्ष्मणभट्ट व आईचें नांव एलमागार. विक्रम संवत् १५३५ मध्यें आईबाप काशीयात्रेला जात असतांना वाटेंतच वैशाख वद्य एकादशीस याचा जन्म झाला. याची वसती मथुरा व वृंदावन या ठिकाणीं कांहीं काल होती. यानें स्वप्नांतील दृष्टांताप्रमाणें गोवर्धन पर्वतावरील देवदमनरूपांत प्रगटलेल्या गोपाळकृष्णाचें दर्शन घेतलें व स्वप्नांतल्या कृष्णादेशाप्रमाणें यानें कृष्णाचें मंदिर उभारून पुष्टी-मार्गाची स्थापना केली व त्या मार्गाचा प्रसारहि केला.

यानें पंथप्रसारासाठीं संस्कृतांत बरेच ग्रन्थ लिहिले आहेत. या ग्रन्थांपैकीं वेदान्तसूत्र (अणुभाष्य), सुबोधिनी, तत्त्वदीप व सिद्धांतरहस्य हे प्रसिद्ध होत.

याचा वेदान्तविषयक सिद्धान्त–आदिपुरुषाला एकटें असणें बरें वाटेना म्हणून तो अचेतन सृष्टि, जीव व अन्तर्यामिन् आत्मा या रूपानें प्रगट झाला.

वसिष्ठः–मित्रावरुणाचा हा मुलगा. कुंभांत याचा जन्म झाला. याची बायको अरुन्धती. यानें कामधेनूच्या सहाय्यानें विश्वामित्राचा पराभव केला म्हणून त्यानें याचे शंभर पुत्र राक्षसाकडून मारविले. या आपत्तीनें वैतागून त्यानें स्वतःला बांधून घेऊन जीव दिला, पण तो या प्रसंगांतून वांचला. देण्याचा प्रयत्न केला.

कक्षसेनानें यास आपली संपत्ति दिली होती. यानें पक्षवर्धिनी एकादशीचें व्रत केलें होतें. याला इंद्रप्रस्थांतील सप्ततीर्थप्रभावानें महापवित्र पुत्र झाले. हा पुष्करक्षेत्रांतील ब्रह्मदेवाच्या यज्ञांत होतृगणांतील ऋत्विज होता. ईक्ष्वाकु वंशांतील हरिश्चंद्र,राम या राजांचा हा गुरु. विश्वामित्राच्या विनंतीवरून यानें रामाला सुप्रसिद्ध ' योगवासिष्ठ ' नांवाचा वेदान्तपर ग्रंथ सांगितला. याशिवाय ३० अध्यायांची एक स्मृति आहे. आणखीहि ७–८ ग्रंथ याच्या नांवावर मोडतात. वसिष्ठ हें कुल असून वसिष्ठ ३–४ तरी झाले असावेत असें अनेकांचें म्हणणें आहे.

वसुदेवः–कृष्णाचा बाप. शूर राजाचा हा सर्वांत थोरला मुलगा. देवांनीं याच्या जन्मकालीं दुंदुभि वाजविल्या म्हणून याला आनकदुंदुभि म्हणत. नारदा-बरोबर याचा भक्तिपर संवाद झाला आहे. याच्या अश्वमेधाचा घोडा शिशुपालानें पळविला होता. कंसाची बहीण देवकी हिच्याबरोबर याचें लग्न झालें होतें. यास भद्रा,रोहिणी व मदिरा या आणखी बायका होत्या. याच्या मुलापासून आपल्याला मरण येणार या देववाणीमुळें कंसानें बायकोसह याला तुरुंगांत ठेविलें होतें. तेथें याला कृष्ण झाला. पूर्वीचीं सर्वच मुलें कंसानें मारलीं म्हणून यानें त्याला गोकुळांत गुप्तपणें पोंचवून त्याचें रक्षण केलें. याच्या सर्वच मुलांत रोहिणीचा राम व देवकीचा कृष्ण हे दोन मुलगे व सुभद्रा हीं तीन मुलें विशेष प्रसिद्धीला आलीं. रामकृष्णाच्या नंतर हा मरण पावला. याच्याबरोबर याच्या चारी स्त्रिया सती गेल्या.

वस्त्रप्रावरणः–आपल्या कपड्यांची उत्क्रांति ऐतिहासिक दृष्टीनें कसकशी होत आली हें चित्रें घालून प्रस्तुत लेखांत विवेचन करणार होतों. पण युद्धामुळें चित्रापायीं खर्च वाढूं लागल्यामुळें पूर्वीचा बेत रहित करणें भाग पडत आहे.

वसंत (ऋतु):–चैत्र व वैशाख या दोन महिन्यांचा काळ. यावेळीं मीन व मेष या राशींच्या संक्रांतीचा काल असतो. इंग्रजी महिन्याप्रमाणें एप्रिल, मे या दोन महिन्यांचा काल असतो.

वसंत ऋतु हा हिंदू पंचांगाप्रमाणें पहिला ऋतु आहे. याला ऋतुराज असें म्हणतात. कारण या ऋतूंत शिशिर ऋतूच्या थंडीचा काल संपून उन्हाळा सुरूं झालेला असतो. थंडीमुळें गळलेलीं झाडेंझुडुपें पुन्हां पल्लवित झालेलीं असतात. नव्या पालवीच्या तांबूस पिंवळ्या रंगामुळें वृक्षवेलींना सोनेरी रंग चढतो, व नवजीवन प्राप्त होतें. वसंत ऋतूची अधिष्ठात्री देवता विष्णु ही आहे. यासच वसंतमाधव असेंहि म्हणतात, व त्याप्रीत्यर्थ ब्राह्मणांची पूजा व मंत्रजागर करण्याची पद्धति रूढ आहे.

वसंत ऋतूच्या प्रारंभापासून अखेरपर्यंत उन्हाळ्याची तीव्रता वाढती असते. या ऋतूच्या उत्तरार्धांत वळ-वाचे पाऊस पडतात व ते उन्हाळ्याची तीव्रता कमी करतात. या पावसांचा कोरड्या पडलेल्या विहिरींच्या पाण्यासाठीं चांगला उपयोग होतो. शेतीच्या दृष्टीनेंहि हे पाऊस आवश्यक असतात.

वांगें:–भाजीचें फळ. हें फळ चोहोंकडे होत असल्या-मुळें सगळ्यांस या फळाचा परिचय आहे. वांग्याला

जरी कसलीही जमीन चालत असली तरी सकस व निचरा होणाऱ्या जमिनींत या फळाची निष्पत्ति पुष्कळच होते. हें झाड मोठ्या व पुष्कळ फळांचें असल्यामुळें, त्यास खताचा मुबलक पुरवठा करावा लागतो. गुजराथेंत या झाडांना पेंड देतात व कोंकणांत मासळीचें खत उपयोगांत आणतात.

अभिवृद्धि—बियांपासून रोपें तयार करून त्यायोगें करतात. रोप तयार होण्यास ३०-४० दिवस लागतात. रोप ५-८ इंच उंचीचें झाल्यावर तें लावण्यास योग्य होतें. रोपांमधील अंतर २×३ किंवा ३×३ फूट असावें. लागण सपाट वाफ्यांत किंवा सरीवर करितात. पावसानंतर कोंकणांत वांग्याची अभिवृद्धि होऊं शकते. जर पावसाळ्यांत लागण करावयाची असल्यास ती 'वेलवांग्याची' करावी.

वांग्याच्या पुष्कळ जाती आहेत. त्यांत बंगाली, डोरली, कृष्णाकांठीं या प्रसिद्ध आहेत. कांहीं जातीवर कांटे असून कांहींवर ते असत नाहींत. डोरलीं वांगीं उन्हाळ्यांत चांगलीं येतात.

या पिकास किडीपासून व रोग पडूनहि अपाय होतो. हा अपाय रोपांवर राख अगर गंधकाची पूड शिंपडल्यानें टळतो.

वाङ्मयः—वाङ्मयाविषयीं विचार करण्यापूर्वी तदनुषंगिक कांहीं अवांतर गोष्टींचा थोडक्यांत विचार केला तर त्याची वाङ्मयाचें स्वरूप समजावून घेण्याला फार मदत होईल.

वाङ्मय हा शब्द वाक्+मय या दोन घटकावयवांपासून बनला आहे. संस्कृतांतील वच् पासून वच्—वाक् हा शब्द साधिला असल्यामुळें व्युत्पत्तिदृष्ट्या जें बोललें जातें तें सारें वाङ्मयच होय.

वाङ्मय अस्तित्वांत येण्याला भाषा आवश्यक आहे. भाषा ही अर्थवाहक शब्दांपासून निर्माण झाली.शब्दांचा उच्चार करण्याला वाणीची आवश्यकता असते. वाणीची उत्पत्ति दैवी मानण्याची प्रथा पडून गेली आहे. ग्रंथाच्या आरंभीं वाग्देवीला नमन करण्याची पद्धत यामुळेंच पडली. ईश्वरी संकेतानुसार प्रथम ॐकार हा शब्द उच्चारिला गेला, व या ॐकारांतूनच इतर अक्षरें निर्माण होऊन त्यांचे पुढें शब्द बनले व त्यांतून पुन्हां शब्दब्रह्म अवतीर्ण झालें.

परन्तु वाक्शक्तीचा शास्त्रीय दृष्टीनें विचार केला तर असें आढळून येईल कीं वाणीची उत्पत्ति जीवनकलहांतूनच झाली आहे. मनुष्याचा पहिला शब्द श्रमनिदर्शक असण्याचा जितका संभव आहे तितकाच तो भावनानिदर्शक असण्याचाहि संभव आहे. पशुपक्ष्यांच्या आवाजांचें अनुकरण करीत असतांनाहि तो बोलायला शिकला असेल. पशुपक्ष्यांचीहि त्यांना समजणारी भाषा आहे असें कांहीं शास्त्रज्ञ प्रतिपादन करितात. मनुष्यप्राणि हा जीवसृष्टींतील उत्क्रांतीच्या सर्वांत वरच्या श्रेणींतील असल्यामुळें त्याला शब्दोच्चारांतील सूक्ष्म छटा प्रकट करून दाखविणें शक्य झालें व त्यांतूनच पुढें भाषा निर्माण झाली. पशुपक्ष्यांची भाषा असलीच तर हर्षरागादि भावना प्रकट करण्यापुरतीच तिची मर्यादा असणार; परंतु मनुष्यप्राणी हा शब्दांच्या सहाय्यानें आपल्या भावनाच प्रकट करूं शकतो असें नाहीं, तर विचारहि करूं शकतो; हेंच त्याचें वैशिष्ट्य आहे. प्रत्येक भाषेंतील शब्दसंपत्तीवरून ती भाषा बोलणारांचा सांस्कृतिक दर्जा ठरवितां येतो. ज्या भाषेंत शब्दसंपत्ति अधिक आहे त्यांची वैचारिक प्रगति अधिक झाली आहे असें समजावयास हरकत नाहीं. प्रत्येक शब्द हा कोणत्या तरी क्रियावाचक धातूपासून बनला आहे हें भाषाशास्त्रज्ञांचें किंवा कोशकारांचें मत सर्वस्वीं ग्राह्य धरितां येत नाहीं. कारण मनुष्याला पदार्थवाचक शब्दांची गरज आधीं उत्पन्न झाली असली पाहिजे, हें उघड आहे. लिपीची उत्पत्ति वस्तूंच्या आकृति काढण्याच्या मनुष्यकृत प्रयत्नांतून झाली असावी.

शब्दोच्चारांना चिन्हांच्या सहाय्यानें लेखनाचें स्वरूप देणें हा मानवी बुद्धिमत्तेनें लाविलेला एक क्रान्तिकारक शोध होय. कारण त्यामुळेंच मनुष्यमात्राला आपल्या विचारांना शाश्वत रूप देतां आलें; व त्यामुळें मानवी ज्ञानांत एकसारखी भर पडत जाऊन त्याची सुधारणा होत गेली. वाङ्मयाची अखंड परंपरा टिकविणें हें देखील या लेखनपद्धतीच्या शोधामुळेंच शक्य झालें आहे. लेखन हा शब्द लिख्‌पासून झाला आहे. लिख् म्हणजे ओरखडणें. यावरून प्रथम दगड, विटा' झाडांच्या साली वगैरे कठीण किंवा चिवट पदार्थांवर रेघा ओढून आपले पूर्वज अक्षरांच्या आकृति काढीत असत असें सिद्ध होतें. 'पुस्तकाचें पान' या शब्दप्रयोगांतील पान हा शब्द 'पर्ण' या शब्दापासून झाला आहे. तेव्हां पत्र व पर्ण यांसारख्या शब्दांवरून लिहिण्याकरितां पूर्वी झाडाचीं पानें वापरीत असत हें उघड आहे. प्राचीन काळीं ताडपत्रांचा लेखनाच्या

कामीं मोठ्या प्रमाणांत उपयोग करण्यांत येत असे हें आपणाला माहीत आहेच. लिप् म्हणजे लिंपणें. यापासूनच लिपि हा शब्द तयार झाला. वर्ण म्हणजे रंग. तेव्हां वर्णमालेंतील वर्ण या शब्दावरून लिहिण्याचे कामीं रंगाचा किंवा रंगयुक्त रसाचा उपयोग करण्यांत येऊं लागल्याचा हा रंगीत पुरावाच होय. भूर्जपत्रांनंतर कांहीं ठिकाणीं चामड्यावर लिहिण्याचा प्रघात पडला. पुढें कागद बनविण्याचा शोध लागल्यानंतर पोथ्या-पुस्तकांचा फैलाव मोठ्या प्रमाणांत होऊं लागला. छापण्याच्या कलेमुळें ग्रंथ विकत घेणें ही गोष्ट सामान्य मनुष्याच्याहि आटोक्यांतील होऊन बसली व बहुजन-समाजाला ज्ञानभांडार खुलें होऊन लोकांमध्यें वाङ्मयाचा व वाङ्मयाबरोबर ज्ञानाचा प्रसार झपाट्यानें होऊं लागला, व मनुष्याची सुधारणा व प्रगति होत गेली. वाङ्मयाचा विचार करितांना उपरिनिर्दिष्ट गोष्टींचा इतिहास लक्ष्यांत घेतला म्हणजे वाङ्मयसरितेच्या उगमस्थानाचा बोध होऊन तिला आजपर्यंत किती खडकाळ प्रदेशांतून आपला मार्ग काढावा लागला तें कळून येतें; व मानवी बुद्धीच्या कल्पकतेचें कौतुक केल्यावांचून राहवत नाहीं. हीच कल्पकता पुढें वाङ्मयांत कसकशी प्रकट आणि परिणत होत गेली हें आतां पहावयाचें. वाङ्मयाला आधारभूत जी भाषा तिचा संशोधनपूर्वक आणि चिकित्सक बुद्धीनें अभ्यास केला असतां मानवी इतिहासांतील कांहीं अत्यंत प्राचीन गोष्टींचा उलगडा होतो. अर्थात् वाङ्मयाचा ऐतिहासिक दृष्टीनें अभ्यास केला असतांना त्या त्या काळच्या सामाजिक परिस्थितीचा उलगडा होऊन मानवी संस्कृतीचीं आणि सुधारणेचीं स्थित्यंतरें कसकशीं होत गेलीं तें कळून येतें.

मनुष्य कळप करून राहूं लागल्यानंतर त्याला आपले विचार दुसऱ्याला कळविण्याकरितां भाषेची आवश्यकता वाटूं लागली व त्यांतूनच पुढें वाङ्मय उत्पन्न झालें. म्हणजे वाङ्मयाची उत्पत्ति जीवनकलहांतून झाली असेंच म्हणावें लागतें. मनुष्यमात्राच्या व्यक्तिविषयक आणि सामाजिक गरजा, भावना, अनुभव आणि आकांक्षा वाङ्मयांतून प्रत्यक्षाप्रत्यक्षरीतीनें प्रकट होतात. सुरवातीला मनुष्याला जिवन्त राहण्याकरितां पंचमहाभूतांशीं झगडावें लागलें; पुढें समाजरचना होऊन त्याच्या आयुष्याला थोडेंबहुत स्थैर्य आलें; पण त्याच्या सामाजिक गरजा वाढत गेल्या व त्यामुळें इतर भिन्न समाजाशीं त्याला दोन हात करावे लागले. वैदिक वाङ्मयांत पंचमहाभूतांवर देवत्वाचा आरोप करून ज्या प्रार्थना केलेल्या आढळतात व देवदानवांमधील लढायांचें जें वर्णन केलेलें आढळतें, त्यांवरून तत्कालीन प्राथमिक अवस्थेंत असलेल्या समाजाच्या कोणत्या गरजा आणि आकांक्षा होत्या तें दिसून येतें. पुढें जसजसे नवीन नवीन शोध लागले तसतशी समाजरचनाहि बदलूं लागली; व त्याबरोबर वाङ्मयाचें स्वरूपहि बदलूं लागलें. पशुपालन, यज्ञसंस्था, स्त्रीपुरुषसंबंधविषयक कल्पना, वैवाहिक नीतीचा प्रादुर्भाव व त्यांत होत गेलेले फरक, राजसत्ता, वर्णव्यवस्था, जातिभेद, सत्ताधारी वर्ग, भांडवलशाहीचा उगम, वर्गकलह इत्यादि सामाजिक स्थित्यंतरांचें जें प्रतिबिंब वाङ्मयांत पडलेलें आढळून येतें त्यावरून या वेगवेगळाल्या सामाजिक स्थित्यंतरांचा वाङ्मयाकडे पहाण्याच्या दृष्टिकोनावर व त्यामुळें वाङ्मयावर कसकसा परिणाम होत जातो तें दिसून येतें. उत्तम समजल्या जाणाऱ्या वाङ्मयाच्या वेगवेगळाल्या काळीं वेगवेगळाल्या कसोट्या कां ठरविण्यांत आल्या त्याचा उलगडा त्या त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीवरून करितां येतो. महाकाव्यांचीं लक्षणें कोणतीं, नाटकांतील नायक कोण असावा, कोणकोणत्या पात्रांच्या तोंडीं कोणकोणती भाषा घालावी, संतवाङ्मयांत भक्तिरसाला प्राधान्य कां दिलें गेलें, मोरोपंत व त्यांचे समकालीन पंडित कवि यांनीं रूपांतरित काव्यरचना करण्यांतच धन्यता कां मानिली, पेशवाईच्या अखेरीस लावण्या व पोवाडे यांना कां ऊत आला, इंग्रजांची राजवट सुरू झाल्यानंतर मराठी वाङ्मयांत बहुविधता कां आली इत्यादि वाङ्मयविषयक प्रश्नांचीं उत्तरें शोधून काढिलीं म्हणजे वाङ्मय हें समाजनिरपेक्ष किंवा परिस्थितिनिरपेक्ष कसें असूं शकत नाहीं हें कळून येतें.

कोणत्याहि राष्ट्राच्या वाङ्मयाचा इतिहास पाहिला म्हणजे त्यांत सुरवातीलाच काव्य-ग्रंथांची निपज झालेली दिसून येते. याचें एक कारण असें कीं, बुद्धिप्रधान वाङ्मयाचे आधीं भावनाप्रधान वाङ्मय निर्माण होतें. आधीं भावना, नंतर बुद्धि हा उत्क्रांतीचा नियम आहे. तेव्हां बुद्धिप्रधान वाङ्मयाचे अगोदर भावनाविष्काराला अधिक अनुकूल असें काव्य निर्माण होणें हें मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. दुसरें कारण असें कीं, ज्या काळांत लेखनकला अस्तित्वांत आली नव्हती व ती अस्तित्वांत आल्यानंतरहि छापखान्यांच्या अभावीं ग्रंथ जोंपर्यंत हातानेंच लिहावे लागत तोंपर्यंत कोणत्याहि प्रकारची

ग्रंथरचना स्मरणसुलभ व पठणसुलभ अशा वृत्तबद्ध काव्यांतून होणेंच स्वाभाविक व सोइस्कर होतें. त्यामुळें गणित, वैद्यक व कोश यांसारख्या सर्वस्वीं शास्त्रीय विषयांवरील ग्रंथहि काव्याचा बाह्यवेष पांघरून प्रकट झाले; एवढेंच नव्हे, तर कोणत्याहि प्रकारचे विचार ग्रंथद्वारें प्रकट करावयाचे असल्यास ते वृत्तबद्धच असले पाहिजेत असा शिष्टसंप्रदाय रूढ झाला; व त्यामुळें गद्यवाङ्मयाची निर्मिति लवकर होऊं शकली नाहीं.

वाङ्मय या शब्दाची व्युत्पत्ति लक्ष्यांत घेतली म्हणजे जें जें बोललें जातें तें तें सर्व वाङ्मयच होय असें सुरवातीला सांगितलेंच आहे. लिहिणें म्हणजे सुद्धां सांकेतिक चिन्हांच्या सहाय्यानें एकप्रकारें बोलणेंच होय. तेव्हां जें जें बोललें जातें व लिहिलें जातें त्या सगळ्याचा अंतर्भाव वाङ्मयांतच करावा लागतो. या दृष्टीनें वाङ्मय या शब्दाची व्याप्ति इतकी विस्तृत आहे कीं, त्यांत परस्परापासून अत्यंत भिन्न अशा विषयांवरील ग्रंथांचाहि समावेश होतो; व काव्यग्रंथांप्रमाणेंच शास्त्रीय ग्रंथ हेदेखील एकाच वाङ्मयवृक्षाच्या दोन फांद्या मानाव्या लागतात.

परंतु सर्वसाधारणपणें वाङ्मय हा शब्द ललित किंवा विदग्ध वाङ्मयाला लावण्याचा प्रघात पडला आहे. या दृष्टीनें वाङ्मय, साहित्य आणि सारस्वत हे शब्द स्थूलमानानें समानार्थकच मानिले जातात. वस्तुतः वाङ्मय हा शब्द वर सांगितल्याप्रमाणें फार व्यापक असून त्यांत सर्व तऱ्हेच्या ग्रंथांचा अंतर्भाव होतो.साहित्य या शब्दावरून प्रामुख्यानें साधनांचा बोध होतो, त्यामुळें ज्या ग्रंथांत काव्याचें आणि काव्यासंबंधीं जे शब्द, अर्थ, रस, अलंकार, गुणदोष, इत्यादि विषयांचें विवेचन असतें त्याला साहित्यशास्त्राचा ग्रंथ असें संबोधण्यांत येतें. सारस्वत हा शब्द सरस्वती या शब्दापासून साधिला असल्यामुळें तो केवळ रसयुक्त वाङ्मयालाच लावणें योग्य होईल. सरस्वतीचें सौंदर्य, तिच्या वीणानादाचें माधुर्य व तिचें वाहन जो मयूर त्याच्या पिसाऱ्यांतील वर्णवैचित्र्य यांचा एकसमयावच्छेदेंकरून विचार केला म्हणजे सारस्वत हा शब्द काव्य, नाटक, कादंबरी यांसारख्या ललित म्हणजे विदग्ध वाङ्मयाला उद्देशून योजण्यांतच औचित्य आहे. तथापि स्थूलपणें वाङ्मय, साहित्य आणि सारस्वत हे तिन्ही शब्द समानार्थक समजले जात असल्यामुळें वाङ्मयाचा विचार करितांना ललित किंवा विदग्ध वाङ्मयाचेंच विवेचन केलें जातें.

वाङ्मयाचें वर्गीकरण करावयाचें म्हटल्यास गद्यात्मक आणि पद्यात्मक, शास्त्रीय आणि ललित, हेतुप्रधान आणि आनंदप्रधान अशा अनेक भूमिकांवरून करितां येण्यासारखें आहे. परंतु हें वर्गीकरण पूर्णपणें समाधानकारक होईल असें नाहीं. कारण, बाणभट्टाची कादंबरी गद्यांत लिहिलेली असली तरी ती पद्याशीं साहचर्य असलेल्या काव्यरसानें ओथंबलेली आहे; व सुश्रुत किंवा चरक यांचे वैद्यकविषयक ग्रंथ पद्यमय असले तरी त्यांत काव्य औषधालाहि मिळण्यासारखें नाहीं. इतिहास हें वस्तुतः शास्त्र आहे. परन्तु मेकॉले किंवा गिबन यांसारख्या लेखकांच्या इतिहासग्रंथांना शास्त्रीय ग्रंथ म्हणावें कीं ललितग्रंथ म्हणावें याचा निर्णय करणें कठीण जाईल. मेकॉलेनें लिहिलेल्या इंग्लंडच्या इतिहासाला इतिहासशास्त्रज्ञ बिलकूल किंमत देत नाहींत; परन्तु वाङ्मयाचे उत्कृष्ट नमुने म्हणून त्याच्या सदरहू ग्रंथांतील उतारे उद्धृत करण्यांत येतात. हेतुप्रधान किंवा बोधप्रधान वाङ्मयांत मनोरंजकता किंवा सौंदर्यजन्य आनंद भरपूर असूं शकतो व मिल्टनच्या ‘ स्वर्गच्युति ’सारखीं काव्यें किंवा तुकाराम नामदेव यांच्या अभंगासारखी उत्तम कविता ही उपदेशप्रधान किंवा नीतिप्रवण असल्याचें आढळून येतें. अशा रीतीनें निश्चित मर्यादांनीं युक्त असें वाङ्मयाचें वर्गीकरण करणें अशक्य असलें तरी शास्त्रीयवाङ्मय, ललितवाङ्मय आणि संमिश्र प्रकारचें वाङ्मय असें वाङ्मयाचें वर्गीकरण स्थूलदृष्टीनें करावयास हरकत नाहीं. शास्त्रीय वाङ्मयाचा हेतु बोध किंवा ज्ञान हा असून ललितवाङ्मयाचें प्रधानकार्य मनोरंजन करणें किंवा सौंदर्यजन्य आनंद देणें हें आहे. संमिश्र प्रकारच्या वाङ्मयांत शास्त्रीय माहिती मनोरंजक पद्धतीनें दिलेली असते. इंग्लंडमध्यें वेल्स, ऑल्डस् हक्स्ले यांसारख्या लेखकांनीं शास्त्रीय गोष्टींना ललितवाङ्मयाचा पेहराव चढवून अनेक ग्रंथ लिहिले आहेत.

कोणत्याहि राष्ट्रांत वाङ्मयाची सर्वांगीण वाढ होण्याला अनेक गोष्टींची अनुकूलता लागते. कोणत्याहि राष्ट्राचें वाङ्मय हें त्यांतील लोकांच्या संस्कृतीचें मापन करण्याचें प्रमुख साधन होय. देशांतील राजकीय परिस्थितीचा वाङ्मयावर फार परिणाम होतो. अनियंत्रित राजसत्ता असलेल्या देशाचें वाङ्मय सरस, सकस आणि समृद्ध असणें शक्य नाहीं. हुकूमशाहींत वाङ्मयाची वाढ होत नाहीं व जी

कांहीं होते ती एकांगी होते. परप्रेरित वाङ्मयांत आत्मप्रत्ययाचा आनंद अनुभवण्यास मिळत नाहीं. लोकसत्ताक राज्यपद्धति ही वाङ्मयाच्या सर्वांगीण उन्नतीला फार पोषक होते. व्यक्तिस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य आणि लेखनस्वातंत्र्य हे विचार, विविधता आणि वैदग्ध्य यांच्या वाढीला पोषक असल्यामुळें हें त्रिगुणात्मक स्वातंत्र्य वाङ्मयाच्या विकासाला अत्यावश्यक आहे. शिक्षणाचा फैलाव, यांत्रिक सुधारणा, वाचकांची संख्या, भाषासौकर्य, मुद्रणानुकूल लिपिपद्धति इत्यादि गोष्टींचा वाङ्मयाच्या वाढीवर अनुकूल परिणाम होतो. प्रत्येक कालखंडांतील वाङ्मय तत्कालीन सामाजिक परिस्थितीला अनुसरूनच निर्माण होत असल्यामुळें कालानुसार वाङ्मयाचें स्वरूप बदलत असतें. मूलभूत मानवी भावना त्याच असल्या तरी परिस्थित्यनुसार त्यांच्या प्रकटीकरणाचें स्वरूप बदलत जातें. नैराश्यवाद, गूढवाद, ध्येयवाद, बोधवाद, सुखवाद, कलावाद, वास्तववाद व संघर्षवाद हे वाङ्मयांतील कांहीं वाद होत. समाजांतील सत्ताधारी वर्ग आणि तद्विरोधी वर्ग यांच्यांमध्यें सतत झगडा चाललेला असतो, व त्यामुळें कोणत्याहि देशाच्या वाङ्मयांत दोन भिन्न मनोवृत्तींचें प्रतिबिंब पडलेलें दिसून येतें. बऱ्याचशा तेजस्वी वाङ्मयाचा जन्म या वैचारिक झगड्यामुळेंच झाला आहे.

वाङ्मयाची म्हणजे ललित वाङ्मयाची व्याख्या अनेकांनीं अनेक प्रकारांनीं केली आहे. "मनुष्याची सदसद्विवेकबुद्धि जागृत करून त्यास नेहमीं सन्मार्गांत ठेवण्यास कारण होणारे, त्याच्या विविध मनोवृत्तींचा विकास करून शुद्ध अशा आनंदाचा आस्वाद त्यास देणारे, जें काय अशुद्ध, अपवित्र, दुःखद, नैराश्योत्पादि व क्षणिक—त्यापासून दूर राहाण्याचा किंवा अप्रत्यक्ष बोध करणारे, नेहमीं उदार, रमणीय अशा विचारांचा व कल्पनांचा त्याच्या मनांत उद्भव व संचार करवून सत्याचे ठिकाणीं तो सदा लीन होईल असे करणारे या जीवितसंग्रामांत त्यास उत्तेजित ठेवून विजयोत्सुक करणारे, सारांश त्यांस मनुष्यत्वांतून काढून देवत्वाकडे जाण्याबद्दल उत्सुक करून त्या मार्गाला सन्मुख करणारे असे जे कोणाचेहि अंतःस्फूर्तीनें शब्दरूप घेऊन मुखावाटें बाहेर पडलेले किंवा लेखणीनें लिहून ठेवलेले विचारोद्गार, त्या सर्वांना समुच्चयानें वाङ्मय ही संज्ञा दिली आहे." वाङ्मयाची ही विराटस्वरूपी व्याख्या हरि नारायण आपटे यांनीं केलेली आहे. त्यापेक्षां "खरी सविकल्प समाधि उत्पन्न करूं शकतें तें वाङ्मय" ही न. चिं. केळकर यांनीं केलेली व्याख्या अधिक सुटसुटीत, सुबोध आणि सशास्त्र वाटते. "उज्ज्वल कल्पनाशक्ति असलेल्या व्यक्तींच्या चिरस्मरणीय व सुंदर शब्दकृतींचा संग्रह म्हणजे वाङ्मय" ही ग. स. भाटे यांनीं केलेली व्याख्याहि सोपी आणि सोइस्कर असल्यामुळें बहुतेकांना मान्य होण्यासारखी आहे. सारांश, सुंदर कल्पना आणि विचार सुंदर शब्दांत प्रकट केलेल्या लिखाणाला वाङ्मय ही संज्ञा द्यावयास हरकत नाहीं.

वाघः—मांजराच्या वर्गांतला मोठा, मांसभक्षक व सस्तन प्राणी. हा धिप्पाड, चपळ व भयंकर प्राणी आहे. एकांतप्रिय असलेला हा प्राणी फार आळशी असतो. दिवसा तो जाळींत पडून राहतो व रात्रीं भक्ष्यासाठीं हिंडतो. कित्येक वेळां तो रक्तप्राशनाकरितां शिकार करतो. वयस्क वाघांना नररक्ताची चटक लागलेली असते. जंगलाजवळच्या खेड्यांतून गुरेंढोरें पळविण्याचें काम हा उत्तमपणें करतो. वाघाला उत्तमपणें पोहतां येतें. कित्येक प्रसंगीं हा आपल्या मादीपिलांसह एकत्र वावरत असलेला आढळतो. सिंहापेक्षां तो जास्त लवकर माणसाळतो. उंची ३-४ फूट व लांबी नाकाच्या शेंड्यापासून शेपटीच्या टोकापर्यंत जास्तीत जास्त ११ फूट असते.

हा सिंहाइतका उंच असला, तरी त्याच्यापेक्षां हा शरीरानें सडपातळ व लांब असतो. गोल डोक्याचा व बिन आयाळीचा हा प्राणी सिंहाइतका बळकट असत नाहीं. सिंहाप्रमाणेंच याला पुढील पायाला आंत ओढतां येणारीं पांच नखें असून मागच्याला चार नखें असतात. याचें शरीर तुळतुळीत पण हरणासारख्या रंगाचें असून त्यावर काळे पट्टे असतात. याच्या पट्ट्यांचें स्वरूप व संख्या या बाबतींत वैचित्र्य दिसून येतें. शेंपटीला झुबका नसतो. परदेशी वाघापेक्षां आपल्याकडील वाघाचे केंस आंखूड असतात. सैबेरिया व मांचूरिया येथील वाघांचे केंस लांब असतात. नाकापासून शेपटीच्या टोकापर्यंतची याची लांबी साधारणपणें दहा फूट असून याचें वजन ५०० पौंडांपावेतों असूं शकतें. त्याच्या शरीराचा वरील भाग पिंवळा असून पोटाकडील भाग पांढरा असतो. नर मादीपेक्षां मोठा असलेला दिसून येतो.

आपल्याकडे बंगाली वाघ प्रसिद्ध आहे. तो जंगलांत पण पाण्याच्या कांठीं राहतो. हा पाणी पिण्यास

येणाऱ्या जनावरावर दबा धरून झडप घालतो. याच्या मादीला एका वेळीं दोन ते पांच पिलें होतात. वाघ तीन वर्षांनीं वयांत येतो. वीस वर्षांपर्यंत हा जगूं शकतो.

बिब्या म्हणून याची एक जात आहे. ती आफ्रिका, हिंदुस्थान इत्यादि उष्ण प्रदेशांत आढळते. बिब्याचा रंग पिंवळा असून त्यावर काळे ठिपके असतात. याची उंची दोन फूट असते. हा झाडावर चढून उड्या मारूं शकतो. या कारणानें त्यास. झाडावरील वाघ म्हणतात. चित्ता व ओन्स हे प्राणी याच्या जातींत येतात.

हा प्राणी विशेषतः आशिया खंडामध्येंच आढळतो. हिंदुस्थान, सैबेरिया, इराण, सुमात्रा व जावा या ठिकाणीं हा असल्याचें दिसून येतें. आपल्याकडील वाघाचें मुख्य भक्ष्य म्हणजे माणसें, जनावरें, हरीण, डुकरें वगैरे प्राणी होत.

या प्राण्याचा उल्लेख वैदिक व प्राचीन ग्रंथ यांतून अनेक स्थळीं केलेला आहे. या उल्लेखांवरून वाघाचा परिचय भारतीय लोकांना फार पूर्वीपासूनचा आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

वाघूळ:—पाकोळीच्या वर्गांतला प्राणी. याचा रंग, याची राहणी, याच्या संबयी सर्व कांहीं पाकोळीप्रमाणेंच. आकारानें हा कावळ्याएवढा असतो. पाकोळीपेक्षां याचा आवाज मोठा पण कर्कश असतो. रात्रीं याला दिसतें. दिवसभर ठराविक झाडावर हा टांगून घेऊन राहतो. पंख फूट दीड फूट लांब असतात.

वादन (Music):—वाद्यवादन ही एक अत्यंत जुनी व अभिनव अशी कला मानण्यांत आली आहे. तिला जुनी म्हणण्याचें कारण भावभावना यांचें दिग्दर्शन करण्यासाठीं यथोचित सूर काढण्याचा व मानवी हालचालींना लयबद्ध ठेका देण्याचा देहस्वभाव मनुष्यांत केव्हां नव्हता हें समजणें कठीण आहे. तो स्वभाव जगाच्या प्रारंभापासून असला पाहिजे असें अनुमान काढणें भाग आहे. या कलेला अभिनव म्हणण्याचें कारणहि तसेंच आहे. काव्य, चित्रकला, शिल्पकला (Sculpture) वगैरे कला जवळजवळ पूर्णावस्थेस पोचल्यानंतर कित्येक शतकांनीं ही कला अर्भकावस्थेंतून पार पडून आज प्रगतीच्या मार्गावर येऊन पूर्णतेकडे तोंड करून उभी आहे असें आढळून येतें. केवळ सूरबद्ध (Inarticulate) गीतांचा शब्दप्रधान (Articulate) भाषेशीं संयोग झाला; गाण्यांतील लयबद्ध नादसमूहाशीं अनुरूप असे तोंडांतून तालबोल (Vocal inflections) निघूं लागले. या सर्वांची अनुकृति जसजशी वाद्यावर होत गेली, तसतशी ही कला विकास पावूं लागली.

या कलेच्या इतिहासाचा अभ्यास केला असतां मनुष्यानें निसर्गांतील कांहीं चमत्कारांना क्रमशः आपल्या अंकित कसें केलें व अनिर्बंधपणें सुटणाऱ्या ध्वनींना श्रुतिमनोहर सुरावटीची शिस्त कशी पाळावयास लावली हें कळून येतें. मानवी आवाजांतील सुरेलपणा व त्यांतील भावनोद्दीपक चढउतार, तसेंच तालाचें सूक्ष्म ज्ञान दर्शविणारे अनेक बोल व ठेके यांचें पद्धतशीर संशोधन होण्यापूर्वीं कंपायमान अशा अनेक वस्तूंतून निघणाऱ्या सुरांतील भेद केवळ ऐकून हमखास जाणण्याचे नियम प्रारंभीं शोधून काढण्यांत आले आणि असे नियम शोधून काढल्यानंतर योग्य वाद्यें तयार करण्यांत येऊन मानवी आवाजांत, वैचित्र्य, खोली (Intensity) व विस्तार (Compass) या बाबतींत जें नैसर्गिक वैगुण्य असतें तें वाद्यांनीं बरेंचसें दूर केलें.

वाद्यांना लागणाऱ्या आवश्यक गोष्टी—प्राचीनकालीन वाद्यांचा इतिहास उपलब्ध नाहीं; तथापि जीं कांहीं वाद्यें उपलब्ध आहेत त्यांत तीन आवश्यक गोष्टी आढळून येतात. (१) लवचिक (Elastic) वस्तूंमध्यें कंप उत्पन्न करणारी शक्ति. (२) लवचिक वस्तूंत उत्पन्न होणारे कंप (Vibrations) व (३) या कंपांना मोठें स्वरूप देऊन कानापर्यंत नेऊन पोंचविणारा (Resonator). या तीन आवश्यक गोष्टींना आरंभक (Originator), कंपक (Vibrator) व वाहक (Resonator) असें म्हटलें तरी चालेल. पोव्यामध्यें वाजविणाऱ्याचा श्वासोच्छ्वास, तोंडाजवळील भोंकांतील हवा व पोव्याच्या नळींतील संपूर्ण हवा (Air column) या तीन आवश्यक गोष्टी होत. इतर वाद्यांसंबंधींहि असेंच सांगतां येईल.

वाद्यांच्या विकासाचा इतिहास म्हणजे साधनांतील सुधारणा, प्रमाणबद्धता, सुरांची भिन्न भिन्न उंची साध्य करून देणाऱ्या साधनांचा सहजसुलभ प्रादुर्भाव या सर्वांची एक गोड कहाणी होय. लायर (Lyre) या वाद्यापासून पियानोपर्यंत यायला, तसेंच वेळू

(Reed) पासून ऑर्गनपर्यंत यायला, कित्येक शतकांचा प्रवास करणें भाग पडलें आहे.

वानप्रस्थाश्रम:–धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ साधणें हें मनुष्यजन्माचें अंतिम ध्येय साधण्यासाठीं हिंदुधर्मांत आश्रमव्यवस्था केली आहे. मानवी आयुष्याचे चार भाग करून त्या प्रत्येक भागांत मनुष्यानें कसें वागावें याविषयीं हिंदुधर्मांत सांगितलेल्या नियमांना आश्रमधर्म अशी संज्ञा आहे. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम हे ते चार आश्रम होत. यांत वानप्रस्थाश्रमाचा क्रम तिसरा लागतो. पहिले दोन आश्रम यथासांग समाप्त केल्यानंतर मनुष्यानें वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करावा अशी हिंदुधर्माची आज्ञा आहे. आपल्या मुलांना मुलें झालीं, आपले केंस पांढरे झाले, अंगावर सुरकुत्या पडूं लागल्या म्हणजे गृहस्थानें प्रपंचाचा बोजा हळू हळू मुलांवर टाकून आपलें चित्त परमार्थाकडे लावावें. आपल्या पत्नीला आपल्या मुलाकडे ठेवून अगर बरोबर घेऊन वनांत जाऊन आश्रम बांधून रहावें. तेथें पत्नी आपणासमवेत असली तरी विषयचेष्टा करूं नये, भूमीवर निजावें. शरीरावर व तदनुषंगिक गोष्टींवर ममत्व ठेवूं नये. उत्तम उत्तम वस्त्रेंप्रावरणें व चैनीचे पदार्थ सोडून द्यावेत. स्वाध्याय करावा, आत्मसंयमन करावें, विद्यादान करावें, कोणाकडून कांहीं घेऊं नये, सर्वांवर दया करावी. अशाप्रकारें वानप्रस्थी मनुष्यानें वागावें. मुंडकोपनिषदांत म्हटलें आहे, " जे शांत व विद्वान लोक वनामध्यें राहून, तप व अनुष्ठान करून व सत्यावर श्रद्धा ठेवून, भिक्षावृत्तीवर शरीरधारणा करतात, ते त्या ठिकाणीं निर्मल होऊन मरणाच्या द्वारानें अविनाशी, हानीलाभरहित, पूर्णपुरुष अशा परमात्म्याला प्राप्त करून घेऊन आनंदित होतात. " याप्रमाणें जीवनाचा तिसरा भाग वानप्रस्थाश्रमांत घालवून नंतर चौथ्या भागांत म्हणजे संन्यासाश्रमांत प्रवेश करावयाचा असतो.

वामन पंडित (इ.स. १६३६–१६९५):–रामदासकालीन पंडित व यमकाचे पुरस्कर्ते आणि यथार्थदीपिकेचे कर्ते. हे मूळचे विजापूरचे. बाटण्याचा प्रसंग आला म्हणून विजापूर सोडलें. ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. यांचे वडील नृसिंह पंडित. आईचें नांव लक्ष्मी.आडनांव शेषे. पत्नि गिराबाई. षट्शास्त्राचें अध्ययन. यांनीं वादविवादांत अनेक पंडितांस जिंकिलें. आरंभीं हे संस्कृतांतच काव्यरचना करीत; पण पुढें रामदासांच्या सांगण्यावरून यांनीं मराठींत काव्यरचना सुरू केली. पंडितांनीं काव्यांत सर्व छंदांचा उपयोग केला आहे. यांचें संस्कृत व मराठी या भाषांवर चांगलें प्रभुत्व होतें. यांची भाषा रसाळ, प्रौढ व मनोवेधक असून अर्थालंकार आणि शब्दालंकार यांनीं सजविलेली आहे. यांचा यमकाकडील कल पाहून रामदास यांना ' यमक्या वामन ' म्हणत. ' यथार्थदीपिका ' ही गीतेवरील टीका बहुतेकांच्या परिचयाची आहे. याशिवाय गीतासमश्लोकी, निगमसार, वेदांत आणि भक्ति या विषयांवर व निरनिराळ्या पौराणिक कथांवर अनेक लहानमोठीं काव्यें त्यांनीं केलीं आहेत. यांची ४०००० कविता उपलब्ध आहे. हे वाई शेजारी गुन्हेगर येथें समाधिस्थ झाले.

वायुभारमापक:–वायुभारमापकाची (बॅरॉमिटर) रचना कोणत्या तत्त्वावर व कशी केलेली असते हें बॅरॉमीटर या सदराखालीं चौथ्या भागांत दिलेंच आहे. या ठिकाणीं त्याचा उपयोग कसा होतो एवढेंच पाहावयाचें.

वेधशाळेंत वायुभारमापकांतील कांच्याच्या सूचनेप्रमाणें हवेसंबंधीं अंदाज बांधतात व त्याप्रमाणें पत्रकें काढून त्यांना प्रसिद्धि दिली जाते. वायुभारमापकांत असलेल्या खुणांवरून कोणता अर्थ व्यक्त होतो हें पुढें दिल्याप्रमाणें कळतें:—

३१ इंच	अतिशुष्क (कोरडी)
३०$\frac{२}{३}$,,	स्थित
३०$\frac{१}{३}$,,	स्वच्छ
३० ,,	लवकरच बदल होणारी
२९$\frac{२}{३}$,,	पाऊस किंवा वारा
२९$\frac{१}{३}$,,	अतिवृष्टि होण्याची सूचना देणारी
२९ ,,	वादळ

या खुणांचा अर्थ सूचनात्मकच समजावयाचा. वायुभारमापकांत जर अगदीं हळू फरक पडत असेल तर हवेंत एकदम कोणताच फरक पडणार नाहीं असें समजावें. याउलट जर त्यांतील कांटा भरभर आपली जागा बदलीत असेल तर हवेचें अनिश्चित स्वरूप राहील असें समजावें.

शुष्क किंवा कोरड्या हवेपेक्षां दमट हवा अधिक जड असते व उष्ण हवेपेक्षां थंड हवा जास्त जड असते.

वारकरी पंथः–वैदिक धर्मांतर्गत असा महाराष्ट्रांतील एक पंथ. वारकरी या शब्दाचा अर्थ प्रतिवर्षी आषाढ शुद्ध एकादशी व कार्तिक शुद्ध एकादशी या दिवशीं पंढरपूरची वारी करणारा असा आहे. वारकरी लोक गळ्यांत तुळशीची माळ घालत असल्यामुळें त्यांना माळकरी असेंही म्हणतात. या वारकऱ्यांचा जो पंथ तो वारकरी पंथ. भागवत पुराणांत सांगितलेला वासुदेवभक्तिपर भागवत धर्म वारकरी सांप्रदायांत पाळला जात असल्यामुळें या पंथाला भागवतधर्म असेंहि नांव आहे. महाराष्ट्रांत सध्यां प्रचलित असलेला भागवतधर्म मूळ भागवतधर्माप्रमाणें प्रवृत्तिपर नसून निवृत्तीपर आहे. (‘भागवतधर्म’ पाहा.) भागवतधर्मांत वासुदेवाची म्हणजे श्रीकृष्णाची भक्ति सांगितली आहे. भागवतधर्मांतील श्रीकृष्णाची बालस्वरूपांत उपासना करण्याची चाल वारकरी पंथांत स्वीकारली आहे. विठ्ठल व पांडुरंग हीं बालकृष्णाचींच दुसरीं नांवें होत. पांडुरंगाची उपासना ज्ञानेश्वरापूर्वींहि पुष्कळ वर्षें महाराष्ट्रांत चालू होती. ज्ञानेश्वराच्या पूर्वी दोनतीन शतकें हा पंथ निघाला असावा असें विद्वानांचें मत आहे. या पंथाची चांगली वाढ ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या कालांतच झाली. ज्ञानेश्वरी या ग्रंथामुळें या पंथाला मूर्तस्वरूप आलें.

पंढरीनाथ हें या पंथाचें उपास्यदैवत असून हरी व हर यांच्यांत कोणताहि भेद नसून ऐक्य आहे असें या पंथांत प्रतिपादिलें आहे. श्रीनिवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई हीं संतभावंडें, नामदेव, एकनाथ, तुकाराम ही या पंथांतील प्रमुख संतमंडळी होत. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व तुकारामबुवांचीं गाथा हे या पंथाचें अत्यंत ओजस्वी असे ग्रंथ होत. हा पंथ अवैदिक नाहीं. वैदिक धर्मास मान्य असलेल्या सर्व गोष्टी या पंथास बहुतेक अंशीं मान्य आहेत. ज्ञानमार्गापेक्षां भक्तिमार्ग सुलभ व श्रेष्ठ आहे असें या पंथांत प्रतिपादिलें आहे. वारकरी पंथ आदि-अन्तीं भक्तिप्रधान आहे; परंतु अद्वैत तत्त्वाशीं विरोधी नाहीं. ‘एकमेवाद्वितीयं ब्रह्म’ हें तत्त्व या पंथाला सर्वस्वीं मान्य आहे. या पंथानें अद्वैत मताचा अंगिकार करूनहि भक्तिमार्गाचा अवलंब केला आहे. अद्वैत सिद्धांताशीं भक्तीचा सुंदर मेळ ह्या पंथांत घालून दाखविला आहे. खरी भक्ति अद्वैतांतच होते अशी या पंथाची शिकवणूक आहे.

वारसाचा कायदाः–वारसा हा मृत व्यक्तीच्या पश्चात् होणाऱ्या धनसंक्रमणाचा एक प्रकार आहे. मृत व्यक्तीच्या धनाचें संक्रमण सामान्यतः तीन प्रकारें होतें:–(१) मृत व्यक्तीनें मृत्युपत्र केलें असेल तर मृत्युपत्रान्वयें. (२) मृत्युपत्र केलें नसेल तर वारसाहक्कानें (३) मृत मनुष्य हिंदू मिताक्षराप्रमाणें एकत्र कुटुंबाचा सहभागीदार असतांना मृत झाला असेल तर त्याचे पश्चात् कुटुंबाच्या मिळकतींतील त्याचा अविभक्त हिस्सा शेषाधिकारानें त्याच्या सहभागीदारांच्याकडे जातो. एकत्र कुटुंबपद्धति हें हिंदु समाजाचें वैशिष्ट्य आहे. मुसलमान, पारसी व ख्रिश्चन या समाजांत एकत्रकुटुंबसंस्था नाहीं; यामुळें शेषाधिकारानें सहभागीदारांकडे धनसंक्रमण होण्याचा प्रश्नच त्या समाजांत उत्पन्न होत नाहीं. त्या समाजांत मृत-व्यक्तीच्या धनाचें संक्रमण होण्याचे दोनच प्रकार सामान्यतः संभवतात. ते प्रकार म्हणजे मृत्युपत्रानें व वारसाक्रमानें. येथें वारसाविषयींच्या हिंदू कायद्याचा संक्षेपानें विचार केला आहे.

हिंदू कायदा–मिताक्षरा व दायभाग या दोन पंथां-तील वारसाविषयींच्या कायद्यांत बराच फरक आहे. यापुढें फक्त मिताक्षरा कायद्याचाच विचार केला आहे.

मिताक्षरा–मिताक्षरेप्रमाणें पुढें दिलेली मिळकत वारसाक्रमानें जाते. (१) मृत हिंदूची स्वसंपादित मिळकत. (२) एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचा संविभाग होऊन त्याच्या हिश्श्यास आलेली मिळकत. (३) इतर सर्व सहभागीदार मृत झाल्यामुळें शेषाधिकारानें त्याच्या एकट्याकडेच आलेली एकत्रकुटुंबाची मिळकत. (४) माता, मातामह, बंधू व चुलता यांचेपासून वारसाहक्कानें मिळालेली मिळकत. वारसाच्या कायद्यांतील सामान्य तत्त्वें पुढें दिलीं आहेत. एकदां हिंदू पुरुष मरण पावला असतां त्याच्या पश्चात् त्याची मिळकत त्याच्या सर्वांत जवळच्या वारसाकडे जाते. त्याच्या मृत्यूच्या वेळीं हयात असलेल्या नाते-वाईकांमधूनच योग्य वारसाची निवड कायद्याप्रमाणें होते. त्याच्या मृत्यूच्या समयीं जिवंत असलेल्या नाते-वाईकांपेक्षां अधिक जवळचा नातेवाईक कदाचित् जन्मेल म्हणून कायदा वाट पहात नाहीं. मनुष्य मृत होतांच त्याची मिळकत तात्काळ योग्य वारसाकडे जाते. त्याच्या मृत्यूच्या वेळीं गर्भावस्थेत असलेली व्यक्ति इतर नातेवाईकांहून जवळची वारस ठरण्या-

सारखी असेल तर मात्र वारसा ठरवितांना जन्मणाऱ्या मुलाचा विचार करावा लागतो. पुरुष वारसाला वारसाहक्कानें मिळालेल्या मिळकतीवर पूर्ण मालकी मिळते; स्त्रीला सामान्यतः तशी मालकी मिळत नाहीं; परंतु मुंबई इलाख्यांत कन्यावारसानें मिळालेल्या मिळकतीवर कन्येची पूर्ण मालकी राहते. स्त्री आपल्या स्त्रीधनाची पूर्ण स्वामिनी असते; त्यामुळें स्त्रीधनाचा वारसा तिच्या स्वतःच्या वारसाकडे जातो. त्याचप्रमाणें मुंबई इलाख्यांत कन्यावारसाला मिळालेल्या मिळकतीचा वारसा स्त्रीधनाप्रमाणेंच जातो. इतर प्रकारें वारसाहक्कानें स्त्रीला मिळालेल्या मिळकतीचा वारसा तिच्या पूर्वीच्या पुरुष वारसाच्या वारसाकडे जातो. पुत्र, ज्याचा पिता मृत आहे असा पौत्र व ज्याचा पिता व पितामह उभयता मृत आहेत असा प्रपौत्र या तिघांना आपल्या पित्याच्या, पितामहाच्या व प्रपितामहाच्या मिळकतीचा वारसा एकाच वेळीं मिळतो; व या तिघांचें एकत्रकुटुंब बनतें.

मिताक्षरेप्रमाणें वारसाक्रम पुढीलप्रमाणें आहे. (१) सपिंड (२) समानोदक (३) बंधु (४) आध्यात्मिक गुरु (५) शिष्य (६) गुरुबंधु (७) राजा.

मिताक्षरेप्रमाणें सपिंड म्हणजे एका रक्ताचे. ज्याचा मयताशीं रक्ताचा संबंध आहे तो मयताचा सपिंड. मुंबई इलाख्यांत पुढीलप्रमाणें वारसांचा क्रम लागतो.

पुत्र, पौत्र, प्रपौत्र, विधवा, कन्या, कन्येचा पुत्र. माता, पिता, बंधू, बंधूचा पुत्र हे पहिले दहा वारस होत. मयूखाप्रमाणें बंधू व मृतबंधूचे पुत्र यांना एकाच वेळीं वारसा मिळतो. वर नमूद केलेल्या वारसाक्रमांत १९३७च्या Hindu Woman's Right to Property Act नें थोडासा फरक झाला आहे. विधवा, आधींच मयत झालेल्या मुलाची विधवा, यांना पुत्राबरोबर वारसाहक्क मिळतो.

मयूखाप्रमाणें मातेच्या आधीं पित्याचा क्रम येतो. या दहा वारसांनंतर बापाची आई, बहिणी व सावत्र बहीण यांचा क्रम लागतो. वारसांची यादी लांबलचक असल्यामुळें यापुढील वारस येथें नमूद केले नाहींत.


स्त्रीधनाच्या वारसाक्रमाचे निराळे नियम आहेत. त्याचप्रमाणें प्रथम विभक्त होऊन नंतर संसृष्ट झालेल्या हिंदूच्या मिळकतीचा वारसा विशिष्ट नियमाप्रमाणें जातो. वर दिलेला क्रम स्वतंत्र मिळकतीसंबंधींचा आहे.

वाल्मीकि:—वाल्मीकि रामायणाचा कर्ता. सुमति ब्राह्मणाचा हा मुलगा. याला एका किराताच्या स्वाधीन करून तपासाठीं याचे आईबाप अरण्यांत निघून गेले होते. पुढें कुसंगतीमुळें याला चोऱ्या, लूटमार करण्याची संवय लागली. याच्या वसतिस्थानावरून जाणाऱ्या कांहीं महर्षींना लुटण्यासाठीं हा त्यांच्या अंगावर धावून गेला. पण ऋषींनीं त्याची समजूत पाडून त्यास भक्तिमार्गास लावला. याला त्यांनीं राममंत्र देऊन त्यास त्याचा जप करण्यास सांगून ते निघून गेले. पुष्कळ वर्षांनीं त्या ऋषींनीं येऊन त्याची वारुळांतून मुक्तता केली आणि त्याचें वाल्मीकि असें नांव ठेविलें.

पुष्कळ वर्षांनीं त्याची ऋषींत गणना होऊं लागली. याचा आश्रम तमसा नदीच्या तीरावर होता. तेथें हा अध्यापनाचें कार्य करीत असे. याची शिष्यशाखा बरीच मोठी होती. सर्व शिष्यांत भारद्वाज हा प्रमुख शिष्य होय. क्रौंचवध पाहून याला काव्यस्फूर्ति होऊं लागली. यानंतर त्यानें रामचरित्र लिहिलें.

परित्यक्त सीतेचा तिच्या मुलांसह यानें संभाळ केला होता. तसेंच मुलांना यानें शिक्षण देऊन स्वरचित रामायण पढविलें. रामानें अश्वमेधयज्ञ केला त्यावेळीं हा तेथें लवांकुशासह हजर होता.

वास्को ड गामा (१४६०–१५२४):—पोर्तुगीज धाडसी दर्यावर्दी. हा खलाशी बनला व १४९७ मध्यें त्यानें केप ऑफ गुडहोपला वळसा घालून हिंदुस्थानला जाण्यास मार्ग शोधण्याची कठिण कामगिरी स्वीकारली. यांत त्याला यश मिळून तो २० मे १४९८ रोजीं मलबार किनाऱ्यावरील कालिकतला पोंचला.


वास्को ड गामा

कालिकतला पोर्तुगीजांची लहानशी वसाहत स्थापून तो १४९९ मध्यें पोर्तुगालला परत गेला.

१५०२ मध्यें पोर्तुगालच्या राजानें त्याला पुन्हां हिंदुस्थानांत केलेल्या वसाहतींतील खलाशांची पी. ए. काब्रालनें कत्तल केल्यामुळें सूड घेण्यासाठीं पाठविलें. काब्रालचा पराभव करून कालिकत जिंकून व कोचीनपर्यंत किनारा पाहून बरोबर खूप व्यापारी माल घेऊन तो परतला; पण पुन्हां त्याला हिंदुस्थानचा

व्हाईसरॉय म्हणून पाठविण्यांत आलें. तापानें तो २४ डिसेंबर १५२४ रोजीं कोचीन येथें वारला.

वास्तुकलाः-अगदीं प्राचीन काळापासून उन्नतीसाठीं चालू असलेल्या मानवजातीच्या धडपडींत वास्तुकलेचें स्थान फार महत्त्वाचें आहे. हळूं हळूं सर्वांगीण प्रगतीस सुरुवात झाल्यावर बदलत्या काळाबरोबर, वास्तुकलेचें निवळ निवाऱ्याच्या साधनाचें स्वरूप संपलें. ज्ञानाची वाढ झाल्यावर नवीन कल्पना व नवीन तत्त्वांचा वास्तुकलेंत समावेश होणें अपरिहार्य होतें. ह्याच विचार-क्रांतिबरोबर हळूं हळूं वास्तुशास्त्रास कलेचा दर्जा प्राप्त झाला.

कालाच्या ओघाबरोबर जीविताकडे पाहण्याच्या बदलत्या दृष्टिकोनाप्रमाणें वास्तुकलेच्या स्वरूपांतही बदल होत गेले आणि निरनिराळ्या देशांच्या भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीनुसार निरनिराळ्या वास्तुपद्धती उत्पन्न झाल्या. मानवजातीसाठीं वास्तुकलेनें महत्वाचें कार्य केलें आहे. देवांसाठीं देवळें, सजीवांसाठीं घरें व निर्जीवासाठीं स्मारकें वास्तुकलेमुळेंच मिळालीं असल्यानें ललितकलांमध्यें वास्तुकलेस अग्रपूजेचा मान दिला जातो.

मानवी संस्कृतीकडे काळाच्या दृष्टीनें पाहिलें असतां विचारांत घेण्यासारखे वास्तुकलेचे अगदीं प्राचीन नमुने इजित व मेसोपोटोमियांत आढळतात. धर्मांची व धर्मगुरूंची त्या काळांत लोकांवर असलेली पक्कड तेथील प्राचीन इमारतींत अगदीं स्पष्टपणें आढळून येते. एकावर एक दगड रचून नुसते निवाऱ्याचें स्थान तयार करणें हा वास्तुकलेचा मूळ हेतू नसून, दगडमातीसारख्या साधनांनीं मानसिक विकासाचें प्रत्यक्ष स्वरूपांत केलेलें चित्रीकरण ह्या दोन्ही देशांच्या इमारतींत आढळतें. अजूनहि अस्तित्वांत असलेलीं, नाईल नदीच्या कांठचीं तीन चार हजार वर्षांमागील मंदिरें व मेसोपोटोमियांतील राजवाडे वरील तत्त्वानुसार बांधलेले आहेत.

लव्हाळ्याच्या जुड्यासारखे दिसणारे उंच दगडी खांब, त्यावरील आडवे दगडी बाहाल आणि बाहेरून तिरप्या दिसणाऱ्या पृष्ठभागावर चित्रें कोरलेल्या भिंती हे इजिप्शियन वास्तुकलेचें वैशिष्ट्य आहे. गीझ येथील पिरॅमिड व कारनॅक आणि एडफू वगैरे ठिकाणचीं मंदिरें इजितमध्यें अजून पहावयास मिळतात.

मेसोपोटोमियांत कोठेंही दगड किंवा इमारतीचें लांकूड विपुल प्रमाणांत नसल्यानें, विटांच्या जाड भिंती व बाहेरून देखाव्यासाठीं रंगीत मुलामा दिलेल्या चपट्या विटा यांचा उपयोग केला गेला. दगडी किंवा लाकडी बाहालांच्या अभावामुळें विटांच्या कमानींचा उपयोग करणें तेथें भाग पडलें. निनव्हे, पर्सोपोलिस वगैरे ठिकाणीं जुन्या राजवाड्यांचे अवशेष अजून पाहावयास मिळतात.

ह्यानंतर ग्रीस देशाचा उदय झाला. इसवी सनापूर्वी ४९० ह्या वर्षी पर्शियन सैन्याचा पूर्ण पराभव केल्यावरच ग्रीकांना वास्तुकलेकडे लक्ष देण्यास अवसर मिळाला. पुढील ५० वर्षांत अथेन्सची कल्पनेबाहेर भरभराट झाल्यानें तेथील वास्तुकला जवळजवळ पूर्णत्वास पोंचली असें म्हणण्यास हरकत नाहीं. 'Athens, the eye of Greece, Mother of Arts, and Eloquence' ही मिल्टनची ओळ कोणास माहीत नाहीं !

ग्रीक संस्कृतीवर अर्थातच आशियांतील संस्कृतीचा बराच छाप असणें अपरिहार्य असलें, तरी ग्रीकांच्या जन्मजात कलासक्तीनेंच त्यांना ललितकलांमध्यें सर्वोच्च स्थान मिळवून दिलें. आज इतक्या वर्षांनंतरही जुनी ग्रीक वास्तुकला निर्दोष समजली जाते.

ग्रीक वास्तुकलेचें वैशिष्ट्य जरी इजिप्शियन वास्तुकलेप्रमाणें उभ्या दगडी खांबांत व बाहालांत असलें तरी त्यांमधील प्रमाणबद्धता, नाजुकपणा व साधेपणा दुसऱ्या कोणत्याही पद्धतींत आढळत नाहीं. शास्त्रीय ज्ञानाचा पूर्ण उपयोगही पहिल्यानें वास्तुकलेच्या संवर्धनांत ग्रीकांनींच केला. उदाहरणार्थ, दृष्टिभ्रमामुळें इमारतींत वैगुण्य आणणाऱ्या दोषांची त्यांना पूर्ण कल्पना होती. उभे मोठे खांब अगदीं सरळ घडवल्यास ते आंत ओढलेले दिसतात व ते किंचित् फुगीर केल्यास नीट सरळ दिसतात हें त्यांना माहीत असल्यानें त्यांचे सर्व खांब प्रत्यक्ष मापें घेतल्यास फुगीर आढळून येतात. अशाच इतर अनेक शास्त्रीय सुधारणांचा त्यांनीं आपल्या वास्तुकलेंत समावेश केला. डॉरिक पद्धत हाच ग्रीक वास्तुकलेचा मोठा आधारस्तंभ आहे. बहुतेक ग्रीक इमारती ग्रीसमध्यें मिळणाऱ्या संगमरवरी दगडाच्या असल्यानें त्यावर उत्कृष्ट शिल्पकामही आढळून येतें.

अथेन्स येथील पार्थेननचा उभा असलेला भाग, पेस्टम येथील पॉसिडानचें मंदीर, एपिडारस येथील उघडें थिएटर वगैरे प्राचीन ग्रीक कामें अजून पाहावयास मिळतात. ' जगांतील ललितकलांना उच्च

दर्जा प्राप्त करून देण्याचें अर्धें श्रेय ग्रीसला आहे' अशी असलेली म्हण अगदीं खरी आहे यांत संशय नाहीं.

ह्यानंतर इसवी सनापूर्वी १४६ पासून इसवी सन ३६५ पर्यंत रोमन साम्राज्याचा काल होता. रोमन लोकांनींही ग्रीकांची खांब व वाहाल पद्धत उपयोगांत आणली. त्यांनीं लावलेल्या काँक्रीटच्या शोधामुळें इतर अनेक प्रकारचीं, कमानी घुमटासारखीं बांधकामें त्यांना करतां आलीं. रोमन साम्राज्य अवाढव्य असल्यानें त्यांच्या गरजाही तशाच होत्या, त्यामुळें टोलेजंग राजवाडे, स्नानगृहें, मंदिरें, न्यायालयें, क्रीडांगणें, विजयस्तंभ वगैरे रोमन वास्तुकलेचे नमुने अजून पाहावयास मिळतात. सर्वच रोमन इमारती फार अवाढव्य असून त्या इटली, सिसिली, उत्तर आफ्रिका, पॅलेस्टाइन वगैरे रोमन साम्राज्याच्या सर्व भागांत विखुरल्या आहेत. पॅन्थेऑन, डायना व व्हीनसचें मंदीर, कॅराकॅलाचें स्नानगृह, कॉलॉसिअम क्रीडांगण, ट्रोजन व मार्कस ऑरेलिअसचे स्तंभ वगैरे रोमन वास्तुकलेचे नमुने अजूनही बऱ्या वाईट परिस्थितींत पाहावयास मिळतात.

ह्यापुढें रोमन साम्राज्यांतच ख्रिस्ती धर्माचा उदय झाला. बऱ्याच काळच्या छळानंतर हळूं हळूं तो सर्व साम्राज्यभर पसरला व शेवटीं राजघराणें ख्रिस्ती झालें. नवीन धर्मास अवश्य असणाऱ्या चर्चेससाठीं जुन्या रोमन न्यायालयांतच बदल करण्यांत आले व त्यांचीं चर्चेस करण्यांत आलीं. इ. स. ३३० मध्यें रोमन साम्राज्याची राजधानी रोमहून बायझान्टिअम म्हणजे हल्लींचें इस्तंबूल येथें हालवण्यांत आली. तेव्हांपासून आशियाशीं अधिक जवळचा संबंध आल्यानें रोमन वास्तुकलेंत घुमटांचें प्राधान्य झालें. ह्या तऱ्हेचा उत्कृष्ट नमुना म्हणजे इस्तंबूल येथील सांटा सोफियाचे चर्च. हल्लीं अर्थातच तेथें तुर्की राज्य असल्यानें ह्या इमारतीचा मशीद म्हणून उपयोग केला जातो.

रोमन साम्राज्याच्या नाशानंतर युरोपमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रसार फार झपाट्यानें होऊन नवीनच परिस्थिति निर्माण झाली. धर्माचा पगडा लोकांवर बसल्यानें धार्मिक संस्थांचें प्राबल्य वाढलें व जवळ जवळ सर्व सत्ता धर्माधिकाऱ्यांच्या हातांत गेली. बारावें शतक संपेपर्यंत असल्या परिस्थितींत निर्माण झालेली वास्तुकला रोमानिस्क ह्या नांवानें ओळखली जाते.

वैभवशाली रोमन साम्राज्यांतील मोडकळीस आलेल्या इमारतींतून योग्य तें सामान घेऊन चालू परिस्थितीस योग्य अशा इमारती बांधण्यास हळूं हळूं सुरवात झाली. जुन्या इमारतींचे अनेक भाग ह्यावेळीं वापरण्यांत आले. पूर्वकाळच्या अवाढव्यपणापेक्षां गरजा भागवणाऱ्या इमारती बांधण्याकडे अधिक लक्ष देण्यांत आलें. चर्चेसचे उंच मनोरे, कमानीच्या आकाराचीं छतें (Vaults) व नक्षीदार खांब हे ह्या कालच्या वास्तुकलेचें वैशिष्ट्य होय. ह्या कालचीं कामें अर्थातच चर्चेसच्या रूपानेंच आढळतात. पिसा येथील बॅप्टिस्ट्री, कॅथेड्रल, व झुकता मनोरा (इ. सन ११७४), जर्मनींतील वर्म्स येथील कॅथेड्रल, फ्रान्समधील ॲंगोलेम कॅथेड्रल हे ह्या पद्धतीचे नमुने आहेत.

बाराव्या शतकानंतर रोमन साम्राज्याचे निरनिराळे प्रांत स्वतंत्र झाले. आतांपर्यंत पोपची सत्ताही अगदीं दृढमूल झाली असल्यानें राजघराणींही त्यांच्या मुठींत होतीं. व्यापार व नवीन शहरेंही ह्या काळांत बरींच वसल्यामुळें लोकांच्या हातांत पैसा खेळत होता. ह्या संपत्तीचा उपयोग शहर सुधारण्याकडे फार मोठ्या प्रमाणांत करण्यांत आला. पंधराव्या शतकाच्या शेवटपर्यंत युरोपमध्यें निरनिराळ्या देशांत गॉथिक पद्धतीनें इमारती बांधण्यांत आल्या.

वरील भागांत पुष्कळच निमुळती होणारी बांकदार कमान, उंच किरकोळ खांब, कमानीपासून येणारा धक्का सहन करण्यासाठीं इमारतीच्या बाजूंना बांधलेल्या भरभक्कम भिंती (Buttresses) व ह्या सर्वांच्या कांहीं भागांवर कोरलेली बारीक व कौशल्यपूर्ण नक्षी गॉथिक पद्धतीचें वैशिष्ट्य दाखवितात. रोमन पद्धतींत इमारतीच्या बाजूस असलेल्या भिंती, वरच्या कमानीच्या आकाराच्या छताचा भार सहन करीत, तर गॉथिक पद्धतींत हा भार इमारतीच्या भिंतीस काटकोन करणाऱ्या भरभक्कम भिंती (Buttresses) सहन करीत. फरक इतकाच कीं, रोमन पद्धतींत कमानीच्या आकाराचीं छतें बहुधा काँक्रीटची असत, व गॉथिक पद्धतींत दगडाचीं असत. हें दगडही एकसारखे कमानीच्या आकारांत बसवलेले नसून, अन्तराअन्तरावर असलेल्या कमानींमधील पोकळ भाग भरून काढण्यासाठीं असत. ग्रीक वास्तुकलेमधील सौंदर्य व साधेपणा गॉथिक पद्धतींत नसला तरी तिच्यांतही उभेपणाचें एक निराळेंच सौंदर्य आहे

हें नाकबूल करतां येत नाहीं. पारिसचें नॉट्रे डाम चर्च, लंडन येथील वेस्टमिनिस्टर अॅबे, कोलोन येथील मोठें चर्च हीं गॉथिक पद्धतीनेंच बांधलेलीं आहेत.

पंधराव्या शतकांत छापखाने निघाल्यानें ज्ञानाचा प्रसार जिकडे तिकडे झपाट्यानें होऊं लागून फक्त धर्माधिकाऱ्यांच्या हातांतच विद्या व ज्ञान राहिलें नाहीं. सर्व प्रकारच्या कलाविकासास अनुकूल परिस्थिति ह्या सुमारास तयार झाली. इ. स. १४५३ मध्यें ओटोमन टर्क्सच्या हातांत कॉन्स्टांटिनोपल पडल्यावर अनेक ग्रीक व रोमन कलावंत इटलींत परत आले, आणि त्यांनीं जुन्या रोमन वास्तुकलेचें पुनरुज्जीवन करण्यास सुरवात केली. इटलींत गॉथिक पद्धतीचा पाय पूर्णपणें कधींच रुजला नव्हता. ह्याच सुमारास जुना रोमन आर्किटेक्ट व्हिट्रुव्हिअस ह्यानें लिहिलेलें वास्तुकलेचें पुस्तक उपलब्ध झालें व त्यामुळें इटलींत ही नवीन चळवळ जोरानें फोंफावली. हळूं हळूं बेल्जिअम, हॉलंड, स्पेन, फ्रान्स, जर्मनी आणि इंग्लंड वगैरे देशांनीं ह्याच पद्धतीचें अनुकरण केलें. ह्या वास्तुकलेस 'रेनायसन्स पद्धत' हें नांव आहे. फ्लॉरेन्स येथील रिकार्डी पॅलेस, रोम येथील मसीमी पॅलेस व सेंट पीटर्सचें चर्च, पॅरिस येथील लुव्हर गॅलरी व व्हर्सेलिस येथील राजवाडा, जर्मनींत हायडलबर्ग वाडा व ब्युकबर्ग येथील चर्च, ब्रुसेल्स येथील न्यायालय, ग्रॅनडा येथील मोठें चर्च, लंडन येथील सेंट पॉल चर्च वगैरे इमारती रेनायसन्स पद्धतीच्या आहेत.

हिंदुस्थानसारख्या प्राचीन व अवाढव्य देशांत अनेक धर्मांचा परिणाम शिल्पकलेवर घडून आला आहे. खिस्तापूर्वी २५० ते इसवी सन ७५० पर्यंत बुद्धधर्मीय पद्धती, इसवी सन १००० ते १३००पर्यंत जैन, व इसवी सन ६०० पासून आतांपर्यंत उत्तर हिंदुस्थानांत हिंदू पद्धत, मध्यहिंदुस्थानांत चालुक्य पद्धत व दक्षिण हिंदुस्थानांत द्राविडी पद्धत आढळून येते. बुद्ध पद्धतीचें कोरीव देवळांचे नमुने कार्ली, अजिंठा, नाशिक वगैरे ठिकाणीं आढळून येतात. जैनांचीं देवळें अबू, पारसनाथ, गिरनार वगैरे ठिकाणीं आढळतात, व हिंदू पद्धतीचीं मंदिरें भुवनेश्वर, पुरी, तंजावर, मदुरा वगैरे ठिकाणीं आढळतात. प्रत्येक ठिकाणीं इतक्या निरनिराळ्या पोटपद्धती हिंदी वास्तुकलेंत आहेत कीं, त्यांचें सांगोपांग विवरण करण्यास एक ग्रंथच पाहिजे. अधिक माहितीसाठीं जिज्ञासूंनीं हॅवेल, फर्ग्युसन वगैरे अभ्यासकांचे ग्रंथ वाचावे.

हिंदुस्थानांतील मुसलमानी वास्तुकला सॅरासेनिक पद्धतीची आहे. आग्रा, दिल्ली, विजापूर, गुजरात, मांडू वगैरे ठिकाणीं स्थलकालप्रमाणें बदल झालेले अनेक प्रकार हिंदुस्थानांत पाहावयास मिळतात. सर्व जगभर, अॅरेबियन, सीरियन, इजिप्शियन, स्पॅनिश, पर्शियन, टर्किश व हिंदी सॅरासेनिक वास्तुकलेचे अनेक नमुने विखुरलेले आहेत.

वास्तुशास्त्रः—'घर पाहावें बांधून' ही आपल्यांत असलेली म्हण अत्यंत अर्थपूर्ण आहे. तिचा उगम अर्थात् अननुभवी माणसांनीं घरें बांधतांना केलेल्या चुकांत आहे. अशा प्रसंगीं कांहीं अवश्य असे मुद्दे डोळ्यांसमोर ठेवल्यास मग पुढें पश्चात्ताप करण्याची पाळी येत नाहीं.

घर बांधण्यापूर्वी किंवा विकत घेण्यापूर्वी तें शहराच्या कोणत्या भागांत आहे ह्याचा विचार करणें फार महत्त्वाचें असतें. नेहमींच्या आयुष्यक्रमांत अवश्य असणाऱ्या शाळा, मंडई, दवाखाने, वाचनालयें वगैरे सोयी जवळ नसलेल्या घराची किंमत कमी ठरते व अशा घराच्या भाड्याचें प्रमाणहि कमी असतें. रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा, विजेची सोय झालेली नसलेल्या शहराच्या भागांत ह्या सोयी पुढें होतील अशा समजुतीनें प्लॉट घेणेंहि धोक्याचेंच असतें. अशा भागांत वरील सोयीबाबत म्युनिसिपालटीची योजना नक्की झालेली असल्यास गोष्ट निराळी.

साधारणपणें, आजकाल, घर बांधूं इच्छिणारा प्रत्येक इसम आपल्या मतानें फार सोयीचा असा नकाशा स्वतःच तयार करतो. अशा नकाशावरून बांधलेलीं बहुतेक घरें शास्त्रीय व अनेक तांत्रिक मुद्याचा विचार न होतां झालेलीं असल्यानें शेवटीं अगदीं गैरसोयीचीं असल्याचें आढळून येतें. अशा प्रकारें घर बांधण्यापेक्षां, आपणांस काय पाहिजे याची कल्पना आर्किटेक्टला देऊन त्याच्यावर सर्व जबाबदारी टाकणें सर्व प्रकारें इष्ट असतें. जुनें घर विकत घेणाऱ्यांनींहि आर्किटेक्टकडून त्याची पूर्ण पाहाणी करून मगच काय तें ठरवणें परिणामीं फायदेशीर ठरतें.

ह्या सर्व कामाबद्दल आर्किटेक्टला द्यावी लागणारी फी अगदीं योग्य कारणीं लागते. नकाशा तयार करणें, कोणत्या प्रकारचें इमारतसामान वापरावयाचें तें ठरविणें, नकाशाला म्युनिसिपालिटीकडून मंजूरी मिळविणें, व काम चालू असतांना देखरेख ठेवणें हीं कामें आर्कि-

टेक्ट फीच्या मोबदल्यांत करतो. आर्किटेक्टच्या विविध अनुभवांचा फायदा ह्यामुळें अनायासेंच घरमालकास मिळून मागून पश्चात्ताप करण्याची पाळी येत नाहीं.

घराची जागा विकत घेतांना इतर सोयींबरोबर पुढें दिलेले मुद्दे अवश्य लक्षांत ठेवावे:—१ आसपासच्या भागाची हवा निरोगी असावी. २ जमीन कोरडी व ओल किंवा दलदल नसलेली असावी. ३ जागेंत फार उतार किंवा चढाव नसावा. इमारतीजवळच जमिनीचा उंचवटा असल्यास हवा नीट खेळत नाहीं. ४ आसपास शहराच्या मैल्याचा निकाल करण्याची जागा, विटांचे किंवा चुन्याचे कारखाने किंवा तळीं वगैरे नसावीं.

घराचा प्रत्यक्ष नकाशा अर्थातच जमिनीच्या प्लॉटच्या आकारावर व इतर अनेक मुद्यांवर अवलंबून असतो. नकाशा तयार करतांना मुख्यतः लक्षांत ठेवण्याचा मुद्दा हा कीं, शक्यतोंवर दिवसांत केव्हांतरी प्रत्यक्ष सूर्यकिरणें महत्त्वाच्या खोल्यांत आलीं पाहिजेत. घरांत खेळणाऱ्या हवेइतकेंच सूर्यकिरणांचें महत्त्व आहे. ह्यासाठीं खोलीच्या प्रत्येक ५० घनफुटांमागें खिडक्यासाठीं एक चौरसफूट, हें प्रमाण धरणें इष्ट असतें. खिडक्यांची प्रत्यक्ष जागाहि योग्य त्या ठिकाणीं असणें महत्त्वाचें असतें. एखाद्या खोलीच्या मोठ्या भिंतींत मधोमध खिडकी नसल्यास, एकदम अंधारी आल्यासारखी वाटते. ज्या खोलीसमोर एकादें चांगलें दृश्य असेल अशा खोलीच्या खिडक्या व जरूर तर त्या खोलीची जागाहि शक्यतोंवर हा महत्त्वाचा मुद्दा लक्षांत घेऊन ठरवावी.

नकाशा तयार करतांना दिशा अवश्य लक्षांत घेतल्या पाहिजेत. निजण्याच्या खोल्या शक्यतोंवर पश्चिमेकडे आणि अभ्यास व लेखनवाचनाच्या खोल्या उत्तरेकडे असाव्या. शौचकूप वगैरे चुकूनही पश्चिमेकडे नसावें.

प्रत्येक घरांत दिवाणखाना ही एक महत्त्वाची खोली असते. घरमालकाच्या परिस्थितीची खरी कल्पना तिऱ्हाइतास ह्या खोलीवरूनच येते. कारण प्रत्येकजण आपल्या शक्यतेनुसार ही खोली सजवतो. दिवाणखाने पश्चिम किंवा दक्षिण, कोणत्याहि बाजूस असण्यास हरकत नाहीं. ह्या खोलीस खिडक्या व प्रकाश मुबलक असला पाहिजे व येथून दुसऱ्या कोणत्याहि महत्त्वाच्या खोलींत सहज व दुसऱ्या खोल्या न ओलांडतां जातां आलें पाहिजे.

अभ्यासाच्या खोल्या शक्यतोंवर जरा बाजूस व गडबड न होईल अशा ठिकाणीं असाव्या. ह्या खोल्यांतून सहज दिवाणखान्यांत येतां येणें इष्ट असतें.

शयनगृहें म्हणजे निजण्याच्या खोल्या घराच्या कोपऱ्याला असणें चांगलें, अशामुळें दोन दिशांकडून मिळणाऱ्या हवेचा उपयोग करून घेतां येतो. दक्षिण व पश्चिमेकडे खिडक्या असलेली निजण्याची खोली फारच उत्तम. सर्वच निजण्याच्या खोल्यांना ही सोय असणें शक्य नसतें; पण प्रत्येक निजण्याच्या खोलीस निदान एक तरी दक्षिणेकडे किंवा पश्चिमेकडे उघडणारी खिडकी अवश्य असावयास पाहिजे.

शयनगृहांतील अंथरुणाची किंवा पलंगाची जागा कोठें असावी ह्याचा विचार आपणांकडे क्वचित् होतो. पलंग अशा जागीं असावा, कीं दार उघडलें असतां बाहेरील माणसास आंतील पलंगाचा भाग शक्य तितका कमी दिसावा. चांगले आर्किटेक्ट आपल्या नकाशांतील शयनगृहावर नेहमीं पलंगाची जागा दाखवतात. प्रकृतीच्या दृष्टीनें, निजणाऱ्याच्या डोळ्यासमोर मोठी खिडकी असणें चांगलें नसतें; अर्थात् खिडक्यांना पडदे असल्यास हा प्रश्न उपस्थित होत नाहीं. उशागतची बाजूहि खिडकीच्या फार जवळ असणें इष्ट नसतें. कारण त्यामुळें फार वारा लागून, सर्दी, घसा धरणें वगैरे दुखण्यांचा त्रास होतो. पलंग कोपऱ्यांत भिंतीजवळ असल्यास निजणारा रात्रीं भिंतीकडील बाजूस कुशीवर वळल्यावर, त्याच त्याच हवेंत श्वासोच्छ्वास करूं लागतो; कारण भिंतीमुळें हवा खेळती राहात नाहीं.

आपल्याकडील घरांत स्वयंपाकघराइतके दुसऱ्या कोणत्याहि खोलीकडे दुर्लक्ष केलें जात नाहीं. वास्तविक पाहतां स्वयंपाकघर म्हणजे इतर कोणत्याहि खोलीइतकीच किंबहुना अधिक महत्त्वाची जागा असते. तेथें तयार होणाऱ्या पदार्थांशीं प्रत्येकाच्या प्रकृतीचा संबंध असतो. कोणची तरी, इतर कामास निरुपयोगी खोली म्हणजे स्वयंपाकघर, ही कल्पना शक्य तितक्या लौकर बदलणें अगदीं अवश्य आहे. घराच्या नकाशांत स्वयंपाकघराच्या जागेबद्दल अनेक मतें असलीं तरी आपल्या राहणीच्या दृष्टीनें पाहिलें तर घरांतल्या स्त्रियांना स्वतः न दिसतां बाहेरून घरांत शिरणारा मात्र सहज दिसावा अशा ठिकाणीं तें असणें योग्य असतें. वाचतांना अशक्य वाटणारा हा मुद्दा विचार

करून केलेल्या नकाशांत साध्य असतो. शक्यतोंवर स्वयंपाकघर दिवाणखान्यास चिकटून नसावें. पण जागेच्या अभावीं किंवा खर्चाच्या दृष्टीनें तसें शक्य नसल्यास, ह्या दोन खोल्यांत सरळ इकडून तिकडे जाण्यासारखें दार नसावें, म्हणजे स्वयंपाक चालू असतांना सुटणारा तळणाचा दर्प किंवा इतर वास बाहेर येत नाहीं.

स्वयंपाकघरांतील सामान ठेवण्यासाठीं बहुधा लाकडी स्टॅण्ड, रॅक, वगैरे वापराव्यात. ह्याऐवजीं घर बांधतांनाच भिंतींमध्यें काँक्रीटचे रॅक करून घेतल्यास फार सोयीचें होतें व जागाहि अडत नाहीं. अशा प्रकारें बांधलेलें स्वयंपाकघर पाहिल्यावांचून जागेची बचत किती होते ह्याची कल्पनाहि येणें शक्य नाहीं.

स्वयंपाकघरांतील उंच ओटा किंवा जमिनीवरील चूल हा ज्याच्या त्याच्या आवडीचा व सोयीचा प्रश्न आहे; पण हळूहळू उंच ओट्याचा प्रसार वाढणार हें निश्चित.

मध्यम वर्गांतील घरांत जेवण्यासाठीं अशी निराळी खोली बहुधा परवडत नाहीं. स्वयंपाकघरच जरा मोठ्या आकाराचें असल्यास जेवणघराचें काम भागतें.

खास स्नानगृहावांचून घर असणें शक्यच नाहीं हें दिवसेंदिवस लोकांस पटूं लागलें आहे हें सुचिन्ह आहे. चार फूट रुंद व सहा फूट लांबीचें स्नानगृह मध्यम वर्गाच्या लोकांच्या घरांत अगदीं पुरेसें होतें. शक्य असेल तेव्हां अधिक मोठें करणें केव्हांहि उत्तमच. शक्य असेल तेव्हां खालीं व बाजूंना निदान तीन फूट उंचीपर्यंत पांढर्‍या ग्लेझड् फरशा वापराव्या. त्यामुळें स्वच्छतेस फार मदत होते. ज्यांना फरशीचा खर्च परवडत नसेल त्यांनीं सीमेण्ट घोटून घ्यावें.

ज्या ठिकाणीं फ्लशचे शौचकूप असतील तेथें ते घरांतच तयार करतां येतात; पण जेथें अशी ड्रेनेजची सोय नसते तेथेंहि सेप्टिक टँक वापरल्यास फ्लशचे शौचकूप होऊं शकतात. अर्थात् हा खर्च ज्यांना झेपणें अशक्य असेल त्यांना मुख्य घराबाहेर कंपाउन्डच्या एका कोंपर्‍यांत शौचकूप बांधण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

शेवटीं लक्षांत ठेवण्याचा मुद्दा म्हणजे घराच्या आंत बाहेरून आढळून येणारी सौंदर्यदृष्टि. नुसती सोय झाली व पावसाचें पाणी आणि सूर्याचें कडक ऊन आंत आलें नाहीं म्हणजे घर तयार होत नाहीं. त्याच्या प्रत्येक भागांत कलापूर्ण दृष्टि दिसून आली पाहिजे. कला म्हणजे नुसती नक्षी नव्हे, तर निरनिराळ्या भागांचें एकमेकांशीं मिळून उठावदार दिसणें. साध्या रचनेंतहि कला आढळून येते हें कांहींहि नक्षी नसलेल्या पण खिडक्या दारें व विटांचा भाग ह्यांच्या एकमेकांबरोबरच्या विवक्षित रचनेमुळें सुंदर दिसणार्‍या घरावरून लक्षांत येईल. ही कलादृष्टि फार अभ्यासानेंच उत्पन्न होत असल्यानें असलें काम आर्किटेक्टच्याच हातीं सोंपविणें इष्ट होय. (दुसर्‍या भागांतील घर हाहि लेख पहावा.)

वाळा:–तृणवर्गांतील सुवासिक वनस्पति. पाण्याच्या पाटावर मुळांसकट कांहीं काड्यांचा गड्डा एकदां लाविला कीं त्याचें पुढें बेटच बनतें. हौशी लोकच आपल्याकडे याची लागण करतात; पण उत्तर हिंदुस्थानांत याची उत्पत्ति फार होते.

ह्या गवताच्या मुळ्यांनाच वाळा म्हणतात. वाळ्यापासून सुगंधी तेल बनवितां येतें. या तेलालाच ' खस ' हें नांव आहे. वाळ्याला हिंदींत खस म्हणतात. याशिवाय लोकांना पंखे, पडदे व उदबत्त्या यांसाठीं त्याचा उपयोग होतो. पित्तविकारावर याचें चूर्ण गुणकारी ठरलें आहे. वद्यै रक्तशुद्धीसाठीं वाळ्याचा उपयोग करून घेतो. वाळ्याचें गवत गुरें आनंदानें खातात. कित्येक लोक समारंभांत किंवा खासगी तर्‍हेनें वाळा घालून प्यायचें पाणी सुवासिक बनवून तें पिण्यास देतात. वाळवी असलेल्या रानांत हा लाविला तर तिचा नायनाट होतो. पड जमिनींत याची लागण केली तर ती करणार्‍यास आर्थिक लाभ झाल्याविना राहणार नाहीं.

वाळ्याच्या जाती दोन, एक पांढरा व दुसरा काळा. सिंधमध्यें काळ्या वाळ्याची निपज पुष्कळच होते.

विजयादशमी:–दसरा हा लेख खंड २ रा, पृष्ठ १०११ वरील पहा.

विजयानगर:– १४–१५ व्या शतकांत दक्षिण हिंदुस्थानांतील हिंदू साम्राज्याची राजधानी. सध्यां हें ठिकाण मद्रास इलाख्यांतील बल्लारी जिल्ह्यांतल्या होसपेट तहशिलींत आहे. या नगराचे अवशिष्ट भाग सध्यां हंपी नांवाच्या एका छोट्या खेड्याजवळ पाहण्यास मिळतात. जवळच तुंगभद्रा नदी वाहते. भोंवतालचा भाग टेकड्यांनीं व्यापलेला आहे. सर्व ऋतूंत येथील निसर्गाची शोभा आल्हाददायक वाटते.

अशा या सुंदर ठिकाणीं, १३३६ त विजयानगर या शहराची स्थापना, सर्वांना आदरणीय बनलेल्या विद्यारण्य स्वामींनीं तत्कालीन हरिहर व बुक्क या बंधूंच्या हस्तें केली. या शहराचा विस्तार तीस कोस असून त्याच्या भोंवतीं सात तट होते. प्रमुख भाग राजवाडा व त्याच्या सभोंवतालचें आंगण हा होय. राजवाड्याच्या चारहि बाजूंना सांडपाण्याचीं गटारें असून नगरांतील इमारती दगडी होत्या. लोक जवळच्या तुंगभद्रेच्या पाण्याच्या कालव्यावर ऊंस व तांदूळ यांचीं पिकें काढीत. राजवाड्याजवळच नदीच्या कांठीं नृसिंह व पंपावती यांचीं देवळें आहेत. एका देवळांतील नृसिंहाची मूर्ति २२ फूट उंच आहे. वरील सर्व कामें कृष्णदेव रायाच्या आधिपत्यांत झालीं आहेत असें १४४० च्या सुमारास एका परदेशस्थ प्रवाशानें लिहून ठेवलें आहे.

या ठिकाणीं सारी हिंदू वास्तुकला एकवटली होती. येथील वैभव, सत्ता हस्तगत करण्यासाठीं या नगरावर मुसलमानांनीं अडीचशें वर्षें खटपट केली; पण या नगरानें दाद दिली नाहीं. परंतु तालीकोटच्या युद्धांत येथील राजाचा व त्याचबरोबर भूषणभूत बनलेल्या या नगराचाहि नाश झाला.

विजापूरः—मुंबई इलाख्यांतील विजापूर जिल्ह्याचें मुख्य ठिकाण व अदिलशाहीची ऐतिहासिक राजधानी. मद्रास सदर्न मराठा रेल्वेवरील हें एक स्टेशन आहे. इ. स. १४८९ पासून १६८६ पर्यंत म्हणजे आदिलशाहीचा अंत होईपर्यंत हें शहर आदिलशाहीची वैभवशाली राजधानी म्हणून विख्यात होतें. १६८६ मध्यें औरंगजेबानें हें शहर उध्वस्त केलें.

युसफ आदिलशहा (इ. स. १४८९ ते १५१०), इब्राहिम आदिलशहा, महंमद आदिलशहा (इ. स. १६२६ ते १६५६) या तीन प्रमुख बादशहांच्या कारकीर्दीत विजापूरनें मोठें वैभव उपभोगिलें.

मुसलमानांची राजधानी म्हटली कीं, मोठमोठ्या इमारती तिथें असावयाच्याच. तशा या ठिकाणींहि आहेत. पैकीं गोलघुमट, इब्राहिम रेझा, जुम्मा मशीद, आरसेमहाल (यांत महंमद पैगंबराच्या दाढीचे दोन केंस मोठ्या काळजीपूर्वक जपून ठेवले आहेत अशी दंतकथा आहे.) या इमारती, मुलुखमैदान ही त्या कालांतली सर्वांत मोठी तोफ, पडका कोट, अनेक मोठ्या विहिरी, बुरूज व मनोरे पाहण्यासारखे आहेत.

१५

विजापूरकर, विष्णु गोविन्द (१८६३–१९२६):– राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते. कोल्हापुरला २६ ऑगष्ट १८६३ सालीं यांचा जन्म झाला. कोल्हापूर येथें दुय्यम व थोडेंसें उच्च शिक्षण होऊन पुढील उच्च शिक्षणाची पूर्तता पुण्यास केली. १८८०त यांनीं प्रवेशपरीक्षा दिली. यांच्या बी. ए. व एम. ए. या परीक्षा अनुक्रमें १८८६ व १८९३त पार पडल्या. १८८९ ते १९०५ पावेतों यांनीं पुणें व अहमदाबाद या ठिकाणीं नोकरी केली. पुढें हे नोकरी लागल्यामुळें कोल्हापुरास कायमचे आले. व्यवसाय संभाळूनच यांनीं समर्थ, विश्ववृत्त व ग्रंथमाला हीं नियतकालिकें सुरू केलीं. पुढें सरकारनें यांना नोकरींतून कमी केलें. त्यांना 'वैदिक प्रार्थनेची तेजस्विता' या लेखाबद्दल तीन वर्षांची राजद्रोह व खून हे आरोप ठेवून शिक्षा दिली. कारावासांतून सुटल्यावर यांनीं सर नायर व सर चौबळ यांच्या मदतीनें तळेगांवला समर्थ विद्यालयाचें पुनरुज्जीवन केलें. हे १ ऑगस्ट १९२६ या दिवशीं मरण पावले.


त्यांचा स्वभाव निगर्वी व प्रयत्नशील होता. १९०८च्या सुमारास प्रो. विजापूरकर यांनीं कोल्हापूरला चळवळ करून प्रति पुण्याचें स्वरूप आणून दिलें. सध्यां मात्र महाराष्ट्र त्यांना केवळ राष्ट्रीय शिक्षणाचे कट्टे पुरस्कर्ते म्हणून ओळखतो.

विजेची घंटाः—आकृतीवरून विजेची घंटेची रचना व ती कशी वाजते हें लक्षांत येईल. (पृ. १७६२ चित्र पहा)

विजेचे दिवेः—विजेचा प्रवाह स्विच् देऊन सुरू केल्यावर विजेच्या दिव्याच्या बल्बमधील फिलॅमेंट तापतें; तें इतकें कीं तें फिलॅमेंट (नाजूक दिसणारी तार) धगधगून त्यांतून स्वच्छ पांढरा प्रकाश बाहेर फेंकला जातो.

विजेच्या दिव्याच्या बल्बचे चार प्रकार आहेत. १ स्वच्छ कांचेचा, २ गॅस भरलेला; या बल्बमध्यें (Gas-filled) व स्वच्छ कांचेच्या बल्बमध्यें (Clear) स्पष्ट फरक कांहीं दिसत नाहीं. ३ दुध्या रंगाच्या कांचेचा (Frosted) व रंगीत कांचेचा. प्रत्येक बल्ब किती प्रकाश देऊं शकतो हें त्यावर वॅटमध्यें लिहिलेलें असतें. (पृ. १७६३ आकृति पहा.)

विंचूः—प्राणिशास्त्रज्ञांनीं कोळी व विंचू यांचा शरीररचनेच्या दृष्टीनें एकाच वर्गांत समावेश केला आहे. विंचू उष्ण प्रदेशांत असतात. विंचवाचें शरीर लांब




विजेची घंटाः—डाव्या बाजूची आकृति—१ जस्ताचा तुकडा, २ कार्बन, ३ बॅटरीच्या कांचेच्या बरण्या, ४ बटन किंवा पुश (हें बटण दाबलें कीं तारांचा संबंध जुळून विद्युत्प्रवाह सुरू होतो), ५ बटनमधून घंटेकडे जाणारी तार (Going wire), ७ घंटेंतून निघून बॅटरीकडे विद्युत्प्रवाह वाहून नेणारी तार (Return wire).

उजव्या बाजूची आकृति—घंटेची अंतररचना. १ बॅटरीच्या तारा घंटेला या ठिकाणीं जोडतात (Terminals), २ पोलादी पट्टचा. याच्या भोंवतीं तांब्याची तार गुंडाळलेली असते (Coil-magnet), ३ घंटेची वाटी, यावर ४ नें दाखविलेल्या टोंकाला गोळी असलेला दांडा आपटतो. ५ स्प्रिंग, ६ तार आवळण्याचा स्क्रू, ७ प्लॅटिनमची चकती ६नें दाखविलेल्या स्क्रूला जोडलेली आहे.

घंटा कशी वाजते ?—बटन ४ दाबतांच विद्युत्–प्रवाह सुरू होतो व २ आकड्यानें दाखविलेल्या पोलादी पट्टयांत चुंबकशक्ति निर्माण होते व त्यामुळें ४ आकड्यानें दाखविलेली लोखंडी पट्टी (आर्मेचर) त्यांच्याकडे आकर्षिली जाते (याचवेळीं या पट्टीच्या टोकाशीं असलेला लोखंडी गोळा घंटीच्या वाटीवर आदळतो), पण यामुळें ५ आंकड्यानें दाखविलेल्या ठिकाणची ४ आकड्यानें दाखविलेल्या पट्टीला जोडलेली वांकडी पट्टीहि त्याबरोबर डाव्या बाजूस ओढली जाते व तेथील संबंध (Contact) तुटतो. यामुळें चालू असलेला विद्युत्–प्रवाह थांबतो–तुटतो. प्रवाह बंद पडल्यामुळें २ आंकड्यानें दाखविलेल्या लोखंडी पट्टयांतील चुंबकशक्ति नाहींशी होते व आर्मेचर पुन्हां पहिल्या ठिकाणीं येतो. यामुळें पुन्हां ५ आंकड्यानें दाखविलेल्या ठिकाणीं (आर्मेचर स्प्रिंगला चिकटतो) तुटलेला संबंध जुळतो व पुन्हां विद्युत्–प्रवाह सुरू होतो. याचप्रमाणें सतत (बटन दाबलेलें असेल तोंपर्यंत) क्रिया चालते व घंटा वाजत राहते.

असून लांबलचक सहा पेरांची शेंपटी असते. या शेंपटीच्या टोंकाला नांगी असते. या नांगींतून विष बाहेर पडतें. विंचवानें नांगी मारली असतां तीव्र वेदना होतात. पण त्यानें मनुष्य सहसा दगावत नाहीं. विंचवाला प्रत्येक बाजूला चार याप्रमाणें आठ पाय असतात. ते छातीशीं संलग्न असतात. डोकीला लागून चिमट्यासारखा एक अवयव असतो; त्यानें किडे व कोळी पकडून विंचू आपलें भक्ष्य मिळवितो. भक्ष्य पकडल्यानंतर त्याला तो नांगीनें मारतो. पोटाच्या खालच्या भागाला दोहोंबाजूस श्वासोछ्वास करण्याकरितां छिद्रें असतात. पाठीच्या कवचीवर डोळे असतात. या डोळ्यांची संख्या विंचवाच्या जातीवर अवलंबून आहे. मात्र सामान्यतः सहापासून बारापर्यंत डोळे असलेले विंचू आढळतात. विंचू काळे, पिंवळे असतात. पिलें जन्मानंतर पुष्कळ दिवस आईच्या अंगावरच असतात.



बल्बची अंतर्रचना–१ फिलॅमेंट, २ कांचेची सळई (Glass rod) ३ विद्युतप्रवाहाशीं जोडल्या जाणाऱ्या तारा, ४ सीलिंग ट्यूब (Sealing tube),५ लुकण (Cement), ६ निर्वात पोकळी किंवा गॅस भरलेली पोकळी.

विदुर:–कौरवांकडील पांडवांचा पक्षपाती पण निस्पृह मुत्सद्दी. व्यासापासून अंबिकेच्या दासीला हा झाला. लहानपणापासूनच याची वृत्ति धर्म व सत्य यांकडे होती. हा धोरणी व निस्पृह असल्यामुळें धृतराष्ट्र याच्या सल्यानें वागे. पांडवांना वनवासाला पाठवूं नये म्हणून यानें पुष्कळ खटपट केली. त्यांच्याबरोबर हा वनवासाला गेला. धृतराष्ट्राच्या आग्रहानें हा पुनः परत आला.अज्ञातवासानंतर यानें धृतराष्ट्राला पांडवांचें राज्य परत देवविण्याबद्दल पुष्कळ उपदेश केला, पण तो निष्फळ ठरला. या वेळीं केलेला उपदेश 'विदूरनीति' या नांवानें प्रसिद्ध आहे. भारतीय युद्धांत यानें भाग न घेतां त्यावेळीं तो तीर्थयात्रेला निघून गेला. पांडवांना राज्य मिळाल्यावरहि हा हस्तिनापुरांत राहात असे. पुढें धृतराष्ट्राबरोबर हा वनांत गेला. कांहीं कालानें याला उद्धवाचें दर्शन झालें. उद्धवाच्या सांगण्यावरून यानें मैत्रेयाचा उपदेश घेतला. पुढें हा पिशाचवृत्तीनें राहूं लागला. एके दिवशीं अरण्यांत याच्या भेटीस धर्म आला असतांना दोघांची दृष्टादृष्ट झाल्याबरोबर धर्माच्या शरीरांत विलीन झाला. भागवतांत यानें प्रभास क्षेत्रांत देहत्याग केला असें म्हटलें आहे.

विद्युत्:–वीज हा लेख पाहा.

विंध्याद्रि:–हिंदुस्थानचे दोन भाग करणारा पर्वत. हा गुजराथपासून बहारपावेतों पसरला आहे. याची लांबी ७०० मैल भरते. विंध्य सातपुडा यांचा संयोग अमरकंटकाजवळ झाला आहे. २००० फुटांहून याची कोठेंहि अधिक उंची नाहीं. बरझिरी येथें उगम पावणारी २२५ मैल लांबीची 'काळीसिंथ' व २२० मैल वाहणारी 'पार्वती' या दोन प्रमुख नद्यांचा उगम या पर्वतावर होतो.

पुराणांत याच्यासंबंधीं पुढीलप्रमाणें हकीकत दिली आहे.

हा अगस्तीच शिष्या. हिमालय व मेरू यांच्या उंचीचें वैषम्य याला वाटें, म्हणून यानें आपली उंची वाढविण्यास आरंभ केला. शेवटीं हा खूपच उंच वाढला. या उंचीमुळें सूर्यप्रकाश आडला, तेव्हां याच्या उंचीची भीति देवादिकांना वाटूं लागली म्हणून त्यांनीं ती कमी होण्यास त्याचे गुरु अगस्तीची प्रार्थना केली. अगस्तीनें उंची कमी करण्याबद्दल यांना आश्वासन दिलें. पुढें विंध्याद्रीला भेटण्यास अगस्ती गेले; अगस्ती आले म्हणून यानें साष्टांग नमस्कार घातला त्यावेळीं अगस्तीनें 'तथास्तु' म्हणून आशिर्वाद दिला. या आशिर्वादामुळें विंध्याद्रीची उंची कायमची कमी झाली.

विनायक, मास्टर (१९०६–):–प्रख्यात महाराष्ट्रीय सिनेमा नट व दिग्दर्शक. यांचें पूर्ण नांव विनायक दामोदर कर्नाटकी. यांचा जन्म कोल्हापुरास ता. १९ जानेवारी १९०६ इ. रोजीं झाला. १९२४ सालीं हे मॅट्रिक झाले. राजाराम कॉलेजमध्यें बी. ए.च्या वर्गांत असतांना १९३१ सालीं प्रभात फिल्म कंपनीच्या आयोध्येचा राजा या पहिल्या बोलपटांत नारदाची भूमिका करण्यासाठीं कोल्हापूर विद्यापीठांतील शिक्षकाचा व्यवसाय सोडून चित्रपटधंद्यांत शिरले (१९३१).



मा. विनायक

यानंतर प्रभातच्या मायामच्छिंद्र, अग्निकंकण व सिंहगड या बोलपटांत प्रमुख भूमिका करून ते प्रसिद्धीस आले. १९३३ मध्यें कोल्हापुरला नवीन निघालेल्या 'कोल्हापूर सिनेटोन'मध्यें ते गेले. तेथेंच १९३४ सालीं 'विलासी ईश्वर' हा पहिला बोलपट त्यांनीं दिग्दर्शित केला. यानंतर त्यांनीं हंस पिक्चर्स या स्वतःच्या सिनेमा कंपनींत 'छाया,' 'धर्मवीर,' 'ब्रह्मचारी,' 'देवता,' व 'अर्धांगी' हे चित्रपट दिग्दर्शित केले. नंतर १९४० च्या प्रारंभीं स्थापन झालेल्या 'नवयुग चित्रपट लि.'मध्यें ते गेले असून या कंपनींत 'अमृत' व 'लग्न पाहावें करून' हे दोन बोलपट आतांपर्यंत दिग्दर्शित केले आहेत.

चित्रपटधंद्यांत शिरण्यापूर्वीं शाळा कॉलेजांतील नाटकांतून त्यांनीं कामें केलीं होतीं. त्याचाच पुढें विकास होऊन सिनेमानट व दिग्दर्शक म्हणून मा. विनायक चमकले आहेत. अभिनयाच्या बाबतींत जिव्हाळा व मिस्किलपणा हें त्यांचें वैशिष्ट्य असून दिग्दर्शनाच्या बाबतींत हळूवार भावना, सूचकता, चुटचुटीतपणा हे गुण आहेत. विनोदी बोलपट काढण्याच्या जनकत्वाचा मान जरी त्यांना मिळाला नाहीं तरी खरेखुरे विनोदी चित्रपट (Comedy) काढल्याचें श्रेय मात्र आज त्यांना एकट्यालाच द्यावें लागेल.

विमानः—विमानाचें उड्डाण पाहून विस्मय आपल्याला वाटतो, पण अगदीं साध्या तत्त्वावर विमान हवेंत उड्डाण करूं शकतें. हवेचा दाब व हवेची प्रतिक्रिया या दोघांचा फायदा घेऊन विमान हवेंत तरंगत राहतें. सोबतचें चित्र पाहा, म्हणजे विमान हवेंत कसें तरंगतें हें समजून येईल.

विमानाच्या प्रॉपेलरचें मुख्य कार्य म्हणजे विमान पुढें ओढीत नेणें हें आहे. स्क्रू लांकडांत पिळूं लागलो म्हणजे ज्याप्रमाणें तो सरळ पुढें जातो त्याप्रमाणेंच प्रॉपेलर सारखा फिरून विमानासह हवेंत पुढें घुसत



विमानाची रचना

प—गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणें विमान बाणानें दाखविलेल्या दिशेनें खालीं ओढलें जातें. **र**—विमानाच्या पंख्याला आपटून मागें रेटलेल्या हवेची प्रतिक्रिया बाणानें दाखविल्याप्रमाणें होते व वर विमान रेटलें जातें. **व, न**—विमानाचे पंख पुढें किंचित् वर कललेले असल्यामुळें त्यावर आपटून हवा बाणांनीं दाखविलेल्या दिशेनें मागें जाते. **त**—प्रॉपेलर. या प्रॉपेलरमुळें (पंख्यामुळें) विमान बाणानें दाखविलेल्या दिशेनें ओढलें जातें.

१ पंखा (प्रॉपेलर) २–८ पंख (Wings), ३ विमान जमिनीवर असतांना प्रथम या खरी धांवांच्या चाकावरून थोडें अंतर जोरानें जातें व मग उंच उडूं लागतें (Landing Wheels), ४ विमानांत जाण्याचें द्वार ५ विमानाच्या शेपटीचें चाक (Skid), ६ विमान उंच चढवणारा पंखा (Elevator), ७ सुकाणूं, ९ वैमानिक बसण्याची जागा.


असतो. प्रॉपेलरनें कमींत कमी २५–३० मैल वेग विमानाला आला म्हणजे विमान वर चढूं लागतें. जमिनीवर विमान सुरू झाल्यानंतर कमींत कमी ९० ते १०० फूट जमिनीवरून सरपटत जातें. हा प्रॉपेलर फिरत ठेवण्याचें कार्य विमानांत असलेलें इंजिन करतें.

विमानाला गति मिळाल्याबरोबर हवा विमानाच्या दोन्ही पंखावर आदळते आणि **व–न** या दोन बाणांनीं दाखविलेल्या दिशेनें जोरानें ढकलली जाऊन तीच विमानाला **र** या बाणानें दाखविलेल्या दिशेनें वर ढकलते. यावेळीं आणखी एक मौज घडत असते ती अशी. गुरुत्वाकर्षणामुळें पृथ्वी विमान आपल्याकडे ओढीत असते. पण यामुळें **व–न** या दिशेनें आलेल्या हवेवर विमानाचा–खालीं ओढलें गेल्यामुळें आणखी दाब बसतो व त्याउलट **र** या दिशेनें ती हवा विमानाला वर रेटीत राहते; विमान जितक्या वेगानें चाललें असेल तितक्या प्रमाणांत हा हवेचा दाब व **र** या दिशेनें प्रतिक्रिया जोरानें चालू असते. यावेळीं विमानाच्यावर हवा कमी असते कारण विमानाच्या पंखांच्या आघातामुळें बरीचशी हवा चित्रांत दाखविल्या-प्रमाणें खालीं रेटली जाते हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. याचा फायदा असा होतो कीं, विमानाला वरून हवेचा दाब कमी सहन करावा लागतो व त्यामुळें विमान वर चढण्याला मदत होते. अगदीं साध्या शब्दांत कशारीतीनें विमान हवेंत तरंगतें तें या ठिकाणीं सांगितलें आहे.


विमानाचें उड्डाण यशस्वी झाल्यावर आणखी गरजा वाढून विमानांचे आकार वाढूं लागले. लढाईच्या कामीं विमानांचा फार उपयोग होत असल्या-मुळें बॉम्ब टाकण्यासाठीं विमानें तयार होऊं लागलीं आहेत. विमानाचा वेग वाढविण्यासाठीं अधिक शक्तीचीं यंत्रें विमानांत बसविण्यांत येतात.

विमानांत प्रवासी (Civil) व लष्करी (Military) विमानें असे दोन मुख्य भेद आहेत. कांहीं विमानें टपाल नेण्यासाठींच मुख्यतः बांधलेलीं असतात. प्रवासी विमानांतून राहण्याची किती उत्कृष्ट सोय केलेली असते हें या लेखांत दिलेल्या एका डच विमानाच्या चित्रा-वरून कल्पना येईलच. अशा मोठ्या विमानांत २००० ते २५००० च्या दरम्यान अश्वशक्ति असलेली इंजिनें बसविलेलीं असतात. ४०–४५ माणसें यांतून नेतां येतात. सिव्हिल विमानांचा वेग दर ताशीं साधारणतः १२५ मैलांच्या खालीं नसतो. सिव्हिल विमानांत एक, दोन, चार अशीं माणसें वाहून नेणारीं लहानमोठीं विमानें असतात. अशा लहान विमानांचा वेग अर्थातच जास्त असतो.

लष्करी विमानांतहि एक, दोन, तीन, चार असे सैनिक नेणारीं लहान विमानें असतात. तशीच एकाच वेळीं ३० सैनिक नेणारींहि विमानें असतात. लष्करी विमानांचा वेग सिव्हिल विमानांच्यापेक्षां साधारणतः अधिक असतो.



बॉम्ब फेकणारें विमान



विमानः–१ फिरवितां येणारा दिवा, २ Mooring Compartment, ३ वरच्या खोलींत जाण्यासाठीं शिडी, ४ धातूच्या पत्र्याची बाहेरची बाजू, ५ गप्पा मारत बसण्याची व धुम्रपानाची जागा ६ मधलें दार, ७–८ स्वयंपाकघर व स्वैपाकी (Steward), ९ पुरुषांची मुत्री, १० वरच्या मजल्यावर जाण्याचा रस्ता, ११ स्त्रियांची मुत्री, १२ विमानाच्या मध्यभागीं असलेली बैठकीची खोली, १३ घडीच्या खुर्च्या, १४ मुख्य दरवाजा, १५ वरच्या पंख्याला जोडलेला धातूच्या पट्टयाचा तर (float), १६ लहान फेऱ्या मारतां येतील व उभें राहून खालचें दृश्य पाहातां येईल अशा सोईची मोठी खोली, १७ मागची खोली, १८ जमिनीवर उतरतांना जास्त प्रकाशासाठीं दिवा, १९ विमानाच्या पंखाच्या (Wing) मागच्या बाजूला असणारी व खालीवर करून दिशा बदलतांना हवेची प्रतिक्रिया कमि अधिक करणारा तर (Flap), २० टपाल व प्रवाशांचें सामान, २१ आन्तरराष्ट्रीय खूण २२ खाद्यपेयपदार्थांचा सांठा व इतर माल, २३ गाद्या ठेवण्याची जागा, २४ विमानाचा संपूर्ण धातूचा पंखा (Wing), २५ झोंपण्याची जागा, २६ ७४० अश्वशक्तींचीं इंजिन्स, २७ रेडिओसाठीं एरियल, २८ सामानाच्या खोल्या, २९ डोलकाठी वरचा दिवा, ३० पंख्याची बदलता येणारी पाती, (Propeller-blades) ३१ वाऱ्याचा वेग दाखविणारी यंत्रयोजना, ३२ विमानावरील कारकून, ३३ दिवा, ३४ सरकणारी व बदलतां येणारी एरियल, ३५ रेडिओयांत्रिक, ३६ कप्तान, ३७ पहिला अधिकारी (First officer), ३८ विमानाचीं यंत्रें व स्वयंचल वैमानिक (Pilot), ३९–४० विमान नांगरण्याची चौकोनी जागा (Mooring hatch)

ड = डिपोल एरियल.

याशिवाय तिसरा एक प्रकार असतो. त्याला ऑटोगिरो (Autogiro) असें नांव आहे. याप्रकारच्या विमानानें सिव्हिल व लष्करी या दोन्ही प्रकारची कामगिरी करतां येईल असा शास्त्रज्ञांचा कयास आहे. या विमानांत विमानाच्या डोक्यावर तीन पात्यांचा एक पंखा असतो, यामुळें इंजिन बंद पडलें तर विमान पुढें न जातां जवळजवळ सरळ रेषेंत खालीं येऊं शकतें व अपघात टळतो. विमानाला गति येण्यासाठीं इतर विमानांप्रमाणेंच इंजिन व पुढें प्रॉपेलर असतो.ताशीं ३० मैलांपेक्षांहि याला कमी वेग ठेवतां येत असल्यामुळें अपघाताचीहि भीति फार कमी. याप्रकारच्या विमानांचा प्रसार मात्र अद्याप फारसा झालेला नाहीं.


यानंतर आणखी दोन महत्त्वाचे प्रकार म्हणजे समुद्रयान (Seaplane) व हवाई जहाज (Airship) किंवा झेपेलिन हे होत. समुद्रयानांचा मुख्य फायदा हा कीं, पाण्यामध्यें हें विमान उतरूं शकतें. यामुळें जमिनीवर उतरतांना एखादें वेळीं अपघात होण्याचा संभव असतो तो यांत कमी असतो. शिवाय उतरतांना व चढतांना पाण्याचा मोठा व मोकळा पृष्ठ-

भाग मिळत असल्यामुळें जमिनीवरील जागेची अड-चणही नाहींशी होते. क्वचित् समुद्रावरून जातांना अपघात झालाच तर समुद्रांत उतरून राहातां येतें.

या प्रकारच्या विमानांतून दीड टन टपाल व १५ ते २० मंडळी नेतां येतात. समुद्रयानाचा वेग ताशीं १०० मैलांहून अधिक असतो व सुमारें २५०० अश्वशक्तीचीं इंजिनें त्यांत बसविलेलीं असतात. कांहींत ७००० अश्वशक्तीचीं इंजिनें बसविलेलीं अस-तात व ५० ते ६० टन एवढें वजन ती वाहूं शकतात.


हवाई जहाजांत हवेंत जहाज तरंगत राहण्यासाठीं निराळी योजना केलेली असते. हायड्रोजन गॅस हवेपेक्षां हलका असल्यामुळें या वायूच्या पिशव्या (टांक्या) भरून घेऊन जहाज हवेंत तरतें ठेवतां येतें. पण आर १०१ हें इंग्लंडचें हवाई जहाज अपघातानें जळून गेल्यापासून हायड्रोजन गॅसचा घातकीपणा शास्त्रज्ञांच्या दृष्टोत्पत्तीस आला. नंतर स्फोट न घेणारा हायड्रोजन हा गॅस वापरून डॉ. एकनेर नांवाच्या जर्मन शास्त्र-ज्ञानें ‘ हिंडेनबुर्ग ’ नांवाचें झेपेलिन बांधलें व त्यानें बराच प्रवास यशस्वी केला. पण हें झेपेलिन ६ मे १९३७ रोजीं लेकहर्स्ट (अमेरिका) येथें जळालें. हायड्रोजनपेक्षां हेलियम गॅस हा न जळणारा गॅस झेपेलिनसाठीं वापरण्याबद्दल शास्त्रज्ञांची खटपट चालू आहे. पण हेलियम एकट्या अमेरिकेंतच उत्पन्न होत असल्यामुळें व हायड्रोजनपेक्षां तो फार महाग पडत असल्यामुळें आतांपर्यंत त्याचा फारसा उपयोग करून घेतां आला नाहीं. झेपेलिनला गतीसाठीं इंजिन ठेवून व मागें प्रॉपेलर ठेवून सोय करतां येते. एकदम १०००० मैल उड्डाण करणें झेपेलिनला शक्य असतें. शिवाय कसल्याहि हवेंतून निर्वेध प्रवास करतां येतो. विमानापेक्षां झेपेलिनचा वेग कमी असतो. झेपेलिनमधून १००–१२५ मंडळी नेतां येतात व १५० ते १८० टन एवढें वजन (संपूर्ण) उचलतां येतें.

याशिवाय हेलिकॉप्टर (Helicopter) नांवाचाहि एक विमानाचा प्रकार आहे. या विमानामुळें



अशा दिशेनें सरळ एकदम वर उडतां येते व खालीं येतां येते. यामुळें विमान-गृहांचा प्रश्न सुटतो. १९२४ सालीं मार्क्विस ऑफ पिस्कॅरा यांनीं या पद्धतीचें विमान बांधलें होतें.

विमानाला अपघात झाला तर विमानांतून उडी टाकून पॅराशूटच्या सहाय्यानें वैमानिकाला किंवा इतर प्रवाशांनाहि खालीं सुरक्षित उतरतां येतें.



विमानविरोधक तोफ

विमानांतून उडी टाकल्यावर १, २, ३ असे आंकडे मोजून झाले कीं, पाठीवर बांधलेल्या पॅराशूटची रिप्-कॉर्ड (निरगांठीची दोरी) ओढावयाची असते. ही दोरी ओढतांच पॅराशूट (हवाई–छत्री) हळूं हळूं उघ-डते व तिच्या कापडी डेऱ्यांत हवा भरून ती तरंगूं लागते व त्याबरोबर मनुष्यहि तरंगूं लागतो व हळूं हळूं जमिनीवर येतो. विमानांतून उडी टाकल्यावर तीन आंकडे एवढ्यासाठीं मोजावयाचें कीं, पॅराशूट सुटून ती विमानाच्या कोणत्याहि भागांत अडकूं नये. पॅराशूट उघडण्यापूर्वीं खालीं पडतांना मनुष्य ताशीं १२५ मैलापेक्षांहि अधिक वेगानें येतो. तो जसजसा जमिनीजवळ येत जाईल तसतसे हवेचे थर जास्त दाट होत असल्यामुळें प्रतिक्रिया जोरांत होते व त्याचा पडण्याचा वेग कमी कमी होत जातो. पॅराशूटच्यामुळें हा वेग कमी कमी होत ताशीं २० च्या आसपास येतो. १७९३ सालीं ब्लन्कार्ड यानें प्रथम पॅराशूट बनविली,

१९१८ मध्यें तिचें महत्त्व पटलें. आजच्या पॅराशूटचा जन्म १९२१ सालीं झाला. १९३५ सालपासून ती लष्करी वैमानिकांनीं वापरावयास सुरवात केली.

बॉंबफेकी विमानांची रचना कशी असते हें चौथ्या भागांत बॉम्बसंबंधींची माहिती देतांना सचित्र सांगितलेंच आहे. समुद्रयान पाण्यावर त्याला जोडलेल्या होड्यांच्या सहाय्यानें तरंगू शकतें. झेपेलिन जमिनीवर राहूंच शकत नाहीं. त्यासाठीं उंच पोलादी मनोरा बांधून त्याच्या नाकावर असलेल्या कड्यांच्या दोरांनीं तें मनोऱ्याला बांधून ठेवतात. विमानांत इंजिनसाठीं सामान्यत: पेट्रोल वापरतात. पण लष्करी व मोठ्या विमानासाठीं क्रूडऑईल वगैरे जड पण कमी ज्वालाग्रही तेलांचा उपयोग करतात. विमानाचा वेग त्या विमानाचा आकार, इंजिनची शक्ति, वातावरण यावर अवलंबून असतो. आतांपर्यंत विमानाच्या वेगाचा उच्चांक (Record) पी. वेन्डेल या जर्मन वैमानिकानें १९३९ सालीं गांठला असून त्यानें ताशीं ४६९·११ मैल वेगानें विमान (सिव्हिल) चालवून दाखविलें आहे.

विराट:–मत्स्यदेशाचा राजा. विराटनगर येथें त्याची राजधानी होती.याला सुरथा व सुदेष्णा या दोन बायका होत्या. सुदेष्णा ही पट्टराणी. विराटाला चार मुलगे, एक मुलगी व अकरा भाऊ होते.

याचा कीचक हा सेनापति होता. त्याच्यामुळें विराटाचें राज्य टिकून राहिलें होतें. सैरंध्रीपायीं कीचकाचा वध झाल्यामुळें विराटावर सुशर्मा व कौरव यांनीं स्वाऱ्या केल्या. यावेळीं अज्ञातवासी पांडवांचें सहाय्य मिळाल्यामुळें विराटानें कौरवांचा पराभव केला. पुढें यानें आपली मुलगी उत्तरा ही अभिमन्यूला देऊन पांडवांशीं शरीरसंबंध जोडला.

भारतीययुद्धांत हा पांडवांच्या पक्षाला होता. या युद्धांत मार्गशीर्ष वद्य ११ ला याला द्रोणाचार्यांनीं ठार मारलें. महाभारतांत याचें नांव कीचक व पांडव यांच्या साहचर्यानें चिरकाल टिकून राहिलें आहे.

विल रॉजर्स (१८७९–१९३५):–अमेरिकेचा विख्यात विनोदी लेखक, वक्ता, तत्त्वज्ञानी व नट. याचा जन्म ४ नोव्हेंबर १८७९ रोजीं एका शेतकऱ्याच्या कुटुंबांत झाला. लष्करी शाळेंत त्यानें शिक्षण घेतलें. पण पुढें तो व्हॉडेव्हिले रंगभूमीवर नट म्हणून शिरला. लौकरच त्याच्या सहज अभिनयानें आणि पदरच्या चुरचुरीत विनोदानें तो पुढें आला. वर्तमानपत्रांत तो लेखहि लिही आणि त्याबद्दल त्याला भरपूर पैसे मिळत. एक तत्त्वज्ञानी म्हणूनहि तो प्रसिद्ध आहे. बोलपटाच्या काळांत तो फार प्रसिद्धीस आला. त्यानें काम केलेल्या बोलपटांना खूप मागणी येत असे म्हणून तो दरवर्षी सहा बोलपटांत काम करी. त्यापासून त्याला सुमारें २० लाख रुपये (म्हणजे सर्व नटांपेक्षां जास्त) उत्पन्न होत असे. त्याला विमानानें प्रवास करणें फार आवडत असें. विलीपोस्ट या अमेरिकेच्या प्रख्यात पायलटबरोबर तो अलास्काला जात असतां अपघातानें १५ ऑगस्ट १९३५ रोजीं मेला. आपल्या थडग्यावर लिहावयाचा लेख पुढीलप्रमाणें १९३० मध्यें त्यानें लिहून ठेवला होता त्यावरून त्याची पूर्ण ओळख पटते. तो लेख असा–" मीं प्रत्येक प्रमुख माणसाची थट्टा केली, पण मला न आवडणारा असा एकहि मनुष्य उभ्या आयुष्यांत मला भेटला नाहीं. ! "

विल्हेम, होहेन्झोलर्न (१८५९–   ):–जर्मनीचा बादशहा (कायसर) व प्रशियाचा राजा. तिसरा फ्रेड्रिक व इंग्लंडच्या व्हिक्टोरिया राणीच्या थोरल्या मुलीचा मुलगा. याचा जन्म २७ जानेवारी १८५९ रोजीं झाला. २७ फेब्रुवारी १८८१ रोजीं प्रिन्सेस ऑगस्टा व्हिक्टोरिया (श्लेस्विगहोल्स्टाइनच्या)बरोबर त्याचा विवाह झाला. कायसरला एकूण सहा मुलगे व एक मुलगी झाली. १५ जून १८८८ रोजीं विल्हेम गादीवर आला. यावेळीं त्याचें लष्करी शिक्षण पूर्ण झालेलें होतें. हा अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. प्रिन्स बिस्मार्कचें व याचें न पटून १८९०मध्यें प्रिन्स बिस्मार्कनें आपल्या जागेचा राजिनामा दिला. तेव्हां कायसरनें सर्व राज्यकारभार स्वतः पाहण्यास सुरवात केली. जर्मनीची सत्ता व राज्य वाढविण्याची तीव्र इच्छा होती. त्यानें आरमार व सैन्य यांची उत्कृष्ट जुळणी केली. आफ्रिकेंत कांहीं वसाहती पटकाविल्या व जर्मनीचा व्यापार वाढविला. महायुद्धाच्या आरंभीं कायसरनें स्वतः सैन्याच्या हालचाली केल्या. नंतर तो मागें पडला व हिंडेनबुर्गसारखे सेनापती पुढें आले. ९ ऑक्टोबर १९१८ रोजीं त्यानें राज्यत्याग केला व तो हॉलंडमध्यें डूर्न येथें जाऊन राहिला. नंतर जर्मनीनें त्याला वार्षिक तनखा सुरू केला. चालू युद्धांत हॉलंड घेतल्यावर हिटलरनें मोठ्या सन्मानानें त्याला परत जर्मनींत आणलें आहे असें म्हणतात.

विल्सन, टॉमस वुड्रो (१८५६–१९२४):–अमेरिकेचा विख्यात अध्यक्ष. स्टाउंटन (व्हर्जिनिया संस्थान) या गांवीं २८ डिसेंबर १८५६ रोजीं विल्सनचा जन्म झाला. प्रिन्स्टन व जॉन हॉप्किन्स युनिव्हर्सिटींत त्याचें शिक्षण झालें. १९०२ मध्यें प्रिन्स्टन विद्यापीठाचा तो अध्यक्ष झाला. १९१०मध्यें न्यू जर्सी संस्थानचा गव्हर्नर निवडून आल्यावर प्रिन्स्टन विद्यापीठाच्या अध्यक्षपदाचा त्यानें राजीनामा दिला. पुढें डेमोक्रॅटिक पक्षातर्फें १९१२ च्या निवडणुकींत अमेरिकेचा (U. S. A) अध्यक्ष म्हणून तो निवडून आला. करांचें ओझें कमी करणें, 'फेडरल रिझर्व ॲक्ट'नें बँकिंगच्या धंद्याच्या बाबतींत आलेल्या अडचणी दूर करणें व व्यापारासाठीं जरूर तो कायदा करणें या महत्त्वाच्या बाबी त्यानें केल्या.

महायुद्धाच्या सुरवातीला विल्सननें अमेरिकेची तटस्थता जाहीर केली होती. १९१६ सालच्या निवडणुकींतहि तो पुन्हां आपण तटस्थ राहूं, या त्याच्या घोषणेमुळें अध्यक्ष म्हणून निवडून आला. परंतु जर्मनीच्या पाणबुड्यांनीं धुमाकुळ माजविला व त्याची झळ खुद्द अमेरिकेला पोंचली, तेव्हां इंग्लंड–फ्रान्सच्या बाजूनें १९१७ च्या एप्रिल महिन्यांत विल्सननें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें. अध्यक्षपदाच्या दुसऱ्या कालांत त्यानें दारूबंदीसाठीं राज्यघटनेंत कांहीं दुरुस्त्या, स्त्रियांना मतदानाचे अधिकार देण्याबद्दल संस्थानांच्या राज्यघटनेंत दुरुस्ती सुचविणें, शेतीवर कर्ज देण्याचा कायदा करणें या महत्त्वाच्या गोष्टी केल्या.

१९१८ च्या प्रारंभीं विल्सननें जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशानें आपले चौदा मुद्दे काँग्रेसच्या जोड अधिवेशनासमोर मांडले. १९१८च्या नोव्हेंबरमध्यें जर्मनीनें तहाचा पाया म्हणून हे मुद्दे मान्य केले. पण इंग्लंड–फ्रान्सनें ते मान्य केले नाहींत. राष्ट्रसंघाची कल्पना विल्सनचीच. शांततापरिषदेंत विल्सननें जातीनें भाग घेतला. पुढें व्हर्सायचा तह झाला. पण हा तह जशाचा तसा अमेरिकेच्या काँग्रेसनें मान्य करण्यासाठीं विल्सननें केलेल्या सर्व खटपटी फुकट गेल्या. नंतर राष्ट्रसंघहि स्थापन झाला. पण त्यालाहि अमेरिकेनें मान्यता दिली नाहीं. महायुद्धानंतर विल्सननें युरोपांत पुष्कळ ठिकाणीं भेटी दिल्या त्यावेळीं एक महापुरुष म्हणून त्याचें सर्वत्र स्वागत झालें. १९२१ मध्यें विल्सनची प्रकृति बिघडली व त्यानें राजकारणांतून अंग काढून घेतलें. पुढें तो ३ फेब्रुवारी १९२४ रोजीं मरण पावला.

विवाह:–हिंदूव्यवहार–धर्मशास्त्राप्रमाणें हिंदूव्यवहार–धर्मशास्त्रांत विवाह, हा एक पवित्र संस्कार मानला आहे. अविवाहित पुरुषाला कांहीं अत्यंत महत्त्वाचे धर्मविधि करण्याचा अधिकार नाहीं; म्हणून ते विधि करतां यावेत याकरितां विवाह करणें हें एक पवित्र कर्तव्य असें शास्त्रानें मानलें आहे. हिंदूधर्मशास्त्राप्रमाणें विवाह म्हणजे धार्मिक कर्तव्यें करण्याकरितां झालेलें स्त्री–पुरुषांचें पवित्र मीलन. हिंदू विवाह हा एक करार नसल्यामुळें अज्ञान मुलांचे विवाह त्यांच्या पालकांकडून घडवून आणले जातात; वधूवरांची पुष्कळ वेळां संमतिदेखील घेतली जात नाहीं. तरी एवढ्यावरूनच ते विवाह रद्द ठरत नाहींत. योग्य ते विवाहविधि फसवणूक अथवा सक्ति झाली नाहीं व विवाह कायदेशीर होण्याला अवश्य त्या गोष्टी असल्या म्हणजे विवाह वधुवरांच्या संमतिविना त्यांच्या अज्ञानावस्थेंत झाला एवढ्यामुळेंच तो रद्द ठरत नाहीं. बालविवाहाला आळा बसावा म्हणून १९२९चा 'बालविवाह प्रतिबंधक कायदा,' करण्यांत आला आहे. या कायद्यानें अठरा वर्षांखालील वयाच्या पुरुषाचा व चौदा वर्षांखालील वयाच्या स्त्रीचा विवाह घडवून आणणें हा गुन्हा मानला आहे. तथापि अशा प्रकारचे विवाह घडवून आणणाऱ्याला शिक्षा झाली तरी एकवार विधिपूर्वक विवाह झाला म्हणजे तो रद्द होत नाहीं. कोणत्याहि प्रकारचें शारीरिक व्यंग, रोग, जन्मापासूनचें नपुंसकत्व अशा प्रकारच्या गोष्टी विवाहाला अपात्र ठरवीत नाहींत. वेडा मनुष्यहि कायद्याप्रमाणें विवाहाला अपात्र ठरतोच असें नाहीं. विवाहाच्या वेळीं आपण काय करतों हें समजण्याची त्याची पात्रता असल्यास त्याचा विवाह कायदेशीर ठरतो. एक वेळ विधिपूर्वक झालेला विवाह त्यांत सक्ति अगर फसवणूक झाली नसेल तर कायदेशीरच मानला जातो.

हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें पुरुषाला अनेक पत्न्या वरतां येतात. एका पत्नीच्या हयातींत त्याला दुसरी करतां येते. हिंदूधर्मशास्त्राला बहुपत्नित्व जरी मान्य असलें तरी बहुपतित्व मान्य नाहीं.

हिंदूव्यवहारधर्मशास्त्रांत आठ प्रकारचे विवाह सांगितले आहेत. ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस, पैशाच हे ते आठ प्रकार होत. यांतील

पहिले चार शास्त्रसंमत व शेवटचे चार शास्त्राला असंमत आहेत. या आठांपैकीं ब्राह्म व आसूर हे दोनच प्रकार सांप्रत रूढ व कायद्याला मान्य आहेत. ब्राह्म हा शास्त्रसंमत प्रकारांपैकीं एक असून आसुर हा शास्त्राला असंमत असलेल्या प्रकारांपैकीं एक आहे. ब्राह्म विवाह म्हणजे वेदशास्त्रवेत्त्या व सदाचारसंपन्न पुरुषाला आदरानें बोलावून केलेलें सालंकृत कन्यादान. आसुर विवाहांत कन्येच्या पालकाला व कन्येलाहि द्रव्य देऊन वर तिचें पाणिग्रहण करतो. पूर्वी फक्त ब्राह्मणच ब्राह्म पद्धतीनें विवाह करीत. फक्त शूद्र व वैश्य या दोन वर्गांतच आसुर-विवाह रूढ होता. सांप्रत कोणत्या जातीच्या हिंदूनें कोणत्या प्रकारें विवाह करावा याला निर्बंध नाहीं. ब्राह्मण आसुरपद्धतीनें विवाह करूं शकेल तर शूद्र ब्राह्म पद्धतीनें विवाह करूं शकेल. सांप्रत ब्राह्म व आसुर या दोन प्रकारांत एकच फरक दिसून येतो. तो म्हणजे ब्राह्म विवाहांत कन्यादान केलें जातें तर आसुर-विवाहांत कन्याविक्रय केला जातो. विवाह ब्राह्म पद्धतीनें झाला, कीं आसुर पद्धतीनें झाला या प्रश्नाला महत्त्व स्त्रीधनाचा वारसा ठरवितांना येतें. विवाह ब्राह्म पद्धतीनें झाला कीं आसुर पद्धतीनें झाला असा प्रश्न कोर्टांत उद्भवला असतां तो ब्राह्म पद्धतीनेंच झाला असें कोर्टानें गृहित धरून चालवयाचें. तो आसुर पद्धतीनें झाला असें ज्याचें म्हणणें असेल त्यानें तसें शाबित केलें पाहिजे.

कन्यादान करण्याचा अग्राधिकार पित्याचा, त्याच्या खालोखाल पितामह, भाऊ, पितृघराण्यांतील इतर आप्त व माता यांचा अनुक्रमानें आहे. मातेच्या खालोखाल हा अधिकार मिताक्षरेप्रमाणें अनुक्रमें मातामह, मामा व मातृघराण्यांतील इतर आप्त यांचेकडे जातो. दायभागाप्रमाणें मातामह व मामा यांचा क्रम मातेच्या पूर्वी येतो. पितृघराण्यांतील व मातृघराण्यांतील इतर आप्तांवर ज्या वेळीं कन्यादानाची पाळी येते त्या वेळीं कन्येला नात्यानें अधिक जवळ असलेल्या आप्तालाच हा अधिकार असतो. वर सांगितलेल्या कन्येच्या नातेवाईकांपैकीं कन्यादान करण्याचा ज्याला अधिकार आहे अशा नातेवाईकांची संमति कन्येच्या विवाहाला अवश्यक असली, तरी तो विवाह इतर सर्व दृष्टींनीं कायदेशीर असेल तर कन्येच्या विवाहासंबंधींच्या पालकाची संमति नाहीं एवढ्यामुळेंच तो विवाह रद्द होत नाहीं. बाप जिवंत असतांना आईनें त्याच्या संमतिविना कन्येचा विधिपूर्वक केलेला विवाह बेकायदेशीर नाहीं. दिलेल्या कन्येच्या विवाहासंबंधींच्या पालकांच्या यादींत आईला दूरचें स्थान दिलें आहे याचें कारण आई स्वतः विवाहाचे धार्मिक विधि करूं शकत नाहीं हेंच आहे. पतीच्या पश्चात मुलीची कायदेशीर पालक तीच असल्याकारणानें जांवयाची निवड करण्याचा तिला हक्क असतोच.

हिंदूधर्मशास्त्राप्रमाणें विवाहहोम व सप्तपदी हे दोन विधि द्विजांच्या विवाहाला अवश्य आहेत. वधूवरांनीं परस्परासमवेत सात पावलें विवाहहोमाच्या अग्निभोंवतीं चालणें म्हणजे सप्तपदी. सातवें पाऊल टाकतांच विवाह पूर्ण होतो; तोंपर्यंत नाहीं. या दोन विधींपैकीं निदान सप्तपदी तरी झालीच पाहिजे. विवाहहोम सामान्यतः करण्यांत येतो. परंतु इतर दृष्टींनीं विवाह पूर्ण झाला असल्यास केवळ विवाहहोम झाला नाहीं एवढ्याच कारणानें तो विवाह रद्द ठरत नाहीं. एकाद्या विशिष्ट ज्ञातींत विशिष्ट पद्धतीनें विवाह करण्याची रूढी असेल तर त्या पद्धतीनें विवाह साजरा केला तर तो कायदेशीर ठरतो. एकवार विधिपूर्वक विवाह झाला म्हणजे तो कायदेशीररीत्या लोकमान्य होण्याला रतिक्रिया होण्याची अवश्यकता नाहीं; याचें कारण हिंदूधर्मशास्त्राला बालविवाह संमत आहे हेंच होय. वर सांगितलेल्या विधीशिवाय पुढील गोष्टी विवाह कायदेशीर होण्याला अवश्यक आहेत–(१) वधु व वर ही एकाच जातीची असली पाहिजेत. (२) द्विजांच्या बाबतींत वधू व वर हे एकाच गोत्राचे असतां कामा नयेत. (३) विशिष्ट नात्यांतील स्त्रीपुरुषांचा विवाह निषिद्ध मानला आहे. म्हणून वधूवर अशा नात्यांतील नसावेत.

वधू व वर ही एकाच जातीची असली पाहिजेत असें वर सांगितलें. एकाच जातीच्या पोटजातीमधील विवाह कायदेशीर आहे. हिंदुसमाजांत द्विज व शूद्र अशा मुख्य दोन जाती आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन मुख्य जाती द्विजांत मोडतात. हिंदु समाजांत एके काळीं आंतर्जातीय विवाह रूढ होते. वरच्या जातीच्या पुरुषानें खालच्या जातींतील स्त्रीशीं विवाह करण्याची रूढी होती. अशा विवाहाला 'अनुलोम विवाह' म्हणत. अशा विवाहापासून झालेल्या संततीची जात आईबापांच्या जातीहून भिन्न मानण्यांत येत असे. ही जात आईच्या जातीहून श्रेष्ठ व बापाच्या जातीहून कनिष्ठ मानण्यांत येई. अनुलोम विवाह काय-

देशीर असल्याविषयीं कोर्टाचे निर्णय झालेले आहेत. परंतु 'प्रतिलोम विवाह' कायदेशीर मानले नाहींत. प्रतिलोम विवाह म्हणजे वरच्या वर्णांतील स्त्रीचा खालच्या वर्णांतील पुरुषांशीं झालेला विवाह. ब्राह्मण स्त्रीचा शूद्र किंवा क्षत्रिय पुरुषांशीं झालेला विवाह 'प्रतिलोम विवाह' होय.

हिंदू विधवांचे विवाह कायदेशीर आहेत. विधवाविवाह कायदेशीर करण्याकरितां स्वतंत्र कायदा करण्यांत आला आहे.

मुसलमानी कायद्याप्रमाणें विवाह हा एक करार आहे. या कराराचा उद्देश स्त्रीपुरुषांचे लैंगिक संबंध व त्यांचेपासून होणारी संतति कायदेशीर ठरावी हा असतो. विवाहाचा हा करार खरेदीच्या करारासारखा असतो. खरेदीच्या करारांत ज्याप्रमाणें खरेदी घेतलेल्या मिळकतीबद्दल किंमत द्यावी लागते त्याप्रमाणें विवाहाच्या करारांत पत्नी ही मिळकत असून तिच्याबद्दल पतीनें मेहरच्या स्वरूपानें किंमत द्यावयाची असते. मेहर म्हणजे पतीनें पतीला आपल्याशीं विवाह केल्याबद्दल द्यावयाची रक्कम अथवा अन्य मिळकत. मुसलमानांच्या विवाहांत मेहेर अवश्यक आहे. विवाहाच्या वेळीं मेहर ठरविलेलें नसेल तर कोर्ट योग्य ती रक्कम ठरवितें.

मुसलमानी कायद्याप्रमाणें विवाह कायदेशीर ठरण्याला पुढील गोष्टींची अवश्यकता आहे:–(१) वधूवरांपैकीं एका पक्षाकडून विवाहाचा हेतु व्यक्त केला जाणें व दुसऱ्या पक्षाकडून त्याचा स्वीकार होणें. (२) वधू व वर दोन्हीहि विवाहाला पात्र असणें. (३) विवाह कायदेशीर होण्याच्या मार्गांत कोणत्याहि प्रकारची कायदेशीर अडचण नसणें.

(१) विवाहाचा हेतु व्यक्त करणें व त्याचा स्वीकार करणें या गोष्टी योग्य अधिकार दिलेल्या मुनीमाकडून करवितां येतात. ही हेतुव्यक्ति व स्वीकार एकाच बैठकींत झाले असले पाहिजेत. एका बैठकींत हेतुव्यक्ति व दुसऱ्या बैठकींत स्वीकार झाल्यानें विवाह कायदेशीर होत नाहीं. सुनी कायद्यानुसार हेतुव्यक्ति व स्वीकार ही दोन पुरुष अथवा एक पुरुष व दोन स्त्रिया अशा साक्षीदारांसमक्ष झाली पाहिजेत. शिया कायद्याप्रमाणें विवाह कायदेशीर होण्यास साक्षिदारांची आवश्यकता नाहीं.

(२) वयांत आलेल्या व मानसिक शक्ति शाबूत असलेल्या कोणाही मुसलमानाला विवाहाचा करार करण्याची पात्रता आहे. सुनी कायद्याप्रमाणें वयाचीं पंधरा वर्षें पूर्ण झाल्यावर स्त्री-पुरुष सज्ञान होतात. हेंच त्यांच्या विवाहाचें संमति वय. या वयाखालील अज्ञानांचे विवाह त्यांच्या पालकाकडून घडवून आणले जातात. १९२९ चा बालविवाहप्रतिबंधक कायदा मुसलमानांनाही लागूं केला आहे. या कायद्यानें बालविवाह निषिद्ध ठरवून ते घडवून आणणें हा गुन्हा ठरविला असला तरी त्या कायद्याच्या तत्त्वाविरुद्ध झालेले विवाह बेकायदेशीर ठरविले नाहींत.

(३) विवाह कायदेशीर होण्याच्या मार्गांतील कायदेशीर अडचणी दोन प्रकारच्या आहेत. मूलग्राही स्वरूपाच्या अडचणी, कीं ज्यांच्या योगें विवाह मूलतःच रद्द ठरतो व ज्यांच्या योगें विवाह रद्द ठरत नाहीं अशा. पहिल्या प्रकारांत पुढील बाबी येतातः—

(१) विवाहित स्त्रीला पहिल्या पतीच्या हयांतीत त्याच्याकडून घटस्फोट मिळाल्याखेरीज दुसरा विवाह करतां येत नाहीं. मुसलमानी कायद्याला बहुपतित्व मान्य नाहीं. परंतु बहुपत्नित्व मान्य आहे. परंतु मुसलमान पुरुषाला चारीहून अधिक बायका ऐकाच वेळीं करतां येत नाहींत.

(२) रक्ताचे संबंध असलेल्या कांहीं नातेवाईकांमधील विवाह कायद्यानें संपूर्णपणें निषिद्ध मानले आहेत. बहिण, मावशी, आत्या, पुतणी, मुलगी वगैरेशीं विवाह संपूर्णतया निषिद्ध मानले आहेत.

(३) बापाची बायको (सावत्र आई); बायकोची आई बायकोची प्रथमसंबंधापासून झालेली मुलगी, मुलग्याची घटस्फोट मिळालेली बायको वगैरे विवाहसंबंधानें नातें असलेल्यांशीं विवाह निषिद्ध.

(४) पालकत्वाच्यामुळें जडलेल्या संबंधीयामधील विवाह निषिद्ध. उदा. जिनें आपणाला आंगावर पाजून आपलें पालनपोषण केलें तिच्याशीं विवाह कायद्यानें निषिद्ध मानिला आहे.

दुसऱ्या प्रकारांत पुढील बाबी येतात.

(१) एकाद्या मुसलमानानें चार बायका असतां पांचवी करणें. पांचव्या बायकोशीं विवाह मूलत. रद्द नाहीं. पहिल्या चार बायकांपैकीं एकीशीं घटस्फोट केला असतां पांचवा विवाह कायदेशीर होतो. (२) विवाहाचा करार साक्षिदारांविना होणें. (३) विधर्मीयांमधील विवाह—मुसलमान स्त्रीला कोणा विधर्मीयाशीं कायद्याप्रमाणें विवाह करतां येत नाहीं. मुसलमान

पुरुषाला ख्रिश्चन किंवा ज्यू स्त्रीशीं विवाह करतां येतो; परंतु हिंदू अथवा पारशी स्त्रीशीं विवाह करतां येत नाहीं. परंतु मुसलमान स्त्रीनें विधर्मीय पुरुषाशीं विवाह केला अथवा मुसलमान पुरुषानें हिंदू अगर पारशी स्त्रीशीं विवाह केला तर तो मूलतः रद्द होत नाहीं. विवाह झालेल्या विधर्मीय व्यक्तीला मुसलमानी धर्माची दीक्षा दिली म्हणजे विवाह कायदेशीर होतो. (३) इदात्तच्या मुदतींत असलेल्या स्त्रीचा विवाह, विवाहविच्छेद झाल्यानंतर विशिष्ट मुदत संपेपर्यंत स्त्रीला दुसरा विवाह करतां येत नाहीं. या मुदतीला 'इदात्त' म्हणतात. विवाहविच्छेद झाल्यावर स्त्रीला होणाऱ्या संततीचें जनकत्व निश्चित ठरवितां यावें म्हणूनच 'इदात्त' पाळला पाहिजे. घटस्फोट झालेल्या स्त्रीनें तीन रजोदर्शनाचा काल इदात्त पाळावयाचा; विटाळ गेलेल्या स्त्रीनें तीन महिने पाळावयाचा. पतिनिधनानंतर चार महिने इदात्त पाळावयाचा असतो. पतिनिधनाच्या वेळीं गरोदर असलेल्या स्त्रीनें प्रसूतीपर्यंत अगर चार महिने दहा दिवस इदात्त पाळावयाचा. या दोहोंत अधिक असेल ती मुदत पाळावयाची.

मूलतःच रद्द असलेल्या विवाहापासून झालेली संतति कायदेशीर नसते.

स्पेशल मॅरेज ॲक्टाप्रमाणें विवाहः— सन १९२३च्या स्पेशल मॅरेज ॲक्टाअन्वयें हिंदू, बुद्ध, शीख, जैन यांपैकीं कोणत्याहि धर्माच्या व्यक्तींना व ख्रिश्चन, ज्यू, हिंदू, मुसलमान, पारसी, बौद्ध, शीख व जैन यांपैकीं आपण कोणत्याही धर्माचें नाहीं असें सांगणाऱ्या स्त्रीपुरुषांना रजिस्ट्रारपुढें विवाह करतां येतो. हा विवाह कायदेशीर होण्याला पुढील बंधनें सांभाळलीं पाहिजेत.

(१) पति हयात असतां पत्नीला अगर पत्नी हयात असतां पतीला या कायद्याप्रमाणें विवाह करतां येत नाहीं. घटस्फोट झाला असेल तर मात्र विवाहबंधनांतून सुटका झालेल्या पतिपत्नींना आपल्या आवडीच्या स्त्रीपुरुषांशीं या कायद्याप्रमाणें विवाह करतां येतो. (२) वराचें वय अठरा वर्षें पूर्ण झालेलें असावें व वधूचें वय १४ वर्षें पूर्ण झालेलें असावें. (३) वधू व वर यांच्यांपैकीं कोणाचें वय २१ वर्षांहून कमी असेल तर त्यांच्या पित्याची अगर पालकाची त्यांच्या विवाहाला संमति पाहिजे. (४) विवाहबद्ध होऊं इच्छिणाऱ्या स्त्रीपुरुषांचें नातें त्यांच्या विवाहाच्या आड येण्यासारखें नसावें.

विवाहाविषयीं नियम—(१) या कायद्याप्रमाणें विवाह करण्याची इच्छा असणाऱ्या स्त्रीपुरुषांपैकीं कोणीहि ज्याचेपुढें विवाह व्हायचा त्या रजिस्ट्रारला एक लेखी नोटीस दिली पाहिजे. ही नोटीस या कायद्याच्या परिशिष्टांत दिलेल्या नमुन्याबरहुकूम पाहिजे. ज्या रजिस्ट्रारला नोटीस द्यावयाची त्याचे स्थलसीमेंत विवाहबद्ध होऊं इच्छिणाऱ्या स्त्रीपुरुषांपैकीं कोणी तरी नोटीस देण्यापूर्वी १४ दिवस वास केला असला पाहिजे. (२) अशा प्रकारच्या नोटीशी रजिस्ट्रारनें फाईल करून ठेवावयाच्या व त्यांची नोंद 'मॅरेज नोटीस—बुक' या बुकांत करून ठेवावयाची असते. (३) अशी नोटीस दिल्यानंतर १४ दिवसांनीं विवाह साजरा करावयाचा असतो. परंतु या १४ दिवसांच्या मुदतींत जर कोणी विवाहाच्या बाबतींत आपली हरकत कळविली, तर ती रजिस्ट्रारनें नोंदून घ्यावी. (४) अशी हरकत नोंदल्यानंतर त्या हरकतीविषयीं निर्णय देण्याचा अधिकार असलेलें दिवाणी कोर्ट उघडें असल्यास १४ दिवसपर्यंत व तें उघडें नसल्यास तें उघडल्यापासून १४ दिवसपर्यंत रजिस्ट्रारनें वाट पहावी. ज्या व्यक्तीनें हरकत नोंदली, त्या व्यक्तीनें योग्य त्या दिवाणी कोर्टांत नियोजित विवाह कायदेशीर नाहीं असा ठराव मिळण्याविषयीं हवा तर दावा दाखल करावा. वधूवरांचे पूर्वसंबंधाचे पतिपत्नी हयात असणें, वधूवरांचें वय विवाहाला योग्य नसणें, विवाहयोग्य वय असूनही पालकांची संमति अवश्य असण्याइतकें कमी वय असणें व तशी संमति न मिळणें, वधूवरांचें परस्पर नातें विवाहाच्या आड येणें यांपैकीं कोणतीहि गोष्ट विवाह बेकायदेशीर ठरविण्याला पुरेशी आहे. याप्रमाणें दावा दाखल झाला असल्यास ज्या अधिकाऱ्यापुढें तो दाखल झालेला असतो त्यानें अशा प्रकारचा दावा दाखल झाला असल्याबद्दल एक दाखला दिला पाहिजे. हरकत नोंदल्यानंतर दावा दाखल करण्याकरितां जी मुदत कायद्यानें दिलेली असते त्या मुदतींत हा दाखला रजिस्ट्रारच्या कचेरींत हजर झाल्यास रजिस्ट्रारनें त्या दाव्याचा निकाल लागून त्याविरुद्ध अपील दाखल करण्याकरितां कायद्यानें दिलेली मुदत टळून जाईपर्यंत अथवा त्या मुदतींत अपील दाखल झालें असेल तर अपीलाच्या-अखेर निकालापर्यंत वाट पाहिली पाहिजे. वर सांगितल्याप्रमाणें दिवाणी कोर्टांत दावा दाखल झाल्याविषयींचा दाखला रजिस्ट्रारपुढें योग्य मुदतींत हजर

झाला नाहीं अथवा नियोजित विवाह बेकायदेशीर होत नाहीं असें कोर्टानें ठरविलें तर रजिस्ट्रारनें विवाह साजरा करावा. परंतु वर नमूद केलेल्या कारणांस्तव नियोजित विवाह बेकायदेशीर ठरतो असें कोर्टानें ठरविल्यास तो विवाह होतां कामा नये.

नियोजित विवाह बेकायदेशीर ठरवून मिळण्याबद्दल वादीनें दिलेलीं कारणें अयोग्य व अप्रामाणिकपणें दिलेलीं आहेत असें कोर्टास आढळून आल्यास कोर्ट वादीला एक हजार रुपयापर्यंत दंड करूं शकेल. या दंडाची सर्व रक्कम अथवा कांहीं भाग नियोजित वधुवरांना देण्याचा कोर्टाला अधिकार आहे.

(४) विवाह साजरा होण्यापूर्वी वधूवर व तीन साक्षीदार यांनीं रजिस्ट्रारसमक्ष एका प्रतिज्ञापत्रकावर सही केली पाहिजे. वधूवरापैकीं कोणाचे वय २१ वर्षांहून कमी असेल तर या प्रतिज्ञा पत्रकावर त्याच्या अगर तिच्या बापाची अगर पालकांची सही पाहिजे. वधू विधवा असेल तर मात्र पालकाच्या सहीची जरूरी नाहीं. या प्रतिज्ञापत्रकावर रजिस्ट्रारचीदेखील सही पाहिजे. रजिस्ट्रार व प्रतिज्ञापत्रकावर सही करणारे तीन साक्षीदार यांच्या समक्ष विवाह साजरा व्हावयाचा असतो. अमूकच पद्धतीनें विवाहसमारंभ झाला पाहिजे असें नाहीं. कोणतीहि पद्धति स्वीकारली तरी तींत एक गोष्ट मात्र झाली पाहिजे ती ही कीं, वधूवरांनीं रजिस्ट्रार व तीन साक्षीदार यांच्या समक्ष परस्परांना "मी माझा कायदेशीर पति म्हणून तुझा स्वीकार करितें" व "मी माझी कायदेशीर पत्नि म्हणून तुझा स्वीकार करतों." असें म्हटले पाहिजे. (५) विवाहसमारंभ रजिस्ट्रारच्या ऑफीसमध्यें अगर वधूवरांच्या इच्छेप्रमाणें दुसरीकडे करतां येतो. (६) विवाह साजरा झाल्यानंतर रजिस्ट्रारनें "मॅरेज सर्टिफिकेट बुकांत" विवाहाचें सर्टिफिकेट नोंदलें पाहिजे. या सर्टिफिकेटावर वधूवरांनीं व साक्षीदारांनीं सह्या करावयाच्या असतात.

पारसी लोकांचे विवाह—पारसी ज्ञातींतील वधुवरांच्या विवाहाबाबत 'दी पारसी मॅरेज अँड डायव्होर्स ॲक्ट (१८६५)' म्हणून कायदा करण्यांत आला आहे. या कायद्यानें पारसी जातींतील विवाहविषयक चालीरीति मानिल्या आहेत. या कायद्याप्रमाणें विवाह कायदेशीर होण्याला पुढील गोष्टींची अवश्यकता आहे:— (१) वधू व वर पारसी ज्ञातींतले असलें पाहिजेत. नियोजित वधूवरांचें नातें विवाहाच्या आड येण्यासारखें नसावें. ज्या स्त्रीपुरुषांचा विवाह निषिद्ध मानला आहे अशांची यादी हिंदुस्थान सरकारनें राजपत्रकांत प्रसिद्ध केली आहे. (३) 'आशिर्वाद' या पारसी विधीला अनुसरून पारसी उपाध्यायानें विवाह लाविला पाहिजे. 'आशिर्वाद' विधि दोन साक्षिदारांसमक्ष (उपाध्यायाखेरीज) झाला पाहिजे. (४) २१ वर्षांखालील वयाच्या वधूवरांच्या विवाहाला पित्याची अगर पालकाची संमति पाहिजे. (५) पारसी समाजांत बालविवाह करतां येतो.

विवेकानंद (१८६२–१९०२):—पाश्चात्यांत वेदान्ताचा प्रसार करणारा पहिला बंगाली स्वामी. दत्त नांवाच्या कायस्थ घराण्यांत यांचा जन्म. हे २१ व्या वर्षी बी. ए. झाले. नंतर हे ब्राह्मोसमाजांत शिरले. पण पुढें त्यांनीं रामकृष्णांना गुरु केले. १८८६ ला गुरुकृपा, १८९३ ला खतरी संस्थानची आर्थिक मदत घेऊन अमेरिकेला स्वामींनीं प्रयाण केलें. स्वामी प्रथम शिकागोला उतरले. जे. एच. राईट यांच्या सहकार्यानें १८९७ ला भरणाऱ्या सर्वधर्मपरिषदेंत त्यांचा प्रवेश झाला. परिषदेनंतर रामकृष्णमठाची स्थापना. १८९४ व १८९६ मध्यें कांहीं काल इंग्लंडांत वास्तव्य. १८९७ ला हिंदुस्थानांत ते परत आले. येथील वास्तव्याच्या मुदतींत बेलूर व हिमालय हे मठ व रामकृष्ण मिशनची स्थापना स्वामींनीं केली. प्रकृतीस्वास्थ्याकरितां स्वामींनीं तिसऱ्यांदा अमेरिका व इंग्लंडला प्रयाण केलें. तिकडे असतांना यांनीं वेदान्तसोसायटी व शांतिआश्रम या संस्था स्थापिल्या. १९०० मध्यें पॅरीसला भरलेल्या सर्वधर्मपरिषदेस स्वामी हजर होते. परत आल्यानंतर साधुसंन्याशांच्यासाठीं 'रामकृष्णसेवाश्रम' सुरू केला. याशिवाय ब्रम्हचर्याश्रम, रामकृष्णपाठशाला, रामकृष्णहोम इत्यादि व हिंदू तत्त्वज्ञानासंबंधीं संस्थांना स्वामींनीं जन्म दिला.

मायावती आश्रमांत ४ जुलै १९०२ ला स्वामी समाधिस्थ झाले. यांच्या व्याख्यानांच्या भाषांतराचे चौदा भाग कर्नाटक प्रेसनें मराठींत प्रसिद्ध केले आहेत. मूळ लिखाण व भाषणें इंग्रजींत आहेत. त्यांवरून त्यांचें तत्त्वज्ञान समजून येतें.

भव्य व पाणीदार मुखमंडळ, गोड आवाज, कार्याची तळमळ, वेदान्ताचें मार्मिक ज्ञान, उत्कृष्ट वक्तृत्वशैली, निरिच्छ वृत्ति आणि व्यापक बुद्धि या गुणांमुळें स्वामींच्या कार्याचा प्रसार झपाट्यानें झाला.

यांच्या कार्यामुळेंच पाश्चिमात्यांत हिंदुस्थानासंबंधीं आदराची भावना निर्माण झाली.

विश्वामित्रः—ब्रह्मर्षिपद मिळविणारा ऋषि. कुशिकाचा हा मुलगा. वसिष्ठाकडे हा गेला असतां त्याची कामधेनू पाहून ती आपल्याला असावी अशी इच्छा झाली. म्हणून त्यानें तिला जबरदस्तीनें नेण्याचा प्रयत्न केला, पण या कामीं त्यास अपयश आलें. तेव्हां पुत्राला राज्यावर बसवून यानें तप करून अस्त्रें संपादन केलीं. पण एवढ्यानेंहि त्याचें वसिष्ठापुढें कांहीं चालेना. शेवटीं यानें ब्राह्मणसामर्थ्य मिळविण्याचा प्रयत्न केला.

त्रिशंकू व हरिश्चंद्र यांच्यामुळें याचें नांव सर्वश्रुत झालें आहे. याचा दोन तीन वेळां तपोभंग झाला. याला महर्षिपद प्राप्त झालें. पण ब्रह्मर्षिपद जितेंद्रियत्व न लाभल्यामुळें मिळेना. अखेरीस तें प्राप्त झाल्यावर वसिष्ठानें याला ब्रह्मर्षि म्हणून कबूल केलें.

प्रतिसृष्टि निर्माण करणारा म्हणूनहि याची प्रसिद्धि आहे.

याला मेनकेपासून शकुंतला ही मुलगी झाली.

विश्वामित्र ही एक व्यक्ती नसून त्या नांवाच्या तीन तरी व्यक्ति झाल्या असाव्यात असें पुष्कळांचें म्हणणें आहे. एक रामकालीन, दुसरी वसिष्ठकालीन व तिसरी दुष्यंतकालीन.

विश्वासराव पेशवे (१७४२–१७६१):—पहिल्या माधवराव पेशव्यांचा हा थोरला भाऊ. नानासाहेब पेशवे हे वडील नि गोपिकाबाई ही याची आई. जन्म १७४२ च्या २२ जुलैला झाला. १७४९ मधील मार्च महिन्यांत याची मुंज झाली. १७५० मधल्या मेमध्यें दीक्षित पटवर्धनांच्या घराण्यांतील लक्ष्मीबाईशीं याचें लग्न झालें. हा फार देखणा होता. शिंदखेडच्या स्वारींत याला सरदार केले होते. दत्ताजी शिंदे हा याचा कारभारी. जनकोजी शिंदे हा याचा मित्र होता. १७५७च्या आक्टोबरमध्यें औरंगाबाद व शिंदखेड या ठिकाणीं यानें निजामाचा पराजय केला. उद्‌गीरच्या लढाईंत हा भाऊसाहेबाबरोबर हजर होता. याला हत्तीवरून उत्तम तिरंदाजी करतां येत असे. १७६० त हा पानीपतच्या युद्धासाठीं भाऊसाहेबांबरोबर गेला होता. भाऊसाहेबानें दिल्लीला दरबार भरवून यास सर्वांकडून नजरा करविल्या. १४ जाने. १७६१ रोजीं पानिपतच्या लढाईत गोळी लागून हा मरण पावला.

विष्णुः—सरंक्षण करणारा देवाधिदेव. हा सत्त्वगुणप्रधान असून पृथ्वीच्या पालनाचें काम याच्याकडे आहे. म्हणूनच हा वेळोवेळीं अवतार घेऊन दुष्टांचा संहार व पृथ्वीचें पालन करतो. याला चार हात असून त्यांत शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें असतात. पीतांबर, वनमाला, किरीटकुंडलें व श्रीवत्स हीं याचीं भूषणें होत. लक्ष्मी ही स्त्री व वैकुंठ हें निवासस्थान आहे. कधीं कधीं हा शेषावर समुद्रांत शयन करतो या गोष्टीचीं निदर्शक अशीं हजारांवर नांवें असलेलें विष्णुसहस्रनाम प्रसिद्ध आहे. एका दैत्यानें कूर्मरूपानें सर्व तीर्थें पळविलीं असतां यानें तीं परत आणलीं. यानें दहा अवतार घेऊन पृथ्वीचें संरक्षण केलें.

वुइल्यम पॉवेल (१८९२–):—अमेरिकन सिनेमा नट. पिटस्‌बर्गमध्यें २९ जुलै १८९२ रोजीं याचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षणानंतर पिटस्‌बर्ग व न्यूयॉर्क येथें त्यानें नाट्यशिक्षण घेतलें. १९२१ पर्यंत यानें रंगभूमीवरच काम केलें. Within the Law, Going up व Spanish Love या नाटकांत त्यानें प्रमुख भूमिका केल्या. Sherlock Holmes या मूकपटांत त्यानें जॉन बॅरिमूरबरोबर पहिली



वुइल्यम पॉवेल

भूमिका केली. The Outcast, Under the Red Robe, Romola, Dangerous Money, The Runaway Tin Gods, Love's Greatest Mistake, Forgotten Faces, Four Feathers हे मूकपट व One Way Passage, The Thin Man, The Great Ziegfild हे बोलपट प्रख्यात आहेत. कामांतील सफाई हा याचा विशेष आहे.

वीजः—मनुष्याप्रमाणें निसर्गहि वीज निर्माण करतो. पण ही वीज तीमुळें होणाऱ्या नायट्रोजनच्या उत्पत्तिशिवाय अनेक वेळीं संहारकच ठरते. ही वीज अशी निर्माण होते—आकाशांत असणाऱ्या ढगांत जवळजवळ नेहमीच विजेचा संचय थोड्याफार प्रमाणांत झालेला असतो. जे वाफेचे कण (पाण्याची झालेली


वाफ) ढग बनवीत असतांना एकत्र येतात व जसजसा तो ढग आकारानें मोठा होऊं लागतो तसतसा त्या वाफेच्या कणांच्या एकत्र येण्यामुळें त्यांतील विद्युत्संचय वाढत जातो. अशाच तऱ्हेनें विरोधी प्रकारचा विद्युत्संचय असलेल्या दुसऱ्या एका ढगाजवळ जेव्हां हा ढग येतो तेव्हां तो एकमेकावर आपटून विद्युत्विसर्जन (Electric discharge) होतें म्हणजे एक विजेचा लोळ निर्माण होऊन तो वातावरणांत पसरतो. याप्रमाणें वीज निर्माण होते व ती एखाद्या झाडाच्या फांदीला फाटे फुटल्याप्रमाणें त्या लोळाला फांटे फुटून आकाशभर वीज चमकून जाते. या विजेच्या लोळाला फुटलेल्या फांट्यांपैकीं एखादा फांटा जमिनीपर्यंत पोंचतो. वीज जमिनीपाशीं येतांच तिच्या मार्गांत अगदीं जवळपास एखादें उंच झाड असेल तर ती त्याकडे आकर्षिली जाते व ती त्या झाडांत शिरून पुढें ती जमिनींत शिरून गडप होते. वीज झाडावर पडली कीं झाडांतील सर्व पाणी (पोषक द्रवपदार्थ) आपल्या उष्णतेनें वाफून टाकतें व त्यामुळें आपल्याला तें झाड मागाहून वठल्याचें दिसतें. कित्येक वेळीं ही क्रिया इतक्या लौकर होते कीं, विजेच्या उष्णतेमुळें झाडाचा जीवनरस उकळून त्याची वाफ होऊन त्याचा गॅस बनतो; व तो गॅस झाड फोडून बाहेर पडतो. वीज ज्या पदार्थावर पडेल त्याचा फडशा पाडते; पण कित्येक वेळां ती कांहीं विचित्र प्रकार करते. एकदां एका माणसावर वीज पडली, पण तिनें फक्त त्या माणसाचे कपडेच तेवढे फाडून टाकले; पण त्याला मात्र कांहीं इजा केली नाहीं. झाडामध्यें पाणी असल्यामुळें व पाणी हें विद्युत्वाहक असल्यामुळें झाडाकडे वीज आकर्षिली जाते. एवढ्यासाठीं पावसाळ्यांत वीज पडत असतांना झाडाखालीं बसूं नये. त्यापेक्षां उंचीला कमी अशा एखाद्या झुडुपाचा आश्रय घेतल्यास तेवढाच धोका कमी. वीज लोखंड वगैरे धातूंतून चटकन् वाहात असल्यानें अशा वेळीं लोखंडी दांड्याच्या छत्र्याहि जवळ बाळगूं नयेत. कित्येक इमारतीवर विद्युत्वाहक (Lightning Conductors) लोखंडी सळ्या बसवून त्या सळईपासून एक लोखंडी पट्टी खालीं जमिनींत नेलेली असते. यामुळें त्या इमारतीवर वीज पडलीच तर ती त्यांतून जमिनींत जाते व इमारतीस धक्का पोंचत नाहीं.

ही वीज तीन प्रकारानें दिसते. १ वर्तुळाकार, (पण हा प्रकार क्वचितच पहावयास मिळतो.) २ झाडाच्या फांदीसारखी किंवा हाताच्या पंजाप्रमाणें व ३ दुसरीकडे कुठें लांब वीज पडली असल्यास (वर वर्णिल्याप्रमाणें निर्माण झाली असल्यास) तिचा झगझगीत प्रकाश आकाशांत दिसतो. दुसऱ्या प्रकारांत वर्णिलेली वीज नदीसारखीं वेडीवांकडीं वळणें घेत (म्हणजे प्रतिविरोधी वस्तूस झटकन् बगल देऊन) जाते. या विजेचा एखादा फांटा ५–७ मैल लांबीचा असूं शकतो.

अशा प्रकारची वीज निर्माण झाली कीं आपल्यास लगेच मोठा कडकडाट ऐकूं येतो. याचें कारण असें कीं, ज्यावेळीं वीजेचा लोळ निर्माण होऊन त्याला फांटे फुटून ती पसरूं लागते त्यावेळीं ती सपाट्यानें जाते व जातां जातां उष्णतेनें भोंवतींची हवा एकदम प्रसरण पावते, यामुळें थोडी पोकळी निर्माण होते. लगेच भोंवतींची हवा जोरानें ती पोकळी भरून काढण्यासाठीं त्या पोकळीकडे घुसते व या भोंवतालच्या हवेच्या घुसण्यामुळें आपल्याला कडकडाट ऐकूं येतो. पण विजेचा चमचमाट व कडकडाट आपल्याला जवळजवळ एकदमच ऐकूं येतो व पुष्कळ वेळीं विजेच्या निरनिराळ्या फांट्यांच्यामुळें वरीलप्रमाणेंच अनेक ठिकाणीं परिस्थिति निर्माण होऊन एकामागून एक गडगडाट ऐकूं येतात.

वीजः–आकाशांतली कडाडणारी व क्षणभरच सर्वत्र लखलखाट करून कुठें गुडुप होणारी वीज सर्वांनीं पाहिलेली असते. ती वीज म्हणजे निसर्गनिर्मित होय. ती निर्माण करणें कांहीं आपल्या हातीं नाहीं. पण निसर्गाचा तरी एवढा दिमाख हवा कशाला ! आपणहि आपल्या स्वतःच्या गरजासाठीं वीज निर्माण केली आहे व हरघडी ती आपण चहा करण्यासाठीं, रात्रीं उजेड देण्यासाठीं, कपड्यांना इस्त्री करण्यासाठीं, पाणी तापविण्यासाठीं, घंटा वाजविण्यासाठीं, ट्रामगाड्या चालविण्यासाठीं, आगगाडी पळविण्यासाठीं, रेडिओसाठीं, टेलिफोनसाठीं, कारखान्यांतली लहानमोठी यंत्रें चालविण्यासाठीं, कपडे धुण्याकरतां, तसेंच शेतावर कामें करण्यासाठींहि ती रोज राबवून घेतो.

ही अशी अनेक कामें करणारी वीज दोन पद्धतीनें तयार करतां येते : १ यांत्रिक (Frictional or static Electricity२रासायानिक (Voltaic Eelectricity).



बॅटरीचे (रासायनिक विद्युत्) मुख्य प्रकार—स = साधी बॅटरी १ कांचेची बरणी, २ तांबें, ३ सल्फ्यूरिक ॲसिड, ४ जस्त. ड = डॅनियल सेल (बॅटरी) १. १० टक्के सल्फ्यूरिक ॲसिड, २ कॉपर सल्फेटचें मिश्रण (मोरचूद), ३ मोरचुदाचे खडे, ४ जस्ताची कांडी. ल = लेकलांकी सेल १ जस्त, २ कर्ब व मॅंगेनीज डायॉक्साइड, ३ नवसागर, ४ सच्छिद्र बरणी, ५ कार्बन (कर्ब), ६ शिशाचें टोपण. ब = ड्राय बॅटरी १ वरचा भाग (Pitch), २ विद्युत्‌रोधक तळ (Insulating base), ३ चुना व नवसागर, ४ जस्ताच्या पत्र्याचें वेष्टण, ५ मॅंगेनीज डायॉक्साइड व शिसपेनीचा दगड, ६ कार्बनची कांडी. टॉर्चसाठीं हीच बॅटरी वापरवात.

यांत्रिक पद्धतीनें वीज उत्पन्न करण्याचें तीन प्रकार आहेत. १ तेलावर चालणाऱ्या अंतर्ज्वलन इंजिनच्या सहाय्यानें २ वाफेचा उपयोग करून तीकरवीं वीज निर्माण करून व ३ सतत वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाच्या गतीवर (दाबावर) यंत्रें फिरवून वीज निर्माण करून. या यांत्रिक पद्धतीनें निर्माण झालेल्या विजेस घर्षणजन्यविद्युत् Frictional Electricity म्हणतात कांहीं रसायनांच्या सहाय्यानें जी वीज निर्माण होते तीस इंग्रजींत Galvanic or Voltaic Electricity म्हणतात.

वीजेच्या प्रवाहांत अे. सी. (Alternating Current—A. C) व डी. सी. (Direct Current—D. C.) असे दोन प्रकार आहेत. मोठ्या प्रमाणांत ज्या ठिकाणीं वीज निर्माण होते त्या ठिकाणीं ती बहुधा अे. सी. असते; व इतरत्र ती डी. सी. असते. अे. सी. विद्युत् दूरवर पोंचवितां येते, व जरूरीप्रमाणें ट्रॅन्सफॉर्मरच्या सहाय्यानें तिचा दाब कमी अधिक करतां येतो. डी. सी. विजेच्या बाबतींत ही सोय नसते.

विजेचे पंखे, मोटारी, मीटर्स, रेडिओ, व इतर लहानसान उपकरणी कोणत्यातरी एका प्रकारच्या विजेच्या प्रवाहावर म्हणजे अे. सी. किंवा डी. सी. प्रवाहावर चालणारीं व कांहींत कोणत्याहि प्रकारच्या प्रवाहावर चालणारीं असतात, तर कांहींत अगदीं थोडाफार फेरफार करून या किंवा त्या प्रवाहावरहि त्यांच्याकडून काम करून घेतां येते. अे. सी. वीजेचा प्रवाह डी. सी. पेक्षां जास्त घातक असतो.

स्वयंपाकासाठीं विजेची चूल, स्नानाचें पाणी तापविण्यासाठीं बंब, चहा करण्यासाठीं किटली किंवा हीटर, उजेड देण्यासाठीं दिवे, वाऱ्यासाठीं पंखे, कपड्यासाठीं इस्त्री, दाढी करण्यासाठीं वस्तरा, इषाऱ्यासाठीं घंटा, केंस वाळविण्यासाठीं पंखा, टोस्ट करण्यासाठीं टोस्टर, ओव्हन, पदार्थ ताजेतवाने राहावेत म्हणून बर्फतुल्य थंड हवा सदैव राखण्यासाठीं रिफ्रिजरेटर, घरांतील दारें उघडण्याझांकण्यासाठीं वगैरे अनेक बाबतींत वीज आपल्या घरीं आपली सेवा करीत असते. याशिवाय घराबाहेर तिचा फार उपयोग होतो.

कोणत्याहि बाबतींत विजेचें कार्य चालू असतांना विद्युत्पादन कारखान्यांतील जनरेटर्सच्या दोन टोंकांमधून निघणाऱ्या विद्युत्वाहकांतून (तारांतून) वीज फिरून तिचें एक वलय पूर्ण व्हावें लागतें. वीज वाहून नेणाऱ्या लहानमोठ्या तारामधून वाहणाऱ्या प्रवाहांत धन (Positive पॉझिटिव्ह) व ऋण (Negative

निगेटिव्ह) असे दोन प्रकार असतात. त्यांच्या खुणा अनुक्रमें + व – अशा असतात.

निरनिराळ्या पदार्थांत निरनिराळ्या प्रकारानें वीज निर्माण होऊन (विद्युज्जागृति) एकप्रकारची आकर्षण-शक्ति निर्माण होते. उदा० कांच जर रेशमाच्या तुकड्यानें घांसली, तर तींत धन विद्युत् निर्माण होईल व फ्लॅनेलच्या तुकड्यानें जर लाख (Sealing wax) घांसली तर लाखेच्या तुकड्यांत ऋण विद्युत्शक्ति निर्माण होईल. या धन व ऋणविद्युत्प्रवाहांत इतर (म्हणजे ज्या पदार्थांत अशा प्रकारें विद्युत्शक्ति निर्माण झालेली नाहीं) पदार्थांना आकर्षिण्याची शक्ति असते व समानधर्मीय विजेमुळें ज्यांत विद्युत्-शक्ति निर्माण होते असे पदार्थ एकमेकाला आकर्षूं शकत नाहींत; पण विरुद्धधर्मीय किंवा धन व ऋण विद्युत्शक्ति निर्माण झालेले पदार्थ एकमेकांना आकर्षूं शकतात.

कांहीं पदार्थांतून वीज चटकन् जाते (वाहूं शकते) पण कांहीं पदार्थांतून ती अजिबात वाहूं शकत नाहीं. पहिल्या जातीच्या पदार्थांना विद्युत्वाहक (Conductors कंडक्टर्स) म्हणतात. सर्व धातू, बहुतेक द्रवपदार्थ, पृथ्वी व प्राण्यांच्या शरीरांतील तंतुमय पदार्थ यांतून वीज सहज वाहते. रुपें व तांबें या धातूंतून वीजेचा प्रवाह–सर्वांत जलद जातो. दुसऱ्या जातीच्या पदार्थांना प्रवाह-रोधक (Non-Conductors or Insulators) म्हणतात. याप्रकारच्या पदार्थांत कांच, लाकूड, रबर, राळ, कोरडी हवा, रेशीम व लोकर हे पदार्थ येतात. विजेच्या दिव्याचा बल्ब काढून दुसरा लावतांना किंवा इतर कामाचे वेळीं लोक पायांखालीं पाट किंवा लांकडी स्टूल, खुर्ची इत्यादि घेतात त्याचें कारण हेंच.

वीज वाहून आणणाऱ्या तारांतहि पॉझिटिव्ह व निगेटिव्ह असे दोन प्रकार असतात. या दोन्ही तारा कोणत्याहि मार्गानें एकमेकीला जोडल्या गेल्या कीं विद्युत्वलय पूर्ण होतें म्हणजेच विजेचा प्रवाह चालू होतो; व या तारांचा संबंध तोडला कीं विजेचा प्रवाह बंद पडतो. स्विच् खालीं किंवा वर करून आपण प्रवाह सुरू करतो किंवा बंद करतो. हेंच कार्य लहानमोठें स्विच् करीत असतात.

विजेसंबंधीं उल्लेख निघाला कीं, ज्या शब्दांचा वारंवार उल्लेख होतो त्यांची माहितीः–

(१) **व्होल्ट** (Volt):–विजेचा दाब मोजण्याचें एक प्रमाण (Unit). इंग्रजींत त्याची पुढीलप्रमाणें व्याख्या आहेः–" The pressure which, applied to a Conductor of 1 ohm. resistence, will produce a current of 1 Ampere.

१ व्होल्ट × १ ॲम्पीयर = १ वॅट.

(२) **ॲम्पियर** (Ampere)–विजेचा प्रवाह मोजण्याचें एक प्रमाण–माप (unit). आंद्रे मारी ॲम्पीयर (१७७५–१८३६) या फ्रेंच शास्त्रज्ञानें विजेचा प्रवाह कसा मोजावयाचा हें दाखविलें. त्याचेंच नांव या प्रमाणाला दिलें आहे.

(३) **वॅट** (Watt)–विजेची शक्ति मोजण्याचें माप (Unit). १ वॅट म्हणजे १ व्होल्टच्या दाबाखालीं १ ॲम्पीयरचा विद्युत्प्रवाह. जेम्स वॅट (१७३६–१८१९) या संशोधकाचें नांव या प्रमाणाला दिलें आहे. दिवा जळत असतांना त्याला किती वीज लागते तें वॅटच्या प्रमाणानेंच मोजतात. शास्त्रीयरीत्या एक किलोवॅट तास (Kilowatt hour) या प्रमाणांत वीज मोजतात. १००० वॅट म्हणजे १ किलोवॅट. (एका तासांत खलास होणारी शक्ति). १ वॅट म्हणजे साधारणतः १$\frac{1}{4}$ कँडल पॉवर.

(४) **फ्लेक्झिबल तार** (Flexible wire)–तांब्याच्या बारीक तारा एकत्र गुंफून तीवरून रबरी वेष्टण व त्यावर रेशमी वीण असलेली तार.

(५) **फ्यूज** (Fuse)–विजेचा प्रवाह सुरू किंवा बंद करणारी तार. शॉर्ट सरकीट झाल्यास, (वीज ज्या ठिकाणीं वापरली जाते त्याच्या अलीकडच्या बाजूस असलेल्या तारेच्या वेष्टणांत दोष निर्माण होऊन त्या एकमेकीस चिकटतात व त्यामुळें विजेचा प्रवाह जोरानें सुरू होतो त्यामुळें फ्यूज जळते, व विजेचा प्रवाह बंद होतो. याशिवाय तारांचे ढिले जोड, तारेवरील रबरी वेष्टण खराब होणें इत्यादि कारणांनींहि शॉर्ट सर्कीट होतें.) फार वापर इ. कोणत्याहि कारणांमुळें फ्यूज जळून गेल्यास त्या ठिकाणीं दुसरी तार (फ्यूज) बसवून विजेचा प्रवाह चालू करतां येतो. विजेच्या खपाच्या मानानें हिची लांबी असते.

वृत्तः–पद्यरचनेचा एक विशिष्ट प्रकार. वृत्ताची व्याख्या कै. डॉ. माधवराव पटवर्धन हे आपल्या 'छंदोरचना' या ग्रंथांत, ' ज्या पद्यांतील चरण विशिष्ट

अक्षरसंख्या, लगक्रम आणि मोडणी किंवा गण-विभागणी यांनीं नियमित असतात तें वृत्त होय,' अशी करतात.

या वृत्ताचे मुख्य प्रकार तीन. एक समवृत्त, दुसरा अर्धसमवृत्ताचा आणि तिसरा विषमवृत्ताचा. प्रत्येक प्रकाराचीं लक्षणें खालीं दिलीं आहेत.

समवृत्त–चार चरण एकसारखे पाहिजेत.

अर्धसमवृत्त–पहिला तिसरा किंवा दुसरा चौथा हे चरण सारखे हवेत.

विषमवृत्त–चारीहि चरण भिन्न लक्षणाचे. मराठी-मध्यें रूढ झालेलीं प्रमुख वृत्तें--पृथ्वी, इंद्रवज्रा, उपेंद्र-वज्रा, रथोद्धता, वसंततिलका, शालिनी, मालिनी, मंदाक्रांता, स्रग्धरा, शार्दूलविक्रीडित,हरिणी, शिखरिणी मंदारमाला, भुजंगप्रयात इत्यादि.

वेडः–निसर्गानें अगर मनुष्यानें पूर्वापार अनुभवानें स्वतःसंबंधीं, आपल्या बांधवांसंबंधीं, धर्मासंबंधीं अगर ईश्वरासंबंधीं जीं बंधनें अगर कर्तव्यें प्रत्येकावर लादलेलीं आहेत तीं न कळत झुगारून देणें व तीं झुगारून दिल्या-बद्दल त्या माणसाला कल्पना न येणें या स्थितीला वेड म्हणतां येईल. **कारणें**–१ वंशपरंपरेनें हा रोग येण्याचा फार संभव असतो. २ आपआपसांत अगर नातेवाइकांत लग्नें केल्यापासून होणाऱ्या संततींत तो रोग जडण्याचा फार संभव असतो. ३ मस्तकास इजा. ४ व्यसनें–दारू, गांजा, भांग, अफू वगैरे व्यसनांनींसुद्धां हा रोग जडतो. ५ अमर्याद प्रेम, मुष्टिमैथुन, अति काळजी, क्रोध, अकस्मात् मानसिक धक्का, अति हर्ष, अति लोभ इत्यादि कारणांनीं वेड लागतें. **पूर्वचिन्हें**–डोकें दुखणें, घेरी येणें, स्वभाव चिडखोर बनणें, कामावरून लक्ष उडणें, झोंप न येणें वर्तनांत फरक पडणें हीं सर्व त्याचीं पूर्वचिन्हें होत. कित्येक माणसें उपजतच वेडीं असतात. **लक्षणें**–वेडाचीं लक्षणें सांगणें फार कठीण आहे, कारण निरनिराळ्या वेडाचीं लक्षणें निरनिराळीं असतात. एखादा मनुष्य दांडगाई करतो, एखादा खून करतो, तर एखादा गुपचुप बसून राहतो आणि त्यास कपड्याची अगर खाण्यापिण्याचीहि शुद्धि असत नाहीं, तर एखादा रस्त्यांतून फिरत असतो. कांहीं वेडे कांहीं काळपर्यंत अगदीं शहाण्यासारखे वागतात; आणि मग अकस्मात् वेडे होतात. आणि पुन्हां ते बरे होतात.कोणी धर्मवेडे होतात, तर कोणी विषयांध होतात, कोणी आत्महत्या करून घेतात तर कोणी खून करतात. **उपाय**–पूर्वचिन्हावरून जवळच्या शहाण्या आणि समजूतदार माणसाला या रोगाची लगलीच कल्पना येते आणि त्याप्रमाणें त्याच्यावर ताबडतोब उपचार करावेत. कारणें नाहींशीं करावींत, झोंप येत नसल्यास झोंपेचीं औषधें द्यावींत आणि त्याकरितां योग्य डॉक्टराच्या सल्यानें ताबडतोब उपाययोजना करावी.

वेदः–हिंदूंचे अतिप्राचीन धर्मग्रंथ. वेद हा शब्द 'विद्' (जाणणें) या धातूपासून झाला आहे. वेद म्हणजे ज्ञान-संग्रह. वेदाची उत्पत्ति एखाद्या विशिष्ट व्यक्तीपासून झाली नाहीं; म्हणून वेद हे अनादि व अपौरुषेय आहेत अशी भाविक हिंदूंची समजूत आहे. परमेश्वरानें सृष्टीच्या प्रारंभीं अग्नि, वायु, आदित्य व अंगिरा या ऋषींच्या आत्म्यांमध्यें एका वेदाचा प्रकाश केला असें शतपथ ब्राम्हणांत म्हटलें आहे. याचा अर्थ असा कीं वैदिक ऋषींना वेदांतील ज्ञान ते ध्यानस्थ होऊन बसले असतांना अंतःस्फूर्तीनें झालें, परमेश्वरानेंच त्यांना तें ज्ञान ऐकविलें. वेदांत परमेश्वरापासून ऋषींनीं ऐकलेलें ज्ञान असल्यामुळें त्यांना 'श्रुति' असेंहि म्हणतात. ऋषी मंत्राचे कर्ते नसून द्रष्टे आहेत. परमेश्वरापासून प्राप्त झालेल्या ज्ञानाचे ते प्रकाशक आहेत. वेदांचा काल कोणता याबद्दल विद्वानांचें एकमत नाहीं. लोकमान्य टिळकांच्या मतें वेद कमींत कमी सात आठ हजार वर्षांपूर्वीं झाले असले पाहिजेत. कांहीं विद्वान वेदकाल तीन हजार वर्षांपूर्वींचा ठरवितात तर कांहीं तो बारा हजार वर्षांपूर्वींचा मानतात. महर्षि स्वामी दयानंद हे वेद दोन अब्ज वर्षांपूर्वीं झाले असल्याचें प्रतिपादितात.

ऋक्, यजुः, साम व अथर्व या चार मंत्रसंहितेला वेद म्हणतात. वेदांच्या मूलमंत्रांना संहिता म्हणतात. सर्व वेदांच्या मिळून ११२७ शाखा आहेत. चारहि वेदांत ऋग्वेद हा अत्यंत प्राचीन आहे. त्याची शाकल या नांवाची एकच शाखा उपलब्ध आहे. ऋग्वेदांत ऋक् म्हणजे ऋचा असल्यामुळें त्याला ऋग्वेद म्हणतात. ऋचा म्हणजे देवतांचीं स्तुतिस्तोत्रें. ऋग्वेदसंहितेंत एकूण १०२८ सूक्तें आहेत. हीं सूक्तें अनेक विषयांवर आहेत. **ऋग्वेदांत** (१) पाऊस, वीज, ऊन्ह इत्यादि नैसर्गिक घटनांचें अत्यंत काव्यमय वर्णन केलें आहे. सृष्टिनिर्माणकर्त्या परमेश्वराच्या अगाध सामर्थ्याचें कौतुक वाटून त्याचीं स्तुतिस्तोत्रें गाइलीं आहेत. (२) वर दिलेल्या घटनांच्या अधिष्ठात्रि देवता सूर्य,

अग्नि, इंद्र, वरुण, मरुत्, द्यौ, पूषन् इत्यादि देवतांचीं स्तोत्रें आहेत; (३) यज्ञोपयोगी सूक्तें आहेत. (४) विवाह, अंत्यविधि इ. साठीं रचलेलीं सूक्तें व मनुष्याचे कांहीं विशिष्ट हेतू साधण्यासाठीं रचलेलीं सूक्तें. (५) यमयमीसंवाद, पुरुरवा–ऊर्वशी यासारखीं मनोरंजक आख्यानें इत्यादि अनेक विषय आहेत.

यजुर्वेद–यज्ञ हा यजुर्वेदाचा विषय. निरनिराळ्या यज्ञांना आवश्यक असे मंत्र, प्रार्थना व विधि यांत सांगितले आहेत. यजुर्वेदाच्या दोन मुख्य संहिता. कृष्णयजुर्वेदसंहिता व शुक्लयजुर्वेदसंहिता. पहिलीस तैत्तिरीय व दुसरीस वाजसनेयी अशीं नांवें आहेत. या वेदाच्या १०१ शाखा आहेत असें पतंजलीनें म्हटलें आहे. सध्यां कृष्णयजुर्वेदाच्या चार व शुक्लयजुर्वेदाची एक अशा पांच संहिता उपलब्ध आहेत. काठक, कपिष्ठल, मैत्रायणी व तैत्तिरीय या कृष्णयजुर्वेदाच्या संहिता व वाजसनेयी ही शुक्लयजुर्वेदाची. यांत तैत्तिरीय व वाजसनेयी या प्रमुख होत. तैत्तिरीय संहितेला कृष्णयजुर्वेद व वाजसनेयी संहितेला शुक्लयजुर्वेद म्हणतात. यजुर्वेदांतील कांहीं भाग गद्यात्मक व कांहीं पद्यात्मक आहे. या वेदांतील पुष्कळसे मंत्र ऋग्वेदांतीलच घेतलेले आहेत.

सामवेद–हा गायनाचा वेद आहे. भारतीय संगीतशास्त्राचा उगम या वेदांतूनच झाला आहे. यांत बहुतेक सर्व ऋचा ऋग्वेदांतून घेतलेल्या आहेत. फक्त पंचाहत्तर ऋचा इतर संहितांतून घेतलेल्या आहेत. या वेदांत स्वतंत्र अशा ऋचा नाहींत. साम म्हणजे स्वर किंवा छंद. या वेदाच्या नांवाप्रमाणेंच छंदाची माहिती देणारा हा वेद आहे. ऋग्वेदांतील ऋचा कशा गाव्यात हें यांत सांगितलें आहे. यांत वेदमंत्र म्हणण्याचे ३६ प्रकार दिलेले आहेत. याच्या रामायणी व कौथुमी अशा दोन शाखा उपलब्ध आहेत. या दोन शाखा अनुक्रमें महाराष्ट्र व गुजराथ येथें प्रचलित आहेत.

अथर्व वेद–प्राचीन काळीं अथर्व वेदाचा वेदवाङ्मयांत अंतर्भाव होत नसे. इतर तीन वेदांना मिळून त्रयीविद्या म्हणत असत. प्राचीन काळीं हा अथर्वांगीरस या नांवानें ओळखला जात असे. अथर्ववेदाचे वीस भाग आहेत; त्यांना कांडें म्हणतात. यांतील बराचसा भाग ऋग्वेदांतून घेतला आहे. या वेदांत ७३१ सूक्तें व ६००० ऋचा आहेत. यांत तत्त्वज्ञानाचा भाग अगदीं थोडा आहे. कांहीं सूक्तांत जगदुत्पत्तीविषयीं विचार केला अत्हे. बहुतेक भाग जारण, मारण, स्तंभन, रोगनिवारण, विवाह इत्यादि विषयांवरील मंत्रांनीं व्यापलेला आहे. राजकारणविषयक मंत्रहि यांत पुष्कळ आढळतात. यांत शत्रूविरुद्ध योजावयाचे अभिचारविधि व पौष्टिक मंत्र यांचा समावेश होतो. परधर्मीयांना हिंदुधर्मांत घेण्याचे वेळीं व हिंदुधर्मांतील पतितांना पुनरपि चातुवर्ण्यांत समाविष्ट करून घेण्याचे वेळीं करावयाचा व्रात्यस्तोम विधि याच वेदांत सांगितला आहे.

चार वेदांचे चार उपवेद आहेत. आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद व अर्थवेद हे चार उपवेद होत. आयुर्वेद हा ऋग्वेदाचा उपवेद, धनुर्वेद हा यजुर्वेदाचा, गांधर्ववेद हा सामवेदाचा व अर्थवेद हा अथर्ववेदाचा. आयुर्वेदावर आर्यांचें वैद्यशास्त्र आधारलें आहे. धनुर्वेदांत युद्धशास्त्राचा विचार केला आहे. यांत शस्त्रें, अस्त्रें, युद्ध करण्याच्या पद्धति, व्यूहरचना इत्यादि बाबींची माहिती दिली आहे. गांधर्ववेदांत संगीतशास्त्राचा विचार केला आहे. अर्थवेदांत अर्थशास्त्राविषयीं ज्ञान सांगितलें आहे.

वेदवाङ्मयाचे संहिता, ब्राह्मण व उपनिषद् असे तीन भाग आहेत. वर दिलेल्या चार वेदांना संहिता म्हणतात. ब्राह्मण व उपनिषदें यांवर माहिती त्या त्या शीर्षकाखालीं दिली आहे.

वेदान्तः–'वेद' म्हणजे 'ज्ञान' व 'अन्त' म्हणजे 'शेवट'. ज्ञानाचा अगदीं शेवट, मनुष्याला जें काय ज्ञान होऊं शकतें, त्यांतील शेवटचें, उच्च कोटीचें ज्ञान. सर्वांत श्रेष्ठ व गुह्यज्ञान असा या शब्दाचा अर्थ आहे.

गुह्यज्ञान–गुह्यज्ञान हाच वेदान्त होय. गुह्य म्हणजे गुप्त, अथवा गुह्य म्हणजे गुहा नामक बुद्धिच्या आंत होणारें ज्ञान, जें शब्दांनीं व्यक्त करतां येणें कठीण, जें प्रमाणांनीं सिद्ध करतां येणें दुस्तर, जें समजतें पण व्यक्त करतां येत नाहीं; म्हणून याला 'स्व-संवेद्य' म्हणजे आपल्याआपणच स्वतःच्या समजुतींत येणारें ज्ञान असें म्हणतात.

वेदान्ताचे ग्रन्थ–हें जरी स्वसंवेद्य ज्ञान असलें तरी वेदान्त हें एक उत्तम शास्त्र आहे व हें ज्ञान बुद्धीच्या कक्षेंत यावें, यासाठीं या विषयावर अनेक ग्रन्थहि आहेत. 'प्रस्थानत्रयी' (१ उपनिषदें, २ वेदान्त-

दर्शन, उत्तरमीमांसा, ब्रह्मदर्शन, व ३ भगवद्गीता) हे तीन ग्रन्थ या वेदान्ताचे मुख्य ग्रन्थ आहेत. या तीनही ग्रन्थांत उपनिषदें हीं मुख्य आहेत, त्यांचें सार भगवद्गीता आहे व उपनिषदांतील वाक्यांची संगति उत्तरमीमांसेंत लावून दाखवली आहे.

वेद (मन्त्र) व ब्राह्मण + आरण्यक (उपनिषद) यांना श्रुति म्हणतात. यांत पहिला भाग मन्त्रसंहिता व ब्राह्मणभाग, याला 'कर्मकाण्ड' म्हणतात व दुसरा उत्तरभाग आरण्यक (उपनिषद्) याला 'ज्ञानकाण्ड' असें म्हणतात. ज्ञानकाण्ड म्हणजेच वेदान्त होय.

कर्मकाण्ड हें चित्तशुद्धीसाठीं असून ज्ञानकाण्ड हें ज्ञान प्राप्त होऊन मुक्ति मिळवण्यासाठीं आहे. चारहि वेदसंहितांना कर्मकाण्ड मानून त्यांस ज्ञान-काण्डापेक्षां कमी लेखण्यांत येतें. ही परंपरेची समजूत असली तरी, या वेदसंहितांमध्येंहि वेदान्तज्ञान भरून राहिलेलें आहे. सर्व वेद त्या एका ब्रह्मपदाचेंच वर्णन करीत आहेत. ज्याला तें ज्ञान होणार नाहीं त्याला वेदमंत्रांचा काय बरें उपयोग होणार ? पण ज्याला तें ज्ञान होतें त्याला मात्र वेदमंत्रांचा फार उपयोग आहे, असें प्रतिपादन करून चारहि वेदांच्या मंत्रांतहि हें वेदांतज्ञान सांगितलें आहे, असेंहि पूर्वींचे कांहीं विचारक मानीत होते, यांत शंका नाहीं. चारहि वेदांतील मंत्रांचा अर्थ पाहिला असतां त्यांत ज्ञानपर पुष्कळच मंत्र आहेत असेंहि अनुभवास येतें. (जसें ऋग्वेद-नासदीयसूक्त, वा. यजु. अ. ३०; ३२; ३६; ४० हे अध्याय इ.)

वेदान्ताचीं नांवें–'वेदान्त' या शब्दाला 'ज्ञान, विद्या, आत्मज्ञान, अध्यात्मज्ञान, ब्रह्मज्ञान' असे दुसरे शब्द आहेत व या शब्दांनीं यामध्यें कशाचा समावेश होतो, तें सहज कळूं शकतें. 'ईश्वरविषयक ज्ञान' असेंहि याला गौणदृष्टीनें म्हणतां येईल. गौण-दृष्टीनें असें म्हणण्याचें कारण असें कीं, वेदान्त-शास्त्रामध्यें ब्रह्म किंवा आत्मा हें शेवटचें परमतत्त्व आहे असें सांगितलें असून, तेंच जगदुत्पत्तीच्या अहंकारानें प्रेरित झालें म्हणजे ईश्वरस्वरूप होतें, असें ठरवलें असल्यामुळें ब्रह्मभावापेक्षां ईश्वरभाव हा वेदान्तामध्यें गौण मानला आहे.

वेदान्ताचा विषय–ब्रह्म, जीव, विश्व, जगत्, यांचें खरें स्वरूप सांगून लोकांचें अज्ञान दूर करून त्यांस सत्यज्ञान देणें व त्यायोगें नराचा नारायण होण्याचा मार्ग दाखविणें हा या वेदान्ताचा विषय आहे.

या विश्वामध्यें परस्परभिन्न अशा अनन्त वस्तु दिसतात, त्यांत विरोधहि दिसतो, यांचा संबंध कळत नाहीं, आपण कोण हें समजत नाहीं, आपण अगदीं अल्प असल्यामुळें हीन व दीन आहों असें वाटतें. यामुळें जीवाला भ्रम उत्पन्न होतो व तो गांगरून जातो. वेदान्ताच्या ज्ञानानें हा जीवाचा भ्रम दूर होतो. त्याला आपल्या शक्तीचें आकलन होतें, जगाचें कोडें उलगडतें व तो 'समर्थ' बनतो. असा हा वेदान्त 'अशक्ताला सामर्थ्यवान करणारा' आहे.

चार महावाक्यें–

"(१) ब्रह्म म्हणून जें कांहीं आहे तेंच तूं स्वतः आहेस, (२) खरोखरच हा आत्मा ब्रह्म आहे, (३) हें सर्व जें कांहीं आहे तें ब्रह्मच आहे. (४) मी ब्रह्मच आहें." वेदान्ताचीं हीं चार महावाक्यें आहेत. ज काय वेदान्ताला सांगावयाचें तें सर्व या महा-वाक्यांनीं सांगितलें आहे. हें जें सर्व विश्व आहे तें सर्व ब्रह्मच आहे. मनुष्याचा आत्माही ब्रह्मच आहे व ज्याला आपण 'मी' असें म्हणतों तेंहि ब्रह्मच आहे.

मनुष्य आपणांस हीन, दीन, अल्प, अशक्त समजत असतो. हा त्याचा भ्रम आहे. तो ब्रह्मच आहे म्हणजे तो 'महाशक्तीचा पुञ्ज' आहे असें वेदान्तानें सिद्ध केलेलें आहे. 'मी ब्रह्म आहें' याचा अर्थ 'मी महा-सामर्थ्यांचा मध्यबिन्दु किंवा केन्द्र आहें' असा आहे.

'हें सर्वच ब्रह्म आहे.' या महावाक्यानें असें सांगितलें कीं, हें सर्व विश्व कीं ज्यांत हें स्थिरचर सर्व समाविष्ट झालेलें आहे, तें सर्व मिळून ब्रह्मच आहे. ह विश्व ब्रह्म आहे व हा जीवहि ब्रह्मच आहे, म्हणजे हें सर्वच ब्रह्म आहे व येथें दुसरें तिसरें कांहीं एक नाहीं. जो येथें भिन्नभिन्न परस्परविरोधी वस्तु आहेत असें मानतो, त्याला कांहीं समजत नाहीं व या भेदकल्पनेनेंच त्याला भ्रम होऊन नाना प्रकारचीं दुःखें भोगावीं लागतात.

एकच सत् आहे–त्रिकालाबाधित सत्यतत्त्व एकच आहे. एकच 'सत्' आहे. ज्या निरनिराळ्या वस्तु दिसतात तीं सर्व त्या एका सत्य वस्तूचीं निर-निराळीं रूपें आहेत. त्या वस्तूला निरनिराळीं नांवें दिलेलीं असलीं, म्हणून त्या प्रत्येक नांवाची निरनिराळी वस्तु आहे, असें म्हणतां येत नाहीं. निरनिराळ्या वस्तु मानणें हा भ्रम असून सर्व मिळून एक सत्य सत्ता

आहे असें मानणें हें खरें ज्ञान होय. अग्नि, इंद्र, वरुण, सुवर्ण, यम, वगैरे सर्व देव हे सुद्धां त्या ब्रह्माचींच रूपें आहेत.

अग्नि, आदित्य, वायु, चन्द्र, आप्, प्रजापति आदि सर्व जें काय या विश्वांत आहे, तें सर्व तेंच ब्रह्म अनेक रूपांनीं प्रकट होऊन बनलेलें आहे. जसें एका सोन्याचे अनेक दागिने किंवा एका विस्तवांतून अनेक ठिणग्या निघतात, तसें हें विश्व त्या सत्य ब्रह्मापासून निघालेलें आहे.

ब्रह्म आणि देव—ब्रह्म एक आहे व देव अनेक आहेत. पण हे सर्व देव त्या ब्रह्माचे निरनिराळे अवयव, अंश अथवा शक्तिकेन्द्र आहेत. ही सर्व सृष्टि म्हणजे ही देवसभाच आहे. पृथ्वीवर अग्नि, जल, वनस्पति, वृक्ष, नदी, नद आदि, अन्तरिक्षांत वायु, चन्द्र, मेघ, विद्युत्, पर्जन्य आदि व द्युलोकांत सूर्य, नक्षत्रें, ग्रह आदि सर्व हे ३३ कोटी देव होत. ब्रह्मामधील निरनिराळ्या शक्ति बाहेर आल्या व त्या या देवांच्या रूपानें प्रकट झाल्या; अर्थात् ब्रह्म व देवता मिळून सर्व एकच सत्तत्त्व आहे. या देवता व हें विश्व एकच. या देवता ३३ असोत अथवा ३३ कोटी असोत. त्या कितीहि असल्या तरी त्या सर्व मिळून एकच ब्रह्मसत्ता होत असते; म्हणूनच येथें भिन्न असें कांहीं नाहीं असें वेदान्तानें ठरविलें आहे.

विश्वरूपी ब्रह्म—विश्व हें या ब्रह्माचें स्वरूप आहे. हें सिद्धांतरूपानें वेदांतानें अनेक रीतींनीं सांगितलें आहे. ‘पुरुष हेंच भूत, वर्तमान, भविष्यकाळांतील सर्व कांहीं आहे.’ (ऋग्वेद) ‘पुरुष हेंच हें विश्व आहे (मुण्डक), ब्रह्मच हें सर्व विश्व आहे. (बृ. उ.), आत्माच हें सर्व आहे (बृ. उ.), हा आत्मा हें खरोखरच ब्रह्म आहे, (मां. उ.), वासुदेव खरोखरच हें सर्व आहे (गीता), हें विश्व हा प्रत्यक्ष विष्णुच आहे. (विष्णु स. ना.), नारायणच हें सर्व विश्व आहे. (नारा. उ.) इतकें सांगून भगवद्गीतेनें ईश्वराचें विश्वरूप कसें आहे तें विशेष वर्णन करून सांगितलें आहे (गी. अ. ११) येथें दुसरें तिसरें कांहींच नाहीं, एकच ब्रह्म अनंतरूपानें नटलेलें आहे, ही शिकवण वेदांतानें अशा रीतीनें समजावून सांगितली आहे.

विश्व व विश्वात्मा-विश्व हें विश्वात्म्याचें शरीर आहे. ‘भूमि, आप, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धि, अहंकार व जीव असें हें ईश्वराचें नऊ प्रकारचें शरीर आहे.’ आपणास पृथ्वी दिसो, जलतत्त्व दिसो किंवा कोणतेंहि दुसरें तत्त्व दिसो, तें विश्वात्म्याचें शरीर आहे या अभ्यासानें या विश्वाच्या आत्म्याचा साक्षात्कार करून घेण्याचें साधन होऊं शकतें.

जड व चेतन—सृष्टि ही जड असून आत्मा हा चेतन आहे. हा जडचेतन भेद स्पष्ट दिसत आहे. यावरून हे दोन परस्परभिन्न पदार्थ आहेत असें स्पष्ट दिसतें. मग एकच वस्तु आहे व दुसरें कांहीं येथें नाहींच नाहीं, असें कसें म्हणतां येईल ? अशी शंका सर्वांस येते, त्याचें उत्तर वेदान्तानें असें दिलें आहे—

खडा + गोडी = गूळ किंवा गूळ = खडा + गोडी हें समीकरण समजून घ्यावें. म्हणजे एकच वस्तु एक प्रकारची, दोन प्रकारची व तीन प्रकारची भासते, पण त्या तीनही प्रकारांनीं मिळून एकाच वस्तूचा कसा बोध होतो तें कळेल.

गुळाचा खडा समोर ठेवा. डोळ्यांनीं त्याचा आकार दिसेल व हातांनीं त्याचा घट्टपणा अनुभवास येईल. हा आकार जड असून नाशवंत आहे. या नाशवंत आकारांत व्यापून असणारी गोडी अव्यक्त असून खड्याचा आकार बदलला तरी ती न बदलणारी आहे. नाशवंतांत अविनाशी तत्त्व कसें असतें, तें येथें समजेल.

खडा व गोडी या दोन वस्तु भिन्न आहेत असें मनाला वाटतें, पण खडा एकीकडे व गोडी दुसरीकडे करतां येतच नाहीं. म्हणून ‘खडा व गोडी’मध्यें मनानें जरी भेद करितां आला तरी त्या दोन पृथक् वस्तु नव्हेत, तर त्या दोन कल्पना मिळून एकच खरी वस्तु आहे हें त्रिकालाबाधित सत्य आहे. खडा, गोडी व गूळ या तीन कल्पना वेगवेगळ्या भासल्या तरी एका गुळाच्या आश्रयानेंच इतर सर्व कल्पना राहिलेल्या आहेत, हें खरें आहे.

असाच ‘जड + चेतन’ भेद कल्पनेनें समजुतीसाठीं मानलेला आहे. ‘क्षर + अक्षर’ हे सर्व भेद तसेच मानीव आहेत. ब्रह्माचींच हीं दोन रूपें आहेत; एक मूर्तब्रह्म, दुसरें अमूर्त ब्रह्म. जसा खडा व गोडी मिळून गूळ ही एक वस्तु बनते, त्याचप्रमाणें जड + चेतन, क्षर + अक्षर, मूर्त + अमूर्त मिळून एकच सत् (ब्रह्म) होत असतें.

पञ्चमहाभूतें—पृथ्वि, आप्, तेज, वायु, आकाश हीं पञ्चमहाभूतें परस्पर पृथक् असून तीं आत्म्याहून सर्वथा निराळीं आहेत असा अनुभव सर्वांचा आहे, पण वेदान्ताच्या निर्णयाप्रमाणें पञ्चमहाभूतें पृथक् पृथक् नाहींत. एका अद्वितीय, सत्तत्त्वाला नाक, जिव्हा, नेत्र, त्वचा, कान हीं पांच इंद्रियें लागलीं म्हणजे त्या इंद्रियांस वास, रुची-रूप, स्पर्श-शब्द या पांच विषयांचा क्रमानें अनुभव येतो. वस्तु एकच, पण त्या एका वस्तूमध्यें असलेल्या अनेक गुणधर्मांपैकीं आपल्या पांच इंद्रियांनीं आपल्या शक्तिप्रमाणें पांच गुणधर्म ग्रहण केले किंवा जाणले. आमच्याजवळ एकापेक्षां अधिक गुणांचें ग्रहण करणारें इंद्रियच नाहीं. हा इंद्रियांचा दोष आहे. ही समजूत पटावी म्हणून वेदान्ती एक उदाहरण देत असतात, तें असें.

एक हत्ती पहावयासाठीं पांच आंधळे गेले. एकानें कान चांचपडला, तो म्हणाला हत्ती सुपासारखा आहे; दुसऱ्याला शेंपटी सांपडली, तो म्हणाला हत्ती पहारीसारखा आहे; तिसऱ्याला पाय सांपडला, तो म्हणाला हत्ती हा खांबासारखा आहे; चवथ्याला पोट सांपडलें, तो म्हणाला हत्ती कापसाच्या पोत्यासारखा आहे. पांचवा सोंडेजवळ गेला तेव्हां त्यास हत्ती मुसळासारखा वाटला. प्रत्येकाचा अनुभव खराच होता. पण यांपैकीं कोणीच संपूर्ण हत्तीचें ज्ञान ग्रहण करण्यास समर्थ नसल्यामुळें त्यांची एकवाक्यता होऊं शकेना. तशीच स्थिति पञ्च इंद्रियांची आहे.

जी एकच एक सत्य वस्तु आहे, तिचें साकल्यानें ग्रहण करण्याचें सामर्थ्य इंद्रियांत नसल्यामुळें प्रत्येक इंद्रिय त्या सद्वस्तूचें अंशतःच ग्रहण करूं शकतें, त्यामुळें अंशतः आलेले अनुभव परस्पर भिन्न भासतात व या अज्ञानाच्या आधारावर पञ्चमहाभूतें हीं भिन्न आहेत या कल्पनेची रचना केलेली आहे! वस्तुतः या पांचहि अनुभवांचा आश्रय असलेली अशी जी एक मूल वस्तु आहे तीच वस्तु खरी असून तीच तीनही कालांत एकरूप राहणारी आहे.

अशा तऱ्हेनें वेदान्तानें सर्व भेदांचा निरास केलेला आहे.

द्वन्द्वांचा भेद—शीतउष्ण, सुखदुःख अशीं अनेक द्वन्द्वें मनुष्याच्या अनुभवाला येत असतात, पण एकाच्याच या निरनिराळ्या भासमान अवस्था आहेत असें वेदान्तानें ठरवलें आहे. उदाहरणार्थ पाहा— अधिक उष्णता व कमी उष्णता एवढ्यानेंच शीत-उष्ण हे भेद निर्माण झाले आहेत. म्हणजे एकाच उष्णतेचीं हीं दोन रूपें आहेत. १००° अंश उष्णता ही ५° अंश उष्णतेपेक्षां अधिक उष्ण व १०००° अंश उष्णतेपेक्षां थंड असते. केवळ तुलनेनें हीं द्वंद्वें भासतात. त्यांत तत्त्वतः खरेपणा असा मुळींच नाहीं. तसेंच इतर द्वंद्वांसंबंधीं समजावें.

माया—खरेपणा नसतांना भासणें, अनुभव येणें, हें सर्व मायेनें होत असतें असें वेदान्तानें ठरवलेलें आहे. अज्ञानानें हे भेद भासतात व ते सर्व सत्यज्ञानानें नाहींसे होतात. वेदान्त हें सत्यज्ञान असून, भेदांवर उभारलेलें प्रापंचिक ज्ञान हें अज्ञानच आहे. या अज्ञानानें बंधन, दुःख व कष्ट होत असतात व वेदान्ताच्या सत्यज्ञानानें त्या सर्व दुःखांचें निरसन होतें.

वेदान्ताचें साध्य—सर्व दुःखें दूर करून अखण्ड आनन्दाची प्राप्ति करून देणें हें वेदान्ताचें साध्य आहे.

मनुष्याची आकांक्षा—मनुष्याची मुख्य आकांक्षा तीन प्रकारची आहे. (१) मी (सत्) चिरस्थायी रहावें, (२) मला (चित्) ज्ञान मिळावें व (३) मला आनंद प्राप्त व्हावा. या तीन आकांक्षा मनुष्यामध्यें सतत आहेत. 'सत्–चित्–आनंद' यांची म्हणजे ब्रह्माची प्राप्ति व्हावी हाच यांचा अर्थ आहे. सर्वच जग हें असें सच्चिदानंदमय होण्यासाठीं धडपडत आहे. असें होण्याचा खरा मार्ग या वेदान्तानें दाखवून दिलेला आहे. तो चोखाळला तरच मानव लवकर आनंद प्राप्त करील, पण जोंपर्यंत तो अन्य साधनें करीत राहील तोंपर्यंत त्याचें दुःख दूर होणार नाहीं.

सिद्धि—विवेकानें व वर दिलेल्या साधनानें अज्ञान नाहींसें झालें व अद्वैत अशा एका सत्तत्त्वाचा अखण्ड अनुभव आला, म्हणजे त्याला कर्तव्य असें कांहीं उरत नाहीं व तो कृतकृत्य होऊन, बंधनांच्या पलीकडे जाऊन मुक्त होतो. ज्ञानानें ही मुक्ति मिळते (ज्ञानान्मुक्तिः).

वेदान्तज्ञान कोणी केव्हां प्राप्त करावें? गृहस्थाश्रमाचा काल (५० वर्षें वय होऊन) संपला, यज्ञयाग केले, मुलेंबाळें झालीं म्हणजे या 'वेदान्ताचें' अध्ययन करावें, असें एक मत आहे. या पक्षाचे लोक उपनिषदादि वेदान्त ग्रंथ घरांत पठणहि करीत नाहींत, तर ते देवळांत, अरण्यांत अथवा उद्यानांत जाऊन पठण करतात. पण यापूर्वीच्या विचारकांचें

मत असें दिसतें कीं, वेदाध्ययनानंतर वेदान्तविद्येचाहि अभ्यास व्हावा व स्नातक (पदवीधर) होईपर्यंत वेदान्तशास्त्राप्रमाणें प्राप्त व्हावयाचें ब्रह्मज्ञान त्यास प्राप्त व्हावें, अर्थात् ब्रह्मसाक्षात्कार या वयांत म्हणजे ब्रह्मचर्यसमाप्तीच्या वेळेपर्यंत व्हावा. 'ज्याला या ब्रह्म-पुरीचें ज्ञान होतें त्याला ब्रह्म व सर्व देवता यांच्या कृपेनें उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व सुप्रजा प्राप्त होते।' (अथर्व.) ब्रह्मप्राप्तीनंतर जी प्रजा व्हावयाची ती औरस संततीच असली पाहिजे यांत शंका नाहीं. अर्थात् यांच्या दृष्टीनें गृहस्थाश्रमाच्या पूर्वीच वेदान्त-ज्ञानानें प्राप्त होणारें शेवटचें साध्य प्राप्त होण्याची शक्यता दिसून येते. श्रीशंकराचार्य, शुक्राचार्य आदि ज्ञानी लहान वयांतच पूर्ण झाले यावरूनहि वरील मत मानण्यास हरकत नाहीं.

वेदान्तज्ञानानें व अनुष्ठानानें मनुष्य पूर्ण पुरुष बनतो. असे पूर्ण पुरुष समाजांत पुष्कळ व्हावे, त्यांच्या प्रभावानें समाज निर्दोष व्हावा व या पृथ्वीवर स्वर्गच नव्हे तर प्रत्यक्ष ब्रह्मलोकच अवतरला आहे असें वाटावें असें ध्येय वैदिक काळच्या ऋषींनीं आपल्यापुढें ठेवलें होतें असें दिसतें; कारण आत्मज्ञान झालेले ब्रह्मनिष्ठ, शमदमादि आचारसंपन्न वसिष्ठ ऋषीसारखे पुरोहित व जनकासारखे ब्रह्मनिष्ठ राजे राज्यव्यवहारांत पडलेले दिसतात. इतर लोक आसक्तीनें व्यवहार करतात; पण हे ब्रह्मनिष्ठ लोक अनासक्तीनें सर्व व्यवहार करतात. इतरांचा व्यवहार व पूर्ण पुरुषांचा व्यवहार यांत हा भेद आहे.

सहजस्वभाव–इतरांनीं नियम पाळून प्रयत्नानें धर्माचरण करावयाचें असतें, पण ब्रह्मनिष्ठांचें सहजा-सहजीं निजस्वभाव म्हणूनच जें आचरण घडतें, तेंच परिशुद्ध असतें, निर्दोष असतें. ब्रह्मज्ञानी हा शुद्ध–बुद्ध –मुक्तस्वभाव असतो. हा त्याचा स्वभावच असल्या-मुळें त्याच्याकडून जें घडतें, तें निर्दोष आचरण घडतें. ही मनाची पूर्णता होय. ब्रह्मप्राप्ति म्हणजे पूर्णतेची सिद्धि होय.

वेलदोडे:–थंड गुणधर्माचा मसाल्याचा पदार्थ. कांहीं-जण याला वेलची म्हणतात. संस्कृतमध्यें याला 'एला' म्हणतात. पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानांत व ब्रह्मदेश नि सिलोन या भागांत ही वस्तु मिळते. याच्या पिकास सर्द जमीन व थंड हवा लागते. वेलदोड्याच्या झाडांच्या मुळाचे तुकडे लावून अथवा बियांपासून रोपें करून त्यांची लागण करतात.

लागण करण्याच्या वेळा दोन. एक मार्च–एप्रिल व दुसरी सप्टेंबर–आक्टोबर. याचीं झाडें बोरूसारखीं सुमारें पांच फूट उंच वाढतात. कायम जागीं लावल्यावर एक वर्षानें जमिनीजवळच बुंध्यावर त्याला ताण फुटतात व त्यावर फुलें येतात. नंतर वेलदोडे लागतात. हे काढण्यासारखे होण्याचा काळ सप्टेंबर–ऑक्टोबर हा असतो. ते एकदम तयार होत नाहींत.

जसजसे होतील तसतसे ते काढावयाचे असतात. याची वेचणी तीन महिने चालते. झाडामागें ३–४ तोळे वेलदोडे निघतात. याचा खप हिंदुस्थानांत फारच होतो. ग्रेट ब्रिटन, जर्मनी, अरबस्थान, इजिप्त व आशियांतला तुर्कस्तान या देशांतहि याचा खप होत असतो.

वेल्स, हर्बर्ट जॉर्ज (१८६६–   ):–या ब्रिटिश कादंबरीकाराचा जन्म केन्ट परगण्यांतील ब्रोम्ले गांवीं २१ सप्टेंबर १८६६ रोजीं झाला. त्याचा बाप धंदेवाइक क्रिके-टर होता. त्यानें शास्त्रीय विषयाचा अभ्यास केला. १८८८ सालीं 'प्राणी-शास्त्र' हा विषय घेऊन तो लंडन विद्यापीठाची बी. ए.ची परीक्षा माना-सहित पास झाला. १८९३ सालीं वृत्तपत्र-व्यवसायांत व साहित्य-क्षेत्रांत त्यानें पदार्पण केलें. 'Nature' व 'Saturday Review' या नियतकालिकांत तो लेख लिही. 'Select Conversations with an Uncle' हा त्याचा ग्रंथ १८९५ सालीं प्रसिद्ध झाला. त्यानें पुष्कळ कादंबऱ्या तर लिहिल्याच, पण त्याशिवाय समाजसत्तावाद, राज्य-शास्त्र, इतिहास वगैरे अनेक विषयांवर आपली लेखणी झिजविली. परंतु त्याच्या कोणत्या लिखाणानें त्याला कीर्ति मिळवून दिली असेल तर ती त्याच्या कादंबऱ्यांनींच.



एच्. जी. वेल्स

त्याच्या 'Time Machine' या कादंबरींत, तसेंच 'The Invisible Man' व 'The War of the Worlds' या कादंबऱ्यांत त्यानें शास्त्रीय ज्ञानाच्या विकासानें मानवी जीवनांत अनेक बाजूंनीं होणाऱ्या स्थित्यंतराची एखाद्या भविष्यवाद्याप्रमाणें चित्रें रेखा-

टलीं आहेत. In Love, Mr. Lewisham, Kipps, Polly या कादंबऱ्यांत त्याचें सूक्ष्म निरीक्षण व वैचारिक मौलिकता हीं दिसून येतात. 'Research Magnificient' व 'the Passionate Friends' यांत त्याच्या समाजसत्तावादी मताचें प्रतिबिंब पडलें आहे. 'Tono Bungay' ही कादंबरी अप्रतिम व्यक्तिदर्शनाविषयीं प्रसिद्ध आहे. त्याचीं कांहीं इतर पुस्तकें:—The outline of History; The Science of Life; The Work, Wealth and Happiness of Mankind, Experiments in Autobiography, A Short History of the World, Travels of a Republican Radical, Things to Come, Rights of Man.

वैद्य, चिंतामण विनायक (१८६१–१९३८):—साहित्यिक, संशोधक व निबंधकार. कल्याणला १८६१ त जन्म. मुंबईच्या एल्फिन्स्टन व्हायस्कूल व कॉलेजांत शिक्षण. बी. ए. १८८० त, १८८२ त एम. ए. व एल्एल्. बी. १८८४ सालीं झाले. थोडा काळ यांनीं पुण्याला वकिली केली. नंतर उज्जयनीला १८८७ मध्यें प्रांतिक न्यायाधिश. ग्वाल्हेर येथें १८९६–१९०६ पावेतों त्यांनीं सरन्यायाधिशाचें काम केलें. नंतर पुष्कळ वर्षे हे लो. टिळकांच्याबरोबर राष्ट्रीय सभेचें कार्य करीत असत. याशिवाय ग्रन्थलेखनाचें कार्य चालू होतेंच. ग्रंथ इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषेंत लिहिले आहेत. मराठी ग्रंथांत रामकृष्णांचीं चरित्रें, मध्ययुगीन भारत, महाभारताचे (यंदेशेटनीं प्रसिद्धिलेल्या) ८–९ खंडांचें संपादन, महाभारताचा उपसंहार, दुर्दैवी रंगू (कादंबरी) हे प्रमुख होत. इंग्रजींत Riddle of the Ramayan, History of the Mediaeval Hindu India, History of Sanskrit Literature, Vedic Period इत्यादि. हे २० एप्रिल १९३८ ला वारले.

वैशंपायन:—संपूर्ण यजुर्वेद मिळविणारा व्यासांचा शिष्य. विशंपाचा वंशज म्हणून यास वैशंपायन म्हणतात. व्यासानें यास चार वेदांपैकीं संपूर्ण यजुर्वेद दिला. यानें त्याच्या ८६ शाखा करून त्या प्रत्येकास एकेक याप्रमाणें आपल्या शिष्यांना देऊन टाकल्या.

एकदां सर्व ऋषिगणांनीं नियम केला कीं, आज जो मेरूपर्वतावर सभेस येणार नाहीं त्याच्या हातून सात दिवसांत ब्रह्महत्त्या घडेल. हा नियम मोडल्यामुळें वैशंपायनाच्या हातून ब्रह्महत्त्या घडली. या ब्रह्महत्त्येपायीं गुरुशिष्यांत वांकडें आलें म्हणून याज्ञवल्क्यानें याची विद्या परत केली. वैशंपायनानें ८६ शाखांचे पुनः तीन भाग केले. यानें जनमेजयास महाभारत सांगितलें होतें. हा जनमेजयाचा मित्र होता. जनमेजयानें अश्वमेध सुरू केला तेव्हां याचें व जनमेजयाचें वांकडे आलें व तंटा झाला.

वैशेषिक दर्शन:—सुप्रसिद्ध षड्दर्शनांपैकीं एक. हें कणाद नामक मुनीनें रचिलें आहे. याची रचना दोन हजार वर्षांपूर्वी झालेली असावी असा विद्वानांचा कयास आहे. यांत अणुपरमाणुविचार हा मुख्य भाग असल्यामुळें याच्या कर्त्याला कणाद म्हणजे 'कणभक्षक' असें लाक्षणिक नांव पडलें असावें. अणुपरमाणूंच्या सिद्धान्ताचा विचार न्यायदर्शनांतहि केलेला आहे; पण वैशेषिक दर्शनांत हा विचार अधिक सूक्ष्मरीतीनें व विस्तारानें केलेला आहे. म्हणून अणुपरमाणु सिद्धांतविचार व सृष्टीच्या मूलभूत पदार्थांचें वर्गीकरण हेंच या दर्शनाचें वैशिष्ट्य आहे. यावरून "या दर्शनांतील अणुपरमाणु सिद्धांत, एका पदार्थापासून दुसऱ्या पदार्थाचा भेद दाखविण्याची प्रवृत्ति व लक्षणांचा स्वतंत्रपणा, या गोष्टींवरून 'वैशेषिक' हें नांव पडलें असल्याचा अधिक संभव वाटतो" हें श्रीयुत न. चिं. केळकर यांनीं आपल्या 'भारतीय तत्त्वज्ञान' या ग्रंथांत व्यक्त केलेलें मत योग्य दिसतें.

या दर्शनाचे एकंदर १० अध्याय असून त्यांत ३७० सूत्रें आहेत. या दर्शनांतील विषयाचा सारांश पुढीलप्रमाणें—ज्याच्यापासून अभ्युदय होतो व निःश्रेयस म्हणजे मोक्ष मिळतो तो धर्म. निःश्रेयसाची प्राप्ती तत्त्वज्ञानामुळें होते. आत्मसाक्षात्कार हें मोक्षप्राप्तीचें प्रमुख साधन होय. देहात्मवाद नाहींसा केल्यानें मोक्ष मिळतो. श्रवण, मनन, निदिध्यास, आसन, प्राणायाम, शम, दम, योगाभ्यास वगैरे गोष्टींच्या योगानें देह हाच आत्मा आहे ही भावना नाहींशी होते; त्यानंतर आत्मसाक्षात्कार होऊन मोक्ष मिळतो.

पदार्थ हे केवळ विचारात्मक नसून वस्तुसत्यरूप आहेत. याचा अर्थ असा कीं, विचाराहून स्वतंत्र असें पदार्थांचें अस्तित्व असूं शकतें. प्रथम पदार्थ व नंतर विचार असा क्रम आहे. विश्वामधील पदार्थांचे द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष व समवाय असे सहा वर्ग मानिले आहेत. कित्येक पंडितांच्या मतें 'अभाव' हाहि वैशेषिकांनीं मानलेला सातवा पदार्थ होय. वैशेषिकांच्या मतें द्रव्यें म्हणजे अंतिम तत्त्वें, हीं नऊ आहेत. पृथ्वी,

पाणी, तेज, वायु, आकाश, काल, दिक्,आत्मा व मन हीं तीं द्रव्यें होत. गुणांचे प्रकार चोवीस, कर्माचे पांच व सामान्याचे दोन प्रकार आहेत.विशेष अनंत प्रकारचे आहेत. समवाय हा एकच मानलेला आहे. सृष्टीची रचना सूक्ष्म परमाणूपासून झाली आहे. परमाणू अविनाशी आहे. परमाणू पूर्वी कांहीं नव्हते. त्यांच्यापासून होणारा परिणाम अनित्य असतो. वैशेषिक तत्त्वज्ञान द्वैती आहे. वैशेषिकांना 'आरंभवाद' मान्य आहे. वैशेषिक 'प्रत्यक्ष, अनुमान व शाब्द' हीं तीनच प्रमाणें मानतात. त्यांच्या मतें 'उपमान' हें प्रमाण अनुमानांत अंतर्भूत होतें.

वंशः-मानवांचे अनेक वंश आहेत. एखाद्या विशिष्ट वंशाचे अमूक एक गुणावगुण आहेत व तें त्यांचेंच वैशिष्ट्य आहे असें निश्चयानें सांगतां येणार नाहीं. जे निरनिराळे मानवी वंश कल्पिले आहेत ते शरीररचना व वर्ण यांवर आधारलेले आहेत. वंशांच्या वर्गीकरणाच्या बाबतींत शास्त्रज्ञांचेंहि एक निश्चित मत नाहीं. ब्लूमेंबाख या शास्त्रज्ञानें पांच वंश कल्पिले आहेत. ते असेः-१ कॉकेशियन अथवा गोरे, २ मंगोलियन अथवा पीतवर्णीय, ३ मलाय अथवा ताम्रवर्णीय, ४ नीग्रो अथवा काळे, ५ अमेरिकन अथवा रक्तवर्णीय. याशिवाय डेनिकर या शास्त्रज्ञानें केंस व कवटीची ठेवण या तीन गोष्टी लक्षांत घेऊन एकूण मुख्य सहा वंश समजून त्यांचे पोटभेद मिळून एकूण २९ मानवी वंश आहेत असें दाखविलें आहे. त्याचे मुख्य सहा वंश आहेत ते असे-(१) रुंद नाकाचे व लोंकरीसारख्या केंसांचे (यांत नीग्रो व बुशमन हे लोक येतात), (२) कुरळ्या केंसांचे (ऑस्ट्रेलियन, द्रविडियन इ.), (३) पिंगट किंवा काळ्या व लांब केंसांचे व काळ्या डोळ्यांचे (यांत पश्चिम युरोपांतील लोक, अरब, बर्बर व इंडो-अफगाण हे येतात.), (४) फिकट रंगाच्या डोळ्यांचे व सडक केंसांचे (यांत उत्तर व पूर्व युरोपांतील लोक येतात), (५) लांबसडक केंसांचे व डोळ्यांचा रंग गर्द असलेले (यांत दक्षिण अमेरिकेंतील लोक व पॉलिनेशियन लोक येतात), (६) सरळ व राठ केंसांचे (तुर्क, एस्किमो इ.).

अगदीं प्रथम अमूक एक मानववंश या पृथ्वीतलावर अवतरला असें निश्चयानें सांगण्याला आज कांहीं पुरावा उपलब्ध नाहीं. तसेंच आज अमूक एक मानववंश निर्भेळ असा अमूक ठिकाणीं सांपडेल असेंहि सांगणें सोपें नाहीं. कांहीं ठिकाणीं उदा. एखाद्या समुद्राच्या किनाऱ्याभोंवतीं, किंवा डोंगरांतून ज्या कांहीं जमाती आरंभीं एकत्र घर करून राहिल्या त्यांच्यावर भोंवतालच्या परिस्थितीनुसार पुष्कळ परिणाम झाले व निरनिराळे गुणावगुण त्यांच्यांत निर्माण झाले. नंतर दुसऱ्या एखाद्या जमातीनें त्यांना जिंकून त्यांच्याशीं बेटीव्यवहार करावा व त्यामुळें शारीरिक ठेवण, वर्ण व गुणावगुण यांची भेसळ होऊन पुढील पिढ्या निर्माण व्हाव्या अशीच स्थिति सर्व जगभर झालेली आढळून येते. शुद्ध व समानधर्मीय रक्तामुळें विशिष्ट गुण पिढ्यान्‌पिढ्या एखाद्या जातींत आढळून येतात हें आपण पाहतों याच तत्त्वावर हिटलरची ज्यूविरोधी मोहीम होती.

हिंदुस्थानांत सध्यां जे लोक आहेत ते व त्यांचे वंश पुढें दिल्याप्रमाणें आहेत. हिंदुस्थानांत मुख्यतः तीन वंश आहेत. १ आर्य, २ द्रवीड, ३ मंगोली. यांत पुढील उपभेद आहेत. १ इंडो-आर्यन, २ आर्यन-द्रवीडियन, ३ द्रवीडियन, ४ सीथो-द्रवीडियन, ५ तुर्की-इराणी, ६ मंगोली, ७ मंगोली-द्रवीड. १ इंडो-आर्यन वंश-यांत जाट, रजपूत, पंजाबांतील खत्री व काश्मिरी लोक येतात, २ आर्य-द्रवीड वंश-संयुक्त प्रांत व बिहारमधील लोक, ३ द्रवीड-हे मूळचे हिंदुस्थानांतील लोक होत. मद्रास, छोटा नागपूर, मध्यप्रांत व हैद्राबाद (दक्षिण) या प्रांतांत हे लोक आहेत. ४ सीथो-द्रवीड वंश-यांत महाराष्ट्रांतील ब्राह्मण, मराठे, कुणबी व कुर्ग प्रांतांतील लोक येतात. ५ तुर्की-इराणी वंश-बलुची, वायव्य सरहद्दीवरील पठाण व अफगाण लोक येतात. ६ मंगोली-नेपाळ, आसाम व ब्रह्मदेश यांतील लोक येतात. ७ मंगोली-द्रवीड अथवा बंगाली-यांत बंगाली ब्राह्मण, कायस्थ, पूर्व बंगाल्यांतील मुसलमान हे येतात. यांपैकीं कांहीं वरच्या जातींत इंडो-आर्यन रक्त मिसळलेलें आहे.

वॅट, जेम्स-(१७३६-१८१९):-इंग्लिश संशोधक. याचा जन्म १९ जानेवारी १७३६ रोजीं ग्रीनॉक येथें झाला. १७५४ मध्यें हा ग्लासगो येथें गेला. तेथें कांहीं दिवसांनीं त्याला गणिताला लागणारीं उपकरणें तयार करण्याची तेथील विद्यापीठांत नोकरी मिळाली. पुढें यानें अनेक प्रयोग करून वाफेच्या इंजिनमध्यें क्रांति केली. या सर्वांत विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे

वाफेच्या इंजिनमध्यें सध्यां गव्हर्नर (नियंत्रक) म्हणून ओळखला जाणारा अत्यावश्यक भाग त्यानें शोधून काढला ही होय. १७७४ मध्यें त्यानें व मॅथ्यू बोल्टन या दोघांनीं मिळून न्यूकमच्या 'पंपिंग इंजिन'पेक्षां श्रेष्ठ दर्जाचें वाफेचें इंजिन तयार केलें. १७६३ ते १७७४ पर्यंत त्यानें कालवे खोदणें व बंदरें बांधणें यासंबंधींच्या योजनाही आंखल्या होत्या. आगबोटींना गति मिळण्यासाठीं असणारा पंखा (Screw propeller), पाण्याचें विशिष्टगुरुत्व चटकन् दाखविणारें उपकरण, लेटर कॉपिइंग प्रेससाठीं शाई व पाण्याच्या पृथक्करणाचा शोध यानेंच लावला. १८१९ मध्यें तो मेला.

वॅलेस बेरी (१८८९-):—अमेरिकन सिनेमा नट. याचा जन्म कॅन्सस शहरीं १ एप्रिल १८८९ रोजीं झाला. कॅन्सस शहरीं वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत शिक्षण घेऊन रिंगलिंग सर्कसमध्यें तो शिरला.



वॅलेस बेरी

कांहीं दिवस काढल्यावर तो १९०४ मध्यें न्यूयॉर्क शहरीं निरनिराळ्या नाटक कंपन्यांतर्फे होणाऱ्या नाटिकांतून गायक म्हणून राहिला. याप्रमाणेंच १९१४ पर्यंत निरनिराळ्या कंपन्यांतून काम करून तो युनिव्हर्सल फिल्मकंपनींत हजर झाला. आरंभीं कांहीं दिवस 'टू रीलर' चित्रपटांतून विनोदी भूमिका यानें केल्या. १९१७च्या सुमारास तो स्वतःची कंपनी काढून जपानमध्यें चित्रपट काढण्यासाठीं गेला. पण महायुद्धानंतर आपली कंपनी मोडून तो हॉलिवुडला परतला व खलनायकांच्या भूमिका करण्यास त्यानें सुरवात केली. बोलपट सुरू झाल्यावर त्यानें नायकाच्या भूमिका करण्यास सुरवात केली व त्यांतहि त्यानें असामान्य यश मिळविलें आहे.

"Behind the Door, The Spanish Dancer, The Devil's Cargo, Fireman, Save my Child, Partners in Crime (मूकपट) व Hell Divers, Flesh, Tugboat Annie, China Seas, Viva Villa, A Message to Garcia" हे त्याचे बोलपट सर्वत्र विशेष आवडले.

त्याच्या शब्दोच्चाराच्या लकबी, डोळे किलकिले करून व वारंवार तोंडावरून हात फिरवून एका प्रकारचें गांभीर्य निर्माण करण्याची हातोटी व चुटचुटीत हालचाल हे त्याच्या अभिनयाचे विशेष आहेत.

वॉशिंग्टन, जॉर्ज (१७३२–१७९९):—अमेरिकेचा पहिला अध्यक्ष. याचा व्हर्जिनिया संस्थानांतील ब्रिजेस क्रीक या गांवीं २२ फेब्रुवारी १७३२ रोजीं जन्म झाला. बापाची इस्टेट जरी मोठी होती तरी तो मेला त्यावेळीं त्यानें प्रत्यक्ष पैसा असा कांहीं ठेवला नव्हता. यावेळीं जॉर्जचें वय फक्त अकरा वर्षांचें होतें. शिक्षण विशेष झालेंच नव्हतें. पण त्याचें गणित चांगलें असल्यामुळें वयाच्या सोळाव्या वर्षी लॉर्ड फेअरफॅक्सच्या शेतीवर मोजणीदार म्हणून त्याला नोकरी मिळाली. १७५२मध्यें त्याचा सावत्र भाऊ लॉरेन्स हा वारल्यावर माउंट व्हर्नान येथील इस्टेटीचा तो तंबाखूच्या मळ्यांचा एकटा मालक बनला.

१७५३व१७५८मध्यें फ्रेंच व इंडियन युद्धांत त्यानें लष्करी नोकरी केली. तो व्हर्जिनिया पलटणीचा कमांडर बनला होता व डुके किल्ल्यावर त्यानें चाल केली होती. १७७४ च्या पहिल्या कॉन्स्टिट्यूशनल कॉंग्रेसचा तो एक प्रतिनिधि होता. नंतर इंग्लंडविरुद्ध अमेरिकन वसाहतींनीं स्वातंत्र्ययुद्ध पुकारलें व तो १७७५ मध्यें वसाहतींच्या सैन्याचा मुख्य सेनापती झाला. बोस्टन, ट्रेन्टन व प्रिन्स्टन येथील हल्ल्यांत त्याला जय मिळाला. २५ डिसें. १७७६ मध्यें डिलवेर नदी ओलांडण्यांत त्यानें शौर्य गाजविलें. पुढें ब्रॅंडीवाइन क्रीक येथें १७७७मध्यें त्याचा पराभव झाला, मॉनमाउथ येथें १७७८ मध्यें लढाईचा निकाल न लावतांच त्यानें माघार घेतली. पण १७८१ मध्यें त्यानें इंग्लिश सेनापती कॉर्नवॉलिस यास यॉर्कटाऊन येथें घेरून शरण यावयास लावलें व अखेरीस विजयी झाला. व्हर्जिनियाचा प्रतिनिधि म्हणून फेडरल कन्व्हेन्शनचा तो अध्यक्ष होता. पुढें १७८९ मध्यें अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा अध्यक्ष (पहिला) म्हणून त्याला निवडण्यांत आलें. सावधपणा व श्रम करण्याची तयारी हे त्याचे मुख्य गुण होते. १७९२ मध्यें त्याला त्याच्या इच्छेविरुद्ध पुन्हां अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आलें. १७९७ मध्यें तो सेवानिवृत्त झाला व आपल्या जमीनजुमल्याच्या ठिकाणीं विश्रांति-

साठीं परतला, व तेथेंच (माउंट व्हर्नान) १९ डिसेंबर १७९९ रोजीं मरण पावला. त्यानें ६ जानेवारी १७५९ रोजीं मार्था डान्ड्रिज कस्टिस हिच्याशीं विवाह केला. मार्था १८०२ मध्यें मेली. वॉशिंग्टनला मूल झालें नव्हतें.

वॉशिंग्टन, बुकर टी (१८५८–१९१५):–हा अमेरिकन शिक्षणतज्ञ. जातीनें निग्रो होता. त्याचा जन्म गुलामाच्या कुळांत झाला. अमेरिकेंतील दक्षिणेकडील संस्थानें व उत्तरेकडील संस्थानें यांच्यामधील यादवीचा शेवट होईपर्यंत याला गुलामगिरींतच खिचपत पडावें लागलें. गुलामगिरींतून मुक्त झाल्यावर कांहीं दिवस मिठागारांत व कांहीं दिवस कोळशाच्या खाणींत काम करून त्यानें आपली उपजीविका चालविली. याच मुदतींत त्यानें रात्रीच्या शाळेंत जाऊन आपलें प्राथमिक शिक्षण संपविलें. पुढें त्यानें अम्पटन नॉर्मल व अग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट या दोन संस्थांत मिळून तीन वर्षें अभ्यास केला. त्यानंतर त्यानें वेलँड सेमिनरी या वॉशिंग्टन येथील शिक्षणसंस्थेंतील अभ्यासक्रम पुरा केला. त्यानंतर तो हॅम्पटन येथें शिक्षक झाला. शिक्षणक्षेत्रांत त्यानें अभिनंदनीय यश मिळविलें. १८८१ सालीं त्यानें टस्केजी येथें एक शिक्षणसंस्था स्थापिली. या संस्थेची सुरवात एका जुन्यापुराण्या इमारतींत झाली. प्रारंभीं फक्त ३० विद्यार्थी होते. त्यानें अहर्निश झटून ती संस्था नांवारूपाला आणली. ती संस्था 'टस्कजी नॉर्मल अँड इंडस्ट्रियल इन्टिट्यूट' या नांवानें आज जगप्रसिद्ध झाली आहे. त्यानें आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे. तें अत्यंत मनोरंजक व स्फूर्तिप्रद आहे.

व्यासः–पराशर व सत्यवती यांचा मुलगा. याचा जन्म यमुनाद्वीपांत झाला. हा द्वीपांत जन्मला म्हणून यास 'द्वैपायन' म्हणतात. याला कृष्णद्वैपायन,बादरायण, पुराणप्रवक्ता, पाराशर या नांवानींहि ओळखतात. प्रत्येक द्वापरांत एकेक व्यास उत्पन्न होतो. त्याप्रमाणें सध्यां वैवस्वत मन्वंतरांत कृष्णद्वैपायन हा अठ्ठाविसावा व्यास आहे.

व्यासानें सूत व शुक यांना पुराणांचा उपदेश केला होता. नारदाच्या उपदेशावरून यानें भागवत रचिलें. नारदानें व्यासाला पुराणसंहिता सांगितल्या. ब्रह्मकुंडाजवळ सरस्वतीमध्यें स्नान केल्यामुळें याला पुराणादिकांचें ज्ञान झालें. यानें सतरा पुराणें केलीं तरी त्यास समाधान होईना, म्हणून यानें नारदाच्या आज्ञेवरून भागवत रचून तें सुतास पढविलें. यानें जातुकर्ण्यापासून धर्मशिक्षण घेऊन भारत तयार केलें. वेदांच्या शाखा घेऊन अठरा पुराणें केलीं. वेदविभागामुळें याला गर्व झाला व पुराणें तयार करण्याच्या तयारींत असतां गणेशस्मरण केलें नाहीं म्हणून चित्तांत भ्रांति उत्पन्न झाली. शेवटीं हा ब्रह्मदेवाकडे गेला. ब्रह्मदेवानें यास मंत्रोपासना व गणेशपुराण देऊन गणेशास उद्देशून तप करण्यास सांगितलें. याप्रमाणें यानें करतांच पुराणरचनेचें काम पार पडलें. यानें अठरा पुराणें व आठ व्याकरणें केलीं. वसिष्ठकुलांत व्यास होऊन गेला असें दिलें आहे.

एकदां याला गृहस्थाश्रमी व्हावें असें वाटल्यावरून यानें जाबाली ऋषीच्या वटिका मुलीशीं विवाह केला. तिचे ठिकाणीं याला शुक नांवाचा मुलगा झाला. शुक सदेह स्वर्गास गेल्यावर हा शोकानें आक्रोश करूं लागला. तेव्हां रुद्रानें येऊन त्याचें सांत्वन केलें व सांगितलें कीं, शुकाची छाया तुला सर्वत्र दिसेल. यानें धृतराष्ट्रादिकांस मृतदर्शन करविलें होतें. यानें आपल्या मातेच्या आज्ञेवरून धृतराष्ट्र, पंडू व विदुर यांस उत्पन्न केलें.

व्यासापासून वैशंपायनानें यजुर्वेद मिळविला. तसेंच जैमिनीनें व्यासाकडून सामवेद मिळविला, आणि अथर्ववेदाचा कर्ता व्यासाचा शिष्य सुमतु हा होय. व्यासानें पुराणसंहिता रोमहर्षणास दिल्या.

व्यास, नारायण गणेश (१९०२–   ):–प्रसिद्ध गायक. कोल्हापुरला १९०२ मध्यें यांचा जन्म झाला. १९१३ ते १९२२ अखेर गांधर्व महाविद्यालयांत (कै. पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांनीं स्थापलेल्या) यांनीं शिक्षण घेतलें. यांना मुंबईचे गव्हर्नरांच्याकडून १९२१ ला 'सुवर्णपदक' व 'प्रमाणपत्र' यांची प्राप्ति झाली.

अहमदाबादला १९२७ पर्यंत संगीताची सेवा करून ते परत मुंबईला आले. १९२९ त यांच्या प्रथम ध्वनिमुद्रिका प्रकाशित झाल्या. यांना १९३१ पासून गायनांचीं आमंत्रणें परप्रांतांतून येऊं लागलीं. कानपूर व अलाहाबाद येथें भरलेल्या अखिलभारतीय संगीतपरीषदांत त्यांचा गौरव केला. अलाहाबाद विश्वविद्यालयाकडून यांना संगीत विभागाचे परीक्षक नेमण्यांत आलें.

होते. १९३८ त यांनीं 'व्यास ॲकेडमी ऑफ म्युझिक' ही संस्था संगीताच्या प्रसारार्थ स्थापली.

मधुर, जोरदार व स्पष्ट आवाज, वैशिष्ट्यपूर्ण व कमालीची फिरत असलेली तान, खानदानी व परंपरागत ढंगाचें गीतभावदर्शक व नाटकी पद्धतीचेंहि आवश्यक तितकें मिश्रण या साधनांनीं यांचें गायन सर्वांना आकर्षक वाटतें.

व्रत—एका विशिष्ट पद्धतीनें आचरण—कायिक व मानसिक—करणें म्हणजे व्रत होय. हिंदूधर्मांत व्रतें हीं शारीरिक व मानसिक शुद्धीसाठीं म्हणून आरंभीं आलीं; पण अलीकडे व्रतांचा साध्यासाठींच उपयोग केला जातो. कांहीं व्रतें केवळ रूढींनीं निर्माण झालेलीं आहेत. एखाद्या पौराणिक कथेपासून निर्माण झालेलींहि अनेक व्रतें आहेत. उदा. पिठोरी अमावस्या. प्रत्येक व्रताला मिळालेल्या नांवामागें एखादी पौराणिक व्यक्ति, देवता किंवा कथा आहे. व्रतांच्यामुळें मनांतील हेतू साध्य होतातच असें म्हणणें धाडसाचें आहे. उदा. पिठोरी आमावास्येच्या व्रतानें देवकीला झालेल्या मृत मुलांच्या दर्शनाप्रमाणें आजच्या कालांतील एखाद्या देवकीला आपल्या मृत मुलाचें दर्शन झालेलें ऐकिवांत नाहीं. तरी पण निदान असलेलीं मुलें या व्रतानें मरणार नाहींत व होणारीं जगावींत हीच इच्छा अशा व्रतांमागें आज शिल्लक राहिलेली आहे. सर्व व्रतांच्या आचरणांत उपवास, शारीरिक स्वच्छता व सात्त्विक मंत्र व कथा यांचें श्रवण यांवरच भर असतो.

एकादशा, महाशिवरात्र, संकष्टी, कोकिलाव्रत, पिठोरी आमावास्या, अनंत चतुर्दशी, वटसावित्री, नवरात्र, ऋषीपंचमी, हरितालिका, सोळा सोमवार हीं प्रमुख व्रतें आहेत. याशिवाय कांहीं विशिष्ट हेतुसिध्यर्थ परंपरेनें चालत आलेलीं अनेक व्रतें सांगितलेलीं आहेत.

व्हर्जिल:—(खि.पू.७०—१९) इसवी सनापूर्वी होऊन गेलेला रोमचा राष्ट्रीय कवि. त्याचें पूर्ण नांव पब्लिअस व्हर्जिलियस मॅरो. याचा जन्म मांटुआ शेजारीं इसवी सनापूर्वी७०व्या वर्षी ऑक्टोबरच्या १५ तारखेस झाला. हा एकवीस वर्षांचा असतांना तो इटलींतील ज्या प्रान्तांत जन्मला त्या प्रान्तांतील लोकांना रोमन नागरिकत्वाचे पूर्ण हक्क मिळाले; त्यापूर्वी त्यांना ते हक्क नव्हते. व्हर्जिलच्या बापाच्या सामाजिक दर्जाविषयीं निश्चित माहिती सांपडत नाहीं. कांहींच्या मतें तो कुंभार होता. कांहींच्या मतें तो मॅगस नामक गृहस्थाचा नोकर होता व त्यानें आपल्या धन्याच्या मुलीशीं लग्न केलें. तो केल्टिकवंशीय होता असें विद्वानांचें अनुमान आहे. त्याच्या लिखाणांतील हळवेपणा व विषण्णता यांवरून हें अनुमान दृढ होतें. व्हर्जिलचें शिक्षण क्रेमोना, मिलान व नेपल्स येथें झालें. त्यानें ग्रीक व रोमन भाषा, अलंकारशास्त्र, तत्त्वज्ञान, गणितशास्त्र, वैद्यक यांचा चांगला अभ्यास केला. हा अगदीं तरुण असतांच त्याचे आईबाप निवर्तले. त्यानें काव्यलेखनाला लहान वयांतच सुरवात केली. इसवीसनापूर्वी १९व्या वर्षी (२२सप्टेंबर) व्हर्जिल मृत्यु पावला.

व्हर्जिलचीं काव्यें—(१) दहा ग्रामीण गीतें. ही थिओक्रिटसच्या पशुपालनादिविषयक लघुकाव्याच्या धर्तीवर लिहिलीं आहेत. यांतील कांहीं कवितांत त्याच्या चरित्राचें प्रतिबिंब पडलें आहे. (२) 'Georgies' हें उपदेशपर काव्य ओजस्वी व सफाईदार आहे. या काव्याचा विषय कृषिकर्म, पशुसंवर्धन यासारखा असला तरी त्याचा हेतु या विषयांची निश्चित माहिती देणें हा नाहीं. श्रमाची महती गाणें व ग्रामीण जीवनाची नागरीक जीवनाहूनची श्रेष्ठता पटवून देणें हाच या काव्याचा हेतू. उच्च दर्जाच्या देशाभिमानाच्या सुगंधानें हें काव्य दरवळलें आहे. उच्च विचार व निर्दोष रचना यांमुळें हें काव्य फार प्रसिद्ध आहे. (३) 'Aneid' या महाकाव्यामुळेंच व्हर्जिलची इटलीचा राष्ट्रीय कवि म्हणून कीर्ति झाली. हें महाकाव्य व्हर्जिलनें ऑगस्टस राजाच्या विनंतीवरून लिहावयास घेतलें. याचे बारा सर्ग आहेत. हें काव्य त्यानें अकरा वर्षांत पुरें केलें; त्यावर सफाईचा हात फिरवून तें निर्दोष करण्याची त्याची इच्छा होती; परंतु त्याच्या मृत्यूमुळें ती तशीच राहिली. तें तशा स्थितींत प्रसिद्ध होऊं नये अशी त्याची शेवटची इच्छा होती; पण त्याच्या या इच्छेविरुद्ध ऑगस्टसनें तें प्रसिद्ध केलें. हें काव्य संपूर्णतया निर्दोष नसलें तरी त्यांत काव्यदृष्ट्या भव्य व उदात्त अशीं बरींच स्थळें आहेत.

याशिवाय व्हर्जिलनें कांहीं लहान लहान कविता लिहिल्या असाव्यात. त्याच्या नांवावर Culex, Moretum, Copra इत्यादि कविता प्रसिद्ध आहेत; परंतु त्या खरोखरीच त्यानें लिहिल्यांत कीं काय याविषयीं शंका आहे.

व्हॉल्टेअर (१६९४—१७७८):-फ्रेंच लेखक, नाटककार व तत्त्वज्ञानी. याचा जन्म २४ नोव्हेंबर

१६९४ रोजीं पॅरिसमध्यें झाला. त्याचें शिक्षण जेसुइटांनीं केलें. त्याचें खरें नांव जीन फ्रेन्कॉइ मारी ॲरो डी असें होतें; पण त्यानें तें टाकून २१ व्या वर्षी व्हॉल्टेअर हें नांव घेतलें. १७१८मध्यें Oepidus ही दुःखान्तिका प्रसिद्ध केली. लौकरच तो साहित्यक्षेत्रांत प्रसिद्धीस आला. १७२६ मध्यें तो इंग्लंडला गेला होता. कांहीं वर्षांनीं तो परत फ्रान्सला आला व बर्लिनला गेला. तेथें दुसऱ्या फ्रेडरिकचा मित्र व सल्लागार म्हणून कांहीं दिवस होता. लौकरच त्याच्याशीं भांडून तो परत आला. नंतरचें उर्वरित आयुष्य त्यानें फर्ने येथें घालविलें. तो १७७८ मध्यें मेला.

त्याच्या नाटकांत Zaire, Merope व Mohamet हीं प्रख्यात आहेत. त्याच्या ऐतिहासिक ग्रंथांत Charles XII, Luis XIV, कथावाङ्मयांत Candide व Zadig व La Henriade हें महाकाव्य हे ग्रंथ विशेष महत्त्वाचे आहेत.

व्हाल्टेअरनें काव्य, नाटक, कादंबरी, तत्त्वज्ञान या क्षेत्रांत विपुल साहित्य निर्माण केलें. परंतु यांपैकीं कोणत्याहि क्षेत्रांत अमर अशी कलाकृति त्यानें निर्माण केली नाहीं. त्यानें यशस्वी नाटकें लिहिलीं, परंतु नामवंत नाटककारांच्या श्रेणींत त्याला स्थान नाहीं. त्याचे ऐतिहासिक विषयावरील लेख चटकदार व वाचनीय असले तरी त्याला प्रथितयश इतिहासकार म्हणतां यावयाचें नाहीं. त्याच्या एकंदर लिखाणावरून त्याला विध्वंसक टीकाकार म्हणतां येईल. जीर्ण रूढी, जुन्या धर्मसंस्था, धर्मवेड याविरुद्ध बंड पुकारून त्यानें त्यांवर आपल्या लिखाणांत चौफेर हल्ला चढविला. आपल्या क्रांतिकारक विचारसरणीचा प्रसार करून पुढें होणाऱ्या फ्रेंच राज्यक्रांतीची पूर्वतयारी त्यानें केली.

व्हिक्टोरिया (१८१९–१९०१):–इंग्लंडचे सांप्रतचे राजे व हिंदुस्थानचे सम्राट् सहावे जॉर्ज यांच्या पणजी व ख्रिस्तवासी पंचम जॉर्ज यांच्या आजी. यांचा जन्म केनसिंगटन् पॅलेसमध्यें २४ मे १८१९ रोजीं झाला. तिसऱ्या जॉर्जचे चौथे चिरंजीव ड्यूक ऑफ केंट हे त्यांचे वडील. वयाच्या अगदीं लहानपणीं म्हणजे त्या आठ महिन्यांच्या असतांना त्यांचे वडील निवर्तले. आईनें त्यांना काळजीपूर्वक शिक्षण दिलें. त्यांचे चुलते चौथे विल्यम हे १८३७ मध्यें मृत्यु पावल्यावर त्या इंग्लंडच्या गादीवर आल्या. २८ जून १८३८ रोजीं वेस्टमिनिस्टरमध्यें त्यांना राज्याभिषेक करण्यांत आला. त्यांनीं आपल्या चांगुलपणानें प्रजेचीं मनें आकर्षून घेतलीं. त्यांच्या साठ वर्षांच्या दीर्घकालीन कारकीर्दींत अठरा वेळां प्रधानमंडळांत पालट झाला. मेलबोर्न, पील रसेल, डर्बी, ॲबरडीन, पामरस्टन, डिझ्रॅली, ग्लॅडस्टन, सॅलिसबरी या मुत्सद्यांनीं प्रधानमंडळें बनविलीं. मेलबोर्ननें त्यांना राज्यकारभाराचें शिक्षण दिलें. १८४० सालीं त्यांचा प्रिन्स आलबर्ट ऑफ साक्स–कोबर्ग (Saxe-Coburg) यांच्याशीं विवाह झाला. या राजदंपतीला चार मुलगे व पांच मुली अशीं नऊ अपत्यें झालीं. त्यांना अनेक कौटुंबिक दुःखें सोसावीं लागलीं. त्यांचीं दोन अपत्यें व बरीचशीं नातवंडें त्यांच्या डोळ्यांदेखत वारलीं. १८६१ सालीं त्यांचे पती निवर्तले. आपल्या वैधव्यदशेंत त्या फारशा समाजांत वावरल्या नाहींत. त्यांच्या कारकीर्दींतील महत्त्वाच्या गोष्टीः–कॅनडाच्या संयुक्तराज्याची घटना, कॉर्न लॉज (धान्यविषयक कायदे) रद्द करणें, ज्यूंना मतदानाचे हक्क देणें, कॅथालिक इमॅन्सिपेशन ॲक्ट पास झाला, हिंदुस्थानचा राज्यकारभार इंग्लंडच्या राणीच्या नांवें हांकण्याचें ठरलें, क्रिमियन युद्ध, आफगाणीस्थानाशीं युद्धें, आयरिश स्वातंत्र्याचा दीर्घकालीन झगडा इत्यादि. १८८७ सालीं ग्रेटब्रिटन व वसाहती यांनीं त्यांची सुवर्णज्युबिली साजरी केली. १८९७ सालीं त्यांचा हीरकोत्सव साजरा झाला. त्या ता. २२ जानेवारी १९०१ रोजीं वारल्या.

व्हिटॅमिन्सः–जीवनद्रव्यें पृष्ठ ७६४ पाहा.


श

शकः–गोदावरी नदीच्या कांठीं पैठण येथें शालिवाहन या नांवाचा अति पराक्रमी राजा होऊन गेला. त्यानें विक्रमशकानंतर १३५ वर्षांनीं आपल्या नांवाचा शक चालू केला. या शकालाच ‘शालिवाहन शक’ म्हणतात. या शकाचा आरंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेस महाराष्ट्र व कर्नाटक या दोन भागांत चालू आहे. इसवी सन व शालिवाहन शक यांत ७८ वर्षांचें (स्थूलमानानें) अंतर असतें.

शकुनिः–दुर्योधनाचा मामा. गांधार देशाधिपति सुबलाचा पुत्र. यानें दुर्योधनाकरितां द्यूत खेळून पांडवांना जिंकिलें व वनवासाला धाडिलें. हा कपटानें द्यूत खेळणारा होता. हा भारतीय युद्धांत दुर्योधनाकडे असून हा सेनापति असतां सहदेवानें यास ठार

केलें. हा मार्गशीर्ष वद्य ३० ला मारला गेला. याचा पुत्र उलूक.

शनिः–सूर्यमालेंतील एक ग्रह. ग्रहांच्या सूर्यापासूनच्या अंतराच्या मानानें हा सूर्यापासून सहावा पडतो. सूर्यमालेंत तो गुरूच्या पलीकडे आहे. यूरेनसचा शोध लागेपर्यंत शनी हा सूर्यमालेंतील अत्यंत लांबचा ग्रह मानण्यांत येत असे. त्याचें सूर्यापासूनचें मध्यम अंतर ८८५९०००००० असून सूर्याभोंवतीं एक प्रदक्षिणा



शनीच्या कला (Phases) व कडीं–वलयें (Rings)

करण्याला त्याला २९॥ वर्षें लागतात. शनीच्या अमाप्रदक्षिणेचा काल ३७८ दिवस आहे. शनीचा आकार पृथ्वीच्या सुमारें ७५० पट आहे. पण त्याच्या आकाराच्या मानानें त्याचें द्रव्य नाहीं. त्याची घनता फार कमी आहे. ती पृथ्वीच्या ०·१३ वा हिस्सा व पाण्याच्या ०·७ वा हिस्सा आहे. यामुळें त्याचा द्रव्यसंच पृथ्वीच्या सुमारें ९५ पट आहे. शनीचा आकार अगदीं गोल नाहीं; बराच चपटा आहे. त्याचा पूर्व-पश्चिम व्यास ७५००० मैल व दक्षिणोत्तर व्यास ६७००० मैल आहे.

शनीभोंवतीं अतिशय दाट व अभ्रमय वातावरण आहे. शनीच्या वातावरणाचें गुरूच्या वातावरणाशीं साम्य आहे. शनीची उष्णता फार आहे; तथापि ती सूर्याच्या उष्णतेहून कमी आहे. तो तेजस्वी आहे. त्याच्या आंगीं त्याचा स्वतःचा प्रकाशहि आहे. त्याचे नऊ उपग्रह आहेत. त्यांत टिटान हा मोठा. त्याचा व्यास ३५५० मैल आहे.

शनीचा अगदीं आंतला उपग्रह शनीपासून १२० हजार मैलांवर आहे. त्याच्या आंत शनीचीं वलयें आहेत. त्यांच्या वास्तविक स्वरूपाचें ज्ञान इ. स. १६५५ मध्यें झालें. या वलयांत दोन वलयें अत्यंत तेजस्वी आहेत. त्यांच्या आंतील वलय तिसरें तेजोहीन आहे. हीं वलयें शनीच्या विषुववृत्ताभोंवतीं म्हणजे पूर्व पश्चिम पसरलीं आहेत. शनी सूर्याभोंवतीं फिरत असतांना या वलयांचें स्थान पालटत नाहीं; शनीचा एक अवयव असल्याप्रमाणेंच तीं शनीबरोबरच त्याच्या सूर्याभोंवतालच्या भ्रमणाच्या वेळीं असतात. बाहेरच्या वलयाची रुंदी १० हजार मैल आहे. या वलयाच्या आंत १७०० मैल रुंदीची जागा असून तिच्या आंत दुसरें वलय आहे; त्याची रुंदी १७॥ हजार मैल आहे. त्याच्या आंत तेजोहीन वलय आहे. त्याची रुंदी ८॥ हजार मैल आहे. या तेजोहीन वलयाच्या आंतल्या कडेपासून शनीच्या पृष्ठभागापर्यंत सुमारें १००००मैल रुंदीची जागा रिकामी आहे. सगळ्या सूर्यमालेंत अशीं वलयें (कडीं) दुसऱ्या कोणत्याहि ग्रहाला नाहींत. या वलयांच्या शारीरघटनेविषयीं ज्योतिषशास्त्रज्ञांनीं असा एक नियम ठरविला आहे कीं, अत्यंत लहान आकाराच्या कोट्यवधि उपग्रहांच्या योगानें हीं वलयें झालीं आहेत; ते उपग्रह परस्परांशीं फारच लगत असल्यामुळें वेगवेगळे दिसत नाहींत. त्यांत प्रत्येक उपग्रह शनीभोंवतीं आपापल्यापरी फिरत आहे. बाहेरचीं दोन वलयें तेजस्वी दिसण्याचें कारण तेथें ते उपग्रह फारच दाटीनें आहेत. आंतलें तिसरें वलय तेथील उपग्रह विरल असल्यामुळें तेजोहीन आहे.

शनि (ज्योतिष):–गुरु हा जसा शुभ ग्रह तसा शनि हा अत्यंत प्रबळ असा पापग्रह. शनि म्हणजे दुःख, छळवाद, दैन्य, दुर्दशा यांचें मूर्तिमंत स्वरूपच होय.

मंदोऽलसः कपिलदृक् कृशदीर्घगात्रः ।
स्थूलद्विजः पुरुष रोम कचोऽनिलात्मा ॥

असें त्याचें वर्णन आहे. गतीनें अतिशय मंद, आळशी, पिंगट, घाऱ्या डोळ्यांचा, उंच, किडकिडीत शरीराचा, वर्णानें फिका व पिंवळसर, अत्यंत थोडें बोलणारा व आंतल्या गांठीचा, अंगावर लव जास्त असून विशेषतः छातीवर केंस असलेला, अंगावर निळ्या शिरांचें जाळें स्पष्ट असलेला असें त्याचें रूपवर्णन करितात. स्मशानासारखीं अशुभ एकांतस्थानें, घाणेरड्या जागा, उध्वस्त झालेलीं शहरें हीं त्याचीं निवासस्थानें मानलीं आहेत. मकरेपेक्षां कुंभ ही शास्त्रीय राशी शनीला चांगली मानतात. या दोन्ही राशी शनीचीं स्वगृहें आहेत. तुळेंत तो उच्च असतो व मनुष्याला भाग्यपदास चढवितो, पण मेषेंत तो नीच राशींत असून तो मनुष्याला नीच आचरण करायला प्रवृत्त करितो.

शनि इतका मंद आहे कीं, त्याला एक अंश चालावयाला महिना लागतो. एका राशीला अडीच वर्षें व राशीचक्राचा एक फेरा करण्याला तीस वर्षें लागतात. चंद्राच्या मागील राशींत व पुढील राशींत तो असतांना साडेसाती असते व या काळांत विशेषतः मूळ कुंडलींत शनि अनिष्ट असेल तर, तो मनुष्याचें शरीर, मन, भाग्य, आशा व आनंद सर्व कांहीं धुळीला मिळवितो! क्षयरोगाप्रमाणें त्याची पकड इतकी चिकट व हृदयपीडा इतकी दारुण होते कीं,मनुष्याला विष खाऊन प्राणत्याग करावा अशा वेदना होतात. मंगळ व हर्षल हेहि पापग्रह मनुष्याचें फार नुकसान करतात. पण त्यांचा पराक्रम इतका त्वरित व जहाल असतो कीं, भरलेल्या सभेंत अवचित वरून एकादा बॉंब पडावा तसा हाहाःकार उडतो. पण मंगळहर्षलचे परिणाम जितके त्वरित व तीव्रतेनें घडतात तितकेच ते त्वरित विसरूनहि जातात. पण शनीचा छळवाद दीर्घकाळ असतो व तो सुरू झाला म्हणजे दुःखानें मन पूर्णपणें विटून जाऊन विरक्त होतें. शनी म्हणजे जणूं कांहीं आरोपीला विद्युत्शलाकेनें समज देऊन त्याचा कबुलीजबाब घेणारा पोलिस शिपाईच आहे! कुंडलीच्या बारा राशींतून फिरत असतां यमराजाप्रमाणें आयुष्यांतील कृतकर्मांचा जाब विचारून त्याचें प्रायश्चित्त तो मनुष्याला इहलोकींच भोगावयाला लावतो.

जग ही जर एक अनुभवाची शाळा मानली तर एका अर्थानें शनीसारखा योग्य व खरा शिक्षक नाहीं असें म्हणतां येईल. जगांतील खरें शहाणपण सुखापेक्षां दुःखाच्या अनुभवानेंच जास्त येतें. वैभव, संपत्ति, स्त्रीसुख, मित्रसुख, या सर्वांचा नाश करून किंवा त्यांचें खरें स्वरूप प्रकट करून खरे मित्र कोणते व खोटे कोणते, खरें कल्याण कोणतें, खरें अकल्याण कोणतें याचें ज्ञान शनीच करून देतो.

शनि हा शैत्य अगर बधिरत्व दर्शवितो व कुंडलीमध्यें ज्या स्थानीं असेल त्याप्रमाणें शीतविकार, संधिवात, बधिरत्व, मलेरिया वगैरेसारखे रोग उत्पन्न करतो. सामाजिक मतें घेतलीं तर स्थिरता (Conservatism) हा त्याचा गुण. जें जुनें असेल तें तसेंच अबाधित चालावें. कायद्याची प्रवृत्ति स्थिरतेकडेच असल्यामुळें हा वकील व कायदा दर्शवितो. जुन्याचा फाजील अभिमान व कर्मठपणा या दृष्टीनें 'पण लक्षांत कोण घेतो' या कादंबरींतील 'शंकरमामंजी'चें वर्णन शनीच्या गुणधर्मांचें उदाहरण म्हणून गमतीनें सांगतां येईल; कुंडलींत शनि शुभकारक असला तर टापटीप, मितव्ययीपणा, विलक्षण चिकाटी व दीर्घोद्योग दर्शवितो. पण तोच अशुभ असला तर विलंब, चिकटपणा, आळशीपणा, लोभीपणा, दुराग्रह, दैन्य व नीचसेवा यांचा दर्शक आहे. शेण जमिनीवर पडलें म्हणजे तें माती घेतल्यावांचून उठत नाहीं म्हणतात तशा प्रवृत्तीचीं कांहीं माणसें असतात. त्यांच्या लग्नीं बहुधा शनि अशुभ असतो.

शपथः—व्यवहारांत आपल्या बोलण्याचा खरेपणा दुसऱ्याला पटविण्याकरितां पुष्कळ लोक शपथ घेतात. विशेषतः अशिक्षित लोक देवाची, आईची, मुलाची अथवा आपल्याला पूज्य व पवित्र वाटणाऱ्या दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची शपथ घेऊन आपल्या विधानांतील सत्यतेचा प्रत्यय आणून देण्याचा प्रयत्न करीत असलेले आढळतात. शपथेवर सांगणारा मनुष्य खरेंच सांगत असला पाहिजे असें ऐकणारालाहि वाटतें. पण सगळेच कांहीं धर्मराजाचे अवतार नसतात! शपथेवर खोटें सांगणारे लोकहि आढळायचेच. अशा प्रकारें खोटें सांगण्यापासून जोंपर्यंत कोणाचें कांहीं प्रत्यक्ष नुकसान होत नाहीं तोंपर्यंत कोणी त्याची क्षितीहि बाळगीत नाहीं. एकाद्याच्या खोटें बोलण्यापासून जर कोणाची फसवणूक झाली तरच तो प्रश्न कायद्याच्या कक्षेंत येतो, एरवीं नाहीं. पुष्कळ लोक आपण अमूक एक गोष्ट करूं

अगर करणार नाहीं म्हणून दुसऱ्याला खासगी अगर जाहीर रीतीनें आश्वासन देतात. कोण आपण आजपासून दारूच्या थेंबाला शिवणार नाहीं अशी शपथ घेतो, तर कोणी आजन्म अविवाहित राहून देशसेवा करण्याची प्रतिज्ञा करतात. पण पुष्कळ वेळां या प्रतिज्ञा क्षणिक भावनावेगांतच घेतलेल्या असतात. अर्थात् त्या पाळणारे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच सांपडावयाचे! या प्रकारच्या प्रतिज्ञांचा भंग कायद्याच्या कक्षेंत येत नाहीं. सद्सद्विवेकबुद्धीची टोंचणी व लोकापवाद एवढीच शिक्षा त्यांना होते. न्यायमंदिरांत साक्षीदार, दुभाष्या, ज्यूरर यांना शपथ देतात. न्यायमंदिरांत शपथेवर जबाब देणाऱ्या साक्षिदारानें खोटें सांगणें हा इंडियन पीनल कोडाप्रमाणें गुन्हा आहे. 'इंडियन ओथ्स ॲक्ट १८७३' या कायद्यांत शपथेविषयींचा कायदा सांगितला आहे. त्यांत असें सांगितलें आहे कीं, ज्यूरर, साक्षिदार अगर दुभाष्या हे हिंदू अगर मुसलमान असतील अथवा त्यांची शपथ घेण्यास हरकत असेल तर त्यांच्यावर शपथ घेण्याची सक्ति करूं नये. शपथ घेण्याचा अधिकार कोर्ट, लवादमंडळ व सैन्याच्या अथवा वैमानिकदलाच्या ठाण्यावरील कमांडर यांना कायद्यानें दिला आहे. कोर्टामधील दाव्यांतील एकाद्या पक्षकारानें कोर्टाला जर अशी विनंति केली कीं, विरुद्ध पक्षकार जर अमूक एक गोष्ट शपथेवर सांगील तर आपल्यावर त्याचें तें विधान बंधनकारक राहील, तर कोर्ट त्याविरुद्ध पक्षकाराला तशाप्रकारें शपथेवर विधान करण्याची मुभा देईल; त्यानें तसें विधान केलें तर त्याच्याविरुद्ध पक्षकारांवर तें बंधनकारक राहील.

विधिमंडळाचे सभासद, गव्हर्नर्स, गव्हर्नर–जनरल व इतर अधिकारी यांना आपल्या अधिकाराचा स्वीकार करण्यापूर्वी आपलें काम नेकीनें करण्याविषयीं विधिपूर्वक शपथ घ्यावी लागते. कायदेशीररीत्या शपथ घेण्याचे निरनिराळे नमुने आहेत.

शरत् (ऋतु):–सहा ऋतूंपैकीं चौथा ऋतु. आश्विन व कार्तिक या दोन महिन्यांचा हा काल असतो. यावेळीं इंग्रजी आक्टोबर नोव्हेंबर हे दोन महिने येतात. कन्या व तुळ या राशींतून या कालांत सूर्य जातो.

शरत्ऋतूच्या प्रथमार्धांत पावसाळा संपतो व मध्यापासून हिंवाळा सुरूं होतो. शेतांतील धान्यें बरींच वाढलेलीं असल्यानें वाऱ्याबरोबर तीं डुलत असतात. सर्वत्र पाणी भरपूर असल्यामुळें व पुढच्या वर्षाच्या धान्याची तरतूद झालेली दिसत असल्यामुळें सर्व लोक आनंदांत असतात.

शारदोत्सव, देवीचें नवरात्र, विजयादशमी, कोजागिरी, दिवाळी, भाऊबीज, तुळशीचें लग्न हे या कालांतले प्रमुख उत्सव होत. या कालांतील हवा समशीतोष्ण व चांदणें शुभ्र असतें त्यामुळें दिवसाप्रमाणें रात्रीहि सुखदायक असतात.

शर्ले टेंपल (१९२९–):–सिनेमा सृष्टींतील अमेरिकन बालनटी. सांता मोनिका येथें २३ एप्रिल १९२९ रोजीं हिचा जन्म झाला. १९३३ मध्यें 'To the Last Man' या बोलपटांत तिनें प्रथम काम केलें. त्यानंतर तिची प्रमुख भूमिका असलेले अनेक बोलपट निघाले. त्यांपैकीं Stand up and Cheer, Change of Heart, Now and Forever, The Little Colonel, Curly Top, The Little Rebel, Poor Little Rich Girl हे प्रख्यात आहेत. वयानें लहान असूनहि कमालीच्या कौशल्यानें काम करणारी ही बालनटी सर्वांची आवडती आहे.



शर्ले टेंपल

शलभासन:–जमिनीवर पालथें निजावें. दोन्ही पाय जुळवून पायांचे आंगठे जुळवून जमिनीवर ताठ करावे. दोन्ही हातांचे तळवे छातीच्या बाजूस जमिनीवर ठेवावे. हातांचीं बोटें खांद्याच्या दिशेकडे व्हावीं. दोन्ही तळव्यावर भार घ्यावा व छातीचा वरचा भाग व डोकें जमिनीवरून वर उचलावें. जांघेपासून पाय आंगठ्यापर्यंत ताठ धरून तेही जमिनीपासून शक्य तितके वर उचलावे. दृष्टि भ्रूमध्यावर ठेवावी. या आसनानें ओटीपोट साफ होतें.



शलभासन

शहाजहान (स. १५९२–१६६६):–ताजमहाल बांधणारा मोंगल बादशहा. शहाबुद्दीन मुहमद किरान ऊर्फ शहाजहान असें याचें पुरें नांव आहे. उदयसिंगाची मुलगी बालमती ही याची आई असून जहांगीर हा याचा बाप होय. नूरजहान व आसफखान यांच्या खटपटीमुळें याला राज्य मिळालें.

१६२८ त राज्यावर आल्यानंतर यानें सर्व आप्तांना ठार केलें. १६३७ मध्यें शहाजीचा पराभव करून अहमदनगरचा सर्व मुलूख यानें आपल्या ताब्यांत घेतला. युरोपियनांनीं हिंदुस्थानांत येऊं नये म्हणून हा खबरदारी घेई. हा त्यांना धार्मिक बाबतींत हात घालून देत नसे व कोणीं तसें केल्यास हा कडक शासन करी. आसफखानाची मुलगी मुमताज ही याची बायको. हिच्यापासून त्याला आठ मुलगे व ६ मुली अशीं १४ अपत्यें झालीं. यानें तिच्या स्मरणार्थ जगत्प्रसिद्ध ताजमहाल ही कबर बांधली. म्हातारपणीं यानें दाराच्या हातीं राज्यकारभार दिला. औरंगजेबानें दाराला ठार करून स्वतः गादी बळकावली. याला त्य च्या कैदेंत आठ वर्षें काढावीं लागलीं. तुरुंगांतच हा १६६६ सालीं मृत्यु पावला. याला दारा, सुजा, औरंगजेब व मुराद हे चार मुलगे होते. यानें पुष्कळ पैसा खर्च करून जुम्मा मशीद, मोती मशीद, दिवाण इ आम, दिवाण इ खास या प्रेक्षणीय इमारती बांधल्या. दानधर्महि यानें पुष्कळच केला. यमुनेच्या तीरीं हल्लींचें दिल्ली शहर यानेंच वसविलें. याची कारकीर्द शांततेची गेली. मोंगलांच्या भरभराटीचा कळस याच्याच वेळीं झाला. हाताखालचे कामगार उत्तम मिळाल्यानें याची कारकीर्द सुरळीत पार पडली. हा मोठा विलासी व रंगेल होता. स्वतः फारच थोडा राज्यकारभार पाहात असे.

शहाजी भोंसले (१५९५–१६६३):–शहाजीचा आजा बाबाजी भोंसले दौलताबादेकडे आपलीं इनाम गांवें खाऊन लहानशी जमेत ठेवीत असे. बाबाजीस विठोजी व मालोजी असे दोन मुलगे होते. मालोजी व त्याची बायको (फलटणच्या निंबाळकरांकडील उमाबाई) यांचे मुलगे शरीफजी व शहाजी. शहाजी सुमारें ५ वर्षांचा असतांच मालोजी इंदापूरच्या लढाईंत मारला गेला. तेव्हां विठोजीच हीं लहान मुलें व त्यांची आई यांची काळजी वाहूं लागला. शहाजी १७।१८ वर्षांचा झाला तेव्हां निजामशाहींतील सरदार लखूजी जाधवराव यानें आपली मुलगी जिजाबाई हिचें शहाजीशीं मोठ्या समारंभानें लग्न केलें. पुढें आपल्या वाडवडिलांप्रमाणें शहाजी निजामशाहींत सरदारी करूं लागला. एकदां निजामशाहानें भरविलेला दरबार आटपून सरदार घरोघर जात असतां खंडागळे नांवाच्या सरदाराच्या हत्तीवरून भोंसले व जाधव मंडळी यांमध्यें मोठी चकमक उडाली. तेथेंच शहाजीचें शौर्य प्रथम प्रत्ययास आलें. पुढें शके १५४६ मध्यें भातवडी येथें निजामशहा आणि मोंगल आदिलशहा यांमध्यें फार मोठी लढाई झाली. तीमध्यें शरीफजी व शहाजी या दोघांनीं पराक्रमाची पराकाष्ठा केली आणि निजामशहास जय मिळाला. या लढाईनंतर शहाजीनें स्वतःचा मान व महत्त्व राखणें व वाढविणें यासाठीं त्यावेळच्या इतर सरदाराप्रमाणें प्रथम आदिलशाही, नंतर निशामशाही, पुढें मोंगल व पुन्हां निजामशाही या सत्तांचा आश्रय घेतला. शेवटीं शके १५५४ मध्यें एका लहान मुलास गादीवर बसवून स्वतः निजामशाही चालवूं लागला. चार वर्षांच्या अनुभवानंतर त्यास कळून चुकलें कीं, मोंगल व आदिलशहा त्यांच्या विरोधामुळें आपणांस यश येणें अशक्य. तेव्हां तो प्रयत्न सोडून देऊन त्यानें आदिलशाहाचा आश्रय केला. आदिलशहानें त्याजकडे भीमा व नीरा यांमधील प्रदेश जहागीर म्हणून कायम ठेवला. शिवाय कर्नाटक जिंकण्याच्या कामीं त्यानें महत्त्वाची कामगिरी बजावल्यामुळें बंगळूरभोंवतालचा मुलूख आणखी जहागीर म्हणून दिला. दिवसेंदिवस शहाजी आदिलशहास अधिकाधिक डोईजड होऊं लागला. तेव्हां त्यानें शहाजीस कैद करून पाहिलें. पण तिचा वाईट परिणाम होईल असें दिसतांच त्यास सोडून देऊन आणखी दक्षिणेकडील प्रदेश जिंकण्याचें काम त्याजवर सोपविलें. याचा फायदा घेऊन शहाजीनें तंजावरच्या बाजूस बऱ्याच मोठ्या प्रदेशावर स्वतःचा अधिकार बसविला. तेव्हां त्यास पुन्हां एकदां थोडे दिवस कैद भोगावी लागली. पण लौकरच सुटका होऊन तो पुन्हां आपल्या जहागिरीचें काम पाहूं लागला. शेवटीं श. १५८५ माघ शु. ५ मीस म्हैसूर संस्थानांतील आपल्या जहागिरींत बो(हा)दिगेरें येथें मरण पावला.

यास जिजाबाईपासून संभाजी, शिवाजी; तुकाबाईपासून व्यंकोजी व संताजी असे चार मुलगे झाले. संभाजी बापासारखाच शूर होता. पण तो श. १५७६ मध्यें कनकगिरीच्या लढाईंत मरण पावला.

शिवाजीचें चरित्र स्वतंत्र दिलें आहे. व्यंकोजीनें विजापूरकरांशीं एकनिष्ठ राहून बापाची तंजावरकडील जहागीर संभाळली. संताजी शिवाजीच्या दक्षिणदिग्विजयांत चमकलेला दिसतो. जिजाबाई शिवाजीच्या राज्याभिषेकानंतर थोड्याच दिवसांत मरण पावली. शहाजीचें चरित्र अनेक दृष्टींनीं बोधप्रद आहे. तीनशें वर्षांच्या मुसलमानी अंमलाखालींही मराठ्यांची कर्तबगारी, महत्त्वाकांक्षा, शौर्य इत्यादि गुणांचा लोप होऊं शकला नाहीं. तें तत्कालीन मराठे सरदारांचें प्रतीकच होतें. शिवाजीमध्यें प्रतीकत्व असून आणखी कांहीं अधिक होतें, यामुळें त्यानें शहाजीपेक्षांही जास्त कर्तबगारी दाखवून मराठी राज्यच स्थापन केलें. तरीही तत्कालीन मराठे सरदारांत शहाजीइतका प्रबल कोणीही नव्हता. स्वामिनिष्ठा व महत्त्वाकांक्षा यांचा विरोध आला असतां अनेक प्रसंगीं त्यानें स्वामिनिष्ठेस दूर लोटलें. यामुळें त्यावर आपत्ति आल्या; पण कर्तबगारीच्या जोरावर तो त्यांतूनहि सुटला आणि अधिकाधिक महत्पदास चढला गेला.

शहामृग:—भूनिवासी व वेगवान पक्षी. आफ्रिका खंड, अरबस्थान व मेसापोटेमिया या देशांतील वाळवंटांत हा प्राणी असतो. याची उंची ६ ते ८ फूट असून मान व पाय या बाबतींत याचें उंटाशीं साम्य जास्त आहे. निमेनिम पिसांनीं झांकलेले व पुढें दोन दोन बोटें असलेले दोन बळकट पाय याला असतात. डोकें व मान हे भाग विन पिसांचे असल्याचें दिसून येतें. पंखें व शेंपूट हे पांढरे असलेले भाग सोडले तर बाकीचें त्याचें सर्वच अंग काळें असतें असें म्हणतां येईल. पंखें व शेंपूट यांवर काळे ठिपके असतात. पंखें लहान असतात त्यामुळें तो उडूं शकत नाहीं. तथापि हा भरधांव धांवणाऱ्या घोड्यांपेक्षांहि जलद पळतो. याची चोंच रुंद व दबलेल्या त्रिकोणासारखी असते. याचा आवाज सिंहाप्रमाणें असतो. याच्या बहुमूल्य पंखांमुळें कित्येक ठिकाणीं याची शिकारहि होते.

याचा पाठलाग चालू असतांना निरुपाय झाला तर शहामृग आपलें तोंड जमिनींत खुपसतें. पण त्याच्या या करण्यानें हा शत्रूच्या तावडींत आयताच सांपडून प्राणास मुकतो. याच्या अंगाचें वजन २००–२५० शेर असतें. माणसाळल्यावर कित्येकजण याच्यावर बसतात व ओझींहि लादतात. कित्येकजण याच्या पिसांना रंग देऊन त्यांचे गुच्छ टोप्यांना लावतात. हा गवत, धान्य यांवर जगतो. खाल्लेल्या पदार्थांचें पचन व्हावें म्हणून मोठमोठे दगड, लोखंड व कांच यांचे तुकडे किंवा अशासारख्या इतर कठीण वस्तु हा प्राणी खात असतो. कोंबडीच्या बारापट मोठें अंडें हा घालतो. त्याचें वजन ३ पौंडापावेतों असूं शकतें. शहामृगी एका वेळेला १०–१२ अंडीं, वाळवंटांत भोंक पाडून केलेल्या घरट्यांत घालतें. तीं उबवण्याचें काम दिवसां नर व रात्रीं मादी करीत असून दिवसाच्या उकाड्याचीहि मदत नराला होते. अंडीं फुटण्यास १॥ महिन्याचा काळ लागतो. एका शहामृगाला अनेक माद्या असतात. तसेंच नर व माद्या एकत्रच राहतात. स्वभावानें हा पक्षी भित्रा आहे.

शाम—रंगारूपानें लक्ष वेधून घेणारा पाळीव पक्षी. हा वृक्षोपवेशक वर्गांपैकीं होय. याचें बहुतेक अंग काळ्या रंगानेंच माखलेलें असतें म्हणून त्याचें नांव अगदीं सार्थ वाटतें. आकारानें डौलदार व रंगानें मोहक असल्यामुळें लोक यास पकडून बाळगतात. हा जंगली पक्षी असून लाजाळू आहे. बाकी इतर बाबतींत हा धायळसारखाच आहे. पुढील माहितीसाठीं 'धायळ' हा लेख (१०५४ पृष्ठ) पहा.

शास्त्री, दी राइट ऑनरेबल व्ही. एस्. श्रीनिवास (स. १८६९–):—भारतसेवकसमाजाचे अध्यक्ष व मद्रास प्रांतांतील मुत्सद्दी व एक उत्तम वक्ता. यांचा जन्म २२ सप्टें. १८६९ ला होऊन शिक्षण कुंभकोणम येथें झालें. शिक्षकाच्या व्यवसायानें यांच्या जीवनाला प्रारंभ झाला. भारतसेवकसमाजाचे १९०७मध्यें हे सभासद झाले. १९१५ पासून भारतसेवकसमाजाचे ते अध्यक्ष बनले. मद्रास कौन्सिलचे १९१३–१६ पर्यंत सभासद. नंतर वरिष्ठ कौन्सिलचे सभासद (दिल्लीच्या) १९१६–२०. १९१८ भारतमंत्रि मॉंटेग्यु यांच्यांशीं हिंदुस्थानांतल्या दौऱ्यांत सहकारिता. हे १९२१ त साम्राज्यपरिषदेला प्रतिनिधि या नात्यानें उपस्थित झाले होते. याच वर्षांत जिनीव्हा व वॉशिंगटन या ठिकाणीं भरलेल्या राष्ट्रसंघी आरमारपरिषदांना हजर राहिले. आल्यावर त्याच वर्षी परत त्यांची प्रिव्ही कौन्सिलमध्यें नेमणूक झाली. १९२२ सालीं हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधि या नात्यानें वसाहतीमध्यें सफर केली. कौन्सिल ऑफ् स्टेटचे लोकनियुक्त सभासद

१९२१–२४. आफ्रिकेंत हिंदुस्थानचे हायकमिशनर म्हणून १९२७–२९ पर्यंत नेमणूक. गोलमेज परिषदेचे १९३०–३१ मध्यें सभासद. सध्यां आंध्र विश्वविद्यालयाचे व्हाइस चॅन्सेलर.

शाहू:–(१६८२–१७४९):–शिवाजीचा नातू व संभाजीचा पुत्र. आई येसूबाई. जन्म १८ मे १६८२. औरंगजेबानें १६८९ त संभाजीला ठार मारून येसूबाई व शाहूस कैद करून आपल्याजवळच ठेवलें. औरंगजेब मरेपर्यंत तो त्याच्या कैदेंतच होता. पण तेथें त्याला बऱ्या रीतीनें वागविण्यांत येत असे.

इकडे शाहू कैदेंत गेल्यावर मराठ्यांनीं संभाजीचा धाकटा भाऊ राजाराम यास गादीवर बसवून मोंगलांशीं युद्ध चालू ठेवलें. राजारामानें शाहूला सोडविण्याचा प्रयत्न केला, पण साधला नाहीं. राजाराम १७००मध्यें वारल्यावर त्याचा अज्ञान मुलगा शिवाजी (दुसरा) यास कोल्हापूर येथें गादीवर बसवून त्याची आई ताराबाई राज्यकारभार पाहात असे.

औरंगजेब १७०७ त मरण पावल्यावर दिल्लीची गादी बळकावण्यासाठीं त्याचा मुलगा अजीमशहा तिकडे जाण्यास निघाला. शाहूला त्यानें बरोबरच घेतले होते. बऱ्हाणपुरापलीकडे गेल्यावर त्यानें शाहूस बादशहाचा अंकित राहाण्याचें वचन घेऊन सोडून दिलें. शाहू दक्षिणेंत येऊन आपण मराठी राज्याचा खरा वारस असल्यानें आपल्यास गादी मिळविण्याचे कामीं मदत करावी अशी त्यानें मराठेमंडळीस आज्ञा केली. परंतु शाहूचा आतां मराठेशाहीवर कांहीं हक्क उरला नाहीं; शिवाजीमहाराजांनीं मिळविलेलें राज्य संभाजीनें घालविलें; राजारामानें मोंगलांशीं लढून मिळविलेल्या राज्यावर त्याचा मुलगा शिवाजी याचाच हक्क आहे, आणि खरोखरी शिवाजीमहाराजांच्या मनांतूनही राजारामालाच राज्य द्यावें असें होतें. या कारणामुळें शाहूला मदत करूं नये असें ताराबाईनें मराठे कारभारीमंडळीस सांगितलें. यामुळें मराठी राज्यांत दुफळी माजली. तरी पण बऱ्याच लोकांनीं शाहूचाच पक्ष धरला. विशेषतः पुणें प्रांताचा सरसुभेदार बाळाजी विश्वनाथ यानें शाहूलाच मदत करण्याचें ठरविलें व बादशहानेंही त्यालाच मान्यता दिली. यामुळें शाहूची बाजू बळकट होऊन त्यानें खेड येथें ताराबाईचा मोड करून पुढें जाऊन सातारा किल्ला काबीज केला; व त्यालाच 'शाहूनगर' हें नांव देऊन तेथें आपल्यास १२–१०–१७०८ रोजीं राज्याभिषेक करवून घेतला. त्याचप्रमाणें शिवाजीप्रमाणें अष्टप्रधानादिकांच्या नेमणूका करून राजारामानें पूर्वी दिलेल्या सनदा पुनः करून दिल्या व स्वतःही कित्येक नव्या करून दिल्या. या प्रसंगीं बाळाजी विश्वनाथाची शाहूला चांगलीच मदत झाल्यामुळें त्यानें त्यास १६–११–१७१३ रोजीं पेशवेपद दिलें. बाळाजीला पेशवाई मिळाल्यावर त्यानें शाहूच्या चिमुकल्या राज्याची व्यवस्था करण्याचा व मराठ्यांचें सैन्य तयार करण्याचा प्रयत्न आरंभला.

१७१८ त दिल्ली दरबारांत आपलें वजन कायम राखण्यासाठीं सय्यद बंधूंनीं शाहूची मदत मागितली. त्यावरून शाहूनें बाळाजीला मोठ्या सैन्यानिशीं दिल्लीला पाठविलें व सय्यदांची सत्ता दृढ केली. या कामगिरीबद्दल सय्यदांनीं शाहूला स्वराज्य व दक्षिणेच्या सहा सुभ्यांवरील चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा बादशहाकडून देवविल्या. यामुळें बाळाजीचें महत्त्व शाहूचे दरबारांत, शाहूचें महत्त्व मराठेशाहींत व मराठ्यांचें महत्त्व हिंदुस्थानांत बरेंच वाढलें. दिल्लीहून येतांना बाळाजीनें शाहूची आई येसूबाई, स्त्री सावित्रीबाई वगैरे अजून बादशहाच्या कैदेंत असलेल्या मंडळींना सोडवून आणलें.

बादशहापासून मिळालेले चौथाई सरदेशमुखीचे हक्क प्रस्थापित करण्यकरितां शाहूला सालोसाल निरनिराळ्या प्रांतांत सैन्य पाठवावें लागत असें. कांहीं वर्षें असा क्रम चालू ठेवल्यानंतर त्या प्रांताबद्दल हक्काच्या सनदा बादशहाकडून मागावयाच्या असा मराठ्यांचा क्रम असे. यामुळें पदरीं सैन्य बाळगून मुलुखगिरी करणाऱ्या सरदारांचें महत्त्व वाढत चाललें. अशा सरदारांत पेशवा हा मूळ बुद्धिवान असून सेनापतीला लागणाऱ्या गुणांतही श्रेष्ठ असल्यामुळें त्याचें महत्त्व मराठेशाहींत फार वाढलें व शाहूनेंही राज्याचा बराचसा भार त्याच्यावरच टाकण्याचें धोरण ठेवलें. १७१८ त मोंगलांच्या ताब्यांतून पुणें मिळविल्यानंतर पेशव्यानें पुण्याची पुनः वसाहत करून तेथेंच राहाण्याचें ठरविलें. १७२० त बाळाजी मरण पावल्यावर त्याचा मुलगा बाजीराव यास व १७४० त बाजीराव मरण पावल्यावर त्याचा मुलगा बाळाजीराव यास शाहूनें पेशवेपदावर कायम केलें; यामुळें शाहूची कारकीर्द म्हणजे पेशव्यांची कारकीर्द अशी स्थिति झाली. शाहूनें पेशव्यांची सत्ता न मानणाऱ्या सरदारांची बाजू कांहीं प्रसंगीं परस्पर

घेण्यानें राज्याच्या एकसूत्रीपणांत प्रतिबंध आला व पेशव्याला आपल्यांतील मराठे सरदारांशीं लढण्याचे प्रसंग आले; तरी पण एकंदरीनें शाहूनें पेशव्यांना बरेंच स्वातंत्र्य दिलें होतें व त्याचा त्यांनीं शाहूचेंच राज्य वाढविण्याचे कामीं सदुपयोग केला यांत संशय नाहीं.

शाहूनें चौथाईतील 'राजबाबत' नांवाचा हिस्सा आणि सरदेशमुखी आपल्या स्वतःच्या खर्चाकडे घेतली होती. आपल्या पदरच्या अठराही कारखान्यांचे खर्च अष्टप्रधानांतील मंडळीकडे सोंपविले होते.

शाहूनें आपल्या कारकीर्दींत मुख्यतः खालील राजकारणें पार पाडून आपली सत्ता वाढविली.

शाहूचें बस्तान बसत चाललेलें पाहून ताराबाईनें चंद्रसेन जाधव, कृष्णराव खटावकर, कान्होजी आंग्रे, दमाजी थोरात, उदाजी चव्हाण यांसारख्या मराठे सरदारांची उठावणी करून त्याला त्रास देण्याचा प्रयत्न केला; परंतु शाहूनें या सर्वांना जेरीस आणलें. बावीस वर्षें झगडा करूनही आपलें कांहीं चालत नाहींसें पाहून तिनें १७३१ त शाहूशीं तह करून कोल्हापूरच्या आसपासचा मुलूख पतकरून स्वस्थ बसण्याचें कबूल केलें. शाहूचें अंतःकरण ममताळु असल्यामुळें शेवटपर्यंत त्याचे कोल्हापूरकरांशीं प्रेमाचेच संबंध राहिले.

बादशाही मुलुखावर चौथाई सरदेशमुखीचे हक्क प्रस्थापित करायला लागल्याबरोबर शाहूला निजाम हा एक बलिष्ठ प्रतिस्पर्धी भेटला. प्रथम १७१३ त दिल्लीच्या बादशहाचा दक्षिणचा सुभेदार म्हणून त्याची नेमणूक झाली होती. पण पुढें १७२४ त तो स्वतंत्र झाल्यामुळें मराठ्यांना चौथाई सरदेशमुखीचे हक्क वसूल करूं देण्यास तो हरकत करी. कोल्हापूरकराची बाजू घेऊन शाहूला त्रास देण्यासही त्यानें कमी केलें नाहीं. यामुळें मराठ्यांचे निजामाशीं लढण्याचे अनेक प्रसंग आले. बाजीरावानें त्याचा पालखेड (१७२८) व भोपाळ (१७३८) येथील लढायांत चांगलाच मोड केला तरी त्याचा कांटा समूळ निघाला नाहीं. शाहूचीही भावना त्याला अजिबात बुडवूं नये अशीच होती.

बाळाजी विश्वनाथानें दिल्लीहून सनदा आणण्यापूर्वीपासूनदेखील माळवा, वऱ्हाड व हैदराबाद या सुभ्यांतून सरकारी उत्पन्नाचा कांहीं अंश वसूल करण्याचा त्याच्या सुटकेच्या वेळीं तोंडीं मिळालेला हक्क शाहू गाजवीत होताच. पण बाजीराव पेशवा झाल्यावर त्यानें मराठ्यांचें उत्तरहिंदचें धोरण फार जोरानें चालू ठेवलें आणि दक्षिणच्या सुभेदारींतच नव्हे, तर त्याच्या पलीकडे गुजराथ, माळवा, बुंदेलखंड, राजपुताना या प्रांतांतही सालोसाल स्वाऱ्या करण्याचा व तेथून चौथाई सरदेशमुखी वसूल करण्याचा सपाटा मराठ्यांनीं चालविला. १७३७ त तर बाजीरावानें प्रत्यक्ष दिल्लीवर चढाई करून बादशहाला मराठ्यांची सत्ता मानायला लावली. दिल्लीची बादशाही ही समूळ बुडवूं नये असा शाहूचा कटाक्ष होता. पुढें बाळाजीराव पेशवा झाल्यावर त्यानेंही माळवा, प्रयाग वगैरे बादशाही मुलुखावर स्वाऱ्या करून तेथें मराठ्यांची सत्ता दृढमूल केली.

कर्नाटकांत सावनूरच्या नबाबाच्या त्रासाला कंटाळून सोंधें व लक्ष्मेश्वर येथील देसायांनीं शाहूच्या मदतीची याचना केल्यामुळें व कर्नाटकावरील चौथाई वसूल करण्याचा बादशाही सनदेनेंच हक्क मिळाला असल्यामुळें शाहूनें १७२५ व १७२६ त प्रतिनिधि व पेशवे यांना कर्नाटकच्या स्वारीवर पाठविलें. मराठ्यांचे या स्वाऱ्यांत हाल झाले व विशेषशी फलप्राप्ति झाली नाहीं. पण पुढें १७४६–४७ त सदाशिवराव व सखारामबापू यांनींही कर्नाटकांत स्वारी करून तेथें मराठ्यांची सत्ता प्रस्थापित केली.

महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर जंजिऱ्याचा शिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज हे मराठ्यांची सत्ता जुमानीत नसून आपल्या मुलुखांतील हिंदूंचा फार छळ करीत यामुळें तिकडेही लक्ष देणें शाहूस भाग पडलें. त्यानें पिलाजी जाधव, प्रतिनिधि, बाजीराव, चिमाजी वगैरे सरदारांस अनेक वेळां कोंकणांत पाठविलें. १७३३ त बाजीरावानें शिद्याचीं कांहीं स्थळें घेऊन त्यास नरम आणलें आणि १७३९ त चिमाजी आप्पानें मोठ्या पराक्रमानें वसई घेऊन पोर्तुगीजांचा मोड केला. शाहूला शिद्दी वगैरेंचा समूळ नाश करतां आला नाहीं तरी त्यांच्यावर मराठ्यांची चांगलीच जरब बसली आणि त्यांच्या मुलुखांत हिंदूंचा छळ होणें बंद पडलें.

शाहूच्या कारकीर्दींतच नागपूरकर भोंसल्यांनीं आरंभापासून व बाळाजीराव पेशव्यानें १७४३ त पूर्वेकडे स्वाऱ्या करून मराठ्यांचा दरारा बंगालपर्यंत बसविला.

अशा रीतीनें शाहूच्या राज्याचा विस्तार चारी दिशांकडे बराच झाला आणि मराठ्यांना हिंदुस्थानाच्या राजकारणांत बरेंच महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें.

शाहूस शिकारीचा, पक्षिसंग्रहाचा व ख्याली-खुशालीचा विलक्षण नाद होता. तरीपण तो धार्मिक व शांत मनोवृत्तीचा असून जेजुरी, शिंगणापूर, धोम वगैरे स्थळांच्या यात्रा करीत असे. दानधर्माबद्दल त्याचा फार लौकिक होता.

शाहूची प्रकृति १७४३ पासून म्हणजे वयाच्या ६१ वर्षापासूनच खंगत चालली होती. त्यांत त्याच्या राण्यांच्या नित्य कलहामुळें त्याला फार त्रास होत असे. अपत्याभावामुळें त्याचें मन नेहमीं उदास असें. शेवटीं १५ डिसेंबर १७४९ रोजीं वयाच्या ६७व्या वर्षी त्याचा सातारा येथें अंत झाला. त्याची छत्री संगम माहुली येथें असून तिची पूजाअर्चा वगैरे यथासांग अजून चालत असते. शाहूला अंबिकाबाई, सावित्रीबाई, सकवारबाई व सगुणाबाई अशा लग्नाच्या बायका होत्या व विरूबाई ही आवडती रक्षा होती. शिवाय लक्ष्मीबाई, सखू वगैरे कित्येक नाटकशाळा होत्या. शाहूला यांच्यापासून कांहीं मुली व मुलगे झाले, पण औरसपुत्र कोणी न उरल्यामुळें त्याच्यामागें त्याच्या गादीवर त्याच्याच इच्छेप्रमाणें ताराबाईचा नातू रामराजा यास बसविण्यांत आले.

शिवाजी हा मराठी राज्याचा संस्थापकच असल्यानें त्याला मराठेशाहींत अग्रपूजेचा मान असला तरी साताराचे गादीचा संस्थापक शाहूच असल्यामुळें त्याच्या वंशजांचे ठिकाणीं शाहूबद्दल अत्यंत पूज्यबुद्धि असल्याचें दिसून येतें. १८१७ त साताराचा प्रतापसिंह दुसऱ्या बाजीरावाला लिहितांना असें म्हणतो— 'श्रीभवानीशंकर याचे कृपेनें व शाहूमहाराज यांचे पुण्येंकरून तुमचा जय आहे. हिंदुपद तुम्हांस यश सर्वकाल देईल.' शाहूबद्दल अनेक आख्यायिका अजून-पर्यंत सांगतात यावरून लोकांचें त्याच्यावर फार प्रेम होतें असें म्हणावें लागतें.

शाहूच्या ६७ वर्षांच्या दीर्घायुष्यापैकीं पहिलीं आठ वर्षें बाळपणांत व त्यापुढचीं अठरा वर्षें औरंगजेबाचे कैदेंत अर्थात् निष्क्रियतेंत व कांहींशीं चैनींत गेलीं. परंतु बाकीचीं ४१ वर्षें बरींच धामधुमींत गेलीं. त्याचा स्वभाव शांत व ऐषआरामी असल्यानें व त्याच्या भाग्यानें त्याचे तिन्ही पेशवे कर्तबगार निघून त्यांनीं राज्याचा भार बराचसा उचलला असल्यानें शाहूस राज्य चालविण्याचे श्रम एकंदरींत कमी पडले, ही गोष्ट खरी व हरएक राजकारणांत स्वतः पुढाकार घेऊन त्याचें धोरण स्वाऱ्या करण्याचें असतें, तर राज्याची वाढ फारच झपाट्यानें होऊन सर्वत्र सुव्यवस्था राहिली असती ही गोष्ट खरी, तरीपण संपूर्ण मराठेशाहीचा मुख्य चालक या नात्यानें त्यालाच निरनिराळ्या सरदारांची आपापसांतील भांडणें मिटवून सर्वांचीं मनें राज्यवृद्धि करण्याकडे वळविण्याचे श्रम करावे लागत होते हें लक्षांत घेतलें असतां त्याला दुर्बळ राजा असें म्हणतां येणार नाहीं. त्याच्या समकालीन दिल्लीच्या बादशाहापेक्षां तो पुष्कळच कर्तबगार होता असेंच दिसून येतें. शाहूच्या रोजनिशा पाहिल्या असतां तो किती दीर्घोद्योगी होता हें दिसून येतें. व्यक्तीचे गुण ओळखण्याची व सर्वांना आपल्या भजनीं लावून व त्यांच्यावर छाप राखून बसल्या ठिकाणाहून त्यांच्याकडून काम करून घेण्याची कर्तबगार मुसलमानी बादशहाचे ठिकाणीं आढळून येणारी कला त्याला चांगली साधली होती असें म्हणावें लागतें. पेशवे आदिकरून राज्यांतील निरनिराळे सरदार आपापसांत कितीही भांडत असले तरी शाहूची अमर्यादा कोणींही केलेली दिसून येत नाहीं. शाहूच्या या लोकसंग्रही वृत्तीमुळेंच शिवाजीचें, मध्यंतरीं हातांतून गेलेलें राज्य पुनः मिळवून त्याचें अर्ध्याअधिक हिंदुस्थानावर पसरलेलें साम्राज्य त्याच्या हयातींतच पाहाण्याचें भाग्य त्याला मिळालें.

शाहू महाराज (१८७४–१९२२):–कोल्हापूरचे छत्रपति. अस्पृश्योद्धारक, सार्वत्रिक शिक्षणाचे पुरस्कर्ते, मल्लविद्येचे भोक्ते, सुधारक मताचे या नात्यानें त्यांचा परिचय सर्वांस आहेच. कागलच्या घाटगे कुलांतील श्रीमत् जयसिंगराव उर्फ आबासाहेब व त्यांचें कुटुंब राधाबाईसाहेब यांच्या पोटीं २६ जुलै १८७४ रोजीं यांचा जन्म झाला. महाराजांचें दत्तविधानपूर्वनाम 'यशवन्तराव' असें होतें.

महाराज नऊ वर्षांचे असतांना १८८३ सालीं कोल्हापूरचे चौथे शिवाजी महाराज हे अहमदनगर येथें मृत्यु पावले. त्यांना मूलबाळ नव्हतें म्हणून चौथ्या शिवाजीमहाराज यांच्या पत्नि आनंदीबाईसाो यांनीं सर्वांच्या अनुमतीनें यांना दत्तक घेऊन त्याच दिवशीं १७ मार्च १८८४ ला गादीवर बसविले.

यावेळीं महाराज केवळ दहा वर्षांचे असल्यामुळें त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न उपस्थित झाला. या शिक्षणासाठीं त्यांना राजकोट, धारवाड दोन्हीं ठिकाणीं ७–८ वर्षें काढावीं लागलीं. शिक्षण संपल्यावर प्रत्यक्ष देशस्थिति ध्यानांत यावी म्हणून त्यांच्याकडून उत्तर हिंदुस्थानच्या दोन व दक्षिण हिंदुस्थान व सिलोन या भागाची एक अशा तीन सफरी १८८९–९१ पर्यंत करविल्या. वडोद्याचे सरदार व गायकवाड सरकारचे संबंधी श्री. गुणाजीराव खानविलकर यांची कन्या 'लक्ष्मीबाई' यांच्यांशीं १ एप्रिल १८९१ ला महाराजांचा विवाह झाला.



छत्रपति श्रीशाहू महाराज

या विवाहामागून तीन वर्षांनीं म्हणजे २ एप्रिल १८९४ ला महाराजांच्या हातीं राज्याचीं अधिकारसूत्रें आलीं. राज्यारोहणापूर्वी १० मार्च १८९४ ला शाहूमहाराजांना श्रीमंत आक्कासाहेब महाराज या झाल्या. हें प्रथम अपत्य होय. यांच्यांप्रमाणेंच ३१ जुलै १८९७ व १५ एप्रिल १८९९ या दोन वर्षांत महाराजसाहेबांना अनुक्रमें श्रीमत् राजाराम महाराज व कै. शिवाजी महाराज या पुत्रद्वयाचा लाभ झाला.

१८९४ पासून १९२२ पर्यंत यांनीं २८ वर्षें राज्यधुरा वाहिली. या मुदतींत विषप्रकरण, डांबरप्रकरण, वेदोक्तप्रकरण, कुलकर्णीवतनप्रकरण, शंकराचार्यप्रकरण, क्षात्रजगद्गुरुप्रकरण, ताईमहाराजप्रकरण इत्यादि प्रकरणें निर्माण झालीं. तसेंच मोफत प्राथमिक शिक्षण, खासबाग मैदानाची योजना, रेस ग्राउंड वगैरे गोष्टींनीं त्यांच्या ठिकाणची साक्षरतेची कळकळ, शिकारीची आवड; मल्लविद्येचा शोक उत्तमपणें लोकांच्या निदर्शनास येतो.

धार्मिक बाबतींत त्यांनीं सत्यशोधकसमाज, आर्यसमाज यांना आश्रय देऊन त्यांच्या करवीं लोकांतील वेडगळ व भोळसरपणाच्या कल्पनांचें उच्चाटन करविलें. स्वतः अनेक सभांतून भाग घेतला व लोकांना ज्ञानसंपन्न होण्याविषयीं उपदेश केला.

यांच्याच राज्यकालांत राधानगरीचा लक्ष्मीबाई तलाव व स्टेट रेल्वे या गोष्टी सुरू झाल्या. यांच्यामुळें व्यापार व शेती यांना चांगलीच गति मिळाली. शाहूपुरी व जयसिंगपूर येथील वसाहती पूर्णतेस जाऊन त्यांना व्यापारी दृष्टीनें महत्त्व प्राप्त होण्यास यांच्याच दूरदृष्टीची मदत झाली.

ब्रिटिश सरकारनें G. C. I. E. व C. S. I. या पदव्या त्यांना दिल्या. तसेंच इंग्लंडच्या अग्रिकल्चरल सोसायटीनें व केंब्रिज विश्वविद्यालयानें अनुक्रमें M. R. A S. व L. L. D. या पदव्या देऊन आपली गुणग्राहकता व्यक्त केली. लोक तर त्यांना 'राजर्षि' म्हणून ओळखीत असत.

या कर्मवीराचा अन्त मुंबईस ६ मे १९२२ ला झाला.

शॉ, जॉर्ज बर्नार्ड (१८५६–):–आयरिश नाटककार. याचा जन्म २६ जुलै १८५६ रोजीं आयरची राजधानी डब्लिन येथें झाला. त्याचें शिक्षण डब्लिन येथेंच झालें. नंतर डब्लिनमध्यें कांहीं दिवस जमिनीच्या दलालाचें काम करून १८७६ मध्यें तो लंडन शहरीं आला. तेथें त्यानें कारकुनाची वगैरे कामें केलीं व शेवटीं त्या नोकऱ्या सोडून तो लेखक बनला. १८७९ ते १८८३ च्या दरम्यान त्यानें पांच कादंबऱ्या लिहिल्या; पण त्यांपैकीं एकाही कादंबरीला प्रकाशक मिळाला नाहीं. १८८२ मध्यें तो सोशॅलिस्ट बनला व संगीत, कला व वाङ्मय यांचा टीकाकार म्हणून वृत्तपत्रांतून त्यानें लेख लिहिण्यास सुरवात केली. यानंतर कांहीं दिवसांनीं 'सॅटर्डे रिव्ह्यू' या पत्रांत तो नाटकावर टीका लिहूं लागला. याच कालांत त्यानें सोशॅलिझमूचा प्रचार केला व १८८४ मध्यें तो फेबियन सोसायटींत गेला. यावेळीं तो वादपटु म्हणून चांगलाच पुढें आला. याच सुमारास त्यानें The Perfect Wagnerite, The Quintessence of Ibsenism हीं पुस्तकें व चार नाटकें लिहिलीं.

यानंतर आपल्या नाटकांना प्रचलित, धार्मिक, सामाजिक व जीवशास्त्र (Biological) विषयक प्रस्तावना तो जोडूं लागला. या त्याच्या प्रस्तावनांनींच प्रथम तो पुढें आला. Mrs. Warren's Profession, (1893) हें त्याचें नाटक १९०२ पर्यंत बंदींत पडलें होतें. Candida (1894) हें त्याचें नाटक जर्मनींत फार लोकप्रिय झालें होतें. परंतु रंगभूमीवर त्याच्या Man and Superman या नाटकानेंच प्रथम यश मिळविलें. यानंतर John Bull's Other Island, The Doctor's Dilemma, Getting married, Androcles and the Lion, Pygmalion, Fanny's First Play हीं दुसरीं नाटकें त्यानें लिहिलीं. त्याचीं सर्वांत उत्कृष्ट नाटकें Heartbreak House, Back to Methuselah, Saint Joan (1923) हीं होत. यांपैकीं सेंट जोन हें विशेष प्रसिद्ध आहे, आणि हीं तीन्हीं नाटकें त्याच्या वयाला साठ वर्षें पुरीं झाल्यानंतर त्यानें लिहिलीं हा त्याचा विशेष होय. यानंतर The Apple Cart (1929) व Too True to be good (1932) हीं नाटकें त्यानें लिहिलीं. The Intelliegent woman's Guide to Socialism and Capitalism (1928) हा प्रबंधात्मक ग्रंथ त्यानें लिहिलेला आहे.

चतुर संवाद, कोट्या, खुसखुशीत विनोद, झणझणीत चुटके, अतिशयोक्ति हें त्याच्या नाटकांचें वैशिष्ट्य आहे. नाटकांतून त्यानें सामाजिक अन्याय चव्हाट्यावर मांडला असून त्यांतून त्यानें तत्त्वज्ञान व धर्मविषयक प्रश्न चर्चिले आहेत. १९२६ मध्यें त्याला वाङ्मयाचें नोबल पारितोषक मिळालें. सोशॅलिस्ट विचारसरणीचा त्यानें व्याख्यानें व पत्रकें काढून मोठा प्रचार केलेला आहे.

शिकंदर (खिस्तपूर्व ३५६–३२३):–खिस्ति शकापूर्वी होऊन गेलेला मॅसिडोनचा दिग्विजयी राजा. हा मॅसिडोनचा राजा फिलिप याचा मुलगा. वयाच्या तेराव्या वर्षी हा सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल याचेपाशीं विद्याभ्यास करूं लागला. बापानें मॅसिडोनशेजारच्या राज्यावर आपलें वर्चस्व बसविण्याकरितां केलेल्या युद्धांत यानें भाग घेतला. त्यावेळीं त्याचें अलोट धैर्य, प्रचंड शक्ति व सहनशक्ति हे गुण दिसून आले. याच्या बापाचा वध झाल्यावर आपल्या वयाच्या विसाव्या वर्षी तो गादीवर आला. गादीवर आल्यावर त्यानें प्रथम आपल्या बापाचा वध करणाऱ्यांना, आपल्या सावत्र आईला व तिच्या तान्ह्या मुलाला यमसदनास पाठविलें. (शिकंदर) अलेक्झँडर हा तरुण व अनुभवी आहे. त्याला आपण तात्काल चीत करूं, अशा समजुतीनें ग्रीसमधील नगरराज्यांनीं बंड उभारलें. अलेक्झँडर त्यांना पुरून उरला. त्यानें त्या बंडाचा बींमोड केला.

वयाच्या बावीसाव्या वर्षी अलेक्झांडर इराणी राज्य जिंकण्याकरितां निघाला. पस्तीस हजार सैन्यांनिशीं जाऊन त्यानें ग्रॅनिकस येथें पर्शियन सेनेचा पराभव केला. त्याच्या पुढील वर्षी त्याला तिसऱ्या दारिअसच्या आधिपत्याखालीं लढणाऱ्या सहा लाख सैनिकांच्या प्रचंड अशा पर्शियन सेनेशीं सामना द्यावा लागला. पण याहि खेपेस त्यानें पर्शियन सेनेला खडे चारले.

त्यानंतर अलेक्झँडरनें आपलें लक्ष फिनिशिया व सीरिया यांच्याकडे वळविलें. हे दोन्ही देश त्याच्या स्वाधीन झाले. परंतु टायर शहर जिंकण्याकरितां त्याला सात महिने वेढा देऊन लढावें लागलें. तें शहर जिंकल्यावर त्यांतील ३०,००० नागरिकांना त्यानें गुलाम म्हणून विकले. यापुढें त्यानें इजिप्तकडे आपली दृष्टि वळविली. इजित देश त्या वेळीं इराणी साम्राज्यांत होता. इराणी छळाला कंटाळलेल्या इजित्तनें त्याचें आपला उद्धारकर्ता म्हणून स्वागत केलें. त्यानें अलेक्झँड्रिया हें शहर वसविलें. त्यानंतर त्यानें पूर्वेकडे कूच करून पर्शियन साम्राज्याचा राहिलेला भाग जिंकला. बाबिलोन व सुसा हीं दोन शहरें ताब्यांत घेतलीं. सुसा येथील पर्शियन राजाचा प्रचंड द्रव्यनिधि त्याचे हातीं लागला. त्यानंतर त्याच्या विजयी सैन्यानें कास्पियन समुद्राजवळील निरनिराळ्या जमातीला जिंकून त्यांचेवर वर्चस्व स्थापिलें.

वयाच्या २९ व्या वर्षी त्यानें हिंदुस्थानावर स्वारी केली. पोरसखेरीज तेथील सर्व राजे त्याला शरण गेले. पोरसचा त्यानें पराभव केला.

त्यानें आपल्या प्रचंड साम्राज्याची राजधानी बाबीलोन येथें ठेविली. वसाहती व आंतरजातीय विवाह यायोगें युरोप व आशिया यांचें एक संयुक्त राष्ट्र करावें व तेथें एक भाषा व सारखे कायदे करावेत अशी त्याची योजना होती. त्यानें स्वतः दारिअस राजाच्या मुलीशीं लग्न केलें होतें. त्याच्या हजारों सैनिकांनीं आशियांतील स्त्रियांशीं विवाह केले. त्याची योजना मूर्त स्वरूपास येण्यापूर्वीच त्याला काळानें

गांठलें. अलेक्झँडरची कीर्ति त्यानें प्रचंड दिग्विजय केला यामुळेंच केवळ झाली नसून त्यानें संस्कृति निर्माण करण्याची योजना आखली होती तीमुळेंहि झाली. त्याची अभिरुची उच्च होती. तो ललितकला, तत्त्वज्ञान व वाङ्मय यांचा पुरस्कर्ता होता.

शिकारी:–'कर्कश शीळी' प्रमाणें आवाज असणारा पक्षी. हा गगनविहारी वर्गांपैकीं म्हणजे हिंस्र पक्षांपैकीं आहे. तित्तीरपक्षाची शिकार करण्यासाठीं कांहीं लोक यास बाळगतात. शरीरानें हा कावळ्यापेक्षां लहान आहे. तसेंच याचा आवाज कर्कश शिळीप्रमाणें वाटतो. या पक्षाच्या नरमादीचा रंग एकसारखाच असतो. लहानपणीं व मोठेपणीं याचे रंग बदलतात. लहानपणीं याची पाठ व शेंपूट पिंगट रंगाची असते. तसेंच याचे डोळे व पाय हे अवयव फिकट पिंवळ्या रंगाचे असतात. हा पक्षी मोठा झाल्यावर याची पाठ व शेंपूट हे अवयव करड्या रंगाचे बनतात, तर डोळे आणि पाय हे भाग गडद पिंवळ्या रंगाचे होतात. शिकारी लहान लहान पक्षी, पालीं, खारी, उंदीर, नाकतोडे इत्यादि प्राण्यांना पकडून आपली भूक शमवितो. एप्रिलपासून जूनपर्यंतच्या काळांत तो आपलें घर बांधतो व त्यांत त्याची मादी पिंगट रंगाची छटा असणारी पांढरीं अंडीं घालते. या पक्षाच्या चिमणा व चेटवा अशा दोन जाती आहेत. यांपैकीं पहिली जात चिमण्यावरच आपला उदरनिर्वाह करते म्हणून तीस 'चिमणा–शिकारी' म्हणतात. चिमण्या–शिकारीचे पाय लांब असतात. दुसऱ्या जातीचा पक्षी पहिल्यापेक्षां मोठा असतो. चेटवा पक्षाच्या डोकीच्या व मानेच्या बाजूचा रंग तांबडा असतो. तसेंच याच्यावरील पिसांचा रंग करडा असून त्यांत पिंगट रंगाचे पट्टे असतात; त्याचप्रमाणें याची शेंपटीहि काळ्या पट्ट्याची असते.

शिंदे, विठ्ठल रामजी (१८७३–):–तौलनिक भाषाशास्त्रज्ञ, इतिहाससंशोधक व अस्पृश्यतानिवारक. जन्म जमखिंडी येथें २३ एप्रिल १८७३ ला. प्राथमिक व इंग्रजी प्रवेशपरीक्षेपर्यंतचें शिक्षण जमखिंडीलाच. १८९१ त प्रवेशपरीक्षा, बी. ए. (फर्ग्यूसन कॉलेजमधून) १८९८ ला. याच वर्षी फर्स्ट एल.एल. बी. या परीक्षांतून हे उत्तीर्ण झाले. १८९१ ते १८९३ पावेतों शिक्षक. उच्च शिक्षणानंतर प्रार्थनासमाजांत प्रवेश व त्याचा प्रचार. पुढें युनिटेरियन शिष्यवृत्तीची प्राप्ति. १९०१ ते १९०३ परदेशवास. १९०३ पासून १९०६ पर्यंत प्रार्थनासमाजाच्या प्रचारापायीं हिंदुस्थानभर यांनीं प्रवास केला. १९०६ त 'डिप्रेस्ड क्लासेस'ची स्थापना. 'भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळी'चे १९१२ त चिटणीस. सातारा प्रांतिक सामाजिक परिषदेचे अध्यक्ष. १९३०ला सत्याग्रह चळवळींत भाग घेतल्याबद्दल सहा महिन्यांची शिक्षा. राष्ट्रीय मराठापक्षाचे संस्थापक. नागपूरच्या कॉंग्रेसच्या विषयनियामक समीतींत नेमणूक. मिशनच्या कार्याशीं त्यांनीं १९२० पासून फारसा संबंध ठेवला नाहीं. इतिहासाचें संशोधन व भाषेचें तौलनिक अध्ययन करणें या गोष्टी चालू आहेत. 'लिबरल रिलिजन इन इंडिया' हा निबंध, आत्मचरित्र (१९४०) व भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न हे यांचे ग्रंथ आहेत.

शिंपी:–दोन चार पानें एकत्र शिवून आपलें घरटें बनविणारा पक्षी. हा वृक्षोपवेशक वर्गांपैकीं आहे. याची चोंच लांब, तीक्ष्ण व ऐटदार असते. याची शेंपूट वर असून याच्या अंगाचा बांधा चिमणीएवढा असतो. याची पाठ हिरवी असून पोट पांढरें असतें. याच्या मानेवर व दोहों बाजूस काळे ठिपके असतात. कीटकांवर याचा निर्वाह असल्यामुळें हा एकसारखा कुंपणांत किडे हुडकण्यासाठीं हिंडतो. घरटें बांधण्याचें काम याची मादी करते. ती मोठीं पानें असणाऱ्या झाडावर ३।४ पानें एकत्र करून व चोंचीनें भोंकें पाडतें व कोळ्याच्या जाळ्याचा अथवा लोंकरीचा धागा किंवा सुतळीचा तुकडा याच्या सहाय्यानें शिवण्याचें काम पार पडतें. अशा रीतीनें तयार केलेल्या घरांत ती ३।४ अंडी घालतें.

शिमगा:–फाल्गुन हा लेख पहा.

शिराळशेट (इ.स. १३९६चा सुमार):–उदार अंतःकरणाचा लिंगायत वाणी. १३९६ च्या सुमारास दुर्गादेवीचा दुष्काळ गुजराथ व महाराष्ट्र या देशांत पडला होता. या दुष्काळांत त्यानें धान्याचा पुरवठा करून लोकांचे प्राण वांचविले.

त्याच्या या कामगिरीबद्दल बिदरचा बादशहा खूष झाला. बादशहानें त्याला या कामगिरीबद्दल 'पाहिजे तें' मागण्याची परवानगी दिली. शिराळशेटनें बादशहाचा साडेतीन तास अधिकार घेऊन त्या अवधींत यानें सोडलेलीं देवांचीं उत्पन्नें व देवांना दिलेल्या खूप नवीन देणग्या यांना बादशहाची मंजुरी घेतली. ही गोष्ट श्रावण शुद्ध ६ स घडली. त्याच्या निरपेक्ष बुद्धीचें

आश्चर्य बादशहाला वाटल्यामुळें त्याचा मुलगा नामशेटी यास बादशहानें सरदारकी दिली.

शिलर, जोहान ख्रिस्तोप फ्रेड्रिक व्हॉन् (१७५९-१८०५):—नामांकित जर्मन कवि व नाटककार. याचा जन्म १० नव्हेंबर १७५९ सालीं वर्टेंबर्ग येथील मार्बाख या गांवीं झाला. याचे वडिल सैन्यांत शस्त्रक्रियाविशारद डॉक्टर होते. यानें प्रथम कायद्याचा अभ्यास केला पण पुढें वैद्यकीचा अभ्यास करून इ. स. १७८० सालीं स्टुट्गार्ट येथें सैन्यांत सर्जन म्हणून त्यानें व्यवसाय आरंभला. हा व्यवसाय संभाळून तो काव्यें व नाटकें लिहिण्याकडे आपलें लक्ष घालूं लागला. इ. स. १७८१ त त्याचें पहिलें नाटक Die Rauber प्रसिद्ध झालें. या नाटकामुळें शिलर—एकदम लोकप्रिय होऊन 'तेजस्वी साहित्तिक' म्हणून लोकांच्या निदर्शनास आला. या लोकप्रियतेमुळें शिलरचा उत्साह अनेक पटीनें वाढला व त्यानें आपली सर्जनची नोकरी सोडून देऊन आणखी नाटकें लिहिण्याचा उपक्रम सुरूं केला. इ. स. १७८३ मध्यें Fiesco व इ. स. १७८४ मध्यें Kabale und Liebe हीं त्यानें दोन नाटकें लिहून प्रसिद्ध केलीं. या दोन नाटकांनीं त्याच्या कीर्तींत निःसंशय भर पडली. इ. स. १७८७ मध्यें त्यानें Don Carlos हें नाटक प्रसिद्ध केलें. शिलरची ही पहिली विदग्ध कलाकृति.


शिलर

नामांकित तत्त्वज्ञ कँट याच्या ओळखीनें जेना येथील विश्वविद्यालयामध्यें त्याची प्रोफेसरच्या जागीं नेमणूक झाली. तेथें त्यानें इतिहास व सौंदर्यशास्त्र (Aesthetics) यांचा खोल अभ्यास केला व १७८८ ते १७९६ या कालांत ' A History of the Revolt of the Netherlands,' ' A popular History of the Thirty years' war,' ' Letters on the Aesthetic Education of Man ' व ' On Naive and Sentimental Poetry ' हे ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले.

इ. स. १७९९ नंतरच्या शिलरच्या कलाकृती गुणाच्या दृष्टीनें एकापेक्षां दुसरी वरचढ अशा होत गेल्या आहेत. शिलरच्या महत्त्वाच्या कृति म्हणजे— Der Taucher, Der Taucher, Der Handschuh, Der Ring des Polykrates, Die Kraniche des Ibykus, Die Kunstler. इ. स. ९ मे १८०५ रोजीं या थोर पुरुषाचा अंत झाला.

शिलर यास ' जर्मनीचा शेक्सपीयर ' म्हणून संबोधण्यांत येतें; उत्कृष्ट नाटककाराप्रमाणें राष्ट्रकवि म्हणूनहि त्याचें स्थान जर्मनीच्या इतिहासांत अढळ आहे. याच्या लेखनावर गटे या महान तत्त्वज्ञान्याची छाप पडली आहे.

शिवणयंत्रः—यांत दोन प्रकार आहेत. एक हातशिवणयंत्र व दुसरें पायशिवणयंत्र. १७९० मध्यें टॉमस सेंट या गृहस्थानें कातडीं शिवण्यासाठीं एक शिवणयंत्र तयार केलें. यानंतर बार्थलेमी थिमॉनी या फ्रेंच मनुष्यानें १८३० मध्यें वरच्या यंत्रांत सुधारणा करून कापड किंवा कातडें आपोआप सरकत जाईल अशी व्यवस्था केली. १८४१ मध्यें न्यूटन व आर्चबोल्ड यांनीं टोंकाकडेच नेढें असणारी सुई शोधून काढली व १८४६ मध्यें येलिया हो यानें तिढ्याचा टांका बसेल अशी यांत्रिक रचना केली. यानंतर सिंगर नांवाच्या अमेरिकन संशोधकानें सांखळीच्या टाक्याचें यंत्र केलें. यापुढची सर्व प्रगति सिंगरकडेच जाते. आपल्याकडे १९३१ सालीं विनायक महादेव वैद्य यांनीं टांक्याबरोबरच गांठ बसणाऱ्या शिवणयंत्राचें पेटंट घेतलेलें आहे.

शिवाजी (१६३०-१६८०):—महाराष्ट्राचा अमर महापुरुष. शिवनेरी किल्ल्यावर शिवाजीचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजीं झाला. वडील शहाजी केव्हां विजापूरकरांची तर केव्हां निजामशाहीची ताबेदारी पत्करून सरदारी संभाळीत असत. निजामशाही बुडल्यावर इ. स. १६३६ मध्यें शहाजी विजापुरास स्थायिक झाला. पुढें शिवाजी बारा वर्षांचा होतांच शहाजीनें पत्नी जिजाबाई व शिवाजी यांची पुणें प्रांतीं रवानगी केली व बरोबर दादोजी कोंडदेव मलठणकर यांस दिले. दादोजीनें पुण्याच्या जहागिरीची नीट व्यवस्था लाविली व शिवाजीला त्यानें दांडपट्टा इत्यादींचें शिक्षण व प्रत्यक्ष कारभार कसा पाहावयाचा याचें शिक्षण दिलें. जिजाबाईनेंहि शिवाजीची मानसिक व नैतिक शिक्षणाची कामगिरी केली.

वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षापासून स्वराज्यस्थापनेसाठीं मावळच्या देशमुखांचीं मनें वळविण्याचा

प्रयत्न सुरू केला. पश्चिमेकडचा डोंगराळ मुलूख व किल्ले, नाक्याचीं ठाणीं पाहून येसाजी कंक, तानाजी मालुसरे व बाजी फसलकर या जिवलग मित्रांच्या सहाय्यानें तो पुढील बेत ठरवी. १६४६ मध्यें आपल्या जहागिरींतील तोरणा किल्ल्याची त्यानें डागडुजी सुरू केली तेव्हां त्याला मोहरांचा हांडा सांपडला. या द्रव्याच्या जोरावर त्यानें राजगड बांधला व हजारबाराशें मावळे (सैनिक) जमविले. १६४७ मध्यें दादोजी कोंडदेवाच्या मृत्यूमुळें सर्वच कारभार शिवाजीला पहावा लागला. लौकरच विजापूरच्या दरबारशीं खटके उडणार हें जाणून शिवाजीनें झपाट्यानें कोंडाणा व चाकण हे किल्ले किल्लेदारांना वश करून घेतले. कल्याणचा सुभेदार विजापूरला खजिना घेऊन जात होता तो लुटला व थेट राजापुरापर्यंत शिवाजीनें स्वारी केली. शहाजीची शिवाजीला फूस असलीच पाहिजे या समजुतीनें विजापूरच्या बादशहानें शहाजीला कैद केलें. (पुढच्या वर्षी त्याची मुक्तता झाली.)

१६५२ मध्यें विजापुराहून बाजी शामराज शिवाजीवर चालून आला, पण बाजी शामराजचा पराभव होऊन तो पळून गेला. १६५४ मध्यें शिवाजीनें पुरंदर किल्ला घेतला व जावळीच्या चंद्रराव मोऱ्यावर स्वारी केली. तेव्हां चंद्रराव रायगडास पळाला, पण १६५५ मध्यें शिवाजीनें रायगड घेतला तेव्हां मोरे शरण आला. पण आंतून त्यानें विजापूरशीं बोलणीं चालू ठेवलीं होतीं. हें उघडकीस आल्यावर शिवाजीनें चंद्रराव व त्याचीं दोन मुलें यांस ठार मारलें. चंद्रराव मोरे हा त्या प्रांताचा वजनदार सरदार होता. त्याच्या पाडावामुळें शिवाजीचा सर्वत्र वचक बसला.

शिवाजीची ही प्रगति न साहून विजापूर दरबारनें अफजलखानास शिवाजीच्या बंदोबस्तासाठीं प्रचंड फौज देऊन पाठविलें. अफजलखान पूर्वी वाईचा सरदार होता. त्याला त्या प्रांताची पूर्ण माहिती होती. त्यानें शिवाजीचा थोरला भाऊ संभाजी याला मारलें होतें. शिवाय शहाजीचें व त्याचें वांकडें होतें. अफजलखान येत आहे हें कळतांच शिवाजी प्रतापगडास आला. अफजलखान वाईला आल्यावर त्यानें शिवाजीला किल्ले देऊन शरण येण्याबद्दल निरोप पाठविला. शिवाजीनें खानाची मागणी मान्य असल्याचा उलट निरोप पाठवून त्याला जावळीस बोलाविलें. शेवटीं १० नोव्हेंबर १६५९ रोजीं अफजलखान व शिवाजीची प्रतापगडावर भेट झाली. भेटीच्या वेळीं अफजलखानानें विश्वासघात करून शिवाजीच्या अंगांत हत्यार खुपसलें, पण शिवाजीच्या अंगांत चिलखत असल्यामुळें तो वांचला. लगेच शिवाजीनें उलट शस्त्र चालवून खानाला ठार केलें व आपल्या सैन्याला खानाच्या सैन्यावर चाल करण्यास सांगितलें. या लढाईंत शिवाजीला जय मिळाला व मोठें संकट टळलें.

यानंतर शिवाजीनें १६६० मध्यें पन्हाळगड घेतला. तेव्हां विजापुराहून रुस्तुमजमा चालून आला, पण कोल्हापूरच्या लढाईंत त्याचा पराभव झाला. यानंतर नेताजी पालकर खुद्द विजापूरच्या हद्दींत शिरून गांवें घेत चालला. तेव्हां सिद्दी जोहार नांवाच्या सरदारानें शिवाजीस पन्हाळ्याला पकडलें व किल्ल्याला वेढा घालून तो बसला. याच वेळीं औरंगजेबाचा मामा शाइस्तेखान दक्षिणेंत येऊन त्यानें पुणें, सुपें, चाकण हे भाग घेतले. तेव्हां शिवाजीनें जोहाराशीं तहाचें बोलणें चालविलें. त्यामुळें वेढा ढिला झाला. ही संधि साधून शिवाजीनें निवडक लोकांनिशीं मध्यरात्रीं पन्हाळा सोडून खिंडींतून विशाळगडाकडे प्रयाण केलें. ही बातमी लागतांच शिद्दी जोहार त्याच्या मागें लागला, पण त्याला बाजी देशपांडे या शूर सरदारानें थोपवून धरलें व त्याचे तीन हल्ले परतविले. चौथ्या हल्ल्याचे वेळीं बाजी देशपांड्यास गोळी लागली. इतक्यांत विशाळगडाला शिवाजी सुखरूप पोंचल्याच्या तोफा त्याला ऐकूं आल्या तेव्हां 'मी सुखानें मरतों' असें म्हणून बाजीनें प्राण सोडला. सिद्दीनें विशाळगड घेण्याचा प्रयत्न केला, पण त्याला यश आलें नाहीं. पण दोघांशीं एकदम युद्ध जमणार नाहीं हें पाहून शिवाजीनें पन्हाळा सिद्दीला देऊन तह केला व तो उत्तरेला वळला.

१६६१ व १६६३ हीं दोन वर्षें शाइस्तेखान पुण्यास तळ देऊन होता. तेवढ्यांत शिवाजीनें राजापूर येथें इंग्रजांच्या वखारीवर हल्ला करून खंडणी वसूल केली. कारण त्यांनीं पन्हाळगडच्या वेढ्यांत सिद्दी जोहाराला दारूगोळा पुरविला होता. पुढें ता. ५ एप्रिल १६६३ रोजीं तो निवडक लोक बरोबर घेऊन पुण्यास निघाला व मोंगल शिपायांस ओळखूं येऊं नये म्हणून तो व त्याचे लोक लग्नाच्या मिरवणुकींतून गांवांत शिरले. खान शिवाजीच्या वाड्यांतच राहात होता. रात्रीच्या

सुमारास वाड्याच्या मागची भिंत पाडून शिवाजी आंत शिरला आणि थेट खानाच्या महालांत जाऊन उभा राहिला. खान त्याला पाहतांच जनान्यांत शिरला. इतक्यांत एका चाणाक्ष स्त्रीनें दिवे मालविले. त्याबरोबर खान खिडकींतून निसटला; पण शिवाजीनें तरवारीनें त्याचीं बोटें छाटलीं. या गर्दीत खानाचा मुलगाहि मेला. लगेच शिवाजी व त्याचें सैन्य सिंहगडास निघून गेलें. शाइस्तखानानें सिंहगडावर सैन्य पाठविलें, पण त्यांत त्याचा पराभव झाला. शाइस्तखान औरंगजेब बादशहाचा मामा. त्याच्यासारख्या



श्रीछत्रपति शिवाजी महाराज

मोठ्या सरदाराच्या पराभवामुळें शिवाजीचा चोहोंकडे विलक्षण दरारा बसला. शाइस्तखान लगेच परत गेला. लगेच शिवाजीनें सुरतेवर हल्ला करून तें शहर लुटलें.

इ. स. १६६५ च्या प्रारंभीं औरंगजेबानें जयसिंग व दिलेरखान ह्या सरदारांस शिवाजीवर पाठविलें. जयसिंग हा वृद्ध व अनुभवी सेनापती होता. त्यानें स्वारीचीं सर्व सूत्रें हातीं घेतलीं. त्यानें पुरंदरला वेढा घालून तो घेतला. तेव्हां मोंगलाचें सैन्य व इतर परिस्थिति पाहून शिवाजीनें तह केला; व २३ किल्ले व ४० लक्ष होन दिले. जयसिंगला डोंगराळ प्रांतांत लढण्याची कटकट नकोच होती. त्यानें तह मान्य करून शिवाजीला आग्र्याला बादशहाच्या भेटीस जाण्याबद्दल सुचविलें. शिवाजीला उत्तरेकडील परिस्थिति एकदां पहावयाची होतीच. त्यानें आग्र्याला प्रयाण केलें. औरंगजेबाच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त दरबार होता (१२मे१६६६). त्या दिवशीं शिवाजी दरबारांत गेला. शिवाजीनें बादशहाला नजराणा देऊन सलाम केला तेव्हां बादशहानें त्यास तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत उभें राहण्यास सांगितलें, त्यामुळें शिवाजीस संताप आला व तो मोठ्यानें रामसिंगाशीं बोलूं लागला तेव्हां गडबड उडाली व दरबार बरखास्त झाला. औरंगजेबानें त्यास कैदेंत टाकलें.

नंतर शिवाजीनें सरदारांस पेटाऱ्यांतून मेवामिठाई पाठविण्यास सुरवात केली व कांहीं दिवसांनीं स्वतः तो व मुलगा संभाजी दोघे पेटाऱ्यांत बसून आग्र्याबाहेर पडले. नंतर संन्याशाच्या वेशानें शिवाजी मथुरा, काशी, गया, जगन्नाथपुरी, गोंडवण, हैद्राबाद या मार्गानें रायगडास परत आला. (डिसें. १६६६.)

परत आल्यावर मुअज्जम (औरंगजेबाचा मुलगा) याशीं तहाचें बोलणें करून त्यानें तह केला. पण फार दिवस तह टिकणें शक्य नव्हतें. कांहींतरी कुरापत काढून औरंगजेबानें लढाई सुरू केली. तेव्हां शिवाजीनें आपले गेलेले सर्व किल्ले परत घेतले. या सर्वांत सिंहगड घेतल्याची व तानाजी मालुसऱ्याच्या मृत्यूची हकीगत रोमांचकारी आहे. आपला मुलूख घेतल्यावर शिवाजीनें मोंगल मुलुखांत स्वाऱ्या केल्या. १६७२ मध्यें साल्हेर येथें मोंगल सैन्याबरोबर मोठी लढाई झाली व तींत मोंगलांचा मोठा पराभव झाला.

यानंतर स्वतःचें वरीष्ठपण जाहीर करण्यासाठीं, स्वतंत्र अस्तित्व जाहीर करण्यासाठीं व हें मराठे सरदारानें स्वतःसाठीं कमावलेलें राज्य नसून तें गोब्राह्मणांच्या प्रतिपालनाकरितां स्थापन झालेलें हिंदवी स्वराज्य आहे हें जगास व आपल्या लोकांस जाहीर व्हावें यासाठीं शिवाजीनें ता. ६ जून १६७४ (ज्येष्ठ शु. १३ शके १५९६) रोजीं स्वतःस रायगडावर राज्याभिषेक करून घेतला. यासाठीं काशीहून गागाभट्ट नांवाचा विद्वान ब्राह्मण त्यानें आणला होता.

यानंतर शिवाजी दक्षिणदिग्विजयार्थ निघाला. कुतुबशाहीचें रक्षण करण्याचें अभिवचन देऊन त्यानें कुतुबशहाकडून तोफा व पैसा घेऊन कर्नाटकावर स्वारी केली व जिंजी, वेलोर व बंगळूरच्या आसपासचा मुलूख त्यानें काबीज केला. त्याचा धाकटा (सावत्र) भाऊ तंजावरास होता त्यानें मुसलमानांशीं संगनमत करून शिवाजीचा सेनापती हंबीरराव मोहिते याजवर छापा घातला. पण त्यांत त्याचा पराभव झाला. नंतर शिवाजीनें व्यंकोजीची भेट घेतली. त्यास त्याच्या जहागिरीवर

कायम केलें व स्वराज्याची कल्पना समजावून देऊन तो परतला. याच वेळीं विजापूरच्या आदिलशाहीवर मुअज्जम व दिलेरखान चालून आले. विजापूर दरबारनें काकुळतीनें शिवाजीकडे सहाय्याची विनंति केली तेव्हां शिवाजीनें सहाय्य करण्याचें ठरवून मोंगलांशीं लढाई दिली. दिलेरखानाचा पराभव होऊन तो औरंगाबादेला पळून गेला. या कामगिरीबद्दल विजापूर दरबारनें व्यंकोजीवरील आपले हक्क सोडले व कृष्णा नदीपासून तंजावरपर्यंत जिंकलेल्या प्रदेशावरील शिवाजीची मालकी मान्य केली.

यानंतर शिवाजी आजारी पडला व ५ एप्रिल १६८० रोजीं रायगडीं मृत्यु पावला. शिवाजीस आठ बायका होत्या. पैकीं निंबाळकरांची सईबाई ही वडील होती. हिलाच संभाजी झाला. शिवाजीची तिसरी बायको सोयराबाई (शिर्के घराणें) हिला राजाराम झाला. शिवाजीला सखूबाई नांवाची एक मुलगी होती व ती बजाजी निंबाळकराच्या मुलास दिली होती.

शिवाजीची राज्यव्यवस्था आदर्श होती. लष्कर व आरमार नेहमीं सुसज्ज होतें. त्याची अष्टप्रधान पद्धति नांवाजलेली होती. शिवाजीला परकीय भाषेचीही चीड होती, हें त्यानें उर्दू शब्दांच्या जागीं संस्कृत शब्द उपयोगांत आणण्याकरितां तयार करविलेल्या ' राज्यव्यवहारकोश ' या ग्रंथावरून दिसतें. सरकारी अधिकारी पगारी असावेत, त्यांची गुणावर निवड व्हावी व वंशपरंपरागत नेमणुकी असूं नयेत हें त्याचें धोरण होतें.

मुसलमानी राज्यांत नोकरीस राहून त्यांच्या छत्राखालीं मोठें व्हावें व स्वतःच्या गौरवार्थ मांडलिकी जहागीर संपादन करावी, ही पिढ्यान्‌पिढ्या बद्धमूल झालेली संवय झुगारून देऊन स्वतःच्या हिंमतीवर स्वतंत्र राज्य स्थापन करून हिंदु संस्कृतीस उजळा देणारा पुरुष शिवाजी होय. तो विजयानें धुंद झाला नाहीं, पराभवानें निराश झाला नाहीं किंवा संकटानें डगमगलाहि नाहीं. त्याच्या शुद्धाचरणाबद्दल त्याचे शत्रूसुद्धां ग्वाही देतात. त्याच्या धार्मिक सहिष्णुतेची साक्ष देवळांप्रमाणें पिरांनाही त्यानें इनामें करून दिलीं यावरून पटण्यासारखी आहे.

शिवाजीनें आपल्या गुणांनीं स्वतःस अलौकिकत्व प्राप्त करून घेतलें, स्वदेशास स्वातंत्र्य प्राप्त करून दिलें, आपल्या पिढींतील लोकांस भाग्याचा दिवस दाखविला व पुढील पिढ्यांना आशेचा आधार व संतत स्फूर्तीचा ठेवा करून दिला, यांत शंका नाहीं.

शिशिर (ऋतु):—सहावा ऋतु. माघ व फाल्गुन या आपल्या महिन्यांत व फेब्रुवारी आणि मार्च या इंग्रजी महिन्यांत हा काल येतो. यावेळीं मकर व कुंभ या राशींतून सूर्य जात असतो.

या ऋतूच्या उत्तरार्धापासून उन्हाळा सुरू होतो. माघ महिन्यांत आंब्याला मोहोर फुटतो. वृक्षांना नवी पालवी फुटूं लागते.


रथसप्तमी (माघ शुद्ध सप्तमी), शिवरात्र, रामदासनवमी, शिवजन्मोत्सव, होळी, रंगपंचमी हे व्रतोत्सव येतात.

शिसें:—निळसर करड्या रंगाचा मऊ धातू. याचें रासायनिक चिन्ह Pb. परामाणू वजन २०७·१, विशिष्ट गुरुत्व ११·४ असून ३२७° सेंटिग्रेड एवढ्या उष्णताबिंदूला शिसें वितळतें. शिशाची उष्णतावाहकशक्ति फार कमी आहे. शिसें मध्येंच तोडलें तर तुटलेला भाग चकचकतो, पण त्यावर लौकरच हवेचा परिणाम होऊन तें काळें पडतें. शिसें पाण्याच्या ११½ पटीनें जड आहे. ठोकून शिशाचा आकार वाढवितां येतो. शिशाच्या अंगीं स्थितिस्थापकत्व नाहीं. वितळल्यानंतर शिसें थंड झालें म्हणजे त्याचा आकार कमी होतो.

शिशाचे पुष्कळ उपयोग आहेत. शिसें सहजासहजीं गंजत नसल्यामुळें पाण्याच्या टाक्याला आंतून बाहेरून कल्हई करण्यासाठीं त्याचा उपयोग होतो. पाण्याच्या नळासाठींहि त्याचा उपयोग होत असलेला आपण सर्वत्र पाहतों. पिस्तुल, बंदुक यांच्या गोळ्यासाठीं त्याचा उपयोग करतात. शिसें व अँटिमनी यांच्या मिश्र धातूचे छापखान्यासाठीं लागणारा टाइप पाडतात. याशिवाय प्राणवायूशीं संयुक्त (Oxide) असें लिथार्ज व रेड लेड् (तांबडें शिसें) या नांवांचे पदार्थ तयार करून त्यांचा रंग व कांच तयार करण्यांत उपयोग करतात. कर्बयुक्त शिसें हें कांहीं रंग तयार करतांना एक अवश्य घटक मानतात. याशिवाय अनेक वस्तू शिशापासून तयार करतात.

शीर्षासन (विपरीत करणी)—दोन्ही गुडघ्यावर बसून दोन्ही हातांचे पंजे मुंढा हात अंतरानें आपल्यासमोर जमिनीवर टेकावे. बोटें समोर ताठ करून पसरावीं. दोन्ही हातांच्या पलीकडे दोन्ही हातापासून समान


अंतरावर शेंडी व कपाळ याचे मध्यावरील मस्तकाचा भाग जमिनीवर (जाड आसनावर) टेकावा. दोन हातांचे पंजे व डोकें यांचा एक समभुज त्रिकोन होईल. पंजे व डोकें यावर शरीराचा भार घेऊन पहिल्यानें गुडघे छातीशीं घेऊन कुल्यांचा भाग वर उचलावा. पायाचे आंगठे उचलून घ्यावे व शरीराचा तोल सांभाळीत पाय आकाशाच्या दिशेनें ताठ करावे. टांचा, पाठीचा कणा व मानेचा व डोक्याचा, पाठीचा भाग एका रेषेंत येईल अशा रीतीनें सर्व शरीर तोलावें. आंगठे ऊर्ध्व करावे. पोट आंत ओढून श्वासक्रिया चालू करावी. दृष्टि नासाग्रीं वा भ्रूमध्यावर करावी.हळूं हळूं सरावानें सर्व भार डोक्यावर घेऊन हांतांच्या पंज्यांवरील भार कमी करावा. फक्त तोल सांभाळण्याकरितां त्यांचा जमिनीशीं स्पर्श ठेवावा व त्यावर भार टाकूं नये.



शीर्षासन

दुसरा प्रकारः—गुडघे जमिनीवर टेकून बसावें. ओणवें होऊन ढुंगण वर उचलून आपलें डोकें जमिनीवर (जाड आसनावर) टेकावें. दोन्ही हातांचे कोंपरापासून पुढील भाग डोक्याचे दोन्ही बाजूस जमिनीवर टेकून दोन्ही पंजांनीं डोक्याचे पाठीमागचे बाजूस बोटांची मगरमिठी बसवावी. दोन्ही हातांच्या करांगुल्या जमिनीवर याव्या. ढुंगण वर उचलून गुडघे वर उचलून छातीशीं आणावे. कोंपर व डोकें यावर शरीराचा भार घेऊन पायाचे आंगठे जमिनीपासून वर उचलावे. पहिल्या प्रकाराप्रमाणें सर्व शरीर वर उचलून पाय ऊर्ध्व दिशेस ताठ करावे. दृष्टि नासाग्रीं ठेवावी.

(१) शीर्षासन करून स्थिर झाल्यावर पायांच्या पिंढऱ्या गुडघ्यांत वाकवून पद्मासन घालावें. यास ' ऊर्ध्वपद्मशीर्षासन ' म्हणतात. (२) शीर्षासन स्थिर झाल्यावर पाय गुडघ्यांत जुळवून वांकवून पिंढऱ्या मांडीच्या मागच्या बाजूस लावून टांचा कुल्यावर दाबाव्या. यास ' ऊर्ध्ववज्रशीर्षासन ' म्हणतात.



उर्ध्वपद्मशीर्षासन

शीर्षासनानें रुधिराभिसरण चांगलें होतें. अग्नी प्रदीप्त होतो. सर्व तऱ्हेचे शीर्षरोग नाहींसे होतात. सतत अभ्यास केल्यास पांढरे केंस काळे होतात.

शुकाचार्य—व्यास व घृताची यांचा हा मुलगा. दुसऱ्या ठिकाणीं हा व्यास व वटिका यांचा मुलगा म्हणून उल्लेख केला आहे. याची मुंज महादेवानें केली. मुंजीच्या वेळीं इंद्रानें याला कमंडलु व वस्त्रें दिलीं. वेद, उपनिषदें, वेदसंग्रह, इतिहास, राजनीति, मोक्षधर्म यांचें शिक्षण यानें बृहस्पतीकडून घेतलें. नंतर हा बहुलाश्व जनकाकडे, ब्रह्मज्ञान शिकण्याकरितां व शंकानिरसण्यार्थ गेला. याठिकाणीं जनकानें त्यास स्त्रीजालांत गोवण्याचा व्यर्थ प्रयत्न करून पाहिला. पुढें जनकाकडून आल्यावर यानें पीवरीशीं लग्न केलें, व तीपासून यास चार मुलगे (गौरप्रभ, भूरि, देवश्रुत व कृष्ण) व एक कीर्तिकन्या ही मुलगी अशीं पांच आपत्यें झालीं. महाभारत व स्कंधपुराण यांत हा ब्रह्मचारी होता असें लिहिलें आहे. याला धर्म व जगदुत्पत्ति या विषयांचें ज्ञान व्यासाकडून मिळालें. तसेंच याला व्यासांनीं भागवतदेखील सांगितलें. यानें तें परीक्षिताला सांगितलें. भागवत सांगतेवेळीं हा तरुण तेजस्वी व आजानुबाहु होता. धर्माच्या मयसभेलादेखील हा उपस्थित होता. यानें गंधर्वादिकांस भारत कथन केलें. नारदानें याला वैराग्याचा उपदेश केला. यानें आदित्यलोकांत जाण्याच्या इच्छेनें कैलास शिखरावरून उड्डाण केलें व पुढें हा पंचमहाभूतांत विलीन झाला.

शुक्र—सूर्यमालेंतील ग्रह. अंतराचे अनुक्रमानें सूर्यापासून दुसरा. बुध पहिला. त्याचें सूर्यापासूनचें मध्यम अंतर ६७२०००० मैल आहे. अंतर्योगाचे वेळीं शुक्र पृथ्वीपासून २६०००००० मैल व बहिर्योगाचे वेळीं १६०००००० मैल अंतरावर असतो. अंतर्योग

व बहिर्योग यांचे वेळीं त्याचें बिंब अनुक्रमें ६० विकला व १० विकला असतें. आकारानें शुक्र, बुध व मंगळ यांचेपेक्षां मोठा; पण इतर ग्रहाहून लहान. आकार व द्रव्य यांच्या बाबतींत तो पृथ्वीहून थोडासा लहानच आहे. त्याचा व्यास ७७०० मैल आहे व द्रव्य पृथ्वीच्या ०.८१ आहे. सूर्याभोंवतीं प्रदक्षिणा करण्याला त्याला २२५ दिवस लागतात; परंतु त्याचा आमा-प्रदक्षिणेचा काल ५८४ दिवस असतो.

शुक्राचें तेज फार मोठें आहे; त्याच्या खालोखाल गुरूचें. काळोख्या रात्रीं शुक्राचें थोडेसें चांदणें पडतें. सूर्यापासून ८ अंशावरच शुक्र दिसूं लागतो पण चंद्र सूर्यापासून १२ अंशावर गेल्यावरच दिसूं लागतो; पण सूर्याच्या प्रकाशास न जुमानतां दिसणारा शुक्र हा एकच ग्रह आहे. दुर्बिणींतून चंद्रापेक्षां शुक्राच्या कला कम-जास्त दिसतात. चंद्र व शुक्र यांच्या कलावृद्धीचे नियम एकच आहेत. चंद्र पृथ्वीभोंवतीं फिरतो; शुक्र सूर्याभोंवतीं फिरतो. अंतर्योगाचे वेळीं शुक्राची आमावास्या असते; बहिर्योगाचे वेळीं पौर्णिमा असते. पृथ्वी व शुक्र यांच्या कक्षांची पातळी भिन्न असल्यामुळें शुक्र प्रत्येक अंत-र्योगाचे वेळीं थेट सूर्याचे आड येत नाहीं; तो त्या वेळीं किंचित् उत्तरेस व दक्षिणेस असतो. शुक्र सूर्य-बिंबाचें अधिक्रमण फार वर्षांनीं करतो. २४३ वर्षांत फक्त चार वेळां तें होतें.

शुक्रावर वातावरण आहे; तें फार दाट आहे; त्यांत अभ्रें असतात. म्हणून त्याच्या पृष्ठभागावर जमीन, पाणी, पर्वत इत्यादिकांच्या स्थाई खुणा दिसत नाहींत. शुक्राला चंद्र नाहीं. पुष्कळ बाबतींत शुक्राचें पृथ्वीशीं साम्य आहे. आकार व द्रव्य या बाबतींतील त्याचें पृथ्वीशीं असलेलें साम्य व त्यावरील दाट वातावरण यांवरून त्यावर कोणत्या तरी प्राण्यांची वस्ती असावी असें अनुमान निघतें.

शुक्राला अक्षप्रदक्षिणेला किती वेळ लागतो याचें निश्चित ज्ञान अद्याप झालें नाहीं.

शुक्र (ज्योतिष):—हा स्त्रीग्रह असून सौंदर्याचा व प्रीतीचा कारक आहे. शुक्र हा पृथ्वीएवढा मोठा असून कृष्णपक्षांत उत्तररात्रीं पायाखालचें दिसण्याइतका त्याचा उज्ज्वल प्रकाश पसरलेला असतो. गुरूला पांच चंद्र आहेत. शुक्राला एकहि चंद्र नाहीं. तथापि त्याच्या मोहक नेत्रयुग्मामुळें सर्व जग वेडावून गेलेलें आहे.

शुक्र हा रतिविलास, स्त्रीसुख, विवाह, ललितकला, वक्तृत्व, लेखनकला, शुक्रधातु, संपत्ति, उत्तमोत्तम वस्त्रें इत्यादि गोष्टींचा (शुभ असतां) कारक आहे. याच्या उलट तो अशुभ असतां मदिरा व मदिराक्षी यांचे बाबतींत पूर्ण अतिरेक, सट्टे, लॉटरी, जुगारी, जारणमारणविद्या, व्यभिचारवृत्ति इत्यादि गोष्टी दर्शवितो.

शुक्रप्रधान माणसें अतिशय सुंदर, कलाकुशल व प्रेम ही वस्तु जाणणारीं असतात. हीं माणसें मोत्या-सारखें सुंदर अक्षर काढतात, व्यवस्थित टापटीपीचा पोषाख करतात; तीं बोलतांना मधुरभाषणीं, आर्जवीं असतात. स्वभाव समाजप्रिय व दुसऱ्यास आकर्षण करणारा असतो. मीन राशींत शुक्र उच्च असतो व कन्या राशींत नीचीचा असतो. तूळ व वृषभ या त्याच्या स्वगृहराशी असून, शुक्र अशुभ योगानें पीडित अस-ल्यास अगर वृश्चिक, मकर या राशींत असल्यास त्याची इष्कबाजी, फटकळपणा, असली हलकट वृत्ति पहावयास मिळते.

गुरु व शुक्र हे दोघेहि शुभग्रह आहेत, पण त्यांच्यांत स्वभावभेद फार तीव्र आहे. गुरु हा सत्त्वगुणी, तर शुक्र राजस. गुरु प्रौढ व ज्ञानी, शुक्र तरुण व विलासी. शुक्र मदिरा व मदिराक्षी यांना जवळ करणारा, तर गुरु या गोष्टींना 'अविद्या' असें मानून त्यापासून दूर राहणारा. शुक्र म्हणजे 'संजीवनी' हें खरें. पण ती संजीवनी अखेर शुक्राजवळ राहूं शकत नाहीं. हें गुरु जाणतो हेंच त्याचें मोठेंपण. गुरु हा शुक्राला शत्रू मानतो; पण शुक्र गुरूला शत्रू न मानतां 'सम' मानतो. उघडच आहे कीं, शत्रु अगर प्रतिस्पर्धी झाला तरी प्रौढत्व आणि ज्ञानाची श्रेष्ठता यांपुढें कोणालाहि मान वांकवावी लागणारच. गुरु-शुक्राचा कुंडलींत शुभस्थानांतून त्रिकोण किंवा त्रिरेका-दशयोग असणें फार शुभ, पण जर त्यांचा अशुभयोग व समसप्तकदेखील प्रेमाच्या बाबतींत बेबनाव व निराशाच प्रत्ययाला आणून देते.

शुक्राचार्य:—दैत्यांचा गुरु. भृगु व दिव्या यांचा पुत्र. हा अघोराचा शिष्य. यानें हिरण्याक्षाला निग्रहविधि सांगितला. बली वामनाला त्रिपादभूमि दान देतांना हा आड आल्यामुळें याचा एक डोळा फुटला. या कारणानें त्यास 'एकाक्ष' म्हणतात. यानें जालंदरास संजीवनीविद्या दिली. अंगिरसाच्या पक्षपाती शिक्षणा-

मुळें यानें शिवाची आराधना करून मृतसंजीवनी-विद्या मिळविली. याच्याकडून पुढें ही विद्या कचाला मिळाली. यानें एक हजार अध्यायांचें 'बार्हस्पत्यशास्त्र' रचिलें आहें. याला देवयानी ही एकटीच मुलगी होती.

शेअरबाजारः—आंतरराष्ट्रीय व्यापारांत शिरणाऱ्या प्रत्येक महत्त्वाच्या जिन्नसांत बाराहि महिने मोठे सट्टे चालतात त्याचप्रमाणें शेअरबाजारांतसुद्धां रोजच्या रोज चांगल्या कंपन्यांच्या शेअर्समध्यें सट्टे चालू असतात. शेअरबाजार ही एक सट्टे करणाऱ्या लोकांची मोठी संस्था आहे. मुंबईसारख्या व्यापारी शहरांत अशा संस्था असतात. या संस्थेंत शिरकाव होण्यास आपणांस या संस्थेचे सभासद व्हावें लागतें. सभासद होण्यापूर्वी हजारांनीं मोजण्याजोगी रक्कम प्रवेश फी म्हणून द्यावी लागते. नाहीं तर आपणास शेअर्सचा व्यवहार शेअर्सच्या दलालामार्फत (Share-Broker) करावा लागेल व विक्रीखरेदीच्या वेळीं दलालाची फी द्यावी लागेल. शेअर्सचा व्यापार कापूस, गहूं वगैरे महत्त्वाच्या जिन्नसांच्या व्यापारा-प्रमाणेंच आहे. भावाच्या भावी होणाऱ्या तेजीमंदीवर व्यापारी लोक या जिन्नसांत सौदे ठरवितात. ठरलेल्या किंमतीपेक्षां भाव उतरल्यास गिऱ्हाइकास विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यास दोहोंमधील फरक भरावा लागतो. भाव चढल्यास विक्री करणारा व्यापारी गिऱ्हाइकास दोहोंमधील फरक देतो. द्यावयाचा अगर घ्यावयाचा फरक दर पंधरवड्यानंतरच्या भावावरून ठरविण्याची वहिवाट आहे. जी गोष्ट इतर जिन्नसांची तीच शेअर्सची. बाजारांत शेअर्सचे भाव ज्या कंपन्यांचे शेअर्स विक्रीखरेदीच्या भानगडींत शिरतात त्या कंपन्यांच्या नफ्यातोट्यावर व त्यांच्या एकंदर आर्थिक स्थितीवर बदलत असतात. जी कंपनी व्यापाऱ्यांच्या दृष्टीनें चांगली नाहीं अगर जींत तोटा राहाण्याचा पुढें संभव आहे अशा कंपन्यांचे शेअर्स भावांत उतरतात. अर्थात् एकादा व्यापारी कंपनीविषयीं पुढील जी अटकळ बांधतो ती सर्वथा स्पृहणीय असतेच असें नाहीं. दुसरा एकादा व्यापारी निराळीच अटकळ करील. भाव चढेल असें म्हणणाऱ्या व्यापाऱ्यांना बुल्स् (Bulls) म्हणतात. उतरेल म्हणणाऱ्यांना (Bears) बेअर्स म्हणतात. या दोघांच्या सामन्यांत शेअर्सचे भाव खालीवर होत असतात. अर्थात् विक्रीखरेदीच्या वायद्यांत प्रत्यक्ष शेअर्स कोणीच कोणास देत अगर घेत नाहीं. फक्त वायदा पटविण्याच्या दिवशीं फरकवाटी मात्र होते. या बाजारांत सरकारी कर्जरोखेसुद्धां व्यापारांत शिरतात. त्यांचाहि भाव बऱ्याच गोष्टींवर अवलंबून असतो. शेअर्सचा भाव रोख्यापेक्षां जास्त बदलतो.

शेक्स्पीयर, वुइल्यम (१५६४–१६१६):—इंग्लंडचा एक महान् नाटककार. याचा जन्म वॉर्विक्शायरमधील स्ट्रॅटफोर्ड ऑन् अॅव्हॉन् येथें २६ एप्रिल, १५६४ सालीं झाला. वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत याचें बरेंच शिक्षण झालें. लॅटिन भाषेंत यानें बरेंच प्राविण्य संपादन केलें होतें. एकोणिसाव्या वर्षी याचा विवाह अॅन् नांवाच्या मुलीशीं झाला. त्याची बायको त्याच्यापेक्षां आठ वर्षांनीं मोठी होती.



वुइल्यम शेक्स्पीयर

इ. स. १५८६ सालीं शेक्स्पीयरनें आपली जन्मभूमि सोडून उदरनिर्वाहार्थ शहराचा आश्रय केला. कांहीं दिवस ताल्या पंतोजीचें काम केल्यावर इ. स. १५८७ सालीं लंडन येथें एका नाटक-मंडळींत त्यानें प्रवेश केला. या कंपनींत त्यानें द्वाररक्षकापासून अव्वल दर्जापर्यंत सर्व तऱ्हेचीं कामें केलीं. या कंपनीस राजाश्रय चांगला मिळाला.

शेक्स्पीयरनें प्रारंभीं बेन जॉन्सन वगैरे नाटककारांच्या नाटकांत स्वतः भूमिका केल्या. पुढें नाट्याचें तंत्र समजत गेल्यावर त्यानें स्वतः नाटकें लिहिलीं व त्यांपैकीं कांहीं नाटकांत स्वतः भूमिका केल्या. शेक्स्पीयरनें एकूण लहानमोठीं सदतीस नाटकें लिहिलीं; त्यांत हॅम्लेट ही त्याची उत्कृष्ट कलाकृति मानतात. त्याचीं इतर महत्त्वाचीं नाटकें म्हणजे Merchant of Venice, Taming of the Shrew, Twelfth Night, The Tempest, Romeo and Juliet, Caesar, Othello, Macbeth, King Lear व Antony Cleopatra हीं होत.

शेक्स्पीयर हा उत्कृष्ट कविही होता. त्याचीं महत्त्वाचीं काव्यें म्हणजे—Venus and Adonis, Lucree व एकशें चौपन्न सुनीतें (Sonnets) हीं होत.

नाटकांच्या जोरावर शेक्सपीअरची मुळची गरीब स्थिति बरीच सुधारली. हा थोर पुरुष २३ एप्रिल १६१६ रोजीं ख्रिस्तवासी झाला.

जगांतील अव्वल दर्जाच्या नाटककारांत शेक्सपीयरला पहिलें स्थान आहे. त्याचें मानवी स्वभावाचें ज्ञान अत्यंत सूक्ष्म व अचूक होतें. शेक्सपीयरची भाषा प्रसाद, लालित्य, अर्थगांभिर्य वगैरे अनेक गुणांनीं नटलेली आहे. त्याला इंग्लिश भाषेचा जनक म्हणून मानण्यांत येते तें सार्थच आहे.

शेरिडन, रिचर्ड ब्रिन्स्ले बटलर, (१७५१–१८१६):—एक नामांकित ब्रिटिश नाटककार. याचा जन्म डब्लिन येथें ३० आक्टोबर १७५१ सालीं झाला. याचा बाप चांगल्यापैकीं नट होता. याचें शिक्षण हॅरो येथें झालें. याचे आईबाप सुशिक्षित असून त्यांना 'आपल्या मुलानें सुशिक्षित व्हावें' असें मनापासून वाटत होतें व त्याप्रमाणें मुलास शिक्षण देण्याची त्यांनीं व्यवस्था केली.



शेरिडिन

इ. स. १७७३ पासून त्यानें नाटकें लिहिण्यास सुरवात केली. त्याच वर्षी त्याचा इलिझाबेद लिन्ले नांवाच्या मुलीशीं विवाह झाला. इसवी सन १७७५ सालीं The Rivals हें त्याचें पहिलें नाटक प्रसिद्ध झालें. यानंतर १७७७ सालीं The School for Scandal हें नाटक प्रसिद्ध झालें. हें दुसरें नाटक लोकप्रिय होऊन शेरीडनचें नांव नाट्यसृष्टींत कायमपणें प्रस्थापित झालें. यानंतरची शेरीडनची साहित्यकृति म्हणजे The Critic ही होय.

शेरिडनचे अंगीं अव्वल दर्जाची वक्तृत्व–कला होती. या त्याच्या गुणामुळें त्यास पार्लमेंटमध्यें १७८० मध्यें सहज निवडून येतां आलें. तो व्हिग् होता. त्यानें पार्लमेंटमध्यें अनेक संस्मरणीय भाषणें केलीं आहेत. त्यांत वॉरन हेस्टिंग्जच्या चौकशीचे वेळीं त्यानें केलेलें भाषण अत्यंत महत्त्वाचें आहे.

शेरिडनचें अखेरचें आयुष्य घरगुती हालअपेष्टांत गेलें; त्यामुळें त्याला पार्लमेंटमधील आपली जागाहि टिकवितां आली नाहीं. १८१२ सालच्या निवडणुकींत तो पडला. तेथून पुढें त्याची आर्थिक परिस्थिति अधिकाधिक खालावत गेली व तो ७ जुलई १८१६ सालीं ख्रिस्तवासी झाला. शेरिडन हा चांगल्यापैकीं नाटककार, प्रभावी वक्ता व मार्मिक विनोद करणारा म्हणून प्रसिद्ध आहे.

शेले, पर्सी बेसी (१७९२–१८२२):—एक नामांकित इंग्लिश कवि. या कवीचा जन्म ४ ऑगस्ट १७९२ रोजीं ससेक्स परगण्यांतील फील्ड पॅलेस (वर्नहॅम) येथें झाला. याचें प्राथमिक शिक्षण आइलवर्थ येथें झाल्यावर पुढील शिक्षणासाठीं तो १८०४ सालीं ईटन येथें गेला. त्यानें येथें शाळेंत शिकत असतां Zastrozzi व St. Irvyne हीं दोन अद्‌भुतरम्य अशीं काव्यें लिहून प्रसिद्ध केलीं. इ. स. १८१० सालीं त्यानें ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी कॉलेजमध्यें प्रवेश केला. आध्यात्मशास्त्र (Metaphysics) व धार्मिक कर्मकाण्ड (Religious Polemics) या दोन्हींचा त्यानें मनःपूर्वक अभ्यास चालविला. हा अभ्यास चालविला असतां नास्तिकवादाची आवश्यकता (Necessity of Atheism) या विषयावर त्यानें एक महत्त्वाचा निबंध लिहून प्रसिद्ध केला; त्या प्रकाशनामुळें धर्ममार्तंडांमध्यें खळबळ उडाली व शेलेला कॉलेजमधून १८११ एप्रिलमध्यें हांकलून देण्यांत आलें.

शेलेनें ऑक्सफर्ड सोडून देऊन लंडन गांठलें व तेथेंच तो कांहीं दिवस राहिला. तेथें त्याचें हॅरिएट वेस्टब्रूक नांवाच्या एका मुलीवर प्रेम बसलें व तिला घेऊन तो पळून गेला. नंतर लवकरच तिच्याशीं लग्न झालें. (इ. स. १८११). लग्न झाल्यानंतर थोड्याच अवधींत त्याची इंग्लिश कवी सउदे याशीं ओळख होऊन दोघांची मोठी मैत्री जमली. शेले हा सउदे कवीला आपला आदर्श मानूं लागला. इ. स. १८१२ सालीं शेलेनें डब्लिनला भेट दिली. तेथें त्यानें Catholic emancipation, The repeal of the Union वगैरे राजकीय विषयांवर आयरिश लोकांपुढें अनेक व्याख्यानें देऊन आपल्या अंतःकरणाची अन्यायपरिमार्जनाची तळमळ व्यक्त केली. याच वेळेला त्यानें Margaret Nicholson, Victor and Cazire व Queen Mab हीं काव्यें प्रसिद्ध केलीं. यांपैकीं पहिलीं दोन काव्यें क्लिष्ट असून त्यांत शेलेच्या अभिजात काव्य-

गुणांचा अभाव दिसून येतो. तिसऱ्या काव्यांत मात्र ते गुण बीजस्वरूपानें आढळतात.

शेलेचें वैवाहिक जीवन कष्टमय झालें. पहिल्या बायकोनें आत्महत्त्या केल्यावर त्यानें मेरी गॉडविन् नांवाच्या एका स्त्रीशीं १८१६सालीं लग्न केलें. लग्न झाल्यानंतर शेले कांहीं दिवस जिनेव्हाला जाऊन राहिला. तेथें बायरन कवीशीं त्याचा रोजचा पत्रव्यवहार होत असे. जिनेव्हाहून परत आल्यावर त्यानें Alastor and other Poems नांवाचा एक काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. या प्रसिद्धीकरणानें शेलेच्या अंगीं असलेले अनेक काव्यगुण तत्कालीन साहित्यिकांच्या नजरेस आले.



शेले

इ. स. १८१८ मार्चमध्यें प्रकृतिस्वास्थ्याठीं त्यानें इटलींत जाऊन वास्तव्य केलें व तेथेंच तो अखेरपर्यंत राहिला. त्याच्या काव्यस्फूर्तीला इटली देशाची हवा मानवली असें दिसतें; कारण त्याचीं महत्त्वाचीं काव्यें येथेंच लिहिलीं गेलीं आहे. तीं काव्यें–The Cenci, Prometheus Unbound, Epipsy-Chidion, Adonais हीं होत. ८ जुलई १८२२ रोजीं हा थोर कवि अपघातानें समुद्रांत बुडून मेला.

इंग्लिश काव्यांत 'भावगीत' (Lyric) म्हणून एक प्रकार आहे; त्या प्रकारचीं उत्कृष्ट भावगीतें शेलेच्या काव्यांत सांपडतात. किंबहुना शेले व भावगीत या दोन कल्पना अभिन्न आहेत.

शेवः–खाण्याचा तिखट पदार्थ. हरभऱ्याच्या डाळीचें पीठ मापटंभर, अर्ध कोळवें तांदळाचं पीठ, चहाच्या चमच्याएवढी हळद, दोन चमचे मीठ, तीन चमचे तिखट. गोडें तेल शेरभर (२० भार). **कृति**–तीन चमचे गोडें तेल आधणांत घालून तें आधण हळद, तां. पीठ, डा. पीठ, मीठ व तिखट या एकत्र केलेल्या पदार्थांत ओतावें. नंतर तें पीठ थंड पाण्यानें मळावें. गोळा झाल्यावर दर खेपेस तें शेवपात्रांत घालून तेलाच्या कढईंत दाबावें. खरपूस भाजल्यावर तळण्याचें बंद करावें व तळणींतील शेव काढून घेऊन नवीन पीठ घालावें.

शेवगा–घरगुती झाड. मोठ्या होणाऱ्या झाडांत याची गणना होते. या झाडाची अभिवृद्धि दोन प्रकारानें होऊं शकते. प्रकार १ ला बियापासून. दुसरा मनगटाएवढा जाड कोंब घेऊन तो लावून. बियापासूनची अभिवृद्धि फारशी करीत नाहींत. लागणीचा दुसरा प्रकारच प्रचारांत फार आहे. साधारण चांगल्या जमिनींत पाण्याशिवाय हीं झाडें होऊं शकतात. शेवग्याचीं झाडें देशापेक्षां कोंकणांतच फार दिसतात. याचीं फुलें पिंवळसर पांढरट रंगाचीं असून त्यांचे झुबके फांद्यावर येतात. नाजुक पानांच्या फांद्या व फुलांचे झुबके यांमुळें हीं झाडें सुशोभित असतात. झाडाची साल पांढरी असून शिवाय खरबरीत असते. झाडाचें लांकूड चिवट नसून तें ठिसूळ आहे. या झाडाच्या शेंगा १॥ फूट लांब असूं शकतात. या शेंगांना एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत उभ्या कोरा असतात. बिया वाटोळ्या नसून त्रिधारी असतात. त्यांच्या धारेवर पातळ पापुद्रे असतात. या शेंगा कोंवळ्या रसरशीत घेऊन त्यांचे तुकडे चार चार बोटांएवढे करून ते आमटींत शिजत टाकतात. या तुकड्यांनीं आमटीला मधुर वास येतो व तिची गोडी वाढते. शेंगेची भाजीहि करतात. या झाडाची साल व मूळ उष्ण आहेत.

शेवंतीः–हें एक शोभिवंत फुलझाड आहे. हें झाड २ ते ३ फूट उंच वाढतें. पानें साधीं, लांबट, अंडाकृति असतात. ह्यांच्या फुलांत निरनिराळ्या मिश्रित रंगांची छटा असते, त्यामुळें निरनिराळ्या रंगांचीं हजारों फुलें शेवंतींत मिळूं शकतात. मुख्य रंग पांढरा, पिंवळा, सोनेरी, निळसर वगैरे असतात. ह्या फुलांस शहरांत मागणी फार असल्यामुळें तर बागवान याची लागवड फार करतात. गांवठी शेवंतीचीं फुलें फारच लहान आकाराचीं असतात; पण प्रदर्शनाकरितां जीं फुलें येतात त्यांचा आकार १०।१२ इंच व्यासाचाही असतो. **अभिवृद्धि**–झाडांपासून जे धुमारे फुटतात ते वेगळे करून स्वतंत्र ठिकाणीं लावणें. फुलांचा हंगाम सप्टेंबरपासून जानेवारीपर्यंत असतो. फुलें फार टिकाऊ असल्यामुळें टेबलावर ग्लासमध्यें भरून ठेवण्याकरितां यांचा फारच उपयोग होतो.

शेळी:–मेंढीपेक्षां उंच, (३–४ फूट) लांब कानाची, शिंगे असलेली, काळ्या, पिंगट किंवा करड्या वर्णाची शेळी नेहमीं पाहण्यांत येते. हिचें दूध अशक्तांना व अर्भकांना उत्तम असतें. गरीबांची तर शेळी ही गाय होय. हिला पुष्कळजण दुधासाठीं व मांसासाठीं पाळतात. साधारणपणें ती शेरापासून चार शेरांपर्यंत दूध देऊं शकतें. हिचें दूध खारट व दाट असतें. हें दूध आरोग्यदृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. एखाद्या क्षयग्रस्ताला तें दिल्यास फार चांगला गुण येतो. याचें कारण ती आपला निर्वाह झाडपाल्यावर करते हें होय.

मेंढ्यांप्रमाणें शेळ्यांचे कळप कोणी पाळीत नाहीं. ही चपळ, तरतरीत असून लोचट असते. हिच्या चपळपणामुळें मेंढ्यांच्या कळपांत, कळपांना चालतांना जरा वेग यावा म्हणून या ८।१० पर्यंत पाळतात. पांच किंवा सहा महिन्यांनीं शेळी फळते. सर्वसाधारणपणें हिला १०।१२ वर्षे पिलें होत असतात. हिच्या पिलांस कोंकरें म्हणतात. गाभ धरल्यापासून शेळी पांच महिन्यांनीं विते. वर्षांतून ही दोन वेळ विते. दर वेळेला तिला १ ते ३ पिलें होतात.

मद्रासकडच्या शेळ्या तांबूस रंगाच्या असतात. महाराष्ट्र व कर्नाटककडच्या शेळ्या काळ्या व पांढऱ्या असल्या तरी त्या ठेंगण्या असतात. उत्तरेकडच्या शेळ्या मोठ्या, केंसाळ, उठावदार, उंच नी मोठ्या कानांच्या असतात. दिल्ली येथील शेळ्यांचे कान लोंबते व फारच लांब असतात.

हा प्राणी समुद्रसपाटीपासून १३,००० फू. उंचीपर्यंतच्या भागांत असतो. हिच्या अनेक जातींपैकीं अंगोरा, काश्मिरी व सीरियीन ह्या जाती उत्तम होत.

हिच्या मलमूत्राचा उपयोग खताकडे होतो. शिंगाच्या मुटी करतात. चामड्यांचीं पुस्तकें बांधणें, हातमोजे वगैरे जिन्नस करणें या गोष्टीसाठीं उपयोग होतो. केंसांचा उपयोग दोऱ्या, तरटें, पिशव्या वगैरे वस्तु करण्याकडे होतो. १५ ते २० वर्षेपर्यंत ही जगूं शकते.

शोपेनहार आर्थर (१७८८–१८६०):–एक नामांकित जर्मन तत्त्वज्ञानी आणि नैराश्यवादी. याचा जन्म २२ फेब्रुवारी १७८८ रोजीं डँझिंग येथें झाला. याचे वडील एक नामांकित पेढीवाले असून आई कादंबरीकार होती. याचें शिक्षण गोटिंगेन बर्लिन व जेना येथें झालें. इ. स. १८२० सालीं बर्लिन युनिव्हर्सिटींत लेक्चरर म्हणून त्यास नोकरी लागली. तथापि या धंद्यांत त्यास लौकिकदृष्ट्या अपयश आलें; अशा स्थितींत १८३१ सालीं कॉलऱ्याची सांथ मोठ्या प्रमाणांत उद्‌भवली. म्हणून त्यानें नोकरी सोडून देऊन फ्रँकफूर्ट ऑन मेन या ठिकाणीं आपलें वास्तव्य केलें व तेथेंच एकांतवासांत जीवन कंठून २१ सप्टेंबर १८६० रोजीं तो खिस्तवासी झाला.

शोपेनहारचा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे The world as Will and Idea (१८१९) हा होय. यांत त्यानें निषेधात्मक मायावाद पुरस्कारिला आहे. शॉपेनहारच्या तत्त्वज्ञानाचें सार असें आहेः–विश्व हा बौद्धिक आभास असून त्याचें स्वरूप सापेक्ष आहे. द्रष्टयाच्या बदलाबरोबर त्याचें स्वरूप बदलतें. जीवन हा अखंड हालअपेष्टांचा ओघ आहे. ज्याला आपण लौकिक भाषेंत सौख्य म्हणतो तें तत्त्वतः दुःखच होय, दुःखाचा अंश कमी, इतकेंच. जीवनांतील दुःखाचा संपूर्ण नाश कधींच होऊं शकत नाहीं; संगीतकला व सामाजिक सहानुभूतीवर आधारलेलें नैतिक जीवन या दोन साधनांनीं दुःखभार बराचसा हलका होतो; तथापि तो सर्वस्वीं नाहींसा होऊं शकत नाहीं. आत्यंतिक यतिधर्माचा अवलंब करून वासनांचा उच्छेद करीत गेल्यानें जीवनांतील दुःखांचा अंत शेवटीं करतां येईल एवढीच आशा मनुष्याला धरतां येईल.

शोभेची दारूः–स्फोटक दारू व मदिरा यांहून ही वस्तू निराळी आहे. पहिल्या दारूचा उपयोग लढाईच्या कामीं. दुसरीची आवश्यकता औषधें व श्रमपरिहार यासाठीं असते आणि तिसरीचा करमणुकीकरितां. हा जो तिसरा प्रकार आहे तो आपल्याकडे फार पूर्वीपासून माहीत आहे.

बाण, चक्रें, चिचुंद्र्या, भुसनळे, चंद्रज्योति, तारनळे, औटगोळे, आपटबार, उखळीचे बार, तुडतुड्या, फोडणीच्या काड्या, फटाकड्या, तोटे, फुलबाजे, सापकांड्या, केपा इत्यादि प्रकार या दारूपासून बनवितात.

बाणापासून उखळीच्या बारापर्यंतचे प्रकार आपल्या देशांत होऊं शकतात. इतर प्रकार मात्र परदेशाहून विशेषतः चीन जपानहून येतात. करमणूक, धिटाई व व शिक्षण या तिन्हीसाठीं त्यांचा चांगला उपयोग होऊं शकतो.

शंकरपाळींः–खाद्यपदार्थ (रव्याचीं) **माप**–मापटंभर रवा, २० भार साखर, पावशेर दूध, २० भार तूप.

कृति–रवा, साखर व दूध यांत थोडें तूप घालून तो मळावा. नंतर पाती लाटून तिकोनी, चौकोनी समद्विभुजी असे लहान लहान तुकडे करावेत व ते तळून काढावेत. (कणकीचीं) कणीक मापटंभर, गूळ आंब्याएवढा, पावशेर दूध व २० भार गोडें तेल. **कृति**–वरीलप्रमाणें.

शंकराचार्य, आद्य (ज. स. ७८८–गुहाप्रवेश सन ८२०):–अद्वैतमताचे संस्थापक व हिंदूधर्माचे उद्धारक. मलबारमधील 'कालडी' गांवीं नंबुद्री ब्राह्मणांतील शिवगुरु व श्रीआंबिका या दांपत्याच्या पोटीं इ.स. ७८८ त वैशाख शु. १० ला यांचा जन्म झाला. लहानपणीं वडील वारल्यामुळें आईनें यांची मुंज केली. वेदपारंगततेनंतर यांनीं आईच्या इच्छेविरुद्धच संन्यास घेतला. यानंतर ते नर्मदातीरीं गोविंद यतींच्याजवळ शिष्य म्हणून राहिले. यतीनीं यांना खऱ्या ज्ञानाचा उपदेश करून धर्मप्रसाराची आज्ञा केली.

गुरूची आज्ञा पार पाडण्यासाठीं हे काशीला येऊन राहिले. तेथें यांनीं शिष्य तयार करणें व ग्रंथ-रचना करणें या गोष्टी सुरू केल्या. यांच्या प्रमुख शिष्यांपैकीं पद्मपाद हे एक होत.

यांनीं भरतखंडभर संचार करून कुमारिलभट्ट, मंडणमिश्र व भारती यांचा वादांत पराभव केला. मंडणमिश्रांनीं पराभव झाल्यावर संन्यास घेतला. यास आचार्यांनीं सुरेश्वराचार्य असें नांव देऊन शृंगेरी मठावर त्यांची योजना केली. शिवाय या संचारांत आचार्यांनीं शृंगेरीप्रमाणेंच जगन्नाथपुरी, बद्रीकेदार व द्वारका या ठिकाणीं मठ स्थापून आपलें कार्य अखंड चालूं राहण्याची स्थिर व्यवस्था केली. अनिष्ट चालींचा नायनाट, शाक्तांचा पाडाव करून यांनीं धर्मावरील लोकांचा विश्वास दृढ केला.

संचाराचें कार्य सुरूं असतांनाच यांची आई मरण पावली. तेव्हां संचार बंद ठेवून आपल्या गांवीं आले. उत्तरक्रियेला गांवांतील ब्राह्मणांचें सहाय्य मिळेना, म्हणून आचार्यांनीं स्वतःच आईच्या शवाचे तुकडे करून ते घरांतच जाळले व यथासांग तिची क्रिया केली. नंतर पुनः त्यांनीं संचाराचें कार्य चालूं केलें.

एका पराजित पंडितानें यांच्यावर अभिचाराचा प्रयोग केल्यामुळें आचार्यांना मूळव्याधीचा विकार जडला; म्हणून ते बद्रीकेदारास आले. येथें त्यांनीं वयाच्या बत्तीसाव्या वर्षीं गुहाप्रवेश केला.

आचार्यांनीं मनीषापंचक व चर्पटपंजरी यांची रचना केली. शिवाय विष्णुसहस्रनाम, उपनिषदें, गीता व ब्रह्मसूत्रें यांवर भाष्यें लिहिलीं. यांचीं भाष्यें 'शांकर भाष्य' या नांवानें प्रसिद्ध आहेत.

वादविवादाच्या वेळीं यांच्या भाषणांतून व ग्रंथांतून तर्कशुद्ध विचारसरणी सुप्रतिपादनशैली व भाषाप्रभुत्व हे गुण उत्तम रीतीनें प्रगट झाले आहेत. या गुणाच्या जोरावरच त्यांनीं अनेकांना जिंकलें. यांचा अनेक राजांनीं सत्कार केला. काशीच्या राजानें तर यांना कायमचा आश्रय दिला होता.

त्यांचे सिद्धांत पुढीलप्रमाणें–१ सृष्टीच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वाला ब्रह्म म्हणतात. २ ब्रह्माशिवाय इतर सर्व जग मिथ्या होय. ३ जीव हाच ब्रह्म होय. ४ जीवालाच ब्रह्माचें स्वरूप प्राप्त झाल्यावर त्याच अवस्थेंत राहणें यालाच मोक्ष म्हणतात. ५ अहंकारी कर्म व प्रत्यक्ष ज्ञान एकत्र राहत नाहीं.

श्राद्धः–जीव पार्थिव शरीराचा त्याग करून जातो तेव्हां त्या शरीराला मृत्यू आला असें आपण म्हणतों. मेलेल्या मनुष्याच्या शरीराला आपण प्रेत म्हणतों. परंतु 'प्रेत' या शब्दाचा खरा अर्थ हा नाहीं. संस्कृतांत 'प्रेत' या शब्दाचा अर्थ 'निघून गेलेला' असा आहे. पार्थिव शरीर सोडून निघून गेलेल्या जीवाला प्रेत अशी संस्कृत संज्ञा आहे. या प्रेताला परलोकीं सद्गति मिळावी म्हणून श्रद्धापूर्वक जो विधि करण्यांत येतो त्याला श्राद्ध म्हणतात. मृत पितरांना उद्देशून सत्पात्र ब्राह्मणाला शक्तीप्रमाणें विधिपूर्वक दान करणें म्हणजे श्राद्ध करणें असें ब्रह्मांड पुराणांत म्हटलें आहे. स्थूल शरीराचा त्याग केलेला जीवात्मा प्रथम वायुरूप, नंतर तेजोरूप व त्यानंतर आकाशरूप होतो. या जीवात्म्याचा वायुलोक, तेजोलोक व आकाशलोक या तीन लोकांतून प्रवास होतो. त्यापुढें तो ब्रह्म-लोकाला जातो. श्राद्धांत फक्त तीन पिढ्याच घेतात. बाप, आजा व पणजा. या तीन पिढ्यांपर्यंतच्या पितरांना पिंडदान करतात. वायुलोक, तेजोलोक व आकाशलोक या तीन लोकांतील पितरांना अनुक्रमें वसुरूप, रुद्ररूप व आदित्यरूप अशीं पारिभाषिक नांवें आहेत. भूलोकीं श्राद्धविधींत उच्चारलेल्या मंत्रांचा व केलेल्या तर्पणाचा व हवनाचा परलोकीं जीवात्म्याला उपयोग होतो अशी भाविक हिंदूंची श्रद्धा आहे. होम, पिंडदान व ब्राह्मणभोजन असे तीन विधी श्राद्धांत अस-

तात. पार्वण श्राद्ध, एकोद्दिष्ट श्राद्ध, नांदीश्राद्ध व सपिंडीकरण श्राद्ध असे श्राद्धाचे चार प्रकार आहेत.

श्रीधरस्वामी (समाधि स. २६ जाने. १७३०):–सर्व परिचित संतकवि. याचें मूळ आडनांव घोडके. याच्या आजोबांनीं नाझरें गांवीं देशपांडेपण संपादल्यामुळें घोडके हें नांव मागें पडून देशपांडे हें आडनांव रूढ झालें. पुढें नाझरें गांवचे म्हणून याला नाझरेकरहि म्हणत. वाजसेनीय माध्यंदिन शाखेचा हा यजुर्वेदी ब्राह्मण. हा वसिष्ठ गोत्री व आनंदसांप्रदायी होता. याच्या बापाचें नांव ब्रह्माजीपंत. बायको पार्वतीबाई. यानें संन्यास घेतल्यावर 'क्रांतानंद' हें नांव घेतलें. पंढरपुरला समाधिस्थ झाला. याची समाधि कुंभार घाटावर आहे.

स्वामींनीं लिहिलेले प्रसिद्ध ग्रंथ १ (श.१६२४) हरिविजय, २ (श. १६२५) रामविजय, ३ (श. १६२५) वेदान्तसूर्य, ४ (श. १६३४) पांडवप्रताप, ५ (श. १६३७) जैमिनी अश्वमेध, ६ (श. १६४०) शिवलीलामृत. वरीलपैकीं १, २ व ४ हे पंढरपुरास लिहिले. उरलेले तीन अनुक्रमें सिद्धाश्रम, ५ पाथरी व ६ बारामती या ठिकाणीं लिहिले.

यांची भाषा फार परिणामकारक व अप्रतिम आहे. महाराष्ट्रांतील स्त्रीपुरुष, विशेषतः स्त्रिया याचे ग्रंथ फार आवडीनें वाचतात.

श्रुति–वेद हा लेख पाहा.

श्वास लागणें:–हा एक फुफ्फुसाचा रोग आहे. यामध्यें रोग्यास श्वास गुदमरल्यासारखा होऊन धाप लागते. ज्यास या रोगाची बाधा असते त्यास हवेंत अगर अन्नांत कमीजास्त बदल झाल्यास धाप लागते. **रोगाचीं कारणें**:–या रोगास अनेक कारणें आहेत. वयाचा प्रश्न विचारांत घेतल्यास हा रोग अगदीं बाल्यावस्थेंतून देखील सुरू होतो. परंतु सर्वसाधारण त्यास तारुण्यांत सुरवात होते. हा बायकापेक्षां पुरुषांस जास्त प्रमाणांत होतो. तो बहुशा आनुवंशिक आहे. याचें कारण हा रोग विशेषतः 'अनस्टेबल नर्व्हस कंडिशन' असलेल्या मनुष्यास होतो.तेव्हां अशी 'नर्व्हस कंडिशन' ज्या घराण्यांत असेल त्यांत याचा उपद्रव होण्याची विशेष भीति असते. यावरून असें दिसून येतें कीं हा रोग प्रत्यक्ष कारणांपेक्षां विशेषतः मनुष्याचे 'नर्व्हस स्टॅबीलिटीवर' अवलंबून असतो. म्हणून अशा रोग्यांवर हवेचा व स्थलाचा वेगवेगळा परिणाम होतो. कित्येकास कोरडी हवा मानवेल तर कित्येकास दमट अगर धुकट हवा मानवेल. स्थलांचे बाबतींत हाच अनुभव आहे. नाकांतील अगर घशांतील कांहीं दोषामुळेंही हा रोग उद्भवतो. प्रत्यक्ष कारणांचा विचार केल्यास घोडा, मांजर, कुत्रा व माकड इत्यादिकांचे सहवासानें दमा होतो. कांहींना इतर कांहीं जनावरांची लोकर वापरल्यापासून तर कित्येकास भात, सातू व इतर कडधान्याचेवरील कुसेपासून व कांहीं फुलावरील पोलनपासून, कित्येकांस कांहीं औषधी वस्तूंच्या व सेंटच्या वासापासून व कांहींस विशिष्ट प्रकारचें अन्न खाल्ल्यापासून दमा उत्पन्न होईल. अशीं या रोगास अनेक कारणें आहेत. **चिन्हें**–सर्वसाधारण दम्याची धाप सुरूं होण्यापूर्वी दोन तीन तास रोग्यास अस्वास्थ्य, मेंदूची क्षीणता नाक व हनुवटीजवळ खाजवणें वगैरेसारखी सूचक चिन्हें भासतात व नंतर बहुधा पहांटें दोनचेपुढें धाप सुरूं होते व रोग्यास गुदमरल्यासारखें होऊन श्वासोछ्वास अति त्रासाचा होतो, व त्यास अंथरुणांत उठून जवळपासच्या खिडकीशीं जाऊन तोंड वासून शुद्ध हवा घ्यावी अशी वाटूं लागते. दमेकऱ्यास दम्याची धाप लागली असतां त्याच्या श्वासोछ्वासाचा सूं सूं असा आवाज होतो. त्याची चर्या फिकी झालेली असते, ओठ निळसर दिसतात व सर्व शरीरास घाम आलेला दिसतो. एकंदरींत त्याची मुद्रा चिंताजनक दिसते. अशा तऱ्हेची धाप कांहीं मिनिटापासून कांहीं तासपर्यंत टिकते. कित्येकदां धाप मध्येंच बंद होऊन कांहीं वळानें पुन्हां सुरू होते. बहुधा धाप दररोज रात्रीं नियमित वेळीं बरेच दिवस येते, व पुढें कांहीं दिवस नाहींशीं होऊन रोग्याचे एकदोन महिने विन त्रासाचे जातात. अशा दम्याच्या धापा वरचेवर आल्यानें रोग्याचे शरिरावर कायमचा परिणाम होतो. म्हणून दमेकरी बहुधा क्षीण दिसतो, व त्याचे चेहऱ्यावर तेज नसतें. त्याची मुद्रा चिंतातुर असल्यासारखी दिसते. त्याची मान बहुधा लांब व खांदे वर उचलल्यासारखे असून कुबड आल्यासारखें दिसतें.

उपायः–दम्याची धाप लागली असतां ती थांबविण्यासाठीं अनेक औषधांचा उपयोग केला जातो. पैकीं सर्वसाधारण खालील औषधांचा उपयोग करावा. स्ट्रॅमोनियम सिगारेट्स ओढून पहाव्यात अगर इफिड्रीनची एक गोळी घ्यावी व ॲमिल नायट्रेट कॅपसूल हातरुमालाचे कोंपऱ्यांत धरून ती फोडून

हुंगावी. अशानें आराम न पडल्यास तज्ज्ञाचा सल्ला घ्यावा. दमेकऱ्यानें दम्याची धाप नसल्याकाळांत आपणांस ज्या वस्तूचे अगर हवेचे अथवा स्थलाचे संसर्गानें दमा उठत असेल त्याची जाणीव करून घेऊन त्यापासून अलिप्त रहावें; व त्यानें संध्याकाळनंतर जडान्न घेऊं नये. थकवा येईल अशीं कामें करूं नयेत व नियमित कोठा साफ असणेची खबरदारी घ्यावी. सर्वसाधारण प्रकृति सशक्त राखणेस शक्तीवर्धक अरसेनिक असलेलीं औषधें घ्यावींत व नियमित जेवणानंतर ॲनॅफीलूयाक्टीन्चे पांच दहा थेंब घ्यावेत. वरील उपचार नीट व नियमित अमलांत आणल्यास त्यास दम्याची धाप बहुधा लागणार नाहीं. दम्याचें कारण जर नाकांतील अगर घशांतील कांहीं दोषांमुळें असेल तर शस्त्रक्रिया करून तें नाहींसें करून घ्यावें.

सखाराम बापू (१७१६–८१):—पेशवाईतल्या साडेतीन शहाण्यांपैकीं एक व बारभाईच्या कारस्थानांतील प्रमुख. सखाराम भगवंत बोकील हें याचें पुरें नांव. हा पंताजी गोपीनाथ बोकील यांच्या कुळांत जन्मला.

प्रथम हा महादजी पुरंदऱ्याकडे शिलेदार होता. नंतर १७३२ त बाजीराव पेशव्यानें याला आपल्याकडे घेतला. यानें अंगच्या गुणानें १७४७ त शाहू महाराज व नानासाहेब पेशवे यांचा विश्वास संपादन केला. नानासाहेबानें १७४१ व १७४४ या वर्षी केलेल्या स्वाऱ्यांत हा त्याच्याबरोबर होता. हा सदाशिवरावभाऊ व रघुनाथराव पेशवा या दोघांचाहि कांहीं काल कारभारी होता. १७४८ पासून यानें उत्तरेकडील राजकारणांत मल्हारराव होळकराबरोबर भाग घेण्यास आरंभ केला. नंतर यानें पुष्कळ गोष्टी केल्या. या सर्वांत प्रमुख गोष्ट म्हणजे दिल्लींत मराठ्यांचें वर्चस्व प्रस्थापित करणें ही होय. पानिपतच्या वेळीं हा दक्षिणेंत होता. मरतेवेळीं नानासाहेबानें यास मुख्य कारभारी नेमलें होतें. १७६१–७२ पर्यंत घडलेल्या प्रत्येक आणीबाणीच्या वेळीं प्रसंगीं मुख्य दिवाणगिरी व शेवटीं सर्वाधिकारीत्व याच्याकडेच आलें होतें. माधवराव पेशवे याची योग्यता ओळखून होते. याला अयोग्य गोष्टी आवडत नसत. बारभाईचें कारस्थान रचून यानें राघोबाला चांगलेंच प्रायश्चित्त दिलें. या कारस्थानानें त्याची कर्तृत्वशक्ति उत्तमपणें दिसून आली.

नाना फडणीसानें, महत्त्वाचे प्रसंग पार पडतांच, हा भारी प्रतिस्पर्धी आपल्या कार्यांत आड येऊं नये म्हणून सन १७७९ च्या फेब्रु. २७ रोजीं, फितुरीच्या आरोपाखालीं यास पकडलें व तुरुंगांत ठेवलें. नंतर जहागीर जप्त केली. याला अनेक ठिकाणच्या तुरुंगांतून ठेवण्यांत आलें. यास सोडविण्याचे प्रयत्न झाल्यामुळें याच्या पायांत बेडी घातली होती. तुरुंगांत शेवटीं शेवटीं याचे हाल करण्यांत आले. अतिसारानें हा थोर पुरुष रायगडावर १७८१ च्या २ ऑगस्टला मरण पावला.

बापूला पांच बायका होत्या. यांपैकीं काशीबाई, राजूबाई व जिऊबाई या त्याच्यामागें हयात होत्या. याला आकोपंत नांवाचा मुलगा होता पण तो याच्यादेखतच मेला. १८२५ त जिऊबाईनें बापूच्या चुलतभावाला दत्तक घेऊन त्याचें यशवंतराव असें नांव ठेविलें.

बापूला ‘राजकारणांतील विधि’ ‘प्रतिसृष्टि करणारा’ ‘शहाणा’ अशीं समकालीन पत्रांत विशेषणें लावलीं आहेत. तत्कालीन ‘सख्या, देवा, विठ्ठला’ या शहाण्यांत पूर्ण शहाणा म्हणून यास अग्रमान मिळाला आहे. राजकारणांतील शस्त्र व शास्त्र हा चांगलेंच जाणीत होता. हा अत्यंत बुद्धिमान व हातांत घेईल तें काम पार पाडणारा होता, याबद्दल समकालीन सर्वांची खात्री होती.

सगनभाऊ (स.१७१८–१८४०):—मुसलमान शाहीर. याच्या फडांत बिबिजान, येमा, बाळा, राघू व रामा हे लोक होते. या सर्वांत रामा गोंधळी सुंदर गाणारा होता. ‘लावणी करावी सगनभाऊनें व म्हणावी रामा गोंधळ्यानें’ अशी त्या वेळीं म्हणच असावी. ‘दक्षिणच्या पेशव्यास घाला नव्हता आला। गंगाधर शास्त्र्यावरून राज्याचा नाश झाला’ हा याचा पोवाडा फार प्रसिद्ध आहे. नंतर सातारचें राज्य जाईपर्यंत हा साताऱ्यास राहिला. याच्या कांहीं लावण्या भेदीक म्हणजे परमार्थपरहि आहेत. याचा गुरु गुरुनाथसिद्ध होय. दुसऱ्या बाजीरावाच्या विलासकांडावर याच्या पंधरा लावण्या आहेत.

सन्निपात (Delirium):—निरनिराळ्या तापाच्या रोगांत जो भ्रम होतो त्याला सन्निपात म्हणतात. **पूर्वलक्षणें**—प्रथमतः अगदीं निरोगी असलेल्या माणसास कुठल्याही तऱ्हेचा आकस्मिक ताप आल्यास त्यांत त्याला भ्रम होतो अगर टॉयफॉइड, प्लेग, क्षय वगैरे

रोगांनीं जर्जर झाल्यावर त्या रोगाच्या विषानें शेवटीं भ्रम होतो. **कारणें**–मेंदूचा रोग, आकस्मिक अगर दीर्घकालीन ताप; दारू, धोत्रा वगैरे मादक पदार्थांचें सेवन इत्यादि कारणांनीं भ्रम होतो. रोगांनीं होणारा भ्रम तात्कालिकच असतो; पण मादक पदार्थांनीं होणारा भ्रम कायम राहण्याचा संभव आहे. **लक्षणें**–सन्निपात अगर भ्रम कमी प्रमाणांत असल्यास रोग्याला मोठ्यानें हांका मारून जागें करितां येतें; फक्त मध्यंतरीं तो हाताचे चाळे करितो. जो त्याचा नेहमींचा उद्योगधंदा असेल त्याबद्दल बडबडतो; पण सन्निपात जास्त प्रमाणांत असल्यास बहुतेक रोगी बेशुद्ध असतो. जवळपास असणाऱ्या इसमांची खबर असत नाहीं, प्रश्नांचीं उत्तरें देत नाहीं. सारखी हाल-चाल करितो, उठून पळूं लागतो, ओरडतो, दंगामस्ती करितो, हाताचे चाळे करितो, कपडे फाडतो. भ्रम रात्रीं विशेष होतो. **उपाय**–ज्या कारणांनीं सन्निपात अगर भ्रम झाला असेल तें कारण शोधून काढून त्यावर योग्य तो इलाज करावा. निरनिराळ्या तापांनीं भ्रम झाला असल्यास डोक्याला कोलनवॉटरची पट्टी अगर बर्फ ठेवावा; मादक पदार्थांनीं सन्निपात झाला असल्यास डॉक्टरांकडून योग्य तो उपचार करून घ्यावा.

सप्टेंबर:–इंग्रजी वर्षाचा हा नववा महिना. लॅटिन-मध्यें सेप्टेम शब्दाचा सात असा अर्थ आहे. रोमन वर्षा प्रमाणें हा सातवा महिना होय. याचें कारण रोमन वर्षमार्चपासून सुरू होतें. ज्यूलिअस सीझरनें आपल्या वर्षगणनेंत ज्या वेळीं सुधारणा केली तेव्हांपासून हा वर्षाचा नववा महिना बनला. बावीस सप्टेंबरच्या सुमा-रास सूर्य विषुववृत्त ओलांडून कर्क वृत्ताकडे जाऊं लागतो. या वेळीं दिवस व रात्र सारखीच असते. आपल्याकडे या वेळीं वर्षाऋतूचा उत्तरार्ध येतो. म्हणजे भाद्रपद महिन्याचा हा काल असतो.

सप्रू, सर **तेज बहादूर**, एम. ए.; एल. एल. डी.; के. सी. एस. आय. (१८७५–):–नामवंत कायदे पंडित व प्रागतिक पक्षाचे पुढारी. यांचा जन्म ८ डिसें-बर १८७५ सालीं झाला. आग्रा येथील 'आग्रा कॉले-जांत' यांचें शिक्षण आटोपलें. नंतर अलाहाबाद हाय-कोर्टांत यांनीं ॲडव्होकेटचें काम १८९६-१९२६पावेतों केलें. हे सं. प्रांत कायदेमंडळाचे १९१३-१६ पर्यंत सभासद होते. तसेंच यांनीं दिल्लीच्या लेजिस्लेटिव्ह कौंसि-लांत १९१६-२० पर्यंत काम केलें. १९०६-१७ पर्यंत ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे हे सभासद होते. लंड-नच्या लॉर्ड सेलबोर्न्स कमिटीपुढें १९१९त यांनीं साक्ष दिली. संयुक्त प्रांतांतील राजकीय, सामाजिक व लिबरल लीग या परिषदांचे हे अनुक्रमें १९१३, १४, १८, २० मध्यें अध्यक्ष होते. १९१० ते २० पर्यंत अलाहाबाद विश्वविद्यालयाचे फेलो होण्याची संधि यांना मिळाली. बनारस हिंदु विश्वविद्यालयाच्या कोर्ट, सीनेट व सिंडि-केट यांचे हे सभासद होते. १९२२ ला गव्हर्नर जनरलच्या कार्यकारीमंडळाचे कायदेमंत्री होऊन पुढें हे सेवानिवृत्त झाले. १९२३ सालीं लंडनच्या साम्राज्य-परिषदेचे सभासद होण्याचा योग यांना आला. पुण्यास भरलेल्या 'अखिल भारतीय परिषदेची माळ' अध्यक्ष म्हणून यांच्या गळ्यांत १९२३ ला पडली. रिफॉर्म्स इन्कायरी कमिटीचे १९२४ ला ते सभासद बनले. तीनहि रा. टे. कॉन्फरन्सचे हे सभासद असून ते त्यांतील प्रमुख कार्यकर्ते होते. तसेंच 'पूना पॅक्ट' घडविणारे म्हणूनहि यांचा परिचय आहेच. हे प्रिव्हिकौन्सीलचे सभासद होते.

सरकार, सर जदुनाथ,:–एम्. ए., सी. आय. ई. के. टी. (१८७०–):–प्रख्यात इतिहासकार जन्म १० डिसें. १८७० राजशाही. (बंगाल) मॅट्रिक १८७८, बी. ए. १८९१ कलकत्ता प्रेसिडेन्सी कॉलेज; इंग्रजी व इतिहास विषयांत डबल ऑनर्स; एम्. ए. १८९२ फर्स्टक्लास फर्स्ट; प्रेमचंद रायचंद बक्षीस स. १८९७ विषय 'औरंगजेब.' त्यावरून पुढें औरंगजेब चरित्राची सुरुवात, त्यासाठीं फारसी व, मराठी साधनांचा अभ्यास; स. १८९७ पासून प्रोफेसर कलकत्ता, पाटणा कटक. स. १९२६, या सालीं सेवानिवृत्ति व दोन वर्षें (विनावेतन) कलकत्ता युनि-व्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सेलर, प्रवास हिंदुस्थानांतील बहु-तेक सर्व ऐतिहासिक स्थलांची–बारकाईनें तपासणी व टिपणें घेऊन दार्जीलिंग येथें थंड हवेंत स्वतःचें घर बांधून ग्रंथलेखन–सर्व प्राप्तीचा व्यय पुस्तकखरेदींत–स्वतःचें ग्रंथालय–१० हजार पुस्तकांचा संग्रह. इंग्रजी, संस्कृत, फ्रेंच, पोर्तुगीज, बंगाली, मराठी, हिंदी, गुजराथी इ० भाषा अवगत. अत्यंत अभ्यासु वृत्ति, प्रसिद्धिविन्मुख स्वभाव. अनेक युनिव्हर्सिटींतून उच्च विषयांवर व्याख्यानें, परीक्षक व संशोधक, विद्यार्थि-गणास उत्तम मार्गदर्शक; वंगीय साहित्यपरिषदेचे पुरस्कर्ते–ग्रंथ औरंगजेब इ० व शिवाजीचरित्र,

मोंगल बादशाहीचा ऱ्हासकाल इ० संपादित साहित्य पुष्कळच आहे.

कौटुंबिक स्थिति श्रीमंतीची—सात बंधूंपैकीं हे तिसरे. वडिलार्जित मिळकत एक एक लाखाची प्रत्येकास असतां ती टाकून सर्व बंधूंनीं स्वत: विद्यार्जन करून स्वावलंबनानें स्वतःची कमाई केली. सर्व बंधु अत्यंत निर्व्यसनी-मोठमोठ्या कामांत निष्णात आहेत. श्री व सरस्वती यांचा एकत्र सहवास व निर्व्यसनता या दृष्टीनें हें सर्व कुटुंब आपल्या देशांत आदरणीय आहे. सहा बंधु हयात आहेत. मातुश्री ९४ वर्षांची. गेल्या-सालीं वारली, तिचा एकटीचा वंशविस्तार २–३ शेंचा हयात आहे.

सरदेसाई, रा. ब. गोविंद सखाराम (१८६५–)–:प्रख्यात इतिहासकार. श्री. सरदेसाई यांची इतिहासक्षेत्रांतील कामगिरी इतकी महत्त्वाची आहे कीं, कोठल्याही मराठी ग्रंथसंग्रहांत त्यांच्या रियासती नाहींत असें व्हावयाचें नाहीं. नवीन पिढींतील अभ्यासक तर त्यांना 'रियासतकार' सरदेसाई याच नांवानें ओळखतात. तरुणपणीं निरनिराळ्या खेळा-बद्दल (चेंडूफळी, चक्कर, ब्रिज इ.) त्यांनीं ४–५ पुस्तकें लिहिलीं. त्यानंतर म्हणजे १८९९ पासून आज-पावेतों सर्व लेखन त्यांनीं बहुतेक इतिहासक्षेत्रांतच केलें. मुसलमानी रियासतीची प्रथमावृत्ति १८९९ सालीं प्रसिद्ध झाली, तोंपर्यंत आपण कांहीं पुस्तकें लिहावीं अशी कल्पनाही त्यांस नव्हती. स्वतःचा अभ्यास करीत असतांना त्यांनीं वरील पुस्तक लिहिलें व त्यांतूनच पुढील रियासतींची कल्पना उदयास आली. इ. १२०० पासून १८५७ साला-पर्यंतचा हिंदुस्थानचा इतिहास त्यांनीं १२ खंडांत प्रसिद्ध केला आहे. मुसलमानी रियासत २ खंड, मराठी रियासत ८ खंड, ब्रिटिश रियासत २ खंड अशी ही वर्गवारी आहे. हीं पुस्तकें धरून इतिहासविषयक मराठी ४१ व इंग्रजी ६ असे ग्रंथ त्यांनीं लिहिले किंवा संपादित केले आहेत. याखेरीज पेशवे दप्तराचे ४५ भाग निराळेच. आतां ७५ व्या वर्षींही त्यांचें हें कार्य पूर्वींच्याच जोमानें चालू आहे. हिंदुस्थानच्या व विशेषतः मराठ्यांच्या इतिहासांतील प्रसंगांची हकीकत इतक्या विस्तारानें प्रथमच श्री. सरदेसायांनीं कथन केली आहे. ज्यावेळीं ग्रँटडफ्‌चा इंग्रजींत लिहिलेला मराठ्यांचा इतिहास हाच एकमेव ग्रंथ उपलब्ध होता त्याकाळीं संकल्प करून मराठी रियासती सरदेसायांनीं लिहून प्रकाशित केल्या ही त्यांची मोठीच कामगिरी होय. सामान्य जनतेला ऐतिहासिक आधार–सनदा–पत्रें यांत रुचि नसते, त्यांना संगतवार इतिहास पाहिजे असतो. ती आकांक्षा सरदेसायांनीं पूर्ण केली आहे.

सरदेसाई हे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यांतील गोविल या गांवचे. जन्म १७ मे १८६५ रोजीं गोविल गांवीं.



गो. स. सरदेसाई

गोविंदरावांचे वडील सखारामपंत,यांचा मुख्य धंदा शेतीचा; परंतु त्यांनीं आपल्या मुलांना शिक्षण घेण्यास उत्साह दिला. रत्नागिरीचें हायस्कूल, पुण्याचें फर्ग्यूसन कॉलेज व मुंबईचें एल्फिन्स्टन कॉलेज या संस्थांतून त्यांचें शिक्षण झालें. १८८८मध्यें ते बी. ए. झाले. मॅट्रिक (१८८४) होण्यापूर्वींच त्यांचा विवाह झाला होता. १८८९ पासून बडोद्यास श्रीसयाजीराव महाराजांकडे ते रीडर म्हणून कामाला लागले. पुढें त्यांचेकडे राजपरि-वारास शिकविण्याचें काम सोंपविण्यांत आलें. १९१२त खाजगी हिशेबखात्याचें त्यांना मुख्य करण्यांत आलें. १९२५ पर्यंत म्हणजे ३७ वर्षें ते संस्थानांत कामावर होते. एवढ्या अवधींत भरतखंडांतील अनेक ऐति-हासिक, धार्मिक व प्रेक्षणीय स्थळें त्यांना पाहण्यास मिळालीं. महाराजांबरोबर युरोपांत जाण्याची संधिही ४।५ वेळां त्यांस लाभली. ऐतिहासिक लेखनास ही पार्श्वभूमि अत्यंत उपयुक्त अशीच ठरली आहे. १९२५ सालीं त्यांचा सुविद्य असा पुत्र श्यामकान्त परदेशीं शिक्षणास गेला असतां वारला ! दुसऱ्या मुलास लहान असतांनाच म्हणजे १२ व्या वर्षीं मृत्यु आला होता ! कौटुंबिक अवस्था अशी दुःखद असली तरी इतिहासांत त्यांनीं आपलें मन रमविलें आहे व त्याची सेवा ते अविरत करीत आहेत.


ग्रंथलेखनास सुरवात सन १८८९. राजधर्म, इंग्लंड देशाचा विस्तार, मुसलमानी, मराठी व ब्रिटिश रियासत–मिळून मराठी ग्रंथसंख्या १५; पाटणा युनिव्हर्सिटी व्याख्यानें, मराठ्यांच्या इतिहासाचे मुख्य

प्रवाह (इंग्रजी); इंग्रजी भाषेची गृहशिक्षा वगैरे; पेशवे दप्तराची संपादणी ४५ भाग, पूना रेसिडेन्सि कॉरस्पांडन्स ८ भाग, एम्. ए. परीक्षक मुंबई, कलकत्ता, नागपूर वगैरे युनिव्हर्सिटींत. सरकारांतून पदवी रावबहादूर.

त्यांचें वाचन फार शोधक बुद्धीनें केलेलें असतें. पुस्तकांवर त्या धर्तीच्या टिपाही ते लगेच लिहून ठेवतात. चांगलें व महत्त्वाचें साहित्य जेथें सांपडेल त्याचा संग्रह करण्याचीही त्यांची हातोटी विलक्षण आहे. यामुळेंच पेशवेदप्तरासारखें जिकिरीचें काम ते योजलेल्या मुदतींत करूं शकले. त्यांचा स्वभावही मृदु असल्यानें त्यांचा मित्रपरिवार मोठा आहे, पण त्यांतही बंगालमधील प्रसिद्ध इतिहासकार व संशोधक सर जदुनाथ सरकार यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. त्यांच्याच सहकार्यानें एलिअनेशन ऑफिसमधील इंग्रजी पत्रव्यवहार प्रसिद्ध करण्याचें कार्य सध्यां सरदेसायांनीं अंगावर घेतलें आहे.

रियासतकार सरदेसाई यांना पाहिलें म्हणजे प्राचीन कालच्या एकाद्या ऋषीनें, कालानुसार योग्य तें परिवर्तन करून, या नवीन युगांत अवतार घेतला आहे कीं काय असा भास होतो. जुन्या काळीं उपनिषदें किंवा अरण्यकें लिहिणाऱ्या ऋषीइतकीच बहुमोल तपश्चर्या सरदेसाई यांची इतिहासक्षेत्रांत झालेली आहे यांत शंका नाहीं. इ. स. १९३८ सालीं त्यांच्या वयाच्या ७३ व्या वर्षी भारतवर्षातील प्रमुख इतिहासज्ञांनीं एक इंग्रजी व एक मराठी असे दोन ' सरदेसाई स्मारक ग्रंथ ' लिहून त्यांस अर्पण केले व त्यांचा गौरव केला. केंब्रिज हिस्ट्रीचे धर्तीवर भरतखंडाचा विस्तृत इतिहास अनेक खंडांत लिहिण्याची योजना सध्यां आंखली जात आहे त्यांत त्यांचें प्रमुख अंग आहे. अविरत उद्योग व नेमस्त राहणी हें त्यांच्या दीर्घायुष्याचें बीज होय.

सर्पासनः–हें आसन कसें करावें याची कल्पना सोबतच्या चित्रावरून येईल



सर्पासन

सरपटणारे प्राणी (Reptiles):–या प्राण्यांना पाठीला हाडांची मालिका असते; यांचें रक्त थंड असतें; तें फुप्फुसांनीं श्वासोच्छ्वास करतात व अंडज असतात. यांच्या मुख्यत: पांच जाती असतात. पहिली जात इग्वाना ही न्यूझीलंडमध्यें आढळून येते. दुसरी जात म्हणजे कांसव व तत्समान प्राण्यांची; तिसऱ्या वर्गांत सुसरीसारख्या प्राण्यांचा समावेश होतो; चौथ्या जातींतील महत्त्वाचे प्राणी म्हणजे अजगरें हीं होत व पांचव्यांत सर्पाची जात येते. बहुतेक जातींत दांत ठराविक मुदतींत पडतात व जरूर तेथें नवीन येतात. सर्व जातींना जिभा असतात व घ्राणेंद्रियें मोठीं तिखट असतात. यांच्या डोळ्याच्या वरच्या व खालच्या पापण्या नेहमीं चल असतात. डोळ्यांचा रंग बहुधा गडद असतो व डोळ्यांचीं बुबुळें वर्तुळांत आकुंचन पावूं शकतात. बहुतेक जातींना आंत व मध्यावर कर्णेंद्रिय असतें; पण सुसरींना तें शरिराच्या बाहेरच्या बाजूस असतें. या प्राण्यांचा मेंदू त्यांच्या एकूण आकाराच्या मानानें मोठा असतो. यांच्या शरिराचें उष्णतामान तें ज्या वातावरणांत वावरत असतात त्यावर अवलंबून असतें. त्यांच्या शारिरीक हालचाली विशेष प्रमाणांत झाल्या तर उष्णतामान वातावरणाच्या उष्णतामानाहूनहि अधिक वाढतें. हे प्राणी बहुंशीं हिंसक असतात.

सवाई माधवराव पेशवे (१७७४–१७९५):–नारायणराव पेशव्याचा मुलगा. याची आई गंगाबाई. पुरंदर किल्ल्यावर १८ एप्रिल १७७४ ला याचा जन्म झाला. चाळीसाव्या दिवशीं यास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. हा लहान असल्यामुळें सर्व कारभार नाना फडणीस पाहत असे. याला व याच्या पक्षाच्या मंडळींना कैद करण्याचा घाट राघोबाच्या पक्षानें घातला होता पण तो नानानें हाणून पाडला.

१७७७ मध्यें गंगाबाई वारल्यामुळें याचा सांभाळ भाऊसाहेबाची बायको पार्वतीबाई हिनें केला. याची १७७९ त मुंज केली. १७८३ मध्यें याचें लग्न करून बायकोचें नांव रमाबाई असें ठेविलें. याला पशु, पक्षी, इतिहास, पुराणें, व्यायाम, लष्करी शिक्षण इत्यादि विषयांचें शिक्षण देण्यांत आलें होतें.

याची आजी गोपिकाबाई पेशवे हिला १७८८ त गंगापुरास भेटून आल्यावर हा राज्यकारभारांत थोडथोडें लक्ष घालूं लागला. १७९१ त हा छत्रपति महाराजांच्या भेटीस गेला होता. महादजी शिंद्यानें,

याच्याकडून, नानाकडील कारभार मिळविण्याचा १७९२ मध्यें अप्रत्यक्षपणें प्रयत्न करून पाहिला. याचें दुसरें लग्न १७९४ त झालें. दुसऱ्या बायकोचें नांव यशोदाबाई. याच सुमारास शनिवारवाड्यांतील कोठी व सातमजली बंगला जळून गेला.

जुन्नरला दुसरा बाजीराव कैदेंत होता. त्याच्याशीं हा गुप्तपणें पत्रव्यवहार ठेवी. एकदां ही गोष्ट नानाच्या दृष्टीस पडली. त्यामुळें नानानें याचा निषेध केला. इतरहि बाबींत याचें नानाशीं पटेनासें झालें. या प्रतिकूल परिस्थितीचा परिणाम याच्या मनावर होऊन हा आजारी पडला. त्यांतच ज्वर व वात यांना जोर येऊन यानें वाताच्या झटक्यांत माडीवरून खालीं उडी मारली आणि त्यामुळें हा १५ ऑक्टोबर १७९५ ला मरण पावला. 'खर्ड्यांचा जय' हीच याच्या आयुष्यांत घडलेली महत्त्वाची गोष्ट होय.

सर्वांगासनः—जमिनीवर उताणें निजावें. दोन्ही पाय ताठ करून जुळवून जमिनीपासून उर्ध्व दिशेकडे उचलावे. पहिल्यानें कमरेपर्यंतचा पायाचा भाग उचलल्यावर मग डोकें, खांदे व हाताचें कोपर यांवर सर्व भार घेऊन शरीर वर उचलावें. खांद्यालगतचा पाठीचा व मानेचा भाग जमिनीवर टेकून बाकीचें सर्व शरीर ताठ करून वर उचललेलें असावें.दोन्ही हाताचीं कोपरें जमिनीवर टेकलेलीं असावीं व दोन्ही हातांचें पंजे पाठीच्या कण्यालगत दोन्ही बरगड्यावर बसवावे. बोटें कमरेच्या दिशेनें असावींत. दोन्हीं तळव्यानीं रेटीत शरीर जितकें ताणतां येईल तितकें ताणावें. हनुवटी छातीशीं खेचावी. कमेरंत वांकूं नये. पायाचे आंगठे उर्ध्व दिशेनें ताणावे.

या आसनानें ओटीपोट साफ होतें. रुधिराभिसरणास मदत होते. वृषणवृद्धि, अंतर्गळ वगैरे रोग याच्या नित्य सरावानें नाहींसे होतात.

ससाः—सस्तन प्राणि. सशाचे मागचे पाय पुढच्यापेक्षां लांब असतात. यामुळें त्याला झपाझप उड्या मारून पळतां येतें. तसेंच चढणीवरहि लौकर पळतां येतें. सशाला लांब व नाजूक कान असतात. त्याची लांबी दोन फूटपर्यंत असूं शकते. वय साधारणतः ७ ते १२ वर्षें असतें व एका वेळीं ८ ते १० पिलें होतात. ससा जमिनीवरच पण झुडपांत आपलें घरटें तयार करतो. सशाचे ओठ तुटलेले असतात. डोळे मोठे व लाल असतात. सशाची शिकार त्याच्या मांसासाठीं व मऊ केसाळ कातड्यासाठीं करतात. मांसाला एक प्रकारचा मस्त वास असतो. हें त्याचें वैशिष्ट्य. शिवाय तें पचायलाहि हलकें असते. गवत पाल्यावर ससा राहतो. आदर्श परिस्थितींत २—३दां वीण होते. ससे वर्णानें पांढरे शुभ्र, पिंगट, क्वचित् पाठीवर काळे पट्टे असलेले असतात. सशाचा आवाज फारसा ऐकूं येत नाहीं. पण त्याला धरल्यावर तो लहान मुलासारखा आवाज काढून ओरडतो. सशांत आणखी एक लहान जात आहे. ती रॅबिट या नांवानें ओळखतात.

सह्याद्रिः—'पश्चिम घाट' या नांवानें प्रसिद्ध असलेला पर्वत. हा दक्षिण हिंदुस्थानच्या पश्चिमेस उत्तर दक्षिण असा आहे. खानदेशपासून कन्याकुमारीपर्यंत हा पसरला असून याची लांबी १००० मैल भरते. याचा कोणताहि भाग ४००० फुटांपेक्षां उंच नाहीं. समुद्र व सह्याद्रि यांच्यांत २० ते ६५ मैलांपावेतों पट्टी बनली आहे. 'कोंकण' हें नांव मिळालेली हीच ती पट्टी.

या पट्टींत अथवा कोंकणांत देशावरून जाण्यास अनेक मार्ग आहेत. त्यांपैकीं रेल्वेचे व घाटाचे मार्ग प्रमुख होत. गोवा, मंगळूर, मुंबई हे रेल्वेचे कोंकणांतले मार्ग. आंबोली, फोंडा, आंबा, तिनई, थळघाट, बोरघाट हे प्रख्यातपैकीं घाट होत. या घाटांनीं मोटार व गाड्या यांनीं पुष्कळ येजा होते.

याच्या पूर्व—पश्चिम जाणाऱ्या रांगांपैकीं ३—४ फारच मोठ्या आहेत. ठिकठिकाणीं याच्या फांद्यांवर १०० एक किल्ले बांधलेले असून ते सर्वच इतिहासप्रसिद्ध आहेत. या किल्ल्यांपैकीं सिंहगड, रायगड, विशाळगड, पन्हाळा, रांगणा, प्रतापगड, शिवनेरी इ. किल्ले सुपरिचित होत.

लोकांनीं थंड हवेसाठीं याच्या कित्येक उंच भागांवर विशेषतः महाबळेश्वर, माथेरान, खंडाळा, लोणावळा, पांचगणी, कॅसलरॉक इत्यादि ठिकाणीं वस्ती केली आहे. अलिकडे शास्त्रीय ज्ञानाचा फैलाव जोरांत झाल्यामुळें लोकांनीं सह्याद्रीच्या अनेक फांद्यांना बंधारे घालून तलाव निर्मिले. या तलावांपैकींच टाटाचा मुंबईजवळचा तलाव, भोरजवळचा भाटघरचा, राधानगरीनजीकचा लक्ष्मी हे तलाव जास्त सुप्रसिद्ध होत. या तलावांमुळेंच कित्येक एकर जमीन सुपीक बनली. तसेंच कारखाने, ट्राम, आगगाड्या, विद्युत्प्रकाशापायीं लागणारी बीज प्राप्त होते.

पश्चिम घाटांवरील थंड हवेच्या ठिकाणांप्रमाणेंच येथील धबधब्याबद्दलची कीर्तिहि चोहोंकडे पसरली आहे. गोकाकचा, गिरसप्पाचा, शिवसमुद्र व दूधसागर या ठिकाणचे धबधबे जास्त प्रसिद्ध होत. त्याचप्रमाणें गोदावरी, कृष्णा, भीमा, तुंगभद्रा, कावेरी, अर्कावती या नद्यांचा उगम सह्याद्रिवरच होतो. याशिवाय त्र्यंबकेश्वर, महाबळेश्वर, भीमाशंकर, जोतीबा इ. देवस्थानें येथेंच असून तीं सह्याद्रिचें महत्त्व चांगलें पटवितात.

या पर्वतावर जंगल देखील पुष्कळ आहे. नाशीक, लोणावळा, महाबळेश्वर, खानापूर, कॅसलरॉक, कारवार इत्यादि ठिकाणें याबद्दल प्रसिद्ध असून या जंगलांतूनच वाघ, हत्ती, चित्ते, कोल्हे, लांडगे हे हिंस्र पशू व कांहीं विषारी सापांच्या जाती रहातात. या जंगलामुळें लोकांना जळाऊ व इमारतींच्या उपयोगीं लांकडें पुष्कळच मिळतात. हल्ल्याळची प्रसिद्धि तर सागवानाबद्दल फारच आहे.

याचें 'मलयगिरी' हें शिखर ६३०० फूट उंच आहे.


एकंदरींत हिंदुस्थानांत जे अनेक पर्वत आहेत, त्यांत अतिशय उपयुक्त असे दोनच पर्वत. एक उत्तर–हिंदुस्थानांतील हिमालय हा. या पर्वतामुळेंच अनेक दृष्टीनें उत्तर–हिंदुस्थानी लोकांचें कल्याण झालें आहे. अगदीं तसेंच दक्षिण–हिंदुस्थानांत सह्याद्रीनें इकडील लोकांचें केलें आहे. येथील नद्या, तलाव, जंगलें, धबधबे, घाट व थंड हवेचीं ठिकाणें यामुळें लोकांच्या सुखांत चिरकालीन अशी भर पडली आहे व पुढेंहि पडत राहील.

साखरः–कार्बोहायड्रेट असलेला अन्नांश. साखर ही पुष्कळ वनस्पतींत व दुधांत असते. साखरेंत कार्बन, हायड्रोजन व ऑक्सिजन असतो. याशिवाय स्फटिकात्मक गोड पदार्थ असतो. साखर पाण्यांत चटकन विरघळते.

शास्त्रज्ञांनीं Monosaccharoses व disaccharoses असे साखरेचे दोन प्रकार कल्पिले असून, पहिल्या प्रकारांत ग्लूकोज किंवा डेक्स्ट्रोज नांवानें ओळखले जाणारे पदार्थ मोडतात व ते द्राक्षरस व मध यांत असतात. यांत सहा कर्ब असतात. दुसऱ्या प्रकारांत आपल्या रोजच्या वापरांतील साखर येते. बीट, ऊंस व दूध यापासून काढलेली साखर याच प्रकारांत मोडते. बीट व ऊंस यापासून रम नांवाची दारू काढतात.

सांख्यः–सुप्रसिद्ध षड्दर्शनांपैकीं एक. कपिलमुनी हा या दर्शनाचा प्रणेता. कपिलमुनीबद्दल निश्चित माहिती मिळत नाहीं. कापिलसांख्यशास्त्र हें महाभारताहून प्राचीन असलें पाहिजे असें विद्वानांचें मत आहे. सांख्यशास्त्र म्हणजे कपिलमुनीभवित सांख्यशास्त्र हा विशिष्ट अर्थ सुपरिचितच आहे. तथापि सांख्य या शब्दाचा सर्व प्रकारचें तत्त्वज्ञान असाहि प्रयोग करतात. लो. टिळक आपल्या गीतारहस्यांत म्हणतात, "या विशिष्ट अर्थाखेरीज सर्व प्रकारच्या तत्वज्ञानासही सामान्यतः सांख्य हें नांव देण्याची वहिवाट असून त्यांत वेदांतशास्त्राचाहि समावेश होतो. सांख्यनिष्ठा किंवा सांख्ययोग या शब्दांच्या जोड्यामध्यें सांख्य शब्दाचा हाच सामान्य अर्थ विवक्षित आहे; पुढें या निष्ठेंतील ज्ञानी पुरुषांसहि सांख्य असें भगवद्गीतेंत जेथें म्हटलें आहे त्या ठिकाणीं, सांख्य म्हणजे केवळ कापिलसांख्यमार्गी असा अर्थ नसून आत्मानात्मविचारानें सर्व कर्मांचा संन्यास करून ब्रह्मज्ञानांतच गढून राहणाऱ्या वेदांत्याचाहि त्यांत समावेश केला आहे. कापिलभिक्षूंना सांख्य म्हणण्याची वहिवाट पडल्यानंतर मग वेदान्ती संन्याशांनाहि तेंच नांव देऊं लागले असतील असें वाटतें."

कपिलप्रणीत सांख्यशास्त्रांत ईश्वराचें अस्तित्व मानलें नाहीं. या शास्त्रांत सृष्टिरचनेच्या सिद्धान्ताची शास्त्रीय पद्धतीनें मांडणी केली आहे. सांख्यांनीं पंचवीस तत्त्वें मानिलीं आहेत. त्यांपैकीं प्रकृति किंवा प्रधान हें मूलतत्त्व सर्व सृष्टीचें मूल कारण आहे. सत्व, रज व तम या तीन गुणांची साम्यावस्था म्हणजेच मूलप्रकृति होय. प्रकृतीचा विकार महत्, महत्चा अहंकार, अहंकाराचा पंचतन्मात्रा व अकरा इंद्रियें, पंचतन्मात्राचा विकार पंचमहाभूतें अशीं चोवीस तत्त्वें. पंचविसावें तत्त्व पुरुष किंवा आत्मा. पुरुष हा नित्य शुद्ध, निर्विकार व चेतनस्वरूपी असतो. हे पुरुष असंख्य आहेत. प्रकृति ही अचेतन आहे. ती आठ प्रकारची आहे. प्रकृति, महत्, अहंकार, पंचतन्मात्रा (शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध) हे ते आठ प्रकार होत. पंच महाभूतें, पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें व मन हे सोळा विकार होत. आठ प्रकारची प्रकृति, सोळा विकार व पुरुष मिळून सांख्यांचीं पंचवीस तत्त्वें झालीं. सांसारिक जीवाला आध्या-



ईशान्य बाजूचा सर्वांत मोठा असलेला स्तूप, सांची.

त्मिक, आधिभौतिक व आधिदैविक असें तीन प्रकारच दुःख होतें. आध्यात्मिक दुःख म्हणजे शरीर व मन याविषयींचें दुःख रोगादिकापासून शरीराला होणाऱ्या व प्रियजनवियोगासारख्या गोष्टींनीं मनाला होणाऱ्या दुःखाचा यांत समावेश होतो. कोणत्याहि स्थावर जंगम पदार्थापासून होणारें दुःख तें आधिभौतिक दुःख. विद्युत्, महापूर, भूकंप, इत्यादि सृष्ट पदार्थांपासून होणारें दुःख तें आधिदैविक. या त्रिविध दुःखांपासून सुटका फक्त ज्ञानप्राप्तीनेंच होते. हें ज्ञान म्हणजे प्रकृति-पुरुषभेदविषयक ज्ञान होय.

सांख्य निरीश्वरवादी आहेत ही गोष्ट खरी आहे. तथापि त्यांचे सृष्टीची वाढ, घटना व परिणति या संबंधींचे सिद्धान्त खरोखरीच तर्कशुद्ध आहेत. ईश्वर मानणाऱ्या शास्त्रकारांनींहि सांख्यांचे हे सिद्धान्त मानले आहेत.

सांची:—ऐतिहासिक अवशेष असलेलें ठिकाण. भोपाळ संस्थानांत हें स्थळ आहे. भोपाळ व भिलसा या शहरांमध्यें सांची हें ठिकाण आहे. सांची हें एक जी. आय. पी. रेल्वेचें स्टेशन आहे व तें मुंबईपासून ५४९ मैलांवर आहे. सांची स्टेशनच्या पूर्वेस एक मैलावर एक टेकडी असून (३०० फूट उंच) तीवर सांचीचे प्रख्यात स्तूप आहेत. हे स्तूप खि. पू. ३०० पासून इ. स. १२०० पर्यंत बांधलेले आहेत. प्राचीन कालच्या पुष्कळशा वस्तु सांची नि भिलसा यांमधल्या भागांत असलेल्या आढळतात. या अनेक वस्तूंपैकींच लहान मोठे स्तुप, एक चैत्यगृह व थोड्या फुटक्या मूर्ति या महत्त्वाच्या वस्तु होत. या ठिकाणीं जो मोठा स्तूप आहे तो खिस्तपूर्व २५० वर्षें अशोकाकडून बांधला गेला असावा असा विद्वानांचा तर्क आहे. ह्या मोठ्या स्तूपाचा व्यास १२१ फूट ६ इंच भरतो. याशिवाय या ठिकाणीं कित्येक स्तूप असून सर्वांत लहान स्तूपाचा व्यास दोन फूट आहे. याशिवाय ग्रीक पद्धतीचें एक मंदिरहि येथें आहे.

सांडगे:—जेवतांना तोंडीं लावण्यास उपयोगीं पडणारा पदार्थ. यानें जेवते वेळीं तोंडाला चांगली चव येते. हा खाणाऱ्याचें मन प्रसन्न करतो. खारटपणा व खमंग-

पणा हे याचे दोन प्रमुख गुण. या गुणांमुळेंच त्याला चव उत्पन्न होते. उन्हाळ्याच्या दिवसांत हा पदार्थ करून ठेवतात. सांडगे बनवण्यास वेळ व खर्च फार थोडा लागतो. हे तीळ, तांदूळ, कोहळा, भेंडी किंवा साबूदाणा या पदार्थांचे मुख्यत्वें करून करतात.

कोहाळ्याचे—१० भार हिरव्या मिरच्या, अर्धे कोळवं खडे मीठ, एक पुरा कोहाळा. **कृति**—प्रथम कोहाळा खिसून ठेवावा. मग त्या खिसांतलें पाणी पिळून काढावें. मीठ व मिरच्या (मिरच्यांचे देठ काढलेले असावेत) यांचा चेचून लगदा तयार करावा. हा लगदा पाणी काढलेल्या कोहाळखिसांत मिसळावा व चांगलें कालवावें. मग एक धोतर किंवा फडकें (स्वच्छ) घेऊन तें उन्हांत घालावें आणि नंतर त्यावर छोटे छोटे सांडगे घालावेत. ते चांगले वाळू द्यावेत. वाळल्यावर ते एका डब्यांत भरून ठेवावेत. हे वाळलेले सांडगे हवे असतील तेव्हां गोड्या तेलांत तळून काढावेत. सांडगे हे जेवणाऱ्याच्या डाव्या हाताला वाढतात. तळलेले सांडगे साधारपणें तास दोन तास कुरकुरीत राहूं शकतात. पुढें ते मऊ होऊं लागतात.

भेंडीचे—कोहाळ्याप्रमाणेंच करावेत.

तांदूळाचे—मापटंभर तांदूळ, पैशाभराची खसखस, व कोळवं भरून खडे मीठ. **कृति**—तांदूळ तीनचार दिवस पाण्यांत भिजत घालावेत. नंतर ते उपसून रोळींत निथळत ठेवावेत. मग ते चेचावेत. बारीक चाळणीनें हें पीठ चाळावें. हें पीठ थंड पाण्यांत घालून बरबरीत करून ठेवावें. पुढें खसखस व मीठ घालून थंड पाणी चुलीवर आधण येण्यासाठीं ठेवावें. जाळ चांगला लावावा म्हणजे थोड्या वेळांत उकळी येईल. या उकळींत सरबरीत केलेलें पीठ ओतून चांगले चटके येईपर्यंत एकसारखे हलवीत बसावें. सारखें हलविलें नाहीं तर पिठाच्या गांठी होतील. नंतर पीठ व पाणी एकजीव झाल्याची खात्री पटल्यावर उन्हांत एक धोतर (भिजवलेलें) घालून त्यावर सांडगे बत्ताशाप्रमाणें घालावेत. उन्हामध्यें हे सांडगे दोन तीन दिवस वाळूं द्यावेत. मग सांडग्याच्या उलट बाजूला धोतरावर बेताचें पाणी शिंपडावें. पाणी न शिंपडतां सांडगे काढण्याचा प्रयत्न करूं नये. तसें केल्यास सांडगे तर निघायचे नाहींतच, पण धोतर मात्र फाटून जाईल. याकरितां पाणी मारून मग सांडगे काढावेत. म्हणजे ते सुटूसुटू निघतील. सर्व सांडगे काढून झाल्यावर पुनः ते ४।५ दिवस उन्हांत वाळवावेत व डब्यांत भरून ते ठेवावेत. पाहिजे तेव्हां ते गोड्या तेलांत तळून घ्यावेत.

तिळाचे—पांढरे तीळ चिपटंभर, स्वयंपाकाच्या पळीभर मीठ, थोडसं कोहाळ्याचं पाणी व उडदाचं पीठ. **कृति**—कोहाळ्याच्या पाण्यांत उडदाचं पीठ, मीठ व तीळ मिसळून ते कालवावेत व त्यांचा गोळा करावा. मग उन्हांत एक फडकें अथवा धोतर पसरावें. त्यावर वरील गोळ्याचे सांडगे घालावेत. हे चांगले वाळले म्हणजे एका डब्यांत ते भरून ठेवावेत. आवश्यकतेप्रमाणें येशेल तेलांत ते तळून घ्यावेत.

शाबूदाण्याचे—अच्छेर शाबूदाणा व अर्धे कोळवं मीठ. **कृति**—वरील पदार्थ आधणांत घालावे व हलवावे. एकसारखे झाल्यावर त्यास मध्यम घट्टपणा आल्यावर उन्हांतील फडक्यावर त्याचे बत्ताशासारखे ठिबके पाडावेत. तांदळाच्या सांडग्याप्रमाणेंच पुढील कृति करावी.

सातपुडाः—अमरकंटकाच्या पठारापासून पश्चिम किनाऱ्यापर्यंत पसरलेली पर्वताची ओळ. ही ओळ पूर्व-पश्चिम असून ५०० मैल लांब आहे. याची सरासरी उंची २००० फूट. 'सालेटेकडी, अमरकंटक, चौरादादर, खामलापर्वत, चिखलदारा, पंचमढी' हे याचे भाग होत. साधारणपणें हे सात भाग असल्यामुळेंच यास 'सातपुडा' हें नामाभिधान प्राप्त झालें. अमरकंटकापासून नैर्ऋत्य बाजूस बालाघाट जिल्ह्यांत 'साले टेकडी' नांवानें प्रसिद्धीस आलेला भाग १०० मैलपर्यंत पसरला आहे. याच्या पश्चिमेकडे गेलेल्या पर्वतश्रेणी निमुळत्या होत गेल्या आहेत. पुढें पुढें तर अशिरगडाच्या किल्ल्यापर्यंत याच्या दोन ओळी समांतर रेषेंत असलेल्या आढळतात. तापी नदीची दरी या दोन भागांत आहे. खानदेशांतील या पर्वताचा फाटा तापी व नर्मदा या दोन नद्यांच्या दऱ्यांच्या सीमेवर आहे. अमरकंटक व चौरादादर हीं दोन पठारें ३५०० फूट उंचीवर आहेत. तसेंच खामला आणि चिखलदरा या पर्वतांची उंची ३७०० फुटांच्याहि वर असल्याचें आढळतें. पंचमढी पर्वताची उंची मात्र सर्वांत अधिक म्हणजे ४५०० फूट भरते. पंचमढी व चिखलदरा या दोन ठिकाणीं पुष्कळसे लोक उन्हाळ्यांत थंड हवेसाठीं येऊन राहतात. या

पर्वतावर उगम पावणाऱ्या नद्यांत तापी व नर्मदा या दोन नद्या प्रमुख होत. पंचमढीसंबंधीं विशेष माहिती 'पंचमढी' या लेखांत पाहा.

सातभाई:—कळप करून राहणारा पक्षी. हा वृक्षोपवेशक वर्गापैकीं होय. सातभाई हा पक्षी दिसण्यांत अगदीं कुरूप असतो. याचा रंग चांगला नाहीं, रूप चांगलें नाहीं, उडणें बेडौल असतें. एकंदरींत याच्यामध्यें लक्षवेधकत्व नाहींच. याचें शरीर साळुंकीएवढें असून याचे पंख बळकट नसतात. याची शेंपूट तर मागच्या बाजूनें खुपसून ठेवली आहे कीं काय असें वाटतें. पंखें बळकट नसल्यानें यास फार लांबवर उडतां येत नाहीं. चिमणीप्रमाणें हा टुणटुण उड्या मारीत मात्र चालतो. सातभाईच्या पिसाऱ्याचा रंग मातकट असून त्याचे पाय, डोळे व चोंच हे अवयव पांढुरके असतात. गळून पडलेल्या पानांमधून किडे शोधून काढून ते हा खातो. छोट्या झाडाच्या खालच्या अंगास पेल्याच्या आकाराचीं, काटक्या व गवत यांच्या मदतीनें बनविलेलीं घरें हा पक्षी बांधतो व त्यांत याची मादी दर खेपेस ३—४ निळसर अंडीं घालते. हिंडणें, फिरणें, निजणें, बसणें वगैरे व्यवहार एकत्रच करण्याची याची प्रवृत्ति आहे. साधारणतः त्यांच्या एका कळपांत ७।८ पक्षी असतात. त्यावरूनच यास 'सातभाई' हें नांव प्राप्त झालें असावें असें म्हणावयास हरकत नाहीं. हे पक्षी अतीशय किलकिलाट करतात. किलकिलाट ऐकून ते भांडतात कीं काय असें पहाणाऱ्यास वाटतें.

सातवळेकर, श्रीपाद दामोदर (१८७०):—भारतीय संस्कृतीचे अभिमानी, पंडित, ग्रंथकार व मासिककार. यांचा जन्म शके १७९२ भाद्रपद वद्य ६ स सावंतवाडी संस्थानपैकीं 'कोलगांव' येथें झाला. घरींच वेदाध्ययन केलें. त्यांनीं सावंतवाडीला व्याकरण, ड्रॉइंग व प्रवेशपरीक्षेपर्यंतचें इंग्रजी शिक्षण घेतलें. यानंतर आर्टस्कूलमध्यें त्यांनीं आपलें चित्रकलेचें शिक्षण पुरें केलें. शिवाय वेद व षट्दर्शनें यांचें मार्मिक अध्ययन पंडितजींनीं विद्वानांकडून व गुरुमुखानें केलें. मुंबई, दक्षिण हैदराबाद, मद्रास, लाहोर, हरिद्वार, काशी इत्यादि ठिकाणीं राहून निरनिराळ्या व्यवहारांतील अनेक अनुभव घेतले. भारतवर्षभर प्रवास केला. या प्रवासांत हिंदू धर्माची सद्यःस्थिति त्यांनीं समक्ष अवलोकिली व हिंदू धर्मशास्त्रांचें पुनरुज्जीवन केल्याविना हिंदू जातीचा व भारतवर्षाचा उद्धार होणार नाहीं असें वाटल्यामुळें त्यांनीं औंधला १९१८ त स्वाध्यायमंडळाची स्थापना केली. या संस्थेकडून सध्यां वेदांचें मुद्रण चालू आहे. सध्यां यांचे ग्रंथ हिंदी व मराठी अशा दोन भाषेंत प्रसिद्ध होत असतात. यांच्या प्रकाशित ग्रंथांची किंमत १५० रु. पर्यंत होईल. यांनीं पुरुषार्थ व भगवद्गीता हीं दोन मराठींत आणि वैदिकधर्म नि गीता हीं दोन हिंदींत अशीं चार मासिकें औंध येथें चालविलीं आहेत.

सातारा:—पहिले शाहू छत्रपति यांची राजधानी. पूर्वींचें याचें नांव 'शाहूनगर.' हें शाहूमहाराजांनीं (पहिल्या) बसविलें. शाहूनगर हें नांव पडण्यापूर्वीं या शहराला जुनाट कागदपत्रांवरून 'सप्तऋषी' हें नांव असल्याचें आढळून येतें. सध्यां हें सातारा जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. या ठिकाणीं येथें यवतेश्वराच्या डोंगरावरून पाणी आणलें असून गांवांत दोन वर्षांपूर्वीं विद्युत्प्रकाशाचे दिवे चालू केले आहेत. शाहूमहाराज व त्यांचे सरदार यांनीं येथें वाडे बांधले होते. १७५३त या ठिकाणचे ऐतिहासिक वाडे व शाहूचा रंगमहाल भस्मसात् झाला. शहरास लागून असलेला 'अजिमतारा' हा किल्ला पन्हाळ्याच्या दुसऱ्या भोजराजानें ११९० त बांधला आहे. पेशव्यांच्या वेळीं बांधलेले वाडे, कै. पारसनीस यांचा ऐतिहासिक वस्तूसंग्रह, वेस्टर्न इंडियाचें ऑफिस, हीं ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. हें पुणें बेळगांवच्या रस्त्यावर असून कोल्हापूर पुणें यांच्या जवळजवळ मध्यावर आहे. स्टेशनापासून हें १० मै. दूर पडतें. शहरांत स्थल, व्यक्ति व वार यांच्या नांवावरून रूढ असलेल्या अनेक पेठा आहेत. गांवच्या आजूबाजूचें सृष्टिसौंदर्यहि संतोषदायक वाटतें. पूर्वीं या ठिकाणीं ब्रिटिशांचें लष्करी ठाणें होतें. या शहराच्या आसपास पुष्कळ ऐतिहासिक ठिकाणें व क्षेत्रें आहेत. येथील लोकसंख्या सुमारें २२००० आहे.

साप:—अरुंद पण लांब, मान नसलेले व इतर कोणतेहि अवयव नसलेले सरपटणारे पृष्ठवंशी व थंड रक्ताचे प्राणी. डोकें, बरगड्या यांचींच तेवढीं हाडें यांना असतात. शरीराच्या खालच्या भागाला समांतर खांचा असतात व पोटाचा म्हणजे खालचा भाग पांढरट रंगाचा असतो. पाठीच्या कण्यांत अनेक सांधे असतात व त्याच्या दोन्ही बाजूंस बरगड्या चिकटलेल्या असतात. या बरगड्यांच्यामुळें सापाला झटकन्

वेटोळें घालतां येतें व वळतां येतें. शरीराची वरची कातडी मऊ असते. पण ती दर वर्षी कठीण होते व मग कातीच्या रूपानें साप ती टाकून देतो. डोळ्यापासून मागें याप्रमाणें कात उलटी सुटत जाते. साप उंच भिंतीवर चढूं शकतात, झाडावर चढतात, पाण्यांत पोहतात, व घट्ट वेटोळीं घालूं शकतात. वेड्यावाकड्या हालचालीमुळें व पोटाच्या खांचामुळें सापाला पुढें सरकतां येतें. साप बहुतेक जमिनीवरच राहतात; पण कांहीं अखंड पाण्यांत राहणाऱ्याहि जाती आहेत. जिवंत भक्ष्यावरच ते जगतात. कांहींहि अन्न मिळालें नाहीं तरी कित्येक दिवस ते जगूं शकतात.

सापाला अनेक रंग असतात. भोंवतालच्या भूप्रदेशाशीं किंवा झाडझुडुपाशीं मिळतील असे त्यांचे रंग असतात. अडचणीची जागा, बिळें, झाडांच्या ढोली, पाणथळ व अरण्यें या त्यांच्या जागा आहेत. अंडीं घालून प्रजोत्पत्ती होते. बरेचसे साप विषारी नसतात. विषारी सापाच्या वरच्या जबड्यांत दोन लांबडे व उलटे दांत असतात. या दातांनीं तो दंश करतो व विषाचे थेंब सोडतो. त्याच्या तोंडांत विषाच्या पिशव्या असतात. सापाची दुभागलेली जीभ निर्विष असते. स्पर्शज्ञानाच्या कामीं या जिभेचा उपयोग त्याला होतो.

साप चावल्याबरोबर एखाद्या तीक्ष्ण शस्त्रानें दंश झालेल्या व तिच्या आसपासच्या जागीं लहान लहान जखमा कराव्या म्हणजे रक्त वाहून विष चढण्याला प्रतिबंध होईल. शिवाय रुमाल किंवा दोरीनें दंशाच्या जागेवरचा भाग घट्ट बांधून टाकावा. (प्राथमिक उपचार पाहा.) सर्पदंशावर सरकारी किंवा मोठ्या दवाखान्यांत असलेलीं इंजेक्शन्स घ्यावींत. कांहींच्या मतें सापाला तीव्र श्रवणेंद्रिय आहे तर कांहींच्या मतें त्याला मुळींच ऐकूं येत नाहीं.

नाग (फणा उभारणारा साप) हा हटकून विषारी असतो. घोणस (विषारी), फरड, धामण, अजगर या सापाच्या लहान (लांबीला कमी) जाती आहेत. त्यांपैकीं कांहीं फार विषारी असतात. सापाचें आयुष्य १० वर्षें असतें.

साबण:—कपड्यांतील मळ काढण्याकरितां व अंग स्वच्छ करण्यासाठीं वापरण्यांत येणारा पदार्थ. क्षार व चरबीयुक्त आम्ल (ॲसिड) यांच्या मिश्रणानें हा पदार्थ बनवितात. जनावरांची चरबी, डुकराची पातळ चरबी किंवा ऑलिव्ह वृक्ष, नारळी, शेंगदाणा इत्यादींच्या तेलापासून बनविलेली वनस्पतिजन्य चरबी व सोडा किंवा पोटॅश हे क्षार यांच्या मिश्रणानें साबण तयार करतात. केव्हां केव्हां बोरॅक्स, नॅप्था, पूमाईस किंवा इतर कोणताही स्वच्छ करणारा पदार्थ यांचा साबण तयार करतांना उपयोग करतात.

कपड्याला लावण्यासाठीं केलेला साबण साधारणतः पिवळट, क्वचित् पांढरा किंवा गर्द काळ्या रंगाचा तयार करतात. अंगाला लावण्याचा साबण मात्र निरनिराळ्या मोहक रंगांत व निरनिराळ्या आकाराच्या वड्यांत तयार करतात. कपड्याचा साबण चुरा, वड्या (Cakes) किंवा बार यांमध्येंच मिळतो. मात्र अंगाला लावण्याचा साबण (टॉयलेट सोप) हा वड्या, पूड, चकत्या (Flakes), मणी, (Paste) व पाण्यासारखा पातळ अशा निरनिराळ्या प्रकारांत मिळतो. घट्ट साबणांत व पातळ साबणांत पोटॅश वापरतात. कपाशीचें तेल, ऑलिव्ह तेल व याचसारख्या अधिक प्रवाही प्रकारची चरबी वापरली तर साबणांत अधिक मऊपणा येतो. ग्लिसरॉल किंवा साखर वापरून व साबण मद्यार्कांत (Alcohol मध्यें) विरवून पारदर्शक साबण तयार करतात.

आपल्याकडे साबण बरेंच शतकें वापरण्यांत असावा असें वाटतें. युरोपांत ग्रीक लोक साबण तयार करण्याची कला फोनीशियन्स लोकांकडून शिकले. फोनीशियन्स लोकांना ख्रिस्ती शकापूर्वी ६०० वर्षेपासून साबण तयार करण्याची कला अवगत होती. जगांतलें साबण तयार करण्याचें पहिलें पेटंट १७ व्या शतकांत इंग्लंडमध्यें नोंदलें गेलें.

साबणाचे अनेक उपयोग आहेत. स्वच्छ करण्याचा मुख्य गुण त्याचे आंगीं आहे. त्याशिवाय तेलकटपणा घालविण्याचा गुणहि त्याच्या अंगीं असल्यामुळें यंत्रांचे भाग स्वच्छ करण्याकडेहि त्याचा उपयोग होतो. पाण्यांत साबण मिसळून फेंसला गेला कीं त्याला फेस येतो व त्यामुळें घाणीचे कण सुटण्यास चांगली मदत होते.

साबरमती:—पश्चिम हिंदुस्थानांतील एक महत्त्वाची नदी. हिचा उगम अरवली पर्वतांत असून नैर्ऋत्य दिशेनें ती वाहत येते. ही नदी, 'ईदर' संस्थानांतील साबर व अहमदनगर जवळून जाणारी हातमती यांच्या संगमापासून बनते. अहमदाबाद शहरापासून ३० मैल अंतरावर हिला यात्रक नांवाची नदी मिळते. या

ठिकाणीं कार्तिकांत प्रतिवर्षी पुष्कळ यात्रिक जमतात. हिची लांबी २०० मैल असून ती खंबायतच्या आखातास मिळते.

साबूदाणाः–नाचण्याच्या आकाराच्या गोल व पांढऱ्या गोळ्यांचा खाद्यपदार्थ. याचा उपयोग रोग्यांना व उपवासिकांना फार होतो. पचण्यास हा पदार्थ फारच हलका. कित्येक हौशी लोक याचे नानातऱ्हेचे पदार्थ बनवून खातात.

या पदार्थाचीं झाडें मलाया, सयाम व आफ्रिकेच्या कांहीं भागांत आहेत. साबूदाण्याचीं झाडें फारशीं उंच वाढत नाहींत. तसेंच त्यांना मुळापासूनच फांद्या फुटतात. या झाडाचें खोड जून झाल्यावर तें कापून त्याचे लहान लहान तुकडे करतात. नंतर साल काढून हे तुकडे एका खिसणीवर खिसतात. खालचा खीस एका चटईवर टाकून वर पाणी शिंपडतात आणि मग तो पायांनीं चांगला पांचसहा वेळ तुडवतात. असें केल्यानें खिसांतून पिठूळ पाणी बाहेर पडतें. हें पाणी एका हौदांत सांठवतात. थोड्या वेळानें पीठ खालीं राहून वर केवळ पाणी राहतें. हें ओलसर पीठ पंचेवजा धोतरावर (विरळ सुताच्या) पसरावयाचें. हें धोतर एका लांब व अरुंद चरीवरच्या लोखंडी पत्र्यावर दोनतीन फूट उंचीवर बांधलेलें असतें. पत्र्याखालीं जाळ लावून तो चांगला तापवतात. पत्रा तापविण्यापूर्वी त्यास स्निग्ध पदार्थ लावावा लागतो. नंतर तें धोतर दाबलें म्हणजे त्यांतून खालच्या पत्र्यावर गोल दाणे पडतात. हे दाणे खालील उष्णतेनें लौकरच वाळतात. हे वाळलेले दाणे म्हणजेच साबूदाणा होय.

सांबः–कृष्ण व जांबवती यांचा पुत्र. विष्णुपुराणांत हा कृष्ण व रुक्मिणी यांचा मुलगा असें म्हटलें आहे. शिवाच्या उपासनेनें हा झाला म्हणून यांचें नांव 'सांब' असें ठेविलें. दुर्योधनाची मुलगी लक्ष्मणा ही याची बायको.

एकदां ' पिंडारक ' क्षेत्रीं यादवांचीं पोरें खेळत खेळत आलीं असतांना त्यांना तेथील ऋषीची चेष्टा करावी असें वाटलें. म्हणून त्यांनीं सांबाला गरोदर स्त्रीचा वेष देऊन व ऋषीला नमन करावयास लावून याला काय होईल असा ऋषीला प्रश्न केला. मुलांच्या या कृत्यानें ऋषी संतापला. त्यानें याला ' तुमचा संहार करणारें लोखंडी मुसळ होईल' असा शाप दिला. मग त्या मुलांनीं सांबाचें पोट सोडलें. तो तेथें एक लोखंडी मुसळ होतें. हें मुसळ मुलांनीं उग्रसेनाजवळ नेऊन दिलें. उग्रसेनानें ती गोष्ट बाहेर फुटूं न देतां त्या मुसळाचें पीठ केलें व तें समुद्रांत फेकून दिलें. पद्मपुराणांत मुसळाची पूड कृष्णानें केली असें लिहिलें आहे.

शाल्व व यादव यांचें युद्ध झालें. तसेंच हा व प्रद्युम्न असे उभयतां नाटकमंडळीच्या रूपानें, वज्रनाभाची मुलगी प्रभावती इचें हरण करण्यास 'सुपूर' नांवाच्या त्याच्या राजधानींत गेले. रात्रौ नाटकें केलीं. प्रभासक्षेत्रीं मैरेयक हे उन्मादक पेय प्याल्यामुळें परस्परांची ओळख विसरून हा प्रद्युम्नाशीं लढतांना मरण पावला.

हा अतिशय रूपसंपन्न होता. दुराचरणाबद्दल कृष्णाच्या शापानें ह्याला कुष्ठरोग झाला. पण हा रोग सूर्याराधनेनें नष्ट झाला.

सांबरः–हरीण हा लेख पाहा.

सारसः–' करकोचा ' हा लेख पाहा.

सार्वत्रिक कौटुंबिक बजेटः–बजेट म्हणजे उत्पन्न व खर्च यांचें अंदाजपत्रक. हें व्यक्तीचें, कुटुंबाचें, संस्थेचें किंवा सर्व देशाचेंहि असतें. त्याची मुदतही कमीजास्त असूं शकते. पण साधारणतः बारा महिन्यांत उत्पन्नाचे व खर्चाचे कमीजास्त होण्याचे सर्व प्रकार येऊन जातात, म्हणून तें एक वर्षाचें केलें जातें.

समाजाचा घटक कुटुंब आहे. यांत मिळवितां (यजमान), गृहिणी व लहान (न मिळवतीं) मुलें, यांचा समावेश होतो. मुलगा मिळवता झाला म्हणजे त्याचा विवाह होऊन वेगळें कुटुंब स्थापन होतें.

मध्यम स्थितींतल्या म्हणजे कमींत कमी ५० रुपये पासून ५०० रुपये माहेवार उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाचा येथें विचार कर्तव्य आहे.

२ गृहशास्त्रावरील ग्रंथांत कांहीं बजेटें दिलेलीं असतात. पण त्यांत कांहीं सूत्र नसल्यामुळें आंकडे सहज लक्षांत रहात नाहींत. आणि दुसरा मोठा दोष म्हणजे खर्चाच्या बाबींचे परस्पर संबंध दर्शविलेले नसतात. त्यामुळें कोणच्याही एका बाबीचा खर्च जास्त झाल्यास दुसऱ्या कोणत्या बाबींचा खर्च कमी करावयास पाहिजे हें समजत नाहीं.

उदाहरणार्थ एका प्रसिद्ध मराठी ग्रंथांत १०० रुपये महिना उत्पन्न असलेल्या माणसाच्या खर्चाचा तपशील येणेंप्रमाणें दिला आहे—

अन्नखर्च	५० रु.	शिक्षण	४ रु.
सर्पण दिवाबत्ती	६ ,,	शिल्लक	१० ,,
स्वच्छता व नोकर	५ ,,	नैमित्तिक खर्च	५ ,,
घरभाडें	१० ,,	इंग्रजी पुस्तकांतूनही असेच वेगळाले आकडे आहेत.	
कपडे	१० ,,		

एका इंग्रजी लेखकानें खर्चाच्या मुख्य १० बाबी समजून प्रत्येक बाबीस उत्पन्नाचा एक दशांश लावून दिला आहे. यांत सूत्र साधतें, पण दुसरा दोष कायम राहतो.

पुढील लेखांत खर्चाच्या बाबींची संगतवारी सोप्या सहज लक्ष्यांत राहण्यासारख्या प्रकारें दाखवून शिलकेच्या विनियोगाचाही विचार केला आहे.

३ उत्पन्न ठराविक नसल्यास वर्षाच्या बारा महिन्यांची सरासरी कायम केली पाहिजे. असें उत्पन्न एक रुपया धरल्यास खर्चाच्या बाबी वरील रकमा आणेवारीनें दाखविणें सोईचें होतें.

उत्पन्न नुसतें कमीजास्तच नव्हे, तर कधीं कधीं मुळींच नाहींसें होण्याचा संभव असतो. अशा वेळेकरितां कांहीं शिल्लक जमविणें अवश्य असतें. ती शिल्लक एक रुपया उत्पन्नास ४ आणे पाहिजे. बाकी १२ आणे चालू खर्चास घेतां येतात.

४ कुटुंबांत २ पिढ्या असतात. मुलांचा खर्च प्रथम थोडा असला तरी तो पुढें फार वाढतो. याकरितां प्रथमपासूनच चालू पिढीस ६ आणे व पुढील पिढीकरितां ६ आणे ठेवणें अवश्य आहे. यजमान व गृहिणी हीं संसाराचीं समान महत्वाचीं अंगें असल्यानें यजमानास ३ आणे व गृहिणीस ३ आणे येतात. कुटुंबाचा खर्च पुष्कळसा समाईक असतो व कांहीं थोडा खर्च वैयक्तिक असतो. अशा समाईक खर्चास ८ आणे देऊन वैयक्तिक खर्चास ४ आणे राहतात. त्यांचा तपशील खालील कोष्टकावरून समजेल.

८ आणे समाईक खर्च.

६ आणे—अन्न—
- १ आणा धान्य.
- १ ,, दूध
- १ ,, तूप, तेल.
- १ आणा गूळ, साखर, किराणा, किरकोळ
- १ ,, भाजी, फळें, मीठ, मसाला.
- १ ,, भांडीं, स्वयंपाक, सर्पण, नोकर

ही स्थूल विभागणी आहे. जरूरीप्रमाणें यांत कमीजास्ती करितां येतें. दुधाचें महत्त्व दाखविण्याकरितां त्याचा वेगळा निर्देश आहे. अन्नाचे निरनिराळे प्रकार यांत सारख्या महत्त्वानें दिसतात.

याच्या एकंदर बचतींतून नैमित्तिक सणवारी व पाहुण्यांचा खर्च केला पाहिजे.

२ आणे—घर
- १ आणा भाडें (किंवा स्वतांचें घर असल्यास डागडुजी)
- १ आणा इतर खर्च

घरपट्टी	बिछाईत
पाणी	फरनिचर
भंगी	दिवाबत्ती
नोकर	बाग

४ आणे वैयक्तिक खर्च
- १ आणा—यजमान
  - १ पैसा वस्त्र
  - २ पैसा बलोपासना, ज्ञानार्जन, ग्रंथसंग्रह
  - १ पैसा आरोग्य, वाहन, प्रवास, औषधें करमणूक क्लब, छंद, नाटक, सिनेमा, व्यसनें चहा, पान सुपारी, विडी
- १ आणा—गृहिणी—
  - १ पैसा—वस्त्र.
  - २ पैसे—कलोपासना, शृंगार, सौंदर्यसाधन.
  - १ पैसा-आरोग्य—औषधें, करमणूक—क्लब वगैरे किरकोळ दानधर्म, प्रवास.
- २ आणे—मुलें—
  - २ पैसे—वस्त्र.
  - ४ पैसे शिक्षण.
  - २ पैसे—आरोग्य, करमणूक, प्रवास, खेळ.

५ मुलगा मिळवूं लागला म्हणजे प्रथम तो स्वतांचा वैयक्तिक खर्च चालवितो, नंतर कुटुंबाच्या समाईक

खर्चास मदत करितो. उत्पन्न वाढून आपल्या बायकोचा व होणाऱ्या मुलांचाही खर्च चालविण्याची ऐपत आली म्हणजे तो स्वतंत्र मिळविता—समाजाचा स्वतंत्र घटक—म्हणविला जाऊं शकतो. वेगळें कुटुंब स्थापन होतांच त्यानें प्रथम गृहिणीकरितां स्वतांचा विमा केला पाहिजे. विम्यानें अकाली मृत्यूनें येणाऱ्या आपत्तींचें भय कांहीं अंशीं तरी कमी होतें. गृहिणीसंबंधीं यजमानाचें हें पहिलें कर्तव्य आहे. विमा शक्य तितका लवकर करण्यानें हप्त्याची रक्कम कमी पडते. शिलकेच्या ४ आण्यांपैकीं १ आणा विम्यास लावून देण्यानें विम्याची रक्कमही ठरते. पुढें प्राप्ति वाढून १ आण्याची रक्कम वाढूं लागली म्हणजे आणखी विमे करीत जाणें इष्ट आहे.

गृहिणीची तरतूद विम्यानें करून शिलकेच्या ३ आण्यांपैकीं १ आणा आई—बापांच्या संसारास मदत म्हणून देतां येतो. त्यामुळें वृद्धापकाळीं त्यांस मदत होते. अशा मदतीची त्यांस गरज नसल्यास तोच आणा आईबापा खेरीज ज्या इतर व्यक्तींनीं किंवा संस्थांनीं आपल्या संगोपनांत व शिक्षणांत मदत केली असेल त्यांस परतफेड करण्यांत लावितां येतो. त्या व्यक्ती किंवा संस्था नसल्यास तत्सम इतर व्यक्तींस किंवा संस्थांस मदत करितां येते.

ही कर्जफेड झाल्यावर तोच १ आणा इतर सामाजिक दानांकरितां घेतां येतो.

२ पैसे आप्तांकरितां—स्वकुलांतील व्यक्तींस किंवा संस्थांस मदत.

२ पैसे अनाप्तांकरितां—व्यक्ती किंवा संस्था.

प्रत्येकीं १ पै. { स्थानिक—स्वजातीय
स्वप्रांत—स्वधर्मीय.
स्वदेश—इतर.

सार्वजनिक देणगी देतांना स्थलमर्यादेप्रमाणेंच कांहीं कालमर्यादा घालणेंही इष्ट आहे. साधारणपणें एक पिढीपेक्षां (२०—२५ वर्षांपेक्षां) जास्त दूरदृष्टि ठेवणें नको.

विमा, आईबापांस व आप्त-अनाप्तांस मदत, सार्वजनिक देणग्या, हे सर्व दिसण्यांत खर्च असूनही त्यांकरितां रक्कम शिलकेंतून घेणें अगदीं योग्य आहे. विम्याची रक्कम तर कांहीं मुदतीनें परत येणारी असतेच. त्याचप्रमाणें दुसऱ्यांस केलेली मदत ही मदत करणाऱ्यास किंवा त्याच्या कुटुंबीयांस पुढें मागें परत मिळणारी आहे, म्हणजे ती शिल्लकच आहे.

६. हे २ आणे वजा जातां बाकी २ आणे दर महिन्यास जमवीत गेल्यास सुमारें ६ वर्षांत एक वर्षाच्या खर्चापुरती रक्कम होईल. म्हणजे एक वर्षपर्यंत उत्पन्नांत खंड पडला तरी चालू खर्चास अडचण पडणार नाहीं. शिलकेंतून खर्च करून पुन्हां उत्पन्न होऊं लागतांच ही एक वर्षाच्या खर्चाची रक्कम पुन्हां जमवावी.

ही जमल्यानंतर पुढें याच २ आण्यांच्या जमावानें मुलांकरितां पितृधन तयार करितां येईल. मुलांचा शिक्षणाचा खर्च त्यांच्या लहानपणापासून जमविलेल्या रकमेंतून व्हावयाचा आहे. पण विशेष शिक्षणाकरितां किंवा शिक्षणानंतर उद्योग सुरू करण्यास कांहीं पुंजी लागल्यास ती या पितृधनांतून घेतां येते. तसेंच मुलींच्या उच्च शिक्षणाकरितां किंवा विवाहाकरितां लागणारी रक्कम (हुंडा) मुलींच्या पितृधनांतून घेतां येईल. शिक्षणावर जास्त खर्च झाल्यास विवाहास रक्कम कमी राहील. मुलांप्रमाणेंच मुलींचाही पितृधनावर हक्क मान्य केला पाहिजे. त्यांस देण्याच्या पितृधनाशिवाय यजमान व गृहिणी यांच्या स्वतांकरितांही कांहीं रक्कम जमवावयास पाहिजेच. कारण त्यांतूनच मुलांमुलींचीं मुंजीलग्नें व्हावयाचीं आहेत. हा खर्च हौशीचा असतो; त्यामुळें त्यांची जबाबदारी यजमानगृहिणींवर आहे. (कांहीं सोनें दागिन्याकरितां घेतलें गेल्यास तेवढें मुलांच्या पितृधनांतून घेतां येईल.) हा हौशीचा खर्च जास्त होऊं नये. नाहींतर वृद्धापकाळीं अडचण पडेल. मुलांकडून मदत मागण्याची पाळी येईल. साधारणपणें एक महिन्याच्या उत्पन्नापेक्षां जास्त खर्च एका कार्यावर करूं नये.

७. मनुष्याचें मिळवितें आयुष्य सरकारी नोकरींत सुमारें ३० वर्षें असतें. खाजगी उद्योगांत कांहीं जास्त धरलें तरी साधारणतः ४० वर्षांपेक्षां जास्त असत नाहीं. तेव्हां २ आणे माहवार शिल्लक जमवीत गेल्यास इतक्या मुदतींत स्वतःकरितां, गृहिणीकरितां, व प्रत्येक मुलास एक वर्ष सर्व कुटुंबास पुरण्याइतकी रक्कम करून ठेवितां येईल, इतकी साधारणतः पुरे आहे. मुलांस फार जास्त रक्कम पितृधन म्हणून देणें इष्टही नाहीं.

८. ही सर्वच रक्कम जवळ ठेवावयास नको. सर्वांचे सारखे हिस्से समजले जावे पण ते वेगवेगळ्या प्रकारें ठेविले जावे.

गृहिणीची रक्कम—विमा, सोनें (दागिने), पोष्टल सेव्हिंग बँक, कॅश सर्टिफिकेटच्या रूपानें.

मुलांची रक्कम—सरकारी रोखे, सरकार हमीचे शेअर. (ट्रस्ट सिक्युरिटीज).

यजमानाची रक्कम—इतर सुरक्षित शेअर, व्यापार.

केव्हांही सट्टयांत रक्कम घालून झटपट श्रीमंत होण्याचा प्रयत्न करूं नये.

९. मुलें स्वतंत्र मिळविती झालीं म्हणजे त्यांचा खर्च कमी होईल. त्याबरोबर बहुधां यजमानाचें उत्पन्नही कमी किंवा बंद होईल व स्वतःच्या आणि गृहिणीच्या हिश्याचे शिल्केंतून खर्च चालवावा लागेल. पेन्शन नसल्यास शिलकेच्या रकमेनें स्वतःकरितां व गृहिणीकरितां वर्षासन (ॲन्युइटी) करून घेणें चांगलें. शिल्केंतूनच यजमानगृहिणीस यात्रा—प्रवास, विशेष दानधर्म, देणग्या यांवर खर्च करितां येईल. देणग्या हयातींतच देणें चांगलें. निदान त्यांचें व्यवस्थापत्रक व विश्वस्त करून ठेवणें इष्ट आहे.

थोडी शिल्लक शेवटच्या महायात्रेसंबंधीं खर्चास राखिली जावी. त्याचा बोजा मुलांवर ठेवूं नये.

१०. प्रत्येक कुटुंबांत नेहमींच्या पद्धतीप्रमाणें जमा-खर्च लिहिला जातो. हें काम मुख्यतः गृहिणीचें आहे. तिला त्याचें चांगलें ज्ञान नसल्यास तें करून दिलें पाहिजे, व तिच्याकडून तें काम करून घेतलें पाहिजे. मनूनें "आय—व्यय—निरीक्षण" हें गृहिणीचें कर्तव्य म्हणून सांगितलें आहे. तें चांगलें होण्यास बुद्धीची प्रगल्भता पाहिजे.

नेहमींच्या जमाखर्चाखेरीज कांहीं नांववार खातीं ठेवून प्रत्येक खात्यांत वरील कोष्टकाप्रमाणें जमा किती, खर्च किती व खर्च होऊन शिल्लक किती राहते तें खातेवारीनें दाखविलें पाहिजे, म्हणजे कांहीं जास्त खर्च करणें आल्यास त्यास शक्यता किती आहे तें समजूं शकेल. निरनिराळ्या खर्चांचें वर्गीकरण कोष्टकांत ज्या प्रकारें दाखविलें आहे त्यावरून खर्चाच्या बाबींचा एकमेकांशीं संबंध चटकन् लक्षांत येतो. उदाहरणार्थ समाईक खर्च आठ आण्यापेक्षां जास्त लागल्यास तो वैयक्तिक रकमेंतून केला पाहिजे. अन्नावर जास्त लागल्यास 'घर'च्या रकमेंतून घेतला पाहिजे. भाडें जास्त लागल्यास 'घर' संबंधीं इतर खर्चांतून घेतलें पाहिजे. [जेथें घरभाडें फारच जास्त (प्रमाणाच्या दुप्पटीपेक्षां जास्त) असतें तेथें एकंदर उत्पन्नांतून भाडें वेगळें काढून घेऊन मग बाकी रकमेची कोष्टकाप्रमाणें विभागणी करणें भाग आहे. जेथें उत्पन्नाबरोबर कांहीं विशेष खर्च करणें अवश्य असतें तेथें तो विशेष खर्च उत्पन्नांतून वेगळा काढून घेऊन बाकी रकमेची कोष्टकाप्रमाणें विभागणी करणें प्राप्त होतें.]

११. 'वस्त्र' यावर जास्त खर्च करावयाचा झाल्यास तो बलोपासना (कलोपासना) किंवा आरोग्य यांच्या रकमेंतून घ्यावयास पाहिजे. औषधें यावर जास्त खर्च करितां येण्यास करमणूक, व्यसनें यांचा खर्च कमी करावयास हवा. आप्तांकरितां कमी जास्त खर्च करणें जरूर पडल्यास अनाप्तांकरितां कमी करावयास हवा. तसेंच स्थानिक किंवा स्वजातीय संस्थास दान जास्त दिल्यास इतर प्रांत—देश—धर्म—यांस देण्यास कमी राहील.

हे संबंध चटकन लक्ष्यांत येणें हाच वरील विशिष्ट कोष्टकरचनेचा हेतू आहे. आणेवारीनें रकमा ठरविणें सोपें होतें.

सावरकर, बॅ. विनायक दामोदर (१८८३—):—तेजस्वी क्रांतिकारक. बॅ. सावरकरांचें नाव माहीत नाहीं असा सुशिक्षित महाराष्ट्रीय आढळणें अशक्य. त्यांचें राष्ट्रप्रेम, त्याग, वक्तृत्व व हिंदूधर्माचा नी संस्कृतीचा अभिमान अलौकिक आहे. त्यांचा जन्म नाशिक जिल्ह्यांतील भगूर या गांवीं शके १८०५ वैशाख कृ. ६ (सन १८८३) या दिवशीं झाला. प्राथमिक शिक्षण भगूरलाच झालें. वयाच्या अवघ्या १०व्या वर्षी 'जगद्धितेच्छू'त त्यांची कविता प्रसिद्ध झाली. १८९७ मध्यें भगूरला प्लेग झाला व त्यांत त्यांचे वडील



बॅ. विनायकराव सावरकर

व चुलते बळी पडले. लहानपणीं आई वारली होतीच; तेव्हां तिथे सावरकर बंधू नाशिकला रामभाऊ दातार नांवाच्या आपल्या मित्रांच्या घरीं येऊन राहिले. नंतर १९०१ मध्यें ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. आणि पुढील शिक्षणासाठीं ते पुण्यास फर्ग्युसन कॉलेजमध्यें आले. १९०४ मध्यें बी. ए. झाले व पुढें एल्‌एल्. बी.चा अभ्यास करण्यासाठीं १९०६ मध्यें मुंबईस गेले. तेथें त्यांनीं 'विहारी' पत्र चालविलें व विश्वविख्यात 'अभिनवभारत' संस्थेची स्थापना केली. पण त्याच वर्षी पं. शामजी कृष्ण वर्मा यांची शिष्यवृत्ति मिळून जूनच्या सुमारास बॅरिस्टर होण्यासाठीं ते इंग्लंडला निघाले. १९०९ मध्यें ते बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाले; परंतु त्यांच्या स्वातंत्र्यविषयक चळवळीमुळें त्यांना सनद देण्याचें नाकारण्यांत आलें. पं. शामजी कृष्ण वर्मा हे इंग्लंडमध्यें हिंदी स्वातंत्र्यासाठीं चळवळ करीत असत. त्यांना सावरकरांचें सहाय्य मिळालें. तेथें त्यांनीं 'फ्री इंडिया सोसायटी' स्थापिली व 'तरवार' पत्र सुरू केलें. शामजींनीं 'इंडिया हाऊस' सावरकरांच्या स्वाधीन केलें. त्यांनीं महत्प्रयासानें बॉम्ब तयार करण्याची माहिती मिळविली व अभिनवभारतसंस्थेच्या निवडक सभासदांस ती कृति शिकवण्यांत आली; १८५७ सालच्या 'स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहास' त्यांनीं लिहिला; पण तो प्रसिद्ध होण्यापूर्वीच जप्त झाला. मध्यंतरीं पॅरिस येथें जाऊन मॅडाम कामा या पारशी युवतीच्या सहाय्यानें चळवळ चालू ठेवली व सर्व युरोपभर चळवळ्यांचें जाळें पसरविलें. १९१० मध्यें सावरकर लंडनला परतले. ते लंडनच्या स्टेशनवर पोंचतात तोंच त्यांना गाडींतच १२१ इं. पि. कोडच्या निर्बंधाखालीं अटक झाली व त्यांना हिंदुस्थानास पाठविण्याचें ठरलें. हिंदुस्थानास येतांना त्यांची बोट मार्सेलिस बंदराला लागली, त्यावेळीं संडासाच्या गवाक्षांतून समुद्रांत उडी मारून सावरकरांनीं बंदुकीच्या गोळ्यांना चुकवीत फ्रान्सचा किनारा गांठला. फ्रान्सच्या भूमीवर इंग्रजांना कांहीं करतां येत नाहीं या आधारावर एखाद्या फ्रेंच मॅजिस्ट्रेटपुढें जाण्यासाठीं त्यांनीं पळ काढला व एका फ्रेंच पोलिसाला गांठलें; पण 'चोर, चोर' म्हणून इंग्लिश शिपायांनीं केलेल्या गिल्ल्याच्या आहारीं जाऊन त्या फ्रेंच पोलिसानें सावरकरांना इंग्लिश शिपायांच्या स्वाधीन केलें. पुढें त्यांना मुंबईस आणून त्यांच्यावर खटला भरला व २३ डिसेंबर १९१० रोजीं त्यांना आजन्म काळ्या पाण्याची शिक्षा दिली गेली; पण एवढ्यानें सरकारचें समाधान न होऊन हत्त्येस चिथावणी दिल्याच्या आरोपावरून आणखी एक खटला भरला व त्यांत आणखी एका जन्मठेपेची शिक्षा म्हणजे एकूण ५० वर्षांची जन्मठेपेची शिक्षा झाली व त्यांना अंदमानास पाठविण्यांत आलें. जानेवारी १९२४ मध्यें राजकारणांत भाग न घेण्याच्या अटीवर सुटका झाली व रत्नागिरीस स्थानबद्ध करण्यांत आलें.

अंदमानांत काळ्या पाण्याच्या शिक्षेच्या मुदतींतहि सावरकरांना स्वस्थ बसवलें नाहीं. कागदपेन्सिली ठेवण्याची अनुज्ञा नसतांहि, त्यांनीं भिंतीवर कोरून काव्यें लिहिलीं, प्रबंध रचिले; 'गोमंतक,' 'सप्तर्षि,' 'कमला' हीं काव्यें व 'हिंदुत्त्व' हा निबंध तेथें बंदींत जन्मला. कारागृहांत त्यांनीं साक्षरतेची व शुद्धीची चळवळ केली. त्यांनीं तेथें भोगलेले हाल व केलेल्या चळवळींच्या हकीगती त्यांच्या 'जन्मठेप' या पुस्तकांतूनच वाचाव्या. रत्नागिरीस प्लेग झाल्यामुळें कांहीं दिवस त्यांना नाशिकला ठेवण्यांत आलें होतें. पुढें १९३५ मध्यें वामनराव चव्हाण यांनीं मुंबईस सार्जंटवर केलेल्या गोळीबाराशीं सावरकरांचा संबंध जोडण्यांत येऊन त्यांना १५ दिवस रत्नागिरींत अटकेंत ठेवून पुढें पुराव्याच्या अभावीं सोडण्यांत आलें. रत्नागिरीस राजकारण नाहीं तर समाजकारण, धर्मकारण या बाबतींत त्यांनीं चळवळी करण्यास प्रारंभ केला. मुंबईस त्यांचे धाकटे बंधू चालवीत असलेल्या 'श्रद्धानंद' पत्रांत व पुढें किर्लोस्कर मासिकांत त्यांनीं अनेक लेख लिहून शुद्धि,संघटन,जात्युच्छेदन, भाषाशुद्धि, लिपिशुद्धि, धर्माच्या बाबतींतील विवेक-अविवेक, अस्पृश्यतानिवारण या कार्यांवर भर दिला व महाराष्ट्रांतील तरुणांच्या वैचारिक क्रांतीस मोठ्या मोलाचें सहाय्य केलें. रत्नागिरी जिल्ह्यांत व्याख्यानें व दौरे काढून त्यांनीं प्रत्यक्ष कामहि करून दाखविलें आहे.

पुढें १९३५ च्या नव्या कायद्यानुसार प्रांतिक स्वायत्तता मिळून नव्या विधिमंडळांच्या निवडणुकी झाल्या (१९३७). आरंभीं काँग्रेसनें मंत्रिमंडळें न बनविण्याचें ठरविलें; त्या मुदतींत (सुमारें ४ महिने) मुंबईस कूपर मंत्रिमंडळ अधिकारारूढ होतें व बॅ. जम्नादास हे या मंत्रीमंडळांत गृहमंत्रि होते. त्यांनीं एप्रिलमध्यें बॅ. सावरकरांना बिनशर्त मुक्त केलें व अशा तऱ्हेनें शृंखलाबद्ध झालेला हा सिंह मुक्त झाला.

यानंतर ऑगस्टपर्यंतचे त्यांचे दिवस सत्कारसमारंभांत गेल्यावर १ ऑगस्ट १९३७ रोजीं टिळक पुण्यतिथीनिमित्त पुण्यास भाषण करून आपल्या पुढच्या कार्याची व काँग्रेसचें धोरण स्वतःस पटत नसल्यामुळें काँग्रेसला न मिळतां लोकशाही स्वराज्य-पक्ष व हिंदुसभा यांना आपण मिळत असल्याची घोषणा केली; व तेव्हांपासून त्यांनीं आपल्या राजकीय कार्याला पुन्हां सुरवात केली.

ही सुटका होतांच अहमदाबाद (१९३७), नागपूर (१९३८), कलकत्ता (१९३९), व मदुरा (१९४०) चे अध्यक्ष म्हणून हिंदुसभेचें व पर्यायानें अखिल हिंदूंचें अमूल्य कार्य केलें आहे. १९३५ च्या कायद्यानें मान्य झालेला जातिनिर्णय, बंगाल, पंजाब व सिंध या प्रांतांतील हिंदूवर या राज्यघटनेनें झालेला अन्याय, लष्करांतील हिंदूंचें अल्प प्रमाण व काँग्रेसनें मुस्लिम लीगला व पर्यायानें मुसलमानांना अवास्तव महत्त्व देऊन प्रत्येक बाबतींत बहुसंख्य हिंदूंचें नुकसान करून, मुसलमानांच्या अन्याय्य मागण्या मान्य करून त्यांच्याशीं नमतें घेण्याचें धोरण यांचा त्यांनीं सदैव निषेध केला आहे. १९३५ च्या कायद्यानें हिंदुस्थानांतील बहुसंख्य हिंदू दुर्दैवानें अल्पसंख्यांक बनले असून याला ब्रिटिश राजकर्त्यांच्याबरोबर काँग्रेस हीहि जबाबदार असल्याचें त्यांनीं स्पष्ट केलें. सर्व हिंदुस्थानभर मुसलमानांचें अत्याचार व अवास्तव प्राबल्य याविरुद्ध अखिल हिंदूंनीं एकजूट केली पाहिजे असा त्यांचा आदेश आहे. मुसलमानांच्या बाबतींत 'आलांत तर तुमच्यासह, न आलांत तर तुमच्याशिवाय' आम्ही (हिंदू) झगडून स्वराज्य मिळवूं असें ते स्पष्ट बजावतात. हिंदूंच्या उज्ज्वल इतिहासापासून स्फूर्ति घेऊन ते 'हिंदूंना उज्ज्वल भविष्यकाल आहे' असा दुर्दम्य आशावाद प्रकट करतात.

वर उल्लेखिलेल्या वाङ्मयाशिवाय जोसेफ मॅझिनी (जप्त), १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध (जप्त), शीखांचा इतिहास (जप्त), हिंदुपदपातशाही (प्रबंध), काळें पाणी (कादंबरी), उःशाप, संन्यस्त खड्ग हीं नाटकें इत्यादि त्यांचें वाङ्मय प्रसिद्ध आहे. बॅ. सावरकर हे तेजस्वी कवि आहेत, एके काळीं त्यांचे पोवाडे (सध्यां जप्त) महाराष्ट्रांत प्रत्येक घरीं म्हटले जात होते. याशिवाय त्यांची भावनाप्रधान कविता विपुल आहे. तर्ककर्कश, बिनतोड व प्रसंगीं भावनाप्रधान व आवेशयुक्त प्रतिपादनशैली हे त्यांच्या गद्य लिखाणाच विशेष होत. त्यांचें वक्तृत्व म्हणजे आवेशाचा मूर्तिमंत अवतार आहे. त्यांचीं भाषणें जरूर वाचावीं. १९३८ च्या मुंबई म. साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

१९०८ सालीं तारुण्यांत उफाळणारी स्वातंत्र्यप्रीति आजहि त्यांच्या ठिकाणीं आहे. फरक एवढाच कीं अनुभवानें तिला किंचित् परिस्थितीनुरूप मुरड पडलेली आहे. १९३७ पूर्वीं राजकारणांत सर्वस्वीं मागें असलेली हिंदुसभा आज चार वर्षांत भारतांतील एक प्रमुख राजकीय पक्ष बनली असून काँग्रेसलाहि हेवा वाटावा एवढें तिचें वैभव वाढलें आहे आणि याचें संपूर्ण श्रेय स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकर यांनाच दिलें पाहिजे.

सावित्रीः–हिंदु स्त्रीपुढील आदर्श स्त्री. अश्वपतीची ही मुलगी. हिच्या आईचें नांव मालती. ही रूप, गुण यांनीं सुंदर होती. बापाच्या श्रीमंतीमुळें आपलें लग्न होण्यास अडचणी येत आहेत हें पाहून तिनें स्वतःच वरपरीक्षेचा निश्चय केला व ती पुढील उद्योगास लागली.

तिनें शाल्व देशचा गुणी पण अल्पायुषी राजपुत्र सत्यवान यास वरण्याचा निश्चय करून आपला बेत बापास कळविला. नारदानें तो अल्पायु असल्याबद्दल सांगून पाहिलें, पण तिचा निश्चय पाहून बापानें सत्यवान–सावित्री यांचा विवाह करून दिला.

पुढें ती नवऱ्याबरोबर सासरीं गेली. तिथें तिनें आपल्या गुणानें सर्वांचें प्रेम संपादन केलें. ती नवऱ्याचा अंतकाळ जवळ आल्यामुळें त्याच्याबरोबर वनांत गेली. तिथें यम, सत्यवानाचें आयुष्य संपल्यावर, त्याचा प्राण घेऊन निघाला. तेव्हां सावित्रीनें यमाला गोडगोड बोलून त्याच्याच शब्दांत त्याला पकडून त्याच्याकडून नवऱ्याचा प्राण तर परत मिळविलाच; पण सासऱ्याची दृष्टि, त्याचें राज्य, स्वतःला १०० मुलगे होण्याचे वर मिळविले.

यानंतर वरांप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या. बापाच्या पश्चात् सत्यवान सावित्रीसह गादीवर बसला. उभयतांनीं ४०० वर्षें राज्य केलें.

साळीः–सुंदर विणीचीं घरटीं बांधणारा वृक्षोपवेशक वर्गांपैकीं पक्षी. हा चिमणीहून थोडा लहान आहे. याची चोंच व पाय हे भाग चिमणीपेक्षां बळकट असून पंख व शेंपटी हे अवयव थोडे लहान असतात.

याचीं पिसें तांबडसर पिंगट असून त्याच्या भिवया मात्र पांढुरक्या असतात. उन्हाळयांत नराचें डोकें, मान आणि छाती हे अवयव सोनेरी बनतात व त्याची हनुवटी मात्र काळी होते. हा धान्य व बारीक किडे खातो. विहीर, नदी, तलाव, बाभळीसारख्या इतर झाडांच्या फांद्यावर हा आपलें घरटें बांधतो. याच्या घरट्याची वीण कपड्याप्रमाणें असते. याच्या या गुणामुळेंच त्यास साळी हें नांव प्राप्त झालें. घरट्याचा आकार उलट्या बाटलीसारखा असून एकाच झाडावर त्याचीं घरटीं पुष्कळ असू शकतात. पावसाळ्याच्या संधीस मादी २।३ पांढरीं अंडीं घालते. अंडीं घालण्याच्या कालांत नराचा रंग पिंवळा धमक असतो.

सॉक्रेटिस (खि. पू. ४६९– खि. पू. ३९९):– महान ग्रीक तत्त्ववेत्ता. याचा जन्म अथेन्स शहरीं खिस्तपूर्व ४६९ व्या वर्षी झाला. याचा बाप साफ्रॉनिस्कस हा शिल्पकार होता. बापाजवळ शिल्पकला शिकून त्यानें कांहीं दिवस बापाचाच धंदा चालविला. पुढें कांहीं दिवस त्यानें लष्करांत सामान्य शिपायाची नोकरी केली. अनेक मोहिमांत त्याचे आंगचे शौर्यधैर्यादि गुण प्रत्ययास आले. यानंतर त्यानें सार्वजनिक कार्यांत भाग घेण्याचें सोडून दिलें. असें करण्याविषयीं आपल्याला ईश्वरी संदेश झाला असें तो सांगत असे. याच अंतःसंदेशानुसार त्यानें शारीरतप करण्यास सुरवात केली. कदान्न खाऊन शरीरधारणा करावी व केवळ लज्जारक्षणार्थ कपडे वापरावेत, थंडी व ऊन्ह यांची क्षिती बाळगूं नये,आपल्या गरजा अगदीं कमी कराव्यात, अशा प्रकारची कठोर तपस्या करून तो इंद्रियनिग्रह करण्यास शिकला. त्यानें आपल्या मनावरहि चांगलाच विजय मिळविला. कोणत्याहि परिस्थितींत त्याच्या मनाची समता बिघडत नसे, शांति ढळत नसे. भगवद्गीतेंत सांगितलेली स्थितप्रज्ञाचीं लक्षणें त्याच्या ठिकाणीं पूर्णत्वानें वास करीत होतीं. झांटिपीसारख्या कजाग पत्नीच्या सहवासांत मनाची शांति ढळण्यासारखे अनेक प्रसंग त्याच्या आयुष्यांत आले; पण या सत्पुरुषानें आपल्या मनाची शांती ढळूं दिली नाहीं. न्यायालयानें देहान्त शासन सांगितल्यानंतर तुरुंगाच्या आवारांत आपले सन्मित्र प्लेटो व क्रिटो यांच्या समक्ष हेमलॉक वनस्पतीचा रस प्राशन करून त्यानें आपली जीवितयात्रा संपविली (खि.पू.३९९).त्यावेळीं त्याचें वर्तन किती धीरोदात्त होतें याचें वर्णन त्याचा सच्छिष्य प्लेटो यानें केलें आहे; पण हा तपोनिष्ठ पुरुष माणूसघाण्या व सुतकी चेहऱ्याचा नव्हता. तो समाजप्रिय व आनंदी वृत्तीचा होता. त्याचा स्वभाव विनोदी होता. तो सर्व प्रकारच्या उत्सवांत मोठ्या उत्साहानें भाग घेई.

सॉक्रेटिसाला अगदीं तुटपुंजें शिक्षण मिळालें होतें; परंतु त्याची बुद्धि जात्याच चौकस असल्यामुळें त्यानें सुसंस्कृत अशा अथेनियन समाजांत प्रचलित असलेल्या विचारांशीं चांगला परिचय करून घेतला. अथीनियन तरुण नीतिमान् व सुसंस्कृत नागरिक व्हावेत या सदिच्छेनें त्यानें त्यांना शिक्षण देण्यास सुरवात केली. त्याची शिक्षणपद्धति प्रश्नोत्तर स्वरूपाची असे. तरुणांवर प्रश्नांची सरबत्ती करून मोठ्या खुबीनें तो त्यांना त्यांच्या अज्ञानाची जाणीव करून देई व सत्यज्ञान प्राप्त करून घेण्याचा योग्य मार्ग सुचवी. आपले उलटतपासाचें प्रभावी शस्त्र तो ज्यांच्या ज्यांच्यावर चालवी त्यांचें त्यांचें अज्ञान व ढोंग उघडकीला येई; यामुळें त्याला पुष्कळ शत्रु निर्माण झाले. तथापि प्लेटो, झेनोफोन, युक्लिड, क्रिटो वगैरे तत्कालिन थोर लोक आणि जिव्हाळ्याचे मित्र होते. सॉक्रेटिसाचें शुद्धाचरण, त्याचा प्रामाणिकपणा, मानवजातीच्या हिताविषयींची त्याची कळकळ, याबद्दल त्याच्या या मित्रांना पराकाष्ठेचा आदर वाटे. परंतु त्याच्या शत्रूंनीं त्याचेवर देशांत पूजिल्या जाणाऱ्या देवतावर विश्वास न ठेवल्याचा व तरुणांना बिघडविल्याचा आरोप ठेवून, रीतसर खटला चालविला. अथेनियन नागरिकांच्या एका न्यायालयापुढें चाललेल्या या खटल्यांत त्यानें आपल्या बचावाचें दणदणीत भाषण केलें. तें 'ॲपॉलॉजी ऑफ सॉक्रेटीस' या नांवानें प्रसिद्ध आहे. त्याला या खटल्यांत देहान्त शिक्षा सांगण्यांत आली.

सॉक्रेटिसचें नांव तत्त्वज्ञ म्हणून गाजलें असलें तरी त्यानें तत्त्वज्ञानावर मुळींच ग्रंथरचना केलेली नाहीं. सॉक्रेटिसाचें तत्त्वज्ञान म्हणून विशिष्ट तत्त्वप्रणाली निर्माण करण्याचा प्रयत्नहि त्यानें केला नाहीं. सॉक्रेटिसाच्या तत्त्वांचें ज्ञान आपल्याला झेनोफोनच्या मेमोरेबिलिया या ग्रंथावरून व प्लेटोनें लिहून ठेवलेल्या सॉक्रेटिसाच्या संवादांवरून होतें.

सिंगर, ऐझॅक मेरिट (१८११–१८७५):–अमेरिकन संशोधक. जन्म ता. २७ ऑक्टोबर १९११ रोजीं

ऑस्वेगो येथें झाला. तो यंत्रशास्त्रज्ञ झाला. शिवण्याच्या यंत्रांत सुधारणा करण्याच्या कामीं त्यानें फार परिश्रम केले. त्यानें आपल्या शिवण्याच्या यंत्राचें पेटंट घेतलें. त्याचीं यंत्रें सिंगरचीं यंत्रें म्हणून प्रसिद्ध आहेत. या शोधापासून त्याला अलोट संपत्ति मिळाली. १९२९ सालीं चार वेगवेगळ्या देशांत हीं यंत्रें तयार करणारे नऊ कारखाने होते; त्यांत २७००० लोक खपत होते.

सिंधूः—हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी व इतिहासप्रसिद्ध व महत्त्वाची नदी. हिला सिंधूनद म्हणतात. ही तिबेटांतून निघून काश्मीर, वायव्य सरहद्दप्रांत, पंजाब व सिंध ह्या भागांतून वाहते. इच्या उगमाजवळच मानस सरोवर असून ती कैलासपर्वताच्या उत्तरेकडून वाहत येते. हिच्या लांबीच्या १६० मैलांवर हिला 'सिंग–का–बाब' हें नांव मिळतें. हिच्या उगमाचें ठिकाण १७००० फूट उंच आहे. अटक शहरापर्यंतीं हिची लांबी ८६० मैल भरते. अटकेजवळ हिला काबूल नदी मिळते. नंतर येथून पुढें ती इंग्रजी मुलखांतून वाहते. झेलम, चिनाब, रावी, बिआस व सतलज ह्या पांच नद्या मिथनकोट शहराच्या वरच्या बाजूला मिळतात. वरील पांच नद्यांच्या साहाय्यामुळें हिचा विस्तार एकदम मोठा होतो. वरच्या नद्या मिळण्यापूर्वी हिची रुंदी ६०० यार्ड असून ती १५ फूट खोल असते. तसेंच तिचा वेग २५ मैल असतो. मिथनकोटाच्या पुढें पूर आल्यावर हीच नदी ५ मैल रुंदीची बनते. मिथनकोटहून ही काश्मीरजवळ सिंध प्रांतांत शिरते. पुढें ही सक्करमधून वाहत जाऊन अनेक मार्गांनीं अरबी समुद्रास जाऊन मिळते. मार्चपासून ऑगष्टपर्यंत ही हळूंहळू फुगत जाते, तर उलट सप्टेंबरमध्यें ती कोरडी ठणठणीत पडते. हिच्या मुखाजवळील त्रिकोणाकृति जमिनीचें क्षेत्रफळ ३००० चौ. मैल आहे. ही जमीन सपाट असून शिवाय निर्वृक्ष आहे. या बाबतींत इजिप्तमधील नाईल नदीशीं हिचें पूर्ण साम्य दिसतें. उलट गंगेच्या बाबतींत स्थिति उलटी आहे. मुखाजवळच्या त्रिकोणाकृति भूमींत कुरणें सपाटून आहेत. लोक शक्य तेथें भाताचीं पिकें काढतात. त्यामुळें तांदूळहि मुबलक होतो. जमिनींत वाळूचें प्रमाण बरेंच असल्याकारणानें एकंदरीनें ही भूमि सुपिक नव्हे. नदीचा प्रवाह वारंवार बदलत असल्यामुळें नुकसान फार होतें. पावसाच्या दुर्भिक्षतेमुळें पंजाब आणि सिंध या प्रांताचें जीवित हिच्यावर अवलंबून आहे. पूर्वीच्या व आतांच्या सत्ताधाऱ्यांनीं हिच्या उपनद्यांना बंधारे घालून पंजाबला सुपीक करून सोडला. सक्करला हिचे कांठीं बांधलेलें धरण जगांत सर्वांत मोठें म्हणून प्रसिद्ध आहे. इची लांबी १८०० मैल भरते.

सिद्धासनः–कुल्यावर बसून डाव्या पायाची टांच गुद व वृषण यांच्यामधील भागास—शिवणीस—जोरानें खेंटून बसवावी. उजव्या पायाची टांच जननेंद्रियाच्यावर बसवावी. (अगर डाव्या पायाच्या टांचेवर ठेवावी). हातांचे तळवे गुडघ्यावर टेंकून ताठ बसावें. हनुवटी छातीचे शिंपेलगत खालचे बाजूस छातीवर बसवावी. नासाग्रीं दृष्टि करून श्वसनक्रिया चालू करावी.

शांतता, आरोग्य व नाडीशुद्धता या गोष्टी या आसनानें साध्य होतात. पुरुषत्व कमी करणारें हें आसन आहे म्हणून विवाहित पुरुषांनीं हें करूं नये.

सिमलाः—हिंदुस्थान सरकारचें उन्हाळ्यांतील राजधानीचें ठिकाण. येथें व्हाइसरॉय व सर सेनापति यांचीं ऑफिसें उन्हाळ्याच्या दिवसांत जात असतात. तसेंच या मुदतींत दिल्लीची लेजिस्लेटिव्ह असेम्ब्ली नि कौन्सिल ऑफ स्टेट यांच्या बैठकी या ठिकाणीं भरत असतात. हें ठिकाण हिमालयाच्या अनेक टेकड्यांवर बसलेलें असून त्याची उंची स. स. पासून ७११६ फूट आहे. G. I. P. किंवा B. B. & C I. रेल्वेनें कालका स्टेशनपर्यंत जातां येतें. नंतर तेथून मोटारीनें अथवा रेल्वेनें सिमल्याला येतां येतें. हिमालयाच्या रांगांत हें आहे त्यामुळें येथील हवा थंड असून सृष्टिसौंदर्यसंपन्न म्हणून हें ठिकाण प्रसिद्ध आहे.

सिमेंट (पोर्टलंड):—चुनकळी व कुंभारमाती (Calcareous and Argillaceous) यांचीं मिश्रणें एकत्र करून एक नवीन मिश्रण तयार करतात व तें तापवितात. कांहीं वेळ गेल्यानंतर त्याचें बारीक पीठ करून तें पोत्यांत भरून ठेवतात. जोसेफ ॲस्पडिन् या एका इंग्लिश गृहस्थानें इ. स. १८२४ सालीं हें सिमेंट तयार केलें.

सिंहः—चतुष्पाद प्राण्यांचा राजा. याचा परिचय आपल्याकडील लोकांना वेदकालापासूनचा आहे. हा प्राणी आफ्रिका, दक्षिण आशिया, सीरिया, आशियामायनर, इराण, अरबस्थान, उत्तर व मध्य—हिंदुस्थान या ठिकाणीं सांपडतो. पूर्वीं हा रोम, ग्रीस या देशांतहि होता असें कांहींचें म्हणणें आहे.

मांजराच्या वर्गातला हा प्राणी पादांगुलचारी जातीचा आहे. हा रंगानें पिंगट असून त्याची शेंपटी झुबकेदार असते. नाक, डोळे, तोंड, कान या सर्वांची ठेवण मांजराप्रमाणेंच असून शरीराच्या मानानें याची कमर बारीक असते. मानेवर आयाळ असते. रात्रीं याला दिसूं शकतें. मांसावर हा जगतो. याला झाडावर चढतां येत नाहीं. उंची ३-४ व लांबी १० फूट असते.

याची ताकद फार मोठी असल्यानें तो हत्ती, घोडा, बैल यांना सहज रीतीनें पकडतो व ठार करून खातो. घोड्यासारखा प्राणी हा पाठीवर घेऊन पळूं शकतो. त्याच्या प्रचंड बलामुळेंच त्यास 'पशूंचा राजा' असें म्हणतात. याचा आवाज मेघगर्जनेप्रमाणें असतो. कित्येक वनपशु याच्या डरकाळीनें गर्भगळीत होतात. हा इतका धीट, शूर व भयंकर जरी आहे तरी तो उदार व कृतज्ञहि आहे. सिंहाचीं पिलें प्रथम आंधळीं असून त्याच्या अंगावर काळे पट्टे असतात. पिलाचा आवाज पहिल्यानें मांजरासारखाच असतो, पण पुढें त्यास गांभीर्य येतें. पिलाचें रक्षण सिंही ५।६ महिने करते. सिंहीला आयाळ नसते; सिंहाला ती असते. आयाळामुळें सिंहाला डौलदारपणा प्राप्त होतो. कित्येकजण म्हणतात कीं, सिंह सरळ २४ हातांपावेतों उडी मारूं शकतो. हा ५० वर्षे जगतो.

सिंहासनः—आसनावर पहिल्यानें साधी मांडी घालून बसावें. डावा घोटा शिवनीच्या उजव्या बाजूस बसवून पायाचा तळवा उजव्या मांडीला चिकटवावा. उजव्या पायाचा घोंटा डाव्या पायावरून डाव्या पायाच्या शिवनीलगतच्या भागास लावून उजवें पाऊल डाव्या मांडीलगत धरावें. गुडघे जमिनीस टेकावे. दोन्ही हातांचे तळवे गुडघ्यावर टेंकून हातांचीं बोटें रुंदवावीं. दंडावर जोर टाकावा. हनुवटी छातीस लावावी. तोंड पसरून जीभ शक्य तितकी जास्त बाहेर काढावी, व दृष्टि नासाग्रीं अगर भ्रूमध्यावर स्थिर करावी. बंधत्रय साधावा. (१ मूलबंधः—गुदद्वार आंत खेचणें. २ उड्डीयानः—बेंबी व ओटीपोटाचा भाग भकाळीं नेणें. ३ जालंदरः—घशांत श्वासनलिका आकुंचित करून हनुवटी शिंपेजवळ छातीस दाबणें.) कुंभक करावा. यायोगें कंबर बळकट होते. शरीरबल वाढतें. अग्नि प्रदीप्त होतो.

सीताः—प्रभु रामचंद्राची बायको. जनकाची ही मुलगी. हिला जानकीहि म्हणतात. जनकाचा धनुष्यभंगाचा पण रामानें जिंकल्यामुळें हिचें रामाशीं लग्न झालें.

यानंतर ती रामाबरोबर वनवासास गेली. ही पर्णकुटिकेंत असतां रावणानें तिला पळवून नेऊन लंकेंतील अशोक वनांत नेऊन ठेविलें. पुढें रामानें रावणाचा वध केल्यावर ही रामासह अयोध्येला आली.

ही व राम आनंदानें कालक्रमणा करीत असतां एकदां हिच्या चारित्र्यासंबंधीं एकानें शंका प्रदर्शित केली म्हणून लोकापवाद टाळण्यासाठीं रामानें, जरी हिचें पावित्र्य अग्निदिव्यानें सिद्ध झालें होतें तरी, हिचा त्याग केला. त्यागाच्या वेळीं ही गरोदर होती. परित्यक्तावस्थेंत तिला वाल्मीक ऋषीचा आधार मिळाला. येथें असतांना हिला लव नि कुश हे दोन जुळे मुलगे झाले. पुढें हिला भूमीनें आपल्या उदरांत ठाव दिला.

सुतकः—मृताची शिवाशीव. सुतकाला अशौच असेंहि म्हणतात. हें आईच्या, बहिणीच्या, मावशीच्या, आतीच्या, सासरच्या, कन्येच्या व स्वतःच्या कुलांतील मृत मनुष्याबद्दल पाळतात. तें कांहींचें स्नानानें, कांहींचें एक दिवसानें, कांहींचें तीन दिवसांनीं व कांहींचें दहा दिवसांनीं फिटतें. मृताचे दिवस करणाऱ्या मनुष्याला तें बारा दिवस धरावें लागतें.

या सुतकाच्या कालांत धार्मिक गोष्टी व आनंदाचे प्रसंग पार पाडतां येत नाहींत. त्याचप्रमाणें अशौची माणसाला कोणाशींहि स्पर्शव्यवहार करतां येत नाहींत. खाणंपिणं, निजणंबसणं वगैरे व्यवहार तुटक करावे लागतात.

एक सुतक फिटायच्या आधींच दुसरें सुरूं झाल्यास दुसऱ्याचें दहा दिवस पुरे होईपर्यंत तें पाळावें लागतें. दहा दिवसांच्या मुदतींतील कांहीं दिवस न कळतां तसेच गेले तर ज्या दिवशीं सुतक कळेल तेथून पुढें उरलेल्या दिवसांपुरतें तें धरावें लागतें. न कळलेले दिवस माफ असतात. मृताला दहा दिवस होऊन गेल्यावर जर तें कळेल तर तें सुतक तीन दिवस पाळतात.

दांत येण्यापूर्वीं मुलगा किंवा मुलगी वारली तर तिचें सुतक स्नानानें नाहींसें होतें. तींच जर मोठीं असतील तर त्यांचें सुतक केवळ आईबापांनाच ३ दिवस धरावें लागतें. लग्नानंतर मात्र वरील कुलवार दिलेल्या माहितीप्रमाणें पाळतात.

मुंज होण्यापूर्वीं सुतक धरीत नाहींत; तसेंच तें ती होऊन सोडमुंज होईपावेतों त्याचा संसर्ग होऊं शकत नाहीं. सोडमुंज झाल्यापासून तें धरलें जातें.

कुटुंबांतील एकादा मनुष्य संन्याशी झाला असून तो जर समाधिस्थ झाला तर त्याचें सुतक त्याच्या नातेवाइकांना किंवा भाऊबंदांना धरावें लागत नाहीं.

हिंदी राजेरजवाड्यांत सुतक पाळण्याचे अधिकार त्यांच्या विशिष्ट घराण्याकडे असतात. पेशव्यांनींदेखील सध्यांच्या राजेलोकांप्रमाणेंच व्यवस्था केली होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या जातींत ते पाळतात. पण विशेषेंकरून तें ब्राह्मणांत कडकपणें पाळलें जातें. सुतकाच्या कालांत पांढरा वेश धारण करतात.

कुलवार सुतक—

स्वकुल—जवळच्याचें १० दिवस. पिढ्या तोडलेल्या लोकांचें ७–३–१ दिवस धरतात.

कन्याकुल—मुलगी जवळ असेल तर ३ दिवस. दूर असेल तर १ दिवस. तिच्या मुलांचें सुतक स्नानानें फिटतें. जांवई ३ दिवस.

आतीचें कुल—आती व तिचीं मुलें—स्नान होईपर्यंत तें असतें.

मावशी—मावशी व तिची मुलें—स्नान होईपर्यंत तें असतें.

सासरचें कुलः—सासू सासऱ्याचें सुतक ३ दिवसपर्यंत धरतात.

बहिणीचें कुलः—बहीण व तिचा नवरा यांचें सुतक तीन दिवस पाळतात; तिच्या मुलांचें सुतक स्नानानें नाहींसें होतें.

मातृकुलः—आजा-आजी व मामा-मामी यांचें अशौच तीन दिवस मानतात. त्यांच्या मुलांचें—स्नान केल्यावर खलास होतें.

सुतारः—धुळीनें आंग धुणारा हा सुंदर पक्षी वृक्षोपवेशक वर्गापैकीं आहे. मैनेएवढ्या आकाराचा हा पक्षी फार छान दिसतो. याच्या डोक्यावर तुरा आहे. तो हा भयभीत होतो त्यावेळीं पंख्याप्रमाणें डोक्यावर पसरतो. एरवीं त्याची घडी बनते व ती मागें झुकलेली असते. याची चोंच लांब व बारीक असून पुढें थोडी वांकलेली असते. हा प्राणी बहुतेक जमिनीवरच कालक्रमणा करतो. केव्हां केव्हां झाडावरहि बसतो. याला हळूहळू झोके घेत हवेंत उडण्याची मोठी हौस असते. हरणासारखा याच्या अंगाचा रंग आहे. पंखें मात्र काळ्या रंगाचीं पण पांढरे पट्टे असलेलीं असतात. सुताराचा आवाज 'डक डक' असा होत असतो. हा फळें न खातां भुईंतील किडे उकरून त्यांवर आपली भूक भागवतो. या सुताराला पाण्यानें आंघोळ करणें आवडत नाहीं तर ती तो धुळीनें करतो. याची मादी ओबडधोबड स्वरूपाचें व फार लहान तोंडाचें घरटें, बीळ, झाडाची ढोली, भिंत अगर भगदाड अशा ठिकाणीं बांधतें. उन्हाळ्यामध्यें मादी या घरट्यांत ४।५ अंडीं घालतें. हीं अंडीं फुटेपर्यंत उबवण्याचें काम तिलाच करावें लागतें. ती अंडीं उबवत असतांना नर तिला अन्न आणून देतो. अंडीं फुटून पिलें बाहेर आल्यावर तीं मोठीं होईपर्यंत नरमादी त्यांना सुरवंट आणून खाऊं घालूं लागतात. सुताराची वीण वर्षांतून दोन वेळ होते.

सुप्त वज्रासनः—दोन्ही पाय गुडघ्यांत वांकवून पिंढऱ्यावर मांड्या दाबून जमिनीवर नडग्यांचे भाग लावून बसावें. टांचा बाजूस बाहेर काढाव्या. पाठ जमिनीकडे नेऊन उताणें निजावें. दोन्ही हातांनीं डोक्यास विळखा घालावा. पुष्ठ व मान यांमधील भाग जमिनीस लागूं देऊं नये. हनुवटी छातीस खेटावी. नासाग्रीं दृष्टि ठेवावी.

पोट व नळ साफ होऊन शरीराचा दोंदिलपणा कमी होतो.

सुभद्राः—कृष्णाची बहीण व वसुदेवाची मुलगी. बलरामानें हिला दुर्योधनास देण्याचें ठरविलें होतें; पण पुढें अर्जुनानें हिला यतिवेषानें पळवून नेलें. हिनें अर्जुनाबरोबर पळून जात असतांना सारथ्य केलें. नंतर अर्जुनाच्या संमतीनें गोपीच्या वेषांत द्रौपदीकडे जाऊन हिनें तिचा आशीर्वाद मिळविला. इकडे कृष्णानें रागावलेल्या बलरामाचें सांत्वन करून सुभद्रा व अर्जुन यांना, कुंती, युधिष्ठिर व विदुर यांच्या अनुज्ञेनें द्वारकेस नेलें व तेथें पुष्कळ खर्च करून यथोचित असा त्यांचा विवाह करून दिला. पुढें हिला अभिमन्यु हा मुलगा झाला. ही गतजन्मीं माधवी होती. हिला लक्ष्मीच्या शापानें अश्वमुख प्राप्त झालें होतें. कृष्ण—बलराम यांना ब्रह्माकडून सुभद्र करून घेतलें. यावरून पुढें हिचें नांव सुभद्रा हें नांव रूढ झालें.

सुरणः—भाजीपाल्यामध्यें सुरणाची लागवड ही बरीच खर्चाची समजली जाते. कारण भाजीकरितां पीक तयार होण्यास पूर्ण चार वर्षें लागतात. मुंबई इलाख्यांत सुरणाची लागवड गुजराथ व बडोदें संस्थानांत मोठ्या प्रमाणावर करितात. कोंकणांतही मधून मधून हीं झाडें

पाहणेंस मिळतात. अलीकडे पुणें भागांत ह्याची लागवड केली जाते आणि त्या हवेंत हें पीक उत्तम येतें असें आढळून आलें आहे.

सुरणाचें झाड म्हणजे जमिनींतून सापाच्या कातडीप्रमाणें चित्रविचित्र रंगाचा आलेला फक्त उभा दांडा व त्यावर पपईच्या पानाप्रमाणें असणारा पानांचा झुबका. बटाट्याप्रमाणें ह्या झाडास जमिनींत गड्डा धरतो व तो चार वर्षांत हत्तीच्या पायाच्या आकाराप्रमाणें व आकारइतका मोठा होतो. म्हणूनच सुरणास इंग्रजींत Elephant's foot असें म्हणतात.

एवढा मोठा गड्डा जमिनींत तयार होण्यास जमीन भुसभुशीत व सकस पाहिजे हें कांहीं सांगावयास नको. निचरा होणारी जमीन व सेंद्रिय खताचा भरपूर पुरवठा असला म्हणजे पीक पहिल्या प्रतीचें येतें.

सुरतः—गुजराथेंतील या जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. येथें बी. बी. सी. आय. रेल्वेचें मोठें स्टेशन असून येथून तापी खोऱ्यांतील रेल्वेनें जळगांवला जातां येतें. हें मुंबईहून १६७ मैल दूर आहे.

हें शहर तापी नदीच्या दक्षिण तीरावर वसलें आहे. १६व्या शतकाच्या प्रारंभीं ह्या शहराचा अर्वाचीन भाग गोपीनाथ नांवाच्या एका हिंदू व्यापाऱ्यानें वसविला असें म्हणतात. पूर्वी या शहराची गणना मोठमोठ्या शहरांत होत असे. १८ व्या शतकांत येथील लोकवस्ती आठ लक्षांच्या घरांत असावी असा कित्येक अंदाज करतात. पश्चिम किनाऱ्यावरील या शहरांत डच, पोर्तुगीज व इंग्रज यांनीं आपापल्या वखारी घातल्या होत्या. पूर्वीपासूनच कलाकौशल्य व व्यापार याबद्दल सुरतेची प्रसिद्धि होती. लोक सुखी, संपत्तिमान होते. त्यामुळें या नगरावर शिवाजीनें लुटीसाठीं तीन वेळ स्वाऱ्या केल्या. गांवांत एक भुईकोट किल्ला असून सध्यां तेथें सरकारी कचेऱ्या आहेत. या किल्ल्याचा देखावा नदींतून चांगला दिसतो. हा किल्ला १५४० त गुजराथच्या राजाच्या पदरीं असणाऱ्या खुदावंतखान नांवाच्या शिपायानें बांधला. लष्करीदृष्ट्या याचें महत्त्व १८६२ पावेतों होतें. येथून १८३७ त इंग्रजांनीं आपलें व्यापारी ठाणें मुंबईस नेलें. आग, पूर व स्वाऱ्या या कारणांनीं शहराचें फार नुकसान झालें.

सध्यां शहरांतील वस्ती दाट असून रस्ते अरुंद पण स्वच्छ आहेत. या ठिकाणचें नगरसभेचें पदार्थसंग्रहालय, गोसावी महाराज व हनुमान यांचीं देवालयें, पारशांच्या अग्याऱ्या, चर्चीस व कांहीं मशिदी पाहण्यासारख्या आहेत. या ठिकाणीं एक कॉलेजहि आहे.

अलीकडे या शहराची वाढ उत्तम तऱ्हेनें होऊं लागली असून सुरतेचें नांव कॉंग्रेसमुळें लोकांच्या चांगलेंच परिचयाचें झालें आहे. येथें १९०७ ला कॉंग्रेस भरली होती. तींत मवाळ व जहाल यांच्यांतील मतभेद तीव्र स्वरूपाला गेले होते. शिवाय या कॉंग्रेसनंतर तिचीं सूत्रें जहाल पक्षाच्या हातीं कायमपणें गेलीं.

सुसरः—उष्ण प्रदेशांत आढळून येणारा जलचर प्राणी. नाईल नदी, दक्षिण नि उत्तर अमेरिका व हिंदुस्थान या ठिकाणीं हा भयंकर प्राणी आढळतो. हिंदुस्थानांत नर्मदा नदी सुसरीच्या वस्तीबद्दल प्रसिद्ध आहे. साधारणतः ती १६ फूटापर्यंत लांब असूं शकते. हिच्या पाठीवर हाडांचे उलटे खवले असतात. तसेंच तिच्या पायांच्या बोटांमध्यें पडदे असल्याचें दिसून येतें. मानेच्या मणक्यांना कांहीं फांसळ्या जोडलेल्या असल्याकारणानें हिला बाजूस लौकर वळतां येत नाहीं. म्हणून ही पाठलाग करीत असतां एकाद्याला बाजूला होऊन हिच्या कचाटांतून सुटका करून घेतां येते. सुसरीच्या जबड्याला पुढें ओठ नसतात. त्या कारणानें तिच्या तोंडांतील तीक्ष्ण दांत व दाढा उघड्या राहतात. दांत व दाढा दिसत असल्याकारणानें हिचें तोंड भयंकर वाटतें. जुन्या दातांखालीं नवे दांत येत राहून जुने पडत असतात. चिखल, झाडपाला गोळा करून त्यांच्या ढिगावर सुसर आपलीं अंडीं घालते. साधारणपणें पाल, घोरपड यासारखी ती दिसते. रंग मात्र भुरकट असतो.

सूरदास (स. १४८२–१५६०):—एक हिंदी भाषेंतील महाकवि व साधु. याची जन्मभूमि दिल्लीच्या जवळ असणारा 'सीही' गांव मानतात. पण कांहीं मथुरा ते आग्रा सडकेवर असलेलें 'सनकता' हें गांव समजतात. हा सारस्वत ब्राह्मण असून याच्या पित्याचें नांव रामदास होय.


यानें आपल्या 'दृष्टिकूट' ग्रंथावर स्वतः टीका लिहून स्वतःविषयीं माहिती दिली आहे. त्यावरून हा ब्रह्मभट असून चंदबरदाई या महाकवीचा वंशज होता असें दिसतें. याला सहा भाऊ होते. ते सर्व मुसलमानांशीं झालेल्या युद्धांत मारले गेले. हा आंधळा होता.

यानें वल्लभाचार्यांच्या आज्ञेवरून 'श्रीमद्‌भागवत' अनेक पदांमध्यें गायिलें आहे. तीं पदें 'सूरसागर' या नांवानें प्रसिद्ध आहेत. वल्लभाचार्यांच्या 'अष्टछाप-मंडळां'तील हा सर्वश्रेष्ठ कवि होय. याच्या 'साहित्य-लहरी' ग्रंथांत सूरसागरांतील दृष्टिकूट पदांचा संग्रह आहे. यांचा 'सूरसारावली' हा ग्रंथ 'सूरसागर' ग्रंथाची सूचि होय. याशिवाय ब्याहलो व नलदमयंती हीं याचीं काव्यें आहेत. याची हरिवंशावरील टीका अद्यापि उपलब्ध नाहीं. हा जन्मतः अंध नसावा. रामचरित्र गाण्यांत तुळसीदासानें प्रगट केलेलें चातुर्य यानें कृष्ण-लीला वर्णन करतांना प्रगट केलें आहे. यासंबंधीं हिंदीमध्यें पुढील कविता प्रसिद्ध आहे.

'सूर सूर तुळसी ससी, उडुगण केशवदास।
अबके कवि खद्यो तसम जहँ जहँ करै प्रकाश।'


'सूरदास सूर्य, तुळसीदास चंद्र आणि केशवदास नक्षत्रगण होय. बाकीचे कवि काजवे होत.' हे उद्धवाचे अवतार मानले जातात. यांची समाधी काशीच्या उत्तरेस दोन मैलांवर असलेल्या शिवपुरी गांवीं आहे.

सूर्यः—ग्रहमालेचा अधिप, पृथ्वीवरील जीवांना प्रकाश व उष्णता देऊन त्यांचे व्यापार चालविणारा ग्रह.




खग्रास सूर्यग्रहण लागलें असतां सूर्य असा दिसतो.

पृथ्वीवरील जीवन सूर्यावर अवलंबून असल्यामुळें सूर्य हा स्थावरजंगमाचा आत्मा आहे असें वेदांत म्हटलें आहे. सूर्य पृथ्वीपासून ९३०००००० मैल अंतरावर आहे. त्याचा व्यास ८६५००० मैल म्हणजे पृथ्वीच्या व्यासाच्या शंभरपटीहून अधिक आहे. त्याचें प्रकृति-द्रव्य पृथ्वीच्या प्रकृतिद्रव्याच्या ३३०००० पट आहे. सूर्याची सर्वसाधारण घनता पाण्याच्या घनतेच्या १$\frac{३}{८}$ पट असते. सूर्यबिंब नुसत्या डोळ्यांनीं पाहिलें असतां अत्यंत तेजस्वी दिसतें.ही गोष्ट खरी असली तरी त्याच्यावर काळे डाग आहेत. त्यांचा शोध इ. स. १६११ मध्यें दुर्बिणीचा शोध लागल्यावरच लागला. दुर्बिणींतून



खग्रास सूर्यग्रहण कसें लागतें व तें कोणत्या भागास दिसूं शकतें हें वरील चित्रांत दाखविलें आहे. (याशिवाय 'चंद्र-ग्रहण' हा लेख जरूर पाहा.)

हे डाग दिसतात. दुर्बिणींतून पाहिलें तर हे डाग काळ्या ठिपक्यासारखे दिसतात. सर्व डागांचा आकार सारखाच नसतो. सूर्य आपल्या आंसाभोंवतीं फिरत असल्यामुळें बिंबाचा एकच डाग बिंबाच्या निरनिराळ्या भागीं निर-निराळा दिसतो. कांहीं डाग कांहीं दिवस दिसून नाहींसे होतात. कांहीं तर कांहीं महिने दिसत नाहींत. कांहीं डागांचें क्षेत्रफळ कोट्यवधि मैल असतें. डागाचा



सूर्य-ग्रहण—पृथ्वी व सूर्य यांच्यामध्यें चंद्र आला म्हणजे सूर्य-ग्रहण लागते. वरील चित्रांत अपूर्ण व पूर्ण सूर्यग्रहण कसें लागतें हें स्पष्ट दाखविलें आहे. चंद्र-ग्रहणाप्रमाणें सूर्यग्रहण वारंवार लागत नाही. खग्रास सूर्य-ग्रहण तर क्वचित् येतें. सूर्याला राहू-केतू ग्रासतात ही हिंदूंची पुराणकल्पना आहे. सूर्य-ग्रहण फक्त आमावास्येलाच लागते. चंद्र-ग्रहणाप्रमाणें सूर्य ग्रहणाचे वेळीहि दानधर्म, जप, इत्यादि गोष्टी हिंदू ग्रंथांत सांगितल्या आहेत (चंद्रग्रहण पृ. ६३४ पाहा.)

मध्यभाग फार काळा दिसतो त्याला छाया म्हणतात. भोंवतालीं काळसर जागा दिसते तिला छायाकल्प म्हणतात. सूर्य आपल्या आंसाभोंवतीं फिरतो हें डागामुळेंच समजूं लागलें. सूर्यावरील हे डाग एखादे वर्षी फार दिसतात, एकाद्या वर्षी थोडेच दिसतात. एका वर्षात मुळींच डाग दिसला नाहीं असें कधीं होत नाहीं. हे डाग कमीअधिक प्रमाणांत दिसण्याच्या काळासंबंधानें ज्योतिषांनीं कांहीं नियम बसविले आहेत. एकदां डाग मोठ्या प्रमाणांत दिसले म्हणजे पुन: तसे दिसावयाला ११ वर्षें ३ महिने इतका काळ जावा लागतो. हे डाग दिसण्याच्या काळाचें चक्र सव्वा अकरा वर्षांचेंच कां असावें याविषयीं निश्चित शोध लागला नाहीं. उत्तरध्रुवाकडे दिसणारा आरोरा नांवाचा चमत्कारिक प्रकाश व विद्युच्छक्ति यांचा व डागांचा संबंध असल्याचें आढळून आलें आहे. ज्या वर्षी डाग फार त्या वर्षी आरोरा हा प्रकाश जास्त दिसतो, व विद्युत्यंत्रांना फार उपाधि होतात.

सोडचिठ्ठी:—घटस्फोट लेख पहा.

सोडा:—सोडा म्हणजे सोडियम कार्बोनेट. ही एक पांढरी पूड असते. याशिवाय सोडा ॲश, वॉशिंग सोडा (धुण्याचा सोडा), अथवा सोडा क्रिस्टल अशीं नांवें आहेत. हा खाणींत सांपडतो; शिवाय कॅलिफोर्निया, ब्रिटिश कोलंबिया, कीनिया येथील कांहीं तळ्यांत खार म्हणून सांपडतो.

सोडियम कार्बोनेटवर कार्बन डायॉक्साइडची रासायनिक क्रिया करून सोडियम बाय कार्बोनेट तयार करतां येतो. सोडियम बायकार्बोनेट म्हणजेच बेकिंग सोडा. सोडियम बाय कार्बोनेटचा औषधांतहि उपयोग करतात.

सोडावॉटर म्हणजे कार्बन डायॉक्साइडयुक्त पाणी. यांत सोडा क्वचित् असतो किंवा मुळींच नसतो.

सोनें:—हा एक मौल्यवान मूलधातू आहे. सोन्याचें रासायनिक चिन्ह Au· हें आहे. परमाणूवजन १९७·२ व विशिष्ट गुरुत्व १९·३२ इतकें आहे. १०६३° सें. उष्णतेवर तें वितळतें. सोन्याचा वर्ख $\frac{१}{२००००००}$ इतका पातळ काढतां येतो. या वर्खाचा उपयोग पुस्तकांच्यावर सोनेरीं अक्षरें छापण्याकडे (गिल्डिंग) करतां येतो.

सोनें सर्व जगभर सांपडतें; परंतु पुष्कळ ठिकाणीं त इतक्या कमी प्रमाणांत सांपडतें कीं त्या ठिकाणीं खाण ठेवण्याइतका खर्च झेपत नाहीं. सोनें खाणींत किंवा नद्यांत वाळू व माती यांत मिसळलेलें सांपडतें. क्वार्ट्झ् नांवाच्या दगडांतहि सोनें मिसळलेलें सांपडतें. दर वर्षी सुमारें ३० कोटी रुपयांचें सोनें निघतें. दक्षिण आफ्रिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, हिंदुस्थान, मेक्सिको, रशिया व अमेरिका (सं. संस्थानें) या देशांत सोन्याच्या मोठ्या खाणी आहेत.

आपल्याकडे उत्कृष्ट सोनें ५२ कशी म्हणून ओळखतात. इंग्रजी पद्धतीप्रमाणें २४ कॅरट म्हणजे उत्कृष्ट सोनें मानतात.

सर्व जगांत सांपडणाऱ्या सोन्यांपैकीं ⅔ सोनें दागिन्यांत खर्च होतें. अनादिकालापासून सोन्याच्या नाण्यांचा उपयोग होत आलेला आहे. पण अलीकडे सर्वत्र सोन्याच्या नाण्यांचें प्रमाण कमी झालेलें असून त्याची जागा रुप्याच्या नाण्यांनीं घेतली आहे. एखाद्या राष्ट्राजवळ सोन्याचा सांठा जेवढा जास्त तेवढी त्याची पत मोठी असें मानतात.

सुवर्णपरिमाण (Gold Standard) म्हणजे अमूक भार चोख सोन्याची अमूक रुपये (डॉलर, शिलिंग इ.) किंमत. ज्या वेळीं परराष्ट्रांचीं कर्जें (बाकी) द्यावयाला सोन्याशिवाय दुसरा कोणताहि मार्ग नसतो त्या वेळीं सुवर्णपरिमाण (गोल्ड स्टॅण्डर्ड) अस्तित्वांत आहे असें मानतात.

सोनें इतर मूलधातूंमध्यें कमीअधिक प्रमाणांत मिळून एकजीव होतें.

सोमलः—हें एक अत्यंत जहाल विष आहे. याचे दोन प्रकार पाहण्यास मिळतात. एक तांबडा व दुसरा पांढरा. सोमल हें क्षाररूपांत सांपडतें.

सोशॅलिझमः—अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडांत वाफेच्या शक्तीवर चालणाऱ्या गिरण्या सुरू झाल्या. या गिरण्या स्थापण्यास व चालविण्यास भांडवल फार लागत असल्यानें फक्त श्रीमंतांनींच गिरण्या उभारल्या. या गिरण्यांचा माल स्वस्त व सुबक असल्यानें खुल्या बाजारांत हस्तव्यवसायी कारागिरांचा माल गिरणीच्या मालाशीं होणाऱ्या चढाओढींत मागें पडून हस्तव्यवसाय बुडाले व रोज नवेनवे हस्तव्यवसायी कारागीर बेकार होऊन गिरण्यांत मजुरीवर जाऊं लागले. या कारखानदारी उत्पादनपद्धतीमुळें इंग्लंडचा व्यापार वाढून संपत्तीचा पूर इंग्लंडांत वाहूं लागला; पण ही संपत्ति आधींच श्रीमान् असलेल्या वर्गाजवळच आणखी वाढूं लागली, आणि उलट गरीब मजुरांची हलाखी उत्तरोत्तर वाढतच गेली. मजूर हे अगदीं अज्ञानी होते. मजुरामजुरांत रोजगारासाठीं चढाओढ चालत असल्यानें मजुरीचे दर अगदींच कमी असत. फ्रेंच बादशाहा नेपोलिअन याच्याशीं त्यावेळीं इंग्लंडचा संग्राम कित्येक वर्षें चालूं असल्यानें ब्रिटिश गरीब वर्गाचें दैन्य भयंकरच वाढलें. प्रौढ पुरुषांप्रमाणेंच स्त्रिया व मुलें यांनाही मजुरी करावी लागे. कोळसा व लोखंड यांच्या खाणींत तरुण मुलींना खाणींतून ढकलगाड्या ओढण्याचें काम देण्यांत येई. कारखान्यांत मुलांना रोज पंधरा, सोळा, कोठें कोठें अठरा तासही कामावर राबविण्यांत येई. यांत दहाबारा वर्षांचीं मुलें असत इतकेंच नव्हे, तर पांच, सहा वर्षांचीं मुलेंही त्यांत असत. मुलांनीं कामांत चुकारपणा करूं नये म्हणून त्यांना छड्या व चाबुक मारण्यांत येत. हीं मुलें कामानंतर इतकीं थकून जात, कीं घरीं येतां येतां ठेंच लागून गटारांत पडलीं तर तेथेंच तीं झोंपून जात. या भयंकर अवस्थेंत त्यावेळीं लहान मुलांच्या मृत्यूचें प्रमाण फार प्रचंड असें. वडील माणसांना मुलांची मिळकत ही उत्पन्नाची महत्त्वाची बाबच झाल्यानें तीं मुलांना राबवीत व त्यांच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करीत. यामुळें मुलांत रोगराई, घाणेरड्या संवयी, व्यसनें, दुराचार यांची अगदीं परिसीमा झाली होती. ब्रिटिश भांडवलशाहीची पहिली पन्नास वर्षांची भरभराट गरीबांच्या या हालअपेष्टावरच आधारलेली होती.

एकीकडून यंत्र व शास्त्र यांच्या साहाय्यानें माणसांचें धनोत्पादनसामर्थ्य वाढत असतां व संपत्तीचें परिमाण अफाट वाढूं लागलें असतां ही सर्व संपत्ति मूठभर लोकांच्या हातीं केंद्रीभूत होत असून बहुसंख्य समाजाचें दारिद्र्य, रोजगारीची अनिश्चिति व राहणीची हलाखी वाढत आहे हें पाहून विचारी लोकांचें लक्ष या प्रश्नाकडे वेधलें व स्वतः गरीब लोकांकडूनही प्रतिकार सुरू झाला. पण कुणालाही प्रथम संपत्तीचें उत्पादन वाढलें असतां दारिद्र्यही वाढत जावें हा काय चमत्कार आहे याचा उलगडा होईना. यंत्रामुळें जुने हस्तव्यवसाय

उध्वस्त होऊन बेकारी वाढली. यामुळें यंत्रेंच माणसांची रोजगारी हिरावून घेत आहेत असें मानून कित्येक कामगारांनीं कारखान्यांतील यंत्रांवर हल्ले केले व त्यांची मोडतोड केली. पण हळूहळू निर्जीव यंत्रांनीं आपलें नुकसान केलें नसून कामगारांच्या आपसांतील चढा-ओढीमुळें त्यांना रोजगारी कमी मिळते व बेकारी वाढते ही गोष्ट कामगारांना कळूं लागली आणि कामगारसंघटनेची म्हणजे ट्रेडयूनिअन्सची चळवळ सुरू झाली. कामगारसंघटना करण्यास इंग्लंडांत त्यावेळीं कायद्यानें बंदी होती. पण ती १८२४ पासून नाहींशी होऊन कायदेशीरपणें कामगारसंघटना इंग्लंडांत अस्तित्वांत आल्या.

ज्याच्याजवळ भांडवल भरपूर तोच बहुसंख्य समाजास रोजगारी व मजुरी देऊं शकत असल्यानें भांडवलदार हाच एकप्रकारें समाजांत सत्ताधीश झाला. यामुळें या धनोत्पादनव्यवस्थेस 'भांडवलशाही' असें संबोधण्यांत येऊं लागलें. या भांडवलशाहीनें निर्माण केलेल्या दुःखांकडे ज्या विचारवंतांचें लक्ष वेधलें त्यांतील कित्येक सरदारवर्गांतून पुढें आलेले तरुण होते. डिझरेली, फेरँड, लॉर्ड जॉन मॅनर्स, लॉर्ड अॅश्ले वगैरे सरदारवर्गीय तरुणांची 'यंग इंग्लंड' नांवाची एक संस्था होती. तिच्यातर्फे भांडवलशाहीवर टीका करून कामगारांच्या राहणीची सुधारणा करण्याचे कायदे करून घेण्याची खटपट हे करीत. डिझरेलीनें 'कॉनिंग्जबर्ग' व 'सिबील ऑर टू नेशन्स' (दुभंगलेलें राष्ट्र) या दोन कादंबऱ्या लिहून भांडवलशाहीवर जोराचा हल्ला केला. "प्रचंड उत्पादनामुळें राष्ट्रांत धनिक आणि निर्धन असे दोन प्रचंड वर्ग पडत असून धनिक व निर्धन या दोन वर्गांत स्नेहसंबंध व सहानुभूति मुळींच राहत नाहीं. एका वर्गाच्या संवयी, विचार, भावना यांचें दुसऱ्या वर्गास ज्ञान नसतें. दोन भिन्न ग्रहावरील माणसें जितकीं एकमेकांस अनोळखीं असतात तितके हे दोन वर्ग एकमेकाबद्दल अनोळखी असतात." असें डिझरेलीनें "सिबिलमध्यें" लिहिलें आहे. लॉर्ड अॅश्ले यानें आपलें सर्व आयुष्य कारखान्यांतील कामगारांची राहणी सुधारण्यासाठीं चळवळी करून पार्लमेंटांतून त्या स्वरूपाचे कायदे करण्यांत घालविलें.

पण भांडवलशाहीवर हल्ला करणाऱ्या या सरदार-वर्गीय तरुणांचा हेतु ही भांडवलशाही म्हणजे व्यापारी-वर्गाचें वर्चस्व नाहींसें करून पुनः सरंजामशाही म्हणजे सरदारवर्गाचें वर्चस्व स्थापावें हा होता. लुई डी बोनाल्ड हा भांडवलशाहीचा विरोधक असलेला एक प्रमुख लेखक. यांत्रिक उत्पादन, शहरें, बँका हा सर्व नवा जगड्व्याळ नवीन पसारा मोडून पुन्हां जुनीं खेडीं व हस्तव्यवसाय यांचा उद्धार करावा असें प्रतिपादन करी. या भांडवलशाही उत्पादनामुळें समाजाचें स्थैर्य, विनयशीलता, सुसंस्कृति या सर्वांचा नाश होतो असें तो म्हणे. बोनाल्ड लिहितो, "दगडी कोळसा हा हवा धुरानें भरून टाकतो, उग्र वास पसरवितो व माणसास नाउमेद करितो. कालांतरानें हा राष्ट्राचें सर्व शीलही भ्रष्ट केल्यावांचून राहणार नाहीं."

'पण या भांडवलशाही उत्पादनांत मानवजातीचीं दुःखें वाढत असलीं तरी त्याचा दोष माणसाकडे आहे. यंत्रें व शास्त्रीय यांनीं मानवजातीचें धनोत्पादन-सामर्थ्य व सुख वाढविलें आहे, म्हणून यांत्रिक उत्पादन बंद न करतां माणसांनीं प्रथम स्वतःची वागणूक सुधारली पाहिजे, म्हणजे हींच साधनें माणसाच्या सुखास व उन्नतीस कारण होतील' असें सांगणारा एक पंथ १८३० नंतर मोठ्या जोमानें पुढें येऊं लागला. 'समाजसुधारणा' हें यांचें प्रमुख तत्त्व होतें. म्हणून या पंथास 'सोशॅलिझम्' हें नांव देण्यांत येऊं लागलें. 'सोशॅलिझम्' हा शब्द प्रथम १८३३ सालीं 'पुअर मॅन्स गार्डिअन' या इंग्लंडांतील एका नियतकालिनें उपयोजिला. फक्त समाजसुधारणा करावी, आर्थिक आणि सामाजिक पुनर्घटनेनेंच माणसांची सुखवृद्धि व उन्नति होते असें मत असणाऱ्या कांहीं कार्यकर्त्यांनीं 'असोसिएशन ऑफ ऑल क्लासेस ऑफ नेशन्स' (सार्वराष्ट्रीय सर्ववर्गसंघ) अशा प्रचंड नांवाची एक संस्था १८३५ सालीं काढली. रॉबर्ट ओवेन नांवाचा एक भांडवलदारच तिचा पुढारी होता. सर्व राजकीय चळवळीपासून आपला पृथकपणा दाखविण्यासाठींच या मंडळीनें आपल्या पंथास 'सोशॅलिझम्' हें नांव दिलें होतें. समाजांत पसरलेल्या दारिद्र्याचें निवारण करण्यासंबंधानें ओवेनचीं तत्त्वें साधारणपणें पुढील प्रकारचीं होतीं.

"पांचशेंपासून तीन हजारपर्यंत लोकसंख्या एक हजार ते दीड हजार एकर प्रदेशावर वसवावी. एका भव्य इमारतींत या सर्वांना राहतां यावें. सैंपाकघरें व जेवणाच्या जागा सर्वांच्या एकच असाव्या. बाकी मग प्रत्येक कुटुंबास एकेक स्वतंत्र खोली असावी. तीन वर्षें-पर्यंत मुलांचा ताबा आईबापाकडे असावा. पुढें त्याचें

शिक्षण व संगोपन समाजानें करावें. आईबापांना जेवणाचे वेळीं व इतर अनेक योग्य वेळीं मुलांना भेटतां यावें. अशा वसाहतीवर समाजविषयक तज्ज्ञांचें नियंत्रण असावें. धनोत्पादक श्रम सर्वांनीं करावे व उत्पन्न झालेल्या धनाचा उपभोग सामुदायिकपणें घ्यावा. अशी वसाहत मुख्यत: शेतीप्रधान असावी, तथापि तिजजवळ उत्तम प्रकारची सर्व यंत्रसामुग्री असावी. तिनें सर्व प्रकारचे उद्योगधंदे चालवावे आणि शक्य तों ही वसाहत आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असावी. या सर्व वसाहती पूर्ण स्वावलंबी राहून त्यांनीं आपल्या घटकांना उत्तम शिक्षण द्यावें, स्वार्थत्यागी भावना निर्माण कराव्या, शहर व खेडीं या दोन्हींतले फायदे या वसाहतींत उत्पन्न करावे, कारखान्यांतलें एकस्वरूपी कंटाळवाणें जीवन नाहींसें करून विविध प्रकारचे धंदे निर्माण करावे आणि सर्व प्रकारच्या यांत्रिक सुधारणा अमलांत आणाव्या. अशीं हीं ‘ शहरें ’ जगभर पसरून त्यांचीं फेडरेशन्स करावीं आणि त्या सर्वांचें एक ‘ जागतिक प्रजासत्ताक ’ बनवावें.”

राजकीय चळवळीची उपेक्षा करून केवळ सामाजिक व आर्थिक पुनर्घटनेवर भर द्यावा या दृष्टीनेंच या नव्या पंथानें ‘सोशॅलिझम्’ हें नांव धारण केलें असें वर म्हटलेंच आहे. ओवेनच्या आतां सांगितलेल्या या तत्त्वप्रणालींत राजकीय सुधारणेचा अथवा सत्तेचा प्रश्न मुळींच उपस्थित केला नसून केवळ सामाजिक व आर्थिक पुनर्घटनेची योजनाच त्यांत आंखण्यांत आली आहे. ओवेन हाही तात्त्विक भूमिका मांडून स्वस्थ बसला नाहीं. त्यानें क्लाइड नदीच्या धबधब्याजवळ एक कापसाची गिरणी काढली व तेथील मजुरांची आपल्या कल्पनेप्रमाणें ‘न्यू लानार्क’ नांवाची वसाहतही स्थापली. भांडवलवाल्यांनीं स्वतांच्या फायद्यासाठीं कारखाने न चालवितां बहुसंख्य समाजाच्या हिताकडे लक्ष पुरवावें म्हणजे कोणत्याही राजकीय क्रांतीवांचून मानवजातीचें कल्याण करण्यास यांत्रिक व शास्त्रीय शोध हे समर्थ आहेत हें ओवेनचें मत त्यानें ‘ न्यू लानार्क ’ मध्यें प्रत्यक्ष कृतींत उतरविलें. “ या वसाहतींत दोन हजार कामगार असून त्यांत पांचशें मुलें होतीं. या सर्वांची स्थिति अतिशय वाईट असून त्यांना घाणेरड्या सवई जडल्या होत्या. अशा गलिच्छ माणसांच्या साहाय्यानें त्यानें आपल्या उद्योगास सुरवात करून अट्ठावीस वर्षांत विलक्षण क्रांति केली. त्यानें कामाचे तास कमी केले. कारखान्यांत सुखकारक व आरोग्यदायक परिस्थिति निर्माण केली. अगदीं लहान मुलांना कामावर नेमणें बंद केलें. कामगारांची कारागिरी सुधारली. मंदीच्या काळांत बेकारवेतन सुरू केलें. मुलांसाठीं शाळा सुरू केल्या; आणि इतकें सर्व करूनहि धंद्यांत बरकत होते असें त्यानें सिद्ध केलें. ओवेन कर्तबगार सुधारक होता, तसाच तो चांगला विचारप्रवर्तक व निपुण लेखक होता. मजूर हे अव्यवस्थित व अविचारी असल्यानें त्यांचें दुःख वाढलें या इतर भांडवलवाल्यांच्या मताचा त्यानें मोठ्या त्वेषानें धिक्कार केला. शिक्षण, उदाहरण व अनुकूल परिस्थिति यांनीं माणूस हवा तितका सुधारूं शकतो व त्यामुळें धंदाही वाढतो हें मत मांडून आपली वसाहत हीच त्याचें उदाहरण होय, असें ओवेननें सांगितलें. ” ओवेनच्या या वसाहतीचा खूप बोलबाला झाला ‘ टाइम्स’, ‘ मॉर्निंग पोस्ट ’ वगैरे प्रमुख पत्रें यांनीं या वसाहतीची प्रशंसा केली. रशियाच्या झारनें न्यू लानार्कला भेट देऊन ओवेनला धन्यवाद दिले. व्हिक्टोरिया राणीचा बाप ड्यूक ऑफ केंट हा या वसाहतीचा मोठा पुरस्कर्ता होता.

ओवेनला एक वसाहत अशा प्रकारें यशस्वी करतां आली तरी स्वार्थत्यागानें जगाच्या कल्याणासाठीं धंदा करण्याची ही फकिरी कल्पना इतर भांडवलदारांना पटली नाहीं; आणि जागतिक उन्नतीचें तत्त्व या नात्यानें ‘ सोशॅलिझम’चें जें हें तत्त्व त्यानें लेखनानें व कृतीनें प्रतिपादिलें तें फक्त त्याच्यापुरतेंच राहिलें. खरोखर तें त्याच्यापुरतेंही राहिलें नाहीं. कारण इतर भांडवलदारांनीं नाना हिकमती लढवून ‘ न्यू लानार्क ’चा धंदा बुडवून टाकला. ओवेननें नंतर अमेरिकेंत इंडियाना संस्थानांत ‘ न्यू हार्मनी ’ नांवाची आणखी एक वसाहत स्थापली. पण तिला मुळींच यश आलें नाहीं. आणि वैयक्तिक प्रयत्नांनीं केवळ आर्थिक व सामाजिक पुनर्घटनेच्या साहाय्यानें मानवसमाजाची उन्नति करूं पाहणारा हा ओवेनचा ‘ सोशॅलिस्ट ’ पंथ ओवेनबरोबरच खलास झाला.

ओवेनच्या या ‘ सोशॅलिस्ट ’ पंथास ‘ कल्पनावादी सोशॅलिस्ट पंथ ’ (युटोपिअन सोशॅलिस्ट) असें नांव कार्ल मार्क्सनें दिलें व त्यापासून आपल्या (मार्क्सच्या) पंथाचें वैशिष्ट्य दाखविण्यासाठीं त्यास तो ‘ शास्त्रशुद्ध सोशॅलिझम् ’ (सायंटिफिक सोशॅ-

लिझम्) असें म्हणूं लागला. मार्क्सच्या मतें ओवन हा हवेंत किल्ले बांधूं पाहात होता. त्याचा ध्येयवाद कल्पनेंतील मनोऱ्यासारखा होता. सत्यसृष्टींत तो अवतरणें शक्य नव्हतें. मार्क्सनें हा कल्पनावाद सोडून देऊन भांडवलशाहीची शास्त्रशुद्ध मीमांसा केली. मानवजातीनें धनोत्पादन साधनें सुधारतां सुधारतां यन्त्रें शोधून काढलीं, नाना प्रकारचे शास्त्रीय शोध लावले आणि त्यांच्या सहाय्यानें माणसाची धनोत्पादनशक्ति अफाट वाढविली. पण हीं धनोत्पादनसाधनें खाजगी व्यक्तींच्या हातीं राहिल्यानें त्यांचा वापर खाजगी नफ्यासाठीं होऊन बहुसंख्य समाजावर दारिद्र्याची आपत्ति ओढवत आहे; म्हणून हीं धनोत्पादन साधनें सार्वजनिक मालकीचीं करून मगच त्यांचा वापर, नफ्यासाठीं नव्हे तर, सर्व जनतेच्या हितासाठीं केला पाहिजे. तरच जनतेचें हित व उन्नति होईल, धनोत्पादन साधनें खाजगी मालकींत असेपर्यंत ही गोष्ट घडणें शक्य नाहीं असें मत मार्क्सनें व्यक्त केलें आहे. मार्क्सच्या एकंदर विचारसरणीस 'सायन्टिफिक सोशॅलिझम्' म्हणजेच 'कम्युनिझम' असें नांव आहे. 'कम्युनिझम्'ची विस्तृत माहिती मागें व्यावहारिक ज्ञानकोशाच्या २०९ ते २१७ पानांत 'कम्युनिझम्' या मथळ्याखालीं आली आहे.

मार्क्सनें आपल्या पंथास 'सोशॅलिझम्' हें नांव दिलें तें ओवेनपासून घेतलें. पण त्यांतला मूळचा अर्थ अजीबात नाहींसा करून सगळा नवीन अर्थ त्या शब्दांत भरला असें 'कम्युनिझम्'ची माहिती वाचणाऱ्यास आढळून येईल. आर्थिक व सामाजिक पुनर्घटनेनेंच मानवी उन्नति होऊं शकेल, राजकीय क्रांति, रक्तपात वगैरे कशाची जरूरी नाहीं असें ओवेनचें मत होतें. तर राज्यक्रांति व वर्गकलह हा मार्क्सच्या विचारसरणीचा आत्मा आहे. दोन पंथांत इतका तीव्र फरक होता तरीही 'सोशॅलिझम्' हा जुना शब्द सोडणें मार्क्सला शक्य झालें नाहीं, इतकें वजन त्या शब्दास प्राप्त झालें होतें.

मार्क्सचा 'कम्युनिझम्' ऊर्फ 'शास्त्रशुद्ध सोशॅलिझम्'जसजसा पुढें येऊं लागला तसतसा ओवेनचा 'युटोपियन सोशॅलिझम्' हळूंहळूं मागें पडूं लागला. आपल्या पंथाच्या प्रसारासाठीं मार्क्सनें अनेक सहकाऱ्यांच्या सहाय्यानें १८६४ मध्यें एक 'आंतरराष्ट्रीय मजूरसंघटना' स्थापन केली. ती पुढें सहा वर्षांनीं मोडली. इतिहासांत ही संघटना 'फर्स्ट इंटरनॅशनल' या नांवानें प्रसिद्ध आहे. मार्क्स इ. स. १८८३ त मृत्यु पावल्यानंतर पुढें सहा वर्षांनीं एक 'दुसरी इंटरनॅशनल' स्थापन झाली. हिचे पुढारी स्वतांस नुसते 'सोशॅलिस्ट' म्हणत. तथापि ते मार्क्सचे अनुयायी नव्हते अथवा ओवेनचेही अनुयायी नव्हते. राजकारणापासून पूर्ण अलिप्त राहून केवळ वैयक्तिक सौजन्य व औदार्य यांच्या बलावर सामाजिक व आर्थिक पुनर्घटना करतां येईल व त्यानें जगाचें कल्याण होऊं शकेल हें ओवेनचें मत या 'सोशॅलिस्टां'ना मार्क्सप्रमाणेंच अमान्य होतें. पण मार्क्सचीं वर्गकलह व कामगारक्रांति हीं तत्त्वेंही (मागें 'कम्युनिझम्' पहा) त्यांना अमान्य होतीं. मानवजातीचा इतिहास आर्थिक प्रेरणांनींच घडविला आहे, आर्थिक उत्पादनप्रकार हा मानवी इतिहासाचा, संस्कृतीचा नियामक आहे, आधिभौतिक तत्त्वज्ञान हेंच खरें व श्रेष्ठ तत्त्वज्ञान होय, वगैरे मार्क्सचीं तत्त्वें हीं या 'सोशॅलिस्टां'स बहुतेक अमान्य होतीं. कामगारसत्ता स्थापन झाल्यानंतर कालांतरानें पूर्णपणें अराज्यव्यवस्था निर्माण करण्याचें कम्युनिस्टांचें ध्येयही या 'सोशॅलिस्टां'ना अमान्य आहे. राज्यव्यवस्थेवांचून मानवसमाज सुखी होणार नाहीं असा यांचा ठाम सिद्धांत आहे. मात्र भांडवलशाहीची मार्क्सनें केलेली मीमांसा यांना बव्हंशीं मान्य आहे. भांडवलशाहीची शास्त्रशुद्ध मीमांसा प्रथम कार्लमार्क्सनेंच केली आणि तिचे दोष त्यानेंच प्रथम जगाच्या नजरेस आणिले असें या सोशॅलिस्टांचा पुढारी रॅम्से मॅक्डोनाल्ड यानें म्हटलें आहे. इंग्लंडांत रॅम्से मॅक्डोनाल्ड, बर्नार्ड शॉ, वेब, जर्मनींत बर्नस्टीन, काउट्स्की, रशियांत मेन्व्हेव्हिक पुढारी वगैरे या 'सोशॅलिस्ट' पंथाचे अनुयायी होत.

१८८९ पासून १९१४ पर्यंत ही 'दुसरी इंटरनॅशनल' टिकली. तींत लेनिनप्रभृति मार्क्सचे अनुयायीही होते. पण १९१४ त इंग्लंड व जर्मनी यांचें युद्ध सुरू होऊन या 'दुसऱ्या इंटरनॅशनल'मधील निरनिराळ्या देशांचे प्रतिनिधि आपापल्या देशांचे वतीनें लढूं लागल्यामुळें ही 'दुसरी इंटरनॅशनल' जवळजवळ नामशेष झाली. महायुद्धानंतर तिची थोडीफार पुनर्घटना करण्यांत आली, आणि रशियांत लेनिननें कम्युनिस्टांची 'तिसरी इंटरनॅशनल' स्थापन केली. तेव्हां-

पासून या दोन संस्थांचें हाडवैर चालू आहे. पण 'दुसऱ्या इंटरनॅशनल'चें कार्य असें कांहीं होत नाहीं. वर्गकलह व कामगारक्रांति न करतां आपापल्या देशांत लोकशाही मार्गानें बहुमत अनुकूल करून घेऊन पार्लमेंटांत ठराव करून 'हळूहळू' सोशॅलिझम् अमलांत आणावा असें या 'सेकंड इंटरनॅशनल'चें धोरण असतें. पण जर्मनी व इटाली या देशांत लोकशाहीच नेस्तनाबूत होऊन इतर युरोपीय देशांतहि लोकशाहीची तीच वाट लागली, आणि इंग्लंड, फ्रान्स यांसारख्या देशांत लोकशाहीचा डोलारा शिल्लक राहिला असला तरी भांडवलदार वर्गाच्या पूर्ण कह्यांत तेथील राज्यसंस्था गेल्यामुळें 'सोशॅलिस्टां'नीं निराश होऊन 'सोशॅलिझम्' आपल्या हयातींत तरी येत नाहीं म्हणून त्याचा नाद सोडला आहे. १९३९ सालीं सुरू झालेल्या महायुद्धामुळें 'दुसऱ्या इंटरनॅशनल'-मधील पुढारी आपापल्या राष्ट्रीय सरकारला युद्धाचे कामीं मदत करीत आहेत व अर्थात् 'सेकंड इंटरनॅशनल' मोडल्यासारखीच झाली आहे. या युध्दानें लोकशाही, सोशॅलिझम्, फॅसिझम् वगैरे सर्वच समाजतत्त्वें आतां कढईंत वितळण्यास टाकलीं आहेत. त्यांचें भवितव्य काय हें यावेळीं कोणीहि सांगूं शकणार नाहीं.

सोहेरः—जन्मास आलेल्या बालकाची शिवाशीव. कोणी-कोणी या शब्दाचा उच्चार 'सुहेर' असाहि करतात. कित्येक ठिकाणीं सोहेर न म्हणता 'वृद्धि' असें म्हणतात.

सोहेर हा सुतकाइतका जाचक असत नाहीं. अन्नपाण्याशिवाय एकमेकांचे स्पर्शव्यवहार सोहेराच्या काळांत चालू शकतात.

या शिवाशिवींत लोक मंगल वा अमंगल कसलेच विधिसंस्कार वा व्रत करीत नाहींत. सोहेर हा भाऊबंदांपैकीं किंवा कुटुंबांतील एकादी स्त्री प्रसूत झाल्यावर येतो. फक्त आईबापांना मुलीचा सोहेर तीन दिवस पाळावा लागतो. कुटुंब अथवा भाऊबंद यांपैकीं कोणीहि स्त्री बाळंतीण झाल्यास हा दहा दिवसांचा मानतात.

हा सोहेर कळला तर जेथून तो कळतो तेथून पुढें उरलेल्या दिवसापुरता धरतात. उदा. पांचव्या दिवशीं सोहेर समजला तर ५–१० अखेर हा पाळावयाचा असतो. दहा दिवस होऊन गेल्यावर जर तो समजला तर त्याबद्दल शिवाशिव पाळावी लागत नाहीं.

सौरमासः—सूर्याच्या गतीच्या अनुरोधानें जे महिने मोजले जातात ते सौरमास होत. बारा राशीपैकीं प्रत्येक राशींत जितके दिवस सूर्य राहतो तितके दिवस त्या महिन्याचे होत. या बारा राशींच्या महिन्यांचे दिवस सारखे नसतात. १२ सौरमासांचें एक वर्ष म्हणजे ३६५ दिवसांचें वर्ष होतें. बंगाल व मलबार-मध्यें सौरमास चालू आहेत. देवकार्याला व मंगल-कार्यांना सौरमास व पितृकार्याला चांद्रमास योग्य असें ग्रंथांतरीं सांगितलेलें आहे. आपल्या पंचांगांतील महिने चांद्रमान व सौरमान या पद्धतीचा मेळ बसावा म्हणून समान दिवसांचे (३० दिवस) केलेलें असून चांद्रवर्ष व सौरवर्ष (अनुक्रमें ३५४ व ३६५ दिवसांचें) यांच्यांतील अंतर भरून काढण्यासाठीं अधिक महिन्याची योजना केली आहे. (अधिक मास पृष्ठ ८ पाहा.)

संक्रमणः—संक्रमण किंवा संक्रांति म्हणजे सूर्याचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें. बारा राशी आहेत (राशी पाहा). तेव्हां दर महिन्यांत हें संक्रमण होत असतें. प्रत्येक राशींत सूर्य समान दिवस राहात नसल्यामुळें एखाद्या महिन्यांत दोन संक्रमणें होतात (दोन संक्रांति येतात). ज्या महिन्यांत दोन संक्रांति येतात तो महिना क्षयमास म्हणून ओळखतात. कार्तिक, मार्गशीर्ष व पौष या महिन्यांतच बहुधा क्षयमास येतो. यावेळीं वृश्चिक, धन व मकर या राशी असतात व या तीनहि राशी ओलांडून जाण्यास सूर्याला तीस दिवसां-पेक्षां कमी काल पुरतो. पण असा क्षयमास फार क्वचित येतो. त्यावेळीं क्षयमासाच्या पूर्वी एक व नंतर एक असे दोन अधिक महिने येतात व त्या वर्षी तेरा महिन्यांचें वर्ष होतें.

वर्षाच्या १२ संक्रमणांपैकीं कर्कसंक्रमण व मकर-संक्रमण हीं विशेष महत्त्वाचीं असून यांपैकीं मकर-संक्रमण महत्त्वाचें आहे. कारण यावेळीं मकरवृत्त ओलांडून सूर्य उत्तर गोलार्धांत (कर्कवृत्ताकडे) येऊं लागतो. हा दिवस थंडीच्या मध्यास येतो (१४ जानेवारी). मकरसंक्रमणाचा दिवस 'मकरसंक्रांत' म्हणून प्रसिद्ध असून तो एक हिंदूंचा महत्त्वाचा सण आहे.

संकटासनः—जमिनीवर उभें राहून गुडघ्यांत वाकावें. डाव्या पायावर होऊन उजवा पाय उचलून डाव्या मांडीवरून उजवा पाय नेऊन गुडघ्यांत वांकवून उजव्या पायाची नडगी डाव्या पिंढरीवर घ्यावी; व उजव्या पायाचें पाऊल डाव्या पावलावर टेकावें. दोन्ही गुडघ्यावर दोन्ही हातांच्या पंजांचे तळवे टेकावे.

कमरेंत ताठ होऊन छाती पुढें काढावी. दृष्टि नासाग्रीं ठेवावी. उजवे पावलावर होऊन डावी मांडी उजव्या मांडीवर नेऊन वरीलप्रमाणेंच सर्व कृती करावी. हा दुसरा प्रकार होतो.

पायाच्या मांड्यांस व पिंढऱ्यांस बळकटी येते.

संगीतः—संगीत या शब्दावरून बोध होणाऱ्या शास्त्रांत तीन कलांचा अन्तर्भाव प्राय: प्राचीन व अर्वाचीन ग्रन्थकारांनीं केलेला आढळतो. गायन, वादन व नृत्य या त्या कला होत. त्यांपैकीं गीत (गायन) स्वयंप्रकाशित असलेनें त्यास प्रधान मानून संगीत हें नामाधिमान या समूहास देणेंत आलें आहे. (गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतम्युचते।) बाकीच्या दोन्हीही कला गायनावर (गीत) कांहीं अंशानें अवलंबून असलेनें त्यांना दुय्यम स्थान दिलें गेलें आहे. म्हणूनच संगीत शास्त्रावरील ग्रंथांत गायनशास्त्राचीच विशेष चर्चा केलेली आढळते. रत्नाकराचा टीकाकार कल्लीनाथ संगीताचे "मार्ग व देशी" असे दोन प्रकार अस्तित्वांत असत असा उल्लेख करतो. मार्ग संगीत म्हणजे अनादिकालापासून एकाच पद्धतीनें गाइलेलें, शास्त्रनियमबद्ध, अकृत्रिम असें जें संगीत तें. त्याच्या उलट लोक-रुचीअनुसार निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या पद्धतीनें रंजनाकरितां गाइलेलें जें संगीत तें देशी संगीत होय. हिंदुस्थानच्या स्वाभाविक विभागांवरून तेथें प्रचलित असलेल्या गायनपद्धतीवरून संगीताचे दोन भेद मानणेचा प्रघात आहे. वस्तुतः तात्त्विक व शास्त्रीय दृष्ट्या दोन्ही पद्धतींत फरक नाहींच. तत्रापि केवळ बाह्यांगावरून हे भेद पडले आहेत. अंतरंग एकच आहे. हिंदुस्थानच्या दक्षिण भागांत म्हणजे मद्रास प्रांत, म्हैसूर संस्थान इत्यादींत जें संगीत प्रचलित आहे त्याला दाक्षिणात्य संगीत (पद्धती) किंवा कर्नाटकी संगीत असें म्हणतात. हे भाग सोडून इतरत्र ज्याचा प्रचार आहे त्याला हिंदुस्थानी संगीत (पद्धती) असें म्हणतात.

तात्त्विकदृष्ट्या दक्षिण व उत्तर पद्धतींत भेद नाहीं हें वर सांगितलेंच आहे. हल्लीं या दोन्हीही विभागांत प्रचलित असलेलें देशी संगीत होय. रत्नाकराच्या कालापासून म्हणजे सुमारें इ. स. १२०० पासून देशी संगीतच प्रचलित असे अशी माहिती उपलब्ध आहे. तरी त्याच संगीताची चर्चा करणें इष्ट होय.

प्रचलित देशी संगीताचा विचार करितांना खालील संगीतप्रकारांचा विचार करणें अपरिहार्य आहे.

(१) लोकसंगीत, (२) नाट्यसंगीत, (३) बोलपटसंगीत, (४) शास्त्रीय संगीत. यांपैकीं पहिले तीन प्रकार पूर्णांशानें लोकरंजनार्थ असलेनें लोकरुचीअनुसार सतत झपाट्यानें बदलत असतात. त्यासंबंधीं कोणत्याहि प्रकारचें शास्त्र किंवा तंत्र निर्माण करणें किंवा होणें शक्य नाहीं; आणि जरी झालें तरी त्यांत विसंगतीचा दोष उत्पन्न होणारच, व म्हणूनच तें शास्त्र टिकाऊ असणार नाहीं. संगीतशास्त्रावर लिहिणाऱ्या ग्रंथकारांनीं कोणकोणत्या मुद्यांची चर्चा करावी यासंबंधीं पुढील श्लोक उद्बोधक आहेतः—

संगीतं ध्वनिसंभूतिः श्रुतयस्तद्व्यवस्थितिः।
शुद्धाः स्वरा विकाराद्याः स्वरस्थानानि तत्त्वतः॥
संवाद्या हि स्वराणां च लक्षणानि सविस्तरम्।
वर्णालंकारगमका यथोक्ताः पूर्वसूरिभिः॥
गात्रस्य लक्षणं तद्वन्मूर्छना लक्षणं तथा।
रागमेलाश्च सर्वेऽपि संपूर्णत्वादि भेदतः॥
तत्तन्मेलस्थरागाणां भेदकारणलक्षणम्।
आलाप लक्षणं गातुर्गुणदोषानुदर्शनम्॥
ताना उद्ग्राहभूताश्च स्वयं रागांगदर्शकाः।
एतावंति च वस्तूनि ग्रंथेऽस्मिन् कथितानि हि॥
—अभिनव रागमंजरी.

भावार्थ—ध्वनि, श्रुति, स्वर, वादि, संवादि, वर्ण, अलंकार, गमक, ग्राम, रागमेल, मेलस्थराग, रागभेदलक्षणें, आलापलक्षणें, गायकगुण व दोष इत्यादि गोष्टींची चर्चा या ग्रंथांत केली आहे.प्राचीन ग्रंथकारांपासून अर्वाचीन ग्रंथकारांच्या बऱ्याचशा ग्रंथांत हीच वस्तुप्रणाली थोडा फेरफार करून अनुसरलेली आढळते. असें जरी आहे, तथापि विशिष्ट गीतप्रकार गायकीसच सर्वसाधारण समाज संगीत म्हणून ओळखतो. त्या गीतप्रकारांचीं नांवें अशीं आहेत.—

(१) धमार, (२) धृपद, (३) ख्याल, (४) चीज, (५) ठुमरी, (६) टप्पा, (७) तराना, (८) भजन, (९) होरी, (१०) गझल, (११) कवाली, (१२) लावणी, (१३) पोवाडा, (१४) रास, (१५) गरबा. यांपैकीं गझलपासून गरब्यापर्यंतचे गीतप्रकार कमीअधिक प्रमाणांत भावनात्मक असलेनें त्यांचा संगीतांत पूर्णांशानें समावेश करितां येत नाहीं. विशिष्ट प्रमाणां-

तच त्या प्रकारांत अस्सल संगीतास क्षेत्र आहे. वरील गीतप्रकार गातांना किंवा वाजवितांना "रस, ताल, व नाद" या तीन प्रमुख तत्त्वांकडे लक्ष देणें जरुरीचें असतें. कारण तीं संगीताचीं "जीवन-तत्त्वें" आहेत. त्यांचा एकमेकाशीं जिव्हाळ्याचा संबंध आहे. साहित्याचा जो भाग आपल्या दृष्टीस पडतो तो संगीतविषयक अज्ञान असणाऱ्या प्रेमी श्रोत्यांकरितां केवळ योगायोग (Accident) म्हणून अस्तित्वांत आला असावा !

वरील निरनिराळ्या गीतप्रकारांच्या गायनांत निरनिराळ्या तत्त्वांना प्राधान्य देणेंत येऊन ते प्रकार गाइले जातात. सर्वसाधारणपणें आलाप, तान, बोलतान इत्यादि स्वरविलासांनीं गीतप्रकार नटविले जातात. तथापि खालीलप्रमाणें विशिष्ट गीतप्रकारगायनांत विशिष्ट तत्त्वांना प्राधान्य देणेंत येतें. (१) धमार व धृपदः—या प्रकारांच्या गायनांत तालांस व नादांस विशेष प्राधान्य असतें. (२) ठुमरींत रस व भाव इत्यादीस प्राधान्य देणेंत येतें. (३) टप्पाः—भावरसात्मक गायन. (४) ख्याल, चीज इत्यादि गीतप्रकारांत तीन्हींही तत्त्वें सारखींच महत्त्वाचीं असतात.

संग्रहिणीः—व्याख्या—सर्व आंतडींभर सौम्य व दीर्घकालीन दाह होऊन त्याचा परिणाम अशक्तपणा, पंडुत्व व हगवण होण्यांत होतो. **कारणें**—हा रोग उष्णप्रदेशांतच विशेषतः होत असून तो स्थानिक आहे. पाश्चिमात्य लोकांतच हा रोग जास्त त्रास देतो. तरुण व मध्यम वयाच्या लोकांत या रोगाचा जास्त प्रादुर्भाव असतो. स्त्री अगर पुरुषजातीवर सारखाच याचा कटाक्ष आहे. ह्या रोगाचीं नक्की कारणें अद्याप सांगतां येत नाहींत तरी (१) कृमि (२) व्हिटॅमिनचा अभाव (३) कॅलशियम क्षाराचा अभाव यापैकीं एक अगर तिन्ही कारणांनीं या रोगाचा प्रादुर्भाव होतो असा समज आहे. **लक्षणें**—या रोगाची सुरवात सावकाशपणें होते. रोग्याला थोडेसें काम केलें तरी दमल्यासारखें वाटतें; अशक्तपणा भासूं लागतो आणि पहांटें पातळ शौच्यास होऊं लागतें आणि त्याची फार गडबड होते, वजन घटूं लागतें, आणि नेहमींच्या चेहऱ्याच्या रंगांत फरक पडतो. शौच्यास पांढरें होऊं लागतें व त्यांत हवा मिसळून फेंस दिसूं लागतो. जीभ लाल होऊन जिभेवर व तोंडांत लहान पुटकुळ्या उठतात व त्यामुळें नेहमींचें अन्न खातां येत नाहीं, तंबाखू ओढतां येत नाहीं व यावर योग्य ते उपचार लवकर केले नाहींत तर रोगी फार कृश होऊन पंडुरोगानें दगावतो. **उपचार**—औषधापेक्षां पथ्यच या रोगांत फार संभाळावें लागतें. दुधावरच रोग्याला ठेवणें जरूर आहे, आणि त्याबरोबर त्याला निजवून ठेवून मानसिक व शारीरिक विश्रांति देणें जरूर आहे. दुधाबरोबर चुन्याची निवळी द्यावी व औषधासाठीं योग्य डॉक्टरचा सल्ला घ्यावा.

संजयः—गवल्गण सूताचा पूत्र. हा धृतराष्ट्राचा सारथी व सल्लागार होता. भीष्मादिकांचें न ऐकल्यामुळें व द्रौपदीचा अपमान केल्यामुळें यानें दुर्योधनाची निंदा केली. धृतराष्ट्राज्ञेवरून हा उपप्लान्यास साम घडवून आणण्याकरितां पांडवांकडे गेला होता. युद्ध पहातां यावें म्हणून व्यास धृतराष्ट्राला दृष्टि देणार होते. परंतु त्यानें तें पाहवणार नाहीं, करितां नुसतें ऐकण्याची इच्छा प्रदर्शित केली. म्हणून व्यासानें यास दिव्यदृष्टि, रणांगणावर युद्ध पहात असतां श्रमराहित्य व घनघोर युद्धांतहि अवध्यता असे वर दिले. यानें धृष्टद्युम्नावर चाल केली. पण त्यानें यास पळवून लावलें. सात्यकीनेंहि यास एकदां मूर्च्छित केलें. तसेंच हा रणभूमीवरून परत जात असतां याच्याबरोबर धृतराष्ट्रास दुर्योधनानें निरोप पाठविला. यावरून हा युद्धप्रसंग पहाण्यास प्रत्यक्ष हजर असे, व याचें सर्व गोष्टीकडे लक्ष असे. कृष्णानें अर्जुनास सांगितलेली गीता व युद्धाचें वर्णन यानें धृतराष्ट्रास सांगितलें. युद्ध संपल्यावर याची दिव्यदृष्टि संपली. युद्धानंतर हा धृतराष्ट्रादिकांसमवेत धर्माजवळ होता. पण विदुराच्या सांगण्यावरून यास चुकवून धृतराष्ट्र गांधारीसह वनांत गेला. धृतराष्ट्राचा वियोग सहन न झाल्यामुळें नारदानें दिलेल्या माहितीवरून हा हिमाचलावर धृतराष्ट्राच्या शोधार्थ गेला. पुढें धृतराष्ट्र, गांधारी, कुंती व हा असे हिमाचलावर तप करीत असतां याच्याशिवाय सर्व वणव्यांत सांपडून मेले. नंतर हा इतरत्र तपार्थ निघून गेला.

संत्रेंः—ह्याची लागवड मोसंब्याप्रमाणेंच सर्व दृष्टींनीं असल्यामुळें ह्याबद्दलच्या माहितीकरितां 'मोसंबीं' हा लेख पाहा.

संधिवात अगर आमवातः—व्याख्या—या रोगांत सांधे धरिले जातात आणि ह्यांत ताप येऊन सांध्यामध्यें सूज, दाह आणि ठणका असतो. ह्या रोगानें हृदयावर परिणाम होऊन (Heart

disease) ऱ्हद्विकार व पंडुता हीं लक्षणें असतात. **कारणें**:—थंडी व सरदीपासून हा रोग होतो. वंशपरंपरेनेंहि हा रोग येतो. हा रोग एका कृमीपासून होतो. कित्येक वेळां रक्तांत कांहीं बिघाड होऊन त्यानें संधिवात होतो. उपदंशा (गरमी–परमा) मुळें संधिवात होतो. **लक्षणें**—प्रथमतः थोडा ताप येऊन थंडी वाजते, मग ताप वाढत जातो, अंगास घाम येतो, डोकें दुखतें, गुडघा, कोंपर, मनगट, खांदा यांपैकीं एक अगर सर्व सांधे दुखूं लागतात आणि सांधे लाल होऊन त्यावर सूज येते. या रोगाचा हा एक विशेष गुण आहे कीं, सांध्याची कळ व सूज एका सांध्यापासून दुसऱ्या सांध्याकडे फिरते, आणि सांध्यांत कधीं पू होत नाहीं; संधिवातांत फुप्फुसांच्या, मेंदूच्या अगर हृदयाच्या आवरणाचा दाह होण्याचा फार संभव असतो आणि मग रोग्याची चिंताजनक स्थिति होते आणि त्यांतच रोगी क्वचित् प्रसंगीं दगावतात. एरवीं संधिवातानें रोगी सहसा दगावत नाहींत. संधिवात वरचेवर उलटत असतो आणि मग त्याच्या तक्रारी सारख्या सुरू होऊन रोग्याचें आयुष्य त्या रोगांतच जातें. **उपाय**—यांत मुख्य उपाय म्हणजे ताप कमी करून सांध्यांतील कळ नाहींशी करणें आणि हृदयावर त्याचा परिणाम न होण्याविषयीं खबरदारी आरंभापासूनच घेणें. सोडियम सॅलिसिलेट, क्विनाइन व सोडियम आयोडाईड या रोगांत देतात; पण डॉक्टरांच्या अगर वैद्यांच्या सल्ल्याशिवाय हीं औषधें देऊं नयेत; कारण संधिवाताचें कारण अगोदर शोधून मग त्याच्यावर योग्य ते इलाज केले पाहिजेत, आणि ते डॉक्टर अगर वैद्य यांच्या हातूनच होणार आहेत म्हणून त्यांच्या सल्ल्याशिवाय कांहीं करूं नये. शुश्रुषेचें काम तेवढें घरच्या मंडळींनीं करावें.

संन्यासाश्रमः—सनातन वैदिक धर्मानें अखिल मानवी समाजाचे, आंगच्या गुणकर्मस्वभावानें चार विभाग केले आहेत (गीता ४।१३). **ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र** हे ते चार विभाग होत. शूद्र हा धर्मसंस्कार व धर्मनियम यांनीं कमी बांधलेला असून, त्याहून वैश्य, क्षत्रिय व ब्राह्मण हे क्रमानें अधिक अधिक धर्माचारांनीं व धर्मनियमांनीं बांधलेले आहेत. ब्राह्मणाची नियमबद्धता सर्वांहून अधिक आहे व हेंच त्याच्या श्रेष्ठतेचें खरें मूळ कारण आहे. (मनु. १।९६–१००, २;२८) जन्मापासून मरेपर्यंत प्रत्येक क्षण त्याचा धर्मासाठीं खर्च झाला पाहिजे, अशा ब्राह्मणालाच संन्यासाचा अधिकार आहे.

सनातन वैदिक धर्मानें मनुष्याचें जीवन चार विभागांत विभागलें आहे. त्या विभागांस ‘ आश्रम ’ असें म्हणतात. **ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास** हे ते चार आश्रम होत. यांत संन्यास हा शेवटचा व श्रेष्ठ असा आश्रम आहे.

शिक्षणानंतर ‘ संन्यासाश्रम ’ घेतां येतो. विशेष हेतु नसेल तर यापूर्वी संन्यास घेतां येत नाहीं. इतक्या आश्रमांतून जाणें व तेथें मानमान्यता पावणें हें सर्वांस शक्य नसल्यानें संन्यासाश्रम हा फार थोड्यासाठींच असे. विशेषतः ब्राह्मणांसच या संन्यासाचा अधिकार मानलेला आहे; पण ‘ विविदिषा संन्यास ’ हा क्वचित् कारणासाठीं इतर द्वैवर्णिकांनाहि घेतां येतो.

पूर्ण अहिंसापालन करणें हें संन्याशाला अत्यंत आवश्यक आहे. (मनु. ६।५२; ६०) “ मत्तः सर्वभूतेभ्योऽभयं–” आपणाकडून कोणाचीहि हिंसा यापुढें घडणार नाहीं, अशी प्रतिज्ञा संन्यास घेतांना प्रथमतः करावी लागते. सर्व वर्णांत ब्राह्मण अधिक अहिंसक व सर्व आश्रमांत संन्यास पूर्ण अहिंसक अशा या पूर्ण अहिंसेमुळें संन्याशाची सर्वांहून श्रेष्ठता आहे.

संन्यासाश्रमामध्यें असणाऱ्यानें अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, शुद्धता, संतोष, तप, अध्ययन व ईश्वरचिन्तन करावयाचें असतें. यथाविधि वेदाध्ययन करून, धर्माप्रमाणें संतति उत्पन्न करून, यथाशक्ति सत्कर्मे करून मग संन्यास घ्यावा व आपलें मन मोक्षमार्गाकडे लावावें. वेदाध्ययन न करतां, पुत्र न उत्पन्न करतां, सत्कर्मे—यज्ञ न करतां जर संन्यास घेतला, तर तो मनुष्य पतित होतो. (मनु. ६।३६–३७). जो सर्व प्राण्यास अभय देऊन संन्यास घेतो त्यास तेजोलोक प्राप्त होतात. (मनु. ६।३९–४०) संन्याशानें वितंडवाद घालूं नये, कोणाचा अपमान करूं नये, कोणाशीं वैर करूं नये, जमीन पवित्र आहे असें पाहून पाय पुढें टाकावा, वस्त्रानें गाळून पाणी प्यावें, सत्य व पवित्र भाषण करावें, पवित्र कर्म करावें, दुसरा रागावला असतांहि त्यावर आपण रागाऊं नये, दुसऱ्यानें आपली निंदा केली तरी आपण त्याची निंदा करूं नये, इतकेंच नव्हे तर उलट त्याच्याशीं शान्त व हितकर असें भाषण करावें, कधींहि अनृत भाषण करूं नये व आपले

भोग वाढण्यासंबंधीं विचार मनांतहि आणूं नयेत. (मनु. ६।४६–४८).

जो कशाचा द्वेष करीत नाहीं व कशाचा लोभहि धरत नाहीं, जो सुखदु:खादि द्वन्द्वांपासून अलिप्त असतो, जो सर्व प्राण्यांना आत्मवत् मानतो, जो कर्मफलावर आसक्ति ठेवीत नाहीं पण कर्तव्य करीत राहतो तो खरा संन्यासी होय. (भ. गीता ५।१–४) मनांतील सुखोपभोगाची इच्छा दूर केल्यावांचून संन्यास-आश्रम सिद्ध होऊं शकत नाहीं. (भ. गी. ६।१) काम्यकर्मांचा म्हणजे स्वतःचे भोग वाढवण्यासाठीं आवश्यक असलेल्या कर्मांचा त्याग करणें हा संन्यास होय. (भ. गी. १८।२) संन्याशाला योगाचें आचरण करणें अत्यंत आवश्यक आहे. (भ. गी. ५।३)

संन्याशानें एका गांवीं फक्त एकच दिवस रहावें, तीर्थांच्या ठिकाणीं तीन दिवस, मोठ्या नगरांत पांच दिवस व क्षेत्रांत सात दिवस रहावें (परमहंस उप०). पावसाळ्यांत एखाद्या क्षेत्रांत चार महिने रहावयास हरकत नाहीं. सर्वांशीं समभावानें वागावें व आपल्या भोगांविषयीं निरपेक्ष व निरिच्छ असावें.

जरी तीन आश्रमांनंतर चवथा आश्रम—संन्यास घ्यावा असें शास्त्र असलें, तरी उत्कट वैराग्य प्राप्त झालें असतां, तसेंच विशेष परिस्थितींत ब्रह्मचर्यांतूनहि एकदम संन्यास घेतां येतो. याला उत्तम उदाहरण श्रीमच्छंकराचार्यांचें होय.

संन्यास पुष्कळ प्रकारचा आहे, पण त्यांत मुख्य सहा भेद आहेत. कुटीचक, बहूदक, हंस, परमहंस, तुरीयातीत व अवधूत. कुटीचक हा शिखायज्ञोपवीतधारी व दण्डकमंडलुधारी असून मातापित्यांची सेवा करून राहतो. बहूदक हा तसाच वरप्रमाणें असतो, पण त्रिपुण्ड्र धारण करतो. हंस हा जटाधारी असतो. परमहंस हा शिखायज्ञोपवीतविरहित एक कौपीनधारी सर्वस्वत्यागी असतो. तुरीयातीत हा जवळ जवळ दिगंबर राहतो, व 'अवधूता'ला कांहींएक नियम नसतो. तो जसा राहील तसा राहील. (संन्यास उप.) याशिवाय 'आश्रम' वगैरे अनेक प्रकारचे संन्याशांचे भेद पुष्कळच आहेत.

संन्याशाश्रम हा सर्वांत श्रेष्ठ आश्रम आहे. या आश्रमाचे नियम फार कडक आहेत. फारच उलट वैराग्य असल्याशिवाय व फारच दृढनिश्चयी स्वभाव असल्याशिवाय या आश्रमाचें यथाशास्त्र पालन होणें शक्य नसतें. याचसाठीं कलियुगांत संन्यास वर्ज्य आहे. (संन्यासं कलौ विवर्जयेत) [कलिवर्ज्य प्र.] पण हा नियम असा नव्हे कीं, जो न पाळला तर पतन होतें. या कारणानेंच संन्यासाचा अजून प्रचार आहे. हा निषेध संन्याशाच्या आचरणाच्या कठीणपणामुळें केलेला आहे. संन्यासाश्रमाचे नियम जे पाळूं शकतात तेच संन्यास घेऊं शकतात.

भगवे कपडे वापरणें हें या संन्यासाचें बाह्यचिन्ह आहे. पण निष्कामभाव, त्यागवृत्ति, निर्लोभवृत्ति, निस्पृहता हीं या आश्रमाचीं खरीं लक्षणें आहेत.

संभाजी, छत्रपती (१६५७–१६८९):—महाराष्ट्राच्या प्रचलित इतिहासांत एखाद्या व्यक्तिबद्दल किंवा राजकारकीर्दीबद्दल जर विपर्यस्त मजकूर रूढ झाला असेल तर तो श्री छत्रपति संभाजी महाराजांबद्दल होय. दिवसेंदिवस नवीन नवीन ऐतिहासिक साधनें उपलब्ध होत आहेत व त्यावरून या मजकुरांतील अवास्तवपणा निदर्शनास येत आहे. परंतु रूढ झालेला गैरसमज दूर होण्यास साधार अशी स्वतंत्र ग्रंथरचना होणें जरूर आहे, आणि अशा ग्रंथरचनेस कालावधि लागणें साहजिक आहे.

संभाजी महाराजांचा जन्म पुरंदर गडावर १४ मे १६५७ (ज्येष्ठ शुद्ध १२ गुरुवार शके १५७९) रोजीं झाला. नंतर दोन वर्षांनीं त्याची माता सईबाई (५ सप्टेंबर १६५९) वारली. त्यामुळें संभाजीचें बालपण त्याची आजी जिजाबाई हिचेच देखरेखीखालीं व सान्निध्यांत झालें. सावत्रमाता पुतळाबाई व सकवारबाई यांनाहि त्याचा लळा होता. शिवाजी महाराजांनीं १६६१ त शृंगारपूर घेतल्यानंतर लवकरच संभाजी महाराजांचें लग्न पिलाजीराव शिर्के यांची कन्या जिऊबाई इचेशीं झालें. हिचें सासरचें नांव येसूबाई (यशवंतीबाई) असें ठेवलें. (संभाजीचें लग्न ४ फेब्रुवारी १६७५ रोजीं झालें.) नंतर येसूबाईस ४ सप्टेंबर १६७८ रोजीं भवानीबाई व १८ मे १६८२ रोजीं पुत्र झाला. त्याचें नांव शिवाजी असें ठेवलें. पुढें तो शाहू म्हणून प्रसिद्ध झाला. संभाजी महाराजांस औरंगजेबानें ता. ११ मार्च १६८९ (फाल्गुन वद्य ३० सोमवार) रोजीं शिरच्छेद करून मारलें.

संभाजीला अगदीं लहानपणापासूनच राजकारणांत पडणें भाग पडलें. शिवाजीवरील जयसिंगाच्या मोहिमेतें

शिवाजीला पडतें घ्यावें लागलें. १२ जून १६६५ रोजीं सल्ला झाला त्यांत संभाजी राजे यास पंचहजारी देऊन मोंगलाचें चाकर केलें. ५ मार्च १६६६ला रायगडाहून आग्र्याला औरंगजेबाचे भेटीस शिवाजी महाराजाबरोबर निघाले. मे महिन्यांत शिवाजी महाराजांस चौक्या बसले. संभाजी रामसिंगाजवळ राहिले. १७ आगष्टला आग्र्याहून शिवाजी महाराजाबरोबर पेटाऱ्यांत बसोन पळाले. वाटेंत मथुरेस काशीपंताकडे संभाजीस ठेवलें. काशीपंत त्यांना घेऊन एक दीड महिन्यांनीं रायगडास आले. नंतर इ. स. १६६७त मोंगलाशीं सख्य झाले त्या वेळीं जो सल्ला केला तो संभाजीला औरंगाबादेस शाहाजादा शहा अलमकडे पाठवून केला. संभाजी २७ आक्टोबरला औरंगाबादेस गेला. २८ ला त्यानें जसवंतसिंगाची भेट घेतली व ४ नवंबरला शहा अलमला भेटून ५ नवंबरला रायगडास येण्यास परत फिरले. संभाजीस पुन्हां सप्तहजारींचा सरदार करण्यांत आलें. संभाजीस स्वतंत्र कारभार २६ जानेवारी १६७१ रोजीं सांगितला. पन्हाळा परगणा त्याकडे सोंपविला. अण्णाजीपंत हा शृंगारपूर किंवा संगमेश्वरीं राहून त्याजकडून कारभार करून घेत होते. यापूर्वीं अनाजीपंत व दादजी प्रभुबरोबर संभाजीस बेळगांव–चिकोडी–हुकेरीकडे स्वारीवर पाठविलें होतें. ५ जून १६७४ रोजीं शिवाजी महाराज सिंहासनीं बसले त्यावेळीं संभाजी युवराजपदारूढ झालें. शिवाजीमहाराज कर्नाटकचे स्वारीवर गेले असतां संभाजीराजे व सोयराबाई व तिचे साथीदार कारकून यांचेंत वैमनस्य फार वाढलें. त्यामुळें संभाजी रागावून २९ आक्टोबर १६७७ रोजीं शृंगारपुरास आपल्या सासुरवाडीस जाऊन राहिला. तेथून पन्हाळा तालुक्याचा कारभार पाहात होता. वितुष्ट वाढतच गेलें व बंदोबस्त व्हावा तसा न झाल्यानें संभाजी पारखे होऊन पालीगडावरून पळोन मोंगलांत १३ डिसेंबर १६७८ रोजीं दिलेरखानाकडे गेले. त्यांनीं त्यास सप्तहजारी देऊन सन्मान केला. दिलेरखानानें संभाजीच्या मदतीनें १७ एप्रिल १६७९ रोजीं भूपालगड घेतला. पुढें औरंगजेबानें संभाजीस कैद करण्याचा घाट घातल्यानें दिलेरखानाचें साहाय्यानें संभाजी मोंगलाईतून पळून पन्हाळ्यास डिसेंबर १६७९ त आला. नंतर १३ जानेवारीस शिवाजी राजांनीं त्याची भेट घेतली. समजूत केली. पुन्हा पन्हाळ्याचा कारभार देऊन तेथेंच ठेवलें.

शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर अण्णाजीपंतानें सोयराबाईचा पक्ष धरून कांहीं मंत्र्यांच्या अनुमतीनें राजारामास मंचकारूढ केलें. लष्कर संभाजीची बाजू धरून राहिलें. हंबीरराव यांनीं मोरोपंतादि कांहीं प्रधानांस मिळवून संभाजीला राज्यावर आणण्याचें ठरवलें. पिलाजीराव शिर्के यांनीं रायगडचा पूर्ण बंदोबस्त केला. नंतर १८ जून १६८० त संभाजी पन्हाळ्यावरून रायगडास आले व २० जुलैला त्यास मंचकारोहण झालें; व १६ जानेवारी १६८१ रोजीं संभाजी राजे सिंव्हासनीं बैसले. ता. १ फेब्रुवारी १६८९ रोजीं (माघ वद्य ७मी) संभाजीस शेख निजाम यानें संगमेश्वरास कैद करून ह्यांस औरंगजेबाकडे नेलें. त्यांनीं संभाजीमहाराजांचा ११ मार्च १६८९ (फाल्गुन वद्य ३०) रोजीं हालहाल करून शिरच्छेद केला.

एप्रील १६८० त अनाजीपंत व मोरोपंत संभाजीस कैद करण्यासाठीं पन्हाळ्यावर चालून गेले तेव्हां पिलाजी शिर्के यांनीं इतर सरदारांच्या सहाय्यानें रायगडीं धराधर केली व हंबीररावानें मोरोपंत पेशवे, अनाजीपंत सूरनीस व प्रल्हादपंत यांस धरून पन्हाळ्यास संभाजी राजापुढें उभें केलें. कुलफौज एकत्र करून राज्य संभाजीस दिलें. नंतर आक्टोबरच्या सुरुवातीस मोरोपंत वारले. त्याचे पुत्र निळोपंत यास सोडून संभाजीनें त्यास पेशवाई दिली व अनाजीपंतासहि मजमू दिली. प्रल्हादपंतहि न्यायाधीश झाले. पुढें आगष्ट १६८१ त अनाजीपंतानें अकबराला राज्य देण्याचा व संभाजीला मारण्याचा कट केला. तो उघडकीस आला. संभाजी यावेळीं पन्हाळ्यास होता. अकबराचा तळ पालीजवळील पातशहापुरावर होता. अनाजी वगैरे पालीजवळील परळीस होते. तेथें त्यांनीं बालप्रभु, महादाजी अनंत, सोमाजी दत्तो, हिरोजी फर्जंद यांस मारवलें. शामजी नाईक कर्नाटकांत कैद केले. याच वेळीं सोयराबाई रायगडास वारली. तिनें बहुधः विष खाऊन प्राण दिला असावा असा लोकांत समज होता. संभाजी नंतर महिन्यांनीं रायगडला आला. खंडोबल्लाळास चिटणीसी सांगितली. यावरून संभाजी राज्यावर येतांच ज्या धरपकडीचा व सोयराबाईंना भिंतींत चिणून मारल्याचा आरोप आहे तो किती विकृत आहे हें दिसून येतें. शिर्के यांचें भांडण १६८८ च्या अखेरीस आलें व ते सर्व त्यावेळीं पन्हाळयास होते. तेथून ते औरंगजेबाकडे पळून गेले. शिर्काण प्रांत संभाजीनें त्यांचेकडून काढून चिटणीसास

भोग वाढण्यासंबंधीं विचार मनांतहि आणूं नयेत. (मनु. ६।४६–४८).

जो कशाचा द्वेष करीत नाहीं व कशाचा लोभहि धरत नाहीं, जो सुखदु:खादि द्वन्द्वांपासून अलिप्त असतो, जो सर्व प्राण्यांना आत्मवत् मानतो, जो कर्मफलावर आसक्ति ठेवीत नाहीं पण कर्तव्य करीत राहतो तो खरा संन्यासी होय. (भ. गीता ५।१–४) मनांतील सुखोपभोगाची इच्छा दूर केल्यावांचून संन्यास-आश्रम सिद्ध होऊं शकत नाहीं. (भ. गी. ६।१) काम्यकर्मांचा म्हणजे स्वतःचे भोग वाढवण्यासाठीं आवश्यक असलेल्या कर्मांचा त्याग करणें हा संन्यास होय. (भ. गी. १८।२) संन्याशाला योगाचें आचरण करणें अत्यंत आवश्यक आहे. (भ. गी. ५।३)

संन्याशानें एका गांवीं फक्त एकच दिवस रहावें, तीर्थांच्या ठिकाणीं तीन दिवस, मोठ्या नगरांत पांच दिवस व क्षेत्रांत सात दिवस रहावें (परमहंस उप०). पावसाळ्यांत एखाद्या क्षेत्रांत चार महिने रहावयास हरकत नाहीं. सर्वांशीं समभावानें वागावें व आपल्या भोगांविषयीं निरपेक्ष व निरिच्छ असावें.

जरी तीन आश्रमांनंतर चवथा आश्रम–संन्यास घ्यावा असें शास्त्र असलें, तरी उत्कट वैराग्य प्राप्त झालें असतां, तसेंच विशेष परिस्थितींत ब्रह्मचर्यातूनहि एकदम संन्यास घेतां येतो. याला उत्तम उदाहरण श्रीमच्छंकराचार्यांचें होय.

संन्यास पुष्कळ प्रकारचा आहे, पण त्यांत मुख्य सहा भेद आहेत. कुटीचक, बहूदक, हंस, परमहंस, तुरीयातीत व अवधूत. कुटीचक हा शिखायज्ञोपवीत-धारी व दण्डकमंडलुधारी असून मातापित्यांची सेवा करून राहतो. बहूदक हा तसाच वरप्रमाणें असतो, पण त्रिपुण्ड्र धारण करतो. हंस हा जटाधारी असतो. परमहंस हा शिखायज्ञोपवीतविरहित एक कौपीनधारी सर्वस्वत्यागी असतो. तुरीयातीत हा जवळ जवळ दिगंबर राहतो, व 'अवधूता'ला कांहींएक नियम नसतो. तो जसा राहील तसा राहील. (संन्यास उप.) याशिवाय 'आश्रम' वगैरे अनेक प्रकारचे संन्याशांचे भेद पुष्कळच आहेत.

संन्याशाश्रम हा सर्वांत श्रेष्ठ आश्रम आहे. या आश्रमाचे नियम फार कडक आहेत. फारच उत्कट वैराग्य असल्याशिवाय व फारच दृढनिश्चयी स्वभाव असल्याशिवाय या आश्रमाचें यथाशास्त्र पालन होणें शक्य नसतें. याचसाठीं कलियुगांत संन्यास वर्ज्य आहे. (संन्यासं कलौ विवर्जयेत) [कलिवर्ज्य प्र.] पण हा नियम असा नव्हे कीं, जो न पाळला तर पतन होतें. या कारणानेंच संन्यासाचा अजून प्रचार आहे. हा निषेध संन्याशाच्या आचरणाच्या कठीणपणामुळें केलेला आहे. संन्यासाश्रमाचे नियम जे पाळूं शकतात तेच संन्यास घेऊं शकतात.

भगवे कपडे वापरणें हें या संन्यासाचें बाह्यचिन्ह आहे. पण निष्कामभाव, त्यागवृत्ति, निर्लोभवृत्ति, निस्पृहता हीं या आश्रमाचीं खरीं लक्षणें आहेत.

संभाजी, छत्रपती (१६५७–१६८९):–महाराष्ट्राच्या प्रचलित इतिहासांत एखाद्या व्यक्तिबद्दल किंवा राजकारकीर्दीबद्दल जर विपर्यस्त मजकूर रूढ झाला असेल तर तो श्री छत्रपति संभाजी महाराजांबद्दल होय. दिवसेंदिवस नवीन नवीन ऐतिहासिक साधनें उपलब्ध होत आहेत व त्यावरून या मजकुरांतील अवास्तवपणा निदर्शनास येत आहे. परंतु रूढ झालेला गैरसमज दूर होण्यास साधार अशी स्वतंत्र ग्रंथरचना होणें जरूर आहे, आणि अशा ग्रंथरचनेस कालावधि लागणें साहजिक आहे.

संभाजी महाराजांचा जन्म पुरंदर गडावर १४ मे १६५७ (ज्येष्ठ शुद्ध १२ गुरुवार शके १५७९) रोजीं झाला. नंतर दोन वर्षांनीं त्याची माता सईबाई (५ सप्टेंबर १६५९) वारली. त्यामुळें संभाजीचें बालपण त्याची आजी जिजाबाई हिचेच देखरेखीखालीं व सान्निध्यांत झालें. सावत्रमाता पुतळाबाई व सकवारबाई यांनाहि त्याचा ळळा होता. शिवाजी महाराजांनीं १६६१ त शृंगारपूर घेतल्यानंतर लवकरच संभाजी महाराजांचें लग्न पिलाजीराव शिर्के यांची कन्या जिऊबाई इचेशीं झालें. हिचें सासरचें नांव येसूबाई (यशवंतीबाई) असें ठेवलें. (संभाजीचें लग्न ४ फेब्रुवारी १६७५ रोजीं झालें.) नंतर येसूबाईस ४ सप्टेंबर १६७८ रोजीं भवानीबाई व १८ मे १६८२ रोजीं पुत्र झाला. त्याचें नांव शिवाजी असें ठेवलें. पुढें तो शाहू म्हणून प्रसिद्ध झाला. संभाजी महाराजांस औरंगजेबानें ता. ११ मार्च १६८९ (फाल्गुन वद्य ३० सोमवार) रोजीं शिरच्छेद करून मारलें.

संभाजीला अगदीं लहानपणापासूनच राजकारणांत पडणें भाग पडलें. शिवाजीवरील जयसिंगाच्या मोहिमेंत

शिवाजीला पडतें घ्यावें लागलें. १२ जून १६६५ रोजीं सल्ला झाला त्यांत संभाजी राजे यास पंचहजारी देऊन मोंगलाचें चाकर केलें. ५ मार्च १६६६ला रायगडाहून आग्र्याला औरंगजेबाचे भेटीस शिवाजी महाराजाबरोबर निघाले. मे महिन्यांत शिवाजी महाराजांस चौक्या बसले. संभाजी रामसिंगाजवळ राहिले. १७ आगष्टला आग्र्याहून शिवाजी महाराजाबरोबर पेटाऱ्यांत बसोन पळाले. वाटेंत मथुरेस काशीपंताकडे संभाजीस ठेवलें. काशीपंत त्यांना घेऊन एक दीड महिन्यांनीं रायगडास आले. नंतर इ. स. १६६७त मोंगलाशीं सख्य झाले त्या वेळीं जो सल्ला केला तो संभाजीला औरंगाबादेस शाहाजादा शहा अलमकडे पाठवून केला. संभाजी २७ आक्टोबरला औरंगाबादेस गेला. २८ ला त्यानें जसवंतसिंगाची भेट घेतली व ४ नवंबरला शहा अलमला भेटून ५ नवंबरला रायगडास येण्यास परत फिरले. संभाजीस पुन्हां सप्तहजारींचा सरदार करण्यांत आलें. संभाजीस स्वतंत्र कारभार २६ जानेवारी १६७१ रोजीं सांगितला. पन्हाळा परगणा त्याकडे सोंपविला. अण्णाजीपंत हा शृंगारपूर किंवा संगमेश्वरीं राहून त्याजकडून कारभार करून घेत होते. यापूर्वीं अनाजीपंत व दादजी प्रभुबरोबर संभाजीस बेळगांव-चिकोडी--हुकेरीकडे स्वारीवर पाठविलें होतें. ५ जून १६७४ रोजीं शिवाजी महाराज सिंहासनीं बसलें त्यावेळीं संभाजी युवराजपदारूढ झालें. शिवाजीमहाराज कर्नाटकचे स्वारीवर गेले असतां संभाजीराजे व सोयराबाई व तिचे साथीदार कारकून यांचेंत वैमनस्य फार वाढलें. त्यामुळें संभाजी रागावून २९ आक्टोबर १६७७ रोजीं शृंगारपुरास आपल्या सासुरवाडीस जाऊन राहिला. तेथून पन्हाळा तालुक्याचा कारभार पाहात होता. वितुष्ट वाढतच गेलें व बंदोबस्त व्हावा तसा न झाल्यानें संभाजी पारखे होऊन पालीगडावरून पळोन मोंगलांत १३ डिसेंबर १६७८ रोजीं दिलेरखानाकडे गेले. त्यांनीं त्यास सप्तहजारी देऊन सन्मान केला. दिलेरखानानें संभाजीच्या मदतीनें १७ एप्रिल १६७९ रोजीं भूपालगड घेतला. पुढें औरंगजेबानें संभाजीस कैद करण्याचा घाट घातल्यानें दिलेरखानाचें साहाय्यानें संभाजी मोंगलाईंतून पळून पन्हाळ्यास डिसेंबर १६७९ त आला. नंतर १३ जानेवारीस शिवाजी राजांनीं त्याची भेट घेतली. समजूत केली. पुन्हा पन्हाळ्याचा कारभार देऊन तेथेंच ठेवलें.

शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर अण्णाजीपंतानें सोयराबाईचा पक्ष धरून कांहीं मंत्र्यांच्या अनुमतीनें राजारामास मंचकारूढ केलें. लष्कर संभाजीची बाजू धरून राहिलें. हंबीरराव यांनीं मोरोपंतादि कांहीं प्रधानांस मिळवून संभाजीला राज्यावर आणण्याचें ठरवलें. पिलाजीराव शिर्के यांनीं रायगडचा पूर्ण बंदोबस्त केला. नंतर १८ जून १६८० त संभाजी पन्हाळ्यावरून रायगडास आले व २० जुलैला त्यास मंचकारोहण झालें; व १६ जानेवारी १६८१ रोजीं संभाजी राजे सिंव्हासनीं बैसले. ता. १ फेब्रुवारी १६८९ रोजीं (माघ वद्य ७मी) संभाजीस शेख निजाम यानें संगमेश्वरास कैद करून त्यांस औरंगजेबाकडे नेलें. त्यांनीं संभाजीमहाराजांचा ११ मार्च १६८९ (फाल्गुन वद्य ३०) रोजीं हालहाल करून शिरच्छेद केला.

एप्रील १६८० त अनाजीपंत व मोरोपंत संभाजीस कैद करण्यासाठीं पन्हाळ्यावर चालून गेले तेंव्हां पिलाजी शिर्के यांनीं इतर सरदारांच्या सहाय्यानें रायगडीं धराधर केली व हंबीररावानें मोरोपंत पेशवे, अनाजीपंत सूरनीस व प्रल्हादपंत यांस धरून पन्हाळ्यास संभाजी राजापुढें उभें केलें. कुलफौज एकत्र करून राज्य संभाजीस दिलें. नंतर आक्टोबरच्या सुरुवातीस मोरोपंत वारले. त्याचे पुत्र निळोपंत यास सोडून संभाजीनें त्यास पेशवाई दिली व अनाजीपंतासहि मजमू दिली. प्रल्हादपंतहि न्यायाधीश झाले. पुढें आगष्ट १६८१ त अनाजीपंतानें अकबराला राज्य देण्याचा व संभाजीला मारण्याचा कट केला. तो उघडकीस आला. संभाजी यावेळीं पन्हाळ्यास होता. अकबराचा तळ पालीजवळील पातशहापुरावर होता. अनाजी वगैरे पालीजवळील परळीस होते. तेथें त्यांनीं बालप्रभु, महादाजी अनंत, सोमाजी दत्तो, हिरोजी फर्जंद यांस मारवलें. शामजी नाईक कर्नाटकांत कैद केले. याच वेळीं सोयराबाई रायगडास वारली. तिनें बहुधः विष खाऊन प्राण दिला असावा असा लोकांत समज होता. संभाजी नंतर महिन्यांनीं रायगडला आला. खंडोबल्लाळास चिटणीसी सांगितली. यावरून संभाजी राज्यावर येतांच ज्या धरपकडीचा व सोयराबाईना भिंतींत चिणून मारल्याचा आरोप आहे तो किती विकृत आहे हें दिसून येतें. शिर्के यांचें भांडण १६८८ च्या अखेरीस आलें व ते सर्व त्यावेळीं पन्हाळ्यास होते. तेथून ते औरंगजेबाकडे पळून गेले. शिर्काण प्रांत संभाजीनें त्यांचेकडून काढून चिटणीसास

दिला. 'शिर्काण' शब्दाचा विपरीत अर्थ जो रूढ झाला तो अगदीं विसाव्या शतकांतील होय. हंबीरराव १६८५त वारला. त्याच वेळीं धनाजी जाधव, अचलोजी घोरपडे व त्यांचे पुत्र संताजी वगैरे यांस सेनापती-पदें मिळालीं. शंकराजीपंत सचिव १६८७ पूर्वीपासून सचीव असल्याचा उल्लेख आढळतो व रामचंद्रपंत अमात्यपणाचा अरपारच नव्हे तर गोवळकोंडेकर व विजापूरकर यांना मराठ्याशीं संगनमत ठेवून औरंगजेबाशीं टक्कर देण्यास लावण्याच्या खटपटींत संभाजीचे मुख्य हस्तक होते. कब्जीस राजकीय अधिकार मिळाल्याचें कागदपत्रांवरून दिसत नाहीं. सरदारकी देऊन १६८७ त पन्हाळ्यास पाठविला होता; तेथेंच त्याचें व शिर्क्यांचें भांडण झालें. सारांश संभाजीनें शिवाजीचे चांगले लोक मारले, हा जसा आरोप खोटा वाटतो तसेंच जें राजाराम यानें कांहीं नांवारूपास आणलें त्यांची निवड राजारामानें केली हेंहि असत्य दिसतें.

संभाजी राज्यावर येतांच औरंगजेबाचें परचक्र महाराष्ट्रावर आलें. त्यास व त्याचे हस्तक जंजिऱ्याचा शिद्दी व गोव्याचे पोर्तुगीज यांस तोंड देण्यांत संभाजीचीं पहिलीं तीन वर्षे गेलीं. शेवटीं औरंगजेब आपलें सैन्य व दाणागोटा पोर्तुगीजांच्या साहाय्यानें पश्चिम किनाऱ्यावर उतरविणार असें कळल्यावर संभाजीनें त्याचा चांगलाच बंदोबस्त केला. गोवेकरांनीं मराठ्यांच्या राज्यांत आक्रमण केलें. तेव्हां संभाजी १६८३च्या नवंबरांत चौलवरून गोवा बारदेशांत घुसून तें मारलें. शहा अलम एक लाख सैन्य घेऊन गोवेकरास मदतीस आला व त्यास झुलवित वेंगुर्ल्यापर्यंत नेलें. अन्न व पाणी यांच्या अभावीं त्याचें ५०–६० हजार सैन्य गेलें. तो परतला तेव्हां आणखी मेले. नंतर औरंगझेबानें गोवळकोंडा व विजापूरवर हल्ले चढविले त्यासहि संभाजीनें सारखी मदत देऊन बाहेरून मोंगली फौजेस हैराण केलें. वेढे यशस्वी न होत; तेव्हां कुत्बशाहींत व आदिलशाहींत फितूर केला. किल्ले घेतले. या घडामोडींत संभाजीनें ३–४ वर्षे अविश्रांत श्रम केले. नंतर लढा मोंगल–मराठ्यांत राहिला. मोंगलास नीटसा धीर मिळेना. फूट पाडण्याचा प्रयत्न चालूच होता. संभाजीचे लोकहि भडोच बऱ्हाणपूरवर चालून जातच होते. अशा वेळीं संभाजी पन्हाळ्यास आल्याचें समजतांच औरंगजेबानें पन्हाळ्यास वेढा देण्यास शेख निजामास पाठविलें. वेढा पडणार तोंच संभाजी अचलोजी घोरपडे व ५०० स्वारासमवेत तेथून निसटले. मोंगलास बातमी लागली. त्यांनीं नेटानें जंगलांतून पाठलाग केला. संगमेश्वराजवळ ३ मैलावर भेट पडली. अचलोजी पडले, २००–३०० लोकहि पडले. ५–१० हजाराचा जमाव मागें. राहिलेले मराठे पळूं लागले. १॥ मैल पळून संगमेश्वराजवळ आले, तों कब्जी तीर लागून पडला. संभाजी संगमेश्वरच्या देवळांत शिरले. वेष पालटून पळणार तों ओळखले गेले व मोंगली जमावाच्यापुढें हताश होऊन हातीं पडले. तेथून त्यास कोरगांवनजीक तुळापूरचे मुक्कामांत औरंगझेबासमोर आणलें. औरंगझेबाला हायसें झालें. सर्व हिंदुस्थान जिंकल्याइतकें समाधान झालें.

संभाजीच्या हालचाली इतक्या त्वरित होत होत्या कीं आज या टोंकाला तर उद्यां दुसऱ्या टोंकाला औरंगजेबाला लढाईस जावें लागें. येसूबाई सर्व कारभार पाही. कोणी फितूर आढळला कीं रायगडीं तिचे ताब्यांत येऊन पडे. एकंदरींत कारकीर्दीचा आढावा घेतला तर संभाजी पकडला जाईपर्यंत मराठी राज्यांतील कोणताहि भाग मोंगलांचे ताब्यांत गेला नव्हता. तो पकडल्यानंतर मात्र २–३ महिन्यांत मोंगली सेनेनें भयंकर आक्रमण केलें. व पुढें एक वर्षात मराठी राज्याचा फुटलेला अंकूर मोडून टाकला. नंतर त्याच अंकुरांतून जोमदार मराठी साम्राज्याचा वृक्ष तयार झाला हें पुढचा इतिहास स्पष्ट सांगत आहे.

संवत्सरः–एक वर्षाचा काल. संवत्सर (सम्+वसंति+ ऋतवः) म्हणजे चांगले ऋतु असलेला कालखंड. सूर्याभोंवतीं पृथ्वीला फिरण्यास जो काल लागतो त्यास संवत्सर म्हणतात. ज्योतिषशास्त्रज्ञांनीं साठ वर्षांचें एक चक्र मानून त्यांतील प्रत्येक वर्षाला स्वतंत्र असें नांव दिलें आहे. हीं साठ नांवें पुढीलप्रमाणें होत. १ प्रभव, २ विभव, ३ शुक्र, ४ प्रमोद, ५ प्रजापती ६ अंगिरा, ७ श्रीमुख, ८ भाव, ९ युव, १० धाता, ११ ईश्वर, १२ बहुधान्य, १३ प्रमाथी १४ विक्रम १५ वृष, १६ चित्रभानु, १७ सुभानु, १८ तारण, १९ पार्थिव, २० व्यय, २१ सर्वजित्, २२ सर्वधारी, २३ विरोधि, २४ विकृति, २५ खर, २६ नंदन, २७ विजय, २८ जय, २९ मन्मथ, ३० दुर्मुख, ३१ हेमलंबी, ३२ विलंबी, ३३ विकारी, ३४ शार्वरी, ३५ प्लव, ३६ शुभकृत्, ३७ शोभकृत्, ३८ क्रोधी, ३९ विश्वासू, ४० पराभव, ४१ प्लवंग, ४२ कीलक, ४३ सौम्य,

४४ साधारण, ४५ विरोधकृत्, ४६ परिधान, ४७ प्रमादी, ४८ आनंद, ४९ राक्षस, ५० नल, ५१ पिंगल, ५२ कालयुक्त, ५३ सिद्धार्थी, ५४ रौद्र, ५५ दुर्मति, ५६ दुंदुभी, ५७ रुधिरोद्गारी, ५८ रक्ताक्षी, ५९ क्रोधन व ६० क्षय. दरवर्षाला हींच नांवें अनुक्रमानें येतात. वर्षारंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून होतो व शेवट फाल्गुन वद्य अमावास्येस होतो.

स्टॅन्ले, सर हेन्री मॉर्टन (१८४१–१९०४):– आफ्रिकेंतील अज्ञात प्रदेशाचा संशोधक. मूळचें नांव जॉन रॉलंडस्. याचा जन्म वेल्समध्यें १० जून १८४१ रोजीं झाला. १८६७ मध्यें हा 'न्यूयॉर्क हेरल्ड'चा खास बातमीदार बनला व त्याच वृत्तपत्रसंस्थेच्या प्रेरणेनें त्यानें आफ्रिकेच्या जंगलांत हरवलेल्या लिव्हिंग्स्टनच्या शोधार्थ १८७१–७२ मध्यें आफ्रिकेंत प्रवास केला. शेवटीं स्टॅन्लेला लिव्हिंग्स्टन टांगानिका सरोवराजवळ सांपडला. नंतर ऑगस्ट १८७२ मध्यें स्टॅन्ले इंग्लंडला परतला. परंतु नंतरहि दोन वेळां आफ्रिकेंत शोधार्थ गेला. १८९५ मध्यें तो इंग्लंडला परतल्यावर त्याचा सत्कार झाला व तो पार्लमेंटचा सभासदहि झाला. तो १० मे १९०४ रोजीं मेला. त्याचे ग्रंथ–How I Found Livingstone, Through the Dark Continent, The Congo, व In Darkest Africa.

स्टॅम्पसचा कायदा:–स्टॅम्प्स ही सरकारच्या उत्पन्नाची एक बाब आहे. हिंदुस्थानांतील प्रचलित स्टॅम्प्स-विषयींचा कायदा '१८९९चा इंडियन स्टॅम्प ॲक्ट' या कायद्यांत सांगितला आहे. स्टॅम्प म्हणजे तिकीट अथवा शिक्का. सरकारनें रेव्हिन्यूचीं तिकिटें एक आण्यापासूनचीं काढलीं आहेत व स्टॅम्पचे कागद काढले आहेत. नागरिकानें दस्तऐवजाकरितां योग्य त्या स्टँपाचा उपयोग केला पाहिजे. प्रॉमिसरी नोट, पावती हे कागद तयार करतांना रेव्हिन्यू तिकिटांचा उपयोग करावयाचा असतो. हीं तिकिटें चिकटविल्यानंतर त्यांचा पुनः उपयोग करतां येऊं नये म्हणून त्यांचेवर सही करून अगर अन्य रीतींनें तीं रद्द केलीं पाहिजेत. अशा प्रकारें तिकीट रद्द केलें नाहीं तर त्या कागदावर तिकीट लावलेंच नाहीं, तिकिटाविनाच तो व्यवहार झाला असें कायदा मानतो. गहाणखत, खरेदीपत्र, कबुलायत, दत्तकपत्र वगैरे दस्तऐवज स्टॅम्पच्या कागदावर लिहिले पाहिजेत. कोणत्या प्रकारच्या दस्तऐवजाला किती किंमतीचा स्टॅम्प वापरावयाचा हें कायद्यांत सांगितलें आहे. 'इंडियन स्टॅम्प ॲक्ट'च्या परिशिष्टांत स्टॅम्प ड्यूटीविषयींचा तक्ता दिला आहे. सामान्यतः हा कायदा सर्व हिंदुस्थानाला लागू आहे; परंतु त्या त्या प्रान्तांत कायदे होऊन या स्टॅम्प ॲक्टांत दुरुस्ती झाली आहे. त्यामुळें सर्व प्रान्तांत एकाच प्रकारचा स्टॅम्पचा ॲक्ट लागू नाहीं.

स्टॅम्प ड्यूटीच्या बाबतींत निरनिराळ्या प्रान्तांतील कायद्यांत फरक आहे.

नागरिकानें योग्य ती स्टॅम्प ड्यूटी देण्याचें टाळूं नये म्हणून कायद्यांत कडक नियम केले आहेत. कायद्याप्रमाणें स्टॅम्प ड्यूटी भरणें अवश्य असतांना, मुळींच स्टॅम्प न लावतां अथवा अपुरा स्टॅम्प लावून एकादा दस्तऐवज झाला असेल तर तो पुराव्यांत दाखल करून घेऊं नये, रजिस्ट्रेशनकरतां स्वीकारूं नये असा कायद्याचा दंडक आहे. परंतु प्रॉमिसरी नोट व तत्सदृश कागद यांखेरीज इतर दस्तऐवज ऐनहंशील व दंड घेऊन पुराव्यांत दाखल करून घेतां येतात. दस्तऐवज साध्या कागदावर झाला असेल तर तो पुराव्यांत दाखल करणाऱ्यानें त्याजवर द्यावयाची मूळ स्टँप ड्यूटी व ५ रुपये दंड इतकी रक्कम भरली पाहिजे. कागद अपुऱ्या स्टँपवर झाला असेल तर भरतीचा स्टँप देऊन त्याशिवाय पांच रुपये दंड दिला पाहिजे. ऐन हंशीलाच्या रकमेची दसपट पांच रुपयांहून अधिक असेल तर ऐन हंशीलाच्या दसपट रक्कम दंडादाखल द्यावयाची असते. रेव्हिन्यू स्टॅम्प न लावतां प्रॉमिसरी नोट झाली असेल तर ती पुराव्यांत ग्राह्य नाहीं. तिकीट न लावतां दिलेली पावती पुराव्यांत दाखल करावयाची असेल तर ती हजर करणाऱ्यानें एक रुपया दंड भरला पाहिजे.

स्टॅलिन, जोसेफ व्हिझारिओनोविच (१८७९–):–रशियाचा डिक्टेटर. कॉकेशस पर्वतांतील टिफलिस गांवीं एका चांभाराच्या पोटीं याचा १८७९ मध्यें जन्म झाला. धर्मोपदेशक करण्याच्या हेतूनें त्याच्या पालकांनीं टिफलिस येथील चर्च कॉलेजमध्यें शिक्षण दिलें; पण हा वयाच्या १७ व्या वर्षी कॉकेशस पर्वतांतील तेलांच्या खाणींत काम करणाऱ्या सोशॅलिस्ट क्रांतिकारक चळवळीस मिळाला व १९०३ पासून बोल्शेव्हिक पार्टीचा सभासद झाला. १९०२ ते १९१२ पर्यंत याच्या राजकीय चळवळींमुळें याला अनेक वेळां शिक्षा होऊन सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलें होतें,

व बहुतेक प्रत्येक वेळीं तो तेथून पळून जात असे. बोल्शेव्हिक पक्षाला मिळाल्यावर त्यानें आपलें युगाश्व्हिली (Jugashvili) हें नांव बदलून स्टालिन ("Man of steel" पोलादी मनुष्य) हें नांव घेतलें; १९१७ मध्यें म्हणजे रशियन राज्यक्रांति झाल्यावर तो पिट्सबर्गला गेला व लेनिनला मिळाला. तो प्रवदाच्या संपादकांपैकीं एक संपादक होता. लेनिननें त्याला Commissar of Nationalities केलें. १९१९ मध्यें मध्यवर्ती पक्षाच्या समितीचा तो सरचिटणीस (General Secretary) बनला. पुढें १९२४ मध्यें लेनिनच्या मृत्यूनंतर सत्तेसाठीं ट्रॉट्स्की व स्टालिन यांच्यांत भांडणें लागून स्टालिननें नाना क्लृप्त्या लढवून १९२७ मध्यें कम्युनिस्ट पक्षावर संपूर्ण प्रभुत्व मिळविलें. पुढें त्यानें पंचवार्षिक योजना आखल्या व बरेंच यश मिळविलें. १९३६–१९३७ मध्यें आपल्या पक्षांतील अनेक लोकांवर अनेक आरोपांखालीं खटले भरून सर्वांस फांशीं दिलें. हे खटले 'मास्को ट्रायल्स' या नांवानें प्रसिद्ध आहेत.


जोसेफ स्टालिन

१९३४ ते १९३८ पर्यंत सर्व जगभर कम्युनिस्ट लोक स्टालिनची नाझीझमचा जबरदस्त शत्रू म्हणून जाहिरात करीत असत. १० मार्च १९३० पर्यंत तो हिटलर व जर्मनीच्या विरुद्धच बोले; पण ब्रिटन–फ्रान्स बरोबर सलोख्याचीं बोलणीं चालू असतांनाच २३ ऑगस्ट १९३९ रोजीं स्टालिननें जर्मनीशीं अनाक्रमणाचा व पोलंडच्या बाबतींत हिटलरला हवें तें करूं देण्याचा करार करून जगाला पहिला आश्चर्याचा धक्का दिला. पुढें जर्मनीची पोलंडवर स्वारी चालू असतांनाच रशियानें पूर्वपोलंडवर हल्ला केला व नंतर जर्मनी व रशियांत पोलंडची वांटणी झाली. यानंतर एस्टोनिया, लटेव्हिया व लिथुआनिया हीं चिमुकलीं बाल्टिक राष्ट्रें त्याच्या प्रभुत्वाखालीं आलीं व फिनलंडकडे कांहीं बेटें व जागा मागून फिनलंडनें या गोष्टींना नकार देतांच फिनलंडविरुद्ध ३० नोव्हेंबर १९३९ रोजीं आपलें सैन्य पाठवून युद्धाला सुरवात केली. मार्चच्या पहिल्या आठवड्यांत रशियाला या युद्धांत जय मिळून १७ मार्च १९४० रोजीं तह होऊन फिनलंडहि रशियाच्या पंजाखालीं गेलें.

ट्रॉट्स्कीचें (त्याच्या पक्षाचें) म्हणणें कीं, रशियाप्रमाणेंच सर्व जगभर कामगारक्रांति घडवून आणण्यासाठीं रशियानें उघडपणें प्रयत्न केले पाहिजेत; तर स्टालिनचें म्हणणें असें कीं ही क्रांति व सोशॅलिझम आज फक्त एकाच देशांत (रशियांत) राबविला पाहिजे. ट्रॉट्स्की स्टालिनला 'Traitor of the Revolution' म्हणतो. स्टालिनच्या कारकीर्दीत रशिया जगांतील शक्तिमान राष्ट्र बनलें असून आजच्या महायुद्धांत जर्मनीला अप्रत्यक्ष मिळणाऱ्या स्टालिनच्या सहाय्यावर या महायुद्धाचा विजय अवलंबून आहे. आज रशियाची लष्करी शक्तीहि अफाट बनली आहे. इतकी कीं, खुद्द जर्मनीलाहि तिची भीति वाटावी!

स्टालिन हा रशियाचा प्रत्यक्ष अधिकारी नाहीं. तो कम्युनिस्ट पार्टीचा सर चिटणीस आहे. १९३४ मध्यें त्याची पहिली बायको मेल्यावर त्यानें दुसरें लग्न केलें. पहिल्या बायकोपासून त्याला एक मुलगा व एक मुलगी झाली आहे.

स्टिफेन्सन, जॉर्ज (१७८१–१८४८):–इंग्लिश इंजिनीयर, संशोधक. प्रथमच रेल्वे इंजिनचा शोध लाविल्याबद्दल याची प्रसिद्धि आहे. हा रॉबर्ट स्टिव्हनसन नामक कोळशाच्या कारखान्यांतील फायरमनचा मुलगा. वयाच्या १४ व्या वर्षी बापाच्या हाताखालीं काम करूं लागला. याच कालांत रात्रीच्या शाळांत जाऊन तो लिहिणें वाचणें शिकला. इ.स. १८१२ सालीं


स्टीफेन्सन जॉर्ज व रॉबर्ट (पितापुत्र)

कोळशाच्या कारखान्यांत त्याला इंजिन तयार करण्याचें काम मिळालें. १८१५ सालीं त्यानें खाणींत काम करणारांच्या उपयोगार्थ बिनधोक्याच्या दिव्याचा शोध लावला. स्टिवनूसननें आपलें पहिलें रेल्वे इंजिन १८१४ सालीं बांधलें. हें इंजिन वारंवार चालवून पाहून त्यानें त्यांत पुष्कळ सुधारणा केल्या. हें वाफेचें इंजिन जमिनीवरून नीट चालेना म्हणून लोखंडी रुळांची कल्पना यानें काढली. (' रेल्वे ' पाहा.) मृत्यू १८४८.

स्टिव्हेन्सन, रॉबर्ट लुई (१८५०–१८९४):–ब्रिटिश कादंबरीकार, निबंधकार, कवि व प्रवासी. टॉमस स्टिव्हन्सन या सिव्हिल इंजिनिअरचा तो एकुलता एक मुलगा. त्याचा जन्म एडिंबरो येथें १३ नोव्हेंबर १८५० रोजीं झाला. लहानपणापासूनच याची शरीरप्रकृति अत्यंत नाजूक होती. उभें आयुष्य त्यानें दुखण्यांशीं झगडतच घालविलें. प्रकृति अशी तोळामासा असतां त्यानें अनेक कलाकृति निर्माण केल्या. त्याचें हें धैर्य व चिकाटी खरोखरीच कौतुकास्पद आहे. वयाच्या आठव्या वर्षापासून तों सतराव्या वर्षापर्यंत तो निरनिराळ्या शाळांत शिकला. सुटींत बापाबरोबर प्रवासाला जात असे. त्यानें वयाच्या १७ व्या वर्षी एडिंबरो विद्यापीठांत प्रवेश केला. तेथें त्यानें कायद्याचा अभ्यास केला, अनेक इंग्लिश व फ्रेंच ग्रंथ वाचले. १८७५ सालीं बॅरिस्टर झाला. पण वकिलीचा धंदा न करतां आपल्या आवडत्या वाङ्मयव्यवसायाला त्यानें वाहून घेतलें. लहानपणापासूनच त्यानें भावी आयुष्यांतील वाङ्मयसेवेची पूर्वतयारी चालविली होती. तो अर्ध्या हळकुंडानें पिंवळा होणारा लेखक नव्हता. त्याला पूर्णत्वाची मोठी हाव होती. लहान वयांत लिहिलेले अनेक लेख मनासारखे न झाल्यामुळें त्यानें फाडून टाकले.

१८७८ सालीं त्याचा Inland Voyage हा स्कॉटलंड व बेल्जम येथील होडीनें केलेल्या प्रवासाचें वर्णन देणारा ग्रंथ प्रसिद्ध झाला. हा त्याचा पहिला ग्रंथ होय. १८७९ सालीं Travels with a Donkey (गाढवासह प्रवास) हें मनोरंजक पुस्तक प्रसिद्ध झालें. याच वेळीं त्यानें निरनिराळ्या नियतकालिकांत कथा, निबंध प्रसिद्ध केले. त्यांतील निवडक लेखांचे संग्रह पुढें प्रसिद्ध झाले. The New Arabian Nights, Virginibus Puerisque, Familiar Studies of Men and Books हे ते संग्रह होत.

१८७९ सालीं तो कॅलिफोर्नियाला गेला. तेथें फारच आजारी पडला. १८८० सालीं मिसेस ऑसबोर्न या विधवेशीं त्यानें विवाह केला. पुढील दहा वर्षांत त्यानें प्रकृतीच्या कारणाकरितां अनेक स्थलांतरें केलीं. १८९० सालीं तो सामोआंत स्थायिक झाला. दरम्यान त्यानें आपलीं पुढील पुस्तकें प्रसिद्ध केलीं:— Prince Otto, Treasure Island, Young Folks, The Black Arrow, A Child's Garden of Verses, Dynamiter, The Strange Case of Dr. Jekyll and Mr. Hyde (प्रत्येक व्यक्तींत चांगला व वाईट असे दोन्ही अंश असतात. याविषयींची कथा); Kidnapped (ऐतिहासिक पार्श्वभूमीवर लिहिलेली अद्भुतरम्य कथा); The Master of Ballantrae. Underwoods (पद्यसंग्रह).

सामोआंत असतांना त्यानें David Balfour व Saint Ives या कलाकृति व Weir of Hermiston ही अपूर्ण कथा, हीं पुस्तकें लिहिलीं. शेवटचें अपूर्ण असलें तरी उत्कृष्ट कलाकृति असल्याचें अनेक टीकाकारांनीं मान्य केलें आहे. तो ४ डिसेंबर १८९४ रोजीं मेला.

स्टिव्हन्सन् हा नामवंत कलावंत होता. त्याची लेखनशैली अप्रतिम होती. कथालेखनाच्या बाबतींत तो स्कॉटच्या बरोबरीचा होता.

स्टीमर:–स्टीमर म्हणजे वाफेच्या यंत्रामुळें गति मिळणारें जहाज. १९ व्या शतकाच्या आरंभीं वाफेचें यंत्र बसविलेली पहिली स्टीमर इंग्लंडमध्यें प्रथम तयार झाली व त्यामुळें स्टीमर हें नांव पडलें; पण अलिकडे डिझेल इंजिन्स किंवा इतर प्रकारची यंत्रसामुग्री उपयोजून जहाजांना गति मिळवितां येते; आणि आतां वाफेचा फारसा संबंध राहिला नसला तरी ' स्टीमर ' हें नांव मात्र (मोठ्या जहाजांना) कायम राहिलें आहे.

मोठ्या स्टीमर्समधून वाहतूक मोठ्या प्रमाणांत करतां येते. प्रवासी नेणाऱ्या स्टीमर्सपैकीं जगांतील तीन सर्वांत मोठ्या जहाजांचीं नांवें अनुक्रमें, क्वीन एलिझाबेथ (इंग्लंड), क्वीन मेरी (इंग्लंड) व नॉर्मंडी (फ्रान्स) हीं आहेत. पैकीं प्रत्येकीचें वजन व लांबी अनुक्रमें १८६,००० टन सुमारें बाराशें फूट २७३,००० टन, १०१८ फूट, ३,८०,००० टन, ९८१ फूट. यांपैकीं 'क्वीन मेरी' या नांवाच्या जहाजाची उंची कण्या पासून शेवटच्या मजल्यापर्यंत १३५ फूट व डोलकाठ्यांच्या टोंकापर्यंत २३४ फूट आहे. हींतून एका वेळीं ४,०००

प्रवासी आरामानें प्रवास करूं शकतात. याशिवाय बोटीचा नोकरवर्ग ११०० असतो. हें जहाज बांधण्याला जवळजवळ १५ कोट रुपये खर्च आला. या जहाजानें ३ दिवस २३ तास व ५७ मिनिटांत अटलांटिक महासागर ओलांडून जलद गतीचें नवें रेकॉर्ड प्रस्थापित केलें.


स्टील, सर रिचर्ड (१६७२-१७२९):—इंग्लिश निबंधकार. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या ख्राइस्ट चर्च व मॅगडेलिन कॉलेज या महाविद्यालयांत शिक्षण झालें. विद्यार्थीदशेंत त्याचा प्रसिद्ध लेखक जोसेफ ॲडिसन याच्याशीं स्नेह जमला. स्टीलनें १६९४ सालीं पदवी न घेतांच शिक्षण अर्धवट सोडलें व लष्करी नोकरी धरली. या खात्यांत तो कॅप्टनच्या पदापर्यंत चढला. १७०१ सालीं त्यानें 'ख्रिश्चन हीरो' या नांवाचें एक धर्मपर चोपडें प्रसिद्ध केलें. त्याच वर्षी त्यानें 'फ्यूनरल' नांवाचें आपलें पहिलें नाटक प्रकाशित केलें. याशिवाय The Lying Lover (१७०३); The Tender Husband (१७०५); The Conscious Lovers (१७२२) हीं नाटकें लिहिलीं.

१७०९ सालीं त्यानें आपलें 'टॅटलर' पत्र काढलें. हें आठवड्यांतून तीनदां निघत असे. हें १७११ पर्यंत चाललें. या कामीं त्याचा मित्र जोसेफ ॲडिसन त्याचा साहाय्यकर्ता होता. १७११ सालीं स्पेक्टेटर पत्र निघालें; तें १७१२ सालीं बंद पडलें. त्यानंतर बरींच पत्रें निघालीं व बंद पडलीं. त्यांत 'दी गार्डीयन' व 'दी इंग्लिशमन' हीं उल्लेखनीय आहेत. स्टील हा कट्टर व्हिग पक्षाचा होता. १७१५ सालीं त्याला 'सर' ही पदवी मिळाली. स्टीलची आर्थिक परिस्थिति ओढघस्तीचीच होती. पहिली पत्नी निवर्तल्यावर त्यानें दुसरें लग्न केलें. दुसरी पत्नी १७१८ सालीं वारली. ॲडिसन १७१९ सालीं वारला. स्टीलचे शेवटचे दिवस दुःखांत व एकाकी स्थितींत गेले.

स्टील आणि ॲडिसन या जोडीनें वाङ्मयाच्या क्षेत्रांत चांगलें कार्य केलें.

स्टोव्ह:—सध्यां स्टोव्हचा प्रसार सर्वत्र झाला आहे. चूल पेटविण्यासाठीं पडणाऱ्या त्रासामुळें व लागणाऱ्या वेळामुळें चुलीऐवजीं स्टोव्ह झटकन् पेटवून चुलीचें काम भागवितां येतें. स्टोव्ह रॉकेलवर चालतो; व प्रवासांत वगैरे त्याचा फार उपयोग होतो.

स्टोव्हची रचना सोबत दिलेल्या चित्रांत दाखविल्याप्रमाणें असते. पंपामुळें स्टोव्हच्या टाकींत हवा भरली जाते व त्या हवेच्या दाबामुळें टाकींतील राकेल जोरानें वरच्या निपलमधून बारीक पण जोरदार धारेनें वर फेंकलें जातें. नंतर बर्नरच्या तबकडीवर आपटून व तापलेल्या बर्नरमुळें निपलमधून तेल वर येतांच तापलेल्या बर्नरच्या उष्णतेमुळें त्याचा गॅस बनून तो जळतो व ज्वाला निर्माण होतात. या ज्वलनक्रियेच्या वेळीं सर्व बाजूंनीं सारखी हवा मिळते व त्यामुळें ही ज्वलनक्रिया पूर्ण होते व धूर निघत नाहीं. स्टोव्ह पेटला असतांना धूर निघत असल्यास किंवा सर्व बाजूंनीं सारख्या ज्वाला निघत नसल्यास ही ज्वलनक्रिया पूर्णपणें होत नाहीं असें समजावें.



स्टोव्हची रचना

एखाद्या बाजूनें जोरानें हवा लागली तरीहि ज्वलनक्रिया संथपणें होत नाहीं. निळसर ज्योत असली म्हणजे ज्वलनक्रिया व्यवस्थित चालली आहे असें समजावें.

स्टोव्हचा बर्नर तापविण्यासाठीं स्पिरिटचा उपयोग करावा. स्टोव्हच्या नळीच्या बुडाशीं असलेल्या वाटींत वाटीभर स्पिरिट ओतून तें पेटवावें व स्पिरिट संपत येतांच किल्ली बंद करून पंपानें हवा भरावी. या वाटीच्या ऐवजीं आस्बेस्टॉसचा आंकडा स्पिरिटमध्यें भिजवून स्टोव्हचा बर्नर तापविण्याची प्रथाच विशेष रूढ आहे. रॉकेलनें बर्नर तापविल्यास रॉकेलचें किटण तेल बाहेर येणाऱ्या छिद्रांत अडकून बसण्याचा संभव असतो. शिवाय बर्नरला तबकडीऐवजीं जाळी (स्टोव्हचा भर्रर्र आवाज होऊं नये म्हणून) वापरली असेल तर तीहि खराब होते. शिवाय त्यामुळें स्टोव्ह लौकर धुरकटतो. स्टोव्हमध्यें रॉकेल गाळून घालावें. नाहीं तर त्यांतील घाण नळींतून वर निपलच्या तोंडाशीं येईल व वारंवार त्रास होईल. टाकी कधींहि पूर्ण भरूं नये व फाजील हवाहि टाकींत भरूं नये.

स्त्रीधन:—'स्त्रीधन' या शब्दाचा वाच्यार्थ स्त्रीची मिळकत असा आहे; परंतु हिंदु व्यवहारधर्मशास्त्रांत हा शब्द कांहींसा संकुचित अर्थानें वापरला आहे.

स्त्रीच्या सर्व प्रकारच्या मिळकतीचा समावेश त्यांत करण्यांत आलेला नाहीं. स्त्रीला मिळकत अनेक प्रकारें मिळूं शकेल. ती शिक्षकिणीचा अगर नर्सेचा धंदा करून विद्येच्या व स्वकष्टाच्या बळावर धन मिळवील, तिला नातेवाईकांकडून अगर इष्टमित्रांकडून देणगी अगर आहेर या स्वरूपानें धनाची प्राप्ति होईल; एकादी मिळकत तिला वारसाहक्कानें अथवा एकत्र कुटुंबाच्या मिळकतींत हिस्सा म्हणून मिळेल, अशा अनेक प्रकारें स्त्रीला धन मिळूं शकेल; परंतु तें सर्वच स्त्रीधनांत मोडत नाहीं. कांहीं मोडतें, कांहीं नाहीं. स्त्रीची कोणत्या प्रकारची मिळकत स्त्रीधन या संज्ञेस पात्र ठरते व कोणत्या प्रकारची ठरत नाहीं आणि स्त्रीच्या मिळकतीचा स्त्रीधन या संज्ञेस पात्र असलेली मिळकत व तशी नसलेली मिळकत असा भेद करण्याचें प्रयोजन काय या प्रश्नांचा पुढें विचार केला आहे.

स्त्रीची अमूक एक मिळकत स्त्रीधनांत मोडते कीं नाहीं हें ठरवितांना तीन प्रकारची कसोटी लावून पहावें लागतें. एकादी मिळकत स्त्रीला कशी मिळाली, त्या मिळकतीचा उपभोग घेण्याचा तिला कोणत्या प्रकारचा हक्क आहे तिच्या पश्चात् त्या मिळकतीचें संक्रमण कोणत्या प्रकारें होतें या तीन प्रश्नांचा विचार करूनच ती मिळकत स्त्रीधन या संज्ञेस पात्र ठरते कीं नाहीं हें पहावयाचें असतें. स्त्रीधनांत न मोडणारी स्त्रीची मिळकत सामान्यतः वारसाहक्कानें अथवा एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचा संविभाग झाल्यामुळें हिस्सा म्हणून मिळालेली असते. त्या प्रकारच्या मिळकतीची स्त्री ही संपूर्णतया स्वामिनी नसते;त्या मिळकतीची विल्हेवाट करण्याचा तिला सामान्यतः अधिकार नसतो. विशिष्ट परिस्थितींतच आपल्या गरजेकरितां ती मिळकत तिला तबदील करून देतां येते; एरवीं नाहीं. स्त्रीधन मिळकतीची स्त्री ही संपूर्णतया स्वामिनी असते; स्वेच्छेप्रमाणें तिला आपल्या स्त्रीधनाचा विनियोग करतां येतो. फक्त सधवा स्त्रीच्या विशिष्ट प्रकारच्या स्त्रीधनाचा विनियोग करण्याच्या हक्काला थोडीशी मर्यादा घातली आहे. स्त्रीधनांत न मोडणाऱ्या मिळकतीचें संक्रमण स्त्रीधनाहून वेगळया प्रकारें होतें. अशा प्रकारची मिळकत स्त्रीच्या पश्चात् उत्तराधिकाऱ्याकडे (तिच्या पूर्वीच्या पुरुषवारसाच्या वारसाकडे) जातें. स्त्रीधन स्त्रीच्या स्वतःच्या वारसाकडे जातें. एखाद्या स्त्रीनें पुनर्विवाह केला तर तिला वारसाहक्कानें मिळालेल्या इस्टेटीस (स्त्रीधन नसलेल्या) मुकावें लागतें. स्त्रीधनाला ती केव्हांही मुकत नाहीं.

हिंदुव्यवहारधर्मशास्त्राच्या निरनिराळया पंथांच्या स्त्रीधनविषयक कल्पनेंत एकवाक्यता नाहीं. या भिन्न भिन्न कल्पनांचें नीट आकलन होण्याकरितां वेगवेगळ्या स्मृतिकारांनीं केलेल्या स्त्रीधनाच्या वर्णनाशीं परिचय होणें अगत्याचें आहे. कोणत्याहि स्मृतिकारानें स्त्रीधन या शब्दाची व्याख्या दिलेली नाहीं. त्यांनीं त्यांच्या मतें स्त्रीधन या संज्ञेस पात्र असणाऱ्या मिळकतींची यादी दिली आहे. मनूनें पुढील सहा प्रकारची मिळकत स्त्रीधन असल्याचें सांगितलें आहेः–(१) अध्यग्नि म्हणजे विवाहहोमाचे वेळीं वधूला मिळणारा आहेर (२) अध्यवाहनिक म्हणजे विवाहोत्तर वधू पतिगृहीं प्रवेश करण्याकरितां पित्याचे घरांतून निघते वेळीं तिला मिळालेला आहेर म्हणजेच वरातीच्या वेळीं मिळणारा आहेर. (३) सासूसासऱ्यांनीं प्रेमानें दिलेल्या देणग्या. यांना प्रीतिदत्त म्हणतात. याशिवाय लग्नानंतर वडील मंडळींना नमस्कार करतांना त्यांनीं वधूला दिलेली देणगी. (४) पित्यानें दिलेली देणगी (५) मातेनें दिलेली देणगी (६) भावानें दिलेली देणगी. या यादींत विष्णु या स्मृतिकारानें चार प्रकारच्या मिळकतींची भर घातली आहे. ती पुढीलप्रमाणें (१) पतीनें दुसरी पत्नी केली असतां पहिल्या पत्नीला दिलेली देणगी [२] पतीच्या नातलगाकडून व माहेराकडून विवाहोत्तर मिळालेल्या देणग्या (३) शुल्क म्हणजे आसुर विवाहांत पतीकडून मिळालेली मोबदल्याची रक्कम अगर देणगी (४) पुत्र व इतर आप्त यांच्याकडून मिळालेल्या देणग्या. सर्वच स्मृतिकारांच्या मतें पतीनें दिलेली देणगी स्त्रीधनांत मोडते.

याज्ञवल्क्यानें स्त्रीधनाचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे.—“ एकाद्या स्त्रीला तिच्या मातापितरांनीं, पतीनें व भावानें दिलेल्या देणग्या, विवाहहोमासमोर तिला मिळालेल्या देणग्या, पतीनें दुसरी पत्नी केली असतां त्याच्याकडून मिळालेली देणगी इत्यादि मिळकती स्त्रीधनांत मोडतात. ”

याप्रमाणें स्मृतिकारांनीं स्त्रीधनांत ज्या मिळकतींचा समावेश केला आहे त्यांना ‘स्त्रीधन’ अशी पारिभाषिक संज्ञा आहे. याप्रमाणें पारिभाषिक स्त्रीधनांत पुढील मिळकतींचा अंतर्भाव होतोः (१) नातेवाईकांनीं कोणत्याहि वेळीं दिलेल्या देणग्या (१) दागिने व

कपडे (३) परक्यांनीं विवाहहोमापुढें व वरातीच्या वेळीं दिलेल्या देणग्या. इतर वेळीं परक्यांनीं दिलेल्या देणग्यांचा पारिभाषिक स्त्रीधनांत समावेश होत नाहीं. स्त्रीनें विद्येच्या बलावर व स्वकष्टानें मिळविलेली मिळकत स्त्रीधनांत मोडत नाहीं असें कात्यायनानें स्पष्टपणें म्हटलें आहे. येथवर स्मृतिकारांच्या स्त्रीधन-विषयक मतांचा विचार झाला. यापुढें टीकाकारांनीं स्त्रीधनाची व्याख्या कशी केली आहे व व्यवहारधर्म-शास्त्राच्या निरनिराळ्या पंथांत कोणत्या प्रकारच्या मिळकतीचा स्त्रीधनांत समावेश केलेला आहे याचा विचार करावयाचा आहे.

स्त्रीधनावरील स्त्रीचा हक्क—या हक्काचें स्वरूप स्त्री ही कुमारी, सधवा अथवा विधवा या तिन्हींपैकीं कोणत्या अवस्थेंत आहे हें पाहून ठरवावयाचें असतें. या तीन अवस्थेमधील स्त्रीच्या स्त्रीधनावरील हक्कांत फरक आहेः—(१) कौमार्यावस्थेंत स्त्रीला आपलें कोणत्याहि प्रकारचें स्त्रीधन तबदील करून देण्याचा अधिकार आहे; ती कायद्याप्रमाणें सज्ञान असली म्हणजे झालें. मुंबई इलाख्यांत कन्यावारसानें मिळालेली इस्टेट कन्येच्या पूर्ण मालकीची असते. (२) सधवा स्त्रीचें सौदयिक स्त्रीधनावर पूर्ण स्वामित्व असतें. सौदयिक स्त्रीधन म्हणजे आप्तांनीं प्रेमपूर्वक दिलेल्या देणग्या. सौदयिक स्त्रीधनाची स्त्री ही स्वामिनी असल्यामुळें त्या मिळकतीचा पतीच्या संमतीविना कोणत्याही प्रकारें विनिमय करण्याचा स्त्रीला अधिकार आहे. मृत्यु-पत्रानें आप्तांकडून मिळालेल्या देणगीचाही सौदयिक स्त्रीधनांत समावेश होतो. सौदयिक स्त्रीधनावर पतीचा कोणत्याही प्रकारचा हक्क नसतो. फक्त संकट-काळीं तो सौदयिक स्त्रीधनाचाही उपयोग करूं शकतो. सौदयिकाव्यतिरिक्त इतर प्रकारच्या मिळकतीची स्त्री स्वामिनी असली तरी तिला पतीच्या संमतीविना त्या स्त्रीधनाचा विनियोग करतां येत नाहीं. त्यावर पतीची सत्ता असते, तो स्वेच्छेनुसार त्या मिळकतीचा उपभोग घेऊं शकतो; परंतु पतीच्या हयातींतच पत्नी निधन पावली तर तें तिचें कोणत्याहि प्रकारचें स्त्रीधन तिच्या वारसांकडे जातें. (३) वैधव्यावस्थेंतील स्त्रीच्या स्त्रीधनाच्या विनियोग करण्याच्या हक्कावर कोणत्याही प्रकारचें नियंत्रण नसतें.

स्नायूः—प्राण्यांच्या हालचाली स्नायूंच्या कमजास्त आकुंचनामुळेंच होतात. स्नायूंचे मुख्यतः दोन वर्ग आहेत. ऐच्छिक व अनैच्छिक. पहिल्या प्रकारचे स्नायु इच्छाशक्तीवर अवलंबून असतात; दुसऱ्यांवर इच्छा-शक्तीचें नियंत्रण असतें.

ऐच्छिक स्नायू हाडांना जोडलेले असतात; स्नायू हे अनेक बारिक बारिक धाग्यांचे बनलेले असतात; प्रत्येक धागा अदमासें एक इंच लांब व $\frac{1}{५००}$ इंच व्यासाचा असतो. सूक्ष्मदर्शक यंत्रांतून या धाग्यांकडे पाहिलें असतां त्यावर कृष्ण व श्वेत अशा आलटून पालटून छटा आलेल्या आढळून येतात. प्रत्येक धाग्या-भोंवतीं एक वेष्टण असतें; त्याला Sarcolemma असें म्हणतात. या वेष्टनांत एक नाजूक टिश्यू असतो. या टिश्यूमध्यें संकोचन पावण्याची शक्ति असते. जेव्हां ज्ञानतंतूकडून स्नायूला चैतन्य मिळून तो संकोचन पावतो तेव्हां हे धागे आंखूड होऊन अधिक घट्ट बनतात. कित्येक प्राण्यांमधील स्नायू (उदा. मासे) तांबड्या रंगाचे असतात.

अनैच्छिक स्नायूवर इच्छाशक्तीचें नियंत्रण नसतें. ते निराळ्याच ज्ञानतंतूंच्या प्रेरणेवर काम करीत असतात. हे स्नायू हृदयाच्या टिश्यूवर असतात; कांहीं जठर, आंतडें, मूत्राशय, रक्त वाहिन्या व आणखी कांहीं इंद्रियें यांवर असतात.

स्पेनः—युरोपच्या नैर्ऋत्येस हा देश असून आफ्रिका आणि युरोप यांना जोडणारा देश म्हणून ओळखतात. आफ्रिका व स्पेन हे एकेकाळीं एकमेकांस जोडलेले होते; पण आज दोन्हींमध्यें जिब्राल्टरची सामुद्रधुनी तेवढी आहे. पश्चिमेस बिस्केचा उपसागर व अटलां-टिक महासागर व उत्तरेस पिरनीज पर्वतांच्या रांगा व पलीकडे फ्रान्स. पूर्वेस भूमध्य समुद्र. याच्या पश्चिमेस पोर्तुगाल हा लहानसा देश आहे.

क्षेत्रफळ, हवा व लोक—स्पेनचें क्षेत्रफळ १९०,५०० चौरस मैल असून कॅनरी व बॅलेरिक बेटें व आफ्रिकेंतील मोरोक्को व गियाना इत्यादि वसाहती मिळून ८००,००० चौरस मैल स्पेनच्या साम्राज्यां-तील वसाहती आहेत. खुद्द स्पेनची लोकसंख्या २२,८००,००० एवढी असून माद्रिद हें राजधानीचें शहर आहे. उत्तरेस पिरनीज पर्वतांच्या रांगा व दक्षिणेस सीरा निवेदा व इतर डोंगराच्या रांगा आहेत. मध्यभाग हें एक पठार आहे व या पठारावरच माद्रिद शहर आहे. गॉडिआना, टेगस, डूरो, मिनो, एब्रो व गॉडॉल क्विव्हीर या सहा प्रमुख नद्या व इतर लहानसहान नद्या या देशां-

तून वाहतात. माद्रिदच्या खालोखाल बार्सिलोना, सेव्हिल, व्हॅलेन्शिया, मॅलेगा, बिलबाओ हीं प्रमुख शहरें होत. पैकीं बार्सिलोना व बिलबाओ हीं दोन मोठीं बंदरें आहेत. स्पेनचें हवामान हिंवाळ्यांत मध्यभागांत नद्या गोठण्याइतकें थंड तर उन्हाळ्यांत १०७° इतकें उष्ण असतें. उन्हाळ्यांत नद्या आटतात व त्यांच्या कांठचीं गांवें ओस पडतात. पश्चिमेकडचा भाग दमट आहे.

स्पेनचे लोक इतर युरोपिअन लोकांच्या मानानें गिड्डे व काळसर आहेत; परंतु स्वभावानें रंगेल व महत्त्वाकांक्षी आहेत. स्वाभिमान व स्वातंत्र्यप्रियता यांबद्दल हे लोक प्रख्यात असून प्रेम व द्वेष या दोन्ही बाबतींत अतिरेकी आहेत.

उद्योग, धंदे, व्यापार, खनिज संपत्ति–स्पेन हा मुख्यत: कृषिप्रधान देश आहे. गहू, बार्ली, ओट व राय हीं धान्यें खूप होतात. याशिवाय नारिंगें, लिंबू, ऑलिव्ह, बदाम इत्यादि फळांच्या पुष्कळ बागा असून द्राक्षांचे मळे हे स्पेनचें वैशिष्ट्य आहे. शिवाय मासेमारीचा धंदाहि मोठ्या प्रमाणांत चालतो. लोखंड, तांबें, कोळसा व शिसें, मँगेनीज, सल्फर, फॉस्फरस यांच्या खाणी असून त्यावर चालणारे थोडे-बहुत कारखाने आहेत. याशिवाय लेस, कापड, कागद, व कातडीं कमावणें यांचे कारखाने आहेत. तंबाखूचे जिनसांचा व्यापारहि मोठ्या प्रमाणांत चालतो.

शिक्षण, धर्म, भाषा व वाङ्मय–शिक्षण सक्तीचें आहे. तरीहि शेकडा ४५ अशिक्षितांचें प्रमाण आहे. माद्रिद येथें मुख्य विद्यापीठ असून त्याशिवाय आणखी विद्यापीठें व उद्योगधंद्यांच्या शाळा आहेत.

बहुतेक सर्व लोक रोमन कॅथोलिक धर्माचे आहेत. १९३१ पूर्वी राजशाहीमध्यें धर्मसंस्थेचा सर्वच खर्च सरकारतर्फे चालत असे. स्पॅनिश ही प्रचलित भाषा असून लॅटिनपासून निघालेल्या रोमन भाषांपैकीं एक आहे. गॅलिशियन, कॅटलन व कॅस्टिलियन या तीन हिच्या पोटबोली आहेत. यांपैकीं कॅस्टिलियन ही भाषा सरकारदरबारची मानली जाते.

'सिड' हें पहिलें स्पॅनिश महाकाव्य होय. १४ व्या शतकापासून कथात्मक वाङ्मयनिर्मिती सुरू झाली. ॲमेडिस ऑफ गॉल ही यापैकीं उत्कृष्ट कथा होय. १६ वें शतक हें स्पॅनिश वाङ्मयाचें सुवर्णयुग समजतात. हें सुवर्णयुग १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंत मानतात. या कालांत काल्डेरॉन डी ला बार्सा, लोप डी व्हेगा हे कवी व सर्व्हांटीस हा कादंबरीकार या तीन व्यक्ति प्रख्यात आहेत. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत फ्रेंच वाङ्मयाची बरीच–विशेषतः नाट्य वाङ्मयाची–नक्कल झाली. अद्‌भुतरम्य वाङ्मयाची १९ व्या शतकांत जी लाट सर्व युरोपभर पसरली तींत स्पेनहि सामील झालें. यानंतर व्हिन्सेंट ब्लास्को इबेनीज हा कादंबरीकार तेवढा जगप्रसिद्ध झाला.

इतिहास–इतिहासपूर्व मानवी जीवनाचे अनेक अवशेष स्पेनमध्यें सांपडत असले तरी फोनिशियन्स लोकांनीं स्पेनच्या पूर्वकिनाऱ्यावर वसाहति केल्यावरचा इतिहास मिळतो. यानंतर ग्रीक, कार्थेजियन व शेवटीं रोमन लोक आले. इ. स. ५३० ते ७३० पर्यंत व्हिसी गॉथ लोकांचें राज्य स्पेनमध्यें होतें. त्यानंतर मूर लोकांनीं आपलें राज्य स्थापलें व कार्डोव्हा (दक्षिण स्पेन) येथें आपली राजधानी केली. इ. स. १००० च्या सुमारास उत्तर स्पेनमध्यें लहान लहान राज्यें निर्माण झालीं. त्यांत कॅस्टिल, ॲरागॉन, लीऑन हीं प्रमुख होतीं. शेवटीं १४७९ मध्यें ॲरा-गॉनचा फर्डीनंड यानें कॅस्टिलच्या इझाबेलाशीं लग्न केलें व हीं सर्व राज्यें एक झालीं. यानंतर लौकरच कोलंबसाला अमेरिकेचा शोध लागला व दक्षिणेंतील मूर लोकांचें राज्य नाश पावलें.

१६ व्या शतकांत द. अमेरिकेंतील संपत्ति मिळाल्या-मुळें स्पेन हें युरोपांतील संपन्न राष्ट्र बनलें. यावेळीं सम्राट ५ वा चार्लस हा गादीवर होता. १५६५ मध्यें त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा २ रा फिलीप गादीवर आला. त्यानें पार्तुगाल देश स्पेनला जोडला व त्यामुळें पोर्तुगालच्या द. अमेरिकेंतील वसाहतीहि स्पेनला मिळाल्या. इ. स. १७०० मध्यें स्पेनच्या हॅप्सबर्ग राजघराण्यांतील शेवटचा राजा मेला. त्याच्या मृत्यूनंतर गादीच्या वारसासंबंधीं तंटे होऊन शेवटीं १७१४ मध्यें बोर्बोन घराण्यांतील ५ वा फिलीप राज्यावर आला. नेपोलियनच्या उदयापर्यंत स्पेन युरोपच्या राजकारणांत महत्त्वाचा भाग घेत होतें. नेपोलियननें स्पेन जिंकून आपला भाऊ जोसेफ याला गादीवर बसविलें. स्पॅनिश लोकांनीं जोसेफ बोनापार्ट-विरुद्ध बंड पुकारलें व १८१४ मध्यें फर्डीनंड गादीवर आला.

१९ व्या शतकांत स्पेन व अमेरिका यांमध्यें युद्ध सुरू झालें व दक्षिण अमेरिकेंतील वसाहती स्वतंत्र

झाल्या. शिवाय क्यूबा व फिलीपाइन हीं बेटेंही हातचीं गेलीं. १८३३ व १८६८ मध्यें 'राजा कीं राणी' याबद्दल यादवी होऊन १८६८ मध्यें ७ व्या फर्डिनंडची मुलगी इझाबेला ही गादीवर आली. १८७०-१८७३पर्यंत इटलीचा व्हिक्टर इमॅन्युअल माद्रीदमध्यें राज्य करीत होता. १८७३ त त्याच्या राज्यत्यागानंतर लोकशाही स्थापण्याचा प्रयत्न झाला; पण तो फसला व इझाबेलाचा मुलगा १३ वा अल्फांझो हा १८८६ मध्यें गादीवर आला. अल्फांझोनें १९३१ पर्यंत राज्य केलें. त्याच्या कारकीर्दींत विशेषतः महायुद्धानंतर भयंकर असंतोष माजला. १९२५ मध्यें प्रिमो डी रिव्हेरा याच्या नेतृत्वाखालीं डिक्टेटरशिप स्थापन झाली व ती १९३० पर्यंत टिकली. शेवटीं राज्यकारभाराविरुद्ध तीव्र असंतोष वाढल्यामुळें १४ एप्रिल १९३१ रोजीं अल्फांझो इटलीला पळून गेला व स्पेनमध्यें लोकशाही जाहीर झाली. यानंतर प्रेसिडेंट झामोरा व अझाना आपल्या डाव्या गटांतील अनुयायांसह सत्तेसाठीं झगडले व शेवटीं १९३६ च्या फेब्रुवारीच्या निवडणुकींत निर्विवाद यश मिळून झामोराच्या ऐवजीं अझानाच्या अध्यक्षतेखालीं ११ मे १९३६ रोजीं सोशॅलिस्ट व कम्युनिस्ट यांचें मंत्रिमंडळ बनलें.

या मंत्रिमंडळानें जमिनीसंबंधीं व सामाजिक सुधारणा जाहीर करतांच कॉंझरव्हेटिव्ह पक्षांतील लोक व मोठे जमिनदार यांनीं ज. फ्रँकोला नेतृत्व देऊन आझानाच्या मंत्रिमंडळाविरुद्ध १८ जुलै १९३६ रोजीं बंड केलें. फ्रँकोला सर्व लष्कर व कांहीं आरमार मिळालें व इटली व जर्मनी यांनींहि मदत केली. या बंडाचा परिणाम अंतस्थ यादवींत होऊन दहा लक्ष लोक मारले गेलें, व ३० अब्ज रुपये खर्च होऊन शेवटीं मार्च १९३९ मध्यें फ्रँकोची सरशी होऊन माद्रीदचें सरकार ४ एप्रिल १९३९ रोजीं फ्रँकोला शरण गेलें. हिटलर व मुसोलिनी या दोघांनींही फ्रँकोला मदत केली ती आझानाचें कम्युनिस्ट मंत्रिमंडळ व पर्यायानें सोशॅलिझम व कम्युनिझमची स्पेनमधून हकालपट्टी करण्याच्या हेतूनें व पुढें लढाईचा प्रसंग आल्यास स्पेनचें सहाय्य आपणांस मिळावें म्हणून. परंतु ऑगस्ट १९३९ मध्यें जर्मनी–रशियाचा तह झालेला पाहून फ्रँकोला मोठा धक्का बसला व त्यानें या युद्धांत तटस्थ राहण्याचें ठरविलें. शिवाय अद्याप निम्मी जनता फ्रँकोच्या सत्तेविरुद्ध होती. मोरोक्कोचें टँजीर हें आंतरराष्ट्रीय सत्तेखालचें महत्त्वाचें बंदर सध्यांच्या महायुद्धाच्या नाजूक परिस्थितीचा फायदा घेऊन नोव्हेंबर १९४० मध्यें आपल्या सत्तेखालीं फ्रँकोनें घेतलें. शिवाय जिब्राल्टर घेण्याची व स्पेनचें गेलेलें साम्राज्य परत मिळविण्याची इच्छा ज. फ्रँकोनें अनेक वेळां व्यक्त केली आहे.

स्पेन्सर, एडमंड (१५५२–१५९९):–एक नामांकित इंग्लिश कवि. याचा जन्म लंडन येथें एका गरीब घराण्यांत झाला. याचें शिक्षण Merchant Taylors' school व Pembroke Hall, Camridge येथें झालें. १५७६ सालीं एम्. ए. झाल्यावर त्यानें लँकेशायर येथें कांहीं महिने वास्तव्य करून प्रादेशिक वाक्प्रचार व शब्दभांडार वाढविलें. हें ज्ञान त्यास पुढें कवितेसाठीं फार उपयोगीं पडलें. गॅब्रेल हार्वे या रसिक मित्राच्या सांगण्यावरून स्पेन्सर लंडन येथें रहाण्यास गेला. तेथें गॅब्रेलनें स्पेन्सरची अर्ल ऑफ लिसिस्टर व फिलिप सिड्नें यांच्याशीं ओळख करून दिली. इ. स. १५७६ सालीं स्पेन्सरनें The Shepheardes Calendar हें पहिलें काव्य प्रसिद्ध केलें. या प्रसिद्धीकरणामुळें स्पेन्सरला तत्कालीन साहित्यक्षेत्रांत एकदम सन्मानाचें स्थान मिळालें. लोकाश्रयाबरोबर राजाश्रयहि मिळाला. १५८०त त्याला लॉर्ड ग्रे डि विल्टन या डेप्युटीचा सेक्रेटरी म्हणून आयर्लंडमध्यें पाठविण्यांत आलें. तेथें त्याला कॉर्क येथें मोठी जमीन बक्षिस मिळाली. तेथें रहात असतां त्यानें A view of the State of Ireland हा गद्य ग्रंथ व काव्य Faerie Queene लिहिलें. आयर्लंडमध्यें असतां त्याची सर वॉल्टर रॅलेशीं दाट ओळख झाली. रॅलेच्या सांगण्यावरूनच तो इंग्लंडमध्यें परत आला. Faerie Queene या काव्यावर खूष होऊन इलिझाबेथ राणीनें स्पेन्सरला २५० पौंडांचें पेन्शन दिलें. १५९४ सालीं स्पेन्सरचें लग्न झालें. त्यानें आपल्या प्रेयसीवर Amoretti हें काव्य लिहिलें आहे. स्पेन्सरनें अखेरपर्यंत आयर्लंड हेंच आपलें वसतिस्थान केलें होतें. १५९७ सालीं आयर्लंडमध्यें बंडें उद्भवलीं. तेव्हांपासून स्पेन्सरवर नानाप्रकारचीं संकटें आलीं व शेवटीं १६ जानेवारी १५९९ रोजीं तो खिस्तवासी झाला.

स्पेन्सरची काव्यसंपत्ति मोठी आहे. स्पेन्सरचें काव्य म्हणजे मध्ययुगीन व अर्वाचीन इंग्लिश काव्याला जोडणारा दुवा होय. इंग्लिश काव्यांत विपुल शब्दभांडार आणण्याचें श्रेय स्पेन्सरला आहे. त्याच्या छंदोरचनेंत नितांतरम्य संगीत आहे.

स्पंजः–पाणी शोषून घेणारा प्राणिज पदार्थ. हा पदार्थ समुद्रांत वास्तव्य करणाऱ्या प्राण्याचे सांगाड्याचा बनविलेला असतो. स्पंज प्राणी भूमध्य समुद्रांत पुष्कळच आहेत. या प्राण्याच्या जवळ जवळ ५० पर्यंत जाती असल्याचें दिसून येतें. तथापि या सर्व जातींत आफ्रिकेच्या किनाऱ्याजवळ सांपडणारी याची जात उत्तमपैकीं होय. समुद्राच्या पाण्यांतून बाहेर काढल्यावर हा प्राणी फारच सुंदर दिसतो. या प्राण्याला उग्र वास असतो. कित्येक लोक यांना वर काढून त्यांवर आपला उदरनिर्वाह चालवितात. यांना पाण्याबाहेर काढणें म्हणजे मोठें दिव्य करण्यापैकींच होय. वर्षांतून ४।५ महिनेच ह्या प्राण्यांना बाहेर काढण्याचा मोसम असतो. हा प्राणी बाहेर काढल्यावर त्यांची त्वचा सोलून काढतात. शिवाय आंतील मांस दाबून काढतात. नंतर तें स्वच्छ करून विक्रीस बाजारांत पाठवितात. स्पंज हा पदार्थ स्वच्छ, मऊ व सौम्य रंगाचा असतो. त्याचा उपयोग पाणी शोषून घेण्याकडे करतात.

स्फोटक द्रव्यें:–स्फोटक द्रव्यांत नायट्रो ग्लिसरीन, पोटॅशिअम, नायट्रोजन, पेट्रोल, ॲसिटोन, नायट्रो सेल्युलोज, सल्फ्युरिक ॲसिड, लीडाइट, पेरिक ॲसिड, अमोनियम नायट्रेट, नायट्रिक ऑक्साईड, हीं रसायनें स्फोटक द्रव्यें म्हणून प्रसिद्ध आहेत. कोळशाची पूड, गंधक व सॉल्ट पीटर यांच्या मिश्रणांनीं बंदुकीची दारू तयार करतात; याचप्रमाणें निरनिराळे घन व दव पदार्थ मिळून जरूरीप्रमाणें मिश्रणें करून युद्धोपयोगी व इतर कामासाठीं स्फोटक पदार्थ तयार करतात.

स्मिथ्, ॲडम् (Smith, Adam १७२३–९०):–एक ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ. इ.स.१७४०पर्यंत तो ग्लासगोच्या युनिव्हर्सिटींत प्रोफेसर होता. त्या वर्षी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटींत बॅलिऑलच्या कॉलेजांत प्रोफेसर झाला. इ.स. १७४८ सालीं एडिंबरो युनिव्हर्सिटींत, १७५१–६३ मध्यें पुन्हां ग्लासगो युनिव्हर्सिटींत त्यानें प्रोफेसर म्हणून काम केलें. तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांवर त्यानें दिलेलीं व्याख्यानें महत्त्वपूर्ण आहेत. इ. स. १७६४ ते १७७६ या काळांत स्मिथनें बराच परदेशप्रवास केला व ग्रंथलेखन केलें. इ. स. १७७६ सालीं त्यानें लिहून प्रसिद्ध केलेला ग्रंथ The Wealth of Nations संस्मरणीय झाला आहे. आर्थिक राजकारणावर तो एक प्रमाणभूत ग्रंथ समजण्यांत येतो. १७५९ सालीं स्मिथनें तत्त्वज्ञानावरहि The Theory of Moral Sentiments नांवाचा एक महत्त्वाचा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. स्मिथचा डेव्हिड ह्यूम व आणखी कांहीं समकालीन साहित्यिकांशीं दाट परिचय होता.

स्मृतिः–स्मृति हा शब्द दोन भिन्न अर्थांनीं वापरण्यांत आला आहे. व्यापक अर्थानें वैदिक वाङ्मयाव्यतिरिक्त सर्व प्राचीन वाङ्मय अशा अर्थानें या शब्दाचा प्रयोग केलेला आढळतो. या अर्थानें स्मृतिवाङ्मयांत गृह्यसूत्रें, धर्मसूत्रें, महाभारत, मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति इत्यादि ग्रंथांचा अंतर्भाव होतो. संकुचित अर्थानें स्मृति म्हणजे धर्मशास्त्र (आचार व व्यवहारधर्म यांचा विचार करणारे ग्रंथ). "श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः" असें मनूचें वचन आहे. प्राचीन काळीं स्मृतिग्रंथांची संख्या फार लहान होती. निर्णयसिंधु, मयूख, नीलकंठ, वीरमित्रोदय यांसारख्या अलिकडील ग्रंथांत उल्लेखिलेल्या स्मृतिग्रन्थांचा विचार करतां त्यांची संख्या शंभरपर्यंत भरेल. या सर्व स्मृति भिन्न भिन्न काळीं झालेल्या आहेत. त्यांतील कांहीं सर्वस्वीं गद्यांत असून कांहीं गद्यपद्यमिश्रित आहेत; व पुष्कळशा निव्वळ पद्यमय आहेत. अगदीं थोड्या अत्यंत प्राचीन असून खिस्ती शकाच्या पूर्वी अनेक शतकांपूर्वी झाल्या आहेत. गौतमाचें धर्मशास्त्र, आपस्तंभ, बौधायन, मनुस्मृति या त्या प्राचीन स्मृति होत. याज्ञवल्क्य, पाराशर व नारद या व इतर कांहीं स्मृति इसवी सनाच्या पहिल्या शतकांत झालेल्या आहेत. वर उल्लेखिलेल्या स्मृतिशिवाय इतर पुष्कळ स्मृति इ. स. ४०० ते इ. स. १००० पर्यंतच्या कालांत झालेल्या आहेत.

या सर्व स्मृतींचा कालानुक्रम ठरविणें सोपें काम नाहीं. कांहीं स्मृतींत जुन्या सूत्रांचीं नवीन रीतीनें रचना केली असल्याचें आढळून येतें; तर दोन अगर तीन भिन्न स्मृति एकाच नांवानें प्रचलित असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. उदा. हारित, अत्रि, शतपत.

स्मृतिग्रंथ अनेक असले तरी सांप्रत १८ स्मृतीच सर्वमान्य झालेल्या आहेत. त्यांतल्या त्यांत मनु, याज्ञवल्क्य, व्यास, वसिष्ठ व पराशर या स्मृति विशेषकरून प्रसिद्ध आहेत. मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति, अत्रिस्मृति विष्णूस्मृति, हारितस्मृति, औशनसस्मृति, आंगिरःस्मृति, यमःस्मृति, आपस्तंभस्मृति, संवर्तस्मृति, कात्यायनस्मृति,बृहस्पतिस्मृति, पराशरस्मृति,व्यासस्मृति,


शंखस्मृति, दक्षस्मृति, शातातपस्मृति, वसिष्ठस्मृति, या प्रमुख १८ स्मृति होत.

स्मृतिग्रन्थांत आचार व व्यवहारधर्म यांचा विचार केला आहे. स्मृतींचें प्रामाण्य वेदाहून कमी आहे. श्रुतिवचनांशीं विसंगत असलेलें स्मृतिवचन त्याज्य मानण्यांत येतें. भिन्नभिन्न काळीं झालेल्या स्मृतिग्रंथांतील वचनांचा विचार केला तर देशकालपरिस्थित्यनुरूप व्यवहारधर्मांत बदल झाल्याचें आढळून येतें. समाज गतिमान असतो. गतिमान समाजाच्या बदलत्या परिस्थितींत आचारांत फरक पडतो, त्यामुळें एकाकाळचा व्यवहारधर्म भिन्न अशा काळीं सर्वस्वीं उपयोगी पडत नाहीं. म्हणून देशकालपरिस्थित्यनुरूप व्यवहारधर्मांत परिवर्तन होणें अगत्याचें आहे. सध्यांच्या परिस्थितीला अनुरूप असा व्यवहारधर्म सांगणाऱ्या स्मृतीची आवश्यकता समाजधुरीणांना पटल्यामुळें त्यांनीं नवी स्मृति निर्माण करण्याचे प्रयत्न चालविले आहेत.


स्वस्तिकासनः–कुल्ल्यावर पहिल्यानें बसावें. डाव्या पायाचें पाऊल उजव्या मांडीला लावावें व उजव्या पायाचें पाऊल डाव्या पायाचें मनगटावरून उजव्या पायाच्या मांडीला लावावें. उजव्या पायाचा आंगठा व इतर बोटें डाव्या पायाची मांडी व पिंढरी यांत दडवावीं व डाव्या पायाचा आंगठा व इतर बोटें उजव्या पायाची मांडी व पिंढरी यांतून वर उचलावीं. गुडघे रुंदवून मांड्या पूर्णपणें जमिनीवर टेकाव्या. दोन्ही गुडघ्यावर हातांचे तळवे टेकावे व ताठ सरळ बसून दृष्टि नासाग्रीं अगर भ्रूमध्यावर ठेवावी.

स्विट्झर्लंडः–युरोपमधील एक लोकशाही स्वतंत्र राष्ट्र. उत्तरेस जर्मनी, पूर्वेस ऑस्ट्रिया व दक्षिण आणि पश्चिम या दिशांना इटली व फ्रान्स यांच्यांमध्यें हें चिमुखलें राष्ट्र आहे.

स्विट्झर्लंडचें क्षेत्रफळ १५,९४४ चौ. मैल असून लोकसंख्या ४,१५०,००० आहे. यापैकीं तीस लक्ष जर्मन, ८॥ लक्ष फ्रेंच व २॥ लक्ष इटालियन लोक आहेत स्विट्झर्लंड २२ कँटन्स (परगणे) मध्यें विभागला असून प्रत्येक कँटन्सचें सरकार स्वतंत्र आहे व या सर्वांवर फेडरल कौन्सिल आहे. बर्न हे राज-



ग्योश्चेनेन, स्विट्झर्लंड मधील एक रम्य शहर



१ खाणींतील हिरा
२ तयार हिरा
३ खाणींतील माणिक
४ तयार माणिक
५ खाणींतील नील
६ तयार नील
७ खाणींतील पाच
८ तयार पाच
९ तयार लसण्या
१० तयार याकूत
११ तयार ओपल
१२ तयार चुनडी

धानीचें शहर असून झुरिच, जिनीव्हा, लॉसेन व बाल हीं इतर प्रमुख शहरें होत. जर्मन, फ्रेंच व इटालियन या तीन्हीहि भाषा प्रचलित असून तीनहि राजभाषा आहेत.

स्विट्झर्लंड हा डोंगराळ प्रदेश असून सृष्टिसौंदर्याविषयीं प्रख्यात आहे. आल्पस् पर्वत, मौण्ट रोझा, सेंट गोथार्ड, ज्यूरा हे पर्वत व त्यांच्या रांगा या देशांत आहेत. उन्हाळयांत बर्फ वितळत असल्यामुळें देशभर नद्यानाल्यांना भरपूर पाणी असतें. ऱ्हाईन व ऱ्होन या दोन मोठ्या नद्या असून टिसीनो व इन या नद्या दऱ्याखोऱ्यांतून वाहून प्रदेश सुपीक करतात. स्विट्झर्लंडमधील सरोवरें आकारानें व खोलीनें मोठीं असून त्यांच्या भोंवतालचें सृष्टिसौंदर्य अत्यंत मनोरम आहे. स्विट्झर्लंडच्या १३ प्रख्यात सरोवरांपैकीं जिनिव्हा व कॉन्स्टन्स हीं विशेष प्रख्यात आहेत. स्विस् लोक केल्टिक व ट्यूटॉनिक वंशाचे असून उद्योगशील, प्रामाणिक, सशक्त व कला कुशल आहेत. शेंकडा ५९ लोक प्रॉटेस्टंट पंथी असून शेंकडा ४० रोमन कॅथोलिक पंथीय आहेत. इतर ज्यू वगैरे. जेसूइट लोकांना बंदी आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचें असून सात विद्यापीठें कार्य करतात. त्यांपैकीं झुरिच, बर्न, जिनिव्हा व लॉसेन हीं प्रमुख आहेत. शेती व जनावरें पाळणें हा मुख्य धंदा असून सरोवरांत मासेमारीचा धंदाहि चालतो. मीठ व आस्फाल्ट हे प्रमुख खनिज पदार्थ असून खेळणीं, घड्याळें, लेस हे प्रमुख उद्योगधंदे आहेत.

अप्रतिम सृष्टिसौंदर्य व हिंवाळयांतील खेळ यांसाठीं लक्षावधि प्रवासी स्विट्झर्लंडला जातात. यामुळेंच स्विट्झर्लंडला युरोपचें क्रीडांगण हें नांव पडलें आहे. स्विट्झर्लंडच्या आरोग्यकारक हवेमुळें अनेक रोगी (विशेषतः क्षयरोगी) तेथें जाऊन राहतात.

स्विट्झर्लंड हें ६०० वर्षांचें लोकशाहीप्रधान राष्ट्र आहे. राज्यघटना, जाति, वंश किंवा भाषा यांवर आधारलेली नसून नागरिकस्वातंत्र्य, उदारमतवादित्व, शांतता व वांशिक समानता यांवर आधारलेली आहे. स्विट्झर्लंडचे लहानलहान परगणे असल्यामुळें एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत प्रत्येक नागरिकाचें मत अजमावतां येतें. यामुळें प्रत्येक स्विस मनुष्याला राज्यकारभारांत प्रत्यक्ष भाग घेतां येतो. व याचमुळें स्विट्झंडची लोकशाही आदर्श मानतात दी स्विस फेडरल असेम्बलीचे नॅशनल कौन्सील व कौन्सील ऑफ स्टेट असे दोन विभाग आहेत. पहिलींत लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधी घेतात व दुसरींत दोन परगण्यांचा एक प्रतिनिधी येतो. फेडरल असेंब्ली फेडरल कौन्सिल (मंत्रीमंडळ किंवा सरकार) निवडते व या कौन्सिलचा अध्यक्ष मुख्य प्रधान असतो व त्यालाच फेडरल प्रेसिडेंट म्हणतात. (त्याची मुदत एक वर्षाची असते व आळीपाळीनें जर्मन, फ्रेंच व इटालियन लोकांना संधी मिळते.)

स्वीडनः-उत्तर युरोपांतील स्वतंत्र राष्ट्र. स्कॅण्डेनेव्हियन द्वीपकल्पाचा पूर्वेकडील मोठा भाग. याचें क्षेत्रफळ १७३,००० चौ. मैल असून ६,२००,००० लोकसंख्या आहे. बाल्टिक समुद्रांत मोठा समुद्रकिनारा असून पश्चिमेस नॉर्वे व ईशान्येस फिनलंड यांमध्यें १००० मैलाची सरहद्द आहे. स्वीडनमध्यें पुष्कळ टेकड्या असून जमीन अत्यंत सुपीक आहे. स्टॉकहोम ही राजधानी व गोटेनबर्ग व मेल्मो हीं प्रमुख शहरें होत. स्वीडनमध्यें अनेक सरोवरें असून त्यांपैकीं वेनर (२००० चौ. मैल) हें सर्वांत मोठें आहे. स्वीडन हा मुख्यत: शेतीप्रधान देश असून गहू, राय, ओट हीं मुख्य धान्यें होतात. मच्छीमारीचा व गुरें पाळण्याचा धंदा येथें मोठ्या प्रमाणांत चालतो. उत्कृष्ट प्रतीचें लोखंड विपुल सांपडतें व लोखंडाचा परदेशाशीं व्यापार चालतो. त्याखालोखाल तांबें, सोनें, रुपें, मंगल व कोबाल्ट ही प्रमुख खनिज संपत्ति आहे. पाईन, स्प्रुस व ओक या वृक्षांचीं जंगलें, कागदाचा लगदा व कागद, इमारतीचें लांकूड यांचा सांठा विपुल असून व्यापार मोठ्या प्रमाणांत चालतो. कापडें विणणें, यंत्रें तयार करणें, रसायनें व काड्याच्या पेट्या हे मोठे उद्योगधंदे होत. क्रोनेन हें नाणें असून मेट्रिक पद्धती अमलांत आहे.

शिक्षण सक्तीचें असून सरकारतर्फे व्यवस्था चालते. स्वीडनमध्यें वयांत आलेला एकहि मनुष्य निरक्षर सांपडावयाचा नाहीं. उपसूला व लुंड या ठिकाणीं दोन विद्यापीठें आहेत. ल्युथरन चर्च हा अधिकृत धर्म आहे.

इतिहास-दहाव्या शतकांत स्वीडन हें स्वतंत्र राज्य बनलें व लौकरच तेथें ख्रिश्चन धर्म मान्य झाला. आरंभीं स्वीड व गॉथ हें दोन मानव वंश होते; पण पुढें ते एक झाले. १३९७ पूर्वी कांहीं काळ नॉर्वे व स्वीडनचीं राज्यें एक झालीं होतीं; पण या वर्षी डेन्मार्कच्या राजानें नॉर्वे–स्वीडनवर आपलें प्रभुत्व स्थापिलें व तेव्हांपासून डॅनिश लोकांविरुद्ध चळवळी सुरू झाल्या. १५२३ मध्यें गस्टाव्हस व्हेसा यानें डेन

लोकांना स्वीडनमधून हुसकून लावलें व त्याच्या कामगिरीबद्दल स्वीडिश लोकांनीं त्याला आपला राजा केलें.

१७ व्या शतकांत स्वीडन गस्टाव्हस ॲडॉल्फस् व १२ वा चार्लस यांच्या कारकीर्दींत युरोपांतील एक सामर्थ्यसंपन्न राष्ट्र बनलें. या कालांत स्वीडननें बाल्टिक समुद्रापलीकडे कांहीं भाग जिंकलाही.पण पुढें रशियाच्या उत्कर्षामुळें बाल्टिक राष्ट्रांतील स्वीडनचें महत्त्व कमी झालें. १८१०मध्यें नेपोलियन बोनापार्टनें मार्शल बर्नाडोट यास स्वीडनचा १३वा चार्लस या निपुत्रिक राजानंतरचा वारस ठरविलें व१८१८मध्यें बर्नाडोट हा१४वा चार्लस म्हणून गादीवर बसला. १८१४ मध्यें नॉर्वे व स्वीडन हीं राज्यें एक झालीं होतीं. १९०५ मध्यें नॉर्वे स्वतंत्र झाला. बर्नाडोटचा वंशज ५ वा गस्टाव्ह हा १९०७ मध्यें राज्यावर आला व तोच सध्यां राज्य करीत आहे. १९४० मध्यें नॉर्वे जर्मनीच्या ताब्यांत गेल्यानंतर स्वीडनमध्यें मोठी खळबळ उडाली होती. परंतु गस्टाव्हनें आपण तटस्थ राहणार असल्याची घोषणा केली. तरीहि आज जर्मनीचें वर्चस्व स्वीडनवर आहे. ,

इंग्लंडप्रमाणेंच हें लोकशाहीप्रधान राष्ट्र असून राजा हा सर्वश्रेष्ठ आहे. डाएट नांवानें ओळखलें जाणारें पार्लमेंट असून त्याचें अपर चेंबर (१५० सभासद) व लोअर चेंबर (२३० सभासद) अशीं दोन विधिमंडळें आहेत.

ह

हक्सले, टॉमस हेन्री (१८२५–१८९५):–सुप्रसिद्ध इंग्लिश प्राणिशास्त्रज्ञ. १८४५ सालीं लंडन विद्यापीठाचा स्नातक झाला. त्याच्या पुढील वर्षी आरमारांतील शस्त्रवैद्याचा मदतनीस झाला. दीर्घकालीन जलप्रवासाचा योग आला. या मुदतींत त्यानें प्राणिशास्त्राचा चांगला अभ्यास केला व त्या विषयावरील संशोधनात्मक निबंध रॉयल सोसायट्यांना पाठविले. समुद्रपर्यटण करून परत आल्यावर प्राणीशास्त्रज्ञ म्हणून आपला बोलबाला झाल्याचें त्याला आढळून आलें. १८५४ सालीं त्याची रॉयल स्कूल ऑफ माइन्स या संस्थेंत प्राणिशास्त्राच्या अध्यापकाचे जागीं नेमणूक झाली. हक्सलेनें डार्विनच्या गुणविकासवादाचें चांगलें स्पष्टीकरण करण्याकरितां व्याख्यानें दिलीं व लेख लिहिले. हीं व्याख्यानें व लेख 'मानवाचें निसर्गातील स्थान' (Man's place in Nature) या त्याच्या ग्रंथांत प्रसिद्ध झाली आहेत. वेगवेगळ्या महाविद्यालयांत त्यानें प्राध्यापकाचें काम केलें. अनेक विद्वन्मंडळांचा सभासद झाला व सरकारनियुक्त पंचमंडळाचें सदस्यत्व भूषविलें.

त्याचे प्रमुख ग्रंथ Oceanic Hydrozoa, On the theory of the Vertebrate skull, Man's place in Nature; On our knowledge of the causes of the phenomena of organic Nature; Elements of comparativs Anatomy; Elementary physiology, American Addresses, Introduction to the classification of animals.

हत्ती:–सोंड असणाऱ्या प्राण्याच्या वर्गातील प्राणी. हा हिंदुस्थान, सीलोन, ब्रह्मदेश, सयाम व आफ्रिका खंड वगैरे देशांत असतो. याची उंची ८।१२ फूट असून शरीरानें हा सर्व प्राण्यांपेक्षां मोठा आहे. हत्तीची शेपूट व डोळे अंगाच्या मानानें लहान असतात. याचें डोकें खोलगट असून त्याचें कातडें फार जाड असतें. याची सोंड वरचा ओठ व नाक यांच्या वाढीनें बनलेली असते. गंध, स्पर्श, अन्नपाणीग्रहण, छोटेमोठे पदार्थ उचलणें वगैरे कामें तो आपल्या सोंडेनें करतो. त्याचे कान सुपाएवढे व सुपासारखे असतात. हे कान त्यास हलवतां येतात. पांच बोटें असणाऱ्या खांबासारख्या जाड पायाचा हा प्राणी होय. बोटांना पुढें नखें असून पायाचे तळवे मऊ असतात. सुळे दांत व खालच्या जबड्याला पुढचे दांत असल्याचें दिसून येत नाहीं. मात्र वरच्या जबड्यांत दोनच लांब वाढलेले दांत असतात. या दांतांनाच हस्तिदंत हें नांव आहे. एका दांताचें वजन १०० पासून १५० पौंडांपर्यंत भरूं शकतें.

कळप करून राहणारा हा प्राणी आहे. एका कळपांत २०–२५ हत्ती असूं शकतात. हत्तीला फार शक्ती असते म्हणून पूर्वी त्याचा लढाईच्या कामीं उपयोग करीत. हा प्राणी साधारणतः दर दिवशीं ३०–३५ कोसांपेक्षां अधिक चालूं शकत नाहीं.

तोफा, सागवानी सर यांसारख्या अवजड पदार्थांची नेआण करण्यास याचा फार उपयोग होतो. हत्तीण २० महिने गरोदर असते. हत्तीचें पोर जन्मतःच ३ फूट उंच असूं शकतें. १०० वर्षे हत्ती जगतो. पाण्याबाहेर सोंडेचें टोंक ठेवून बराच कालपर्यंत हत्ती पाण्यांत बुडून राहूं शकतो. हत्ती बाळगणें फार खर्चाचें काम असल्यानें हा केवळ राजे लोकांजवळच दिसतो. स्वभावानें हा गरीब, आज्ञाधारक, मायाळू व समजूत-

दार असतो. रानटी हत्ती पाळीव हत्तीपेक्षां फार भयंकर असतात. हिंदी हत्तीपेक्षां आफ्रिकेच्या हत्तीनें डोकें फुगीर असून कान मोठे असतात.

हत्यारें:—हत्यारें अनेक प्रकारचीं असूं शकतात. हत्यारामुळें हातांना ज्या गोष्टी करतां येणें अशक्य असतें त्या गोष्टी करतां येतात. $\frac{1}{100}$ इंच जाडी पासून ते ८—१० फूट जाडीच्या व्यासापर्यंत हीं हत्यारें असूं शकतात.

आरंभीं लाकूड, हाडें व दगड यांचीं ओबडधोबड हत्यारें बनविलीं जात; पण लोखंडाचा शोध लागल्यावर लोखंडाचींच हत्यारें बनविलीं जाऊं लागलीं व आजहि हत्यारें बनविण्यासाठीं लोखंडाचाच मोठ्या प्रमाणांत उपयोग करतात. ज्यावर हत्यार चालवावयाचें त्यापेक्षां हत्याराच्या वस्तूचे घटक कठीण असावे लागतात.

हनुमान:—सामर्थ्यदेवता. याचीं मारुती, बजरंग व बलभीम हींहि आणखी नांवें रूढ आहेत. वायूच्या कृपाप्रसादानें हा अंजनीच्या उदरीं चैत्र शु॥ १५ ला जन्मला. केसरि हा याचा बाप. यास खूप वर मिळालें होतें; त्यांपैकीं अवध्यत्व, अबद्धत्व, अजिंक्यत्व, यथेष्टगामित्व, दीर्घायुष्य, समुद्रोल्लंघनसामर्थ्य, मित्रभयनाशकत्व, भयोत्पादकत्व व आरोग्य हे वर प्रमुख होत.

सूर्याज्ञेनें हा सुग्रीवाचा स्नेहि व मंत्री बनला. पुढें हा सुग्रीवाकडून रामाकडे आला. यानें लंकेंतील सीतेचा शोध लावला. आपलें बल त्यानें लंकादहन करून रावणाच्या निदर्शनास आणलें. शक्ती लागून मरणाच्यादारीं पडलेल्या लक्ष्मणास वांचविण्याकरितां यानें द्रोणागिरी आणला. रामाच्या अभिषेकाला यानें समुद्रांचें पाणी आणलें या सर्व गोष्टींवरून त्याची एकनिष्ठा, सामर्थ्य, कौशल्य इत्यादि गुण उत्तमपणें प्रगट होतात.

राम व सीता यांच्याकडून याला ब्रह्मविद्या व रत्नहार यांची प्राप्ती झाली. भीमाचा गर्व यानें हरण केला. पण याचा गर्व एका मुनीनें नष्ट केला. भारतीय युद्धांत हा अर्जुनाच्या रथावर बसत असे. यानें लिहिलेल्या रामचरित्रास नाटक रामायण म्हणतात. हा सप्तचिरंजीवांपैकीं एक आहे.

हरिण:—हरिणाच्या निरनिराळ्या पन्नास जाती आहेत. तीं कळपानें राहतात. काळवीट (नर) हा कळपाचें संरक्षण करतो. काळवीट मादीपेक्षां उंचीला मोठा असून अंगानें मोठा असतो. शिवाय त्याचा रंग पाठीकडे काळसर असते व त्याचीं शिंगेंही हरिणीपेक्षां मोठीं असतात. हरिणीचा रंग पिवळसर तांबूस असून तिच्या पोटाचा रंग पांढरा असतो. तिला दर खेपेला १ किंवा २ पाडसें होतात. हरिणाचे डोळे मोठे असतात. स्वभावानें हा प्राणी भित्रा आहे. या प्राण्याच्या अंगाच्या मानानें शेपटी आखूड व अंगासरशीं असते. कांहींच्या अंगावर पांढरे ठिपके असतात. हा जलद पळणारा प्राणी असून चाऱ्यावर (गवत, पाला यांवर) जगणारा आहे. पाय अंगाच्या मानानें बारीक व लांब असून त्याचे खूर दुभागलेले असतात. यांचें वय १५ वर्षांपर्यंत असूं शकतें.

मांस, शिंग व कातडें यांच्यासाठीं हरणाची शिकार करतात. शिंगाचीं बटणें तयार करतात. कातड्याचें हातमोजे, टोप्या वगैरे उपयोग करतात. हरणाचें कातडें सोवळ्यांत चालतें.

हरिद्वार:—गंगानदीच्या कांठचें हिमालयांतील एक सुप्रसिद्ध हिंदूचें क्षेत्र. येथें वैशाख शुद्ध प्रतिपदेला फार मोठी यात्रा भरते. सौरवर्षाचा आरंभ या कालांत नुकताच झालेला असतो. गंगानदी प्रथमच या दिवशीं प्रगटली असें म्हणतात. बाराबारा वर्षांनीं या ठिकाणीं कुंभमेळा भरतो. या मेळ्याला हिंदुस्थानच्या सर्वच प्रांतांमधून लाखो यात्रिक जमत असतात.

या ठिकाणीं 'हरीची पायरी' हा घाट, आणि याच्या जवळच असलेलें गंगाद्वार हीं ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. तसेंच घाटावरील भिंतीमधील विष्णुचरणाची शिला पावनकारक आहे असें मानतात. याशिवाय मायादेवीचें देऊळ, श्रावनाथाचें देऊळ व चंदी पहाड देऊळ हीं देवालयें प्रमुख होत. हरिद्वारला दिल्लीहून पुढें आगगाडीनें जातां येतें. हरिद्वारहून सहा मैलांवर 'ऋषिकेश' हें एक पवित्र ठिकाण आहे. या ठिकाणीं असलेला 'लक्ष्मणझुला' बघण्यास यात्रेकरू चुकत नाहींत.

हरियाळ:—फलाहारी, हिरव्या पंखांचा, क्वचितच जमिनीवर येणारा आणि पलंगाप्रमाणें घरटें बांधणारा हा स्थलचर वर्गापैकीं पक्षी. हा हिरव्या पंखांचा पक्षी असल्यामुळें झाडावर असतांना चटकन् त्याच्याकडे माणसाचें लक्ष जात नाहीं. याचे डोळे निळे, पण गुलाबी कडे असलेले असतात. चोंचीचें टोंक निळसर रंगाचें असतें. हरियाळ कळप करून राहणारा प्राणी

आहे. साधारणतः एका कळपांत १५।२० पक्षी असतात. बहुधा हा पक्षी पाणी पिण्याशिवाय कोणत्याच कारणासाठीं खालीं येत नाहीं. फळांवरच हा जगतो. फळांमध्यें वड, पिंपळ, उंबर हीं फळें या प्राण्याला फार आवडतात. मार्च ते जून या काळांत मादी मंचकासारख्या घरट्यांत २।३ अंडीं घालतें. हा पक्षी कबुतराच्या जातीचा आहे.

हरिश्चंद्रः—इक्ष्वाकु वंशांतील त्रिशंकूचा थोरला मुलगा. 'वसिष्ठ' याचा गुरु होय. याचें शैव्यकन्या तारामति इच्याबरोबर लग्न झालें. या दोघांना रोहित नांवाचा मुलगा होता. हा दानशूर मायाळू असून वचनाचा धड होता.

एकदां इंद्रसभेंत वसिष्ठानें याची स्तुति केली. ती विश्वामित्रास सहन न होऊन त्यानें हरिश्चंद्राची परीक्षा पाहण्याची प्रतिज्ञा केली. यानें एका ब्राह्मणाला स्वप्नांत सर्व राज्य दान दिलें; पण २॥ तोळ्याची दक्षिणा देण्यास याच्याजवळ कांहीं उरलें नाहीं म्हणून यानें तारामति व रोहित यांना विकलें; पण तेवढ्यानेंहि दक्षिणेची पूर्तता झाली नाहीं; म्हणून स्वतःस एका डोंबाला विकून घेतलें व आलेल्या सोन्याची भर मूळ सोन्यांत घालून यानें आपलें वचन पाळिलें. परदास्यांत असतांना हाल, अपमान व कष्ट यांनीं त्याचें जीवन त्रासदायक बनलें. एकदां तर पुत्रघाताच्या खोट्या आळाबद्दल स्वपत्नीचा वध करण्याची पाळी त्याजवर आली असतां हा यथार्थ सिद्ध झाला म्हणून याजवर विश्वामित्रानें कृपा करून पुनः त्यास राज्यावर बसविलें.

हर्षलः—प्रजापति हा लेख पाहा.

हर्षवर्धन (मृत्यु स. ६४८):—बुद्धमर्धी पराक्रमी, विद्वान नि उदार सम्राट. हा बैसवंशी रजपुतांपैकीं प्रभाकर वर्धनाला यशोमतीपासून झालेला दुसरा मुलगा. यालाच श्रीहर्ष, हर्ष व शीलादित्य असेंहि म्हणत. राज्यवर्धनाच्या निधनानंतर हा गादीवर आला. यानंतर त्यानें तीस वर्षें युद्ध व दिग्विजय करून सारें उत्तर हिंदुस्थान आपल्या स्वामित्वाखालीं आणलें. याची दृष्टी दक्षिण हिंदुस्थानाकडेहि होतीच; पण चालुक्यवंशीय पुलकेशीनें याचा पराभव केल्यामुळेंच हर्षाला माघार घ्यावी लागली. ठाणेश्वर व कनोज अशा उभयस्थानीं हर्षाची राजधानी होती. शेवटीं शेवटीं याचें सैन्य ६००० हत्ती व एक लक्ष घोडेस्वार इतकें होतें. तीस वर्षांनंतर याचें लक्ष राज्यवर्धनावरून उडून तें धर्मप्रचाराकडे लागलें. सर्व राज्यांत जीवहिंसा व मांसभक्षण यांना त्यानें मनाई केली; तसेंच धर्मशाळा, अन्नपाणी व औषधें यांची व्यवस्था केली. प्रत्येक पांचव्या वर्षी हा 'मोक्षमहापरिषद' प्रयागला भरवी आणि त्यावेळीं आपली सर्व संपत्ति दान करी. विद्वानांचा सत्कार करून त्यांना उत्तेजन देई. स. ६०७ मध्यें हा राज्यावर बसला व ६४८ त मरण पावला. याच्या पश्चात् याचें राज्य नष्ट झालें. याला एक बहीण व एक मुलगी होती. मुलीचें लग्न वल्लभीपूरच्या दुसऱ्या ध्रुवसेनशीं झालें होतें. स्वतः सम्राट विद्वान असून चित्रकलेंत निपुण होता. त्यानें रत्नावलि, प्रियदर्शिका व नागानंद हीं नाटकें लिहिलीं.

यानें चीनच्या बादशहाकडे एक ब्राह्मण राजदूत पाठविला होता. तो स. ६४३ त परत आला याच्याबरोबरच चीनच्या बादशहानेंहि आपले दूत हर्षवर्धनाकडे पाठविले होते. ६४७ तहि चीनहून पुनः राजदूत आले होते. या दूतांत वंग हुएन्त्से हा प्रमुख होता.

हर्षवर्धन प्रथम शिवभक्त होता. पण बौद्धधर्मावर अधिक श्रद्धा जडल्यामुळें पुढें हा बुद्ध झाला असावा. अयोध्या प्रांतांत बैसवाडा हा भाग बैसवंशी रजपुतांचें मुख्य स्थान आहे. त्यांतील तिळकचंदी बैस आपणांस मुख्य समजतात.

या सम्राटाच्या पदरीं अनेक नामांकित विद्वान होते. त्यांपैकीं बाण व त्याचा मुलगा पुलिंद, मयूर, मातंग व दिवाकर हे प्रमुख होत.

हलासनः—जमिनीवर उताणें निजावें. दोन्ही पाय वर उर्ध्व दिशेस करून हळूंहळूं ते ताठ ठेवूनच डोक्याचे पलीकडे जमिनीच्या बाजूस नेऊन पायाचे आंगठे जमिनीवर टेकावे. सर्व शरीर मानेच्या कांड्यावर वळवून व कमरेंत वांकवून पाय ताठ ठेवून डोक्यापलीकडे ताणावे. दोन्ही हात जमिनीवर विरुद्ध बाजूस ताठ करून तळवे जमिनीवर टेकून पसरावे. कमरेनें थोडें हाताचें बाजूस शरीर सोडून गुडघे न वाकवितां कपाळास लावावे. हनुवटी छातीस खेटावी.

या आसनानें पोटांतील दोष नाहींसे होतात.

हाडः—पृष्ठवंश असलेल्या बहुतेक सर्व प्राण्यांचा सांगाडा हाडांचा बनलेला असतो. हाडांत $\frac{1}{3}$ सेंद्रिय चिवट पदार्थ व $\frac{2}{3}$ क्षार व फॉस्फेटस् असतात (लाइम). हाडाच्या मध्यभागीं पोकळी असते व तींत पिवळसर रंगाची बिलबिलीत अस्थिमज्जा असते. हाडांच्या दोन्ही

टोकांकडील फुगीर भागांपर्यंत ही पोकळी असते. (चपट्या व लहान हाडांत ही पोकळी नसते) हाडांचें आवरण पांढऱ्या कठिण पदार्थाचें बनलेलें असतें व टोंकाचा फुगीर भाग छिद्रमय असतो.

मानवी शरीरांत एकूण २०६ हाडें आहेत. कांहीं हाडें लांब, कांहीं आंखूड, चपटीं व कांहीं अनियमित आकाराचीं असतात. विशिष्ट अवयव बनण्यास उपयोग होईल अशी त्यांची रचना असते. शरीरास आधार, संरक्षण व त्वरित हालचाली यांसाठीं हाडांचा उपयोग होतो. शरीरांत हाडें नसतीं तर शरीर म्हणजे एक मांसाचा नुसता गोळाच झालें असतें. कोंवळ्या हाडांस कूर्चा म्हणतात. कूर्चेंत हळूं हळूं कॅल्शियम फॉस्फेट व कार्बोनेट हे क्षार मिसळत जाऊन हाडें तयार होतात. (मानवी शरीर पृष्ठ १५३१ पाहा.)

हानिमान, डॉ. सॅम्युअल (१७५५–१८४३):– होमिओपाथी या चिकित्साशास्त्राचा जनक. याचा जन्म दिनांक १० एप्रिल १७५५ रोजीं जर्मनींतील मायसेन या गांवीं झाला. त्याची सांपत्तिक स्थिति चांगली नसल्यामुळें त्यास आपलें सर्व शिक्षण शिकवण्या धरून व परकीय भाषेंतील शास्त्रीय विषयांवरील उपयुक्त पुस्तकांचें जर्मन भाषेंत भाषांतर करून मिळणाऱ्या पैशावर करावें लागलें. हा महातत्त्वज्ञानी, मोठा शास्त्रज्ञ व सूक्ष्म संशोधक होता. रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र हे त्याच्या आवडीचे विषय होत. लायप्झिक व व्हिएन्ना येथें त्यानें आपलें वैद्यकीचें शिक्षण पुरें केलें. १७७९ सालीं एरलोंजेन येथें त्यानें एम्. डी.ची पदवी मिळविली. त्यानंतर त्यानें अनेक ठिकाणीं आपला वैद्यकीचा धंदा करण्याचा प्रयत्न केला; परंतु एकाहि ठिकाणीं तो स्थिर राहूं शकला नाहीं. ॲलोपाथीचीं तत्त्वें त्यास पटत नसत. अनेक वर्षें मनन व चिंतन करून त्यानें स्वतःच होमओपाथिक चिकित्सापद्धति निर्माण केली; व तीनुसार रोग्यांस औषधें देण्यास सुरवात करून त्यांत त्यानें मोठेंच यश संपादन केलें. त्याच्या शत्रूंनीं त्याचा खूप छळ केला. जर्मनींत त्यावेळीं असा एक कायदा होता कीं, कोणाहि वैद्यकीचा धंदा करणारानें रोग्यांना औषधें स्वतः द्यावयाचीं नाहींत. तीं सरकारी परवाना असलेल्या औषधी दुकानदारांनींच तयार करून रोग्यांना द्यावयाचीं; हानिमानची चिकित्सापद्धति नवीन असल्यामुळें त्याचीं औषधें इतर कोणास तयार करतां येत नसत. या अडचणीचा फायदा घेऊन त्याच्या शत्रूंनीं त्यास कांहीं ठिकाणांहून हद्दपारहि करावयास लाविलें. शेवटीं १८२१ मध्यें कोथेनच्या ड्यूकनें त्यास आपल्या पदरीं ठेवून घेतलें. ॲलोपाथिक अगर इतर चिकित्सापद्धतीनें बरी न झालेली अशी एक जीर्ण विकृति ड्यूकला होती. ती हानिमाननें होमिओपाथीनें बरी केली. त्यामुळें हानिमान व होमिओपाथी यावर त्याचा विश्वास बसून कोथेन येथें दवाखाना काढण्यास ड्यूकनें परवानगी दिली व त्याच्या मार्गांतील कायद्याच्या सर्व अडचणी दूर केल्या. कोथेनला गेल्यापासून त्यास स्वास्थ्य मिळून होमिओपाथीचा प्रसार करण्यास सवड मिळाली. या ठिकाणीं व पूर्वी लायप्झिक येथें असतांना अनेक शिष्य त्यानें होमिओपाथी शिकवून तयार केले. १८३५मध्यें तो पॅरिसला जाऊन राहिला. १८३० मध्यें त्याची पहिली सुशील पत्नी ४८ वर्षांच्या पतिसहवासानंतर वारली. त्यानंतर १८३५ मध्यें त्यानें मेलनी हर्विली नांवाच्या ३५ वर्षें वयाच्या एका फ्रेंच बाईशीं विवाह केला. त्याच्या अखेरच्या या उतार वयांत मेलनी हिनें त्याची उत्कृष्ट सेवा केली. वयाच्या ६७–६८ वर्षांपर्यंतचे त्याचे दिवस दारिद्र्यांत व हालअपेष्टांत गेले. कोथेनला आल्यापासून त्याला दिवस चांगले आले. पॅरिसमध्यें त्याचे दिवस तर फारच सुखांत गेले. येथें त्याची कीर्ति सर्वत्र पसरली, खूप पैसा मिळाला व अनेक मानमरातबहि मिळाले. तो आपल्या उभ्या ८९ वर्षांच्या आयुष्यांत कधींहि आजारी पडला नाहीं. ८९ वर्षांचें दीर्घायुष्य व आरोग्य भोगल्यानंतर हानिमान हा पॅरिस येथें खोकल्याच्या दुखण्यानें दिनांक २।७।१८४३ या दिवशीं शांतपणानें इहलोक सोडून गेला.

हानिमान हा जाडा विद्वान्, खंदा लेखक व अनेक भाषाकोविद होता. त्यानें परकीय भाषेंतील जवळजवळ २५ शास्त्रीय पुस्तकांचीं भाषांतरें व १०० स्वतंत्र पुस्तकें लिहिलीं आहेत. यांत (१) ओरगॅनन (साधन ग्रंथ), (२) मटेरिया मेडिका प्यूरा (शुद्ध निघंटु) (३) क्रॉनिक डिझीजीज (जीर्ण व्याधि) हीं तीन महत्त्वाचीं अशीं स्वतंत्र पुस्तकें असून तीं सर्व होमिओपाथीसंबंधीं आहेत. (होमिओपाथी हा लेख पहा).

हिटलर, ॲडॉल्फ (१८८९):–जर्मनीचा नेता व राइश चॅन्सेलर. ऑस्ट्रियाच्या उत्तर सरहद्दीवरील ब्राऊनाउ या गांवीं २० एप्रिल १८८९ रोजीं जन्मला. हा एका अबकारी अधिकाऱ्याचा (कस्टम्स ऑफिसर) मुलगा.ऑस्ट्रियांतील लिन्झ या गांवीं त्याचें चार इयत्तांचें

दुय्यम शिक्षण झालें. त्याला लहानपणापासून चित्रकलेची आवड आहे. १७व्या वर्षाच्या सुमारास तो आपलीं कांहीं चित्रें घेऊन व्हिएनीज ॲकॅडमी ऑफ आर्ट या व्हिएन्नांतील संस्थेंत प्रवेश मिळविण्यासाठीं गेला; पण त्याला प्रवेश मिळाला नाहीं. तेव्हां कांहीं दिवस त्यानें गवंड्याचें काम करून पोट भरलें. नंतर कांहीं दिवस पोस्टकार्डांवर रंगीत चित्रें काढून तो हॉटेल्स व बार्समध्यें विकत असे. १९११मध्यें तो म्यूनिक शहरीं (बव्हेरिया) गेला. तेथें तो लहान लहान पेन्टिंग्ज विकून पोट भरत असे. १९१४ चें महायुद्ध सुरू होतांच जर्मन सैन्यांत स्वयंसेवक म्हणून दाखल झाला. युद्ध होईपर्यंत तो ऑर्डर्ली म्हणून काम करीत होता; पण फक्त लान्स-कार्पोरल (भालाईत) एवढा हुद्दा मिळेपर्यंतच त्याची प्रगती झाली. युद्धाच्या अखेरच्या दिवसांत तो जखमी झाला व मस्टर्ड गॅसमुळें त्याची दृष्टि कांहीं काल गेली. लढाईनंतर तो म्युनिकला परतला. तेथें 'राईशवीर' (लढाईनंतरचें जर्मन सैन्य)मध्यें त्याला गुप्तपोलिसाची नोकरी मिळून राजकीय सभांवर देखरेख करण्याचें काम मिळालें. या कामगिरीवर तो असतांना ड्रेक्स्लर नांवाच्या एका गृहस्थानें आपल्या खाणावळींत चालविलेल्या जर्मन लेबर पार्टीशीं त्याचा संबंध आला. या पार्टीचे फक्त सहाच सभासद होते. हिटलर सातवा सभासद बनला व लौकरच त्यानें ड्रेक्सलरची हकालपट्टी करून स्वतःच त्या पार्टीचा पुढारी बनला. त्यानें पहिलें नांव बदलून नॅशनल–सोशॅलिस्ट जर्मन लेबर पार्टी असें नवें नांव आपल्या पक्षाला देऊन प्रचार कार्याला सुरवात केली. १९२३मध्यें एकदम कांहीं तरी अधिकारक्रांति करावी या हेतूनें त्यानें बेसनदशीर सत्ताग्रहणाचा प्रयत्न केला; पण तो गर्भावस्थेंतच फसला. कारण बव्हेरियन कमिशनर व म्युनिक येथील सैन्याचे सेनापति यांची त्याला मदत होईल असें वाटलें; पण ती मदत मिळाली नाहीं. हिटलर पकडला गेला व पांच वर्षांची शिक्षा होऊन लॅण्डस्बर्गच्या किल्ल्यांत तुरुंगांत पडला. येथें त्यानें त्याच्या 'माइन काम्फ' या विश्वविख्यात पुस्तकाचा पहिला भाग लिहिला. फक्त आठ महिन्याच्या मुदतीनंतरच त्याची सुटका झाली. नंतर त्यानें पुन्हा आपल्या पक्षाची जुळणी केली. १९२५ ते २७ च्या दरम्यान त्यानें 'माइन काम्फ' या पुस्तकाचा दुसरा भाग लिहिला.

१९२८ च्या निवडणुकींत त्याच्या पक्षाला फक्त ८ लक्ष मतें मिळून १२ डेप्युटी (प्रतिनिधी) राइश्स्टॅग मिळून (जर्मन पार्लमेंट) मध्यें निवडून आले; पण त्यानें आपलें प्रचारकार्य जोरानें चालवून व मोठमोठ्या कारखानदारांना वश करून घेऊन १९३० मध्यें राइश्स्टॅगमध्यें १०६ जागा पटकावल्या. व्हर्सायचा तह (त्यानें झालेला अन्याय), मार्क्सिझम्, लोकशाहीची पद्धती व ज्यू (नीं केलेलें नुकसान) या गोष्टींवर त्यानें आपल्या प्रचारकार्यांत भर दिला. नाझी पक्ष व कम्यूनिस्ट पक्ष हे राइशस्टॅगमध्यें जवळ जवळ सारखेच प्रबल होते; त्यामुळें 'पार्लमेंटरी गव्हर्मेंट' अशक्य झालें व लष्कर आणि जमिनदार वर्गाच्या हातीं राजसत्ता गेली. याच वेळीं सर्व जगभर पसरलेली आर्थिक तंगी जर्मनींतहि तीव्रतेनें जाणवत होती. हिटलरनें भरमसाट आश्वासनें दिल्यामुळें त्याच्या पक्षाचें नव्या निवडणुकींतून अधिकाधिक यश वाढूं लागलें. १९३२ मध्यें त्याच्या पक्षांतील एका बड्या अधिकाऱ्यानें त्याला एका महत्त्वाच्या जागेवर नेमून जर्मन अधिकारी व पर्यायानें जर्मन नागरिक बनविला. त्याबरोबर हिटलर १० एप्रिल १९३२च्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठीं हिंडेनबुर्ग विरुद्ध उभा राहिला (पण तो पडला.) पुढें ३१ जुलै १९३२ च्या राइश्स्टॅगच्या निवडणुकींत १३,७००,००० मतांनीं निवडून आला. पण या वेळीं हिंडेनबुर्गनें हिटलरची स्वतःला चॅन्सेलर नेमण्याची मागणी फेटाळली. ता. ६ नोव्हेंबर १९३२ रोजीं झालेल्या निवडणुकींत त्याला पूर्वीपेक्षां कमी मतें मिळालीं. यावेळीं जनरल फॉन श्लायशर याला हिंडेनबुर्गनें चॅन्सेलर नेमलें. श्लायशरच्या मनांतून हिटलर व हिंडेनबुर्गच्या भोवतीं चिकटलेलें सरंजामी वृत्तीचे जमिनदार यांचा राजकारणांतून (सत्तीनें) कांटा काढण्याचा बेत होता व जर्मनीला आर्थिक शांतता व राजकीय स्थैर्य आणण्याची त्याची आकांक्षा होती. पण श्लायशरचें हें धोरण न साहून हिंडेनबुर्गच्या भोंवतीं असलेल्या जमिनदारांनीं व जवळ जवळ दिवाळखोर बनलेल्या लोखंड–पोलादाच्या कारखानदारांनीं पुढें हिटलर आपल्या उपयोगी पडेल या कल्पनेनें हिटलरला वाचवायचें ठरविलें व पूर्वी चॅन्सेलर असलेल्या फॉन पेपेनच्या पुढाकारानें हिंडेनबुर्गला विनंति करून हिटलरला चॅन्सेलर नेमून घेण्यांत आलें. हिंडेनबुर्ग यावेळीं अगदी म्हातारा झाला होता व त्याची बुद्धी आणि कार्यशक्ति चांगल्या

काम करत नव्हत्या असें म्हणतात. पण त्याच्या इतकी वजनदार व्यक्ति नसल्यामुळें व त्याच्यावरील प्रेमामुळें लोकांनीं त्याला अध्यक्ष म्हणून निवडलें होतें. अशा रीतीनें ३० जानेवारी १९३३ रोजीं हिटलर जर्मनीचा चॅन्सेलर बनला. नंतर ५ मार्च १९३३ रोजीं झालेल्या निवडणुकींत त्याच्या नाझी पक्षाला फक्त ४४ टक्के यश मिळालें. हिटलरनें राइश्स्टॅगच्या इमारतीस आग लाववून कम्यूनिस्ट लोकांवर ही आग लावल्याचा आळ घातला व अनेक लोक व पुढारी पकडून त्यांचा त्यानें छळ केला. शेवटीं राइश्स्टॅगच्या बैठकींतून सक्तीनें कम्यूनिस्ट व इतर विरोधी पक्षांतील प्रतिनिधींना (डेप्युटीज) हाकलून लावून Empowering Act (सत्ता देण्याचा कायदा) पास करून घेऊन तो कायदेशीर डिक्टेटर बनला. त्यानें चर्चसंस्था राज्यांत सामील केली. त्यानें आपल्या देणेकऱ्यांचे खून करविले, जनरल फॉन श्लायशर व त्याची बायको, हर फॉन कार, म्यूनिकचा कमिशनर (१९२३ सालीं त्यानें हिटलरला मदत केली नव्हती म्हणून) त्याचा व ज्यांच्या सहाय्यानें तो एवढ्या वैभवाला चढला होता त्या आपल्याच पक्षांतील प्रमुख कर्तृत्ववान लोकांचे व मित्रांचे त्यानें खून करविले.कॅथॉलिक लोकांनीं त्याला विरोध केल्यामुळें, त्यांच्या प्रमुखांचीहि अशीच वाट त्यानें लाविली. अशा रीतीनें सुमारें ३०० ते ११००पर्यंत कर्तबगार जर्मन त्यानें ठार केले.२५ जुलै१९३४ रोजीं ऑस्ट्रियांत नाझींचें बंड करवून डॉल्फसचा खून करवला. २ ऑगस्ट १९३४ रोजीं हिंडेनबुर्ग मेल्यावर हिटलरनें अध्यक्षपद व चॅन्सेलरपद आपल्याकडेच घेतलें. अशावेळीं त्यानें आपल्या धोरणासंबंधीं मतें घेण्याचा फार्स केला.

१९३५च्या मार्चपासून त्यानें सक्तीचें लष्करी शिक्षण सुरू केलें. युद्धसामुग्री व आरमार वाढविण्यास जोरानें सुरवात केली. १५सप्टेंबर १९३५रोजीं स्वस्तिकांकित नाझी-ध्वज हा जर्मनीचा राष्ट्रीय ध्वज म्हणून त्यानें जाहीर केला. ज्यूविरुद्ध मोहीम सुरू करून त्यांना जीव नकोसे करून टाकले. त्यांचा पैसा त्यानें घेतला, इस्टेटी जप्त केल्या, नोकऱ्यांवरून दूर केलें, धंदे करूं देण्यास परवानगी नाकारली, घरें जाळलीं. ज्यूबरोबर लग्नें करण्यास जर्मनांना बंदी केली. सुमारें १० लाख ज्यू कसे बसे निसटून (३० लाखापैकीं) परदेशीं गेले. लोकॅर्नोचा तह मोडून ७ मार्च १९३६ रोजीं ऱ्हाइनलॅंडमध्यें त्यानें सैन्य पाठवून तो प्रदेश घेतला व लौकरच 'सिगफ्रीड लाइन' बांधण्यास त्यानें सुरवात केली. १२ फेब्रुवारीला १९३८ ऑस्ट्रियाचा चॅन्सेलर शूस्निग यास बोलावून नाझींच्या कारवायांना आपण विरोध करणार नाहीं अशा करारनाम्यावर जिवाची भीति दाखवून सही करून घेतली व १२ मार्च १९३८ रोजीं जर्मन सैन्य अकस्मात् ऑस्ट्रियांत शिरून त्याच दिवशीं ऑस्ट्रिया जर्मनीला जोडल्याचें हिटलरनें जाहीर केलें. झेकोस्लोव्हाकियांतील सुडेटन प्रांतांतील जर्मनांचा छळ होतो आहे असा कांगावा सुरू करून त्यानें सुडेटन प्रांताची मागणी केली. या वेळीं इंग्लंड–फ्रान्स या राष्ट्रांनीं दाखविलेल्या कमकुवतपणामुळें (' म्यूनिक करार पाहा ') व रशियाच्या उत्तेजनामुळें हिटलरनें १५ मार्च १९३९ रोजीं झेकोस्लोव्हाकियाचा अध्यक्ष हाचा यास बर्लिनला बोलावून, व झेकोस्लोव्हाकिया हिटलरच्या संरक्षणाखालीं दिल्याच्या मजकुराच्या कागदावर शूस्निगप्रमाणेंच धमक्या देऊन सही करून घेऊन झेकोस्लोव्हाकिया जर्मनीच्या साम्राज्यांत लष्करी बळावर सामील केला. लौकरच (२२ मार्च १९३९) लिथुआनियाचें मेमेल बंदर त्यानें घेतलें.

आपल्या 'माइन काम्फ' या पुस्तकांत हिटलरनें रशिया व बोल्शेव्हिझम् विरुद्ध किती तरी कडवट लिहिलें आहे. ३० जानेवारी १९३७ मध्यें झालेल्या राइश्स्टॅग पुढील त्याच्या भाषणांत तो म्हणतो Bolshevism is the doctrine of world revolution, i. e., world destruction. It is necesary that we should avoid all close contact with the bearers of these poisonous bacilli. तसेंच आपण रशियाशीं कधींच तह करणार नाहीं असें त्यानें अनेक वेळां ठासून सांगितलें असतांहि २३ ऑगस्ट १९३९ रोजीं जर्मनी–रशियाचा परस्पर अनाक्रमणाचा तह झाला. पोलंडकडून कॉरिडॉर व डान्झिगची मागणी करून व पोलंडमधील जर्मनांचा छळ होतो आहे असा कांगावा करून ३० ऑगस्ट १९३९ रोजीं त्यानें पोलंडला निर्वाणीचा खलीता पाठविला व आपल्या मागण्या नाकारल्याचें लगेच जाहीर करून १ सप्टें. रोजीं हिटलरनें पोलंडविरुद्ध युद्ध सुरू केलें. नंतर पोलंडशीं झालेल्या तहानुसार ३ सप्टेंबर १९३९ रोजीं जर्मनीविरुद्ध ग्रेटब्रिटन व फ्रान्स यांनीं युद्ध जाहीर केलें.

युद्ध सुरू झाल्यानंतर १४ सप्टेंबर रोजीं त्यानें पोलंड जिंकला. ९ एप्रिल १९४० रोजीं डेन्मार्क जिंकून नॉर्वेवर स्वारी केली. १ मे १९४० रोजीं नॉर्वे-

तील लढाई संपल्याचें त्यानें जाहीर केलें. १० मे १९४० रोजीं लक्झेंबर्ग, हॉलंड, बेल्जियम व फ्रान्सवर चढाई सुरू केली. १५ मे १९४० रोजीं हॉलंड शरण आलें. २७ मे १९४० रोजीं बेल्जियमच्या राज्यानें शस्त्र खालीं ठेवलें. १७ जून १९४० रोजीं फ्रान्सचे मुख्य प्रधान माँ. पेताँ यांनीं शरणागती जाहीर करून २४ जून १९४० रोजीं फ्रान्स–जर्मनीचा तह झाला. १० जून १९४० रोजीं मुसोलिनीनेंहि फ्रान्स–इंग्लंड-विरुद्ध युद्ध पुकारलें. आतां जर्मनीच्या विमानाच्या स्वाऱ्या ग्रेटब्रिटनवर चालू आहेत व बाल्कन राष्ट्रांत हिटलर आपलें वर्चस्व नेटानें वाढवूं लागलेला आहे.

ॲडॉल्फ हिटलर ही विसाव्या शतकांतील एक महान् व्यक्ति आहे. त्याचें तत्त्वज्ञान नॅशनल सोशॅ-लिझम् व नॉत्सिझम् या नांवानें प्रसिद्ध आहे. आज युरोपियन संस्कृतीचें अस्तित्व त्याच्या धोरणावर अवलंबून आहे, एवढेंच नव्हे तर लोकशाही व जागतिक शांतता हीहि त्याच्या सत्तेमुळें धोक्यांत आलेली आहे.

हिंडेनबुर्ग, पॉल फॉन (१८४७–१९३४):–जर्मनीचा भीष्माचार्य. जन्म पासेन येथें ता. १ ऑक्टोबर १८४७ रोजीं झाला. लष्करी शिक्षण मिलिटरी कॉलेजांत झालें. १८६५ सालीं प्रशियन सैन्यांत प्रवेश केला. आस्ट्रो-प्रशियन युद्ध व पुढें फ्रँको-प्रशियन युद्ध या दोन्ही युद्धांत लढला. १९०० सालीं मेजर, जनरल व पुढें पायदळाचा सेनापती झाला. १९११ सालीं सेवानिवृत्त झाला. १९१४ चें महायुद्ध सुरू झालें त्या वेळीं हिंडेनबुर्ग हॅनोव्हर येथें होते. त्याला बोलावून पूर्व प्रशियामधील जर्मन सैन्याचें आधिपत्य देण्यांत आलें. टॅनेन्बर्गच्या लढाईत त्यानें रशियनांचा पराभव केला. सप्टेंबर महिन्यांत ऑस्ट्रो–जर्मन सैन्याच्या सरसेनापतीच्या पदावर त्याची नेमणूक झाली. त्यानें वॉर्सावर एकामागून एक असे दोन हल्ले केले. दुसऱ्या हल्ल्यांत त्यानें रशियनांचा कुंढो येथें पराभव केला. या विजयाबद्दल त्याला फील्ड मार्शल करण्यांत आलें. लवकरच तो चीफ ऑफ जनरल स्टाफ झाला. महायुद्धाच्या शेवटीं शेवटीं झालेली पश्चिम आघाडीवरील चढाई त्याच्या नेतृत्वाखालीं झाली. जर्मनींतील राज्यक्रान्तीनंतरहि जर्मन सैन्याचें आधिपत्य याच्याकडेच होतें. १९२५ सालीं राष्ट्राध्यक्षपदावर हा निवडून आला. या पदावर असतांना त्यानें मोठ्या देशाभिमानानें राष्ट्राची सेवा केली. जर्मन राष्ट्रानें १९३२ सालच्या निवडणुकींत पुनः एकवार प्रचंड बहुमतानें राष्ट्राध्यक्षाचा मुकुट त्याच्या डोकीवर ठेवून त्याच्यावरील आपला अढळ विश्वास व्यक्त केला. हिटलर अधिकारारूढ झाल्यावर हा २ ऑगस्ट १९३४ रोजीं मृत्यु पावला. जर्मन राष्ट्रानें मोठ्या थाटानें प्रेतयात्रा काढून या वीराचा सन्मान केला.

हिंदूकुश:–हिमालयाच्या वायव्येकडील पर्वत. 'हिंदूकुश' या शब्दाचा अर्थ चंद्राचा पर्वत. उंचीच्या बाबतींत हा हिमालयाच्या खालोखाल भरतो. वायव्य-भागांत जेथें हिमालयाचा शेवट आहे तेथूनच याचा प्रारंभ होतो. हिंदूकुशचें पहिलेंच मोठें शिखर तिरीच-मिरच्याजवळ पण उत्तरेस २५४०९ फूट उंचीचें आहे. प्रथमतः हा पश्चिमेकडच्या बाजूस निघून नंतर उत्तरेकडे वळतो व पुनः तो पश्चिमेकडे जातो.

याची खावकखिंडीच्या पूर्वेस दुसरी एक पर्वताची रांग सुरू होते. हीच रांग पुढें ईशान्य व वायव्य या दोन दिशांना जाते. 'कोकचा' हें नांव या रांगेचेंच. खावकखिंडीपासून एक शाखा वायव्य दिशेनें कटाधान किंवा कुंडूझकडे जाते. हिंदूकुशाच्या बऱ्याच श्रेणी अशा तऱ्हेच्या आहेत.

या पर्वताची लांबी ३५० मैल, रुंदी २०० मैल असून सरासरी उंची १८००० फूट आहे. कांहीं ठिकाणीं याचीं शिखरें २०००० पासून २५००० फुटांपर्यंत उंच आहेत. या ठिकाणीं झाडी फारच अल्प आहे. १५००० फुटांवर नेहमीं बर्फ असतें. जरी येथली हवा खराब असली तरी पण वनश्री चांगली आहे. हिमालयावरीलच वनस्पति व प्राणी येथेंहि आहेत.

येथील लोक मिश्र–वर्णाचे. लोकच जर मिश्र तर भाषा कशी शुद्ध असणार! तीहि तशीच. या लोकांचा धर्मदेखील मिश्रच आहे. त्यांच्यामधल्या घरगुती चालीरीति वेगवेगळ्या वाटतात. तसेंच यांच्यांतील राजकीय संस्थाहि निरनिराळ्या प्रकारच्या आहेत. हिंदूकुशमधील दऱ्या व खिंडी चांगल्या सुपीक असून तेथील लोक अगदीं स्वतंत्र बाण्याचे आहेत. सध्यां असलेले इथले लोक हे मुळचे नव्हेत. सध्यांचे या ठिकाणचे लोक मुसलमानी धर्माचे आहेत.

हिंदुधर्म:–आज जगांत जे विविधधर्म विद्यमान आहेत, त्या सर्वांत हिंदुधर्म हा अत्यंत प्राचीन आहे. हिंदुधर्मांतूनच कांहीं तत्त्वें घेऊन जैन व बौद्धधर्म अस्तित्वांत आले. बौद्धधर्माची छाप ख्रिस्तीधर्मावर

पडलेली आहे. ख्रिस्तिधर्मांतील तत्त्वें जाणणारे कांहीं साधु महंमद पैगंबराला भेटले होते व त्यांच्या शिकवणीचा परिणाम पैगंबरावर झाला, अशी माहिती मिळते. यावरून परंपरेनें हिंदुधर्माचें ऋण सर्व धर्मांनीं घेतलेलें आहे, असें सिद्ध होतें.

हिंदुधर्म, जैनधर्म, बौद्धधर्म, शीखधर्म असे हे चार धर्म हिंदुस्थानांतच जन्मलेले आहेत.

कनफ्यूशस धर्म, टाओधर्म, शिंटोधर्म असे हे तीन धर्म चीन व जपानमध्येंच उदयास आले. यहुदीधर्म, पारसीधर्म, मुसलमानी धर्म व ख्रिश्चन धर्म असे हे चार धर्म पॅलेस्टाइन, इराण व अरबस्तान अशा ठिकाणीं उदयास आलेले आहेत.

हिंदुधर्माचें अधिष्ठान

हिंदुधर्माचें अधिष्ठान एक व्यक्ति, एक ग्रंथ, एक संप्रदाय असें नसून याचें अधिष्ठान बुद्धि हें आहे.

'धर्मज्ञ समयः प्रमाणम् वेदाश्च' हे आपस्तंब धर्म सूत्रकाराचें वचन अत्यंत मार्मिक आहे. हिंदुधर्माचें अधिष्ठान धर्मज्ञ, देशकालज्ञ, समयज्ञ असे जे विद्वान त्यांचे समय म्हणजे निर्णय हेंच होय! यालाच पुढें शिष्टाचार असें समजू लागले. 'वेदाश्च' म्हणजे वेदहि या धर्माचें अधिष्ठान आहेत. पण 'च' कारानें आणि प्रथमोच्चार न केल्यामुळें धर्मज्ञांच्या निर्णयाच्या खालोखाल वेदाला प्रामाण्य आहे असें सिद्ध होतें.

हिंदुधर्म हा व्यक्तिप्रधान नाहीं, ग्रंथप्रधान नाहीं, तर तो विचारप्रधान व तत्त्वप्रधान आहे. जैनधर्मसंस्थापक महावीर, बौद्धधर्मसंस्थापक गौतम बुद्ध, ख्रिस्ती धर्म प्रस्थापक ख्राइस्त, इस्लाम धर्म संस्थापक पैगंबर इत्यादि महान व्यक्ति त्या त्या धर्मांच्या संस्थापक समजण्यांत येतात. या व्यक्तींच्या पूर्वी या धर्मांचा मागमूसहि नव्हता. हिंदुधर्माचें तसें नाहीं. हिंदु धर्म हा अनादि आहे. त्याचा संस्थापक कोणीहि नाहीं. राम, कृष्णादि अवतार हेसुद्धां या धर्माची विस्कळित घडी पुन्हां नीट करण्याकरितां पुढें आले. पण तेहि या धर्माचे संस्थापक नव्हेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हिंदुधर्म हा इतका अनादि आहे कीं जेव्हां मनुष्यप्राणी प्रथम उत्पन्न झाला तेव्हांपासून त्याच्याबरोबरच हा धर्म उत्पन्न झालेला आहे.

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।
अनेन प्रसविष्यध्वं... ॥ गीता ॥ अ. ३ श्लो. १०

प्रजापतीनें मानवप्राणि उत्पन्न केला त्याच वेळीं त्याच्या इष्टकामना परिपूर्ण करण्याकरितां धर्म उत्पन्न केला, यावरून या धर्माचें अनादित्व प्रतीत होतें. एक व्यक्ति, एक ग्रंथ, एक संस्कार असली सांप्रदायिक व्यक्तिनिष्ठता हिंदुधर्मांत नाहीं. हिंदुधर्माचें अधिष्ठान व्यक्ति, पोथी व संप्रदाय यांत नसून तें धर्मज्ञांच्या बुद्धींत आहे हें विशेषत्वानें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

हिंदुधर्माचें अधिष्ठान बुद्धि हें असल्यामुळें आणि हा धर्म ऐहिक अभ्युदय आणि पारलौकिक मोक्ष साध्य करून देणारा असा असल्यामुळें या धर्माचें प्रमाणग्रंथहि अनेक आहेत. नेहमीचा संकल्प 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' असा आहे. समाजधारणा व प्रभव एका काळीं श्रौतधर्मानें होत होतीं, त्यावेळीं श्रुतीला महत्व होतें.

'यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानिधर्माणि प्रथमान्यासन्'

यज्ञ हाच एका काळीं मुख्य धर्म होता. पुढें परिस्थिति पालटली. मंत्रकाल मागें पडला. तंत्रकाल सुरू झाल्यावर देवदेवता, देवपूजा हा धर्म पुढें आला. पुराणांतील व्रतांनींहि त्यांत भर घातली. त्यावरून श्रुतीनें समाजधारणेला अपुरेपणा येऊं लागतांच पुढें तंत्रग्रंथ, आगमग्रंथ व स्मृतिग्रंथ आले. तेहि अपुरे पडल्यावर पुराणें आधारास घेतलीं गेलीं. अर्थात् हें विचारस्वातंत्र्य ध्यानांत घेतलें म्हणजे आजच्या कालाला पुरा पडणारा असा नवा धर्मग्रंथ निर्माण करण्यास हिंदुधर्मांतच स्थान आहे.

ज्यायोगें समाजधारणा, समाजप्रभव, वैय्यक्तिक उन्नति, भौतिक प्रगति आणि आध्यात्मिक शांति प्राप्त होईल तोच धर्म होय! या दृष्टीनें हिंदुधर्म हा अनेक विचारी व विद्वान लोकांनीं अनादिकालापासून चालू केला असल्यामुळें वैचारिक दृष्ट्या त्यांत भर पडण्यास पुष्कळ जागा आहे. हिंदु धर्माचे प्रस्तुत जे प्रमाणग्रंथ समजण्यांत येतात त्यांची थोडीशी माहिती देतों.

हिंदुधर्माचे प्रमाणग्रंथ–

धर्मजिज्ञासमानानां प्रमाणं प्रथमं श्रुतिः ।
द्वितीयं धर्मशास्त्रं तु तृतीयं लोकसंग्रहः ॥
–महाभारत

श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
सम्यक्संकल्पजः कामो धर्ममूलमिदं स्मृतम् ॥
–याज्ञ. १–७

अनाम्नातेषु धर्मेषु कथं स्यादिति चेद्भवेत् ।
यं शिष्टा ब्राह्मणा ब्रूयुःस धर्मः स्यादशंकितः ॥
म. अ. १२–१०८

हिंदुधर्म समजून घेण्याचें पहिलें प्रमाण म्हणजे श्रुति (चार वेद) हें होय ! दुसरें प्रमाण धर्मशास्त्र म्हणजे स्मृति, सूत्रें व निबंधग्रंथ हें होय ! तिसरें प्रमाण लोकसंग्रह म्हणजे शिष्टाचार, रूढि हें होय !

श्रुति, स्मृति व सदाचार किंवा शिष्टाचार यांनीं जेव्हां धर्माधर्मविवेक होत नसेल किंवा श्रुति, स्मृति व सदाचार यांमध्यें परस्पर विरोध भासत असेल, त्यावेळेला आपल्या मनपसंतीप्रमाणें वागावें. इतक्यानेंहि न भागलें तर उदात्त बुद्धीनें व शुद्ध मनानें विचार करीत करीत सत्संकल्पानें उत्पन्न होणारी जी मनकामना म्हणजे अन्तःस्फूर्ति किंवा मनाची प्रेरणा तीच प्रमाण समजून चालावें.

श्रुति, स्मृति, सदाचार, स्वतःचा विवेक व आत्मस्फूर्ति यांच्या सहाय्यानें विचार करण्याची पात्रता प्रत्येकांत असते असें नाहीं; आणि परिस्थिति भिन्न झाल्यामुळें धर्म आणि अधर्म कशास समजावें असे प्रसंग श्रुतिस्मृतींत कधीं न सांपडणारे उद्भवूं शकतात. अशा वेळीं त्या काळचे शिष्ट ब्राह्मण म्हणजे विद्वान निर्मत्सर, निरहंकारी व समतोल बुद्धीचे विद्वान जें कांहीं सांगतील तो धर्म समजावा, असा या वरील तीन्ही श्लोकांचा आशय आहे. या प्रमाणग्रंथांसंबंधीं थोडी अधिक माहिती देतों.

श्रुति म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असे चार वेद होत. या वेदांमध्यें मंत्र, ब्राह्मण व आरण्यकें असे तीन भाग आहेत. हे सर्व मिळून चार वेद प्रमाणग्रंथामध्यें मुख्य समजले जातात. यानंतर दुसरें प्रमाण म्हणजे धर्मशास्त्र होय ! धर्मशास्त्रामध्यें धर्मसूत्रें, स्मृति अशा सर्वांचा समावेश होतो. जवळ जवळ शंभर स्मृतिकारांचीं नांवें आढळतात. याज्ञवल्क्यस्मृतींत वीस स्मृतिकारांचा उल्लेख आहे. हेमाद्रि, वीरमित्रोदय व मयूख या निबंधग्रंथांमध्यें अनुक्रमें बत्तीस, छत्तीस व सत्त्याणव स्मृतींचा उल्लेख आहे. श्रौतसूत्रांचा अग्निहोत्र व यज्ञ यांशीं संबंध आहे. पण धर्मसूत्रें, तंत्रग्रंथ, आगमग्रंथ यांचा स्मृतींमध्येंच समावेश होतो.

आपण हल्लीं कोणतेंहि धर्मकार्य करतांना जो संकल्प उच्चारतो, तो 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' असा आहे. वरील श्लोकांत पुराणांचा साक्षात् उल्लेख नसला तरी पुराणालासुद्धां जुना इतिहास म्हणून हिंदुधर्मांत प्रमाण मानतात. स्मृतींच्या बरोबरीनें जवळ जवळ पुराणांतील सिद्धांतांना मान्यता आहे.समाजांत असलेलीं अनेक व्रतें बहुतेक पुराणांतूनच घेतलेलीं आहेत. मुख्य पुराणें अठरा असून उपपुराणेंहि अठरा आहेत. याशिवाय शिष्टाचार, रूढी, देशाचार, अर्थशास्त्र, व्यवहार या सर्वांचाहि धर्माधर्मविचाराचे वेळीं प्रमाण म्हणून उपयोग करण्यांत येतो.

चार वेद हे जसे प्रामुख्यानें प्रमाणग्रंथ समजण्यांत येतात, त्याचप्रमाणें स्मृतिग्रंथांतील आपस्तंब, बौधायन, गौतम, वसिष्ठ व विष्णु हीं धर्मसूत्रें आणि मनु, याज्ञवल्क्य, पराशर, वेदव्यास, देवल इत्यादि स्मृति प्रमाण मानण्यांत येतात. शंभर स्मृतींची आणि छत्तीस पुराणांची नामावळी येथें दिलेली नाहीं. ती माहिती पुराणें व स्मृति या शीर्षकांत वाचकांस वाचावयास मिळेल.

शिष्टाचार, देशाचार व रूढि यांचें परिगणन कोणत्याहि ग्रंथांत स्वतंत्र असें नाहीं. त्या त्या ठिकाणीं जो देशाचार, जी रूढि, जो व्यवहार असेल तो प्रमाण होय ! उदाहरणार्थ कांहीं ब्राह्मणांच्या घरीं नवरात्रांत मांग किंवा चांभार या जातींतील सुवासिनीला अष्टमीच्या दिवशीं जेवावयास बोलावतात. कांहीं जातींमध्यें लग्नसंस्कारांत न्हावी आणि कुंभार यांना फार महत्त्व असतें. त्यांची मान्यता मिळाली तरच तो लग्नसंस्कार परिपूर्ण झाला असें समजण्यांत येतें. कांहीं जातींत लग्नाच्या पूर्वी पशुहननाची चाल असते. अशा तऱ्हेचे अनेक देशाचार अथवा रूढि त्यांच्या मागें कांहीं इतिहास असतो असें समजून प्रमाण मानण्यांत येतात.

वरील श्लोकांत ज्यांचा स्पष्ट उल्लेख नाहीं, पण जे धर्मशास्त्राचे प्रमाणग्रंथ समजण्यांत येतात ते ग्रंथ म्हटले म्हणजे स्मृतिग्रंथांवर टीका करणारे निबंधग्रंथ होत. नारदस्मृतीवरील असहाय नामक टीकाकार, याज्ञवल्क्यस्मृतीवरील विश्वस्वरूपाची टीका, मनुस्मृतीवरील मेधातिथीची टीका, याज्ञवल्क्यस्मृतीवरील मिताक्षरा टीका प्रमाण मानण्यांत येते. हिचा कर्ता विज्ञानेश्वर या नांवाचा होता.

बंगालमध्यें जीमूतवाहन हा निबंधकार दायभाग, व्यवहारमातृका या बाबतींत प्रमाण मानण्यांत येतो. स्मृतिचंद्रिका हा देवणभट्टाचा निबंधग्रंथ मद्रासकडे

प्रमाण मानतात. अपरार्क या याज्ञवल्क्यस्मृतीवरील टीकाकाराला व मनुस्मृतीवरील कुल्लुकभट्ट या टीकाकाराला कांहीं भागांत बरेंच महत्त्व आहे.

मैथिल देशांत चंडेश्वराचा स्मृतिरत्नाकर ग्रंथ प्रमाण मानण्यांत येतो. तिकडे वाचस्पतिमिश्र या निबंधकारालाही महत्त्वाचें स्थान आहे. मद्रासकडे पराशरस्मृतिवरील टीकाकार माधवाचार्य याला प्रमाण मानतात. बंगाल प्रांतात जीमूतवाहनाखालोखाल शूलपाणी या ग्रंथकाराला प्रामाण्य आहे. ओरीसा प्रांतांत प्रताप रुद्रदेव याचा सरस्वती विलास हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. कमलाकर भट्टाचा शूद्र कमलाकर व निर्णयसिंधू, नीलकंठभट्टाचा मयूख हा ग्रंथ महाराष्ट्रांत व कोकणांत मान्य आहे. मित्रमिश्रानें लिहिलेला वीरमित्रोदय हा ग्रंथ संयुक्तप्रांतांत प्रसिद्ध आहे. नागोजीभट्ट, बाळंभट्ट बाबा पाध्ये इत्यादि विद्वानांचे धर्मशास्त्रावरील ग्रंथ महाराष्ट्रांत मान्य आहेत. आजचा हिंदु लॉ म्हणजे दायभाग, दत्तक व विवाह हा या निबंधग्रंथांवरच अधिष्ठिलेला आहे.

बुद्धिप्रामाण्य–हिंदुधर्माचे प्रमाणग्रंथ श्रुति, स्मृति, सूत्रें, पुराणें, निबंधग्रंथ इत्यादि जरी असले तथापि त्यांचाहि स्पर्श होऊं शकत नाहीं अशीं कांहीं धर्मस्थळें असतात. तेथें ना रूढि, ना सदाचार, ना ग्रंथाधार अशी स्थिति असते. अशा वेळेला हिंदुधर्मानें त्या माणसास पूर्ण स्वातंत्र्य दिलेलें आहे, हें या धर्माचें वैशिष्ट्य आहे. बुद्धिस्वातंत्र्य हें व्यवहारांत मान्य करणारा हा उदार धर्म आहे. पारमार्थिक क्षेत्रांत जसें आत्मस्वातंत्र्य मान्य केलें आहे तसेंच व्यवहारक्षेत्रांत बुद्धिस्वातंत्र्य देणारा हा उदार धर्म आहे. जेथें श्रुति, स्मृति व सदाचार यांनीं काम भागत नाहीं तेथें स्वतःची मनपसंती मान्य केली आहे. ही मनपसंती श्रुति, स्मृति, सदाचारांमध्यें परस्पर विरोध येईल त्या वेळींच उपयोगांत आणावी; पण जेथें वरील प्रमाणांचा स्पर्शहि होऊं शकत नाहीं अशा ठिकाणीं स्वतःची प्रेरणा, अन्तःस्फूर्ति हीच प्रमाण मानली पाहिजे. प्रसंगीं शिष्टांना विचारूनहि काम भागत नाहीं. त्यांनीं दिलेला निर्णय जेव्हां आपल्याला पटत नाहीं, अशा वेळीं तुझें सत्प्रवृत्त मन जें सांगेल, त्याप्रमाणें तूं वाग, अशी हिंदुधर्माची आज्ञा आहे. गीतेचे शेवटीं अर्जुनाला भगवंतांनीं हेंच सांगितलेलें आहे.

भगवंतांनीं अर्जुनाला जें कांहीं सांगावयाचें होतें तें सर्व सांगितलें आणि शेवटीं त्याला बुद्धिस्वातंत्र्य देऊन बजावलें कीं,

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥६३॥

–गी. अ. १८

या सर्वांचा विचार करून तुला जें पटेल, तुझा आत्मा तुला जी प्रेरणा देईल त्याप्रमाणें वाग. मी सांगतों म्हणून तूं अमुक कर, असा बलात्कार गीतेंत नाहीं. तर बुद्धिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य ही जी परंपरा तीच गीतेंतहि दाखविलेली आहे.

कांहीं भ्रामक कल्पना

हिंदुधर्माचीं मुख्य अंगें तीन आहेत. आचारधर्म, नीतिधर्म आणि तत्त्वज्ञान हीं तीं होत! आचारधर्म शरीरावरील पोषाखासारखा आहे. नीतिधर्म शरीराच्या अवयवासारखा आणि तत्त्वज्ञान हें शरिरांतील आत्म्याप्रमाणें आहे. हिंदुधर्माचें आजचें स्वरूप हें बौद्ध संस्कृति आणि वैदिक संस्कृति यांनीं मिश्र असें आहे. त्यांतच इस्लाम व खिश्चन संस्कृतीच्या संसर्गानें कांहीं थोड्या संस्कारांची भर घातली आहे. तसें होणें अपरिहार्य आहे. हिंदुधर्माचें बुद्धपूर्वकालीन स्वरूप प्रवृत्तिपर, अभ्युदयकारक, अत्यंत तेजस्वी, जयस्वी, आक्रमणशील आणि उत्साहवर्धक होतें. पण बुद्धोत्तर कालांत निवृत्तितत्त्वज्ञानाची समाजावर दांडगी छाप पडली. त्यामुळें समाजाला मरगळ आली. संसार दुःखमय आहे, असार आहे, क्षणभंगुर आहे, असलें तत्त्वज्ञान रूढ झालें. त्यामुळें प्रपंचाचा, राष्ट्राचा व व्यवहाराचा अपकर्ष होऊं लागला. पारमार्थिक कल्पनेला नसतें महत्त्व आलें. समाजाचें ध्येय बदललें. दैववाद, देववाद, कलिवाद, अवतारवाद, शिवाशीव, जन्मजात उचनीचता, हीं सर्व बोकाळलीं आणि धर्माचा इहलोकाशीं कांहीं संबंध नाहीं, तो केवळ परलोकसंबद्ध आहे, अदृष्टाकरितां आहे, अपूर्वाकरितां आहे, धर्माचरणाचें फळ मेल्यावरच मिळतें, इत्यादि अनिष्ट विचारसरणी समाजांत प्रभाव पावूं लागली. प्रस्तुत रूढ असलेल्या या विचारसरणीचा थोडा परामर्श घेणें अप्रासंगिक नाहीं.

धर्म हा शरीरधारणा, मनोधारणा, बुद्धिस्वातंत्र्य, राष्ट्रीय अभ्युदय यांकरितां आहे. तो केवळ अदृष्टाकरितां, अपूर्वाकरितां, परलोकाकरितां नाहीं. शौच,

मुखमार्जन, स्नान हा आचारधर्म शरीरधारणेकरितां आहे. व्यवसाय, अर्थोत्पादन, उद्योगादि धर्म, वैय्यक्तिक व राष्ट्रीय जीवनाकरितां आहेत. धर्माचें फळ अदृष्ट आहे असेंहि नाहीं. दान, अध्ययन, उपासना, अनुष्ठान इत्यादींचें फल प्रत्यक्ष आहे. सत्पात्रीं दान करावें, कुपात्रीं करूं नये, उगाच एकादा फकीर दाराशीं कुत्रीं घेऊन आला कीं दत्ताचा अवतार समजून त्याला पैसा देऊं नये, अशा दंडकावरून अभ्युदयकारक दान करावें हेंच सिद्ध होतें. धर्मामध्यें तारतम्य आहे, याचें कारण तो पुरुषबुद्धीला गम्य आहे. वाटेंत लघवी करूं नये, पाण्यांत थुंकूं नये, झाडाखालीं शौचास बसूं नये, म्हातारे व गरोदर स्त्रिया आकुंचित मार्गांत भेटल्यास त्यांना प्रथम मार्ग द्यावा वगैरे आचारांवरून धर्म हा सद्गुणसंवर्धन, शील व दैवी संपत्तीचें अर्जन अशाकरितां आहे हें स्पष्ट आहे. धर्माचरणाचें अदृश्य फल कांहीं असूं शकेल. माणसाला सर्वच कांहीं समजतें असें नसलें तरी जेवढें त्याला प्रत्यक्ष प्रमाणानें व अनुमानानें कळतें तें सर्व ध्यानीं घेऊन त्यानें वागावें व तसें वागण्याचें स्वातंत्र्य हिंदु धर्मांत आहे. म्हणूनच आचारधर्मांत वेळोवेळीं परिवर्तन झालेलें आहे; व तसें आजहि करण्याचा अधिकार आहे.

परिवर्तनाचीं उदाहरणें–(अ) पूर्वीं एका काळीं मांसाहार त्रैवर्णिकांत रूढ होता. यज्ञ, श्राद्ध व मधुपर्क अशा तीन प्रसंगीं मांस अवश्य लागे. श्राद्ध प्रसंगीं ब्राह्मणांना कोणकोणत्या पशुपक्ष्यांचें मांस खावयास घातलें म्हणजे पितर कसकसे तृप्त होतात याचें वर्णन आपस्तंब, गौतम, बौधायन इत्यादि धर्मसूत्रांत व मन्वादि स्मृतींत पुष्कळ आलेलें आहे. पण पुढें पराशरस्मृतीपासून मांसाहाराचा अनुल्लेख आढळतो. प्रजापतिस्मृतीमध्यें तर ब्रह्मदेवानें मांस जसें स्वादिष्ट, बलिष्ठ होतें तसा माष म्हणजे उडीद हा पदार्थ उत्पन्न केला व श्राद्धप्रसंगीं आज मांसाच्या जागीं माष म्हणजे उडदाचा वडा रूढ झालेला आहे.

(आ) पूर्वीं मद्यप्राशन होत असे. मद्याचे निरनिराळे प्रकार असत. कोणी कोणतें मद्य प्यावें याचेहि नियम आहेत. पण पुढें शुक्राचार्यांनीं त्याची मर्यादा घालून दिली.

(इ) एका काळीं विवाहसंस्था ही अस्तित्वांत नव्हती, असें आदिपर्वांतील श्वेतकेतूच्या कथेवरून दिसतें. त्यानेंच विवाहाची मर्यादा सुरू केली असें दिसतें.

एका काळीं समाजांत आठ प्रकारचे विवाह रूढ होते. समाजाच्या प्रगतीच्या त्या भिन्न भिन्न अवस्थाच असें म्हटलें तरी चालेल. प्रयोग करीत करीत आज समाज ब्राह्म व गांधर्व विवाहापर्यंत आतां आलेला आहे.

(ई) एकाकालीं अमुक वर्णानें अमुकच व्यवसाय करावा असा दंडक होता. परंतु पुढें त्यावर निर्वाह होईना. म्हणून युगधर्माप्रमाणें व्यवसाय करून जगावें असें प्रजापतीनें सांगितलें आहे. अध्ययन, याजन व प्रतिग्रह या तीन उद्योगावर ब्राह्मणाचें भागेना, म्हणून त्याला कृषीची परवानगी दिली. कृषिकर्मानेंहि तो जगेना म्हणून त्याला व्यापाराची परवानगी दिली. पुढें ज्या ज्या युगांत जो जो व्यवसाय समाजाच्या धारण पोषणाला अवश्य असेल तो तो करून जगावें, असें प्रजापतीनें सांगितलें आहे.

'युगधर्मेण वर्णानां धनं गाह्यं द्विजातिभिः'

(उ) पूर्वीं एका काळीं त्रैवर्णिकामध्यें 'नियोग' ही संस्था होती. नियोग म्हणजे वडील भावानें धाकट्या भावाच्या विधवेच्या ठिकाणीं पुत्रोत्पादन करणें. ही चाल पुढें अनिष्ट ठरली व नियोग बंद करण्यांत आला. नियोगाच्या ठिकाणीं विधवा–विवाह रूढ झाला. विधवा विवाहाला मान्यता देणारे वशिष्ठ, पराशर, नारद इत्यादि स्मृतिकार होत.

(ऊ) खाण्याच्या पदार्थासंबंधानें स्मृतिग्रंथांत अनेक निर्बंध आहेत. ते सर्व पाळावयाचे म्हणजे उपाशीच राहाण्याचा प्रसंग यावयाचा. परंतु समाजानें आज खाण्याच्या पदार्थामध्यें आरोग्यशास्त्रानुसार विलक्षण परिवर्तन केलेलें आहे व तें आवश्य, योग्य आणि न्याय्यहि आहे.

(ए) यंत्रपूर्वकालीं समाजस्थितीमध्यें कृषि हा मुख्य व्यवसाय होता. त्यामुळें स्पर्शास्पर्शाच्या कल्पना निराळ्या होत्या. परंतु आतां सर्व जीवन यंत्रारूढ झालें असल्यामुळें समाजांतील स्पर्शास्पर्शाच्या कल्पना झटाझट पालटत आहेत व त्या अवश्य पालटल्याच पाहिजेत.

(ऐ) पूर्वीं एका काळीं बारा प्रकारच्या पुत्रांना मान्यता होती. आज आपण औरस व दत्तक या दोनच पुत्रांना मान्यता देतों. क्षेत्रज, गूढज, कृत्रिम, अपविद्ध, कानिज, सहोढ वगैरे पुत्रांना हल्लीं समाजांत स्थान नाहीं व कायद्याचीहि मान्यता नाहीं.

(ओ) पूर्वी यज्ञामध्यें पशुहनन अवश्य असे. पुढें अहिंसेचें तत्त्वज्ञान बळावल्यामुळें पिष्टपशूची प्रथा मान्य होऊं लागली.

(औ) अनेकभार्यात्व व अनेक पतित्व, सती, दत्तक अशा क्षेत्रांतहि पुष्कळ परिवर्तन झालेलें आहे.

(अं) एका कालीं चातुर्वर्ण्य नव्हतें, त्रैवर्णिक हीच संस्था होती. चौथा वर्ण जो शूद्र तो दूर राहाणारा, असंस्कृत आणि स्मशानतुल्य होता. तो हळुहळु त्रैवर्णिकाजवळ आला, त्यांच्या सेवेंत आला, तो स्वैपांकघरांत शिरला, त्याच्या हातचें अन्न आर्यांना चालूं लागलें. 'आर्याधिष्ठिताः शुद्राः पाकसंस्कार्तारास्यु'—आपस्तंब

पुढें सतशूद्रांचें घरीं ते सत्‌शूद्र म्हणून भोजनास हरकत नाहीं असें ठरलें. अनुलोम विवाहहि होऊं लागले. तात्पर्य पुढें चौथा वर्ग जो शूद्र, दस्यु, अनार्य यांचा. त्याला चातुर्वर्ण्यांत समाविष्ट करण्यांत आलें.

हिंदुधर्माचें हें परिवर्तनशीलत्व लक्षांत घेतलें म्हणजे आज समाजसंघटनेकरितां व; बलवर्धनाकरितां इष्ट व योग्य असलेल्या सुधारणा करण्याचा पूर्ण अधिकार आहे व तें धर्मशास्त्राला धरून आहे असें सिद्ध होतें.

नीतितत्त्वें परिस्थितिसापेक्ष असतात—आचारधर्मच परिवर्तनशील आहे व तो परिस्थितिसापेक्ष आहे. इतकेंच नव्हें तर अहिंसा, सत्य, अस्तेय इत्यादि नीतितत्त्वेंसुद्धां परिस्थितिसापेक्षच आहेत. अहिंसेकरितां अहिंसा नाहीं, सत्याकरितां सत्य नाहीं, तर ही दोन्ही समाजधारणेकरितां आहेत. प्रसंगीं हिंसा करूनहि समाजहित साधावें. 'नरो वा कुंजरो वा' असें बोलूनहि समाजाचें कल्याण करावें लागतें. सत्य म्हणजे शाब्दिक सत्य नसून तें वास्तविक सत्य पाहिजे.

यद्‌भूतहितमत्यंतं तत्सत्यमितिधारणा ।

—महाभारत.

असा महाभारताचा सिद्धांत आहे. शाब्दिक सत्यापेक्षां समाजाचें हित ज्यांत साधेल तेंच सत्य होय! खलहिंसा करून, आततायींचा वध करून जर समाजस्वास्थ्य उत्पन्न होत असेल तर ती हिंसा नसून अहिंसाच होय! सत्य, अहिंसा, अस्तेय इत्यादिसंबंधाचें मार्मिक व व्यावहारिक प्रतिपादन महाभारतांत ठिकठिकाणीं भगवान व्यासांनीं केलेलें आहे. त्यावरून नीतितत्त्वें कशीं परिस्थितिसापेक्ष असतात याची कल्पना येते.

हिंदु धर्माचें अविनाशी स्वरूप—आचारधर्म, नीतिधर्म हा जसा परिस्थितिसापेक्ष आहे तसें तत्त्वज्ञान नाहीं. तथापि तत्त्वज्ञानसुद्धां मानवी ज्ञानाच्या प्रगल्भतेप्रमाणें वाढत असतें. ईश्वर, आत्मा, कर्म, पुनर्जन्म यांसंबंधाचे सिद्धांत एकदम सिद्ध झालेले नसून ते हळुहळू ज्ञानानें, तर्कानें व विचारानें सिद्ध होऊं लागलेले आहेत. मनुष्यसमाजाच्या ज्ञानाच्या सापेक्ष ईश्वराची कल्पना जगांत रूढ झालेली दिसते. त्यामुळें कुराण व बायबल यांतील ईश्वराचें स्वरूप आणि गीता व उपनिषदें यांतील ईश्वराचें स्वरूप यांमध्यें भेद दिसतो. ईश्वराचें विशुद्ध स्वरूप आणि कर्मफलाची प्रक्रिया यांचें प्रतिपादन गीतेइतकें तर्कशुद्ध कोठेंहि नाहीं. हिंदुधर्माचें अविनाशी स्वरूप जर कशांत असेल तर कर्मफलप्रक्रिया, ईश्वर आणि आत्मा या त्रयींतच आहे. एक कर्मफलप्रक्रिया (कर्ता, कर्म आणि फल यांचा संबंध) मानली कीं, क्रमानें ईश्वर, पुनर्जन्म, आत्मा, आत्मसाक्षात्कार वगैरे मानावें लागतें. हिंदुधर्माचें अविनाशी स्वरूप म्हणजे त्याचें अध्यात्म तत्त्वज्ञान हें होय! आज जगांत जी कांहीं तत्त्वज्ञानाची वाढ झालेली आहे असें म्हणतात त्याची मजल अद्याप वैदिक अध्यात्माच्या पुढें मुळींच गेलेली नाहीं. नासदीय सूक्ताच्या मंत्रद्रष्ट्या ऋषींच्या बुद्धीची धांव जगाच्या मूलतत्त्वावर पडली व त्यावेळीं त्यानें जें आत्मस्थितीचें वर्णन केलें त्यापुढें अद्याप कोणताहि तत्त्ववेत्ता गेलेला नाहीं. मनःसमाधान, आत्मप्रसाद, आत्मौपम्य, निर्विषयता, अमानित्व, अदंभित्व इत्यादि लक्षणांनीं युक्त असें हें हिंदुधर्माचें अविनाशी स्वरूप आहे. सर्व जगांतील बुद्धिमंतांना या क्षेत्रांत वाव आहे, परिश्रम करण्यास जागा आहे. एक काल असा येईल कीं, भौतिक व बाह्य अशा पसाऱ्याला कंटाळून अध्यात्मिक शांतीकरितां जगांतील मुमुक्षु अखेरीस हिंदुधर्माच्या या अविनाशी अंगाकडेच धांव घेतील.

हिंदुधर्माचें वैशिष्ट्यः—कांहीं धर्म केवळ प्रवृत्तिप्रधान तर कांहीं केवळ निवृत्तिप्रधान आहेत. हिंदुधर्म हा प्रवृत्ति व निवृत्ति या दोहोंचा समन्वय करणारा आहे. प्रपंचपरमार्थ, प्रवृत्तिनिवृत्ति, अभ्युदयनिःश्रेयस इहपर कल्याण असें साध्य करून देणारा हा धर्म आहे. कांहीं धर्मांची शिकवण प्रवृत्तिपर तर कांहींची केवळ निवृत्तिपर अशी आहे. जैन व बौद्धधर्म प्राधान्यानें निवृत्तिप्रधान आहेत. बौद्धक्रांतीमुळें तेच

निवृत्तीचे संस्कार हिंदुधर्मावर झालेले आहेत. तथापि मूळचा हिंदुधर्म हा निवृत्तिप्रधान नसून प्रवृत्तिनिवृत्तींना सारखाच लेखणारा आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ हेंच सूचित करतात. तीन पुरुषार्थ प्रवृत्तीचे आणि ते साध्य झाल्यानंतर आत्यंतिक सुखाकरितां शेवटचा पुरुषार्थ सांगितलेला आहे, व तो मनुष्यस्वभावाला धरून आहे.

प्रवृत्तिनिवृत्तीचा समन्वय हें जसें एक हिंदुधर्माचें वैशिष्ट्य आहे तसेंच उपासनास्वातंत्र्य हेंहि हिंदुधर्माचें वैशिष्ट्य आहे. इतर धर्मांत अमुकच देव भज, अमक्याच देवाला शरण जा, अमक्याच पद्धतीनें उपासना कर, तसें न केल्यास नरकप्राप्ति होईल इतके संकुचित विचार आहेत; व त्यामुळेंच विशिष्ट देवता व विशिष्ट संप्रदाय यांच्या बाहेरचे जे कोणी असतील त्यांचा दुस्वास त्या धर्माच्या अनुयायांकडून केला जातो. हिंदुधर्म हा फार उदार आहे. त्याच्या पोटांत आस्तिक, नास्तिक अशा सर्वांना जागा आहे. एवढा वेदनिंदक चार्वाक आणि तत्सदृश इतर, परंतु त्यांचा छळ हिंदुधर्मानें केला नाहीं. पारमार्थिक मत, उपासना आणि कर्म या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य देणारा जगांत एक हिंदुधर्मच आहे.

जग हें त्रिविध आहे. माणसें सत्त्व, रज व तमगुणी अशीं असतात. प्रत्येकाला आपापल्या स्वभावाप्रमाणें प्रतीकाची उपासना करावीशी वाटते, तशीतशी त्यानें खुशाल करावी असें गीतामुखानें एकटा हिंदुधर्मच सांगतो.

यो यो यां यां तनुंभक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥२१॥
—गी. अ. ७

जो जो मनुष्य ज्या ज्या स्वरूपाची भक्ति श्रद्धापूर्वक करूं इच्छितो त्या त्या स्वरूपाचे ठायीं त्याची श्रद्धा मी दृढ करितों. कोणत्याही देवतेची उपासना कर, पण ती अहेतुक कर, निर्व्याज प्रेमानें कर, असेंच हिंदुधर्म सांगतो.

भक्तीमध्यें अहेतुकता सांगून हिंदुधर्म जसें उपासना स्वातंत्र्य देतो तसेंच कर्मामध्यें निष्कामता सांगून हिंदुधर्म कर्मस्वातंत्र्यहि देतो.

जग हें कर्माचा परिपाक आहे. मनुष्यांचे संस्कार भिन्न भिन्न असतात, आणि त्या दृष्टीनें माणसें भिन्न भिन्न कर्में करतात. पूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशा चार गटांत विशिष्ट तऱ्हेचीं कर्में समाविष्ट झालेलीं होतीं. अर्थात् त्याबाहेर कर्में नाहींत असें नाहीं. हिंदुधर्म मनुष्याला अमुकच तूं कर्म कर असा निर्बंध घालीत नाहीं. तर सहज कर्म, स्वभावज कर्म, स्वभावानें नियत केलेलें कर्म म्हणजे प्रत्येकाला जें उत्तमांत उत्तम कौशल्यानें कर्म करतां येईल व ज्यामुळें समाजाच्या धारणपोषणाला साह्य होईल तें कर्म मनुष्यानें करावें असा हिंदुधर्माचा संदेश आहे.

ब्राह्मणाच्या मुलाचे संस्कार क्षात्रवृत्तीला अनुरूप असल्यास त्यानें शिपाईगडी होऊन तलवार गाजवावी. चांभाराच्या मुलाचे संस्कार जर विद्येला अधिक अनुकूल असले तर त्यानें संस्कृत शिकून मोठें पांडित्य मिळवावें. धनगराच्या मुलाला जर व्यापारी व्यवसायांत अधिक गोडी वाटत असेल तर त्यानें मोठा व्यापारी होऊन जगांत नांव मिळवावें. थोडक्यांत म्हणजे कोणाहि व्यक्तीच्या बुद्धीची व कर्तृत्वाची खची न होतां त्याला पूर्ण वाव मिळावा व त्याचे नैसर्गिक गुण प्रगट होण्यास कोणतीहि धार्मिक सामाजिक आडकाठी नसावी असें हिंदुधर्माचें तत्त्व आहे. जें जें कर्म मनुष्य करतो त्यांतील कांहीं शरीरधारणेचीं, कांहीं वैयक्तिक व कांहीं सामाजिक कर्तव्यें असतात. वैयक्तिक कर्तव्यांविषयीं आणि सामाजिक कर्तव्यांविषयीं हिंदु धर्म असें सांगतो कीं हीं सर्व कर्तव्यें कर्तव्यबुद्धीनें कर. फलाशेनें स्वतःलाच फळ मिळावें, तें अमुकच दिवसांत मिळावें व तें अमुकच मिळावें, अशा आग्रहानें म्हणजे आसक्तीनें कर्म न करतां अनासक्ति, अनहंकार या वृत्तीनें चांगल्यांत चांगलें जें कर्म कौशल्यानें करतां येईल तें मनुष्यानें करीत राहावें. कर्म म्हटलें कीं त्याला फल हें आहेच. कारण जगांत कोणतेंहि कर्म निष्फल नसतें. कर्मपरिपाकाप्रमाणें आणि निसर्गनियमाप्रमाणें कोणतेंहि कर्म कालपरिपक्व झाल्यावर फलद्रूप होतेंच. आसक्ति धरली म्हणजे फल उत्पन्न होतें व ती न धरली म्हणजे तें उत्पन्न होत नाहीं असें मुळींच नाहीं. कर्त्याच्या इच्छेचा, अनिच्छेचा, आसक्तीचा कर्मफलाशीं कांहीं संबंध नाहीं. कर्मफल ही गोष्ट कांहीं आपल्या हातची नाहीं. कर्म करणें एवढेंच आपल्या हातचें आहे म्हणून प्रत्येकानें निष्कामतेनें कर्म करावें असें हिंदु धर्म सांगतो. भक्तीमध्यें अहेतुकता, कर्मामध्यें निष्कामता, तत्त्वज्ञानांत उदात्तता आणि प्रवृत्तिनिवृत्तीचा समन्वय हें हिंदु धर्माचें वैशिष्ट्य आहे.

'आत्मौपम्य' म्हणजे सर्वत्र आपल्यासारखी पाहाण्याची दृष्टि; ही केवळ हिंदुधर्मानेंच प्रतिपादली आहे. यांतूनच सर्व जगत् हें ईश्वरमय पहाण्याची व अनुभवण्याची दिव्यदृष्टि येते. विश्वबंधुत्वाच्या कल्पनेचें बीजहि आत्मौपम्यांतच आहे. जगाच्या बुडाशीं एक तत्त्व आहे, तेंच सर्वत्र विखुरलेलें आहे, नामरूपात्मक जगतांत सर्वत्र त्याचाच विकास व विलास आहे, अशा भूमिकेवर आरूढ होऊन, स्वानंदसाम्राज्यांत विलीन होण्याचें शास्त्रशुद्ध अध्यात्म तत्त्वज्ञान हिंदुधर्मांतच आहे, व तेंच या हिंदुधर्माचें अविनाशी स्वरूप आहे असें पूर्वी सांगितलेंच आहे.

हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें:-(१) हिंदुधर्म हा मनुष्याला केवळ ईश्वराचा अंश समजत नाहीं, तर साक्षात् ईश्वर होण्याचा अधिकार (म्हणजे नराला नारायण होण्याचा अधिकार) हिंदुधर्म मान्य करतो. उत्क्रांति नियमाप्रमाणें क्रमानें मनुष्य उच्च पदाला खास पोंचणार आहे असा हिंदुधर्माचा सिद्धांत आहे.

(२) चराचराचा नियंता व कर्मफलदाता असा एक ईश्वर आहे. तो निर्गुण, निराकार आहे. तो सर्वत्र अधिष्ठानभूत आहे. ज्याला त्याला या जगांत स्वकर्मानुरूप फल मिळतें. व्यक्तीनें स्वभावनियत कर्में निष्कामतेनें करून तीं समष्टिरूपी परमेश्वराला समर्पण करणें हीच ईश्वराची पूजा आहे.

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥४६॥
गी. अ. १८

(३) जगत् हें मिथ्या, दुःखमय, अभावात्मक, नसून तें परिवर्तनशील, आनंदमय व चैतन्ययुक्त आहे. म्हणून मनुष्यानें चतुर्विध पुरुषार्थ या जगांत साध्य करावेत.

(४) आत्मा अमर व देह नश्वर हें हिंदुधर्मांतील एक श्रेष्ठ तत्त्व आहे. कर्मफलप्रक्रियेप्रमाणें उच्च स्थितीचें आश्वासन हिंदुधर्मानेंच दिलेलें आहे. सर्वभूतात्मैक्य व सर्वभूतहित हें ध्येय ठरवून मनुष्यानें आत्म्याचें अमरत्व लक्षांत घेऊन देहाचा उपयोग स्वसमाज, स्वराष्ट्र व मानव्य यांच्या हिताकरितां करावा.

(५) धैर्य, निर्भयता, तप, त्याग, शुचिता इत्यादि दैवी संपत्तीचीं लक्षणें समाजांत दिसलीं पाहिजेत. जागतिक शांततेचें बीज या दैवी संपत्तींतच आहे.

(६) ऋणत्रयअपाकरणाचें तत्त्व हिंदुधर्मानेंच सांगितलेलें आहे. देव, ऋषि आणि पितर यांच्या ऋणांतून मुक्त होणें म्हणजे कर्तव्य, ज्ञान व संतति यांचें सातत्य कायम ठेवणें समाजधारणेस अत्यंत अवश्य आहे. कुटुंबसंस्था, समाजसंस्था आणि राष्ट्रसंस्था यांचें अस्तित्व या ऋणत्रयअपाकरणाच्या कल्पनेंतच आहे.

(७) संपूर्ण मानवजातीचें संपूर्ण कल्याण हें हिंदुधर्माचें शेवटचें ध्येय आहे.

येथवर हिंदुधर्माचें अधिष्ठान, हिंदुधर्माचे प्रमाणग्रंथ, हिंदुधर्माचें परिवर्तनशीलत्व, हिंदुधर्माचें अविनाशी स्वरूप, हिंदुधर्माचें वैशिष्ट्य आणि हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें यासंबंधाचें विवेचन केलें. आतां हिंदुधर्मावर जीं आक्रमणें अन्यधर्मीयांकडून होत आहेत तीं नष्ट करण्याकरितां व हिंदुधर्म हा संपूर्ण मानवजातीचा धर्म बनविण्याकरितां कोणकोणत्या सुधारणा आवश्यक आहेत याचें विवेचन करतों.

हिंदुधर्मावर प्रथम बौद्धधर्मानें आक्रमण केलें. तें आक्रमण उत्तरेंत शबरस्वामी, कुमारिलभट्ट, पुष्यमित्र, समुद्रगुप्त, विक्रमादित्य, हर्षवर्धन इत्यादींच्या प्रयत्नामुळें पराभूत झालें. दक्षिणेंत श्रीशंकराचार्य, आंध्रभृत्य राजा शातकर्णी, चालुक्य राजे यांच्या प्रयत्नामुळें बौद्ध आक्रमण नष्ट झालें. रजपूत राजांनीं उत्तरेवर स्वाऱ्या करून मगध व ओरिसा प्रांतांतील बौद्धधर्माचें आक्रमण नष्ट केलें. तथापि बौद्धधर्मानें हिंदुधर्माचें तत्त्वज्ञान नष्ट केलें. जीवनाचें रहस्य, सामाजिक आकांक्षा या सर्व बदलून टाकल्या. कलिवाद, दैववाद, दुःखवाद, मिथ्यावाद, संन्यासवाद हे बोकांडीं बसले. अंत्याश्रमाला महत्त्व आलें. शिवाशीव, विटाळ, कटोर जातिबंधनें, जन्मजात उच्चनीचता, खाण्यापिण्याचे फाजील निर्बंध, सोवळें-ओवळें, अदृष्ट, अपूर्व, निवृत्तिपरता, मूर्तिविषयक अद्भुत कल्पना या सर्व बोकाळल्या.

समाजांत अशी अनिष्ट मनोवृत्ति बुद्धोत्तर कालांत उत्पन्न होतांच रानटी, कडवें असें इस्लामचें आक्रमण हिंदुधर्मावर आलें. त्याचा पराभव रजपूत, मराठे, शीख इत्यादींनीं केला. हिंदुधर्म विजयानें जरा डोकें वर काढतो तों विज्ञानाच्या जोरावर पाश्चात्य इंग्रज राष्ट्रानें आक्रमण केलें. आज हिंदुधर्मावर राष्ट्रीय, सामाजिक व धार्मिक आक्रमण चालू आहे. स्वराज्याशिवाय राष्ट्रीय आक्रमण बंद होणार नाहीं. धार्मिक

व सामाजिकदृष्ट्या जीं आक्रमणें होत आहेत तीं नष्ट करण्यास प्रथम हिंदुसमाजाचें मन ताठर बनविलें पाहिजे.

हिंदुसमाजाचें मन ज्या अनेक कारणांनीं दुर्बळ झालेलें आहे, त्यांत शकुन, फलज्योतिष, भुतेंखेतें, कलिकल्पना, दैववाद, अवतारवेड, अपौरुषेयत्व, निवृत्तिपरता, दुःखवाद, संन्यासवाद इत्यादि कारणें प्रथम नष्ट केलीं पाहिजेत.

हिंदुसमाजाचें सामाजिक बल वाढविण्याकरितां हिंदुधर्मांत जी जन्मजात उच्चता, नीचता, शिवाशिव व अस्पृश्यता आलेली आहे तिचा नायनाट झाला पाहिजे. जन्मावलंबी, जन्मपुरस्कृत समाजांत मो मोठे-पणा आहे तो नष्ट होऊन हिंदुधर्मांतील कोणतीहि जाती जन्मतः श्रेष्ठकनिष्ठ नाहीं, स्पृश्य अस्पृश्य नाहीं, तर सर्व माणसें जन्मानें सारख्या योग्यतेचीं आहेत हें तत्त्वज्ञान रूढ झालें पाहिजे. विश्वबंधुत्वाची अवजड कल्पना टाकून समाजबंधुत्वाची, सर्व हिंदु आपण एक आहोंत, सर्व हिंदू बंधू आहोंत अशी समष्टिधर्माची कल्पना नसा-नसांत खेळली पाहिजे. अखिल हिंदूंचा एक संस्कार, अखिल हिंदूंना वेदाधिकार, अखिल हिंदूंची सामु-दायिक एक प्रार्थना, अखिल हिंदूंचा गायत्री हा एक मंत्र, गीता हा तत्त्वज्ञानाचा एक ग्रंथ अशी एकरूपता समाजांत आणली पाहिजे. अखिल हिंदूंचें सामुदायिक भजन, सामुदायिक सहभोजन वरचेवर घडलें पाहिजे. कोणच्याहि हिंदूच्या प्रेतयात्रेला अखिल हिंदूंनीं जमलें पाहिजे. सर्व हिंदूंनीं पाडवा, दसरा, संक्रांत हे सण, तसेंच रामनवमी, गोकुळअष्टमी या जयन्त्या, श्रीगणेश व श्रीशिवाजी हे उत्सव सामुदायिक पद्धतीनें पाळण्यास लागले पाहिजे.

आजचा हिंदुसमाज हा वर्णबद्ध नसून जातिबद्ध आहे. प्रत्येक जातींत निरनिराळा जातिधर्म रूढ आहे. यापुढें वर्णसंस्था अस्तित्वांत येणार नसून, जाति-संस्थाहि राहणार नसून अखिल हिंदूंची एक जाति अशी समाजरचना होण्याचा काल आहे व तो हिंदु-धर्माच्या बलिष्ठतेच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. हिंदुधर्म हा सर्व दृष्टीनें बलवान झाला तर जगांत अखिल मानवांचा धर्म होण्यास हाच पात्र आहे. या धर्माला पूर्वीं मानवधर्म असें नांव होतें. सर्व मनुष्यांचा धर्म म्हणजे हिंदुधर्म होय! ज्यामध्यें संकु-चित कल्पना आहेत, ज्यामध्यें बुद्धिस्वातंत्र्य नाहीं, उपासनास्वातंत्र्य नाहीं, ते अहिंदुधर्म. जागतिक शांतता असल्या धर्मांनीं राहाणार नाहीं. सर्व जगांत मानवांच्या ठिकाणीं बंधुत्व, सख्य, प्रेम नांदावें, समता, स्वातंत्र्य यांचा लाभ सर्व मनुष्यांना मिळावा, जगताचें कल्याण व्हावें अशी जर इच्छा असेल तर जगाला आज ना उद्यां हिंदुधर्माकडेच धांव घ्यावी लागेल.

कोणी छलबलानें, कोणी आमिषानें, तर कोणी अन्य कृत्रिम उपायानें आपल्या धर्मामध्यें इतर धर्मांतील माणसें ओढून घेत आहेत. हिंदुधर्मानें आजवर हा असला अत्याचार केलेला नाहीं. हिंदुधर्म हा आपलें तत्त्व शिकवितो, इतरांस शेजारधर्मानें राहण्याचें आश्वासन देतो, हळुहळु मुरत मुरत आमच्या धर्माचे संस्कार ग्रहण करण्यास सांगतो. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' असें वैदिक मंत्रद्रष्टा म्हणतो, याचा अर्थ जुलमानें अडचणीचा लाभ घेऊन छलबलानें प्रलोभन दाखवून अनार्यांना आर्य करा असा नाहीं. तर इतर जे असंस्कृत, धर्मविहीन, अनार्य वृत्तीचे आहेत त्यांची संस्कृति हळु हळु बदलून त्यांना मानवधर्माचे घटक करा, मनुष्यत्वाचें त्यांना शिक्षण द्या, त्यांच्यामध्यें सुहृद्भाव उत्पन्न करा, त्यांची असुरी संपत्ति नष्ट करा म्हणजेच 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' हें तत्त्व सिद्धीस जाईल. स्वतः तेजस्वी, जयस्वी, मनस्वी आर्य बना आणि जगाला आपल्यासारखे आर्य करा, असा हिंदुधर्माचा संदेश आहे.

हिंदुव्यवहारधर्मशास्त्रः—'हिंदुव्यवहारधर्मशास्त्र' हा शब्दप्रयोग 'हिंदूकायदा' या अर्थानें केला आहे. 'हिंदूकायदा' या सोप्या व रूढ झालेल्या शब्द-प्रयोगाऐवजीं एवढा लांबलचक व कठीण शब्दप्रयोग करणें योग्य नव्हें असें कित्येकास वाटण्याचा संभव आहे. तथापि हिंदूच्या धर्मशास्त्रांतच आचार व व्यवहार यासंबंधींचे नियम सांगितले असल्यामुळें 'व्यवहारधर्मशास्त्र' या शब्दप्रयोगानें या नियमांच्या यथार्थ स्वरूपाची जितकी सुस्पष्ट कल्पना येते तितकी 'कायदा' या शब्दानें येत नाहीं. 'कायदा' (Law) या शब्दाची पाश्चात्य व्याख्या व कायदा करण्याची पाश्चात्य पद्धति यांची पकड ज्यांच्या मनावर बसली आहे असे पौर्वात्य व पाश्चात्य पंडित हिंदुधर्मशास्त्रां-तर्गत आचार व व्यवहार याविषयींच्या नियमांना कायदा या नांवानें संबोधण्यासहि तयार नाहींत. पाश्चात्य पंडितांच्या मतें कायदा म्हणजे आचार व व्यवहार या-

विषयींचे प्रजेनें पाळावेत म्हणून राजसत्तेनें केलेले नियम. हे नियम म्हणजे राजाज्ञा. राजाज्ञापालन करणें हें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य; या कर्तव्यच्युतिबद्दल अर्थातच नागरिकाला प्रायश्चित्त भोगावें लागतें. पाश्चात्यांच्या या कल्पनेप्रमाणें "ज्यांची राजसत्तेकडून सक्तीनें अम्मलबजावणी केली जाते असे राजसत्तेनें प्रजेकरितां केलेले नियम म्हणजे कायदा." ऑस्टिन या पाश्चात्य पंडिताची ही कायदा या शब्दाची व्याख्या. ज्याला सांप्रत 'हिंदू कायदा' म्हणतात तो प्राचीन पंडितांनीं लिहिलेल्या स्मृत्यादि ग्रंथांवर आधारलेला असल्यानें त्याला मुळांत राजसत्तेचें पाठबळ नाहीं; म्हणून 'हिंदू कायदा' ह्या शब्दप्रयोग चुकीचा आहे असें पाश्चात्य पंडितांचें म्हणणें. परंतु कायदे कसे बनतात, हें मनांत वागविलें असतां हिंदूधर्मशास्त्रांतर्गत आचार व व्यवहार याविषयींच्या नियमावर आधारलेल्या सांप्रतच्या हिंदू कायद्याला पाश्चात्य कल्पनेनुसारदेखील कायदा मानण्यास हरकत नाहीं हें दिसून येतें. पाश्चात्य देशांत काय अगर पौर्वात्य देशांत काय राजा अगर राजसत्ता स्वतः कायदे तयार करीत नाहीं. कायद्याचा मसुदा पंडितच करतात; नंतर तो राजमुद्रांकित होऊन राजकृत कायद्याचें स्वरूप पावतो. पाश्चात्य देशांत पंडितांकडून जे कायद्याचे मसुदे तयार करण्यांत येतात ते राजाज्ञेवरून तयार करण्यांत येतात; तर हिंदुस्थानांत झालेले धर्मशास्त्रांवरील ग्रंथ समाजधारणेची कळकळ बाळगणाऱ्या ऋषीमुनींनीं स्वेच्छेनें लिहिले व त्यानंतर त्यांच्या योग्यतेनुसार त्यांना राजमान्यता मिळाली. याज्ञवल्क्यस्मृतीवरील अपरार्काची टीका, मदनपारिजात, सरस्वतीविलास, भगवंतभास्कर वगैरे ग्रंथ याच प्रकारचे होत.

जगांतील कोणत्याहि पौर्वात्य अगर पाश्चात्य देशांतील कायद्यांत एका बाबतींत विलक्षण साम्य दिसून येतें. ती बाब म्हणजे त्या त्या धर्मग्रंथांतूनच त्यांचा उगम झाला असें मानण्यांत येतें ही होय. हिंदूव्यवहारधर्मशास्त्रविषयक ग्रंथांत श्रुतीलाच अग्रस्थान देण्यांत आलें आहे. सांप्रत ब्रिटिश हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या हिंदू कायद्याचे लिखित व अलिखित असे दोन प्रकारचे उगम मानिले आहेत. लिखित उगमांत पुढील गोष्टींचा अन्तर्भाव होतो. (१) प्राचीन धर्मशास्त्रविषयक वाङ्मय (२) ब्रिटिश हिंदुस्थानांतील न्यायालयांनीं दिलेले निर्णय (३) विधिमंडळानें केलेले कायदे. अलिखित उगम म्हणजे रूढी होय.

(१) प्राचीन संस्कृत वाङ्मय—व्यवहारधर्मशास्त्रावरील प्राचीन वाङ्मय श्रुति व स्मृति असें दोन प्रकारचें आहे. श्रुति म्हणजे वेद. चार वेद, संहिता, ब्राह्मण, शाखा, उपशाखा, उपनिषदें, वेदांगें यांचा त्यांत समावेश होतो. ('वेद' पाहा). स्मृतिवाङ्मयाचे दोन ढोबळ भेद: सूत्रवाङ्मय व स्मृति. सूत्रें दोन प्रकारचीं:—(१) श्रौत व गृह्यसूत्रें (२) धर्मसूत्रें. यांपैकीं धर्मसूत्रांतच आचार व व्यवहार याविषयीं नियम सांगितले आहेत. या धर्मसूत्रांत गौतम, बोधायन, आपस्तंभ, वशिष्ठ व विष्णू यांचीं सूत्रें प्रमुख होत. स्मृतिवाङ्मयांत या सूत्रांना आद्यस्थान आहे. हिंदूव्यवहारधर्मशास्त्राची उभारणी या सूत्रवाङ्मयावरच झाली आहे. धर्मसूत्रांत गृहस्थाचीं कर्तव्यें, राजधर्म, न्यायदान, वारसासंबंधीं नियम वगैरे स्मृतिग्रंथांत सामान्यतः आढळणारे विषय आहेत. स्मृतीमध्यें मनु, याज्ञवल्क्य, नारद, पराशर या मुख्य होत. (स्मृति, मनुस्मृति, याज्ञवल्क्य नारदस्मृति लेख पाहा). श्रुति व स्मृति यांच्यामध्यें ज्या बाबतींत विरोध दिसून येतो त्या बाबतींत श्रुतिवचनाला प्राधान्य द्यावयाचें. निरनिराळ्या स्मृतींवर अनेक टीका झालेल्या आहेत. यांत मनुस्मृतीवरील मेधातिथीची टीका व याज्ञवल्क्यस्मृतीवरील मिताक्षरानामक विज्ञानेश्वराची टीका या प्रमुख होत. मिताक्षरा बंगालखेरीज हिंदुस्थानच्या सर्व भागांत प्रमाणभूत मानिली आहे. मिताक्षरेवरहि बऱ्याच टीका झालेल्या आहेत. त्यांत नंदपंडिताची प्रमिताक्षरा, विश्वेश्वरभट्टाची सुबोधिनी व बाळंभट्टी या तीन प्रमुख होत. प्रमिताक्षरा ही टीका मिताक्षरेचा अर्थ करण्याच्या कामीं अत्यंत उपयुक्त आहे.

न्यायाधिशांनीं वेळोवेळीं दिलेल्या निर्णयांत या टीकेचा अनेकवार उल्लेख करण्यांत आला आहे. बाळंभट्टी ही टीका लक्ष्मीदेवी नामक स्त्रीनें लिहिली असावी असा एके काळीं समज होता. परंतु ती त्या बाईचा मुलगा राजाराम यानें लिहिली असावी असा विद्वानांचा कयास आहे. मिताक्षरेचा आशय स्पष्टपणें कळण्याला या टीकेचें फार सहाय्य होतें. मुंबई इलाख्यांत ही टीका विशेष महत्त्वाची मानिली आहे. पाराशर स्मृतीवरील पाराशरमाधवीय ही टीका प्रसिद्ध आहे. ती विजयानगरच्या बुक्क राजाचे प्रधान अमात्य माधवाचार्य यांनीं लिहिली. हिंदूंच्या धर्मशास्त्रविषयक ग्रंथांत निबंधग्रंथांनाहि विशेष महत्त्व आहे. नीलकंठप्रणीत व्यवहारमयुख हा निबंध गुजराथ व मुंबई

शहर येथें प्रमाणभूत मानिला आहे. महाराष्ट्रांत मिताक्षरेच्या खालोखाल व्यवहारमयूखाचेंच प्रामाण्य मानिलें आहे. लक्ष्मीधराचा कल्पतरु आणि चंडेश्वराचा विवादरत्नाकर हे दोन निबंध उल्लेखनीय आहेत. जीमूतवाहनाचा दायभाग हा निबंध बंगाल्यांत प्रमाणभूत मानिला आहे. दायभागावरही पुष्कळ टीका झालेल्या आहेत.त्यांत रघुनंदन व श्रीकृष्णतारकालंकार यांच्या टीका प्रमुख होत. रघुनंदनाची टीका तर बंगालमध्यें वारसाखेरीज इतर सर्व बाबतींत अतिशय प्रमाणभूत मानिली आहे. याशिवाय मित्रमिश्राचा वीरमित्रोदय, देवण्णभट्टप्रणीत स्मृतिचंद्रिका व दत्तक या विषयांवरील नंदपंडितकृत दत्तकमीमांसा, व महामहोपाध्याय कुबेरकृत दत्तकचंद्रिका हे निबंध प्रसिद्ध आहेत. दत्तक या विषयावरचे हे दोन ग्रंथ अखिल भारतांत प्रमाणभूत मानिले आहेत. या दोहोंत ज्या बाबतींत मतभेद असतो त्या बाबतींत बंगाल व दक्षिण हिंदुस्थान येथील पंडित दत्तकचंद्रिकेला प्राधान्य देतात, तर बनारस व मिथिला या विभागांत दत्तकमीमांसा प्रमाणभूत मानतात. मिताक्षरा व मयुख यांचें पुरवणी ग्रंथ म्हणून ते मानिले आहेत.

स्मृतीग्रंथावर झालेल्या निरनिराळ्या टीका व निबंध यांचें प्रामाण्य हिंदुस्थानांतील सर्व विभागांत सारखेंच मानलें जातें असें नाहीं. एका विभागांत एक टीका प्रमाणभूत मानली जाते तर दुसऱ्या विभागांत दुसरी. ज्या विभागांत जी स्मृति प्रमाण त्या विभागांत त्या स्मृतिवरील टीका व निबंधही प्रमाण मानले जाऊं लागले. याप्रमाणें व्यवहारधर्मशास्त्राचे वेगवेगळे सांप्रदाय निर्माण झाले. या सांप्रदायांत मिताक्षरा व दायभाग हे प्रमुख होत. मिताक्षरा बंगालखेरीज सर्व हिंदुस्थानांत प्रचलित आहे, तर दायभाग फक्त बंगालमध्यें प्रचलित आहे. दायभाग व मिताक्षरा या सांप्रदायांत एकत्रकुटुंबसंस्था व वारसा या बाबतींत मतभेद आहे. (‘ दायभाग ’ व ‘ मिताक्षरा’ पाहा) मिताक्षरेचे चार पोटसांप्रदाय आहेत; या चार पोटसांप्रदायांत मिताक्षराच प्रमाणभूत मानिली आहे; परंतु मिताक्षरेवरील भिन्न भिन्न टीका व निबंध भिन्न भिन्न विभागांत प्रमाणभूत मानल्यामुळें हे पोटसांप्रदाय निर्माण झाले. हे चार पोट सांप्रदाय व त्यांचे प्रमाणभूत ग्रंथ पुढीलप्रमाणें:–(१) बनारस सांप्रदाय-विज्ञानेश्वराचा मिताक्षरा हा मुख्य प्रमाणभूत ग्रंथ. त्या खालोखाल सुबोधिनी, वीरमित्रोदय, कल्पतरु, दत्तकमीमांसा व निर्णयसिंधु यांचें प्रामाण्य.

द्रविड सांप्रदाय अथवा मद्रास सांप्रदाय–मिताक्षरा, स्मृतिचंद्रिका पाराशरमाधव, वीरमित्रोदय, सरस्वतीविलास, विद्यानाथ दिक्षिती.

मिथिला सांप्रदाय–मिताक्षरा, विवादचिंतामणी, विवादरत्नाकर, दत्तकमीमांसा, द्वैतनिर्णय, सुधिविवेक, द्वैतपरिशिष्ट.

मुंबई सांप्रदाय–मिताक्षरा, व्यवहारमयुख, निर्णयसिंधु, वीरमित्रोदय, दत्तकमीमांसा. हिंदुस्थानच्या पश्चिम विभागांत मुंबई सांप्रदाय प्रचलित आहे. यालाच महाराष्ट्रसांप्रदाय म्हणतात. महाराष्ट्र, उत्तर कानडा व रत्नागिरी जिल्हा या प्रदेशांत मिताक्षरेला प्राधान्य आहे, तर गुजराथ, मुंबई शहर व उत्तर कोंकण या प्रदेशांत मयूखाला प्राधान्य आहे. अहमदनगर, पुणें, खानदेश या जिल्ह्यांत मिताक्षरेइतकेंच मयूखाचें प्रामाण्य आहे. मिताक्षरा व मयूख यांतील वचनांचा होता होईल तों समन्वय करण्याचें मुंबई हायकोर्टाचें धोरण आहे.

(२) **न्यायालयांचे निर्णय**–हे निर्णय हिंदूधर्मशास्त्रावरच आधारलेले आहेत. ब्रिटिश आमदानीच्या सुरवातीला न्यायाधिशाच्या मदतीला संस्कृतज्ञ पंडित देण्यांत येत असत. हे पंडित व्यवहारधर्मशास्त्राचा अर्थ गोऱ्या न्यायाधिशाला समजावून सांगत. याप्रमाणें पंडितांच्याकडून समजावून घेतलेल्या व्यवहारधर्मशास्त्रांतील नियमांचा अम्मल जोंपर्यंत न्यायाधीश करीत होते तोंपर्यंत हिंदूव्यवहारधर्मशास्त्रांना अनुसरून निर्णय होत. पण पुढें पुढें गोरे न्यायाधीश पंडितांवरच विसंबून न राहतां आपल्या स्वतःच्या कल्पना व तत्त्वें आपल्या ठरावांत गोवूं लागले, यामुळें मूळ स्मृतिवचनाहून निराळींच तत्त्वें कित्येक वेळां प्रस्थापित केली जात.न्यायाधिशांनीं दिलेले हे निर्णय प्रचलित हिंदू कायद्याचा महत्त्वाचा भाग म्हणून मानले जातात. प्रीव्हिकौन्सिलचा निर्णय हिंदुस्थानांतील हायकोर्टांवर बंधनकारक असतो; पण एका हायकोर्टाचा निर्णय दुसऱ्या हायकोर्टावर बंधनकारक नसतो.

(३) **विधिमंडळाचे कायदे**–हिंदूव्यवहारधर्मशास्त्राच्या नियमांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष फरक करणारे बरेच कायदे ब्रिटिश अमदानींत झाले आहेत. त्यांतील प्रमुख पुढें दिले आहेत:–

(१) The Caste Disabilities Removal Act 1850—हिंदुव्यवहारधर्मशास्त्राप्रमाणें परधर्म स्वीकारलेल्या हिंदूला वारसाहक्काला व मिळकतीसंबंधीं इतर हक्काला मुकावें लागतें. परंतु या कायद्यामुळें परधर्म स्वीकारणाऱ्याला ही धास्ती उरली नाहीं. या कायद्याला धर्मस्वातंत्र्याचा कायदा हें दुसरें नांव आहे.

(२) हिंदू विधवांच्या पुनर्विवाहासंबंधीं कायदा १८५६—या कायद्यानें कांहीं बाबतींत विधवांचा पुनर्विवाह कायदेशीर मानला आहे.

(३) इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५—यांत मृत्युपत्राविषयींचा कायदा आहे.

(४) दी नेटिव्ह कॉन्व्हर्ट्स मॅरेज डिझोल्यूशन ॲक्ट १८६६—या कायद्यामुळें ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या हिंदूला कांहीं विशिष्ट परिस्थितींत घटस्फोट मिळवितां येतो.

(५) The Transfer of Property Act 1882—या कायद्यानें हिंदूव्यवहारधर्मशास्त्रांतील मिळकत तबदील करून देण्याच्या कायद्यांतील पुष्कळसा भाग रद्द झाला आहे.

(६) The Indian Majority Act 1875—या कायद्यानें हिंदूंची सज्ञानतेची मर्यादा अठरा वर्षें पूर्ण ही आहे. ही मर्यादा विवाह, घटस्फोट, दत्तक या बाबतींत लागू नाहीं.

(७) The guardian & Wards Act 1890—हा कायदा कोर्टानें अज्ञानपालक नेमण्याच्या बाबतींत हिंदूना लागू केला आहे.

(८) The Hindu Inheritance Act 1928-या कायद्यानें हिंदूंच्या मिळकतीचा वारसा घेण्याच्या व एकत्र कुटुंबांतील मिळकतीचा हिस्सा घेण्याच्या अपात्रतेला मर्यादा घालून दिली आहे.

(९) The Hindu Law of Inheritance Act 1929—हा हिंदूंच्या वारसाकायद्यांत सुधारणा करणारा कायदा आहे. या कायद्यानें मुलाची मुलगी, मुलीची मुलगी व बहिण व बहिणीचा मुलगा यांना वारसांच्या मालिकेंत बापाचा बाप व बापाचा भाऊ यांच्यामध्यें स्थान दिलें आहे.

(१०) विद्याधनाचा कायदा १९३०—या कायद्यानें विद्येच्या बळावर एकाद्या हिंदूनें मिळविलेली मिळकत त्याच्या मालकीचीच राहते.

(११) १९३७ चा हिंदू वारसाचा कायदा. या कायद्यानें हिंदू विधवेला पतीच्या पश्चात् त्याच्या पुत्रांच्याबरोबर त्याच्या मिळकतीचा वारसा दिला आहे. त्याचप्रमाणें मिताक्षरा एकत्र कुटुंबांत मयत झालेल्या हिंदूच्या विधवेला कुटुंबांतील त्याच्या मिळकतीसंबंधीं त्याचे अधिकार दिलेले आहेत.

रूढी हा एक कायद्याचा उगम मानला आहे. शास्त्रवचन व रूढी यांत विरोध असेल तर रूढीला प्राधान्य द्यावयाचें असतें. ‘ शास्त्राद् रूढिर्बलीयसी ’ असें शास्त्रवचनच आहे.

येथवर हिंदूव्यवहारधर्मशास्त्राच्या सामान्य स्वरूपाचा व उगमाचा विचार झाला.

हिंदुव्यवहारधर्मशास्त्राचा अम्मल करण्याचे अधिकार हिंदुस्थानांतील कोर्टांना पार्लमेंटच्या कायद्यानें प्राप्त झालेले आहेत. त्याचप्रमाणें याबाबत हिंदुस्थानांतहि कायदे झालेले आहेत. हिंदुव्यवहारधर्मशास्त्रांत सांगितलेल्या सर्वच नियमांचा अम्मल सांप्रत करण्यांत येत नाहीं. वारसा, विवाह, कौटुंबिक संबंध, दत्तक, अज्ञानाचें पालकत्व, मृत्युपत्र, देणगी, संविभाग या बाबींतच हिंदुव्यवहारधर्मशास्त्राचा अम्मल होतो; परंतु या बाबतींतदेखील वेळोवेळीं झालेल्या कायद्यांनीं हिंदुव्यवहारधर्मशास्त्रांतील मूळच्या नियमांत फरक पडला आहे. ज्या बाबतींत असे कायदे झाले आहेत त्या बाबतींत हिंदुशास्त्रांतील नियम लागू नाहींत. वर अशा कायद्यांची यादी दिली आहे.

हिंदुकायद्याचा अम्मल पुढील व्यक्तींच्या बाबतींत होतो:—

(१) केवळ जन्मानेंच नव्हे तर धर्मानेंही हिंदू असणारी व्यक्ति.

(२) हिंदू आईबापांचीं अनौरस मुलें.

(३) ख्रिश्चन बाप व हिंदू आई यांचीं हिंदू धर्मांत वाढलेलीं अनौरस मुलें. परंतु या मुलांच्या बाबतींत हिंदू एकत्रकुटुंबसंस्थेविषयींचा कायदा लागू पडत नाहीं. बापच ख्रिश्चन असल्यामुळें त्याच्या मिळकतींत मुलांना जन्मतःच हक्क प्राप्त होत नाहीं; त्यामुळें एकत्र कुटुंबच निर्माण होत नाहीं.

(४) जैन, शीख, व नंबुद्री ब्राह्मण.

(५) प्रथम परधर्म स्वीकारून नंतर प्रायश्चित्त घेऊन स्वधर्मांत आलेला जन्मजात हिंदू.

(६) मुसलमान झालेल्या हिंदू नायकिणीचे मुलगे. मात्र हे आपल्या हिंदू आजोळीं हिंदू म्हणूनच वाढलेले असले पाहिजेत.

जन्मजात हिंदू असून जिनें हिंदुधर्माचा त्याग केलेला नाहीं अशी व्यक्ति आहार व धार्मिक आचार-विचार या बाबतींत रूढीला अनुसरून वागत नाहीं अथवा तिनें ब्राह्मो समाजाची दीक्षा घेतली, म्हणून अहिंदू ठरत नाहीं. त्याचप्रमाणें ग्रंथसाहेबाचा स्वीकार करणें म्हणजे हिंदुधर्माशीं विसंगत गोष्ट करणें नव्हे.

पुढील व्यक्तींना हिंदूकायदा लागू होत नाहीं:—

(१) हिंदू पुरुषाला खिश्चन स्त्रीपासून झालेली व खिश्चन म्हणून वाढविलेली अनौरस संतति.

(२) हिंदू पुरुषाला मुसलमान स्त्रीपासून झालेली अनौरस संतति. ही जन्मानेंही हिंदू नाहीं व धर्मानेंही हिंदू नाहीं.

(३) खिश्चन धर्माचा स्वीकार केलेले हिंदू. खिश्चन धर्माचा स्वीकार केलेल्या हिंदूच्या मिळकतीचा वारसा इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ प्रमाणें जातो.

(४) मुसलमानी धर्माचा स्वीकार केलेले हिंदू. अशांच्या मिळकतीचा वारसा मुसलमानी कायद्याप्रमाणें जातो.

हिंदुस्थान:—आशिया खंडांतील संस्कृतिसंपन्न व सुपीक देश. उत्तरेस हिमालय, पश्चिमेस हाला पर्वत, बलुचिस्थान व अरबी समुद्र, दक्षिणेस हिंदी महासागर, पूर्वेस बंगालचा उपसागर आणि ब्रह्मदेश. क्षेत्रफळ १,८०८,६७९ चौ. मैल, दक्षिणोत्तर २००० मैल व पूर्वपश्चिम २५०० मैल, ८ ते ३७ उत्तर अक्षांशांत व पू. रेखांश ६८ ते ९५. भौगोलिकदृष्ट्या हिमालयाच्या टेकड्या, गंगासिंधूचें खोरें व दक्षिणेचें पठार असे तीन भाग पडतात. उन्हाळा, पावसाळा व हिंवाळा असे तीन प्रमुख कालविभाग आहेत. एकूण पांच हजार मैलांचा किनारा आहे.

हिंदुस्थानचे ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानी हिंदुस्थान असे दोन भाग असून एकसष्ट टक्के भूभाग ब्रिटिश हिंदुस्थानमध्यें आहे. लोकसंख्या १९३१ च्या शिरगणतीप्रमाणें ३५२,८३७,७७८ इतकी असून शेकडा ७७ ब्रिटिश हिंदुस्थानांत आहे. सर्वांत जास्त लोकवस्ती बंगाल प्रांतांत (एका चौरस मैलास ६४६ लोक) आहे. हिंदुस्थानांतील लोकसंख्येपैकीं हिंदू सुमारें २८ कोटी, मुसलमान ८ कोटी व इतर बुद्ध, शीख, जैन वगैरे आहेत.

हिंदुस्थानांत एकूण ५८४ संस्थानें असून संस्थानांतील लोकसंख्या ८१,३१०,८४५ इतकी आहे. सर्वांत लहान संस्थान बिलबारी या नांवाचें असून त्याची लोकसंख्या २७ व उत्पन्न ८० रु. आहे.

ब्रिटिश हिंदुस्थानचे एकूण अकरा प्रांत आहेत व त्यांना १९३५ च्या कायद्यानें प्रांतिक स्वायत्तता मिळाली आहे. याशिवाय बलुचिस्तान, अजमीर–मेवाड, कूर्ग, अंदमान–निकोबार व दिल्ली असे कमिशनरच्या ताब्यांतले पांच प्रांत आहेत.

हिंदुस्थानच्या राज्यघटनेचा इतिहास—

(१) १७७३ ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदुस्थानांतील प्रांतावर गव्हर्नर जनरल नेमण्याचा रेग्युलेटिंग ॲक्ट पास होऊन राजाला अधिकार मिळतो.

(२) १७८४ पिट्स इंडियन ॲक्टमुळें इंग्लंडच्या राजाचे प्रतिनिधी म्हणून ईस्ट इंडियाच्या कारभारावर देखरेखीखालीं बोर्ड ऑफ कंट्रोल नेमलें जातें.

(३) १८१३–३३ या दोन वर्षी पास झालेल्या चार्टर ॲक्टमुळें बंगालचा गव्हर्नर जनरल हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल बनतो व ईस्ट इंडिया कंपनीचे व्यापारी हेतु मागें पडून ही राजकीय संस्था बनते.

(४) १८५३ या वर्षी पास झालेल्या चार्टर ॲक्टमुळें हिंदुस्थानांत लेजिस्लेटिव्ह कौन्सिल स्थापलें जातें.

(५) १८८१ या वर्षी पास झालेल्या इंडिया कौन्सिल्स ॲक्टमुळें मुंबई, बंगाल, मद्रास, पंजाब व सरहद्द प्रांत यांमध्यें प्रांतिक विधिमंडळें स्थापन होतात.

(६) १९०९ कौन्सिल ॲक्ट किंवा मोर्लेमिंटो सुधारणा जाहीर होऊन बिनसरकारी सभासदांना विधिमंडळांत प्रवेश मिळतो.

(७) १९१९ मॉंटेग्यूचेम्सफर्ड सुधारणा जाहीर होऊन (गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट) द्विदलराज्यपद्धति सुरू होते.

(८) १९३५ गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट या कायद्यानें मध्यवर्ति सत्तेंत ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानी हिंदुस्थान यांचें एकीकरण होतें. ब्रिटिश प्रांतांना स्वायत्तता मिळते.

हिमालयः—हिंदुस्थानच्या उत्तरेस असणारी अनेक मोठमोठाल्या पर्वतांची ओळ. याची लांबी १५०० व रुंदी १५०–२५० मैल भरते. शिकंदरबरोबरचे लोक याला ‘हिंदी कॉकेशस’ म्हणत; तर भूगोलशास्त्रज्ञ याला हिमॉस वा हिमोदास या नांवानें ओळखतात. कालिदासानें याला ‘पृथ्वीचा मानदंड’ असें नांव दिलें आहे. याच्या सर्व भागांचा अद्याप शोध लागला नाहीं. काश्मीर, जम्मू, नेपाळ व भूतान हे प्रदेश या पर्वतावरचे. याशिवाय पंजाबमधलाहि कांहीं भाग यांत मोडतोच. नवीन माहितीप्रमाणें या पर्वतराजाचे तीन भाग पडतात. मधल्या भागांत याचीं उंच उंच शिखरें आहेत. मधल्या भागाच्या उत्तरेस दुसरी श्रेणी आहे. ही हिंदुस्थान व तिबेट यांची सीमारेषा मानली आहे. हिंवाळ्यांत ५००० फुटांवर बर्फ पडूं शकतें. या पर्वतामुळेंच सिंधू, गंगा, ब्रह्मपुत्रा, यमुना या प्रचंड नद्यांचा जन्म झाला. आणि या नद्यांमुळेंच सिंधु व गंगा नदी यांचीं खोरीं सुपीक बनलीं आहेत. ह्या पर्वताचीं अतिविख्यात शिखरें पुढीलप्रमाणें होत.

२६१८२ फूट नंगापर्वत. नंदादेवी २५६६१ फूट. २३३८२ फूट त्रिशूल. नंदाकोट २२५३८ फूट. गौरीशंकर २९००२ फूट. धवलगिरी २६८२६ फूट. कांचनगंगा २८१४६ फूट.

येथें राहणारीं माणसें इंडोचायनी वंशाचीं आहेत. हिमालयाच्या पूर्वेस मंगोली लोक राहतात. या ठिकाणीं जे पदार्थ उत्पन्न होतात ते व्यापारीदृष्टीनें फारसे महत्त्वाचे नाहींत. इथलें मुख्य धान्य तांदूळ, गहूं, जवस हें होय. उष्ण हवेच्या दऱ्यांतून मिरची, हळद, आलें यांसारखे पदार्थ तयार होतात. कांहीं उंच प्रदेशांत बटाटेहि निघतात. या ठिकाणचीं जंगलें अतिशय महत्त्वाचीं आहेत. हीं जंगलें हिमालयाच्या शेवटच्या श्रेणींत आहेत. जंगलांत इमारतीच्या उपयोगीं असें पुष्कळ लांकूड मिळतें. पूर्वहिमालयांत रबरहि पुष्कळ पिकतो. रेल्वेच्या अभावीं दळणवळण बंद आहे. जम्मू, सिमला व दार्जिलिंग या ठिकाणीं रेलगाड्यांचे रस्ते आहेत. पायरस्ते व बैलांच्या उपयोगी असे अनेक रस्ते आहेत. (गौरीशंकर, पृष्ठ ४३९पहा.)

हिरडाः—औषधी व रंगोपयोगी फळ. हें झाड पाण्याशिवाय वाढूं शकतें. याचीं झाडें कोंकण व मावळ या भागांत आढळतात. या झाडाची उंची ३०–३५ फूट असूं शकते. तसेंच त्याचा विस्तार देखील बराच मोठा होतो. हें झाड ५०–७५ वर्षें टिकतें. या झाडाची लागवड मुद्दाम कोणी करीत नाहींत. जंगलांत झाडाखालींच याचीं रोपें वाढलेलीं आढळतात. फळें बहुतेक सर्वांच्या परिचयाचीं आहेतच. वाळवून ठेवलेल्या कोंवळ्या हिरड्यास बाळहिरडा म्हणतात. हिरडा, बेहडा व आंवळकाठी या तिन्ही वस्तूंच्या मिश्रणास ‘त्रिफळा’ म्हणतात. वरील तिन्ही वस्तूंच्या एकत्र केलेल्या पुडीला ‘त्रिफळा चूर्ण’ असें म्हणतात.

हिरड्यापासून उत्तम शाई होते. फळांचा उपयोग औषधें व रंग यांस होतो. याच्या लांकडाचा उपयोग घरकामासाठीं व इतर किरकोळ कामास करितात. एकंदरींत चांगलें उत्पन्न देणारें व बिनत्रासानें होणारें हें एक उपयुक्त झाड आहे.

हुंडणावळः—इंग्रजी भाषेंत ज्याला ‘फॉरेन एक्सचेंज’ म्हणतात त्यास मराठींत हुंडणावळ म्हणण्याचा प्रघात पडलेला आहे. वास्तविक हुंडणावळीचा दर म्हणजे बँका ज्या भावानें हुंड्या विकत घेण्यास तयार असतात तो दर म्हणजे खरोखरी ‘मनोतीचा दर’ असा अर्थ होतो. इंग्रजींतल्या शब्दांचा खरा अर्थ ‘नाणेबदल’ असा करावयास पाहिजे होता. नाणेबदलीच्या बाजारांत खरोखरी एतद्देशीय चलनानें परदेशी नाणें अगर चलन विकत घेतलें जातें. म्हणून त्या व्यवहारास आपण नाणेबदल असें म्हणूं.

परदेशी नाण्यांचा अगर देशी नाण्यांचा दर हुबेहुब इतर जिन्नसाप्रमाणेंच ठरतो. एकाद्या जिन्नसाचा पुरवठा बाजारांत कमी असेल तर त्या जिन्नसाची किंमत वाढते व बराच असेल तर कमी होते. हीच गोष्ट देशी अगर परदेशी चलनांची पण आहे. नाणेबदलीच्या बाजारांत व्यवहार करणारा मनुष्य त्या व्यापारांत तज्ज्ञच असावा लागतो. याचें कारण असें कीं, चलनाचा पुरवठा किती आहे व कोणकोणत्या कारणांनीं तो बदलतो ह्या गोष्टी साध्या माणसाच्या ध्यानांत येणें फारच कठीण असतें. म्हणून नाणेबदलीचा व्यापार फक्त ‘एक्सचेंज बँका’च करतात. या बँकाजवळ देशी व परदेशी चलनांचा पुरवठा असतो. जसजसा चलनांचा पुरवठा व त्यांची मागणी बदलते त्याप्रमाणें या बँका आपला विक्रीखरेदीचा दर बदलत असतात. हिंदी रुपयाचा दर कायद्यानें पौंडावर ठरविलेला आहे. दर रुपयास इंग्रजी चलनाचे एक शिलिंग सहा पेन्स सरकार देण्यास तयार असते.

प्रत्यक्ष चलन इकडून परदेशीं अगर उलट पाठविण्यास कांहीं खर्च लागतो. पौंडाच्या खरेदीवर हा आकार मिळवावा लागतो व रुपये खरेदी करतांना तो वजा घालावा लागतो. प्रत्यक्ष चलन इकडून तिकडे अगर उलट पाठविण्यास लागणारा खर्च मिळवून व वजा घालून जे आंकडे येतील त्या दोन आंकड्यांमध्यें बाजारी दर हेलकावीत असतो व हें दराचें दोन टोंकांतील आंदोलन चलनांच्या मागणीपुरवठ्यावर अवलंबून असतें. आंदोलन जर या टोंकाबाहेर गेलें तर सरकार स्वतः कायदेशीर दरानें चलन विकण्यास अगर विकत घेण्यास तयार असतें, म्हणून वर सांगितलेल्या दोन टोंकाबाहेर नाणेंबदलाचा दर सहसा जात नाहीं.

हुंडी:–सर्व प्रकारच्या हुंड्या व्यापाराच्या घडामोडींत जन्मास येतात. व्यापारी माल विकत घेतो तेव्हां मालाच्या किंमतीची रक्कम त्याला तावडतोब मिळत नाहीं. विकत घेणारा व्यापारी माल विकणाऱ्या व्यापाऱ्यास स्वतःवर हुंडी काढण्यास सांगतो. माल विकणाऱ्या व्यापाऱ्याचेसुद्धां घेणेकरी हे असतात. विक्री करणारा व्यापारी खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यावर स्वतःच्या घेणेकऱ्यास ठराविक रक्कम ठराविक मुदतीनंतर अगर मागणी करतांच ठराविक व्याजाच्या दरानें देऊं करण्याबद्दल हुंडी लिहितो. खरेदी करणारा व्यापारी ह्या हुंडीचा स्वीकार (Acceptance) करतो. स्वीकार करणें म्हणजे हुंडीवर स्वीकार केला असें लिहून सही करणें. हुंडी लिहिल्यानंतर विक्री करणारा व्यापारी ती आपल्या घेणेकऱ्याला देतो. घेणेकरी खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याकडे जाऊन तिच्यावर त्याचा स्वीकार व त्याची सही करून घेतो. हुंडीचा तावडतोब स्वीकार झालाच पाहिजे असें नाहीं. दर्शनी हुंडींत कोणतीही मुदत घातलेली नसते. हुंडी सादर करून पैसे मागतांच तीवर पैसे मिळणें शक्य असतें. त्यामुळें तिचा स्वीकार करण्याची जरुरी नसते. मुदती हुंडींत माल स्वीकार करवून घेणें कायद्याच्या दृष्टीनें व व्यवहाराच्याही दृष्टीनें चांगलें. स्वीकारलेली हुंडी बिनबोभाट व्यापारी क्षेत्रांत वावरूं शकते तशी बिन स्वीकारलेली हुंडी वावरण्यास थोडा त्रास पडतो.

हुंडीमध्यें चार इसमांचा समावेश होतो. समजा "अ" हा एक पुण्यास राहणारा व्यापारी आहे. 'अ' हा मुंबईच्या पेठेंत 'ब'कडून एक हजार रुपयांचा माल विकत घेतो. उलट 'क' हा मुंबईचा व्यापारी, 'ड' नांवाच्या पुण्याच्या व्यापाऱ्याकडून त्याच वेळीं एक हजाराचा माल घेतो. 'अ'नें, 'ब'चें एक हजार रुपये देणें आहे. व 'क'ला, 'ड'चें तितकेंच देणें आहे. अशा वेळीं 'अ' हा 'ब'वर हुंडी काढतो व ती 'ड'ला विकतो. 'ड' ती हुंडी 'क'कडे पाठवून 'ब'कडून एक हजार रुपये वसूल करून घेण्यास लिहितो. अशा तऱ्हेची बहुधा मुदतीची हुंडी असते. 'ड'नें 'क'ला ती हुंडी पाठवितांच सर्वांचें देणें चुकतें होतें व प्रत्यक्ष पैसा पुण्याहून मुंबईस अगर मुंबईहून पुण्यास पाठविण्याची गरज पडत नाहीं. जी गोष्ट देशांतील निरनिराळ्या शहरांमध्यें होणें शक्य आहे तीच निरनिराळ्या देशांमध्येंही होईल. फरक इतकाच कीं, परदेशी व्यापाऱ्यावर हुंडी काढावयाची असल्यास माल निर्यात करणारा व्यापारी आपल्या एतद्देशीय चलनांत काढतो; अगर देशीपरदेशी चलनांच्या अदलाबदलीचा अगर विक्रीखरेदीचा दर आधींच ठरवून मग परदेशी चलनांतसुद्धां काढूं शकतो. हुंड्यांची विक्री प्रत्यक्ष व्यापाऱ्याव्यापाऱ्यांत होणें शक्य असत नाहीं, म्हणून इतर जिनसांप्रमाणें हुंड्यांच्या व्यापारांतसुद्धां दलाल असतातच. एक्सचेंज बँका (Exchange Banks) अशा दलालीचीं कामें करीत असतात. बऱ्याच वेळां अशा बँका परस्परावर हुंड्या काढून त्या व्यापारी लोकांना विकीत असतात. हुंड्यांना जशी कमी जास्ती प्रमाणांत मागणी असते त्या मानानें त्यांचा भाव बदलत असतो. हा भाव बहुतेक देशी–परदेशी चलनाच्या विक्रीखरेदीच्या भावावर अवलंबून असतो व त्याचप्रमाणें परदेशी व्यापारावरहि बऱ्याच अंशीं अवलंबून असतो. हुंड्या बँका स्वतः काढून विकतात हें पूर्वी सांगितलेंच आहे. व्यापारांत उद्भवणाऱ्या वचनचिठ्ठ्यांचाहि हुंड्यांत समावेश करण्यास हरकत नाहीं.

चेकप्रमाणें बेचनाचे योगानें हुंड्या व वचनचिठ्ठ्या हातोहात फिरूं शकतात. त्यामुळें त्यांना कायद्याच्या दृष्टीनें पैशासारखेंच महत्त्व आहे व पैशाचे सर्व गुणधर्म त्यांच्या पोटीं आहेत. हुंड्यांची मुदत भरतांच हुंडी स्वीकारणारा त्यांच्यावर पैसे देतो. पैसे देतांच हुंडी अस्तित्वांतून नाहींशी होते. हुंडीवर जर स्वीकारणाऱ्यानें बटावा केला नाहीं तर हुंडीचा अनादर झाला असें समजावें. अनादर झालेली हुंडी नोटरी पब्लिक

(Notary Public) नांवाच्या सरकारी अमलदाराकडे न्यावी. हा अमलदार नंतर स्वतः तिच्यावर वटावा मागेल व तो न झाल्यास अनादर झालेल्या हकीगतीची स्वतःच्या बुकांत नोंद करून तिची नक्कल हुंडीच्या मालकास देईल. ही नक्कल घेऊन मालक हुंडीवर बेचन दिलेल्या सर्व लोकांना अगर त्यांपैकीं कोणासही नोटीस देतो व त्याच्यावर कायदेशीर इलाज करतो. एकादे वेळेस प्रत्यक्ष हुंडी लिहिणाऱ्यानें आपल्या हुंडीचा कदाचित् अनादर होईल या भीतीनें जर संकटकालीं अमूक अमूक मनुष्याकडे जावें असा मजकूर हुंडीवर लिहिला असल्यास हुंडीचा मालक हुंडीचा अनादर होतांच हुंडीवर दर्शविलेल्या दुसऱ्या इसमाकडे जाऊन हुंडी पटवितो. देशाच्या अंतस्थ व्यापारांत व परदेशी व्यापारांतसुद्धां अशा तऱ्हेचे प्रकार घडतात.

हुतात्माः–आपली धार्मिक निष्ठा प्रस्थापित करण्यासाठीं जो सर्व प्रकारच्या हालअपेष्टा धीरोदात्त वृत्तीनें सहन करतो व शेवटीं देहदंड देतो त्या ख्रिश्चन महात्म्यास 'मार्टिर' असें म्हणतात. जो हालअपेष्टा सहन करतो, पण देहदंड देत नाहीं त्यास Confessor असें म्हणतात. स्टीफन दि डीकॉन् हा पहिला मार्टिर होय. हा Protomartyr म्हणून प्रसिद्ध आहे.

मार्टिर यांची संतामध्यें साहजिकच गणना करण्यांत आली. त्यांचीं थडगीं मोठ्या सन्मानानें उभारण्यांत व राखण्यांत येऊं लागलीं. मार्टिरांच्या वस्तू पवित्र म्हणून पदार्थसंग्रहालयांत त्या जतन करण्यांत येऊं लागल्या. ज्या नगरांत किंवा जिल्ह्यांत मार्टिरनें हालअपेष्टा सहन केल्या अगर तो राहिला त्या नगरास अगर जिल्ह्यास त्याचें नांव देण्यांत आलें आहे; उदाहरणार्थ, सेंट ॲलबन्स (St. Albans), बेरी सेंट एडमण्डस् वगैरे (Bury St. Edmunds).

फार प्राचीनकाळीं मार्टिर ही पदवी प्राप्त होण्यास कांहीं दिव्यांतून पसार व्हावें लागत असे. यासंबंधीं कडक नियम करण्यांत आले होते.

हुतुतुः–एक देशी मैदानी खेळ. क्रीडांगणाचा चौकोन २०×४० फूट असा आंखतात. मध्यरेषेच्या दोन्ही बाजूंस चार फुटांवर दोन सूचक पट्टे काढतात.

एकेका बाजूस नऊ किंवा अकरा गडी घेतात व एका बाजूच्या एका गड्यानें 'हुतुतु' असा अखंड आवाज करीत प्रतिपक्षाच्या बाजूला जाऊन खेळाडूंना स्पर्श करून आपल्या बाजूला परत यावयाचें असतें. कोणत्याहि वेळीं खेळाडूंच्या शरीराचा कोणता तरी भाग क्रीडांगणांत असावा लागतो.

हुमायून (१५०५–१५५६):–बाबराचा मुलगा व अकबराचा बाप. याचें पुरें नांव नासिरुद्दीन मुहंमद हें होतें. हा बाबराचा थोरला मुलगा असून याला आणखी तीन भाऊ होते. त्यांना यानें निरनिराळ्या प्रांतांचे अधिकारी नेमिले होते. गुजराथ व माळवा येथील बंदोबस्त नीट न राहिल्यानें ते प्रांत याच्या हातून गेले. पुढें शेरखानानें बंड करून बंगाल व बहार हे प्रांत घेतले, व याला पळावयास लाविलें. स. १५५५ पर्यंत दिल्लीच्या तक्तावर शेरशहा व त्याचे वंशज राज्य करीत होते. या पंधरा वर्षांत हुमायुनाचे अत्यंत हाल होऊन तो आश्रयार्थ भटकत होता. पुढें इराणांतून सैन्य आणून यानें आपलें तख्त मिळविलें, व पुन्हां बादशहा बनला. पण याचा उपभोग घेण्यास तो जगला नाहीं. दिल्लीस हा जिन्यावरून पडून मृत्यु पावला. याच्यांत हिकमत व जबाबदारी ओळखण्याची पात्रता मुळींच नव्हती. हा शूर असला तरी आळशी व बेफिकीर वृत्तीचा होता. तथापि हा उदार, ममताळू व सौजन्यपूर्ण होता. विद्वानांचा आश्रयदाता असून स्वतः गणिती व ज्योतिषी होता.

हेमंत (ऋतु):–पांचवा ऋतु. यावेळीं मार्गशीर्ष व पौष हे आपले व डिसेंबर, जानेवारी हे इंग्रजी महिने येतात. वृश्चिक व धन या राशींतून या कालांत सूर्य जातो.

हा ऋतु म्हणजे हिंवाळ्याचा मध्यकाल असतो. कडक थंडी हा याचा विशेष होय. या ऋतूच्या आरंभापासून पीक काढण्यास (हंगामास) सुरवात होते. शेतकरीवर्गाच्या श्रमाचें सार्थक याच कालांत होतें.

नाताळ, दत्तजयंती, मकरसंक्रांत हे प्रमुख व्रतोत्सव या ऋतूंत येतात.

हेस्टिंग्ज, वॉरनः–(१७३२–१८१८) इंग्रज मुत्सद्दी व हिंदुस्थानचा पहिला गव्हर्नर जनरल. यांचें शिक्षण वेस्ट मिनिस्टर स्कूलमध्यें झालें. १७५० सालीं बंगाल्यांत ईस्ट इंडिया कंपनींत कारकुनीची नोकरी पतकरली. १७५७त क्लाइव्हच्या मोहिमेनें तो प्रसिद्धीस आला. १७६१ सालीं बंगाल कौन्सिलचा सभासद होऊन कलकत्त्याला आला. १७६४ सालीं विलायतेला परत गेला. पांच वर्षांनीं हिंदुस्थानांत येऊन मद्रासच्या कौन्सीलचा सभासद झाला. पुढें तीन वर्षांनीं बंगा-


लच्या सुप्रीम कौन्सीलचा अध्यक्ष झाला. इ. स. १७७४ सालीं हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल झाला. तो या जागेवर अकरा वर्षें होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या मागणीप्रमाणें मोठमोठ्या रकमा पुरविण्याकरितां त्यानें बराच जुलूम केला. याबद्दल इंग्लंडला परत गेल्यावर त्याला जाब द्यावा लागला. हिंदुस्थानांतील त्याच्या राज्यकारभारांतील सावळागोंधळ, त्यानें केलेला अन्याय, जुलूम व लांचलुचपत याबद्दल बर्कनें त्याजवर आरोप ठेवून खटला चालविला. हा खटला १७८८ सालीं सुरू झाला तो १७९५ पर्यंत चालला. त्यांत तो निर्दोषी ठरला. ईस्ट इंडिया कंपनीनें १७९६ सालीं त्याला वर्षासन दिलें.

हैदरअल्लीः–(१७२२–८२) टिपू सुलतानाचा बाप. हा १७४० च्या सुमारास म्हैसूरच्या लष्करांत उदयाला आला. यानें दिवाण व राजा या दोघांनाहि आपल्या ताब्यांत ठेविलें. राजाला यानें पेशव्यांची ठरलेली खंडणी न देण्याबद्दल सल्ला देऊन त्यांच्या कारकुनासहि हांकून देवविलें. अबदालीशीं लढण्यांत पेशवे गुंतले असें पाहून यानें १७६१-६४ पर्यंत मराठ्यांचा बराच मुलूख जिंकला. पण १७७४ त पेशव्यांनीं स्वारी केल्यामुळें यास सारा घेतलेला प्रदेश परत देणें भाग पडलें. याच्यावर पेशव्यांनीं वेगवेगळ्या वेळीं ३-४ स्वाऱ्या केल्या. प्रत्येक वेळीं यास अपयश आल्यानें त्यास जवळजवळ, पेशव्यांच्या सर्व स्वाऱ्यांत, एक कोटीची घस सोसावी लागली. पेशव्यांच्याशिवाय निजाम व इंग्रज यांच्याशींहि याला झगडा करावा लागला. पेशव्यांच्या घरांत कलह सुरू झाल्यामुळें याचा फायदा झाला. यानें अनेक मराठे सरदारांचा पराभव केला. पण हरिपंत फडक्यानें यास चांगलाच जेरीस आणून पुष्कळ पैसा याच्याकडून वसूल केला. राघोबादादानें याच्यावर स्वारी केली, पण यानें त्यास वश करून घेऊन दरसाल सहा लक्ष खंडणी देण्याचा तह करून परत पाठवला. राघोबाला यानें २४००० होन बक्षिस देऊन त्यास अनुकूल करून घेतलें. चितूर येथें इंग्रजांशीं लढतांना १७८२मध्यें हा मरण पावला. याचें धोरण विरुद्ध पक्ष जोरदार वाटला कीं पड घ्यावी असें होतें. हैदराला धर्म, नीति किंवा दया कांहीं नव्हती, हा निरक्षर व उलट्या काळजाचा होता. याला पांच भाषा चांगल्या येत. हा सर्व काम झटपट उरकी. याची स्मरणशक्ति तीव्र होती. तसेंच हा अवघड आंकडेमोडींतहि कुशल होता. लोकांचा स्वभाव व गुण ओळखण्याचें ज्ञान यास उत्कृष्ट असल्यामुळें याला आपल्याभोंवतीं कार्यक्षम माणसें गोळा करतां आलीं. स्वतः काम पहाणें व कडक अम्मल ठेवणें या गुणांची जोड मिळाल्यानें त्यास १८ व्या शतकांत रणजितसिंगाप्रमाणें दक्षिणेकडे राज्य स्थापतां आलें. याच्या ताब्यांत इ. स. १७६१ पासून पूर्ण सत्ता होती, तरी राजा अशा अर्थाची सुलतान ही पदवी याच्यानंतर टिपूनें धारण केली.

हैदराबादः–निजाम सरकारची राजधानी. पूर्वीचें नांव भागानगर. हें शहर महंमद कुली नांवाच्या पांचव्या कुतुबशाही राजानें १५८९ सालीं वसविलें. १६८७ त हें शहर मोंगलांनीं जिंकिलें व नंतर निजाम उल्मुल्कनें येथें आपली राजधानी केली. शहराभोंवतालीं जो तट (भिंत) आहे तो समांतरभुज चौकोनी आहे. येथें पुष्कळच इमारती पाहण्यासारख्या आहेत; पण त्यांत चार मिनार, मक्का मशीद, हायकोर्ट, हॉस्पिटल, अशुरखाना, चार कमान, नामपल्ली व काचीगुडा येथील स्टेशनें, दार–उस्–शिफा, विश्वविद्यालयाची इमारत या फार चांगल्या आहेत. शहराला तलावाच्या पाण्याची सोय करून शहरभर नळांची सोय केली आहे. गांवांत हुसेनसागर व मीरअलम हे दोन तलाव आहेत. हें शहर मुचकुंदा अर्थात् मुसा या नदीच्या उत्तर व दक्षिण तीरावर वसलें आहे. नदीच्या उत्तर तीरावर रेसिडेन्सी आहे. हैदराबाद हें शहर मुंबईपासून ४९२ मैल, मद्रासपासून ५३३ मैल व कलकत्त्याहून ९८७ मैल दूर आहे. शहरांत मराठी, तेलंगी, कानडी व ऊर्दू बोलणाऱ्या लोकांची वस्ती आहे. सध्यां या शहराची लोकसंख्या ४६६८९४ (१९३१) इतकी आहे. गांवांत डांबरी रस्ते असून फिरण्यास बसची सोय आहे. सर्व शहर विजेच्या प्रकाशानें सुप्रकाशित असून तें तेलंगणांत वसलेलें आहे.

होकायंत्रः–दिशा दाखविणारें यंत्र. एका तबकडीवर दक्षिणोत्तर दिशा दर्शविणारा कांटा बसविलेला असतो. तबकडीच्या वर्तुळाचे ३६० भाग पाडलेले असतात व तीवर अष्टदिशांच्या खुणा असतात. तबकडीवरील कांट्याचें उत्तरटोंक उत्तरेकडे असतें. व तबकडीवरील उत्तर दिशेवरील खुणेवर कांट्याचें उत्तर दिशा दाखविणारें टोंक आलें म्हणजे समोरची उत्तर दिशा होय असें ओळखावयाचें.

कायम स्वरूपाच्या लोहचुंबकाच्या तत्त्वावर होकायंत्राची रचना केली आहे. चुंबककांटा नेहमीं दक्षिणोत्तर राहतो. पृथ्वी हाच एक लोहचुंबक आहे व तिचा उत्तर ध्रुव चुंबककांट्याच्या दक्षिणध्रुवाला आकर्षितो व उत्तर ध्रुवाला प्रतिसारितो हें तत्त्व होकायंत्राच्या रचनेच्या मुळाशीं आहे.



होकायंत्र

होनाजी बाळ (१७९०-१८१८ नंतर):– ‘ घनश्याम सुंदरा ’ या भूपाळीचा जनक व लावणी म्हणणारा. हा साताप्पाचा नातू व सयाजीचा मुलगा. सवाई माधवराव पेशवे यांच्यावेळीं हा उदयास आला. दुसऱ्या बाजीरावाला हा लावण्या म्हणून दाखवीत असे. लावण्या म्हणणें व पोवाडे रचणें याशिवाय गवळ्याचाहि धंदा हा करी. याचा त्रिंबकजी डेंगळ्याशीं स्नेह असून त्याच्या वाड्यांतच याची बैठक असे. खळनाथ हें याचें कुळदैवत. जेजुरीच्या खंडोबाच्या दर्शनास हा गेला होता. तेथें यानें एक लावणी केली. मारेकऱ्यानें याला ठार केलें. पुण्यास संगमावर याची समाधि होती; पण सध्यां तेथें एक बेलाचें झाड आहे. भाद्रपद वद्य १४ ला याचा मृत्युदिन अद्यापिहि पुण्यास साजरा होत असतो.

भैरवी रागांत लावण्या म्हणण्याबद्दल याची प्रसिद्धि होती. ‘ घनश्याम सुंदरा ’ ही याची भूपाळी अजूनहि कित्येकांच्या तोंडीं ऐकूं येते. या भूपाळीची गोडी कै. प्रो. शि. म. परांजपे यांनीं विशद करून दाखविली आहे. यानें अनंतफंदीची फारच प्रशंसा केली आहे. ‘ रंगपंचमीचा ’ व ‘ खर्ड्यांच्या लढाईचा ’ असे याचे दोन पोवाडे प्रसिद्ध आहेत.

होमरः–प्राचीन ग्रीक कवि. इलियड व ओडिसी हीं महाकाव्यें त्यानें रचिलीं आहेत अशी दंतकथा आहे. होमरच्या जीवनवृत्तांताविषयीं माहिती मिळत नाहीं. होमर नांवाची व्यक्ति खरोखरीच होऊन गेली किंवा काय याविषयीं शंका व्यक्त करण्यांत येते. होमरची कित्येक प्राचीन चरित्रें उपलब्ध आहेत. त्यांतील दोन हेरॉडॉटस् व प्ल्यूटार्क यांनीं लिहिलेलीं आहेत. त्यांत दिलेली ग्रंथकर्तृत्वाविषयींची माहिती विश्वसनीय नसली तरी त्यांतील होमरविषयींच्या प्राचीन दंतकथामुळें त्यांना महत्त्व आलें आहे. होमरच्या जीवनाविषयीं विश्वसनीय माहिती सांपडतच नसल्यामुळें पुष्कळ शहरें होमरचें जन्मस्थान म्हणून आपला हक्क सांगूं लागलीं. यांत स्मर्ना व किऑस हीं मुख्य होत. होमर अंध होता असा सार्वत्रिक समज आहे. तो ख्रिस्तपूर्व १२ व्या शतकाच्या प्रारंभापासून तों ७व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत केव्हांतरी होऊन गेला असावा असा संशोधकांचा कयास आहे. कांहींचें म्हणणें असें आहे कीं होमर हें त्याचें खरें नांव नसून धारण केलेलें नांव होतें. होमर म्हणजे एकत्र करणारा. यावरून असें दिसतें कीं होमर हा मूळ कवि नसून प्रचलित कवितांचा संग्राहक अथवा संकलनकार होता.

होमिओपाथी (**समचिकित्सापद्धति**):–वैद्यक शास्त्राचीं जीं अनेक अंगें आहेत त्यांत चिकित्सा (रोगनिवारण कसें व कोणत्या मार्गानें करावयाचें)हें एक प्रमुख अंग आहे. त्याचे कायाचिकित्सा (पोटांत औषध देणें) व शस्त्रचिकित्सा (शस्त्रक्रिया) असें दोन भाग आहेत. त्यापैकीं कायाचिकित्सेचा विचार होमिओपाथीमध्यें केला जातो; आणि म्हणूनच होमिओपाथी हें चिकित्साशास्त्र म्हणजे रोगनिवारणपद्धति होय. तें सर्व वैद्यकशास्त्र नव्हे; आणि म्हणून वैद्यकशास्त्रांतील इतर अंगांचा यांत प्रत्यक्षपणें विचार केला जात नाहीं.

ही पद्धति अगदीं नवीन असून जर्मनींतील सुप्रसिद्ध डॉ. सॅम्युअल हानिमान यानें सुमारें १२५–१५० वर्षांपूर्वीं ती निर्माण केली आहे. (हानिमान पाहा).

ओमोइऑस (Omoios) म्हणजे सदृश आणि पॅथॉस (Pathos) म्हणजे रोग या दोन ग्रीक शब्दांपासून होमिओपाथी हा शब्द तयार झाला आहे. मनुष्यांमध्यें रोगनिदर्शक अशीं जीं लक्षणें उत्पन्न झालीं असतील, तशाच प्रकारचीं म्हणजे तत्सदृश (प्रत्यक्ष तींच नव्हेत) लक्षणें शरीरांत उत्पन्न करणारें औषध देणें म्हणजे तत्सम असा कृत्रिम रोग शरीरांत उत्पन्न करणें (व तें देऊन रोग बरा करणें) इतका अर्थ रूढीनें या शब्दास प्राप्त झाला आहे.

वैद्यकीय क्षेत्रामध्यें होमिओपाथीला एक महत्त्वाचें व स्वतंत्र असें स्थान प्राप्त झालें आहे. ही केवळ एक चिकित्सापद्धतीच आहे असें नसून तें एक तत्त्वज्ञान आहे व या तत्त्वज्ञानाच्या आधारावरच रोगनिवारणाची योजना निश्चित ठरविण्यांत आली आहे. चिकित्सेचीं तत्त्वें व सिद्धांत निराळे असले कीं, वैद्यक-

शास्त्राच्या इतर अंगांकडे पाहण्याची दृष्टीहि वेगळी होते व त्यांचा उपयोग कसा करून घ्यावा यासंबंधींहि निराळा विचार करणें भाग पडतें. प्रस्तुत या ठिकाणीं दुसऱ्या बाजूचा विचार कर्तव्य नसून फक्त या चिकित्सापद्धतीच्या तत्त्वांची व सिद्धांतांची थोडक्यांत माहिती द्यावयाची आहे.

(१) मानवी शरीराचे सर्व व्यापार केवळ रसायन, पदार्थविज्ञानशास्त्र यांसारख्या भौतिक शास्त्रांच्या नियमांस धरूनच चालत असतात. त्यापलीकडे या व्यापारांवर नियंत्रण करणारी अतींद्रिय अशी कोणतीहि शक्ति नाहीं अथवा ती आहे असें धरून चाललों तरी तिचा विचार चिकित्सेच्या वेळीं करण्याचें कारण नाहीं; अशी एक सर्वसामान्य रूढ झालेली कल्पना आहे. ही कल्पना होमिओपाथीस मान्य नाहीं.

(२) मानवी शरीरांत अतींद्रिय अशी एक शक्ति आहे. तिच्या नियंत्रणाखालींच मनुष्याचे शारीरिक व मानसिक सर्व व्यापार चालतात. या अतींद्रिय शक्तीच्या प्रेरणेशिवाय शरीरांतील कोणताहि इष्ट वा अनिष्ट व्यापार होत नाहीं; व रोगचिकित्सा करतांना ही गोष्ट ध्यानांत धरणें अत्यंत आवश्यक आहे असें होमिओपाथीचें म्हणणें असून हा होमिओपाथीचा प्रमुख सिद्धांत आहे. या अतींद्रिय शक्तीस हानिमाननें प्रेरकशक्ति (ॲनिमेटिंग फोर्स–आत्मा) असें नांव दिलेलें आहे.

(३) या प्रेरक अथवा चेतनाशक्तीच्या स्वाभाविक व अस्वाभाविक अशा दोन अवस्था आहेत. स्वाभाविक अवस्था म्हणजेच निरोगी अवस्था होय. यामध्यें शरीराच्या निरनिराळ्या इंद्रियांची एकतानता कायम ठेविली जाऊन शरीराचें स्वास्थ्यरक्षण केलें जातें.

(४) कोणत्यातरी कारणामुळें ही एकतानता कायम ठेवण्याचें काम प्रेरकशक्तीकडून होईनासें झालें, स्वाभाविक–निरोगी–स्थिति नाहींशी होऊन अस्वाभाविक–रोगी–स्थिति (रोग) उद्भवते. रोग म्हणजे एखादी वस्तु अथवा स्वतंत्र पदार्थ नाहीं. तो एक जीवनाचा निराळा प्रकार आहे इतकेंच.

(५) ज्या प्रेरकशक्तीच्या योगानें आपले मानसिक व शारीरिक व्यापार चालतात ती प्रेरकशक्ति प्रथम बिघडते व ती बिघडली म्हणजे नंतरच इंद्रियांत कांहीं अनिष्ट असे फरक घडून येतात. हे फरक म्हणजेच रोग असून ते पुढें लक्षणरूपानें दृग्गोचर होतात. अर्थात् शारीरिक अस्वास्थ्याचें रोग हें कारण नसून–तो शारीरिक अस्वास्थ्याचा परिणाम अथवा कार्य आहे. चिकित्सा करतेवेळीं ही कार्यकारणमीमांसा अवश्य लक्षांत घेतली पाहिजे असें होमिओपाथीचें म्हणणें आहे.

(६) वारंवार मधून मधून उद्भवणारे, तसेंच दीर्घकाल टिकणारे जुनाट रोग किंबहुना शीघ्रगामी रोगसुद्धां ज्या वेळीं बरे होत नाहींत त्या वेळीं वर सांगितलेली कार्यकारणमीमांसा अवश्य लक्षांत घ्यावी लागते. त्याशिवाय कायमची रोगमुक्तता होणार नाहीं. रोगनिदर्शक लक्षणांचा केवळ रसायन व पदार्थविज्ञानशास्त्र यासारख्या भौतिक शास्त्रांच्या नियमाप्रमाणें विचार करून चिकित्सा ठरवून भागत नाहीं. त्याच्याहि पलीकडे जाऊन प्रकृति (प्रेरकशक्ति) म्हणून कांहीं चीज या शरीरांत आहे व त्याचा या विकृतीशीं संबंध येतो, तो काय आहे हें लक्षांत घेऊन चिकित्सा केल्याशिवाय विकृति बरी होणार नाहीं असें होमिओपाथीचें ठाम मत आहे.

दुसऱ्या भाषेंत हेंच सांगावयाचें म्हणजे केवळ रोगलक्षणें लक्षांत घेऊनच चिकित्सा केल्यास यश येत नाहीं, तर त्याचबरोबर रोग्याची प्राकृतिक लक्षणेंहि लक्षांत घेऊन चिकित्सा करावयास पाहिजे तरच यश येईल. रोग्याचा स्वभाव (तापट, शांत, हट्टी, मत्सरी वगैरे,) त्याच्या शरीराची, मनाची ठेवण, आचारविचार, आवडीनावडी, संवयी, हवा अगर अन्य कोणत्याहि कारणामुळें त्यास होत असलेलीं लक्षणें कमजास्त होणें (मोडॅलिटी–विकार अथवा संस्कारक्षमता) हीं प्राकृतिक लक्षणें होत. यासच (रोग्याचीं) प्राकृतिक लक्षणें असें म्हणावयाचें. रोगाचीं लक्षणें व रोग्याचीं लक्षणें असे दोन स्पष्ट भेद होमिओपाथीमध्यें केलेले आहेत. प्राकृतिक लक्षणें अधिक रोगाचीं लक्षणें मिळून जीं लक्षणें होतात त्यास रोग्याचीं लक्षणें असें म्हणावयाचें. या सर्व लक्षणांची माहिती घेऊनच औषधयोजना करावी लागते. या पद्धतीनें केलेल्या चिकित्सेस होमिओपाथीमध्यें प्राकृतिक (कॉन्स्टिट्यूशनल) चिकित्सा व दिलेल्या औषधास प्राकृतिक औषध असें म्हणतात. प्राकृतिक चिकित्सा हें होमिओपाथीचें प्रमुख वैशिष्ट्य होय. (प्राकृतिक औषधांचा विशिष्ट असा गटच होमिओपाथीमध्यें असून त्यांच्या लक्षणांची माहिती होमिओपाथीच्या निघंटूमध्यें सांपडते.)

(७) "रोग्याची चिकित्सा करा; रोगाची नव्हे" या लहानशा वाक्यांत वर केलेल्या विवेचनाचें म्हणजेच होमिओपाथिक तत्त्वज्ञानाचें सार सांठविलें आहे. ही चिकित्सापद्धति खालीं दिलेल्या प्रमुख नियमांस अनुसरून करावयाची असते.

(१) समःसमंशमयति—म्हणजे प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें रोग्यामध्यें जीं लक्षणें असतील तत्सदृश लक्षणें असलेलें औषध देऊन रोग बरा करणें हा या चिकित्सापद्धतीचा मुख्य नियम होय. निसर्गाच्या मूलभूत आधारावरच हा नियम ठरविला आहे. कोणत्याहि परिस्थितींत कधींहि न बदलणारा असा हा एक रोगनिवारणाचा नियम अथवा कायदा असणें ही या चिकित्सापद्धतींतील नियमांचे बाबतींतील विशेष प्रामुख्यानें सांगण्यासारखी गोष्ट होय. औषध अगर रोग कोणताहि असो व तो कोणत्याहि अवस्थेंतील असो, चिकित्सेचा 'समःसमंशमयति' हा नियम कधींहि बदलावयाचा नाहीं, अशा प्रकारचा रोगनिवारणाचा सर्वत्र लागू असणारा एकच नियम कोणत्याहि चिकित्सापद्धतींत नाहीं.

(२) एकच औषध द्यावयाचें, मिश्रण केव्हांहि द्यावयाचें नाहीं. निरनिराळीं औषधें एकत्र केलीं असतां त्या मिश्रणांत सर्व औषधांचे गुण सारखेच शिल्लक राहतात असें नाहीं. त्यांत फरक पडतो. हे फरक पडलेले गुणधर्म कोणते हें माहित नसतांना चिकित्सा करावी लागते; व तसें करणें रोग्याच्या हिताच्या दृष्टीनें धोक्याचें असतें; म्हणून मिश्रण देण्याच्या पद्धतीवर होमिओपाथीचा मोठा कटाक्ष आहे. रोग्यांमध्यें असलेलीं जास्तींत जास्त लक्षणें (लक्षणसमुच्चय) एकत्र विचारांत घ्यावयाचीं व हीं सर्व लक्षणें ज्या औषधाच्या जास्तींत जास्त लक्षणांशीं जमत असतील तें औषध शोधून काढून तेवढें एकच औषध देऊन रोग बरा करावयाचा हा दुसरा प्रमुख नियम होय.

(३) औषध अतिशय सूक्ष्म प्रमाणांत देणें. होमिओपाथिक पद्धतीनें तयार केलेलीं औषधें वजन करून अगर मोजून देण्याचें कारण नसतें. एक गोळी अगर एक थेंब याचेऐवजीं जास्त गोळ्या अगर जास्त थेंब दिले तर अपाय होतो अगर गुण येण्यांत कमजास्त फरक होतो असेंहि नाहीं.

(४) औषधें तयार करण्याची विशिष्ट पद्धति—यास होमिओपाथीमध्यें पोटॅंटायझेशन अथवा अटेन्युएशन म्हणजे 'प्रभावनपद्धति' असें म्हणतात. होमिओपाथीमध्यें सहसा मूळ स्वरूपांत औषधें वापरलीं जात नाहींत. प्रभावन (चूर्ण असल्यास खलणें आणि पातळ असल्यास हालविणें म्हणजे जोराचे धक्के देणें या) पद्धतीनें ओज वाढवून तयार केलेलीं निरनिराळ्या क्रमांकांचीं औषधेंच वापरतात.

(५) औषध दिल्यानंतर रोग्यास आराम वाटत आहे, लक्षणांत सुधारणा होत आहे तोंपर्यंत पुन्हां औषध द्यावयाचें नाहीं. सुधारणा थांबून रोगलक्षणें शिल्लक असलीं तर पुन्हां औषधाची मात्रा द्यावयाची.

यांपैकीं कोणतीहि गोष्ट ॲलोपाथिक अगर इतर चिकित्सापद्धतींत आढळत नाहीं.

(६) औषधी पदार्थांचा प्रयोग मानवी देहावर करूनच त्याचे गुणधर्म ठरवावयाचे व ते लक्षांत घेऊनच चिकित्सा करावयाची. ही या पद्धतींतील आणखी एक विशेष गोष्ट होय. बेडूक, उंदीर वगैरेसारख्या प्राण्यांवर अगर अन्य मार्गानें एखाद्या औषधी पदार्थाचे प्रथम प्रयोग करून त्याचे गुणधर्म पहावयाचे, व या प्रयोगाच्या धोरणानुसार रोग्यास तें औषध देऊन ते गुणधर्म निश्चित करावयाचे असा प्रकार ॲलोपाथीमध्यें आहे. ॲलोपाथिक औषधांच्या गुणधर्मविषयक निघंटूमध्यें या पद्धतीनें सिद्ध केलेल्या औषधांचे गुणधर्मच दिलेले असतात. हानिमान यास ही पद्धति पसंत नव्हती. औषधी पदार्थांचा प्रयोग मानवी देहावर करून दृष्टोत्पत्तीस आलेलीं लक्षणेंच शुद्ध, विश्वसनीय व खरीं मानलीं पाहिजेत असें त्याचें म्हणणें असें. म्हणून त्यानें निरनिराळ्या प्रकृतीच्या, वयाच्या व राहणीच्या अनेक निरोगी माणसांना औषधें देऊन त्यांचे गुणधर्म निश्चित केले आहेत. हानिमाननंतर अनेकांनींहि ही पद्धति स्वीकारून आणखी पुष्कळ औषधांचे गुणधर्म ठरविले आहेत. या पद्धतीनें सिद्ध केलेले गुणधर्मच होमिओपाथीच्या निघंटूमध्यें दिलेले असतात, व हे गुणधर्म लक्षांत घेऊनच रोग्याची चिकित्सा होमिओपाथीमध्यें करतात. या पद्धतीस औषधांचें सिद्धीकरण (प्रूव्हिंग ऑफ ड्रग्ज) असें म्हणतात.

डॉ. हानिमान यानें अनेक वर्षांच्या अनुभवानें व संशोधनानें मानवी प्राण्यांच्या तीन प्रकृति असतात असें ठरविलें आहे. या बाबतींत हानिमाननें केलेलें विवेचन सर्वमान्य आहे असें नाहीं. होमिओपाथिक चिकित्सक पुष्कळ वेळेला या विवेचनास अनुसरून

औषधांचा उपयोग करतात व त्यापासून फायदा होतो एवढें मात्र खरें.

(१) सोरा (Psora) म्हणजे कुष्ट. (२) सिफिलिस (Syphilis) म्हणजे उपदंश. (३) सायकोसिस (Sycosis) म्हणजे प्रमेह अशीं या प्रकृतीस तीन नांवें दिलेलीं असून कोणतें लक्षण कोणत्या दोषाचें (कुष्ट, उपदंश, प्रमेह) द्योतक आहे हेंहि साधारण ठरविलेलें आहे. एकाच प्रकृतिमध्यें दोन अगर तीन दोषांचें अस्तित्व असून त्यापासून संमिश्र (दोषांचीं) प्रकृतीचीं लक्षणेंहि उद्‌भवतात. या दोषांचीं लक्षणें उद्‌भवण्यासाठीं प्रत्यक्ष कुष्ट, उपदंश अगर प्रमेह हे रोग व्हावयासच पाहिजेत असें नाहीं. अनुवंश अगर पारा, गंधक यांसारख्या औषधांचा दुरुपयोग करणें वगैरे कारणांमुळें या निरनिराळ्या प्रकृति उद्‌भवूं शकतात. म्हणून उपदंश, प्रमेह हीं नांवें पाहून बिचकण्याचें कारण नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें या दोषांचीं लक्षणें असणाऱ्यास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीतीनें हे रोग झालेले असलेच पाहिजेत असें नाहीं. मानवी प्राण्याच्या प्रकृतीवर निरनिराळीं लक्षणें असणाऱ्या तीन दोषांपैकीं एक किंवा अनेक दोषांचा पगडा नेहमीं असतो. त्यांतून कोणीहि सुटत नाहीं, एवढाच त्याचा अर्थ आहे. मग हानिमाननें निरनिराळ्या लक्षणांच्या गटास वापरलेलीं कुष्ट, उपदंश, प्रमेह इत्यादि नांवें पसंत नसल्यास त्याचे ऐवजीं दुसरीं कोणतींहि नांवें दिलीं तरी चालेल.


या दोषावर उपयोगी पडणाऱ्या औषधांचे (कुष्ट-मारक, उपदंशमारक, प्रमेहारि असे) गटहि असतात. कोणतीं औषधें कोणत्या प्रकृतीवर उपयोग पडतील या-बद्दल लक्षणांसह माहिती होमिओपाथीचा निघंटु (मटेरिया मेडिका) या पुस्तकांत दिलेली असते.

या चिकित्सेपासून होणारे फायदे:-(१) रोग लवकर, सुखानें व कायमचे बरे होतात. औषध घेतांना अगर त्यानंतर कोणत्याहि प्रकारचा त्रास होत नाहीं. (२) औषधापासून विषारी अपाय होण्याची भीति मुळींच असत नाहीं. (३) असाध्य समजले जाणारे अनेक रोग व केवळ शस्त्रक्रियेच्या क्षेत्रांत येणारे असे समजले जाणारे कांहीं रोगसुद्धां कायमचे बरे होतात. (४) औषध घेण्यास गोड असतें. कडू, आंबट, खारट वगैरे निरनिराळ्या रुचि अगर वास या औषधांत असत नाहींत. (५) औषधास खर्च अतिशय कमी येतो.

ही चिकित्सापद्धति दिसण्यांत जरी सोपी व साधी असली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत यशस्वी रीतीनें तिचा उपयोग करून घेणें हें तितकेसें सोपें नाहीं. या पद्धतीचा पायाशुद्ध व शास्त्रोक्त अभ्यास केल्याशिवाय ती चांगलीशी अवगत होत नाहीं. सूक्ष्म निरीक्षण, चांगली स्मरणशक्ति व चिकाटीचा उद्योग असणाऱ्या अभ्यासू मनुष्यासच ती साध्य करतां येईल. वरवर अभ्यास करून हीं औषधें वापरल्यास त्यांत अपयश येतें; शिवाय या उपयुक्त शास्त्राबद्दल गैरसमजहि उत्पन्न होतो.

प्रचलित रूढ कल्पनांच्या विरुद्ध एखादें नवीन व क्रांतिकारक तत्त्व प्रस्थापित करावयाचें झाल्यास त्यास (१) उपहास अथवा अवहेलना (२) प्रत्यक्ष व तीव्र स्वरूपाचा विरोध (३) उदासीनपणा व सहानुभूति व प्रत्यक्ष मदत आणि स्वीकार या चार अवस्थांतून जावेंच लागतें. अद्यापहि ही चिकित्सा सर्वमान्य झाली आहे असें नाहीं. ही पद्धति मान्य नसल्यामुळें अज्ञानानें वा जाणूनबुजून त्यास विरोध व तिची थट्टा करणारे व टर उडविणारे लोक आहेतच. तथापि अनेक सुप्रसिद्ध, आपल्या धंद्यांत प्राविण्य संपादन केलेले, अधिकारी व विद्वान् समजले जाणारे असे ॲलोपाथिक भिषग्वर हानिमानची व या चिकित्सापद्धतीची मुक्तकंठानें स्तुति करीत असून कांहींनीं तर ॲलोपाथिक चिकित्सापद्धति सोडून होमिओपाथीचाच सर्वस्वीं अंगिकार केलेला आहे. पाश्चिमात्य देशांत याचा फार प्रसार झालेला असून अमेरिकेंत तर होमिओपाथीचीं रुग्णालयें व विद्यालयें स्थापन झालेलीं आहेत. इंग्लंडसारख्या पुराणप्रिय देशांतसुद्धां होमिओपाथीचीं मोठमोठीं रुग्णालयें निघालीं असून होमिओपाथीचे पदवीधरवर्गहि चालविले जातात. मोठा निधि जमवून या शास्त्राचें संशोधन-कार्यहि तेथें चालू आहे. हिंदुस्थानांतहि या पद्धतीचा वाढत्या प्रमाणांत प्रसार होत असून कलकत्ता किंबहुना सर्व बंगाल देश हा या विद्येचें माहेरघरच आहे असें समजलें जातें.

होला:-पलंगाप्रमाणें घरटें बांधणारा व धान्यावर जगणारा पक्षी. हा स्थलचर वर्गापैकीं होय. मैनेएवढें याचें अंग आहे. कांहीं लोक याचें मांस खातात. त्यामुळें पुष्कळ ठिकाणीं याची शिकार होत असलेली दिसते. याला 'कवडा' या नांवानें देखील ओळखतात. होला हा धान्यावरच जगतो. कवड्याची मादी वर्षांतून



हंगेरीच्या राजधानीचें शहर बुडापेस्ट.

कमींत कमी सहा वेळां तरी विते. हा प्राणी पलंगाप्रमाणें आपलें घरटें बहुतकरून बाभळीवर बांधतो. हें घरटें अगदीं साधें असून तें फारच थोड्या काटक्यांच्या सहाय्यानें बनविलेलें असतें. पडवींत, भिंतींत किंवा इमारतींत घरटीं बांधणारे कांहीं कवडे दिसतात. या घरट्यांत मादी दोन पांढरीं अंडीं घालतें. नर मादीची मनधरणी करण्यासाठीं तिच्याभोंवतीं सारखा फिरत असतो. होल्याच्या चार जाती आहेत. त्यांपैकीं पहिल्या जातीचा रंग ठिपकेदार करडा असून त्याचा कु कु कू कू असा आवाज ऐकूं येतो. दुसऱ्या जातीच्या होल्याचा रंग पिंगट असून तो क क क कु कु असा पांच वेळां आवाज करतो. तिसऱ्या प्रकारच्या जातींत मानेवर पट्टा असतो. हा पट्टा काळा असून त्याच्या कडा पांढऱ्या असतात. पिसाऱ्यांत निळसर झांक असते. व पिसांवर ठिपके नसतात. या सर्व कारणांनीं या जातीचा होला सुंदर दिसतो. त्याचा आवाज क्यु क्यु क्यु असा ऐकूं येतो. वरील तीनही जातींत नरमादी एकाच रंगाच्या पिसाऱ्याचे असतात. चौथी जात. या जातीचा नर तांबड्या रंगाची झांक असणाऱ्या पिसाऱ्याचा असतो. याचे पंख मात्र तांबड्या रंगाचे असतात व मानेवर काळी पट्टी असते. या जातीची मादी पिंगट रंगाची असून तिच्या पंखाचा रंग तांबडा नसतो. चौथी जात कु कु कु कु असा आवाज करते. वरील चारही जातींचे पक्षी वर्षभर आवाज करीत असतात.

हंगेरीः—ऑस्ट्रिया हंगेरी या संयुक्त साम्राज्यांतील एक राज्य. १९१९च्या व्हार्सायच्या तहान्वयें आस्ट्रिया व हंगेरी यांची विभागणी होऊन हंगेरी राष्ट्र स्वतंत्र झालें. आस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया, रुमानिया व युगोस्लाव्हिया यांमध्यें हें राष्ट्र आहे. क्षेत्रफळ ३५९११ चौ. मैल आहे. लोकसंख्या सुमारें एक कोटी. या लोकसंख्येंत जवळ जवळ निम्मे माग्यार (हंगेरियन) व बाकीचे क्रोट, सर्बियन, रुमानियन, स्लाव्ह, आर्मेनियन व बल्गेरियन अशा या अल्पसंख्यांकांचें हें राष्ट्र आहे.

राजधानीचें शहर बुडापेस्ट हें असून डान्यूब नदीच्या दोन्ही तीरावर वसलेलें आहे. डान्यूब नदी हंगेरींतून उत्तर दक्षिण वाहत असून तिचा उपयोग शेतीकडे व मोठ्या जहाजांच्या वाहतुकीकडे होतो. बहुतेक सर्व प्रदेश सपाट असून येथील शेती हाच मुख्य धंदा आहे. गहूं, मका, राय, बार्ली व बटाटे यांचें मुख्य पीक आहे. कोळसाहि हंगेरींत सांपडतो. शिवाय मोठमोठीं जंगलें देखील आहेत.

गेल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर बेलाकुन या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं कांहीं दिवस कम्युनिस्टांनीं गोंधळ घातल्यावर १९१९ च्या शेवटीं ॲडमिरल हॉर्थी यानें कम्युनिस्टांना हाकून लावलें व रीजन्सी स्थापून तो 'ॲडमिनिस्ट्रेटर ऑफ दि रेल्म' या नांवानें त्यानें राज्यकारभार आपल्या हातीं घेतला. १९२० मध्यें आस्ट्रियाचा पदच्युत राजा चार्लस यानें दोनदां हंगेरींत शिरून हंगे-

रीचें राज्य बळकाविण्याचा प्रयत्न केला, पण ॲडमिरल हॉर्थीनें त्याचे प्रयत्न विफल केले. नंतर त्याच्या नेतृत्वाखालीं हंगेरीनें आपला उत्कर्ष करून इटली जर्मनीशीं मैत्री जोडली. १९३८ च्या सप्टेंबरमध्यें झेकोस्लोव्हाकियाची विभागणी झाली त्यावेळीं हंगेरीला स्लोव्हाकियापैकीं बराच भाग मिळाला व दुसऱ्या विभागणीच्यावेळीं म्हणजे मार्च १९३९ मध्यें रशियापैकीं रुथेनियन लोक असलेला आणखी थोडा भाग मिळाला. यामुळें हंगेरीची सरहद्द रशियाच्या सरहद्दीला भिडली आहे. चालू महायुद्धांत हंगेरी तटस्थ असून नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत तो 'त्रिराष्ट्र करारांत' सामील झाला आहे.

हंगेरींत निरनिराळे राजकीय पक्ष असून वरिष्ठ व कनिष्ठ अशीं दोन विधिमंडळें आहेत. जमिनदार वर्गाचें प्राबल्य राजकारणांत असून ॲडमिरल हॉर्थी हा डिक्टेटर आहे.

हंसः—बदकाच्या जातीचा पण जलचर वर्गांपैकीं फारच मोठा पक्षी. मूळचा हा तिबेटमधल्या मानससरोवरच्या कांठचा. याचा रंग पांढरा सफेत असतो. क्वचित् ठिकाणीं हा काळ्या रंगाचा असल्याचेंहि आढळतें. बांध्यानें हा बदकापेक्षां मोठा असतो. खूप पोहणें, उंच उडणें व लांबचा प्रवास करणें या गोष्टी तो सहज करूं शकतो. याची शक्तीदेखील अचाट आहे. ती इतकी कीं याच्या मदतीनें कित्येक माणसें सहज तरून जातात. किडे, लहान लहान मासे व झाडपाला यांवर हंसाची उपजीविका चालते. बदक व हंस यांमध्यें त्याच्या मोठेपणाशिवाय आणखी पुष्कळच बाबतींत फरक आहे. हंसाची मान बांकदार असून त्याची चोंच अर्धी काळी व अर्धी पिवळी असते.हा प्राणी आपलें घरटें काटक्यांचें व गवतांचें बनवितो. हें घरटें पाण्याच्या कडेला असतें. हिरवट रंगाची छटा असणारीं पांढरीं अंडीं ५ पासून १० पर्यंत मादी घालते. हंसाचें पिलूं एक वर्षाचें होईपर्यंत तें करड्या पण पिंगट रंगाचें असतें. पुढें त्याचा रंग बदलतो. हंस हा जलचर प्राण्यांचा सौंदर्याच्या दृष्टीनें राजाच आहे असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. याचीं वर्णनें आपल्या कथापुराणांतून आलीं आहेत. त्यांपैकीं हंस व दमयंती हें प्रमुख व सर्वपरिचित उदाहरण होय. हंसामध्यें 'राजहंस' नांवाची एक काल्पनिक जात कवींनीं मानली असून त्या जातीचा हंस पिवळ्या अगर सुवर्णरंगाचा असतो. हा पक्षी ५० वर्षांपावेतों जगतो.

याच्या अनेक जाती आहेत. त्यांत शीळ घालणारी, ऑस्ट्रेलियन व कांहीं अमेरिकन या प्रमुख होत.

हॅरॉल्ड लॉइड (१८९५-):—विनोदी अमेरिकन सिनेमानट. बरखार्ड येथें २० एप्रिल १८९५ रोजीं याचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण संपतांच सान डीगो येथील 'स्कूल ऑफ ड्रॅमॅटिक आर्ट' या शाळेंत त्यानें अभिनयाचें शिक्षण घेतलें व वयाच्या १२व्या वर्षींच त्यानें 'टेस् ऑफ द यूबरव्हिलेज' या नाटकांत छोट्या अवेची भूमिका केली. १९१३ मध्यें तो सिनेमासृष्टींत शिरला. एडिसन यूनिव्हर्सल, मॅक सेनेट, पॅरामाउंट इ. कंपन्यांतर्फे त्याचे ५० हून अधिक लहानमोठे चित्रपट निघाले आहेत. The Kid Brother, Girl Shy, Doctor Jack, Speedy, For Heavens Sake हे मूकपट व WelCome Danger (1929), Feet First, Movie Crazy, Cats' Paw, The Milky Way हे बोलपट प्रख्यात आहेत. बालिशपणा व भोळेपणा हें याच्या अभिनयाचें वैशिष्ट्य आहे. सर्व भूमिकांतून यानें चष्मा वापरला असल्यामुळें त्याला 'चष्मेवाला हॅरॉल्ड लॉइड' म्हणूनच सर्वत्र ओळखतात.

हॉकीः—एक मैदानी खेळ. कठीण पदार्थाचा चेंडू व जमिनीकडचें टोंक वक्र असलेली कांठी यांनीं खेळावयाचा खेळ. प्रत्येक बाजू अकरा खेळाडूंची असते व त्यांपैकीं एक गोलकीपर, दोन बॅक्स, तीन हाफ बॅक्स व पांच फॉरवर्डस् खेळाडू याप्रमाणें विभागणी केलेली असते.

क्रीडांगणाच्या चौकोनाची लांबी १०० यार्ड व रुंदी ५० किंवा ६० यार्ड ठेवतात. रुंदीच्या मध्यापासून क्रीडांगणांत १५ यार्डांचें अर्धवर्तुळ असतें व या वर्तुळाच्या मध्यावर १२ फूट रुंद व ७ फूट उंच गोलाची जाळीदार चौकट असते. क्रीडांगणाचा मध्य दर्शविण्यासाठीं एक वर्तुळ काढतात. रुंदीच्या बाजूकडून मध्याकडे २५ यार्डांवर दोन्ही बाजूंस दोन रेषा काढतात व त्याचप्रमाणें लांबीच्या दोन्ही बाजूस क्रीडांगणांत पांच यार्ड लांबीवर स्त्रियांच्या बाबतींत व सात यार्ड लांबीवर पुरुषांच्या बाबतींत दोन्ही बाजूस रेषा आखतात. चेंडू केवळ खेळण्याच्या काठीनें (स्टिक्) टोलवावयाचा असतो. कोणत्याहि वेळीं चेंडू मारल्यावर ही काठी खांद्याच्यावर उचलली जातां कामा नये.

हॉलंड:–यास 'नेदर्लंड्सचें राज्य' असें सरकारी नांव आहे. क्षेत्रफळ १२,५८२ चौ. मैल, लोकसंख्या ८,४७४,५०६. राजधानीचें ठिकाण ॲमस्टरडॅम. दुसरें महत्त्वाचें शहर हेग. देश मुख्य शेतीप्रधान असून गुरें पाळणें, फुलें, कोको, बिटा, कापड तयार करणें हे प्रमुख धंदे आहेत.

हॉलंडची सध्यांची राणी विल्हेमनिया (ज. स. १८८०). ही गादीवर १८९० मध्यें आली व आजतागायत तिच्या नांवेंच राज्यकारभार चालू आहे. हॉलंडमध्यें सनदशीर राजसत्ता प्रस्थापित झालेली असून सध्यांची घटना १८४८ मध्यें तयार झाली आहे. सीनेट व हौस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह असे पार्लमेंटचे दोन भाग असून २५ वर्षांवरील सर्व माणसांस मतदानाचा हक्क आहे.

हॉलंडचें साम्राज्य मोठें असून ३०० वर्षांपासून वाढत आलेलें आहे. जावा, सुमात्रा व आग्नेयेपासून ते ऑस्ट्रेलियापर्यंतचीं इतर बेटें, शिवाय वेस्ट इंडिज बेटें व दक्षिण अमेरिकेंतील डच गियाना व कोरॅकाओ येथें हें साम्राज्य पसरलें आहे. साम्राज्याचें एकंदर क्षेत्रफळ सुमारें ८००००० चौ. मैल असून लोकसंख्या पांच कोटी आहे.

१८१४ मध्यें फ्रान्सविरुद्ध संरक्षण म्हणून हें राज्य निर्माण करण्यांत आलें. त्यांत आरंभीं बेल्जियम, नेदर्लंडस् हा भाग होता. पण १८३०–३१ मध्यें बेल्जियम स्वतंत्र झाल्यामुळें हा भाग बेल्जियमला जोडला गेला. त्याच्यानंतर अद्यापपर्यंत युरोपच्या राजकारणांत हॉलंडनें कांहीं महत्त्वाचा भाग घेतलेला नाहीं. गेल्या महायुद्धांत हॉलंड तटस्थ होतें.

१० मे १९४० रोजीं हिटलरनें हॉलंडवर अकस्मात् स्वारी केली. १५ मे १९४० रोजीं हॉलंडमधील डच सेनापतीनें हत्यारें खालीं ठेवलीं व शरणागती जाहीर केली. १९ मे १९४० रोजीं हॉलंड पूर्णपणें जिंकून जर्मनीस जोडल्याचें हिटलरनें जाहीर केलें. युद्ध सुरू होतांच राणी विल्हेमनिया ही इंग्लंडला पळून गेली.

ह्यूगो, व्हिक्टर (१८०२ ते १८८५):–१९ व्या शतकांतील पहिल्या प्रतीचा फ्रेंच कवि, नाटककार, निबंधकार व कादंबरीकार. लेस मिझरेबल्स (Les Miserables) या महाकाव्याचा जनक म्हणून जग त्याला ओळखतें. हें काव्य १८६२ सालीं निरनिराळ्या दहा भाषांत एकाच वेळीं प्रसिद्ध करण्यांत आलें. यांत पाप व अधोगती यांच्या गर्तेत पडलेल्या जीन व्हॅलजीन नामक नायकानें आत्मोद्धार कसा करून घेतला ही कथा रेखाटली आहे.

व्हिक्टर ह्यूगो हा एका सुप्रसिद्ध सेनापतीचा मुलगा. माद्रिद व पॅरिस येथें त्याचें शिक्षण झालें. आयुष्याच्या पूर्वार्धांत जरी त्याचा ओढा राजपक्षाकडे होता तरी उत्तरार्धांत तो लोकशाहीचा कट्टा कैवारी झाला. १८२२ सालीं त्याच्या काव्यांचा एक संग्रह प्रसिद्ध झाला. १८२३ व १८२५ या वर्षीं अनुक्रमें Hans of Iceland व Bug gargal या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. १८२६ सालीं त्याचा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. ह्यूगो हा रोमँटिक सांप्रदायाचा पुढारी होता. Cromwell, Hernani, Marion Delorme, The king Amuses Himself, Ruy Blas हीं त्याचीं नाटकें. १८४१ सालीं फ्रेंच ॲकॅडेमीचा सभासद झाला. १८४५ सालीं लुई फिलिप यानें त्याला फ्रान्सचा सरदार केलें. १८४८ च्या राज्यक्रान्तीच्या समयीं तो राजकारणाच्या जंजाळांत सांपडला. प्रथमतः तो नेपोलियनचा पक्षपाती होता. पण पुढें लोकपक्षाचा पुढारी झाला. नेपोलियन सत्तारूढ झाल्यावर त्याजविरुद्ध झगडा चालूं ठेवल्यामुळें याला निर्वासित व्हावें लागलें. ब्रुसेल्समध्यें निर्वासित असतांना त्यानें Nepoleon the Little ही उपहासात्मक कविता लिहिली. Ninetythree ही उत्कृष्ट कादंबरी त्यानें आपल्या वयाची सत्तरी ओलांडल्यावर प्रसिद्ध केली. त्याचे बरेचसे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

ह्यूम, डेव्हिड् (१७११–१७७६):–सुप्रसिद्ध इंग्लिश इतिहासकार व तत्त्वज्ञ. त्यानें कायद्याचा अभ्यास केला होता; परंतु वाङ्मय व तत्त्वज्ञान या विषयांची आवड असल्यामुळें फ्रान्सला जाऊन तीन वर्षें तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला, व Treatise upon Human Nature हा मानवी स्वभाव या विषयांवरील आपला प्रबंध लिहिला. या निबंधाचा विशेष बोलबाला झाला नाहीं. पण त्यानंतर त्यानें लिहिलेले नैतिक, व राजकीय व वाङ्मयीन निबंधसंग्रह हें पुस्तक विशेष लोकप्रिय झालें. त्याचा Enquiry concering the Hnman understanding हा ग्रंथ म्हणजे त्याच्या पहिल्या ग्रंथाची सुधारलेली आवृत्ति आहे. Political di courses (राजकीय व्याख्यानें) व Inquiry concerning the Principles of Morals (नैतिक तत्त्वविषयक चर्चा) व इंग्लंडचा इतिहास हे त्याचे

महत्त्वाचे ग्रंथ होत. त्यानें लिहिलेल्या 'इंग्लंडचा इतिहास' या ग्रंथानें त्याला कीर्ति मिळवून दिली.

ज्ञ

ज्ञानदेव:—मराठी भाषेंतील प्रसिद्ध ग्रंथ ज्ञानेश्वरी तिचे कर्ते. महान् योगी व भगवद्भक्त श्रीज्ञानदेव यांचा जन्म आळंदी येथें शके ११९७, श्रावण वद्य ८ गुरुवार रोजीं रात्रीं झाला. यांच्या वडिलांचें नांव विठ्ठलपंत व आईचें नांव रखुमाबाई. ज्ञानदेवांचे वडिल हे पैठणजवळील आपेगांवचे गोविंदपंत कुलकर्णी यांचे चिरंजीव, व मातोश्री रखुमाबाई ह्या आळंदी येथील सिद्धोपंत कुळकर्ण्यांची कन्या. ज्ञानदेवांना थोरले बंधु निवृत्तिनाथ व धाकटे बंधु सोपानदेव व सर्वांत धाकटी बहीण मुक्ताबाई अशीं तीन भावंडें होतीं. हीं सर्वच भावंडें अत्यंत अलौकिक होतीं व ज्ञानदेवाहि तिघांचे थोरले बंधु निवृत्तिनाथ हेच गुरु होते. ज्ञानदेवांच्या चरित्रावर दोन गोष्टींचा मोठा परिणाम झाला आहे. त्यांपैकीं हीं सर्व मुलें विठ्ठलपंतांनीं संन्यासाश्रमांतून पुनः गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर त्यांना झालीं ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. ज्ञानदेवांचे आजे गोविंदपंत व आजी नीराबाई यांना गहिनीनाथांचा विठ्ठलपंताच्या जन्माच्या आधींच उपदेश झाला होता ही दुसरी होय. हेच गहिनीनाथ ज्ञानदेवांचे बंधु व गुरु निवृत्तिनाथ ह्यांचे गुरु होत.

विठ्ठलपंत हे मुळांतच विरक्त. पण यात्राप्रसंगांत दृष्टान्त होऊन त्यांनीं रखुमाबाईशीं विवाहास संमति दिली. पण त्यांची वैराग्यवृत्ति कधींच मावळली नव्हती. यामुळें वडिल वारल्यावर तिनें पुनः उचल खाल्ली. ते काशीस गेले व एका मोठ्या उदार अन्तःकरणाच्या स्वामींना आपणांस बायकोवगैरे नाहीं असें खोटेंच सांगून त्यांच्याकडून आश्रय घेतला. दैववशात् ते स्वामी यात्राप्रसंगानें आळंदीस आले असतां त्यांना खरी गोष्ट कळली. लगेच ते तसेंच परत काशीस गेले व त्यांनीं पुनः आपला शिष्य जो चैतन्याश्रम (विठ्ठलपंतांचे संन्यासाश्रमांतील नांव) त्यास गृहस्थाश्रम स्वीकारावयास लावून आपल्या कुटुंबाबरोबर संसार करावयास लावलें. गुरुमुखीचें अक्षर हेंच शास्त्र समजून विठ्ठलपंतांनीं संसारास पुनः आरंभ केला.

पण ही गोष्ट जनाचाराच्या दृष्टीनें अत्यंत अघटित व गर्ह्य अशी झाली. यामुळें आळंदीच्या लोकांकडून या जोडप्यास मोठा उपद्रव होऊं लागला. तेव्हां हीं दोघें गांवाबाहेर एका झोंपडींत राहूं लागलीं व तेथेंच या चार अलौकिक मुलांचा जन्म झाला.

मुलें लहान असतांना विठ्ठलपंतांना ज्या अडचणी येत त्या त्यांनीं वारून नेल्या. पण ज्यावेळीं निवृत्तिनाथ व ज्ञानदेव हे मौंजीबंधनाच्या संस्कारास योग्य झाले त्यावेळीं धर्मनिष्ठ विठ्ठलपंत व रखुमाबाई यांच्या मनाला आपल्या मुलांनीं संस्कारविरहित रहावें हें बरें वाटेना. म्हणून आळंदीच्या ब्राह्मणांची सभा भरवून त्यांना विठ्ठलपंतांनीं विनंति केली कीं, 'माझ्याकडून शास्त्राज्ञा मोडण्याचा अपराध झाला तर त्याबद्दल मला शिक्षा सांगा, ती भोगण्यास मी तयार आहे; पण माझ्या मुलांना पावन करून घ्या.' तत्कालीन विद्वानांनीं धर्मग्रंथ चाळले. पण त्यांना विठ्ठलपंत व त्यांचें कुटुंब यांना देहान्तप्रायश्चित्ताविना दुसरें प्रायश्चित्त दिसेना; व त्याप्रमाणें त्यांनीं विठ्ठलपंतांना देहान्तप्रायश्चित्तच योग्य म्हणून सांगितलें. अत्यंत श्रद्धावान् अशा त्या दांपत्यानें देहान्तप्रायश्चित् घेण्याकरतां प्रयागाचा रस्ता स्वीकारला व तेथें गंगायमुनांच्या संगमांत त्यांनीं दोघांनीं आपले देह अर्पण करून इहलोकची यात्रा संपवली.

अशा रीतीनें विठ्ठलपंत व रखुमाबाई यांचा प्रश्न मरून कां होईना पण सुटला. तरी मुलांचा प्रश्न शिल्लकच राहिला. येथें एक गोष्ट सांगणें अवश्य आहे कीं, आईबाप जिवंत असतांनाच निवृत्तिनाथांना गहिनीनाथांचा अनुग्रह झाला होता; व त्यांच्यापासून ज्ञानदेवादि भावंडांनाही अनुग्रह मिळाला होता. कडकडीत वैराग्य, गुरूचा अनुग्रह, तपश्चर्या व पूर्वसुकृत यांनीं अल्पवयांतच या चौघांच्या ठिकाणीं मोठें अध्यात्मिक सामर्थ्य उत्पन्न झालें. हीं सर्वच भावंडें योगी होतीं. त्यांत निवृत्तिनाथ तर नांवाप्रमाणें नित्यनिवृत्तवृत्तीनें रहाणारे. यामुळें आईबाप सोडून गेल्यावर निवृत्तिनाथांनीं पुनः शुद्ध करून घेण्याबद्दल फारशी खटपट केली नाहीं. पण ज्ञानोबांना पुढें मोठा लोकसंग्रह करावयाचा होता. यामुळें आपण जर वेदाज्ञेस मान दिला नाहीं तर इतर लोक तिला कोणीच मानणार नाहीं अशी निवृत्तिनाथांची समजूत घालून पुनः पावन होण्याची खटपट त्यांनीं सुरू केली. आळंदीच्या ब्राह्मणांच्याकडे दाद लावून घेण्याकरितां ते गेले असतां तेथील ब्रह्मवृंदानें पैठणकर ब्राह्मणांचें

शुद्धिपत्र आणा म्हणजे तुम्हास आम्ही आपल्या जातींत घेऊं असें सांगितलें. लगेच ज्ञानदेवादि चारीं भावंडें पैठणास जाण्यास निघालीं. तेथेंहि प्रथम यांची कुचेष्टाच झाली. पण ज्ञानदेवांनीं घाटावर चर्चेकरतां मंडळी जमली असतां एक मोठा चमत्कार केला व त्यायोगानें त्यांच्या चरित्रास अगदींच वेगळें वळण मिळालें. ज्ञानदेवांनीं तेथें सर्व जमलेल्या ब्राह्मणादिक लोकांसमोर रेड्याकडून वेद बोलविले. या चमत्कारामुळें त्यांची हेटाळणी करण्याच्या ऐवजीं लोक देव म्हणून त्यांना भजूं लागले. तत्कालीन विद्वानांनीं आपण शुद्ध करून घेण्याच्या पलिकडे स्वभावतःच शुद्ध आहांत, तेव्हां आपण सर्व ठिकाणीं परमात्मा भरलेला आहे असें समजून त्याची सेवा करा, अशा अर्थाचें त्याना शुद्धिपत्र दिलें.

यानंतर कांहीं दिवस ज्ञानदेवादि हीं भावंडें पैठणास राहिलीं. तेथें त्यांनीं श्राद्धादिवशीं जेवणास प्रत्यक्ष पितर खालीं आणणें वगैरे चमत्कार केले; पण त्याबरोबरच गोदावरीच्या कांठावर गीता सांगण्याचा क्रमहि ठेवला. श्रवणास हजारों लोक जमत. नंतर ही मंडळी आळंदीकडे जाण्यास निघाली. पण निघतांना ज्याच्या मुखांतून वेद बोलविला त्या ज्ञान्या नांवाच्या रेड्यास आपल्याबरोबर घेण्यास ज्ञानदेव चुकले नाहींत. वाटेंत त्यांनीं मोहनीराज दैवतामुळें प्रसिद्ध असलेल्या नेवासें गांवीं आपला मुक्काम ठेवला, व तेथेंच भगवद्गीतेवरील आपला प्रसिद्ध ग्रन्थ ज्ञानेश्वरी यास आरंभ करून तो शके १२१२ त पुरा केला. अजूनहि नेवासें मुक्कामीं एक खांब दाखवतात. कोणी म्हणतात, ज्ञानदेव त्या खांबावर ओव्या लिहीत व सच्चिदानंदबाबा (ज्याला त्यांनीं जिवंत केला) त्या उतरवून घेई, कोणी म्हणतात त्या खांबाजवळ बसून ज्ञानदेव ज्ञानेश्वरींतील ओंव्या कथन करीत. येथेंच त्यांनीं आपला अनुभव सांगणारा 'अनुभवामृत' नांवाचा ग्रन्थ केला. यावरून नेवाशास त्यांचा मुक्काम बराच असावा असें दिसतें.

येथें असतांनाच तापीतीरवासी योगी चांगदेवानें त्यांची कीर्ति ऐकून त्यांच्या दर्शनास येण्याचा विचार केला. पण आशीर्वाद का नमस्कार लिहावा ही आरंभींच अडचण आल्यानें कोराच कागद त्यांनीं ज्ञानदेवांच्याकडे धाडला. त्याला उत्तर म्हणून ज्ञानदेवांनीं पासष्ट ओव्या लिहिल्या. त्यासच ' चांगदेवपासष्टि ' म्हणतात. त्या पाहून अर्थाचा उलगडा न झाल्यानें चांगदेव वाघावर बसून ज्ञानदेवांच्या दर्शनास आले. त्या वेळीं ज्ञानदेवादि मंडळी भिंतीवर बसली होती. ज्ञानदेवांनीं त्या भिंतीसच चालण्याची आज्ञा केली, व चांगदेवाचा गर्वहरण करून त्यावर अनुग्रह केला.

यानंतर ज्ञानदेवांना तीर्थयात्रा करावीशी वाटली म्हणून ही सर्व मंडळी पंढरपुरास गेली. तेथें नामदेवास बरोबर घेऊन हा संतमेळा उत्तर हिंदुस्थानांतील सर्व यात्रा करून परत आला. वाटेंत ठिकठिकाणीं यांनीं चमत्कार केले. त्यांचीं वर्णनें नामदेवांनीं दिलीं आहेत.

परत आल्यावर ज्ञानदेवांना आपलें अवतारकार्य समाप्त झालें असें वाटून त्यांनीं पंढरपुरास देवाजवळ समाधि घेण्याची इच्छा प्रगट केली. ज्ञानदेवांनीं शके १२१५ कार्तिक वद्य त्रयोदशी गुरुवार रोजीं सर्व साधुसंतांसमक्ष आळंदी मुक्कामीं सिद्धेश्वरासमोर जिवंतपणीं समाधींत प्रवेश केला. त्यांच्यानंतर सोपानदेव, मुक्ताबाई व शेवटीं निवृत्तिनाथ या क्रमानें या सर्व भावंडांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली.

ज्ञानदेवांचे ज्ञानेश्वरी, अनुभवामृत, चांगदेवपासष्टि व कांहीं अभंग हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांनीं योगवासिष्ठ प्राकृतांत लिहिल्याचाहि उल्लेख आहे. या नांवाचा एक ग्रंथ त्यांच्या नांवावर मोडतोहि. पण तो त्यांचा असावा असें वाटत नाहीं. याशिवायहि त्यांच्या नांवावर बरेच ग्रंथ मोडतात. पण ते ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचे वाटत नाहींत.

श्री. भारद्वाज नांवाच्या लेखकांनीं आपेगांवकर व आळंदीकर असे दोन ज्ञानदेव असावेत अशी बाजू मांडली होती. त्यांपैकीं एक पहिले ज्ञानेश्वरीकर्ते व दुसरे अभंगकर्ते. पण यांस कै. भिंगारकर बुवा यांनीं सप्रमाण उत्तर देऊन श्री. भारद्वाजांचें मत खोडून काढलें आहे. ज्ञानेश्वरीकर्ते व अभंगकर्ते ज्ञानदेव एकच होत.

ज्ञानदेव हे नाथसंप्रदायी होते. त्यांनीं नाथसंप्रदायांतील अद्वैत व भक्ति यांचा महाराष्ट्रभाषेंत ओवी व अभंग या वृत्तांत ग्रंथरचना करून संपूर्ण महाराष्ट्रभर प्रचार केला. लाखांनि मोजले जाणारे वारकरी आळंदीस दरसाल कार्तिक वद्यांत ज्ञानदेवांच्या यात्रेकरतां जमा होतात, व ते प्रेमळपणानें ज्ञानदेवांना ' ज्ञानोबामाउली ' या नांवानें हांक मारतात. ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्यानंतर झालेल्या एकनाथ, तुकाराम, रामदासादि सर्व संतकवींवर मोठा परिणाम झालेला आहे.

व्यावहारिक ज्ञानकोश

पुरवणी १

अकबर (१५४२–१६०५): —दिल्लीच्या मोगल घराण्यांतील तिसरा बुद्धिमान बादशहा. उमरकोटला १५ आक्टोबर १५४२ त हुमायून हमीदाबानू यांच्या पोटीं हा जन्मला. जलालुद्दीन मुहम्मद अकबर असें याचें नांव होतें. वयाच्या चौदा वर्षांपर्यंत वडिलांचा मृत्यु, कैद, आईबापांचा वियोग व जिवावरचे अनेक प्रसंग यांना त्यास तोंड द्यावें लागलें. राजकीय धामधुमीमुळें याच्याकडे लक्ष देण्यास हुमायूनला सवड झाली नाहीं. सुदैवाची गोष्ट इतकीच कीं, त्यानें अकबराच्या पालनपोषणाची सर्व जबाबदारी त्याचा एकनिष्ठ सेवक बहरामखान यांजवर सोपविली होती व ती बहरामनें उत्तम प्रकारें पार पाडली. १५६१ मध्यें बहरामखानाचें व याचें [अकबराचें] पटेना म्हणून अकबरानें राज्याचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. हा गादीवर बसला त्यावेळीं दिल्ली व आग्रा या शहरांपलीकडील फारसा मुलुख त्याच्या ताब्यांत नव्हता. हा गादीवर बसला त्यावेळीं याचें वय १३ वर्षें ३ महिने इतकें होतें. १५६२ पासून १६०० पर्यंत यानें काबूलपासून खानदेश व सिंधपासून बहार एवढा टापू जिंकला.

याचीं शेवटचीं वर्षें फार त्रासांत गेली. मुराद व दानियाल हे याचे मुलगे त्याच्या देखत मरण पावले. तसेंच नातलग व मित्रमंडळीपैकींहि याचीं आवडतीं माणसें मृत्यु पावलीं. यामुळें हा भ्रमिष्ट बनला व आजारी पडून आग्र्यास १६ आक्टोबर १६०५ रोजीं अतिसारानें मृत्यु पावला. कांहींच्या मतें हा विषप्रयोगानें मेला. १६९१ त जाटांनी बंड करून याचें थडगें [शिकंदरा येथील] उकरून याचीं हाडें जाळलीं. हा आजारी असतांना याच्या मुलांत गादीसंबंधीं तंटे उत्पन्न झाले पण ते अकबरानें सेलीमनेंच गादीवर बसावें असें लिहून ठेवलें असल्यामुळें मिटलें.

याला मानबाई, जोधबाई, राठोडबाई व खाजाहसनची मुलगी अशा चार प्रमुख बायका होत्या. यांपैकीं मानबाईला खुश्रु, जोधबाईला, शहाजहान, राठोडबाईला शहर्यार व खाजा हसनच्या मुलीला पर्विझ हे मुलगे झाले. याखेरीज सेलीम, मुराद व दानियल असे आणखी मुलगे होते.

हा लठ्ठ, गोरा असून याचें कपाळ रुंद होतें. व चेहरा पाणीदार होता. साधी राहणी हा ठेवीत असे. नियमितपणा, उद्योगमग्न, अल्प निद्रा, कुशाग्र बुद्धि, कार्यदक्षता, महत्त्वाकांक्षीपणा, निर्व्यसनीपणा, शोधकता, मिताहारीपणा, सुधारणावादीपणा; इत्यादि गुण अकबराचें आंगीं होतेच. याशिवाय संगीत चित्रकला यांचाहि नाद त्यास होता. तो धीट, प्रजावत्सल, गुणग्राही, निशाणबाज व लोकसंग्रही होता.

यानें जमिनीची मोजणी करून जमिनीच्या प्रतवारीप्रमाणें कर बसविले. हे कर तो धान्य रूपानें न घेतां पैशाच्या रूपानें घेई. गांवें मक्त्यानें देण्याचें यानें बंद केलें.

अकबराच्या पदरीं अबुल फजल, अबुल फैजी, राजा मानसिंग, राजा तोडरमल, राजा बिरबल, तानसेन, बदाऊनी इत्यादि तेजस्वी लोक होते. त्यावरून त्याची मनुष्यपरिक्षा कशी होती हें चांगलें कळून येतें.

याच्या आयुष्यांतील महत्त्वाची गोष्ट आणखी एक आहे. ती म्हणजे ‘ दीने इलाही ’ या धर्माची स्थापना. या धर्मांत त्यानें सर्व धर्मांतून चांगली चांगलीं तत्त्वें घेतलीं असून तो स्वतःच या धर्माचा प्रेषित झाला. ह्या धर्माचा प्रसार राज्यवाढीच्या

दृष्टीनें अनिष्ट आहे असें वाटल्यामुळें त्यानें धर्मप्रसाराचा हट्ट धरला नाहीं.

राज्य वाढविण्यासाठीं व तें सुरक्षित राहण्यासाठीं त्यानें पुष्कळ गोष्टीं केल्या. त्यांपैकीं प्रमुख या— जिझिया कर माफ केला. हिंदु मुसलमान यांच्या कडून सारखा कर घेतला. हिंदूंच्या हिताच्या गोष्टी केल्या. रजपुतांना लष्करांत मोठमोठ्या जागा देऊन स्वतःबद्दल विश्वास निर्माण केलें. रजपुतांशीं विवाहसंबंध केलें.

अक्षांश–रेखांशः— उत्तर व दक्षिण ध्रुवापासून सारख्या अंतरावरून पृथ्वीसभोंवति वर्तुळाकार काढलेल्या काल्पनिक रेषेस विषुववृत्त अथवा भूमध्य रेषा असें म्हणतात. हिच्यामुळें उत्तर व दक्षिण गोलार्ध असें पृथ्वीचें दोन समान भाग पडतात. विषुववृतापासून उत्तर ध्रुव अगर दक्षिण ध्रुवापर्यंत सरळ चालत गेल्यास पृथ्वीच्या परिघाचा $\frac{1}{4}$ हिस्सा म्हणजे ९०^{0} चालावे लागते. विषुववृत्ताच्या उत्तरेस व दक्षिणेस विषुववृत्तापासून अंशात अंतर दर्शविणारी विषुववृत्ताला समांतर अशी वर्तुळें काढतात त्यांस अक्षवृत्तें असें म्हणतात. हींहि सर्व काल्पनीक आहेत. ती सोईप्रमाणें एक किंवा अनेक अंश अंतरावर काढतात. लहान नकाशावर १०^{0} अंतराची व मोठ्या नकाशावर १^{0} अंतराची अक्षवृत्तें दाखविण्याची साधारणतः पद्धत आहे. अंशाचें पोट विभागास कला (एक अंश = ६० कला) व विकला (एक कला = ६० विकला) म्हणतात. फारच मोठ्या नकाशावर हें भाग दाखवितात. एखाद्या स्थळाचें अक्षांश म्हणजे त्या स्थळाचें विषुववृत्तापासूनचें अंशात्मक अंतर. विषुववृत्ताचा अक्षांश शून्य समजून तेथून उत्तरेस व दक्षिणेस ध्रुवापर्यंत प्रत्येकीं ९०^{0} होतात. उत्तरगोलार्ध व दक्षिणगोलार्ध यामधील अंश १०^{0}, २०^{0}, ३०^{0} असें दोहों बाजूस सारखेंच येत असल्यानें उत्तरगोलार्धांतील अक्षांशापुढें उत्तर व दक्षिण गोलार्धांतील अक्षांशापुढें दक्षिण असें लिहिण्याची पद्धत आहे. नुसते १०^{0} अगर ५०^{0} असें सांगितल्यास उत्तरगोलार्ध कीं दक्षिणगोलार्ध असा संशय उत्पन्न होईल. म्हणून ही पद्धत ठेविली आहे. कोल्हापूर १६^{0} ४२′ १५″ उत्तर वर आहे याचा अर्थ हें शहर विषुववृत्तापासून उत्तरेस १६ अंश ४२ कला व १५ विकला इतक्या अंतरावर आहे. इतर अंशावर व दक्षिणगोलार्धांत ते शोधण्यांचे कारण नाहीं. उत्तर व दक्षिण ध्रुवामध्यें १८० अक्षांश भरत असल्यानें व पृथ्वीचा परिघ सुमारें २५,००० मैल असल्यानें एक अंश दर्शविणाऱ्या दोन अक्षवृत्तांमधील प्रदेशाची दक्षिणोत्तर लांबी जवळ जवळ ६९ मैल असते. पृष्ठ १२५४ (भाग ४) वरील आकृती पाहा.

एखादें स्थळ पृथ्वीच्या पाठीवर कोठें आहे हें बरोबर समजण्यास त्या स्थळाचें नुसते अक्षांश देऊन भागणार नाहीं. अक्षांशानें ते स्थळ उत्तरगोलार्धांत अगर दक्षिण गोलार्धांत व विषुववृत्तापासून किती अंतरावर आहे एवढेंच कळेल. तें स्थळ शोधण्यास त्या सर्व अक्षवृत्तावर पहावे लागेल. म्हणून तें स्थळ शोधून काढण्यास जसे अक्षांश उत्तर–दक्षिण अंतर दर्शवितात तसेंच त्या स्थळाची पूर्वपश्चिम अंतराची माहिती कळणें आवश्यक आहे. ती आपणांस रेखावृत्तांवरून मिळते. हीं वृत्तें उत्तर व दक्षिण ध्रुवामधून पृथ्वीसभोंवतीं विषुववृत्तास काटकोन करून जातील अशीं काढलेलीं असतात. हीं वृत्तेंहि काल्पनिकच आहेत. तीं उत्तर ध्रुवापासून दाक्षिणध्रुवापर्यंत जात असल्यानें अर्धवर्तुळें असतात. तरीहि त्यांस वृत्तेंच म्हणतात. विषुववृत्त पूर्ण वर्तुळ असल्यामुळें त्याच्या प्रत्येक अंशांतून जाणारें एक एक रेखावृत्त काढल्यास रेखावृत्तें ३६० भरतील. हीं रेखावृत्तें कोठूनहि मोजतां येतात. निरनिराळ्या देशांतील लोक आपल्या देशाच्या मध्यांतून अगर राजधानींतून गेलेल्या रेखावृत्तांस मूळ रेखावृत्त मानतात व त्यांस ० अंशाचें रेखावृत्त मानून त्यापासून पूर्वेस व पश्चिमेस १८० रेखावृत्तें धरतात. इंग्लिशांनीं ग्रीनीचवरून जाणाऱ्या रेखावृत्तास मूळ रेखावृत्त (Prime meridian) मानून त्याच्या पूर्वेस व पश्चिमेस १८० पूर्व व १८० पश्चिम अशीं ३६० रेखावृत्तें काढण्याची पद्धत ठेविली आहे. ब्रिटिश साम्राज्यांत याचप्रमाणें पूर्व पश्चिम अंतर मोजतात. १८८४ सालीं लंडनमध्यें भरलेल्या आंतरराष्ट्रीय सभेंतहि ग्रीनीच हें मूळ रेखावृत्त मानावें असें ठरलें व त्यांस जगांतील बऱ्याच प्रमुख राष्ट्रांनीं मान्यता दिली आहे. (ग्रीनिच पहा) हीं रेखावृत्तें लहान नकाशावर १०^{0} अंतराची व मोठ्या नकाशावर

१° अंतराची दाखविलेलीं असतात. रेखांश म्हणजे मूळ रेखावृत्तापासून पूर्वेकडील किंवा पश्चिमेकडील अंशात्मक अंतर होय. हेंहि अंतर अंश, कला व विकला यांमध्यें दाखवितां येते. पूर्वेकडील रेखावृत्त असल्यास रेखावृत्तापुढें पूर्व व पश्चिमेकडील असल्यास पश्चिम असें लिहिण्याची पद्धत आहे. अक्षवृत्तें समांतर असतात परंतु सर्व रेखावृत्तें उभय ध्रुवबिंदूमध्यें मिळत असल्यामुळें ती समांतर नसतात. म्हणून एक अंश अक्षवृत्तांमधील अंतर सर्व ठिकाणीं सारखे म्हणजे ६९ मैल असले तरी एक अंश दूर असलेल्या दोन रेखावृत्तांमध्यें सर्व ठिकाणीं सारखेंच अंतर असणार नाहीं. फक्त विषुववृत्तावर ते ६९ मैल भरते व तेथून जसजसें उत्तरेकडे अथवा दक्षिणेकडे जावें तसतसें कमी कमी होत जातें. उदाहरणार्थ ५०° उ० अक्षवृत्तावर असलेल्या स्थळीं दोन रेखावृत्तांमधील अंतर फक्त ४४ मैल भरते; तेंच उत्तरध्रुववृत्तावर— ६६½° उ०— २८ मैल भरते, व प्रत्यक्ष ध्रुवांवर ते शून्य होते. अक्षवृत्तांच्या सहाय्यांस रेखावृत्तें पृथ्वीवर काढल्यानें पृथ्वीवरील कोणतेंहि स्थळ सहज निश्चित करितां येते. कोल्हापूर उ० १६° ४२′ १५″ व पू० ७४° १६′ वर आहे याचा अर्थ उत्तर गोलार्धांत १६° ४२′ १६″ वरील अक्षवृत्तास ग्रीनिचच्या पूर्वेकडील ७४° १६′ रेखावृत्त ज्या ठिकाणीं छेदिते तेथें तें आहे असा होतो.

अक्षांशावरून स्थळांच्या हवामानासंबंधींहि आपणांस अटकळ करता येते. विषुववृत्तापासून जसजसें उत्तर व दक्षिण ध्रुवांकडे जावें तसतसें उष्णतामान व पाऊसहि कमी होतो असा सर्वसाधारण नियम आहे. एखाद्या स्थळाचें अक्षांश १०° आहेत व दुसऱ्याचे ४०° आहेत असें दिल्यास त्यावरून १०° वरील स्थळ ४० वरील स्थळापेक्षां अधिक उष्ण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. उंचीमुळें अगर अन्य कारणामुळें त्याचें उष्णतामान कमी झाल्याशिवाय या अनुमानांत चूक होत नाहीं. याप्रमाणें अक्षांशावर हवामान अवलंबून असतें.

प्रमाणवेळ:—अक्षांशावरून जसें हवामानाचें ज्ञान होते तसेंच रेखांशावरून वेळेचें ज्ञान होतें. पृथ्वी आपल्या आंसाभोंवती चोवीस तासांत ३६०° फिरते म्हणजे ती दर तासास १५° अथवा चार मिनिटास १° फिरते. त्यामुळें कोणत्याहि स्थळाच्या रेखांशाचें पूर्वेच्या रेखावृत्तावरील स्थळीं सूर्योदय चार मिनिटें लौकर होईल व पश्चिमेच्या रेखावृत्तावरील स्थळीं चार मिनिटें उशिरानें होईल. म्हणजेच ग्रीनिच येथें मध्यान्ह होऊन बारा वाजले असतां त्याच्या पूर्वेस ९०° वर मध्यान्ह पूर्वीच होऊन गेल्यानें आतां सायंकाळ असेल, ९०° पश्चिमेस सकाळ व १८०° वर मध्यरात्र असेल. मुंबई शहर ७२½° पू० रेखावृत्तावर आहे. ग्रीनिचच्या वेळेपेक्षां मुंबईची स्थानिकवेळ ७२½° नीं पुढें आहे. १५° च्या फरकांत वेळ एक तास पुढें अगर मागें असते. म्हणून मुंबईची वेळ ७२½° ÷ १५ = ४ तास ५० मिनिटांनीं ग्रीनिचच्या पुढें असणार. ग्रीनिच येथें मध्यान्ह झाली असतां (१२ वाजले असतां) मुंबईस ४ वाजून ५० मिनिटें झालेली असतील. याच्या उलट ग्रीनिचचें घड्याळ व एखाद्या स्थळाचें घड्याळ या दोहोंतील वेळेच्या फरकावरून त्या स्थळाचें रेखावृत्त ठरवितां येतात. ग्रीनिचच्या घड्याळांत १२ वाजलेले असले व एखाद्या स्थळाचें घड्याळांत दुपारचे तीन वाजले असले तर ते स्थळ ग्रीनिचच्या पूर्वेस ४५° वर आहे हें सिद्ध होते कारण वेळ दर १५° ला १ तास पूर्वेस पुढें व पश्चिमेस मागें असते.

पृथ्वीवरील हिंदुस्थानासारखा अगर कॅनडासारखा देश घेतल्यास त्यांतून पुष्कळ रेखावृत्तें गेलेली असतात व प्रत्येक रेखावृत्तावर एक एक स्थानिक वेळ असणार यामुळें बराच घोटाळा माजतो. प्रवाशांस दर रेखांशावर ४ मिनिटांनीं आपले घड्याळ बदलावें लागेल. नाहींतर त्याच्या घड्याळाची वेळ स्थानिक घड्याळाचें वेळेबरोबर जुळणार नाहीं. कलकत्याहून ८ वाजतां तार केल्यास ती तार कराचीस आठाचे पूर्वीं एक तास चोवीस मिनिटें अगोदर म्हणजे ६ वाजून ४६ मिनिटांनीं पोचेल. हें दिसण्यांत अशक्य व चमत्कारिक वाटत. पण स्थानिक वेळांवरून ते बरोबरच आहे. असा घोटाळा होऊं नये म्हणून देशाच्या एखाद्या मध्यवर्ती स्थळाची स्थानिक वेळ ही सर्व देशाची प्रमाण वेळ मानिली जाते व त्या देशांत त्या स्थळांच्या पूर्वेस अगर पश्चिमेस असलेल्या सर्व स्थळीं स्थानिक वेळ उशिराची

अगर लौकरची असली तरी प्रमाण वेळच कायम मानून सर्व व्यवहार चालतात. हिंदुस्थानची प्रमाण वेळ ८२½° पूर्व रेखांशावरील स्थानिक वेळ ही आहे व ती ग्रीनिचच्या पुढें ५½ तास आहे. म्हणजे ग्रीनिचचे घड्याळांत बारा वाजले असतां हिंदुस्थानांत साडेपांच वाजलेले असतात व अरेबियामध्यें तीन वाजलेले असतात. कारण तेथील प्रमाण वेळ ४५° पूर्व रेखांशावर अवलंबून आहे. अमेरिका खंडात एकूण एक एक तास अंतराच्या पांच प्रमाण वेळा ठरविल्या आहेत व त्या पश्चिम रेखांश ६०°, ७५°, ९०° १०५° व १२०° यावर ठरविल्या असून ग्रीनिचच्या वेळेंपेक्षां अनुक्रमें ४, ५, ६, ७ व ८ तासांनीं मागें असतात.

आंतरराष्ट्रीय वाररेषा (दिनांतररेषा):—दर रेखांशास वेळ ४ मिनिटांनीं बदलत असल्यानें ग्रीनिच येथील घड्याळांत बुधवारीं दिवसाचें ९वाजले असतां त्याच वेळीं ग्रीनिचच्या पश्चिमेकडे प्रवास करून १८०° रेखावृत्तावर जाणाऱ्याच्या घड्याळांत मंगळवार रात्रीचे ९ वाजतील व पूर्वेकडून प्रवास करणाऱ्याच्या घड्याळांत बुधवार रात्रीचे ९ वाजतील म्हणजे १८०° रेखावृत्तावर एकाचवेळीं मंगळवार व बुधवार हें दोन्ही वार चालू आहेत असें मानण्याची पाळी येते. ते टाळण्यासाठीं १८०° रेखावृत्त ओलांडतांच दिवसांत फरक करावा असें सर्व राष्ट्रांनीं १८८४ च्या आंतरराष्ट्रीय सभेमध्यें ठरविले आहे. ही आंतरराष्ट्रीय वाररेषा (दिनांतररेषा) ग्रीनिचच्या पश्चिमेकडून ओलांडतांच मंगळवारानंतर बुधवार टाकून एकदम गुरूवार सुरू झाला असे समजावे व पूर्वेकडून ती ओलांडतांना पुन्हः तोच दिवस म्हणजे बुधवार सुरू झाला असें समजावे असें ठरले आहे. ही रेषा लोकवस्ती जेथें आहे तेथील वेळेंत घोटाळे माजू नयेत म्हणून°१८० वृत्तावरून सरळ न जातां जागजागीं ती वक्र केलेली आहे. पृष्ठ १२५६ (भाग ४) वरील आकृती पाहा.

अणे, माधव श्रीहरी (स. १८८०–):—वऱ्हाडमधले एक अखिल भारतीय पुढारी, व महाराष्ट्रीय साहित्तिक. हे 'बापूजी अणे' याहि नांवानें प्रसिद्ध आहेत. यांचा यवतमाळ जिल्ह्यांतील वणी या गांवीं १८८० मधील ऑगस्ट २९ ला जन्म झाला. यांनी कलकत्ता विश्वविद्यालयाच्या बी. ए व बी. एल् या पदव्या अनुक्रमें १९०२ आणि १९०७ या वर्षी मिळविल्या. १९०७ त यवतमाळला बापूजींनीं वकिलीस प्रारंभ केला. बापूजी अण्यांच्या हालचाली किंवा चळवळ शंकास्पद वाटल्यामुळें सरकारनें क्रि. प्रो. क. १०८ खालीं जामीन मागितला. शिवाय सरकारनें त्यांची वकिलीची सनदहि एक वर्ष तहकूब ठेवली. याखेरीज बापूजींनीं १९३०, १९३२ व १९३३ मध्यें जंगल सत्याग्रह, कायदेभंग व वैयक्तिक कायदेभंग केल्यामुळें प्रत्येक खेपेस सहा सहा महिन्यांचा साधा कारावास त्यांना भोगावा लागला.

१९२३ पासून १९३० पर्यंत अखंड व १९३४ ते आतांपर्यंत ते दिल्लीच्या वरिष्ठ विधीमंडळाचे, वऱ्हाडचे प्रतिनिधी या नात्यानें सभासद आहेत. या शिवाय वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीचे १९२० पासून १० वर्षें ते अध्यक्ष होते. यांनीं १९१५ त स्थापलेल्या यवतमाळ डिस्ट्रिक्ट असोसिएशनचे हें संस्थापक असून शिवाय तिचे १९२६ पासून बरीच वर्षें अध्यक्षहि हेच होत. नेहरूसमितीचे एक प्रमुख सभासद. तसेंच १९३३त हें काँग्रेसचें 'सर्वाधिकारी' होते.

राजकारणाशिवाय साहित्य व सामाजिक बाब यांच्याशीहि त्यांचा संबंध आलेला आहे. ग्वाल्हेरला १९२८ त जें साहित्य संमेलन भरलें त्याचे हे अध्यक्ष होते तसेंच १९३८ त सोलापूर येथें भरलेल्या अखिल भारतीय आर्यन लीगच्या परिषदेच्या अध्यक्षाची माळ यांच्या गळ्यांत पडली होती. यांचा, 'लेख व भाषणें' हा ग्रंथ बापूजी वाङ्मयमंडळानें प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथाशिवाय त्यांनीं पुष्कळ ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या आहेत.

यांचें सरकार, काँग्रेस व लोक यांवर चांगलेंच वजन आहे. यांची नुकतीच एकसष्ठी पार पडली. त्यावेळीं लोकांनीं यांना २५००० रु. ची थैली अर्पण केली यावरून त्यांच्यासंबंधीं लोकांना किती आदर वाटतो हें दिसते. अलीकडे हिंदूंच्या हिताबाबत व पाकिस्तानच्या चळवळीबाबत काँग्रेसशीं व महात्मा गांधीशीं यांचा मतभेद झाला असून हिंदुसभेच्या मताकडे त्यांचा कल दिसून येतो. लखनौस भरलेल्या हिंदू लीगच्या अधिवेशनाचे (१९४०) ते अध्यक्ष होते.

अत्रे, प्रल्हाद केशव (१८९८–[illegible]):—सुप्रसिद्ध नाटककार, चित्रपट कथालेखक, मार्मिक व मर्मभेदी टीकाकार आणि कवि. श्री. अत्रे यांचा जन्म पुणें जिल्ह्यांत सासवड या गांवीं १८९८ सालीं झाला. त्यांचे प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षण पुण्यांतच झालें. १९१९सालीं ते बी. ए. झाले व त्याच सालीं मुंबईच्या न्यू भरडा स्कूलमध्यें शिक्षक म्हणून ते नोकरीस राहिले. १९२१ पर्यंत ते या ठिकाणीं होते. त्यानंतर ते पुण्यास पुन्हां परत आले व कँप एज्युकेशन सोसायटीनें चालविलेल्या हायस्कुलची प्रिन्सिपलशिप् त्यांनीं स्वीकारली. १९२६ सालीं ते बी. टी. झाले व शिक्षणशास्त्राची टी. डी. ही पदवी मिळविण्यासाठीं ते १९२८ सालीं इंग्लंडलाहि गेले. गेल्या दहाबारा वर्षांत त्यानीं मराठी साहित्यक्षेत्रांतहि चिरस्मरणीय कामगिरी करून दाखविली आहे. काव्यप्रांतांत रूढ झालेल्या कांहीं तऱ्हेवाईक व नवीन प्रकारांवर त्यांनीं आपल्या विडंबनपर कवितेनें जोराचे प्रहार केले व विडंबन (Parody) हा काव्यप्रकार लोकप्रिय करण्याचें श्रेय संपादन केलें. त्यानंतर त्यानीं आपली दृष्टि नाट्यवाङ्मयाकडे वळविली. नाटकांतूनहि त्यानीं सामाजिक वैगुण्यांवर टीकेचे फटकारे ओढले आहेत आणि विनोदाच्या साह्यानें रेशमी चिमटे घेतले आहेत. किंबहुना अत्र्यांचीं नाटकें हीं हास्य आणि करुण या दोन्हीं रसानें ओथंबणारीं मोहोळें आहेत. नाटकाचा मुख्य विषय कोणता का असेना—बहुधा तो कोणताहि नसतोहि—ते समाजापुढील ताजे ताजे विषय आणि उल्लेख येवढ्या खुबीनें नाटकांत आणतात कीं सबंध नाटक रंगदार होण्यास त्याचा कितीतरी उपयोग होतो. हंसवितां हंसवितां वाचक-प्रेक्षकांच्या डोळ्यांत अश्रु उभे करण्याची करामतहि अत्र्यांनीं करून दाखविली आहे. बोलपटांचा जमाना सुरू झाल्यानंतर त्यांतहि अत्र्यांनीं आपलें वैशिष्ट्य प्रगट केलें. काव्य प्रांतात 'झेंडूच्या फुलां'नीं नवलाई निर्माण केली 'साष्टांग नमस्कार' 'घराबाहेर उद्यांचा संसार' 'लग्नाची बेडी' इत्यादि नाटकांनी रंगभूमी गाजविली आणि 'प्रेमवीर' 'धर्मवीर' 'ब्रह्मचारी' 'अर्धांगी' 'लपंडाव' इत्यादि बोलपटांनीं रजतपटावरहि नवयुग निर्माण केलें. त्यांच्या वाङ्मयांत जिवंतपणा आहे, विनोद आहे, करुण रसाचा परिपोष आहे आणि आयुष्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टिहि एकंदरीत आशावादी, खेळकर आणि खिलाडूपणाची आहे. १९४० च्या मार्चपासून त्यांनीं पुण्यास 'नवयुग, सप्ताहिक सुरू केलें असून शृंगारप्रधान लेख व कॉंग्रेसची विचारप्रणाली याबद्दल तें नांवाजलेलें आहे.



अनंतफंदी (शके १६६६ ज. व मृत्यु शके १७४१):—सुप्रसिद्ध लावणीकार, कीर्तनकार व 'माधव निधन' या काव्याचा कर्ता याचें पुरें नांव 'अनंत भवानीबावा घोलप' असें आहे. हा नगर जिल्ह्यांतील संगमनेरचा राहणारा. कौंडिण्य गोत्री भवानीबावा व राजबाई यांच्या पोटीं हा जन्मला. याचें घोलप हें नांव मागें पडून फंदी या नांवानेंच तो फार प्रसिद्धीला आला आहे. फंदी हें आडनांव तो 'मलिक फंदी' नांवाच्या फकीराच्या नादाला लागल्यामुळें लोकांनीं तें त्याला दिलें. रक्ताक्षीनाम संवत्सरीला शके १६६६ मध्यें हा जन्मला व शके १७४१ त वारला. वारला त्यावेळीं हा ७५ वर्षांचा होता.

हा पूर्वी तमाशे करीत असे. स्वतः रचलेल्या लावण्या तमाशांत म्हणून पोऱ्यास नाचवीत असे. एकदां अहल्याबाई होळकरीण संगमनेरास येऊन तिनें याला असें सांगितलें कीं, 'तुम्ही जें कृत्य करतां तें ब्राम्हणांस अयोग्य आहे.' तेव्हां यानें तमाशाचा नाद सोडून दिला, व हा कथा करूं लागला. परंतु एकदां लोकाग्रहास्तव फंदीं तमाशा करीत असतां अहल्याबाई अवचित संगमनेरास आली, तेव्हां तिला हें वृत्त कळतांच तिनें फंदीचें डोकें उडविण्याचा हुकूम दिला. परंतु हें वृत्त याला कळतांच यानें तमाशाचें रूपांतर लगेंच कीर्तनांत केलें. तेव्हां बाई खुष होऊन त्यांनीं याला बक्षीस दिलें.

याची कविता कटाव, फटके, लावण्या व क्वचित

श्लोक, आर्या आणि ओव्या अशा प्रकारची असून ती प्रायः सर्व मराठी भाषेत आहे. याला श्रीपति ऊर्फ सवाई फंदी व बापू फंदी असें दोन पुत्र होते.

याचा एक 'माधव निधन' नांवाचा ग्रंथ आहे. त्यांत फंदीनें सवाई माधवरावांच्या मृत्युची कथा वर्णन केली आहे. याचें अध्याय ६ असून ३६० ओव्या आहेत. याला ऐतिहासिक कवि म्हणतात. खर्ड्यांच्या लढाईचा पोवाडा चांगला प्रसिद्ध आहे. सवाई माधवराव, नाना फडणीस, दुसरा बाजीराव, होळकर वगैरे त्या वेळच्या थोर व्यक्तींवर फंदीनें फटके रचिले आहेत.

सवाई फंदीचा राव बाजीवरचा पोवाडा सर्वांच्या तोंडीं होता. त्यांत तत्कालीन दुःस्थिति, व पेशव्याचे दुर्गुण चांगले रेखाटले आहेत. यानें चेंडूफळी व विठ्ठल स्तुति लिहिलेली आहे.

रा. य. न. केळकर यांनीं संपादन केलेल्या 'ऐतिहासिक पोवाडे' या पुस्तकांत थोडी वेगळी माहिती दिली आहे. ती अशी—

"अनंतफंदीचे पूर्वज गोंधळीपणाचा व सराफी असा जोड धंदा करीत. अनंतफंदींचे वडील लहानपणींच वारलेले होते. याचें पालनपोषण राऊबाई नांवाच्या याच्या आईनें केलें. लहानपणीं याच्यावर कोणाचा दाब नसल्यामुळें हा लवकरच एक उनाड पोरगा बनला. यानें शिक्षणाला रामराम ठोकून दिवसभर व गांवभर उनाडक्या कराव्यात. रात्रीं तमासगिरांच्या फडांत शिरावें. असा याचा क्रम सुरू झाला. एकदां हा आईबरोबर भांडून भवानीबोवाच्या मठांत जाऊन बसला. याची आई तेथें गेली व याच्या खोड्या सांगू लागली. तेव्हां बुवांच्या कृपेनें त्यांस कवित्वस्फूर्ति झाली.

पुढें हा लावण्या रचून त्या म्हणून किंवा म्हणवून दाखवून आपला चरितार्थ चालवी. याचे मलकफंदी रतनफंदी व राववफंदी असे तिघेजण साथीदार असत. तरुणपणीं यानें पुष्कळ वेळां मुलुखगिऱ्या केल्या. रावबाजीची याच्यावर भारी मर्जी. रावबाजीनें स्वतः माहिती पुरवून फंदी बोवाकडून 'माधव निधन' हें काव्य रचवून घेतलें. याचें हें काव्य ऐतिहासिक पुराव्याच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचें आहे.

अफगाणिस्तानः— मध्य आशियांतील हिंदुस्थानच्या उत्तरेकडील एक राज्य, याच्या पश्चिमेला इराण, उत्तरेला रशिया, पूर्वेला व दक्षिणेला हिंदुस्तान व बलुचिस्तान हे देश आहेत. यावरून हा देश हिंदुस्थानच्या थेट उत्तरेस नसून साधारणतः वाव्यव्येस असल्याचे दिसून येते. हा देश डोंगराळ असून मागासलेला आहे. येथील हवा निरोगी व कोरडी आहे. उष्णतामान सर्व भागांत सारखे नाहीं. काबूल व उत्तरेकडील प्रदेश येथें थंडी कडाक्याची असते तर जलालाबाद येथें अगदीं सौम्य थंडी पडते. सर्वच भागांत उन्हाळ्यांत तीव्र उन्हाळा भासतो. अफगाणिस्तानचें क्षेत्रफळ २५०,००० चौरस मैल असून लोकसंख्या १०,०००,००० आहे.

उद्योग धंदे—उत्तर व पूर्व विभागांत वर्षांतून दोनदां पीक काढतात. वसंतऋतूंत गहू, सातू व मसूर यांचा हंगाम असतो. तर तांदूळ, ज्वारी, तंबाखू, बीट, मका हीं पिकें शरदृतूंत निघतात. येथें युरोपांत होणारी बहुतेक सर्व फळें होतात. द्राक्षें तर विपुल होतात. यामुळें फळांचा व्यापार मोठ्या प्रमाणांत चालतो. ऊंस व कापूस यांची पिकें विशेष ऊष्ण प्रदेशांत होतात. तांबे, लोखंड व सोनें हें प्रमुख खनिज पदार्थ होत. चांदी एका काळीं विपुल प्रमाणांत सांपडत होती. जिप्सम (कर्पुर शिलाजित) कंदाहारनजिक सांपडते. रेशीम व गालिचे यांचे कारखानें आहेत. कापसाचे कापड, नीळ, चहा व साखर यांची आयात होत असून लोंकर, रेशीम, फळें, इमारतीचें लाकूड, घोडे, वगैरे पदार्थांची निर्यात होते.

लोक व राज्यव्यवस्था—अफगाणिस्तानचे रहिवाशी मुख्यतः सुनी पंथीय मुसलमान आहेत. पर्शियन, पुश्तू व तुर्की या भाषा बोलल्या जातात. काबूल, तुर्किस्तान, हिरात व कंदाहार असे चार राजकीय विभाग आहेत. या प्रत्येक विभागाचा राजकारभार पाहण्याकरितां एक गव्हर्नर नेमण्यांत येतो. त्याला नाइब म्हणतात. हा नाइब आपल्या प्रान्तांतील राज्यकारभाराबद्दल अमीराला जबाबदार असतो. १९२२ सालापासून विधिमंडळ निर्माण करण्यांत आले आहे.

ताजा इतिहास—अफगाणिस्तानचे सांप्रतचे राजे महंमद झहिर शाह हे आहेत. यांचा जन्म १९१४ सालीं झाला. अमीर हबीबुल्लाचा खून १९१९ सालीं क्रान्तीकारकाकडून करण्यांत आला. त्याचा भाऊ नासरुल्ला याला त्याचे ऐवजी गादीवर बसविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु हबीबुल्लाचा मुलगा अमानुल्ला यानें नासरुल्लाला तुरुंगांत टाकून व स्वतः गादीवर बसून आपल्या पित्याचा वध करणाऱ्या क्रान्तिकारकांचा डाव उधळून लावला. गादीवर आल्यावर अमानुल्लानें ब्रिटिशांच्या विरुद्ध युद्ध पुकारलें. हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील रानटी टोळ्यांना मदत करण्याकरितां अफगाण सैन्य खैबरखिंडीजवळ उतरलें. परंतु अफगाण सैन्याचा मोड झाला व १९२१ सालीं अमानुल्लानें तह केला. यापुढें अमानुल्लानें रशियाशीं तह केला. १९२६ सालीं त्यानें राजा हे पद धारण केलें. १९२७–२८ सालीं युरोपचा प्रवास केला. प्रवासांतून परत येतांच त्यानें युरोपांतील सुधारणा अफगाणिस्तानांत सुरू केल्या. बुरख्याची चाल, अनेक पत्नित्वाची रूढी इत्यादि जुन्या अनिष्ट चाली नष्ट करण्याचा त्यानें चंग बांधला; व युरोपियन पद्धतीचा पोषाख रूढ करण्याचा प्रयत्न केला. यामुळें सनातनी वृत्तीच्या मुल्लांचा त्याच्यावर रोष झाला व त्यांनीं त्याच्याविरुद्ध लोकमत प्रक्षुब्ध करून बंडाला चिथावणी दिली. त्याचवेळीं सैन्यांतील शिपायांचे पगार थकल्यामुळें त्यांचीही मदत त्याला मिळेना. म्हणून त्यानें देशत्याग केला. हिंदुस्थानच्या मार्गानें तो इटलीला गेला. तो गेल्यावर बंडखोराचा पुढारी बचा ई साकू यानें आपल्या हातीं सत्ता घेतली. तो अमीर म्हणून गादीवर आला. परंतु सेनापती नादीरखान या राजकुलोत्पन्न पुरुषानें वझिरी लोकांच्या सहाय्यानें बचाई साकूचा पराभव केला व त्याला १९२९ सालीं देहान्त शासन दिलें. नादीरशहा गादीवर आला. त्यानें ब्रिटिशांशीं मित्रत्वाचें धोरण स्वीकारलें. व हळू हळू सुधारणा केल्या. परंतु ता. ८ एप्रिल १९३३ रोजीं बक्षिसें वाटत असतांना त्याचा वध झाला. या खुनाच्या पाठीमागें राजकीय हेतू नसावा, खासगी द्वेषानें तो झालेला असावा. नादीरखानच्या पश्चात् त्याचा मुलगा राजा महमद झहिर हा गादीवर आला. हाच सांप्रतचा अफगाण राजा होय.

अमृतराय (१६९८–१७५३):— कटाव वृत्तांत काव्यरचना करणारा कवि भक्तकथामृत ग्रंथांत हा औरंगाबादेचे म्हणजे खडकीचे विसामोरो (मुत्सद्दी) यांचा हा आश्रित होता असें म्हटलें आहे. अमृतरायांचा जन्म शके १६२० व मृत्यु शके १६७५ (स. १७५३) असें काव्यसंग्रहकार ओकांच्या आधारें आजगांवकर लिहितात.

मध्वमुनीश्वरांकडून यानें उपदेश घेतला, अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. परंतु कुडची वीर म्हणतो कीं, यानें चैतन्य सांप्रदायांतील म्हणजे राघवचैतन्यापासून ५ वें पुरुष यशवंतराव यांजपासून उपदेश घेतला होता. कुडची वीराचा अमृतराय हा आजे गुरु असल्यानें त विश्वसनीय आहे.

ध्रुवचरित्रांत ‘ माता उमा परमशंकर तात झाला. ’ अशी अमृतराय स्वतः विषयीं माहिती देतो. मध्वमुनींच्या उपदेशानें अमृतराय ईश्वरभक्तिकडे वळला. अशी आख्यायिका आहे. याचें मूळ नांव अंबाजी.

याच्या कवितांत ‘ श्रीगुरु मध्वनाथपर अमृतराय बलहारी ’ असेंहि आढळतें. शिवाय ‘ अमृत म्हणे तुम्हीं भजा निरंतर श्रीधर गुरुचे पाय ’ असाहि उल्लेख आहे. अद्वैतानंद व ब्रम्हानंद हेहि गुरु आढळतात. या गुरुत्रयीवरून अनेक अमृतराय झाले असावेत, अशी आजगांवकर शंका काढतात. औरंगाबादला याची समाधी आहे.

अमृतरायांचीं काव्यें :— १ गणपति वर्णन, २ जगदंबा वर्णन, ३ ध्रुवचरित्र, ४ शुकचरित्र, ५ सुदामचरित्र, ६ नारदी, ७ कृष्णचरित्र, ८ द्रौपदीवस्त्रहरण, ९ रामचंद्र वर्णन, १० कृष्ण वर्णन, ११ राधा वर्णन, १२ कृष्णध्यान, १३ मृत्तिका भक्षण, १४ वत्सलाहरण, १५ रासक्रीडा, १६ कुंजवन विहार १७ कृष्णलीला, १८ चंद्रावळी, १९ दुर्वासयात्रा, २० पारिजात आख्यान, २१ जीवदशा वर्णन, २२ उपदेश, २३ पूतनावध इ०

अमृतरायांची वर्णनशैली फार अप्रतिम आहे. सुदामचरित्रांत कृष्णाच्या अप्रतिम ऐश्वर्याचें वर्णन, द्रौपदीवस्त्रहरणांत अनेक वस्त्रांचीं नांवें व तीं मिळणाऱ्या पेठांचींहि नांवें, भोजनांतील पदार्थ, रासक्रीडेंत रागरागिण्या वगैरे पाहिल्यास वरील वाक्यांचें प्रत्यंतर येईल. याची कविता कटावबद्ध असल्यानें ती

वर्णनास फार साजेशी आहे. कीर्तनकार या कवितांचा फार उपयोग करितात.

अमेरिका (संयुक्त संस्थानें):— उत्तर अमेरिकेतील एक अत्यंत वैभवशाली राष्ट्र याच्या उत्तरेस कॅनडा, दक्षिणेस मेक्सिको, हे देश आहेत. पूर्वेला ॲटलांटिक महासागर असून दक्षिणेला मेक्सिकोचे आखात आहे. पश्चिमेला पॅसिफिक महासागर आहे. जास्तींत जास्त पूर्व पश्चिम लांबी ३१०० मैल असून दक्षिणोत्तर लांबी १७०० मैल आहे. क्षेत्रफळ ३,०२६, ७८९ चौरस मैल आहे. यांतील ४३,००० चौरस मैल भाग पाण्यानें व्यापला आहे. या क्षेत्रांत संयुक्त संस्थानाच्या ताब्यांत असलेल्या बाहेरील ७१६,७०० चौरस मैल प्रदेशाची भर घातली म्हणजे संयुक्त संस्थानांच्या सरकारच्या ताब्यांतील एकंदर प्रदेश ३,७४३,४७८ चौरस मैल भरतो. फक्त संयुक्त संस्थानांची लोकसंख्या १३०,०००,००० आहे.

संयुक्त संस्थानची भूमि इतकी वैभव संपन्न होण्याला अमेरिकन लोकांच्या आंगीं वसत असलेले उत्साह, उद्योगशीलता, बुद्धिमत्ता, कल्पकता इत्यादि गुण पुष्कळ अंशीं कारणीभूत झालेले आहेत यांत शंका नाहीं. अमेरिकेनें जगांतील वैभवसंपन्न व सामर्थ्य संपन्न राष्ट्रांत मिळविलेल्या अग्रेसरत्वाचे श्रेय अमेरिकनांच्या या बहुमोल राष्ट्रीय सद्गुणाइतकेच अमेरिकेवर असलेल्या निसर्गाच्या कृपेला दिले पाहिजे. अमेरिकेची भूमि सुजला व सुफला असून निसर्ग सौंदर्यानें विनटली आहे. पर्वत, दरी खोरी, सपाट व उंचवट्याचे प्रदेश यांची विभागणी निसर्गानें इतक्या चातुर्यानें केली आहे कीं कोणत्याहि प्रकारचे उद्योगधंदे तेथें यशस्वी रीतीनें चालवितां यावेत. सुपीक व विस्तीर्ण भूमि व मेघराजाची पूर्ण कृपा यामुळें अमेरिकेंत प्रचंड प्रमाणांत शेती चालते. मिसिसिपी सारख्या ४००० मैलाहून जास्त लांबीच्या नदींतून जहाजें चालत असल्यामुळें अंतर्गत जलमार्गाची चांगलीच सोय झाली आहे. त्यामुळें थोड्या खर्चांत वाहतूक होते. एका बाजूला अटलांटिक व दुसऱ्या बाजूला पॅसिफिक हे महासागर असून दूरदूरच्या देशाशीं चांगलें दळणवळण होते. न्यूयॉर्क, बोस्टन सारखी प्रशस्त बंदरें आहे. देशभर रेल्वेचे मोठे जाळें पसरले आहे.

हवा:–अमेरिका हा देश विस्तीर्ण असल्यामुळें निरनिराळ्या विभागांत निरनिराळ्या प्रकारची हवा आढळून येते. उत्तरेकडील सीमा भागांत जानेवारी महिन्यांतील सरासरी उष्णतामान २०° व जुलै महिन्यांत ६०° असते. देशाच्या उत्तरेकडील विभागांतील पॅसिफिक व ॲटलांटिक या दोन महासागरांच्या किनाऱ्यावरील विभागाच्या हिंवाळ्यांतील उष्णतामानांत जमिनअस्मानाची तफावत पडते. पॅसिफिकच्या किनाऱ्यामधील कमीतकमी उष्णतामान ४१° व ॲटलांटिकच्या किनाऱ्यावरील १४° असते. जसजसे दक्षिणेकडे जावें तसतसें सरासरी उष्णतामान वाढत जातें. व त्या विभागांतील पूर्व व पश्चिम टोंकाकडील उष्णतामाण जवळजवळ सारखेंच असतें असे म्हणण्यास हरकत नाहीं. मध्यविभागांतील प्रदेशावर उत्तर व दक्षिण भागाकडून वाऱ्याचे झोत आलटून पालटून अनिरुद्धपणें येत असल्यामुळें तेथील उष्णतामानांत आकस्मिकपणें आश्चर्यकारक फरक पडतो.

पर्वत व पाऊस: — ॲपलॅचियन व रॉकी या दोन मोठ्या पर्वतांच्या रांगा आहेत. दोन्हीही फारशा उंच नाहींत या दोन रांगा मध्यें विस्तीर्ण सपाट प्रदेश आहे या दोन पर्वतांच्या भूपृष्ठावरील विशिष्ट स्थानामुळें देशांतील सर्वच भागांत सारखाच पाऊस पडत नाहीं. उत्तर कॅरोलिनाच्या पूर्वेकडील भागांत व मेक्सिकोच्या आखाताच्या उत्तरेकडील भागांत ६० इंचापेक्षा अधिक पाऊस पडतो. इलिनॉईसच्या उत्तरेकडील निम्मा भाग, मिनेसोटा, आयोवा, टेक्झसचा पूर्वेकडील निम्मा भाग या प्रदेशांत २० इंचापासून ४० इंचा पर्यंत पाऊस पडतो. त्यामुळें त्या प्रदेशांत पीक होते. पर्वतांच्या रांगा मधील पठार रुक्ष असून त्याचा निम्मा भाग, अरिझोनाचा पश्चिमेकडील भाग व कॅलिफोर्नियाचा आग्नेयेकडील भाग यांत पाऊस पडत नाहीं. पर्वतांच्या मधील दऱ्या व समुद्रकाठच्या पट्ट्या येथें चांगला पाऊस पडतो.

खनिज पदार्थ:—संयुक्तसंस्थानावर खनिज संपत्तीच्या बाबतींत निसर्गाचा वरदहस्त आहे. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धाच्या अखेरपर्यंत या संपत्तीचा उपयोग म्हणावा तसा करून घेण्यांत आला नव्हता. परंतु

पासून आतांपर्यंत अमेरिकेनें या बाबतींत विश्व प्रयत्न केले व पराकाष्ठेची प्रगति करून घेतली. खनिज संपत्तींतील विविधता व वैपुल्य या बाबतींत अमेरिकेची बरोबरी दुसरा कोणताहि देश करूं शकत नाहीं. कोळसा व पेट्रोलियम या खेरीज इतर खनिज पदार्थ डोंगराळ प्रदेशांत सांपडतात; याच विभागांत खाणीचा धंदा वाढीस लागला आहे दगडी कोळसा, पेट्रोलियम व गॅस हे खनिज इंधन सांपडतें. लोखंड, सोनें, रुपें, तांबें, शिसें, जस्त, पारा हे मुख्य खनिज पदार्थ होत.

शेती—अमेरिकेला शेतीप्रधान देश जरी म्हणता आलें नाहीं तरी त्या देशांत शेती मोठ्या प्रमाणावर चालते. बहुतेक जमिनी जमिनींचे मालकच कसतात. शेतीवर राबणारा मजूर वर्ग जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल; परंतु दक्षिणेकडील कापसाच्या शेतांवर पुष्कळसे निग्रो मजूर खपतात. जी कांहीं थोडी शेतें कुळाकडे कसण्याकरितां देण्यांत येतात त्यांच्या बाबतींत कुळाकडून मालकाला नक्त खंड न मिळतां भाग मिळतो. संयुक्त संस्थानें अन्नाच्या पुरवठ्याच्या बाबतींत पुष्कळ अंशीं स्वयंपूर्ण आहेत. कॉफी, चहा, साखर, कोको, केळीं, ऑलिव्हतेल या खेरीज कोणत्याहि पदार्थाबद्दल संयुक्तसंस्थानांना दुसऱ्या देशावर अवलंबून राहावें लागत नाहीं. तांदळाखेरीज बहुतेक सर्व खाद्यधान्यें गरजेपेक्षांहीं जास्त पिकतात. दक्षिणेकडील संस्थानांत कपाशीचें पीक विपुल होते. टेक्सस, मिसिसिपी व जॉर्जिया, अलबामा, व दक्षिण कॅरोलिना येथें कापूस होतो. तंबाखू देशाच्या बहुतेक सर्व भागांत होतो. उत्तर कॅरोलिना, केन्टुकी, व्हर्जिनिया हा विभाग तंबाखूबद्दल विशेष प्रसिद्ध आहे. फळांची लागवड मोठ्या प्रमाणांत होते. फ्लॉरिडा, न्यू जर्सीचा कांहीं भाग, न्यूयार्क, कॅलिफोर्निया येथें हा धंदा विशेष मोठ्या प्रमाणांत चालतो. फ्लॉरिडांत अननस व मोसंबी; कॅलिफोर्नियांत मोसंबी, लिंबू, द्राक्षें, मनुका, बदाम, इत्यादि होतात. रॉजबेरी, ब्लॅकबेरी, स्ट्रॉबेरी वगैरे फळें पुरेसा पाऊस असलेल्या बहुतेक भागांत होतात. याशिवाय ताग, ऊस, बीट, रताळीं व भाजीपाला पुष्कळ होतो.

उद्योगधंदे—उत्पादक धंद्याच्या बाबतींत संयुक्त संस्थानांची प्रगति फार झाली आहे. कोळसा, लोखंड, पेट्रोल, चिनीमातीची माती, लाकूड (जंगलें), कापूस या वस्तु विपुल सांपडत असल्यामुळें अनेक कारखाने निघून त्यांच्या करवी फार मोठे उत्पन्न मिळतें. अमेरिकेच्या अनेक संस्थानामधून अंतर्गत व्यापारी वस्तूंवर निरनिराळ्या संस्थानांच्या जकाती नसल्यामुळें व्यापार वाढीला फार मोठी मदत होते. मोटारी, विणण्याची यंत्रें, आगबोटी, लढाऊ जहाजें, विमानें, शिवण्याची यंत्रें, विजेची यंत्रे व उपकरणें वगैरेचा फार मोठा व्यापार परदेशाशीं चालतो. याशिवाय नद्यांच्या पाण्यावर अनेक ठिकाणीं वीज उत्पन्न करून उद्योगधंद्यांना पुरवितां येतें. रेल्वे व पक्के रस्ते यांचे सर्व देशभर जाळें पसरलें असल्यामुळें अंतर्गत वाहतूक फार सुलभतेनें होते.

लोक—१७व्या शतकापासून साधारणतः युरोपमधून लोक अमेरिकेंत वसाहतीसाठीं येऊं लागले. इंग्लिश, स्कॉच, आयरिश, स्वीड, डच, फ्रेंच व जर्मन लोक वसाहतीसाठीं येत असत. पण या सर्वांत संख्येनें इंग्लिश लोकच जास्त असल्यामुळें इंग्लिशांचा पगडा इतर लोकावर राहिला व पुढें एकमेकांची लग्नें होऊन जी संतती झाली तीवरहि इंग्लिश लोकांच्या संस्कृतीची छाप पडून भाषा, आचार विचार इत्यादीहि इंग्लिशांचेच दृढमूल झाले. अमेरिकेच्या पश्चिम भागांत लोकवस्ती जास्त असून सरासरीनें एका चौरस मैलास ४१ लोक हे प्रमाण पडतें.

राज्य व्यवस्था—एकूण ४८ संस्थानें व एक फेडरल डिस्ट्रिक्ट अमेरिकेंत मोडतात. याशिवाय अलास्का, हवाई, फिलिपाइन्स, गोआम, व्हर्जिनिया बेटें, पोर्टो रिको व टूटिला असे बाहेरचे प्रदेश आहेत.

प्रत्येक संस्थानांत सीनेट व हौस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज्‌चें एक मंडळ अशी दोन विधि मंडळें असतात. सीनेटच्या सभासदांची सीनेटमध्यें राहावयाचीं वर्षें सर्व संस्थानांतून सारखी नाहींत. प्रत्येक संस्थानला एक गव्हर्नर असतो व तोच मुख्य अधिकारी असतो. त्याच्या हाताखालीं लेफ्टनंट गव्हर्नर, सेक्रेटरी ऑफ स्टेट, खजिनदार, ॲटर्नी जनरल व कमिशनर ऑफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन (शिक्षणाधिकारी) असे अधिकारी असतात. प्रत्येक संस्थानचें स्वतंत्र सुप्रीम कोर्ट आहे.

अमेरिकेची संयुक्त संस्थानें म्हणजे एक फेडरेशन आहे. या राज्ययंत्राच्या तीन शाखा आहेत.

१ अध्यक्ष; उपाध्यक्ष (executive) २ विधि-

मंडळें (कॉंग्रेस) (१) हौस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज्, व (२) सीनेट ३ सुप्रीम कोर्ट. हौस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज्मध्यें ४३५ मेंबर असतात व प्रत्येक संस्थानच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत ते निवडून येतात. सीनेटमध्यें प्रत्येक संस्थानचे दोन याप्रमाणें ९६ मेंबर असतात. अध्यक्षाला व्हेटोचा अधिकार आहे पण दोन तृतियांश मतें मिळवून अध्यक्षाचा व्हेटोचा अधिकार (त्या बाबतीपुरता) बाजूस सारता येतो. सुप्रीम कोर्टमध्यें सध्यां नऊ जज्ज आहेत. ही संख्या सीनेट ठरवितें. न्यायाधिशांची नेमणूक सीनेटच्या संमतीनें अध्यक्ष करतो. या कोर्टाच्या निकालावर अपील नाहीं. संस्थानांमधील लढ्यासंबंधीं व फेडरल कायद्यासंबंधीं, आरमारी बाबी व निरनिराळ्या संस्थानांच्या नागरिकांच्या मधील तंट्यांच्या केसेस हे कोर्ट पाहतें.

इतिहास—कोलंबसाला १४९२ मध्यें हिंदुस्थानला जाण्याचा मार्ग शोधण्याच्या प्रयत्नांत अमेरिकाखंड सांपडलें. यानंतर १४९७ पासूनच इंग्लंडच्या लोकांनीं लॅब्रॉडॉर व न्यू इंग्लंडचा भाग शोधून काढून आपलें निशाण त्या भूभागावर रोवलें. १५१३मध्यें बाल्बोआ या स्पॅनिश गृहस्थानें पॅसिफिक महासागराची बाजू पाहिली, १५२४ मध्यें फ्रेंचानीहि फेरी मारली. इंग्लंडच्या एलिझाबेथच्या कारकीर्दींत अनेक दर्यावर्दी लोकांनीं कांहीं प्रदेश घेऊन वसाहती करण्याचा प्रयत्न केला पण त्यांत विशेष यश आलें नाहीं.

इंग्लिश लोकांनीच प्रथम यशस्वीरीतीनें वसाहती करण्यास सुरवात केली. १६०७ मध्यें जेम्स टाऊन हें पहिलें शहरहि त्यांनीं वसविलें. बहुतेक सर्व वर्गांतील लोक वसाहतीसाठीं येत. श्रीमंत व धाडसी लोकांना ही फार मोठी संधी होती व पुष्कळांनीं तिचा फायदा घेतला. १६१९ सालीं या ठिकाणीं असेंब्ली स्थापून त्या लोकांनीं वसाहतीला व्यवस्थित स्वरूप देण्यास सुरवात केली. १६२० मध्यें इंग्लंडमधील धार्मिक जुलमाला कंटाळून अनेक लोकांनीं मॅसॅच्युसेटस् संस्थानांत प्लायमाउथ येथें वसाहत केली. १६२८ मध्यें प्यूरिटन पंथाच्या लोकांनीं येऊन सालेम येथें वसाहत केली. लौकरच वसाहतवाल्यांनीं स्वराज्याची मागणी केली व यावेळपासूनच इंग्लंडच्या राज्याशीं कटकटी सुरू झाल्या. १६३८मध्यें हारवर्ड कॉलेज स्थापलें गेलें. १६३७ मध्यें कॉनेक्टिकट या नदीवर वसाहत होऊन या वसाहतीनें आपली पहिली लेखी राज्यघटना तयार केली. (fundmental orders of Connecticut) यानंतर न्यू जर्सी, पेन्सिल्व्हेनिया, जॉर्जिया इ. तेरा ठिकाणीं १६६४ पर्यंत वसाहती झाल्या. पुढें १६८९ ते १७६३ पर्यंत फ्रेंच लोकांचे प्रभुत्व झुगारण्यासाठीं व रेडइंडियन लोकांशीं युद्धें होऊन अमेरिकन वसाहतवाल्यांना लढायांचें शिक्षण मिळालें. परिणामीं फ्रेंचांचें वर्चस्व पार नाहींसें झालें व अंतर्गत एकीचें महत्त्व पटलें.

वसाहतींच्या अंमलाखालील प्रदेश वाढूं लागला तसतशा राजकीय अडचणीं निर्माण होऊं लागल्या. इंग्लंडचें राजकीय प्रभुत्व असल्यामुळें इंग्लंडनें सैन्य ठेवून व कर बसवून राज्यकारभार चालविला. देशाबाहेरचा व्यापार इंग्रजांच्याच ताब्यांत होता. अंतर्गत व्यापारावरहि कडक नियंत्रणें होतीं. न्यायालयाची व्यवस्था चांगली नव्हती. नॅव्हिगेशन ॲक्ट, स्टॅम्प ॲक्ट वगैरे अप्रिय कायदे अमेरिकन वसाहतवाल्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर लादले असल्यामुळें पार्लमेंटमध्यें प्रतिनिधित्त्व मिळाल्याशिवाय कर देणार नाहीं अशीं विचारसरणी पुढें आली. शेवटीं बोस्टन बंदरांत रेडइंडियन लोकांच्या वेषांत ब्रिटिश बोटीवर अमेरिकन लोक चढून बोटीवरचा चहा त्यांनीं समुद्रांत ओतला. त्यामुळें ब्रिटिश लष्करानें चिडून बरेच लोक मारले. पुढें बोस्टन बंदरहि बंद झाले तेव्हां मॅसॅच्युसेटस् वसाहतीच्या असेंब्लीच्या विनंतीप्रमाणें १ सप्टेंबर १७७४ रोजीं फिलाडेल्फिया येथें परिषद भरून या दडपशाहीच्या विरुद्ध निषेधपर ठराव पास झालें व इंग्लंडमधून कोणताच माल आणावयाचा नाहीं असें ठरलें. पण याचा कांहींच परिणाम न होऊन उलट दडपशाही वाढली व युद्धाला सुरवात झाली.

१७७६ च्या जून–जुलै मध्यें अमेरिकेनें इंग्लंडशीं असलेले आपले सर्व संबंध तोडल्याचे जाहीर केलें व युद्धास सुरवात झाली. जॉर्ज वॉशिंग्टन व इतर लोकांच्या नेतृत्त्वाखालीं सात वर्षें युद्ध चालू होते, शेवटीं लॉर्ड कॉर्नवॉलिस (इंग्लिश सेनापती) याचा पराभव होऊन १७८३ मध्यें तह झाला व अमेरिका स्वतंत्र झाली. १७८७ मध्यें अमेरिकेची घटना तयार झाली, (ही सर्व जगांतील पहिली लिहिलेली राज्यघटना आहे.) व जॉर्ज वॉशिंग्टन हा पहिला अध्यक्ष झाला.

या नंतर पश्चिमेकडील प्रदेश जिंकून वसाहती करण्यास सुरवात झाली. नंतर १८०३ मध्यें फ्रान्स कडून लुझियाना देश विकत घेतला. १८१९ मध्यें स्पेनकडून फ्लोरिडा विकत घेतला. १८४५ त टेक्सस येऊन मिळाला पुढें मेक्सिकोशीं तंटे होऊन आणखी प्रदेश मिळाला. १८६७ मध्यें रशियाकडून आलास्का विकत घेतला. १८९८ मध्यें हवाई बेटें व १८९९ मध्यें फिलिपाइन्स बेटें जोडली.

१९०४ मध्यें पनामा कॅनॉलच्या भोंवतीचा भाग कायम भाडेपट्ट्यानें घेतला, व १९१७ मध्यें डेन्मार्कपासून व्हर्जिन बेटें अमेरिकेनें विकत घेतली.

अमेरिकेंतील दक्षिण संस्थानांतील कांहीं मळेवाल्यांनीं गुलामांची मुक्तता करण्याचें नाकारल्यानें अमेरिकन संस्थानांची जूट फुटूं पाहात होती पण आब्राहम लिंकनच्या कारकीर्दीत युद्ध होऊन उत्तरेकडील संस्थानांचा जय झाला. गुलामांची गुलामगिरींतून मुक्तता झाली व अमेरिकन फेडरेशन अखंड राहिलें. यानंतर अमेरिकेच्या इतिहासांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे गेल्या महायुद्धांत अमेरिकेनें १९१७ मध्यें दोस्तांच्या बाजूनें युद्धांत पडून जर्मनीचा पराभव केला ही होय. सध्यांच्या युद्धांतहि अमेरिका इंग्लंडला शस्त्रसाहित्याची खूप मदत देत आहे. कदाचित अमेरिका इंग्लंडच्या बाजूनें उद्यां युद्धांत पडेलहि !

अरबस्तान:—आशियाखंडाच्या नैर्ऋत्य भागांतील एक द्वीपकल्प, याचें क्षेत्रफळ १,२००,००० चौरस मैल असून लोकसंख्या अजमासे ७,०००,००० आहे. अरबस्तानचें सामान्य स्वरूप साहाराप्रमाणें आहे. अरबस्तानांत एक मध्यवर्ती पठार असून भोंवतालीं वालुकामय प्रदेश आहे. अरबस्तान ही मुसलमानांची धर्मभूमि आहे. अरबस्तानचें बहुतेक सर्व रहिवाशी मुसलमान आहेत. परंतु तेथें मध्यवर्ती राजकीय सत्ता अशी नाहीं. १९१४ चें महायुद्धाचे सुमारास अरबस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावर व पूर्व किनाऱ्याच्या कांहीं भागावर तुर्कस्थानची सत्ता होती. आग्नेय भागाकडील ओमन हा एक स्वतंत्रच देश होता; पण तेथें ब्रिटिशांचे वजन होतें. नैऋत्येकडील कोपऱ्यांत असलेलें एडन शहर व त्या भोंवतालचा प्रदेश ब्रिटिशांच्या ताब्यांत होता. देशाच्या मध्यभागांत अमीर, इमाम, शेख हीं नांवें धारण करणारे तद्देशीय राजे राज्य करीत होते.

हेजाझ हा तांबड्या समुद्राच्या पूर्वकिनाऱ्यावरील चिंचोळा प्रदेश सोळाव्या शतकांत तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं गेला व सन १९१८ पर्यंत आटोमन साम्राज्याचाच भाग होता. तुर्कांनीं महायुद्धाच्या पहिल्या दोन वर्षांत अरबांवर अत्याचार केल्यामुळें व विशेषतः मक्का या पवित्र क्षेत्रावर कुलपी गोळ्यांचा भडिमार केल्यामुळें हेजाझच्या लोकांनीं बंड केलें; व महंमद पैगंबराचा वंशज एल् हुसेन इब्न अलि याच्या नेतृत्वाखालीं स्वातंत्र्य पुकारलें. दोस्तराष्ट्रांनीं या नव्या राज्याला मान्यता दिली. ब्रिटननें या राज्याला आर्थिक मदत दिली. तुर्कस्थानविरुद्ध हेजाझनें दोस्तांना मदत केली. पुढें राष्ट्रसंघ स्थापन झाल्यावर त्यांजकडून या राज्याच्या हद्दी ठरविण्यांत आल्या. याच राज्यांत मक्का व मदिना ही मुसलमानांची पवित्र क्षेत्रें आहेत.

हवा व पीक:—अरबस्तानची हवा अत्यंत उष्ण व कोरडी आहे. प्रदेश अत्यंत रुक्ष आहे. या देशांत वर्षांतून एकवार देखील पावसाचा शिंतोडा मिळत नाहीं असा बराच भाग आहे. खजुराची झाडें विपुल असल्यामुळें खजूर हाच खाण्याचा मुख्य पदार्थ होय. याशिवाय गहू, सातू, मक्का, बाजरी इत्यादि खाद्यधान्येंहि होतात. नानातऱ्हेची फळें, कॉफी, रुमामस्तकी हिराबोळ, कवड्याउद, लोहबाणी ऊद यांची निपज होते. देशाच्या कांहीं भागांत हवामानानुसार तांदूळ, तंबाखू, उडीद, मसूर, कलिंगडें, केशर, खसखस, इत्यादींची निपज होतें. मेंढ्या, बैल, घोडे, गाढव, खेंचर, उंट इत्यादि पाळीव जनावरें व कोल्हा, तरस, बिब्यावाघ, सिंह हे हिंस्र पशू आढळतात. मरु शाद्बलांत (ओॲसिस) शहामृग सांपडतात. पेट्रोलियम, मीठ, गंधक व गोमेदादि रत्नें इत्यादि खनिज पदार्थ सांपडतात.

लोक—अरबस्तानच्या रहिवाश्यांना अरब म्हणतात. अरबाची आंगकाठी बारीक पण बळकट असते; वर्ण करडा असून चेहरा रेखीव असतो. अरब चपळ व तरतरीत आहेत. ते आतिथ्यशील आहेत. त्यांच्या आतिथ्यशीलतेचा अनुभव विशेषतः युरोपीयन लोकांना विशेष येतो. निम्मे शिम्मे लोक भटक्या वृत्तीचे

आहेत. ते एका ठिकाणीं स्थाइक होऊन न राहतां आपली गुरेंढोरें घेऊन पोटाला मिळेल तिकडे जातात. त्यांच्या आंगीं व्यापारी वृत्ति नाहीं. व्यापार बहुधा युरोपीयनांच्या हातीं आहे.

मुसलमानांचे सुनी, शिया व वहबी असे तीन पंथ तेथें नांदतात. वहबी पंथाचा उदय अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत झाला. या पंथाला राजकीय दृष्ट्या बरेंच महत्त्व प्राप्त झालें होतें.

भाषा व वाङ्मय—अरबी भाषा ही एक सेमिटिक भाषा आहे. सेमिटिक भाषांत ही मार्दव व शब्दसंपत्ति याविषयीं विशेष प्रसिद्ध आहे. इस्लाम धर्माच्या प्रसारामुळें ही भाषा अरबस्तानांतील एकमेव ग्रंथाची भाषा झाली. ही भाषा आशियाच्या नैर्ऋत्य भागांत व आफ्रिकेच्या पूर्व व उत्तर भागांत बोलली जाते. कांहीं काळ स्पेन, माल्टा व सिसिली येथेंहि ही भाषा प्रचारांत होती. सांप्रतहि ज्या ज्या ठिकाणीं इस्लामी धर्माचा प्रचार झाला आहे त्या त्या ठिकाणीं ती विद्वानांची पवित्र भाषा म्हणून उपयोगांत असते.

महंमदानें अरबी वाङ्मयाला नवीन वळण लावून दिलें. मुसलमानांचा धर्मग्रंथ कुराण हा याच भाषेंत लिहिला आहे. मध्ययुगांत अरबांनीं भूगोल विषयांवर बरीच ग्रंथरचना केली असून, आठव्या शतकापासून अनेक इतिहासकारांनीं इतिहासाच्या क्षेत्रांत विपुल ग्रंथसंपत्ति निर्माण करून ठेविली आहे. रसायन शास्त्रांतील प्राथमिक संशोधन अरबानीच केलें असें मानण्यांत येतें. त्यांनीं गणित व खगोलशास्त्र या विषयावरही ग्रंथरचना केली; त्यांचे या विषयांवरील ग्रंथ ग्रीक ग्रंथावर आधारलेले असले तरी मूळ ग्रीक ग्रंथांतील ज्ञानांत त्यांनीं आपल्या संशोधनानें बरीच भर घातली व विषयाची मांडणी सुलभ केली. पाश्चात्त्यांनीं बीजगणिताचा परिचय त्यांच्याचकडून करून घेतला. खगोलशास्त्रांत तर त्यांनीं पुष्कळच प्रगति केली. बगदाद व कार्डोव्हा येथें वेधशाळा बांधल्या. त्यांनीं कथावाङ्मय देखील निर्माण केलें. वनदेवता, राक्षस, जादुगार यांच्या अद्भुतरम्य कथा अरबी भाषेंत विपुल आहेत. अरेबियन नाइट्स (अरबी भाषेंतील सुरस गोष्टी) सुपरिचितच आहेत.

शिल्पः— महंमदाच्या पूर्वी अरबस्थानांत स्वतःचें असें शिल्प नव्हतेंच. त्यांनीं इजिप्त, सीरिया, पर्शिया पादाक्रांत केल्यावरहि इमारती बांधण्याच्या कामीं बायझंटाईन व इराणी शिल्पकारावरच त्यांना विसंबावें लागलें. म्हणून त्या देशांतील अरबी शिल्प म्हणून ओळखलें जाणारें शिल्प अरबी प्रतिभेंतून निर्माण झालें नाहीं. प्रारंभीं प्रारंभीं अणकुचीदार कमान हें त्याचें वैशिष्ट्य म्हणून गणलें जात असे. या शिल्पाचें नमुने कैरो व दमास्कस येथील मशीदींत सांपडतात. पुढें पुढें घोड्याच्या नालाच्या आकाराच्या कमानी करण्यांत येऊं लागल्या. आणि मुसलमानांचें वर्चस्व जसजसें वाढूं लागलें तसतसें या प्रकारचें शिल्प मुसलमानी शिल्पाचें वैशिष्ट्य म्हणून गणलें जाऊं लागलें.

अरवलीः—राजपुतान्याचे दोन भाग करणारा पर्वत. राजपुताना, अजमीर व मेवाड या भागांत हा ईशान्य दिशेला ३०० मैल पसरलेला आहे. हा २४ ते २७° १०′ उत्तर अक्षांश व ७२° ते ७५° पूर्वरेखांश यांच्यामध्यें आहे; कडे व शिखरें यांनीं सर्वच पर्वत व्यापलेला दिसून येतो. कांहीं भागांत याची रुंदी ६ मैल तर कांहीं ठिकाणीं ती ६० मैलहि भरते. १००० फुटापासून ३००० फुटापर्यंत याची उंची भरते. अबूचा पहाड, रघुनाथगड व हरसनाथचा डोंगर हे भाग याचेच. यापैकीं अबूची उंची ५६५३ फूट आहे. याला नैर्ऋत्य दिशेकडे 'गुरु शिखर' नांवाचें एक अति उंच शिखर आहे. यालाच कित्येक अबूचा पहाड म्हणतात. या पहाडांत पुष्कळच झाडी राखलेली आहे. या पर्वताच्या उत्तरेकडील पाणी लुनी व साखी या नद्यांना मिळतें. तसेंच दक्षिणेकडचें पाणी ओढे व चंबळा नदीस येतें. याठिकाणीं ग्रनाईट, नीस, क्वार्टाइट्स यांसारखे खडक आहेत. या पर्वतांतून लुनी (३२० मैल), बनास (३०० मैल) व साबरमती या तीन प्रमुख नद्या उगम पावतात.

इथल्या मूळच्या लोकांपैकीं मेर हे सध्यां रानटी अवस्थेंत आहेत.

अरवलीची आठवण तेथील प्रेक्षणीय स्थळें, उत्तम वनश्री व पूर्वकालीन जैन व हिंदू धर्मियांचीं देवालयें यामुळें राहील. येथील देवालयें शिल्पकलेच्या दृष्टीनें फार महत्त्वाचीं आहेत.

अहमदशहा अब्दाली (१७२४–१७७२) :— तिसऱ्या पानिपतच्या युद्धांतील अफगाणसेनेचा नेता. सद्दोझाई जातींत १७२४ मध्यें जन्मला. सम्मौनखान हा याचा बाप हा नादिरशाहाच्या घोडदळावरील प्रमुख होता. त्यामुळें नादिरशहानें हिंदुस्थानावर केलेल्या स्वारींत हा होता. पुढें नादिरशहाच्या पश्चात् त्याची ३० लक्षाची ठेव, कंदाहारचा कबजा व स्वातंत्र्य यांचा लाभ यास एकदम झाला.

१७४८ पासून १७६७ पर्यंत यानें हिंदुस्थानावर एकूण आठ स्वाऱ्या केल्या. यापैकीं तिसऱ्या व चौथ्या या स्वाऱ्यांत त्यास लाहोर, काबूल व कंदाहार हे प्रांत मिळाले. चौथ्या स्वारींत त्यानें दिल्लीपर्यंत चाल करून नादिरशहाची आठवण करून दिली.

याच्या आक्रमणामुळें उत्तरेंतील मराठ्यांची सत्ता धोक्यांत आली. ती बळकट व्हावी म्हणून रघुनाथराव पेशवे यांनीं पुनः लाहोर व मुलतान हे प्रांत त्याच्या सरदारांना हुसकून लावून परत घेतलें. आपले गेलेले प्रांत घेण्यासाठीं अहमदशहानें १७५९–६१ पर्यंत चाललेली पांचवी स्वारी हिंदुस्थानावर केली. मराठे व हा यांमध्यें पानिपत येथें हें युद्ध झालें. या युद्धांत जय अब्दालीला मिळाला. त्यामुळें याला खूप प्राप्ती झाली. पुढें यानें १७६२ ते १७६७ पर्यंत तीन स्वाऱ्या शीखांच्या बंदोबस्तासाठीं हिंदुस्थानावर केल्या पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. यानें पेशव्यांशीं तह करून शिखांना शह देण्याचा निष्फळ प्रयत्न करून पाहिला.

धाडसी वृत्ती, धोरणी स्वभाव, समयसूचकता, कल्पकता, शास्त्रें व इतिहास यांसंबंधीं आस्था इत्यादि गूण त्यांच्या अंगीं होते. त्याचबरोबर लोभी, क्रौर्य, हिंदूंचा द्वेष हे त्याचे प्रमुख दुर्गुण दिसून येतात. याला काळपुळीच्या विकारानें १९–१०–१७७२ ला मरण आलें. तैमूर नांवाचा याला एक मुलगा होता.

अहल्याबाई होळकर (१७२५—१७९५):— भारतवर्षाचें भूषण. निजामहद्दींतील चौंढें गांवचा माणकोजी शिंदे हा पाटील. तो हिचा बाप. अहिल्याबाईचा जन्म १७२५ त झाला. १७३३–३४ त हिचें मल्हारराव होळकरांचा मुलगा खंडेराव याच्याशीं लग्न झालें. हिला १७४५ मध्यें मालेराव हा मुलगा देपाल येथें झाला. यानंतर तिला मुक्ताबाई नांवाची मुलगी १७४८ सालीं झाली. अहल्याबाईला हींच दोन मुलें.

कुंभेरीच्या वेढ्यांत १७५४ मध्यें हिचा नवरा मरण पावला. त्याच्याबरोबर ही सती जाणार होती. पण सासऱ्याच्या आग्रहामुळें तिनें सती जाण्याचा बेत रहित केला. मल्हाररावानें हिच्यावर हळू हळू राज्यकारभार सोपविण्यास प्रारंभ केला. १७६६ च्या ३ जूनला मल्हारराव मेल्यामुळें सर्वच राज्यकारभार हिला पहावा लागला.

मल्हाररावाच्या पश्चात् हिनें मालेरावाला २३–७–१७६६ रोजीं गादीवर बसवून राज्यकारभार चालविण्यास आरंभ केला. पण दहाच महिन्यानें मालेराव मेला.

यावेळीं बाईच्या मांडीवर दत्तक देऊन तिचें राज्य आपल्या हस्तकांकडून चालविण्याचा घाट राघोबादादा पेशव्यानें घातला. पण तिनें धैर्य धरून मुत्सद्दीपणानें येणारी ही आपत्ती टाळली. पुढें तिनें महादजी शिंदे व पेशवे यांचा पाठिंबा मिळवून व सैन्याची मदत घेऊन राज्य करण्याचा विचार कायम केला. बाहेरचा कारभार तुकोजीराव होळकराकडे सोपवून स्वतःकडे घरांतला कारभार घेतला. दोघांमध्यें शेवटपर्यंत विशेष असा विरोध कोठेंहि आला नाहीं. प्रत्येक बाबींत ही आपलें लक्ष घालीत असें.

१७७१ त मेवाडच्या राण्याकडून महादजी शिंद्याबरोबर हिलाहि कांहीं प्रदेश मिळाला. तसेंच चंद्रावत व रामापुऱ्याचा जहागीरदार यांचीं बंडें वेळींच खबरदारी घेऊन हिनें मोडून टाकली.

हिच्यावर अगदीं म्हातारपणीं जावई, नातू व त्यांच्या बायका यांच्या मृत्यूंचा जबरदस्त आघात झाला. पण तो तिनें विवेकानें सहन केला.

अहल्याबाई रूपानें साधारणच असली तरी ती तेजस्वी होती. साधी पण पांढरी शुभ्र वस्त्रें ही परिधान करीत असे. ही आपली व्रतेंवैकल्यें, पूजाअर्चा, दानें वगैरे विधि ठराविक वेळीं पुरें करून नियमितपणें दरबारांत जाऊन काम पहात असे.

तिनें लोकांना सुखावह असा राज्यकारभार तर केलाच; पण स्वतःच्या खासगी खर्चातून पुष्कळ पैसा खर्च करून विश्वेश्वर, विष्णु व सोमनाथ यांचीं देवालयें बांधलीं. घाट बांधले. तसेंच रस्ते केले. धर्मशाळा व विहिरी बांधल्या.

हिनें आपलें वजन पेशव्यांबद्दल निष्ठा ठेवून, सासऱ्याचा अभिमान बाळगून स्वतःचा स्वाभिमान राखून व प्रजेला संतुष्ट राखून शेवटपर्यंत राखलें. शांतवृत्तीची धार्मिक, बहुश्रुत, विवेकी, प्रजाहिततत्पर अशी ही पुण्यश्लोक सती १३ आगष्ट १७९५ या दिवशीं मरण पावली.

ॲरिस्टॉटल् (खि. पू. ३८४-३२२) —प्राचीन ग्रीक तत्वज्ञांचा मुकुटमणी. प्लेटोचा शिष्य व एका स्वतंत्र तत्वज्ञानपद्धतीचा संस्थापक. वयाच्या सतराव्या वर्षी तो विद्याभ्यासाकरितां अथेन्स शहरीं गेला. तेथें त्यानें वीस वर्षें वास्तव्य केलें. तो प्लेटोचा आवडता शिष्य होता. प्लेटो "हा माझ्या विद्यालयाची बुद्धिमत्ता आहे" असें त्याचेविषयीं गौरवपर उद्गार काढीत असे. खिस्तपूर्व ३४३ सालाचे सुमारास अरिस्टॉटल् ॲलेक्झँडर दी ग्रेट याचा शिक्षक झाला. पर्शिया जिंकल्यावर अलेक्झँडरनें विपुल संपत्ति गुरुदक्षिणा म्हणून ॲरिस्टाट्लला दिली; व आपल्या मोहिमेंत आढळणारे चमत्कारिक व ग्रीसमध्यें न आढळणारे प्राणी व वनस्पती आपल्या गुरूकडे पाठवून देऊन त्याच्या संशोधनाला मदत केली. अलेक्झँडरला शिकविण्याचें काम सात वर्षें केल्यानंतर अथेन्स येथें एक विद्यालय स्थापून शिष्य पढविण्याला त्यानें सुरवात केली. तेथें त्यानें एक तप अध्यायनाध्यापनांत व्यतींत केलें. या मुदतींत त्यानें कांहीं शास्त्रीय शोधहि लावले. ३२३ सालीं त्याचा आश्रयदाता मृत्युमुखीं पडला. सॉक्रेटिसाचा अंत कसा झाला याची त्याला पक्की जाणीव होती. तत्वज्ञांच्या बाबतींत अथीनियन नागरीकाकडून झालेल्या अन्यायाची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून त्यानें अथेन्सला रामराम ठोकला. तो यूब्रोइया या बेटांत जाऊन राहिला. तेथेंच त्याचा अंत झाला.

ॲरिस्टॉटलनें लिहिलेल्या ग्रंथापैकीं पुष्कळसे काळाच्या भक्ष्यस्थानीं पडलेले आहेत. अशाप्रकारें नष्ट झालेल्या ग्रंथांत पत्रें, भाषणें, कविता, तात्त्विक संवाद, राष्ट्रीय उत्सवावरील प्रबंध, सृष्टिविज्ञान, अलंकारशास्त्र वगैरे ग्रंथ आहेत. या नष्ट झालेल्या ग्रंथांच्या लेखन शैलीमुळेंच त्याची लेखनपटुत्वाबद्दल कीर्ति झाली. अकराव्या शतकापूर्वी ॲरिस्टाटल्ची माहिती खिस्ती जगताला नव्हती. तेव्हां पासून खिश्चन तत्त्वज्ञ चार शतकेंपर्यंत त्याचे ग्रंथ प्रमाणभूत मानीत असत. पण पुढें हळूं हळूं त्याच्या ग्रंथाचा भलताच अर्थ करण्यांत येऊं लागला. विद्येच्या पुनरुज्जीवनानंतर मात्र त्याच्या ग्रंथांचा सखोल अभ्यास करण्यांत येऊं लागला. या अभ्यासाचा परिणाम बेकन, काण्ट, यांच्या ग्रंथावर झालेला दिसून येतो. ॲरिस्टॉटलच्या ग्रंथांतील थोडेच उपलब्ध आहेत. त्यांत पुढील ग्रंथ प्रमुख आहेत. विचारशास्त्र (Logic), अलंकारशास्त्र, काव्यशास्त्र, विज्ञानशास्त्र, अध्यात्मविज्ञान, नीतिशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, प्राण्यांचा इतिहास, वायूस्थितिशास्त्र.

हा कुटुंब संस्थेचा पुरस्कार करतो. गुलामगिरीच्या चालीचेहि त्यानें मंडन केलें आहे.

आइन्स्टाइन आलबर्ट (१८७९-):—



आइन्स्टाइन

सुप्रसिद्ध जर्मन शास्त्रज्ञ, व सापेक्षकता वादाचा जनक. याचा जन्म उल्म येथें १४ मे १८७९ सालीं झाला. याचे आई बाप ज्यू होते. म्यूनिच येथें वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत शालेय शिक्षण झाल्यावर आपल्या आईबापाबरोबर तो मिलान येथें गेला. लवकरच त्यानें म्यूनिच येथील टेक्निकल हायस्कूल मध्यें नांव दाखल केलें. तेथें १८९६ ते १९००पर्यंत अभ्यास केला. १९०० सालीं कॉन्फेडरेट पॉली टेक्निक ॲकॅडमीच्या परीक्षेंत त्यानें उत्कृष्ट यश मिळविलें. १९०२ सालीं त्यानें स्विस पेटंट ऑफीसांत नोकरी धरली. १९०३ सालीं त्याचा विवाह झाला. सन् १९०९पर्यंत तो स्विस पेटंट ऑफिसांतच होता. त्या कामावर असतांनाच त्यानें शास्त्रीय विषयावर अनेक शोध लावले. त्याच्या New Determination of Molecular Dimension या निबंधाबद्दल त्याला डॉक्टोरेट मिळाली. १९०९ सालीं

त्याची झूरिच विद्यापीठांत प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. १९११ सालीं झूरिचहून तो प्रागला पदार्थ-विज्ञान शास्त्राचा प्राध्यापक म्हणून गेला. १९१२ सालीं झूरिच विद्यापीठानें त्याची यांत्रिक व औद्योगिक कलांच्या विज्ञानाच्या प्राध्यापक पदावर नेमणूक केली. हें काम १९१४ पर्यंत करून तो त्या वर्षी ॲकॅडमी ऑफ सायन्स या संस्थेचा सभासद म्हणून बर्लिनला गेला. १९२१ सालीं त्याला पदार्थविज्ञानशास्त्राचें नोबेल प्राइज् मिळालें व १९२५ सालीं त्याला रॉयल सोसायटीचें कॉप्लेपदक मिळालें. १९२६ सालीं रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचें सुवर्णपदक मिळालें. १९३३ सालीं हिटलरनें जर्मनींतून याची हकालपट्टी केली व तो इंग्लंडला गेला. सांप्रत अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत तो प्रिन्सटन् येथें गणिताचा प्रोफेसर आहे.

आगरकर, गोपाळ गणेश (१८५६–१८९५):– सामाजिक सुधारणांचे आद्य पुरस्कर्ते आणि सुधारकांचे अग्रणी. आगरकरांचा जन्म सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाड-जवळील टेंभू गांवीं एका निर्धन कुटुंबांत १८५६ सालीं झाला. घरच्या दारिद्र्यामुळें त्यांना शिक्षणासाठीं म्हणून कऱ्हाड, रत्नागिरी, अकोला येथें व शेवटीं उच्च शिक्षणासाठीं म्हणून पुणें येथें राहावें लागलें. दारिद्र्याशीं झगडत, शिष्यवृत्त्या मिळवीत त्यांनी आपलें एम्. ए. पर्यंतचें शिक्षण पुरें केलें आणि सामोऱ्या आलेल्या लक्ष्मीला दूर सारून लोकसेवेचें, व्रत आमरण अंगिकारिलें! याच सुमारास लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, विष्णुशास्त्री चिपळुणकर इत्यादि जाज्वल्य स्वदेशप्रेमानें भारलेल्या तरुणांशीं त्यांची गांठ पडली आणि शिक्षणाच्या सर्वव्यापी प्रसाराशिवाय आपल्या देशाला ऊर्जितावस्था येऊन त्याचें नष्टचर्य संपायचें नाहीं ही विचारसरणी सर्वांच्या अंतःकरणांत एकसमयावच्छेदेंकरून प्रज्वलित झाल्यामुळें अल्पवेतन घेऊन एखादी नमुनेदार शिक्षणसंस्था चालवायची त्यांनीं ठरविलें. आणि त्या प्रमाणें पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली.



गो. ग. आगरकर

पण हें कार्यक्षेत्र त्या सर्वच मंडळींना अपुरें वाटूं लागलें आणि लोकजागृतीसाठीं व ज्ञानप्रसारार्थ म्हणून 'केसरी' व 'मराठा' हीं दोन वर्तमानपत्रें अनुक्रमें आगरकर व टिळक यांच्या संपादकत्वाखालीं निघूं लागली. आगरकर संपादक असतानांच कोल्हापूर प्रकरण उद्‌भवलें व त्या वेळचे कोल्हापूरचे कारभारी बर्वे, यानीं टिळक—आगरकरांवर अब्रुनुकसानीची फिर्याद केली, त्याचा परिणाम असा झाला, कीं आगरकर व टिळक यांना १०१ दिवस डोंगरी तुरुंगांत काढावे लागले ! पण त्यामुळें त्यानीं आपली निःस्पृहवृत्ति व कार्यनिष्ठा सोडली नाहीं, तिला उलट एक नवा बहर आला ! आगरकरांनीं या कारावासांत शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' नाटकाचें 'विकार–विलसित' या नांवाचें रूपांतर केलें. न्यू इंग्लिश स्कूल चांगलें भरभराटीला आलें होतें, त्यामुळें कॉलेज स्थापन करण्याची ईर्षा चालकांनीं आपल्या मनांत धरली व डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन होऊन फर्ग्युसन कॉलेज त्यानीं सुरू केलें.

याच सुमारास टिळक–आगरकरांमधील मतभेदाला सुरवात झाली. केसरींतून आगरकर सामाजिक सुधारणांचा पुरस्कार अव्याहतपणें करीतच होते, पण मलबारी शेटजींच्या बालविवाहप्रतिबंधक चळवळीला आगरकरांनीं उचलून धरतांच दोघांच्या विचारसरणींतील विरोध स्पष्टपणें प्रगट झाला. बहुजनसमाजाला रुचतील अशाच सुधारणांचा पुरस्कार करण्याचें टिळकांचें धोरण आगरकरांना पटलें नाहीं व 'लोकांना संतुष्ट करण्याकरितां आत्मवंचना करण्याचें प्रयोजन नाहीं' अशा तर्कशुद्ध विचारसरणीचा अवलंब करण्याचें आगरकरांनीं ठरविलें. याचा परिणाम 'आधीं राजकीय सुधारणा कीं सामाजिक सुधारणा' या प्रसिद्ध वादांत होऊन आगरकरांनीं 'केसरी' तून आपलें अंग काढून घेतलें व समाजांतील घातुक रूढींचें सीमोल्लंघन करण्यासाठीं म्हणून त्यांनीं १८८८ च्या दसऱ्याला आपलें 'सुधारक' वर्तमानपत्र सुरू केलें. 'इष्ट असेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार' हा 'सुधारका'चा बाणा होता. पण आगरकरांची ही निःस्पृहवृत्ति आणि

निर्भय विचारसरणी त्यावेळच्या समाजाच्या पचनीं पडली नाहीं आणि त्याचा परिणाम ते जिवंत असतांनाच त्यांची प्रेतयात्रा काढण्यांत झाला! तरीहि दुष्ट सामाजिक रूढीवर आणि आचारधर्मावर आगरकरांचे चौफेर हल्ले सुरूं होतेच! या मध्यंतरीच्या काळांत ते कांहीं दिवस फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉलहि होते. आनुवंशिक दारिद्र्याबरोबरच दम्याचा विकारहि त्यांना लाभला होता. त्यांतच कॉलेजांतील जबाबदारीची भर पडली आणि दारिद्र्याशीं, विकाराशीं एवढेंच नव्हें तर स्वजनाशींहि आमरण झगडलेल्या या युगप्रवर्तकाचा अंत १७ जून १८९५ रोजीं पुणें येथें झाला.

अवघ्या ३९ वर्षांच्या अल्पकालांत आगरकरांनीं जें लोकोत्तर कार्य केलें आणि ज्या नव्या कार्याची मूहूर्तमेढ रोवली तिचें विस्मरण महाराष्ट्राला कधींच व्हायचें नाहीं. त्यांनीं आपली वाणी आणि लेखणी महाराष्ट्राच्या उद्धाराकरितां झिजविली आणि निर्भयता, सडेतोडपणा, तर्कशुद्धता या गुणांची ओळख महाराष्ट्राला करून दिली. त्यांच्या लेखणींत अग्निची दाहकता होती, आणि वाणींत जाज्वल्य स्वदेशाभिमान होता. अंतःकरणाच्या असामान्य तळमळीनें त्यांनीं आपलीं हत्यारें चालविलीं, त्यांच्या डोळ्यांपुढें एकच ध्येय होतें–स्वदेशाचा आणि स्वजनांचा उत्कर्ष! व्यापक समाज–जीवनाचा पाया घालणारे आगरकर नुसते लेखक किंवा देशभक्तच नव्हते तर द्रष्टेहि होते.

आगाखान (१८७५—):— हिंदुस्थानांतील इस्माइल (बोहरी) मुसलमानांचे मुख्य धर्मगुरु. सर्व बोहरी लोकांच्या उत्पन्नांतील कांहीं ठराविक भाग यांना मिळत असतो. ब्रिटिशांना सर्वबाजूंनीं मदत करून हिंदुस्थानांतील मुसलमानांचे सदैव हित पाहणारे म्हणून हे प्रसिद्ध आहेत. यांचे धर्मानुयायी हिंदुस्थानांत व पूर्व आफ्रिकेंत आहेत. यांना ब्रिटिश सरकारनें अकरा तोफांचा मान दिला असून हिज हायनेस ही सन्मानाची पदवी दिलेली आहे. जगांतील अत्यंत श्रीमान् गृहस्थांत त्यांची गणना होत असून त्यांच्या रेसच्या नादामुळें ते जगप्रसिद्ध आहेत. पूर्ण नांव आगा सुलतान महंमदशहा. खिलाफतची चळवळ यांनींच चालू केली. इराणच्या राजघराण्याशीं यांचा संबंध आहे.

आजगांवकर, जनार्दन रघुनाथ (१८७९–):—



ज. र. आजगांवकर

महाराष्ट्रीय लेखक. यांचा जन्म १६ ऑगस्ट १८७९ रोजीं वऱ्हाड गांवीं झाला. शिक्षण मराठी सातवी व इंग्रजी चौथीपर्यंत. पण पुढें मराठी व इंग्रजी या भाषांचा चांगला अभ्यास केला. सॉलिसिटरचे ऑफिस, टांकसाळ, वृत्तपत्राचा संपादक इ. ठिकाणीं नोकरी केली. मराठी वाङ्मयांत, पांगारकरांच्याबरोबर, संतवाङ्मयाचा अभ्यासू म्हणून त्यांचें नांव घ्यावें लागेल. भक्तियुक्त व रसाळ भाषा हे त्यांच्या लेखनाचें वैशिष्ठ्य आहे. यांनीं कविचरित्राचे अकरा भाग, नेपाळवर्णन, प्रणयानंद (नाटक), भरतपूरचा वेढा, इत्यादि सुमारें ३०–३५ पुस्तकें लिहिलीं आहेत. याशिवाय कित्येक वृत्तपत्रांतून निरनिराळ्या विषयावर लेख लिहिले आहेत.

आपटे, नारायण हरी (१८८९–):–कादंबरीकार. सातारा जिल्ह्यांतील समडोळी गांवीं १८८९ मध्यें यांचा जन्म झाला. समडोळी व सातारा या गांवीं अनुक्रमें मराठी चार व इंग्रजी चार इयत्तांपर्यंत शिक्षण झालें. १९०४ मध्यें हे घरून पळून गेले. वर्षभर हिंदुस्थानांत पायीं हिंडत होते. यांनीं जयपुरला १९०५–११ पावेतों वास्तव्य केलें. यांचीं १९०६ त करमणूक पत्रांत पहिली गोष्ट प्रसिद्ध झाली. १९०९ त यांनीं 'अजिंक्य तारा' ही कादंबरी लिहिली. या कादंबरीनंतर आतांपर्यंत ३०–४० पुस्तकें लिहिली आहेत. या शिवाय कांहीं वर्षें ते स्वतःचें 'मधुकर' हें मासिक काढीत असत. या मासिकापूर्वीं हे किर्लोस्करचें सहसंपादक पुष्कळ वर्षें होतेच. यांच्या पुस्तकांत 'बनारसी बोरें' व 'आराम विराम' हे दोन कथासंग्रह; तसेंच कादंबऱ्यांत–सुखाचा मूलमंत्र, वैभवाच्या कोंदणांत, भाग्यश्री, याला कारण शिक्षण, पहाटेपूर्वींचा काळोख, दिवाकर दृष्टि, भुरळ, रत्नगुंफा, लांछित चंद्रमा, रजपुतांचा भीष्म व मानवी आशा विरुद्ध

दैवी इच्छा या; आणि गृहसौख्य व अमेरिकेचा दोन भागांतील इतिहास हीं ललितेतर वाङ्मयविषय पुस्तकें महत्त्वाचीं आहेत.

यांचें लेखन हेतुप्रधान असून ते वाचकांना वृत्तांत सांगत सांगतच बोध करण्याचा प्रयत्न करतात. तात्पर्यदर्शन व तत्त्व विशद करण्यासाठीं जाणून-बुजून केलेली कृत्रिम कथानकाची रचना हे प्रमुख दोष कलेच्या दृष्टीनें यांच्या कादंबऱ्यांत दिसून येतात. यांची भाषा कळकळीची, साधी, प्रसन्न व मधुर आहे.

आपटे, वासुदेव गोविंद (१८७१–१९३०):— आनंदाचे जनक व संपादक; कोशकार व टीकाकार; व बालवाङ्मयाचे निर्माते या नात्यानें त्यांचा परिचय आहे. यांचा जन्म अमळनेरजवळील धरणगांवीं १८७१ मध्यें झाला. दुय्यम शिक्षण धुळ्यास व उच्च शिक्षण इंदूर व नागपूर या दोन ठिकाणीं पुरें झालें. १८९३ त यांना कलकत्ता विश्वविद्यालयाची बी. ए. ची पदवी मिळाली.

यानंतर त्यांनीं जन्मभर ज्ञानदानाचें कार्य केलें. ज्ञानदानाचे दोन मार्ग. एक प्रत्यक्ष शिक्षण देणें व दुसरा ग्रंथलेखन करणें. दोन्हीं प्रकारांनीं त्यांच्याकडून महाराष्ट्रानें काम करून घेतलें. १९१० पर्यंत त्यांनीं पुणें, इंदूर, प्रयाग या ठिकाणीं शिक्षण देण्याचें कार्य केलें.

तसेंच वेगवेगळ्या कारणांनीं त्यांचा मॉडर्न रिव्ह्यू, ज्ञानप्रकाश व मल्हारी मार्तंड व विचारसाधन या नियतकालिकांशीं कमी जास्त कालपर्यंत संबंध आला. या मुदतींत त्यांनीं आपली कामगिरी उत्तमपणें पार पाडली.

बालबोध मासिकाचे कर्ते कै. विनायक कोंडदेव ओक यांच्याशी त्यांचा मतभेद झाल्यामुळें आपल्या कल्पनेला प्रगट स्वरूप देण्याकरितां त्यांनीं १९०६मध्यें ' आनंद ' मासिक सुरू केलें.

वासुदेवरावांनीं लहान मोठीं ४७-४८ पुस्तकें लिहिलीं. त्यांत लेखनकला, शब्दरत्नाकर, बंकिमचंद्राचे चार खंड, सांप्रदाय व म्हणी, अशोकचरित्र हीं प्रमुख होत.

त्यांच्या कांहीं पुस्तकांवरून त्यांचें, रूपांतरांचें कौशल्य, मराठी भाषेवरचें प्रभुत्व, चिकाटी, कळकळ, परिश्रम सातत्य, विद्वत्ता, सुबोधता वगैरे गुण दिसून येतात. यांचें नांव सुपरिचित होण्यास त्यांच्या प्रौढ ग्रंथांप्रमाणेंच त्यांचें बालवाङ्मयहि कारणीभूत झालें. हे १९३० सालीं मरण पावले.

आपटे, हरि नारायण (१८६४–१९१९):—महाराष्ट्राचे श्रेष्ठ कादंबरीकार. याचा जन्म खानदेशांतील पारोळे गांवीं दीनांक ८ मार्च १८६४ रोजीं झाला. त्यांच्या वयाच्या चौथ्या वर्षीच त्यांची आई वारली. पुढें त्यांचे चुलते व चुलती यांनींच त्यांना आपल्या घरीं ठेवून प्रेमानें संभाळले व शिक्षण दिलें. त्यांच्या चुलतीनें त्यांना पुत्रवत् संभाळले, पण मुंजीच्या वेळीं त्याहि निवर्तल्या. त्यांचें लहानपण मुंबईस गेलें. पुढें ते चुलत्याबरोबर पुण्यास आले (वयाच्या १४ व्या वर्षी) व न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रिक झाले. नंतर डेक्कन कॉलेज व फर्ग्युसन कॉलेज यांत ते पांच वर्षें होते पण त्यांचे कांहीं विषय कच्चे असल्यामुळें त्यांना बी. ए. ची डिग्री मिळवितां आली नाहीं. मात्र संस्कृतचा अभ्यास घरीं शास्त्री ठेवून त्यांच्या चुलत्यांनीं त्यांच्याकडून करून घेतला. शिवाय हरीभाऊंना वाचनाची विलक्षण आवड असल्यामुळें त्यांनीं फ्रेंच व जर्मन भाषांचा अभ्यास करून त्या वाङ्मयांतील बरीच पुस्तकें वाचून काढली. त्यांच्या पहिल्या लग्नापासून त्यांना तीन मुलें झाली पण तारुण्यांतच तिन्हीं मुलें व पत्नी वारली. नंतर त्यांनीं दुसरें लग्न केलें. दुसऱ्या लग्नापासून त्यांना ' ताई ' नांवाची मुलगी झाली पण जन्मापासूनच ती रोगी होती आणि तीहि लौकरच गेली. वडिलांच्या जुन्या विचारामुळें व चुलत्यांच्या कांहींतरी धनोत्पादक धंदा त्यांनीं करावा या इच्छेमुळें त्या दोघांपासूनहि त्यांना विशेष सुख मिळालें नाहीं. त्यांची सांपत्तिक स्थिति कधींच चांगली नव्हतीं आणि अखेरच्या कालांत तर त्यांना बंगालमधील एका रेल्वे कंपनीचे शेअर्स खपविण्याचा उद्योग करावा लागला. या उद्योगांतच त्यांना अतिशय दगदग पडून कलकत्याहून येतांना वाटेवर असतांनाच ते आजारी पडले (जलोदरानें) व पुण्याला ३ मार्च १९१९ ला सकाळीं परत आले आणि त्याच दिवशीं संध्याकाळीं त्यांची इहलोकची यात्रा संपली. मराठी वाङ्मयांत हे ' हरीभाऊ आपटे ' या नांवानें प्रसिद्ध आहेत.

'आजकालच्या गोष्टी–मधली स्थिति' ही हरीभाऊ आपट्यांची पहिली कादंबरी त्यांनीं कॉलेजमध्यें असतांना लिहिली व १८८५ मध्यें ती 'पुणें वैभव' या साप्ताहिकांत प्रसिद्ध झाली; व वज्राघात ही त्यांची शेवटची कादंबरी १९१५ सालीं पूर्ण झाली. त्यांच्या वाङ्मयाचे कादंबऱ्या, नाटकें, निबंध, टीका व स्फुटगोष्टी असे पांच विभाग करतां येतील. त्यांच्या कादंबऱ्यापैकीं मधली स्थिती या कादंबरी शिवाय सर्व कादंबऱ्या 'करमणूक' या त्यांनींच (रा. गोविंदराव डुकले. मालक मे. बाबाजी सखाराम, यांच्या सहाय्यानें) १८९० सालीं मुंबईस सुरू केलेल्या साप्ताहिकांतून क्रमशः प्रसिद्ध झाल्या. त्यांनीं एकूण अठरा कादंबऱ्या लिहिल्या. त्यापैकीं दहा सामाजिक व आठ ऐतिहासिक आहेत. सामाजिक कादंबऱ्यापैकीं १ पण लक्षांत कोण घेतो, २ जग हें असें आहे, ३ यशवंतराव खरे, ४ मी व ५ भयंकर दिव्य या विशेष प्रख्यात आहेत. ऐतिहासिक कादंबऱ्या पैकीं १ उषःकाल, २ केवळ स्वराज्यासाठीं, ३ गड आला पण सिंह गेला, ४ रुपनगरची राजकन्या व ५ सूर्योदय या विशेष प्रख्यात आहेत. त्यांचे इतर वाङ्मय १ नाटकें— संत सखूबाई व संगीत पिंगला. २ स्फुट गोष्टी भाग १, २, ३ व ४. ३ हरीभाऊंची पत्रें. ४ मराठी वाङ्मयाचा अभ्यास निबंध, ५ विकार–विलसित या आगरकरांच्या नाटकावरील टीका. त्यांनीं करमणूक प्रमाणें मनोरंजनांतहि लिखाण केलें. शिक्षणाचा मुख्य उद्देश दृष्टीसमोर ठेवून आपलें लिखाण मनोरंजक व प्रतिष्ठित करणें हें हरीभाऊंचें ध्येय होते, आणि या त्यांच्या ध्येयप्रवृत्तीमुळें त्यांनीं आपल्या गोष्टींतून व सामाजिक कादंबऱ्यांतून समाजांत रुजलेल्या अनेक अन्यायाविरुद्ध मऊ पण परिणामकारक शब्दांनीं कडक टीका केली व कोणत्या सुधारणा हव्यात हें दाखवून दिलें. त्यावेळच्या समाजांत धार्मिक, सामाजिक व राजकीय बाबतींत ज्या कल्पना व भावना उफाळलेल्या होत्या त्याचें यथार्थ प्रतिबिंब त्यांच्या-कादंबऱ्यांत पहावयास सांपडतें. हरीभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्या "कौटुंबिक स्वरुपाच्या आहेत. त्यांतून मध्यम वर्गांतील, हिंदू, विशेषतः ब्राह्मण, कुटुंबांचें आणि त्यांनीं बनलेल्या समाजाचें प्रामुख्यानें (महाराष्ट्रीय) वर्णन आहे." ऐतिहासिक कादंबऱ्याहि अत्यंत सफाईनें त्यांनीं लिहिलेल्या आहेत. पूर्वकालच्या कल्पना, राहाणी व विचार यांचें उत्कृष्ट व चटकदार वर्णन त्यांतून आढळतें. "हरीभाऊंच्या बहुतेक कादंबऱ्यांची रचना, त्या प्रथम साप्ताहिकांतून खंडशः प्रसिद्ध झाल्यामुळें असो किंवा लेखकाच्या लेखन–वैगुण्यामुळें असो, कांहींशीं पाल्हाळिक विस्कळित झाली आहे." हरीभाऊ पूर्ण कादंबरी कधीं लिहून ठेवीत नसत. करमणुकीचा अंक प्रसिद्ध होण्याचा दिवस आला म्हणजे त्या आधीं १–२ दिवस त्यांनीं कादंबरीचें प्रकरण लिहावयास घ्यावयाचें असा त्यांचा प्रघात होता.

"हरीभाऊंची भाषा सामान्यतः साधी, सुबोध, प्रसन्न आणि प्रवाही आहे, परंतु विषयाच्या किंवा प्रसंगाच्या अनुरोधानें ती ओजस्वी, प्रौढ, लालित्यपूर्ण, विनोदी, खोंचदार स्वरूपहि धारण करिते. प्रसाद आणि माधुर्य हे तिचे मुख्य गुण आहेत. शब्दालंकाराची हरिभाऊंना आवड नाही, आणि उपमादि अर्थालंकारहि ते फारसे योजीत नाहींत. त्यांची वर्णनें अकृत्रीम, स्वाभाविक आणि यथातथ्य असल्यामुळें मनोहर होतात. विशेषतः स्त्रियांच्या तोंडची भाषा अत्यंत समर्पक व त्यांच्या स्वभावाला योग्य अशी असते."

या वाङ्मयीन कार्याशिवाय पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष म्हणूनहि त्यांनीं काम केलें आहे. मुंबई विश्वविद्यालयाची त्यांना बी. ए. ची परीक्षा पास होतां आली नाहीं पण त्यांना त्याच विश्वविद्यालयाच्या एम्. ए. च्या परीक्षकाचा मान मिळाला. या शिवाय १९१५ मध्यें Marathi, its Sources and Development या विषयावर मुंबई युनिव्हर्सिटींत सहा व्याख्यानेंहि त्यांनीं दिली होतीं.

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणेचा इतिहास लिहितांना हरीभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्या व त्यांनीं केलेलें कार्य याबद्दल इतिहासकाराला आदरानें लिहावेच लागेल. आणि मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनें तर त्यांचें वाङ्मय अमर होऊन राहिलें आहे असेंच म्हणावें लागेल.

✓ **आंबेडकर, डॉ. भीमराव रामजी** PH. D., D. Sc., Bar-at-Law (१८९३ —):– अस्पृश्यांचे कैवारी, एक कायदे पंडित व राजकारणी

सातारा व मुंबईस शिक्षण घेऊन यांनीं बी. ए. ची पदवी मिळविली नंतर यांनीं गायकवाड सरकारची शिष्यवृत्ती घेऊन उच्च शिक्षणासाठीं परदेशला प्रयाण केलें. परीक्षा आटोपल्यावर एक वर्ष त्यांनीं संशोधन केलें. हें संशोधन करण्यास त्यांनीं इंडिया ऑफिस लॅयब्ररीचा उपयोग करून घेतला. पुढें १९१७ मध्यें ते हिंदुस्थानांत परत आले. यांनीं कर व्यवस्था व जाती-संस्था यांवर ग्रंथरचना केली आहे. डिप्रेस्ड क्लासेस इन्स्टीट्यूटचे स्थापना केली. हरिजनांच्या उद्धारासाठीं चालू असलेल्या चळवळींत हे मोठ्या धडाडीनें भाग घेत असतात. मुंबईच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सरकार नियुक्त सभासद १९३०–३२ च्या रा. टे. कॉ. ला अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून विलायतेला प्रयाण. तसेंच हें १९३२ मधल्या जॉइंट पार्लमेंटरी कमिटीचे सभासद होते. दलित वर्गाच्या सामाजिक छळामुळें आपण धर्मांतर करणार आहोंत अशी प्रक्षोभकारक घोषणा करून (१९३२) त्यांनीं हिंदू समाजांत अत्यंत खळबळ उडवून दिली. १९३७ च्या निवडणुकींत ते मुंबई विधिमंडळाचें सभासद म्हणून निवडून आले आहेत.

आयर्लंड:—'एमेरल्ड आईल' (हिरवें बेट) या काव्यमय नांवानें प्रसिद्ध असलेलें हे चिमुकलें बेट अटलांटिक महासागरांत आहे. ग्रेट ब्रिटन व आयर्लंड यांच्या मध्यें आयरिश समुद्र असून आयर्लंडच्या बाकीच्या तिन्हीं बाजूंना अटलांटिक महासागर आहे. याचें क्षेत्रफळ ३२,५८६ चौरस मैल आहे. किनाऱ्यावर बरींच नैसर्गिक बंदरें आहेत. पश्चिम किनाऱ्याबाहेर लहान मोठी पुष्कळ बेटें आहेत. त्या सर्वांत ऑचिल हे मोठें आहे. किनाऱ्यापासून जवळच डोंगर असून आंतील भाग सपाट मैदानासारखा आहे. पुष्कळसा भाग दलदलीचा आहे. आयर्लंडची भूमि सुजला आहे. पुष्फळ नद्या असून देशांतील सर्व भागाला त्यांचा फायदा मिळतो. शॅनॉन ही पश्चिम भागांतील नदी आयर्लंडमधील सर्वांत मोठी नदी होय. या नदींतून २४० मैलपर्यंत जलमार्ग आहे. याशिवाय बँडान, ली, ब्लॅकवॉटर, बॅरो इत्यादि नद्या महत्त्वाच्या आहेत. या नद्या दक्षिणेकडील बाजूस समुद्राला मिळतात. सरोवरेंहि अनेक आहेत.

नीथ हें केवळ आयर्लंडांतीलच नव्हे तर साऱ्या ब्रिटिश बेटांतील सर्वांत मोठें सरोवर आहे. तें देशाच्या ईशान्य भागांत असून त्याचें क्षेत्रफळ १५८ चौरस मैल आहे. किलार्नीची सरोवरें नैऋत्येकडील निसर्ग-रम्य प्रदेशांत आहेत. आयर्लंडची हवा ब्रिटनमधील पुष्कळशा भागाच्या हवेपेक्षां अधिक दमट, सौम्य व सम आहे.

लोक, भाषा व वाङ्मय:——आयर्लंडमधील बहुसंख्यांक रहिवाशी प्राचीन केल्ट लोकांचे वंशज आहेत. रोमन लोकांनीं ग्रेट ब्रिटन जिंकलें त्यावेळीं केल्ट लोकांनीं आयर्लंडमध्यें वस्ती केली. आयर्लंडच्या रहिवाशांना आयरिश म्हणतात. त्यांची भाषा केल्टिक भाषेचीच एक शाखा आहे. हीच भाषा सामान्यतः खेडोपाडीं बोलली जाते. इंग्लिश ही दरबारी भाषा असून शहरांतून प्रामुख्यानें बोलली जाते. पुष्कळांना इंग्रजी समजते. आयरिश लोक उद्योगी, विनोदी व ममताळू आहेत. हजारों आयरिश लोक परदेशीं रहावयास गेले आहेत; विशेषतः अमेरिकेतील संयुक्त संस्थानांत त्यांची वस्ती असून त्यांना नागरिकत्वाचें हक्क मिळाले आहेत. आयर्लंडची लोकसंख्या ४,३००,००० आहे. सुमारें शंभर वर्षांपूर्वी या देशाची लोकसंख्या ८,१९६,००० होती परंतु १८४५ सालीं पडलेल्या भयंकर दुष्काळांत हजारों लोक मृत्युमुखीं पडले; कित्येक देशोधडीला लागले. या पुढेंहि अनिश्चित राजकीय परिस्थिती व दारिद्र्य यांच्या पायीं हजारोंनीं देशत्याग केला. यामुळें लोकसंख्या कमी झाली आहे.

आयरिश भाषा ही केल्टिक गटांतील भाषांच्या गॅलिक शाखेची आहे. हिच्यांत भाषेंत पुष्कळ साम्य आहे. आयरिश वाङ्मय विविध व अफाट आहे. यांत इतिहास, दंतकथा, बखरी, पौराणिक कथा, भावगीतें, उपहासात्मक लेख, सत्पुरुषांचीं चरित्रें, कायदा, व्याकरण व इतर शास्त्रावरील ग्रंथ यांचा समावेश होतो. यांतील कांहीं इसवीसनाच्या पांचव्या शतकांत झालेलें आहेत. आयरिश भाषेंत सतराव्या शतकानंतर नांव घेण्यासारखें गद्यवाङ्मय निर्माण झालेंच नाहीं म्हटलें तरी चालेल; परंतु त्या भाषेंत काव्यरचना पुष्कळ झाली आहे व होत आहे. एकुणीसाव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं आयरिश वाङ्मयांत एक नवा प्रवाह सुरू झाला. राष्ट्रांत राष्ट्रीयभावना उदय पावून स्वराज्याची कल्पना

वाढीस लागली. राष्ट्राच्या या राजकीय आकांक्षांचा आविष्कार वाङ्मयाचे द्वारें होणें साहजिकच होते. आयरिश राष्ट्राच्या अशा आकांक्षाचें प्रगटीकरण करणारा नवीनच सांप्रदाय वाङ्मयांत सुरूं झाला. या सांप्रदायांत विल्यम बटलर यीट्स्, लेडी ग्रेगरे व जॉन एम् सिंज् हे साहित्यिक आघाडीला आहेत यांचें बहुतेक वाङ्मय इंग्रजींत असून थोडेसे गॅलिकमध्येंहि आहे.

शेतकी—आयर्लंडची भूमि सुजला व सुफला आहे. देश शेतीप्रधान आहे. सुमारें १२०००००० एकर जमीन लागवडीखालीं असून ८००० एकर जमीनींत ताग पेरण्यांत येतो. बटाटा हें आयरिश लोकांचें मुख्य अन्न. ओट, बार्ली (यव), टर्निप (सलगम) व भाजीपाला होतो. विस्तीर्ण कुरणें राखण्यांत आलीं असून मेंढ्या, गाई व म्हशी हे मुख्य प्राणी आहेत. चांगल्या जातीच्या घोड्याचीहि निपज होते.

खनिजसंपत्ति व उद्योगधंदे— कांहीं भागांत विशेषतः नैर्ऋत्येकडील भागांत कोळशाच्या खाणी आहेत, पण कोळसा हलक्या दर्जाचा असतो. याशिवाय चुनखडी, वाळूचे खडक, खडू, चिकणमाती वगैरे पदार्थ सांपडतात. मासे धरण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. उत्तर आयर्लंडांतील अल्स्टर हा प्रांत उद्योगधंद्याच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. उंची तागाचें कापड तयार करणें हा मुख्य धंदा आहे. लोकरीचें कापडहि निर्माण होतें. बेलफास्ट हे तागाच्या कापडाचें व जहाजें तयार करण्याचें केंद्र आहे. याशिवाय दारू गाळणें, फीत तयार करणें हेहि धंदे चालतात. आयर्लंडचा परदेशाशीं मोठा व्यापार चालतो. बेलफास्ट, डब्लिन, वॉटरफोर्ड, कॉर्क, क्वीन्स टाऊन ही मोठीं बंदरें आहेत गुरेढोरें, तागाचें कापड, दारू, मांस, दुधाचे पदार्थ हे पदार्थ इंग्लंडला मोठ्या प्रमाणांत पाठविण्यांत येतात.

राज्यव्यवस्था—आयर्लंडचे दक्षिणेकडील आयर्लंड व उत्तरेकडील आयर्लंड असें दोन मुख्य भाग आहेत. दक्षिणेकडील भागाला आयरिश फ्रीस्टेट म्हणतात. आयरिश फ्रीस्टेटचे क्षेत्रफळ २६,६०० चौरस मैल असून लोकसंख्या ३०००००० आहे. आयरिश फ्रीस्टेट १९२२ सालीं पास झालेल्या पार्लमेंटच्या कायद्यानें निर्माण झालें. विल्यम टी. कॉसग्रेव्ह हा १९२३पासून १९३२ पर्यंत फ्रीस्टेटचा अध्यक्ष होता. १९२२ च्या कायद्यानें दक्षिण आयर्लंडला वसाहतीचा दर्जा देण्यांत आला. डी व्हॅलेरानें या योजनेला विरोध केला. परंतु १९३२ च्या निवडणुकींत डी व्हलेराचा पक्ष विजयी झाला. व डी व्हलेरा अध्यक्ष झाला. इग्लंडच्या राजाशीं एकनिष्ठ राहण्याची जी शपथ आयरिश विधिमंडळाच्या सभासदांना घ्यावी लागत असें ती रद्द करण्यांत आली. गव्हर्नर जनरलचे कार्यक्षेत्र संकुचित करण्यांत आलें. १९३७सालीं डी व्हलेरानें आपल्या देशबांधवापुढें एक नवीन राज्यघटना ठेवली. ही घटना सार्वत्रिक मत नोंदणीं करून संमत करून घेण्यांत आली. ती १९३७ सालींच अमलांत आली. या घटनेंतील मुख्य बाबी देशाचे नांव आयर (Eire) हे राहील. इंग्लिश व आयरिश या दरबारी भाषा राहतील. दक्षिण व उत्तर आयर्लंड मिळून सर्व आयर्लंड या राष्ट्रांत मोडतो. परंतु उत्तरेकडील सहा परगणें (अल्स्टर) हे आयरपासून विभक्त असेतोंपर्यंत आयरिश फ्रीस्टेटनें केलेले कायदे फक्त आयर पुरतेच लागू होतील. आयरिश राष्ट्राला स्वतःची राज्यसंस्था कशी असावी हें ठरविण्याचा व परराष्ट्राशीं संबंध कसे असावेत हें ठरविण्याचा अधिकार आहे. आयर्लंड हे स्वतंत्र, लोकसत्ताक राज्य आहे. हिरवा, पांढरा व नारिंगी हे तीन रंग असलेला ध्वज राष्ट्रध्वज म्हणून स्वीकारण्यांत आला आहे; त्यांत युनियन जॅकचा निर्देश नाहीं. घटनेंत राजाचा उल्लेख नाहीं. गव्हर्नर जनरलला स्थान नाहीं. लोकनियुक्त अध्यक्ष हाच राज्याचा प्रमुख. अध्यक्षाची निवडणूक सात वर्षांनीं होतें.

उत्तर आयर्लंड ग्रेटब्रिटनचाच भाग असून त्याला काहींशीं स्वायत्तता देण्यांत आली आहे.

इतिहासः—इ. सनानंतर आठव्या शतकांत स्कॅन्डेनेव्हियन चाच्यांचे आयरवर फार हल्ले होत असत. शेवटीं आयरिश पुढारी ब्रियान बोरू यानें १०१४ मध्यें चाच्यांचा पूर्ण पराभव केला. या पूर्वी आयर्लंड हें खिश्चनधर्माचे व विद्येचें एक महत्त्वाचें ठिकाण होतें.

दुसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दींत इंग्लंड–आयर्लंडचे घनिष्ट संबंध जडले. पुढें आठव्या हेन्रीनें आपल्याला आयर्लंडचा राजा ही पदवी घेतली. याच्या कारकीर्दींत मूळ आयरिश लोकांच्याकडून जबरीनें जमिनी बळकावून इंग्लिश वसाहतवाल्यांना देण्यांत

आल्या. आणि याचमुळें एक जमिनदार व नोकर असा वर्ग कायमचा निर्माण झाला. पुढें धार्मिक सुधारणांच्या काळांत प्रोटेस्टंट इंग्रज व रोमन कॅथॉलिक आयरिश यांचें संबंध आणखी दुरावालें. एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत तर या दुरावलेल्या संबंधांना तीव्रतम स्वरूप प्राप्त झालें व त्यामुळें इंग्लिश व आयरिश लोकांमध्यें आयर्लंडमध्यें वारंवार लढाया झाल्या व इंग्लिशांचें प्रभुत्व कायम राहिलें. १७ व्या शतकांत पहिल्या जेम्सनें स्कॉटिश लोकांच्या वसाहती अल्स्टर या प्रांतांत करवल्या. यामुळें चिडून आयरिश लोकांनी मोठें बंड केलें पण १६४२ मध्यें आयरिश लोकांच्या अनेक कत्तली झाल्या व क्रॉमवेलच्या कारकीर्दींत हें बंड पार खुडून टाकलें गेलें.

१७५० नंतर रोमन कॅथॉलिक लोकांच्या विरुद्ध असलेल्या कायद्यांचा कडकपणा कमी झाला. १७८२ मध्यें आयर्लंडला स्वतंत्र विधीमंडळाचे अधिकार दिलें गेलें. परंतु मताचा व निवडून येण्याचा अधिकार फक्त प्रॉटेस्टंट लोकानांच दिला होता. १७९८ मध्यें इंग्लंडचें फ्रान्सशीं युद्ध चालू असतां आयर्लंडमध्यें बंड झालें. पण तेहि मोडलें गेलें. इ. स. १८०० मध्यें आयर्लंडचें पार्लमेंट बंद होऊन तें ग्रेट ब्रिटनच्या पार्लमेंटमध्येंच सामील झालें. परंतु १८२९ पर्यंत रोमन कॅथॉलिक लोकांना निवडून येण्याचा व मतदानाचा अधिकार मिळाला नाहीं. १८४५ मध्यें आयर्लंडमध्यें बटाट्यांचा दुष्काळ पडून हजारों लोक मृत्युमुखीं पडले व कित्येक परदेशीं निघून गेलें. यामुळें आयर्लंडची लोकसंख्या निम्मी झाली. यानंतर ब्रिटिश राज्याविरुद्ध सारख्या चळवळी चालू झाल्या. व्हाइटबॉय, फेनियन्स हे या चळवळींचें जनक होत. राष्ट्रीय पक्ष (Nationalist) स्थापन होऊन त्या तर्फे पार्लमेंटच्या निवडणुकी लढविल्या गेल्या. ग्लॅडस्टननें तीन वेळा आयर्लंडला समानदर्जाचें स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न केला. पण ते सर्व प्रयत्न फसलें.

१९१४ मध्यें आयर्लंडची स्वराज्याची मागणी (Home Rule) मान्य झाली. पण महायुद्धाच्या सुरवातीमुळें प्रत्यक्ष अंमलबजावणी लगेच झाली नाहीं. यानंतर सिनफेन चळवळीला सुरवात झाली. ही चळवळ करणाऱ्यांनीं इंग्लंडशीं सर्व संबंध तोडण्याचें धोरण पत्करलें. डिसेंबर १९२१ मध्यें इंग्लंड–आयर्लंड तह होऊन 'आयरिश रिपब्लिक' मान्य करण्यांत आलें. या पुढचा इतिहास वर आलाच आहे. या शिवाय डी व्हॅलेराचें चरित्र पाहा.

ऑक्सिजनः—' प्राणवायु ' पाहा.

ऑस्ट्रेलियाः–जगांतील सर्वांत मोठें बेट. हें बेट इतकें विस्तीर्ण आहे कीं त्याला स्वतंत्र खंड म्हणून मानण्यांत येतें. ऑस्ट्रेलिया व टॅस्मानिया मिळून ब्रिटिश साम्राज्यांतर्गत एक स्वयंशासित राष्ट्र आहे. या राष्ट्राला ऑस्ट्रेलियाचे स्वयंशासित राष्ट्र म्हणतात. याचें क्षेत्रफळ २,९७४४,००० चौरस मैल असून लोकसंख्या ६८००,००० आहे. येथील रहिवाशामध्यें मुख्यतः भरणा ब्रिटिशांचा आहे. लोकवस्ती अत्यंत विरळ आहे. इतकीं कीं एक चौरस मैलांत २·०५ वस्ती पडते. पूर्व व आग्नेय किनाऱ्यावर विशेष दाट वस्ती आहे. ब्रिसबेन्, सिड्ने, मेलबोर्न व ॲडलेड् ही मोठी शहरें याच भागांत आहेत. ऑस्ट्रेलियांतील मूळ रहिवासी अगदीं रानटी स्थितींत आहेत. यांचे अफ्रिकेंतील नीग्रो लोकांशीं सादृश्य आहे. पण हे निग्रो इतके बुद्धिवान् नाहींत. त्यांची उंची सामान्य असून वर्ण काळा आहे. ते इतके रानटी आहेत कीं ते आजही नग्नावस्थेंतच वावरतात. त्यांची संख्या एकसारखी घटत आहे.

हवा व खनिज संपत्ति— हवा सामान्यतः उष्ण व कोरडी तथापि निरोगी आहे. विषुववृत्ताकडील भागांत विपुल पाऊस पडतो. समुद्रकांठच्या प्रदेशाची हवा बरीच दमट आहे; परंतु मध्यभागीं कमालीची उष्णता असून अवर्षणही पडते. खनिज संपत्तींत सोन्याचा क्रम वर लागतो. या देशाच्या पूर्वभागांत सोन्याच्या खाणीं आहेत. या शिवाय, लोखंड, दगडी कोळसा, रुपें, तांबें, सुरम्याची धातु, बिस्मथ (एक प्रकारची ठिसूळ धातु), मंगल (मॅंग्यानिझ), प्लॅटिनम हें सांपडतात. कांहीं भागांत हिरे व इतर जवाहिरें आढळतात. चांगल्या प्रकारचे इमारतीचे दगड व विटा व कौलें करण्याकरितां चिकणमाती सांपडते.

पिकें:— गहू, मक्का, ओट्स, फळफळावळ, बार्ली, ऊंस, बटाटें, द्राक्षें इत्यादि पिकें मुख्य असून तांदूळ, ताग, तंबाखू, कापूस हीं इतर पिकें होतात. आस्ट्रे-

लियांत मोठमोठीं कुरणें आहेत. त्यामुळें तेथें मेंढ्या पाळण्याचा धंदा चालतो. आस्ट्रेलिया हा जगांतील सर्वांत मोठ्या प्रमाणांत लोकर उत्पन्न करणारा देश आहे.

या देशांत जहाजें जाण्यासारख्या नद्या नाहींत. अंतर्गत दळणवळण रेल्वे व गाड्या यांनीं होतें. सुमारें २८,४४० मैल रेल्वेरस्ता आहे.

राज्यव्यवस्थाः—राज्यघटना संयुक्त संस्थानांच्या राज्यघटने सारखी संयुक्त आहे. या देशावर ग्रेट ब्रिटनचें अधिराज्य आहे; पण अंतर्गत स्वायत्तता राखण्यांत आली आहे. आस्ट्रेलियाला वासाहातिक स्वराज्य देण्यांत आलें आहे. गव्हर्नर जनरलची नेमणूक इग्लंडच्या राजाकडून होते. आस्ट्रेलियाचें एक पार्लमेंट असून त्याला कायदे करण्याची सत्ता आहे. या पार्लमेंटच्या सीनेट व हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हस् अशा दोन शाखा आहेत दोन्हीं सभांच्या सभासदांची निवडणूक संयुक्त घटनेंतील निरनिराळ्या संस्थानांतील लोकांकडून होतें. सीनेटसंची निवडणूक सहा वर्षांपुरती व रिप्रेझेंटेटिव्हजची तीन वर्षांपुरती होतें. सुरवातीस प्रत्येक संस्थानातर्फे सहा सभासद सीनेटमध्यें पाठवावयाचे असत व प्रती तीन वर्षांनीं निम्मे सभासद निवृत्त व्हावयाचे असा निर्बंध घालण्यांत आला होता. निवृत्त झालेल्या सभासदांना पुनः निवडणूकीस उभे राहण्याची मुभा आहे. हॉऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजमध्यें सीनेटमधील सभासदांच्या दुप्पट सभासद असावयाचे आहेत.

मंत्रीमंडळाची निवड पार्लमेंटच्या सभासदांमधून होते. या बाबतींत संयुक्त संस्थानांचे कार्यकारी सरकार व आस्ट्रेलियाचे कार्यकारी सरकार यांत फरक आहे.

ऑस्ट्रेलियांत सहा संस्थानें असून प्रत्येकाचे स्वतंत्र विधिमंडळ आहे.

इतिहास—१६८५ मध्यें वुइल्यम डॅम्पीयर हा आस्ट्रेलियांत येऊन गेला. नंतर १७८८ मध्यें इंग्लिश लोकांची वसाहत करण्यासाठीं पहिली टोळी दाखल झाली. ही वसाहत आरंभीं सिडने येथें झाली. व हळू हळू पाय पसरून सबंध खंड इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतलें. १७९० च्या सुमारास अनेक लोक वसाहतीसाठीं येथें आले. व त्यांनीं किनाऱ्यावर वसाहती केल्या. १८५१ मध्यें व्हिक्टोरिया या संस्थानांत सोन्याच्या खाणीं सांपडल्यामुळें वसाहतीसाठीं पुष्कळ लोक येऊं लागले.

इंग्लंड—'ग्रेटब्रिटन' पाहा.

इटलीः—एके काळीं अविनाशी समजल्या जाणाऱ्या 'रोमन साम्राज्या'ची कर्मभूमी व फॅसिझमच्या राजकीय तत्त्वज्ञानाची पहिली प्रयोग भूमी. यूरोपच्या दक्षिणेस मध्यावर भूमध्य समुद्रांत बुटाच्या आकाराप्रमाणें पसरलेलें हें एक द्वीपकल्प आहे. इटलीमध्यें सिसिली व सार्डिनिया ही मोठी बेटें व इतर कांहीं लहान बेटें यांचा समावेश होतो.

निरभ्र आकाश व सृष्टिसौंदर्य या बाबतींत इटली आज कित्येक शतकें प्रख्यात आहे. शिवाय जुनी ऐतिहासिक स्थळें, शिल्पकला, चित्रकला, वैभव, रोमन साम्राज्याच्या आठवणी देणाऱ्या पडक्या इमारती, व रोमन कॅथॉलिक धर्माचें आद्यपीठ म्हणून इटली देश जगप्रसिद्ध आहे.

स्थान, लोक व धर्म-—इटलीच्या उत्तरेस आल्प्स् पर्वताच्या रांगा व स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रिया या देशांच्या सरहद्दी, पूर्वेस ॲड्रियाटिक समुद्र. पश्चिमेस भूमध्य समुद्र व फ्रान्स व दक्षिणेस भूमध्य समुद्र व आफ्रिका ही आहेत. इटलीचें क्षेत्रफळ ११९,७४४ चौ. मैल असून लोकसंख्या ४,११७६,६७१ एवढी लोकसंख्या आहे. या शिवाय जवळ जवळ एक कोट इटालियन लोक सर्व जगभर निरनिराळ्या राष्ट्रांत रहिवाशी म्हणून राहिलेले आहेत. इटली मध्येंच पण इटलीची सत्ता ज्यावर चालत नाहीं अशी व स्वतंत्र अशी व्हॅटिकन सिटी (पोपचें शहर) व सान मारिनो या नांवाची दोन शहरें आहेत. बहुसंख्यांकांचा धर्म रोमन कॅथालिक आहे.

इटलीचे राज्यकारभारासाठीं अनेक प्रांत पाडलें असून त्यांची पूर्वीची नांवेंच कायम राखली आहेत. उदा० पिडमॉंट व लोंबार्डी (उत्तरेस), टस्कनी व उम्ब्रीया (मध्यभागीं), व कॅलेब्रिया व ॲपूलिया (दक्षिणेस). रोम हें राजधानीचें शहर असून नेपल्स, जिनोआ, मिलान व ट्यूरिन ही इतर मोठी शहरें होत.

इटली हा एक डोंगराळ प्रदेश आहे. उत्तरेस आल्प्स पर्वत व मध्यभागीं ॲपेनाइन पर्वताच्या रांगा

आहेत. ऐतिहासिक महत्त्वाच्या टायबर, पो, आर्नो, ॲडिग व पीव्ह या नद्या आहेत पण त्यांची लांबी फार नाहीं. खुद्द इटलीला २००० मैलांचा समुद्र किनारा असून त्या शिवाय १,९४५ मैलांचा इटलीच्या बेटांचा समुद्र किनारा आहे.

उद्योग धंदे, व्यापार, खनिज संपत्ती—इटलींत शेती हाच मुख्य धंदा आहे. सर्व इटलीभर वर्षांतून दोन तीन पिकें निघतात. उत्तरेस असलेले लोंबार्डीचे प्रदेश फार सुपीक आहेत. गहूं हें मुख्य पीक आहे. दक्षिण भागांत गहूं पुष्कळ होतो. या शिवाय भात, मका, ओट, जव (बार्ली), व राय ही धान्यें होतात. तरी पण इटलीच्या लोकसंख्येला पुरेल एवढें धान्य इटपिकत नसल्यामुळें बाहेरून पुष्कळ आणावें लागतें. फळांचें पीक इटलींत मुबलक येतें. नारिंगें, लिंबू, बदाम ही फळें प्रमुख आहेत. शिवाय फ्रान्सच्या खालोखाल दारू तयार करणारें हें राष्ट्र आहे. मासेमारीचा धंदाहि जोरांत चालतो.

जे काय उद्योगधंद्याचे कारखाने आहेत ते बहुतेक उत्तरेंत आहेत. रेशीम, लोंकर, पोंवळी, रत्नें, संगमरवरी दगड हीं विपुल सांपडत असल्यामुळें त्यांचे जिन्नस तयार करण्याचेंच कारखाने विशेष आहेत. इटलींत कोळसा विशेष नाहींच; त्यामुळें लोखंडाचे कारखाने फार कमी आहेत.

खनिज द्रव्यांत लोखंड, शिसें, ॲंटिमनी, सोनें व रुपें यांच्या खाणीं आहेत. गंधक विपुल मिळतो. कॅरारा ॲलाबास्टर या नांवाच्या संगमरवरी दगडांच्या खाणी पुष्कळ आहेत.

इटलीच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्याला लागून रेल्वे पसरली आहे. एकूण सुमारें १५,००० मैल लांबीची रेल्वे आहे. किनारा मोठा असल्यामुळें रेल्वे व समुद्र यांचा वाहतुकीसाठीं फार उपयोग होतो. इटलीची आयात निर्गतीपेक्षां जास्त असून अमेरिका, जर्मनी व इंग्लंड यांच्याशीं मुख्यतः व्यापार आहे.

शिक्षण, भाषा व वाङ्मय:—वयाच्या चौदा वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचें आहे. उत्तरेपेक्षां दक्षिणेकडे, शेतकरी वर्गांत, शिक्षणाचें प्रमाण कमी आहे. एकूण सात विद्यापीठें (युनिव्हर्सिटी) असून त्यांपैकीं बोलोना हें साडेआठशें वर्षांचें जुनें आहे.

आजची इटालियन भाषा लॅटिन भाषेपासून निर्माण झालेली आहे. ग्रंथगत व राजभाषा एकच असली तरी बोलण्यांत निरनिराळ्या बोली आहेत. इटालियन भाषेंत काव्यात्मक शब्दांचें प्रमाण इतर कुठल्याहि जिवंत भाषेपेक्षां जास्त आहे.

चौदावें शतक हें इटलीच्या वाङ्मयाच्या इतिहासांत फार महत्त्वाचें आहे. याच शतकांत आज प्रचलित असलेल्या इटालियन भाषेचा प्रारंभ झाला. डॅन्टे, पेट्रार्क व बोकॅशियो या तीन साहित्य सेवकांनीं आपल्या वाङ्मयानें इटलीला फार महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें. यानंतर सोळाव्या शतकांत टासो व आरिआस्टो हे चमकले. सोळाव्या शतकाच्या अखेरीस युरोपांतील इतर राष्ट्रांनीं वाङ्मयांत पुढाकार घेतला त्यामुळें इटलीचें महत्त्व कमी झालें. अगदीं अलीकडे इतिहासकार फेरेरो व डी. आनुन्झियो या कवीनी चांगलें नांव कमाविलें. इटलीनें, सुनीतें (sonnet) काव्याला, व चॉसर, स्पेन्सर, शेक्सपियर यांच्या नाटकांना विपुल कथा कल्पना दिल्या आहेत. इतर राष्ट्राप्रमाणें आजहि इटलींत वाङ्मयाच्या सर्वच प्रकारांत चांगली प्रगती झाली असून लुई पिरँडेलोसारखे साहित्यिक चमकलें आहेत.

राज्यव्यवस्था व इतिहास—पूर्वीं प्रधानमंडळाच्या सहाय्यानें राजा राज्यकारभार पहात असे. याशिवाय सीनेट व चेंबर ऑफ् डेप्युटीज या लोकप्रतिनिधींची दोन विधीमंडळें असत. परंतु मुसोलिनीच्या हातीं राज्यकारभार आल्यापासून फॅसिस्ट पक्षाच्या कौन्सिलच्या हातीं सत्ता असून मुसोलिनी डिक्टेटर आहे.

इटलीला वसाहतींचें मोठें साम्राज्य आहे. पैकीं आफ्रिकेंत इरिट्रिया, सोमालीलँड, ट्रिपोलिटानिया, (ट्रिपोली) व सिरेनैका हे भू भाग आहेत. यांतच १९३६ सालीं ॲबिसीनिया (इथिओपिया)ची भर पडली आहे. या शिवाय युरोपमध्यें आल्बेनिया व एजियन बेटेंही इटलीच्या साम्राज्यांत मोडतात. यापैकीं ॲबिसीनिया, सोमालीलॅण्ड व इरिट्रिया एका व्हॉइसरॉयच्या हाताखालीं आहेत.

रोमन साम्राज्याच्या अंतानंतर इ. स. ८०० मध्यें इटली चर्लेमान या जर्मन सम्राटाच्या साम्राज्यांत सामील झालें. १८०६ मध्यें पवित्र रोमन साम्राज्याच्या अंताबरोबर व्हेनीस, जिनोआ, नेपल्स, इत्यादि लहान लहान राज्यांत तें विभागलें गेलें. या सर्वांत

पोपचेंहि एक राज्य बनलें. इ. स. १८१६ मध्यें सॅव्हॉयच्या ड्यूकनें पिडमॉट घेऊन राज्य वाढविलें, पुढें त्याच्या मुलानें सिसिली बेट जिंकून १७२० मध्यें ते देऊन त्याऐवजीं सार्डिनिया घेतलें व तो राजा बनला. १८१५ मध्यें याच राज्याच्या वारसानें इटलींत आणखी प्रदेश जिंकला. एकोणिसाव्या शतकांत सार्डिनियाच्या राजाच्या नेतृत्वाखालीं इटलीच्या एकीकरणाची चळवळ सुरू झाली. मॅझिनी, गॅरिबाल्डी व काव्हूर यांच्या मदतीमुळें निरनिराळे प्रांत सार्डिनियाच्या राज्याला जोडलें गेलें. १८५९ मध्यें लोंबार्डी प्रांत घेतला. १८६० मध्यें टस्कनी व इतर प्रांत घेतलें व १८६१ मध्यें सार्डिनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युअल हा इटलीचा राजा म्हणून जाहीर झाला. त्यानें १८६६ मध्यें व्हेनीस व १८७० मध्यें व्हॅटिकन शहराशिवाय पोपचे इतर प्रांत त्यानें जिंकून घेतले. या व्हॅटिकन शहरासंबंधोंचा वाद बरेंच वर्षें चालून शेवटीं १९२८ मध्यें मिटला व लॅटरन तहान्वयें १९२९ मध्यें या शहरावरील पोपचें प्रभुत्व मुसोलिनीनें मान्य केलें. या तहान्वयें पोपला आपलें नाणें व पोस्टाचीं तिकिटें काढतां येतात. पोपचें स्वतंत्र निशाण असून तें स्वतंत्र राज्य म्हणूनच ओळखलें जातें. सन १९०० मध्यें व्हिक्टर इमॅन्युअल तिसरा राज्यावर बसला व सध्यां त्याच्या नांवेंच राज्यकारभार चालू आहे.

१९१५ मध्यें इटलीनें जर्मनी व ऑस्ट्रियांशीं आपलें स्नेहसंबंध तोडले. व इंग्लड—फ्रान्सच्या बाजूनें युद्धांत उडी घेतली. इटलीनें मुख्यतः ऑस्ट्रियांत लढाई सुरू केली. आरंभीं पुष्कळ ठिकाणीं पराजय मिळाल्यावर शेवटीं एकदां जय मिळाला. लढाईनंतर इटलीला सामाजिक व आर्थिकदृष्ट्या चार पांच वर्षें फार वाईट गेली. १९२२ च्या आक्टोबर मध्यें मुसोलिनी प्रबळ झाला व त्याच्या हातीं सत्ता गेली. (मुसोलिनी व फॅसिझम् पाहा.)

२ आक्टोबर १९३५ रोजीं इटलीनें ॲबिसीनियाचे विरुद्ध युद्ध पुकारलें व ९ मे १९३६ रोजीं ॲबिसीनिया जिंकून इटलीच्या साम्राज्यांत दाखल केला. १९३९ च्या मार्च मध्यें इटलीच्या सैन्यानें आकस्मिकपणें आल्बेनियावर स्वारी करून ८–१० दिवसांतच आल्बेनिया जिंकून इटलीच्या राज्यांत सामील केला. चालू युद्धांत आरंभीं ८–९ महिने तटस्थता स्वीकारून १० जून १९४० रोजीं जर्मनीच्या बाजूनें या युद्धांत इटलीनें उडी टाकली; व आफ्रिकेंत इजिप्तच्या रोखानें ब्रिटिशांच्या विरुद्ध चाल केली. पण अद्याप इजिप्त इटलीला घेतां आलेला नाहीं. भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमाराशींहि इटलीच्या आरमारांच्या चकमकी उडत आहेत. २९ आक्टोबर १९४० पासून इटलीनें ग्रीसवर आल्बेनियांतून एकाएकीं स्वारी केली आहे. पण इटलीला अद्याप कांहींच यश या स्वारींत मिळालेलें दिसत नाहीं.

इब्सेन हेन्रिक (१८२८–१९०६):—नॉर्वेजियन नाटककार व कवि. जन्म २० मार्च १८२८ रोजीं. याच्या बापाचा धंदा व्यापार होता; परंतु त्याला व्यापारांत खोट आली. त्यामुळें हेन्रिकचें बालपण आत्यंतिक दारिद्र्यांत गेलें. त्याला वयाच्या पंधराव्या वर्षीं एका औषधविक्याच्या दुकानीं उमेदवारी करावी लागली. १८४९ सालापासून त्यानें आपली भावगीतें व मर्मभेदक चुटके प्रसिद्ध करण्यास सुरवात केलीं. १८५० सालीं ख्रिस्तियाना येथें उच्च शिक्षणाकरितां तो गेला; पण विद्यापीठाच्या शिक्षणापेक्षां राजकारण व रंगभूमि यांच्याकडे त्याचा विशेष कल होता. पुढें त्यानें कांहीं दिवस वृत्तपत्र व्यवसाय केला. प्रथम कांहीं दिवस बर्गेन येथील नाटकगृहाचा तो संचालक (डायरेक्टर) होता. पुढें १८५७ पासून १८६२ पर्यंत ख्रिस्तियाना येथील नाट्यगृहाच्या संचालकाचें त्यानें काम केलें. १८६४ सालीं नॉर्वे सरकारच्या मदतीनें तो प्रवासाला निघाला; कांहीं वर्षें रोम येथें व कांहीं वर्षें ड्रेसडेन येथें राहून १८७८ सालीं तो स्वदेशाला परत आला.

त्याची नाटकें गद्यपद्यात्मक आहेत. त्यानें ऐतिहासिक व सामाजिक विषयावर पुष्कळ नाटकें लिहिलीं. त्याची सामाजिक नाटकें उपहासात्मक आहेत. A Doll's House, Ghost; The lady from the Sea; Hedda Gabler; The Master Builder; Solness; John gabriel borkman; When We Dead Awaken. ही इब्सेनची प्रमुख नाटकें होत. समाजाच्या जिव्हाळ्याचे प्रश्न त्यानें आपल्या नाटकांतून मोठ्या कौशल्यानें व धडाडीनें मांडलें आहेत. आधुनिक नाटककारांच्या प्रथमश्रेणींत

त्याला मोठ्या मनाचें स्थान प्राप्त झालें आहे. तो २३ मे १९०६ रोजीं मेला.

इराणः--आशिया खंडांतील नैर्ऋत्येकडील प्राचीन देश. याची दक्षिणोत्तर लांबी ७०० मैल असून पूर्व पश्चिम रुंदी ९०० मैल आहे. क्षेत्रफळ ६२८,००० चौरस मैल आहे. याच्या उत्तरेला ट्रॅन्सकॉकेशिया, कास्पियन समुद्र व रशियन तुर्कोमान असून पूर्वेला तुर्कोमान, अफगाणिस्तान, बलुचिस्तान हे आहेत. इराणचें आखात व अरबी समुद्र ही दक्षिणेला व इराणचें आखात व इराक पश्चिमेला ही आहेत. लोकसंख्या १५,०००,००० आहे.

लोकः—इराणी लोक आर्यलोकांच्या इराणी शाखेचे आहेत. सांप्रतचें इराणी लोकांत मंगोलीयन, तार्तर, तुर्की व अरब या जातींचे मिश्रण झालेलें आहे. डोंगराळ प्रदेशांतील भटके लोक आपले कळप घेऊन स्थलांतर करतात. सुमारें नऊ दशांश लोक शिया पंथीय मुसलमान असून सुमारें ८५०००० लोक सुनी पंथाचे आहेत. या शिवाय पारसी, ज्यू, आर्मेनियन हे लोकहि आहेत. फारसी भाषा हीच राजभाषा आहे.

हवा व सृष्टपदार्थ—सर्वच प्रान्तांत सारखी हवा नाहीं. मध्यभागच्या पठाराची हवा उन्हाळ्यांत अतिशय उष्ण व हिवाळ्यांत तितकीच थंड असते. इराणच्या आखाताच्या किनाऱ्यावर राक्षसी उन्हाळा असतो. पर्वताची ओळ व कास्पियन समुद्र यांच्या दरम्यानच्या भागांत पाऊस फार पडतो. बराचसा भाग रुक्ष असल्यानें मोठमोठे वृक्ष क्वचितच आढळतात. इराणांत खनिज संपत्ति विपुल आहे; पण तिचा म्हणावा तसा उपयोग करून घेण्यांत आला नाहीं. लोखंड, ताम्बें, शिसें, सुरम्याची धातू, विपुल प्रमाणांत सांपडतात. याशिवाय गंधक, नॅप्था तेल, दगडी कोळसा हे खनिज पदार्थ सांपडतात. निशापूर येथें वैडूर्य मण्याच्या खाणी आहेत. तेलाच्या खाणी पुष्कळ असून त्या विदेशी कंपन्यांनीं चालविल्या आहेत.

शेती मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत नाहीं. शेतीची आयुधें साधीच वापरण्यांत येतात. गंहू, यव, तांदूळ, वाटाणा, मसूर, ज्वारी, बाजरी इत्यादींचे पीक होते. कापूस पुष्कळ होतो. रेशमाची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होतें. इस्पाहाच येथें रेशमाचे कापड तयार होतें. तंबाखूची लागवड मोठ्या प्रमाणांत होते. देशाच्या गरजा भागून बाहेर तंबाखू पाठविण्यांत येतो. याशिवाय अफू, नीळ, विविध फळें व खजूर यांची निपज होतें. इराणांत अस्सल जातीच्या घोड्यांची पैदास होते. उंट, मेंढ्या व खेचरें ही इतर जनावरें आहेत.

राज्यव्यवस्था व इतिहास—शहा नांवानें ओळखल्या जाणाऱ्या राजाच्या हातीं सत्ता आहे. तेहरान ही राजधानी असून शहा येथून कारभार पाहतो. १९०६ मध्यें प्रथम राज्यघटना तयार करण्यांत आली. मर्यादित मतदानाच्या हक्कावर दर दोन वर्षांनीं मजलिसची (विधी मंडळ) निवडणूक होते. परंतु सर्व सत्ता शहाच्या हातांतच आहे.

१९०७ मध्यें इंग्लंड व रशिया या दोघांनीं तह करून अनुक्रमें दक्षिण व उत्तर इराणमध्यें आपलें वजन प्रस्थापित केलें. गेल्या महायुद्धांत इराण तटस्थ होता. पण ब्रिटिश, रशियन, जर्मन व तुर्की लोकांनीं बराच भाग ताब्यांत घेतला होता. १९१७ मध्यें बोल्शेव्हिक क्रांतिनंतर ट्रॉटस्कीनें इराणमधील रशियाचें राजकीय वर्चस्व नाहींसें केलें. १९१८ मध्यें ब्रिटिशांनीं आपलें सैन्य काढून घेतलें. यावेळीं रेझाखान पेहलवी नांवाचा एक लष्करी अंमलदार पुढें आला. व त्यानें राष्ट्रीय चळवळींत पुढाकार घेतला. तो १९२० मध्यें युद्धमंत्री व १९२२ मध्यें मुख्य प्रधान बनला. गादीवरील शहा युरोपला पळून गेला व रेझाखान पेहलवी हाच इराणचा १९२५ मध्यें बादशहा झाला. यानें आपल्या कारकीर्दींत लष्कर, उद्योगधंदे व धर्म या बाबतींत बऱ्याच सुधारणा करून युरोपियन राष्ट्रांच्या पावलावर पाऊल टाकून राष्ट्राला आधुनिकता आणली. १९२६ नंतर टर्की, रशिया यांच्याशीं त्यानें मित्रत्वाचा तह केला. १९३४ मध्यें टर्की, इराण, इराक व अफगाणिस्थान यांचे मित्रत्वाचे करार झाले. १९३५ मध्यें बादशहानें इराणला पर्शिया न म्हणण्याची जाहीर विनंति केली. १९३९ मध्यें इराणच्या युवराजाचे इजिप्तच्या राजभगिनीशीं लग्न झालें. चालू महायुद्धांत तो तटस्थ आहे.

उत्तरायणः— हिंदूंनीं वर्षाचे सहा सहा महिन्याचे दोन भाग केलें आहेत. (अयन = अर्धे वर्ष, तीन ऋतू किंवा

सहा महिने) यापैकीं दुसरा अयनकाल उत्तरायण म्हणून ओळखतात. मकरवृत्तापासून कर्कवृत्तापर्यंत सूर्याच्या क्रांतीस लागणारा म्हणजेच हा काल होय. इंग्रजी तारखेप्रमाणें २२डिसेंबर ते २१जूनपर्यंत हा काल येतो. आपल्या कालगणना पद्धतीनें पौष महिन्याच्या उत्तरार्धापासून ते आषाढ महिन्यापर्यंतचा काल येतो.

उत्तरायण सुरू झाल्यापासून दिवस मोठा होत जातो. उत्तरायणाच्या प्रारंभी हिंवाळ्याचा मध्य येतो. यानंतर थंडीची तीव्रता हळूं हळूं कमी होत जाते. थंडीमुळें वृक्षांची पानें झडून गेलेली दिसतात. नंतर फाल्गुनच्या मध्यापासून वृक्षांना नवी पालवी व मोहोर फुटतो. ही चिन्हें म्हणजे ऋतुराज वसंताच्या आगमनाची वर्दीच असते. चैत्र वैशाखांत वळीवाचे पाऊस पडून शेतकरी शेतांची मशागत करायला लागतात. चैत्रांत सर्वत्र हळदीकुंकवाच्या समारंभाची गर्दी उडते, रामनवमी, मारुती जन्म, शिवजयंती, रामदास नवमी, नृसिंह जयंती हे उत्सव याच अयनांत होतात. उत्तरायणाच्या शेवटीं शेवटीं मृग नक्षत्राला सुरवात होते व उन्हानें करपलेल्या भूमीस मेघराजाच्या कृपेनें पाणी मिळून ती शांत होते.

उत्तरायणांत आंबा, फणस, कलिंगडें, टरबुजें, जांभळें, चिंच इत्यादि फळें येतात व ती खाणें उन्हाळ्यांत प्रकृतिदृष्ट्या हितकर असते. महाराष्ट्रांत होळीनंतर गुढीपाडव्याचा दिवस (चैत्र प्रतिपदा) नव्या वर्षाचा पहिला दिवस मानतात व तो एक मोठा सण समजला जातो. याशिवाय अक्षतृतीया हा दुसरा महत्त्वाचा सण आहे. दशाहार याच कालांत येतो.

उत्तरायणांत मृत्यु आल्यास सद्गति मिळते असें हिंदूंच्या धर्मग्रंथांत सांगितलेलें आहे.

उमरावती:—वऱ्हाडांतील कापसाचें केंद्र व याच जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. याची समुद्र सपाटीपासून उंची १११८ फूट असून हें उ. अ. २०° ५६′ व पू. रे. ७७° ४७′ मध्यें आहे. येथें जी. आय्. पी. च्या नागपूर फाट्यानें बडनेरा स्टेशनहून निघालेल्या रस्त्यानें जातां येतें.

या ठिकाणीं हिंदूचीं व जैनांचीं पुष्कळ मंदिरें आहेत. या सर्वांत अंबादेवी व बालाजी यांची देवालयें प्रमुख होत. या शिवाय बडेनालसाहेबाची मशीदहि प्रसिद्ध आहेच. इथल्या आंबेच्या देवळांतच कृष्ण व रुक्मिणी यांची प्रथम भेट झाली. यामुळें धार्मिक दृष्टीनें या शहराला फार महत्त्व आहे. येथें आश्विन शुद्ध ८ ते १० अखेर यात्रा भरते. देवळाचा भाग वगळल्यास बाकीचा भाग अलिकडे नागपूरचे रघूजी भोसल्यांनीं वसविला असें म्हणतात. अठराव्या शतकांत या गांवची चांगली भरभराट झाली होती. येथें घंटाघर, म्युनिसिपालटीचा हॉल, कॉलेज, राजा बिसनचंदाची हवेली (नक्षीकामाच्या दृष्टीनें) गांवचा तट इत्यादि ठिकाणें बघण्यासारखीं आहेत. या शिवाय तेलाचे कारखाने व जिनिंग फॅक्टरी आहेत. शहराच्या पूर्वेस कॅंप आहे.

उर्ध्व पद्मशीर्षासन:—'शीर्षासन' पाहा.
ऊर्ध्व वज्रशीर्षासनः—'शीर्षासन' पाहा.
ऋषिकेशः—हरिद्वार पाहा.

एकनाथ (१५४८–१५९९):—महाराष्ट्रीय संत. आपल्या पवित्र आचरणानें, व प्रेमळ शिकवणुकीनें, एकनाथांनीं आपलें नांव प्राचीन मराठी संतकवींत—अढळ करून ठेविलें आहे. व्यक्ति आणि वाङ्मय या दोन्हीं दृष्टींनीं त्यांची योग्यता श्रेष्ठ प्रकारची ठरते. ज्ञानेश्वरांच्या मागाहून सुमारें तीनशें वर्षांनंतर, त्यांचा जन्म शके १४५४ च्या सुमारास पैठणास झाला. कोणी त्यांचा जन्म शके १४७० हा मानितात. त्यांचे पणजे भानुदास, हे विठ्ठलभक्त होते. एकनाथांना हरिभक्तीचें बाळकडूं वंशपरंपरेनेंच मिळालें होतें. एकनाथांच्या आजोबाचें नांव चक्रपाणी, व वडिलांचें नांव, सूर्यनारायण असें होतें. रुक्मिणीबाई हें त्यांच्या आईचें नांव. एकनाथ लहान असतांच त्यांचे आईबाप निवर्तले, त्यामुळें त्यांच्या पालनपोषणाचा सर्व भार त्यांच्या आजोबांवरच पडला.

आरंभापासूनच एकनाथांची वागणूक विनयशील असे. ही त्यांची शांतवृत्ति वयानुसार वाढतच गेली. त्यांची ग्राहकशक्तीहि तीव्र होती. त्या काळच्या रीतीप्रमाणें सहाव्या वर्षी मुंज होतांच, त्यांच्या विद्याभ्यासास सुरवात झाली. त्यावेळीं देवगिरीस जनार्दनपंत या नांवाचे एक सत्वशील ज्ञानसंपन्न व प्रेमळ भगवद्भक्त राहात होते. एकनाथांनीं त्यांचेजवळच ज्ञानेश्वरीचा

अभ्यास केला; तसेंच व्यावहारिक शिक्षणाचेंहि धडे आपल्या गुरूपासून त्यांनीं मिळविलें. हिशेबाच्या कामांत एका अडक्याची चूक झाली असतां, ती शोधून काढण्यांत एकनाथांनीं रात्रीचा दिवस केला, यावरून एकाच प्रश्नाला तन्मयतेनें वाहून घेणारी त्यांची मनोवृत्ति, आणि त्यांच्या बुद्धीची एकाग्रता, दिसून आली.

महाराष्ट्रावर त्यावेळीं परकीय राजांचे हल्ले होत होते. बेदर येथें इ. स. १४९३ ते १६५६ पर्यंत बेदरीशाहीनें सत्ता गाजविली. या परचक्राचे दुहेरी-परिणाम दिसून आले. राजकीय दृष्ट्या जनतेला आर्थिक हानि सहन करून, शिवाय परावलंबन स्वीकारावें लागलें. भाषेच्या दृष्टीनें, मराठीचें मूळचें शुद्ध स्वरुप परकीय शब्दांमुळें, गढूळ होऊं लागलें. एकनाथांचें थोर व्यक्तिमत्व, अशा वेळीं, समाजाला व भाषेला उपकारकच ठरलें.

आदर्श गृहस्थ या नात्यानें प्रपंच उत्तम प्रकारें करूनहि, त्यांनीं आपल्या अंगांत साधुत्वाचीं लक्षणें बिंबविलीं होतीं. उच्च नीच भाव त्यांनीं टाकिला होता. ज्ञानेश्वरांनीं भक्तिमार्गाचें महत्व सर्वांना पटवून दिलें होतें. त्याचाच विस्तार करण्याचें काम, एकनाथांनीं मोठ्या प्रमाणांत, ' कीर्तन ' ' प्रवचन ' व ' ग्रंथलेखन ' यांच्या साहाय्यानें सुरू ठेविलें. ' भक्तिमार्गानें सहजासहजी आत्मशांति मिळवितां येते. सर्व जातींना व स्त्रीपुरुषांना हरिचिंतनानें आत्मोन्नति करून घेतां येते '. ही भागवतधर्माची गोड शिकवण त्यांनीं आपल्या ग्रंथद्वारें चोहोंकडे पसरविली.

' एकनाथी भागवत ' व ' भावार्थ रामायण ' हे त्यांचे दोन ग्रंथ अत्यंत लोकप्रिय झालें. भागवताचे पहिले कांहीं अध्याय त्यांनीं पैठणास लिहिले. व काशीस शके १५९५ मध्यें तो ग्रंथ लिहून पुरा केला. मूळ भागवतांतील एकादश अध्यायावर या ग्रंथांत टीका आली असून, श्रीकृष्ण व उद्धव, यांच्या संवादाच्या आधारें ' धर्म ' ' नीति ' आणि ' व्यवहार ' यांचें प्रासादिक विवेचन, एकनाथांनीं आपल्या या भागवतांत केलें आहे. भागवताची ओवीसंख्या वीस हजार आहे. भावार्थ रामायणांत, भक्तियुक्त अंतःकरणानें एकनाथांनीं श्रीरामाचें चरित्र आळविलें आहे. रामायणाची ओवीसंख्या चाळीस हजार आहे. या खेरीज, चतुःश्लोकीं भागवत, शुकाष्टक, आनंदलहरी इत्यादि लहान मोठीं अध्यात्मपर प्रकरणें त्यांनीं लिहिलीं. ' ज्ञानेश्वर ' ' नामदेव ' यांचीं चरित्रें भावमधुर पद्यांत त्यांनीं लिहिलीं. त्यांचीं सामान्य विषयांवरील ' भारुडें ' काव्यगुणांनीं नटलेलीं आहेत. मराठी भाषेंतील आरंभींचीं तीं ' नाट्यगीतेंच ' होत.

एकनाथ हे गुणग्राहकवृत्तीचे मराठींतील पहिलेंच टीकाकार व वाङ्मयसंशोधक होते. ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार करून, तिचा सर्वत्र प्रसार त्यांनीं केला. (शके १५०६).

एक थोर लोकशिक्षक, व वाङ्मयभक्त, या नात्यांनीं एकनाथांचें नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत चिरंजीव झालें आहे. त्यांच्या मागाहून झालेल्या अनेक श्रेष्ठ कवींनीं त्यांची स्तुतिस्तोत्रेंच गायिलीं आहेत. एकनाथांच्या दयाशील वृत्तीचीं अनेक उदाहरणें आढळतात. तान्हेनें व्याकूळ झालेल्या गाढवाला त्यांनीं रामेश्वरास चालविलेल्या कावडींतील पाणी प्यावयास दिलें. ब्राह्मण आणि अंत्यज यांना सारखेंच लेखिलें. भागवतधर्म हा सर्वांना तारणारा आहे ही गोष्ट त्यांनीं आपल्या उदाहरणानें सर्वांस पटवून दिली.

हे प्रतिभाशाली साधुपुरुष शके १५२१ च्या फाल्गुन वद्य षष्ठीस, इहलोक सोडून गेले.

एमिल जॅनिंग्ज (१८८६–):— जर्मन सिनेमा नट. याचा जन्म ब्रुकलिन शहरीं २६ जुलै १८८६ मध्यें झाला. याचें शिक्षण स्वित्सर्लंडमध्यें झालें. लहानपणापासूनच त्यानें नाटक मंडळ्यांतून काम करण्यास सुरवात केली. शेक्सपियर, इब्सेन, शिलर, गटे इत्यादि सुप्रसिद्ध नाटककारांच्या नाटकांतून त्यानें अनेक भूमिका केल्या. १९१५ मध्यें अर्नस्ट लुबिश या विख्यात चित्रपट दिग्दर्शकाच्या आग्रहानें त्यानें सिनेमा सृष्टींत प्रवेश केला. Madame Dubarry, Passion, Deception, The Loves of Pharaoh, Peter the Great, Faust, The Last Laugh या उफा (जर्मन) कंपनीच्या मूकपटांतून कामें करून सर्व जगभर उत्कृष्ट नट म्हणून कीर्ती मिळविल्यावर तो लुबिश बरोबर अमेरिकेस गेला. तेथें The Way of All Flesh, The Last Command, The Patriot, Sins of Father, Betrayal या मूकपटांत प्रमुख भूमिका करून सर्व जगभर त्यानें अनेक

चाहाते मिळविले. बोलपटाचें युग सुरूं झाल्यावर इंग्रजी सफाईनें बोलण्याची आपली अडचण ओळखून तो परत बर्लिनला गेला. तिथें इंग्रजीचा अभ्यास करून त्यानें Blue Angel (१९३२) या उफाच्या बोलपटांत काम केलें. या नंतर The Tempest, Der schwarze Walflsch, Der Alte under Junge Konig व पीटर दि ग्रेटच्या आयुष्यावर उफाच्या चित्रपटांतून त्यानें प्रमुख भूमिका केल्या.

याचे चित्रपट ज्यांनीं ज्यांनीं पाहिले आहेत त्यांना याचा विसर पडणें अशक्य आहे. राग, लोभ, पितृप्रेम, विषाद, वेड वगैरे निरनिराळे भाव त्याच्या चेहऱ्यावरच इतक्या स्पष्टपणें दिसत कीं मूकपटाच्या काळांत कथानक समजून देण्यासाठीं ज्या पाट्या (titles) जोडलेल्या असत त्या याच्या चित्रपटांत फार कमी लागत. बोलपटांतहि त्याच्या अभिनय कौशल्यामुळें त्याच्या वाट्याला बोलण्यासाठीं फारच कमी वाक्यें लेखक योजीत असे. सध्यां हा स्वस्थ आहे.

ओगले, गोपाळ अनंत (१८७९-):— 'महाराष्ट्र' पत्राचे (नागपूर) संपादक. विजयदुर्ग येथें जन्म. यांचें शिक्षण रत्नागिरी व पुणें येथें झालें १९०६ पासून १९१० पर्यंत त्यांचा देशसेवक व राष्ट्रमत या पत्रांशीं संपादक व उपसंपादक या नात्यानें संबंध आला. यांनीं पुढें नागपुरास स्वतःचें 'महाराष्ट्र' पत्र १९१४ पासून सुरूं केलें. या पत्राचें संपादकत्व आतां पावेतों त्यांच्याकडेच आहे. १९३१ त राजद्रोही लेख लिहिल्याबद्दल त्यांना कारागृहवास पतकरावा लागला. यांच्या महाराष्ट्र पत्रानें वऱ्हाड मध्यप्रांतांत फार महत्त्वाची राजकीय कामगिरी केलेली आहे. वृत्तपत्रसृष्टींत मुंबई इलाख्यांतील मराठी वृत्तपत्रांत केसरीचे जें स्थान तेंच स्थान त्या प्रांतांत 'महाराष्ट्र' चें आहे.



गो. अ. ओगले

औरंगजेब (१६१८—१७०७):— हिंदुस्थानचा हिंदूद्वेषी मोंगल बादशहा. शहाजहानचा मुलगा. याचें पूर्ण नांव मुहिउद्दीन मुहम्मद औरंगजेब. अर्जमंदबानू मुमताज महाल ही याची आई. अहमदनगरच्या स्वारीहून जहांगीर परत जात असतां पंचमहाल जिल्ह्यांतल्या दोहद गावीं २४ आक्टोबर १६१८ ला याचा जन्म झाला.

यास अरबी व फार्शी या भाषा उत्तम येत. व्यवहारापुरती हिंदीहि समजे. तसेंच चघताई व तुर्की या भाषा साधारण समजत. शहाजहान गादीवर बसल्यावर याचें शिक्षण सुरूं झालें. सादुल्लाखान हशीम व सालिह या मंडळींनीं त्यास शिक्षण दिलें.

या नंतर त्यास दौलताबाद (१६३६—४४), गुजराथ (१६४५-४७), बल्क व बदकशान (१६४७-४८), मुलतान (१६४८-५२), व बऱ्हाणपूर (१६५२) या ठिकाणीं सुभेदारी करावी लागली. वरील ठिकाणीं एकंदरींत यानें चांगली कामगिरी केली म्हणून बापानें त्यास मोठे मोठे अधिकार देतां देतां शेवटीं तर २३ फेब्रु. १६३९ रोजीं त्याला पंधरा हजाराचा सरदार केला.

१६५७ त दिल्लीला बादशहा आजारी पडला म्हणून तो तिकडे निघाला. वाटेंत यानें मुरादला आपल्या बाजूला वळविलें व स्वपक्षबलवर्धक अशा पुष्कळ गोष्टी केल्या. प्रथमतः जसवंतसिंहाला त्यानें नर्मदातीरीं चांगलाच हात दाखविला. नंतर दाराला चकवून हा आग्र्याकडे निघाला. दारानें याचा पाठलाग आरंभला पण औरंगजेबानें समुगड येथें त्याचा पराभव केला. त्यानें ३ जूनला आग्रा शहर ताब्यांत घतलें. तिथें यानें १० जूनला दरबार भरवून सर्वसत्ता आपल्या हातीं घेतली व हा दिल्लीकडे निघाला. २१ जून रोजीं तो दिल्लीमधील शालीमार बागेंत गादीवर बसला. पुढें यानें 'आलमगीर गाझी' ही पदवी धारण केली. आपलें बूड स्थिर होतांच यानें दारा व मुराद या भावांना ठार केले. सुजा हिंदुस्थानाबाहेर पळून गेल्यामुळें याचा मार्ग निष्कंटक झाला. म्हणून ५ जून १६५९ ला यानें राज्यारोहणाचा टोलेजंग समारंभ पार पाडला. या दिवसापासून त्यानें पारशी नवरोझ बंद करून हिजरी

वर्ष चालू केलें. २३ मे १६५८ पासून (तक्तारूढ) सरकारी वर्ष धरलें.

यानें १६६२–६४ पर्यंत काश्मिरांत वास्तव्य केलें. बापाच्या मृत्युमुळें पुढें हा आग्र्यास परत आला. एव्हांपासून १६७४ पावेतों हा दिल्लीला राहिला. यानें आफ्रिडी लोकांच्या बंडाचा मोड १६७६ त केला. १६७९ मध्यें जसवंतसिंगाचें राज्य लाटण्याचा याचा बेत होता. पण त्या कामीं याचें नुकसान होऊन सर्व रजपूत उलटल्याकारणानें याचें बळ एकदम कमी झालें. हें प्रकरण मागें पडल्यावर हा १६८२ च्या मार्च महिन्यांत दक्षिण सर करण्यास बाहेर पडला. या कामीं पंचवीस वर्षें खटपट करूनहि त्यास यश आलें नाहीं. शेवटीं हा अहमदनगर येथें १७०७ च्या २१ फेब्रु.ला मृत्यु पावला.

'फतवा इ आलमगिरी' हा मुसलमानी कायद्याचा उत्तम ग्रंथ यानें तयार केला. हा फार विद्वान् होता. याच्या परधर्म व स्वेतर पंथियांच्या द्वेषामुळें त्यास शेवटीं शेवटीं अपयशी राजकारण करण्याची पाळी आली.

कबीर (१३९७–):––कबीर पंथाचा संस्थापक, एक संत व हिंदी कवि. 'कबीर कसोटी' या ग्रंथाप्रमाणें वि. सं. १४५५ (स. १३९७) मध्यें हा जन्मला. व वि. सं. १५१७ (स. १४६०) त यांस मृत्यु आला. याच्या जन्माबद्दल निश्चित अशी माहिती मिळत नाहीं. लोक याच्यासंबंधीं ज्या कथा सांगतात त्या विसगत आहेत.

हा एका ब्राह्मण विधवेचा मुलगा असून स्वतःच्या अब्रूचा बचाव करण्यासाठीं तिनें जन्म देतां क्षणींच यास काशींतील 'लहर' तळ्याजवळ नेऊन टाकलें. पुढें नीरू नांवाचा मुसलमान साळी आपल्या नीमा नांवाच्या बायकोसह तेथून चालला असतां त्याचें लक्ष या अर्भकाकडे गेलें. त्या साळ्यानें यास घरीं नेऊन याचें पालनपोषण केलें. मोठा झाल्यावर हा साळ्याचा धंदा करूं लागला.

हा जरी मुसलमानाच्या घरीं लहानाचा मोठा झाला तरीं बाल्यदशेपासूनच याचें लक्ष हिंदूधर्माकडे होतें. याच्या वेळीं रामानंदांची सत्पुरुष म्हणून फार प्रसिद्धी होती. म्हणून त्यांना यानें युक्तीनें गुरु करून घेतलें. पुढें हा रामानंदांच्या मठांत जाऊन तेथें चालणाऱ्या वादविवादांत भाग घेत असे. मणिकपूर येथेंहि यानें कांहीं वर्षें वास्तव्य केलें. तेथें असतांना शेर, तक्की व एकवीस पीर यांच्या उपदेशाचा निषेध करून यानें तेथील लोकांना निराळाच उपदेश केला. यामुळें कबीराला बराच त्रास सहन करावा लागला.

कबीर हा 'मगहर' येथें मरण पावला. याला लोई नांवाची बायको होती. या शिवाय कमाल व कमाली या नांवाची, एक मुलगा व एक मुलगी, अशी दोन मुलें होती.

हा मुसलमान व हिंदू या दोन्हीं धर्मांना शिव्या देत असे. वेदांत, चातुर्वर्ण्य, उपासतापास व सुंता या गोष्टी त्यास मुळींच मान्य नव्हत्या. कबीर द्वैतमताचा असून तो भक्तिमार्गी होता. राम हें याचें कुलदैवत. यानें सर्व उपदेश तोंडींच केला. याची कवित्वशक्ति चांगली, स्फूर्तिदायक व हृदयंगम आहे. याचे दोहरे बहुतेकांना परिचित असून ते 'कहत कबीरा' असें म्हणून पुरें केलेले असतात. या दोहऱ्यांचा सुभाषितांप्रमाणें लोक उपयोग करतात.


याचे धर्मदास व सुरत गोपाळ या नांवाचे दोन शिष्य प्रसिद्ध आहेत. कबीराच्या मृत्यूनंतर काशीच्या शाखेचा चालक सुरतगोपाळ झाला. आणि छत्तीसगडच्या शाखेचा चालक धर्मदास झाला.

धर्मपरत्वें याच्या अनुयायाच्या दोन शाखा झाल्या. एक मुसलमानांचीं व दुसरी हिंदूंची. मुसलमानी भक्तांचें मुख्य ठिकाण मगहर येथें असून हिंदू भक्तांचें काशीला आहे. दोन्हीं धर्मांतील याचे अनुयायी, सर्व हिंदुस्थानांत, सुमारें दहा लक्ष आहेत. कबीरपंथी, ब्राह्मण माळ घालून शिवाय जानवेंहि घालतो. स्त्रियांसुद्धां माळ घालतात. कबीरपंथांत एकाद्यास जावयाचें असल्यास मोठा दीक्षाविधी करून घ्यावा लागतो. यांच्यांत जातीभेद आहेतच.

करंदीकर, जनार्दन सखाराम (१८७५–):–शिक्षक, संशोधक, जोतिषशास्त्रज्ञ व संपादक जन्म १८७५ त कुंदगोळ येथें यांनीं १८९७ त बी. ए. व १९०३ मध्यें एल्. एल्. बी. या पदव्या मिळविल्या. यानंतर मुधोळ, धारवाड, कोल्हापूर व पुणें या ठिकाणीं यांनीं पुष्कळ वर्षें शिक्षकाचा व्यवसाय केला.

थोडीं वर्षें हे समर्थ व ग्रंथमाला या नियतकालिकांचे सहसंपादक होते. नंतर ते केसरी संस्थेंत शिरले. आतां यांना केसरीचे मुख्य संपादक नेमिलें आहे. मुळशी सत्याग्रह व कायदे भंगाची चळवळ यांत यांनीं भाग घेतल्यामुळें त्यांना कारावास भोगावा लागला. वाईची 'राष्ट्रीय शिक्षण' व झांशीची 'बृहन्महाराष्ट्र' या सभांचीं अध्यक्षस्थानें यांना मिळालीं. कौटिलीय अर्थ शास्त्राचें भाषांतर व 'जगांतल्या क्रांतिकारक लढाया' हीं दोन पुस्तकें व अनेक विषयांवरील वेळोवेळीं लिहिलेले लेख हा यांचा लेखन संसार होय.

कर्वे, धोंडो केशव (१८५८–):--भारतवर्षीय महिला विद्यापीठाचें संस्थापक, १८८१ त प्रवेश परीक्षा व १८८५ मध्यें बी. ए. या परीक्षांमधून ते उत्तीर्ण झाले.



धों. के. कर्वे

शिक्षणानंतर यांनीं एल्फिन्स्टन, मराठा व न्यू इंग्लिश स्कूल या शिक्षण संस्थांत व फर्ग्युसन कॉलेजमध्यें नोकरी केली.

यांनीं १८८६ त मुरुडफंड १८९३ मध्यें विधवाविवाहसंस्था, १८९६ ला अनाथ बालिकाश्रम, १९०७ सालीं महिला विद्यालय, १९३६ त महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षणमंडळ, व १९१६ ला भारतवर्षीय महिला विद्यापीठ या संस्था स्थापन केल्या. सर्व संस्था आज चांगल्या स्थितींत आहेत.

अनाथ बालिकाश्रम व महिला विद्यापीठ या संस्थांकरितां आर्थिक मदत मिळविण्यासाठीं यांनीं आरंभीं सारा हिंदुस्थानांत, वयाच्या ७१ व्या वर्षानंतर, आर्थिक सहाय्याकरितांच युरोप, अमेरिका, जपान, चीन, जावा, फिलीपाईन्स, मलाया, पूर्व व दक्षिण आफ्रिका वगैरे देशांतून प्रवास केला.

मराठींत यांनीं आत्मचरित्र लिहिलें असून त्याचीच इंग्रजींत एक संक्षिप्त आवृत्ति 'Looking Back' या नांवानें प्रसिद्धली आहे. स्त्रीशिक्षणाचे व विधवाविवाहाचे निस्सीम पुरस्कर्ते म्हणून यांचें कार्य महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासांत अमर राहील.

कादंबरी:---कादंबरी हा शब्द बाणाच्या याच नांवाच्या नवलकथेवरून मराठींत रूढ झाला असला तरी आपल्या देशांत तिच्यापूर्वीं अशा पद्धतींची वाङ्मयनिर्मिती होत नव्हती असें मात्र नाहीं. गोष्टीची आवड मनुष्याला उपजतच असते. मग ती गोष्ट पद्यांत सांगितलेली असो अगर गद्यांत वर्णिलेली असो, देवादिकांच्या अवताराचें वर्णन करणारी असो अथवा मानवी आयुष्यांतल्या घडामोडी रंगविणारी असो ! या दृष्टीनें पाहिलें तर 'ओडेसी' ही जशी युरोपची पहिली कादंबरी मानतां येईल, त्याप्रमाणें 'रामायण' ही पहिली भारतीय कादंबरी होय असें म्हणतां येईल. रामायण काव्य म्हणून लिहिलें गेलें हें खरें. पण आजच्या दृष्टीनें पाहिलें तर त्यांत काव्यापेक्षां कथाच अधिक आहे. राम–कृष्ण हे परमेश्वराचे अवतार मानले गेल्यामुळें रामायण–महाभारतादि ग्रंथांची गणना इतिहास पुराणांत होऊं लागली. पण केवळ वाङ्मयाच्या दृष्टीनें पाहिलें तर त्या प्राचीन काळांतल्या पद्यांत वर्णिलेल्या ऐतिहासिक कादंबऱ्याच आहेत. ज्योतिषशास्त्र व वैद्यकशास्त्र हीं सुद्धां ज्या काळांत पद्यांत लिहिलीं जात, त्यावेळीं कुठल्याहि कथेचें स्वरूप पद्यमय असावें यांत अस्वाभाविक असें काय आहे ?

या प्राचीन काळांतून आपण अर्वाचीन काळाकडे वळलों कीं, संस्कृत वाङ्मयांतली 'बाणा' ची 'कादंबरी' व सुबंधूची 'वासवदत्ता' या दोन गद्य दीर्घकथांचें नयनमनोहर दर्शन होतें. 'कादंबरीं' तलें कथानक केवळ मानवी नाहीं. ऋषि आणि यक्षगंधर्व यांच्या जीवनांतल्या अद्भुतरम्यतेवरच तें उभारलें आहे. तथापि, या नवलकथेंतलीं पात्रें देवादिकांचे अवतार नाहींत, त्यांच्या भाव भावना किंवा त्यांचे काम क्रोधादि विकार सर्वस्वीं मानवीच आहेत, हा तिचा महत्त्वाचा विशेष आहे. या दृष्टीनें बाणाची 'कादंबरी' ही नवलकथा प्राचीन पौराणिक काव्यमय कथा, व अर्वाचीन गद्य सामाजिक कादंबरी यांच्या मधला टप्पा आहे. 'कादंबरी' तल्या 'अच्छोद' सरोवराच्या वर्णनांत कथालेखकापेक्षां कवीलाच शोभणारा जो कल्पनाविलास आढळतो, त्याचें कारण

बाणाची नवलकथा हा प्राचीन काव्य आणि अर्वाचीन कादंबरी यांच्यामधला दुवा आहे हेंच नाहीं काय ?

'मुक्तामाला', 'मंजुघोषा' वगैरे मराठींतल्या आरंभींच्या कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखकांनीं आपल्यापुढें बाणाच्या कादंबरीचाच आदर्श ठेवला होता यांत शंका नाहीं. बाणाच्या कादंबरींतले ऋषिकुमार या मराठी कादंबऱ्यांत राजपुत्र बनले. आणि गंधर्वकन्या राजकन्या झाल्या. पण हा फरक आजची मराठी कादंबरीची प्रगति लक्षांत घेतां फारसा महत्त्वाचा वाटत नाहीं. आजच्या मराठी कादंबरीचे जनक हरिभाऊ आपटे हेच होत. आणि हरिभाऊंनीं कादंबरी-लेखनाची स्फूर्ति मिळविली ती कांहीं बाणापासून नव्हे-तर रेनॉल्ड्स्, स्कॉट व डिकेन्स या इंग्रजी कादंबरीकारांकडून.

इंग्रजींतल्या पहिल्या कादंबरीचे (Pilgrim's Progress. मराठी भाषांतराचें नांव 'यात्रिक क्रमाण' १८४१) स्वरूप बव्हंशीं धार्मिक आहे. ही कादंबरी पहिल्यांदा १६७८ मध्यें प्रसिद्ध झाली. त्यानंतर जवळजवळ पन्नास वर्षांनीं 'रॉबिन्सन क्रूसो' (१७१९) व 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' (१७२६) या दोन लोकप्रिय कादंबऱ्या जन्माला आल्या. अद्भुतरम्यतेचा एक भाग जो साहसप्रियता तो 'रॉबिन्सन क्रूसो' मधें भरपूर आहे. मात्र या साहसप्रियतेंत दैवी अगर अतिमानवी असा भाग मुळींच नाहीं. 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' ही दीर्घकथा मूळ कल्पनेच्या दृष्टीनें बाणाच्या कादंबरीसारखीच अद्भुतरम्य (Fantastic) आहे. पण स्विफ्टच्या कल्पकतापूर्ण उपरोधामुळें तिचें स्वप्नाळु कथेचें स्वरूप नाहींसें होऊन तिच्यामधें एक प्रकारची मानवी अनुभवांची माधुरी निर्माण झाली.

बोकॅशिओ, सर्व्हेंटीज, रॅबेल वगैरे अनेक युरोपिअन लेखकांनीं या इंग्रजी लेखकांपूर्वींच विविध प्रकारच्या कादंबऱ्या लिहून आपआपल्या भाषांत या वाङ्मय प्रकाराचा उपक्रम केलेला असला, तरी मराठी कादंबरीच्या विकासाशीं त्यांचा प्रत्यक्ष असा कांहींच संबंध पोंचत नाहीं. जी स्थिति या इंग्लंडबाहेरील लेखकांची तीच फील्डिंग, रिचर्डसन्, स्मॉलेट व स्टर्न या इंग्लिश कादंबरीच्या रथाच्या पहिल्या चार चाकांची. हरिभाऊंनीं या रथाकडे प्रथम दृष्टि फेंकली तेव्हां त्यांना जीं चार चाकें दिसलीं तीं रेनॉल्डस्, स्कॉट्, जेन ऑस्टेन व डिकेन्स हींच असलीं पाहिजेत. त्यामुळें आधुनिक इंग्रजी कादंबरीचा जनक रिचर्डसन हा इंग्रजींतला मनोविश्लेषण करणारा पहिला कादंबरीकार मानला जात असला तरी त्याची 'पॅमिला' 'पण लक्षांत कोण घेतो ?' लिहिणाऱ्या हरिभाऊंनीं अभ्यासिली असेल असें वाटत नाहीं ! टॉम जोन्स (फील्डिंग) सेंटिमेंटल जरनी (स्मॉलेट), ट्रिस्टम शँडी (स्टर्न) या कलाकृतींना इंग्रजी कादंबरीच्या इतिहासांत मानाचीं स्थानें असलीं तरी मराठी वाङ्मयावर त्यांचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष असा कांहींच परिणाम होऊं शकला नाहीं. इतकेंच नव्हे, तर गोल्डस्मिथच्या ज्या कादंबरीवर थॅकरे व स्कॉट बेहद्द खूष होते, ती व्हिकार ऑफ वेकफील्ड (मराठी रूपांतर-धनुर्धारीकृत 'वाईकर भटजी') मराठींतली एका काळची लोकप्रिय कादंबरी असूनही तिचा मराठी कादंबरीच्या विकासाशीं मुळींच संबंध येत नाहीं. एकोणिसाव्या शतकांतल्या इंग्लिश कादंबरीकारांपैकीं जेन ऑस्टीन व थॅकरे यांच्या कादंबऱ्या हरिभाऊंनीं वाचल्या असतील. पण त्यांच्या लेखनावर अगदीं स्पष्ट छाप जी पडली ती फक्त दोनच प्रतिभावंतांची एक स्कॉट व दुसरा डिकेन्स. याच शतकाच्या उत्तरार्धांत टर्जीनेव्ह, डोस्टोव्हेस्की व टॉलस्टॉय् या तीन जागतिक कीर्ति मिळविणाऱ्या रशियन कादंबरीकारांच्या कलाकृति निर्माण झाल्या. पण हे रशियन कादंबरीकार किंवा बाल्झाक-झोलासारखे फ्रेंच कादंबरीकार यांनीं आपआपल्या देशांत कादंबरीचा नवा इतिहास घडविला असला तरी मराठी कादंबरीच्या विकासाशीं त्यांचाही प्रत्यक्ष असा कुठेंच संबंध पोंचत नाहीं.

जगाच्या वाङ्मयांत कादंबरी या वाङ्मयप्रकारानें उशीरा प्रवेश केला असला तरी आतां विविध-अंगांनीं तिची इतकी प्रगति झाली आहे कीं तिचें वर्णन करायला एखादा ग्रंथही पुरणार नाहीं. कथाप्रधान गुप्तपोलिसांच्या कादंबऱ्यांपासून ज्यांत कथासूत्र नाममात्र आहे अशा मनोविश्लेषणपर कादंबऱ्यांपर्यंत सर्व प्रकारच्या कृती पाहिल्या—हार्डी आणि वुडहाऊस, अप्टन सिंक्लेअर व स्टीफेन झ्वाइग, अशा अत्यंत भिन्न प्रतिभेच्या कलावंतांनीं या क्षेत्रांत केलेली निर्मिती पाहिली—म्हणजे आजच्या कादंबरीचें तंत्र व

तिचा आत्मा या संबंधानें निश्चित विधानें करणें हें किती कठिण काम आहे याची कल्पना येते. अशा रीतीनें कादंबरीचें क्षेत्र दिवसेंदिवस विस्तृत होत असले तरी 'काल्पनिक गद्य कथेच्या द्वारें केलेलें मानवी जीवनाचें चित्रण' ही व्याख्या अजूनही तिला लागूं पडतेंच. या व्याख्येच्या अनुरोधानें तिचें अंतरंग व बहिरंग यांची रूपरेखा काढणें मात्र शक्य आहे.

अद्भुतरम्य (यांतच धार्मिक व पौराणिक कथानकांचा समावेश करतां येईल), ऐतिहासिक व सामाजिक अशा कादंबरीच्या आत्म्याच्या विकासाच्या तीन पायऱ्या आहेत. यांपैकीं तिसऱ्या पायरीवरच गेल्या अर्ध शतकांत जगांतली कादंबरी उभी आहे असें म्हणायला हरकत नाहीं. ऐतिहासिक कादंबरींत अद्भुतरम्यता व सामाजिकता यांचें एक प्रकारचें मिश्रण असल्यामुळें इंग्रजींत स्कॉटच्या, बंगालींत बंकिमचंद्रांच्या व मराठींत हरिभाऊ आपटे आणि नाथमाधव यांच्या अशा प्रकारच्या कादंबऱ्या एकेका विशिष्ट काळीं लोकप्रिय झाल्या हें खरें. पण हार्डी, गॅल्सवर्दी, गॉर्की, व्हिकि बॉम, स्टीफेन झ्वाईग, सिंक्लेअर, लुई इत्यादि जागतिक कीर्तीचे कादंबरीकार घ्या, अथवा शरच्चंद्र, मुनशी प्रेमचंद, रमणलाल देसाई वामनराव जोशी, प्रो. फडके इत्यादि नामवंत हिंदी कादंबरीकार घ्या, आपला कथाविषय शोधण्याकरतां त्याच्यापैकीं कुणीही इतिहासाकडे सहसा वळत नाहीं. धर्माप्रमाणें इतिहासांतली अद्भुतरम्यता लोप पावली असून समाजशास्त्र व मानसशास्त्र यांच्या प्रगतीमुळें मानवी जीवनांतली मोहकता मात्र वाढली आहे. आजच्या कादंबरीकारांना खोल खाणींत जाऊन तिथल्या मजुरांचें जीवन जसें सूक्ष्मपणें पाहतां येतें, त्याप्रमाणें मानवी मनाच्या व तिथल्या विविध भावनांचेंही निरीक्षण करतां येतें. 'The proper study of mankind is man' ही उक्ति विसाव्या शतकांतल्या सामाजिक कादंबरीकाराला अत्यंत सार्थ वाटते. शिवाय आजचा काळ ऐतिहासिक काळालाही मागें टाकणाऱ्या भव्य व भीषण अनुभवांनीं भरला आहे. स्कॉट अगर हरिभाऊ यांच्या स्वप्नांतही आलें नसेल असें महायुद्ध आज जगांत सुरूं असून तें मानवतेचा अत्यंत निर्दयतेनें संहार करीत आहे. ऐतिहासिक काळांतील प्रणयी स्त्री—पुरुषांना कधींही सोडवावीं लागलीं नसतील अशीं प्रेमाचीं कोडीं आजच्या सामाजिक गुंतागुंतींत तरुणांना सोडवावीं लागत आहेत. स्थूल भावनांच्या वर्णनांनीं उत्कट स्वभावपरीपोष साधण्याचा काळ मागें पडला असून मानवी मनाचे सूक्ष्म पापुद्रे हलक्या हातानें दूर करून त्यांचें सूक्ष्म चित्रण करण्यांत अधिक कौशल्य आहे असें आजच्या कलावंत कादंबरीकारांना वाटत आहे.

या विलक्षण फरकामुळें कथानक, स्वभावरेखन व हेतु (Motif) हे कादंबरीचे मुख्य घटक बाह्यतः कायम राहिले असले तरी त्यांच्या अंतरंगांत कितीतरी अंतर पडलें आहे. विविध घटनांनीं भरलेलें कथानक हाच पहिल्या पहिल्या सामाजिक कादंबऱ्यांचा आत्मा असे. पण स्कॉटची 'आयव्हॅनो' किंवा ड्यूमासची 'थ्री मस्केटीअर्स' यांची गोडी जशी आतां एडगर वॅलेसच्या कादंबऱ्या अथवा शॅरलॉक होम्सचें चातुर्य एवढ्याच क्षेत्रांत ज्याप्रमाणें मर्यादित होऊन राहिली आहे, त्याप्रमाणें कथानकाला उपकथानकाची जोड देऊन पांचपन्नास पात्रांच्या गर्दींत विविध प्रसंगांमागून प्रसंग गुंफीत जाणारी सामाजिक कादंबरीही मागें पडली आहे. डिकेन्सची 'डेव्हिड कॉपरफील्ड' आणि स्टीफेन झ्वाइगची 'लेटर फ्रॉम अॅन अन्नोन् वुमन' या दोन्हीं कादंबऱ्या आत्मनिवेदनपरच आहेत. पण पहिलींतलें सामाजिक नाट्य जेवढें प्रभावी आहे, तेवढेंच दुसरींतलें मानसिक नाट्य मोहक आहे. 'पण लक्षांत कोण घेतो ?' ही मराठी कादंबरीच्या उदयकाळांतल्या स्त्रीजीवनाचें चित्रण करणारी कादंबरी व अलीकडच्या त्याच विषयावरल्या 'सुकलेलें फूल' 'उल्का,' 'भंगलेलें देऊळ,' 'हिंदोळ्यावर,' 'इंदु काळे व सरला भोळे' प्रभृति कादंबऱ्या यांची तुलना केली म्हणजे सामाजिक कादंबरीचें प्रसंगप्रधान स्वरूप कसें कमी होत चाललें आहे याची पूर्ण कल्पना येईल. एकोणिसाव्या शतकांतल्या नामांकित पाश्चात्य कादंबऱ्यांत स्वभावरेखनाइतकेंच गुंतागुंतीच्या व घटनाप्रधान कथानकाला महत्त्व असे. मराठींतल्या अगदीं अलीकडच्या लोकप्रिय कादंबरीकारांच्या 'दौलत,' 'दोन ध्रुव,' 'कांता' इत्यादि कादंबऱ्या पाहिल्यातर त्यांनींही स्वभावरेखनाइतकेंच कथानकाला महत्त्व दिलेलें आढळतें. पण तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें तर मूळ कथानकाला भरदार उपकथानक जोडण्याची

पद्धत मागें पडली असून कथाप्रसंगांचें वैपुल्य अगर गुंतागुंत कमी करण्याकडेच आधुनिक कादंबरीकारांचा कटाक्ष आहे.

कथानकांत प्रसंग थोडे असोत वा पुष्कळ असोत, त्यांची कौशल्यानें गुंफण करणारा कादंबरीकारच वाचकाच्या मनाची पकड घेऊं शकतो. कथासूत्राची गुंतागुंत, निरगांठ व उकल करतांना वाचकांची उत्कंठा कशी वाढेल, योग्य वेळीं विविध प्रसंगांनीं स्वभावपरिपोष कसा साधतां येईल, स्वभावाच्या विविध छटांनीं पुढील कथानकाचा कसा परिपोष होईल, वाचकाचें चित्त वेधून टाकण्यासारखें बाह्य किंवा आंतरिक द्वंद्व कथानकांत निर्माण झालें आहे किंवा नाहीं, इत्यादि गोष्टींकडे लक्ष न देणारा लेखक सध्यांच्या रसिक वाचकांचें पूर्ण समाधान कधींच करूं शकणार नाहीं. कादंबरीच्या कथानकांत कुतूहलजनक पण थोड्याफार कृत्रिम घटना भरपूर घातल्या कीं गोष्ट रंगली ही समजूत जसजशी मागें पडत आहे, तसतसा तिच्या तंत्राचा प्रश्न कथानकाइतकाच महत्त्वाचा होत आहे. ' A letter from an unknown woman ही स्टीफेन झ्वाइगची छोटी कादंबरी ही एक छोटी भावकथा आहे. ती लेखकानें सांगितली असती तर खूप मोठी झाली असती; पण मग तिच्यांतली आजची उत्कटता निम्म्यानेंसुद्धां अनुभवाला आली नसती. नायिकेच्या दैनंदिनीच्या स्वरूपांत या कथेला आर्तता आली असती; पण वाचकांची उत्कंठा वाढविण्याचा गुण मात्र तिच्यांत राहिला नसता!

कादंबरीच्या कथनपद्धतींत निवेदन व आत्मनिवेदन हे दोन प्रकार वारंवार उपयोजिले जातात. पत्रपद्धति, दैनंदिनी, इत्यादिकांचा उपयोग करणें अधिक कौशल्याचें असल्यामुळें लेखक त्यांचा आश्रय क्वचितच करतात. कथनपद्धतीची निवड कथाविषय जास्तींत जास्ती परिणामकारक करण्याच्या दृष्टीनेंच केली पाहिजे. पण पुष्कळदां पद्धत जुनी असूनही तिला नाविन्याचा मुलामा कसा देतां येतो हें पहावयाचें असेल तर जेम्स हिल्टनची ' We Are Not Alone ' ही कादंबरी पहावी.

आधुनिक कादंबरींत कथानक आणि तंत्र यांच्या इतकेंच स्वभावरेखन आणि हेतु यांचेंही महत्त्व आहे. नायक-नायिका-खलनायक यांचें ठराविक ठशाचे त्रिकोण आतां वाचकाला रंजवूं शकत नाहींत. ठराविक सांच्याच्या कथानकापेक्षांहि ठराविक ठशाचें स्वभावरेखन हल्लींच्या वाचकाला अधिक अप्रिय होतें. मनुष्याच्या मनांत इंद्रधनुष्याचे सात रंग असतात, नुसता प्रकाश किंवा नुसता अंधार नसतो, हें मानसशास्त्राच्या वाढत्या परिचयामुळें प्रत्येकाला कळूं लागलें आहे. कनक आणि कामिनी किंवा प्रेम आणि मत्सर यांच्या प्रेरणेनें मनुष्य अजूनही बरीवाईट धडपड करतो हें खरें. पण त्या धडपडीचें स्वरूप पूर्वीसारखें यांत्रिक नाहीं. आधुनिक कादंबरींतली पात्रें बरीवाईट कशींहि असलीं तरी वाचक तीं सजीव आणि विकासशील आहेत कीं नाहीं हें पाहतात. मानवी जीवन हें सांचेबंद नाहीं. परिस्थितीशीं टक्कर मारीत मारीत आणि जगाचे बहुविध संस्कार घेत घेत तें घडत जातें. ही घडण जो कादंबरीकार कल्पकतेनें आणि कौशल्यानें रंगवूं शकतो, मोत्यांचे शिंपले वेंचणाऱ्या पाणबुड्यांप्रमाणें जो मानवी मनांतली चित्रविचित्र रहस्यें शोधून काढतो, तोच कादंबरीकार आजच्या वाचकाला अधिक आवडतो.

यंत्रयुग, महायुद्धें आणि सर्व शास्त्रांतलें विविध शोध यांच्यामुळें समाजाचें आजचें जीवन इतकें बदलून गेलें आहे कीं, कथेला प्रेरक असा जो हेतु त्याचें स्वरूपसुद्धां सर्वस्वीं निराळें झालें आहे. एखाद्या लंगड्या मुलीवर भूतदयेनें प्रेरित होऊन प्रेम करणारा तरुण मागील काळांत मोठा उदात्त ठरला असता. पण ' Beware of Pity ' या आपल्या कादंबरींत स्टीफेन झ्वाईगनें अशा तरुणाचें जें चित्रण केलें आहे, तें प्रत्येक रेखेंत सजीव असलें तरी उदात्त या विशेषणाला मात्र पात्र नाहीं! भिकाऱ्याच्या पोराला दाखविलेली दया पूर्वकाळीं मनाच्या मोठेपणाची दर्शक ठरली असती; पण आज ती भीक घालणाऱ्याचें सामाजिक परिस्थितीचें अज्ञान दर्शवितें. ' Main Street ' या कादंबरींत सिंक्लेअर लुईनें एक सुशिक्षित स्त्री समाजसेवेच्या बाबतींत आत्मवंचना कशी करून घेते, याचें जें चित्र रेखाटलें आहे, त्याचें स्वप्नसुद्धां पन्नास वर्षांपूर्वीच्या कादंबरीकाराला पडलें नसतें. कादंबरीचा विषय कोणताही असो, तो मांडतांना लेखकाचा दृष्टिकोन अगदीं आधुनिक हवा आणि मनुष्याचें वैयक्तिक आणि सामाजिक मन हरघडी जे

नवें नवें अनुभव घेत आहे त्यांची त्यानें अभ्यासपूर्वक चिकित्सा केली पाहिजे, या गोष्टी यावरून उघड होतील.

वरील त्रोटक विवेचनांत उल्लेखिलेल्या बहुतेक गोष्टी मराठी कादंबरीच्या गेल्या ८० वर्षांच्या इतिहासांतही आपल्याला पहायला मिळतात. या ८० वर्षांचे चार कालखंड पडतात. १८६१–१८८९, १८८९–१९१४, १९१४–१९३४ आणि १९३४– या रेघेपुढें कोणत्या सालचा आंकडा उभा राहणार आहे तें भावी काळच ठरवील.

१८६१–१८८९ या कालखंडांतील बहुतेक मराठी कादंबऱ्या अद्भुतरम्य आहेत. या कादंबऱ्यांतला नायक मदनाचा पुतळा. अर्थात् नायिका रतीइतकी सुंदर असते हें सांगायलाच नको! प्रतिनायक हा शुद्ध सैतान. अशा स्थितींत अघटित घटनांना काय तोटा? त्या घटनांच्या पुढें प्रसंगीं संतचरित्रांतले चमत्कार सुद्धां फिक्के पडायचे! असल्या कादंबऱ्यांचीं नांवें वसंतकोकिला, सुहास्यवदना, विलासिनी, प्रभवमालिनी, चंद्रकला, चंपकमाला इत्यादि इत्यादि असलीं पाहिजेत हें काय सांगायला पाहिजे?

फार गोड पदार्थाप्रमाणें आत्यंतिक अद्भुततेचाही मानवी मनाला लवकर वीट येतो. त्यामुळें अद्भुतांतील विलक्षण कल्पनारम्यता कायम ठेवणाऱ्या पण अधिक मानवी वाटणाऱ्या अशा कथांकडे मराठी लेखक वळले. 'मोचनगड' (१८७१), 'अनाथ पांडुरंग', 'जिंजीवास', 'नूरजहान' वगैरे ऐतिहासिक भासणाऱ्या कादंबऱ्या याच कारणामुळें निर्माण झाल्या. याच्या पुढची पायरी म्हणजे रूपांतरित किंवा आधाररचित सामाजिक कादंबऱ्या. १८७९–१८८९ या कालखंडांत लिहिल्या गेलेल्या 'नारायणराव आणि गोदावरी', 'मधली स्थिति', 'वाईकर भटजी' इत्यादि कादंबऱ्या याच प्रकारच्या आहेत.

१८८९ सालीं हरिभाऊंनीं 'पण लक्षांत कोण घेतो?' ही कादंबरी लिहिली आणि स्वतंत्र मराठी कादंबरीचा जन्म झाला. १८८९ पासून १९१४ पर्यंत हरिभाऊ हे मराठी कादंबरीचे अनभिषिक्त सम्राट होते. त्यांनीं दहा सामाजिक व दहा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांचे विषय — स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, केशवपननिषेध, सापत्नभाव इत्यादि— आतां जुने झाले असले तरी कथानकाची कुशल गुंफण, जिव्हाळ्यानें केलेलें स्वभावरेखन आणि समाज सुधारणेची तळमळ या दृष्टींनीं त्या अद्यापिही वाचनीय आहेत. 'मी'मधला भावानंद, 'पण लक्षांत कोण घेतो'मधला शंकरमामंजी, 'भयंकर दिव्यां'तला प्रो. डँडी आणि 'कर्मयोग' मधील चंद्रशेखर हीं पात्रें अत्यंत भिन्न स्वभावाचीं आणि भिन्न परिस्थितींतलीं आहेत! पण यांतल्या प्रत्येकाचें चित्रण सुंदर, सजीव आणि सरस झालें आहे. यमू, सुंदरी, पद्मा आणि नर्मदा या त्यांच्या नायिकाहि अशाच संस्मरणीय आहेत.

हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांत 'गड आला पण सिंह गेला' ही कलादृष्ट्या अत्यंत सुंदर आहे. शिवाय 'उषःकाल' 'रूपनगरची राजकन्या' व 'वज्राघात' या त्यांच्या कादंबऱ्या अजूनही मनोवेधक वाटतात.

पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशांत चांदण्यांचें तेज फिक्कें वाटावें, त्याप्रमाणें आपटे युगांत निर्माण झालेल्या इतर कादंबरीकारांच्या वाङ्मयाची स्थिति झाली. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीच्या 'धाकट्या सूनबाई' 'सुधारणेचा मध्यकाल' इत्यादि कादंबऱ्या प्रसिद्धीच्या वेळीं लोकांना आवडल्या नाहींत असें नाहीं. पण ही माला अगर 'सरस,' 'सुरस' व विशेषतः 'भारत गौरव' या मालांनीं मराठीं कादंबरी लोकप्रिय करण्याला साहाय्य केलें असलें, तरी रसिकांच्या स्मरणांत राहतील अशा फारच थोड्या कृती त्यांनीं निर्माण केल्या.

आपटेयुगाच्या उत्तरार्धांत वि. सी. गुर्जर, ना. ह. आपटे, नाथमाधव, सहकारी कृष्ण इत्यादिकांचा उदय झाला. कृ. के. गोखले, शि. म. परांजपे, सी. के. दामले वगैरे अन्य वाङ्मय–क्षेत्रांत नाणावलेल्या लेखकांनींही कादंबरीच्या क्षेत्रांत पाऊल टाकलें. पण आपटेयुग संपल्याचा स्पष्ट इषारा यांच्यापैकी कुणीही देऊं शकला नाहीं. तें काम प्रो. वा. म. जोशी यांच्या 'रागिणी'नें केलें. १९१४–१९३४ या काळाच्या पहिल्या दशकांतले प्रमुख कादंबरीकार प्रो. जोशी व दुसऱ्या दशकांतले अत्यंत लोकप्रिय कादंबरीकार प्रो. फडके हे होत असें म्हणतां येईल. वामनरावजींच्या कादंबऱ्यांत हरिभाऊंचे कथागुण नसले तरी त्यांनीं

मराठी कादंबरीला तत्त्वचिकित्सेची जोड करून दिली आणि बदलत्या कालमानाप्रमाणें कादंबरीला विचार-प्रधान बनविली, यांत शंका नाहीं. त्यांची चिमुकली 'आश्रमहारिणी' मोहक असून 'रागिणी' व 'इंदु काळे आणि सरला भोळे' या त्यांच्या अनेक दृष्टींनीं एकमेकीपासून भिन्न परंतु सारख्याच आकर्षक अशा कलाकृती आहेत.

वामनरावजी नव्या पिढीचे आवडते कादंबरीकार झाले तेव्हां गुर्जर, ना. ह. आपटे, नाथमाधव व हडप यांचें कादंबरीलेखन अतिशय वेगानें सुरू होतें. विपुल लेखन हा या चारही कादंबरीकारांचा विशेष म्हणतां येईल. त्यांच्या लिखाणापैकीं 'देवता' 'पौर्णिमेचा चंद्र' (गुर्जर कृत रूपांतरें), न पट-णारी गोष्ट' 'भुरळ' पहांटेपूर्वींचा काळोख' (ना. ह. आपटे) व 'डॉक्टर' 'स्वराज्याचा श्रीगणेशा' (नाथमाधव) इत्यादि कृतींचा मराठी कादंबरीच्या इतिहासांत सादर उल्लेख करावा लागेल.

प्रो. जोशी यांनीं मराठी कादंबरीला जशी तत्व-चिकित्सेची जोड दिली, त्याप्रमाणें प्रो. फडके यांनीं तिच्यांत प्रणय–रम्यतेचा प्रवाह आणून सोडला. 'दौलत' सोडली तर त्यांच्या पहिल्या पांचसहा कादं-बऱ्या हेतुदृष्ट्या परिणामकारक वाटत नाहींत. पण आपल्या अप्रतिम कलाविलासानें सर्व अंगोपांगें सज-वून त्यांनीं मराठी कादंबरीला अगदीं आधुनिक (up-to-date) स्वरूप दिलें यांत शंका नाहीं.

१९३३–३४ सालीं 'मुक्तात्मा' 'दोन ध्रुव,' 'हिंदोळ्यावर' 'इंदु काळे व सरला भोळे,' 'उल्का' इत्यादि कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. या कादंबऱ्यांतून स्पष्टपणें दिसणारीं प्रचलित जीवनाचीं प्रतिबिंबें, त्यांतला सहेतुक कलाविलास आणि लेखकांचा विशाल होऊं लागलेला दृष्टिकोन यांच्यामुळें मराठी कादंबरी एक नवें वळण घेत आहे—एका नवीन युगांत प्रवेश करीत आहे हें स्पष्ट झालें. गेल्या सहा वर्षांत प्रसिद्ध झालेल्या सर्व कादंबऱ्यांवर या नव्या युगाची छाया पडली आहे. ती एवढी कीं, प्रो. फडके यांच्या 'उद्धार,' 'आशा,' 'समरभूमि' व 'उन्माद' या कादंबऱ्यांचा थाटही कालमानाप्रमाणें बदलला आहे.

कांटेकोर कालमापन सोडून दिलें तर गेल्या बारा वर्षांत प्रो. वामनराव जोशी व प्रो. फडके या दोन धुरंधर कादंबरीकारांच्या जोडीनें व ज्या लेखकांनीं मराठीचें वैभव वाढवायला हातभार लावला त्यांत डॉ. केतकर, वरेरकर, खांडेकर, विभावरी शिरूरकर माड-खोलकर आणि पु. य. देशपांडे यांचीं नांवें प्रामुख्यानें घ्यावीं लागतील. याशिवाय सौ. शांताबाई नाशिककर, कुमुदिनी प्रभावळकर आणि गीता साने यांच्यासा-रख्या स्त्रीलेखिका व वा. वि. जोशी, कुमार रघुवीर, प्रो. य. ग. नाईक, बोकील, य. गो. जोशी प्रभृति अनेक लेखक यांनीं कादंबरीक्षेत्रांत यथाशक्ति कार्य केलें असून त्यांच्यापैकीं कित्येकांकडून अधिक चांगलें लेखन होईल अशी वाचकांना खात्री वाटत आहे. नुकत्याच उदयाला आलेल्या कादंबरीकारांत प्रो. आंबेकर ('काळे ढग'), बोरकर ('मावळता चंद्र') गलगली ('जीवनाचा पाया'), श्री. र. वा. दिघे ('पाणकळा') इत्यादिकांचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. या सर्व लेखकांचे विविध वाङ्मयगुण पाहिले आणि लेखक ज्या सामाजिक जीवनांतून आपल्या प्रतिभेचें पोषण करतात, त्याच्यांत होणाऱ्या विलक्षण खळबळीकडे लक्ष दिलें म्हणजे येत्या दशकांत (१९४०–५०) मराठी कादंबरी बरीच पुढें जाईल आणि 'कादंबरीचें शिल्प,' 'आधु-निक कादंबरींतले प्रवाह' 'कादंबरीचें तंत्र' इत्यादि अनुषंगिक विषयांवर ग्रंथ निर्माण होण्याइतकें कादंबरी वाङ्मय सजीव संपन्न होईल अशी आशा मनांत उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं.

कानेटकर, शंकर केशव (१८९३–):— एक प्रसिद्ध कवि. टोपण नांव गिरीश. फत्त्यापूर गांवीं २८ आक्टो. १८९३ ला यांचा जन्म झाला. १९११ ला प्रवेश परीक्षा, १९२२ त बी.ए. व १९३० मध्यें एम. ए. या परीक्षांतून गिरीश उत्तीर्ण झाले. कॉलेजचा अभ्यास यांनीं नोकरी करीत करीत केला.

नोकरी करीतच यांनीं अरुणवाचनमाला, खिस्तायन व रविकिरण मंडळाचीं कांहीं पुस्तकें संपादलीं. गिरी-शांनीं काव्यलेखनास १९११ पासून आरंभ करून आतांपावेतों, 'अभागी कमल' 'कला' व 'आंबराई' या तीन खंडकाव्यांना; 'कांचनगंगा' व 'फलभार' या स्फुट कवितेच्या भागांना व 'मराठी नाट्यछटा' व 'काव्यकला' या गद्यग्रंथांना जन्म दिला.

महाराष्ट्रांत आधुनिक काव्यासंबंधीं आत्मियता वाढ-ण्यास यांच्या काव्यगायनाचा अतिशय उपयोग झाला.

पात्रानुरुप भाषा, वात्सल्य, कारुण्य, देशाभिमान, शोक व वीरश्री या भावना त्यांनीं आपल्या काव्यांतून सुंदर रीतीनें चित्रिल्या आहेत. सृष्टिची वर्णनें ते आपल्या काव्यांतून फार सुंदर रीतीनें करतात.

"गिरीशांच्या काव्यस्फूर्तिला भावगीतापेक्षां कथा–कथनात्मक खंड काव्यें जास्त अनुकूल दिसतात. गिरीशांची भाषा त्यांनीं निवडलेल्या विषयाला अनुरूप आहे. ती साधी, कोमल व विनयशील आहे. तींत मुळचें सौंदर्य खुलून उठेल इतकेंच अलंकार आहेत. ती मोकळेपणानें, स्वच्छंदानें, नेहमीच्याच गोष्टी सांगत असतांना, त्यांतील नैसर्गिक सौंदर्य व्यक्त करून नवीन जादू उत्पन्न करते आणि अंत:करण हालवून सोडते. तिच्यांतल्या भावना आणि मनोविकार तिच्या घरंदाज विनयशीलतेंतून रसिकांवर जास्तच परिणाम करितात."

काळे, प्रो. वामन गोविंद (१८७६–):— विख्यात अर्थशास्त्रज्ञ. यांचा जन्म १० एप्रिल १८७६ रोजीं सांगलीस झाला. प्राथमिक शिक्षण म्युनिसिपल शाळेंत झालें. न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेजमध्यें याप्रमाणें सर्व शिक्षण (बी. ए. १९०३, एम्. ए. १९०५) पुण्यास झालें. १९०७ मध्यें डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्यें आजन्म सभासद म्हणून दाखल झाले व इतिहास व अर्थशास्त्र या विषयांचे प्रोफेसर म्हणून काम केलें. १९२१–२३ कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद, १९२३–२५ इंडियन टॅरिफ बोर्डाचे सभासद, १९२५ ते २८ डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे चिटणीस याप्रमाणें त्यांनीं कामगिरी केलेली आहे. राजकारणांत ते प्रागतिक पक्षाचे आहेत. राजकारण, सामाजिक सुधारणा व अर्थशास्त्र या बाबतींत त्यांनी अनेक लेख लिहिलेलें आहेत. याशिवाय अर्थशास्त्रासंबंधीं सोळा पुस्तकें लिहिलेली आहेत. यापैकीं, अर्थशास्त्र, भारतीय अर्थशास्त्र, बँका आणि त्यांचे व्यवहार, Indian Economics, Indian Administration, Constitutional Reforms in India, Currency Reform in India, Indian Industrial and Economic Problems हे ग्रंथ विशेष महत्त्वाचें आहेत. याशिवाय 'विक्षिप्तराव' हे एक प्रहसन त्यांनीं लिहिलेलें आहे. १९३५ पासून 'अर्थ' नांवाचें साप्ताहिक ते चालवीत असतात.

महाराष्ट्रांतील बँका व इतर धंदे करणाऱ्या कंपन्यापैकीं बहुतेक सर्वांशीं त्यांचा डायरेक्टर या नात्यानें संबंध आलेला आहे. उद्योगधंद्यांत महाराष्ट्र अलीकडेच पाऊल टाकूं लागला आहे तरी हें पाऊल सावधगिरीनें पडावें म्हणून सर्व दृष्टींनीं विचार करून सल्ला देण्याची महत्त्वाची कामगिरी रा. काळे यांनीं केलेली आहे. महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांचा इतिहास लिहितांना प्रो. काळे यांना प्रथम श्रेणींत स्थान द्यावें लागेल.

किपलिंग, रुडयार्ड (१८६५—१९३६):— प्रख्यात इंग्रज लेखक व कवी. याचा जन्म मुंबईस ३० डिसेंबर १८६५ रोजीं झाला. शिक्षणासाठीं याला इंग्लंडांत पाठविण्यांत आले होते. १८८२ मध्यें तो हिंदुस्थानांत परत आला. १८८१ मध्यें त्यानें Schoolboy Lyrics हें पुस्तक प्रसिद्ध केलें. लाहोरयेथील सिव्हिल अँण्ड मिलिटरी गॅझेटमध्यें त्यानें कांहीं लघुकथा लिहिल्या. या गोष्टींतून किपलिंग हिंदी जीवन रेखाटीत असे. याचमुळें इंग्लिश वाङ्मयांत तो प्रसिद्धीस आला. १८९० मध्यें त्यानें The Light that Failed ही कादंबरी लिहिली. यानंतर तो इंग्लंडमध्यें जाऊन राहिला. यापुढील चाळीस वर्षांत त्यानें पुष्कळ वाङ्मय लिहिलें व पहिल्या प्रतीचा लेखक म्हणून कीर्ति मिळविली. १९०७ मध्यें त्याला वाङ्मयाचें नोबेल पारितोषक मिळालें. इंग्लिश लोकासंबंधीचा दुर्दम्य अभिमान, साम्राज्यशाहीचा पुरस्कर्ता व हिंदी लोकांचा तिटकारा याबद्दल तो विशेष प्रसिद्ध आहे. Plain Tales from the Hills, Soldiers Three, Wie Willie Winkie, Under the Deodars हे लघुकथा संग्रह, Barrack Room Ballads, The Seven Seas, The Five Nations, The Years Between हे कविता संग्रह. Puck of Pook's Hill, Rewards and Fairies हीं मुलांसाठीं लिहीलेलीं पुस्तकें, Kim ही कादंबरी इत्यादि विशेष प्रसिद्ध आहेत. 'On The Road to Mandalay', 'It', व 'The Vampaire', 'Recessional' या कविता विशेष प्रख्यात आहेत. तो. १८ जानेवारी

१९३६ रोजीं लंडनमध्यें मेला. किपलिंगची ग्रंथसंख्या शंभरहून अधिक आहे.

किर्लोस्कर, बळवंत पांडुरंग उर्फ अण्णा किर्लोस्कर (१८४३–१८८५):—मराठी नाट्यकलेचे जनक आणि लोकप्रिय नाटककार. अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्म १८४३सालीं धारवाड जिल्ह्यांतील गुर्लासूर या गांवीं झाला. त्यांचें प्राथमिक शिक्षण पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें घरींच एका शिक्षकाच्या हाताखालीं झालें. पुढें ते चार वर्षे धारवाड येथें राहिले व मुलकी (७ वी) परीक्षा पास झाले. त्यांच्या आजोबांनीं यानंतर त्यांना पुणें येथें इंग्रजी शिक्षणाकरितां म्हणून ठेवलें होतें. पण याच सुमारास त्यांची नाट्यकलेवर असामान्य आसक्ति जडली व अभ्यासांत प्रगति होणें अशक्य झालें. वडील माणसांच्या इच्छेस्तव त्यांनीं धारवाड येथें राहून वकिलीचा अभ्यास सुरू केला, पण परीक्षेंत अपयश आल्यामुळें त्यांनीं बेळगांव येथें इंग्रजी शाळेंत २५ रुपयांवर शिक्षकाची नोकरी धरली. या ठिकाणीं ते आठ वर्षे होते. परंतु पगार वाढ होईना म्हणून त्यांनीं या नोकरीचा राजीनामा दिला व त्यांच्याशीं नेहमीं बुद्धिबळें खेळणाऱ्या एका फौजदाराच्या वशिल्यानें जमादाराची नोकरी त्यांनीं मिळविली परंतु ती नोकरीहि त्यांना जमेना म्हणून ते शेवटीं रेव्हिन्यू कमिशनरच्या ऑफिसांत नोकरीस राहिले. या ठिकाणींच मराठी रंगभूमीच्या दृष्टीनें एक अकल्पित प्रकार घडला आणि त्यामुळेंच ‘ मराठी संगीत नाटकांचे जनक ’ अशी बहुमानाची पदवी अण्णांना मिळाली. आपल्या ऑफिसबरोबर ते १८८० सालीं पुण्यास गेले होते. त्या वेळेस त्यांनीं उर्दू भाषेंत एका पार्शी कंपनीनें नृत्यगायनासहित केलेलें एक नाटक पाहिलें. इंग्रजी ‘ ऑपेरा ’ पद्धतीचें तें नाटक पाहतांच आण्णांच्या डोक्यांत एकदम कल्पना आली कीं आपल्या मातृभाषेंत असलें एखादें नाटक आपण लिहावें आणि त्याचा प्रयोग करावा. संस्कृतांतील ‘ शाकुंतल ’ नाटक त्यांच्या अतिशय आवडीचें होतें. त्यांनीं ताबडतोब ‘ शाकुंतलाचें मराठी भाषांतर करण्यास सुरुवात केली. प्रथम त्यांनीं पहिल्या तीन अंकाचें भाषांतर केलें आणि त्या अंकांचीं रंगीत तालीम अतिशय लोकप्रिय होतांच त्यांनीं पुढील चारहि अंकांचें भाषांतर केलें. हें नाटक सर्वच ठिकाणीं अतिशय गाजलें. त्यानंतर अण्णांनीं ‘सुभद्राहरण ’ हें सुप्रसिद्ध कथानक घेऊन त्यावर स्वतंत्र असें ‘ संगीत सौभद्र ’ नाटक लिहिलें. त्या नाटकांत ते स्वतः भूमिकाहि करीत असत. ‘ मालती माधव ’ नाटकाचें भाषांतर करण्याविषयींहि त्यांना सांगण्यांत आलें पण तें नाटक अण्णांना मुळींच आवडत नसे. पुढें त्यांनीं ‘ रामराज्यवियोग ’ हें नाटक तीन अंकापर्यंत लिहिलें याच सुमारास त्यांना मधूमेहाचा विकार जडला आणि १८८५ च्या नोव्हेंबर महिन्यांत त्यांचा अंत झाला, त्यामुळें ‘ रामराज्यवियोग ’ हें नाटक अपुरेंच राहिलें.

किर्लोस्करांनीं मराठी रंगभूमीला एक स्वतंत्र, हितकर नाविन्यपूर्ण असें वळण लाविलें, नाट्यकलेला गायनकलेची जोड दिली आणि ‘ शाकुंतल ’ ‘ सौभद्र ’ व ‘ रामराज्यवियोग ’ यासारखीं वाङ्मयगुणांनीं अलंकृत अशीं नाटकें लिहून आपलें नांव चिरस्मरणीय केलें. नादमधुर शब्दरचना, वास्तववादी आणि चटकदार संवाद आणि नाट्यरचनेचें असामान्य कसब यामुळें त्यांचें नांव मराठी वाङ्मयांत खचित अढळपद मिळवील.

किर्लोस्कर, लक्ष्मण काशिनाथ (१८६९–):–



ल. का. किर्लोस्कर

किर्लोस्करवाडीच्या कारखान्याचे संस्थापक व संवर्धक यांचा जन्म १८६९ त धारवाडला झाला. तेथेंच त्यांचें बालपण व इंग्रजी पांच इयत्तेपर्यंतचें शिक्षण झालें. पुढें ते आर्टस्कूलच्या अभ्यासासाठीं मुंबईस आले. तिथला अभ्यासक्रम संपल्यावर त्याच स्कूलमध्यें ते शिक्षक झाले. या ठिकाणीं ते दहा वर्षे शिक्षक होते. तेथील जातीय पक्षपातामुळें यांनीं नोकरी सोडून दिली व ते बेळगांवास आले. येथें बंधूंच्या सहकार्यानें एक सायकलीचें दुकान व शाळा यांनीं सुरू केली. हळूहळू लोखंडी औतें बनविण्यास प्रारंभ केला. शाळेला कारखान्याचें स्वरूप आलें व तो वाढूं लागला. १९०० च्या सुमारास औतें बनविणारा हा हिंदुस्थानमधील पहिलाच कार-

खाना होय. पुढें बेळगांव म्युनिसिपालटींनें जागा काढून घेतल्यामुळें १९१० त कारखाना औंध संस्थानांत सध्यांच्या जागीं आणून सुरू केला. या वसाहतीसच किर्लोस्करवाडी हें नामाभिधान प्राप्त झालें. १९२० मध्यें या कारखान्याचें श्री. लक्ष्मणराव यांच्या चालकत्वाखालीं १६ लक्ष रुपये भांडवलाच्या लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें. या कंपनींत सध्यां एक हजारपर्यंत माणसें काम करतात. कामगारांच्या सुखाकडे विशेष लक्ष देण्याबद्दल यांना दोनदां कैसर-इ हिंद हें रौप्यपदक सरकारनें दिलें. आतां कारखान्यांत औतापासून कोणत्याहि प्रकारची यंत्रसामुग्री तयार होते.

किर्लोस्कर, शंकर वासुदेव (१८९२–):– संपादक, चित्रकार आणि विक्रयशास्त्राचे तज्ज्ञ. यांचा जन्म स. १८९२ त सोलापुरास झाला. प्राथमिक शिक्षणहि तेथेंच झालें. यांचें हायस्कूलचें शिक्षण बेळगांवास झालें.



शं. वा. किर्लोस्कर

पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत एक वर्ष काढल्यावर, चित्रकलेच्या अभ्यासासाठीं लाहोरास पंडित सातवळेकर यांच्याकडे श्रीयुत शंकररावांनीं प्रयाण केलें. १९१४ पासून यांनीं किर्लोस्कर कारखान्यांत काम पाहण्यास आरंभ केला. यांना इंडियन डिफेन्स फोर्समध्यें १९१७ त लष्करी शिक्षण घेण्याची संधि मिळाली. ‘ किर्लोस्कर खबर’ हें मासीक १९२० मध्यें त्यांनीं सुरू केलें. १९२३ मध्यें हे विलायतेस गेले. त्यांनीं तेथें लंडन कॉलेज ऑफ कॉमर्सचा विक्रयशास्त्राचा डिप्लोमा मिळवला व इन्कार्पोरेटेड सेल्स मॅनेजर्स असोसिएशन ऑफ यू. के. या संस्थेचें सभासदत्व संपादन केलें. स्वदेशीं आल्यावर १९३० सालीं ‘ किर्लोस्कर ’ खबर मासिकाच्या जोडीला ‘ स्त्री ’ व १९३४ त ‘ मनोहर ’ हीं दोन नवी मासिकें यांनीं चालू केलीं. औंध दरबारचें सुवर्णपदक व संस्थानच्या असेंब्लीचें सभासदत्व आणि कुंडल तालुका समितीचें अध्यक्षपद यांचा लाभ १९३९त श्री. शंकररावांना मिळाला. विक्रीचीं १२ सूत्रें, व्यापाराचें व्याकरण, टांकाच्या फेकी इ. पुस्तकें त्यांनीं लिहिलीं. महाराष्ट्रांतील प्रमुख तीन मासिकांचें संपादन आणि पुरोगामी विचारसरणी या दोन गोष्टीमुळें ते महाराष्ट्रास विशेष परिचित आहेत.

कुराण:— इस्लाम धर्माचा पवित्र ग्रंथ. महंमद पैगंबराचीं वचनें यांत ग्रथित केलीं आहेत. गॅब्रियल हा देवदूत महंमदाच्या अंगांत येऊन जें सांगत असे तें महंमदाच्या अनुयायांनीं टिपून ठेवलें. हें कुराण एकंदर २३ वर्षें प्रकट होत होतें. हीं वचनें निरनिराळ्या वस्तूवर लिहून ठेविली होती. महंमदपैगंबराच्या निर्वाणानंतर अबूबकरच्या आज्ञेवरून झैदूनें हीं वचनें एकत्र केलीं व पुढें कित्येक वर्षांनीं ओथमन खलिफाच्या कारकीर्दींत कुराणाचें निश्चित स्वरूप ठरलें. धर्म, नीति, कायदा या बाबतींत कुराण हाच मुसलमानांचा एकमेव आधार आहे. कुराणांत गद्यपद्यात्मक ६००० कविता आहेत. तें ११४ सुरामध्यें (अध्याय) विभागलें असून मुसलमान दिवसांतून पांचवेळ करीत असलेल्या फत्यानें (प्रार्थना) कुराणाला सुरवात झाली आहे.

कुलकर्णी, प्रो. कृष्णाजी पांडुरंग (१८९३–):– मराठी भाषा शास्त्रज्ञ ह्यांचा जन्म सातारा जिल्ह्यांत इसलांपूर ह्या गांवीं ५ जानेवारी १८९३ रोजीं झाला. त्यांचें प्राथमिक शिक्षण त्याच गांवीं झालें. दुय्यम शिक्षण फलटण, नाशीक कोल्हापूर ह्या ठिकाणीं झालें. उच्च शिक्षण कोल्हापूर येथील राजाराम कॉलेज व पुणें येथील फर्ग्यूसन् कॉलेजमध्यें झालें. मॅट्रिक्युलेशन परीक्षा १९११, बी. ए. १९१६, एम्. ए. १९१९, बी. टी. १९२५ सालीं अशा त्यांच्या परीक्षा झाल्या. पुढें ते सरकारी नोकरींत शिरले व पुणें, धुळे, सातारा, अहमदाबाद मुंबई वगैरे ठिकाणीं शिक्षक व प्रोफेसर म्हणून नोकरी केली. सध्यां ते मुंबईच्या एल्फिन्स्टन् कॉलेजमध्यें मराठी भाषेचे प्रोफेसर म्हणून काम करतात. पेशवे दप्तरच्या संशोधनकामीं त्यांची नेमणूक मुंबई सरकारनें केली व तें काम त्यांनीं इ. स. १९२९ ते १९३३ पर्यंत केलें. त्यांचे संशोधन दोन विषयांत चालतें— एक भाषाशास्त्र व दुसरा इतिहास, भाषाशास्त्राचा अभ्यास त्यांनीं राजवाडे, गुणे ह्यांच्याजवळ केला. त्यांनीं पुढें दिलेली पुस्तकें लिहिलीं आहेत.

भाषाशास्त्र व मराठी भाषा. संस्कृत नाटकें व नाटककार, राजवाडे धातुकोश, मराठी भाषा—उद्गम व विकास, ऐतिहासिक पत्रव्यवहार, धर्म—उद्गम व विकास. मराठी गद्यविकास. संपूर्ण मराठी व्युत्पत्तिकोश.

सध्यां ते मराठी भाषेचा संपूर्ण व्युत्पत्तिकोश तयार करीत आहेत व त्यासाठीं उत्तेजन म्हणून डॉ. जयकर ह्यांनीं रु. १००० चें पारितोषिक देण्याचें जाहीर केलें आहे. कोशाचें काम पुरें होत आलें आहे. ह्यापुढील संकल्पित पुस्तकांत मराठी वाङ्मय–उद्गम व विकास व मराठ्यांचा इतिहास हे ग्रंथ आहेत. हे पुणें येथें भरलेल्या पांचव्या शारदोपासक संमेलनाचे अध्यक्ष होते. तसेंच नागपूर येथें भरलेल्या मध्यप्रांत संशोधन मंडळाच्या दुसऱ्या संमेलनाचे अध्यक्ष होते.

कृष्णमूर्ती (१८९७—):—थिऑसफीचे एक प्रमुख आधार. जन्म मादनपल्ली (मद्रास) येथें ११ मे १८९७ रोजीं झाला. या मुलामध्यें दैवी अंश आहे या भावनेनें अगदी लहानपणापासून ॲनी बेझंट या बाईनीं कृष्णमूर्तींना आपल्याकडे ठेवून घेतले व संरक्षण संगोपनाची जबाबदारी स्वीकारली. १९१२ ते १९२२ पर्यंत कृष्णमूर्तीचें इंग्लंडमध्यें शिक्षण चालू होतें. १९२२ मध्यें कृष्णमूर्ती कॅलिफोर्नियांत गेले व नंतर त्यांनीं सर्व अमेरिकाभर प्रवास केला. १९३० मध्यें कृष्णमूर्तींनीं आपली सर्व खाजगी मालमत्ता सार्वजनिक कार्याकरितां देऊन टाकली. मनुष्य 'मुक्तात्मा' बनावा हेंच कृष्णमूर्तींच्या उपदेशाचें व विचारांचें सार आहे. थिऑसफीच्या मासिकांतून व स्वतंत्र ग्रंथांतून कृष्णमूर्तींचीं वचनें दिलेलीं आहेत.

कृष्णा:—दक्षिण हिंदुस्थानांतील एक मोठी व पवित्र नदी. हिची पौराणिक दृष्टीनें गायलेली महति 'कृष्णामाहात्म्य पुराण' व 'कृष्णामाहात्म्य वर्णन' या ग्रंथांतून पाहाण्यास मिळते.

गंगायमुना या नद्यांप्रमाणेंच धार्मिक दृष्टीनें कृष्णेला महत्व प्राप्त झालें आहे. कन्याराशीला गुरु आला म्हणजे कृष्णेला भागीरथी भेटावयास येते अशी समजूत असून त्या कालांत क्षौरश्राद्धादि धार्मिकविधि हिच्या कांठीं करण्याची प्रथा आहे.

हिच्या कांठीं कोप्पम या ठिकाणीं चोलांचा चालुक्यांनीं पराभव केला. याचप्रमाणें राक्षसतागडी येथें विजयनगरकर व मुसलमान यांच्यांत युद्ध झालें.

मद्रास प्रांतांत हिला काढलेला कालवा 'बकिंगहॅम कालवा' या नांवानें प्रसिद्ध आहे. या कालव्याइतकेंच बेझवाडा जिल्ह्यांत हिला बांधलेलें एक प्रचंड धरण सर्वश्रुत झालें आहे. गुंटुर व कृष्णा या जिल्ह्यांत हिचे अनेक कालवे काढले आहेत. या कालव्यांनीं कृष्णा व गोदावरी हे जिल्हे जोडले गेले.

ही सह्याद्री पर्वतांत महाबळेश्वर येथें उगम पावते. माहुलीजवळ हिला वेण्णा, कऱ्हाडपाशीं कोयना, हरीपूर येथें वारणा, कुरुंदवाडला पंचगंगा, कल्लोळाजवळ दूधगंगा, विजापूर जिल्ह्यांत घटप्रभा व मलप्रभा या नद्या मिळतात. याशिवाय भीमा, तुंगभद्रा व वझीराबादजवळ मुसी या नद्या तिला भेटतात. ही बंगालच्या उपसागराला बेझवाडा येथें दोन मुखांनीं मिळते. उगमापासून मुखापावेतों हिची लांबी ८०० मैल आहे. कृष्णाथडीचें एकूण क्षेत्रफळ ९७००० चौ. मैल भरतें. उगमापासून माहुलीपर्यंतचा भाग खडकाळ व उथळ असल्यामुळें तो निरुपयोगी आहे. या नदीचें पात्र खोल रुंद असें आहे. ही मुंबई इलाख्यापैकीं सातारा, बेळगांव व विजापूर या जिल्ह्यांमधून वाहते. नंतर ती निजामच्या राज्याच्या सीमेवरून वाहत जाऊन पुढें मद्रास इलाख्यांत प्रवेश करते.

सोलापूर रायचूर या दुआबांत ती ४०८ फूट उंचीवरून खालीं येते. पुराच्या वेळीं या ठिकाणचा देखावा फार बहारीचा दिसतो.

केतकर, डॉ. श्रीधर व्यंकटेश (१८८४–१९३७):—महाराष्ट्र कोशकार, समाजशास्त्रज्ञ, कादंबरीकार, ग्रंथकार व अष्टपैलू पंडित. डॉ. केतकर यांचे वडील व कुटुंब वऱ्हाडांतील असून केतकरांचा जन्म रायपूर गांवीं ता. २ फेब्रुवारी १८८४ रोजीं झाला. वडील लहानपणींच वारल्यामुळें शिक्षण चुलत्याजवळ उमरावतीस झालें. लहानपणापासून बुद्धि कुशाग्र व विवेचक; वाचन विस्तृत; व चौकसपणा जास्त. १९०० सालीं मॅट्रिक झाल्यानंतर कॉलेज शिक्षणासाठीं मुंबईस गेले. तेथें विल्सन कॉलेजांत १९०६ पर्यंत होते. पण बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले नाहींत. याचें बव्हंशीं कारण अभ्यासाव्यतिरिक्त उद्योग व विविध वाचनाचा

व्यासंग. १९०६ त त्यांनीं व कादंबरीकार गडकरी यांनीं मिळून "महाराष्ट्र वाग्विलास" नांवाचें मासिक काढलें. पण केतकर लवकरच अमेरिकेंत गेल्यानें पुढें दोन अडीच वर्षे गडकरी यांनीं हें मासिक चालविलें.

अमेरिकेंत कॉर्नेल विश्वविद्यालयांत केतकर यांनीं बी. ए. (१९०७), एम्. ए. (१९०८) व पीएच्. डी. (१९११) या परीक्षा दिल्या. तिकडे असतांना त्यांनीं पाश्चात्य शास्त्रीय आणि विवेचक पद्धतीच्या अभ्यासाची चांगली संवय लावून घेतली. अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांचें पुष्कळ वाचन केलें व वाङ्मय प्रचारतंत्राचीहि चांगली माहिती करून घेतली. हें ज्ञान त्यांना हिंदुस्थानांत आल्यावर शेवटपावेतों उपयोगी पडलें. १९११ सालीं ते इंग्लंडांत येऊन दोन वर्षे राहिलें. तेथेंच त्यांच्या भावी पत्नी मिस् कोहन यांशीं त्यांचा परिचय झाला.

१९१२ सालीं हिंदुस्थानांत परत आल्यानंतर त्यांनीं सीलोन, ब्रह्मदेश, बंगाल वगैरे भागांत प्रवास करून आपल्याला काय व्यवसाय जमतो याची पाहाणी केली. १९१३-१४ या काळांत ते कलकत्ता विद्यापीठांत पोस्ट ग्रॅज्युएट प्रोफेसर म्हणून राहिले. पण तेथें न पटून ते नागपुरास येऊन राहिले व महाराष्ट्रीय ज्ञानकोश तयार करण्याच्या खटपटीस लागले. १९१६ त त्यांनीं त्या साठीं एक लिमिटेड कंपनी काढली व संपादकीय कार्य नेटानें सुरूं केलें. पुढें लवकरच कंपनी पुण्यास हलवून तेथें १९२७ सालीं तेवीस भागांत हें प्रचंड वाङ्मयकार्य पुरें केलें. त्यानंतर ज्ञानकोशासाठीं जमविलेला सर्व संच मोडला व त्यांनीं एकट्यानींच 'प्राचीन महाराष्ट्र' हा चतुर्खंडात्मक ग्रंथ तयार करण्याचें मोठें काम अंगावर घेतलें. याचा एक खंडच पुरा झाला व ते १० एप्रिल १९३७ रोजीं एकाएकीं मधुमेहाच्या विकारामुळें वारले.

महराष्ट्रांत डॉ. केतकर यांनीं कोशयुग सुरू केलें यांत शंका नाही. व्यापारी तत्वावर व पद्धतीवर मोठी वाङ्मयकार्यें पार पाडतां येतात हें त्यांनीं प्रत्यक्ष दाखवून दिलें. वाङ्मयाचा खप कसा करावा याचे धडे त्यांनीं महराष्ट्रांस दिले म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचें अनुकरण त्यांचे संपादकीय सहकारी श्री. दाते, श्री. कर्वे श्री. चित्रावशास्त्री, वे. मू. धुंडिराजशास्त्री बापट इ. मीं करून त्यांच्या प्रमाणेच कोश काढले. व्यावहारिक ज्ञानकोश, व्यायाम ज्ञानकोश, धर्मकोश, वगैरे कोशही त्यांच्या स्फूर्तीनें चालले आहेत. अशीं कामें करण्याची धमक महाराष्ट्रांत उत्पन्न झाली याचें सर्व श्रेय डॉ. केतकर यांस दिलें पाहिजे.

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाखेरीज त्यांनीं बरेच ग्रंथ रचिले आहेत व त्यांचेंहि महत्व कमी नाहीं. History of Caste in India, Hindustan, Indian Economics हे तीन इंग्रजी ग्रंथ ज्ञानकोशापूर्वीचे, त्यांच्या पीएच्. डी. च्या अभ्यासाचें प्रत्यक्ष फल म्हणून होत. वृत्तपत्रांतील लेखांचा 'संकीर्ण लेखसंग्रह' म्हणून एक ग्रंथ १९१५ त श्रुतिबोधमंदिरानें प्रकाशित केला. 'गोंडवनांतील प्रियंवदा,' 'परागंदा' 'आशावादी', 'गांवसासू' 'ब्राह्मणकन्या' 'विचक्षणा' व 'भटक्या' या त्यांच्या सात कादंबऱ्या समाजशास्त्राच्या दृष्टीनें फार महत्त्वाच्या आहेत. समाजांतील निरनिराळे नाजूक प्रश्न घेऊन त्यांवर त्यांनीं गंभीर प्रकाश टाकला आहे व समाजहितैष्यांना यांत विचार करावयास लाविलें आहे. कादंबरी वाङ्मयांत त्यांच्या कादंबऱ्यांना स्वतंत्र स्थान द्यावें लागत आहे. 'भारतीय समाजशास्त्र' हा ग्रंथ नवभारत ग्रंथमालेंत प्रसिद्ध झाला आहे. राजकारणावरहि त्यांचे स्वतंत्र व विक्षिप्त वाटणारे विचार असत व ते त्यांनीं 'निःशस्त्रांचें राजकारण' व 'Victorious India' या पुस्तकांत ग्रथित केले आहेत. ज्ञानकोश आटोपल्यानंतर 'माझें बारा वर्षांचें काम' म्हणून त्यांनीं भावी कोशकारांसाठीं स्वानुभवांचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला. हा आत्मचरित्रपरहि आहे.

ज्ञानकोशमंडळाच्या कार्याला सातत्य राहावें व कोशांत न आलेले विषय देण्यास जागा असावी म्हणून त्यांनीं 'विद्यासेवक' मासिक व 'पुणें समाचार' हें दैनिक सुरूं केलें. विद्यासेवकांतील लेख चांगले संशोधकीय व विविध विषयांवरील टिपण्यांच्या स्वरूपाचे असत. याच मासिकांतून डॉक्टरांच्या बहुतेक कादंबऱ्या, 'महाराष्ट्रियांचें काव्यपरीक्षण' 'निरनिराळ्या देशांतील कहाण्या' हीं पुस्तकें बाहेर पडलीं. डॉ. केतकरांचे कांहीं उत्कृष्ट लेखहि यांतून पहावयास सांपडतात. ते जुन्या पठडींतले कविहि होते. 'गोविंदपौत्र' या टोपण नांवानें विलायतेंत असतांना त्यांनीं कांहीं कविता रचिलेल्या आहेत. याप्रमाणें साहित्यक्षेत्राच्या निरनिराळ्या

प्रांगणांतून ते फिरले व प्रत्येक ठिकाणीं आपली छाप त्यांनी ठेविली.

त्यांना हिंदुत्व, ब्राह्मण्य, स्वभाषा, स्वदेश यांचा दांडगा अभिमान होता. त्यांचीं भाषणें आणि लेख यांनीं रसरसलेली आढळतील त्यांची वृत्ति अत्यंत निर्भीड आणि सडेतोड असे. यामुळें पुष्कळ थोर मंडळींत त्यांच्याबद्दल आदर वसत नसे. तथापि त्यांच्या साहित्यसेवेबद्दल महाराष्ट्रानें त्यांना १९३१ सालीं हैद्राबादेस भरलेल्या संमेलनाचें अध्यक्षपद दिलें व मोठा गौरव केला. त्यांचे विचार व आचार शिष्टसमाजाला विलक्षण वाटत तथापि तरुणवर्ग त्यांच्या बद्दल आदर बाळगून असे; कारण त्या वर्गाला ते स्फूर्ति आणि उत्तेजन देत.

डॉ. केतकर यांचें व्यक्तिमत्व इतके मोठें आहे कीं महाराष्ट्र अद्याप तें पूर्णपणें ओळखूं शकला नाहीं. जों जों काल जाईल तों तों केतकरांचे विचार आगरकरांच्या बाबतींत झालें त्या प्रमाणेंच, समाज पचवूं लागेल. त्यांची प्रचंड अष्टपैलू विद्वत्ता आणि समाजावलोकन, त्यांची कार्यतत्परता आणि चिकाटी, त्यांची निर्भयवृत्ति आणि निरभिमानता, त्यांची आर्थिक दृष्टि आणि सहकार्याची पद्धति हीं सर्व लक्ष्यांत घेतल्यास राजारामशास्त्री भागवत, माधवराव कुंटे, इतिहासाचार्य राजवाडे यांच्या पहिल्या पंक्तिला डॉ. केतकरांना बसवावें लागेल.

केमालपाशा, गाझी मुस्ताफा (१८८२–१९३८):– टर्कीचा उद्धारकर्ता, सेनापती व पहिला अध्यक्ष. याचा जन्म सॅलोनिक या गांवीं एका अबकारी अधिकाऱ्याच्या पोटीं १८८२ मध्यें झाला. याचें शिक्षण बेताचेच झालें होतें. स्वभावानें हा एकंदरींत उनाडच होता. पण पुढें हा सैन्यांत शिरला व लौकरच सैन्याधिकारी बनला. तरुण क्रांतिकारक तुर्कांच्या चळवळींत यानें महत्त्वाचा भाग घेतला होता. पुढें १९१५ मध्यें गॅलीपोलीला पाठविलेल्या सैन्याचें नेतृत्व याच्याकडे आले व हा सेनापती झाला. या वेळेपासूनच तो मुस्ताफा केमालपाशा म्हणून ओळखला जाऊं लागला. कॉकेशस, हेजाज व पॅलेस्टाइनमध्यें यानें महायुद्धांत कामगिरी केली. पण शेवटीं जर्मनीचा पराभव होणार असें पाहून त्यानें टर्कीच्या अंतर्गत कारभारांत जर्मनांना हात घालूं देण्यास मनाई केली. १९१९ मध्यें अनातोलिया प्रांतांत 'निःशस्त्रीकरण' करण्यासाठीं त्याला पाठविलें असतां त्यानें राष्ट्रीय पक्षाशीं सहकार्य करून चळवळ आरंभिली. त्यानें राष्ट्रीय सभा बोलावून आशिया मायनरमध्यें उतरलेल्या ग्रीकांच्या विरुद्ध युद्ध पुकारलें. तेव्हां सुलतानानें त्याला हद्दपार केलें, पण टर्कीच्या पार्लमेंटच्या राष्ट्रीय वृत्तीच्या सभासदांनीं 'नॅशनल असेंब्ली' आंगोरा येथें भरवून केमालला अध्यक्ष निवडलें. १९२१ मध्यें साकारियाची लढाई त्यानें जिंकली. या लढाईत जय मिळाल्यामुळें असेंब्लीनें त्याला 'गाझी' ही पदवी दिली. १९२२ मध्यें सुलतानी व खलीफाशाही त्यानें झुगारून दिली. व २९ आक्टोबर १९२३ रोजीं त्यानें टर्की हे रिपब्लिक (लोकशाही राष्ट्र) असल्याचें जाहीर केलें. १९२७, १९३१ व १९३५ मध्यें त्याची पुन्हां अध्यक्ष म्हणून निवडणूक झाली. तो वस्तुतः टर्कीचा डिक्टेटरच होता आणि म्हणूनच कांहीं अकल्पित सुधारणा टर्कींत घडून आल्या. त्यानें धर्म व सरकार यांचा संबंध तोडला. अरबी लिपी टाकून इंग्लिश लिपी स्वीकारली, पडदा पद्धती कायद्यानें बंद केली. एक पत्नित्वाचा कायदा केला. स्त्रीपुरुषांना युरोपियन कपड्यांची दीक्षा दिली. फेज टोपीला कायद्यानें बंदी करून त्यानें आडनावें लावण्याची प्रथा सुरूं केली. युरोपियन खेळ सुरूं केले. राज्यपद्धतींत युरोपियनांचें अनुकरण केलें. स्त्री शिक्षणाची सक्ती केली. सारांश टर्कींत त्यानें अंतर्बाह्य सुधारणा केल्या. लतीफी हनून या सुंदर व इंग्लंडांत उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रीशीं त्यानें १९२३ मध्यें विवाह केला होता. पण १९२७ मध्यें त्यानें घटस्फोट घेतला. नंतर त्यानें लग्न केलें नाहीं. यकृताच्या विकारानें तो १० नोव्हेंबर १९३८ रोजीं वारला. त्याला मागें मूल बाळ कांहींच नाहीं.

केळकर, नरसिंह चिंतामण (१८७२–):— श्री. न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांचें नांव माहीत नाहीं असा सुशिक्षित महाराष्ट्रीय विरळाच! मराठी वाङ्मयोद्यानांत विविध प्रकारच्या रंगीबेरंगी नि सुवासिक फुलझाडांची रेलचेल उडवून देऊन त्याला शोभा आणणारे रसिक, चतुर आणि विद्वान् मालाकार, हिंदुस्थानचे अनभिषिक्त सम्राट् कै. लोकमान्य टिळक यांचे पट्टशिष्य व त्यांच्या पावलावर पाऊल टाकून

हिंदुस्थानच्या राजकारणांत उडी घालणारे एक धीमे मुत्सद्दी, कुशल, साक्षेपी व सर्वग्राही बुद्धिमत्तेचे संपादक, महाराष्ट्रांतील विविध चळवळींशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पण जिव्हाळ्याचा संबंध ठेवणारे एक संघटक या अनेक दृष्टींनीं त्यांना आज अवघा महाराष्ट्र ओळखीत आहे.



न. चिं. केळकर.

श्री. केळकर यांचा जन्म शके १७९४ श्रावण वद्य ६ ला (इ. स. २४ ऑगस्ट १८७२) रोजीं मिरज संस्थानांतील मोडनिंब या गांवीं झाला. हे आश्वलायन शाखीय शांडिल्य गोत्री कोंकणस्थ चित्पावन ब्राह्मण. कोंकणांतील वानिवडें हें त्यांचें मूळ गांव. त्यांचें कोंकणचें वेड विलक्षण आहे. त्यांच्या आवडत्या कोंकणचें वातावरण निदान आठवण तरी वारंवार मनांत घोळत रहावी असेंच त्यांना सदैव वाटत असतें.

त्यांचें शिक्षण एकाच ठिकाणीं झालें नाहीं. मिरज, कोल्हापूर, पुणें, मुंबई इत्यादि ठिकाणीं त्यांना शिक्षणासाठीं जावें लागलें. अर्थात् या प्रवासाचा फायदाही त्यांनीं आपलें ज्ञान वाढविण्यासाठीं केला. आत्मचरित्रांत त्यांनीं या सर्व शाळाकॉलेजांतील आपले अनुभव दिलेले आहेत. इ. स. १८९१ मध्यें ते बी. ए. झाले व नंतर इ. स. १८९४ मध्यें ते एल्. एल्. बी. झाले.

त्यानंतर सातारला कायमचे स्थायिक होऊन वकिली करण्याचा त्यांचा मानस होता. त्याप्रमाणें ते वागले असते तर उत्तम वकिल म्हणून त्यांची कीर्ति होऊन त्यांना भरपूर पैसाही मिळाला असतां. पण विधिघटना विलक्षण होती. त्यांच्या दैवानें त्यांच्यासाठीं दुसरेंच कांहीं योजलें होतें. त्यांनीं ठरविल्याप्रमाणें इ. स. १८९५ मधील जून मध्यें त्यांनीं वकिलीला आरंभही केला होता. पण कै. लोकमान्य टिळकांना 'मराठा' पत्रांत लेखनाचें काम करण्यासाठीं व त्यांचा लॉ क्लास चालविण्यासाठीं एका होतकरु व हुशार तरुणाची आवश्यकता असल्यामुळें त्यांनीं यांना बोलावणें पाठविलें. श्री. केळकरांनीं पुष्कळ विचार केला आणि शेवटीं १७ मार्च १८९६ या वर्षी ते या संस्थेंत आले. 'केसरी व मराठा' या वर्तमानपत्रांचे संपादक ते बरेच वर्षें होते.

'मला पुष्कळ लिहावयाची हौस होती म्हणून मी टिळकांना होकार दिला.' असें त्यांनीं म्हटलें आहे. त्यांना जी स्वस्थता लाभली तिचा त्यांनीं भरपूर उपयोग करून घेतला. पंधरा वीस हजार पृष्ठें सहज भरतील इतकें विपुल लेखन त्यांनीं गेल्या तीसपस्तीस वर्षांत केलें आहे. नाटककार, निबंधकार, लघुकथालेखक, कादंबरीकार, चरित्रकार, राजकारणावरील तौलनिक लेखक, विनोदीलेखक, भाषांतरकार, कवि इत्यादि सर्व दृष्टीनें त्यांचा दर्जा फार मोठा आहे. त्यांचा 'हास्य-विनोद मिमांसा' हा ग्रंथ त्यांच्या चिंतनशीलतेची व खोल अभ्यासाची साक्ष देतो, तर 'टिळकचरित्र' त्यांच्या निबंध लेखनशैलीची साक्ष पटवितें. त्यांच्या कादंबऱ्यांत व लघुकथांत नेहमींच कांहींतरी नाविन्य आढळतें. त्यांनीं सबंध हिंदुस्थानचा प्रवास केलेला आहे. इंग्लंडच्याही एक दोन वाऱ्या केलेल्या आहेत. आपल्या सतत व दीर्घ व्यासंगानें, अचूक तर्कपद्धतीनें व सूक्ष्म समाजावलोकनामुळें त्यांना आपल्या कादंबऱ्यांतून इतका रंग भरतां येतो. महाराष्ट्र जनतेनें त्यांना साहित्य संमेलनाचे अध्यक्ष करून 'साहित्यसम्राट' ही पदवी देऊन त्यांचा योग्य रीतीनें गौरव केला आहे.

संपादक या नात्यानें केळकरांची थोरवी इतकी मोठी आहे, कीं श्री. दि. वा. दिवेकरांना 'संपादकानां केळकरोऽहं' असें वचन बनविण्याचा मोह प्राप्त झाला. संपादकाला लागणारी सर्वग्राही विशाल बुद्धिमत्ता, समाजाची नाडी व मनःप्रवाह ओळखण्याचें कौशल्य, निर्भयता, स्वतःची मतें, तर्कनिष्ठा इत्यादि गोष्टी श्री. केळकरांमध्यें प्रामुख्यानें आढळून येतात. पांढरा रंग जसा सात मनोहर रंगांच्या मिश्रणानें बनलेला असतो त्याचप्रमाणें केळकरांचें संपादकीय धवल यश या त्यांच्या बुद्धिमत्तेच्या विविधरंगी दालनानें मिळून निर्माण झालें आहे. १४ सप्टेंबर १८९७ त कै. लोकमान्यांना राजद्रोहाच्या खटल्यांत अठरा महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली त्यावेळीं

कांहीं दिवसांच्या अंतरानें श्री. केळकर 'केसरी व मराठा' पत्राचे संपादक झाले. त्यांच्या आयुष्यांतील लेखनखंड, राजकीयखंड व संपादकीयखंड हे तीनही एकाच वेळीं सुरू झाले. निरनिराळ्या आयुष्यखंडांत त्यांनीं तीं कार्यें केलीं नाहींत. ६ सप्टेंबर १८९८ पर्यंत संस्था कर्जाच्या बोजांत सांपडली असतांनाहि त्यांनीं धैर्यानें हीं पत्रें चालविलीं आणि सांधा इतका बेमालूम जुळविला कीं लोकमान्य सुटून आल्यावर सुद्धां ४ जुलै १८९९ पर्यंत संपादक म्हणून त्यांचेंच नांव लागत होतें. यानंतर इ. स. १९०८ मध्यें लोकमान्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली आणि मंडालेला त्यांची रवानगी झाली. इ. स. १९०८ ते १९१४ पर्यंत लोकमान्य मंडालेला होते. तेव्हां संपादकीय धुरा तात्यासाहेबांवरच पडली.

त्याकाळीं केसरी आणि मराठा या दोन वर्तमानपत्रांचे संपादक होणें म्हणजे सुळावरची पोळी होती. पण निर्भयतेनें त्यांनीं आपल्या मार्गदर्शकाच्या पावलावर पाऊल टाकून पत्रांचें उत्तरदायित्व घेतलें. लोकमान्यांची जबरदस्त पुण्याई पाठीमागें होतीच तिला आपल्या बुद्धिमत्तेची, मुत्सद्दीपणाची नि कौशल्याची जोड देऊन त्यांनीं त्या पत्रांत विविधता आणली.

याचवेळीं त्यांचें राजकीय आयुष्य सुरू झालें. त्या वेळचा काळ विलक्षण होता. सरकारची भेदक नजर त्यावेळीं अखिल हिंदुस्थानांतील चळवळयांकडे लागलेली होती. दुष्काळ निवारणाची चळवळ, हारिसचीं जुलमीं कारस्थानें, प्लेग, दंगे याविषयीं केसरींतून जहाल लेख येत असत. दुष्काळावर टीका केसरींतून प्रसिद्ध झाली त्याचवेळीं वास्तविक टिळकांना तुरुंगांत जावें लागलें असतें. पण त्यांच्या मदतनिसांवर खटले होऊन ते सुटले. शिवाजीमहाराजांच्या उत्सवाला कै. टिळकांनीं चालना दिली आणि त्यानंतर सात आठ दिवसांनीच रँडचा खून झाला. रँडचा खून म्हणजे सरकारी रोषाच्या दारुच्या कोठारावर पडलेली शेवटची ठिणगीच.

१९०४ मध्यें वंगभंगाची चळवळ झाली. १९०७ सालीं जहाल आणि मवाळांच्या मध्यें भयंकर तेढ निर्माण झाली आणि तिचें सुरतेच्या मोडलेल्या काँग्रेसमध्यें पर्यवसान झालें. १९०८ सालीं मुझफरपूरला बॉंब गोळा पडून सर्वत्र जास्तच असंतोष माजला व बंगल्यांतील 'युगांतर' पत्राप्रमाणें केसरीच्या संपादकानांही कारावास होण्याचा प्रसंग आला. टिळक तुरुंगांत गेले त्यांचा तुरुंगवास ही केळकरांच्या राजकारणी आयुष्याची नांदी झाली. त्यावेळीं २६ जुलै १९०८ च्या मराठ्यांत तात्यासाहेबांचा लेख झळकला आणि त्यांना हजार रुपये दंड, खर्चाचे दोनशें रुपये, चौदा दिवसांची शिक्षा व कोर्टाची माफी मागेपर्यंत तुरुंगवास इतकी शिक्षा झाली.

या पुढील इ. स. १९२० पर्यंतच्या काळांत तात्यासाहेबांनीं परिस्थितीची मर्यादा ओळखून लो. टिळकांचें राजकारण पुढें चालविण्याचें धोरण सतत कायम ठेवलें. मवाळ पक्षाशीं झालेला समेट, राष्ट्रीय सभा काबीज करण्यासाठीं केलेलें प्रयत्न, स्वराज्यसंघाची स्थापना व प्रचार, डॅमोक्रेटिक पार्टीची स्थापना, इंग्लडांत गेलेलें राष्ट्रीय सभेचें शिष्टमंडळ इत्यादि कोणतीहि चळवळ घेतली तरी त्यांत तात्यासाहेब लोकमान्यांचे उजवे हात होते. १ ऑगस्ट १९२० त लोकमान्यांचा अंत झाला. महात्माजींच्या नवतत्त्वाचा अखिल भरत खंडांत फैलाव होऊं लागला. काँग्रेसचे महात्माजींच्या अनुयायांचें खादीचें अवास्तव स्तोम, कायदेमंडळें व शिक्षणसंस्था यांवरील बहिष्कार, आणि वकीलांची व सरकारी अधिकाऱ्यांची टवाळी यावरून दोन पक्षांत रणें माजलीं. तात्यासाहेबांनीं गांधींचे दोष आपल्या तर्कशुद्ध विचारसरणीनें दाखवून दिले.

कौन्सिलांत प्रवेश करण्याविरुद्ध काँग्रेसचा विशेष कटाक्ष, तर तात्यासाहेबांचा कौन्सिलनिषेधाविरुद्ध विशेष कटाक्ष. पण ही गोष्ट मात्र येथें ध्यानांत ठेविली पाहिजे कीं कायदेकौन्सिल हीच इतिकर्तव्यता असें केळकरांनीं कधींच मानलें नाहीं. पण कायदेकौन्सिलें हीं स्वराज्याच्या झगड्यांतील युद्धभूमि व लष्करीठाणीं होत व या लष्करीठाण्यांची नाकेबंदी करून सरकारास नामोहरम केलें पाहिजे व ज्या बाबतींत या लष्करीठाण्यांचा उपयोग जनतेला करून देतां येणें शक्य आहे त्या बाबतींत जरूर तेथें व जरूर तितके करूनही जनतेचा फायदा करून द्यावा, हें तत्व काँग्रेसच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांना मान्य करण्यास त्यांनीं लाविलें

१९२४ सालीं कोर्टाची बेअदबी केल्याबद्दल दुसरा खटला त्यांच्यावर झाला. शार्मन व वॉकर नांवाच्या दोन सोजिरांच्या हातून मारल्या गेलेल्या दोन

सोजिरांना मॅजिस्ट्रेटनें दोषमुक्त केलें. त्या खटल्यावर ६ मे १९२४ च्या केसरींत त्यांनीं कडक टीका केली त्यावेळींही त्यांना पांचहजार रुपये दंड झाला.

इ. स. १९२० ते आजतागायतचा काळ हा हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीच्या इतिहासांत 'गांधी युग' म्हणून ओळखला जाईल यांत शंका नाहीं. महात्माजींचें अलौकिक व्यक्तिमत्व लक्षांत घेतां ते या मानास सर्वथैव पात्र आहेत यांतहि शंका नाहीं; पण गांधी हे महात्मा असले तरी मनुष्य आहेत ही गोष्ट ओळखणाऱ्या निवडक राष्ट्रीय पुढाऱ्यांत श्री. केळकर यांची गणना केली पाहिजे. मतभेद असतांही महात्माजींच्या महात्म्याचा श्री. केळलर यांनीं केवढा गौरव केला हें श्री. केळकर यांनीं म. गांधीवर अहमदाबाद येथें झालेल्या खटल्याचें जें वर्णन केलें आहे त्यावरून दिसून येईल. मतभेद असतांही महात्माजींच्या प्रयोगास संधि देण्यास श्री. केळकर यांनीं कमी केलें नाहीं पण गांधीतत्वज्ञानाच्या ओघांत अनेक पुढारी वाहवत गेले असतां—त्यांत अनेक महाराष्ट्रीयही होते व आहेत व त्यांनीं पगडी टाकून गांधी टोपी घातली!—आपली तर्ककर्कश विवेचनशक्ति चालवून प्रसंगी लोकमताचा रोष सोसूनही गांधींवादाची अव्यवहार्यता सतत दाखवून देण्याचें कार्य उभ्या हिंदुस्थानांत जर कोणी केलें असेल तर तें श्री. केळकर यांनींच. आमच्या मतें हीच श्री. केळकर यांची मोठी राजकीय कामगिरी होय,

त्यांनीं कायदेमंडळें ताब्यांत घेतलीं, सायमन कमिशनवर बहिष्कार घातला, व सत्याग्रहही केला. श्री. ल. ब. भोपटकर यांनीं म्हटल्याप्रमाणें 'त्यांच्या राजकारणांत मेघांचा गडगडाट व विजांचा चमचमाट कदाचित् नसेल; परंतु त्यांत गंगौघाचा गंभीर घोष व शुक्राच्या चांदणीचा तेजस्वीपणा निःसंशय आहे.'

केळकर महाराष्ट्रांतील धिमे मुत्सदी आहेत, यशस्वी संपादक आहेत, लोकसेवा करणारे समाजसुधारक आहेत आणि प्रथित यश साहित्यिक आहेत. त्यांनीं शेकडों संस्था चालविल्या आहेत. आणि त्यांना मदत केली आहे. संस्थानीराजकारणांतही त्यांचा हात आहे. विमाकंपन्या, उद्योगधंदे, कारखाने, शिक्षण देणाऱ्या संस्था, सामाजिक व राजकीय कार्य करण्याऱ्या संस्था संशोधकमंडळें, या सर्वांत तात्यासाहेबांचा हात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें असतोच.

सारांश श्री. केळकर हे महाराष्ट्राचे सव्यसाची पुरुष आहेत. एवढें सव्यसाचित्व संपादन केलेला पुरुष महाराष्ट्रांत तरी आज दुसरा कोणीही आढळत नाहीं. रा. केळकरांचे वाङ्मय 'समग्र केळकर' या ग्रंथांत छापलें असून त्या शिवाय 'कावळा आणि ढापी' 'कोंकणचा पोर' व आत्मचरित्र हें वाङ्मय प्रकाशित झालेलें आहे.

केळूसकर, कृष्णराव अर्जुन (१८६०–१९३४):— ऐतिहासिक साधनांचा अभ्यास करून चिकित्सक दृष्टीनें लिहिणारे पहिले मराठी शिवचरित्रकार. सावंतवाडी संस्थानांतील केळूस गांवीं २० ऑगस्ट १८६० रोजीं यांचा जन्म झाला. मराठी शिक्षण सावंतवाडीस झालें पण इंग्रजी शिक्षण घेण्यास यांना मुंबईला जावें लागलें. येथील विल्सन हायस्कूलमधून ते मॅट्रिक झाले. पुढचें उच्च शिक्षण त्यांना गरिबीमुळें घेतां आलें नाहीं. पुढें यांनीं नोकरी करण्यास आरंभ केला. इस्त्रायली स्कूलमध्यें यांनीं ४॥ वर्षें नोकरी केल्यावर यांची कायमची नेमणूक विल्सन हायस्कुलांत झाली. या संस्थेंत ३९ वर्षें शिक्षणकार्य करून ते सेवानिवृत्त झाले.

शिक्षणाबरोबरच त्यांचे इतरहि व्याप चालू होतेच. या व्यापांत त्यांचा अनेक विषयांचा व्यासंग, वर्तमानपत्राचें संपादन व ग्रंथलेखन हे व्याप प्रमुख होत. हे 'जगतवृत्त' या पत्राचे सात वर्षें संपादक होते. या कालांत त्यांनीं वर्तमानपत्रांत प्रकरणशः लिहून अनेक ग्रंथांना जन्म दिला. या ग्रंथांत तुकाराम व गौतमबुद्ध यांचीं चरित्रें व नीतिबोध मालेचे चार खंड यांचा समावेश होईल. नीतिबोधाचे चारहि खंड बालवाङ्मयाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचे आहेत. या शिवाय यांनीं फ्रान्सचा जुना इतिहास, सेनेका व एपिक्टेटस् यांचीं बोधवचनें, उपनिषदांचें भाषांतर शिवाजीचें चरित्र, जुन्या कराराचें भाषांतर, लेख व भाषणें यांचा विचारसंग्रह व आत्मचरित्र हे ग्रंथ लिहून हातावेगळे केले. आत्मचरित्र अद्याप प्रसिद्ध व्हावयाचें आहे.

त्यांच्या या वाङ्मयसेवेबद्दल मुंबईकरांनीं त्यांना १९३४ त भरलेल्या मुंबई प्रांतिक साहित्य संमेलनाचें अध्यक्षस्थान देऊन आपली गुणग्राहकता व्यक्त केली. हे १९३४ सालीं आक्टोबरच्या १४ तारखेला मरण पावलें.

कोल्हटकर, अच्युत बळवंत (१८७९–१९१३):— सुप्रसिद्ध वर्तमानपत्रकार आणि चोखंदळ व निर्भीड

लेखक. श्री. कोल्हटकर यांचा जन्म सातारा जिल्ह्यांत कृष्णानदीचे कांठीं वाई या गांवीं ता. १ ऑगस्ट १८७९ रोजीं झाला. ते कोकणस्थ ब्राम्हण होत. अच्युतराव हे विद्यार्थीदशेंत कधींच फारसे चमकले नाहींत पण त्यांचा वाचनाचा नाद असामान्य होता. विद्यार्थीदशेंतच त्यांनीं रामायण, महाभारत, दासबोध इत्यादि ग्रंथ वाचून काढले होते. वयाच्या पंधराव्या वर्षीं म्हणजे १८९४ सालीं ते मॅट्रिक झाले आणि पुढें दहावर्षांनीं १९०४ सालीं एल्एल्. बी झाले. कॉलेजांत असल्यापासूनच त्यांना सार्वजनिक आयुष्याची व राजकारणाची गोडी लागली होती. त्या वेळेस सार्वजनिक आयुष्यांत आपल्या प्रखर तेजानें चमकणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या विचारसरणीचा आणि त्यांच्या 'केसरी'चा अच्युतरावांच्या तरुण, विकारवश अंत:करणावर तात्काळ परिणाम झाला आणि देशसेवेचें व्रत त्यांनीं या तरुण वयांतच अंकिकारलें. लोकमान्य टिळकांनां ते आपले राजकीय गुरु मानूं लागले. अच्युतराव वकिलीची परिक्षा पास झाले होते, व त्या व्यवसायाकडे त्यांच्या मनाचा कल नव्हता. त्यामुळें सातारा येथें दोन वर्षें शिक्षकाचें काम केलें, पण अखेरीस वडील माणसांच्या आग्रहास्तव त्यांनीं नागपूरला वकिली सुरू केली, पण ती फार काळ चालविली नाहीं. राजकारणानें त्यांचें जीवन ग्रासून टाकलें होतें. नागपूरच्या 'देशसेवक' पत्रांत त्यांनीं राजकारणावर लेख लिहिण्यास सुरवात केली; येवढेंच नव्हे तर त्या वर्तमानपत्राचे ते संपादक झाले. त्यांनीं राजकारणांत टिळकपक्षाला उचलून धरण्याचें ठरविलें व टिळकांच्या राजकारणाचा पुरस्कार केला. हा काळ १९०७ चा होता. जहाल-मवाळांतीलमतभेद वाढले होते आणि त्यांच्यांतील वैमनस्य दुणावलें होतें. अच्युतरावांचे वडील वामनराव हे मवाळपक्षांतील एक प्रमुख गृहस्थ मानले जात आणि साहजिकच टिळकांविषयीं त्यांच्या मनांत एक विलक्षण अढी होती. पितापुत्रांतील मतभेद शेवटीं येवढ्या थराला गेले कीं अच्युतरावांनीं आपल्या वडिलांचें नांवहि लावायचें सोडलें आणि ज्या लोकमान्य 'बलवंत' टिळकांना त्यांनीं राजकीय पिता मानलें होतें त्यांचेंच नांव पितृस्थानीं लावून ते अच्युत 'बलवंत' कोल्हटकर झाले! पण या टिळक भक्तीबद्दल त्यांना प्रायश्चित्त भोगावें लागलें. १९०८ सालीं टिळकांना ६ वर्षांची शिक्षा झाली त्याबरोबरच अच्युतरावांनाहि पावणेदोन वर्षांची शिक्षा झाली. राजकीय क्षितिजावरील या नवोदित ताऱ्याचें तेज सरकारच्या दृष्टीला सहन झालें नव्हतें हें उघड होतें. तुरुंगांतून सुटुन आल्यानंतर अच्युतरावांची स्थिति मोठी विचित्र झाली आणि किंकर्तव्यमूढ स्थितींत त्यांनीं अज्ञातवासांत मद्रास येथें दोन वर्षें काढलीं. पुढें १९१२ सालीं ते पुन्हां मुंबईस आले आणि थोड्या दिवसांतच त्यांचें सुप्रसिद्ध 'संदेश' वृत्तपत्र जन्मास आलें. त्याच्या जोडीला त्यांनीं 'मेसेज' हें इंग्रजी वृत्तपत्रहि सुरूं केलें होतें पण तें अल्पायुषी ठरलें. पुढें 'श्रुतिबोध' व 'उषा' अशीं दोन नियतकालिकें त्यांनीं काढलीं पण तींहि लवकरच बंद पडली. 'संदेश'च तेवढा चालूं राहिला. 'संदेश' निघण्यापूर्वी वर्तमानपत्र हें गंभीर राजकीय चर्चा करण्याकरितांच असतें अशी समजूत होती, पण अच्युतरावांनीं ही समजूत आपल्या चुरचुरीत, चटकदार आणि चमत्कृतिपूर्ण लिखाणानें पार बदलून टाकली. पैसे टाकून वर्तमानपत्रें विकत घ्यायची संवयहि अच्युतरावांनींच लोकांना लावली. अच्युतराव प्रतिपक्षावर येवढे तुटून पडत कीं प्रतिपक्ष घायाळ झाल्यावांचून राहात नसे. त्यांची लेखणी तिखट, बोंचक आणि मर्मभेदी होती. प्रतिपक्षाला वचक आणि दहशत बसविण्याचें कार्य अच्युतरावांची लेखणी येवढें करी कीं 'संदेशाची एक प्रत माझ्या टेबलावर आणून टाकीत जा' असें लोकमान्य टिळकांनीं बाबासाहेब विद्वांसांना सांगून ठेवलें होतें! किंबहुना जें कार्य 'केसरी' ला करणें अशक्य होतें तें कार्य अच्युतरावांचा 'संदेश' उत्तमरीतीनें पार पाडी. 'संदेश'ची असामान्य लोकप्रियता अखेरपर्यंत टिकली पण हें तेज सरकारला सहन झालें नाहीं आणि १९१८ सालीं संदेश बंद पडला. पुढें त्यांनीं 'संजय' व 'चाबुकस्वार' हीं दोन वृत्तपत्रें काढलीं पण 'संदेश'चा चटकदारपणा त्यांत राहिला नव्हता. पुढें ते ज्या 'इंदुप्रकाश' चे त्यांनीं अनेकवार वाभाडे काढले होते त्याचे संपादक झाले. मध्यंतरीच्या काळांत त्यांनीं 'नारिंगी निशाण मंडळी' नांवाची नाट्यसंस्था काढली होती आणि 'नारिंगी निशाण' 'ताई तेलीण' 'बष्याबोळ' इत्यादि नाटकें लिहून शेक्सपियरप्रमाणें

स्वतःच्या नाटकांत स्वतः भूमिकाहि केल्या होत्या. याच काळांत त्यांचा 'केसरी'शीं मतभेद झाला आणि त्याचें पर्यवसान खुद्द, लोकमान्य टिळकांशींच दोन हात करण्यांत झालें! याचा परिणाम सार्वजनिक आयुष्यांतून त्यांची जवळजवळ हकालपट्टी होण्यांत झाला. १९३० सालच्या महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळींत ते पुन्हां एकदां चमकले आणि त्यांना कारावासाची शिक्षाहि झाली. तुरुंगांतून बाहेर आल्यानंतर मात्र ते फार काळ जगले नाहींत. ता. १५ जून १९३१ रोजीं त्यांचें देहावसान झालें.

अच्युतराव हे आधुनिक वृत्तपत्रसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट होते असें म्हणणें अतिशयोक्तीचें नाहीं. त्यांच्या लेखणीनें वृत्तपत्रसृष्टीचें गंभीर स्वरूप बदलून टाकलें आणि खुमासदार, चुरचुरीत, तिखट, बोंचक, विनोदी, उपहासात्मक आणि मर्मभेदी लेखनशैलीचें नवयुग निर्माण केलें. त्यांच्या लेखणीचा चवचालपणा, बोंचरेपणा, तेजस्वीपणा आणि कल्पकता मराठी वृत्तपत्रसृष्टींत खचित चिरस्मरणीय होऊन राहील.

कोल्हटकर, श्रीपाद कृष्ण (१८७१–१९३४):— सुप्रसिद्ध नाटककार व विनोदी लेखक. श्रीपाद कृष्णांचा जन्म नागपूर येथें २९ जून १८७१ रोजीं झाला. १८८८ सालीं ते मॅट्रिकची परीक्षा अकोला हायस्कूलमधून उत्तीर्ण झाले व १८९२ सालीं पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधून बी. ए. झाले. याचसुमारास नाट्यलेखनाकडे त्यांची दृष्टि वळली व म्हणूनच एल्. एल्. बी. होण्यास आणखी ६ वर्षें लागलीं. १८९८ सालीं ते परीक्षा पास झालें. प्रथम पांचसहा वर्षें त्यानीं तेल्हारा (वऱ्हाड) येथें वकिली १८९९ सालीं सुरूं केली, नंतर १९०२ सालीं ते खामगांवास आले व १९१८ सालीं ते जळगांवास वकिली करूं लागले. त्यांचें निधन पुणें येथें १ जून १९३४ रोजीं झालें.

श्रीपाद कृष्ण हे मराठी वाचकांस नाटककार, कवि, विनोदी लेखक, टीकाकार, ज्योतिषशास्त्रज्ञ इत्यादि बहुविध नात्यांनीं परिचित आहेत. त्यांनीं दोन कादंबऱ्या कांहीं लघुकथा व थोडे स्फुट लेखहि लिहिले आहेत. मूकनायक, मतिविकार, वधूपरीक्षा, सहचारिणी इत्यादि दहाबारा नाटकें लिहून श्रीपाद कृष्णांनीं मराठी रंगभूमीच्या इतिहासांत मन्वंतर घडवून आणलें असें म्हणणें अतिशयोक्तीचें नाहीं. कोल्हटकरांच्या पूर्वी रंगभूमि ही पौराणिक नाटकांची बाजारपेठ होती. रामायण–महाभारतांतल्या जुन्या आणि जीर्ण कथानकांवरच त्यांच्या अगोदरच्या नाटककारांनीं आपली प्रतिभा खर्च केली होती. त्यामुळें रंगभूमीला एकप्रकारचें जुनाट स्वरूप आलें होतें. कोल्हटकरांच्या नाटकांनीं ही स्थिति एकदम पालटून टाकली. त्यानीं प्रथमच काल्पनिक (Romantic) कथानकें रचिलीं, सामाजिक प्रश्न नाटकांच्या द्वारें समाजापुढें मांडले आणि मराठी रंगभूमीला अद्यावत् स्वरूप आणून दिलें. कैलासवासी अण्णा किर्लोस्कर यांनीं रूढ केलेली संगीत नाटकांची प्रथा त्यांनीं यशस्वीपणें पुढें चालविली त्यामुळें त्यांचीं नाटकें अधिकच लोकप्रिय झालीं. लोक सुधारणेचें एक प्रभावी हत्यार म्हणूनच त्यांनीं बहुशः उपयोग केला आणि मार्मिकता, सहृदयता, कल्पकता, रसोत्कटता, भावप्रवणता इत्यादि गुणसमुच्चयांमुळें मराठींत एक नवा सांप्रदाय रूढ करण्याचें श्रेय संपादन केलें. पण कोल्हटकरांचें नांव वाङ्मयेतिहासांत त्यांच्या विनोदामुळेंच कायम राहिल. ते महाराष्ट्राचे मार्क ट्वेन किंवा मोलियर आहेत. त्यांचा विनोद म्हणजे प्रसन्न मनाचें निर्भर हास्य! त्या हास्यांत उपहास आहे, वक्रोक्ति आहे, व्यंजना आहे, तुच्छता आहे आणि विडंबनहि आहे पण कोणत्याहि गुणाचें प्राचुर्य नाहीं. अस्पृश्यतेपासून कवींच्या आणि गवयांच्या आचरट लीलांपर्यंत मानवी जीवनांतील हरएक वैगुण्यांत आणि विसंगतींत मन घालून कोल्हटकरांनीं त्यांची हास्यास्पदता चव्हाट्यावर आणली; आणि लोक शिक्षणाचें महत्वाचें कार्य केलें. समाजांतील ढोंग, आपमतलबीपणा, स्वार्थ, त्यांनीं येवढ्या विदारक स्वरूपांत पुढें मांडले आहेत, कीं सहृदय वाचकाला एकप्रकारची अनुकंपा वाटल्यावांचून राहात नाहीं. त्यांच्या वाङ्मयांत ठळक गुणांबरोबरच ठळक दोषहि आहेत. त्यांच्या कलाविलासांत कमालीची कृत्रिमता आहे, विनोदांत अतिरंजन आणि अतिशयोक्ति आहे, आणि टीकावाङ्मयांत बोजडपणा आणि जडजंबालपणाहि आहे. हे दोषहि कल्पकता, वैचित्र्याची आवड आणि पांडित्य या गुणांच्या अतिरेकामुळेंच त्यांच्या वाङ्मयांत आले आहेत. गुणातिशयाचें पर्यवसान पुष्कळ वेळां वैगुण्यांत कसें होतें याचें

कोल्हटकरांचें वाङ्मय हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. कोल्हटकरांनीं वाङ्मयाला एक नवी दिशा दिली आहे. आतां रूढ झालेल्या 'जीवनासाठीं कला' या मत प्रणालीचे तेच आद्यसंजीवक आहेत असेंच म्हणावें लागेल. त्यांचा सांप्रदाय पुढें कै. राम गणेश गडकरी, श्री. भा. वि. वरेरकर, प्रो. चिं. वि. जोशी, श्री. वि. स. खांडेकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर इत्यादि मान्यवर लेखकांनीं उत्कर्षास नेला आहे आणि मराठी वाङ्मयाचें वैभव वाढविलें आहे.

क्लाइव्ह रॉबर्ट (१७२५–१७७४):—इंग्रज योद्धा व मुत्सद्दी. हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्याचा पाया यानेंच घातला. वयाच्या एकूणवीसाव्या वर्षीं त्यानें मद्रास येथील ईस्ट इंडिया कंपनीच्या कचेरींत कारकूनाची नोकरी धरली. परंतु सन १७४७ सालीं ती नोकरी सोडून त्याच कंपनीच्या लष्करी खात्यांत तो शिरला. त्यावेळीं ब्रिटिशांचे हिंदुस्थानांतील हितसंबंध धोक्यांत होते. फ्रेंचांनीं महत्त्वाचे हक्क व व बराचसा प्रदेश मिळविला होता. डुप्लेच्या अधिपत्याखालीं त्यांनीं हातपाय पसरण्याला सुरुवात केली होती. चंदासाहेबाशीं संगनमत करून त्यांनीं ब्रिटिशांना चांगलाच शह दिला. १७५१ सालीं क्लाइव्हनें अर्काटवर स्वारी करून तें शहर जिंकलें. पुढें चंदासाहेबानें अर्काटला वेढा दिला; यावेळीं क्लाइव्हनें दोन महिनेंपर्यंत मोठ्या धैर्यानें तोंड दिलें व शेवटीं शत्रूंचा धुव्वा उडवून त्यांची महत्वाचीं ठिकाणें काबीज केली. १७५३ सालीं तो प्रकृतिस्वास्थ्या करितां इंग्लडला गेला. तेथून दोन वर्षांनीं सेंट डेव्हिडचा गव्हर्नर होऊन तो परत आला. लवकरच त्याला सुराजउद्दवल्याविरुद्ध बंगालच्या मोहिमेवर पाठवण्यांत आलें. त्यानें कलकत्ता जिंकून सुराजउद्दवल्ला यास तह करण्यास भाग पाडलें. परंतु नबाब सुराजउद्दवला यांजवर त्याचा विश्वास नव्हता. त्यानें मिरजाफर नामक एका नबाबाच्या दरबारीं असलेल्या अधिकाऱ्याशीं संगनमत करून नबाबाला पदच्युत करण्याची यशस्वी कामगिरी केली; व नबाबाच्या सेनेचा पराभव केला. मिरजाफरला नवीन नबाब करण्यांत आलें. क्लाईव्ह कलकत्त्याचा गव्हर्नर झाला. त्यानें डचांचा पराभव करून त्यांच्या आक्रमणाला यशस्वीरीतीनें तोंड दिलें. तो पुनः स्वदेशी गेला. तेथें त्याचा त्यानें हिंदुस्तानांत मिळविलेल्या यशाबद्दल सत्कार झाला. १७६१ सालीं त्याला लॉर्ड करण्यांत आलें. १७६४ सालीं बंगालचा प्रेसिडेंट व तेथील सेनेचा नायक या नात्यानें हिंदुस्तानांत तो पुनः आला. त्यानें बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतांची दिवाणगिरी कंपनीला मिळवून दिली. १७६७ सालीं तो इंग्लंडला परत गेला. तो पुनः हिंदुस्तानांत आला नाहीं. १७७३ सालीं हाऊस ऑफ कॉमन्समध्यें एक ठराव आणण्यांत आला कीं क्लाईव्हनें हिंदुस्तानांत असतांना अन्यायाचें वर्तन करून आपल्या सत्तेचा दुरुपयोग केला. पण हा ठराव फेटाळण्यांत येऊन क्लाईव्हनें आपल्या देशाची उज्वल सेवा केली असा दुसरा ठराव पसार करण्यांत आला. क्लाईव्हनें ता. २२ नोव्हेंबर १७७४ रोजीं आत्महत्त्या केली.

क्रॉमवेल ऑलीव्हर (१५९९—१६५८):—इंग्लंडच्या इतिहासांतील एक महनीय व्यक्ति. इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स याला पदच्युत करणाऱ्या क्रान्तींत पुढारी म्हणून चमकला. हंटिंगडन येथें जन्म. शिक्षण केंब्रिज येथील सिड्ने–ससेक्स कॉलेजमध्यें. सर जेम्स बोर्चिअर याची कन्या इलिझाबेथ हिच्याशीं त्याचा विवाह झाला. विवाहानंतरचीं कांहीं वर्षें त्यानें हंटिंगडन येथील आपल्या इस्टेटीवर घालविली. सन १६२८ सालीं तो पार्लमेंटचा सभासद झाला; पण त्यावेळीं तो विशेषरीतीनें चमकला नाहीं. सेंट इव्हज येथें एक जमीन खरेदी करून तेथें सन १६३१ सालीं तो राहावयास गेला. १६४० सालीं पुनः एकवार पार्लमेंटचा सभासद म्हणून तो निवडून आला. यानंतर त्यानें सर्व महत्त्वाच्या प्रश्नांच्या चर्चेंत भाग घेतला; पण त्याची विशेष छाप पडली नाहीं. या वेळीं क्रॉम्वेलला पुढें येण्याचा योग मात्र आला. राजा पहिला चार्ल्स व पार्लमेंट यांच्यामधील तेढ विकोपाला गेली. १६४२ सालीं क्रॉम्वेलनें पार्लमेंट पक्षाच्यावतीनें सैन्य भरतीला उत्साहानें सुरवात केली. क्रॉम्वेल स्वतः योद्धा होता. या यादवीच्या सुरवातीस त्यानें कॅप्टन व कर्नल या दोन हुद्यावर कामें केलीं. यावेळीं त्याची शिस्त व त्यानें शिकवून तयार केलेल्या सैन्याची कार्यक्षमता यांचा प्रत्यय आला. पुढें सैन्याची पुनर्रचना झाल्यावेळीं पार्लमेंटच्या सभासदानें सैन्याचें अधिपत्य स्वीकारूं नये असा नियम करण्यांत आला.

पण या नियमाला क्रॉम्वेलच्या बाबतींत अपवाद करण्यांत आला. १६४६ सालीं चार्ल्सचा स्कॉटिश-सैन्यानें पराभव केला त्यावेळीं हा कमिशनर होता. या वेळीं केलेल्या कामगिरीबद्दल त्याला मार्किस ऑफ वर्सेस्टर याच्या इस्टेटींतून सालीना २५०० पौंड द्यावयाचें ठरलें.

आयर्लंडमध्यें राजपक्षीयांनीं उचल खाल्ल्यामुळें त्याला तिकडें जावें लागलें. त्याची लॉर्ड लेफ्टनंट व कमांडर इन चीफ या हुद्यावर नेमणूक होऊन आयर्लंडकडे रवानगी झाली. त्यानें ड्रॉघेडा येथें राजपक्षीयांचा पराभव करून तो पक्ष चिरडून टाकला. स्कॉटलंडमध्यें दुसऱ्या चार्ल्सच्या नांवानें द्वाही फिरल्यामुळें, पार्लमेंटच्या विनंतिवरून त्यानें स्कॉटलंड् विरुद्ध मोहीम नेली. या मोहिमेंत प्रारंभीं त्याला जरी त्रास झाला तरी शेवटीं त्यानें वर्सेस्टर येथें राजपक्षीयांचा संपूर्णतया पराभव १६५१ सालीं केला. दीर्घकालीन पार्लमेंटचें अवशिष्ठ पार्लमेंट निरूपयोगी झाल्यामुळें क्रॉम्वेलनें उधळून लावलें. नंतर त्यानें आपल्या प्रमुख अधिकाऱ्यांचें एक कॉन्सिल ऑफ स्टेट बोलावलें. या कॉन्सिलनें एक पार्लमेंट निवडलें. या पार्लमेंटला छोटी पार्लमेंट म्हणतात. यानंतर पंधरा महिन्यांनीं एक नवीन वार्षिक पार्लमेंट निवडण्यांत आलें. त्या पार्लमेंटनें कॉन्सिल ऑफ स्टेटच्या हातीं सर्व राज्यकारभार सोंपविला. कॉन्सिलनें क्रॉम्वेलला राज्याचा लॉर्ड प्रोटेक्टर (संरक्षक) केलें. क्रॉम्वेलच्या हातीं अनियंत्रित सत्ता आली. त्याच्या कॉन्सिलांत एकवीस सभासद होते. लॉर्ड प्रोटेक्टर या नात्यानें त्याची कारकीर्द यशस्वी झाली.

हॉलंड, स्वीडन, डेनमार्क, पोर्तुगाल या देशाशीं त्यानें मित्रत्वाचे तह केले. व इंग्लंडला गेलेला अंतरराष्ट्रीय दर्जा पुनः मिळवून दिला. १६५६ त त्यानें पुनः पार्लमेंट बोलावली. या पार्लमेंटनें घटनेंत फेरफार करण्याचा विचार केला. व क्रॉमवेलला राज्यपद देऊं केलें. तें त्यानें नाकारलें. त्यानें यूरोपांत इंग्लंडचा दरारा बसविला व आपल्या हयातींत अंतर्गत शांतता राखली. तो १६५८ सालीं वारला.

क्रॉमवेल कुशल सेनानी व चतुर राज्यकर्ता होता. त्याची राहणी साधी असून, त्याला कामाचा मोठा उरक असे. त्याची बुद्धि सूक्ष्म असून त्याला मनुष्यस्वभावाचें ज्ञान चांगलें होतें. अत्यंत महत्त्वाच्या बाबतींत त्वरित निर्णय घेऊन तें तितक्याच त्वरेनें अमलांत आणण्याची त्याची पात्रता होती.

क्लार्क गेबल (१९०१–):— अमेरिकन सिनेमा नट. याचा जन्म १ फेब्रुवारी १९०१ रोजीं केडीझ (ओहिओ) येथें झाला. आरंभीं कांहीं दिवस रॉकेलच्या खाणींत काम करून मग कांहीं दिवस रंगभूमीवर The Copperhead, Madame X या नाटकांतून कामें केलीं, नंतर तो सिनेमाकडे वळला. (१९३०) The Painted Desert हा त्याचा पहिला चित्रपट (बोलपट) या नंतरचें Hell Divers, Strange Interlude, China Seas, It Happened One Night, Manhattan Melodrama, Mutiny on the Bounty, Parnell, Gone with the Wind हे त्याचे प्रसिद्ध बोलपट आहेत. १९३४ मध्यें It Happened one Night या बोलपटांतील त्याच्या भूमिकेबद्दल त्याला ॲकॅडमी अवॉर्ड (बक्षीस व मान) मिळालें.

खरे, वासुदेव वामन (१८५८—१९२४):— एक महाराष्ट्रीय कवि, ग्रंथकार, नाटककार व इतिहास संशोधक आणि लेखक. मराठ्यांच्या इतिहासाला आवश्यक राजवाडे, साने, पारसनीस प्रभृतींनीं जीं अस्सल साधनें गोळा करून छापिलीं त्यांच्याप्रमाणेंच वासुदेवशास्त्री खरे यांनींहि छापिलीं. या साधनांचें महत्त्व फारच मोठें आहे. खरेशास्त्री यांनीं काव्यें, नाटकें व इतर ग्रंथ लिहिलें व ते जरी मुळींच उपेक्षणीय नाहींत तरी त्यांनीं स्वतः कष्ट करून आणि पैसे खर्चून ' ऐतिहासिक लेख संग्रहा'चे जे बारा भाग सुव्यवस्थित प्रसिद्ध केलें त्यांमुळेंच शास्त्रीबोवांचें नांव अजरामर होईल.

त्यांचें घराणें कोंकणांत गुहाघरचें. जन्म गुहाघरासच ता. ५ आगष्ट १८५८ रोजीं झाला. तेथेंच मराठी सहावी इयत्तेपर्यंत शिक्षण झालें. पुढें कोल्हापूर आणि सातारा या ठिकाणीं त्यांनीं संस्कृत अध्ययन केलें. लहानपणापासून कविता करण्याचा नाद व त्या चांगल्याहि होत. नाटकें रचण्याचाहि उद्योग सुरूं असे. त्यांच्या पांडित्याचीं छाप लवकरच सर्वत्र पडूं लागली. १८७६ त ते पुण्यास एका शाळेंत शिक्षक म्हणून लागले. लवकरच विष्णुशास्त्री चिपळूणकर

यांनीं त्यांना 'काव्येतिहाससंग्रहा'च्या संस्कृत विभागाचे संपादक केलें. नंतर 'न्यू इंग्लिश स्कूल' पुण्यास १८८० सालीं निघालें तेव्हां त्यात शास्त्रीबोवांस शिक्षक होण्याचा मान मिळाला व टिळकादि थोर पुरुषांच्या निकट सहवासाचा लाभ अनायासें झाला. पण अकरा महिन्यांनींच ते मिरजेस संस्कृत शिक्षक म्हणून जे गेले तें कायमचेच तेथें राहिले. १९१३ सालीं त्यांनीं पेनशन घेतलें. त्यावेळीं त्यांना अवघा ४५ रु. पगार होता. यावरून खऱ्यांच्या सांपत्तिक स्थितीची व तींतच त्यांनीं केलेल्या अफाट संशोधन-लेखनकार्याची कल्पना येईल.

लहानपणीं ते इंग्रजीमुळींच शिकलें नव्हतें पण पुढच्या वयांत त्यांनीं घरीं अभ्यास करून मोठमोठें इंग्रजी ग्रंथ अभ्यासण्याइतकें त्या भाषेचें ज्ञान मिळविलें. त्यांची उपजत काव्यशक्ति १८८४, सालापासून ग्रंथरूपांत विराजूं लागली. काव्य ग्रंथांत 'यशवंतराव' हें महाकाव्य नांवाजण्यासारखें आहे. स्कॉटच्या महाकाव्यांच्या तोडीचें तें वाटेल. खरेशास्त्र्यांची काव्यरचना प्रासादिक आणि रसात्मक आहे. तथापि आधुनिक कवींच्या भावगीतांच्या धर्तीची ती नाहीं. त्यांच्या काव्या-नाटकांवर संस्कृत वाङ्मयाची प्रभावी छाप आहे. 'गुणोत्कर्ष', 'तारामंडळ' व 'शिवसंभव' हीं तीन गद्य व 'चित्रवंचना', 'कृष्णकांचन', व 'उग्रमंगल' हीं तीन संगीत नाटकें त्यांनीं लिहिलीं. हीं सर्व रंगभूमीवर गाजलीं. तथापि 'शिवसंभव' आणि 'उग्रमंगल' हीं सर्वांत सरस ठरतील. स्वाभाविकता आणि राष्ट्रीयता हे दोन गुण त्यांच्या नाटकांतून प्रतीत होतात.

त्यांचा इतिहाससंशोधन-लेखनाचा क्रम सुमारें ३५ वर्षे अखंड चालू होता. प्रथम 'नाना फडनविसांचें चरित्र' काढून त्यांनीं या क्षेत्रांतील आपला अधिकार पटवून दिला. पुढें मिरजमळ्याचे ऐतिहासिक दप्तर बारकाईनें चाळून त्यांनीं १७६१ ते १८०० पर्यंतचा ४० वर्षांचा पानपतोत्तर मराठ्यांचा पत्रबद्ध इतिहास १२ भागांत 'ऐतिहासिक लेख संग्रह' या नांवाखालीं मोठ्या परिश्रमानें आणि चिकाटीनें प्रसिद्ध केला व राजवाड्यांसारख्याकडून 'खरेशास्त्री यांच्या एवढा अवाढव्य माहितीचा माणूस एकाद्या राष्ट्रांत वारंवार उपजत नसतो,' असे तळमळीचे उद्गार काढविले. या संग्रहांतील त्यांच्या जागजागीं असलेल्या प्रस्तावना नुसत्या वाचल्या तरी त्यांची निःपक्षपाती, व्यापक आणि विवेचक बुद्धि दिसून येईल. उत्तरकालीन मराठे इतिहासाची सुसंगत जुळणी त्यांनीं करून देऊन भावी इतिहासकारांना सुलभ मार्ग करून दिला.

'इचलकरंजी संस्थानचा इतिहास' अधिकार योग' 'हरिवंशाची बखर' वगैरे त्यांचे ग्रंथ आहेत. मरेपावेतों त्यांचें इतिहासलेखन चालू होतें. त्यांचें सर्व लिहिणें सरळ, सुबोध आणि सुव्यवस्थित असे. विनोद आणि कोटीबाजपणा त्यांच्या अंगीं जो विशेष होता तो त्यांच्या नाटकांतून चांगला दिसतो. त्यांची प्रखर विवेचक आणि सारग्राही बुद्धि त्यांच्या ऐतिहासिक लिखाणांत प्रतीत होते. त्यांच्या जिवंतपणीं त्यांचें नांव फारसें झालें नाहीं पण भावी कालांत राजवाड्यांखालोखाल खरेशास्त्री यांना स्थान निश्चित आहे. ते ता. ११ जून १९२४ रोजीं मिरजेस वारले.

खाडिलकर, कृष्णाजी प्रभाकर (१८७२-):- प्रख्यात महाराष्ट्रीय नाटककार व संपादक. यांचा जन्म सांगलीस ता. २३-११-१८७२ रोजीं झाला. मॅट्रिक पर्यंतचें सर्व शिक्षण सांगलीसच झालें. नंतर १८९० मध्यें पुण्यास पुढील शिक्षणाकरितां फर्ग्युसन कॉलेजमध्यें दाखल झाले. नंतर १८९२ मध्यें तत्त्वज्ञान विषय घेऊन ते बी. ए. झाले व सांगली हायस्कूलमध्यें शिक्षकाची त्यांनीं नोकरी पतत्करली. पण १८९४ मध्यें नोकरीचा राजीनामा देऊन मुंबईस एल् एल्. बी. चा अभ्यास सुरू केला. १८९६ मध्यें 'विविधज्ञानविस्तार' मध्यें 'ब्राह्मण व त्यांची विद्या' या ग्रंथावरील त्यांच्या टीकेमुळें लोकमान्य टिळकांचें त्यांच्याकडे लक्ष वेधलें व पुढें १८९७ मध्यें ते केसरी संस्थेंत संपादक वर्गांत दाखल झालें. १९०२ मध्यें ते नेपाळला कौलाचा कारखाना काढण्यासाठीं गेले व पुढें १९०५ मध्यें आजारीपणामुळें परत आले. नंतर पुन्हां त्याच वर्षी केसरीला येऊन मिळालें. नंतर १९०८ ते १० व मार्च १९१८ ते जून १९२० पर्यंत ते केसरीचे संपादक होते. १९०८मध्यें ते 'मराठ्या' चेहि संपादक होते. १९२० मध्यें त्यांनीं केसरीचा संबंध सोडला व मार्च १९२१ मध्यें मुंबईस 'लोकमान्य' दैनिकाचें संपादकत्व पत्करलें. पुढें मार्च १९२३ मध्यें 'लोकमान्य' सोडून त्यांनीं लगेच एप्रिलमध्यें स्वतःचें 'नवाकाळ' दैनिक

काढलें. नंतर सप्टेंबर १९२५ मध्यें 'आठवड्याचा नवाकाळ' सुरू केला. १९२७सालीं हिंदु मुसलमानांचे वादावरील लेखनाबाबत खटला व ७००रु. दंड झाला. पुढें १९२९ मध्यें राजद्रोहाचा खटला होऊन एक वर्षाची शिक्षा झाली. १९३३ नंतर सांगलीस स्वगृहीं राहून दत्तमंदिरांत योगविषयक प्रवचनें वगैरे देऊन ते काल कंठीत आहेत.

१९०७ व १९१७ सालीं नाट्य संमेलनाचे व १९३३ सालीं नागपूर येथील साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. वृत्तपत्रीय लिखाण व नाटकें या शिवाय अगदीं अलीकडचें 'खाडिलकरांचा रुद्र' हें पुस्तक त्यांनीं लिहिलेलें आहे. त्यांचीं नाटकें, १ कांचनगडची मोहना २ सवाई माधवराव यांचा मृत्यु, ३ कीचक वध, ४ बायकांचें बंड, ५ भाऊबंदकी, ६ प्रेमध्वज, ७ मानापमान, ८ विद्याहरण, ९ सत्वपरीक्षा, १० स्वयंवर, ११ द्रौपदी, १२ मेनका, १३ सवती मत्सर, १४ सावित्री अशी एकूण चौदा नाटकें त्यांनीं लिहिलेलीं आहेत यापैकीं ७, ८, १०, ११, १२ व १४ हीं संगीत असून बाकीचीं गद्य आहेत.

खाडिलकरांच्या वृत्तपत्रीय लिखाणाची खरी सुरवात १ व ८ सप्टेंबर १८९६ सालच्या केसरींतील 'राष्ट्रीय महोत्सव' या अग्रलेखानें व नाटकांची सुरवात 'कांचनगडची मोहना' या नाटकानें झाली आहे. या नाटकाची कल्पना त्यांना १८९६ सालीं विजापूरचा मोडकळीस आलेला किल्ला पाहून झाली.

त्यांच्या नाटकांत नाटकपात्रांना आपलें अभिनयकौशल्य दाखविण्याला क्षेत्र निर्माण करून दिलें, त्यांचीं नाटकें सजावटीच्या दृष्टीनें उठावदार व प्रसंगांच्या दृष्टीनें जोरदार आहेत असे श्री. शं. बा. मुजुमदार यांनीं मत व्यक्त केलें आहे. मराठी साहित्य समालोचनकार त्यांच्या नाटकाविषयीं म्हणतात, 'पौराणिकाला आधुनिकाचें रूप देण्याच्या कलेचे ते आद्यप्रवर्तक होत. सुसंबद्ध, एकसूत्री संविधानकें रचण्यांत खाडिलकर सिद्धहस्त आहेत. विशिष्ट प्रकारचा खोंचदार, ध्वनिपूर्ण विनोद त्यांच्या 'मानापमान' व 'विद्याहरण' या नाटकांतून काय तो आढळतो...त्यांच्या पदांत काव्य असलें तरी दुर्बोध शब्दजालांतून तें धुंडून काढण्यास इतकें परिश्रम पडतात कीं ते श्रम करण्याचा धीर क्वचित्च आढळतो.'

खाडिलकरांचें बरेच आयुष्य राजकारण्यांत गेल्यानें त्यांच्या कडक अग्रलेखाप्रमाणें नाटकांतूनहि त्यांनीं प्रचलित राजकारणाचा परामर्ष घेतला. याच कारणास्तव 'कीचक-वध' हें नाटक १९१० मध्यें जप्त होऊन त्याच्या प्रयोगालाहि बंदी झाली. त्यांच्या 'नवाकाळ' च्या जन्माबरोबर त्यांनीं महात्मा गांधींचा पक्ष घेतला आणि त्याचा प्रसार ते इतक्या हिरहिरीनें करूं लागले कीं शेवटी टिळक पक्षीयावर उघड व छद्मी टीका ते करूं लागले याचें प्रत्यंतर त्यांच्या 'मेनका' या नाटकांत सांपडतें. मेनका नाटकावर श्री. न. चि. केळकर यांनीं केलेली प्रत्युत्तरात्मक टीका अभ्यसनीय आहे. यांच्या नाटकांवरील 'खाडिलकरांची नाटकें' हा रा. सहस्त्रबुद्धे यांचा ग्रंथ वाचनीय आहे.

खांडेकर, विष्णु सखाराम (१८९८—):— टीकाकार व कादंबरीकार. यांचा जन्म सांगलीस १९ जानेवारी १८९८ रोजीं झाला. प्राथमिक शिक्षण सांगलीसच झालें. १९१६ मध्यें सांगली हायस्कूलमधून मॅट्रिकच्या परीक्षेंत ७ वा नंबर पटाकवून पास झाले. नंतर



वि. स. खांडेकर

पुण्यास फर्ग्युसन कॉलेजमध्यें पुढील शिक्षणासाठीं गेले. येथें त्यांचा व कै. रा. ग. गडकरी यांचा परिचय होऊन १९१४-१५ सालीं त्यांचा सहवास लाभला. १९१६ मध्यें चुलत चुलत्यांना (मूळचें नांव गणेश आत्माराम खांडेकर) सावंतवाडीचे सखाराम रामचंद्र खांडेकर यांना दत्तक गेले. दत्तक गेल्यानंतर त्यांचे कॉलेजचें शिक्षण बंद पडलें. रत्नागिरी जिल्ह्यांतील शिरोडें गांवची ट्युटोरियल इंग्लिश स्कूल ही शाळा १२ एप्रिल १९२० रोजीं चालवावयास घेतली. तेव्हां पासून १९३८ अखेरपर्यंत रा. खांडेकर यांनीं या शाळेचे हेडमास्तर म्हणून काम केलें व शाळा नांवारूपाला आणली.

सांगलीस यांचे वडील मुन्सफ होते. त्यांचें घरीं

कै. देवल (संशय कल्लोळ कर्ते) व देव येत असत. दरबार सर्जन डॉ. ह. श्री. देव यांच्या उदार आयुष्याचाहि फार मोठा परिणाम त्यांच्यावर झालेला आहे. हरीभाऊ आपटे यांच्या वाङ्मयामुळें त्यांना वाचनाची गोडी लागली. आपट्यांच्यानंतर श्री. कृ. कोल्हटकर व गो. कृ. आगरकर यांच्या वाङ्मयाचाहि फार मोठा परिणाम त्यांच्या मनावर झाला आहे. त्यांच्या लेखनास वयाच्या सहाव्या वर्षापासून सुरवात झाली असून आतापर्यंत आदर्श लघुकथा लेखक, लघुनिबंधकार, टीकाकार व कादंबरीकार म्हणून त्यांनी कीर्ति मिळविली आहे. 'रंकाचें राज्य' हें नाटकहि त्यांनीं लिहिलें असून 'छाया' 'देवता' 'सुखाचा शोध' 'अमृत' इत्यादि लोकप्रिय बोलपट कथाहि त्यांनीं लिहिल्या आहेत. गेली २–३ वर्षें जोत्स्ना या मासिकाचें संपादन त्यांनीं केलें आहे. 'हृदयाची हांक' (१९३०) ही त्यांची पहिली कादंबरी होय.

तीव्र भावनोत्कटता, सूक्ष्म सौंदर्यदृष्टी, तल्लख कल्पकता, समावेशक अवलोकनशक्ति, अमोघउद्बोधन क्षमता, तेजस्वी तत्त्वचिकित्सा, श्रेयस्कर पुरोगामित्व, रुचिर शद्बलालित्य, चमत्कृतिपूर्ण कल्पनाविलास; चतुर संवाद नित्यनैमितिक सृष्टीचें पुरेपूर मापन, विविध तंत्रयोजना, आणि चैतन्यपूर्ण स्फूर्तिप्रदता हे ललितवाङ्मयाचे गुण ललितलेखकाच्या ठिकाणीं कधीं साकल्यानें तर कधीं अल्पप्रमाणांत एकवटलेले असावेत अशी जी ललितवाङ्मयानें चालू युगांत एक सार्वत्रिक अपेक्षा उत्पन्न केली आहे तिच्या निकषावर खांडेकरांच्या वाङ्मयाचें सोनें घांसून पाहिलें तर तें कसाला योग्यरीतीनें उतरल्याशिवाय खचित राहाणार नाहीं. यांतील कांहीं गुण आज त्यांच्या समकालीन लेखकांत त्यांच्यापेक्षांही अधिक प्रमाणांत एकवटलेले पाहावयास मिळत असतील. पण साऱ्या गुणांचा योग्य प्रमाणांत अगदीं बेतशीर संगम पाहवयाचा झाला तर खांडेकरांचें वाङ्मय पाहावें, असेंच म्हणावें लागेल. त्यांच्या लेखणीला या साऱ्या गुणांची मनस्वी चाड असूनही ती त्या गुणांच्या आविष्काराकरितां कधीं अडखळत नाहीं. किंबहुना तिचा वेग इतका विलक्षण आहे कीं, या साऱ्या गुणांचे सुवर्णकण आपल्या कुशाग्र कलमाला एकसारखे चिकटवून खांडेकरांना लेखनाचा इतका अवाढव्य खटाटोप उरकतो कसा, असा अचंबा वाटावयास लावण्याइतकी त्यांनीं अवघ्या एका तपाच्या अवधींत असामान्य कर्तबगारी करून दाखविली आहे. चौदा लघुकथा संग्रह, दहा अकरा कादंबऱ्या, दोन टीकात्मक प्रबंध, तीनचार लघुनिबंध संग्रह, सहासात बोलपटकथा, इत्यादि त्यांच्या लेखनाचा व्याप दहाबारा वर्षांच्या मानानें निःसंशय फार वेगाचा आहे. या साऱ्या लेखनांत विषयांची विविधता तर इतकी प्रभावी आहे कीं, एवढ्या एका गुणासाठींही त्यांचें वाङ्मय इतिहासांत वैशिष्ट्यपूर्ण स्थान पटकावील. बुद्धि, मन, मेंदू, पैसा, अंतःकरण, शरीर आणि माणुसकी या साऱ्यांची आमच्या समाजांत असलेली लाचार गरिबी वास्तवपूर्ण शद्बांनीं लिहून ठेवण्यांत खांडेकरांनीं समाजाची फार मोठी कामगिरी केली आहे. कारण या लाचार गरिबीचा वैताग येऊनच आजचा विस्कळित आणि उध्वस्त समाज पुनर्घटनेची धडपड करण्यासाठीं उद्युक्त होणार आहे. पुनर्घटित समाज कांहीं पिढ्यानंतर वाङ्मयाच्या इतिहासांत मागें मुरडून पाहील तर श्री. खांडेकर यांनीं केलेल्या उद्बोधनाचें अपूर्व ऋण मान्य करण्याकरितां आपलें मस्तक आदरानें वाकविल्याशिवाय खचित राहणार नाहीं.

खेर, बाळ गंगाधर (ज. स. १८८८–):— १९३५ च्या सुधारणा नंतरचे मुंबई इलाख्याचे (कॉंग्रेस पक्षाचे) पहिले पंतप्रधान रत्नागिरीला २४ ऑगस्ट १८८८ ला जन्म. १९०६ स बी. ए. (विल्सन कॉलेज). वरजीवनदासची संस्कृतची शिष्यवृत्ती मिळाली व भाऊ दाजीचेंहि बक्षीस त्यांनीं पटकावलें. दक्षिणाफेलोशिपहि यांना मिळाली. १९१२–१९१८ पावेतों वकिली केली. १९१८ सालीं सालिसिटर झाले. मेसर्स मणीलाल, खेर, अंबालाल आणि कंपनीचे ते एक भागीदार होते. हे होत. १९२२ पासून राजकारणांत प्रवेश. मुंबई असेंब्लीच्या कॉंग्रेस पक्षाचे पुढारी. १९३७ च्या २१ जुलैला पंतप्रधानपद यांच्याकडे



बा. गं. खेर

आलें. १९३९ च्या ४ नोव्हें. स या पदाचा राजीनामा. १९२८ पासून मुंबई उपनगर जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे सभासद व सध्या अध्यक्ष. १९३० त विलेपार्ले सत्याग्रह शिबिराचे संचालक. येथील मीठ-सत्याग्रहाबद्दल ८ महिन्यांची सश्रम शिक्षा व दंड १९३० त झाला. ऑर्डिनन्सखालीं १९३२ ला पुनः अटक होऊन दंड व दोन वर्षांची सश्रम शिक्षा झाली. महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष. अस्पृश्यता निवारण्यास यांची खटपट पुष्कळशी कारणीभूत आहे. हे समाज सेवासंघाच्या कार्यकारी मंडळाचे एक सभासद होत. याशिवाय ते बॉम्बे लीगल एड सोसायटीचे संस्थापक असून तिच्या कार्यकारी मंडळापैकीं एक सभासद आहेत. हे श्रद्धानंद अनाथ महिलाश्रमाचे उपाध्यक्ष व बॉम्बे लॉ जर्नलचे सह संपादक होते. २६ नोव्हेंबर ९४० रोजीं त्यांना गांधीच्या आदेशाप्रमाणें त्यांनीं सत्याग्रह करण्यापूर्वीच पकडण्यांत आले.

खंड्याः— अचानक घाला घालून आपलें भक्ष्य मिळविणारा बहुरंगीत व वृक्षोपवेशक वर्गातील पक्षी. या पक्षाचें डोकें काळ्यानिळ्या रंगाचें असतें. याची पाठ, पंख व शेपूट हे अवयव निळ्या रंगाचे असतात. खालचा भाग नारिंगी तर गाल पांढरे असून याचे पाय तककीत तांबड्या रंगाचे असतात. चोंच मात्र काळी असते. पिंगट व पांढऱ्या पोटाचेहि खंडे पाहण्यास मिळतात. चिमणी एवढा याचा बांधा असतो. यास तीक्ष्ण कडा असणारी लांब चोंच असते. खंड्याचे पाय आखूड असतात. हा प्राणी जमिनीवर फारसा पळत किंवा चालत नाहीं. पाण्यांतले किडे मासे व खेकडे यांवर हा पोट भरत असल्यामुळें त्यांना पकडण्यासाठीं पाण्याच्या कडेला असणाऱ्या झाडाच्या फांदीवर हा गप्प बसतो व पाण्यामध्यें किडा अथवा मासा दिसल्याबरोबर डोकें खालीं करून पाण्यांत एकदम बुडी मारतो व आपल्या भक्ष्याला पकडतो. नदीच्या कांठाला वाळवंटांत बिळें करून त्यांत मादी ४।७ पर्यंत अंडीं घालते.

खंड्याच्या दोन जाती पाहण्यास मिळतात एका जातीचा खंड्या चोचीनें काळा-तांबडा, पायानें भडकतांबडा, गळा व छाती यांनीं पांढरा असून इतर अवयवांनीं तो तांबूस पिंगट असतो. दुसऱ्या जातीच्या खंड्याची चोंच व पाय या ठिकाणीं काळा असतो व त्याचा पिसारा काळा तांबडा असतो.

गटे, जोहान वोलफगांग फॉन (१७४९-१८३२):— जर्मन सारस्वतांतील महनीय व्यक्ति, भावकवि, नाटककार, कादंबरीकार व तत्त्वज्ञ म्हणून त्याचें नांव जर्मन साहित्य क्षेत्रांत अजरामर झालें आहे. इंग्लंडचा जसा शेक्सपीयर, इटलीचा जसा डान्टे व भारतवर्षाचा जसा कालिदास तसा जर्मनीचा गटे. जन्म फ्रँकफोर्ट-ऑन-दी-मेन येथें एका सुखवस्तू कुटुंबांत २८ ऑगस्ट १७४९ रोजीं झाला. याचा बाप कायदेपंडित असून त्याला ललित कलांची आवड होती. घरच्या सुस्थितीमुळें त्याला शिक्षण चांगलें मिळालें. लहानपणापासूनच त्याला ललितकलांची मोठी आवड होती. नाटकें पाहण्याचाही त्याचा शोक मोठा. चित्रकला, संगीत, पदार्थविज्ञानशास्त्र, न्यायतत्त्वशास्त्राची मूलतत्त्वें व भाषाविषय या विषयांचा त्यानें विशेष अभ्यास केला. फ्रेंच भाषा त्याला चांगली येत असे. पुढें लाइप्झिक विद्यापीठांत कायद्याचा अभ्यास करण्याकरतां त्याला पाठविण्यांत आलें. पण आजारी पडल्यामुळें अभ्यास सोडून घरीं जावें लागलें. १७७० सालीं बापाच्या इच्छेनुसार त्यानें स्ट्रासबर्ग विद्यापीठांत कायद्याचा अभ्यास केला व १७७१ सालीं त्या विद्यापीठाची डॉक्टर ऑफ ज्यूरिस्प्रूडन्स ही पदवी त्यानें मिळविली. नंतर वकिली करण्याकरितां वेट्झलार येथें गेला. येथें असतांनाच त्यानें The sorrows of Werther हें प्रसिद्ध केलें.

कर्मधर्मसंयोगानें गटे प्रवासांत असतां चार्ल्स ऑगस्टस या वीमार येथील ड्यूकशी परिचय होण्याचा योग आला. आपल्या हातीं राज्यकारभार येतांच ड्यूकनें गटेला आपल्या दरबारीं बोलावलें. गटेनें या आमंत्रणाचा स्वीकार केला व इ. स. १७७५ सालीं तो वीमार येथें जाऊन राहिला. स्ट्रासबर्ग येथें असतांनाच गटेचा हर्डर या टीकाकाराशीं परिचय झाला होता. हा परिचय गटेला वाङ्मयदृष्ट्या उपकारकच ठरला. फ्रेंच वाङ्मयांतील सर्वोत्कृष्ट कलाकृतीचा आदर्श दृष्टीपुढें ठेवूनच गटे चालत असे. हर्डरनें त्याच्या प्रकृतीला अधिक मानवेल अशाच प्रकारची काव्यविषयक कल्पना त्याच्यापुढें ठेवली. या हर्डरचा सहवास त्याला वीमार येथें पुनः घडला.

हर्डर शिवाय शिलर, विलँड वगैरे साहित्यिक तेथें होते. दुसरे कांहीं कवि, टीकाकार व कादम्बरीकार त्याच्या प्रभावळींत या वेळीं शोभत होते. १७८६ सालीं गटे इटलीला गेला. तेथें त्यानें दोन वर्षें वास्तव्य केले, सिसिलीला भेट दिली व रोम येथें बरेच दिवस राहिला. इटलींतील या वास्तव्यामुळें त्याच्या कलावृत्तीचा चांगलाच विकास झाला.


गटेचे ग्रंथ :— Faust, Ifhigenia in Tauris, Tasso, Blavigo, Stella ही नाटकें; wilhelm Meister Wandejahre; ही कादंबरी; Hermann and Dorothea हे कथनात्मक काव्य, वगैरे ललित कृति; याशिवाय वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करून त्या शास्त्रावरही त्यानें ग्रंथरचना केली आहे. Faust हीं गटेची सर्वोत्कृष्ट कलाकृति आहे. गटेनें आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे. ते अत्यंत सुंदर आहे.

विशाल बुद्धिमत्ता, व्यापक सहानुभूति, मानवी कृतीचें महत्त्वमापन करण्यांत त्यानें दाखविलेली कळकळ व सावधगिरी या त्याच्या आंगच्या गुणांचा प्रत्यय त्याचें वाङमय वाचतांना पदोपदी येतो. बुद्धिप्रामाण्यवादी युगांत जन्मूनही त्या युगांतील जडवादी प्रवृत्तींच्या प्रवाहाबरोबर जशी त्याची बुद्धि वाहवली नाहीं तशीं अध्यात्माच्या सूक्ष्म विचारसरणीच्या चक्रव्यूहांत अडकून राहिली नाहीं. त्याच्या नाटकांनीं रंगभूमीच्या रूढ संकेतांची मर्यादा ओलांडलीं; त्याच्या कादंबऱ्यांत प्रमाणबद्धतेचा व रंजकतेचा अभाव आहे ही गोष्ट खरी असली तरी त्यांत त्यानें केलेलें व्यक्तिदर्शन, मानवी भावनांच्या परस्पर संघर्षणामुळें उत्पन्न होणारे समरप्रसंग, व ठिकठिकाणीं विखुरलेल्या सुभाषितांचे सुवर्णकण यांनीं त्यांची योग्यता मोठीच ठरतें. त्याचें व्यक्तिदर्शनाचे कौशल्य खरोखरच शेक्सपीयरच्या तोडीचे आहे. भावकवि या नात्यानेंहि त्याची योग्यता मोठी आहे.

गडकरी, राम गणेश (१८८५–१९१९):—सुप्रसिद्ध नाटककार, कवि व विनोदी लेखक श्री. गडकरी यांचा जन्म गुजराथेंत १ मे १८८५ रोजीं झाला. ते दहा वर्षांचे होण्यापूर्वींच त्यांच्यावर पितृनिधनाची आपत्ति ओढवली आणि आयुष्याच्या सुरुवातीसच त्यांना घोर आपत्तीनां, संकटांना आणि अकल्पित वादळांना तोंड द्यावें लागलें. या सर्व संकटांना तोंड देत देत अखेर ते वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं प्रवेश परीक्षा पास झाले. या नंतर त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजांत प्रवेश केला पण प्रीव्हिअसच्या परीक्षेंतच त्यांना अपयश आलें. त्यांच्या आयुष्याला ठराविक अशी दिशाच उरली नाहीं ! निराशेच्या गाढ अंधारांतूनच त्यांनीं आपली जीवित–नौका ध्येय तारकेकडे नव्हे तर मिळेल त्या प्रकाशाकडे नेली ! वयाच्या एकोणिसाव्या वर्षीच ते त्या वेळीं प्रसिद्ध असलेल्या किर्लोस्कर नाटक मंडळींत मुलांचे शिक्षक म्हणून नोकरीस राहिले. वाङ्मयाची त्यांना प्रथमपासूनच आवड होती. किर्लोस्कर नाटक मंडळींत प्रविष्ट होण्यापूर्वींच श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या वाङ्मयगुणांची मोहिनी त्यांच्या मनावर पडली होती आणि कोल्हटकरांच्या कल्पकता, भावप्रवणता, रसोत्कटता इत्यादि गुणांचे ते एकनिष्ठ भक्त झाले होते. किर्लोस्कर नाटक मंडळींत आल्यानंतर तर त्यांचा प्रत्यक्ष रा. श्री. कृ. कोल्हटकरांशीं परिचय आणि स्नेह घडून आला. नाटक कंपनींत नेहमींच वास्तव्य असल्यामुळें यशस्वी नाटककार व्हायचें असेल तर कोणते गुण लेखकापाशीं असणें अगत्याचें आहे याचा त्यांना अभ्यास करतां आला आणि यशस्वी नाटककार म्हणून नांव मिळविण्याची महत्वाकांक्षाहि याच काळांत त्यांच्या मनांत उदित झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. पण गडकऱ्यांचें नांव वाङ्मयाच्या इतिहासांत राहील तें केवळ नाटककार म्हणूनच नव्हे. कवि या दृष्टीनेंहि गडकऱ्यांची योग्यता फार मोठी आहे. त्यांच्या सर्व कवितांचा संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर ' वाग्वैजयंती ' या नांवानें प्रसिद्ध झाला असला तरी त्यांचें महत्वाचें काव्यलेखन १९११ ते १९१७ या अर्ध तपांतच झालें. आधुनिक कविपैकीं केशवसुत हे त्यांचे अतिशय आवडते कवि होते व स्वतःला ते मोठ्या अभिमानानें ' केशवसुतांचा सच्चा चेला ' म्हणवून घेत असत. यामुळेंच केशवसुतांच्या ' तुतारी ' च्या धर्तीवर ' दसरा ' ही कविता त्यांनीं लिहिली. पण गडकऱ्यांच्या कवितांना केशवसुतांच्या कवितांतील राष्ट्रीय, सामाजिक किंवा तत्वज्ञानपर वातावरण एकंदरींत मानवणारें नाहीं. म्हणूनच अशा कवितांपेक्षां प्रेमविषयक कवितांचें वैपुल्यच त्यांच्या कवितेंत अधिक आढळतें. येवढेंच नव्हे तर क्वचित् तात्विक कविता-

तून देखील शेवटीं प्रणयाचे सूरच अधिक स्पष्टपणें ऐकूं येतात. त्यांची बहुतेक कविता प्रेमनिराशेच्या सूत्रांतच गुंफलेली आहे. त्यांची सारी कविता जशी भावप्रवण व रसोत्कट आहेत तशीच कल्पनासौंदर्या-नेंहि नटलेली आहे. विनोदी लेखक म्हणून गडक-ऱ्यांनीं कीर्ति मिळविली ती आपल्या "रिकामपणाच्या कामगिरी" मुळें सामाजिक दोषांचें सूक्ष्म निरीक्षण करून त्यावर विनोदप्रचुर भाषेंत त्यांनीं यथेंच्छ कोरडे ओढले आहेत. पण विनोदाचा आश्रय करतांना त्यानीं येवढी अतिशयोक्ति किती तरी ठिकाणीं केली आहे, कीं रसभंग पदोपदीं जाणवतो आणि कृत्रिमतेचा उग्र दर्प असह्य होतो. गडकऱ्यांनीं आपल्या कीर्तीवर कळस चढविला आहे तो आपल्या नाटकांनीं प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, एकच प्याला, भावबंधन, राजसंन्यास (अपूर्ण) व वेड्यांचा बाजार (अपूर्ण) येवढींच नाटकें लिहून त्यांनीं अमर कीर्ति मिळविली आहे. गडकरी आल्पायुषी ठरले नसते तर संकल्पाप्रमाणें १८ नाटकें लिहून त्यांनीं नाट्यक्षेत्रांत खचित मन्वंतर घडवून आणलें असतें. खाडिलकर-कोल्हटकरांसारखे नाटककार तळपत अस-तानांसुद्धां गडकऱ्यांनीं येवढी असमान्य कामगिरी नाट्यक्षेत्रांत करून दाखविली कीं तरुण पिढीचे डोळे-दिपून गेल्यावांचून राहिले नाहींत. त्यांची प्रतिभा खरो-खरच असामान्य होती. कल्पकता, भावनोत्कटता, सुहृदयता, मार्मिकपणा, अलंकारिक प्रसादयुक्त भाषा इत्यादि गुणांमुळें गडकऱ्यांचे लेखन नेहमींच प्रिय होऊन राहील. त्यांचें निधन जानेवारी १९१९ रोजीं झालें.

गांधी, मोहनदास करमचंद (१८६९):—



महात्मा गांधी,

हिंदुस्थानचे महा-पुरुष. यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९रोजीं काठे-वाडांत पोरबंदर येथें झाला. यांचे वडील राजकोट संस्थानचे दिवाण होते. काठेवाड व भावनगर येथें शिक्षण झाल्यावर ४ सप्टेंबर १८८८ रोजीं बॅरिस्टर होण्यासाठीं ते लंडनला गेले व १० जून १८९१ रोजीं परीक्षा पास झाले. १८९३ मध्यें त्यांनीं मुंबईस वकिली सुरू केली. पण त्याच वर्षी ते दक्षिण आफ्रिकेला वकिली करण्यासाठीं गेले. १८९४ मध्यें येथें त्यांनीं नाताळ हिंदी काँग्रेसची स्थापना केली. आफ्रिकेमध्यें हिंदी लोकांना जो राजकीय व सामाजिक त्रास सोसावा लागतो त्याबद्दल त्यांनीं चळवळीस सुर-वात केली. यासाठीं त्यांनीं हिंदुस्थान, इंग्लंड व आफ्रिका या तिन्हीं ठिकाणीं व्याख्यानें देऊन व लेख लिहून डेप्यु-टेशन्स नेऊन इंग्रज सरकार विरुद्ध लोक क्षोभ निर्माण केला. १९०५ मध्यें एशियाटिक लॉविरुद्ध सत्याग्रह केला. यांत त्यांना कैद होऊन शिक्षाहि झाली. १९०९ मध्यें ते शिष्टमंडळ घेऊन पुनः इंग्लंडला गेले. दक्षिण आफ्रिकेच्या सरकारनें गांधीशीं झालेले करार मोड-ल्यानें १९१३ मध्यें त्यांनीं पुनः सत्याग्रह केला व या वेळीं त्यांना यश मिळालें. १९१४ मध्यें ते इंग्लंडला गेले व तेथें शुश्रुषा पथकाची स्थापना केली. १९१५ मध्यें ते हिंदुस्थानाला परत आले. २५ मे १९१५ रोजीं त्यांनीं अहमदाबादनजीक सत्याग्रहाश्रमाची स्थापना केली. १९१७ सालीं चंपारण्यांतील अन्यायाविरुद्ध व अहमदाबादच्या गिरणी मजुरांच्या संपास पाठिंबा व त्यासाठीं तीन दिवसांचा उपवास या दोन महत्त्वाच्या गोष्टी त्यांनीं केल्या. १९१८ मध्यें खेडा जिल्ह्यांत त्यांनीं सत्याग्रह केला व यश मिळविलें. १९१९ मध्यें त्यांनीं 'यंग इंडिया' व 'नवजीवन' हीं पत्रें सुरूं केली. १९१९ मध्यें रौलेट कायद्याविरुद्ध सत्याग्रह व प्रवास खिलाफत चळवळीस पाठिंबा अमृतसर काँग्रेसमध्यें ब्रिटिश सरकारशीं सहकार्याची तयारी व सरकारनें विरुद्ध धोरण स्वीकारतांच असहकारिता त्यांनीं फुकारली. १ ऑगस्ट १९२० रोजीं असहका-रितेच्या चळवळीस सुरवात करून या धोरणानें एक वर्षांत स्वराज्य मिळवून देतो अशी घोषणा केली. १९२२ सालीं चौरीचौराच्या दंग्यामुळें बारडोली येथें सविनय कायदेभंग व करबंदी पुकारली. १९२२ मध्यें राजद्रोहाचा खटला होऊन सहा वर्षांची शिक्षा झाली परंतु १९२४ मध्येंच त्यांची मुक्तता झाली. सुटकेनंतर हिंदुमुसलमानांच्या ऐक्यासाठीं त्यांनीं एकवीस दिव-सांचा उपवास केला. यानंतर स्वराज्य पक्षाशीं त्यांनीं मिळतें घेऊन चरखा, खादी, ग्रामसंघटना इत्यादि

कार्यावर भर दिला. १९२८ मध्यें काँग्रेसचीं सूत्रें त्यांनीं पुन्हां हातीं घेतलीं.

१ जानेवारी १९३० च्या आंत स्वराज्य देण्याची मागणी करून तिला नकार मिळतांच सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा प्रचार करून १२ मार्च १९३० रोजीं साबरमती आश्रमांतून मिठाच्या सत्याग्रहासाठीं ८० स्वयंसेवकासह दांडीचा प्रवास पायीं आरंभला. व ५ एप्रिल रोजीं ते दांडीस पोहोंचले. मिठाचा कायदा तोडण्याचा कार्यक्रम ठरवून ही गोष्ट सरकारला कळवून त्यांनीं ५ मे रोजीं कायदेभंग केला. व त्याच दिवशीं 'रास' गांवीं अटक होऊन त्यांना बिनमुदत कैद करण्यांत आले. २६ जानेवारी १९३१ रोजीं त्यांची एरवडा तुरुंगांतून सुटका झाली. व दिल्ली येथें ५ मार्च १९३१ रोजीं गांधी आयर्विन (त्या वेळचे हिंदुस्थानचे व्हॉईसरॉय) तह होऊन कायदेभंगाची चळवळ मागें घेण्यांत आली. ३१ एप्रिल १९३१ रोजीं कराचीच्या काँग्रेसमध्यें या तहाला संमति मिळून २९ ऑगस्ट १९३१ रोजीं काँग्रेसतर्फे गांधी दुसऱ्या गोलमेज परिषदेस हजर राहण्यास मुंबईहून निघाले.

गोलमेज परिषदेंत त्यांनीं स्पष्ट शब्दांत हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची मागणी केली. व परिषद संपताच ते हिंदुस्थानास परत आले. मध्यंतरीच्या काळांत लॉर्ड विलिंग्डन हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय झाले होते. त्यांच्याकडे जुलमी वट-हुकूम परत घेण्याची मागणी केली परंतु नकार मिळतांच पुन्हां सविनय कायदेभंगाच्या चळवळीस प्रारंभ केला. तेव्हां ४ जानेवारी १९३२ रोजीं गांधीना मुंबई येथें अटक झाली व येरवड्यास पाठविण्यांत आले. मध्यंतरी मुख्यप्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड यांनीं आपला जातीनिर्णय जाहीर करून अस्पृश्यासही स्वतंत्र मतदार संघ दिले. ही अनिष्ट गोष्ट दुरुस्त करण्यासाठीं आमरण उपवासाला २० सप्टेंबर १९३२ रोजीं तुरुंगांत सुरवात केली. शेवटीं अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांच्या संमतीनें संयुक्त मतदार संघ व राखीव जागा या गोष्टी मान्य झाल्या व त्यांना ब्रिटिश प्रधान मंडळाची संमति मिळाल्यावर त्यांनीं उपवास सोडला.

यानंतर त्यांची ८ मे १९३३ रोजीं सुटका झाली. नंतर त्यांनीं पुनः चरखा, खादी व अस्पृश्योद्धार हीं कार्यें हातीं घेतलीं व त्यासाठीं 'हरिजन' पत्र सुरू केलें. १९३५ मध्यें त्यांनीं ग्रामोद्धार चळवळीस हात घातला. १९३७ मध्यें १९३५ च्या सुधारणा कायद्याप्रमाणें प्रांतिक स्वायत्ततेस सुरवात होताच काँग्रेसतर्फे निवडणुकी लढविण्यास संमति दिली. व आठ प्रांतांत काँग्रेसला मताधिक्य मिळालें पण आरंभीं मंत्रीमंडळें बनविण्यास नकार देऊन चारच महिन्यांनीं त्यांचे प्रांतिक स्वायत्ततेच्या उपयुक्ततेबद्दलचें मत बदललें व मंत्री मंडळें बनविण्यास त्यांनीं संमति दिली व काँग्रेस पक्ष अधिकारारूढ झाला. १९३९ च्या सप्टेंबरमध्यें चालू महायुद्ध सुरू होतांच हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न पुनः काढून व युद्ध समाप्तिनंतर हिंदुस्थानास स्वराज्य देण्याचें वचन मिळाल्याशिवाय काँग्रेस ब्रिटिशसरकारशीं सहकार्य करणार नाहीं असें त्यांनीं जाहीर केलें व ही मागणी फेटाळली जातांच काँग्रेस मंत्री मंडळांना राजिनामे देण्याचा आदेश त्यांनी दिला व त्याप्रमाणें आक्टोबर–नोव्हेंबर १९३९ मध्यें सर्व काँग्रेस मंत्री मंडळांनीं राजिनामे दिले. नंतर डोमिनियन स्टेट्स व संपूर्ण स्वातंत्र्य यांच्या मागण्या गांधींनीं पुढें मांडल्या व त्यांना नकार मिळताच व्हॉइसरायांच्या कार्यकारी मंडळाच्या नव्या योजनेबाबत असहकाराचे धोरण पुकारून नोव्हेंबर १९४० पासून 'वैयक्तिक सत्याग्रह' धोरणाचा त्यांनीं अवलंब केला आहे.

गांधीना त्यांच्या थोरपणामुळें हिंदुस्थानांत त्यानां महात्मा गांधी असें संबोधतात. चरखा, खादी व ग्रामोद्धार यामुळें गरीबांच्या पोटापाण्याचा प्रश्न व खेडेगांवच्या अशिक्षितांच्या उद्धाराचा प्रश्न त्यांनीं हातीं घेतला. अस्पृश्योद्धाराच्या त्यांच्या चळवळींमुळें हिंदूसमाजांत शेंकडो वर्षें सामाजिक जुलूम सहन करीत राहणाऱ्या अस्पृश्य बांधवांची बाजू त्यांनीं उत्कृष्टपणें मांडून हिंदूसमाजाची चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

राजकारणाच्या बाबतींत असहकार, अन्यायी कायद्यांचा भंग व सत्य आणि अहिंसेचें धोरण स्वीकारून अभूतपूर्व राजकारण टिळकांच्या मृत्युनंतर ते लढवीत आहेत. अहसकार व सत्याग्रहाची चळवळ यामुळें त्यांनीं राजकारण हें समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोचविलें आहे. सत्य व अहिंसा यांच्या धोरणामुळें गेल्या वीस वर्षांत एका अपूर्व तत्त्वज्ञानाची हिंदुस्था-

न्च्या राजकारणाशीं गांठ मारण्यांत आली आहे. गांधींच्या सत्य आणि अहिंसा या संबंधींच्या कल्पना वारंवार बदलल्या असल्यामुळें त्याविषयीं एक प्रकारची गूढ विचारसरणी निर्माण झाली आहे. गेल्या महायुद्धाच्या वेळीं ब्रिटिश सरकारला प्रत्यक्ष मदत करणारे गांधी या युद्धाच्या वेळीं असहकाराचें धोरण स्वीकारतात. हिंसेनें स्वराज्य मिळणार नाहीं व मिळालें तरी तें टिकणार नाहीं अशी म. गांधींची निश्चित विचारसरणी आहे. हिंदुस्थानांतील अल्प संख्यांकाच्या बाबतींत त्यांनीं कमालीचें उदारतेचें धोरण स्वीकारून जाती निर्णयासारखे हिंदु हितविरोधी निर्णय आपल्यावर लादून घेतले आहेत. मुसलमानांची पाकिस्थानची मागणी ही म. गांधींच्या उदार धोरणांतूनच निर्माण झाली आहे. एवढेंच नव्हेतर त्यांनीं या मागणीला तात्विक पाठिंबा देऊन आपली तात्त्विक भूमिका जाहीर केली आहे.

गायः—हिंदूंचा पवित्र व उपयुक्त असा ग्रामपशू. हिंदू लोकांना हिची माहिती वेदकालापासून असलेली दिसते. हिच्या ठिकाणीं तेहेतीस कोटी देव वास करतात असा बहुतेक हिंदूंचा समज आहे. हिच्या कुळांतील कामधेनू ही सर्वांच्या परिचयाची आहे. ही वसिष्ठाजवळ होती. तिच्याबद्दल वसिष्ठ विश्वामित्र यांच्यांत अनेकवार तंटे उपस्थित झाल्याचे आपणांस पुस्तकांतून वाचावयास मिळतात. दिलीप राजाला हिच्या मुलीच्या सेवेमुळें मुलगा झाला. ब्राह्मणांना पूर्वींचे पुष्कळ राजे गायी दान देत असत. कुवेळीं जन्मास आलेल्या बालकाला ग्रहबाधा होऊनये म्हणून गोप्रसवशांती करण्याची व गोप्रदानें देण्याची वहिवाट आहे. महाराष्ट्रभूषण श्रीशिवराय यांनीं स्वतःला ‘ गोब्राह्मण प्रतिपालक ’ ही पदवी धारण केली होती. या उदाहरणावरून तिच्या संबंधीच्या आदराची व पावित्र्याची कल्पना येईल.

वरील आदराचा दृष्टिकोन बाजूला करून व्यावहारिक उपयुक्ततेच्या दृष्टीनें जरी तिच्याकडे पाहिले तरी शेतीच्या कामाला तिचा स्वतःचा उपयोग होतोच. शिवाय तिच्यापासून होणारे बैल शेतकऱ्यांचा अगदीं प्राण आहेत. तिच्यापासून मिळणारे दूध, तूप, ताक व लोणी हे पदार्थ प्रत्येक मनुष्याची बुद्धि व शक्ति वाढवीत असतात. इतकेंच नव्हे तर तिच्या गोमय आणि गोमूत्र या पदार्थांचा देखील रोग निवारण्याच्या कामीं किती उपयोग होतो हें एखादा वैद्य तेव्हांच सांगू शकेल.

अशारीतीनें उपयुक्त असणारा हा प्राणी तांबडा, पांढरा, काळा किंवा बाळा यापैकीं कोणत्या तरी एका रंगाचा असतो. शरीरानें ही म्हशीपेक्षां थोडी लहान असते. हिचीं शिंगें गोल असतात. वशिंड व गळ्याखालीं लोंबणारी पोळी यामुळेंहि तिचें वैशिष्ट्य व्यक्त होतें. शेंपूट गोंडेदार, पाय दुबेळकें असलेले व स्वभाव गरीब हीं आणखीं हिचीं विशेष लक्षणें होत. साधारणपणें ही वीस अथवा बावीस वर्षे जगूं शकते. वासरूं तीन वर्षांचें झालें म्हणजे त्याला गायीचें स्वरूप येतें. स्थूलमानानें गाय ८।९ महिने दूध देऊं शकते. हिचें दूध, लोणी व तूप पिवळें असतें. दूध पातळ असतें. ही गाभ गेल्यापासून नऊ महिन्यांनीं विते. हिच्या नर वासराला गोऱ्हा किंवा पाडा व मादी वासराला कालवड अथवा पाडी म्हणतात. हिचें वयोमान (सुमारें २०) कित्येकजण तिच्या दांतांवरूनहि सांगू शकतात. हिला फक्त खालींच दांत असतात. हिच्या अनेक जाती आहेत त्यांपैकीं कृष्णाकाठी, गुजराथी, गोदाकाठी, गंगाकाठीं खिलारी या जाती प्रमुख होत.

गायकवाड, श्रीमंत तिसरे सयाजीराव (१८६३–१९३९):—बडोद्याचे सुधारक, विद्याप्रेमी, स्वाभिमानी व मुत्सद्दी महाराज दत्तकपूर्व नांव गोपाळराव. कवळाण्याला काशीराव व त्यांची पत्नी उमाबाई यांच्या पोटीं ११ मार्च १८६३ ला जन्म. बाळपण तेथेंच. बडोद्याच्या महाराणी जमनाबाईनीं यांना २७ मे १८७५ ला दत्तक घेतले. त्याच दिवशीं राज्यारोहण. २७ डिसें. १८८१ पर्यंत मि. ईलियट यांच्या नेतृत्वाखालीं मराठी, गुजराथी व इंग्रजी या भाषांचें व अनेक विषयांचें शिक्षण पुरें केलें. २८–१२–१८८१ रोजीं अधिकारप्राप्ति. राज्यांतील परिस्थितीचें १८८२–१८८४ पर्यंत अवलोकन. १८८७–१९३८ पर्यंत साधारणतः २५ सहली करून जगाची माहिती करून घेतली.

त्यांनीं केलेल्या अनेक चांगल्या गोष्टींपैकीं पुढील प्रमुख होत. लोकोपयोगी कायदे, नागर–सौंदर्य वाढवणाऱ्या इमारती, पाण्याचा पुरवठा, रेल्वेची सुरवात व वाढ. गायकवाडी नाण्यानें होणारे नुकसान

वाचविलें, देशी भाषा व ग्रंथ यांना उत्तेजन दिलें. प्राथमिक शिक्षण सक्तीचें पण मोफत केलें, मध्यवर्ति व फिरती वाचनालयांची सोय, कोर्टें स्थापलीं, शास्त्रीय, संगीत व उच्च शिक्षणाच्या सोयी केल्या, विद्वानांचा सत्कार केला.

महाराजांचीं दोन लग्नें अनुक्रम १८८० व १८८५ या वर्षांत झालीं. दोन्हीं कुटुंबांपासून त्यांना चार मुलगे व तीन मुलींचा लाभ झाला. महाराजांना दोन जनक बंधू व एक दत्तक बहीण होती. यांचे १९०६ ला रौप्य १९२६ ला सुवर्ण व १९३६ मध्यें हीरक हे महोत्सव लोकांनीं साजरे केले.

तत्त्वज्ञान परिषद, सर्व धर्म परिषद, मराठी, गुजराथी व हिंदी या संमेलनांचीं अध्यक्षस्थानें त्यांनीं स्वीकारलीं होती. या शिवाय लंडनला भरलेल्या पहिल्या दोन गोलमेज परिषदांना हजर राहून त्यांनीं हिंदी लोकांना आपल्या ज्ञानाचा फायदा घेऊं दिला.

सरकारनें त्यांना 'फर्जंद–इ–खास' 'दौलत–इ–इंग्लिशिया' हे दोन किताब दिले. तसेंच G. C. I. E. व G. C. S. I. या दोन पदव्यांची प्राप्ती झालीं. १९२४ त विश्वविद्यालयानें L. L. D. ही पदवी देऊन त्यांच्या विषयींचा आपला आदर प्रगट विला. हे ६ फेब्रुवारी १९३९ ला स्वर्गवासी झाले.

गिबन, एडवर्ड (१७३७–१७९४):– इंग्लिश इतिहासकार. याचा जन्म २७ एप्रिल १७३७ रोजीं झाला. १७६३ मध्यें हा इटलींत प्रवासाला गेला व त्यानें इतिहास प्रसिद्ध रोमशहर पाहिलें. तेव्हां त्याला The Decline and Fall of the Roman Empire हा ग्रंथ लिहिण्याची स्फूर्ती झाली, पण प्रत्यक्ष लेखनाला सुरवात १७७२ मध्यें होऊन १७७६ मध्यें पहिला खंड प्रसिद्ध झाला व १७८८मध्यें राहिलेलें तीन खंड प्रसिद्ध झालें. या एकाच ग्रंथानें तो प्रसिद्ध आहे. तो लंडन शहरीं १६ जानेवारी १७९४ रोजीं मरण पावला.

गुरु गोविन्दसिंह (१६६५–१७०७):—शीखांचा दहावा गुरु. गुरु तेजबहादूर व गूजरी यांच्या उदरी जन्म. ७ व्या वर्षी लग्न. हा संस्कृत व फार्शी या भाषा उत्तम जाणत असे. शीख पंथांत याच्यामुळेंच मन्वंतर सुरूं झालें. हा धोरणी चलाख, रणनिपुण होता. यानें आपल्या पंथाला 'खालसा' हें नांव दिलें खालसा याचा अर्थ एकी असा आहे. केस, कडे, कंगवा, कट्यार व कच्छ हे पंच ककार प्रत्येक शीखानं धारण केले पाहिजेत अशी आज्ञा यानें केली. शीखांना ऐक्य व शिस्त यांचें महत्त्व यानेंच पटविलें. गोवध बंद करून हिंदूंची सहानुभूति मिळविली.

१६६५ त याच्या बापाचा वध मुसलमान होईना म्हणून झाला. मुसलमानांशीं याचीं युद्धें सुरूं झालीं. अनेक–प्रसंगांतून हा बचावला पण याचीं दोन मुलें त्यांत मरण पावलीं. शीखांचा संहार होण्याची वेळ आली तेव्हां हा मुसलमानी वेष करून पळाला. वाटेंत एका ठिकाणीं मुसलमानाबरोबर जेवण करून याला आपला प्राण वांचवावा लागला. शत्रूनें याचीं दोन मुलें चिणून मारलीं म्हणून याची आई गूजरी हिनें तुरुंगाच्या खिडकींतून उडी टाकून प्राण दिला. शेवटीं हा दक्षिणेंत नांदेडला शांततेनें दिवस घालवीत असतां मारला गेला.

गोविन्दसिंह उत्तम हिंदी कवि म्हणून प्रसिद्ध आहे. तसेंच एक उत्तम ग्रंथकार म्हणूनहि त्याचा लौकिक आहे. यानें सुनीतिप्रकाश, ज्ञानप्रबोध, प्रेमसुमार्ग, बुद्धिसागर, विचित्रनाटक, ग्रंथसाहेबांतील कांहीं भाग सर्व लोहप्रकाश व चंडीचरित्र हे ग्रंथ लिहिलें आहेत. गुरुबक्षसिंह या नांवाचा याचा एक पट्टशिष्य होता.

गॅरी कूपर (१९०१—):—अमेरिकन सिनेमानट. हेलेना (मोंटाना) येथें ७ मे १९०१ रोजीं याचा जन्म झाला. इंग्लंडमध्यें याचें शिक्षण झालें. हायस्कूल व कॉलेजमधील नाटकांत कामें करतांना मिळालें तेवढेंच त्याचें अभिनय शिक्षण होय. इंग्लंडहून शिक्षण घेऊन अमेरिकेस परत आल्यावर कांहीं दिवस त्यानें एका वृत्तपत्रांत व्यंगचित्रकार म्हणून काम केलें. पण नट म्हणून चित्रपटसृष्टींत कीर्ती मिळवावयाची असें ठरवून १९२४ मध्यें हा हॉलिवुडला गेला. एक वर्षभर 'एक्स्ट्रा' म्हणून काम केल्यावर एका 'टू रीलर' (लहान चित्रपट, सुमारें २००० फूट लांबीचा) मध्यें त्याला काम मिळालें.




गॅरी कूपर

व तो नट म्हणून पुढें येऊं लागला. Winning of Barbara Worth, It, Children of Divorce हे मूकपट व A Farewell to Arms, The Eagle and the Hawk, The Wedding Night, Desire, Mr. Deeds Goes to Town हे त्याचे बोलपट प्रसिद्ध आहेत. भक्कम शरीरबांधा, ऐटबाज चाल, व अभिनयांतील बालिशपणा हे त्याचे विशेष आहेत.

गॅलिलि गॅलिलिओ (१५६४–१६४२):–सुप्रसिद्ध इटालियन खगोलशास्त्रज्ञ, गणिती व पदार्थ विज्ञान शास्त्रज्ञ. पिसा येथें १५ फेब्रुवारी १५६४ रोजीं त्याचा जन्म झाला. पिसा विद्यापिठांत त्यानें १५८५ पर्यंत शिक्षण घेतलें. पुढें त्यानें गणिताचा फारच आस्थापूर्वक अभ्यास केला. १५८९ सालीं पिसा विद्यापिठांतील गणिताच्या अध्यापकाची जागा त्याला देण्यांत आली. या जागेवर असतानांच त्यानें गणितशास्त्राचा एक शोध लावला. हा शोध तत्पूर्वी अरिस्टॉटलनें लावलेल्या शोधाविरुद्ध होता. ‘पदार्थांना पंडण्याला लागणारा वेळ त्यांच्या वजनावरच फक्त अवलंबून असतो’ या अरिस्टॉटलच्या सिद्धान्तांतील चूक त्यानें दाखवून दिली. परंतु परंपरागत ज्ञानाला चिकटून राहण्याच्या लोकवृत्तीमुळें त्याला आपली अध्यापकाची जागा सोडावी लागली. १५९२ सालीं पाडुआ विद्यापीठांत तो प्राध्यापक झाला. हें काम त्यानें १८ वर्षें केलें. १५९३ सालीं त्यानें कोनमापक यंत्राचा शोध लावला. १६०४ पासून त्यानें खगोल शास्त्राच्या अभ्यासाला सुरवात केली. त्यानें पृथ्वी स्थिर असून तिच्या भोंवती सर्व ग्रह फिरतात हा टॉलेमीचा सिद्धांत चूक असून सूर्याभोंवतीच पृथ्वी व इतर ग्रह फिरतात हें कोपर्निकसचें मत बरोबर असल्याचें दाखवून दिलें. १६०३ सालीं त्यानें दुर्बिण तयार केली. दुर्बिणीच्या सहाय्यानें त्यानें सूर्यावरील डाग व गुरुचे उपग्रह यांचा शोध लावला. बुध व शुक्र यांनाहि चंद्राप्रमाणें कला असतात हेंहि त्यानें जगाच्या निदर्शनाला आणलें. १६२४ सालीं त्यानें धूमकेतूच्या भ्रमणाविषयींचा आपला शोध लावला.

गॅलिलिओनें लावलेले शोध तत्कालिन रूढ व धार्मिक मतांना धक्के देण्यासारखे असल्यामुळें पोपकडून त्याला फार जांच झाला. १६२३ सालीं त्याच्या पाखंडी मताबद्दल त्याची चर्चकडून चौकशी झाली. कांहीं लेखकांच्या मतें गॅलिलिओला कारागृहवास घडला. पण पुष्कळ आधुनिक संशोधक म्हणतात कीं कारागृहवासाची शिक्षा जरी त्याला सांगण्यांत आली असली तरी तिचा अम्मल झाला नाहीं. हा थोर शास्त्रज्ञ आपल्या वयाच्या ७८ व्या वर्षी फ्लॉरेन्स येथें मरण पावला. मृत्यू पूर्वी तो पांच वर्षें आंधळा झाला होता.

गॉर्की, मॅक्सिम (१८६८––१९३६):—प्रख्यात रशियन क्रांतिकारक लेखक. याचा जन्म १४ मार्च १८६८ रोजीं निझिनी नोव्हगोरॉड येथें झाला. याचें मूळचें नांव अलेक्सी मॅक्सिमोविच पेशकॉव्ह असें होतें पण पुढें त्यानें तें बदलून मॅक्सिम गॉर्की असे घेतलें. घरचीं स्थिती गरीबीची असल्यामुळें त्याला शिक्षण फारसें मिळालें नाहीं. चांभार, बागवान, सैपाकी, कारकून असें धंदे करून तो कंटाळला व पायीं प्रवासाला निघाला. प्रवासांत त्याला ज्या गोष्टी दिसल्या त्या त्यानें पुढें आपल्या कादंबऱ्या कथांतून चित्रिल्या. १८९३ सालीं Chelkash ही कादंबरी लिहून लेखक म्हणून यश मिळविलें. पुढें सोशल डेमोक्रॅटस् या क्रांतिकारकांना तो मिळाला. १९०५ मध्यें त्याला अटक होऊन १९१३ पर्यंत त्याला हद्दपार करण्यांत आलें होतें. लेनिनबरोबर पत्रव्यवहार ठेवून त्यानें मजूरांची चळवळ चालू ठेविली होती. रशियन क्रांतीनंतर तो विशेष प्रसिद्धीस आला. त्याच्या कामगिरीच्या गौरवार्थ त्याच्या जन्मगांवचें नांव बदलून गॉर्की हें ठेवण्यांत आलें, व कांहीं पोस्टांच्या तिकिटांवरहि त्याचें चित्र छापण्यांत आलें होतें.



गॉर्की मॅक्सिम

त्याच्या वाङ्मयाचा सूर शोकान्त आहे. त्यानें अनेक गोष्टीहि लिहिल्या आहेत. त्याच्या कथा–कादंबऱ्याचे पुढील ग्रंथ Song of the Falcon, Three Men, Comrades, Mother, Other Fires, प्रसिद्ध आहेत. याशिवाय The Summer Folk, The Children of the Sun, The Barbarians, Lower Depths ही नाटकें प्रसिद्ध आहेत. तो १८ जून १९३६ रोजीं मरण पावला.

ग्रेटब्रिटनः--युरोपच्या वायव्येस असलेल्या बेटांच्या समूहाला ग्रेटब्रिटन हें नांव आहे. ग्रेटब्रिटनमध्यें इंग्लंड, स्कॉटलंड व वेल्स या तीन प्रांतांचा समावेश होतो. पश्चिमेस आयर्लंडपासून आयरिश समुद्रानें हें विभागलेलें असून उत्तर आयर्लंडचा ब्रिटिश शासित भाग धरला तर ग्रेटब्रिटन व उत्तर आयर्लंडचें राज्य असें संयुक्त नामाभिधान देतात. ग्रेटब्रिटनच्या दक्षिणेस इंग्लीश खाडी पश्चिमेस अटलांटिक महासागर व पूर्वेस आणि उत्तरेस उत्तर समुद्र आहे. कित्येकवेळीं नुसत्या इंग्लंडला उद्देशूनहि ग्रेटब्रिटन असा शब्दप्रयोग करतात.

क्षेत्रफळ, लोकसंख्या व भूप्रदेशः--ग्रेटब्रिटनचें क्षेत्रफळ ८८,७४५ चौ. मैल आहे. जगांतील बेटांत आकारमानानें याचा सातवा क्रमांक लागतो. यांपैकीं इंग्लंड, ५०,८७४ चौ. मैल; वेल्स, ७,४६६ चौ. मैल; स्कॉटलंड, ३०,४०५ चौ. मैल. या बेटाची जास्तींत जास्त लांबी ६०० मैल व जास्तींत जास्त रुंदी ३२० मैल आहे. (कमीत कमी रुंदी ३२ मैल) ग्रेटब्रिटन उ. अ. ५० ते ५९ व इंग्लंडमधील ग्रीनिचपासून पूर्वपश्चिम रेखांश मोजतात.

१९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें ४४,९३७, ४४४. स्कॉटलंडमध्यें लोकवस्ती विरळ आहे. स्कॉटलंडचा भाग डोंगराळ आहे. तसाच वेल्सचाहि आहे. इंग्लंडचा दक्षिणेकडील व अग्नेय दिशेकडील भाग सपाट आहे. स्कॉटलंडमधील पश्चिमेस बेननेव्हीस पर्वत असून त्याची उंची ४,४०६ फूट आहे. इंग्लंड स्कॉटलंडच्या सरहद्दीवरील चेव्हियट टेकड्यांची उंची २,६०० फूट आहे.

ग्रेटब्रिटनमध्यें फार लांबीच्या किंवा रुंदीच्या नद्या नाहींत. स्पे, डॉन, डी, टे, फोर्थ, ट्वीड, टाइन, ट्रेंट व थेम्स या पूर्वेस वाहात जाणाऱ्या व उत्तर समुद्रास मिळणाऱ्या नद्या आहेत. क्लाइड व सेव्हर्न पश्चिमेस वाहतात. थेम्स नदी व्यापारी दृष्टीनें फार महत्वाची असून हिच्याच कांठीं लंडन शहर वसलेलें आहे. डोंगराळ भागांत सरोवरें असून तो प्रदेश सृष्टिसौंदर्याबद्दल प्रख्यात आहे.

ग्रेटब्रिटनचें सरासरी उष्णतामान ४८° आहे. जुलै महिन्यांत उष्णता जास्त असते व त्यावेळीं ६४° उष्णता असते. जानेवारी हा कडक थंडीचा महिना असतो. साधारणतः पश्चिम किनाऱ्यावर सर्वसाधारणतः पाऊस जास्त पडतो ४० ते ८० इंच हें प्रमाण आहे. वारंवार पडणारें धुकें व आभ्राच्छादित आकाश हें या बेटाचें वैशिष्ट्य आहे. अटलांटिक महासागरवरून उष्ण वारे व उत्तर समुद्रावरून थंड-वारे बेटावर वाहातात.

खनीज संपत्ति, जमीन व पिकें—ग्रेट ब्रिटनची जमीन सुपीक असली तरी लोकसंख्येला पुरेल एवढें अन्न तें उत्पन्न करूं शकत नाहीं. लोखंड व दगडी कोळसा इंग्लंडमध्यें विपुल सांपडतो. त्या खालोखाल शिसें, टिन व जस्त सांपडतें. ओट, बार्ली, बटाटे, राय, गहूं, फ्लॅक्स व निरनिराळी फळें होतात.

धर्म, भाषा व शिक्षण—प्रॉटेस्टंट पंथीय ख्रिश्चन धर्माचे लोक इंग्लंड वेल्समध्यें आहेत. पण स्कॉटलंडमध्यें ५० लक्ष लोक रोमन कॅथॉलिक आहेत. आठव्या हेन्रीच्या कारकीर्दींत इंग्लंडनें धार्मिक बाबतींत पोपचा अधिकार झुगारून दिला. स्कॉटलंडमध्यें चर्च ऑफ स्कॉटलंड (प्रेस्बिटेरियन पंथ) ही संस्था व इंग्लंडमध्यें चर्च ऑफ इंग्लंड ही संस्था आहे. चर्च ऑफ इंग्लंड ही संस्था सरकारच्या नियंत्रणाखालीं आहे. राजा हाच धार्मिक बाबतींत शेवटची अधिकारी व्यक्ति आहे. कँटर्बरी व यॉर्क या दोन विभागांत धर्मसत्ता विभागली असून आर्चबिशप हा प्रमुख धर्माधिकारी आहे.

इंग्लिश भाषेचें प्रभुत्व गेटब्रिटनमध्यें आहे. व राजभाषाहि तीच आहे. पण स्कॉटलंड व वेल्समध्यें अनुक्रमें स्कॉटिश व वेल्स या भाषा बोलतात व त्याभाषांत वाङ्मयहि चांगलें आहे.

शिक्षण सक्तीचें असून सर्व लोक साक्षर आहेत. केंब्रिज, ऑक्सफर्ड, एडिंबरो, ग्लासगो, लंडन, लीड्स इ. विद्यापिठें जगभर प्रसिद्ध असून जगाच्या सर्व भागांतून शेंकडो विद्यार्थी ग्रेटब्रिटनमध्यें शिक्षणासाठीं येत असतात.

राजधान्या व शहरें--इंग्लंडची राजधानी लंडन हें शहर असून लोकसंख्या विस्तार व्यापार इ. बाबतींत सर्व जगांत तें पहिलें आहे. केर्नरव्हॉन व कार्डिफ ही दोन शहरें वेल्सच्या राजधानीचीं ठिकाणें मानतात. एडिंबरो ही स्कॉटलंडची राजधानी आहे. याशिवाय बर्मिंगहॅम, मँचेस्टर, लिव्हरपूल, ग्लासगो,

डंडी, साउथॅम्प्टन, ब्रिस्टल, प्लायमाऊथ इ. शहरें हीं बंदरें किंवा कारखान्यांचीं केंद्रें म्हणून प्रसिद्ध आहेत.

उद्योगधंदे व व्यापार:—शेती, खाणी, कारखाने व व्यापार हें मुख्य उद्योगधंदे असून स्कॉटलंड, इंग्लंड व वेल्स या तीन्ही देशांची हवा या सर्व उद्योगांना अत्यंत अनुकूल अशी आहे. तीन कोटी एकर जमीन शेतीसाठीं उपयोगांत येते. उद्योगधंद्यांत कापड विणण्याचा धंदा मोठ्या प्रमाणांत असून त्या खालोखाल लोखंड व पोलाद आणि त्यापासून निर्माण होणारी यंत्रें व इतर साधनें यांचा धंदा मोठा आहे.

सर्व ग्रेटब्रिटनभर रेल्वेचें जाळें पसरलेलें आहे. याशिवाय कमालीच्या दंतुर किनाऱ्यामुळें कित्येक बंदरें आहेत. मोटारीचे रस्तेहि भरपूर आहेत. इंग्लंडचीं व्यापारी जहाजें जगांतील कुठल्याही देशापेक्षां (आरमाराप्रमाणेंच) जास्त आहेत. यामुळें देशांत व परदेशाशीं सुलभ दळणवळण ठेवतां येऊन व्यापार वाढीला फार मदत झालेली आहे. दरवर्षी वीस अब्ज रुपयांचा व्यापार परदेशी चालतो. यापैकीं $\frac{1}{3}$ निर्गत व $\frac{2}{3}$ आयात व्यापार चालतो. तयार माल व कोळसा हे निर्गतीचे प्रमुख जिन्नस असून, खाद्यपदार्थ व कच्चामाल हे आयात होतात.

राजव्यवस्था—राजा हा सर्व सत्ताधीश मानतात. सनदशीर राजसत्ता प्रस्थापित आहे. राजाची गादी वंशपरंपरेनें मिळते. राजाला सर्व सत्ताधीश मानलें असलें तरी पार्लमेंट हेंच प्रत्यक्ष सत्ताधारी आहे. पार्लमेंटचें दोन विभाग आहेत. (१) हौस ऑफ लॉर्डस् (वरिष्ठ विधिमंडळ) (२) हौस ऑफ कॉमन्स (जनतेच्या प्रतिनिधींचें विधिमंडळ).

हौस ऑफ लॉर्डस्मध्यें ७५० सभासद आहेत. यांत धर्मसंस्थेचे प्रमुख अधिकारी इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंडमधील सरदार, कायद्याचे वरिष्ठाधिकारी व मंत्रिमंळाच्या शिफारशीनें आलेले सभासद यांचा समावेश होतो. हौस ऑफ कॉमन्समध्यें ६१५ सभासद असतात. त्यांची मुदत पांच वर्षांची असते. हौस ऑफ कॉमन्समध्यें बहुसंख्येनें निवडून आलेल्या पक्षाच्या प्रमुखाला राजा मुख्य प्रधान नेमतो. मुख्य प्रधान आपलें प्रधानमंडळ बनवितो. मुख्य प्रधान हाच प्रधानमंडळाचा नेता असतो व तोच (सामान्यतः) 'फर्स्ट लॉर्ड ऑफ् दि ट्रेझरी' असतो. प्रधानमंडळांत हौस ऑफ् लॉर्डस् व हौस ऑफ कॉमन्स या दोहोंतून सभासद घेतां येतात. याशिवाय प्रधानमंडळांत न बसणारे इतर मंत्रिहि नेमतात.

एकवीस वर्षांवरील स्त्री पुरुषास व कमितकमी ६ महिने राहिलेल्या रहिवाशास मतदानाचा अधिकार आहे.

पार्लमेंटच्या देखरेखेखालीं स्थानिक स्वराज्य संस्था काम करतात. ५०,००० लोक संख्येपेक्षां अधिक लोक संख्येच्या शहरांना बरो म्हणतात व त्यांना विशेष अधिकार असतात. लंडन शहराची स्वतंत्र राज्यव्यवस्था आहे.

प्रधान मंडळें वारंवार बदलली तरी राज्यव्यवस्थेला धक्का लागू नये म्हणून स्थिर अशी सिव्हिल सर्व्हिस आहे व ती कायद्यानें प्रधान मंडळाला जबाबदार आहे.

न्यायखात्यांत कोर्ट ऑफ् क्रिमिनल अपील, किंग्ज बेंच, चॅन्सरी, प्रोबेट, डायव्होर्स ॲण्ड ॲडमिरॉलिटी, कौंटी कोर्टस्, क्वार्टर सेशन्स, पेट्टी सेशन्स, जस्टिस ऑफ दि पीस अशी विभागणी आहे.

इंग्लंडचे ४० परगणे (Counties कौंटी) केलें आहेत. इंग्लंडची लोकसंख्या सुमारें ३८,०००,००० आहे, इंग्लंडला १८०० मैलाचा किनारा आहे, व भूप्रदेश सपाटच आहे. फक्त वायव्येस डोंगराळ भाग आहे.

स्कॉडलंडचे ३३ परगणे असून लोकसंख्या सुमारें ४,८४२,५५४ इतकी आहे. स्कॉटलंडचा किनारा अत्यंत दंतुर असून सभोंवतीं १८० बेटें आहेत. सर्व भूभाग डोंगराळ असून फारसा सुपीक नाहीं. पण वनश्रीच्या दृष्टीनें स्कॉटलंड प्रख्यात आहे.

वेल्सचे १२ परगणे केले असून लोकसंख्या सुमारें २,२४७,००० आहे. पुष्कळसा भाग डोंगराळ असून सृष्टिसौंदर्याबद्दल प्रसिद्ध आहे.

इतिहास—इ. स. १६०३ मध्यें स्कॉटलंडचा सहावा जेम्स हा पहिला जेम्स या नांवानें इंग्लंडच्या गादीवर बसला. तरी पण स्कॉटलंड व इंग्लंडचीं स्वतंत्र विधिमंडळें होतीं. पण इंग्लंड-स्कॉटलंडचे राष्ट्रीय हित एकाच धोरणांत असल्याबद्दलची विचारसरणी प्रबल होत जाऊन मे १७०७ मध्यें राजकीयदृष्ट्या इंग्लंड--स्कॉटलंड एकजीव झाले व तेव्हांपासून ग्रेटब्रिटन हें

नांव पडलें. अर्थात् दोघांचें विधिमंडळहि एकच बनलें.

या नंतरच्या इतिहासांत व्हिग व टोरी या नांवानें ओळखलें जाणारें पक्ष प्रमुख आहेत. १७१४ मध्यें ॲन राणीच्या मृत्यूनंतर पहिला जॉर्ज गादीवर आला. जॉर्ज गादीवर आल्यावर लौकरच स्टुअर्ट (घराण्यांतील) राजांना परत आणण्याची चळवळ टोरी पक्षियांनी सुरू केली पण सत्ताधारी व्हिग पक्षीयांनी ही चळवळ दडपून टाकली. यावेळीं सत्ताधारी झालेला व्हिग पक्ष पुढें जवळजवळ ५० वर्षें सत्ता राखून होता. या पक्षानें (Septennial Act) सप्तवर्षी कायदा पास करून घेऊन प्रत्येक पार्लमेंटचे आयुष्य सात वर्षांचे ठरवून घेतलें. जॉर्ज हा जर्मनींतील हॅनोव्हर घराण्यांतून आला असल्यानें त्याचें लक्ष इंग्लंडमध्यें फारसें नव्हतेच. यामुळें वाल्पोलच्या नेतृत्वाखालीं प्रथम मंत्रिमंडळ बनलें व जरी मुख्य प्रधान ही पदवी मिळाली नाहीं तरी तोच मुख्य प्रधान बनला.

१७२७ मध्यें पहिला जॉर्ज मेला व त्याचा मुलगा दुसरा जॉर्ज गादीवर आला. याच्या कारकीर्दीत वॉल्पोल सत्ताधारी होता. लोकमताप्रमाणें त्यानें स्पेनबरोबर युद्ध पुकारलें पण त्यांत फारसें यश मिळालें नाहीं. लौकरच त्यानें राजीनामा दिला. त्याच्या जागीं कार्टरेट आला. त्यानें युद्ध चालू ठेवलें. इंग्लंडला कांहीं ठिकाणीं जय मिळाले पण युद्धाच्या अखेरीस इंग्लंडला कांहींच फायदा झाला नाहीं. यांच्या कारकीर्दीत स्टुअर्ट घराण्यांतील तरुण तोतयाचें (Young pertender) बंड झालें पण तेंहि मोडलें गेलें. १७५६ मध्यें वुइल्यम पिट प्रधानमंडळांत आला. त्याच्या फ्रेंचांच्या वैरामुळें इंग्लंड युद्धांत गुंतले गेलें व परिणामीं हिंदुस्थान व अमेरिका येथील फ्रेंचांची कांहीं ठाणीं इंग्लंडला मिळाली. या युद्धाच्या धामधुमींत दुसरा जॉर्ज मेला (१७६०), व त्याचा मुलगा तिसरा जॉर्ज म्हणून गादीवर आला. पहिल्या व दुसऱ्या जॉर्जचें इंग्लंडच्या कारभारांत फारसें लक्ष नव्हते पण तिसऱ्या जॉर्जनें हें धोरण बदललें. तो स्वत: लक्ष घालूं लागला पण त्याला दूरदृष्टि नव्हती. त्याच्या कारकीर्दीत लॉर्ड नॉर्थ मुख्य प्रधान असतां अमेरिकेंतील भांडणास ऊत आला होता. शेवटीं इंग्लंडचें दडपशाहीचें धोरण साफ फसून उत्तर अमेरिकेंतील बराच भाग इंग्लंडच्या ताब्यांतून गेला. १७८३ मध्यें धाकटा पिट मुख्य प्रधान झाला. फ्रान्सच्या लोकशाहीच्या कल्पनेचा त्याला तिटकारा असल्यामुळें त्यानें फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारलें. पुढें नेपोलियन बरोबरच्या युद्धांत ट्राफलगारच्या लढाईंत इंग्लंडचा जय झाला. पुढें स्पेन व पोर्तुगाल येथील व शेवटीं वाटर्लू येथील लढाईंत वेलिंग्टनला जय मिळाल्यामुळें व्हिएन्नाच्या परिषदेंत इंग्लंडला फार महत्त्व मिळालें व इंग्लंडचा हात यूरोपच्या राजकारणांत पक्का गुंतला.

फ्रान्स बरोबर चालू असलेल्या युद्धाच्यावेळीं आयर्लंडमध्यें बंड झालें तें मोडण्यासाठीं व सारख्या चालू असलेल्या युद्धाच्या पायीं तिसऱ्या जॉर्जच्या कारकीर्दीत राष्ट्रीय कर्ज फार वाढलें होते व जनतेंत असंतोष वाढला होता. पुढें १८२२ मध्यें चौथ्या जॉर्जच्या कारकीर्दीत जॉर्ज कॅनिंग परराष्ट्र मंत्री बनला. त्यानें लहान सहान सुधारणा करून परिस्थिति आटोक्यांत आणली. १८२७ मध्यें कॅनिंग मुख्य प्रधान बनला पण लौकरच मेला. नंतर वेलिंग्टन मुख्य प्रधान बनला. वेलिंग्टन टोरीपक्षीय होता तरी त्यानें सुधारणा करण्याचें धोरण चालू ठेवलें व १८२८ मध्यें टेस्ट ॲक्ट त्यानें परत घेतला. पुढच्याच वर्षीं ओकॉनेल या आयरिश पुढाऱ्याच्या चळवळीमुळें कॅथॉलिक लोकांना राजकीय हक्क द्यावे लागलें. १८३० मध्यें चौथा वुइल्यम गादीवर आला. त्यावेळीं लॉर्ड ग्रे हा मुख्य प्रधान होता. त्याच्या आग्रहावरून नवे सरदार (peers) निर्माण करून १९३२ चें ग्रेट रिफॉर्म बिल परत करून घ्यावें लागलें. १८३३ मध्यें गुलामांच्या मुक्ततेचा कायदा झाला.

१८३७ मध्यें व्हिक्टोरिया गादीवर आली. (चरित्र पाहा) तिच्या ६४ वर्षांच्या कारकीर्दीत इंग्लंडचें साम्राज्य आणखी वाढलें व त्याचबरोबर इंग्लंडमध्यें लोकशाही दृढमूल झाली. एव्हढेच नव्हे तर वाढीला लागली. व्हिक्टोरियानें प्रजेशीं खटके उडूं नयेत म्हणून राजकीय धोरणें पील, पामर्स्टन, डिझरेली, ग्लॅडस्टन सॅलिसबरी या नामांकित मुख्य प्रधानांकडे सोंपविली. तिच्या कारकीर्दीत हिंदुस्थान इंग्लंडच्या साम्राज्यांत पूर्णपणें सामील झाला. व ती हिंदुस्थानची साम्राज्ञी बनली (१८७६). हिच्या कारकीर्दींतील महत्वाच्या

गोष्टी म्हणजे क्रीमियन युद्ध (१८५४–५६), १८६७ चा रिफॉर्म ॲक्ट, मतदानाचा अधिकार वाढविणें, इजिप्तवर प्रभुत्व, दक्षिणआफ्रिकेंतील युद्ध व इंग्लंड हें व्यापारासाठीं खुलें राष्ट्र बनलें या होत.

सातव्या एडवर्डच्या कारकीर्दींत (१९०१–१९१०) ऑस्ट्रेलियन वसाहतीचें फेडरेशन, दक्षिण आफ्रिकेंतील युद्धाची अनुकूल समाप्ति या महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. १९०९ मध्यें लॉइड जॉर्जचें बजेट पास न करण्याचें हौस ऑफ लॉर्डस्‌च्या धोरणामुळें लॉर्डस् व कॉमन्समध्यें तेढ निर्माण झाली. पण शेवटीं बजेट पास झालें. (पांचव्या जॉर्जच्या कारकीर्दींत)

इ. स. १९१० ते १९३६ या कालांत पांचव्या जॉर्जनें राज्य केलें. याच्या कारकीर्दींत व्हेटो बिल (हौस ऑफ् लॉर्डस्‌चें एखादें फायनॅन्शियल बिल फेटाळण्याचा किंवा दुरुस्त करण्याचा अधिकार काढून घेऊन विशिष्ट परिस्थितींत हौस ऑफ् कॉमन्सनें पास केलेलें बिल जरी लॉर्डसूनी नापास केलें तरी तें कायदेशीर ठरण्याचा अधिकार) पास झालें. आयर्लंडच्या स्वातंत्र्याची मागणी मान्य झाली, महायुद्ध (१९१४–१९१८) सुरू होऊन त्यांत इंग्लंडचा जय झाला. मजूर पक्ष प्रथम अधिकारारूढ झाला. (१९२४) व सर्वांत खालचा समजला जाणारा वर्ग राजकारणांत चमकूं लागला. हिंदुस्थानांत टिळक–गांधींच्या चळवळींनी जागृति होऊन १९१९ चा सुधारणा कायदा व १९३५ चा फेडरेशनचा कायदा पास झाला.

पांचव्या जॉर्जच्या मृत्यूनंतर कांहीं महिने आठवा एडवर्ड गादीवर आला पण घटस्फोटित स्त्रीशीं विवाह करण्याचा त्याचा निश्चय त्याच्या राजेपणाच्या आड येऊन त्याला आपला धाकटा भाऊ सहावा जॉर्ज याच्या नांवें गादी सोडावी लागली. सहावा जॉर्ज १० डिसेंबर १९३६ रोजीं गादीवर आला. सहावा जॉर्ज व राणी एलिझाबेथ यांनीं न्यू फाउंडलंड कॅनडा व अमेरिका यांना मे–जून १९३९ मध्यें भेटी दिल्या. इंग्लंडच्या गादीवरील राजाची ही पहिलीच भेट असल्यामुळें या भेटीला फार महत्त्व दिलें जातें. या भेटीनंतर लौकरच जर्मनी–पोलंड संबंधांत ब्रिटिश सरकारचें जर्मनीशीं वांकडें येऊन पोलंडशीं झालेल्या तहाप्रमाणें पोलंडबरोबर जर्मनीनें युद्ध सुरू करतांच ब्रिटननें जर्मनीविरूद्ध ३ सप्टेंबर १९३९ रोजीं युद्ध पुकारलें व दुसरें महायुद्ध सुरू झालें.

या युद्धाच्या आरंभापासून ब्रिटिशांना जबरदस्त धक्के बसत आहेत. जर्मनीनें पोलंड अवघ्या १५-२० दिवसांत जिंकलें. ९ एप्रिल १९४० रोजीं डेन्मार्क, घेतला व नॉर्वेवर स्वारी करून १ मे १९४० रोजीं नॉर्वेची मोहीम संपल्याचें जर्मनीनें जाहीर केलें. १० मे १९४० रोजीं लक्झेंबर्ग , हॉलंड, बेल्जियम व फ्रान्सवर जर्मनीनें चढाई केली. १९ मे रोजीं हॉलंड जिंकून जर्मनीला जोडल्याचें हिटलरनें जाहीर केलें. २७ मे १९४० ला बेल्जियम शरण आलें व १७ जून १९४० रोजीं फ्रान्सनेंहि शरणचिठ्ठी हिटलरला –जर्मनीला लिहून दिली. आणि तेव्हांपासून इंग्लंड एकाकी लढत आहे. १० जून १९४० रोजीं इटलीनेंहि इंग्लंड-फ्रान्स विरुद्ध युद्ध पुकारलें.

इटलीनें इजिप्तवर स्वारी केली, भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमराशीं लढाया चालू केल्या. पण त्या सर्वांना ग्रेटब्रिटन पुरून उरलें आहे. हिटलरच्या भयानक वैमानिक हल्ल्यांना ग्रेटब्रिटन तोंड देत असून त्याचें धैर्य अद्याप अविचलित आहे. इटलीनें २९ ऑक्टोबर १९४० रोजीं अल्बेनियांतून ग्रीसवर आकस्मिकपणें स्वारी करतांच ग्रीसनें उलट लढाई चालू केली. ग्रेटब्रिटननें ग्रीसला सहाय्याचें आश्वासन देऊन पैसा, युद्धसामुग्री व सैनिक यांचें सहाय्य देण्यास सुरुवात केली आहे.

जगांतील लोकशाहीचें अस्तित्व इंग्लंडला या युद्धांत मिळणाऱ्या यशावर अवलंबून आहे.

चिआंग कै–शेक (१८८८–):--चीनचा नेता व सेनापती. त्याचें फेंगहुआ (जन्मस्थान) येथें शिक्षण झालें. १९११–१२ व १७च्या चिनी राज्यक्रांतींत त्यानें भाग घेतला होता. सन्यत्‌सेननें सुरू केलेल्या कुओ मिन् टांग या राष्ट्रसभेंत तो होता व १९१७ ते २२ पर्यंत सन्यत्‌सेनच्या अधिकाऱ्यांतहि तो होता. १९२३ मध्यें तो रशियाची राजधानी मास्को येथें लष्करी शिक्षण घेण्यासाठीं गेला. तेथून १९२४ सालीं परत आल्यावर तो व्हॅम्पू येथील चायनीज् मिलिटरी ॲकॅडमीचा मुख्याधिकारी बनला. या लष्करी शाळेंतील विद्यार्थ्यांतून त्यानें एक उत्कृष्ट तुकडी तयार केली. १९२५ मध्यें दक्षिणेंतील विश्वासघातकी सेनापतीचा त्यानें या तुकडीच्या मदतीनें

पराभव केला. सन्यत्सेनच्या—चिआंग कै-शेकचा मेहुणा—मृत्यूनंतर हा कुओ मिन् टांगचा मुख्य पुढारी बनला व लौकरच कम्यूनिस्टांचे सहकार्य स्वीकारून त्यानें १३२६ मध्यें शांघाय जिंकलें. यावेळीं तो सरसेनापती व मार्शल बनला.

१९२७ च्या मार्चमध्यें कम्यूनिस्टांशीं त्याचें बिनसलें, एवढेंच नव्हे तर शांघायमध्यें त्यानें त्यांची कत्तल केली व कुओ मिन् टांग या कम्यूनिस्ट प्रेमी जुन्या राज्याविरुद्ध स्वतःचें राज्य यानें नानकिंग येथें उभारलें. पण लौकरच दोघांत एकी होऊन चिआंग कै-शेकच्या आधिपत्याखालीं दक्षिण चीन एक झाला. लगेच त्यानें उत्तर चीनवर स्वारी करून १९२८ मध्यें उत्तर चीन नानकिंग सरकारच्या सत्तेखालीं आणला व अशारीतीनें सर्व चीन एक झाला. या नव्या चीन राज्याचा चिआंग कै-शेक मुख्य प्रधान म्हणजे पर्यायानें डिक्टेटर बनला. तरीहि त्याला अंतर्गत यादवीशीं तोंड द्यावें लागत होतेंच. कम्यूनिस्ट व कॅन्टन येथील सरकार त्याला विरोध करीत होते. १९३१ मध्यें त्यानें मुख्य प्रधानपदाचा राजीनामा दिला. पण १९३२ मध्यें त्याला पुन्हां बोलावून पूर्वीचाच अधिकार दिला गेला.

१९३२ मध्यें कम्यूनिस्ट सैन्याशीं त्याला लढाई द्यावी लागली. त्याच वेळीं जपाननें मांचूरिया घेतल्यामुळें व शांघायवर स्वारी केल्यामुळें त्यानें जपानशीं मैत्री जोडण्याचा प्रयत्न केला. १९३६ मध्यें चांग सू लिआंग या त्याच्या प्रतिस्पर्धी सेनापतीनें त्याला पकडून कैद केलें. पण दोघांत सख्य होऊन त्याची सुटका झाली. १९३७ च्या जुलै महिन्यांत चीन विरुद्ध जपाननें लढाई पुकारली. तेव्हां चिआंग कै-शेकनें लढाईकडे अधिक लक्ष देतां यावें म्हणून आपल्या मुख्य प्रधानपदाचा राजिनामा दिला. लौकरच कम्यूनिस्टांशीं मिळतें घेऊन त्यांची सहानुभूती त्यानें मिळविली व कम्यूनिस्ट सैन्य त्याच्या हाताखाली दाखल झालें. १९३७ च्या डिसेंबरमध्यें नानकिंग पडल्यावर तो चुंगकिंग येथें आला. यानंतर अनेक ठिकाणीं पराजय सोसूनहि अद्याप तो जपानच्या आक्रमणाविरुद्ध जोरानें लढत असून सर्व चीन त्याच्याकडे मोठ्या आशेनें बघत आहे.

चिआंग कै-शेकचे दुसरें लग्न शांघाय येथील एका डॉ. कुंग नांवाच्या श्रीमंत बँकरच्या बहिणीशीं झालें आहे. मॅडम चिआंग कै शेक (दुसरी पत्नि) आपल्या पतीच्या कार्यांत मोठा भाग घेत असते. चुंककिंगच्या राष्ट्रीय सरकारचा मुख्य प्रधान म्हणून डॉ. कुंग काम करीत असतो.

जमाखर्च:—एक अत्यावश्यक कौटुंबिक बाब. उत्पन्नापैकीं खर्च किती होतो, कोणकोणत्या कारणांसाठीं होतो व शिल्लक किंवा देणें घेणें किती आहे याची माहिती जमाखर्च ठेवल्यानें मिळते. पुढें जमाखर्चासंबंधीची जुजबी माहिती (कौटुंबिक) दिली आहे.

रक्कम रोजच हातीं येते व रोजच खर्च होते अशी परिस्थिति असेल तर बाजारांत मिळणाऱ्या रोजनिशांत हा जमा खर्च मांडणें इष्ट आहे. पण तशी परिस्थिति नसेल तर एका मोठ्या वहींत ज्या ज्या दिवशीं जमा किंवा खर्च होईल त्या दिवसाची तारीख (किंवा मिती) मांडून त्या खालीं जमाखर्च लिहावा. यामुळें कित्येक वर्षांचा जमाखर्च एकाच वहींत लिहितां येऊन हिशेबाचा अनेक पुस्तकें संभाळण्याचा त्रास वाचेल. सध्यां इंग्रजी शिक्षणामुळें सुशिक्षितांत रेघांमध्यें आणे पैचा हिशेब लिहिण्याची पद्धतीच नाहींशी झाली आहे. तेव्हां इंग्रजीपद्धतीप्रमाणें रु. आ. पै यांचीं स्वतंत्र सदरें असलेल्या आंखीव रोजकीर्दीत (रोजची जमा, खर्च व शिल्लक मांडली जाणारी वही इंग्रजीत हीस Cash-book म्हणतात) त्याप्रमाणें नोंद करावी.

पुढील कोष्टकांत तपशीलापुढें खतावणीच्या पानासाठीं एक कोष्टक सोडलें. एखाद्यानें विशेष चिकित्सेनें हिशेब लिहिण्याचें ठरविलें तर घरभाड्यासाठीं, दुधासाठीं भाजीसाठीं इत्यादि बाबींची खातीं पाडून त्यांच्या स्वतंत्र नोंदी एकतर्फी म्हणजे फक्त खर्चाच्या (जरूर तेथें दोन्ही) ठेवाव्या. त्यांचाही प्रसंगीं पुष्कळ उपयोग होईल. खतावणीच्या कोणत्या पानावर ज्या बाबीची नोंद असेल त्या पानाचा आंकडा या कोष्टकांत जरूर तेथें लिहावा.

रोज शिल्लक काढण्याची पद्धत फार चांगली. सर्व साधारणतः घरखर्चाच्या बाबी किती व कोणत्या बाबीस किती महत्व देऊन खर्च करावा या संबंधीचे विचार 'सार्वत्रिक कौटुंबिक बजेट,' (पृष्ठ १८२३) या सदराखालीं प्रदर्शित केले आहेत ते जरूर वाचावेत.

जमाखर्चाचें टिप्पण—

जमेची बाजूः—

तारीख	तपशील	खा. पा.	रु.	आ.	पै.
४।१२।४०	पूर्वशिल्लक		६७	१०	
”	प्र. रा. नाडकर्णी यांचेकडून उसने दिलेले परत आले.		१०		
			७७	१०	

खर्चाची बाजू—

तारीख	तपशील	खा. पा.	रु.	आ.	पै.
४।१२।४०	नोव्हेंबर महिन्यांचे दुधाचे दिले ते		८	६	६
	भाजी व फळें		०	३	०
”	नोव्हेंबरचें वि. बिल		१	१४	०
”	पोस्टेज		०	०	९
”	वाण्याचें नोव्हेंबरचें बिल दिलें ते		६	४	३
”	सेव्हिंग बँकेत ठेविलें		२०	०	०
	एकूण		३६	१२	६
	शिल्लक		४०	१३	६
			७७	१०	०

जहाजें:—साधा लाकडाचा ओंडका पाण्यावर तरतांना पाहूनच मनुष्याला लाकडाचा उपयोग करून पाण्यावरून तरून जाण्याची कल्पना सुचली असली पाहिजे. आरंभी नुसतेच ओंडके नंतर मोठे ओंडके खोदून आंत सुरक्षित बसण्याची सोय, पुढें लांब कांठीच्या सहाय्यानें या पहिल्या होडीला गति मिळण्याची सोय व पुढें वल्हीं तयार करून व होडीच्या मागें सुकाणू जोडून त्यानें पुष्कळ प्रगति केली. यानंतर आकारांत वाढ करण्याकडे लक्ष पुरवून व वल्ह्यांच्या जोडीला किंवा वल्ह्यांच्या ऐवजीं शिडांचा उपयोग करण्याचें शिकून त्यानें अनुल्लंघनीय समुद्रावरहि विजय मिळविला. अर्थात् एवढीं ही प्रगति व्हावयास शेंकडों वर्षांचा काल गेला. गरजूंच्या गरजाप्रमाणें आकार व प्रकार (models) कितीतरी तयार झालीं. व त्यांना निरनिराळीं नांवें मिळालीं. एका जहाजास १००–१५० पर्यंत वल्ही व तीन मोठ्या डोलकाठ्या व शिडें असत.

१९ व्या शतकांत वाफेवर चालणाऱ्या यंत्राच्या सहाय्यानें जहाजें चालूं लागलीं. यामुळें वल्हीं व शिडें नाहींशीं झालीं. तसेंच लांकडाच्या ऐवजीं लोखंड-पोलादाचीं जहाजें तयार होऊं लागलीं आहेत.

आपल्याकडे ऋग्वेदकालापासून नौकानयनाचें उल्लेख सांपडतात. युरोपांतील फोनीशियन्स हे पहिले दर्यावर्दी व नौका तयार करण्यांत कुशल लोक होत. सध्यां अनुक्रमें इंग्लंड, अमेरिका (U. S. A.), जपान, जर्मनी, फ्रान्स हे देश जहाजें तयार करण्यांत कुशल आहेत. इंग्लंड दरवर्षी साडेसहा लक्ष टन वजनाचीं जहाजें तयार करतें.


जिलेबी:—मधुर आंबट रुचिचें गर्भपाकी पक्वान्न. कांहीं मंडळीं विनोदानें हिला ‘ गोड कडबोळें ’ म्हणून संबोधतात. **साहित्य**—जिलेबीचा रवा एक शेर, एक शेर पिठी, साखऱ्या पांच शेर, पळीभर गोडे तेल, पावशेर आंबट दही, केशर अर्धा तोळा, तूप २॥ किंवा ३ पावशेर (२० भाराचा पावशेर धरतात). **कृति**—आधल्या दिवशीं संध्याकाळीं किंवा रात्रीं एका कल्हईच्या पातेल्यांत रवा, पिठी, दही व पळीभर गोडें तेल हे पदार्थ एकत्र करावेत. नंतर त्यांत थोडें पाणी घालून तें पातेलें थोड्याशा उबीवर ठेवून द्यावें. मग दुसरें दिवशीं उबीवरील पदार्थ चांगलें फेसलून ते हवे तेवढें द्रावण पातळ करून घ्यावें. नंतर साखऱ्याचा पाक करून केशरी रंग येण्यासाठीं त्यांत केशर मिसळावें. यानंतर रुंद तोंडाच्या चुलाणावर कढई अथवा कल्हईची परात ठेवून तींत तूप घालावें व खालीं चांगला जाळ लावावा. तूप कढत झाल्यावर जिलबी-पात्रानें कढईंत वा परातींत जिलब्या घालण्यास आरंभ करावा. त्या चांगल्या तळल्यानंतर शेजारच्या पाकाच्या परातींत टाकाव्यांत तिच्यामधून दोन मिनिटें झाल्यावर त्या पुन्हां बाहेर काढून कल्हईच्या परातींत त्या ठेवाव्यांत.

जेन्नर डॉ. एडवर्ड (१७४९–१८२३): – देवीच्या लशीचा संशोधक. याचा जन्म इंग्लंडमध्यें बर्कले या गांवीं १७ मे १७४९ रोजीं झाला. सोडबरी येथें लडलो व लंडन येथें विख्यात शरीरशास्त्रज्ञ जॉन हंटर यांच्याकडे शिक्षण घेतल्यावर स्वतःच्या गांवीं त्यानें वैद्यकी सुरू केली. १७७६ च्या सुमारास देवीच्या रोगाकडे त्याचें लक्ष वेधलें व त्यानें संशोधनास सुर. वात केली. शेतकन्यामध्यें अशी एक सामान्य समजूत होती कीं गाईची धार काढतांना (गाईंना आलेल्या देवीमुळें) त्यांच्या आचळांची लस त्यांच्या हातांना लागतें व त्यामुळें त्यांना देवी येत नाहींत. या समजुती- कडे त्याचें लक्ष वेधलें व त्यानें संशोधनास सुरवात केली. अखेर अनेक प्रयोगानंतर त्याला यश मिळालें व देवी प्रतिबंधक लस त्यानें तयार केली. १७९८ मध्यें त्यानें आपला शोध प्रसिद्ध केला व त्याच वर्षी सेंट टॉमस हॉस्पिटलमध्यें या लसीचा त्यानें उपयोग केला. अनेक डॉक्टरांच्याकडून त्याला या उपयोगाबाबत आरंभीं विरोध झाला; पण शेवटीं परराष्ट्रांतसुद्धां त्याच्या शोधाला मान्यता मिळाली. त्याला १८०२ व १८०७ मध्यें १०,००० पौंड व २०,००० पौंड पुरस्कार मिळाला. ता. २६ जानेवारी १८२३ रोजीं हा ॲपोप्लेक्सीच्या विकारानें वारला.

जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री बाळाजी (१९०२–):—धर्मकोशाचे संपादक, अध्यापक, सोशॅ- लिस्ट मताचे पुरस्कर्ते. पश्चिम खानदेशमधील पिंपळ- नेर गांवीं १९०२ मध्यें यांचा जन्म झाला. यांनीं वाईला वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठ्यांच्याकडे तर्क, वेदान्त, साहित्य, दर्शनादि विषयांचें शिक्षण घेतलें. त्यानंतर कलकत्ता येथील संस्कृत असोसिएशनची ‘ तर्कतीर्थ ’ पदवी १९२४ त यांना मिळाली.

वाईच्या प्राज्ञपाठशाळेंत १९२१ पासून अध्यापनाचें कार्य हे करीत असतात. धार्मिक व सामाजिक बाब- तींत प्रागतिक मताचे पुरस्कर्ते म्हणून यांची ख्याती आहे. शुद्धि सर्वस्वम् (संस्कृत) आनंदमीमांसा (मराठी), धर्मकोशाचे तीन भाग ही यांची ग्रंथसेवा आहे. याशिवाय यांनीं कायदेभंगाच्या चळवळींत तीनदां शिक्षा भोगली आहे.

थर्मास (ची बाटली):—चहा, दूध किंवा इतर पेयें बराच वेळ गरम राहावीत किंवा बर्फ उष्णतेनें वितळूं नयेत म्हणून अशा परस्पर विरोधी कारणासाठीं थर्मासचा उपयोग करतात. थर्मास मध्यें जी बाटली असते तिच्या अंगची कांच मध्यंतरी पोकळ असलेली असते व या आंतल्या व बाहेरच्या पृष्ठभागा- मधील पोकळींतील हवा काढून टाकलेली असते. नंतर ही बाटली



थर्मासची रचना

बुचें, रबर इत्यादि लहानसहान धक्के सहन करणाऱ्या पदार्थांच्या सहाय्यानें पत्र्याच्या बाट- लींत अलगद बसविलेली असते. आंतल्या कांचेच्या बाटलीला बूच लावून ती बंद करतां येते. बाहेरच्या पत्र्याच्या बाटलीला फिरकीचें स्वतंत्र झांकण असतेच. बाटलींतील उष्णता बाहेर न जाऊं देणें व बाहेरील उष्णतेचा परिणाम आंतल्या पदार्थावर न होऊं देणें हा या बाटली तयार करण्यामध्यें मुख्य उद्देश आहे. कांचेतून अगदीं हळूं उष्णता वाहते. त्यामुळें व कांचेच्या बाटलींतील मधल्या पोकळींतील हवा काढून टाकलेली असल्यामुळें बाटलींत भरलेल्या उष्ण पदा- र्थांतील उष्णता बाहेर जाऊं शकत नाहीं. याशिवाय कांचेच्या बाटलीच्या आंतील व बाहेरील दोन्हीं बाजू चकचकीत केलेल्या असतात. त्यामुळें तींतून उष्णता फार कमी प्रमाणांत बाहेर पडते. या उलट आंत बर्फ असल्यास क्रिया घडते.

दिवाकर ऊर्फ गर्गे, शंकर काशीनाथ(१८८९-१९३१) नाट्यछटाकार. श्री. दिवाकर यांचा जन्म ता. १८ जानेवारी १८८९ रोजीं दिवाकर घराण्यांत झाला. पण पुढें ते गर्गे घरण्यांत दत्तक गेले. आपल्या पहिल्या घराण्यां- तील ‘ दिवाकर ’, हें आडनांवच त्यांनीं पुढें टोपण नांव म्हणून वापरलें. १९०८ सालीं ते स्कूल फायनल झाले व पुण्याच्या फौजदार कचेरींत कांहीं काल त्यांनीं कारकुनाचें व ‘ डिस्प्रेड क्लास मिशन , च्या शाळेंत शिक्षकाचें काम केलें. शेवटीं पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयांत शिक्षक म्हणून दाखल होऊन १ ऑक्टो- बर १९३१ रोजीं त्यांचें देहावसान होईपर्यंत ते याच शाळेंत राहिले. श्री. दिवाकर हे अष्टपैलू लेखक नव्हेत, चिकित्सक बुद्धीचे संशोधक नव्हते, हें खरें असलें तरी त्यांचें नांव मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत चिरस्मरणीय राहील. तें त्यांनीं ‘नाट्यछटा’ नांवाचा

जो अभिनव वाङ्मय प्रकार मराठी वाङ्मयांत रूढ केला त्यामुळेंच ब्राऊनिंगनें लिहिलेल्या Dramatic Monologues च्या धर्तीवर आपल्या आयुष्यांतील प्रसंगांचें व अनुभवांचें प्रगटीकरण करण्यासाठीं 'नाट्यछटा' हा वाङ्मयप्रकार त्यांनीं रूढ केला आणि तो लोकप्रिय करून दाखविला. प्रतिकूल परिस्थितींतहि केवढें कार्य करतां येतें याचें श्री. दिवाकरांचें वाङ्मय म्हणजे एक जिवंत उदाहरण आहे.

धोबी:-—पाण्यांत उभे राहून (परटाप्रमाणें) आपली शेपटी एकसारखी पाण्यामध्यें खळबळविणारा व गाणारा वृक्षोपवेशक वर्गापैकीं पक्षी. याचें अंग चिमणीहून थोडें लांब व रोडकें असतें पण याची शेंपटी तिच्यापेक्षां लांबडी असते. नराचा रंग काळा पांढरा असून त्याच्या पिसांचा रंग काळा असतो. पापण्या, पोट, शेंपटाच्या बाजू व पंख हे भाग पांढऱ्या रंगाचे असतात. याची मादी आकारानें याच्यापेक्षां लहान असून. करड्या रंगाच्या पाठीची असते. बाकीचा भाग नराप्रमाणेंच असतो. गाणारा हा पक्षी आहे. हा गोड्या पाण्याच्या ठिकाणीं गवत, केंस नी पिसें यांच्या मदतीनें घरटें बांधतो. नदीकांठीं जुनी नांव असल्यास तींत देखील हा आपलें घरटें उभारतो. फिकट हिरव्या रंगाचीं ३।४ अंडीं दर वेळेस या घरट्यांत मादी घालते. धोब्याची रंगाची एक जात आहे. ती स्थलांतर करते. हिवाळ्यांत हा पक्षी आपल्याकडे येतो व उन्हाळ्यांत तो हिमालयाकडे परत जातो.

नरकचतुर्दशी:—दिवाळी हा लेख पाहा. पृष्ठ १०२५

नाताळ:–खिस्ती चर्चचा (व लोकांचा) उत्सव प्रतिवर्षी २५ डिसेंबरच्या दिवशीं साजरा करण्यांत येतो. हा उत्सव खिस्ताचा जन्मोत्सवच होय. त्या दिवशीं विशेष अशी प्रार्थना खिस्ती प्रार्थना मंदिरांत करण्यांत येते. हा उत्सव केव्हांपासून साजरा करण्यांत येऊं लागला. याविषयीं नक्की माहिती मिळत नाहीं; परंतु तिसऱ्या शतकाच्या प्रारंभीं अलेक्झांड्रियाच्या क्लेमंटनें त्याचा उल्लेख केला आहे. चौथ्या शतकाच्या उत्तरार्धात खिसॉस्टोमनें हा उत्सव प्राचीन असल्याचा निर्वाळा दिला आहे. हा उत्सव कोणत्या दिवशीं साजरा करावा याविषयीं पुष्कळ दिवस मतभेद होता; पण खिसॉस्टोमच्या वेळीं २५ डिसेंबर हाच दिवस वेस्टर्न चर्चनें निवडला. खिस्त केव्हां जन्मला हें नक्की माहित नव्हतें; तथापि कोणता तरी एक दिवस उत्सवाकरितां निश्चित केला पाहिजे म्हणून हा दिवस निवडण्यांत आला. ईस्टर चर्च पूर्वी ६ जानेवारी दिवशीं हा उत्सव करीत असे; परंतु पुढें त्यांजकडूनही २६ डिसेंबर हाच दिवस हळूहळू उत्सवदिन म्हणून निश्चित् करण्यांत आला. पुष्कळांचा असा समज आहे कीं या तारखेच्या सुमारांस विधर्मीय उत्सव होत असल्यामुळें ही तारीख निवडली असावी. रोमन कॅथालिक, अँग्लिकन, ग्रीक व ल्यूथरन चर्चमध्यें या उत्सवाचे दिवशीं एक खास सार्वजनिक प्रार्थना चालविण्यांत येते.

निबंध:— निबंध हा नाटक, कादंबरी, लघुकथा यांच्याप्रमाणेंच एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे; या वाङ्मयप्रकारालाहि इतर वाङ्मय प्रकाराप्रमाणेंच एक स्वतंत्र वैशिष्ट्य आहे. नाटककाराला देश, काल, नटनटी, सामाजिक चालीरीती इत्यादींचें बंधन पाळून आपला कलाविलास प्रगट करावयाचा असतो, विस्मय आणि उत्कंठा यांचें तंत्र सांभाळींत कादंबरीकाराला आपला प्रवास करावयाचा असतो, किंवा अगदीं मोजकीं पात्रें आणि एखाद दुसराच प्रसंग यांच्या साहाय्यानेंच लघुकथालेखकाला आपलें कौशल्य प्रगट करावयाचें असतें, असलीं बाह्य बंधनें निबंधकाराच्या कलाविलासाला अडथळा करूं शकत नाहींत, असें सकृद्दर्शनीं वाटतें आणि निबंध हा एक स्वैर वाङ्मयप्रकार असावा, असें त्यामुळेंच गैरसमाजानें मानलें जातें. पण वास्तविक तसें नाहीं. ठराविक लांबीरुंदीच्या आणि व्यक्ति–परिस्थितीच्या कांटेकोर चौकटींत जरी निबंधकाराला वावरावें लागलें नाहीं, तरी तंत्राचे म्हणून कांहीं ठराविक नियम त्यालाहि पाळावें लागतातच. कारण एक तर निबंध झाला तरी तोहि एक वाङ्मयप्रकारच आहे आणि वाङ्मयकेलला इतर कलांप्रमाणेंच कांहीं तंत्र नियम पाळावें लागतात. निबंध त्याला अपवाद असणें शक्य नाहीं आणि तसा तो असेल तर वाङ्मयाच्या थोर पदवीस तो प्रकार पोंचूं शकणार नाहीं.

असें जरी आहे तरी नाटक, कादंबरी किंवा लघुकथा यांच्याप्रमाणेंच निबंध या शब्दाची व्याख्या काय असा कुणी प्रश्न केला तर, अगदीं मोजक्या शब्दांत ती व्याख्या देणें दुर्घट आहे. अगदीं धात्व-

र्थांच्या जुन्या मार्गानें व्याख्या करण्याचा प्रयत्न केला तरीहि ' एखाद्या विषयांवरील विचार सुसूत्रपणें एकत्र गुंफणें ' या पलीकडे प्रगति होणें कठीण आहे. अर्थात् ही व्याख्याहि अतिव्याप्तीच्या दोषानें दूषित झालेली आहे हें उघड आहे. तेव्हां ' निबंध ' शब्दावरून त्याची व्याख्या न ठरवितां त्या वाङ्मयप्रकारांतून जें वैशिष्ट्य प्रगट झालेलें आढळून येईल त्यावरूनच त्या वाङ्मयप्रकाराचें लक्षण ठरविणें अधिक युक्त होईल.

निबंध हा वाङ्मयप्रकार आतां सर्व भाषांतून रूढ झाला असला तरी ज्या प्रकारचे निबंध आतां लिहिले जातात तशा प्रकारचे निबंध लिहिण्याची आणि ते यशस्वी करून दाखविण्याची पहिली कर्तबगारी मॉंटेन (Montaigne) या फ्रेंच लेखकानेंच करून दाखविली. अर्थात्च या लेखनप्रकाराचें जनकत्व मॉंटेनकडे जावें हें उघड आहे. फ्रेंच भाषेंत हा वाङ्मयप्रकार रूढ होतांच वैचित्र्यप्रिय अशा इंग्रज लेखकानींहि इंग्रजी भाषेंत त्याचें बीजारोपण केलें आणि गेल्या तीन शतकांत प्रथमतः रोपट्याच्या स्वरूपांत असलेला हा वाङ्मयप्रकार प्रौढ आणि प्रगल्भ विचारांच्या फलांनीं येवढा भारावून गेला आहे, कीं वाङ्मयाचें एक दालन सुशोभित करण्याची अपूर्व कर्तबगारी त्यानें करून दाखविली आहे. त्याचा शाखाविस्तारहि सर्व दिशांनीं वाढला आहे. प्रथमतः धार्मिक आणि शैक्षणिक (Pedantic) असें जें त्याचें स्वरूप होतें तें कालांतरानें बदलत गेलें आणि सामाजिक, राजकीय, वाङ्मयीन इत्यादि क्षेत्रांतील विचारांच्या प्रगटीकरणाचें बहुमोल साधन असा श्रेष्ठ दर्जा या वाङ्मय प्रकारास आला. फ्रॅन्सिस बेकन, डॉ. जॉनसन बर्क अॅडीसन, स्टील, डी क्विन्सी, काउले, मोर्ले, मेकॉले इत्यादि धुरंधर लेखकांनीं हा वाङ्मयप्रकार इतक्या तऱ्हेनें हाताळला आहे, कीं निबंधाचें स्वरूप त्या त्या लेखकापुरतें वैशिष्ट्यपूर्ण असें होऊन बसलें आहे. उपहास, विनोद, इत्यादि साधनें कुणी वापरलीं आहेत, पांडित्याला आवरणाखालीं कुणी त्या वाङ्मयप्रकाराला दडपून टाकलें आहे, राजकीय विचार अभिनिवेशाचें मांडण्याचें एक प्रभावी साधन म्हणून कुणी त्याचा उपयोग केला आहे. पण राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, वाङ्मयीन क्षेत्रांतील विचार पुढें मांडतांना त्या वाङ्मयप्रकारचा बोजहि सर्वांनीं राखला आहे. शिवाय, प्रादेशिक स्वरूप त्याला येऊं न देण्याची काळजी बहुतेकांनीं घेतली आहे. हें वैशिष्ठ्य लक्षांत घेतलें तर व्यवहारोपयोगी अशी निबंधाची व्याख्या करणें फारसें दुर्घट नाहीं. कोणत्याहि विषयावरील मौलिक (original) विचार प्रौढ, प्रगल्भ भाषेच्या साहाय्यानें सुसंगतपणें एकत्र गुंफणें हें निबंधाचें सार्वकालिक आणि सार्वदेशिक लक्षण होऊन बसलें आहे. लोकशिक्षण हें निबंधाचें प्रमुख कार्य होय असें म्हणावयास हरकत नाहीं.

मराठी वाङ्मयांतील या वाङ्मयप्रकाराचा इतिहास मात्र फारसा जुना नाहीं. लोकहितवादी, चिपळुणकर, टिळक, आगरकर, शि. म. परांजपे, अ. ब. कोल्हटकर, न. चिं. केळकर बॅ. सावरकर या लेखकांच्या परिचर्येमुळें मराठी निबंधाला आतां बाळसेदार स्वरूप आलें आहे. मराठी वाङ्मयांतहि इंग्रजी वाङ्मयाप्रमाणेंच या वाङ्मयप्रकारांत भरपूर वैचित्र्य आलें आहे. लोकहितवादी ऊर्फ गोपाळ हरी देशमूख यांनीं सुमारें ७५ वर्षांपूर्वींच्या तत्कालिन सामाजिक विषयासंबंधानें जें विपुल लेखन केलें होतें तें सामान्यतः निबंधाच्या स्वरूपाचेंच होतें. त्यांनीं लोकांना उद्देशून लिहिलेलीं ' शतपत्रें ' मुख्यतः लोकजागृतीसाठींच होतीं. पण तीं मतें त्यावेळीं मान्य होण्यासारखीं नव्हतीं येवढेंच नव्हे तर विष्णुशास्त्री चिपळुणकरांनीं निबंधमालेंतून त्यांवर विदारक हल्लाहि केला आहे. पण याचा अर्थ तीं मतें दूषणीय त्याज्य किंवा तिरस्करणीय होतीं असा मुळींच नव्हे. त्यांच्या नंतरच्या पिढींत आगरकरांनीं जें कार्य केलें तेंच कार्य आपल्या पिढींत लोकहितवादींनीं केलें असें म्हटलें म्हणजे त्यांच्या कार्याचें मूल्यमापन केल्यासारखें होईल. पण लोकहितवादींचें निबंधलेखन हें वाङ्मयदृष्ट्या कांहींसें अंधारांत चांचपडण्यासारखें अनिश्चित स्वरूपाचें होतें. निबंधाचें प्रगल्भ, ओजस्वी स्वरूप त्यांच्या लिखाणांतून प्रगट होत नाहीं. तें कांहींसें विस्कळित, त्रुटित आहे. या दृष्टीनें विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या ' निबंधमाले 'ला मराठी निबंधाचा उषःकाल खचित म्हणतां येईल. लोकहितवादींची तळमळ आणि कळकळ कदाचित् त्या प्रमाणांत ' निबंधमालें 'त दृष्टीस पडली नाहीं तरी कलाविलासाची चारुता ' निबंधमालें ' त खचित आहे.

शिवाय असेंहि म्हणतां येईल, कीं 'निबंधमाले' चें युग निर्माण होईपर्यंत मराठी वाङमयच मुळीं परपुष्ट आणि परावलंबी होतें. नवे विचार, नवी दृष्टि, नवे आचार विचार, नवें तत्वज्ञान यांचा अरुणोदय होत होता. सुप्त स्थितींतल्या या समाजाच्या नवकल्पनांना वाचा फोडण्यांचें कार्य स्वतंत्र प्रतिभेच्या कलमबहाद्दरांनीं करणें इष्ट होतें. विष्णुशास्त्री चिपळुणकरांनीं 'निबंध मालेच्या रूपानें हें कार्य केलें आणि महाराष्ट्रांतल्या सर्व सुप्त शक्ति कार्योन्मुख झाल्या. महाराष्ट्राला स्वत्वाची जाणीव करून द्यावयास, कर्तव्याची दिशा दाखवावयास आणि जागृतीची ज्योत प्रज्वलित करावयास 'निबंधमाला'च कारणीभूत झाली. त्यांच्या निबंधांची भाषाहि प्रौढ, रसयुक्त, आवेशपूर्ण आणि उपहासगर्भ आहे. टिळक आगरकरांमुळें मराठी निबंधाचें स्वरूप थोडेसें बदललें आणि मराठी निबंधाला एक नवी दिशा मिळाली. टिळकांनीं तत्कालिन राजकीय प्रश्नांवर तर आपली लेखणी चालविलीच, पण सामाजिक, शैक्षणिक वाङ्मय, तत्वज्ञान इत्यादि विषयांचा परामर्षहि त्यांच्या सर्वंकष प्रतिभेनें घेतला. मात्र त्यांचें हें निबंधलेखन कलाविलासासाठीं नव्हतें. त्यांच्या निबंधाला तत्वप्रतिपादनाची धार आहे. भाषा प्रसंगीं दाहक, आवेशयुक्त आणि हृदयाला भिडणारी, तरी विचारांचा प्रौढपणा आणि विवेचनाचें गांभीर्य बुद्धीला थक्क करणारें! लॉक या इंग्रज तत्त्वज्ञानें Essay Concerning Human Understanding सारखा मौलिक विचारांनीं भरलेला प्रचंड निबंध लिहिला त्याला लाजाविणारा टिळकांचा 'गीतारहस्य' हा प्रबंधहि मराठी भाषेचा अमोल अलंकार ठरला. आगरकरांच्या निबंधाचें स्वरूप टिळकांच्या निबंधांतून पुष्कळच निराळें आहे. समाजाविषयीं आत्यंतिक तळमळ हा दोघांमधील सामान्य विशेष असला तरी दोघांच्या साधनांत महदंतर होतें. सामाजिक अन्यायामुळें विव्हळ झालेलें अंतःकरण आगरकरांच्या प्रत्येक निबंधांत स्पष्ट दिसतें. टिळक काय किंवा आगरकर काय कलोपासना म्हणून लेखन करीतच नसत. त्यामुळेंच चिपळुणकरांच्या निबंध मालेंत दिसणारा रेखीवपणा व विषयाची नमुनेदार मांडणी या दोघांच्याहि निबंधांत दिसत नाहीं. याचें मुख्य कारण टिळक–आगरकरांचें बहुतेक सर्व लेखन 'केसरी' 'सुधारका' सारख्या साप्ताहिकांतून झालें हेंच होय. असें म्हणतां येईल, विद्वत्ता प्रदर्शनापेक्षां विषयप्रतिपादनावरच त्यांचा अधिक भर, बुद्धीवादी विचार सरणी व सडेतोड मांडणी यामुळें आगरकरांच्या निबंधास ओजस्वी स्वरूप आलें आहे. प्रो. शि. म. परांजपे यांचे निबंध म्हणजे प्रतिपक्षावर सोडलेले आणि द्वेषाच्या विषानें माखलेले लखलखीत बाणच! त्यांत अलंकार येतील, दृष्टांत येतील, रूपकें येतील, उपहास येईल, वक्रोक्ति येईल, व्यंजना येईल, पण त्यांच्या या टीकेचा बाण एकदां हृदयांत घुसला, कीं प्राण घेऊनच तो बाहेर येईल! अ. ब. कोल्हटकरांच्या निबंधांचें स्वरूप कांहींसें विस्कळित व पाल्हाळिक आहे. आपल्या निबंधानीं प्रतिपक्षाला घायाळ करण्यांत परांजप्याइतकेच तेहि निष्णात आहेत. पण प्रतिपक्षाची हुर्रेवडी उडविणें हेंच त्यांचें वैशिष्ट्य. मग त्यासाठीं ते किती पुनरुक्ति करतील याला सीमा नाहीं. बॅ. सावरकर तर बुद्धीच्या धारेनें सारें अनिष्ट कापून काढणारे निष्णात शस्त्रधारी! न. चिं. केळकरांनीं मात्र स्वतः करितां या सर्व लेखकांपेक्षां एक स्वतंत्र स्थान निर्माण करून ठेवलें आहे. त्यांच्या निबंधांची पद्धत प्रतिपक्षाचे नुसते दोष काढण्याचीच नाहीं. नीरक्षीरविवेक हा राजहंसाप्रमाणेंच केळकरांच्या निबंध लेखनाचाहि विशिष्ट गुण आहे. टिळकांच्या लेखणींतील जळजळीतपणा, आगरकरांचा अभिनिवेश, प्रतिपक्षाला नामशेष करणारें परांजप्यांचें तडित्ताडण, सावरकरांच्या लेखनांतील प्रखर दाहकता त्यांच्या निबंधांत कदाचित् नसेल, पण व्यापक दृष्टि आणि सखोल अभ्यास, या बरोबरच कलाविलासाचें शुभ्र चांदणेंहि त्यांच्या निबंधांत कांठोकांठ आहे. अलीकडील निबंध लेखकांत श्री. द. के. केळकर, प्रो. ना. सी. फडके, श्री. माडखोलकर यांनींहि बहुमोल कामगिरी केली आहे.

लघुनिबंध.—निबंध आणि लघुनिबंध यांच्यांतील नामसादृश्यामुळें पुष्कळ वेळां घोटाळा होण्याचा संभव असतो. लहान निबंध तो लघुनिबंध असें वाटण्याचाहि संभव खचित आहे. पण केवळ लघुत्वाच्या गुणावरून लहान निबंधाला लघुनिबंध म्हणतां यावयाचें नाहीं. लघुत्व हा लघुनिबंधचा एक गुण असला तरी तो केवळ आनुषंगिक. निबंध आणि लघुनिबंध यांच्या

प्रकृतीच भिन्न आहेत. ते दोन स्वतंत्र वाङ्मय–प्रकार आहेत.

लघुकथा व कादंबरी या दोहोंतहि कथा असली तरी मोठी लघुकथा ज्याप्रमाणें कादंबरी होऊं शकणार नाहीं किंवा कादंबरी ज्याप्रमाणें लघुकथा होऊं शकणार नाहीं त्याचप्रमाणें निबंध लहान असला म्हणजे तो लघुनिबंध झाला असें म्हणतां यावयाचें नाहीं. वृद्ध आणि बालक यांत मूलभूत फरक आहे तसा निबंध आणि लघुनिबंध यांतहि आहेत. एखाद्या वाङ्मयप्रकाराशीं लघुनिबंधाची तुलनाच करावयाची झाली तरी ती फक्त भावगीताशीं करतां येईल. रसोत्कटता हा भावगीता-प्रमाणेंच लघुनिबंधाचाहि आत्मा आहे असेंच म्हणावें लागेल. आपल्या सभोंवतीं घडणाऱ्या सहस्रावधि गोष्टींचे आपल्या संस्कारक्षम मनावर झालेले आघात कौशल्यानें प्रगट करणें हें लघुनिबंधाचें मुख्य लक्षण आहे. लघुनिबंधकार व्यक्तिवादी दृष्टींतून समाजाकडे पाहतो आणि असें पाहात असतांना जे विचार, ज्या कल्पना त्याच्या मनांत स्फुरतात त्यांचें चित्रण कला-त्मक रीतीनें तो करतो. लोकांना शिकविणें, उद्बोधन करणें, यापैकीं कोणतेंच कार्य त्यानें आपल्या अंगावर घेतलेलें नसतें. या ठिकाणींच निबंध आणि लघुनिबंध यांचें परस्पर संबंध किति भिन्न आहेत हें दिसून येईल निबंधाचा जन्मच मुळीं प्रौढ, प्रगल्भ, मौलिक विचार लोकशिक्षणाचा एकमेव हेतु गृहीत धरून होतो, तर आपल्या आयुष्यांतले व्यक्तिगत अनुभव, आपल्या आवडीनिवडी, आपल्या चुका, चटकदार, धांवत्या, खेळकर, सुगम अशा भाषेंत, अगदीं आपण कांहींहि आपल्या वाचकांपासून लपवून ठेवीत नाहीं अशा थाटांत लघुनिबंधकार लिहीत असतो. त्याच्या लेखनांतून बोध निर्माण होतां कामा नये, लोकजागृ-तीचें आणि लोकशिक्षणाचें कार्य लघुनिबंकारानें कर-तांच कामा नये असा याचा अर्थ नव्हे. तें कार्य त्यानें केलें तरी अगदीं सहज, जातां जातां, केवळ आनु-षंगिक म्हणून. लघुनिबंधकार खेळीमेळीनें आपलें अनुभव वाचकाला सांगण्याऐवजीं मोठमोठ्या तत्वांचें आणि विचारांचें ओझें वाचकांवर लादूं लागला तर लघुनिबंधाची कलात्मकता नाहींशी होऊन पुराणि-काच्या प्रवचनाचें स्वरूप त्याच्या लेखनास येईल. बोध त्याच्या लेखनांत असलाच तर वाचकाला कळ-णार नाहीं अशा स्वरूपांत प्रगट झाला पाहिजे· व्यक्तिविषयक दृष्टिकोनावांचून लघुनिबंध निर्माण होऊं शकत नाहीं म्हणूनच निबंधाहून लघुनिबंध हा अधिक सूक्ष्म म्हणूनच अधिक कलात्मक वाङ्मय प्रकार आहे. लघुनिबंधाला इंग्रजींत Personal Essay म्हणतात. त्यांतील अभिप्रायहि हाच आहे.

लघुनिबंधाचें संपूर्ण तंत्र अजून पूर्णपणें प्रगट व्हावयाचें आहे. पाश्चात्य लेखकहि अजून त्याचे निरनिराळे प्रयोग करून पहात आहेत. गार्डिनर, चेस्टरटन, लिंड, ल्यूकस इत्यादि कलावंतांनीं हा वाङ्मय–प्रकार लोकप्रिय करून दाखविला असला तरी अजून त्याचे तंत्रनियम ' प्रवाही ' स्वरूपांतच आहेत. लघुनिबंधाची लोकप्रियता त्यांतील कला-गुणांमुळें दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. लेखकाचें मन जितकें अधिक संस्कारक्षम, त्याचे अनुभव जितके अधिक विविध, त्याची भाषा जितकी अधिक घरगुती पण प्रसादयुक्त तितकी लघुनिबंधाची रुची अधिक वाढत जाते.

मराठी वाङ्मयांत तर हा वाङ्मयप्रकार अजून बाल्या-वस्थेंतच आहे. इंग्रजींतल्या तंत्रानुरोधानें लघुनिबंध लिहिण्याची प्रथा प्रो. ना. सी. फडके यांनींच पाडली असें म्हणावयास हरकत नाहीं. श्री. ना. गो. चापेकर यांच्या ' गच्चीवरील गप्पा ' लघुनिबंधापेक्षां निबंधा-कडेच अधिक झुकतात आणि रसोत्कटता व कलात्म-कता या अवश्यक गुणांचा अभावच त्यांत अधिक असल्यामुळें प्रो. फडके यांनाच मराठी लघुनिबंधाचें जनकत्व द्यावें लागेल. फडक्यांच्या ' गुजगोष्टीं ' नीं मराठी वाङ्मयाला एक नवें दालन उघडलें. प्रसाद-युक्त, लालित्यपूर्ण, सोप्या, धांवत्या, चटकदार भाषेंत फडक्यांनीं वाचकांशीं हितगुज केलें आहे. त्यांच्या-' नव्या गुजगोष्टी ' व ' धूम्रवलयें ' तितकींच आल्हाद-दायक आहेत. फडके कोणत्याहि तत्वाचें प्रतिपा-दन लघुनिबंधांतून हेतुपुरःसर करीत नाहींत. श्री. वि. स. खांडेकर यांनींहि हा लेखनप्रकार यशस्वीपणें हाताळला आहे. पण केवळ कलात्मकतेकडे व रंजनाकडे दृष्टि न ठेवतां उद्बोधनाकडेहि त्यांनीं प्रथम पासूनच दृष्टि वळविल्यामुळें त्यांच्या लघुनिबंधाला कृत्रिमतेचा दर्प आल्यावांचून राहात नाहीं. ' वायु-

लहरी', 'चांदण्यांत' व 'सायंकाल' हे त्यांचे तिनही लघुनिबंधसंग्रह या म्हणण्याची साक्ष देतील. श्री. अनंत काणेकर यांनीं मात्र लघुनिबंधाच्या क्षेत्रांत अभूतपूर्व कामगिरी करून दाखविली आहे. फडक्यांचें लालित्य व खांडेकरांची कल्पकता त्या प्रमाणांत नसूनहि एका नव्या पद्धतीनें व दृष्टिकोनानें त्यांनीं लघुनिबंध लिहिल्यामुळें तत्व प्रतिपादनाकडे त्यांची लेखणी झुकती असून देखील त्यांच्या लघुनिबंधांत भरपूर रंजकता आली आहे. त्यांचे लघुनिबंध वाचून संपविले कीं समाजवादी विचारसरणीचा स्पष्ट ठसा मनावर उमटतो. त्यांचीं 'पिंकलेलीं पानें' 'शिंपले आणि मोतीं' 'तुटलेले तारे' यापैकीं कोणत्याहि पुस्तकाचें पान उघडा, आशावादी अन् सडेतोड विचारसरणी, समाजवादी दृष्टिकोन आणि गंमतीगंमतीनं आयुष्यांतले असंख्य अनुभव त्यांनीं सांगितलेले आढळतील. या लेखकांशिवाय प्रो. वि. पां. दांडेकर, प्रो. वि. द. साळगांवकर, श्री. गं. भा. निरंतर, श्री. र गो. सरदेसाई, श्री. द. दा. पेंडसे इत्यादि नवीन लेखकांनींहि हा लेखनप्रकार हाताळला आहे.

नीलगिरी:— म्हैसूर संस्थानच्या दाक्षिणेस असणारा पर्वत. याच्या पूर्व व अग्नेय या दिशांना कोइमतूर जिल्हा असून पश्चिम व नैऋत्य या दिशा मलबारनें वेढलेल्या आहेत. सरासरी उंची ६५०० फूट भरते. कांहीं ठिकाणीं तर ती ८००० फूटांपावेतों असलेली दिसते. या भागांत एक चौरस मैल देखील सपाट जागा नाहीं. 'शोलास' नांवाचीं जंगलें या भागांतच आहेत. मलबार वायनद या नांवानें हा भाग प्रसिद्ध असून कुन्नुर व उटकमंड हीं प्रसिद्धी पावलेलीं ठिकाणें यांत मोडतात. मकुति हें शिखर ८४०३ फूट उंच आहे. दोडाबेटा नांवाचें आणखी एक शिखर आहे. त्याची ८७६० फूट उंची भरते.

या पर्वतावरील कुन्नूर व उटकमंड हीं दोन ठिकाणें थंड हवेबद्दल प्रसिद्ध आहेत. उटकमंड येथें तर प्रतिवर्षी, मद्रास सरकार कांहीं काल आपल्या कचेऱ्या आणीत असतें. या पर्वतावर सरासरीनें ६७" पर्यंत पाऊस पडतो. वायदनच्या भागांत तर तो खूपच पडत असतो. देवाला व नड्डवट्टम या दोन्हीं ठिकाणीं अनुक्रमें १६१ इंच व १०२ इंच सर्वसाधारपणें पडतो. याच्यावर उदेयारकोट, हुलिकलदुर्ग व मालीकोट हे तीन प्रसिद्ध किल्ले आहेत.

यावर वस्ती करणाऱ्या लोकांत बडगा, पराया, वेल्लाळ, कुरुंबा, चेट्टी, कोटा, तोडा, हेली हे लोक प्रमुख होत. येथील लोकांत ७–८ भाषा बोलतात. इथला व्यापार मुसलमानांच्या हातांत असून तो कालिकत बंदरांतून चालतो.

निलगिरीवरील जमिनींत तीन प्रकार दिसतात. त्यांपैकीं काळी चिक्कण ही पहिल्या प्रतीची. तपकिरी रंगाची जमीन ही दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीची पिवळी व लाल ही.

येथील मदुमलई, बीन व सिगूर हीं मोठीं जंगलें असून तीं राखीव आहेत. सागवान व चंदन यांचींहि झाडें पुष्कळच आहेत. लाकडाप्रमाणेंच लोखंड, अभ्रक, सुवर्णरजमिश्रित स्फटिक वगैरे पदार्थ येथें निर्माण होतात. करझोल हें ठिकाण लोखंडाबद्दल प्रसिद्ध पावलेलें आहे. वायनदमध्यें अभ्रक व सुवर्णरजमिश्रित स्फटिक यांची निर्मिती होते. अरवणघाटखोऱ्यांत बिनधुराची बंदुकीची दारू तयार करणेचा कारखाना आहे. याशिवाय चहा, सिंकोना क्विनाईन व दारू आणि कॉफी यांची पैदास होतेच.

वेलिंगटन या ठिकाणीं लष्कराची छावणी असून तें ठिकाण या पर्वतावर आहे. निलगिरीची लांबी १०० मैल भरते.

१६ व्या शतकांत येथें नाईक राजांची सत्ता होती. नंतर ही सत्ता सध्याच्या म्हैसूरच्या राजघराण्यांतलि पूर्वजांकडे आली. हैदर व टिपू यांनीं ती आपल्याकडे घेतली. १७९९ नंतर कंपनीसरकारनें या ठिकाणीं आपला ताबा बसवला. १८६७ पासून मद्रास सरकारनें थंड हवेचें ठिकाण म्हणून पसंत केलें. इथल्या थंड हवेच्या ठिकाणाचें सौंदर्य वाढण्यास कोईमतूरचा कलेक्टर जॉन सुलीव्हन याचें श्रम कारणीभूत झालें.

नेप्च्यून:— वरुण हा लेख पाहा.

नॅशनल सोशॅलिझम्:—जर्मनीचा सर्वाधिकारी अडॉल्फ हिटलर याच्या नेतृत्वाखालील जर्मन राष्ट्रीय चळवळ. या चळवळीचा प्रारंभ १९१२ सालीं झाला. त्यावेळीं आस्ट्रियाच्या सत्तेखालीं असलेल्या सुडेटनलँड मधील कार्लसबॅड येथें राष्ट्रीय सुडेटन जर्मनांच्या एका कंपूनें जर्मन नॅशनल–सोशॅलिस्ट लेबर पार्टी (जर्मन

राष्ट्रीय साम्यवादी मजूरपक्ष) नांवाचा पक्ष स्थापला. या पक्षाची एक शाखा व्हिएन्ना येथें स्थापण्यांत आली; पण तिला महत्त्व आलें नाहीं. या पहिल्या सोशॅलिस्ट पार्टीशीं हिटलरचा प्रत्यक्ष संबंध दाखविण्यांत आला नाहीं. हिटलरची पार्टी प्रथमतः ड्रेक्सलर नामक जर्मन कार्यकर्त्यानें १९१९ सालीं म्यूनिच येथें स्थापिली. या पक्षाचें नांव जर्मन लेबर पार्टी (जर्मन मजूर संघ) असून तो ॲडमिरल टिरपिझ (Tirpiz) याच्या जर्मन फादरलँड पार्टी (जर्मन पितृभू पक्ष) या पक्षानें युद्धकालीं स्थापिलेल्या ' वर्कस् कमिटीं ' तून (मजूर—मंडळ) निघाला. पहिल्यानें हा पक्ष अगदीं लहान होता. म्यूनिच येथील एका अतीथि गृहाच्या खोलींत या पक्षाची सभा भरत असे. हिटलर हा या पक्षाचा सातवा सभासद. त्यानें या पक्षाचें नेतृत्व पतकरून त्याला ' नॅशनल सोशॅलिस्ट जर्मन लेबर पार्टी ' हें नवीन नांव दिलें व आपल्या प्रभावी प्रचार कार्यानें त्याचे सभासद वाढविले. या पक्षाचा मूळ संस्थापक ड्रेसलर याची या पक्षांतून हकालपट्टी झाली. त्यानें एक लहानसा प्रतिस्पर्धी पक्ष स्थापिला; पण त्याचें व त्याच्या पक्षाचें नांवहि ऐकूं येत नाहीं. म्यूनिच, व्हिएन्ना व कार्ल्सबाद येथील नॅशनल सोशॅलिस्ट पक्षांनीं म्यूनिच येथें एक परिषद १९२० सालीं बोलावली; परंतु या पक्षांत निकट सहकार्य घडवून आणण्यांत आलें नाहीं. त्याच वर्षी या पक्षाचा एक कार्यक्रम आखण्यांत आला. त्यांत पुढील २५ बाबी होत्या.

(१) सर्व जर्मनांचें ऐक्य (union) (२) व्हर्सायचा तह रद्द करून घेणें. (३) अन्ननिर्मितीकरतां व वसाहती करतां मुलुख मिळविणें (४) फक्त जर्मन रक्ताच्याच व्यक्ति जर्मन नागरिक होत. ज्यूंना नागरिकत्वाच्या हक्कांतून वगळण्यांत आलें आहे. (५) राष्ट्राचे नागरीक नसलेल्या व्यक्ति परदेशी (alien). (६) सरकारी नोकऱ्या देतांना व्यक्ती कोणत्या पक्षाची आहे याचा विचार न करतां व्यक्तीचे शील व कार्यक्षमता या गुणावरच निवड होईल. (७) सरकारनें (the State) राष्ट्रांतील लोकांच्या कल्याणार्थ झटावयाचें. (८) परराष्ट्रीयांना जर्मनींतून काढावयाचें व जर्मनींत राहण्याकरितां येण्याला बंदी करावयाची (९) सर्व नागरिकांना समान हक्क; त्यांचीं कर्तव्येंहि समानच (१०) प्रत्येक नागरिकानें राष्ट्राच्या कल्याणार्थ झटणें (११) न मिळविलेली मिळकत (Unearned) सरकार जमा करावयाची (abolition) (१२) युद्धकालीं मिळविलेला नफा जप्त करावयाचा. (१३) ट्रस्ट्चें राष्ट्रीकरण. (१४) घाऊक व्यापारांतील नफेबाजीस बंदी (१५) वृद्धापकाळचे भत्ते व सोशल इन्शुरन्स. (१६) लहानसहान व्यापाऱ्यांना संरक्षण; (१७) जमिनींत सुधारणा (१८) राष्ट्राविरुद्ध गुन्हा करणाऱ्यांचा, नफेबाजांचा, व व्याजखाबूंचा निःपात; (१९) रोमन कायद्याच्या ठिकाणीं जर्मन कायद्याची स्थापना (२०) राष्ट्रीय शिक्षण (२१) राष्ट्रांतील नागरिकांचें शरीरबल संवर्धन (२२) सक्तीची लष्करभरती. (२३) मुद्रण नियंत्रण (२४) राष्ट्राला विघातक होणार नाहीं इतक्या मर्यादेपर्यंत सर्व धर्मांना स्वातंत्र्य. (२५) कणखर अशा मध्यवर्ती सत्तेची जर्मनीला जरूरी.

वर दिलेल्या राष्ट्रीय व समाजसत्तावादी ब्रीदवाक्यांच्या समुदायांतून केवळ राष्ट्रीय ब्रीदवाक्यांना अनुसरूनच कार्य झालें आहे. हिटलरचा पक्ष १९३३ सालीं सत्तारूढ झाला; तेव्हांपासून सांप्रदायिक अर्थानें साम्यवादी तत्त्वावर संघटना करण्याचा प्रयत्न करण्यांत आला नाहीं; परंतु नाझी सत्तेखालीं आर्थिक घडी भांडवलशाही स्वरूपाची राहिली आहे असेंही म्हणतां येणार नाहीं. खाजगी मिळकतीला हात लावण्यांत आला नाहीं; कोणत्याहि ट्रस्टचें राष्ट्रीकरण करण्यांत आलें नाहीं; मूठभर लोकांच्या हातांत भांडवल पूर्वीप्रमाणेंच राहिलें; परंतु कोणते नवीन आर्थिक कार्यक्रम हातीं घ्यावयाचे हें ठरविण्याची व आर्थिक बाबीवर नियंत्रण घालण्याची सत्ता सरकारकडेच केवळ गेली. समाजसत्तावादी अर्थशास्त्राला पूर्वमान दिल्याचा हा परिणाम नव्हे. उलट पक्षीं नाझींनीं प्रारंभींच कोणत्याहि प्रकारच्या आर्थिक पूर्वयोजनेविषयीं व खाजगी व्यक्तींनीं कोणतेहि नवीन औद्योगिक कार्य हातीं घेण्याविषयीं आपली नापसंती व्यक्त केली. बेकारीला आळा घालणें, शस्त्रवाढ करणें, व युद्धोपयोगी साहित्य निर्माण करण्याचे कारखाने इत्यादि गोष्टींची राजकीय दृष्टीनें आवश्यकता वाटूं लागली म्हणून सरकारनें नवे नवे धंदे काढले. सांप्रतचें युद्ध सुरूं होण्यापूर्वींहि जर्मनीची

आर्थिक पद्धति १९१४ च्या महायुद्धकालच्या समाजसत्तावादी पद्धतीप्रमाणेंच होती. मोठमोठ्या कारखानदारांचें सरकारवर असलेलें वजन कमी झालें व नाझी पद्धती ब्राऊन बोल्शेव्हिझम या नांवानें वावरूं लागली. (नाझी पिंगट रंगाचे सदरे व गणवेश घालतात.) खाजगी व्यक्ति अद्यापिहि नफेबाजी करतात; परंतु सरकार जबर कर व सक्तीचें कर्ज या रूपानें त्या नफ्याचा बराचसा भाग उचलतें. औद्योगिक बाबतींत हुकूम काढणें, कच्चा माल वाटणें हीं व या प्रकारचीं कामें सरकारकडून होत असल्यामुळें उत्पादनावर सरकारी नियंत्रण राहतें.

नाझी पक्ष ('नॅशनल सोशॅलिस्ट') हा जर्मनींतील एकमेव अधिकृत राजकीय पक्ष आहे. त्याची घटना सर्वाधिकारित्वाच्या तत्त्वावर आहे. हिटलर हा त्याचा पुढारी; त्याला अनियंत्रित सत्ता असून आपले सहकारी तोच नेमतो. पक्षांतील सदस्यांना पक्षाचें धोरण ठरविण्याचा अधिकार नाहीं; आज्ञापालन हेंच त्यांचें कर्तव्य. पक्षांत सुमारें ३०००००० सभासद आहेत. याशिवाय नाझी पक्षाचे उपपक्ष आहेत. जर्मन लेबर फ्रंट हा एक उपपक्ष आहे. सर्व कामगार व नोकर यांना या पक्षाचे सभासद होण्याची सक्ती केली आहे. जर्मन युवकांचा हिलटर यूथ नांवाचा नाझी पक्षांतर्गत एक पक्ष आहे. पक्षाच्या हातीं येणाऱ्या पैशाचा हिशेब प्रसिद्ध करण्यांत येत नाहीं. सामान्यतः या पक्षाची परिषद प्रतिवर्षी नुरेंबर्ग येथें भरत असते.

या चळवळीचा मूळ पाया मध्यम वर्गाच्या आर्थिक दुरस्थतेंत आहे. मोठमोठे उद्योगधंदे व आर्थिक दुरवस्थेंत मध्यम वर्गाला भेडसावीत असतां त्या वर्गाचा उद्धार करण्याचा नाझी पक्षानें आपला मनोदय प्रगट केला. लहानसान व्यापारी व कारागीर यांना संरक्षण मिळालें. या धंद्यांना शस्त्रवाढीमुळें चालना मिळून त्यांची भरभराट झाली असली तरी उत्पादित मालाच्या किंमतीवरील सरकारी नियंत्रण व त्यापासून होणारा नफ्यावरील जबर कर यामुळें धंदा चालविणाऱ्यांना राहणाऱ्या नफ्याचें प्रमाण अत्यल्पच असतें. अलीकडे तर समाजाला अत्यंत उपयोगी अशा मध्यम वर्गाला वांचविण्याचें धोरण नाझींनीं सरकाररीत्या सोडून दिलें आहे. लहान दुकानांची बेसुमार वाढ झाली या सबबीवर ती सक्तीनें बंद करून त्यांच्या चालकांना कारखान्यांत मजूर म्हणून नेमण्याचें धोरण नाझी पक्षानें गेल्या तीन वर्षांत पतकरलें आहे. सुमारें ७००००० कारागीर व दुकानदार यांची मजूर म्हणून योजना झाली आहे.

आर्यत्वाच्या तत्त्वावर वंशाभिमान व राष्ट्राभिमान उभारलेला यांची नाझींनीं परिसीमा गांठली आहे. सन १८८० च्या अलिकडच्या आपल्या पूर्वजांत कोणी ज्यू नव्हते असे पक्षाच्या सभासदानें सिद्ध केले पाहिजे.

नाझी पक्षानें आपल्या चळवळी परदेशापर्यंत नेल्या आहेत. परदेशांतील जर्मनअल्पसंख्यांकाकरितां त्यांनीं चळवळ केली. ज्या देशांत जर्मन नाहींत त्या देशांतहि त्यांनीं आपल्या चळवळीचा फैलाव केला.

(पेन्ग्विन पोलिटिकल डिक्शनरींतील लेखावरून.)

पश्चिमोत्तानासन :—जमिनीवर दोन्ही कुल्ल्यावर बसून गुडघ्यास गुडघे, घोट्यास घोटे, आंगठ्यास आंगठे लावून दोन्ही पाय ताठ करून जमिनीला टांचा, पिंढऱ्या व मांड्यांचा मागचा भाग लागेल अशारीतीनें दोन्ही पाय आपल्यामोर पसरावें. दोन्ही हातांच्या बोटांनीं पायांचे आंगठे धरावें. उजव्या हाताच्या बोटांनीं उजव्या पायाचा आंगठा, डाव्या हाताच्या बोटांनीं डाव्या पायाचा आंगठा धरावा. दोन्ही पायांचे गुडघे जमिनीपासून वर उचलूं नयेत. दोन्ही हात कोपरांत वाकवूं नयेत. पायांच्या आंगठ्यांनीं पुढें ताणावें व हातांच्या बोटांनीं पायाचे आंगठे आपल्याकडे ओढावे. जमिनीपासून गुडघे वर न उचलतां व हात कोपरांत न वाकवितां मान दोन्ही बाहूंच्या मधून पायाच्याकडे वाकवावी; व श्वास सोडीत कपाळाचा भाग गुडघ्यावर टेकावा. हनुवटी छातीवर टेकावी. दृष्टी नासाग्रीं ठेवावी.

मान वर उचलून पूरक करून कपाळ गुडघ्यावर टेकीत रेचक करावा अशा दीर्घकालीन प्रयत्नानेंच हें आसन साध्य होतें. पुष्कळ सराव झाल्यावर दोन्हीं पावलें रुंदवून पाय ताठ ठेवून कपाळ गुडघ्यामधील जमिनीवरही टेकतां येतें. चांगला सराव झाल्यावर दोन्ही पायांचे तळव्यावर दोन्ही हातांचे तळवे टेकून हातांचीं बोटें पावलावर टांचांच्या दिशेनें धरूनही

कपाळ गुडघ्यावर टेकतां येतें. या आसनानें जठराग्नी प्रदीप्त होतो; पोटाचा दोंदिलपणा निघून जातो. नाडी बळकट व शुद्ध होते.

पादशिरासनः—(१) दोन्ही पाय जुळवून आपल्या समोर ताठ करून बसावें. उजव्या पायाचें पाऊल उचलून त्याचा चवडा डाव्या हातानें धरावा व उजव्या हाताचा आंगठा व तर्जनी यांचे चिमटींत त्या पायाची टांच घेऊन दोन्ही हातांनीं तो पाय डोक्यावरून मानेवर आणून पायाचे मनगटा शेजारच्या पिंढरीचा भाग मानेवर टेकावा. दोन्ही हात छातीवर नमस्कारासारखे जुळवावे. मान वर उचलावी व छाती ताठ करावी. डावा पाय पुढें ताठ करून जमिनीस टेकलेलाच ठेऊन उजव्या पायास मानेवरून निघूं न देतां जितकें लोडास टेकल्यासारखे त्या पायावर रेलतां येईल तितकें रेलून बसावें. दृष्टी नासाग्रीं आणावी. यास **दक्षिणपाद शिरासन** म्हणतात. २ वरीलप्रमाणेंच सर्व कृति डावा पाय मानेवर आणून केल्यास त्यास **वामपादशिरासन** म्हणतात. ३ एक पाय पहिल्यानें मानेवर नेऊन नंतर दुसरा पाय त्या पायावर बसवून पायांची आढी मानेवर बांधून दोन्ही हातांनीं छातीवर नमस्कार करून बसणें यास **द्विपादशिरासन** म्हणतात. (४) वरील प्रमाणेंच दोन्ही पाय मानेवर नेऊन पायांची मिठी न घालतां दोन्ही पायांच्या फक्त टांचा मानेवर टेकून दोन्ही पावलांचे तळवे एकमेकांस नमस्कारास हाताचे तळवे जसें जुळवतात तसें जुळवावें. यासही द्विपादशिरासन म्हणतात. दोन्ही हातांचे तळवे जमिनीवर साफ टेंकून कोपरें ताठ करून हातावर सर्व शरीर उचलतां येतें; यास त्या त्या जातींचीं **उत्थितासनें** म्हणतात (उ. उत्थितदक्षिणपादशिरासन, उत्थितवामपादशिरासन, उत्थितद्विपादशिरासन.) एक पाय मानेवरून उशास घेऊन दुसरा पाय ताठ करून निजलें असतां **उपधानासन** होते.

पूर्वघाटः— दक्षिण हिंदुस्थानच्या पूर्वेस असणारी पर्वताची ओळ. ओरिसापासून नीलगिरीपर्यंत हा ९०० मैल पसरला आहे. याची सरासरी उंची २००० फूट भरते. आरंभीं हा किनाऱ्याजवळच असला तरी दक्षिणेकडे जसजसें जावें तसतसें हा किनाऱ्यापासून दूर दूर होत चाललेला दिसतो. नीलगिरीजवळ तर याच्यापासून किनाऱ्यापर्यंत १००–१५० मैलांची चांगली रुंद पट्टी बनली आहे. हा सर्वच घाट अनेक प्रकारच्या भूस्तरांचा बनला असून यावरील खडकांची घटना देखील वेगळी वाटते. याशिवाय पर्वताच्या निरनिराळ्या भागांत इतर दृष्टीनेंहि फरक असलेला दिसून येतो. या पर्वताच्या सखल भागांत पाऊस फारच कमी पडतो. हिंवतापानें ग्रासलेला असा हा भाग आहे. इथले लोक रानटी स्थितींत आहेत. या पर्वतावरील सर्वांत उंच असलेलें शिखर महेंद्रगिरी हें. या शिखराची उंची ५००० फूट भरते. ऋषिकुल्या वगैरे १—२ नद्या या घाटांतून निघून उत्तरेला वाहत जातात. पुढें नद्या वगैरे कांहीं नाहींच. पश्चिम घाटाकडून येणाऱ्या नद्या मात्र याच्यामधील दऱ्या वगैरे तुटक भागांतून पलीकडे जाऊन समुद्राला मिळतात.

पॅनइस्लामिझम्—अखिल मुसलमानांचें राजकीय सहकार्य घडवून आणून तद्वारा मुसलमानी साम्राज्य अथवा संयुक्तराज्य स्थापण्याकरितां करण्यांत येणारी चळवळ. जगांतील मुसलमानांची संख्या तीस कोट आहे. मुसलमान तेवढे बंधू बंधू हें तत्त्व नेहमींच मुसलमानी धर्माचा पाया मानण्यांत आलें आहे. खलीफाची संस्था ही एका झेंड्याखालीं झालेल्या अखिल मुसलमानांच्या एकीकरणाचेंच द्योतक आहे. पॅनइस्लामिझमची कल्पना अधुनिक स्वरूपांत १८८० च्या सुमारास उद्भवली; तुर्कस्थानांतील खिलाफतप्रमुख अब्दुल हमिद दुसरा याच्या नेतृत्वाखालीं थोडीशी चळवळ झाली; पण ती निष्फळ ठरली. १९११ सालीं पॅनइस्लामिक काँग्रेस बोलावण्याचा प्रयत्न करण्यांत आला; तोहि विफल झाला. १९१४ सालीं सुरूं झालेल्या महायुद्धांत खिलाफत दुर्बल झाल्याचें प्रत्यंतर आलें; तुर्कस्थानच्या सुलतानानें दोस्तराष्ट्राविरूद्ध जिहाद अथवा धर्मयुद्ध पुकारलें पण त्या युद्धांत इस्लामधर्मीय अरब व हिंदी मुसलमान इस्लामधर्मीय तुर्कांविरूद्ध लढत असल्याचें दृश्य दिसलें. केमाल अतातुर्कनें महायुद्धाच्या समाप्तीनंतर सुलतानत व खिलाफत ही संपुष्टांत आणली व तुर्कस्थानसारख्या प्रमुख इस्लामधर्मीय राष्ट्राच्या राजकारणाची धर्मकारणापासून फारकत केली. तेव्हांपासून मुसलमानी साम्राज्याच्या चळवळीचें केंद्र अरबस्तानांत गेलें.

खिलाफतीची पुनर्स्थापना करण्याचा प्रश्न उद्भवला. कैरो येथें खिलाफत कॉंग्रेसचें व मक्का येथें अखिल मुसलमानांच्या कॉंग्रेसचे अशीं दोन अधिवेशनें १९२६ सालीं झालीं. परंतु व्यवहार्य स्वरूपाचा कोणताहि निर्णय घेण्यांत आला नाहीं. खलीफाच्या पदाकरतां हेजाजचा माजी राजा हुसेन, राजा इब्नसौद, इजिप्तचा राजा यांच्यासारखे उमेदवार पुढें आले. प्राचीन खलिफापासून मुसलमानांचें असें संयुक्त साम्राज्य झालेलें नाहीं; व परस्पराहून दूर असलेल्या इस्लामी राष्ट्रांत भौगोलिक, वांशिक व आर्थिक बाबतींत असलेल्या वैषम्यामुळें मुसलमानी साम्राज्याची कल्पना सत्यसृष्टींत उतरण्याचा संभव नाहीं. तथापि इस्लामी राष्ट्रांच्या स्वातंत्र्याच्या झगड्यांत पॅनइस्लामिझमची कल्पना एक पवित्र शस्त्र म्हणून वापरण्यांत येऊं लागली आहे. सीरिया व इजिप्त येथें १९३८ सालीं झालेल्या मुस्लीम परिषदांनीं पॅलेस्टाइनच्या प्रश्नाला अरबांना उपकारक अशी चालना देऊन तो वाढीस लावण्याचें कार्य केलें. १९३७ सालीं सादाबाद येथें झालेल्या करारानें तुर्कस्थान, इराक, इराण व अफगाणिस्थान यांचें राजकीय सहकार्य घडवून आणण्याची योजना केली. सौदी अरेबिया (इब्नसौदचें स्वतंत्र अरब राज्य); इजिप्त व इराक यांच्या तहनाम्यांत "इस्लामी कळकळ" (Islamic Sincerity) चा उल्लेख आहे. पॅनइस्लामिझमची कल्पना सर्व इस्लामी राष्ट्रांच्या राजकारणांत महत्वाचें तत्त्व म्हणून यापुढेंहि राहील हें निःसंशय.

प्रजापतिः— हें नांव कै. मोडक यांनीं 'हर्षल' या ग्रहाला दिलें. याचें अस्तित्व, गेल्या शंभर वर्षांतच, लोकांना कळून आलें. हा पापग्रह आहे. हा चमत्कारिक ,अत्यंत कल्पक, गूढ विद्येची आवड असणारा, घातपात, लढाया करणारा, ज्या राशींत अगर ज्या ग्रहाशीं तो युतींत असेल त्यांचे गुणधर्म विशेष उत्कट करणारा आहे. कुंभ ही त्याची स्वगृह राशी आहे. अग्निराशींत तो जाळपोळ, खून, मारामाऱ्या दर्शवितो. लग्नीं किंवा अष्टमांत हा असेल तर अपघातानें मृत्यु येतो. व सप्तमांतील प्रजापति पतिपत्नींची ताटातूट अगर वैधव्य दर्शवितो. एका राशींत हा सात वर्षें असतो. त्या स्थानाची सातच वर्षांत हानि झालेली दिसते.

प्राणवायुः—प्राण्यांच्या व वनस्पतींच्या जीवनाला आवश्यक असा वायू, पृथ्वीवरच्या वातावरणांत व्यापी $\frac{1}{5}$ भाग [मिश्रणाच्या स्वरूपांत] व पाण्यांत वजनी $\frac{8}{9}$ भाग [संयुगाचे स्वरूपांत] ऑक्सिजन (प्राणवायु) आहे. संयुगाच्या (compound) स्वरूपांत हा वायु सृष्टीमध्यें पुष्कळ ठिकाणीं विखुरलेला सांपडतो. हा वायु रंगहीन, वासरहित व रुचीहीन असतो. तो हवेमध्यें फारच थोड्या प्रमाणांत विद्रुत होतो; पण थोड्या प्रमाणांत कां होईना तो विद्रुत झाल्यामुळें माशांना व इतर जलचरांना श्वासोच्छ्वास करण्याला मदत होते. हा स्वतः जळत नाहीं; पण ज्वलनाला याची मदत होते. कोणत्याहि मौलाचा ऑक्सिजनशीं संयोग होऊन जो संयुग बनतो त्याला ऑक्साईड म्हणतात व त्या विक्रियेस ऑक्सिडेशन म्हणतात.

ऑक्सिजनचे अनेक उपयोग आहेत. जीवनाला तर तो अत्यावश्यक आहेच. प्राणीजीवन व वनस्पतीजीवन ऑक्सिजनविनाशक्यच नाहीं. श्वासोच्छ्वासाच्याद्वारां हवेंतील ऑक्सिजन फुप्फुसांत शिरून त्याचा रक्तशुद्धीला उपयोग होतो. वनस्पती आपल्या पानांच्याद्वारां कार्बन डायॉक्साईड शोषून घेतात, व ऑक्सिजन बाहेर सोडतात; पण ही क्रिया दिवसा होते. ज्वलनशील पदार्थाचें ज्वलन होण्यास ऑक्सिजनची आवश्यकता आहे. विस्तवाला तो प्रज्वलित करण्याकरितां फुंकर घालतात; त्यामुळें त्याच्या भोंवतालची अशुद्ध हवा बाजूला जाते शुद्ध हवा त्या ठिकाणीं अपसूक जमते; यामुळेंच विस्तव प्रज्वलित होऊन ज्वाला निर्माण होते. मनुष्य जसजसा वर वर जात जाईल तसतसी हवा अधिक विरल होत जाते, व ऑक्सिजनचा पुरवठा कमी पडतो; म्हणून विमानांतून विरल हवेंत प्रवास करणाऱ्यांना व गौरीशंकरासारख्या उत्तुंग शिखरावर मोहिम करणाऱ्यांना ऑक्सिजन वायूनें भरलेलीं नळकांडीं बरोबर वागवावीं लागतात.

प्रारब्धः—'पुर्नजन्म' हा १२४३ पृष्ठावरील लेख पाहा.

प्लूटोः—या ग्रहाचा शोध सन १९३०सालीं लागला. हा पृथ्वीपेक्षां पुष्कळच लहान असावा असा ज्योतिषशास्त्रज्ञांचा अंदाज आहे. या ग्रहाचे सूर्यापासूनचें अंतर ४००००००००० मैल आहे. फ्लॅगस्टाफ येथील लॉवेल वेध शाळेनें हा शोध जाहीर केला.

बद्धपद्मासनः—उजव्या पायाचें पाऊल उताणें करून डाव्या जांघेंत बसवून त्यावरून डाव्या पायाचें पाऊल आणून उजव्या जांघेंत बसवावें. उजवा हात पाठीमागून नेऊन त्यानें उजव्या पायाचा डाव्या जांघेतील आंगठा हाताच्या आंगठ्याच्या व तर्जनीच्या बेचकेंत धरावा. मग त्या हाताचीं बाकीचीं बोटें मुठीवजा करावी अगर पायाच्या आंगठ्यावरून पायाच्या तळव्याच्या पाठीकडे न्यावी व त्यांनीं पायांच्या बोटांच्या मुळाचा भाग धरावा. नंतर डावा हात पाठीमागून उजव्या हातांवरून नेऊन त्यानें वरील प्रमाणेंच डाव्या पायास धरावयाचें. हें प्रयत्नानेंच साध्य होईल. हातांच्या बोटांनीं पायांचे आंगठे पक्के धरल्यावर पायांचे गुडघे रुंदवावे. दोन्हीं गुडघे जमिनीस टेकलेले पाहिजेत. शरीरास बाक न येईल अशी खबरदारी घ्यावी. शिवाय पोटावर ताण न पडेल असें बसावें. यकृत व प्लीहा यांच्या मधील भाग आंत खेंचून धरून श्वासक्रिया कराव्या हें आसन साध्य होण्यास वेळ लागतो. वरील प्रमाणेंच पद्मासन ठेऊन डाव्याहातानें डाव्यापायचा आंगठा पहिल्यानें धरून मग उजव्या हातानें त्या हातांवरून उजव्या पायाचा आंगठा धरून वरील सर्व कृती केल्यास बद्धपद्मासनाचा दुसरा प्रकार होतो. डाव्यापायाचें पाऊल उजव्या जांघेंत पहिल्यानें बसवून मग उजवें पाऊल डाव्या जांघेंत बसवावयाचा व हातांनीं पूर्ववत एकदां उजव्या हातानें पहिल्यानें व एकदां डाव्याहातानें पहिल्यानें असें पायांचे आंगठे धरल्यानें याच आसनाचे आणखी दोन प्रकार होतात.

बर्फः—आकाशांतून पृथ्वीवर पडणाऱ्या थिजलेल्या वाफेच्या चिपा व गोठलेलें पाणी या दोन्हीं अर्थांनीं हा शब्द मराठींत वापरण्यांत येतो. पहिल्या प्रकारचे बर्फ म्हणजे पाऊस पडत असतांना गोठलेलें पावसाचें पाणी असा कांहींजणांचा समज असतो; पण तो चुकीचा आहे. कारण हें बर्फ बाष्पाचें प्रथम द्रवीभवन होऊन त्या द्रवाचें बनलेले नसते. द्रवीभवनाची मधली स्थिती न येतां एकदमच बाष्प थिजून हें बर्फ बनलेलें असते. फॅरन्हीट उष्णतामापक यंत्रावरील पारा ३२ अंशाखालीं गेला कीं बर्फ बनतें. याच्या चिपा सामान्य सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं धरल्या असतां त्यांत बारीक बारीक व चकचकीत असल्याचें दिसून येतें, या चिपा बारीक कांड्याच्या अथवा खड्यांच्या बनलेल्या असतात. कित्येक चिपा आकारानें फारच सुंदर असतात. या चिपा मोठ्या अथवा लहान होणें हें उष्णतामान व वातावरणांतील आर्द्रतेचें प्रमाण यावर अवलंबून असतें. वातावरणांत जेव्हां आत्यंतिक आर्द्रता असते व उष्णतामान गोठण्याच्या बिंदूच्या थोडें खालीं असते तेव्हां या चिपा मोठ्या असतात. या बर्फांतील पाण्याचें प्रमाण पावसाच्या पाण्याच्या एक दशांश असतें; म्हणून दहा इंच हिमवृष्टि एक इंच पर्जन्य वृष्टि बरोबर असते.

बर्फ शीतकटिबंधांत हिवाळ्यांत आढळतें. तें मोठ्या पर्वताच्या शिखरावर पडतें. ध्रुवप्रदेशांत तें बारामहिनें पडतें. शीतकटिबंधांतील पर्वतावर तें विपूल प्रमाणावर पडतें. हिमालय, आल्प्स, रॉकी पर्वत या पर्वतावर विपूल बर्फ पडतें.

पाणी गोठूनहि बर्फ होतें. सामान्य परिस्थितींत सेंटिग्रेडच्या उष्णतामापक यंत्रांत शून्यांशावर पारा असतांना व फॅरेनहीटच्या ३२ अंशावर पारा असला कीं शुद्ध पाण्याचें बर्फ बनतें. नाशवंत पदार्थ सुरक्षित ठेवण्याकरितां बर्फाचा उपयोग होतो. यामुळें बर्फ जमविणें, सांठविणें, बोटींत घालून परदेशी पाठविणें हा एक महत्त्वाचा धंदा होऊन बसला आहे. कृत्रीम रीतीनेंहि (यांत्रिक सहाय्यानें) बर्फ तयार करतां येते.


बाबर (१४८३—१५३०):—मोगलबादशाहीचा संस्थापक. हा बापाकडून तैमूरलंगाचा व आईकडून चेंगीजखान मोगलाचा वंशज होता. तैमूरच्या काबूल या राजधानींत यास राज्याभिषेक झाला; आणि त्या ठिकाणीं आपला नीट बंदोबस्त करण्याच्या उद्योगास हा लागला. १५१९ त बाबरानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली.

दौलतखान लोदीनें सन १५२४ त बाबराची मदत मागितली. बाबरास हेंच पाहिजे होतें. हा तात्काळ हिंदुस्थानांत आला व इब्राहिमखानाच्या फौजेबरोबर लढून यानें पंजाब प्रांत घेतला. पुढें बाबरानें जसजशी संधि सांपडेल तसतशा स्वाऱ्या करून हिंदुस्थान काबीज केला.

बाबरासारख्या बलिष्ठ माणसास आपल्या देशांत राहूं देऊं नये म्हणून संगराण्यानें युद्धाची तयारी केली. बाबरहि सैन्यानिशीं तयारींतच होता. उभयतांत शिक्री येथें लढाई होऊन संगराण्याचा १६ मार्च १५२८ ला पराभव झाला.

बाबर हा हिंदुस्थान व आशिया यांस जोडणाऱ्या साखळींतील मध्यवर्ती दुवा होय. बारा वर्षांचा असतांना त्याचा बाप वारला तेव्हांपासून मरेपर्यंत बाबरानें एकंदर छत्तीस वर्षें राज्य केलें. यानें आपलें चरित्र इत्थंभूत लिहून ठेवलें आहे. हा २६ डिसेंबर १५३० रोजीं मरण पावला.

बायनाक्युलरः—दोहों डोळ्यांनीं पाहण्याची लहान




दुर्बिण या दुर्बिणीला दोन नळ्या असतात. हा मायक्रॉस्कोपचा अथवा टेलिस्कोपचा एक प्रकार आहे. याला इंग्रजींत फील्ड–ग्लास असें दुसरें नांव आहे. चित्रावरून बायनाक्युलरची रचना लक्षांत येईल.

बेलवलकर, डॉ. श्रीपाद कृष्ण (१८८१–   ):– प्राच्य विद्यापंडित, जन्म ११ डिसेंबर १८८१ ला. यांचें उच्च शिक्षण राजाराम कॉलेज कोल्हापूर व डेक्कन कॉलेज पुणें येथें झालें. हें १९०७ मध्यें मुंबई ते शैक्षणिक खात्याला येऊन मिळाले. यानंतर हे १९१४ पासून डेक्कन कॉलेजांत प्रोफेसर झाले. भांडारकर ओरिएण्टल रिसर्च इन्स्टिट्यूटच्या प्रमुख संस्थापकांपैकीं हे एक होत. सेक्रेटरी या नात्यानें त्यांचा संस्कृत विद्यापीठ असोसिएशन पुणें, ऑल इंडिया ओरिएण्टल कॉन्फरन्स, व भांडारकर इन्स्टिट्यूट यासंस्थांशीं त्यांचा संबंध आला. यांनीं हिंदी तत्त्वज्ञानाचा इतिहास, संस्कृत व्याकरण पद्धतींचा इतिहास इत्यादि पुस्तकें लिहून इंग्रजी वाङ्मयांत भर घातली आहे. यांना हार्वर्ड (अमेरिका) विश्वविद्यालयाकडून पी. एच. डी. ही पदवी मिळाली.

बौद्धधर्मः—'गौतमबुद्ध' हा लेख पाहा. पृष्ठ ४३१

ब्लॉऊजः--माप-छाती ३४ कमरलांबी १५ हात १५



खांदेरुंदीसह अ ते क, छातीचा १/६ – १/२ इंच ठेवून कांखरेषा मारा. अ ते इ, छातीचा १/४ + १ इंच ठेवून इण रेषा मारा. रणश बगल अ ते घ वळण काढून घ्या. हाताची लांबी १५ इंच अ ते ख, छातीचा १/१२ अ ते उ, एक इंच ठेवून उख वळण काढा, आणि खक गळावळण काढून घ्या. तसेंच आकृतिप्रमाणें दोन इंच रुंदीची कॉलर काढा. या शिवाय खालचा कमरपट्टाहि कमरघेरापेक्षां दोन इंच अधिक लांब व अडीच इंच रुंदीचा कापा. **जंपर**—ब्लॉऊजप्रमाणेंच बेतण्याची व कापडाची घडी घालून कापण्याची रीत आहे. फरक केवळ उंची जास्त असते. कमरपट्टा वेगळा नसतो. बगल वळण कमरेपासून थोडें बाहेरच्या बाजूस घ्यावें लागतें. कमरेला सुरकुत्या पडाव्या म्हणून कोणी कमरेला नेपा करतात. या नेप्यांत नाडी ओवून ती कमरेबरोबर बांधतात. यानें सैल असलेल्या कापडाच्या चुण्या पडतात. कित्येक पाठीवर दोहों बाजूंस बारीकशा दोन दोन तीन तीन चुण्या घालतात. या चुण्या पुढेंसुद्धां कित्येक घालीत असलेल्या दिसतात. कॉलर कित्येक ठेवतात, कित्येक ठेवीत नाहींत. आतां गोटाचे जंपर स्त्रियांच्या आवडींचे बनलें आहेत. लहान मुलीच्या जंपरना टेनीस किंवा पोलो या कॉलरीहि लावलेल्या पाहण्यास मिळतात.

ब्रह्मचर्यः—ब्रह्मचर्य म्हणजे वेदादिविद्येच्या अध्ययनाकरितां अविवाहित राहून आचारावयाचें व्रत. विद्याभ्यास संपेपर्यंत या व्रताचें कडकडित पालन करणें हें

प्रत्येकाचें स्वत:विषयींचे व स्वराष्ट्राविषयींचें परम पवित्र कर्तव्य आहे. ब्रह्मचर्यव्रताच्या सम्यक् पालनानें मनुष्य निरोगी, दीर्घायु, सुखी, पवित्र, बुद्धिमान, धैर्यवान्, सामर्थ्यसंपन्न व कीर्तिवान् होतो. म्हणून प्राचीन आर्य ऋषींनी चार आश्रमांची योजना करून उपनयन संस्कार झाल्यापासून कमीतकमी १२ वर्षें या व्रताचें आचरण विद्यार्थ्यानें चांगल्या प्रकारें करावें म्हणून सांगितलें आहे. विद्याभ्यास उत्तम प्रकारें होण्याकरितां शरीराचें व मनाचें आरोग्य प्राप्त करून घेणें अवश्य आहे. हे शरीराचें व मनाचें आरोग्य वीर्यावर अवलंबून असते. म्हणून वीर्यरक्षण करणें हा ब्रह्मचर्यव्रताचा महत्त्वाचा भाग आहे. वीर्यरक्षणानें शरीर व मन ही कणखर बनतात, बुद्धि तीव्र होते व मन पवित्र होतें. या गोष्टी विद्याभ्यास चांगला होण्यास अवश्य आहेत. सांप्रतकालीं प्राचीन कालाप्रमाणें वेदविद्येचें अध्ययन सर्वच विद्यार्थ्यांना करावें लागत नाहीं ही गोष्ट खरी असली तरी ज्या भौतिकशास्त्रादि विद्यांचें अध्ययन सांप्रतकालीं विद्यार्थी करतात त्यांच्या अध्ययनालाहि बुद्धीची तीव्रता, मनाची शांति पावित्र्य व शरीरबल यांची अवश्यकता असते. शरीरानें निर्बल व बुद्धीनें मंद अशा विद्यार्थ्यांकडून कोणत्याहि विषयाचें अध्ययन चांगल्याप्रकारचें होणें शक्य नाहीं. विद्यार्थी-दशेंत म्हणजे पहिली पंचविशी उलटेपर्यंत जर वीर्य रक्षण केलें तर भावीकाल सुखाचा व यशस्वी होतो. आजचे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक आहेत. विद्यार्थ्यांच्या आंगीं बीजरूपानें वसत असलेल्या शक्तींचा प्रमाणबद्ध विकास करणें हें शिक्षणाचें उद्दिष्ट आहे. शारीरीक व मानसिक शक्तींचा योग्य विकास झाला तर इतर शक्तींचा विकास त्या योगें होतोंच होतो, कारण त्यांचा विकास शारीरिक व मानसिक शक्तींच्या विकासावर पुष्कळ अंशीं अवलंबून असतो. शारीरिक व मानसिक शक्तींचा विकास वीर्यरक्षणानेंच होतो हें वर सांगितलेंच आहे. म्हणून विद्यार्थीदशेंत ब्रह्मचर्यव्रताचें कडकडीत पालन केल्यानेंच कणखर शरीराचे व खंबीर मनाचे नागरिक निर्माण होतात हें उघड आहे.

वीर्य म्हणजे प्रत्येक वस्तूंमध्यें व व्यक्तिमध्यें धारण करण्याची व कार्य करण्याची जी शक्ति असते ती. वीर्य हे शरीराच्या अमूक एका ठराविक जागीं असतें असें नाहीं. वीर्य हें शरीराच्या अणुपरमांणूत भरलेलें असतें. दुधांत वा दह्यांत जसें लोणी तसें संपूर्ण शरिरांत वीर्य व्यापलेलें असते. मंथनानें दुधाच्या प्रत्येक कणांतून लोणी जसें खेचलें जातें तसेंच विषयचिंतन, कामचेष्टा, इंद्रियमर्दन, स्त्रीपुरुषसंग इत्यादींच्या योगानें शरिरांतील वीर्य सर्व शरीरावयवाला पिळून बाहेर निघतें. अशा प्रकारें वीर्य निघत असतांना मेंदुला, हृदयाला व शरीरांतील परमाणूंना प्रचंड धक्का बसतो. त्यानें शरीर नि:सत्त्व होतें संभोग-कालीं दीड तोळा वीर्य सहज बाहेर पडतें. दीड तोळा वीर्य ६० तोळे रक्ताबरोबर आहे; कारण वीर्याच्या एका थेंबाबरोबर रक्ताचे ४० थेंब असा सिद्धांत आहे अर्थात् वीर्याचा नाश करणें म्हणजे रक्ताचा नाश करणें व रक्ताचा नाश करणें म्हणजे मृत्यूला बोलावणें करणें होय यांत शंका नाहीं. ‘ब्रह्मचर्य हेंच जीवन असून वीर्यनाश हाच मृत्यू आहे.’

ब्रह्मचर्याश्रम:--व्यक्तीच्या विकासासाठीं हिंदूधर्मानें घालून दिलेल्या चार आश्रमापैकीं पहिला. या आश्रमाला उपनयन संस्कारापासून सुरवात होतें. उपनयन संस्कार ८ ते १२ वर्षांपर्यंत होतो. हा संस्कार झाल्यानंतर बटूनें गुरुगृहीं राहून विद्याभ्यास करावयाचा असतो; तीनही वेदांचें सांगोपांग अध्ययन व्हावयाला छत्तीस वर्षें लागतात; कारण प्रत्येक वेदाच्या अध्ययनाला बारा वर्षें लागतात. उपनयन आठवें वर्षीं झालें असल्यास तीन वेदांचें अध्ययन संपेपर्यंत वयाला ४४ वर्षें पूर्ण होतात. बाराव्या वर्षीं उपनयन झाल्यास तीन वेदांचें अध्ययन होईपर्यंत अठ्ठेचाळीस वर्षांचें वय होतें. यावरून प्राचीनकाळीं या आश्रमाचा जास्तींत जास्त मर्यादा ४८ वर्षेंपर्यंत असे हें दिसून येतें. ३६ वर्षांच्या दीर्घ कालावधिपर्यंत ब्रह्मचर्य पालन शक्य नसल्यास अठरा वर्षेंपर्यंत ब्रह्मचर्यपालन करावें. हें संपेपर्यंत वय सव्वीस वर्षांचें होतें. या आश्रमाचा शरीराचें व बुद्धीचें सामर्थ्य संपादन करणें असा दुहेरी हेतु आहे.

ब्रह्मचर्य तीन प्रकारचें आहे--कनिष्ठ, मध्यम व उत्तम, चोवीस वर्षांचे हे कनिष्ठ ब्रह्मचर्य. चवेचाळीस वर्षेंपर्यंत ब्रह्मचारी राहून वेदाभ्यास करणें हें मध्यम ब्रह्मचर्य. उत्तम ब्रह्मचर्य ४८ वर्षांचें आहे.

भरती ओहोटी:—‘चंद्र’ हा लेख पाहा.

भातः— नेहमींच्या खाण्यांतील एक धान्य. सह्याद्रिचा घाटमाथा व कोंकण या भागांत हें धान्य पुष्कळ पिकतें. कोकणाप्रमाणेंच हिंदुस्थानांत जे समुद्रालगत प्रांत आहेत तेथेंहि पुष्कळ भात पिकते. मुंबई, मद्रास ओरिसा, बंगाल, सिंधचा कांहीं भाग व म्हैसूर या भागांतून पुष्कळच भात पिकतात. आपल्याकडे जे भात पिकतात ते आपल्या लोकांना पुरत देखील नाहींत. बेझवाडा, गुंतूर, रंगून इकडे खूपच भात होतात. हे भात सडून त्याचे बनविलेलें तांदूळ आपल्याकडे येतात. भाताची पिकें कांहीं भागांत वर्षांतून दोन दोन निघतात.

या भाताचे उपयोग अनेक आहेत. त्यांत तांदूळ करणें हा मुख्य उपयोग होय. पण याशिवाय लाह्या, पोहे, चिरमुरे हे पदार्थ करण्यासाठीहि भाताचा उपयोग होतो.

याची पेरणी मृगाला होऊन लोकांच्या पदरांत ते दसऱ्याला पडतात. दमट हवा व पुष्कळ पाऊस या पिकाला लागतो. या पिकाची लागण दोन तऱ्हेनें करतात एक कुरीनें व दुसरी रोपानें.

व्यवहारांत भाताचे प्रकार खूप आहेत. हे प्रकार भाताचें स्थान व आकार यांवरून बनले आहेत. या प्रकारांपैकीं कांहीं प्रमुख जाती या खालीं दिल्या आहेत.

हावळे, रेडेमुसळे, मोठे, जिरगे, काळी, गजेली, लांडीसाळ, कणेरीसाळ, दोडकींसाळ, मुदगे, वरंगळ, आंबेमोर, जोंधळेभात, मासड, चंपाकळी.

पोह्याला मोठ्या भाताचा उपयोग करतात. तसेंच हाळवें भात चिरमुऱ्याला उपयोगीं पडतात. काळी-गजेलीचा तांदूळ हिरवट रंगाचा असून तो बारीक पण वासाचा असतो. मासडभात रंगानें काळे असतात. जोंधळे भात जोंधळ्याप्रमाणें असतात. त्याचा तांदूळ बुटका व गोलसर असतो. आंबेमोहोर, जिरगे या भातांना चांगला वास असून त्याचे तांदूळ बारीक असतात. साळीचे तांदूळ लांब व बारीक असलेले दिसून येतात. जुने तांदूळ पचण्याला हलके असतात.

भुजंगासन :— पालथें निजून दोन्हीं हातांचे तळवे बेंबीच्या ओळींत कमरेच्या दोन्हीं हाडांचे बाजूस छातीच्या दिशेनें बोटें करून टेकावेत. बेंबी-पासून पायाच्या आंगठ्या पर्यंतचा शरीराचा भाग ताणावा. पाय जुळलेले असावेत. पायाचे आंगठे जुळवून ताणून ठेवावे. त्यांच्या नखाच्या बाजूचा भाग जमि-नीवर टेकावा. डोकें वर सावकाश उचलावें व डोकें मान, छाती व पोटाचा वरचा बेंबीपर्यंतचा भाग वर उचलावा. हाताचे तळवे न उचलतां शक्य तो कोपरांत ताठ करावे. दृष्टी भ्रूमध्यावर न्यावी. या आसनानें जठराग्नी प्रदीप्त होतो. पचनक्रिया वाढते.

मत्स्यासन :— पद्मासन घालून पाठीवर निजावें. दोन्हीं कुल्लें, मांड्या व गुडघे जमिनीवर टेकावेत. मानेपर्यंत पाठीचा सर्व भाग जमिनीपासून उचलून फक्त डोक्याचा पाठीचा भाग जमिनीवर टेकावा. दोन्हीं हातांचा डोक्याभोंवती विळखा घालावा. डाव्या हाताच्या बोटांनीं खालून उजवा दंड व उजव्या हाताच्या बोटांनीं खालून डावा दंड धरावा व डोकें हातांच्या विळख्यांत घ्यावें. डोकें व मांड्या यावर जोर घेऊन पाठीचा भाग जमिनीपासून शक्य तों वर उचलावा व कुंभक करावा. या आसनानें शौच्याच्या तक्रारी नाहींशा होतात व पोट साफ होतें.

मत्स्येंद्रासन :—आसनावर मांडी घालून बसावें. डाव्या पायाच्या जांघेंत उजव्या पायाचा पंजा उताणा करून असा बसवावा कीं उजव्या पायाची टांच बेंबीच्या खालचे बाजूस ओटीपोटावर यावी व पायाची बोटें डाव्या मांडीवर यावी. डावा पाय गुडघ्यांत वांक-वून पावलावरून उभा करावा. उजवा गुडघा जमिनीस टेकलेला ठेऊन त्याच्या जवळ डावें पाऊल आणावें. डावा गुडघा उजव्या काखेकडे आणावा व छाती डाव्या बाजूकडे वळून उजवा हात डाव्या मांडीवरून बाहेरच्या बाजूस न्यावा. म्हणजे डावा गुडघा डजव्या काखेच्या बाहेरच्या बाजूस येईल. उजवा हात ताठ करून त्याची बोटें डाव्या पावलाच्या आंगठ्यापलीकडे नेऊन त्या बोटांनीं डाव्या पावलाचा तळवा धरावा. उजव्या हातांत डाव्या पावलास पक्कें धरून तें पाऊल उचलून हळूं हळूं उजव्या गुडघ्याच्या बाहेरच्या बाजूस न्यावें उजव्या गुडघ्याजवळ वाहेरच्या बाजूस डावी टांच टेकावी व उजव्या हातानीं धरलेलें पाऊल जमिनीस पूर्ण टेकावें. धडाचा वरचा सर्व भाग डाव्या बाजूकडे वळवून डावा हात कोपरांत वाकवून डाव्या कमरेकडून पाठीच्या बाजूनें नेऊन उजव्या मांडीकडे आणावा. डाव्या हाताचा तळवा

उपडा करून त्याची पाठ उजव्या मांडीकडे करून त्याच्या बोटांनीं उजव्या पायाचें मनगट घोट्यांशेजारीं धरावें. डावा आंगठा उजव्या पावलाच्या घोट्यावर येईल व बोटें खालच्या बाजूस जातील, मान डाव्या-खांद्याकडे वळवून हनुवटी डाव्या खांद्यावर येईल. उजवी मांडी जमिनीपासून उचलूं नये व डावें पाऊल जमिनीवर उजव्या गुडघ्यापलीकडे उजव्या हातानें धरलेलें जमिनीस पूर्ण टेकावें. दृष्टी डाव्या बाजूस भूमध्यावर स्थिर करावी. ह्या आसनाचा दुसरा प्रकार—डावें पाऊल पहिल्यानें उजव्या जांघेंत बसवून उजवा गुडघा उभा करून त्यावरून डाव्या हातानें उजवें पाऊल धरून तें डाव्या गुडघ्या पलीकडे न्यावें व उजव्या बाजूस वळून उजवा हात पाठीच्या मागें नेऊन त्यानें डाव्या पायाचें मनगट धरावें.


मत्स्येंद्रासन करावयास कठीण आहे तें पुष्कळ सरावानें साध्य होतें. त्याचा सराव पहिल्यानें अर्ध-मत्स्येंद्रासन करून करावा. **अर्धमत्स्येंद्रासन**—वरील आसनांत सांगितल्याप्रमाणें उजव्या पायाचें पाऊल डाव्या जांघेंत न बसवितां उजवी टांच शिवणीपाशीं नेऊन डाव्या कुल्याजवळ पाऊल जमि-नीवर उपडें बसवावें व डावा गुडघा उजव्या काखेच्या बाहेर नेऊन उजव्या हातानें डावें पाऊल धरून तें पाऊल मत्स्येंद्रासनांत सांगितल्या-प्रमाणें उजव्या गुडघ्यापलीकडे न्यावें. डाव्या बाजूस वळून डावा हात पाठीमागें नेऊन त्या हाताच्या पंजानें उजव्या जांघेशेजारीं मांडीला धरावें. दृष्टी व मानेची स्थिति वर वर्णिल्याप्रमाणेंच. डाव्या पायाचें पाऊल उजव्या कुल्याजवळ बसवून वरीलप्रमाणें सर्व कृती उजव्या बाजूस वळवून करून या आसनाचा दुसरा प्रकार करावा.

गुल्म, उदरादि, सर्व रोग या आसनानें नाहींसे होतात. पचनक्रिया वाढते. कुंडलिनीचा बोध होऊन मस्तकांतील अमृत स्थिर होतें.

मनुः—'मनु' या नांवाचा उल्लेख आर्यांचें अति-प्राचीन ग्रंथ जे वेद त्यांत व त्यानंतर झालेल्या अनेक प्राचीन ग्रंथांत आढळतो. ऋग्वेदांत मनू हा मानव जातीचा पिता असा उल्लेख आहे. एका वैदिक कवीनें आपल्या प्रार्थनेंत "मनू या पूर्वजानें आंखून दिलेल्या मार्गापासून आपण भ्रष्ट होऊं नये" असें म्हटलें आहे. ऋग्वेदांतील दुसरा एक ऋषी म्हणतो कीं प्रथम यज्ञ जर कोणी केला असेल तर मनूनें. तैत्तिरीय संहितेंत व तांड्य ब्राह्मणांत तर असें म्हटलें आहे कीं मनूनें जें कांहीं सांगितलें आहे तें सर्व औष-धच आहे. तैत्तिरीय संहिता व ऐतरेय ब्राह्मण यांत मनूनें आपली संपत्ति आपल्या मुलांमध्यें वाटून दिल्या-विषयीं व ती तशी देतांना आपला मुलगा नाभनेदिष्ट यांना त्यांतून वगळल्याविषयीं कथा आहे. निरुक्ताच्या तिसऱ्या प्रकरणांत पुत्र व कन्या यांच्या हक्काविषयी विवेचन करतांना पुत्राप्रमाणें कन्येलाहि पित्याची संपत्ति मिळाली पाहिजे, असें प्रतिपादून या प्रतिपाद-नाला पुष्टी देण्याकरितां एक ऋचा व एक श्लोक उद्धृत केली आहेत. श्लोकांत स्वायंभूव मनूच्या मताचा उल्लेख आहे. श्लोक व ऋचा यांतील फरक दाखवून हा श्लोक स्मृति असून श्रुति नव्हे असें म्हटलें आहे; तें विचारणीय आहे. यांवरून ज्यांत मनूचा धर्मशास्त्रकार म्हणून उल्लेख आहे अशा स्मृति भास्कराचार्यांच्या पूर्वी होत्या असें दिसून येतें. गौतम व वशिष्ठ मनूच्या मताचा उल्लेख करतात. आपस्तंभ श्राद्धपद्धतीचा प्रवर्तक म्हणून मनूचा उल्लेख करतो. महाभारतांत अनेक स्थळीं मनूचा उल्लेख आहे. कोठें 'मनू' म्हणून, कोठें 'स्वायंभूव मनू' म्हणून तर कोठें 'प्राचेतस मनू' म्हणून उल्लेख आढळतो. महा-भारताच्या शांतिपर्वांत स्वायंभूव मनूनें परमेश्वर प्रणित धर्माचें प्रवर्तन केल्याचा व उपनस् व बृहस्पति यांनीं त्या ग्रंथावर आधारलेली शास्त्रें रचली असें म्हटलें आहे.

प्रचलित मनुस्मृति ऋग्वेदांत ज्याच्या नांवाचा उल्लेख आढळतो त्या मनूनें रचिली नाहीं. ('मनु-स्मृति' पहा.)

मयुरासनः—दोन्हीं गुडघ्यावर बसून ओणवें व्हावें.



मयुरासन

दोन्हीं हात करांगुलीपासून कोपरापर्यंत एकेमकांशजारीं लागून धरावें. दोन्हीं हातांचे तळवे जमिनीवर असें

टेंकावेत कीं मनगटें पुढें येतील व हाताचीं बोटें गुडघ्याच्या दिशेनें होतील. दोन्हीं हातांच्या करांगुलीच्या लगतचा भाग एकमेकांस चिकटेल व आंगठे बाहेर राहतील. दोन्हीं कोपर जुळवून कोपरांत हात वाकवून कोपरावर पोटाचा दोन्हीं नळांचा छातीलगत खालचा भाग टेकावा. दोन्हीं कोपरावर थोडा भार घेऊन दोन्हीं पाय मागें जुळवून ताठ करावें व फक्त दोन्हीं पायांचे आंगठ्यावर शरीराचा मागील भाग तोलावा. मान वर उचलून दृष्टी समोर धरावी. छाती वर उचललेली धरून कोपरावर भार घेत शरीराचा तोल पुढील बाजूस आणावा. व कोपरावर तोल सांभाळींत दृष्टीपुढें कायम ठेऊन छाती अगर खांदे जमिनीकडे न नेतां पायांचे आंगठे जमिनीपासून वर उचलावें. हिसका घेऊं नये. सर्व शरीर जमिनीस समांतर झालें कीं स्थीर व्हावें.

यामुळें यकृत, प्लीहा यांचें कार्य व्यवस्थित चालूं होतें. पचनक्रिया वाढतें, जठराग्नी प्रदीप्त होतो. या आसनावर युक्तीनें राहून भस्त्रिका केल्यास वाढलेली प्लीहा अगर यकृत यांची विकृती नाहींशीं होतें.

महाएकादशीः--एकादशी हा लेख पाहा. पृष्ठ १५२.

मांडूक्योपनिषद्:--सुप्रसिद्ध दशोपनिषदांतील एक उपनिषद्. तें सर्वांत लहान उपनिषद आहे. त्यांवर श्रीगौडपादाचार्यांनीं दोनशें पंधरा कारिका लिहिल्या आहेत. त्यांत अद्वैत सिद्धान्ताला अनुकूल असाच अर्थ या उपनिषदाचा केला आहे. यांत ॐकाराची उपासना सांगितली आहे. त्याचा सारांश असा:— हें सारें विश्व ओंकार आहे. आत्म्याचे विश्व, तैजस, प्राज्ञ व तुर्य असें चार प्रकार आहेत. वैश्वानर हा स्थूल विषयांचा भोक्ता, तैजस हा वासनेचा भोक्ता, प्राज्ञ हा निद्रानंदाचा भोक्ता. हाच सर्वांचा ईश्वर. सर्वांचा ज्ञाता व सर्वांचा अंतर्यामी. सर्वभूतें याच्यापासूनच उत्पन्न होतात व शेवटीं याच्यांतच लीन होतात. प्रपंचविरहित शांत, द्वैतरहित असा आत्मा तो तुर्य. 'आयमात्मा ब्रह्म' हें महावाक्य याच उपनिषदांत आहे.

मॅमलः—आपल्या पिलांना पाजविणारे जे प्राणी आहेत त्यांपैकीं सर्वांत मोठा प्राणी म्हणजे मॅमल हा होय. जीवसृष्टीच्या शिरोभागीं विराजमान होणारा प्राणि म्हणजे मॅमल हा होय, असें साधारणतः मानण्यांत येते. अगदीं लहान कोटीचे जीव सोडून दिलें असतां बाकीचे सर्व जीव मैथुन क्रियेनेंच जन्मास येतात. आईच्या पोटांत गर्भरूपानें असतां पिलाचें संगोपन आपोआपच आईच्या आहारानें होत असते. जन्मल्यावर तें आईच्या दुधावरच कांहीं दिवस रहातें.

मॅमलला चार अवयव असतात, दोन हात व दोन पाय. यास अपवाद म्हणजे व्हेल होय. मॅमल प्राण्यांना कमीजास्तप्रमाणांत केंस असतात. प्राण्यांच्या इतर जातींना खरे केंस असे नसतातच. व्हेललासुद्धां थोडेसे केंस असतातच. मॅमल या प्राण्याच्या त्वचेस ठिकठिकाणीं घामाच्या गांठी, दूध देणाऱ्या गांठी वगैरे गांठी असतात. शरिराच्या पोकळीचे एका पडद्यानें ऊर व पोट (Abdomen) असे दोन भाग झालेले असतात. उरामध्यें फुप्फुसें वेगळी असतात; हृदयाला चार कप्पे असतात. हाडाच्या सांगाड्यांतहि अनेक विशेष दिसून येतात. मॅमल प्राण्याच्या प्रत्येक जबड्यास दांत, उपदाढा, व दाढा या पद्धतशीर ओळीनें आलेल्या असतात. **लक्षणें व संवयीं**—डोक्यांच्या आकारांतील भिन्नता हें लक्षण पक्षी व मॅमल यांतील फरक ओळखण्यास उपयोगी पडतें व मासे सर्प वगैरे प्राण्यापासून मॅमल हा प्राणी भिन्न आहे हें ओळखण्यास त्यांच्या रक्तांतील उष्णतामान हें उत्तम लक्षण आहे. मासे सर्प वगैरे जातीच्या प्राण्यांचें रक्त थंड असते; मॅमलचें रक्त उष्ण असतें. मॅमल हा प्राणी फुफुस्सांनीं श्वासोच्छ्वास करतो. चार अवयवांनीं युक्त असलेला व श्वासोच्छ्वास करणारा असे. हा मॅमल सेटेसीन सिरेनियन व पाकोळी हे अपवाद सोडून प्राणी पृथ्वीतलावर विहार करण्यास योग्य असा आहे. सेनेसीन व सिरेनियन हें प्राणि समुद्रांत विहार करतात. व पाकोळी आकाशांतून भ्रमण करत जाते. ओरँग या सारखीं कांहीं माकडें (Apes) झाडांवर रहातात. व जमिनीवरून अडखळत चालतात. बहुतेक मॅमलना शेपट्या असतात; कांहींच्या शेंपट्या तर मोठाल्या व लांबलचक असतात. हातापायांच्या बोटांना नखें, खूर किंवा पंजे असतात. मॅमल या प्राण्यांचा आकार पासून व्हेलपर्यंत लहानमोठा असतो.

बहुतेक मॅमल प्राणि हे गटानें राहतात. ते गटानें राहून भक्ष्य मिळवितात व एकत्र राहून शत्रूपासून आपले संरक्षण करतात; कुत्र्याच्या जातीचे कित्येक

मॅमल प्राणी गटानें अरण्यांत जाऊन शिकार करतात; कित्येक खूर असलेले मॅमल प्राणी म्हाताऱ्या नराच्या संरक्षणाखालीं कळपानें रहातात. आणि मनुष्याबद्दल तर सांगायलाच नको. हा प्राणी संवयीनें इतका समाजाच्या आधीन झालेला आहे कीं रोजचीं उपजीविकाहि त्यास समाजाच्या साह्यावांचून अशक्य झाली आहे. सर्व जन्मभर नवरा–बायको एकमेकाच्या सहवासांत कालक्रमण करीत असल्याची उदाहरणें कांहीं कमी नाहींत. तसेंच एकाच कुटुंबांत आईबापांच्या सावलीखालीं रहाणारी अनेक मंडळी आढळून येतात. मॅमल या सदराखालीं येणारे बहुतेक प्राणी घर करून, एकत्र रहातात व तेथें आपल्या पिलांचे कांहीं काल तरी संगोपन करतात.

मॅमल या प्राण्याचे तीन भाग कल्पिण्यांत आले आहेत– Prototheria, Metatheria व Eutheria. पहिल्या भागांत येणारे प्राणी सर्पाच्या जातीसारखे असतात. यांतहि अंडीं घालणारे, व न घालणारे असे पोटभेद आहेत. यांना घाण बाहेर टाकणारे एकच छिद्र (Aperture) असतें. अंडीं न घालणाऱ्यांच्या बाबतींत सांगावयाचें म्हणजे या जातीच्या माद्यांना स्तनें नसतात; पण त्यांच्या शरिरांतील कांहीं भागांतून दूध बाहेर येऊन एके ठिकाणीं साखळतें व तें पिलें चाटून टाकतात.

Metatheria या प्रकारचें उत्तम उदाहरण म्हणजे कॅंगॅरू अल्प मैथुन क्रियेनें पिलू जन्मास येतें. आई त्यास पिशवीमध्यें ठेवतें. तेथेंच तें स्तनास चिकटून रहातें. पिलाला स्तनांतून थोडें थोडें दूध मिळत जातें.

Eutheria या प्रकारांत मॅमलच्या उरलेल्या सर्व जाती येतात. या प्रकारांत पिलें अधिक विकास होऊन जन्मतात व आईच्या जीवनाहून निराळें जीवन अधिक लवकर धारण करण्यास समर्थ असतात. आईची स्तनें चोखून ते तिच्या केवळ दुधावरच कांहीं दिवस राहूं शकतात; या प्रकारांत नऊ जाती आहेत— (1) Edentata (2) Cetacea (3) Sirenia (4) Ungulata (5) Rodentia (6) Carnivora (7) Insectivora (8) Chiroptera (9) Primates पहिल्या जातींतील मॅमलना पुढील दांत नसतात; त्यावरून त्यांना दंत विहीन Edentata असें नांव पडलें आहे. दुसरे व्हेल सारखें असतात; म्हणून त्यास Cetacea असें म्हणतात. तिसरे चिपनाळींसारखे (Siren-like) दिसतात; म्हणून त्यास Sirenia असें म्हणतात. यांतील माद्यांना स्तनें असतात व हे प्राणी बहुधा पाण्यांत राहतात. चवथ्या प्रकारच्या मॅमलना खूर असतात. या प्रकाराचे पुन्हां चार उपभेद करण्यांत आले आहेत. पहिल्यांत गुरें ढोरें, मेंढरें, काळवीट, हरीण, जिराफ, उंट, डुक्कर व हिपॉपोटेमस हे प्राणी येतात. दुसऱ्यांत घोडे, गेंडोऱ्हेनीसिरोस हे प्राणी येतात; तिसऱ्यांत हिरेक्सस हे येतात व चवथ्यांत हत्तीहि येतात.

Rodentia म्हणजे कुरतडणारे या प्रकारांत पुन्हां दोन पोट–भाग पडतात. पहिल्यांत खारी, बीव्हर, उंदीर, वगैरे येतात व दुसऱ्यांत ससे वगैरे यतात.

Carnivora म्हणजे मांस खाणारे या प्रकारांत कुत्रा, मांजर, अस्वल, वगैरे पहिल्या पोट प्रकारांत येतात व दुसरें वॉलरस, सील वगैरे जलचर प्राण्यांचा दुसरा पोट–प्रकार होय. Insectivora म्हणजे जंतू भक्षक. Chiroptera या प्रकारांत, फळें खाणाऱ्या पाकोळ्या व जंतू खाणाऱ्या पाकोळ्या असे दोन पोट–भेद आहेत.

व्यावहारिक ज्ञानकोश

पुरवणी २

ग्रीसः—१९३५ च्या निवडणुकींत राजपक्षीय कोन्डिलिस मुख्य प्रधान बनून त्यानें राजाला परत बोलाविण्याच्या प्रश्नावर मतें घेऊन (प्लेबिसाइट) अनुकूल मतें पडतांच २५ नोव्हेंबर १९३५रोजीं राजा दुसरा जॉर्ज ग्रीसमध्यें परत आला व आतांपर्यंत त्याचेंच राज्य सुरूं आहे. एप्रिल १९३६ मध्यें जनरल मेटॅक्सस हा मुख्य प्रधान बनला. त्यानें कम्यूनिस्ट लोकांचें बंड होईल त्याला तोंड देण्यासाठीं म्हणून ४ ऑगस्ट १९३६ रोजीं डिक्टेटरशिप (सर्वसत्ताधिकारित्व) जाहीर केली. पार्लमेंटचें विसर्जन झालें. १९३८ मध्यें जनरल मेटॅक्ससची आजन्म मुख्य प्रधान म्हणून नेमणूक झाली. युरोपांतील राजकारणांत खळबळ सुरूं झाली तेव्हां एप्रिल १९३९ मध्यें ग्रेटब्रिटननें युद्धप्रसंगीं आपण ग्रीसला सहाय्य करूं असें आश्वासन दिलें. ग्रीसच्या राजाचा व इंग्लंडच्या राज्याचा नात्याचा संबंध आहे. चालू महायुद्धाच्या सुरवातीस ग्रीसनें आपलें तटस्थतेचें धोरण जाहीर केलें. पण २९ आक्टोबर १९४० रोजीं इटलीनें अल्बेनियांतून ग्रीसवर हल्ला करतांच जनरल मेटॅक्सच्या नेतृत्त्वाखालीं ग्रीसनें प्रतिहल्ले करण्यास सुरवात करून चढाईचें धोरण पत्करलें व अल्बेनियावर स्वारी केली व आतांपर्यंत दक्षिण अल्बेनियांतील बरीच महत्त्वाची ठाणीं काबीज करून इटालियन सैन्याचा अनेकदां पराभव केला आहे. हें युद्ध सुरूं होतांच ब्रिटिश सैन्य क्रीट बेटावर उतरलें. अशा रीतीनें ब्रिटिशांनीं प्रत्यक्ष सहाय्य दिलें आहे. अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. रुझवेल्ट यांनींहि ६ डिसेंबर १९४० रोजीं ग्रीसला सहाय्य करण्याचें जाहीर केलें आहे.

चीनः—७ जुलै १९३७ रोजीं चिनी व जपानी सैनिकांचें पेकिन जवळ (मार्कोपोलो ब्रिज येथें) भांडण झालें. या भांडणाचें निमित्त पुढें करून जपाननें चीन विरुद्ध लढाई चालू केली. डिसेंबर १९३७ मध्यें जपानच्या सैन्यानें नानकिंग ही राजधानी काबीज केली. यानंतर चिनी सैन्याची पिछेहाट होत जाऊन आतापर्यंत सर्व उत्तर चीन जपाननें जिंकला आहे. रशियाकडून चीनला शस्त्र सामुग्रीचें सहाय्य उघडपणें मिळतें. याशिवाय अमेरिका व इंग्लंकडूनहि थोडेंबहुत सहाय्य होत आलें आहे. चिआंग कै-शेकच्या नेतृत्त्वाखालीं अद्यापपर्यंत चीननें टिकाव धरला आहे एवढेंच नव्हे तर नोव्हेंबर १९४० मध्यें नानकिंग हें शहरहि परत जिंकलें आहे. चीननें या प्रसंगीं दाखविलेल्या एकजूट व सहनशीलतेबद्दल धन्यता वाटतें. जपाननें नानकिंग कॅन्टन, हँकौ इत्यादि ठिकाणीं फितूर लोकांचें सरकार उभें करून पाहिलें पण अद्याप जपानला यश मिळालेलें नाहीं. आजच्या परिस्थितीवरून चीन अखेरीस यशस्वी होईल असें वाटतें.

जपानः—चीनमध्यें जपानमधील वाढलेल्या लोकसंख्येची सोय करण्यापेक्षां तेथील कच्चा माल मिळवणें हाच चीनवर स्वारी करण्याचा जपानचा मुख्य हेतू आहे. १९३७ पासून म्हणजे हिटलर-मुसोलिनीची गट्टी जमल्यावर जपानहि या दोघांना मिळाला व 'त्रिराष्ट्र करार' झाला. यानें एकमेकांचे व्यापारीसंबंध ब राजकीय मैत्री दृढ झाली. तरी पण १९३९ मध्यें जर्मनीनें रशियाशीं केलेल्या तहामुळें जपान जर्मनीच्या धोरणाबद्दल बुचकळ्यांत पडला आहे. त्रिराष्ट्र करारानें जपानला आशियाचें राजकीय भवितव्य ठरविरण्यास स्वातंत्र्य मिळालें. फिलिपाइन्स, हवाई, फ्रेंचइंडोचाइना, डच ईस्ट इंडीज, ऑस्ट्रेलिया व हिंदुस्थान या प्रदेशावर जपानचें साम्राज्य वाढविण्याची महत्त्वाकांक्षा जपानी राजकारणी पुरुषांत निर्माण झाली आहे. सध्यां जपानचें फ्रेंचइंडोचायनावर विशेष लक्ष आहे. चीनच्या युद्धांत आतांपर्यंत जपानचें सहा लाख सैन्य ठार झालें. भयंकर पैसा खर्च झाला असून लढाईचा ताण असह्य होत चालला आहे. आहे. युद्धाच्या हकीगतीसाठीं 'चीन' पाहा.

जर्मनी:—'हिटलर'चें चरित्र पाहा.

झेकोस्लोव्हाकिया:——१९३५ नंतर स्लाव्ह लोकांची (सुमारें ३०,००,०००) आपला प्रांत स्वतंत्र करण्याची मागणी जोरानें पुढें आली. हिटलरच्या वाढत्या आकांक्षामुळें नाझी पुढारी हेनलाईन यानें झेकोस्लोव्हाकियांतील जर्मन लोकांचा भाग स्वतंत्र करण्याची मागणी केली. परंतु या मागणीला नकार मिळतांच १९३८ च्या सप्टेंबरमध्यें हेनलाईननें झेकोस्लोव्हाकियांतील जर्मन लोकांच्या वस्तीचा भाग (हा भाग 'सुडेटेन' या नांवानें ओळखला जातो. सुडेटेन म्हणजे दक्षिणेकडील) जर्मनीला जोडण्याची मागणी पुढें केली. नाझींच्या प्रचार कार्यामुळें त्यांचे व झेक लोकांचे तंटे उद्भून दोन्हीं पक्षांत लहानसान झटापटी झाल्या. व या प्रश्नाला गंभीर स्वरूप आलें. हिटलरनें लढाईची धमकी दिली तेव्हां इंग्लंड, फ्रान्स आदि राष्ट्रांनीं पुढाकार घेऊन म्यूनिच करार (या नांवाचा लेख पाहा.) घडवून आणला. त्यामुळें सुडेटेन प्रांत जर्मनीला मिळाला. हिटलरच्या या यशानें हंगेरी व पोलंड यांनींहि झेकोस्लोव्हाकियांतील कांहीं भागांच्या मागण्या पुढें केल्या व पोलंडला ओल्सा प्रांत द्यावा लागला. त्याचप्रमाणें स्लोव्हाकियाच्या दक्षिणेकडील कांहीं भाग व सब्-कार्पेथिक रशिया हा भाग हंगेरीला मिळाला. झेकोस्लोव्हाकियाला असुरक्षित सरहद्द तेवढी राहिली. अध्यक्ष बेनेश राजिनामा देऊन परदेशीं गेला. नंतर बिरान यानें आपल्या हातीं सत्ता घेतली व फेडरेशनच्या पद्धतीवर झेक, स्लोव्हाक व रुथेनियन असे त्याचे तीन स्वयंशासित घटक तयार केले. जर्मनीनें स्लोव्हाक लोकांचें बंड करविलें व यामुळें जर्मनीच्या शांततेला धोका येईल असें जाहीर करून ही आपत्ती टाळण्यासाठीं १५ मार्च १९३९ रोजीं हिटलरनें जर्मन सैन्य झेकोस्लोव्हाकियांत पाठविलें. अध्यक्ष हाचानें हिटलरच्या सत्तीपुढें मान वाकविली व झेकोस्लोव्हाकिया जर्मनीच्या संरक्षणाखालचा प्रदेश म्हणून जाहीर झाला. हिटलरनें स्लोव्हाकिया प्रांत स्वतंत्र केला. अशारीतीनें गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं झेक लोकांनीं फ्रान्स व इंग्लंडमध्यें आपल्या सैन्याच्या तुकड्या उभारून स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं धडपड चालविली आहे.

टर्की:—१० नोहेंबर १९३८ रोजीं केमालपाशा मृत्यु पावला व त्याचा पहिल्यापासूनचा सहकारी इस्मेट इन्योन्यू हा अध्यक्ष बनला. त्यानें केमालपाशाचें धोरण पुढें चालविलें आहे. १९३८ मध्यें अलेक्झांड्रेटा टर्कीस मिळालें. इंग्लंड, फ्रान्स व टर्कीचा १९ आक्टोबर १९३९ रोजीं परस्पर सहाय्याचा व टर्कीवर कोणत्याहि युरोपियन राष्ट्रानें चढाई केल्यास किंवा भूमध्य समुद्रांतील लढाईत टर्की ओढला गेल्यास टर्कीला मदत करण्याचें व या तहाची अंमल बजावणी फक्त रशियाच्या बाबतींत करावयाची नाहीं. असें ठरलें. टर्कीनें रशियाशींहि मित्रत्वाचें धोरण स्वीकारलें असून चालू युद्धांत त्यानें तटस्थता स्वीकारली आहे. ता. १२।११।४० रोजीं बल्गेरियाशींही तह झाला आहे.

ट्रॉटस्की, लिऑन्:—मेक्सिको येथें यानें आपल्या मित्रास चहास बोलाविलें असतां त्या मित्रानें ट्रॉटस्कीच्या डोक्यांत हातोडीवजा पदार्थाचा घाव घातला व त्यामुळें ट्रॉटस्की २२ सप्टेंबर १९३९ रोजीं मरण पावला.

डेन्मार्क—९ एप्रिल १९४० रोजीं हिटरलनें डेन्मार्कवर हल्ला करून त्याच दिवशीं हा देश त्यानें आपल्या ताब्यांत घेतला.

नॉर्वे:—बंदरावरील मुख्य अधिकाऱ्याची खोटी सही घेऊन बर्गेन बंदरांत आपलें सैन्य उतरवून अकल्पित रीतीनें ९ एप्रिल १९४० रोजीं हिटलरनें स्वारी केली. लगेच वैमानिक सैनिकांचेंहि सहाय्य मिळालें व आवघ्या आठ दिवसाच्या आंत नॉर्वे जर्मनीच्या ताब्यांत गेला. ब्रिटननें जर्मनीच्या सैन्याशीं नॉर्विक बंदर व इतर ठिकाणीं लढाया दिल्या परंतु अखेरीस ब्रिटनला माघार घ्यावी लागली. नॉर्वेच्या लोकांनींहि थोड्या लढाया दिल्या परंतु त्यांचा पराभव होऊन १ मे १९४० रोजीं नॉर्वेतील लढाई सपल्याचें व नॉर्वेवर जर्मनसत्ता–प्रस्थापित झाल्याचें हिटलरनें जाहीर केलें. व पुढें नॉर्वेचे राजे हॅकन यांनींहि नॉर्वेतील युद्ध संपल्याचें जाहीर केलें.

पटवर्धन डॉ. माधव त्र्यंबक:—काबीळच्या विकारानें पुणें येथें ता. २९ नोहेंबर १९३३ रोजीं मृत्यु पावले. यांच्या स्मारकाची योजना आंखली असून तिच्या प्रीत्यर्थ दहा हजाराहून अधिक निधि जमला आहे.

पवार, शिवराम गणपत:—हे सप्टेंबर १९३९ मध्यें मरण पावले.

पेंढारकर, यशवंत दिनकरः— कवि ' यशवंत ' राव पेंढारकर यांनीं ' काव्य किरीट ' या नांवाचें काव्य श्रीमंत प्रतापसिंह महाराज गायकवाड (सं. बडोदें) त्यांना त्यांच्या राज्यारोहणप्रसंगीं अर्पण केलें. नंतर नोव्हेंबर १९४० मध्यें कवि यशवन्त यांची बडोदा दरबारचें ' राजकवि ' म्हणून नेमणूक झाली.

पोलंड :—१ सप्टेंबर १९३९ रोजीं जर्मनीनें पोलंडवर स्वारी केल्यानंतर पोलंडनें प्रतिकाराला सुरुवात केली. ३ सप्टेंबर रोजीं इंग्लंड व फ्रान्स पोलंडच्या बाजूनें युद्धांत पडलें. परंतु इंग्लंड फ्रान्सला चांगलीशीं मदत करतां येण्यापूर्वी पोलंडचें युद्ध संपलें. १७ सप्टेंबर रोजीं रशियानें पूर्वबाजूनें अकस्मात हल्ला केला. २७ सप्टेंबर रोजीं वॉरसा शहर पडलें व २९ सप्टेंबर १९३९ रोजीं रशिया व जर्मनी यांनीं परस्परांनीं जिंकलेल्या पोलंडच्या भूभागाच्या विभागणीबद्दल तह होऊन पोलंड नामशेष झालें.

फडके, प्रो. नारायण सीतारामः—यांची १९३९ च्या रत्नागिरी येथें भरलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष स्थानीं निवड झाली. या वेळच्या अध्यक्षीय भाषणांत त्यांनीं मराठी वृत्तपत्रांतील अश्लील, अनृत; व अमर्याद वैयक्तिक टीका लेखांबद्दल निषेध प्रदर्शित करून एक मोठें आंदोलन घडवून आणलें.

फ्रान्सः— ३ सप्टेंबर १९३९ रोजीं सायंकाळीं पांच वाजतां पोलंडच्या बाजूनें फ्रान्सनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें. १६ मे १९३९ रोजीं जर्मन सैन्य सेडानच्या उत्तरेकडून फ्रान्समध्यें घुसलें. जनरल गॅमेलीन यानें बचावाचें धोरण स्वीकारलें. दलादिये व रेनो या मुख्य प्रधानांनीं जर्मनीच्या जबरदस्त हल्ल्यापुढें तोंड देण्याची पराकाष्ठा केली. मे महिन्यांत गॅमेलीनच्या ऐवजीं जनरल वेगाँ यांची नेमणूक झाली. १० जूनला इटलीनें फ्रान्स विरुद्ध युद्ध पुकारलें. व शेवटीं मुख्य प्रधान रेनो यांनीं राजिनामा दिला व मार्शल पेटाँ फ्रान्सचे मुख्य प्रधान झाले व १७ जून १९४० रोजीं फ्रान्सनें युद्ध तहकुबीची याचना केली व २४ जून १९४० रोजीं युद्ध तहकुबीच्या तहावर सह्या होऊन हिटलरनें युद्ध बंद झाल्याचें जाहीर केलें. सध्यां जर्मन सैन्य फ्रान्सच्या उत्तरेकडील ⅔ भागांत असून फक्त दक्षिण फ्रान्स फ्रान्स सरकारच्या ताब्यांत आहे. जनरल डी गॉल या फ्रेंच सेनापतीनें जर्मनीविरुद्ध लढण्याचा निश्चय जाहीर केला व इंग्लंडच्या सहाय्यानें युद्ध चालू ठेवलें. नुकतेंच त्याला आफ्रिकेंत कांहीं वसाहती घेण्यांत यश मिळालें असून इतरहि फ्रेंच वसाहतींत डी गॉलला पाठिंबा मिळत आहे. ७ जुलै १९४० रोजीं मा० पेटाँच्या सरकारनें इंग्लंडशीं सर्व संबंध तोडले. हिटलरनें आलसेस व लॉरेन हे प्रांत जर्मनीला जोडले असून इटलीलाहि फ्रान्सचा थोडा भाग मिळाला. सध्यां सयाम व फ्रेंच इंडोचायना यामध्यें युद्ध चालू असून सयामला फ्रेंच इंडोचायना पैकीं कांहीं भाग हवा आहे.

बेल्जियम :—१० मे १९४० रोजीं हिटरलनें बेल्जियमवर हल्ला केला. तेव्हां राजा लिओपोल्ड (तिसरा) यानें स्वतः सेनापतिपद स्वीकारून जर्मनीच्या सैन्याला तोंड दिलें. परंतु भयंकर मनुष्यहानी झालेली पाहून व आणखी मनुष्य हानी होऊं नये म्हणून २७ मे १९४० रोजीं बेल्जियम सैन्यानें शस्त्रें खालीं ठेवलीं व २८ मे ला बेल्जियमवर जर्मनीचें अधिराज्य स्थापन झालें. राजा लिओपोल्ड जर्मनांचा कैदी आहे.

मार्कोनी, गॉलिएल्मो (पृष्ठ १५७७):—मृत्यु सन १९३९ पडला आहे. त्या ऐवजीं १९३७ वाचावा.

मासारिक, टॉमस गॅरिग (पृष्ठ १५८४):— मृत्यु १४ सप्टेंबर १९३७

राजाराममहाराजः— श्रीमन्महाराज सर राजाराम छत्रपति सरकार करवीर हे ग्वाल्हेरास कै. माधवरावमहाराज शिंदे यांच्या पुतळ्याचा अनावरण विधि उरकून मुंबईस परत आले व २६ नोव्हेंबर १९४० रोजीं दुपारीं हृदयक्रिया बंद पडून निवर्तले. महाराजांच्या निधनानें अखिल महाराष्ट्राला वाईट वाटलें.

लेखकांची सूचि

आनंदकर, कु. पिरोज B. A., B. T., T. D. मुंबई
कौटुंबिक शिवणकाम, गृहसौंदर्य, पाकशास्त्र, केशभूषा किंडरगार्टन

आपटे, श्रीमती इंदिराबाई वामन, नागपूर.
चूल.

आपटे, डॉ. वाय. जी.
सार्वत्रिक कौटुंबिक बजेट.

आंबडेकर, वीरेश्वर नीळकंठ A. R. I., B. A. मुंबई.
काँक्रीट, वास्तुकला व वास्तुशास्त्र, घाट, फोटोग्राफी

आंबेकर, प्रो. वि. बा. M. A., मुंबई
मराठी लघुकथा

ओतुरकर, प्रो. रा. वि. M. A. पुणें
न्या. मू. म. गो. रानडे, शिवाजी

कबनूरकर, रा. भास्कर शामराव B.A. B.T. कोल्हापूर
चीन, जपान, टर्की, डिसेंबर, तिबेट, अक्षांश-रेखांश तुंगभद्रा, तुर्कस्थान, ध्रुव, ढग ध्रुवप्रदेश नोव्हेंबर, पृथ्वी, फेब्रुवारी, ग्रीष्म, ग्रीनलंड, ग्रीस गंगा

कर्वे, रा. चिं. ग. B. A. पुणें.
केतकर, डॉ. श्रीधर व्यंकटेश,
खरे, वासुदेव वामन, ब्रह्मेंद्रस्वामी, महावीर

कानिटकर, श्रीमती चंपूताई,
खाद्य पदार्थ बनविण्याच्या रीति.

काळे, श्री. दि. वि. M. A. पुणें
राजवाडे, कै. इतिहासाचार्य वि. का. व रामदास.
भाऊसाहेब पेशवे, गोविंदपंत बुंदेले

कुऱ्हाडे, रा. ग. कृ. कोल्हापूर
आर्यसमाज

कुलकर्णी, प्रो. कृष्णाजी पांडुरंग M. A. B. T. मुंबई
भाषाशास्त्र आणि मराठी

कुलकर्णी, केशव रामचंद्र, कोल्हापूर
कपडे, कांहीं पक्षी, व पशू यांचीं वर्णनें, कांहीं ऐतिहासिक व कांहीं पौराणिक चरित्रें, कांहीं शहरांचीं माहिती, कांहीं नद्या व पर्वत.

कुलकर्णी, वामन हरी M. Ag. रत्नागिरी.
फळें, फुलें व भाज्या या संबंधींचे १ ते ५ भागां-

कुलकर्णी, प्रो. वि. ह. M, A. मुंबई
वाङ्मय

कुलकर्णी, वैद्य स. ब. दुधगांवकर, कोल्हापूर
रोग व उपचार यासंबंधींची आयुर्वेदिक माहिती भाग १ ते ५ मधील.

प्रो. कुंभारे, M. A. पुणें
बाजीराव (पहिला)

केळकर, ॲ. काशिनाथ नरसिंह, मुंबई
फलज्योतिष

कोलते, प्रो. वि. भि. एम्. ए.
मानभावी पंथ व वाङ्मय.

कोल्हटकर, प्रो. वासुदेव यशवन्त, M.A. M. Sc. पुणें
बँकेच्या व्यवहारासंबंधीं १ ते ५ भागांतील लेख.

खरे, रा. ग. ह., पुणें
शहाजी भोसले

खांडेकर, रा. वि. स. कोल्हापूर
लघुकथा व कादंबरी.

खानवेलकर, रा. श्री. शं. M. A. पुणें
केळकर, श्री. न. चिं. यांचें चरित्र.

खांबेटे, रा. म. ल. B. A. L. L. B. जळगांव
रत्नें

गाडगीळ पांडुरंग वामन, पुणें
कम्यूनिझम्, फॅसिझम्, बोल्शेविझम्, सोशॅलिझम्

गोहीन, डॉ. जे. एल., सांगली
कोंबड्या

घाटगे, डॉ. अमृत माधव M. A. Ph. D. कोल्हापूर
जैनधर्म

चितळे, रा. शं. रा. पुणें
गो. स. सरदेसाई

जोशी, रा. शंकरराव पुणें
राजाराम छत्रपति, माधवराव पेशवे

जोशी, न. वि. B. A. LL. B.
ताल

ठकार, कै० वासुदेव नारायण, कोल्हापूर.
अंत्यसंस्कार

रा. डिकसळकर, पुणें
शाहू छत्रपति

डॉ. शिंदे, जी. बी. L. C. P. S. कोल्हापूर
३ ऱ्या भागांतील रोग व उपचार या विषयावरील लेख. लेले, रा. वि. गं.
बाजीराव (रघुनाथ) दुसरा

शेवडे. श्रीमती यमूताई, कोल्हापूर
पहिल्या चार भागांतील खाद्य पदार्थांचे कांहीं लेख.

श्रीखंडे, डॉ. रामचंद्र चिंतामण M. B. B. S. कोल्हापूर
भाग १ ला व ४ था या मधील रोग व उपचार यावरील लेख, काव्य व मानवी शरीर

सबनीस, कृष्णाजी गणेश B. A., S. T. C. कोल्हापूर
डाल्टन पद्धति व कांहीं चरित्रें

सबनीस, रा. सौ. सुशिलाबाई, कोल्हापूर
पहिल्या चार भागांतील खाद्य पदार्थांसंबंधीचे कांहीं लेख

सातवळेकर, पंडित श्रीपाद दामोदर औंध
गृहस्थाश्रम, वेदान्त व संन्यासाश्रम

चित्रें

पहिल्या भागांतील—श्री' इंगळहळ्ळीकर व श्री. ग. रं. भिडे

दुसऱ्या व चौथ्या भागांतील—वसंतराव जाधव

तिसऱ्या भागांतील–श्री. इंगळहळ्ळीकर रा. बाळ गजबर

पांचव्या भागांतील—श्री. वसंतराव जाधव व श्री. ग. रं भिडे

आधारभूत ग्रंथांची माहिती.

एवढ्या या मोठ्या कामाला किती तरी लेखांचा, व्याख्यानांचा, पुस्तकांचा व ग्रंथांचा उपयोग झालेला आहे. त्यापैकीं कांहींची नांवें पुढें दिलेलीं आहेत.—

एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका (१४ वी आवृत्ती)
डबल डे एन्सायक्लोपीडिया
ग्रेशॅम एन्सायक्लोपीडिया
दि न्यू एज्युकेटर एन्सायक्लोपीडिया
दि वर्ल्ड ऑफ वंडर्स
नॅचरल हिस्ट्री.
वन् थाउजंड हीरोज
महाराष्ट्रीय ज्ञानकोश
चरित्रकोश (प्राचीन व मध्ययुगीन).
ज्योतिर्विलास
'प्रतिभा' पाक्षिकाचे अंक
ए. बी. सी. ऑफ् इंटर नॅशनल पॉलिटिक्स
हिंदुधर्म विश्वधर्म.
मराठी साहित्य सभालोचन.
अर्वाचिन वाङ्मय सेवक खंड १ व २
हिंदुस्थानांतील पक्षी
दि सर्व्हे ऑफ सिव्हिलिझेशन
महाराष्ट्र सांवत्सरिक
विज्ञान बोध
ॲन् औटलाइन ऑफ् वर्ल्ड हिस्टरी
दि स्टोरी ऑफ् मनकाइंड
सत्यार्थ प्रकाश
कुराण
हिस्ट्री ऑफ् हिंदुधर्मशास्त्र, प्रो. काणे
हिंदू लॉ, प्रो. घारपुरे

व्यावहारिक ज्ञानकोश

—विषय-सूचि—

भाग पहिला

पुरवणी १

पुरवणी २